# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

सभा क्र.१/२०२१ दिनांक १९.०६.२०२१

स्थळ- web based Microsoft team या ॲपव्दारे वेळ- दुपारी ०१.०० वाजता

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.१२०/२०१९ यावर दि. ०९/१०/२०१९ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा शनिवार दि.१९.०६.२०२१ रोजी सकाळी ११.०० web based Microsoft team या ॲपव्दारे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/ वशी-०४/८६५/२०२१, दि.१६.०६.२०२१ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार सदरहु सभा शनिवार दि.१९.०६.२०२० रोजी दुपारी ०१.०० web based Microsoft team या ॲपव्दारे सुरु करण्यात आली. काही अपरिहार्य कारणास्तव सदरहु सभा सकाळी ११.०० ऐवजी दुपारी ०१.०० वाजता सुरु करण्यात आली.

या सभेस web based Microsoft team या ॲपव्दारे खालील मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्रीकांत आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर. तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.

२. मा.श्री. कान्हूराज बगाटे, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी. तथा सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.

३. मा.श्री.भानुदास ह. पालवे, अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक, तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती

४. मा.श्रीमती गीता प्र.बनकर, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर, तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

त्यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

विषय नं.०१ चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.

1. दि.१९.१२.२०२० रोजी झालेल्या तदर्थ समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

---

2. संरक्षण विभागाकडील बॅगेज स्कॅनरचे दुरुस्ती देखभालकामी वार्षिक कंत्राट देणेकामी प्राप्त ई-निविदेतील निम्नतम दरधारक मे.क्रिस्टल व्हीजन इमेज सिस्टिम्स प्रा.लि. पुणे यांचेशी चर्चा वाटाघाटीअंती प्राप्त दराची निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

---

३. श्री साईबाबा मंदिरालगत पर्यटन पोलीस चौकी निर्माण करणेकामी पोलीस विभागास निधी उपलब्ध करुन देणेबाबत.

---

४. श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक असणारे N-95 Face Mask खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.

---

५. Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून दैनंदिन वापराकरीता आवश्यक असणारे सॅनीटायझर तातडीने खरेदीकामी पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

---

६. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये नव्याने कार्यान्वीत होणा-या विविध वॉर्ड/विभागाकरीता ऑक्सिजन व नायट्रस गॅसच्या पाईपलाईनचे काम करणेकामी M/s United Services, Kalyan यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

---

७. श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेच्या कामकाजाच्या ई-निविदा प्रक्रियेबाबत.

---

८. शिकाऊ इंटर्न डॉक्टर्स यांचे करीता श्री साई प्रसादालय विभागामार्फत मोफत नाष्टा पाकिटे मिळणेबाबत.

---

९. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत परिचारक/ परिचारीकांचा नेमणूक करारांचा कालावधी संपुष्टात येत असलेबाबत.

---

१०. दर्शनरांगेमधील कोरोना संशयित साईभक्त रुग्णांची Rapid Antigen Test करणेकामी आवश्यक असणा-या Strips खरेदी करणेकामी Short notice E-Tender प्रक्रिया राबवून प्रशासकीय पातळीवर प्राप्त निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेस व व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

११. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक रिक्त पदे भरणेबाबत.

---

१२. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२१-२२ या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्याचे दर निश्चित करणे (Rate Contract) तसेच On Consignment Basis वरील Material खरेदीकामी पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

---

१३. संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.२१,१७,७६८/-मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.

---

१४. संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.११,६८,५२६/-मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.

---

१५. संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.३,७२,९८८/-मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.

---

१६. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये १२०० LMP Oxgen Generation Plant उभारणीकामी तातडीची बाब म्हणून दरपत्रकाव्दारे खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

---

१७. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षिक सन २०२०-२१ ची छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

---

१८. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये नोव्हेंबर-२०२० महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.४१,१२,८८२/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

१९. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये डिसेंबर-२०२० महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.५९,४१,९९०/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

२०. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जानेवारी-२०२१ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.७२,९३,४६९/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

२१. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये फेब्रुवारी-२०२१ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.६८,१८,१७०/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

२२. श्री साईनाथ रुग्णालयात भूलतज्ञांची व्हिजीटींग पध्दतीने ऑनकॉल सेवा घेणेकामी तयार केलेला पॅनल सुरु ठेवणेबाबत.

---

२३. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड व विभागाकरीता Multiparameter Monitor खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.

---

२४. नविन कार्डीयाक रुग्णवाहीकेकरीता Biphasic Defibrillator खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.

---

२५. श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रयोगशाळा या विभागाकरीता जुने Immunoassay Analyser Buyback (परत) करुन नवीन Immunoassay Analyser खरेदी करणेबाबत.

---

२६. श्री साईबाबा रुग्णालयातील बायोमेडीकल विभागाकरीता Air Compressor व Vacuum Compressor with tank खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.

---

२७. श्री.संजय गोपीनाथ कोते, मदतनीस, बांधकाम विभाग यांचा वैद्यकीय बिलाचा परतावा मिळणेबाबतचा अर्ज.

---

२८. श्रीमती वर्षा मिलींद पवार लोणी यांचा त्यांचे पतीचा वैद्यकीय बिलाचा परतावा मिळणेबाबत अर्ज.

---

२९. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड व विभागाकरीता आवश्यक असलेले Syringe Pump खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.

---

३०. Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक असणारे औषधे खरेदी करणेबाबत.

---

३१. Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक असणारे कन्झुमेबल व सर्जिकल साहित्य खरेदी करणेबाबत.

---

३२. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता ऑक्सीजन व नायट्रस गॅस मंजूर दराने खरेदीस व याकामी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

---

३३. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक रिक्त पदे भरणेसाठी थेट मुलाखती घेणेकामी गठीत करावयाचे समितीमध्ये तदर्थ समितीमधील एक सदस्य निश्चित करणेबाबत.

---

३४ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध माशिन्सचे सन २०२१-२२ करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.

---

३५ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागात न होणा-या तपासण्या बाहेरील लॅबधारकांकडून आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी कोटेशन मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

---

३६ श्री साईनाथ रुग्णालयातील X-ray या विभागाकरीता जुने X-ray Machine परत (Buyback) करुन नविन Floor Mounted digital Radiography system with Dual Detector खरेदी करणेबाबत.

---

३७ संस्थानच्या श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात नव्याने सुरु होणा-या RTPCR Lab साठी Consumbale मटेरिअल खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

३८ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरीता ECG Machine खरेदी करणेकामी पुरवठा आदेश देणेबाबत.

---

३९ श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलमध्ये नविन HMIS (Hospital Management Information System) संगणकीय प्रणाली PACS (Picture Archiving and Communication System) प्रणालीसह कार्यान्वीत करणेकामी येणा-या अंदाजीत खर्चास व याकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.

---

४० शिर्डी येथे जम्बो कोविड सेंटर चालू करणेबाबत.

---

४१ १० लिटर क्षमतेचे ५५०० नग Oxyen Concentrator Machine खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

४२ दोन्ही हॉस्पिटलमध्ये सुरु असलेल्या Internet सुविधेकरीताचे सध्याचे कार्यान्वीत असलेले Firewall Router चे 3 वर्ष कालावधीसाठी License Subscription चे Upgradation करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

४३. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये दि.२९ मार्च ते २ एप्रिल, २०२१ या कालावधीत मोफत जयपूर फुट शिबीराचे आयोजन करणेस व येणा-या अंदाजे तीन लाख पन्नास हजार रुपये खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

४४. श्री साईनाथ रुग्णालयात दि.२४ ते २५ एप्रिल,२०२१ या कालावधीत किडणीस्टोन शिबीराचे आयोजन व त्याकामी लागणा-या रक्कम रु.५,००,०००/- मात्रचे अनुषंगीक खर्चास मान्यता देणेबाबत.

---

४५. श्री.हरिभाऊ महादेव धुमाळ यांस वैद्यकीय आर्थिक अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत.

---

४६. श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपात्या) /पुरी मनुष्यबळाव्दारे तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

---

४७. श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती मशिनव्दारे चपाती तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

---

४८. श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

---

४९. श्री साई प्रसादालयातील हाऊस किपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलकामी तसेच वाढपी कामगार पुरविणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

---

५०. पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील (पी.व्ही.पी.पी.) महाविद्यालय, प्रवरानगर येथे उभारण्यात येणा-या हॉस्पिटलमधील रुग्णांना नाष्टा व जेवण पुरविणेबाबत.

---

५१. जुन्या वाहनांचा फेर लिलाव तसेच निरुपयोगी डेडस्टॉक भंगार साहित्याची जाहीर लिलावाने विक्री करणेबाबत.

---

५२. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामधील संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणा-या निरुपयोगी भंगार / सादिल स्वरुपाच्या साहित्याची विक्री करणेकामी ई-निविदा मागविणेबाबत.

---

५३ सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात निरुपयोगी भंगार साहित्य विक्रीकामी प्राप्त ई-निविदेतील उच्चतम दरासंदर्भात निर्णय होणेबाबत.

---

५४. संस्थान आयकर कामकाजाची निकड व कालमर्यादा विचारात घेऊन नव्याने कर सल्लागार लेखापरिक्षण संस्थेची नियुक्ती करणेबाबत..

---

५५. आर्थिक वर्ष २०१९-२० च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन शासनास सादर करण्यास मान्यता मिळणेबाबत.

---

५६. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०२०-२१ चे सुधारित अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

---

५७. संस्थानचे नावाने परकीय चलनासंबधीत बचत खाते स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा, नवी दिल्ली येथे उघडणेबाबत.

---

५८. आयकर कायद्यातील तरतुदीन्वये सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबत.

---

५९. माहे ऑगस्ट-२०२० ते नोव्हेंबर-२०२० मासिक जमा खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.

---

६०. दि. २५.११.२०२० व दि. १२.०१.२०२१ रोजी दक्षिणापेटीतील रक्कम मोजणी करत असतांना त्यामध्ये प्राप्त झालेल्या सोन्याचा मुलामा असलेल्या श्री साईबाबांची मुर्ती फोटोंच्या फ्रेमबाबत.

---

६१. सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या दोन वर्षामध्ये प्रत्येक वर्षी रु.५० कोटी असे एकूण रु.१०० कोटी इतका निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडून शिर्डी विमानतळाच्या विकासासाठी देणेच्या प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.

---

६२. श्री साईबाबा संस्थानचे CSR Registration करणेबाबत.

---

६३. आर्थिक अनुदान मागणीकरीता आलेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत. (नस्तीबध्द)

---

६४. आर्थिक अनुदान मागणीकरीता आलेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत. (नस्तीबध्द)

---

६५. संस्थानचे आयकर विषयक संपुर्ण कामकाज करणेकामी पात्र झालेले लेखापरिक्षण संस्थाचा तुलनात्मक दर तक्त्याचे अवलोकन होऊन कर सल्लागार नेमणूक होणेबाबत.

---

६६. पुर्व लेखापरिक्षण (Pre-Auditor) कामकाज करणेकामी पात्र लेखापरिक्षण संस्थाचा तुलनात्मक दर तक्ता याचे अवलोकन होऊन पुर्व लेखापरिक्षक नेमणूक होणेबाबत.

---

६७. आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता वैधानिक लेखापरिक्षक नियुक्ती कामी प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा फीचा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ व शासनास सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

६८. करनिर्धारण वर्ष २०१८-१९चे करनिर्धारण आदेशाविरुध्द आयकर विभागाकडे अपील करण्यास मान्यता मिळणेबाबत.

---

६९. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता अंतर्गत लेखापरिक्षण नियुक्ती कामी प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा फीचा तुलनात्मक तक्ता शासनास सादर करणेबाबत.

---

७०. स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा श्रीरामपूर यांचेकडून ए.टी.एम.व्दारे प्राप्त होणा-या देणगी रक्कमेचे रिपोर्ट मिळत नसल्याने सदर खाते स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी येथे वर्ग करणेबाबत.

---

७१. माहे डिसेंबर-२०२० व जानेवारी-२०२१ मासिक जमा खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.

---

७२. संस्थान व रुग्णालये विभागाकडील मालमत्ता विमा, कामगार कायदा १९२३ अन्वये कर्मचारी विमा व श्री साईभक्तांचा अपघाती विमा पॉलीसीचे नुतनीकरणासाठी राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून बंद पाकीटामध्ये दरपत्रक मागविणे व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

७३. संस्थानचे परकीय चलनाच्या नोंदणी प्रमाणपत्राचे (FCRA) नुतनीकरण करणेबाबत.

---

७४. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना प्रस्तावात नमुद १४ ठिकाणी कोरोना बाधीत रुग्णांसाठी तातडीने ऑक्सिजन पुरवठा करणेकामी

ऑक्सिजन (PSA) युनिट उभारणीकामी रु.९०३.२८ लक्ष विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावावर निर्णय घेणेबाबत.

---

७५. सन-२०२१ ची श्री साई दैनंदिनी /दिनदर्शिका छपाई करणेसाठी निम्नत्तम दर देऊ केलेल्या निविदाधारकांना कार्यादेश देणेबाबत.

---

७६. सन-२०२१ चे साईलिला व्दैमासिके मराठी व हिंदी-इंग्रजी तसेच वितरणकामी पाकीटे छपाई करणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदेतील निम्नतम दर निश्चिती तसेच निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.

---

७७. 'श्री साईबाबा एक अद्भूत अवतार' या हिंदी पुस्तकाचे प्रकाशनाबाबत.

---

७८. सन २०२०-२१ (दि.१.१०.२०२० ते ३१.०३.२०२१) देणगीदार व मान्यवरांना भेट देण्यात आलेली प्रकाशने किंमतीसह खर्ची टाकणेबाबत.

---

७९. मा.उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, मा. उच्च न्यायालयाने नेमलेल्या तदर्थ समितीचे अध्यक्ष, सदस्य, मा.राहाता व कोपरगाव न्यायालयाचे न्यायाधीश, मा.व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य व मा.अधिकारी वर्ग यांना श्री साईबाबा दैनंदिनी, दिनदर्शिका व कार्यालयीन दिनदर्शिका विनामुल्य भेट देणेबाबत.

---

८०. श्री रामनवमी उत्सव-२०२१ कार्यक्रमाचे नियोजन व उत्सव साजरा करणेसाठी येणारे खर्चास अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

---

८१. संस्थानमार्फत साज-या होणा-या सन २०२१ मधील तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

८२. श्री साईबाबा समाधी मंदिर परीसरातील सध्याचे साई सभागृह/पारायण हॉल मध्ये मिटींग हॉल तयार करणे साठी फर्निचर व इंटेरीअर कामे करणेसाठी अपेक्षित रक्कम.रु.४६,०५,०००/-मात्रचे अंदाजपत्रकिय खर्चास तसेच याकामी ई-निवीदा मागविणेसाठी मान्यता देणेबाबत.

---

८३. श्री साईबाबा समाधि मंदिर परीसरातील साई सभागृह अथवा पारायण हॉलचा वापर प्रतिक्षालय (वेटिंग हॉल) म्हणुन करणेसाठी सदर हॉल मध्ये फर्निचर व इंटेरीअर कामे करणेसाठी अपेक्षित रक्कम

रु.८,६५,०००/- मात्रचे अंदाजपत्रकिय खर्चास तसेच याकामी ई-निवीदा मागविणेसाठी मान्याता देणेबाबत.

---

८४. सर्व्हे नं.१२४ मधील भांडार इमारतीचे छताचे पत्रे बदलणे, रंगकाम करणे व इतर अनुषंगीक कामासाठी अंदाजे रु.३९,६२,७५५/-मात्र खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

८५. संस्थान निधीतून शिर्डी शहरातील सहा रस्ते विकसन कामाचे ठेकेदार टारमॅट लि.यांचे रु.१९,४३,७५,४०८/- मागणीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.०६.११.२०२० रोजीचे ऑर्डरने निवृत्त न्यायमुर्ती श्री.आर.एम.सावंत यांची Sole Arbitrator म्हणून केलेली नेमणूक दि.०२.१२.२०२० रोजी झालेल्या Preliminery meeting चे इतिवृत्त तसेच संस्थान वकील ॲड. शानबाग यांचे फीबाबत.

---

८६. श्री साईबाबा समाधी मंदिरातील स्टेनलेस स्टिल रेलिंग काढून सागवान लाकडाची डीझाईन मधील रेलिंग करणेकामी येणारे रक्कम रु.१,६९,३०,६४०/-मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबत.

---

८७. संस्थानचे मंदिर परिसरातील गुरुस्थान समोरील तळघरात स्ट्रॉगरुमचे बांधकाम करणेसाठी रक्कम रु.६५,००,०००/- मात्रचे सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चास व विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देणेबाबत.

---

८८. संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे गट नं.१९५ मधील हेलीपॅड येथील वेटींग लाऊंजचे नुतनीकरण करणे आणि हेलीपॅड व वेटींग लाऊंजचे मधील भागात पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामांसाठी येणारे रु.२५,५०,०००/-मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास व सदर कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता देणे व हेलीपॅडचा वापर आकार कमी करणेस मान्यता देणेबाबत.

---

८९. श्री रामनवमी उत्सव -२०२१ निमित्त साईभकतांचे सुविधेकरीता ऊन, वारा, पावसापासून संरक्षण होणेकामी संस्थान परिसरात तसेच पायी पालखी घेऊन येणारे साईभक्तांचे निवा व्यवस्थेकरीता पालखी मार्गावर तात्पुरती मंडप व्यवस्था उभारणेकामी येणारे रक्कम रु.१६,३३,५२८/-मात्रचे खर्चास व याकामी संबधीत मंडप ठेकेदाराकडून ई-निविदा मागविणेस मान्यता देणेबाबत.

---

९०. संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे गट नं.२४५/१ पै. मधील नविन साठवण तलावात गोदावरी उजवा तट कालव्यानुसार पाणी घेणेसाठी जलवाहीनी टाकणे व इतर अनुषंगीक कामांकरीता सल्लागार नियुक्ती करणेसाठी प्राप्त झालेल्या ई.आर.एफ.पी. प्रस्तावातील निम्नतम दराची ई-निविदा स्विकारणेकामी निर्णय होणेबाबत.

---

९१. सन २०२१ चे उन्हाळयाच्या कालावधीत दि.०१.०३.२०२१ ते दि.१५.०६.२०२१ अखेर १०७ दिवस साईभक्तांचे उन्हापासून व पावसापासून संरक्षण होणेसाठी संस्थान परिसरात ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणेकामी येणारे रक्कम रु.१४,०५,०००/- मात्रचे खर्चास व याकामी संबधीत मंडप ठेकेदारांकडून ई-निविदा मागविणेस मान्यता देणेबाबत.

---

९२. श्री साईबाबा हॉस्पिटल येथील सीव्हीटीएस ओटी, जनरल ओटी व न्युरो ओटी मध्ये ग्रेनाईट प्लोरिंग बसविणेस तसेच रंगकाम करणेसाठी येणा-या अपेक्षीत रु.११,१९,३२३/-मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणेबाबत.

---

९३. श्री साईबाबा हॉस्पिटलचे दक्षिण बाजुस असलेले साईनगर कर्मचारी वसाहत येथील मैदानास वाहन पार्किंग करीता चेनलिंक फेसींगचे कंपाऊंड तयार करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत रु.२८,१९,४६२/- मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणेबाबत.

---

९४. श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकामासाठी एकूण रु.१५७.४०५ कोटी मात्रचे सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देणे तसेच सदर वाढीव बांधकामासाठी ई-निविदा मागविण्यात याव्यात अथवा सदर वाढीव बांधकाम ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा.लि.मुंबई यांचेकडून सध्या प्रगतीत असलेल्या (G+2) इमारत बांधकामासाठीचे निविदादराने तसेच करारातील अटी व शर्तीनुसार करुन घेणे यावर निर्णय होणेबाबत.

---

९५. श्री साईबाबा शताब्दी सोहळयानिमित्त कोपरगाव-कोल्हार रस्ता (प्र.रा.मा.०८) यावर तात्पुरत्या स्वरुपात उभारलेल्या स्वागत कमानीचे फायबर क्लॅडींगचे दुरुस्ती/नुतनीकरण करणेकामी येणारे रक्कम रु.८,८९,९००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

९६. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये १२०० LPM क्षमतेच्या Oxygen Generation Plant उभारणेकामी आवश्यक सिव्हील कामे करणेकामी

येणारे रक्कम रु.३९,०२,०००/-मात्रचे खर्चास मान्यता मिळणे तसेच तातडीची बाब म्हणून कमी (३ दिवस) कालावधीचे ठेकेदाराकडून कोटेशन मागविणेस, निम्नतम दर देणारे ठेकेदारास कार्यादेश देणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

---

९७. श्री समाधी मंदिर परिसरातील शांतीनिवास इमारतीचे प्रशासकीय कार्यालय, पॅसेज व जिन्याला ग्रेनाईट फ्लोरींग करणे कामाचे ठेकेदार साई श्रध्दा कन्सट्रक्शन, भाईंदर ठाणे यांचे अंतिम देयक रक्कम रु.११,७८,९५८/- मंजूर करणे व त्यापैकी उर्वरीत देय रक्कम रु.४,६१,९८१/- ठेकेदार यांना अदा करणेस मंजुरी देणे.

---

९८. साई आश्रम भक्त निवासस्थान येथे उभारण्यात आलेल्या टेंसाईल फॅब्रिक शेडचा वापर तात्पुरत्या स्वरुपात कोविड-१९ चे रुग्णांकरीता बेड टाकून करणेस तसेच त्याकरीता सध्याचे शेडची लांबी १२० फुटाने वाढविणेस व त्याकामी येणारे रक्कम रु.५७,०७,५००/-मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास व याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

---

९९. सन २०२१-२२ करीता कॅन्टीन, प्रसादालय, मंदिर व लाडू निर्मीती विभागासाठी टोन्ड गाय दुध, पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर, पेपर पिशवी, पेपर कप खरेदीबाबत.

---

१००. सन २०२१-२२ (माहे ऑक्टोबर २०२१ ते माहे सप्टेंबर २०२२) करीता संस्थानचे विविध विभागांसाठी वार्षिक किराणा माल व अनुषंगीक साहित्य विहित पध्दतीने खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

१०१. संस्थानचे कंत्राटी कर्मचा-यांची बंद केलेली ४० टक्के वेतनवाढ पुर्ववत सुरु करणेबाबतचे प्रस्तावास चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत. (दि.१६.०२.२०२१)

---

१०२. सन २०२१-२२ करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करण्यासाठी ई-निविदा मागविणेस चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत. (२४.१२.२०२०)

---

१०३. सन २०२१-२२ करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करण्यासाठी ई-निविदा मागविणेकामी फेरप्रस्ताव सादर करणेस व व

निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत आहे त्या कॉन्ट्रक्टर्स यांना मुदतवाढ देणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत. (१६.०२.२०२१)

---

१०४. सन २०२१-२२ करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करण्यासाठी ई-निविदा मागविणेकामी फेरप्रस्ताव सादर करणेस व व निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत आहे त्या कॉन्ट्रक्टर्स यांना मुदतवाढ देणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत. (२५.०२.२०२१)

---

१०५. सन २०२१-२२ करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करण्यासाठी ई-निविदा मागविणेकामी फेरप्रस्ताव सादर करणेस व व निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत आहे त्या कॉन्ट्रक्टर्स यांना मुदतवाढ देणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत. (०१.०३.२०२१)

---

१०६. संस्थानचे कंत्राटी कर्मचा-यांची बंद केलेली ४० टक्के वेतनवाढ पुर्ववत सुरु करणेबाबतचे प्रस्तावास चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत. (दि.१०.०३.२०२१)

---

१०७. संस्थानला सन २०२१-२२ करीता कंत्राटी पध्दतीने सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करणेबाबत चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.(२०.०४.२०२१)

---

१०८. माहे जानेवारी-२०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी-२०२१ व तदनंतरचे वेतन अदा करणेबाबत.

---

१०९. माहे जानेवारी-२०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे मार्च-२०२१ चे वेतन सानुग्रह अनुदान म्हणून अदा करणेबाबत.

---

११०. ५९८ संस्थान कंत्राटी कर्मचारी यांनी मा.उच्च न्यायालय येथे दाखल केलेली रीट पिटीशन क्र.६२२४/२०२० मधील दि.६.१.२०२१ रोजीचे सुनावणीदरम्यान मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार कार्यवाही करणेबाबत.

---

१११. कर्मचारी निवासस्थान वापरास मुदतवाढ मिळणेबाबत श्रीमती सुरेखा मोहन यादव यांचे विनंती अर्जाबाबात.

---

११२. संस्थानचे बेंगलोर येथील माहिती केंद्रातील कुशल कंत्राटी कर्मचारी यांचे मुदतवाढीचे अर्जाबाबत.

---

११३. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे आस्थापनेवर वर्ग ०१ प्रवर्गातील ०२ राजपत्रित अधिकारी व उप जिल्हाधिकारी प्रवर्गातील ०१ यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती होणेबाबत.

---

११४. संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटमध्ये एकत्रित वेतनावर कंत्राटी पध्तदीने ११ महिने कालावधीसाठी नेमणूक दिलेल्या वैद्यकीय अधिकारी व आर.एम.ओ. यांना संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन दिल्यास त्यांचेकडून आकारावयाचे दरमहा भाडे निश्चीती बाबत.

---

११५. श्री साईबाबा संस्थानचे कंत्राटी कर्मचा-यांचे पाल्यांचा सन २०१८-१९ या वर्षाचा शैक्षणिक शुल्काचा परताव्याकामी रु.२,२२,८५३/-वाढीव खर्चास चक्रिय पध्दतीने मंजूरी मिळणेबाबत.

---

११६. सन २०२०-२१ कंत्राटी कर्मचारी यांचे पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा देणेबाबत.

---

११७. कायम कर्मचा-यांचे खाते चौकशीचे कामकाजाकरीता कंत्राटी पध्दतीने खाते चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक असलेले महाराष्ट्र शासनाचे पॅनलवरील सेवा निवृत्त कर्मचारी/अधिकारी यांचे प्राप्त अर्जाबाबत.

---

११८. श्री.अरुण गणपत जाधव, वायरमन, विद्युत विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.

---

११९. माहे जानेवारी-२०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे मे-२०२१ चे मानधन सानुग्रह अनुदान पित्यर्थ अदा करणेबाबत.

---

१२०. श्री.रघुनाथ भागा आहेर, प्र.कार्यकारी अभियंता तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचे मुदतवाढीबाबत.

---

१२१. सन २०२१-२२ या कालावधी करीता वाहन विभागाकडील १२५ वाहनांचा वार्षिक विमा नुतनीकरण करणेकामी निम्नतम दर देणारे विमा कंपनी

कडून विमा नुतनीकरण करुन घेणेस व येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

१२२. माहे एप्रिल-२०२१ ते मार्च-२०२१ या वर्षाकरीता फुटाणे प्रसाद, विडयाची पाने, पावडर मार्बल मूर्ती व काशी अष्टगंध पावडर खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणे व त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

१२३. संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता आवश्यक असणा-या सन २०२१-२२ या वर्षाकरीता व्यावसायिक १९ किलो चे गॅस सिलेंडर खरेदी करणेबाबत.

---

१२४. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये ज्युनियर केजी वर्गासाठी ऑनलाईन पध्दतीने नविन प्रवेश प्रकिया राबविणेस व मर्यादीत एकूण २५० प्रवेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

---

१२५. श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे यांना शिर्डी संस्थान परिसरात माहिती केंद्राकरीता जागा मिळणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास,मोहटे, ता.पाथर्डी यांचेकडील पत्र जा.क्रं. ५१/२०२० दि.११/०२/२०२०.

---

१२६. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना त्यांचे ३३/११ के.व्ही.उपकेंद्रासाठी संस्थान मालकीची मौजे निमगांव-को-हाळे येथील गट नं.८७ पैकी २४.५० आर व गट नं.८८ पैकी क्षेत्र २७.५० आर असे एकूण वापरास दिलेले क्षेत्र ०.५२ आर इतके (नवीन गट नं.८७/८८) क्षेत्राच्या जागा वापरास मुदतवाढ मिळणेबाबत मा.अतिरीक्त कार्यकारी अभियंता (स्था) स्थापत्य उपविभाग, महावितरण, अहमदनगर यांचेकडील पत्र क्रं. अकाअ (स्था)/बां व सु उपविभाग/अनगर/तांत्रिक नं.४९८ दि.२१/११/२०२० प्राप्त दि.१५/१२/२०२०.

---

१२७. संस्थान परिसरात साईभक्तांच्या सोयीसाठी प्रसाद नॉव्हेल्टी, दुध व दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय विक्री, जनरल स्टोअर्स, शालेय साहित्य इ.व्यवसायासाठी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डीयांना वापरास दिलेल्या संस्थान मालकीचे विविध १२ ठिकाणचे जागा/गाळे वापराची मुदतवाढ देणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं. श्रीसासंएक्रेसो/१५८/२०२१, दि.२५.०१.२०२१

---

१२८. महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्या., नाशिक यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे परिसरात नोगा ब्रॅण्ड फुड प्रॉडक्टस विक्री केंद्राकरीता वापरास दिलेल्या जागेच्या वापरास मुदतवाढ मिळणेबाबत.

---

१२९. संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१ पै.चे क्षेत्रातील मंदिर परिसर गेट नं.४ लगतचे जागेत साईभक्तांचे सोयीसाठी पादत्राणेगृह व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा पुरविणेकामी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना वापरास दिलेल्या जागा वापराची मुदत वाढवून देणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/१६२/२०२१, दि.२५.०१.२०२१ रोजीचे पत्र.

---

१३०. संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.२ पै.चे क्षेत्रातील मंदिर परिसर गेट नं.१ लगत साईभक्तांचे सोयीसाठी मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा पुरविणेकामी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना वापरास दिलेल्या जागा वापराची मुदत वाढवून देणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं. श्रीसासंएक्रेसो/ १६१/ २०२१, दि.२५.०१.२०२१ रोजीचे पत्र.

---

१३१. संस्थान परिसरात साईबाबा भक्तनिवासस्थानच्या पार्किंगमध्ये फळे विक्रीस परवानगी दिलेल्या फळविक्रेत्यांना तत्सवम ठिकाणी फळे विक्री करणेस मुदतवाढ देणेबाबत साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग यांचेकडील जा.क्र.१७२४ दि.१५.१२.२०२० रोजीचे पत्र.

---

१३२. गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील मोबाईल, कॅमेरा क्लोकरुम चालविणेस श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि. शिर्डी यांना मुदतवाढ देणेबाबत.

---

१३३. संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेमार्फत चालवत असलेल्या क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायास पुढील ११ महिन्यासाठीची मुदतवाढ मिळणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं. श्रीसासंएक्रेसो/१६३/ २०२१, दि.२५.०१.२०२१ रोजीचे पत्र.

---

१३४. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचे मार्फत चालवत असलेल्या मोफत बॅग क्लोकरुम, पादत्राणे गृह व मोबाईल कॅमेरा, प्रसादा व दुध स्टॉल इत्यादी व्वयसायासाठी वापरत असलेल्या जागा वापराचे पुढील मुदत वाढवून मिळणेबाबत.मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं. श्रीसासंएक्रेसो /१८४/२०२१, दि.१७.०२.२०२१ रोजीचे पत्र.

---

१३५. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थान परिसरात वापरास दिलेल्या १२ कियॉस्क/गाळे पैकी ११ कियॉस्क/गाळे वापराची मुदत वाढवून मिळणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं. श्रीसासंएक्रेसो/ १६०/२०२१, दि.२५.०१.२०२१ रोजीचे पत्र.

---

१३६. श्री साई मंडळी ट्रस्ट, मल्लेश्वरम, बंगलोर यांनी त्यांचे मालकीचे मल्लेश्वरम (बंगलोर) येथील मिळकतीपैकी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे माहिती केंद्रासाठी भाडेपट्टा करारनाम्याने वापरास दिलेल्या जागेच्या वापराची मुदत वाढवून घेणेबाबत.

---

१३७. स्टेट बॅंक आफ इंडिया, शाखा शिर्डी यांना संस्थान साईनाथ छाया इमारतीतील ए.टी.एम.वापरासाठी दिलेली जागा स्टेट बॅंक आफ इंडिया, शाखा शिर्डी यांचे ए.टी.एम.साठी इलेक्ट्रॉनिक पेमेंट ॲन्ड सर्व्हीसेस या कंपनीस वापरास देणेबाबत.

---

१३८. संस्थानचे मौजे कनकुरी येथील साठवण तलावातील मासे विक्री करणेबाबत.

---

१३९./अ वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालीका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणीपुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा-१ चे कामातील पाईपलाईन मार्गातील रस्त्यांची दुरुस्ती खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

१३९/ब वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालीका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणीपुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर योजणा तयार करणे व त्यास तांत्रिक मंजुरी देणेचे शुल्क रक्कम रु.३.९० कोटी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागास आदा करणेबाबत व महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभाग व श्री साईबाबा

संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यात करावयाच्या करारनामा मसुदाबाबत.

---

१४०. टोन्ड गाय दुध खरेदीसाठी पुरवठा आदेशाची मुदत संपुष्टात येत असल्याने वार्षिक मागणीच्या २५ टक्के दुधाची २०२१-२२ करीताची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मागील पुरवठाधारकांकडून मंजूर दराने खरेदी करणेबाबत.

---

१४१. पेपर कप खरेदीसाठी पुरवठा आदेशाची मुदत संपुष्टात येत असल्याने वार्षिक मागणीच्या २५ टक्के पेपर कप २०२१-२२ करीताची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मागील पुरवठाधारकांकडून मंजूर दराने खरेदी करणेबाबत.

---

१४२. भाजीपाला खरेदीसाठी पुरवठा आदेशाची मुदत संपुष्टात येत असल्याने जानेवारी २१ ते मार्च २१ या क्वॉर्टरच्या पुरवठा आदेशाच्या एकूण परिमाणाच्या २५ टक्के भाजीपाला २०२१-२२ करीताची ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मागील पुरवठाधारकांकडून मंजूर दराने खरेदी करणेबाबत.

---

१४३. सन २०२०-२१ या वर्षासाठी किराणामाल व अनुषंगीक साहित्य खरेदीकामी न्युनतम निविदाधारकाशी चर्चा वाटाघाटीकरुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नोंद घेणेबाबत.

---

१४४. संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्यूनतम दरांबाबत निर्णय होऊन न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

---

१४५. सन २०२१-२२ करीता भाजीपाला खरेदीबाबत.

---

१४६. "श्री रामनवमी उत्सव-२०२१" मध्ये दि.२०-०४-२०२१ ते दि.२२-०४-२०२१ अखेर श्री साई मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई व देखावा उभारणी करणेस श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांना परवानगी देणेस तसेच विद्युत रोषणाई, देखावा उभारणी करणे व त्याअनुषंगाने कराव्या लागणा-या कामास व खर्चास चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

---

१४७. जनरेटरसेट करीता १२ व्होल्ट बॅट-या खरेदी करणेकरीता येणा-या खर्चास तसेच ई-निविदा मागविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देणेस व संस्थानचे

वेबसाईटवर जाहिरात नोटीस प्रसारीत करणेबाबत चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

---

१४८. विद्युत विभागाकरीता दैनंदिन इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स कामाकरीता लागणारे इलेक्ट्रीकल मटेरीयल खरेदी करणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

---

१४९. सर्व्हे नं.२/४,३/१ व ३/७ चे ठिकाणचे जुन्या Electrical Substation मधील Cable शिफ्ट करणे, जॉईंट देऊन नविन पॅनलमध्ये जोडणी करणे व Electrical Panel मधील कनेक्शन नविन पॅनलमध्ये जॉईंट करणे व जनरेटर सेट डिसमेंटल करुन काढुन घेणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

---

१५०. विद्युत विभागाकरीता दैनंदिन इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स कामाकरीता लागणारे इलेकट्रीकल मटेरीअल खरेदी करणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

---

१५१. लाडू प्रसाद निर्मिती विभागाकरीता अद्ययावत नविन मशिनरी खरेदी करणेबाबत.

---

१५२. साईआश्रम भक्तनिवास येथील A, B व C इमारतीचे ए.सी.यंत्रणेचे सन २०२१-२२ वर्षाकरीता मे.डायकिन एअर कंडीशनींग इंडीया प्रा.लि. यांना वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेसाठी मान्यता मिळणेबाबत.

---

१५३. संस्थानच्या निधीतून नगरपंचायत करीता गॅस दाहीनी खरेदी करणेकामी प्राप्त ई-निविदेतील निम्नत्तम दरधारक मे.कल्याणी एन्टरप्राईजेस, पुणे यांचेकडून ई-मेलव्दारे दर कमी करणेबाबत विचारणा करुन प्राप्त दर शासन खरेदी नियमावलीच्या तरतुदीनुसार १० टक्के मर्यादेत आल्यास मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर कार्यादेश देणेस अथवा फेर ई-निविदा काढणे याबाबत मर्जिनुरुप आदेश होणेकामी विषयाची टिपणी तदर्थ समिती सभेसमोर मान्यतेसाठी चक्रिय पध्दतीने सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

१५४. मध्यवर्ती पानमळा गोडाऊनचे इमारतीस सात नग नविन ॲटोमॅटिक (मोटोराईज्ड) शटर्स बसविणेकामी येणा-या रक्कम रु.५,४१,०००/-मात्रचे खर्चास तसेच याकामी ई-निविदा बोलाविणेस मान्यता मिळणेबाबत.

---

१५५. श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत मा.तदर्थ समितीचे निर्देशान्वये M/s Tata Comm., Mumbai यांचेकडून मागविणेत आलेल्या सुधारीत दराचे प्राप्त ई-मेलबाबत.

---

१५६. कोरोना विषाणू (Covid 19)चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेअंतर्गत श्रींचे समाधी मंदिर दि.०६.०४.२०२१ पासून पुढील आदेश होईपर्यंत भक्तांकरीता दर्शनासाठी बंद करणेत आल्याने साईभक्तांनी ऑनलाईन पध्दतीने आरक्षीत केलेल्या आरती/दर्शनपास व रुम बुकींग सुविधेकामी संस्थानखातील जमा रक्कम परत करणेबाबत.

---

१५७. m/s Sadhna Group (TV), Delhi यांनी केलेल्या मागणीनुसार त्यांचे टिव्ही चॅनलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधेअंतर्गत समाधी मंदिरातील चार आरत्यांचे थेट प्रक्षेपन करणेस मान्यता देणेबाबत.

---

१५८. माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे सुरक्षीततेच्या दृष्टीने कार्यान्वीत असलेले firewall कालबाहय झाल्याने नविन ०१ नग firewall खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निम्नतम दरधारक निविदाकार यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

---

१५९. मोफत दर्शनपास (Time Base) कार्यप्रणाली संस्थानमार्फत कार्यान्वीत करणेकामी आवश्यक कार्यवाही करणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

१६०. सन २०२०-२१ मधील (दि.०१.०१.२०२१ ते दि.३१.१२.२०२१ अखेर) एक वर्ष कालावधीकरीता साईआश्रम भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग इत्यादी स्वच्छता दुरुस्ती व देखभालीचे कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी सुमित फॅसिलिटीज लि.पुणे यांचेशी चर्चा वाटाघाटी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नोंद घेणेबाबत.

---

१६१. साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या विभागाकडील लॉन्ड्री कामा करीता सन २०२०-२०२१ मधील दि.०१.०२.२०२१ ते दि. ३१.१२.२०२१ या एक वर्ष कालावधीकरीता निम्नतम दरधारक यांचेशी चर्चा वाटाघाटी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नोंद घेणेबाबत.

---

१६२. सन २०२०-२१ मधील (दि.०१.०१.२०२१ ते दि.३१.१२.२०२१ अखेर) एक वर्ष कालावधीकरीता साई धर्मशाळा विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग इत्यादी स्वच्छता दुरुस्ती व देखभालीचे कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी सुमित फॅसिलिटीज लि.पुणे यांचेशी चर्चा वाटाघाटी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नोंद घेणेबाबत.

---

१६३. सन २०२०-२१ (दि.०१.०१.२०२१ ते दि.३१.१२.२०२१ अखेर) एक वर्ष कालावधीसाठी साई आश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या दोन्ही विभागाकडील परिसरात पेस्ट कंन्ट्रोल करणेकामी निम्नतम दरधारक यांचेशी चर्चा वाटाघाटी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नोंद घेणेबाबत.

---

१६४. सन २०२०-२१ मधील (दि.०१.०१.२०२१ ते दि.३१.१२.२०२१ अखेर) एक वर्ष कालावधीकरीता व्दारावती भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, स्वच्छता कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी सुमित फॅसिलिटीज लि.पुणे यांचेशी चर्चा वाटाघाटी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नोंद घेणेबाबत.

---

१६५. कोरोना विषाणूचे (कोव्हीड-१९) संक्रमण थांबविण्यासाठी श्री साई मंदिर बंद झाल्यानंतर लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील शिल्लक असलेल्या बेसन आटयाचे स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन व्यापारी / बेसनआटा मिल धारक यांचेकडून कोटेशन मागवुन त्याची उच्चतम दराने विक्री करुन विल्हेवाट (Dispose) लावलेबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल.

---

१६६. सन २०२०-२१ या वर्षाकरीता मोतीचूर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद उक्त्या मजुरीने तयार करुन पॅकींग करुन देणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील न्युनतम दराचे निविदाधारक यांचेशी चर्चा वाटाघाटी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नोंद घेणेबाबत.

---

१६७. श्री साईनाथ रुग्णालय इमारतीमध्ये फायर विभागाचे सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांचे ऑडीट अहवालानुसार स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापित करणे व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

१६८. श्री साईबाबा हॉस्पिटलचे सर्व इमारतीमध्ये फायर विभागाचे सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांचे ऑडीट अहवालानुसार

स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापित करणे व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

१६९. संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्नीशमन यंत्रणा उभारणी करणेकामी निम्नतम दरधारक मे.अल्ट्रा फायरटेक सिस्टीम, पुणे यांचेशी चर्चा/ वाटाघाटी करुन पुढील निर्णय होणेबाबत.

---

१७०. सन २०२१-२२ करीता दि.०१.०५.२०२१ ते दि.३०.०४.२०२२ या कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या विभागाकडील इमारतीमध्ये व पेस्ट कंन्ट्रोल करणेकामी निम्नतम दरधारकांस कार्यादेश देणेबाबत.

---

१७१. श्री साईबाबा महाविद्यालय- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्राध्यापक भरती करणेबाबत.

निर्णय क्र.१ चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेल्या उपरोक्त १ ते १७१ विषयांचे प्रस्ताव व त्यावर घेण्यात आलेले निर्णय सोबत 'परिशिष्ट अ' म्हणून जोडले आहेत. आजचे सभेत त्याचे अवलोकन करण्यात येऊन नोंद घेण्यात आली.

---

विषय नं.०२ दि.०४.१२.२०२० रोजी झालेल्या तदर्थ समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

निर्णय क्र.०२ दि.०४.१२.२०२० रोजी झालेल्या तदर्थ समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा. सदस्यांना देण्यात आल्या होत्या आजचे सभेत सदरचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

(कार्यवाही- सभाकामकाज विभाग)

---

विषय नं.०३ श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलमध्ये नविन HMIS (Hospital Management information system) संगणकीय प्रणाली व PACS (Picture Archiving and Communication System) सिस्टीम खरेदी करणेकामी येणा-या अंदाजीत खर्चास व त्याकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.०३ मा.अध्यक्ष महोदय यांनी असे मत व्यक्त केले की, सदर प्रकरणी प्रथम हार्डवेअरची बाब विचारात घेणे आवश्यक आहे. हार्डवेअरची आवश्यकता नसल्यास तसे प्रस्तावात नमुद करावे. तसेच सदरची कार्यप्रणाली पाच वर्षांनंतर पुढे चालू ठेवायची नसल्यास लायसेन्स फी शिवाय पुढील updates न घेता त्याचे वापरास परवानगी राहील, अशी

अट करारात टाकावी. यास इतर दोन सदस्य मा.श्री. भानुदास पालवे व मा. श्रीमती गीता बनकर यांनी मान्यता दिली.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी सांगीतले की, सदर प्रकरणी हार्डवेअरची आवश्यकता नाही. पाच वर्षानंतर सदरची कार्यप्रणाली update होऊ शकते त्याकरीता अटी व शर्तीमध्ये पाच वर्षांनंतर आहे त्याच दरामध्ये कार्यरत ठेवणे ही बाब नमुद करता येत नाही कारण दर कमी देखील होऊ शकतात. तथापी DATA वर संस्थानचा हक्क राहील.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे दोन्ही रुग्णालयांमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त हॉस्पिटल कामकाज संगणकीय प्रणाली कार्यान्वित करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. 3,97,00,000/- (करविरहीत) मात्रच्या खर्चास मान्यता देण्यात आली. सदरची कार्यप्रणाली पाच वर्षांनंतर पुढे चालू ठेवणार नसल्यास लायसेन्स फी शिवाय पुढील updates न घेता त्याचे वापरास परवानगी राहील, अशी अट करारात नमूद करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हिल ॲप्लिकेशन यापूर्वीच दाखल करण्यात आलेले आहे.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)

---

विषय नं.०४अ) महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१८१६/प्र.क्र. २०/का.१६, दि.२८/१२/२०१८ अन्वये ५०० सामाजिक संस्थाना रुग्णवाहिकेकरीता प्रत्येकी रु.५ लाख कायम स्वरुपी अनुदान देणेबाबतचा विषय न्यायप्रविष्ठ असलेने, मा.व्यवस्थापन समिती व तदर्थ (Ad-hoc) समितीने स्थगीत ठेवलेल्या विषयावर निर्णय होणेबाबत.

ब) मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन नं. 4844/2021 संबंधीत निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.०४अ)यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.सासंवि- १०१७/१८१६/प्र.क्र.२०/ का.१६, दि.२८/१२/२०१८ अन्वये ५०० सामाजिक संस्थाना रुग्णवाहिकेकरीता प्रत्येकी रु.५ लाख कायम स्वरुपी अनुदान देणेबाबत 'स्थगीत' ठेवण्यात आलेला मा.तदर्थ समितीचे दि.११.१२.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.५४७ निरस्त करण्यात आला.

ब) मा.अध्यक्ष महोदय व समिती सदस्या मा.श्रीमती बनकर मॅडम यांनी असे मत व्यक्त केले की, रुग्णवाहिका प्रकल्पाकरीता देणगी म्हणून संस्थानखाती जमा असलेली रक्कम रु.५,३३,८३,०६३/- यामध्ये

संस्थान मार्फत रक्कम रु.4,66,16,937/- जास्तीची टाकून एकूण रक्कम रुपये दहा कोटी मात्र या रकमेतून जेवढया रुग्णवाहिका खरेदी करता येतील त्या खरेदी करुन अथवा अशा रुग्णवाहिका खरेदी करण्यासाठी त्यांची ठराविक किंमत ज्या शासकीय रुग्णालयांची मागणी असेल त्यांना देण्यात यावी.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव व समिती सदस्य मा.श्री.पालवे साहेब यांनी असे मत व्यक्त केले की, ५०० रुग्णवाहिका सद्य:स्थितीत आर्थिक परिस्थिती विचारात घेता संस्थानने खरेदी करुन शासकिय ग्रामिण रुग्णालयांना देणे आर्थिक दृष्टया व्यवहार्य नाही. तसेच याबाबत शासनाकडूनही मागणी नाही. साई रुग्णवाहिका प्रकल्पाकरीता देणगीदार साई भक्तांकडून देणगी आलेली जमा रक्कम रु.५,३३,८३,०६३/-मात्र या रकमेतुन जितक्या रुग्णवाहीका खरेदी करता येतील तितक्या रुग्णवाहीका शासनास देण्यात याव्यात. यापेक्षा जास्त रक्कम वापरुन खरेदी करणे अयोग्य आहे, असेही मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव व समिती सदस्य मा.श्री.पालवे साहेब यांनी प्रतिपादन केले.

सदरचे प्रस्तावाबाबत २x२ असा निर्णय झालेला असल्याने याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही- वाहन विभाग/विधी विभाग)

---

विषय नं.०५ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना प्रस्तावात नमुद १४ ठिकाणी कोरोना बाधीत रुग्णांसाठी तातडीने ऑक्सिजन पुरवठा करणेकामी ऑक्सिजन (PSA) युनिट उभारणीकामी रु.९०३.२८ लक्ष विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावावर निर्णय घेणेबाबत.

निर्णय क्र.०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना प्रस्तावात नमुद १४ ठिकाणी कोरोना बाधीत रुग्णांसाठी तातडीने ऑक्सिजन पुरवठा करणेकामी ऑक्सिजन (PSA) युनिट उभारणीकामी रु.९०३.२८ लक्ष विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव सद्य स्थितीतील संस्थानची आर्थिक परिस्थिती विचारात घेता मा.अध्यक्ष महादेय व समिती सदस्या मा.श्रीमती बनकर मॅडम यांनी अमान्य केला.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव व समिती सदस्य मा.श्री.पालवे साहेब यांनी कोरोनाच्या तिस-या लाटेच्या पार्श्वभूमिवर

ऑक्सिजन युनिट (Life Saving) ठरणार असल्याचे मत नोंदवून ऑक्सिजन (PSA) युनिट उभारणीकामी रु.९०३.२८ लक्ष विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्यास मान्यता दर्शविली.

सदरचे प्रस्तावाबाबत २x२ असा निर्णय झालेला असल्याने याबाबत मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही- लेखाशाखा/विधी विभाग)

---

विषय नं.०६ गॅस दाहिनी खरेदी करणेकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्णयानुसार फेर ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.०६ मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येत असल्याचे नमुद केले. तसेच सदरची निर्णय प्रक्रिया सहा महिन्यापासून चालू आहे, तथापी कोव्हिड-१९ चे पार्श्वभूमिवर निर्णय प्रक्रियेबाबत लागणारा विलंब व वेळेबाबत चिंता व्यक्त केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन गॅस दाहिनी खरेदी करणेकामी राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करण्यास तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्णयानुसार फेर ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)

---

विषय नं.०७ शिर्डी व ग्रामस्थांच्या आरती व दर्शन व्यवस्थेबाबत.

निर्णय क्र.०७ यावर सविस्तर चर्चा झाली, तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी असे म्हटले की, या विषयावर निर्णय झालेला नसतांना निर्णय झाल्याचे भासवून मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करण्यात आला, त्यावर दिलेल्या पत्रानुसार या बाबीची स्पष्टता मा. उच्च न्यायालयात करण्यात आली आहे काय ? त्यावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी सभेस अशी माहिती दिली की, शिर्डी व ग्रामस्थांच्या आरती व दर्शन व्यवस्थेबाबतचा प्रस्ताव चक्रिय पध्दतीने मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करण्यात आलेला होता. सदरचा प्रस्ताव मा.अध्यक्ष महोदय व समिती सदस्या मा.श्रीमती बनकर मॅडम यांनी नामंजूर केलेला आहे. तर मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव व समिती सदस्य मा.श्री. पालवे साहेब यांनी सदरचा प्रस्ताव मंजूर केलला

आहे. या प्रस्तावाचे बाबतीत २x२ अशी समसमान मत विभागणी झाल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात आलेले आहे.

(कार्यवाही- संरक्षण विभाग/जनसंपर्क विभाग)

---

विषय नं.०८ रुग्णालये विभागाकडील मानधनावरील वैद्यकीय अधिकारी यांना सन २०१९-२० वर्षाकरीता दिपावली सानुग्रह अनुदान अदा करणेबाबत.

निर्णय क्र.०८ यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन निर्णय क्र.सांसवि १०२०/४०१/ प्र.क्र.१६७/का-१६, दि.१८/११/२०२० अन्वये, तदर्थ समितीच्या दि. ३१/१०/२०२० रोजीच्या निर्णयानुसार तसेच मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये प्रलंबित जनहित याचिका क्र.१२०/२०१९ व रिट याचिका क्र.६२२४/२०२० मधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रस्तावात नमुद केलेले ०१ ते २९ वैद्यकीय अधिका-यांना उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे दि.०१ आक्टोबर, २०१९ ते ३० सप्टेंबर, २०२० या कालावधीतील त्यांना अदा करणेत आलेल्या एकुण वार्षीक मानधनाचे ८.३३% यानुसार सानुग्रह अनुदान वित्त विभागाद्वारे तपासणी करून दि. २४/११/२०२० रोजीचे आदेशातील अटी शर्तीनुसार त्यांचेकडून बंधपत्र घेऊन अदा करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.०९ संस्थानला कुशल अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत कार्यरत परिचारीका व पॅरामेडीकल स्टॉफ यांचे समान काम समान वेतनाबाबत मागणी व बेमुदत काम बंद आंदोलन (१२ मे जागतीक परिचर्या दिन) चे अर्जाबाबत.

निर्णय क्र.०९ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला कुशल अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत कार्यरत परिचारीका व पॅरामेडीकल स्टॉफ यांना प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे राष्ट्रीय मिशन अंतर्गत कार्यरत पॅरामेडीकल स्टॉफ प्रमाणे रु.२०,०००/-मासिक वेतन+कुशल कामगाराचे दर ६ महिन्याने वाढणारा विशेष भत्ता असे एकूण वेतनावर २५% वाढ याप्रमाणे वेतन देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)

---

विषय नं.१० श्री साईनाथ रुग्णालय इमारतीमध्ये फायर विभागाचे सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. औरंगाबाद यांचे ऑडीट अहवालानुसार स्थायी

अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणे व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालय परिसरातील दोन इमारती व परीसरामध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी येणा-या खर्चाबाबत नवीन टेंडर प्रक्रीया राबवीणेकामी सल्लागार यांचे अहवालानुसार येणा-या अंदाजे रु.२,२५,२७,५५७/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही- फायर ॲन्ड सेफ्टी विभाग/विधी विभाग)

---

विषय नं.११ श्री साईबाबा हॉस्पिटलचे सर्व इमारतीमध्ये फायर विभागाचे सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. औरंगाबाद यांचे ऑडीट अहवालानुसार स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणे व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.११ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरातील सर्व इमारती व परीसरामध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी येणा-या खर्चाबाबत नवीन टेंडर प्रक्रीया राबवीणेकामी सल्लागार यांचे अहवालानुसार येणा-या अंदाजे रु.१,८७,८७,९१३/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही- फायर ॲन्ड सेफ्टी विभाग/विधी विभाग)

---

विषय नं.१२ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील जिवनदायी आरोग्य योजना विभागाचे विशेष लेखापरिक्षण अहवालाबाबत.

निर्णय क्र.१२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील जिवनदायी आरोग्य योजना विभागाचे विशेष लेखापरिक्षण अहवालाचे समिती सदस्य मा.श्री.पालवे साहेब यांनी अवलोकन करुन याबाबतचा सविस्तर अहवाल मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करावा. असे ठरले.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.१३ श्री.अभिजित देविदास शिंदे, एम.डी.सी.रेसीडेन्सी, मु.पो.लोणी बु., ता.राहाता, जि.अहमदनगर यांना ऐतिहासिक वस्तु, शस्त्रात्रे, कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे

मालकीची मौज़े निमगाव को-हाळे, ता.राहाता येथील वापरास दिलेल्या जागा वापराची मुदतवाढ मिळणेबाबत श्री.अभिजित देविदास शिंदे यांचा दि.१५.२.२०२१ रोजीचा अर्ज.

निर्णय क्र.१३ यावर सविस्तर चर्चा होऊन श्री.अभिजित देविदास शिंदे यांना ऐतिहासिक वस्तू व शस्त्रास्त्रे यांचे कलादालन व प्रदर्शन मांडण्याकरीता वापरास दिलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे, ता.राहाता येथील गट नं.८० व ८५ पै. यामधील साईप्रसादालय इमारतीतील पहिल्या मजल्यावरील आय.टी.विभागा शेजारी असलेला हॉल अंदाजे रुंदी दक्षिणोत्तर ६० फुट व लांबी पूर्व-पश्चिम १२० फुट याचे साधारणत: क्षेत्रफळ ७२०० चौ.फुट या जागेच्या वापराची पाचवी मुदतवाढ दि.०१/०३/२०२१ ते दि.३१/०१/२०२२ या ११ महिने कालावधीसाठी, यापूर्वीची मासिक भाडेदराची रक्कम रु.१,००,०००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.१,००,०००/-+ रु.१०,०००/- अशी एकुण रक्कम रु.१,१०,०००/- इतके परवाना शुल्क ॲडव्हान्समध्ये संस्थानकडे जमा करणेच्या व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देण्यास आणि यापूर्वीप्रमाणेच लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

विषय नं.१४ कायम कर्मचा-यांचे खाते चौकशीचे कामकाजाकरीता कंत्राटी पध्दतीने खाते चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक असलेले महाराष्ट्र शासनाचे पॅनलवरील सेवा निवृत्त कर्मचारी/अधिकारी यांचे प्राप्त अर्जाबाबत.

निर्णय क्र.१४ यावर सविस्तर चर्चा होऊन, कायम कर्मचा-यांचे खातेचौकशीचे कामकाजाकरीता कंत्राटी पध्दतीने खाते चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक असलेले उपरोक्त प्रस्तावातील नमुद तक्ता 'अ' मधील महाराष्ट्र शासनाचे पॅनलवरील सेवा निवृत्त कर्मचारी/अधिकारी यांची नियुक्ती आजचे तारखेपासून पुढे म्हणजे दि. 19/06/2021 पासून पुढे करण्यास हरकत नाही, मात्र यापूर्वी समिती समोर विषय न आणता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशी नियुक्ती केली असल्यास त्या नियुक्तीस मान्यता नाही असे स्पष्टपणे तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी आपले निर्णयात म्हटले. समिती सदस्या मा.श्रीमती गीता बनकर यांनीही आजपासून पुढे अशी नियुक्ती देण्यास हरकत नाही, असे मत मांडले.

सदस्य सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पूर्वीची नियुक्ती accept करावी, घाबरु नये, पूर्वीपासून मंजूर करावे, असे मत मांडले. *

*लगतच्या वाक्याची शब्द योजना सदस्य सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मांडलेली नाही. मुळ प्रारुपात (दि.२८.०६.२०२१ रोजीचे) 'कायम कर्मचा-यांचे खातेचौकशीचे कामकाजाकरीता कंत्राटी पध्दतीने खाते चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक असलेले उपरोक्त प्रस्तावातील नमुद तक्ता 'अ' मधील महाराष्ट्र शासनाचे पॅनलवरील सेवा निवृत्त कर्मचारी/अधिकारी यांची नियुक्ती करण्यास व शासनाच्या अटी व शर्तीनुसार व वेळोवेळी होणा-या बदलानुसार मानधन अदा करणेस मान्यता देण्यात यावी,' असे मत व्यक्त केले.*

समिती सदस्य मा. श्री.भानुदास पालवे यांनी मा. अध्यक्ष साहेब यांचे निर्णयास सहमती दाखविली.

त्यामुळे 3x1 या मताधिक्याने अशा नियुक्त्या दिनांक 19/01/2021 पासून पुढे करण्यास व शासनाच्या अंटी व शर्तीनुसार वेळोवेळी होणा-या बदलानुसार मानधन अदा करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.१५ कोव्हीड-१९ मुळे ज्या विभागांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेल्या आहेत अशा विभागातील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेल्या आहेत. अशा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे एप्रिल-२०२१, मे-२०२१ व जून-२०२१ या कालावधीतील मानधन मानवतेच्या दृष्टीकोनातून अदा करणेबाबत.

निर्णय क्र.१५ यावर सविस्तर चर्चा होऊन, कोव्हीड-१९ मुळे ज्या विभागांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेल्या आहेत अशा विभागातील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी तसेच त्याव्यतिरिक्त कंत्राटदारामार्फत कार्यरत सर्व कंत्राटी कर्मचारी (आऊटसोर्स) यांना माहे एप्रिल-२०२१, मे-२०२१ व जून-२०२१ या कालावधीत हजर दिवसासाठी पूर्ण दराने व कोव्हीड-१९ मुळे सेवा खंडीत दिवसासाठी ५० टक्के दराने वेतन अदा करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.१६ श्री.अरुण गणपत जाधव, वायरमन, विद्युत विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.

निर्णय क्र.१६ यावर सविस्तर चर्चा झाली, मा.अध्यक्ष महोदय यांनीअसे मत व्यक्त केले की, श्री.अरुण गणपत जाधव, वायरमन, विद्युत विभाग यांचा खुलासा प्राप्त झालेला नाही. एखाद्या कर्मचा-याला तात्पुरते सेवानिलंबीत करण्यासाठी त्या कर्मचा-याचे त्याचे पदावर काम करणे हे आजपासून पुढे चालू राहणे संस्थानला हानी पोहचवणारे आहे असे दर्शविणा-या गोष्टी समोर असणे आवश्यक आहे. झालेल्या घटनेसंबंधी त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल झालेला आहे, त्याची चौकशी होणार आहे. त्यात त्याची चूक आढळल्यास त्यासाठी त्याला शिक्षा होणार आहे. मात्र लवकरात लवकर त्याचेविरुध्द खातेचौकशी सुरु करुन विहित मुदतीत ती पूर्ण करावी. तोपर्यंत त्याची विद्युत विभागातून इतर विभागात बदली करण्यात यावी.

समिती सदस्या मा. श्रीमती गीता बनकर यांनी असे मत मांडले की, त्यांनी चक्रिय पध्दतीने सादर केलेल्या या विषयावर पूर्वीच त्यांचा निर्णय कळविलेला आहे व त्याप्रमाणे श्री. अरुण जाधव यांना तात्पुरते सेवानिलंबीत करता येणार नाही असा निर्णय दिला आहे.

समिती सदस्य मा.श्री.पालवे साहेब यांनी श्री.जाधव हे नेमलेल्या डयुटीचे ठिकाण सोडून श्री साईबाबा हॉस्पिटल येथे कोरोना संसर्ग रुग्णांच्या वार्डात फिरत असतांना रुग्णालयाचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये ते दिसून आलेले आहेत. त्यामुळे त्यांना सक्तीचे रजेवर पाठविण्यात यावे अथवा तात्पुरते सेवा निलंबन करण्यात यावे, असे मत मांडले.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी असे नमुद कले की, श्री.जाधव यांचा खुलासा दि.२९.०५.२०२१ रोजी E-Mail व्दारे पाठविणेत आलेला आहे श्री.जाधव हे विद्युत विभागात वायरमन या पदावर कार्यरत आहेत. श्री.जाधव हे नेमलेल्या डयुटीचे ठिकाण सोडून श्री साईबाबा हॉस्पीटल येथे कोरोना संसर्ग रुग्णांच्या वार्डात श्री.सचिन चौगुले, अध्यक्ष शिर्डी शहर कॉंग्रेस यांना escorting करत फिरत असतांना रुग्णालयाचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये ते दिसून आलेले आहेत. श्री.जाधव हे थेट कोव्हीड उपचार घेत असलेल्या अतिदक्षता विभाग उदा. ICCU, GICU तसेच इतर सर्व कोव्हीड उपचार घेत असलेल्या वार्डमध्ये PPE KIT परिधान न करता तसेच कोणत्याही प्रकारची दक्षता सुरक्षा न बाळगता वार्डमध्ये विनापरवानगी जाऊन कोव्हीड उपचार घेत असलेल्या रुग्णांचे संपर्कात आल्याने सदर विषाणू मोठया प्रमाणात संक्रमीत होण्यास ते जबाबदार राहणार आहेत. तसेच श्री.जाधव हे संक्रमित झालेस सुपर स्प्रेडर म्हणून समाजातील लोकांमध्ये त्वरीत मिसळून त्याचा प्रादूर्भात वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच श्री.जाधव यांचे व्हिडीओ चित्रीकरण व पोलीस स्टेशन मधील फिर्याद पाहता शिस्त पालन करण्यासाठी असे उद्याम व बेजबाबदार कर्मचारी यांना चाप बसणे आवश्यक आहे. संस्थान कर्मचा-यांच्या अशा गैरशिस्त वर्तनास वेळीच आळा घातला नाही तर कर्मचा-यांमध्ये गैरशिस्त निर्माण होऊ शकते. त्यामुळे श्री.जाधव यांना सेवानिलंबीत करण्यात यावे. असे मत व्यक्त केले.

सदर प्रस्तवावर २x२ निर्णय झाल्याने याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)

---

विषय नं.१७ साईभक्तांना मोफत उदी प्रसाद पोस्टाने पाठविणेकामी मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१७ यावर सविस्तर चर्चा होऊन संस्थानमार्फत श्री साईभक्तांना एकदाच मोफत उदीप्रसाद पाठविणेस, त्याकामी पाकीटे छपाई व स्टीकरची खरेदी करणेकामी तसेच उदीप्रसाद पाठविणेकामी येणा-या योग्य त्या अनुषंगीक खर्चास व स्थानिक प्रेसधारंकाकडून दरपत्रके मागवून कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. तसेच सदरची कार्यवाही दि.३१ ऑगस्ट,२०२१ अथवा श्रींचे मंदिर दर्शनासाठी खुले होईल यापैकी जे आगोदर घडेल तोपर्यंत करण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.१८ साईपालखी निवारा येथील संस्थानला देणगी मिळालेल्या इमारतीमध्ये लोडकरीता जनरेटर सेट, कॉम्पॅक्ट सबस्टेशन, मिटरींग क्युबीकल, इलेक्ट्रीकल पॅनल, केबल इत्यादी खरेदी करुन बसविणे तसेच वातानुकुलीत यंत्रणा व गिझरकरीता वायरींग करणेबाबत.

निर्णय क्र.१८ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या सद्याच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता साईपालखी निवारा येथील संस्थानला देणगी मिळालेल्या इमारतीमध्येलोडकरीता जनरेटर सेट, कॉम्पॅक्ट सबस्टेशन, मिटरींग क्युबीकल, इलेक्ट्रीकल पॅनल, केबल इत्यादी खरेदी करुन बसविणे तसेच वातानुकुलीत यंत्रणा व गिझरकरीता वायरींग करणेबाबतचा प्रस्ताव मा.अध्यक्ष महोदय यांनी नामंजूर केला.

समिती सदस्य मा.श्री.पालवे साहेब यांनी मा. अध्यक्ष महोदय यांचे मताशी ते सहमत आहेत असे मत मांडले. समिती सदस्या मा. श्रीमती गीता बनकर यांनीही मा. अध्यक्ष महोदय यांचे मताशी सहमत आहे, असे म्हटले.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा समिती सदस्य यांनी असे मत व्यक्त केले की, सदरची इमारत संस्थानला देणगी दाखल मिळालेली आहे. देणगीदाराने ज्या उद्देशाने इमारत देणगी दिली आहे त्यासाठी इमारतीचा वापर होणे आवश्यक आहे. सदरची इमारत दोन वर्षापासून विनावापर बंद आहे. अशा परिस्थितीत सदर इमारतीचे Depreciation वाढत जाईल. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मंजूर करणे आवश्यक आहे.

सदर प्रस्तवावर 3x1 मताधिक्याने निर्णय झाल्याने सदरचा प्रस्ताव तूर्तास नामंजूर करण्यात आला.

(कार्यवाही- विद्युत विभाग/विधी विभाग)

---

विषय नं.१९ महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (रोजगाराचे विनियमन व सेवेच्या शर्ती) कायदा २०१७ मधील तरतुदीनुसार कंत्राटी कर्मचा-यांना सार्वजनिक सुट्टया, रजा लागू करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.१९ यावर सविस्तर चर्चा झाली. काय करणे संस्थानच्या फायद्याचे आहे हे समितीसमोर ठेवावे असे ठरले. त्यामुळे सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला.

(कार्यवाही- कामगार विभाग)

---

विषय नं.२० मे.शिवसाई एंटरप्रायजेस, शिर्डी प्रो.प्रा.सोन्याबापू गंगाधर शेळके यांना देण्यात आलेल्या कामाचा ठेका रद्द करुन त्यांना काळया यादीत (Black List) समाविष्ट करणेसाठी मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.२० यावर सविस्तर चर्चा झाली. मा.अध्यक्ष महोदय व समिती सदस्या श्रीमती बनकर मॅडम यांनी असे मत व्यक्त केले की, मे.शिवसाई एंटरप्रायजेस, शिर्डी प्रो.प्रा.सोन्याबापू गंगाधर शेळके यांचेशी करण्यात आलेल्या करारनाम्यात तसा उल्लेख नसल्याने, संस्थानसाठी ठेकेदारामार्फत लावलेले कामगार हे Third Party ठरतात त्यामुळे मे. शिवसाई एंटरप्रायझेस यांना Black List करणे कायदेशीरदृष्टया उचित होणार नाही. तरी यावर कायदेशीर सल्ला घेवून पुढील कार्यवाही करावी. सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन त्यातून अशा कामगारांचे पगार करावेत, असे पगार करताना ती रक्कम कमी पडत असल्यास सर्व कामगारांना proportionate मध्ये पगार करावा.

समिती सदस्य मा.श्री.पालवे साहेब यांनी मे.शिवसाई एंटरप्रायजेस, शिर्डी प्रो.प्रा.सोन्याबापू गंगाधर शेळके यांना देण्यात आलेल्या कामाचा ठेका रद्द करुन त्यांना काळया यादीत (Black List) समाविष्ट करणेसाठी मान्यता दर्शविली व चेकच्या अनादराबाबत Negotiable Instruments Act खाली मे.शिवसाई एंटरप्रायजेस यांचे विरुध्द कार्यवाही करावी, सुरक्षा अनामत रकमेतून कामगारांचे पगार करावेत असे म्हटले.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी असे सांगीतले की, मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांचे बॅंक खात्यावर माहे एप्रिल २०२० चे वेतनापोटी रक्कम दि.१०/०९/२०२० रोजी संस्थानचे लेखाशाखा विभागामार्फत RTGS व्दारे वर्ग करणेत आली आहे. तथापी संबधीत ठेकेदाराने कर्मचा-यांचे माहे एप्रिल २०२० चे वेतन अदा केलेले नाही. संस्थानने अदा केलेल्या रक्कमेचा चेक देणेबाबत संबधीतांना तोंडी निर्देश दिले होते. त्यानुसार रक्कम रू.६,३०,४२७/- मात्रचा चेक दिला होता, सदरचा चेक स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांचेकडे Clearing करीता पाठविला असता बॅंकेने "Fund Insufficient" असे कारण देऊन, दि.०२/११/२०२० रोजी संस्थानकडे परत पाठविला आहे व चेक बाऊन्स झाले प्रकरणी संस्थानला रु.२९५/- इतके रिटर्न चार्जेस आकारले आहेत.

अशा ठेकेदारांना काळया यादीत न टाकल्यास ते पुन्हा ई-निविदा प्रक्रियेत भाग घेऊ शकतात.

मे.शिवसाई एंटरप्रायजेस, शिर्डी यांचेशी करण्यात आलेल्या करारनाम्यातील अ.नं.३५ अन्वये 'मोतीचूर लाडू , सुटी बुंदी व बर्फी प्रसाद तयार करण्याचे कामात वारंवार हलगर्जीपणा, संस्थानने देखरेखीसाठी नियुक्त केलेल्या कर्मचा-यांबरोबर वादविवाद केल्यास अथवा करतांना आढळून आल्यास तसेच अन्न सुरक्षा कायदा २००६ चे कोणत्याही कायद्याचे उल्लंघन केल्यास काळया यादीत टाकण्याचा अधिकार संस्थानने राखून ठेवलेला असल्याचे नमुद केलेले आह. त्यामुळे मे.शिवसाई एंटरप्रायजेस, शिर्डी प्रो.प्रा.सोन्याबापू गंगाधर शेळके यांना देण्यात आलेल्या कामाचा ठेका रद्द करुन त्यांना काळया यादीत (Black List) समाविष्ट करणेसाठी मान्यता देण्यात यावी. तसेच मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांचेमार्फत लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे कामास असलेल्या १०४ बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचा-यांचे माहे मे २०२० ते ऑक्टोंबर २०२० चे आदा न केलेले वेतन देणेबाबत उपरोक्त प्रस्तावातील 'ब' प्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात यावी असे म्हटले.

सदर प्रकरणी २x२ असा निर्णय झालेला असल्याने याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग/ विधी विभाग)

---

विषय नं.२१ संस्था साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी संस्थान परिसरात चालवत असलेल्या विविध स्टॉल/ गाळयांचे जागा भाडे माफ होणेबाबत मा.चेअरमन, श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/१९४/२०२१ दि.०५.०३.२०२० रोजीचे पत्र.

निर्णय क्र.२१ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थान मालकीच्या उपरोक्त प्रस्तावात दर्शविलेल्या भाडेतत्वावर वापरास दिलेल्या गाळे/ स्टॉल/जागांचे भाडे अ.नं.१२ व २६ या ठिकाणचे व्यवसाय उक्त काळात चालू असलेने त्या जागा वगळून इतर ३७ ठिकाणच्या गाळे/स्टॉल/जागांचे दि.१८/०३/२०२० पासून ते दि.१५/११/२०२० या कोव्हीड-१९चे कालावधीतील होणारे एकूण भाडे रक्कम रु.१५,३८,६६९/-मात्र श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना माफ करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

विषय नं.२२ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२५/१/१ क्षेत्र सुमारे ०.३७.१७ आर मध्ये असलेल्या श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय ही शाळा स्थलांतरीत करुन त्या ठिकाणी साईबाबा सुपर हॉस्पिटलचा विस्तार (पुर्नबांधणी) करणेबाबत.

निर्णय क्र.२२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२५/१/१ क्षेत्र सुमारे ०.३७.१७ आर जागेमध्ये असलेल्या श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय या शाळेस सध्यस्थितीत संस्थानच्या कन्या विद्या मंदिर व इंग्लिश मिडीयम स्कूलसाठीच्या वापरात असलेली संस्थान मालकीच्या मिळकती/जागा उपलब्ध करुन देण्याचे अधिन राहून श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय ही शाळा स्थलांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली. व त्याठिकाणी श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची विस्तारीत इमारत बांधणेसाठीचा सविस्तर प्रस्ताव समितीसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.

आरीज व्यवस्था म्हणून

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

विषय नं.२३ संस्थानचे साईनाथ हॉस्पिटल (२०० रुम) चे पश्चिमेकडील भागात साचणा-या पावसाच्या पाण्याचे विल्हेवाट लावणेसाठी पावसाळी गटार लाईन टाकणेसाठी संस्थानकडून रु.५०.४५ लक्ष निधी मिळणेकामी शिर्डी नगरपंचायतीचे प्रस्तावावर निर्णय घेणेबाबत.

निर्णय क्र.२३ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे साईनाथ हॉस्पीटल (२०० रुम) चे पश्चिमेकडील भागात साचणा-या पावसाच्या पाण्याची विल्हेवाट लावणेसाठी पावसाळी गटरलाईन टाकणेसाठी संस्थानकडून रु.५०.४५ लक्ष निधी शिर्डी नगरपंचायतीस देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही- लेखाशाखा/विधी विभाग)

---

विषय नं.२४ मयत कंत्राटी कर्मचारी कै.चंद्रकांत पावसे व कै.सतिष येवले यांचे वारसास आर्थिक मदत देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित होणा-या आपदग्रस्त व्यक्तींना द्यावयाचे मदतीचे दर व निकष याबाबत महाराष्ट्र शासन,महसुल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:सीएलएस-२०१५/प्र.क्र.४०/म-३, दिनांक १३ मे, २०१५ मधील नियमानुसार मयत

कंत्राटी कर्मचारी कै.चंद्रकांत पावसे व कै.सतिष येवले यांचे वारसास आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- कामगार विभाग)

---

विषय नं.२५ श्री.विजय तुकाराम मोकळ, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.

निर्णय क्र.२५ यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.अध्यक्ष,महोदय यांनी श्री.विजय तुकाराम मोकळ, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांना संस्थान प्रशासनाच्या प्रस्तावा नुसार एकूण 75 वेळा शिक्षा झालेली दिसते. दोन वेळा सेवानिलंबनाची कारवाई केल्याचे दिसते. वारंवार विनापरवानगी कामावर गैरहजर राहणे (habitual absenteeism) इ. बाबी गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडतात. करिता त्यांना गैरशिस्त वर्तनाबाबत संस्थान सेवेतून "तात्पुरते सेवा निलंबीत" करुन, त्यांची विभागीय खाते चौकशी करावी असा निर्णय दिला.

समिती सदस्य मा. श्री. भानुदास पालवे यांनी असे मत मांडले की, श्री.विजय मोकळ यांनी नोटीस स्वीकारलेली नाही व नोटीस नाकारणे म्हणजे ती deemed service असते.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी तात्पुरते सेवा निलंबीत न करता सदर कर्मचा-यास एक संधी देण्यात यावी, असे मत व्यक्त केले. याबाबत निर्णय क्र.१६ मध्ये मा. अध्यक्ष यांचे मताचा विचार करणे

समिती सदस्या मा. श्रीमती गीता बनकर यांनी असे म्हटले की, श्री. विजय मोकळ नोटीस मिळूनही गैरहजर राहत असतील तर वारंवारच्या विनापरवानगी गैरहजेरीबाबत त्यांना तात्पुरते सेवानिलंबीत करुन खाते चौकशी पूर्ण करावी.

सदर प्रकरणी 3x1 मताधिक्याने श्री.विजय तुकाराम मोकळ, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांना संस्थान सेवेतून "तात्पुरते सेवा निलंबीत" करुन, त्यांची विभागीय खाते चौकशी करावी असा निर्णय घेण्यात आला.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग, विधी विभाग)

---

विषय नं.२६ मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१४८ पै.मधील जागेत संस्थानचे अग्निशमन वाहन पार्किंगकरीता पत्राशेड उभारणी करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारका समवेत चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.२६ यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१४८ पै.मधील जागेत संस्थानचे अग्निशमन वाहन पार्किंगकरीता पत्राशेड उभारणी

करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारक कासम इलियास कच्छी, मनमाड यांचे रक्कम रु.९,९३,७९६.००/- मात्र निम्नतम दराबाबत चर्चा-वाटाघाटी करुन त्यांना कार्यादेश देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव यांना देण्यात आले.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.२७ एअर सर्किट ब्रेकर्सच कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट सन २०२१-२२ साठी देणेकामी उघडण्यात आलेल्या निविदांमधील निम्नतम निविदाधारकाशी वाटाघाटी/चर्चा होऊन त्यांना कार्यादेश देणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, एअर सर्किट ब्रेकर्सच कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट सन २०२१-२२ साठी देणेकामी उघडण्यात आलेल्या निविदांमधील निम्नतम निविदाधारकाशी वाटाघाटी/चर्चा करुन त्यांना कार्यादेश देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव यांना देण्यात आले.

(कार्यवाही- विद्युत विभाग)

---

विषय नं.२८ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील कंत्राटी महिला कर्मचा-यांना प्रसुती रजेचे वेतन देणेबाबतचे प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.२८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील कंत्राटी महिला कर्मचा-यांना प्रसुती रजेचे वेतन देणेबाबत या संदर्भातील शासनाची प्रसुतीलाभ अधिनियम, १९६१ मधील नियमावली स्विकारण्यास तसेच या संदर्भात काही शासन निर्णय असल्यास त्या शासन निर्णयानुसार प्रस्तावात नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यास व त्यानुसार दि.०१ जुलै, २०२१ पासून कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- कामगार विभाग)

---

विषय नं.२९ प्रभारी पोलीस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा, शिर्डी या पदनामाचे शासकीय अधिकारी यांना संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन देणेबाबत.

निर्णय क्र.२९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. हर्षवर्धन गवळी, प्रभारी पोलीस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा, शिर्डी यांना त्यांचे मागणीनुसार संस्थान निवासस्थान

उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी शासनाची मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.३० शासकिय अधिका-यांना निवासासाठी संस्थान निवासस्थान देणेबाबत.

निर्णय क्र.३० यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.अध्यक्ष महोदय तसेच समिती सदस्य मा.श्री.पालवे साहेब व मा.श्रीमती बनकर मॅडम यांनी शासकिय अधिका-यांना निवासासाठी संस्थान निवासस्थान देणेबाबत नियमावली तयार करुन प्रस्ताव मा.तदर्थ समितीपुढे सादर करण्यात यावा, असा निर्णय घेतला.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी शासकिय अधिका-यांना निवासासाठी संस्थान निवासस्थान देणेबाबत पात्र व्यक्तींना प्राधान्य देऊन निवासस्थान देणेबाबतचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव यांना देण्यात यावेत, असे मत व्यक्त केले.

सदर प्रस्तावावर 3x1 मताधिक्याने शासकिय अधिका-यांना निवासासाठी संस्थान निवासस्थान देणेबाबत नियमावली तयार करुन प्रस्ताव मा.तदर्थ समितीपुढे सादर करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.३१ श्रीमती यास्मिन अकबर पठाण यांचा अनुकंपा तत्वावर संस्थानमध्ये नोकरी मिळणेबाबत दि.१३.०१.२०२१ व दि.१४.०१.२०२१ रोजीचा अर्ज.

निर्णय क्र.३१ यावर सविस्तर चर्चा झाली. तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी असे मत मांडले की, अनुकंपा तत्वावर अर्ज देण्यास या अर्जदाराला उशीर का झाला, याबाबत चौकशी करावी व त्यानंतर याबाबतचा निर्णय घ्यावा.

तदर्थ समितीचे सदस्य सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे मत मांडले की, अशी चौकशी करता येणार नाही. उशीर झालेला आहे, फक्त याचा विचार करावा व प्रस्ताव नामंजूर करावा.

समिती सदस्य मा.श्री.भानुदास पालवे यांचे मते एवढया उशिराने त्यांना अनुकंपा तत्वावर कामावर घेण उचित होणार नाही त्यामुळे त्यांचेतर्फे प्रस्ताव नामंजूर अथवा पूर्ण चौकशी होवून पुन्हा प्रस्ताव ठेवावा.

समिती सदस्या मा. श्रीमती गीता बनकर यांच्या मते चौकशी होवून त्याचे तपशिलासह प्रस्ताव ठेवावा म्हणजे त्यावर निर्णय घेता येईल.

सदर प्रकरणी २x२ असा निर्णय झालेला असल्याने याबाबत मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.३२ संस्थानचे जुन्या सेवाधाम इमारतीचे बाहेरील बाजूस असलेल्या खोल्या/रुम विविध कर्मचारी संघटना व इतर संस्थाना त्यांचे कार्यालयासाठी भाडे तत्वावर उपलब्ध करुन देणेकामी सदर जागेचे भाडे निश्चित होणेबाबतचे प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.३२ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे जुन्या सेवाधाम इमारतीचे बाहेरील बाजूस असलेल्या खोल्या/रुम विविध कर्मचारी संघटना व इतर संस्थाना त्यांचे कार्यालयासाठी उपरोक्त प्रस्तावात नमुद मुद्दा क्र.२ नुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडील भाडे ठरविण्याचे पध्दतीनुसार इमारत बांधकामाचे वर्ष विचारात घेऊन त्यानुसार रुमचे एकूण बांधकाम (चटई) क्षेत्रानुसार येणारे दरमहा भाडे व मिटर रिडींगप्रमाणे होणारा विद्युत आकार घेऊन भाडे तत्वावर उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.३३ संस्थानचे साईगार्डन प्रकल्पातंर्गत मे.लेजन व्हिजन लि. हॉगकॉग यांचेसमवेत आर्बिट्रेशन कार्यवाही करणेबाबत.

निर्णय क्र.३३ यावर सविस्तर चर्चा झाली. तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी असे सुचित केले की, फक्त ॲडव्होकेट यांची नेमणुक करुन ही कार्यवाही पूर्ण होण्यासारखी नाही व यापुढे आर्बीट्रेटरच्या नियुक्तीबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात सुध्दा संस्थानला अर्ज करावा लागेल. याकरिता सर्वाधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना द्यावेत. मात्र अध्यक्षांच्या या प्रस्तावास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहमती दर्शविली नाही व आहे तसा प्रस्ताव मान्य करावा व पुढील बाबी नंतर ठरवू असे त्यांचे मत मांडले. करिता, आहे तसा प्रस्ताव मान्य करण्यात आला व संस्थानचे साईगार्डन प्रकल्पातंर्गत मे.लेजन व्हिजन लि. हॉगकॉग यांचेसमवेत आर्बिट्रेशन कार्यवाही करणेकामी ॲड. जुन्नरकर ॲण्ड असोसिएट्स, ३११/३१२, इंबसी सेंटर, नरीमन पॉईंट, मुंबई–४०००२१ यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.३४ श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग प्रकल्पाचे बांधकाम ठेकेदार श्रीम भानु कंन्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई यांनी महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन

परिपत्रक दि.२९.७.२०२० अन्वये मागणी केलेली सुरक्षा ठेव रक्कम रु.३,६१,७३,४३६/-मात्र विनार्शत बँक गॅरंटीच्या (दोष दायित्व निवारण कालावधीपर्यंत) बदल्यात मुक्त करण्याच्या मागणीबाबत.

निर्णय क्र.३४ यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परीपत्रक क्र.संकिर्ण-१०२०/प्र.क्र.१००/ २०२०/व्यय-१२, मुंबई दि.२९/०७/२०२० नुसार दर्शनरांग प्रकल्पाचे ठेकदार श्रीम भानु कंन्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई यांना त्यांचे रनिंग बिलातून कपात केलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.२,२४,८५,९३६/-मात्र परत करण्यास तसेच यापुढील त्यांचे रनिंग बिलातून सुरक्षा अनामत रक्कम वसूल न करता एकूण निविदा रकमेसाठी सुरक्षा अनामत म्हणून रनिंग बिलातून वसूल करावयाच्या रकमेएवढी म्हणजे रु.२,७३,७५,०००/- एवढया रकमेची विनाशर्त बॅंक गॅरंटी (दोष दायित्व निवारण कालावधीपर्यंत) घेण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.३५ डॉ. वैभव बबन तांबे, निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत.

निर्णय क्र.३५ यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. तांबे यांचे गैरवर्तनाचे गांभीर्य लक्षात घेवून त्यांना 48 तास पोलीस कोठडीत ठेवले असल्याने व त्यामुळे हे कायद्याप्रमाणे deemed suspension असल्याने त्यांना सदरचे गैरशिस्त वर्तनाचा निर्णय होईपर्यंत तात्काळ संस्थानचे सेवेतून तात्पुरते सेवा निलंबित करणेबाबत केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.३६ सन २०२१-२२ शैक्षणिक वर्षात शालेय व स्कूल बस शुल्कात १० टक्के फी वाढीबाबत.

निर्णय क्र.३६ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात शैक्षणिक व बसचे शुल्कात १० % वाढ न करता मागील शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ प्रमाणे पालकांकडुन फी आकारण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही- श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

आयत्या वेळेचा

विषय नं.०१ चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.

१. साईभक्तांना मोफत उदी प्रसाद पोस्टाने पाठविणेकामी मान्यता मिळणेबाबत.

---

२. अ) मे.शिवसाई एंन्टरप्राईजेस, शिर्डी प्रो.प्रा.सोन्याबापु गंगाधर शेळके यांना काळया यादीत (Black List) समाविष्ट करुन संस्थानकडे असलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेस व
ब) मे.शिवसाई एंन्टरप्राईजेस, शिर्डी यांचे कोव्हिड-१९ चे काळातील थकीत वेतन नव्याने नियुक्ती करणेत आलेल्या ठेकेदारामार्फत करणेस चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

---

३. संस्थानचे प्रसादालय, लाडूनिर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी लॅमिनेटेड पेपर पिशवी खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत चर्चा वाटाघाटी करुन न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.

---

४. संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी टोन्ड गाय दुध खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत खरेदी समितीचे सभेत चर्चा वाटाघाटी करुन न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.

---

५. संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी पेपर कप खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत खरेदी समितीचे सभेत चर्चा वाटाघाटी करुन न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.

---

६. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये मार्च-२०२१ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.५८,९४,७०८/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

७ श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपात्या)/पुरी मनुष्यबळाव्दारे तयार करणेकामी प्राप्त न्युनतम दराबाबत चक्रीय पध्दतीने निर्णय होवून कार्यादेश देणेबाबत .

---

८. श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती मशिनव्दारे चपाती तयार करणेकामी प्राप्त न्युनतम
दराबाबत चक्रीय पध्दतीने निर्णय होवून पुरवठा आदेश देणेबाबत .

---

९. श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी प्राप्त न्युनतम
दराबाबत चक्रीय पध्दतीने निर्णय होवून कार्यादेश देणेबाबत .

निर्णय क्र.३७ चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेल्या उपरोक्त १ ते ९ विषयांचे प्रस्ताव व त्यावर घेण्यात आलेले निर्णय सोबत 'परिशिष्ट ब' म्हणून जोडले आहेत. आजचे सभेत त्याचे अवलोकन करण्यात येऊन नोंद घेण्यात आली.

---

वरील निर्णय क्र.०१ ते ३७ घेण्यात आले.

यानंतर दुपारी ०३.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

(श्रीमती गिता पी.बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर. तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

(भानुदास ह. पालवे)
अपर आयुक्त,नाशिक विभाग, नाशिक. तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा
सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

(श्रीकांत एल.आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर.
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

सभा क्र.१/२०२१ दिनांक १९.०६.२०२१

स्थळ- web based Microsoft team या ॲपव्दारे वेळ- दुपारी ०१.०० वाजता

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.१२०/२०१९ यावर दि. ०९/१०/२०१९ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा शनिवार दि.१९.०६.२०२१ रोजी सकाळी ११.०० web based Microsoft team या ॲपव्दारे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/ वशी-०४/८६५/२०२१, दि.१६.०६.२०२१ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार सदरहु सभा शनिवार दि.१९.०६.२०२० रोजी दुपारी ०१.०० web based Microsoft team या ॲपव्दारे सुरु करण्यात आली. काही अपरिहार्य कारणास्तव सदरहु सभा सकाळी ११.०० ऐवजी दुपारी ०१.०० वाजता सुरु करण्यात आली.

या सभेस web based Microsoft team या ॲपव्दारे खालील मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्रीकांत आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर. तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.
२. मा.श्री. कान्हूराज बगाटे, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी. तथा सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.
३. मा.श्री.भानुदास ह. पालवे, अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक, तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
४. मा.श्रीमती गीता प्र.बनकर, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर, तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.
त्यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

विषय नं.०१ चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.

1. दि.१९.१२.२०२० रोजी झालेल्या तदर्थ समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

---

2. संरक्षण विभागाकडील बॅगेज स्कॅनरचे दुरुस्ती देखभालकामी वार्षिक कंत्राट देणेकामी प्राप्त ई-निविदेतील निम्नतम दरधारक मे.क्रिस्टल व्हीजन इमेज सिस्टिम्स प्रा.लि. पुणे यांचेशी चर्चा वाटाघाटीअंती प्राप्त दराची निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

---

३. श्री साईबाबा मंदिरालगत पर्यटन पोलीस चौकी निर्माण करणेकामी पोलीस विभागास निधी उपलब्ध करुन देणेबाबत.

४. श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक असणारे N-95 Face Mask खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.

---

५. Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून दैनंदिन वापराकरीता आवश्यक असणारे सॅनीटायझर तातडीने खरेदीकामी पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

---

६. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये नव्याने कार्यान्वीत होणा-या विविध वॉर्ड/विभागाकरीता ऑक्सिजन व नायट्रस गॅसच्या पाईपलाईनचे काम करणेकामी M/s United Services, Kalyan यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

---

७. श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेच्या कामकाजाच्या ई-निविदा प्रक्रियेबाबत.

---

८. शिकाऊ इंटर्न डॉक्टर्स यांचे करीता श्री साई प्रसादालय विभागामार्फत मोफत नाष्टा पाकिटे मिळणेबाबत.

---

९. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत परिचारक/ परिचारीकांचा नेमणूक करारांचा कालावधी संपुष्टात येत असलेबाबत.

---

१०. दर्शनरांगेमधील कोरोना संशयित साईभक्त रुग्णांची Rapid Antigen Test करणेकामी आवश्यक असणा-या Strips खरेदी करणेकामी Short notice E-Tender प्रक्रिया राबवून प्रशासकीय पातळीवर प्राप्त निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेस व व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

११. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक रिक्त पदे भरणेबाबत.

---

१२. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२१-२२ या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्याचे दर निश्चित करणे (Rate Contract) तसेच On Consignment Basis वरील Material खरेदीकामी पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

१३. संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.२१,१७,७६८/-मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.

---

१४. संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.११,६८,५२६/-मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.

---

१५. संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.३,७२,९८८/-मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.

---

१६. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये १२०० LMP Oxgen Generation Plant उभारणीकामी तातडीची बाब म्हणून दरपत्रकाव्दारे खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

---

१७. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षिक सन २०२०-२१ ची छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

---

१८. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये नोव्हेंबर-२०२० महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.४१,१२,८८२/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

१९. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये डिसेंबर-२०२० महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.५९,४१,९९०/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

२०. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जानेवारी-२०२१ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.७२,९३,४६९/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

२१. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये फेब्रुवारी-२०२१ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.६८,१८,१७०/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

२२. श्री साईनाथ रुग्णालयात भूलतज्ञांची व्हिजीटींग पध्दतीने ऑनकॉल सेवा घेणेकामी तयार केलेला पॅनल सुरु ठेवणेबाबत.

---

२३. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड व विभागाकरीता Multiparameter Monitor खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.

---

२४. नविन कार्डीयाक रुग्णवाहीकेकरीता Biphasic Defibrillator खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.

---

२५. श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रयोगशाळा या विभागाकरीता जुने Immunoassay Analyser Buyback (परत) करुन नवीन Immunoassay Analyser खरेदी करणेबाबत.

---

२६. श्री साईबाबा रुग्णालयातील बायोमेडीकल विभागाकरीता Air Compressor व Vacuum Compressor with tank खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.

---

२७. श्री.संजय गोपीनाथ कोते, मदतनीस, बांधकाम विभाग यांचा वैद्यकीय बिलाचा परतावा मिळणेबाबतचा अर्ज.

---

२८. श्रीमती वर्षा मिलींद पवार लोणी यांचा त्यांचे पतीचा वैद्यकीय बिलाचा परतावा मिळणेबाबत अर्ज.

---

२९. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड व विभागाकरीता आवश्यक असलेले Syringe Pump खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.

---

३०. Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक असणारे औषधे खरेदी करणेबाबत.

---

३१. Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक असणारे कन्झुमेबल व सर्जिकल साहित्य खरेदी करणेबाबत.

---

३२. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता ऑक्सीजन व नायट्रस गॅस मंजूर दराने खरेदीस व याकामी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

---

| | |
|---|---|
| ३३. | श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक रिक्त पदे भरणेसाठी थेट मुलाखती घेणेकामी गठीत करावयाचे समितीमध्ये तदर्थ समितीमधील एक सदस्य निश्चित करणेबाबत. |
| ३४ | श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध माशिन्सचे सन २०२१-२२ करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत. |
| ३५ | श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागात न होणा-या तपासण्या बाहेरील लॅबधारकांकडून आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी कोटेशन मागविणेस मान्यता मिळणेबाबत. |
| ३६ | श्री साईनाथ रुग्णालयातील X-ray या विभागाकरीता जुने X-ray Machine परत (Buyback) करुन नविन Floor Mounted digital Radiography system with Dual Detector खरेदी करणेबाबत. |
| ३७ | संस्थानच्या श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात नव्याने सुरु होणा-या RTPCR Lab साठी Consumbale मटेरिअल खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत. |
| ३८ | श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरीता ECG Machine खरेदी करणेकामी पुरवठा आदेश देणेबाबत. |
| ३९ | श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलमध्ये नविन HMIS (Hospital Management Information System) संगणकीय प्रणाली PACS (Picture Archiving and Communication System) प्रणालीसह कार्यान्वीत करणेकामी येणा-या अंदाजीत खर्चास व याकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत. |
| ४० | शिर्डी येथे जम्बो कोविड सेंटर चालू करणेबाबत. |
| ४१ | १० लिटर क्षमतेचे ५५०० नग Oxyen Concentrator Machine खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत. |
| ४२ | दोन्ही हॉस्पिटलमध्ये सुरु असलेल्या Internet सुविधेकरीताचे सध्याचे कार्यान्वीत असलेले Firewall Router चे 3 वर्ष कालावधीसाठी License Subscription चे Upgradation करणेस मान्यता मिळणेबाबत. |

४३. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये दि.२९ मार्च ते २ एप्रिल, २०२१ या कालावधीत मोफत जयपूर फुट शिबीराचे आयोजन करणेस व येणा-या अंदाजे तीन लाख पन्नास हजार रुपये खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

४४. श्री साईनाथ रुग्णालयात दि.२४ ते २५ एप्रिल,२०२१ या कालावधीत किडणीस्टोन शिबीराचे आयोजन व त्याकामी लागणा-या रक्कम रु.५,००,०००/- मात्रचे अनुषंगीक खर्चास मान्यता देणेबाबत.

---

४५. श्री.हरिभाऊ महादेव धुमाळ यांस वैद्यकीय आर्थिक अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत.

---

४६. श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपात्या) /पुरी मनुष्यबळाव्दारे तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

---

४७. श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती मशिनव्दारे चपाती तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

---

४८. श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

---

४९. श्री साई प्रसादालयातील हाऊस किपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलकामी तसेच वाढपी कामगार पुरविणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

---

५०. पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील (पी.व्ही.पी.पी.) महाविद्यालय, प्रवरानगर येथे उभारण्यात येणा-या हॉस्पिटलमधील रुग्णांना नाष्टा व जेवण पुरविणेबाबत.

---

५१. जुन्या वाहनांचा फेर लिलाव तसेच निरुपयोगी डेडस्टॉक भंगार साहित्याची जाहीर लिलावाने विक्री करणेबाबत.

---

५२. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामधील संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणा-या निरुपयोगी भंगार / सादिल स्वरुपाच्या साहित्याची विक्री करणेकामी ई-निविदा मागविणेबाबत.

---

५३ सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात निरुपयोगी भंगार साहित्य विक्रीकामी प्राप्त ई-निविदेतील उच्चतम दरासंदर्भात निर्णय होणेबाबत.

---

५४. संस्थान आयकर कामकाजाची निकड व कालमर्यादा विचारात घेऊन नव्याने कर सल्लागार लेखापरिक्षण संस्थेची नियुक्ती करणेबाबत.

---

५५. आर्थिक वर्ष २०१९-२० च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन शासनास सादर करण्यास मान्यता मिळणेबाबत.

---

५६. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०२०-२१ चे सुधारित अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

---

५७. संस्थानचे नावाने परकीय चलनासंबधीत बचत खाते स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा, नवी दिल्ली येथे उघडणेबाबत.

---

५८. आयकर कायद्यातील तरतुदीन्वये सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबत.

---

५९. माहे ऑगस्ट-२०२० ते नोव्हेंबर-२०२० मासिक जमा खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.

---

६०. दि. २५.११.२०२० व दि. १२.०१.२०२१ रोजी दक्षिणापेटीतील रक्कम मोजणी करत असतांना त्यामध्ये प्राप्त झालेल्या सोन्याचा मुलामा असलेल्या श्री साईबाबांची मुर्ती फोटोंच्या फ्रेमबाबत.

---

६१. सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या दोन वर्षामध्ये प्रत्येक वर्षी रु.५० कोटी असे एकूण रु.१०० कोटी इतका निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडून शिर्डी विमानतळाच्या विकासासाठी देणेच्या प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.

---

६२. श्री साईबाबा संस्थानचे CSR Registration करणेबाबत.

---

६३. आर्थिक अनुदान मागणीकरीता आलेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत. (नस्तीबध्द)

---

६४. आर्थिक अनुदान मागणीकरीता आलेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत. (नस्तीबध्द)

---

६५. संस्थानचे आयकर विषयक संपुर्ण कामकाज करणेकामी पात्र झालेले लेखापरिक्षण संस्थाचा तुलनात्मक दर तक्त्याचे अवलोकन होऊन कर सल्लागार नेमणूक होणेबाबत.

---

६६. पुर्व लेखापरिक्षण (Pre-Auditor) कामकाज करणेकामी पात्र लेखापरिक्षण संस्थाचा तुलनात्मक दर तक्ता याचे अवलोकन होऊन पुर्व लेखापरिक्षक नेमणूक होणेबाबत.

---

६७. आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता वैधानिक लेखापरिक्षक नियुक्ती कामी प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा फीचा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ व शासनास सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

६८. करनिर्धारण वर्ष २०१८-१९चे करनिर्धारण आदेशाविरुध्द आयकर विभागाकडे अपील करण्यास मान्यता मिळणेबाबत.

---

६९. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता अंतर्गत लेखापरिक्षण नियुक्ती कामी प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा फीचा तुलनात्मक तक्ता शासनास सादर करणेबाबत.

---

७०. स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा श्रीरामपूर यांचेकडून ए.टी.एम.व्दारे प्राप्त होणा-या देणगी रक्कमेचे रिपोर्ट मिळत नसल्याने सदर खाते स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी येथे वर्ग करणेबाबत.

---

७१. माहे डिसेंबर-२०२० व जानेवारी-२०२१ मासिक जमा खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.

---

७२. संस्थान व रुग्णालये विभागाकडील मालमत्ता विमा, कामगार कायदा १९२३ अन्वये कर्मचारी विमा व श्री साईभक्तांचा अपघाती विमा पॉलीसीचे नुतनीकरणासाठी राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून बंद पाकीटामध्ये दरपत्रक मागविणे व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

७३. संस्थानचे परकीय चलनाच्या नोंदणी प्रमाणपत्राचे (FCRA) नुतनीकरण करणेबाबत.

---

७४. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना प्रस्तावात नमुद १४ ठिकाणी कोरोना बाधीत रुग्णांसाठी तातडीने ऑक्सिजन पुरवठा करणेकामी

ऑक्सिजन (PSA) युनिट उभारणीकामी रु.९०३.२८ लक्ष विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावावर निर्णय घेणेबाबत.

---

७५. सन-२०२१ ची श्री साई दैनंदिनी /दिनदर्शिका छपाई करणेसाठी निम्नत्तम दर देऊ केलेल्या निविदाधारकांना कार्यादेश देणेबाबत.

---

७६. सन-२०२१ चे साईलिला व्दैमासिके मराठी व हिंदी-इंग्रजी तसेच वितरणकामी पाकीटे छपाई करणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदेतील निम्नतम दर निश्चिती तसेच निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.

---

७७. 'श्री साईबाबा एक अद्भूत अवतार' या हिंदी पुस्तकाचे प्रकाशनाबाबत.

---

७८. सन २०२०-२१ (दि.१.१०.२०२० ते ३१.०३.२०२१) देणगीदार व मान्यवरांना भेट देण्यात आलेली प्रकाशने किंमतीसह खर्ची टाकणेबाबत.

---

७९. मा.उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, मा. उच्च न्यायालयाने नेमलेल्या तदर्थ समितीचे अध्यक्ष, सदस्य, मा.राहाता व कोपरगाव न्यायालयाचे न्यायाधीश, मा.व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य व मा.अधिकारी वर्ग यांना श्री साईबाबा दैनंदिनी, दिनदर्शिका व कार्यालयीन दिनदर्शिका विनामुल्य भेट देणेबाबत.

---

८०. श्री रामनवमी उत्सव-२०२१ कार्यक्रमाचे नियोजन व उत्सव साजरा करणेसाठी येणारे खर्चास अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

---

८१. संस्थानमार्फत साज-या होणा-या सन २०२१ मधील तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

८२. श्री साईबाबा समाधी मंदिर परीसरातील सध्याचे साई सभागृह/पारायण हॉल मध्ये मिटींग हॉल तयार करणे साठी फर्निचर व इंटेरीअर कामे करणेसाठी अपेक्षित रक्कम.रु.४६,०५,०००/-मात्रचे अंदाजपत्रकिय खर्चास तसेच याकामी ई-निवीदा मागविणेसाठी मान्यता देणेबाबत.

---

८३. श्री साईबाबा समाधि मंदिर परीसरातील साई सभागृह अथवा पारायण हॉलचा वापर प्रतिक्षालय (वेटिंग हॉल) म्हणुन करणेसाठी सदर हॉल मध्ये फर्निचर व इंटेरीअर कामे करणेसाठी अपेक्षित रक्कम

रु.८,६५,०००/- मात्रचे अंदाजपत्रकिय खर्चास तसेच याकामी ई-निवीदा मागविणेसाठी मान्याता देणेबाबत.

---

८४. सर्व्हे नं.१२४ मधील भांडार इमारतीचे छताचे पत्रे बदलणे, रंगकाम करणे व इतर अनुषंगीक कामासाठी अंदाजे रु.३९,६२,७५५/-मात्र खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

८५. संस्थान निधीतून शिर्डी शहरातील सहा रस्ते विकसन कामाचे ठेकेदार टारमॅट लि.यांचे रु.१९,४३,७५,४०८/- मागणीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.०६.११.२०२० रोजीचे ऑर्डरने निवृत्त न्यायमुर्ती श्री.आर.एम.सावंत यांची Sole Arbitrator म्हणून केलेली नेमणूक दि.०२.१२.२०२० रोजी झालेल्या Preliminery meeting चे इतिवृत्त तसेच संस्थान वकील ॲड. शानबाग यांचे फीबाबत.

---

८६. श्री साईबाबा समाधी मंदिरातील स्टेनलेस स्टिल रेलिंग काढून सागवान लाकडाची डीझाईन मधील रेलिंग करणेकामी येणारे रक्कम रु.१,६९,३०,६४०/-मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबत.

---

८७. संस्थानचे मंदिर परिसरातील गुरुस्थान समोरील तळघरात स्ट्रॉगरुमचे बांधकाम करणेसाठी रक्कम रु.६५,००,०००/- मात्रचे सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चास व विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देणेबाबत.

---

८८. संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे गट नं.१९५ मधील हेलीपॅड येथील वेटींग लाऊंजचे नुतनीकरण करणे आणि हेलीपॅड व वेटींग लाऊंजचे मधील भागात पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामांसाठी येणारे रु.२५,५०,०००/-मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास व सदर कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता देणे व हेलीपॅडचा वापर आकार कमी करणेस मान्यता देणेबाबत.

---

८९. श्री रामनवमी उत्सव -२०२१ निमित्त साईभकतांचे सुविधेकरीता ऊन, वारा, पावसापासून संरक्षण होणेकामी संस्थान परिसरात तसेच पायी पालखी घेऊन येणारे साईभक्तांचे निवा व्यवस्थेकरीता पालखी मार्गावर तात्पुरती मंडप व्यवस्था उभारणेकामी येणारे रक्कम रु.१६,३३,५२८/-मात्रचे खर्चास व याकामी संबधीत मंडप ठेकेदाराकडून ई-निविदा मागविणेस मान्यता देणेबाबत.

---

९०. संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे गट नं.२४५/१ पै. मधील नविन साठवण तलावात गोदावरी उजवा तट कालव्यानुसार पाणी घेणेसाठी जलवाहीनी टाकणे व इतर अनुषंगीक कामांकरीता सल्लागार नियुक्ती करणेसाठी प्राप्त झालेल्या ई.आर.एफ.पी. प्रस्तावातील निम्नतम दराची ई-निविदा स्विकारणेकामी निर्णय होणेबाबत.

---

९१. सन २०२१ चे उन्हाळ्याच्या कालावधीत दि.०१.०३.२०२१ ते दि.१५.०६.२०२१ अखेर १०७ दिवस साईभक्तांचे उन्हापासून व पावसापासून संरक्षण होणेसाठी संस्थान परिसरात ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणेकामी येणारे रक्कम रु.१४,०५,०००/- मात्रचे खर्चास व याकामी संबधीत मंडप ठेकेदारांकडून ई-निविदा मागविणेस मान्यता देणेबाबत.

---

९२. श्री साईबाबा हॉस्पिटल येथील सीव्हीटीएस ओटी, जनरल ओटी व न्युरो ओटी मध्ये ग्रेनाईट प्लोरिंग बसविणेस तसेच रंगकाम करणेसाठी येणा-या अपेक्षीत रु.११,१९,३२३/-मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणेबाबत.

---

९३. श्री साईबाबा हॉस्पिटलचे दक्षिण बाजुस असलेले साईनगर कर्मचारी वसाहत येथील मैदानास वाहन पार्किंग करीता चेनलिंक फेसींगचे कंपाऊंड तयार करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत रु.२८,१९,४६२/- मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणेबाबत.

---

९४. श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकामासाठी एकूण रु.१५७.४०५ कोटी मात्रचे सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देणे तसेच सदर वाढीव बांधकामासाठी ई-निविदा मागविण्यात याव्यात अथवा सदर वाढीव बांधकाम ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा.लि.मुंबई यांचेकडून सध्या प्रगतीत असलेल्या (G+2) इमारत बांधकामासाठीचे निविदादराने तसेच करारातील अटी व शर्तीनुसार करुन घेणे यावर निर्णय होणेबाबत.

---

९५. श्री साईबाबा शताब्दी सोहळयानिमित्त कोपरगाव-कोल्हार रस्ता (प्र.रा.मा.०८) यावर तात्पुरत्या स्वरुपात उभारलेल्या स्वागत कमानीचे फायबर क्लॅडींगचे दुरुस्ती/नुतनीकरण करणेकामी येणारे रक्कम रु.८,८९,९००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

९६. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये १२०० LPM क्षमतेच्या Oxygen Generation Plant उभारणेकामी आवश्यक सिव्हील कामे करणेकामी

येणारे रक्कम रु.३९,०२,०००/-मात्रचे खर्चास मान्यता मिळणे तसेच तातडीची बाब म्हणून कमी (३ दिवस) कालावधीचे ठेकेदाराकडून कोटेशन मागविणेस, निम्नतम दर देणारे ठेकेदारास कार्यादेश देणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

---

९७. श्री समाधी मंदिर परिसरातील शांतीनिवास इमारतीचे प्रशासकीय कार्यालय, पॅसेज व जिन्याला ग्रेनाईट फ्लोरींग करणे कामाचे ठेकेदार साई श्रध्दा कन्सट्रक्शन, भाईदर ठाणे यांचे अंतिम देयक रक्कम रु.११,७८,९५८/- मंजूर करणे व त्यापैकी उर्वरीत देय रक्कम रु.४,६१,९८१/- ठेकेदार यांना अदा करणेस मंजुरी देणे.

---

९८. साई आश्रम भक्त निवासस्थान येथे उभारण्यात आलेल्या टेंसाईल फॅब्रिक शेडचा वापर तात्पुरत्या स्वरुपात कोविड-१९ चे रुग्णांकरीता बेड टाकून करणेस तसेच त्याकरीता सध्याचे शेडची लांबी १२० फुटाने वाढविणेस व त्याकामी येणारे रक्कम रु.५७,०७,५००/-मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास व याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

---

९९. सन २०२१-२२ करीता कॅन्टीन, प्रसादालय, मंदिर व लाडू निर्मीती विभागासाठी टोन्ड गाय दुध, पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर, पेपर पिशवी, पेपर कप खरेदीबाबत.

---

१००. सन २०२१-२२ (माहे ऑक्टोबर २०२१ ते माहे सप्टेंबर २०२२) करीता संस्थानचे विविध विभागांसाठी वार्षिक किराणा माल व अनुषंगीक साहित्य विहित पध्दतीने खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

१०१. संस्थानचे कंत्राटी कर्मचा-यांची बंद केलेली ४० टक्के वेतनवाढ पुर्ववत सुरु करणेबाबतचे प्रस्तावास चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत. (दि.१६.०२.२०२१)

---

१०२. सन २०२१-२२ करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करण्यासाठी ई-निविदा मागविणेस चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत. (२४.१२.२०२०)

---

१०३. सन २०२१-२२ करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करण्यासाठी ई-निविदा मागविणेकामी फेरप्रस्ताव सादर करणेस व व

निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत आहे त्या कॉन्ट्रक्टर्स यांना मुदतवाढ देणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत. (१६.०२.२०२१)

---

१०४. सन २०२१-२२ करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करण्यासाठी ई-निविदा मागविणेकामी फेरप्रस्ताव सादर करणेस व व निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत आहे त्या कॉन्ट्रक्टर्स यांना मुदतवाढ देणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत. (२५.०२.२०२१)

---

१०५. सन २०२१-२२ करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करण्यासाठी ई-निविदा मागविणेकामी फेरप्रस्ताव सादर करणेस व व निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत आहे त्या कॉन्ट्रक्टर्स यांना मुदतवाढ देणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत. (०१.०३.२०२१)

---

१०६. संस्थानचे कंत्राटी कर्मचा-यांची बंद केलेली ४० टक्के वेतनवाढ पुर्ववत सुरु करणेबाबतचे प्रस्तावास चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत. (दि.१०.०३.२०२१)

---

१०७. संस्थानला सन २०२१-२२ करीता कंत्राटी पध्दतीने सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करणेबाबत चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.(२०.०४.२०२१)

---

१०८. माहे जानेवारी-२०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी-२०२१ व तदंनंतरचे वेतन अदा करणेबाबत.

---

१०९. माहे जानेवारी-२०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे मार्च-२०२१ चे वेतन सानुग्रह अनुदान म्हणून अदा करणेबाबत.

---

११०. ५९८ संस्थान कंत्राटी कर्मचारी यांनी मा.उच्च न्यायालय येथे दाखल केलेली रीट पिटीशन क्र.६२२४/२०२० मधील दि.६.१.२०२१ रोजीचे सुनावणीदरम्यान मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार कार्यवाही करणेबाबत.

---

१११. कर्मचारी निवासस्थान वापरास मुदतवाढ मिळणेबाबत श्रीमती सुरेखा मोहन यादव यांचे विनंती अर्जाबाबात.

११२. संस्थानचे बेंगलोर येथील माहिती केंद्रातील कुशल कंत्राटी कर्मचारी यांचे मुदतवाढीचे अर्जाबाबत.

---

११३. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे आस्थापनेवर वर्ग ०१ प्रवर्गातील ०२ राजपत्रित अधिकारी व उप जिल्हाधिकारी प्रवर्गातील ०१ यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती होणेबाबत.

---

११४. संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटमध्ये एकत्रित वेतनावर कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी नेमणूक दिलेल्या वैद्यकीय अधिकारी व आर.एम.ओ. यांना संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन दिल्यास त्यांचेकडून आकारावयाचे दरमहा भाडे निश्चीती बाबत.

---

११५. श्री साईबाबा संस्थानचे कंत्राटी कर्मचा-यांचे पाल्यांचा सन २०१८-१९ या वर्षाचा शैक्षणिक शुल्काचा परताव्याकामी रु.२,२२,८५३/-वाढीव खर्चास चक्रिय पध्दतीने मंजूरी मिळणेबाबत.

---

११६. सन २०२०-२१ कंत्राटी कर्मचारी यांचे पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा देणेबाबत.

---

११७. कायम कर्मचा-यांचे खाते चौकशीचे कामकाजाकरीता कंत्राटी पध्दतीने खाते चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक असलेले महाराष्ट्र शासनाचे पॅनलवरील सेवा निवृत्त कर्मचारी/अधिकारी यांचे प्राप्त अर्जाबाबत.

---

११८. श्री.अरुण गणपत जाधव, वायरमन, विद्युत विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.

---

११९. माहे जानेवारी-२०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे मे-२०२१ चे मानधन सानुग्रह अनुदान पित्यर्थ अदा करणेबाबत.

---

१२०. श्री.रघुनाथ भागा आहेर, प्र.कार्यकारी अभियंता तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचे मुदतवाढीबाबत.

---

१२१. सन २०२१-२२ या कालावधी करीता वाहन विभागाकडील १२५ वाहनांचा वार्षिक विमा नुतनीकरण करणेकामी निम्नतम दर देणारे विमा कंपनी

कडून विमा नुतनीकरण करुन घेणेस व येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

१२२. माहे एप्रिल-२०२१ ते मार्च-२०२१ या वर्षाकरीता फुटाणे प्रसाद, विडयाची पाने, पावडर मार्बल मूर्ती व काशी अष्टगंध पावडर खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणे व त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

१२३. संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता आवश्यक असणा-या सन २०२१-२२ या वर्षाकरीता व्यावसायिक १९ किलो चे गॅस सिलेंडर खरेदी करणेबाबत.

---

१२४. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये ज्युनियर केजी वर्गासाठी ऑनलाईन पध्दतीने नविन प्रवेश प्रकिया राबविणेस व मर्यादीत एकूण २५० प्रवेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

---

१२५. श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे यांना शिर्डी संस्थान परिसरात माहिती केंद्राकरीता जागा मिळणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास,मोहटे, ता.पाथर्डी यांचेकडील पत्र जा.क्रं. ५१/२०२० दि.११/०२/२०२०.

---

१२६. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना त्यांचे ३३/११ के.व्ही.उपकेंद्रासाठी संस्थान मालकीची मौजे निमगांव-को-हाळे येथील गट नं.८७ पैकी २४.५० आर व गट नं.८८ पैकी क्षेत्र २७.५० आर असे एकूण वापरास दिलेले क्षेत्र ०.५२ आर इतके (नवीन गट नं.८७/८८) क्षेत्राच्या जागा वापरास मुदतवाढ मिळणेबाबत मा.अतिरीक्त कार्यकारी अभियंता (स्था) स्थापत्य उपविभाग, महावितरण, अहमदनगर यांचेकडील पत्र क्रं. अकाअ (स्था)/बां व सु उपविभाग/अनगर/तांत्रिक नं.४९८ दि.२१/११/२०२० प्राप्त दि.१५/१२/२०२०.

---

१२७. संस्थान परिसरात साईभक्तांच्या सोयीसाठी प्रसाद नॉव्हेल्टी, दुध व दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय विक्री, जनरल स्टोअर्स, शालेय साहित्य इ.व्यवसायासाठी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डीयांना वापरास दिलेल्या संस्थान मालकीचे विविध १२ ठिकाणचे जागा/गाळे वापराची मुदतवाढ देणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं. श्रीसासंएक्रेसो/१५८/२०२१, दि.२५.०१.२०२१

---

१२८. महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्या., नाशिक यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे परिसरात नोगा ब्रॅण्ड फुड प्रॉडक्टस विक्री केंद्राकरीता वापरास दिलेल्या जागेच्या वापरास मुदतवाढ मिळणेबाबत.

---

१२९. संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१ पै.चे क्षेत्रातील मंदिर परिसर गेट नं.४ लगतचे जागेत साईभक्तांचे सोयीसाठी पादत्राणेगृह व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा पुरविणेकामी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना वापरास दिलेल्या जागा वापराची मुदत वाढवून देणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/१६२/२०२१, दि.२५.०१.२०२१ रोजीचे पत्र.

---

१३०. संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.२ पै.चे क्षेत्रातील मंदिर परिसर गेट नं.१ लगत साईभक्तांचे सोयीसाठी मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा पुरविणेकामी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना वापरास दिलेल्या जागा वापराची मुदत वाढवून देणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं. श्रीसासंएक्रेसो/ १६१/ २०२१, दि.२५.०१.२०२१ रोजीचे पत्र.

---

१३१. संस्थान परिसरात साईबाबा भक्तनिवासस्थानच्या पार्किंगमध्ये फळे विक्रीस परवानगी दिलेल्या फळविक्रेत्यांना तत्सवम ठिकाणी फळे विक्री करणेस मुदतवाढ देणेबाबत साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग यांचेकडील जा.क्र.१७२४ दि.१५.१२.२०२० रोजीचे पत्र.

---

१३२. गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील मोबाईल, कॅमेरा क्लोकरुम चालविणेस श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि. शिर्डी यांना मुदतवाढ देणेबाबत.

---

१३३. संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेमार्फत चालवत असलेल्या क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायास पुढील ११ महिन्यासाठीची मुदतवाढ मिळणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं. श्रीसासंएक्रेसो/१६३/ २०२१, दि.२५.०१.२०२१ रोजीचे पत्र.

---

१३४. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचे मार्फत चालवत असलेल्या मोफत बॅग क्लोकरुम, पादत्राणे गृह व मोबाईल कॅमेरा, प्रसादा व दुध स्टॉल इत्यादी व्यवसायासाठी वापरत असलेल्या जागा वापराचे पुढील मुदत वाढवून मिळणेबाबत.मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं. श्रीसासंएक्रेसो /१८४/२०२१, दि.१७.०२.२०२१ रोजीचे पत्र.

---

१३५. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थान परिसरात वापरास दिलेल्या १२ कियॉस्क/गाळे पैकी ११ कियॉस्क/गाळे वापराची मुदत वाढवून मिळणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं. श्रीसासंएक्रेसो/ १६०/२०२१, दि.२५.०१.२०२१ रोजीचे पत्र.

---

१३६. श्री साई मंडळी ट्रस्ट, मल्लेश्वरम, बंगलोर यांनी त्यांचे मालकीचे मल्लेश्वरम (बंगलोर) येथील मिळकतीपैकी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे माहिती केंद्रासाठी भाडेपट्टा करारनाम्याने वापरास दिलेल्या जागेच्या वापराची मुदत वाढवून घेणेबाबत.

---

| Both Hospitals HMIS Software with 5 Years AMC-CMC, Customization, On Site Support With 2 Engineers | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Company Name | License Cost | AMC-CMC Cost | Customization Cost | Cost of On Site Support With 2 Engineers | Total Amount (Without Tax) |
| 1 | Manorama Infosolution Pvt. Ltd., Kolhapur. | 96,00,000/- | 1,82,16,000/- | 1,68,00,000/- | Including in AMC/CMC Cost. | 4,46,16,000/- |
| 2 | 21st century Informatics, Mumbai. | 1,00,00,000/- | 98,90,262/- | 69,07,039/- | 41,40,532/- | 3,09,37,833/- |
| 3 | Palash Healthcare Pvt. Ltd., Pune. | 1,50,00,000/- | 90,00,000/- | - | 50,00,000/- | 2,90,00,000/- |
| 4 | Clinivantage Healthcare Technologies, Pune. | 1,50,00,000/- | 1,20,00,000/- | 40,00,000/- | 50,00,000/- | 3,60,00,000/- |
| 5 | Triotree Technologies, Noida. | 65,00,000/- | 60,00,000/- | 60,00,000/- | 90,00,000/- | 2,75,00,000/- |
| 6 | Caresoft Information System Pvt.Ltd., Mumbai. | 48,00,000/- | 28,80,000/- | 70,00,000/- | 51,28,284/- | 1,98,08,284/- |
| 7 | C-Dac, Pune. | 2,45,42,000/- | 1,34,98,100/- | Including | 1,65,21,000/- | 5,45,61,100/- |
| 8 | Sirona Digitech Pvt.Ltd., Mumbai | 1,40,00,000/- | 56,00,000/- | 7,50,000/- | 42,00,000/- | 2,45,50,000/- |

| Both Hospitals PACS System with 5 Years AMC/CMC | | | | |
|---|---|---|---|---|
| Sr. No. | Company Name | License Cost | AMC/CMC Cost | Total Amount (Without Tax) |
| 1 | Medsynaptic Pvt Ltd, Pune | 67,00,000/- | Including | 67,00,000/- |
| 2 | Inhospital Health Service s Pvt. Ltd. Pune | 42,40,000/- | 15,60,000/- | 58,00,000/- |

| Sr. No. | Software Description | Average Amount (Without Tax) |
|---|---|---|
| 1 | Both Hospitals HMIS Software with 5 Years AMC/CMC, Customization, On Site Support With 2 Engineers | 3,33,71,652/- |
| 2 | Both Hospitals PACS System with 5 Years AMC/CMC. | 62,50,000/- |
| | **Total Average Amount (Without Tax) -** | **3,96,21,652/-** |

दोन्ही हॉस्पिटलसाठी 5 वर्षांकरीता अद्ययावत, अत्याधुनिक असलेली नविन HMIS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम खरेदी करणेकामी उपरोक्त तक्त्यातील विविध नामांकित कंपन्यांमार्फत घेण्यात आलेल्या अंदाजीत दरांनुसार सरासरी पुर्णांकित अंदाजीत रक्कम रु. 3,97,00,000/- (कर विरहीत) मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

त्याअनुषंगाने, दोन्ही हॉस्पिटलसाठी 5 वर्षांकरीता अद्ययावत, अत्याधुनिक असलेली नविन HMIS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम खरेदी करणेकामी येणाऱ्या एकुण अंदाजीत पुर्णांकित रक्कम रु. 3,97,00,000/- (कर विरहीत) मात्रच्या अंदाजीत खर्चास तसेच त्याकामी ई-निविदा प्रक्रीया राबविणेस मा. तदर्थ समितीची मान्यता मिळणेस्तव, मान्यतेस्तव टिपणी/ प्रस्ताव सादर करण्यात आलेली होती.

सदरहू टिपणीबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करण्यात येऊन, त्यांचे मार्गदर्शनाखाली व दिलेल्या निर्देशानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

1) दि. 16/09/2020 रोजी 'साई सभागृह' कक्षात स. 11.00 वा. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी याचे अध्यक्षतेखाली M/s. SANHAR ABS Pvt. Ltd., Hyderabad. व M/s. Clinivantage Healthcare Technologies, Pune. या कंपन्यांनी त्यांचे सॉफ्टवेअरचे Demo दाखविलेले आहे. तसेच सदर मिटींगमध्ये कंपनीचे प्रतिनीधींशी सॉफ्टवेअरच्या Modules बाबत चर्चा करण्यात आलेली आहे.
2) दि. 05/11/2020 रोजी स. 11.00 वा. Apollo कंपनीचे प्रतिनीधींनी मा. वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षीका यांचे समवेत दोन्ही हॉस्पिटलची पाहणी केलेली आहे. तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी सध्या दोन्ही हॉस्पिटलमध्ये कार्यान्वित असलेले संगणके/ संगणकीय साहित्य कालबाह्य झालेले असलेबाबतची व आवश्यक असलले संगणके/ संगणकीय साहित्य व सर्व्हर बाबतची चर्चा झालेली आहे. तसेच Apollo कंपनीचे प्रतिनिधींनी त्यांचे HMIS संगणकीय प्रणालीचा Demo दाखविलेला आहे.
3) दि. 19/12/2020 रोजी स. 11.30 वा. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे कक्षात M/s. Clinivantage Healthcare Technologies, Pune या कंपनीचे Director व प्रतिनीधींशी HMIS संगणकीय प्रणालीबाबत कंपनीचे Proposal संस्थानला सादर करणेबाबतचे निर्देश देण्यात आलेले होते. तसेच, कंपनीचे प्रतिनीधींनी त्यांचे HMIS संगणकीय प्रणालीतील विविध Modules दाखविलेले असून, सदरहू Modules बाबत सखोल माहिती दिलेली आहे. सदरच्या नमुद मुद्दा क्र. 1 ते 3 बाबतचा माहितीस्तव अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

तसेच, दि. 19/12/2020 रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी M/s. Clinivantage Healthcare Technologies, Pune कंपनीचे प्रतिनीधींना दिलेल्या निर्देशानुसार, सदरहू कंपनीमार्फत ई-मेलअन्वये HMIS संगणकीय प्रणालीचे Monthly व Yearly Subcription चे Proposal प्राप्त झालेले असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.,

**DELIVERABLE MODULES**

| Sr. No. | Modules | Sr. No. | Modules | Sr. No. | Modules |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Emergency | 21 | Pathology Lab Management | 41 | Kitchen Management |
| 2 | Registration | 22 | Radiology Lab Management | 42 | Blood Bank Management |
| 3 | OPD | 23 | Machine Integration | 43 | Back Office Management |
| 4 | Queue Management | 24 | Consignment Management | 44 | Equipment Management |
| 5 | KIOS | 25 | Purchase Management | 45 | Auction Management |
| 6 | Token Display | 26 | Pharmacy Management | 46 | Tender Management |
| 7 | OP/ IP Billing | 27 | Inventory Management | 47 | CSSD Management |
| 8 | OP/ IP Corporate | 28 | Store Management | 48 | Housekeeping Management |
| 9 | OP/ IP Insurance | 29 | Narcotics Store Management | 49 | Mortuary Management |
| 10 | OP/ IP TPA | 30 | Scrap Management | 50 | Reports Management |
| 11 | Cashless Management | 31 | Medico Legal Case Management | 51 | User Access Control Management |
| 12 | Admission Discharge Transfer | 32 | Doctor Share Management | 52 | Transaction Log Management |
| 13 | Nursing Management | 33 | Ambulance Management with Google Map Integration | 53 | Accounting Interface |
| 14 | Bed Management | 34 | Crash Cart Management | 54 | Self-Configurable Email and SMS Template Management |
| 15 | New Born Management | 35 | QR and Barcode Management | 55 | Secured Master Management |
| 16 | ICU Management | 36 | Health Package Management | 56 | User Specific Dashboard Management |
| 17 | Operation Theatre Management | 37 | Visitor Management | 57 | Patient Centric Mobile App |
| 18 | Voice Enabled Electronic Medical Records | 38 | Fund Management | 58 | Smart Device Integration |
| 19 | Day Care Management | 39 | Asset Management | 59 | Artificial Intelligence |
| 20 | Doctor Desk Management | 40 | Diet and Nutrition Management | 60 | Full Voice Recognition |

**1) Monthly Subscription -**

| COMMERCIALS | | |
|---|---|---|
| MONTHLY COMMERCIAL FOR Shirdi Sai Sansthan Trust | | |
| ACC – HIMS – Application Cloud Hosting Per Month for Shri Sainath Hospital (300 Beds) | INR | 2,50,000.00 |
| ACC – HIMS – Application Cloud Hosting Per Month for Shri Saibaba Hospital (300 Beds) | INR | 2,50,000.00 |
| Hosting Services Cloud Deployment | INR | 50,000.00 |
| **Total -** | **INR** | **5,50,000.00** |
| Note - Minimum contract signing for 1 Year | | |

Monthly Subscription नुसार सादर केलेल्या Commercial Proposal मध्ये त्यांनी प्रथम 1 वर्षाकरीता दर महा रक्कम रु. 5,50,000/- (करविरहीत) मात्रचे दर दिलेले आहेत. सदरच्या रक्कम रु. 5,50,000/- (करविरहीत) दर महा याप्रमाणे 5 वर्षांकरीताचे दर त्यांनी सादर केलेले असून, सदर रक्कमेच्या विवरणाप्रमाणे संस्थानचा 5 वर्षाकरीता रु. 3,30,00,000/- (करविरहीत) अक्षरी - तीन कोटी तीस लाख मात्रचा खर्च अपेक्षीत आहे.

**2) Yearly Subscription -**

| COMMERCIALS | | |
|---|---|---|
| YEARLY COMMERCIAL FOR Shirdi Sai Sansthan Trust | | |
| ACC – HIMS – Application License Subscription Year - 1 | INR | 60,00,000.00 |
| Subscription Year - 2 | INR | 60,00,000.00 |
| Subscription Year - 3 | INR | 60,00,000.00 |
| Subscription Year - 4 | INR | 60,00,000.00 |
| Subscription Year - 5 | INR | 60,00,000.00 |
| **Total Application Cost -** | **INR** | **3,00,00,000.00** |

Yearly Subscription नुसार 5 वर्षाकरीता दरवर्षी 60,00,000/- (करविरहीत) मात्रचे दर दिलेले आहेत.

सदरच्या रक्कम रु. 60,00,000/- (करविरहीत) दर वर्षी याप्रमाणे 5 वर्षांकरीताचे दर त्यांनी सादर केलेले असून, सदर रक्कमेच्या विवरणाप्रमाणे संस्थानचा 5 वर्षाकरीता रु. 3,00,00,000/- (करविरहीत) अक्षरी - तीन कोटी मात्रचा खर्च अपेक्षीत आहे.

तसेच, Proposal मध्ये कंपनीने खालील काही Terms & Conditions नमुद केलेल्या आहेत.

1. Your obligation to pay Advance to us shall arise at the time of signing the master Subscription Agreement.
2. Annual Maintenance will be charged @ 20 % of the total application cost after completion of 5 Years.
3. All On site work would be chargeable at actual after completion of customization period. Travel, lodging and boarding expenses would be paid by Shirdi Sai Sansthan Trust.
4. Add-On modules will be charged separately.
5. Devices and API's requred for integration should be procured by the customer.
6. All Integration/ Customization work not included explicitly in this proposal will be charged extra depending on actual effort. The scope will be mutually agreed for and paid for in advance. Integration with 3rd Party costs, which will be paid for by the hospital.
7. Initial Onsite Training will be provided by Clinivantage Free of Cost for a period of 3 Months. Travel, lodging and boarding expenses would be paid by Shirdi Sai Sansthan Trust.
8. Any third-party license application required for integration will be procured by Shirdi Sai Sansthan Trust.
9. Commercials are Exclusive of Taxes.

तसेच Terms & Conditions मध्ये On Site Work, Add on Modules, Devices and API's Required for Integration, Customization/ Integration with 3rd Party, Travel, Lodging and Boarding, 3rd Party License Application, PACS System इ. करीता अतिरीक्त खर्च संस्थानला करावा लागेल असे नमुद केलेले आहे. परंतु प्रत्यक्षात खर्चाचा तपशिल मात्र दिलेला नाही.

संस्थानचे दोन्ही रुग्णालयांमध्ये संगणक प्रणाली वार्षिक भाडेतत्वावर कार्यान्वित करणेकामी प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणेस तसेच याकामी येणा-या अंदाजे खर्च रक्कम रु. 3,97,00,000/- (कर विरहीत) खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे समोर चक्रीय सादर केलेल्या प्रस्तावावर मा. अध्यक्ष सो. तदर्थ समिती यांनी सदरचा विषय तदर्थ समितीच्या सभेसमोर ठेवावा विषयाचे सविस्तर प्रेझेंटेशन करावे, असे निर्देश दिलेले होते.

त्यानुसार दि. 09/03/2021 रोजी दोन्ही हॉस्पिटलचे प्रेझेंटेशन तसेच HMIS संगणकीय प्रणाली विकसीत करणारे कंपनीचे प्रतिनीधी यांचे समवेत अहमदनगर येथे समक्ष प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अध्यक्ष तदर्थ समिती व सहा. धर्मादाय आयुक्त, सदस्य तदर्थ समिती यांना तसेच दि. 25/03/2021 रोजी नाशिक येथे अप्पर विभागीय आयुक्त, सदस्य तदर्थ समिती यांना सॉफ्टवेअर कंपनीच्या प्रतिनीधींचे समवेत नविन HMIS संगणकीय प्रणालीचे प्रेझेंटेशन व सध्या कार्यान्वित असलेल्या HMIS संगणकीय प्रणालीचे व Hardware बाबतचे प्रेझेंटेशन दाखविण्यात आलेले आहे.

त्यानुसार सदरचा विषय मा. तदर्थ समितीचे सभेसमोर चक्रीय पद्धतीने सादर करण्याची कार्यवाही सुरु असताना विधी विभागाचे पत्राअन्वये खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

"श्री. संजय भास्करराव काळे यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे पी.आय.एल.नं.86/2018 दाखल केलेले असून, सदर पी.आय.एल.मध्ये आता नविन सिव्हील ॲप्लीकेशन दाखल केलेले आहे.

त्यामध्ये, श्री. संजय भास्करराव काळे यांनी मा. कोर्टास विनंती केली श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयामध्ये विविध नोंदी (उदा. ऑपरेशन थियटर चार्जेस, सर्जरी चार्जेस, ॲनास्थेसिया चार्जेस) घेणेकामी अद्यावत संगणक प्रणाली नाही, त्यामुळे सदर नोंदी रजिष्टरला नोंदविणेत येतात. त्यामुळे संस्थानला अद्यावत संगणक प्रणाली खरेदी करणेचे आदेश देणेत यावे, अशी मा. कोर्टास विनंती केलेली आहे.

त्यानुसार मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद मध्ये आय.पी.एल.नं.86/2018 मध्ये सिव्हील मध्ये मुद्दा क्र. 18 मध्ये खालीलप्रमाणे निर्देशीत आहे.

A. Allow the Civil Application.

B. Direct the Saibaba Sansthan to purchase software/hardware to deal with the issues of patient details, medicine stocks, inventory ect in the Hospitals of the Sansthan.

C. Grant any other relief in the interest of the public at large which the Applicant has not prayed.

दोन्ही रुग्णालयांमध्ये संगणक प्रणाली कार्यान्वित करणेकामी प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे खर्चास मान्यता मिळणेस्तव दि. 22/05/2021 रोजीचे मंजूर टिपणीअन्वये मा. तदर्थ समितीचे सभेसमोर चक्रीय पद्धतीने प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदरहू प्रस्तावाबाबत मा. अध्यक्ष साहेब यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

1) सर्व विषयाचे वाचन केले व श्री. राहूल गलांडे, प्रभारी ई.डी.पी. मॅनेजर यांच्याकडून समजून घेतला. येथे जरुर नमूद करावेसे वाटते की, आम्हाला दिनांक 09/03/2021 रोजी जिल्हा न्यायालयाचे वर्कशाळा सभागृहामध्ये संस्थानचे संबंधीत कर्मचारी श्री. विनोद कोते व Clinivantage Healthcare Technologies, Pune या कंपनीचे प्रतिनिधी श्री. निलेश जैन आणि श्री. अफरोज सय्यद यांचेतर्फे प्रेझेंटेशन देण्यात आले होते.

2) वरील विषयाचा आवाका लक्षात घता हे स्पष्ट होते की, या प्रस्तावाद्वारे संस्थान प्रशासनाला फक्त सॉफ्टवेअरसाठी 3,97,00,000/- करविरहित हे पाच वर्षाच्या वापरासाठी खर्च करावयाचे आहेत. या प्रस्तावामध्ये हार्डवेअर तसेच नेटवर्कींगबाबत किती खर्च अपेक्षित आहे, याबाबतचा स्पष्टपणे विचार केलेला नाही. श्री. गलांडे यांच्यामते तो खर्च कदाचित पाच कोटी रुपयांच्या घरात जाऊ शकतो व त्यावर जीएसटी सुद्धा द्यावा लागेल.

3) वरील गोष्टींचा सोपा अर्थ म्हणजे संस्थान प्रशासनाला सदर सिस्टीमसाठी पाच वर्षाच्या वापरासाठी GST चा विचार करता सुमारे बारा कोटी रुपये खर्च करावयाचे आहेत.

4) हे म्हणणे वादातीत आहे की, हार्डवेअर वस्तू तसेच नेटवर्कींच्या वस्तु (Items) यांची किंमत पाच वर्षानंतर घसाऱ्यापोटी कदाचित शून्य असणार आहे. अशा परिस्थितीत पाच वर्षाच्या लायसेन्सचा विचार करता व त्याबाबत अपेक्षीत असलेल्या गुंतवणुकीचा विचार करता वरील बाबी अतिशय खर्चिक वाटतात.

5) सर्व टिपणीचा अभ्यास करता असेही लक्षात येते की, महाराष्ट्र शासन आजही विविध शासकीय हॉस्पिटल्समध्ये अशाच प्रकारची प्रणाली वापरते. महाराष्ट्र शासनाने अशी प्रणाली किती लायसेन्स फीवर प्राप्त केली आहे, ही बाब स्पष्ट होत नाही. कदाचित या बाबींचा विचार करता मा. उच्च न्यायालयाकडून शासनाला निर्देश देवून सदर प्रणाली संस्थानच्या रुग्णालयांच्या वापरासाठी सुद्धा उपयोगात आणता येवू शकते. मात्र याबाबत कुठलाही अभ्यास केलेला नाही.

6) वरील परिस्थितीत सरसकट अशी प्रणाली प्राप्त करून घेत असतांना संस्थानचा दूरदर्शी फायदा विचारात घेणे गरजेचे आहे. दोन्ही रुग्णालये Charitable आहेत. अशा परिस्थितीत सदर प्रणाली (सॉफ्टवेअर) 10 वर्षांच्या वापरासाठीची परवानगी तसेच या दरम्यानचा Support या बाबी अंतभूत करणे व त्या अनुषंगाने किमतीत घासाघीस करणे उचित ठरेल. याला मुख्य कारण म्हणजे सद्यस्थितीत आणलेला प्रस्ताव हा फक्त पाच वर्षांसाठी वापरात येऊ शकतो.

7) करिता आमच्या मते संस्थान प्रशासनाने वरील बाबींचा पुन्हा विचार करावा, शासकीय रुग्णालयांतील प्रणाली कशी चालते त्यावर शासनाने किती खर्च केला आहे इत्यादि बाबी तपासून पहाव्यात प्रस्ताव पुन्हा सादर करावा असे वाटते.

उपरोक्त नमुद मुद्यांप्रमाणे दोन्ही रुग्णालयांकरीता प्रस्तावित HMIS (Hospital managment Information System) संगणकीय प्रणालीसाठी 3,97,00,000/- (करविरहित) मात्रचा खर्च अपेक्षीत आहे व सदरचे सॉफ्टवेअर Cloud Base असल्यामुळे, शिर्डी येथे स्वतंत्र सर्व्हर खरेदी करण्याची आवश्यकता नाही. माहिती तंत्रज्ञान (IT) विभागाकडे 50 MBPS क्षमतेची इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे. सद्यस्थितीत दोन्ही रुग्णालयांकरीता आवश्यक असलेली इंटरनेट सुविधा ते पुरवित असून भविष्यात लागणारी इंटरनेट सुविधा देखील त्यांचेकडूनच उपलब्ध करून घेता येईल व आवश्यकतेनूसार Wi-Fi Router जोडून Users जोडता येईल. यासाठी सदरची बाब फार खर्चिक नाही. तसेच Users ला सदरची संगणकीय प्रणाली वापरणेसाठी Tab अथवा Mobaile चा वापर करता येतो व संगणक संचापेक्षा Tab चा खर्च कमी स्वरुपात असतो. प्रस्तावित HMIS संगणकीय प्रणाली ही Cloud Base स्वरुपात आहे. Wi-Fi Internet Router व सद्यस्थितीत कार्यान्वित असलेल्या नेटवर्कचा संयुक्तरीत्या वापर करणार असल्यामुळे संगणकीय प्रणाली सुरु करणेकामी सहाजीकच सद्यस्थितीत हार्डवेअर व नेटवर्कींगकरीता इतक्या मोठया खर्चाची आवश्यकता नाही.

संगणक व संगणकीय प्रणालीचे तंत्रज्ञानातील बदल (Technical Upgrades, Technologial Platforms etc.) हे काळानुसार बदलत असतात. साधारणतः संगणकीय क्षेत्रातील तंत्रज्ञानामध्ये चार ते पाच वर्षात नव-नविन बदल होत असतात. याचा सरासरी विचार करता संगणकीय प्रणाली ही पाच वर्षांकरीता प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तसेच, शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती07/प्राक्र.89/39 दि. 01/08/2021 रोजीच्या निर्णयाप्रमाणे संगणकीय साहित्यांचे व नेटवर्कींगचे वयोमान पाच वर्षे निश्चित करण्यात आलेले असून, पाच वर्षांनतर सदरचे साहित्य कालबाहय झाल्याने निर्लेखीत करण्यायोग्य ठरविण्यात यावे, असे आदेशीत आहे.

सिव्हील हॉस्पिटल, अहमदनगर येथे संगणकीय प्रणालीबाबत संपर्क केला असता, त्यांचे हॉस्पिटलकरीता स्वतंत्र HMIS संगणकीय प्रणाली चालू नाही. परंतु, शासनामार्फत e-hospital चे पोर्टल उपलबध करून देणबाबत कळविलेले असल्याचे त्यांनी सांगीतले.

National Informatic Centre (NIC) यांचे e-hospital चे सिस्टीम काही रुग्णालयांमध्ये कार्यान्वित आहे. परंतु, याबाबत संस्थानने त्यांचेशी यापुर्वी पाठपुरावा केला असता त्यांनी दि. 26/06/2018 रोजीचे ई-मेलद्वारे संस्थानचे हॉस्पिटलकरीता त्यांचे (NIC) मार्फत e-hospital सॉफ्टवेअर Implement करता येणार नाही, असे कळविलेले आहे. शिवाय केंद्र सरकार संचलीत प्रगत संगणक विकास केंद्र (C-DAC) यांचेमार्फतही सिव्हील हॉस्पिटल, अलिबाग, रिजनल रेफरल हॉस्पिटल (मल्टीस्पेशालिटी), नाशिक या ठिकाणी हॉस्पिटलकरीताचे HMIS संगणकीय प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्यासाठी त्यांनी सादर केलेल्या प्रस्तावात फक्त HMIS संगणकीय प्रणालीकरीता (PACS सिस्टीम वगळून) एकत्रीत रक्कम रु. 5,45,61,100/- करविरहीत मात्र इतका खर्च दिलेला आहे. परंतु, C-DAC यांनी दिलेले दर हे प्रस्तावित केलेल्या खर्चापेक्षा जास्त आहे.

संगणकीय क्षेत्रतील तंत्रज्ञानाचे बदलाप्रमाणे पाच वर्षांकरीता संगणकीय प्रणाली प्रस्तावित होती. परंतु, HMIS संगणकीय प्रणाली 10 वर्षांकरीता Support सह उपलब्ध करून देणेबाबत निविदाधारकाकडून हमी घेता येतील.

त्यानुसार, दि. 27/05/2021 रोजीचे मंजूर टिपणीअन्वये, संस्थानचे दोन्ही रुग्णालयांमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त संगणकीय कार्यान्वित करणेकामी ई-निविदा प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. 3,97,00,000/- (करविरहीत) अक्षरी – तीन कोटी सत्त्यान्नव लाख मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव चक्रीय पद्धतीने मा. तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करण्यात आलेला होता.

सदरहू प्रस्तावावर उप्पर विभागीय आयुक्त, नाशिक सदस्य तदर्थ समिती यांनी 'प्रस्तावाप्रमाणे मंजुरीस हरकत नाही' असा निर्णय दिलेला आहे. तसेच मा. अध्यक्ष सो. यांनी दि. 31/05/2021 रोजीचे पत्राअन्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

1) निम्मस्वाक्षरीदार यांनी संस्थान प्रशासनाने आणलेल्या आधीच्या विषयावर दि. 24/05/2021 रोजी निर्णय नमूद केल्यानंतर हा नविन प्रस्ताव तदर्थ समिती समक्ष आणलेला आहे. पूर्वी दिलेल्या प्रस्तावास बऱ्याच बाबी भिन्न दिशेशा वगळून (divert) हा नविन प्रस्ताव केल्याचे दिसून येते.

2) संबंधित अधिकारी श्री. राहूल गलांडे, प्रभारी ई.डी.पी. मॅनेजर यांच्याशी विषयाचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, आत्ताच्या प्रस्तावात सुध्दा संस्थान प्रशासनाला writing pad घ्यावे लागतील, ते किती घ्यावे लागतील, त्याचा खर्च किती, या बाबी नमूद केलेल्या नाहीत. अशी प्रणाली ही Cloud Base घ्यावयाची आहे, मात्र Physical Server प्रत्यक्षात शिर्डी येथे

घेतल्यास किती खर्च होईल, याबाबत स्पष्टता नाही. याचे महत्वाचे कारण म्हणजे सर्व रुग्णालयाचा डाटा हा एकत्र रुग्णालयामध्ये साठवून ठेवावा लागेल किंवा Cloud Base असल्याने त्यासाठी पैसे मोजावे लागतील.

3) एकूणच आधीच्या प्रस्तावाला फाटा देवून काही बाबी नमूद करून निविदा प्रक्रीया राबविण्याची दिसून येते. त्याचप्रमाणे National Informatics Center यांच्यातर्फे काही हॉस्पिटलमध्ये त्यांनी तयार केलेली प्रणाली कार्यान्वित आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या सोबत जून 2018 नंतर पुन्हा पत्रव्यवहार नाही. किंवा राज्य शासनाला विनंती करून त्यांच्या तर्फे ज्या हॉस्पिटलमध्ये अशी प्रणाली कार्यान्वित आहे त्यांच्याकडून या बाबींची स्पष्टता घेता येईल. मात्र तसे दिसून येत नाही.

4) वरील परिस्थिती पाहता, पूर्वी आणलेला प्रस्ताव तसेच आज आणलेला प्रस्ताव हा पूर्णत: अभ्यासांती आणलेला नाही. तसेच आज आणलेला प्रस्ताव यामध्ये बऱ्याच बाबी ज्यांचा विचार मोघम प्रकारे नमूद केलेला आह. मात्र त्या बाबी पुढे जाऊन स्पष्ट झाल्यास त्यासाठी खर्च करणे गरजेचे होईल. उदा : सद्या संस्थानकडे उपलब्ध असलेले हार्डवेअर मटेरिअल आज रोजी आणलेल्या प्रस्तावासाठी वापरता येईल किंवा नाही याबाबत स्पष्टपणे नमूद केलेले नाही. म्हणजेच पुन्हा हार्डवेअरसाठी नविन प्रस्ताव गरजेप्रमाणे आणणे भाग पडेल. करिता सर्वकष विचार करून प्रस्ताव आणावा. पुर्वी दिलेला प्रस्ताव व आज दिलेला प्रस्ताव माझ्यातर्फे नामंजूर.

तसेच सदरहू विषयाच्या PIL/86/2018 सिव्हील ॲप्लिकेशन बाबत दि. 08/06/2021 रोजी मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

1. It appears that there is no harmony amongst the members of the Ad-hoc Committee. The members of the Ad-hoc Commettee appointed by this Court shall hold meeting regarding the issues concerning the Sansthan including the issue concerned in both Civil Applications and revert back to this Court.

2. Stand over to 06/07/2021.

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रमाणे कळविलेनूसार सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे मत आहे.

**मागणी –**

सिव्हील ॲप्लिकेशन PIL/86/2018 बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. 08/06/2021 रोजीचे पत्राअन्वये कळविलेप्रमाणे, दोन्ही हॉस्पिटलमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त संगणकीय कार्यान्वित करणेकामी ई-निविदा प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. 3,97,00,000/- (करविरहीत) मात्रच्या खर्चास मान्यता देता येईल, असे मत आहे.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय –**

प्रस्ताविकेत नमुद केलेप्रमाणे सद्यस्थितीत साईबाबा हॉस्पिटल येथे सन 2006 मध्ये कार्यान्वित केलेली व सध्या कालबाहय झालेली संगणकीय प्रणाली वापरात आहे. सदरची प्रणाली कार्यान्वित असलेली संगणके, सर्व्हर, नेटवर्क व इतर अनुषंगीक साहित्यही कालबाह्य झालेली आहेत. तसेच, साईनाथ हॉस्पिटल येथे संगणकीय प्रणाली कार्यान्वित नसल्यामुळे सर्व कामकाज हे मानविय पद्धतीने सुरु आहे.

संस्थानचे दोन्ही रुग्णालयांचा अवाका व दिवसेंदिवस रुग्णांची वाढणारी संख्या याचा विचार करता उपचार घेणाऱ्या रुग्णांना आवश्यक उपचार व अनुषंगीक सुविधा वेळेवर मिळणेकामी तसेच प्रशासकीय कामकाजात अचुकता, सुसुत्रता व कामकाज अधिक गतीमान होणेचे दृष्टीने दोन्ही रुग्णालयांकरीता अद्ययावत संगणकीय प्रणाली कार्यान्वित करणे अत्यावश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे, संस्थानचे दोन्ही रुग्णालयांमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त संगणकीय कार्यान्वित करणेकामी ई-निविदा प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. 3,97,00,000/- (करविरहीत) मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे समोर सादर.

14/6/22

**(कान्हूराज बगाटे भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- ०४



वाहन विभाग

मा. तदर्थ (Ad hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर

विषय:- अ) महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१८१६/प्र.क्र.२०/का.१६, दि.२८/१२/२०१८ अन्वये,५०० सामाजीक संस्थांना रुग्णवाहीकेकरीता प्रत्येकी रु. ५ लाख कायम स्वरुपी अनुदान देणेबाबतचा विषय न्यायप्रविष्ट असलेने, मा.व्यवस्थापन समिती व तदर्थ (Ad hoc)समितीने स्थगीत ठेवलेल्या विषयावर निर्णय होणे बाबत...

ब) मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन नं. ४८४४ / २०२१ संबंधीत निर्णय होणे बाबत...

संदर्भ:- ०१) PIL No.86/2018 .

०२) ॲड. ए एस बजाज यांचे सिव्हील ॲप्लीकेशन नं.४८४३ व ४८४४ / २०२१ बाबतचे पत्र.

०३) विधी विभागाकडील जा.नं.एसएसएस-वशी-विधी-३१३/२०२१ दिनांक २६/०५/२०२१ चे पत्र.

०४) मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठाचे दि.०८/०६/२०२१ चे निर्देश.

महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील:-

१) कलम १७ (१) मध्ये,"राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्यती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यकत त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) कलम १७ (२-ण) मध्ये,मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला अपत्ती मध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

३) कलम २१ (१) मध्ये, विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल,--

(ख) - रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग) - भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

(ड) – श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

४) कलम २१ (१क-२) मध्ये पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापराता व खर्च करता येईल:-

(एक) राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेला एखादी नोंदणीकृत सावर्जनिक *विश्वस्तव्यवस्था* किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखाभाल करुन घेणेसाठी छाननी समितीचे मान्यतेने अर्थसाहय्य देण्याची तरतुद आहे.

५) कलम-१७ (३) मध्ये "विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्व मंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरिता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाही", अशी तरतुद आहे.

प्रस्तावना:-

दि.३१/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीने सभेतील विषय क्र.२३ निर्णय नं.६३७ (१८) अन्वये,*श्री साईबाबांनी त्यांच्या हयाती मध्ये स्वत:च्या हाताने अनेक रुग्णांची सेवा सुश्रुषा करुन त्यांच्या व्याधी ब-या केलेल्या आहेत. श्री साईबाबांनी केलेले हे रुग्णसेवेचे कार्य श्री साईबाबा संस्थानने अविरतपणे पुढे सुरु ठेवलेले आहे. आजमितीस शिर्डीमध्येसंस्थान मार्फत श्री साईबाबा व श्री साईनाथ या दोन रुग्णालयामार्फत ही सेवा अल्पदरात उपलब्ध करुन देण्यात येत आहे.*

*श्री साईबाबांचे हे रुग्णसेवेचे कार्य पुढे असेचचालु ठेवुन त्यांची व्याप्ती वाढविण्याकरीता,"राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील अधिकाधिक रुग्णांपर्यंत तातडीने वैद्यकीय सेवा पोहचविणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व दानशुर साईभक्त यांचे संयुक्त विद्यामाने राज्यातील विविध भागातील स्वयंसेवी संस्थाना रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्याचा उपक्रम सुरु करण्याचा व्यवस्थापन समितीचा मानस आहे. सदरचा उपक्रम सुरु करण्यासाठी ५०० रुग्णवाहिका (Ambulance) खरेदी कराव्या लागतील. या रुग्णवाहिकांच्या खरेदीसाठी रुग्णवाहिका प्रकल्प राबविणा-या स्वयंसेवी संस्थानी त्यासाठीची २५ टक्के रक्कम भरावी व उर्वरित ७५ टक्के रक्कम दानशुर देणगीदार साईभवताच्या देणगीमधुन उपलब्ध करावयाची आहे. याकरीता या उपक्रमासाठी देणगीदार साईभक्त आपल्या आई-वडीलांच्या स्मृतीपित्यर्थ अथवा इतर कार्यानिमित्त देणगी देऊ शकतात. अशा प्रकारे देणगीदारांना आवाहान करण्यात यावे. या सर्व रुग्णवाहिका साई ॲम्बुलन्स या नावाने महाराष्ट्रभर चालतील व त्यांचे संचालन स्वयंसेवी संस्थामार्फत होईल अशा प्रकारे कार्यवाही करण्यात यावी"* असा निर्णय झालेला होता.

पान नं.०२ वर...

त्यानुसार इकडील जा.नं.एसएसएस-वशी-वाहन/४४५५/२०१६ दि.२३/११/२०१६ अन्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांना सदर साई-रुग्णवाहिका प्रकल्पास शासन मान्यता मिळणे कामी पत्र देण्यात आलेले होते.

त्यानंतर दि.२५.०२.२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४ व निर्णय क्र.१४ अन्वये, *"महाराष्ट्रातील ग्रामीण, दुर्गम भागातील गरीब व गरजु रुग्णांना तात्काळ वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन देणेसाठी ५०० रुग्णवाहिकांचा प्रकल्प राबविणेकामी अंतीम सुधारित नियमावली तयार करणेत येऊन त्यास मान्यता देण्यात आली व या सर्व कार्यवाहीस संस्थानच्या छाननी समितीची मान्यता घेऊन पुढील मंजुरीसाठी सदर प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात यावा"*, असे ठरले.

सदर निर्णयानुसार,दि.२७/०३/२०१७ रोजीचे मा छाननी समितीचे सभेत सदर साई रुग्णवाहिका प्रकल्पास व त्या बाबतचे सुधारीत नियमावलीस मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या सभेत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला होता.

*"वरील विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. श्री साईबाबा संस्थानमार्फत ५०० रुग्णवाहिकांचा साई-रुग्णवाहिका प्रकल्प राबविणेस व याकामी महिंद्रा व महिंद्रा कंपनीचे BS-4 बोलेरो वाहन, विशेष किंमत रु.५ लक्ष प्रति रुग्णवाहिका या दराने खरेदी करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली.*

*सर्व सहमतीने असेही ठरले की, या प्रकल्पाच्या पहिल्या टप्यात १०० रुग्णवाहिका खरेदी करण्यात याव्यात व त्यानंतर या १०० रुग्णवाहिकांच्या व त्या रुग्णवाहिका चालविणा-या संस्थाच्या कामकाजाबाबत आढावा घेवुन पुढील प्रकल्प राबविण्याची कार्यवाही करावी. श्री साईबाबा संस्थानचे रुग्णवाहिका संदर्भातील सर्व नियम हे संबंधीत संस्थांना लागु असतील. तसेच या प्रकल्पात लागु होणारे सर्व प्रकारचे सरकारी कर माफ करण्याचा विनंती प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा. सर्वानुमते प्रस्तावीत नियमावलीस मान्यता देण्यात आली व सदरहु नियमावलीस व प्रकल्प राबविणेस शासनाची मान्यता घेणेसाठी विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा*, असे ठरले होते.

यानुसार इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/२५३/२०१७ दि.१५/०४/२०१७ चे पत्रान्वये, साई रुग्णवाहिका प्रकल्पास व या बाबतचे मा.व्यवस्थापन समितीने तसेच छाननी समितीने मान्यता दिलेले नियमावलीस शासन मान्यता मिळणे करीता प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करण्यात आला होता.

यावर महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग यांनी पत्र क्र. सासंवि-१०१७/६७४/प्र.क्र.२०/का.१६ दि.०८/०५/२०१७ अन्वये, *"श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील उपरोक्त तरतूदी विचारात घेता,"भक्तांना जाहिर आवाहन करुन या प्रयोजनासाठी भक्तांकडून थेट प्राप्त होणारा निधी कोणत्याही स्वयंसेवी संस्थेला उपलब्ध करुन देता येणार नाही. सबब, संदर्भाधीन पत्रान्वये आपण सादर केलेला प्रस्ताव अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने सदर प्रस्तावावी फेर तपासणी करण्यात यावी"*, असे कळविलेले होते.

तसेच कार्यासन अधिकारी, विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.सासवि-१०१७/सं.क्र.११९५/का.१६, दि.१९.०७.२०१७ चे पत्रामध्ये,"श्री संजय भास्करराव काळे, कोपरगांव, जि.अहमदनगर यांच्या दिनांक २१/०६/२०१७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करावे. सदर पत्रातील मुद्यांच्या अनुषंगाने आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास त्वरीत सादर करण्यात यावेत", असे कळविलेले होते.

महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग यांचेकडील पत्रातील व मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या जनहित याचीकेतील मुद्यांबाबत सविस्तर चर्चा होऊन शासनास देणेचे अभिप्राय बाबत निर्णय होणे करीता सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता.

दि.०४/०४/२०१८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०१ निर्णय क्र.२२४ (५) नुसार दि.०७/०३/२०१८ रोजीचे शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली. दि.०७/०३/२०१८ चे सभेतील निर्णय क्र.२०४ या मध्ये खालील मजकुर समाविष्ठ करणेत यावा.

*साई रुग्णवाहिका प्रकल्पासाठी साईभक्तांनी देणगी दिलेल्या रकमेचा सदर योजनेसाठी विनियोग कसा करता येईल, याबाबत समिती सदस्य मा. ॲड. मोहन जयकर यांचे मार्गदर्शनाखाली कायदेतज्ञ व आयकर तज्ञांचा सल्ला घेण्यात यावा*, असे ठरले.

यानंतर दि.०२/०५/२०१८ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३३८ व दि.०१/०६/२०१८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३४७ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

पान नं.०३ वर...

*"रुग्णवाहिकांसाठी साई रुग्णवाहिका प्रकल्पाबाबत सभेत सविस्तर चर्चा झाली, सदर प्रकल्पासाठी भाविकांकडून जमा केलेल्या निधीचा विनियोग कसा करावा, याबाबत संस्थानचे कर सल्लागार श्री केळकर व सनदी लेखापाल श्री चितळे यांचा सल्ला घेण्यात आला. भाविकांनी रुग्णवाहीकांसाठी देणगी स्वरुपात दिलेली रक्कम कोणत्याही परिस्थितीत त्यांना परत करता येणार नाही, असे दोन्ही सल्लागारांनी सुचित केले आहे. त्याऐवजी सदर निधीचा विनियोग संस्थाननेच करावा असे त्यांची सुचविले आहे.*

*यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर निधी भाविकांना परत करु नये, असे ठरले. तसेच सदर निधीमधुन विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन १०० रुग्णवाहीका खरेदी कराव्यात, सदर रुग्णवाहिकेवर साई रुग्णवाहिका व संस्थानचे तसेच देणगीदार साईभक्ताचे नाव टाकावे. सदर रुग्णवाहिका राज्यभरातील आरोग्य क्षेत्रात कार्य करणा-या सेवाभावी संस्था / ट्रस्ट यांना करारपध्दतीने वापरण्यासाठी देण्यात याव्या, त्यासाठी सदर संस्थाकडून रु.१ लाख मात्र एवढी रक्कम नापरतावा अनामत रक्कम म्हणून संस्थानकडे जमा करुन घ्यावी. सदर रुग्णवाहीकांची मालकी संस्थानची राहील. तथापी सदर रुग्णवाहीकेवरील वाहन चालक त्यांसाठी येणार इंधन, दुरुस्ती देखभाल व इतर अनुषंगीक खर्च करण्याची जबाबदारी वापरकर्त्या सस्थांची राहील. तसेच सदर रुग्णवाहिकेचा वापर करतांना अपघात किंवा तत्सम प्रसंगातुन उद्भवणा-या कायदेशीर बाबींची जबाबदारी देखील संबधीत वापरकर्त्या सस्थांची राहील", असे ठरले. त्याप्रमाणे प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यास मान्यता देण्यात आली.*

*याबाबत सेवाभावी संस्था/ ट्रस्ट यांचेकडून अर्ज मागविणे, त्यांची निवड करण्याची पध्दती पात्रतेचे निकष तसेच संस्थेची निवड झाल्यानंतर त्यांचेशी करावयाच्या करारनाम्यातील अटी व शर्ती यांचा समावेश असलेल्या नियमावलीसह सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करावा, असे ठरले.*

उपरोक्त निर्णयानुसार, साई रुग्णवाहिका प्रकल्पाच्या रुग्णवाहिका संस्थानच्या नावावर असलेने त्या अनुषंगीक ब-याच कायदेशिर जबाबदा-या संस्थानवर बंधनकारक राहतील. त्यामुळे ज्या स्वयंसेवी संस्था / ट्रस्ट यांना रुग्णवाहिका द्यावयाच्या आहेत, त्यांचे निकष / नियमावली निश्चित करुन त्यानुसार त्यांचेकडून विहीत नमुन्यात अर्ज मागवुन त्या संस्था निश्चित करुन त्यांना ठरावीक रक्कम अनुदान म्हणुन देवुन त्या रक्कमेतुन त्यांनी रुग्णवाहिका खरेदी केल्यास त्या रुग्णवाहिकांची कायदेशीर जबाबदारी त्यांची राहील. यामुळे अनुदान देणे बाबतचा सुधारित प्रस्ताव व या अनुशंगाने सुधारित नियमावलीचे प्रस्तावावर *दि.२६/०७/२०१८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.२० निर्णय क्र.४८० व दि.२२/०८/२०१८ चे सभेतील विषय क्र.१ निर्णय क्र.५०६(१) नुसार, प्रस्तुत प्रकरणी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.*

*१) ५०० रुग्णवाहिकांचा प्रकल्प मान्यतेसाठी मा.छाननी समितीचे शिफारशीने शासनाकडे फेर प्रस्ताव पाठविण्यात यावा.*

*२) याकामी संस्थानने पात्र सेवाभावी संस्थांना प्रत्येकी रुपये ५ (पाच) लाख उपलब्ध करुन द्यावेत, उर्वरीत रक्कम संबधीत संस्थेने द्यावी.*

*३) संबधीत संस्थेशी करारनामा करुन घेण्यात यावा.*

*४) रुग्णवाहीकेसाठी महिंद्रा अॅन्ड महिंद्रा कंपनीचे BS-VI हे मॉडेल निश्चित करणेत यावे.*

*५) प्रत्येक रुग्णवाहीकेस GPS System बसवुन घेण्यात यावी.*

*६) रुग्णवाहीकेच्या नोंदणी व विम्याची जबाबदारी संबधीत संस्थेची राहील.*

*७) रुग्णवाहीकेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे सौजन्याने 'श्री साई शताब्दी रुग्णवाहीका' असे नमुद करण्यात यावे.*

तसेच दि.२६/०७/२०१८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.२१ निर्णय क्र.४८१ नुसार, सविस्तर चर्चा होऊन, पुढील प्रमाणे नियमावलीस मान्यता देण्यात आली.

१) स्वयंसेवी संस्था ही मुंबई सार्वजनिक संस्था १९५० (बॉम्बे पब्लिक ट्रस्ट १९५०) खाली नोंदणीकृत होऊन कमीतकमी तीन वर्ष कार्यरत असावी. (अथवा सोसायटी रजि. अॅक्ट खाली किंवा मा.धर्मदाय आयुक्त यांचेकडे ३ वर्षापुर्वी नोंदलेली असावी).

२) ज्या स्वयंसेवी संस्था या प्रकल्पात समाविष्ट होवु शकतात त्यांना या प्रकल्पातील जास्तीत जास्त एक रुग्णवाहिकेसाठी अनुदान देय राहील.

३) सदर अनुदानातुन केवळ रुग्णवाहिकाच खरेदी करता येईल.

४) संस्थान अनुदानातुन रुग्णवाहिका खरेदी केले बाबतचा पुरावा संस्थानकडे सादर करावा लागेल.

५) रुग्णवाहिकेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व साई शताब्दी साई रुग्णवाहिका असे नाव टाकणे बंधनकारक राहील.

पान नं.०४ वर...

६) सेवाभावी संस्थेचे लेखापरिक्षण नियमित (प्रति वर्षी) होणे आवश्यक असुन मागील ३ (तिन) वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे.

७) सेवाभावी संस्थेची मागील ३ वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल (टर्नओव्हर) किमान १०(दहा) लाख रुपये असावी.

८) सेवाभावी संस्थेवर कोणतेही आर्थिक गैरव्यवहारातील गुन्हे नोंदविलेले नसावेत. या बाबत संस्थेने रु.१००/- चे गैरन्यायीक स्टॅम्पवरील प्रतिज्ञापत्र द्यावे.

९) स्वयंसेवी संस्थेला देण्यात येणा-या अनुदानातुन घेतलेली रुग्णवाहिका ही फक्त रुग्णांना सेवा देणेकरीताच वापरावी लागेल. यात कोणत्याही प्रकारची प्रवासी अगर अवैध वाहतुक करता येणार नाही.

१०) सदर रुग्णवाहिकेचे पीयुसी, फिटणेस,टॅक्स इत्यादी कामे व त्याकरीता येणारा खर्च संबधीत संस्थेस करावा लागेल.

११) स्वयंसेवी संस्थेला संस्थान सोबत अटी व शर्तीचा स्वतंत्र करारनामा रु.६००/- चे गैरन्यायीक स्टॅम्प पेपरवर करुन द्यावा लागेल. या करीताचा खर्च संबंधीत सेवाभावी संस्थेस करावा लागेल.

१२) कायदेरशिर बाब उदभवल्यास न्यायालयीन कार्यक्षेत्र राहाता, कोपरगांव व औरंगाबाद कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.

१३) संस्थान अनुदानातुन खरेदी केलेली रुग्णवाहिका स्वयंसेवी संस्थेला पुढील १० वर्ष इतर कोणासही चालविण्यास देता येणार नाही अथवा हस्तांतरीत करता येणार नाही.

दि.२६/०७/२०१८ व दि.२२/०८/२०१८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.४८० व निर्णय क्र.४८१ नुसार, फेर प्रस्तावास व त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सुधारित नियमावलीस मान्यता मिळणेस बाबतचा प्रस्ताव मा.छाननी समितीचे सभेपुढे सादर करण्यात आले होते. दि.२२/०८/२०१८ चे मा.छाननी समितीचे सभेतीचे विषय क्र.०६, निर्णय क्र.४० नुसार, यावर सविस्तर चर्चा होऊन, विषय नं.६ वर प्रशासकीय अडचणी पाहिल्यानंतर पुढे येणाऱ्या अडचणी व कायदेशीरबाबी लक्षात घेता, शिर्डी संस्थानतर्फे अर्थसहाय्य म्हणून महाराष्ट्रातील नोंदणीकृत प्रत्येकी एक या प्रमाणे ५०० सामाजीक संस्थाना (मुंबई सार्वजनिक संस्था कायदा १९५० किंवा सोसायटी रजिष्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोदणीकृत) प्रत्येक रुग्णवाहिकासाठी संस्थानतर्फे रु.५.०० लक्ष कायम स्वरुपी अनुदान म्हणून देण्यात यावी. अशी रक्कम सदर संस्थेला न देता मागणी करणाऱ्या संस्थेने महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीकडे आगाऊ रक्कम (५ लक्ष वजा करुन) भरावी व कागदोपत्री पुर्तता करावी अशी रक्कम त्यांनी भरल्या नंतर संस्थान तर्फे रु.५ लक्ष अनुदान परस्पर डिलरला / कंपनीला देण्यात यावे. रुग्णवाहिकेची मालकी ही स्वयंसेवी संस्थेची राहील. मात्र त्यांना संस्थानच्या नावाने हमीपत्र द्यावे लागेल, की ते सदर रुग्णवाहिका विकणार नाही व सर्व कार्यवाही संस्थानचे नियमाप्रमाणे करतील, सदर छाननी समितीची शिफारस व्यवस्थापन समितीपुढे ठेवून तदनंतर शासनाकडे पाठवावी, तसेच दि.२२/०८/२०१८ चे मा.छाननी समितीचे सभेतील विषय क्र.०७ निर्णय क्र.४१ नुसार, "५०० रुग्णवाहिका प्रकल्पाला शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर रुग्णवाहिका नियमावलीबाबत शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर निर्णय घ्यावा असे एकमताने ठरले. व हा प्रस्ताव व्यवस्थापन समितीकडे पाठविण्यात यावा". असे ठरले.

दि.२२/०८/२०१८ चे मा.छाननी समितीचे सभेतीचे विषय क्र.०६, निर्णय क्र.४० नुसार,"५०० रुग्णवाहिकांना प्रत्येकी रु.५ लक्ष याप्रमाणे अनुदान देणे करीता रु.२५ कोटी येणारे खर्चास मान्यता मिळणेस तसेच मा.छाननी समितीने शिफारस केलेनुसार सदर प्रस्तावास मान्यता मिळणे कामी व त्यानंतर विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यता मिळणेस सादर करणे कामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेपुढे मान्यता मिळणे कामी सादर करण्यात आला होता. या सभेत निर्णय क्र.५४९ नुसार, *"दि.२२/०८/२०१८ चे मा.छाननी समितीचे सभेतीचे विषय क्र.०६, निर्णय क्र.४० नुसार, ५०० रुग्णवाहिकांना प्रत्येकी रु.५ लक्ष याप्रमाणे अनुदान देणे करीता रु.२५ कोटी येणारे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरचा प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठविणेस मान्यतेसाठी पाठविण्यात यावा"*, असे ठरले.

यानुसार मा.प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/३१११/२०१८ दि.२७/०९/२०१८ अन्वये सुधारीत साई रुग्णवाहिका योजनेचा प्रस्ताव निर्णयास्तव सादर करण्यात आला होता.

यावर, विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१८१६/प्र.क्र.२०/का.१६, दि.२८/१२/२०१८ अन्वये, खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"श्री साईबाबा संस्थन विश्वस्तव्यवस्था, अधिनियम, २००४ कलम १७(२-ण) मध्ये, मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्याला चालना देण्यात येईल, अशी तरतूद आहे. सदर तरतूदीनुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत महाराष्ट्र राज्यातील आरोग्य क्षेत्रात / रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत संस्थेस प्रत्येकी एक याप्रमाणे ५०० रुग्णवाहिकांना प्रत्येकी रुपये ५ लक्ष याप्रमाणे अनुदान देणेकरीता रुपये २५ कोटी येणा-या खर्चास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

पान नं.०५ वर...

१) *शिर्डी संस्थानातर्फे अर्थसहाय्य म्हणून महाराष्ट्रातील आरोग्य क्षेत्रात / रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत संस्थेस प्रत्येकी एक याप्रमाणे ५०० सामाजिक संस्थांना (महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोंदणीकृत) प्रत्येक रुग्णवाहिकेसाठी संस्थानातर्फे रु.५ लक्ष कायमस्वरुपी म्हणून अनुदान देण्यात यावे. अशी रक्कम सदर संस्थेला न देता मागणी करणा-या संस्थेने महिंद्रा ॲन्ड महिंद्रा कंपनीकडे आगाऊ रक्कम (रु. ५ लाख वजा करुन) भरावी व कागदोपत्री पूर्तता करावी. अशी रक्कम त्यांनी भरल्यानंतर संस्थानातर्फे रु.५ लक्ष इतकी रक्कम स्वयंसेवी संस्थेनी भरल्यानंतर संस्थेतर्फे रु.५ लक्ष अनुदान परस्पर डिलरला / कंपनीला देण्यात यावी.*

२) *संबंधित संस्थेशी करारनामा करुन घेण्यात यावा.*

३) *रुग्णवाहिकेसाठी महिंद्रा ॲन्ड महिंद्रा बोलेरो BS-IV हे मॉडेल निश्चित करण्यात यावे.*

४) *प्रत्येक रुग्णवाहिकेस GPSSystem बसवून घेण्यात यावी.*

५) *रुग्णवाहिकेच्या नोंदणी व विम्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहिल.*

६) *रुग्णवाहिकेवर श्री साई रुग्णवाहिका असे नमूद करण्यात यावे.*

७) *रुग्णवाहिका नियमावली अंतिम करुन शासन मान्यतेस्तव तात्काळ सादर करण्यात यावी. सदर नियमावलीस शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर नियमावलीमध्ये नमूद अटी व शर्तीनुसार महाराष्ट्रातील नोंदणीकृत संस्थांना प्रत्येकी एक याप्रमाणे रुग्णवाहिके करीता अनुदान देण्यात यावे.*

मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे श्री संजय भास्कर काळे यांनी १) महाराष्ट्र शासन, २) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचीकेत मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ व दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयाची मा.कोर्टाचा पुढील आदेश होईपावेतो स्थगीत ठेवणेची मागणी केलेली होती. सदर याचीकेचा नंबर ८६/२०१८ असा आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ चे सभेतील विषय क्र.०१ निर्णय क्र.३९ (८) व (९) नुसार, दि.०८/०१/२०१९ रोजीचे सभेच्या इतिवृत्त कायम करतांना त्यातील निर्णय क्र.३४ व ३५ ऐवजी खालील प्रमाणे दुरुस्ती करुन त्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

*"मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानशी संबधीत जनहीत याचीकेवरील दि.३०.०१.२०१९ रोजी सुनावणीच्या वेळी सदर याचीका प्रलंबीत असतांना संस्थान व्यवस्थापनाने केवळ संस्थानचे दैनंदिन कामकाजाशी संबधीत बाबींवर खर्च करावा, संस्थान व्यतिरीक्त अन्य संस्था अथवा शासकीय विभाग यांना निधी देण्याबाबत निर्णय घेण्यात येऊ नये, असे निर्दश मा.उच्च न्यायालयाने दिलेले असल्याचे संस्थानचे वकील ॲड. नितीन भवर यांनी दुरध्वनीद्वारे आजचे सभेमध्ये कळविले आहे.*

*मा.उच्च न्यायालयाचे सदर निर्देशास अनुसरुन आजचे सभेत सदरचा निर्णय कामय करतांना मा.उच्च न्यायालयाचे पुढील आदेश होईपर्यंत सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा"*, असे ठरले.

तसेच मा. तदर्थ समितीचे दि.११/१२/२०२० चे सभेतील निर्णय क्र.४५७ नुसार, *"मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल असलेल्या रिट पिटीशन १२०/२०१९ मध्ये न्यायालयाने दि.३०/०१/२०२० रोजी, संस्थान व्यवस्थापनाने केवळ संस्थानचे दैनंदिन कामकाजाशी संबंधीत बाबीवर खर्च करावा, संस्थान व्यतिरीक्त अन्य संस्थान अथवा शासकिय विभाग यांना निधी देण्याबाबत निर्णय घेण्यात येऊ नये असे निर्देश दिलेले असल्याने साई रुग्णवाहीका प्रकल्पाबाबतचा निर्णय स्थगित करण्यात यावा असे ठरले.*

आता, संस्थान पॅनल वरील ॲड. ए एस बजाज यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिकाकर्ते श्री संजय काळे यांनी सिव्हील ॲप्लीकेशन नं.४८४३ व ४८४४ / २०२१ दाखल केलेले असुन यात त्यांनी संस्थानने ५०० रुग्णवाहीका खरेदी करुन शासकिय रुग्णालयांना देणगी देणे बाबत आदेश होणेस विनंती केलेली आहे. याबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दि.२५/०५/२०२१ पुर्वी संस्थानची बाजु मांडणेकरीता शपथपत्र सादर करणे बाबत कळविलेले आहे.

या प्रकरणी मा.उच्च न्यायालय,मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांनी सदर सिव्हील ॲप्लीकेशन बाबत दिनांक ०८/०६/२०२१ रोजी पुढील तारीख नेमलेली होती. यावेळी त्यांनी सदर प्रकरणाबाबत तदर्थ (Ad hoc) समितीने याबाबत निर्णय घेऊन न्यायालयापुढे सादर करावे असे निर्देश दिलेले आहेत.

**प्रकरणातील वस्तुस्थीती व विभागाचा अभिप्राय:-**

अ) साई रुग्णवाहीका प्रकल्पाबाबत-

१) दि.३१/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीने सभेतील विषय क्र.२३ निर्णय नं.६३७ (१८) अन्वये, साई रुग्णवाहीका प्रकल्प राबविणेस व याकामी ५०० रुग्णवाहिकांच्या खरेदीसाठी रुग्णवाहिका प्रकल्प राबविणा-या स्वयंसेवी संस्थानी त्यासाठीची २५ टक्के रक्कम व उर्वरित ७५ टक्के रक्कम दानशुर देणगीदार साईभक्ताच्या देणगीमधुन उपलब्ध करावी असा निर्णय झाला होता.

२) मा.व्यवस्थापन समिती व छाननी समितीचे निर्णयानुसार सदर साई रुग्णवाहीका प्रकल्प राबविणेस व याकामी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा चे बीएस 4 बोलेरो रुग्णवाहीका हे वाहन खरेदी करणेस मान्यता देण्यात आली होती.

पान नं.०६ वर...

३) या प्रकल्पाकरीता महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीने क्र.NP/ADMIN/2016 दि.२६/१२/२०१६ रोजीचे पत्रान्वये २५ रुग्णवाहीका देणगी देणार असल्याचे कळविले होते.

४) सदर साई रुग्णवाहीका प्रकल्पास व नियमावलीस शासन मान्यता घेणेकरीता जा.नं.एसएसएस/वशी-वाहन/२५३/२०१७ दि.१५/०४/२०१७ चे पत्राने प्रस्ताव पाठविला होता.

५) यावर महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग यांनी पत्र क्र. सासंवि-१०१७/६७४/प्र.क्र.२०/का.१६ दि.०८/०५/२०१७ अन्वये, "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील उपरोक्त तरतूदी विचारात घेता,"भक्तांना जाहिर आवाहन करुन या प्रयोजनासाठी भक्तांकडून थेट प्राप्त होणारा निधी कोणत्याही स्वयंसेवी संस्थेला उपलब्ध करुन देता येणार नाही. सबब, संदर्भाधीन पत्रान्वये आपण सादर केलेला प्रस्ताव अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने सदर प्रस्तावावी फेर तपासणी करण्यात यावी", असे कळविलेले होते.

६) यानंतर मा.व्यवस्थापन समिती व छाननी समितीचे निर्णयानुसार साई रुग्णवाहीका संस्थानच्या नावावर असलेने त्या अनुशंगीक ब-याच कायदेशीर जबाबदा-या संस्थानवर बंधनकारक राहतील. यामुळे स्वयंसेवी संस्था/ट्रस्ट यांना रुग्णवाहीका देणे ऐवजी रुग्णवाहीका खरेदीसाठी अनुदान देणेचा प्रस्ताव व याअनुशंगाने सुधारीत नियमावली करुन ती जा.नं.एसएसएस/वशी-वाहन/३१११/२०१८ दि.२७/०९/२०१८ अन्वये महाराष्ट्र शासनास निर्णयास्तव सादर करण्यात आला होता.

७) यास अनुसरुन विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१८१६/ प्र.क्र.२०/का.१६, दि.२८/१२/२०१८ अन्वये, मान्यता देण्यात आलेली आहे.

८) तथापी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे श्री संजय भास्कर काळे यांनी १) महाराष्ट्र शासन, २) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे विरुध्द या प्रकल्पाबाबत जनहित याचीका दाखल केलेली आहे.

९) मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ चे सभेत सदर प्रकरणा बाबत मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसा, मा.उच्च न्यायालयाचे पुढील आदेश होईपर्यंत सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आलेला आहे.

१०) तसेच मा. तदर्थ समितीचे दि.११/१२/२०२० चे सभेतील निर्णय क्र.४५७ नुसार, " मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल असलेल्या रिट पिटीशन १२०/२०१९ मध्ये न्यायालयाने दि.३०/०१/२०२० रोजी, संस्थान व्यवस्थापनाने केवळ संस्थानचे दैनंदिन कामकाजाशी संबंधीत बाबीवर खर्च करावा, संस्थान व्यतिरीक्त अन्य संस्थान अथवा शासकिय विभाग यांना निधी देण्याबाबत निर्णय घेण्यात येऊ नये असे निर्देश दिलेले असल्याने साई रुग्णवाहीका प्रकल्पाबाबतचा निर्णय स्थगित करण्यात आलेला आहे.

११) विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१८१६/प्र.क्र.२०/का.१६, दि.२८/१२/२०१८ अन्वये, शिर्डी संस्थानातर्फे अर्थसहाय्य म्हणून महाराष्ट्रातील आरोग्य क्षेत्रात / रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत ५०० सामाजीक संस्थांना प्रत्येकी ५ लक्ष अनुदान देण्यात यावे असे नमुद असुन या निर्णयातील अट क्र.३ मध्ये रुग्णवाहीकेसाठी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा बोलेरो बीएस-4 हे मॉडेल निश्चीत करण्यात यावे असे नमुद करण्यात आलेले आहे. तथापी सध्या बीएस-6 प्रणालीत वाहने वापरात असून महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी बोलेरो बीएस- 6 रुग्णवाहिकेचे उत्पादन करत नाही. यामुळे सदर अर्थसहाय्य देण्याच्या निर्णयाची आता अंमलबजावणी करणे शक्य होणार नाही, असे मत आहे.

ब) सिव्हील ॲप्लीकेशन नं.४८४४ / २०२१ बाबत.

१) मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिकाकर्ते श्री संजय काळे यांनी सिव्हील ॲप्लीकेशन नं.४८४३ व ४८४४ / २०२१ दाखल केलेले असुन यात त्यांनी संस्थानने ५०० रुग्णवाहीका खरेदी करुन शासकिय रुग्णालयांना देणगी देणे बाबत आदेश होणेस विनंती केलेली आहे.

२) साई रुग्णवाहिका प्रकल्पाकरीता देणगी स्विकारणे करीता स्वतंत्र खाते तयार करण्यात आले होते. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ चे सभेतील निर्देश व दि.०५/०४/२०१८चे मान्यतेने व जा.नं.एसएसएस /वाहन/९९/२०१८ दि.१२/०४/२०१८ चे आदेशान्वये साई रुग्णवाहिका प्रकल्पाकरीता संस्थानमार्फत साईभक्तांकडून स्विकारण्यात येणारी देणगी पुढील आदेश पावेतो स्थगित करण्यात आलेली आहे. त्यानुसार साई रुग्णवाहिका प्रकल्पाचे निधीमध्ये संस्थानखाती दि.१६/०७/२०२० अखेर एकुण रक्कम रु.५,३३,८३,०६३/- जमा आहेत.

३) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे कोव्हीड-१९ करिता रु.५१ कोटी मुख्यमंत्री सहाय्यता निधीत मदत देण्यात आलेली आहे.

४) संस्थानमार्फत साई धर्मशाळा, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटल येथे कोवीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे कोवीड सेंटर सुरु करण्यात आलेले आहे. येथे आतापर्यंत जवळपास ७००० रुग्णांवर मोफत उपचार करण्यात आलेले असुन, अजुनही उपचार चालु आहेत. तसेच येथे उपचारार्थ दाखल रुग्णांना नाष्टा व दोन वेळा चहा, जेवनाची मोफत व्यवस्था करण्यात येत आहे. त्यामुळे संस्थानचा वरील बाबीवर खर्च चालु आहे.

पान नं.०७ वर...

५) महाराष्ट्र शासनाकडुन संस्थानला रुग्णवाहीका मागणीचा प्रस्ताव प्राप्त नाही.

६) सध्या कोवीड-१९ चे महामारीमुळे श्री साईबाबांचे मंदिर साईभक्तांचे दर्शन / आरतीसाठी दि.१७/०३/२०२० रोजी बंद करण्यात आले होते. यानंतर माहे नोव्हेंबर-२०२० मध्ये मंदिर दर्शनासाठी सुरु करण्यात आले होते. तथापि माहे मार्च-२०२१ पासुन कोवीड-१९ चा प्रादुर्भाव वाढत गेल्याने माहे एप्रिल-२०२१ पासुन श्री साईबाबांचे मंदिर साईभक्तांचे दर्शन / आरती साठी बंद करण्यात आलेले आहे. त्यामुळे संस्थानचे देणगीवर मोठा परिणाम झालेला असुन संस्थानचे आर्थिक उत्पन कमी झालेले आहे. संस्थान आस्थापनेवरील कर्मचा-यांचे पगार नियमित सुरु असुन संस्थानमार्फत पुर्व नियोजित बांधकाम प्रकल्प सुरु असुन पुर्णत्वाच्या टप्यात आहेत. त्यामुळे त्यावरील खर्च नियमितपणे सुरु आहे.

७) प्राप्त परिस्थितीमध्ये संस्थानकडून महाराष्ट्र शासनाला ५०० रुग्णवाहीका देणे आर्थिकदृष्टया व्यवहार्य नाही.

८) पुर्वी साई रुग्णवाहिका प्रकल्पा करीता देणगीदार साई भक्तांकडून देणगी दिलेली रक्कम रु.५,३३,८३,०६३/- जमा असुन या रकमेतुन जीतक्या रुग्णवाहीका खरेदी करता येतील तितक्या रुग्णवाहीका शासनास देता येतील.

प्रस्ताव -

अ) महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१८१६/प्र.क्र.२०/का.१६, दि.२८/१२/२०१८ अन्वये, ५०० सामाजीक संस्थांना रुग्णवाहीकेकरीता प्रत्येकी रु. ५ लाख कायम स्वरुपी अनुदान देणेबाबतचा विषय न्यायप्रविष्ट असलेने, मा.व्यवस्थापन समिती व तदर्थ (Ad hoc) समितीने स्थगीत ठेवलेल्या विषयावर निर्णय होणेस,

ब) मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन नं. ४८४४ / २०२१ संबंधीत निर्णय होणेस,

सदरचा विषय मा. तदर्थ (Ad hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

( कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वतव्यवस्था, शिर्डी

ERP- 128

विषय क्र.- ०५

## मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय

लेखाशाखा अनुदान

**विषय:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना प्रस्तावात नमूद १४ ठिकाणी कोरोना बाधीत रुग्णांसाठी तातडीने ऑक्सिजन पुरवठा करणेकामी ऑक्सिजन (PSA) युनिट उभारणीकामी रु. ९०३.२८ लक्ष विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग नाशिक यांना उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावावर निर्णय घेणेबाबत...**

प्रस्तावना:-

मा. श्री राधाकृष्ण गमे, विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी जा.क्रं. नियोजन/संस/२०२१/६९८४/दि. १९.०५.२०२१ अन्वये मा. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना पत्र लिहून, केलल्या मागणीचा तपशील खालीलप्रमाणे

कोव्हीड-१९ या विषाणूच्या प्रसारामुळे संपूर्ण देशांत मोठया प्रमाणात प्रादुर्भाव झालेला असून नाशिक विभागातील सर्व जिल्हयात रुग्णसंख्या सातत्याने वाढत आहे. त्यामुळे विभागातील सर्वच शासकीय व खाजगी रुग्णालयांमध्ये रुग्ण मोठया प्रमाणात दाखल होत आहेत. यापैकी ब-याच रुग्णांना ऑक्सिजनची आवश्यकता भासते. अशावेळी उपलब्ध ऑक्सिजन पुरेसा उपलब्ध नसल्याने विभागातील सर्वच जिल्हयांमध्ये ऑक्सिजनची कमतरता जाणवत आहे.

त्यामुळे सद्यस्थितीत वाढत्या रुग्णांची संख्या व तुलनेने ऑक्सिजनची आवश्यकता तसेच पुढील काळात कोरोनाच्या तिस-या लाटेची शक्यता पाहता विभागात जास्तीत जास्त ऑक्सिजन प्लांटची (PSA) उभारणी करण्यात येत आहे. आतापर्यंत विभागात ८६ ठिकाणी PSAयुनिट प्रस्तावित केले असून त्यातील अनेक कामे प्रगती पथावर आहेत. अजूनही १४ ठिकाणांच्या ग्रामीण रुग्णालयांना PSA युनिट स्थापित करण्याची आवश्यकता दिसून येते. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | PSA युनिट स्थापित करावयाचे ठिकाण | क्षमता (LPM)/Unit | क्षमता (MT)/Unit | आवश्यक निधी (रु. लाखात) (६४.५२प्रति युनिट) |
|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे | थालनेर, बोराडी, सोनगीर | ५०० | ०.९४ | १९३.५६ |
| २ | नंदुरबार | मोलगी, तोरणमाळ, विसरवाडी, खोंडमळी, खांडबारा | ५०० | ०.९४ | ३२२.६० |
| ३ | जळगांव | वाघवड, न्हावी, एरंडोल | ५०० | ०.९४ | १९३.५६ |
| ४ | अहमदनगर | कोतूळ, चिचोंडी पाटील, पुणतांबा | ५०० | ०.९४ | १९३.५६ |
| | | | | एकूण | ९०३.२८ |

उपरोक्तप्रमाणे PSA युनिट स्थापित करावयाचे असल्याने त्यासाठी आपले संस्थान तर्फे रु.९०३.२८ लक्ष निधी उपलब्ध करून द्यावा असे त्यांचे पत्रात नमूद केले आहे.

**मा. अध्यक्ष यांचे अभिप्राय :-**

सदरहू प्रस्ताव मा. तदर्थ समिती सभेचे अध्यक्ष यांचेसमोर दि. २८.०५.२०२१ रोजी चक्रीय पद्धतीने सादर केला असता त्यावर त्यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

संस्थानची सद्याची आर्थिक स्थीती, संस्थानने हाती घेतलेले उपक्रम, त्यासाठी लागणारा नियोजित निधी, पुढील काळात कोराना महामारीमुळे होवू घातलेली अंदाजित आर्थीक कमतरता, कर्मचा-यांचे पगार इत्यादि सर्व बाबींचा सविस्तर तपशील तदर्थ समिती समक्ष हजर करावा, त्यानंतर निर्णय घेता येईल, असे निर्देश दिलेले आहेत.

**मा. समिती सदस्य यांचा अभिप्राय:-** सदरहू प्रस्ताव मा. समिती सदस्य तथा अप्पर आयुक्त नाशिक यांचे समोर दि. २८.०५.२०२१ रोजी सादर केला असता, **"मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांचे अभिप्रायाप्रमाणे फेरप्रस्ताव सादर करावा"** असा निर्णय घेतला आहे.

**मा. समिती सदस्य यांचा अभिप्राय:-** सदरहू प्रस्ताव मा. समिती सदस्य तथा सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांचे समोर दि. ०७.०६.२०२१ रोजी सादर केला असता, सदरचा विषय वाचण्यात आला. संपूर्ण विषयाचे अवलोकन केले असता विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांनी ऑक्सिजन पुरवठा करणेकामी ऑक्सिजन (PSA) युनिट उभारणीकामी रु.९०३.२८ लक्ष विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांना उपलब्ध करून देणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. परंतु संस्थानची सद्या आर्थिक परिस्थिती पहाता, वेगवेगळया मंजूर झालेल्या विषयाचे अनुषंगाने होवू घातलेल्या खर्चाचा अवाका पहाणे आवश्यक आहे. सामाजिक बांधिलकी आणि कोरोना महामारीच्या कालावधीमध्ये शासनास तसेच अन्य स्वरूपामध्ये संस्थान प्रशासनाने खूप चांगले काम केलेले आहे. परंतु, सद्यस्थितीमध्ये संस्थानची आर्थिक आवक पूर्णपणे बंद आहे. त्यामुळे विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना ऑक्सिजन (PSA) युनिट उभारणे कामी निधी उपलब्ध करून देण्याचे काम हे शासनाचे आहे ना की केवळ संस्थानचे त्यामुळे इतर अनुषांगिक बाबी, होऊ घातलेले मोठमोठाले प्रकल्प आणि इतर अनुषंगीक खर्चिक बाबींचा विचार करता माझेतर्फे सदरचा पस्ताव **अमान्य** करण्यात येतो.

**वस्तुस्थिती** :- तदर्थ समितीचे एकूण ४ सदस्य पैकी १ सदस्याने प्रस्तावास मंजूरी दिलेली आहे. २ सदस्यांनी प्रस्ताव फेर सादर करणेबाबत अभिप्राय दिला आहे व १ सदस्याने प्रस्ताव अमान्य केलेला आहे.

मा. अध्यक्ष व १ सदस्य यांनी प्रस्ताव फेरसादर करणेबाबत अभिप्राय दिलेने प्रस्ताव फेरसादर करण्यात आला आहे.

**संस्थानची आर्थिक परिस्थीती**

| अ.न. | तपशील | रक्कम कोटीत |
|---|---|---|
| १ | संस्थानच्या मुदतठेव (२२३७-८८८, एकूण निधी- निश्चित स्वरूपाचा निधी) | १३४९.०० |
| २ | मुदतठेवीवर मिळणारे व्याज | १५३.०० |
| अ | **अंदाजे एकूण निधी** | **१५०२.००** |
| | **खर्चाचा तपशील** | **रक्कम कोटीत** |
| १ | संस्थानचे प्रगती पथावरील प्रकल्प | १००.०० |
| २ | संस्थानचे प्रस्तावित प्रकल्प अंदाजे खर्च | ६८८.०० |
| ३ | कर्मचारी वेतन खर्च वार्षिक | १६८.०० |
| ४ | निळवंडे धरण कॅनॉल साठी | ५००.०० |
| ५ | आयकर देय कर | ३७०.०० |
| ब | **अंदाजे एकूण खर्च** | **१८२६.००** |
| | **अ - ब** | **-३२४.००** |

**विभागाचा अभिप्राय :-**

१) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना रु.९०३.२८ लक्ष निधी उपलब्ध करून दिल्यास, ते प्रस्तावात नमूद रुग्णालयांना निधी उपलब्ध करून देतील. व प्रकल्प उभारणीनंतर संस्थानला उपयोगिता प्रमाणपत्र सादर करतील.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७ (२) (ण) " मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल" अशी तरतूद आहे. सदर तरतुदीन्वये निधी उपलब्ध करून देणेबाबत तरतूद आहे

३) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीला कोरोना कालावधीत (दि. १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१अखेर) फक्त रक्कम रु. ९६ कोटी मात्र प्राप्त झालेले आहेत.

४) संस्थानकडे सद्यस्थितीत एकूण रक्कम रु.२२३७ कोटी मात्र मुदतठेवी असून, त्यापैकी रक्कम रु.८८८कोटी मात्र हा निश्चित स्वरुपाचा निधी (Earmarked Fund) आहे. सदरहू निधी अन्नदान, वैद्यकीय, बांधकाम, शैक्षणीक, देखभाल दुरुस्ती निधी अशा स्वरूपाचा आहे. निश्चित स्वरूपाचा निधी (Earmarked Fund) ज्या उद्देशासाठी भक्तांनी देणगी दिलेला आहे त्याच उद्देशासाठी वापर करावा लागणार आहे. म्हणजेच रक्कम रु.१३४९ कोटी मात्र निधी अधिनियमातील तरतूदीनुसार खर्च करता येईल.

५) श्री साईबाबा संस्थानचे प्रगती पथावरील प्रकल्प, अंदाजे प्रस्तावीत प्रकल्प, कर्मचारी पगार याबाबींसाठी साधारणतः रक्कम रु.१८२६कोटी मात्र निधीची आवश्यकता भासणार आहे. संस्थानकडे उपलब्ध असलेलेा निधी,खर्च व एकूण प्रकल्प यांचा विचार करता, साधारणतः रक्कम रु.३२४ कोटीची तूट आहे.

६) मा. तदर्थ समितीचे सभेचे मान्यतेनंतर, मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करून व विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडून शासन निर्णय निर्गमित झालेनंतर अनुदान वितरीत करता येईल.

**प्रस्ताव:- विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग,नाशिक यांचे दि. १९.०५.२०२१ रोजीचे प्रस्तावात नमूद १४ ठिकाणी कोरोना बाधीत रुग्णांसाठी तातडीने ऑक्सिजन पुरवठा करणेकामी ऑक्सिजन (PSA) युनिट उभारणीकामी रु.९०३.२८ लक्ष मात्र निधी, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग ,नाशिक यांना उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढेनिर्णयार्थ सविनय सादर.**

14/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

10-5-2021

विषय क्र.- ०६



# मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषयाची टिपणी

**मेकॅनिकल विभाग**

**विषय :- गॅस दाहीनी खरेदी करणेकामी मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्णयानुसार फेर ई निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत ...**

## टिपणी

मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दिनांक १.१०.२०२० रोजीचे पत्रान्वये " अहमदनगर जिल्हामध्ये कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव वाढत असून दैनंदिनरित्या मोठया प्रमाणावर नागरिकांना कोरोनाची बाधा होत असल्याने जिल्हासाठी एक गॅस क्रिमॅटोरियम श्री साई संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे निधीतून शिर्डी मध्ये उपलब्ध करुन देणेत यावे " असे कळविलेले होते. त्यानुसार संस्थानमार्फत एक गॅस क्रिमॅटोरीयम खरेदी करुन नगरपंचायतीचे मालकीचे हिंदु स्मशानभुमीमध्ये उभारणी करणेस व याकामी येणा-या रक्कम रु. ५७,७३,३२२/- मात्रचे अपेक्षित खर्चास तसेच गॅस क्रिमॅटोरीयम उभारणी झालेनंतर शिर्डी नगरपंचायत यांचे कडे हस्तांतरीत करणेस मा. तदर्थ समितीची दिनांक ११.१२.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं ४५५/१८ अन्वये व मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांची दि. १४ जानेवारी २०२१ रोजीचे निर्णयानुसार मान्यता घेणेत आलेली आहे.

मा. तदर्थ समितीची व मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेने ई निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर अपलोड करण्यात आली होती त्यानुसार चार पात्र ई निविदाचे दराचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | ई निविदेतील प्राप्त दर रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. अल्फा इक्युपमेंटस, बडोदा | १,०३,५०,०००/- | L3 |
| २ | मे. कल्याणी एन्टरप्राईजे, पुणे | **७४,२७,०००/-** | **L1** |
| ३ | मे. चिरंतन उद्योग, ठाणे | ८९,२४,०००/- | L2 |
| ४ | मे. मायक्रोटेक्नीक , अंबाला, हरियाना | १११२७५०५/- | L4 |

उपरोक्त तपशिलानुसार संस्थानमार्फत एक गॅस क्रिमॅटोरीयम खरेदी करुन नगरपंचायतीचे मालकीचे हिंदु स्मशानभुमीमध्ये उभारणी करणेकामी मे. कल्याणी एन्टरप्राईजेस, यांचे रक्कम रु. ७४,२७,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चौ-याहत्तर लाख सत्तावीस हजार) मात्र निम्नत्तम आहे. निम्नत्तम पुरवठादार यांचे दर मंजूर इस्टेमेट रक्कमेपेक्षा रक्कम रुपये १६,५३,६८७/- (२८.६५%) जास्त आहे.

*शासन निर्णय क्रं. भांखस-२०१४/प्र.कं. ८२/भाग –III/उद्योग -४ दिनांक १ डिसेंबर २०१६ मधील खरेदी नियमावली ३.१.२.१ खरेदी प्रक्रिया हि अंदाजित किंमत आणि त्यानंतर प्रत्यक्ष द्यावी लागणा-या किंमती भोवती फिरत असते. दरांचा / किमंतीचा अचुक अंदाज हा पुरवठादाराकडून प्राप्त झालेल्या देकारांचा वाजवीपणा निश्चित आणि स्थापित करण्यासाठी आवश्यक असतो. त्यामुळे दर / किमंत हे वास्तव, वस्तुनिष्ठ, बाजार किंमतीनुसार आणि व्यवसायिक पद्धतीने काढणेत यावेत. अंदाजित किंमत आणि आणि प्रत्यक्ष द्यावी लागणारी किंमत यामध्ये मोठी तफावत असू शकणार नाही, यावर भर देण्यात यावा. खरेदीची वास्तविक किंमत व अंदाजित किंमत यामध्ये (-) २०% ते (+) १०% तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदारास विचार करता येईल. तथापि खरेदीची अंदाजित किमंत व प्रत्यक्ष द्यावी लागणारी किंमत यामध्ये जास्त तफावत आढळल्यास, संबंधित खरेदीदार विभागाने नव्याने निविदा काढणे आवश्यक राहील. त्यानंतरही त्यामध्ये तफावत आढळलेस एक उच्चसूतर प्राधिका-याची मान्यता घेण्यात यावी.* असे नमुद केलेले आहे

मे. कल्यानी एन्टरप्राईजेस, पुणे यांना ई मेल द्वारे दर कमी करणेबाबात विचारणा करुन पुरवठादार दर कमी करण्यास तयार असल्यास ई मेलद्वारे कमी केलेले दर प्राप्त करुन घेऊन शासन निर्णयातील तरतुदीनुसार अंदाजित किंमतीच्या १०% च्या मर्यादेत न्युमत्तम दरधारकाचे दर आल्यास त्यास मा. तदर्थ समितीचे मान्यतेने मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर कार्यादेश देणे कामी प्रस्ताव मा. तदर्थ समितीची चक्रिय पद्धतीने मान्यता घेणेकामी विषय सादर केला असता मा. अध्यक्ष, साहेब यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

प्रस्तावातील नमुद परिस्थीती पहाता, पुन्हा टेंडर काढणे हे सद्याच्या कोव्हीड -१९ च्या परिस्थीतीत वेळखाऊपणाचे आहे. ज्या कारणासाठी गॅस दाहीनी मंजूर करण्यात आली होती तोच हेतु मुळात विफल होताना दिसत आहे. अशा परिस्थीतीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निम्नत्तम धारक पुरवठादार यांचेशी वाटाघाटी करुन ईस्टीमेटेड कॉस्टचे जास्तीचे १० टक्के पर्यंत निम्नत्तम दरधारकास सदर गॅस् दाहीनी देण्याबाबत विनंती करावी.

ER8-202

जरका सदर पुरवठादार दर कमी करण्यास तयार असेल तर शासन निर्णयातील तरतुदीनुसार अंदाजित किमंतीच्या १० टक्केचे मर्यादेत न्युनतम दरधारकाचे दर दिल्यास त्यास मुख्य,कार्यकारी अधिकारी यांनी कार्यादेश द्यावा. जर अशी विनंती त्यांनी मान्य केली नाही तर सदर दरधारक किती टक्केपर्यत खाली येऊन सदर गॅस दाहीनी देण्यास तयार आहे ही बाब स्पष्ट करुन त्यांच्या कडून तसे लिखित स्वरुपात घेऊन सद्याची निकड पाहता मा. उच्च न्यायालयासमक्ष सिव्हील अप्लिकेशन दाखला करुन मान्यता घ्यावी व लवकरात लवकर गॅस दाहीनी बसविण्याची व्यवस्था करावी.

मा. अध्यक्ष, मा. तदर्थ समितीची यांचे निर्णयानुसार निम्नत्तम दर धारक मे. कल्याणी एन्टरप्राईजेस, पुणे यांना चर्चा व वाटाघाटी करणेकरीता दिनांक १३.५.२०२१ रोजी उपस्थीत राहणेबाबत कळविणेत आले होते. त्यानुसार दिनांक १३.५.२०२१ रोजी सकाळी ११.०० वा. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षते खाली मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्यलेखाधिकारी यांचे उपस्थितीत सभा आयोजित करणेत आली होती. सदर सभेत श्री अनिल नेवाळे, मे. कल्याणी एन्टरप्राईजेस, पुणे यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे मा. तदर्थ समितीचे निर्णयानुसार मा. उच्च न्यायालयात सिव्हील अप्लिकेशन दाखल करणेत आले होते. त्यावर दिनांक ८ जुन २०२१ रोजी सुनावणी होऊन मुळ अंदाजपत्रकिय मंजूर रक्कमेपेक्षा प्राप्त झालेले दर हे १० टक्के पेक्षा अधिक असलेने मा. जिल्हाधिकारी यांचे अभिप्राय नुसार संस्थानच्या निधितुन शिर्डी नगरपंचायत करीता गॅस दाहीनी खरेदी करणेकामी संस्थानने नव्याने ई निविदा मागवाव्यात असा निर्णय झालेला आहे.

**विभागाचा अभिप्राय** :- शासन निर्णय क्रं. भांखस-२०१४/प्र.कं. ८२/भाग –III/उद्योग -४ दिनांक १ डिसेंबर २०१६ मधील खरेदी नियमावली ३.१.२.१ खरेदीची वास्तविक किंमत व अंदाजित किंमत यामध्ये (-) २०% ते (+) १०% तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदारास विचार करता येईल. **तथापि खरेदीची अंदाजित किमंत व प्रत्यक्ष द्यावी लागणारी किंमत यामध्ये जास्त तफावत आढळल्यास, संबंधित खरेदीदार विभागाने नव्याने निविदा काढणे आवश्यक राहील. त्यानंतरही त्यामध्ये तफावत आढळलेस एक उच्चस्तर प्राधिका-याची मान्यता घेण्यात यावी. असे नमुद केलेले आहे.**

उपरोक्त तरतुद व मा. उच्च न्यायालय यांचे निर्णयानुसार फेर ई निविदा मागावून प्रस्तावीत कामी मंजूर अंदाजपत्रकिय रक्कम रु.५७,७३,३२२/- व प्राप्त दर यामध्ये (-) २०% ते (+) १०% तफावत आलेस मा. तदर्थ समिती / मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेने पुढील कार्यवाही करता येईल, असे मत आहे.

**प्रस्ताव :-** तरी मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्णयानुसार संस्थानच्या निधितुन शिर्डी नगरपंचायत करीता गॅस दाहीनी खरेदी करणेकामी

I. राबविणेत आलेली निविदा प्रकिया (टेंडर SAI_677906_1) रद्द करणेस
II. नव्याने फेर ई निविदा मागविणेस व त्याकामी जाहिरात एका प्रमुख विभागीय स्तरावरील वर्तमानपत्रात आणि एका राज्य स्तरावरील वर्तमान पत्रात प्रसिद्ध करणेस
III. तसेच सदरची ई निविदा व जाहीरात www.mahatenders.gov.in या महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर तसेच संस्थान वेबसाईटवर प्रसिद्ध करणेस

उपरोक्त प्रस्तावीत I, II व III नुसार कार्यवाही करणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

16/6/21

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

16.6

D< E Tender <Gas Crematorium Shasan Nirnay

ERP

विषय क्र.- ०७

# मा.तदर्थ समिती समोरील विषय



## विषय-शिर्डी ग्रामस्थांच्या दर्शन व आरती व्यवस्थेबाबत

**प्रस्तावना-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तस्व्यवस्था शिर्डी यांचेकडून श्री साईबाबांचे दर्शन व आरतीबाबत समस्त भक्तांसाठी व्यवस्था करण्यात आलेली आहे. सदर दर्शन व्यवस्था दिपावली प्रतिपदा दि.१६ नोव्हेंबर, २०२० पासून कार्यरत असून आजपर्यंत जवळजवळ ०७ लाखांपेक्षा जास्त भक्तांनी दर्शनाचा लाभ घेऊन, दर्शनव्यवस्था आदर्शवत असल्याने संतोष व्यक्त केलेला आहे. यापूर्वीची दर्शनव्यवस्था अत्यंत जिकीरीची होती व दर्शनव्यवस्थेत भक्तांना खुपच त्रास होत असे व त्यातून सुलभ दर्शन देखील होत नव्हते. तसेच श्री साईबाबा मंदिर परिसरातील द्वारकामाई, गुरूस्थान, दत्तमंदिर तसेच इतर मंदिरांत जाणे देखील दुरापास्त होत असे किंवा त्यासाठी भक्तांना मंदिरातच वेगवेगळया रांगेत उभे राहून मनःस्तापास सामोरे जावे लागत होते. गर्दीमुळे खिसेकापू किंवा चोरांना त्याचा फायदा होत असे. व त्यातून संस्थान प्रशासन टिकेला सामोरे जात असे.या प्रकारात आता मोठया प्रमाणात सुधारणा झालेली आहे.

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सद्याची दर्शनव्यवस्था आदर्शवत असल्याचा अभिप्राय जवळजवळ ०७ लाखांपेक्षा जास्त भक्तांनी व्यक्त केलेला आहे.यामध्ये प्रामुख्याने मा.श्री.शिवराजसिंह चौहान, मुख्यमंत्री, मध्यप्रदेश, मा.श्री.नितीन सांबरे, मा.श्री.घुगे,न्यायमूर्ती मा.उच्च न्यायालय, मुंबई, मा. श्री.सुब्बा रेड्डी, अध्यक्ष तिरूपती देवस्थान, मा.श्री.आर.जी.आनंद, खासदार., तसेच इतर प्रमुख मान्यवर जसे श्री.पोपटराव पवार, अभिनेते श्री.शर्मन जोशी, अभिनेत्री प्रार्थना बेहेरे, कलादिग्दर्शक श्री.नितीन चंद्रकांत देसाई यांनी संस्थानच्या सध्याची दर्शन व्यवस्था अत्यंत योग्य असुन त्याबाबत आंनद व्यक्त करून सदरची व्यवस्था कायम करण्यासाठी सूचीत केलेले आहे.

**गावकरी दर्शनव्यवस्था प्रस्ताव -**

उक्त पार्श्वभूमीवर शिर्डी गावक-यांच्या दर्शनाचा मुद्दा देखील समोर आलेला असुन गावातील भक्त लोकांसाठी सुध्दा सहज सुलभ दर्शन व्यवस्था असावी असे गावक-यांकडून तोंडी अथवा काही लोकांनी दुरध्वनीवरून इकडे इच्छा व्यक्त केलेली आहे. सद्यस्थितीत गावक-यांसाठी सकाळी १००० भक्तांना तसेच आरतीसाठी १० भक्तगनांना मोफत प्रवेश देण्याची योजना चालु आहे. सदर योजना श्री साई मंदिर दर्शनासाठी खुले करण्यासाठी मंदिरात दि.१४/११/२०२१ रोजी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधिक्षक व लोकप्रतिनिधी खासदार व स्थानिक आमदार महोदय, तसेच नगरपंचायतीचे पदाधिकारी व काही निवडक गावक-यां समवेत बैठकीत चर्चा करून बनविण्यात आलेली आहे व त्यावर उक्त सभेत सर्वांची सहमती झालेली आहेच. सदर योजना अशीच कायम चालू ठेवण्याची योजना असुन गावातील लोकांना दर्शनासाठी आणखी सुलभता यावी म्हणून खालील उपाययोजना प्रस्तावित करण्यात येत आहे.

१) गावक-यांसाठी दररोज १००० गावक-यांना दर्शन (एकुण दर्शन क्षमतेच्या १०%) तसेच प्रत्येक आरतीस १० गावकरी ( एकुण आरती क्षमतेच्या १०% ) मुक्तपणे व मोफत उपस्थित राहू शकतील अशी योजना यापुढे कायम चालु ठेवण्यात येत आहे.

२) गावक-यांना याबाबत दर्शन पास आरतीचे मोफत असतील. तथापि असे दर्शनपास त्यांना साईउद्यान इमारतीच्या ठिकाणी मिळू शकतील, तसेच त्यांना पास online ही मिळू शकतील. तथापि त्यांनी दर्शनाचे अथवा आरतीचे पास अगोदर प्राप्त करणे अनिवार्य असेल.

३) गावक-यांना दर्शनासाठी येतांना ओळख म्हणून मतदान ओळखपत्र (Electoral ID Card) अनिवार्यरित्या आवश्यक असेल. काही १८ वर्षाखालील भक्तांना मतदान ओळखपत्र नसेल त्यांना

त्यांचे आई वडिलांचे ओळखपत्रासह स्वतःचे आधारकार्ड /कॉलेज शाळा ओळखपत्र दर्शनास्तव अनिवार्य असेल.

४) गावक-यांना दर्शनरांग ०१ (पेड) अथवा दर्शनरांग (२) मधून मोफत प्रवेश मिळू शकेल. तथापि, स्वतंत्र प्रवेश व्यवस्था असाही प्रवाद आहे. याबाबत स्पष्ट करणेत येते की, संस्थानबाबत शासनाने स्वतंत्र कायदा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी २००४ पारीत केलेला आहे. त्यामुळे त्याला निरस्त करता येऊ शकत नाही. म्हणून खालीलप्रमाणे मध्यममार्ग म्हणून दर्शनरांगेत प्रवेश घेणे प्रस्तावित केलेले आहे.

अ) निहीत केलेल्या १००० गावक-यांपैकी सर्वांना दर्शनासाठी येतांना फक्त सकाळचे वेळी येणे अशक्य असते. यास्तव दिवसभरात सकाळचे सत्रात ३५०, दुपारचे सत्रात ३०० व सायंकाळचे सत्रात ३५० इतक्या संख्येने प्रवेश देण्यात येऊ शकतो. दर्शन प्रवेशासाठी निवडणूक ओळखपत्राची अट अनिवार्य असेल.

**ब) दर्शनरांगेत प्रवेशाबाबत** गावक-यांना दर्शनाची रांग स्वतंत्र ठेवण्यात येईल, त्यांचा प्रवेश दर्शनरांग क्र.०१ अथवा दर्शनरांग क्र.०२ जेथून मोफत व सशुल्क प्रवेश देण्यात येतो., तेथून देण्यात येईलच, तथापि आणखी सुलभ सुविधा म्हणून दोन्ही रांगा एकत्र येतात तेथे म्हणजेच गेट नंबर-०२ चे दक्षिण बाजूस येतात तेथे सशुल्क दर्शनरांगेत थेट प्रवेश देता येईल व तेथून व्ही.आय.पी.रांगेतून जाण्याची सुविधा गावक-यांना देण्यात येईल.

सबब, या जाहीर प्रकटनाद्वारे दर्शनव्यवस्थेची समस्त गावकरी यांनी नोंद घेऊन, त्याबाबत आपल्या लेखी हरकती/सुचना संस्थानकडे दि.२६ जानेवारी, २०२१ पर्यंत मागविता येतील. ग्रामस्थाकडून प्राप्त या सर्व सुचनांचा साकल्यांने विचार करून मा.तदर्थ समितीत त्याचा प्रस्ताव अंतिम निर्णयास्तव सादर करणेस येईल.

उपरोक्तप्रमाणे ग्रामस्थांच्या दर्शनव्यवस्थेबाबत जाहीर प्रकटन प्रसिध्द करण्यास मान्यतेसाठी प्रस्ताव मा. तदर्थ समितीसमोर चक्रिय पध्दतीने सविनय सादर.

5.1.21

**( कान्हूराज बगाटे, भा.प्र.से. )**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

---

उपरोक्तप्रमाणे प्रस्तावास मान्यता देणेत आली.

मा. अध्यक्ष यांनी सुचित केलेप्रमाणे नमूद बाबींच्या स्पष्टीकरणानंतर सदरचा प्रस्ताव विचारात घेणे योग्य वाटते.

(श्रीमती गिता पी.बनकर) 06/01/2021
सहा.धर्मादाय आयुक्त , अहमदनगर तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc)समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

(भानुदास एस.पालवे)
अपर आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc)समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

(कान्हूराज बगाटे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.

(श्रीकांत एल.आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर.
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

**चक्रीय पध्दतीने सादर केलेल्या विषयावरील निर्णय, दि. ०६ जानेवारी, २०२१**

**विषय – शिर्डी ग्रामस्थांच्या दर्शन व आरती व्यवस्थेबाबत**

१) प्रस्थावनेत परिच्छेद क्रमांक २ मध्ये मान्यवर व्यक्तिंचा, ज्यामध्ये कार्यरत मा.मुख्यमंत्री, मा. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ति इत्यादिबाबत नमूद केलेले आहे. अशा बाबी अभिलेखात नमूद करणे सर्वथा अयोग्य आहे. करिता प्रशासनाचे संबंधीत कर्मचा-यांनी याबाबतीत दक्षता घ्यावी व यापुढे अशी मान्यवरांची नांवे अभिलेखात नमूद करु नयेत.

२) टिपणी वाचली. तदर्थ समितीच्या दि. ११ मे २०२० रोजीच्या बैठकीतील निर्णय क्र. २५७ बाबत मा. उच्च न्यायालयासमोर सिव्हील ॲप्लिकेशन केले आहे काय, त्यात काय झाले, याबाबत श्री. अनिल थोरात, लिपिक यांना विचारले असता त्यांनी विधी विभागाकडे चौकशी करावी लागेल व त्यांना स्वतःला त्याबाबत माहिती नाही, असे सांगितले. निर्णय क्र. २५७ होतांना, त्यावेळी सर्व बाबींचा विचार करुन तो निर्णय घेण्यात आला होता व त्याबद्दल मा. उच्च न्यायालयामध्ये सिव्हल ॲप्लिकेशन दाखल करण्यासाठी सांगण्यात आले होते. असे सिव्हील ॲप्लिकेशन दाखल केले किंवा नाही, याबाबत टिपणीत उल्लेख नाही. या पूर्वीचे काही आदेश मा. उच्च न्यायालयाने केल्याचे दिसून आले होते. करिता मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लिकेशन करण्यासाठी संस्थान प्रशासनाला तदर्थ समितीने निर्देशित केले होते.

३) वरील बाबींचे स्पष्टीकरण झाल्यानंतर या विषयावर निर्णय घेणे योग्य होईल असे वाटते.

(श्रीकांत ल.आणेकर)
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर

# मा.तदर्थ समिती समोरील विषय

**विषय-शिर्डी ग्रामस्थांच्या दर्शन व आरती व्यवस्थेबाबत**

**प्रस्तावना-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तस्व्यवस्था शिर्डी यांचेकडून श्री साईबाबांचे दर्शन व आरतीबाबत समस्त भक्तांसाठी व्यवस्था करण्यात आलेली आहे. सदर दर्शन व्यवस्था दिपावली प्रतिपदा दि.१६ नोव्हेंबर, २०२० पासून कार्यरत असून आजपर्यंत जवळजवळ ०७ लाखांपेक्षा जास्त भक्तांनी दर्शनाचा लाभ घेऊन, दर्शनव्यवस्था आदर्शवत असल्याने संतोष व्यक्त केलेला आहे. यापूर्वीची दर्शनव्यवस्था अत्यंत जिकीरीची होती व दर्शनव्यवस्थेत भक्तांना खुपच त्रास होत असे व त्यातून सुलभ दर्शन देखील होत नव्हते. तसेच श्री साईबाबा मंदिर परिसरातील द्वारकामाई, गुरूस्थान, दत्तमंदिर तसेच इतर मंदिरांत जाणे देखील दुरापास्त होत असे किंवा त्यासाठी भक्तांना मंदिरातच वेगवेगळया रांगेत उभे राहून मनःस्तापास सामोरे जावे लागत होते. गर्दीमुळे खिसेकापू किंवा चोरांना त्याचा फायदा होत असे. व त्यातून संस्थान प्रशासन टिकेला सामोरे जात असे.या प्रकारात आता मोठया प्रमाणात सुधारणा झालेली आहे.

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सद्याची दर्शनव्यवस्था आदर्शवत असल्याचा अभिप्राय जवळजवळ ०७ लाखांपेक्षा जास्त भक्तांनी व्यक्त केलेला आहे.यामध्ये प्रामुख्याने मा.श्री.शिवराजसिंह चौहान, मुख्यमंत्री, मध्यप्रदेश, मा.श्री.नितीन सांबरे, मा.श्री.घुगे,न्यायमूर्ती मा.उच्च न्यायालय, मुंबई, मा. श्री.सुब्बा रेड्डी, अध्यक्ष तिरूपती देवस्थान, मा.श्री.आर.जी.आनंद, खासदार., तसेच इतर प्रमुख मान्यवर जसे श्री.पोपटराव पवार, अभिनेते श्री.शर्मन जोशी, अभिनेत्री प्रार्थना बेहेरे, कलादिग्दर्शक श्री.नितीन चंद्रकांत देसाई यांनी संस्थानच्या सध्याची दर्शन व्यवस्था अत्यंत योग्य असुन त्याबाबत आंनद व्यक्त करून सदरची व्यवस्था कायम करण्यासाठी सूचीत केलेले आहे.

**गावकरी दर्शनव्यवस्था प्रस्ताव -**

उक्त पार्श्वभूमीवर शिर्डी गावक-यांच्या दर्शनाचा मुद्दा देखील समोर आलेला असुन गावातील भक्त लोकांसाठी सुध्दा सहज सुलभ दर्शन व्यवस्था असावी असे गावक-यांकडून तोंडी अथवा काही लोकांनी दुरध्वनीवरून इकडे इच्छा व्यक्त केलेली आहे. सद्यस्थितीत गावक-यांसाठी सकाळी १००० भक्तांना तसेच आरतीसाठी १० भक्तगनांना मोफत प्रवेश देण्याची योजना चालु आहे. सदर योजना श्री साई मंदिर दर्शनासाठी खुले करण्यासाठी मंदिरात दि.१४/११/२०२१ रोजी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधिक्षक व लोकप्रतिनिधी खासदार व स्थानिक आमदार महोदय, तसेच नगरपंचायतीचे पदाधिकारी व काही निवडक गावक-यां समवेत बैठकीत चर्चा करून बनविण्यात आलेली आहे व त्यावर उक्त सभेत सर्वांची सहमती झालेली आहेच. सदर योजना अशीच कायम चालू ठेवण्याची योजना असुन गावातील लोकांना दर्शनासाठी आणखी सुलभता यावी म्हणून खालील उपाययोजना प्रस्तावित करण्यात येत आहे.

१) गावक-यांसाठी दररोज १००० गावक-यांना दर्शन (एकुण दर्शन क्षमतेच्या १०%) तसेच प्रत्येक आरतीस १० गावकरी ( एकुण आरती क्षमतेच्या १०% ) मुक्तपणे व मोफत उपस्थित राहू शकतील अशी योजना यापुढे कायम चालु ठेवण्यात येत आहे.

२) गावक-यांना याबाबत दर्शन पास आरतीचे मोफत असतील. तथापि असे दर्शनपास त्यांना साईउद्यान

त्यांचे आई वडिलांचे ओळखपत्रासह स्वतःचे आधारकार्ड /कॉलेज शाळा ओळखपत्र दर्शनास्तव अनिवार्य असेल.

४) गावक-यांना दर्शनरांग ०१ (पेड) अथवा दर्शनरांग (२) मधून मोफत प्रवेश मिळू शकेल. तथापि, स्वतंत्र प्रवेश व्यवस्था असाही प्रवाद आहे. याबाबत स्पष्ट करणेत येते की, संस्थानबाबत शासनाने स्वतंत्र कायदा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी २००४ पारीत केलेला आहे. त्यामुळे त्याला निरस्त करता येऊ शकत नाही. म्हणून खालीलप्रमाणे मध्यममार्ग म्हणून दर्शनरांगेत प्रवेश घेणे प्रस्तावित केलेले आहे.

अ) निहीत केलेल्या १००० गावक-यांपैकी सर्वांना दर्शनासाठी येतांना फक्त सकाळचे वेळी येणे अशक्य असते. यास्तव दिवसभरात सकाळचे सत्रात ३५०, दुपारचे सत्रात ३०० व सायंकाळचे सत्रात ३५० इतक्या संख्येने प्रवेश देण्यात येऊ शकतो. दर्शन प्रवेशासाठी निवडणूक ओळखपत्राची अट अनिवार्य असेल.

**ब) दर्शनरांगेत प्रवेशाबाबत** गावक-यांना दर्शनाची रांग स्वतंत्र ठेवण्यात येईल, त्यांचा प्रवेश दर्शनरांग क्र.०१ अथवा दर्शनरांग क्र.०२ जेथून मोफत व सशुल्क प्रवेश देण्यात येतो., तेथून देण्यात येईलच, तथापि आणखी सुलभ सुविधा म्हणून दोन्ही रांगा एकत्र येतात तेथे म्हणजेच गेट नंबर-०२ चे दक्षिण बाजूस येतात तेथे सशुल्क दर्शनरांगेत थेट प्रवेश देता येईल व तेथून व्ही.आय.पी.रांगेतून जाण्याची सुविधा गावक-यांना देण्यात येईल.

सबब, या जाहीर प्रकटनाद्वारे दर्शनव्यवस्थेची समस्त गावकरी यांनी नोंद घेऊन, त्याबाबत आपल्या लेखी हरकती/सुचना संस्थानकडे दि.२६ जानेवारी, २०२१ पर्यंत मागविता येतील. ग्रामस्थाकडून प्राप्त या सर्व सुचनांचा साकल्यांने विचार करून मा.तदर्थ समितीत त्याचा प्रस्ताव अंतिम निर्णयास्तव सादर करणेस येईल.

उपरोक्तप्रमाणे ग्रामस्थांच्या दर्शनव्यवस्थेबाबत जाहीर प्रकटन प्रसिध्द करण्यास मान्यतेसाठी प्रस्ताव मा. तदर्थ समितीसमोर चक्रिय पध्दतीने सविनय सादर.

5/1/21

( कान्हूराज बगाटे, भा.प्र.से. )
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

---

उपरोक्तप्रमाणे प्रस्तावास मान्यता देणेत आली.

मा. अध्यक्ष यांनी सुचित केलेप्रमाणे नमूद बाबींचा स्पष्टीकरणानंतर सदरचा प्रस्ताव विचारात घेणे योग्य राहिल.

(श्रीमती गिता पी.बनकर) 06/01/2021
सहा.धर्मादाय आयुक्त , अहमदनगर तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc)समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

(प्रमुदास एस.पालवे) 4/1/2021
अपर आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc)समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

मा.तदर्थ समितीसमोर चक्रियपध्दतीने सविनय सादर

---

**विषय-शिर्डी ग्रामस्थांच्या दर्शन व आरती व्यवस्थेबाबत**

**प्रस्तावना-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तस्व्यवस्था शिर्डी यांचेकडून श्री साईबाबांचे दर्शन व आरतीबाबत समस्त भक्तांसाठी व्यवस्था करण्यात आलेली आहे. सदर दर्शन व्यवस्था दिपावली प्रतिपदा दि.१६ नोव्हेंबर, २०२० पासून कार्यरत असून आजपर्यंत जवळजवळ ०७ लाखांपेक्षा जास्त भक्तांनी दर्शनाचा लाभ घेऊन, दर्शनव्यवस्था आदर्शवत असल्याने संतोष व्यक्त केलेला आहे. यापूर्वीची दर्शनव्यवस्था अत्यंत जिकीरीची होती व दर्शनव्यवस्थेत भक्तांना खुपच त्रास होत असे व त्यातून सुलभ दर्शन देखील होत नव्हते. तसेच श्री साईबाबा मंदिर परिसरातील द्वारकामाई, गुरूस्थान, दत्तमंदिर तसेच इतर मंदिरांत जाणे देखील दुरापास्त होत असे किंवा त्यासाठी भक्तांना मंदिरातच वेगवेगळया रांगेत उभे राहून मनःस्तापास सामोरे जावे लागत होते. गर्दीमुळे खिसेकापू किंवा चोरांना त्याचा फायदा होत असे. व त्यातून संस्थान प्रशासन टिकेला सामोरे जात असे.या प्रकारात आता मोठया प्रमाणात सुधारणा झालेली आहे.

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सद्याची दर्शनव्यवस्था आदर्शवत असल्याचा अभिप्राय जवळजवळ ०७ लाखांपेक्षा जास्त भक्तांनी व्यक्त केलेला आहे.यामध्ये प्रामुख्याने मा.श्री.शिवराजसिंह चौहान, मुख्यमंत्री, मध्यप्रदेश, मा.श्री.नितीन सांबरे, मा.श्री.घुगे,न्यायमूर्ती मा.उच्च न्यायालय, मुंबई, मा. श्री.सुब्बा रेड्डी, अध्यक्ष तिरूपती देवस्थान, मा.श्री.आर.जी.आनंद, खासदार., तसेच इतर प्रमुख मान्यवर जसे श्री.पोपटराव पवार, अभिनेते श्री.शर्मन जोशी, अभिनेत्री प्रार्थना बेहेरे, कलादिग्दर्शक श्री.नितीन चंद्रकांत देसाई यांनी संस्थानच्या सध्याची दर्शन व्यवस्था अत्यंत योग्य असुन त्याबाबत आंनद व्यक्त करून सदरची व्यवस्था कायम करण्यासाठी सूचीत केलेले आहे.

**गावकरी दर्शनव्यवस्था प्रस्ताव -**

उक्त पार्श्वभूमीवर शिर्डी गावक-यांच्या दर्शनाचा मुद्दा देखील समोर आलेला असुन गावातील भक्त लोकांसाठी सुध्दा सहज सुलभ दर्शन व्यवस्था असावी असे गावक-यांकडून तोंडी अथवा काही लोकांनी दुरध्वनीवरून इकडे इच्छा व्यक्त केलेली आहे. सद्यस्थितीत गावक-यांसाठी सकाळी १००० भक्तांना तसेच आरतीसाठी १० भक्तगनांना मोफत प्रवेश देण्याची योजना चालु आहे. सदर योजना श्री साई मंदिर दर्शनासाठी खुले करण्यासाठी मंदिरात दि.१४/११/२०२१ रोजी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधिक्षक व लोकप्रतिनिधी खासदार व स्थानिक आमदार महोदय, तसेच नगरपंचायतीचे पदाधिकारी व काही निवडक गावक-यां समवेत बैठकीत चर्चा करून बनविण्यात आलेली आहे व त्यावर उक्त सभेत सर्वांची सहमती झालेली आहेच. सदर योजना अशीच कायम चालू ठेवण्याची योजना असुन गावातील लोकांना दर्शनासाठी आणखी सुलभता यावी म्हणून खालील उपाययोजना प्रस्तावित करण्यात येत आहे.

१) गावक-यांसाठी दररोज १००० गावक-यांना दर्शन (एकुण दर्शन क्षमतेच्या १०%) तसेच प्रत्येक आरतीस १० गावकरी ( एकुण आरती क्षमतेच्या १०% ) मुक्तपणे व मोफत उपस्थित राहू शकतील अशी योजना यापुढे कायम चालु ठेवण्यात येत आहे.

२) गावक-यांना याबाबत दर्शन पास आरतीचे मोफत असतील. तथापि असे दर्शनपास त्यांना साईउद्यान इमारतीच्या ठिकाणी मिळू शकतील, तसेच त्यांना पास online ही मिळू शकतील. तथापि त्यांनी दर्शनाचे अथवा आरतीचे पास अगोदर प्राप्त करणे अनिवार्य असेल.

३) गावक-यांना दर्शनासाठी येतांना ओळख म्हणून मतदान ओळखपत्र (Electoral ID Card) अनिवार्यरित्या आवश्यक असेल. काही १८ वर्षाखालील भक्तांना मतदान ओळखपत्र नसेल त्यांना

त्यांचे आई वडिलांचे ओळखपत्रासह स्वतःचे आधारकार्ड /कॉलेज शाळा ओळखपत्र दर्शनास्तव अनिवार्य असेल.

४) गावक-यांना दर्शनरांग ०१ (पेड) अथवा दर्शनरांग (२) मधून मोफत प्रवेश मिळू शकेल. तथापि, स्वतंत्र प्रवेश व्यवस्था असाही प्रवाद आहे. याबाबत स्पष्ट करणेत येते की, संस्थानबाबत शासनाने स्वतंत्र कायदा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी २००४ पारीत केलेला आहे. त्यामुळे त्याला निरस्त करता येऊ शकत नाही. म्हणून खालीलप्रमाणे मध्यममार्ग म्हणून दर्शनरांगेत प्रवेश घेणे प्रस्तावित केलेले आहे.

अ) निहीत केलेल्या १००० गावक-यांपैकी सर्वांना दर्शनासाठी येतांना फक्त सकाळचे वेळी येणे अशक्य असते. यास्तव दिवसभरात सकाळचे सत्रात ३५०, दुपारचे सत्रात ३०० व सायंकाळचे सत्रात ३५० इतक्या संख्येने प्रवेश देण्यात येऊ शकतो. दर्शन प्रवेशासाठी निवडणूक ओळखपत्राची अट अनिवार्य असेल.

**ब) दर्शनरांगेत प्रवेशाबाबत** गावक-यांना दर्शनाची रांग स्वतंत्र ठेवण्यात येईल, त्यांचा प्रवेश दर्शनरांग क्र.०१ अथवा दर्शनरांग क्र.०२ जेथून मोफत व सशुल्क प्रवेश देण्यात येतो., तेथून देण्यात येईलच, तथापि आणखी सुलभ सुविधा म्हणून दोन्ही रांगा एकत्र येतात तेथे म्हणजेच गेट नंबर-०२ चे दक्षिण बाजूस येतात तेथे सशुल्क दर्शनरांगेत थेट प्रवेश देता येईल व तेथून व्ही.आय.पी.रांगेतून जाण्याची सुविधा गावक-यांना देण्यात येईल.

सबब, या जाहीर प्रकटनाद्वारे दर्शनव्यवस्थेची समस्त गावकरी यांनी नोंद घेऊन, त्याबाबत आपल्या लेखी हरकती/सुचना संस्थानकडे दि.२६ जानेवारी, २०२१ पर्यंत मागविता येतील. ग्रामस्थाकडून प्राप्त या सर्व सुचनांचा साकल्यांने विचार करून मा.तदर्थ समितीत त्याचा प्रस्ताव अंतिम निर्णयास्तव सादर करणेस येईल.

उपरोक्तप्रमाणे ग्रामस्थांच्या दर्शनव्यवस्थेबाबत जाहीर प्रकटन प्रसिध्द करण्यास मान्यतेसाठी प्रस्ताव मा. तदर्थ समितीसमोर चक्रिय पध्दतीने दि.०६/०१/२०२१ रोजी सादर केला असता, सदर प्रस्तावासंदर्भात मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा अध्यक्ष तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी त्यांचे पत्र क्र.आस्था-०९/२०२१ जिल्हा न्यायालय अहमदनगर दि.०७ जानेवारी,२०२१ नुसार प्रस्तावामध्ये सदर दर्शनव्यवस्था कोव्हीड-१९ चे कालावधीनंतरही चालु राहणार आहे काय? ग्रामस्थांचे दर्शनव्यवस्थेबाबत यापूर्वी व्यवस्थापन समितीने काही धोरणात्मक निर्णय घेतले आहेत काय ? व इतर १० मुद्देबाबत माहिती समाविष्ट करून फेरसादर करावा असे नमुद केले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे मुद्देनिहाय माहिती सादर करणेत येत आहे.

१) परिच्छेद ०१ अभिप्राय नाहीत.

२) सदर अभिलेख पहाता सर्व बाबी नमुद करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

३) ही बाब धोरणात्मक स्वरूपाची आहे. प्रशासन पातळीवर करण्यासारखी नाही.

४) सदर बाब गावकरी दर्शनाशी निगडीत आहे.

५) गावक-यांसाठी दर्शन व आरतीकरीता स्मार्टकार्ड देण्याचे विचाराधीन आहे. गावक-यांना दर्शनपासशिवाय प्रवेश नसेल. तथापि, गावक-यांसाठी दर्शन्-१००० व आरती-१० पास मोफत असतील. त्यासाठी पास वितरण व्यवस्था करावी लागेल. तसेच गावक-यांचा प्रवेश हा ओळखपत्र (आधार व मतदान कार्ड) वर आधारीत असेल.

६) व ७) सदर बाबीच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, शासनाने दि.१४/११/२०२० रोजी उदघोषणा करून दि.१६/११/२०२० दिपावली, पाडवा यादिवशी श्री साईबाबा मंदिर दर्शनाकरीता खुले करण्याचा निर्णय घेतला. त्याबाबत मा.जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधिक्षक, अहमदनगर,

लोकप्रतिनिधी म्हणून स्थानीक खासदार व आमदार तसेच शिर्डी नगरपंचायत पदाधिकारी यांची दि.१५/११/२०२० रोजी बैठक होवुन निर्णय झालेला आहे. दि.१५/११/२०२० चे बैठकीचे इतिवृत्त सोबत सादर करीत आहे.

८) याबाबत अभिप्राय नाही

९) सदर बाब गावकरी दर्शनव्यवस्थेशी निगडीत नाही.

१०) एकुणच सदरची गावकरी दर्शनव्यवस्था कायमस्वरूपी करावयाची आहे.त्यासाठी जाहीर प्रकटन करून त्याची कार्यपध्दती ठरवायची आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे ग्रामस्थांचे दर्शनव्यवस्थेबाबत जाहीर प्रकटन प्रसिध्द करण्यास मान्यतेसाठी प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर चक्रिय पध्दतीने सविनय सादर.

8/11/2024

**( कान्हूराज बगाटे, भा.प्र.से. )**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

---

उपरोक्तप्रमाणे प्रस्तावास मान्यता देणेत आली.

(श्रीमती गिता पी.बनकर )
सहा.धर्मादाय आयुक्त , अहमदनगर तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc)समिती
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.**

(भानुदास एस.पालवे)
अपर आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc)समिती
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी**

8/11/2024

**(कान्हूराज बगाटे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.**

**(श्रीकांत एल.आणेकर)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर.**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**चक्रीय पध्दतीने सादर केलेल्या विषयावरील निर्णय, दि. १५ जानेवारी, २०२१**

**विषय – शिर्डी ग्रामस्थांच्या दर्शन व आरती व्यवस्थेबाबत**

१) सर्वप्रथम ग्रामस्थांच्या दर्शन व आरती व्यवस्थेबाबतचा विषय तदर्थ समितीसमोर चक्रिय पध्दतीने दि. ०५/०६ जानेवारी २०२१ रोजी ठेवण्यात आला. तो प्रस्ताव व प्रशासनाने त्यासोंबत दिलेली टिपणी हे आता आणलेला प्रस्ताव व टिपणीपेक्षा वेगळा आहे.

२) निम्नस्वाक्षरीकार यांनी दि. ०६/०१/२०२१ रोजी खालील आदेश पारीत केला होता :-

*"प्रस्थावनेत परिच्छेद क्रमांक २ मध्ये मान्यवर व्यक्तिंचा, ज्यामध्ये कार्यरत मा.मुख्यमंत्री, मा. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ति इत्यादिबाबत नमूद केलेले आहे. अशा बाबी अभिलेखात नमूद करणे सर्वथा अयोग्य आहे. करिता प्रशासनाचे संबंधीत कर्मचा-यांनी याबाबतीत दक्षता घ्यावी व यापुढे अशी मान्यवरांची नांवे अभिलेखात नमूद करु नयेत.*

*टिपणी वाचली. तदर्थ समितीच्या दि. ११ मे २०२० रोजीच्या बैठकीतील निर्णय क्र. २५७ बाबत मा. उच्च न्यायालयासमोर सिव्हील ॲप्लिकेशन केले आहे काय, त्यात काय झाले, याबाबत श्री. अनिल थोरात, लिपिक यांना विचारले असता त्यांनी विधी विभागाकडे चौकशी करावी लागेल व त्यांना स्वतःला त्याबाबत माहिती नाही, असे सांगितले. निर्णय क्र. २५७ होतांना, त्यावेळी सर्व बाबींचा विचार करुन तो निर्णय घेण्यात आला होता व त्याबद्दल मा. उच्च न्यायालयामध्ये सिव्हल ॲप्लिकेशन दाखल करण्यासाठी सांगण्यात आले होते. असे सिव्हील ॲप्लिकेशन दाखल केले किंवा नाही, याबाबत टिपणीत उल्लेख नाही.. या पूर्वीचे काही आदेश मा. उच्च न्यायालयाने केल्याचे दिसून आले होते. करिता मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लिकेशन करण्यासाठी संस्थान प्रशासनाला तदर्थ समितीने निर्देशित केले होते.*

*वरील बाबींचे स्पष्टीकरण झाल्यानंतर या विषयावर निर्णय घेणे योग्य होईल असे वाटते."*

त्या अनुषंगाने विविध बाबी स्पष्ट करण्यासाठी दि.०७/०१/२०२१ रोजी पत्र पाठविण्यात आले.

३) सदर आदेश व पत्राच्या अनुषंगाने संस्थान प्रशासनाने विविध बाबींचे स्पष्टीकरण/माहिती देणे अपेक्षित होते. मात्र तसे न करता, विविध मुद्दयांबाबत काही त्रोटक बाबी नमूद करुन हा प्रस्ताव आणण्यात आला आहे.

४) करिता पुन्हा नमूद करणे गरजेचे आहे की, दि. ११/०५/२०२० रोजीच्या तदर्थ समितीच्या बैठकीत गावक-यांसाठी मोफत दर्शनाबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर निर्णय सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करुन मा. उच्च न्यायालयासमक्ष प्रलंबित आहे. म्हणजेच आजही तो निर्णय अस्तित्वात आहे.

५) दिनांक ०६/०१/२०२१ रोजीचा प्रस्ताव हा अस्पष्ट होता व आताच्या प्रस्तावात असे ध्वनित करण्यात येत आहे की, आताच्या प्रस्तावाने गावकरी दर्शन व्यवस्था कायमस्वरुपी करण्याची आहे व त्यासाठी जाहीर प्रकटण करुन हरकती मागवून नंतर निर्णय घ्यायचा आहे.

६) मात्र प्रस्तावासोबत जोडल्याप्रमाणे दि. १७ नोव्हेंबर, २०२० रोजी कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमिवर झालेल्या बैठकीचा आधार घेण्यात येत आहे. कदाचित सदर बैठकीत उपस्थितांनी ग्रामस्थांबाबत काही बाबी मान्यही केल्या असतील, मात्र जेव्हा प्रशासनाला गावकरी दर्शन व्यवस्था कायमस्वरुपी करावयाची आहे तर कुठलाही अभ्यास न करता अशा कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमिवरील बैठकीच्या आधारावर करणे सर्वथा अयोग्य आहे.

७) मुळातच दि. ११/०५/२०२० रोजी झालेल्या निर्णयाबाबत भाष्य करण्याची गरज नाही. तसेच त्या निर्णयबाबात मा. उच्च न्यायालयास सर्वप्रथम निदर्शनास आणून द्यावे लागेल.

८) जर सर्व गावक-यांसाठी दर्शनव्यवस्था कायम करण्याची आहे तर पंचक्रोशीत किती गावकरी राहतात, यावर किती गावक-यांना एका दिवशी दर्शन देणे योग्य होईल, याची पाहणी करणे गरजेचे ठरते. मात्र असा कुठलाही अभ्यास केला गेलेला दिसून येत नाही.

९) कोव्हिड-१९ काळातील १००० गावकरी दर्शसाठी व १० नागरिक आरतीसाठी हा तर्क सर्वथा संयुक्तिक नाही व त्यावर शिक्कामोर्तब करणे सुध्दा मला अयोग्य वाटते.

१०) मुळात असा सर्वसमावेषक निर्णय घेत असतांना, त्यामागे अभ्यास गरजेचा आहे. मात्र तसा केलेला दिसून येत नाही. मुळातच प्रकटणात काय लिहावयाचे आहे, त्यामागे कुठला अभ्यास/तर्क आहे, हेही स्पष्ट होत नाही.

११) तसेच जेव्हा दि. ११/०५/२०२० रोजीच्या निर्णयाप्रमाणे गावक-यांसाठी वेगळे प्रवेशद्वार आहे, अशा परिस्थितीत फक्त कोव्हिड-१९ बाबत व्यवस्था करतांना दुस-या किंवा प्रचलित दरवाजाने दर्शन देणे ही बाब प्रशासकीय पातळीवर तात्पुरती शक्य आहे. त्यामुळे त्याचा आधार घेवून आधीच्या निर्णयाबाबत पूर्नविचारासाठी कुठल्याही बाबी समाविष्ट न करता अशा पध्दतीने आधीच्या निर्णयाकडे डोळेझाक करणे अयोग्य वाटते.

१२) वरील परिस्थितीत प्रस्तावीत केलेले प्रकटण यासाठी कुठलाही आधार नसल्याने माझ्यातर्फे हा प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे.

(श्रीकांत ल.आणेकर)
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर

विषय क्र.- ०८

## मा तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोरील विषय

**विभागाचे नाव - श्री साईबाबा हॉस्पिटल**

**विषय- रूग्णालये विभागाकडील मानधनावरील वैद्यकीय अधिकारी यांना सन २०१९-२० वर्षाकरीता दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान आदा करणेबाबत . . .**

टिपणी -

**शासननिर्णय क्र.सांसवि १०२०/४०१/प्र.क्र.१६७/का-१६ दि.१८/११/२०२०.**

श्री साईबाबा संस्थानच्या आस्थापनेवरील तदर्थ समितीच्या दि.३१/१०/२०२० रोजीच्या निर्णयानुसार पात्र असणा-या स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) कर्मचा-यांना दिपावली निमित्त दि.०१/१०/२०१९ ते दि.३०/०९/२०२० या कालावधीतील त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३% टक्के दराने सानुग्रह अनुदान देण्यासाठी व त्यासाठी येणा-या अंदाजे एकूण रक्कम रूपये ११,७५,००,०००/- मात्र (अकरा कोटी पंच्याहत्तर लाख फक्त) इतक्या खर्चास मा मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये प्रलंबित जनहित याचिका क्र.१२०/२०१९ व रिट याचिका क्र.६२२४/२०२० मधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे प्रतिनियुक्तीद्वारे कार्यरत असणा-या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान अनुज्ञेय असणार नाही.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी संस्थान सेवेतील पात्र स्थायी (कायम) व कंत्राटी (अस्थायी) कर्मचा-यांना सदर शासन निर्णयाप्रमाणे दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान वितरीत करून त्याबाबतचा विस्तृत अहवाल शासनास सादर करावा.

**मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र-**

दि.३१/१०/२०२० रोजी चक्रीय पध्दतीने आणलेल्या निम्नलिखीत विषयावरील एकत्रीत निर्णय. त्यातील अ.नं. १ व २ नुसार, स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) व बाह्यस्त्रोत कर्मचारी (५९८ कर्मचारी वगळता) खालील (i) व (ii) नुसार निर्णय खालीलप्रमाणे.

(i) अटी व शर्तीनुसार पात्र होणा-या संस्थानचे स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) कर्मचा-यांना (अधिकारी वगळता) दि. ०१/१०/२०१९ ते दि. ३०/०९/२०२० या कालावधीतील त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३ % दराने सानुग्रह अनुदान देण्यात यावे.

(ii) इतर संस्थान कर्मचा-यांचे बाबतीत (कायम, कंत्राटी, बाह्यस्त्रोत कर्मचारी) (५९८ कर्मचारी वगळता) त्यांना दि.१३/०७/२०२० रोजीच्या निर्णय क्र ३५७ प्रमाणे हजर दिवसाला पूर्ण व कामावर नसलेल्या दिवसाला अर्धवेतन देण्यात यावे व असे वेतन श्री साई मंदिर सुरू होईपर्यंत / लॉकडाऊन कालावधी संपेपर्यंत जे आधी होईल तोपर्यंतचे देण्यात यावे.

**प्रस्तावना-**

जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/१५४६/२०२० दि. २४/११/२०२० आदेशान्वये, दि. ०१/१०/२०१९ ते दि. ३०/०९/२०२० या कालावधीत संस्थान सेवेत कार्यरत असलेल्या स्थायी कायम, व कंत्राटी अस्थायी कर्मचा-यांना सदरील कालावधीतील त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३ टक्के इतके सानुग्रह अनुदान अटी शर्तीनुसार देणेत यावे असा आदेश पारित झालेला आहे.

सदर आदेशातील अ.नं. ७ मध्ये ' रूग्णालये विभागाकडील मानधनावरील वैद्यकीय अधिकारी यांचे सानुग्रह अनुदानाबाबत मनुष्यबळ व्यवस्थापक (रूग्णालये विभाग) यांनी स्वतंत्रपणे टिपणी सादर करून मा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने सानुग्रह अनुदान अदा करणेबाबतची कार्यवाही करावी. ' असे नमुद आहे.

**अ)** जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/६२०/२०१९ दि.१८/०६/२०१९ अन्वये डॉ अविनाश लक्ष्मणराव जाधवर यांची श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये फिजिशियन या पदावर दि.१६/०६/२०१९ पासून पुढे ११ महिने कालावधी अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत एकत्रित मासिक मानधन रू.६९०००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्त्यावर नेमणूक करणेत आलेली आहे.

तदनंतर दि.२६/०८/२०१९ रोजीचे आदेशान्वये डॉ जाधवर यांना प्रतिमहा रू.२,०१,०००/- एकत्रित मानधन व मा व्यवस्थापन समितीचे दि.०८/०३/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र १९६ नुसार प्रोत्साहन भत्ता दि.०१/०७/२०१९ पासून पुढील आदेश होईपावेतो देणेबाबत आदेश पारीत करणेत आलेला आहे.

तदनंतर जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/१४७/२०२० दि.२१/०५/२०२० अन्वये डॉ अविनाश लक्ष्मणराव जाधवर यांची श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये फिजिशियन या पदावर दि.२०/०५/२०२० पासून पुढे ११ महिने कालावधी अथवा सदर पदावर स्थायी उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत एकत्रित मासिक मानधन रू.२,०१,०००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्त्यावर नेमणूक करणेत आलेली आहे.

**ब)** जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/९७१/२०१९ दि.१६/०८/२०१९ अन्वये डॉ अजिंक्य बन्सीधर ढाकणे यांची श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय उपचार तज्ञ (Physician) या पदावर ११ महिने कालावधी अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत एकत्रित मासिक मानधन रू.६९०००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्त्यावर नेमणूक करणेत आलेली आहे.

दि.३१/१२/२०१९ रोजीचे आदेशान्वये डॉ ढाकणे यांना प्रतिमहा रू.२,०१,०००/- एकत्रित मानधन व मा व्यवस्थापन समितीचे दि.०८/०३/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र १९६ नुसार प्रोत्साहन भत्ता दि.०१/११/२०१९ पासून पुढील आदेश होईपावेतो देणेबाबत आदेश पारीत करणेत आलेला आहे.

जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/४६४/२०२० दि.१५/०७/२०२०अन्वये डॉ अजिंक्य बन्सीधर ढाकणे यांची श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय उपचार तज्ञ (Physician) या पदावर दि.२०/०७/२०२० पासून पुढे ११ महिने कालावधी अथवा सदर पदावर स्थयी उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत एकत्रित मासिक मानधन रू.२,०१,०००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्त्यावर नेमणूक करणेत आलेली आहे.

**क)** जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/९७९/२०१९ दि.१६/०८/२०१९ अन्वये डॉ रविंद्र शांताराम गायकवाड यांची श्री साईनाथ रूग्णालयामध्ये मेडीकल ऑफिसर (फिजिशियन) या पदावर कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधी अथवा स्थायी उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत रू.२,०१,०००/- एकत्रित मासिक मानधनावर नेमणूक करणेत आलेली आहे.

तदनंतर, जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/४६८/२०२० दि.१५/०७/२०२० अन्वये डॉ रविंद्र शांताराम गायकवाड यांची श्री साईनाथ रूग्णालयामध्ये मेडीकल ऑफिसर (फिजिशियन) या पदावर कंत्राटी पध्दतीने दि.२०/०७/२०२० पासून पुढे ११ महिने कालावधी अथवा स्थायी उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत रू.२,०१,०००/- एकत्रित

मासिक मानधनावर नेमणूक करणेत आलेली आहे. डॉ गायकवाड यांचा दि.१५/०१/२०२१ पासून राजीनामा मंजूर झालेला आहे.

ड) श्री साईनाथ रूग्णालयातील १० व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील १९ असे एकुण २९ मानधनवरील वैद्यकीय अधिका-यांना त्यांचे संबंधीत पदासाठी मंजुर वेतनश्रेणीनुसार एकत्रित मानधनावर खालीलप्रमाणे नेमणूका देणेत आलेल्या आहेत.

| अ नं | वैद्यकीय अधिका-यांचे नाव<br>पदनाम व रूग्णालय | सध्याचे मानधन व प्रोत्साहन भत्ता |
|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ |
| १ | डॉ संदीप नारायणराव देवरे<br>इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| २ | डॉ राजेंद्र उत्तमराव बिडगर<br>आर्थोपेडीक सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| ३ | डॉ नितीन दशरथ ठाकरे<br>कार्डीयाक सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| ४ | डॉ विजय मुरलिधर थोरात<br>जनरल सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल<br>दि.०४/०५/२०२१ अखेरपासून राजीनामा मंजूर | रू. ६९,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| ५ | डॉ विद्या मनोहर बोराडे<br>जनरल सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| ६ | डॉ श्रीकांत मधुकर नागरे<br>सिनीअर रेडीओलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| ७ | डॉ गणेश सदाशिव चौधरी<br>जनरल सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल<br>दि. २१/११/२०२० अखेर पासून राजीनामा मंजूर. | रू. ६९,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| ८ | डॉ विक्रांत विश्वास खैरनार<br>मानसोपचार तज्ञ, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| ९ | डॉ गगन सुरेंद्रकुमार शर्मा<br>इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| १० | डॉ प्रसाद रामभाऊ उंबरकर<br>न्युरोसर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| ११ | डॉ शिल्पा दशरथ सोनावणे<br>वरीष्ठ शरीरविकृती शास्त्रज्ञ, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ६९,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| १२ | डॉ पोर्णीमा रामराव शेळके<br>वैद्यकीय अधिकारी (दंतरोग), श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ५७,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| १३ | डॉ स्वप्नाली राम चव्हाण<br>आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ५७,००० |
| १४ | डॉ रोहित राजेंद्र सप्रे<br>ज्युनिअर मायक्रोबायोलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ५७,००० |
| १५ | डॉ अंजली पदमाकर सोनवणे<br>आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल | रू. ५७,००० |
| १६ | डॉ स्वाधीन किसनराव गाडेकर<br>आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल<br>दि.०६/०३/२०२१ रोजी नेमणूक संपुष्टात आली. | रू. ५७,००० |
| १७ | डॉ सचिन श्रीहरी यादव<br>ज्युनिअर ॲनेस्थेसियालॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल<br>दि. २४/०२/२०२१ अखेर पासून राजीनामा मंजूर. | रू. ५७,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |

| अ नं | वैद्यकीय अधिका-यांचे नाव<br>पदनाम व रूग्णालय | सध्याचे मानधन व प्रोत्साहन भत्ता |
|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ |
| १८ | डॉ स्वेता विजयसिंग पवार<br>आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल<br>दि. ३०/०९/२०२० अखेर पासून राजीनामा मंजूर. | रू. ५७,००० |
| १९ | डॉ कल्याणी साहेबराव शिंदे<br>निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटल<br>दि.१९/०६/२०२१ रोजी नेमणूक संपुष्टात आली. | रू. ५७,००० |
| २० | डॉ राहुल दत्तात्रय डोंगरे<br>ज्युनिअर पॅथोलॉजीस्ट, श्री साईनाथ रूग्णालय<br>दि.०६/०३/२०२१ रोजी नेमणूक संपुष्टात आली. | रू. ५७,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| २१ | डॉ उज्वला भाऊसाहेब काळे<br>मेडीकल ऑफीसर (दंत तज्ञ), श्री साईनाथ रूग्णालय | रू. ५७,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| २२ | डॉ देविदास लक्ष्मण लव्हाटे<br>आरएमओ, श्री साईनाथ रूग्णालय<br>दि. १२/०२/२०२१ अखेर पासून राजीनामा मंजूर | रू. ५७,००० |
| २३ | डॉ अभिषेक जयराम खोडे<br>होमिओपॅथी तज्ञ, श्री साईनाथ रूग्णालय | रू. ५७,००० |
| २४ | डॉ शोभना तुकाराम कोल्हे<br>मेडीकल ऑफीसर (ईएनटी सर्जरी)<br>श्री साईनाथ रूग्णालय | रू. ६९,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| २५ | डॉ अमित दिपक नाईकवाडे<br>मेडीकल ऑफीसर (आर्थोपेडीक सर्जन)<br>श्री साईनाथ रूग्णालय | रू. ६९,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| २६ | डॉ विशाल धनाजी पटेल<br>मेडीकल ऑफीसर (आर्थोपेडीक सर्जन)<br>श्री साईनाथ रूग्णालय | रू. ६९,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| २७ | डॉ शिरीष शशिकांत शेळके<br>ईएनटी सर्जन, श्री साईनाथ रूग्णालय | रू. ६९,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| २८ | डॉ प्रियंका विलास गायकवाड<br>स्त्री रोग तज्ञ, श्री साईनाथ रूग्णालय<br>दि.०९/१२/२०२० पासून नेमणूक संपुष्टात आली. | रू. ६९,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |
| २९ | डॉ प्रिती हिरालाल दोशी<br>स्त्री रोग तज्ञ, श्री साईनाथ रूग्णालय | रू. ६९,००० व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता |

उपरोक्त अ व ब मध्ये नमुद केलेले डॉ अविनाश लक्ष्मणराव जाधवर व डॉ अजिंक्य बन्सीधर ढाकणे, फिजिशियन (११ महिने कालावधी) श्री साईबाबा हॉस्पिटल यांना एकत्रित मासिक रू.२,०१,०००/- मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता अदा करणेत येत आहे.

उपरोक्त क मध्ये नमुद केलेले डॉ रविंद्र शांताराम गायकवाड, मेडीकल ऑफिसर (फिजिशियन) श्री साईनाथ रूग्णालय यांना एकत्रित मासिक रू.२,०१,०००/- मानधन अदा करणेत येत होते. त्यांचा दि.१५/०१/२०२१ पासून राजीनामा मंजूर करणेत आलेला आहे.
उपरोक्त अ, ब, क व ड मध्ये नमुद एकुण २४ वैद्यकीय अधिका-यांना मासिक एकत्रित मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता आदा करणेत येत असुन ०८ वैद्यकीय अधिका-यांना फक्त मासिक एकत्रित मानधन अदा करणेत येत आहे. त्यांना प्रोत्साहन भत्ता अदा करणेत येत नाही.

शासननिर्णय क्र.सासंवि-१०१७/९८०/प्र.क्र.१०८/का.१६ दि.२७/०६/२०१८ अन्वये, श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रूग्णालयाप्रमाणे श्री साईनाथ रूग्णालयांतील डॉक्टर्सना प्रोत्साहन भत्ता लागू करण्यास तसेच दोन्ही रूग्णालयातील डॉक्टर्सना प्रोत्साहन भत्ता आदा करण्याबाबतची नियमावली / अटी व शर्ती तसेच प्रोत्साहन भत्याचे दर व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने निश्चित करणेबाबत मान्यता दिलेली आहे. त्यानुसार श्री साईबाबा सुपरस्पेशालिटी रूग्णालयात रूग्णांचे केसपेपरनुसार प्रोत्साहन भत्ता व श्री साईनाथ रूग्णालयात डीग्री / डीप्लोमा या पात्रतेनुसार फिक्स प्रोत्साहन भत्ता कायम / कंत्राटी / मानधनावरील तज्ञ व कनिष्ठ वैद्यकीय अधिका-यांना आदा करणेत येत आहे.

शासननिर्णय क्र.सांसवि १०२०/४०१/प्र.क्र.१६७/का-१६ दि.१८/११/२०२० अन्वये, श्री साईबाबा संस्थानच्या आस्थापनेवरील तदर्थ समितीच्या दि.३१/१०/२०२० रोजीच्या निर्णयानुसार पात्र असणा-या स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) कर्मचा-यांना दिपावली निमित्त दि.०१/१०/२०१९ ते दि.३०/०९/२०२० या कालावधीतील त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३% टक्के दराने सानुग्रह अनुदान देण्यासाठी व त्यासाठी येणा-या अंदाजे एकूण रक्कम रूपये ११,७५,००,०००/- मात्र (अकरा कोटी पंच्याहत्तर लाख फक्त) इतक्या खर्चास मा मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये प्रलंबित जनहित याचिका क्र.१२०/२०१९ व रिट याचिका क्र.६२२४/२०२० मधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील कायम (स्थायी) वैद्यकीय अधिका-यांना सानुग्रह अनुदान आदा करणेत आले आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय-

१. ज्या वैद्यकीय अधिकारी यांना प्रोत्साहन भत्ता लागु आहे त्यांना सानुग्रह अनुदान देय होईल किंवा कसे ? याबाबत शासननिर्णय मा व्यवस्थापन / तदर्थ समितीचे ठरावात उल्लेख नाही.

२. सानुग्रह अनुदान हा एक प्रकारचा प्रोत्साहन भत्ता आहे. त्यामुळे हॉस्पिटलमधील कायम / कंत्राटी / मानधनावरील ज्या वैद्यकीय अधिकारी यांना पगाराव्यतिरिक्त प्रोत्साहन भत्ता लागु आहे. त्यांना पुन्हा सानुग्रह अनुदान देणे योग्य वाटत नाही. मात्र सानुग्रह अनुदान किंवा एकूण वार्षीक प्रोत्साहन भत्ता यापैकी जे फायदेशीर असेल ते स्विकारण्याचा पर्याय त्यांना उपलब्ध करून देता येईल.

सदर धोरणात्मक बाब असल्याने याबाबत निर्णय होणेस विनंती.

असा उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव चक्रीय पध्दतीने मा तदर्थ समितीसमोर सादर करणेत आला होता. त्यावर दि.०९/०६/२०२१ रोजी मा अध्यक्ष, तदर्थ समिती यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"विषयाचे वाचन केले. टिपणी व विभागाचा अभिप्राय पाहिला. विभागाने सोबत दिलेल्या यादीतील अ.क्र. १३ ते १६, १८, १९, २२ व २३ यांच्या बाबतीत स्पष्टता केलेली नाही. त्याचप्रमाणे विषयाची व्याप्ती पाहता, पुर्वी झालेल्या बाबी व अभिलेख पाहून चर्चा करून निर्णय होणे अपेक्षित आहे. करिता विभागाने वरील बाबी स्पष्ट करून नियमित बैठकीत हा विषय ठेवावा."

तसेच सहायक धर्मादाय आयुक्त तथा सदस्य तदर्थ समिती यांनी दि.०९/०६/२०२१ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिला आहे.

"विषय सविस्तर वाचण्यात आला. सदरच्या विषयामध्ये नमूद केलेल्या टिपणी व अभिप्रायावरून विषयाचा अवाका पाहता याबाबत या पूर्वीच्या बाबी आणि अभिलेख

सविस्तर पाहणे आवश्यक वाटते. त्यामुळे याबाबत चर्चा करून निर्णय होणेस आवश्यक आहे. त्यामुळे विषय नियमित बैठकीत ठेवणे उचित होईल."

डॉ विजय मुरलिधर थोरात, माजी जनरल सर्जन यांनी दि.२०/०५/२०२१ रोजीचे अर्जान्वये प्रोत्साहन भत्ता व सानुग्रह अनुदान मिळणेबाबत विनंती केली आहे. तसेच मानधनवरील सर्व कन्सल्टंट डॉक्टर्स यांनी दि.२७/०५/२०२१ रोजीचे अर्जान्वये सानुग्रह अनुदान मिळणेबाबत मागणी केली आहे..

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-**

साईबाबा हॉस्पिटलकडील कायम व मानधनावरील वैद्यकीय अधिकारी यांना सन २००६ पासून प्रोत्साहन भत्ता आदा करणेत येत आहे. २००६ पासून सन २०१९ पर्यंत कायम व मानधनावरील वैद्यकीय अधिकारी यांना सानुग्रह अनुदान आदा करणेत आले आहे. कायम वैद्यकीय अधिकारी यांना दि.०१ आक्टोबर २०१९ ते ३० सप्टेंबर २०२० या कालावधीतील सानुग्रह अनुदान यांना आदा करणेत आलेले आहे.

उपरोक्त बाब विचारात घेता रूग्णालय विभागाकडील मानधनवरील उपरोक्त 'अ', 'ब' व 'क' अनुक्रमे डॉ अविनाश लक्ष्मणराव जाधवर, डॉ अजिंक्य बन्सीधर ढाकणे व डॉ रविंद्र शांताराम गायकवाड हे फिजिशियन या पदावर ॲडहॉक बेसिस पध्दतीने कार्यरत असल्याने त्यांना सन २००९ चे आकृतीबंधामध्ये फिजिशियन या पदासाठी मंजुर वेतनश्रेणी रू.१५६००-३९१००, ग्रेड पे ६६०० नुसार इतर पदावरील वैद्यकीय अधिकारी यांना रू.६९,०००/- एकत्रित मासिक मानधन आदा करणेत येत असल्याने त्यांना दि.०१ आक्टोबर २०१९ ते ३० सप्टेंबर २०२० या कालावधीतील त्यांना रू.६९,०००/- एकत्रित मासिक मानधन त्यांना आदा करणेत आले असे ग्राह्य धरून एकुण वार्षीक मानधनाचे ८.३३ % यानुसार सानुग्रह अनुदान वित्त विभागाद्वारे तपासणी करून दि. २४/११/२०२० रोजीचे आदेशातील अटी शर्तीनुसार आदा करता येईल.

तसेच, उपरोक्त 'ड' मध्ये नमुद संस्थान रूग्णालयातील एकुण २९ मानधनवरील वैद्यकीय अधिका-यांना दि.०१ आक्टोबर २०१९ ते ३० सप्टेंबर २०२० या कालावधीतील त्यांना अदा करणेत आलेल्या एकुण वार्षीक मानधनाचे ८.३३ % यानुसार सानुग्रह अनुदान वित्त विभागाद्वारे तपासणी करून दि. २४/११/२०२० रोजीचे आदेशातील अटी शर्तीनुसार आदा करता येईल, असे मत आहे.

निर्णयास्तव सादर.

16/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

16/6/21

विषय क्र.- ०९

**मा. तदर्थ (Ad-hoc) समितीसमोरील विषय**
**विभागाचे नाव – श्री साईबाबा हॉस्पिटल**

**विषय- संस्थानला कुशल अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत कार्यरत परीचारीका व पॅरामेडीकल स्टाफ यांचे समान काम समान वेतनाबाबत मागणी व बेमुदत काम बंद आंदोलन (१२ मे जागतिक परिचर्या दिन) चे अर्जाबाबत . . .**

टिपणी-

**मा व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.**

१) मा व्यवस्थापन समिती दि. २८/०८/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६६६/४.
सध्या कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारामार्फत व ११ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या व नव्याने घेण्यात येणा-या परिचारक/ परिचारीका यांना प्रतिमहा रू.११,०००/- वेतन देण्यात यावे, असे ठरले.

२) मा व्यवस्थापन समिती दि. १९/०२/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र १७३.
श्री साईबाबा व श्री साईनाथ या दोन्ही रूग्णालयांकरिता Physiotherapist, MRI Technician, Dialysis Technician, Jr PFT Technician, Jr Biomedical equipment engineer pharmacist या पॅरामेडिकल पदांवर कंत्राटदारांमार्फत नेमणूकामी उमेदवारांच्या घेण्यात आलेल्या मुलाखतींना पुष्टी देण्यात आली.

३) मा व्यवस्थापन समिती दि. २०/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र १०१६.
यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित तज्ञ वैद्यकीय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी, आर एम ओ, सी एम ओ / बी टी ओ टेक्निशियन्स व स्टाफनर्स यांना त्याच पदावर काम करणा-या स्थायी कर्मचा-यांच्या वेतनाचे जवळपासचे वेतन देणेस मान्यता देण्यात आली.

मात्र, या निर्णयाची अंमलबजावणी करणेपूर्वी अशा संपुर्ण पदांचा आढावा व प्रत्यक्ष द्यावयाचे वेतन यासह सविस्तर प्रस्ताव सादर करणेत येऊन, मा जिसदस्य समितीची मान्यता घेण्यात यावी.

४) मा व्यवस्थापन समिती दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १४१.
उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानमध्ये कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना कायद्यानुसार कामबंद आंदोलन करता येत नाही त्यांच्या मागण्या त्यांनी संबंधीत कंत्राटदारास कळवायला हव्या आहेत यापुर्वी कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत कायम करणे, समान काम समान वेतन देणे, त्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा देणे या बाबतचे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेत आलेले असून त्याचाही पाठपुरावा चालू आहे. संस्थानच्या प्रशासनावरील खर्च सुमारे ४५% पर्यंत होत आहे व कंत्राटी कामगारांना सध्या देत असलेल्या वेतनाव्यतीरीक्त प्रती व्यक्ती जवळपास २८% (सेवाकर १५% व पी.एफ १३.३६%) रक्कम संस्थानला अदा करावी लागत आहे.

सदरहू कंत्राटी कर्मचारी शासनाचे किमान वेतनदरावर सुमारे १५ ते १६ वर्षापासुन कंत्राटदारामार्फत संस्थानमध्ये काम करत आहेत व वयोमर्यादा ओलांडल्यामुळे त्यांनी इतरत्र सेवेची संधी गमावलेली आहे. या सर्व बाबींचा विचार करता सहानुभूतीच्या दृष्टीने संस्थानमध्ये आजअखेर कंत्राटीदारामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना दि. ०१ एप्रिल २०१७

पासून त्यांच्या प्रती दिन वेतनावर ४०% वाढ देण्यात यावी, तसेच संबंधीत कंत्राटदारामार्फत सर्व कंत्राटी कर्मचा-यांचा रू. १० लाख पर्यंतचा अपघात विमा उतरविणेत यावा, असा धोरणात्मक निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

कामगार कायद्यानुसार कंत्राटी कर्मचा-यांना फक्त किमान वेतन देणे बंधनकारक आहे महागाई निर्देशांकानुसार त्यामध्ये वेळोवेळी शासनाकडून जी वाढ मंजूर करणेत येते, ती कर्मचा-यांना लागू करण्यात येते. किमान वेतन निश्चित करताना शासनाकडून चालू महागाई व इतर अनुषंगिक घटक यांचा विचार करून किमान वेतन निश्चित केले जाते. त्यामुळे किमान वेतनापेक्षा जास्त वेतनवाढ देणे बंधनकारक नाही. मात्र सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून विशेष बाब म्हणून वरीलप्रमाणे ४०% वेतनवाढ भविष्यात कोणतीही वेतनवाढ न मागण्याच्या अटीवर मंजुर करणेत आली.

परंतु सदरहू वेतनवाढ देणेपुर्वी कंत्राटीदारामार्फत या कंत्राटी कर्मचा-यांच्या संघटनेकडून संस्थान विरोधात यापुढे आंदोलन करणार नाही, असे हमीपत्र लिहून घेण्यात यावे व या कंत्राटी कर्मचा-यांची दरवर्षी गैरहजेरी तपासणेत यावी. यामध्ये आठवडा सुट्टया वगळता, आजारीपण / सबळ कारणाशिवाय १०% पेक्षा जास्त दिवस गैरहजर असेल, किंवा जे कर्मचारी वारंवार गैरहजर रहात असतील, अशा कंत्राटी कर्मचा-यांना संबंधीत कंत्राटदाराने तात्काळ कामावरून कमी करावे या बाबीचा समावेश नवीन कंत्राटदार नेमताना त्यांच्या बरोबरच्या करारनाम्यात करणेत यावा.

तसेच कंत्राटदारामार्फत नवीत रूजू झालेल्या कंत्राटी कर्मचा-यांना रूजू दिनांकाच्या एक वर्षानंतर, त्यांची हजेरी व काम समाधानकारक असेल तरच वेतनवाढ देण्यात यावी.

या कंत्राटी कर्मचा-यांच्या कामाचे सर्वंकष मुल्यमापन दरवर्षी ०१ एप्रिल ते १५ एप्रिल दरम्यान करणेत यावे व त्यांचे तांत्रिकज्ञान, कामाचा दर्जा, गुणवत्त, उपस्थिती इ. मुद्यांच्या आधारे अ,ब,क,ड असे वर्गीकरण करून त्याचा अहवाल ३० एप्रिल पर्यंत संस्थानला सादर करावा या मुल्यमापन अहवालाच्या आधारे दरवर्षी कोणत्या कर्मचा-यांना वेतनवाढ सुरू ठेवायची याचा निर्णय संस्थानमार्फत घेतला जाईल. यासाठी संबंधीत कंत्राटदाराने त्रयस्थ यंञणेची नेमणूक करावी व आवश्यकतेनुसार विभागप्रमुख / प्रशासकीय अधिकारी यांची मदत घ्यावी, असे ठरले.

मनुष्यबळ व्यवस्थापन अहवालानुसार संस्थान विभागांमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त मनुष्यबळ असल्याचे निदर्शनास आले आहे. याकरीता यापुढे अकुशल / सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांची भरती करण्यात येऊ नये. तसेच संस्थानमध्ये कार्यरत असलेले कायम कर्मचारी व कंत्राटीदारामार्फत कार्यरत असलेले कुशल / अकुशल/ सुरक्षा कंत्राटी कर्मचारी यांचे वेतनावरील होणा-या खर्चाबाबतचा प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना अवलोकनार्थ पाठविणेत यावा, असे ठरले.

५) मा व्यवस्थापन समिती दि. २८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३४६.

श्री साईबाबा संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांप्रमाणेच दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १४१ मधील अटीस अधीन राहून श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील ११ महिने कालावधी तसेच कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या स्टाफनर्स, टेक्निशियन कर्मचा-यांना त्यांचे प्रतिदिन वेतनावर ४०% वेतनवाढ देण्यात यावी.

६) मा व्यवस्थापन समिती दि. १३/१२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७२८/४.

मा व्यवस्थापन समितीचे दि. ०५/१०/२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र ५९४ नुसार महाराष्ट्र दुकाने व व्यापारी संस्था कायदा २०१७ मधील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांना द्यावयाच्या सोयी सवलतीबाबत समिती सदस्य मा ॲड मोहन जयकर यांनी अभ्यास करून त्याबाबत

शिफारस करावी, असे ठरले होते. सदर विषयावर कायद्यातील तरतुदीच्या अनुषंगाने पुन्हा सविस्तर चर्चा करण्यात आली. कायद्यातील तरतूदीनुसार कंत्राटी कामगारांना भरपगारी सप्ताहीक सुट्टी (Paid Weekly off) अनुज्ञेय असल्याने कंत्राटी कर्मचा-यांना दि. ०१/१२/२०१८ पासून भरपगारी साप्ताहीक सुट्टी (Paid Weekly off) देण्यास मान्यता देण्यात आली.

७) मा व्यवस्थापन समिती दि. ०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ५६६.
यावर सविस्तर चर्चा होऊन, असे निदर्शनास आले की असे कुशल परिचारक / परिचारीका कौशल्य प्राप्त करून योग्य मानधन नसल्यास काम सोडून जातात अशा परिस्थितीत श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात ठेकेदारामार्फत कार्यरत असलेले कुशल परिचारक / परिचारीका यांना दि. ०१/१०/२०१९ पासून मासिक रू.१७,५००/- एकत्रित वेतन निश्चित करून त्यामध्ये प्रतिदीन रू. १५ स्पेशल अलाऊन्स देण्यास तसेच येथून पुढे वेळोवेळी अधिसुचनेद्वारे होणा-या स्पेशल अलौन्सची वाढ सदर कर्मचा-यांचे निश्चीत केलेल्या एकत्रित वेतनावर देण्यास मान्यता देण्यात आली.

८) मा. तदर्थ (Ad-hoc) समिती दि. २७/०३/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र २२८.
सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.

९) मा. तदर्थ (Ad-hoc) समिती दि. ११/०५/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र २८७.
यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात ठेकेदारामार्फत कार्यरत असलेले कुशल परिचारीका, फिजिओथेरपिस्ट, एमआरआय व डायलेसिस तंत्रज्ञ यांचा वेतनवाढीबाबतचा अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.

१०) मा. तदर्थ (Ad-hoc) समिती दि.११/०५/२०२० रोजीचे सभेत विषय नं १, चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेला विषय वाचुन कायम करणे. करोना विषाणू कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत . . . माहे मार्च २०२० व एप्रिल २०२० चे मासिक वेतन आदा करणेबाबतचे विषयावर निर्णय क्र २३५ नुसार, आजचे सभेच्या अजेंड्यावरील विषय नं ०१, ०२, ४३ व ६३ या विषयांवरील एकत्रित निर्णय सदर इतिवृत्ताचे शेवटी परिशिष्ट अ म्हणून जोडलेला आहे.

११) दि.३१/१०/२०२० रोजी चक्रीय पध्दतीने आणलेल्या निम्नलिखित तीन विषयांवरील एकत्रीत निर्णय- तदर्थ समितीने दि.२४/०९/२०२० रोजी चक्रीय पध्दतीने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे ४६६ कर्मचा-यांना ४० % वाढीव वेतन (कोव्हीड-१९ चे कामाबाबत) माहे सप्टेंबर २०२० पासून देण्यात यावे.

**प्रस्तावना-**

कंत्राटी परिचारक व परिचारीका इनसोर्स व आऊटसोर्स व सर्व पॅरामेडीकल स्टाफ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटल यांचा बेमुदत काम बंद आंदोलन (१२ मे जागतिक परिचर्या दिन) विषयीचे दि.०६/०३/२०२१, दि. २९/०३/२०२१, दि.३०/०३/२०२१ व दि.१५/०४/२०२१ रोजीचे अर्ज प्राप्त झाला असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

*संदर्भ-कंत्राटी पॅरामेडीकल कर्मचा-यांच्या वेतन संरचनेत ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारणा करून सुधारीत वेतन वाढ मिळावी पॅरामेडीकल स्टाफ व लिपीक, टंकलेखक, वाहन चालक यांच्या कामातील तफावत लक्षात घेऊन वेतन वाढ मिळावी.*
*मिळणारे वेतन पुढील प्रमाणे (कंत्राटी)*

| अ.नं. | विभाग | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन | मिळणारे वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | लिपीक | ५२००-२२०० | १९०० | १८६२८.५ |
| २ | टंकलेखक | ५२००-२२०० | १९०० | १८६२८.५ |
| ३ | वाहन चालक | ५२००-२२०० | १९०० | १८६२८.५ |
| ४ | नर्सेस + पॅरामेडीकल स्टाफ | ९३००-३४८०० | ४४०० | १८६२८.५ |

*लिपीक टंकलेखक, वाहन चालक, काम तांत्रीक व नर्सेस, फिजीओथेरेपी डॉक्टर, लॅब टेक्नीशीयन, ब्लड बॅंक टेक्नीशयीयन, एक्स रे, एमआरआय टेक्नीशीयन, डायलेसिस टेक्नीशियन, फार्मासिस्ट, (काम अत्यावश्यक) काम वेगवेगळे पण पगार समान ही बाब लक्षात घेऊन लवकरात लवकर निर्णय घ्यावा.*

*संदर्भ१- श्री साईबाबा संस्थान दि.२०/११/२०१४ विषय नं.२९, निर्णय क्र.१०१६ प्रत सादर.*

*२. भारत सरकार आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय विभाग परिचर्या दि.२०/०९/२०१६ कोर्ट जजमेंट ईन दि.२९/०१/२०१६ WP©527/2011 प्रत सादर. महाराष्ट्र परिचर्या परिषद दि.२४/११/२०१७ M.N.C./G/CIR-417/28779/2017 प्रत सादर.*
*संदर्भ- १. दि.३०/०५/२०२० वेतनवाढीसाठी अर्ज*
*२. दि.१०/०९/२०२० समक्ष भेटुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अर्ज*
*३. दि.२३/०१/२०२० रोजी मा.ना.श्री बाळासाहेब थोरात साहेब यांना पत्र*
*४. दि.१०/०२/२०२० वेतन अर्ज*
*५.१८/०२/२०२० रोजी अर्ज*
*६. दि.३०/०७/२०२० मा.ना.श्री राजेशजी टोपे साहेब, आरोग्य मंत्री महा.राज्य यांना अर्ज*
*७. दि.२२/०८/२०२० मा जिल्हाधिकारी साहेब यांना निवेदन*
*८. दि.२४/०९/२०२० बेमुदत कामबंद आंदोलन*
*९. दि.०७/१२/२०२० रोजी समक्ष कार्यकारी अधिकारी यांना भेटुन अर्ज*
*१०. दि.१६/१२/२०२० रोजी कार्यकारी अधिकारी व वैद्यकीय संचालक यांना स्मरणपत्र१*
*११. दि.०६/०३/२०२१ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी व वैद्यकीय संचालक यांना स्मरणपत्र२*
*उपरोक्त विषयान्वये आम्ही सर्व कंत्राटी परिचारक व परिचारीका (१८०) व पॅरामेडीकल स्टाफ श्री साईबाबा संस्थानमध्ये ११ ते ... वर्षे कंत्राटी पॅरामेडीकल स्टाफ म्हणुन कार्यरत आहोत. आम्ही वेळोवेळी सुधारीत वेतनवाढीसाठी आपल्या प्रशासनाकडे अर्ज केले आहे. परंतु प्रशासनाने त्याची अजुन कोणत्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. दि.२४/०९/२०२० रोजी काम बंद आंदोलन मागे घेण्यास सांगीतले होते व त्यावेळी रूग्णांची हेळसांड होऊ नये म्हणुन व एक सामाजीक भान ठेऊन आंदोलन मागे घेतले होते. परंतु संस्थान प्रशासनाने आजपर्यंत कुठल्याही प्रकारची मागणी मान्य केलेली नाही.*
*मागण्या पुढीलप्रमाणे.*
*अनुक्रमे१. किमान वेतन ४४,९००/- मिळावे.*
*संदर्भ १. श्री साईबाबा संस्थान दि.२०/११/२०१४ विषय नं.२९, निर्णय क्र.१०१६ प्रत सादर.*

*२. भारत सरकार आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय विभाग परिचर्या दि.२०/०९/२०१६ कोर्ट जजमेंट ईन दि.२९/०१/२०१६ WP©527/2011 प्रत सादर. महाराष्ट्र परिचर्या परिषद दि.२४/११/२०१७ M.N.C./G/CIR-417/28779/2017 प्रत सादर.*

*३. स्पष्टीकरण१. इतर कर्मचा-यांच्या व परिचारीका, पॅरामेडीकल यांच्या कामात फरक असल्याने वेतन वाढ मिळावी. उदा. साथीच्या रोगामध्ये काम करत असतांना सरळ पेशंटच्या संपर्कात येऊन आजारी पडण्याचे प्रमाण जास्त आहे. आणि स्वताचा जीव कुटुंबाचा जीव धोक्यात घालुन जीवावरती उदार होऊन जोखीम पत्कारावी लागते.*

*२. परमानंट स्टाफ व त्यांच्या कुटुंबातील सदस्य आजारी पडल्यास ज्याप्रमाणे बाहेरील हॉस्पिटलचे व मेडीसीन बिल अदा केले जाते तसे कॉन्ट्रॅक्ट परिचारीकांना दिले जात नाही म्हणुन पगार वाढ मिळावी. (इतर कर्मचा-यांच्या तुलनेत परिचारीकांचा सरळ पेशंटशी संपर्क आहे.)*

*३. लिपीक, टंकलेखक, वाहन चालक व परिचारीका यांच्या कामातील जोखीम बघुन वेतन वाढ मिळावी.*

*अनुक्रमे २. महिन्याला किमान ४ पगारी सुट्या मिळाव्यात. (आठवडा सुट्टया व्यतिरीक्त)*

*संदर्भ- श्री साईबाबा संस्थान व मे. सुमित फॅसिलीटीज लि.पुणे प्रा.लि.कॅम्प, शिर्डी श्री साईबाबा संस्थान यांच्यातील करार जा.नं.एसएसएस/वशी/२८९७/२०२० ३१ डिसेंबर २०२०.*

*स्पष्टीकरण१ – कायमच पेशंटच्या संपर्कात असल्याने आजारी पडण्याचे प्रमाण जासत आहे. याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. आरोग्यावर होणारा परीणाम हा इतर होणत्याही हानीपेक्षा गांभीर्यदायक आहे.*

*२. सुट्टया न मिळाल्यामुळे मानसिक व शरिरीक थकवा येऊन याचा परीणाम पेशंटच्या कॉलीटी केअर वरती होतो.*

*अनुक्रमे ३. मेडिक्लेम मिळावा.*

*संदर्भ- श्री साईबाबा संस्थान व मे. सुमित फॅसिलीटीज लि. पुणे प्रा लि पुणे कॅम्प शिर्डी श्री साईबाबा संस्थान यांच्यातील करार जा.नं.एसएसएस/वशी/२८९७/२०२०/३१ डिसेंबर २०२०.*

*स्पष्टीकरण १. ड्युटीवर असतांना कर्मचारी आजारी पडल्यास, काही कमी जास्त झाल्यास अथवा एखादी दुर्घटना घडल्यास अवलंबीताच्या उदर निर्वाहासाठी मेडीक्लेम मिळावा.*

*या प्रमुख मागण्यांसाठी वेळोवेळी अर्ज करून देखील सुध्दा संस्थान प्रशासन कोणत्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. तरी संस्थान प्रशासनाने सकारात्मक भुमिका घेऊन आमच्या मागण्या पुर्ण करण्यासाठी कार्यवाही करावी ही नम्र विनंती.*

*इतर कंत्राटी स्टाफला त्यांच्या बेसीक सॅलरी व ग्रेड पे प्रमाणे पेमेंट दिले जाते. परंतु नर्सेस स्टाफला त्यांच्या बेसीक सॅलरी व ग्रेड पे प्रमाणे पेमेंट दिले जात नाही.*

*श्री साईबाबा संस्थान संचलित येथे Covid Center येथे आत्तापर्यंत जवळपास ४००० रूग्णांनी चांगल्या प्रकारे उपचार घेऊन Covid वरती मात केलेली आहे. यात कंत्राटी नर्सेस, लॅब टेक्नीशीयन, एमआरआय, एक्स रे टेक्नीशीयन, फार्मासिस्ट व इतर टेक्नीशीयन यांचा मोलाचा वाटा आहे.*

*साईबाबा व साईनाथ हॉस्पिटल येथे इतर हॉस्पिटलच्या तुलनेत IPD, OPD चे प्रमाण जास्त आहे. MJPJAY योजनेअंतर्गत होणा-या शस्त्रक्रियेत Shri Saibaba Super Speciality Hospital महाराष्ट्रात अव्वल आहे. तरी यामुळे येथील कंत्राटी नर्सेस व टेक्नीशियन, फार्मासिस्ट व इतर यांचेवर कामाचा अती ताण तणाव आहे.*

*कामाचे स्वरूप बघता देण्यात येणारे वेतन हे तुटपुंज्या स्वरूपात आहे.*

*तीन वर्षापासुन सर्व मागण्यांचा पाठपुरावा करीत आहोत. तरी संस्थान प्रशासनाने कुठल्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. तरी संस्थान प्रशासनाने सकारात्मक भुमिका घेऊन आम्हा*

*पॅरामेडीकल स्टाफच्या मागण्या पुर्ण करून आम्हाला न्याय मिळुन द्यावा ही आपणास नम्र विनंती.*

१. *श्रध्दा सबुरी . . .*
२. *आम्हाला साईबाबांचे काम बंद पाडण्याची अजिबात ईच्छा नाही. परंतु आज आमचे जीव आणि आमचे कुटुंब धोक्यात आहे. परंतु प्रशासन वेळोवेळी अर्ज करून देखील गांभीर्याने घेत नाही.*
३. *दि.३० एप्रिल २०२१ अखेर पर्यंत आमच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करावा अथवा आम्ही आमच्या १२ मे (जागतिक परीचर्या दिन) काम बंदच्या भुमीकेवरती ठाम आहोत.*

तसेच, कंत्राटी परिचारक व परिचारीका इनसोर्स व आऊटसोर्स व सर्व पॅरामेडीकल स्टाफ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटल यांचे दि. ३०/०३/२०२१ रोजीचे निवेदनास अनुसरून उपविभागीय दंडाधिकारी, शिर्डी, भाग शिर्डी यांचे दि.०९/०४/२०२१ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.

तदनंतर आता, संगिता सोनवणे व इतर ६ यांचा दि.०७/०५/२०२१ रोजी सकाळी ८ वाजल्यापासून काळ्याफिती लाऊन काम करण्यासंदर्भात व दि.१२/०५/२०२१ रोजी काम बंद आंदोलनाविषयीचा दि.३०/०४/२०२१ रोजीचा अर्ज प्राप्त झाला असुन सदर अर्जामध्ये खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

१) सेवेत कायम करण्यात यावे अथवा समान काम समान वेतन मिळावे, अथवा ४४९०० वेतन मिळावे.
२) महिन्याला किमान ४ पगारी सुट्या मिळाव्या (आठवडा सुट्टी व्यतिरिक्त)
३) मेडीक्लेम मिळावा
४) कोविड – १९ विमा संरक्षण मिळावे.

**वस्तुस्थिती-**

मा व्यवस्थापन समिती दि. २८/०८/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६६६/४ नुसार सध्या कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारामार्फत व ११ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या व नव्याने घेण्यात येणा-या परिचारक/ परिचारीका यांना प्रतिमहा रू.११,०००/- वेतन देण्यात येत होते.

तदनंतर,मा व्यवस्थापन समिती दि. २८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३४६ नुसार, श्री साईबाबा संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांप्रमाणेच दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १४१ मधील अटीस अधीन राहून श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील ११ महिने कालावधी तसेच कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या स्टाफनर्स, एमआरआय टेक्निशियन, डायलेसिस टेक्निशियन टेक्निशियन कर्मचा-यांना त्यांचे प्रतिदिन वेतनावर ४०% वेतनवाढ दि. ०१/०४/२०१७ पासून देण्यात आली. सदर निर्णयानुसार ज्या कर्मचा-यांना ११,०००/- मासिक एकत्रित वेतन देण्यात येत होते त्यांचे वेतन १५,४००/- इतके झाले.

त्यानंतर मा व्यवस्थापन समिती दि. १३/१२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७२८/४ नुसार, महाराष्ट्र दुकाने व व्यापारी संस्था कायदा २०१७ मधील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांना द्यावयाच्या सोयी सवलतीबाबत समिती सदस्य मा ॲड मोहन जयकर यांनी अभ्यास करून त्याबाबत शिफारस करावी, असे ठरले होते. सदर विषयावर कायद्यातील तरतुदीच्या अनुषंगाने पुन्हा सविस्तर चर्चा करण्यात आली. कायद्यातील तरतूदीनुसार कंत्राटी कामगारांना भरपगारी सप्ताहीक सुट्टी अनुज्ञेय असल्याने कंत्राटी कर्मचा-यांना दि. ०१/१२/२०१८ पासून भरपगारी

साप्ताहीक सुट्टी देण्यास मान्यता देण्यात आल्याने अर्जदार यांचे वेतन रू. १७,७६९/- इतके झाले.

त्यानंतर श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात (बाह्ययंत्रणेमार्फत) ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत सर्व कंत्राटी परिचारक / परिचारीका यांनी वेळोवेळी व दि. २८/०८/२०१९ रोजीचे अर्जान्वये वेतनवाढीबाबत अर्ज केल्याने सदर अर्जावर निर्णय घेणेकामी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी व प्र प्रशासकीय अधिकारी यांची समिती गठीत करणेत आली. गठीत करणेत आलेल्या समितीचा दि. ०७/०९/२०१९ रोजीचे अहवालावर निर्णय होणेकरीता प्रस्ताव दि. ०४/१२/२०१९ रोजीचे मा तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ५६६ नुसार, यावर सविस्तर चर्चा होऊन, असे निदर्शनास आले की असे कुशल परिचारक / परिचारीका कौशल्य प्राप्त करून योग्य मानधन नसल्यास काम सोडून जातात अशा परिस्थितीत श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात ठेकेदारामार्फत कार्यरत असलेले कुशल परिचारक / परिचारीका यांना दि. ०१/१०/२०१९ पासून मासिक रू.१७,५००/- एकत्रित वेतन निश्चित करून त्यामध्ये प्रतिदीन रू. १५ स्पेशल अलाऊन्स देण्यास तसेच येथून पुढे वेळोवेळी अधिसुचनेद्वारे होणा-या स्पेशल अलौन्सची वाढ सदर कर्मचा-यांचे निश्चीत केलेल्या एकत्रित वेतनावर देण्यास मान्यता देण्यात आली.

तदनंतर, श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत कार्यरत ज्योती विखे, राखी आहुवालीया, विश्वजित गायकवाड यांनी दि. २८/१२/२०१९ रोजीचे अर्जान्वये खालीलप्रमाणे मागणी केली होती.

"वरील विषयास अनुसरून कारणे विनंती आम्ही कंत्राटी फिजीओथेरपिस्ट (Bachelor of physiotherapy) अर्ज करतो की, आम्ही अनेक वर्षापासून श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल शिर्डी मध्ये कार्यरत असून आम्हाला कोणत्याही प्रकारची वेतन वाढ झाली नाही. आमचे शिक्षण हे डिगरी कोर्स झालेले आहे. आम्ही तिघांनीही Bachelor of physiotherapy हा ४ १/२ (साडेचार) वर्षाचा कोर्स केलेला आहे. तरी आम्हाला २५,००० ते ३०,०००/- वेतन मिळावे. साईबाबा संस्थानमध्ये आम्हाला ११,००० वेतन वरती घेतले होते. नंतर त्यात ४० टक्के वाढ करून आम्हाला १५,४०० वेतन दिले जात व नंतर आम्हाला आठवडा सुट्टीचा पगार दिला गेला व आमचे वेतन १७,७९० रू. महिना झाले. परंतु जी दर वर्षाची वेतनवाढ येते ती आम्हाला दिली जात नाही आमचे शिक्षण कुशल कर्मचारी पेक्षा, उच्च दरजाचे आहे. आम्ही डॉ म्हणून काम करतो व कुशल कर्मचारी व आमच्या कामात खुप तफावत आहे. आम्हाला किमान २५,००० ते ३०,००० रू वेतन मिळावे. तरी मा मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांना कळकळीची विनंती की, आपण या विषयावर गांभीर्याने विचार करावे आम्हाला नियमीत वेतनवाढ मिळावी ही विनंती. आपणाकडून योग्य त्या कार्यवाहीची अपेक्षा आहे."

तसेच, श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात (बाह्ययंत्रणेमार्फत) ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत सर्व कंत्राटी परिचारक / परिचारीका यांचा मा तदर्थ Adhoc समिती दि. २७/१२/२०१९ रोजी निर्णय क्र ५६६ वर झालेल्या निर्णयावर पुनर्विचार होणेविषयीचे दि. १०/०२/२०२० व दि. १८/०२/२०२० रोजीचे अर्जान्वये खालीलप्रमाणे मागणी केली होती.

"आम्ही अर्जदार सध्या श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात इनसोर्स कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावर संस्थानमध्ये सन २००९ पासून कार्यरत आहोत. आमची व कायम कर्मचा-यांची (स्टाफनर्स) ची शैक्षणिक पात्रता व कामाचे स्वरूप सारखेच असुन सुरवातीपासुनच आमचे व त्यांचे वेतनामध्ये फार मोठी तफावत आहे .

तसेच जे मा तदर्थ अॅड Adhoc समिती यांचा दि. २७/१२/२०१९ रोजीचा निर्णय क्र ५६६ मंजुर झालेला असुन दि. ०१/१०/२०१९ पासुन एकत्रित मानधन देऊन प्रतिदिन १५ रू. ची

वाढ केलेली आहे. असे समजले असुन सदरची वाढ महागाईचा व आमचे शैक्षणिक कर्जाचा विचार केल्यास अत्यंत अल्प असुन जे काही वेतन आम्हाला मिळत आहे सध्याचे महागाईचे तुलनेत अत्यंत कमी आहे अशा परीस्थीतीत कुटूंबाचा निर्वाह, कामावर येण्याजाण्याचे भाडे, घरभाडे इत्यादी अनुषंगीक खर्च सध्याचे वेतनात भागविणे अत्यंत कठीण झाले आहे.

श्री साईबाबा व साईनाथ रूग्णालयात सध्या खालीलप्रमाणे स्टाफनर्स कार्यरत आहेत .

| नेमणूकीचा प्रकार | शैक्षणिक पात्रता | कार्यरत संख्या | सध्याचे देय वेतन |
|---|---|---|---|
| कायम कर्मचारी स्टाफनर्स | जीएनएम बीएसस्सी / नर्सिंग | १५२ | ५७,०००-/ |
| कंत्राटी कर्मचारी स्टाफनर्स | जीएनएम बीएसस्सी / नर्सिंग | १४६ | रू .१७,७६९-/ |

आमचेच बरोबर जे कायम स्टाफनर्स कार्यरत आहेत यांना दरवर्षी वेतनवाढ होते.
तरी, मे तदर्थ ॲड Adhoc समिती आमच्या रूग्णसेवेचा व साईचरणी सेवेचा विचार करून सर्व इनसोर्स कंत्राटी परिचारक / परिचारीका कर्मचा-यांना दि. २०/११/२०१४ रोजी निर्णय क्र १०१६ ची अंमलबजावणी करून समान काम समान वेतन / कायम कर्मचा-यांचे वेतनाच्या जवळपासचे वेतन मिळावे, ही विनंती."

उपरोक्त दि. २८/१२/२०१९, दि. १०/०२/२०२० व दि. १८/०२/२०२० रोजीचे अर्जाबाबत निर्णय होणेकामी दि. ११/०५/२०२० रोजीचे मा तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर प्रस्ताव सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र २८७ नुसार, यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात ठेकेदारामार्फत कार्यरत असलेले कुशल परिचारीका, फिजिओथेरपिस्ट, एमआरआय व डायलेसिस तंत्रज्ञ यांचा वेतनवाढीबाबतचा अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.

सद्यस्थिती खालीलप्रमाणे ठेकेदारामार्फत स्टाफनर्स व पॅरामेडीकल कर्मचारी कार्यरत आहेत.

| अ.नं. | कामाचे स्वरूप | साईबाबा हॉस्पिटलमधील संख्या | साईनाथ रूग्णालयमधील संख्या |
|---|---|---|---|
| १ | कुशल स्टाफनर्स | ७३ | ५५ |
| २ | आऊटसोर्स स्टाफनर्स | ९ | ३१ |
| ३ | कुशल टेक्निशियन (एमआरआय, डायलेसिस, फिजिओथेरपीस्ट) | ४ | ०१ |
| ४ | कुशल टेक्निशियन (ईसीजी टेक्निशियन, लॅब टेक्निशियन, फार्मासिस्ट, डायलेसिस टेक्निशियन, ज्यु एक्स रे टेक्निशियन, बायोमेडीकेल टेक्निशियन, ज्युनिअर लॅब टेक्निशियन/ लॅब असिस्टंट) | २२ | १८ |
| एकूण | | १०८ | १०५ |

**अ)** मा तदर्थ Adhoc समिती दि. ०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ५६६ नुसार कुशल स्टाफनर्सचे वेतन अदा करतांना सध्या ३१ दिवसांचे महिन्यामध्ये खालीलप्रमाणे वेतन अदा करणेत येत आहे.

| अ नं | तपशिल | प्रतीदिन वेतन रूपये | प्रतीमहा ३१ दिवसाचे वेतन |
|---|---|---|---|
| १ | निश्चित केलेले एकत्रित वेतन रू. १७,५०० ÷ ३१ दिवस | ५६४.५१ | १७,५०० |
| २ | + प्रतिदीन स्पेशल अलाऊन्स | ४२ (दि.०१/०१/२०२१ पासून) | १३०२ |
| | एकुण | ६०६.५१ | १८,८०२ |

**ब)** मा तदर्थ Adhoc समिती दि. ०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ५६६ नुसार स्टाफनर्सचे वेतन अदा करतांना सध्या ३० दिवसांचे महिन्यामध्ये खालीलप्रमाणे वेतन अदा करणेत येत आहे.

| अ नं | तपशिल | प्रतीदिन वेतन रूपये | प्रतीमहा ३० दिवसाचे वेतन |
|---|---|---|---|
| १ | निश्चित केलेले एकत्रित वेतन रू. १७,५०० ÷ ३० दिवस | ५८३.३३ | १७,५०० |
| २ | + प्रतिदीन स्पेशल अलाऊन्स | ४२ (दि.०१/०१/२०२१ पासून) | १२६० |
| | एकुण | ६२५.३३ | १८,७६० |

सद्यस्थितीत परीचारक / परिचारीका यांना दि. ०४/१२/२०१९ रोजीचे मा तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील निर्णय क्र ५६६ नुसार, मासिक रू.१७,५००/- एकत्रित वेतन निश्चित करून ३० दिवसाने भागून येणारी रक्कम रू. ५८३.३३ ही प्रतिदीन वेतन निश्चीत करणेत आली. दि. ०५/०२/२०२१ रोजीचे अधिसुचनेमध्ये दुकाने व व्यपारी आस्थापना उद्योगाकरीता रू. १०९२/- प्रतीमहा विशेष भत्त्याची रक्कम २६ दिवसाने भागून येणारी रक्कम रू. ४२/- ही प्रतीदीन विशेष भत्ता निश्चित करणेत आली. निश्चित केलेले रू. ५८३.३३ प्रतीदीन एकत्रित वेतन + रू. ४२ प्रतीदीन विशेष भत्ता असे ३० दिवसाकरीता एकुण प्रतिदीन रू. ६२५.३३/- होईल. तसेच तसेच मा व्य स समिती दि. १३/१२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७२८/४ नुसार आठवडा सुट्टी लागु करणेत आल्याने रू. ६२५.३३/- प्रतिदीन वेतनानुसार प्रतिमहा (३०/३१) हजर दिवसानुसार गणना करणेत येऊन उपरोक्त तक्ता अ व ब मध्ये दर्शविणेत आलेप्रमाणे (रू.१८,७६०/ १८,८०२) वेतन अदा करणेत येत आहे.

क) एमआरआय टेक्निशियन, ज्युनिअर फिजिओथेरपिस्ट, डायलेसिस टेक्निशियन यांना सध्या देण्यात येत असलेले वेतन खालीलप्रमाणे.

| एकत्रित वेतन | प्रतिदिन वेतन | सध्याचे मासिक वेतन |
|---|---|---|
| १७,५००/२६ दिवस+४ आठवड्या सुट्टया | ५९२.३१ | १७,७६९ |

ड) आऊटसोर्स परिचारीका व कुशल टेक्निशियन यांना देणेत येत असलेले वेतन खालीलप्रमाणे.

| वर्गवारी | प्रती दिन मुळ वेतन | प्रती दिन स्पेशल अलौन्स | एकुण किमान वेतन दर प्रती दिन रूपये / पैसे (४०१.५४+४२) | एकुण किमान वेतनावर ४०% वाढ धरून प्रती दिन रूपये / पैसे (४४३.५४+४०%) | ३० दिवसाचे महिन्यामध्ये एकुण वेतन | ३१ दिवसाचे महिन्यामध्ये एकुण वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| कुशल कामगार | ४०१.५४ | ४२.०० | ४४३.५४ | ६२०.९५ | १८६२८.६८ | १९२४९.४५ |

**श्री साईबाबा संस्थानचे सन २००९ चे मंजुर आकृतीबंधामध्ये खालील पदांच्या वेतनश्रेण्या खालीलप्रमाणे आहे.**

| पदनाम | मंजुर वेतनश्रेणी<br>सहाव्या वेतन आयोगातील पे बॅन्ड ग्रेड पे |
|---|---|
| ०१ | ०२ |
| परीचारीका, एमआरआय टेक्निशियन, ज्युनिअर फिजिओथेरपिस्ट, डायलेसिस टेक्निशियन, ईसीजी टेक्निशियन, लॅब टेक्निशियन | रू. ९३००-३४८००<br>ग्रेड पे रू. ४२०० |
| फार्मासिस्ट | रू. ५२००-२०२००, ग्रेड पे रू. २८०० |
| ज्यु एक्स रे टेक्निशियन | रू. ५२००-२०२००, ग्रेड पे रू. २४०० |
| बायोमेडीकल टेक्निशियन | रू. ५२००-२०२००, ग्रेड पे रू. १९०० |
| ज्युनिअर लॅब टेक्निशियन/ लॅब असिस्टंट | रू. ५२००-२०२००, ग्रेड पे रू. २००० |

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-**

१. सध्या ठेकेदारामार्फत कार्यरत कुशल कर्मचारी - परिचारीका, आऊटसोर्स परिचारीका, ज्यु. फिजिओथेरपिस्ट, एमआरआय टेक्निशियन, डायलेसिस टेक्निशियन, लॅब टेक्निशियन, फार्मासिस्ट, ई.सी.जी. टेक्निशियन व ज्युनिअर एक्स रे टेक्निशियन यांना सध्या देण्यात येत असलेले वेतन एक सारखे नसुन वेतनात सुसूत्रता नाही.

सद्यस्थितीत राष्ट्रीय आरोग्य मिशन अंतर्गत कार्यरत कंत्राटी स्टाफनर्स (BSc Nursing / GNM) यांना रू.२०,०००/- प्रतिमहा व फार्मासिस्ट यांना रू.१७,०००/- याप्रमाणे मानधन देण्यात येत आहे. संस्थानमधील इतर कुशल / अकुशल कामगारांना किमान वेतनावर ४० % वाढ तत्कालीन व्यवस्थापन समितीने मंजूर केले आहे.

याबाबींचा विचार करून तसेच संस्थानच्या हॉस्पिटलकडे कार्यरत सर्व स्टाफनर्स, ज्यु. फिजिओथेरपिस्ट, एमआरआय टेक्निशियन, डायलेसिस टेक्निशियन, लॅब टेक्निशियन, ई.सी.जी. टेक्निशियन व फार्मासिस्ट या ब-याच वर्षापासून कंत्राटदारामार्फत सेवा देत आहेत. हे गृहीत धरून त्यांना

अ. राष्ट्रीय मिशन अंतर्गत कार्यरत स्टाफ कंत्राटी नर्स प्रमाणे रू.२०,०००/- मासिक वेतन + कुशल कामगाराप्रमाणे दर ६ महिन्याने वाढणारा विशेष भत्ता असे एकुण वेतनावर २५% वाढ याप्रमाणे वेतन देता येईल.

| पदनाम | सध्याचे वेतन ३० दिवसाकरीता | प्रस्तावीत वेतन | वेतनात होणारी वाढ | कर्मचारी संख्या | मासिक वाढीव भार | वार्षीक वाढीव भार |
|---|---|---|---|---|---|---|
| कुशल स्टाफनर्स | १८,७६० | २६,३६५ | ७,६०५ | १२८ | ९,७३,४४० | १,१६,८१,२८० |
| आऊटसोर्स स्टाफनर्स, कुशल तंत्रज्ञ (ईसीजी टेक्निशियन, डायलेसिस तंत्रज्ञ, लॅब टेक्निशियन) | १८,६२८.६८ | २६,३६५ | ७,७६३.३२ | ५७ | ४,४२,५०९ | ५३,१०,१११ |
| एमआरआय टेक्निशियन, ज्युनिअर फिजिओथेरपिस्ट, डायलेसिस टेक्निशियन | १७,७६९ | २६,३६५ | ८,५९६ | ५ | ४२,९८० | ५,१५,७६० |
| एकूण | | | | १९० | १४,५८,९२९ | १७,५०७,१५१ |

ब. राष्ट्रीय मिशन अंतर्गत कार्यरत स्टाफ कंत्राटी फार्मासिस्ट प्रमाणे रू.१७,०००/- मासिक वेतन + कुशल कामगाराप्रमाणे दर ६ महिन्याने वाढणारा विशेष भत्ता असे एकुण वेतनावर २५% वाढ याप्रमाणे वेतन देता येईल.

| पदनाम | सध्याचे वेतन ३० दिवसाकरीता | प्रस्तावीत वेतन | वेतनात होणारी वाढ | कर्मचारी संख्या | मासिक वाढीव भार | वार्षीक वाढीव भार |
|---|---|---|---|---|---|---|
| कुशल कर्मचारी (फार्मासिस्ट) | १८,६२८.६८ | २२,६१५ | ३,९८६.३२ | ८ | ३१,८९१ | ३,८२,६८७ |
| एकूण | | | | ८ | ३१,८९१ | ३,८२,६८७ |

२. राष्ट्रीय आरोग्य मिशन अंतर्गत देण्यात येणा-या वेतनामध्ये ज्युनिअर एक्स रे टेक्निशियन यांचे वेतन नमुद नाही. ६ व्या वेतन आयोगानुसार ज्युनिअर टेक्निशियन यांचे पे बॅन्ड रू.५२००-२०२०० ग्रेड पे २४०० असे नमुद असुन सदरचे ग्रेड पे स्टाफनर्स व इतर यांचेपेक्षा कमी असुन बायोमेडीकल टेक्निशियन व इतर यांचेपेक्षा जास्त असल्याने कुशल कर्मचारी (ज्युनिअर एक्स रे टेक्निशियन) साठी रू.१५,०००/- मासिक वेतन + कुशल कामगाराप्रमाणे दर ६ महिन्याने वाढणारा विशेष भत्ता असे एकुण वेतनावर २५% वाढ याप्रमाणे वेतन देता येईल.

| पदनाम | सध्याचे वेतन ३० दिवसाकरीता | प्रस्तावीत वेतन | वेतनात होणारी वाढ | कर्मचारी संख्या | मासिक वाढीव भार | वार्षीक वाढीव भार |
|---|---|---|---|---|---|---|
| कुशल कर्मचारी (ज्युनिअर एक्स रे टेक्निशियन) | १८,६२८.६८ | २०,११५ | १,४८६.३२ | ४ | ५,९४५ | ७१,३४३ |
| एकूण | | | | ४ | ५,९४५ | ७१,३४३ |

३. अ.नं. १ व २ मध्ये नमुद पदांना किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार प्रतिदिन किमान दर हा मासिक मानधनास २६ ने भागून येणारा भागाकार नजीकच पैशापर्यंत पूर्णांकात काढण्यात येईल. उपरोक्त वेतनदरामध्ये साप्ताहिक सुट्टयांच्या वेतनाचा समावेश असेल.

४. सदर पदांवरील कर्मचा-यांच्या वार्षीक वेतनावर १,७९,६१,१८१/- + (जीएसटी १८ टक्के) रू ३२,३३,०१३/- असा एकूण रू.२,११,९४,१९४/- (अक्षरी रू. दोन कोटी अकरा लाख चौ-यांन्नो हजार एकशे चौ-यांन्नो मात्र)इतका अंदाजे आर्थिक भार वाढेल.

५. सदर कर्मचा-यांचे वेतन व सुट्टयांसदर्भात यापूर्वी झालेले सर्व आदेश मा व्यवस्थापन समिती, तदर्थ समितीचे ठराव निरस्त करणेस मान्यता असावी.

६. कायम पदावरील लिपीक व बायोमेडीकल टेक्निशियन, ज्युनिअर लॅब टेक्निशियन यांची वेतनश्रेणी जवळजवळ सारखीच आहे. कंत्राटी लिपीक यांना किमान वेतन कायद्याप्रमाणे किमान वेतन, विशेष भत्ता असे एकुण वेतनावर ४० % वाढ व ४

आठवडा सुट्टयांचे वेतन अदा करणेत येत आहे. त्यामुळे कुशल कर्मचारी (बायोमेडीकल टेक्निशियन व ज्युनिअर लॅब टेक्निशियन) यांना सध्या देणेत येत असलेल्या वेतनात बदल करण्याची आवश्यकता नाही.

उपरोक्तप्रमाणे वेतन देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

GR8-218

विषय क्र.- 90

फायर अॅण्ड सेफ्टी विभाग

मा.तदर्थ (Ad-Hoc ) समिती सभेपुढील विषयाची टिपणी



---

**विषय :- श्री साईनाथ रुग्णालय इमारतींमध्ये फायर विभागाचे सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांचे ऑडीट अहवालानुसार स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणे व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.....**

**संदर्भ :-** १. आवक नं.०१३३० दि.०१.०५.२०२१ रोजी साईनाथ रुग्णालयचे ई – निविदा टेंडर

२.जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी /२५७०/२०१७ दि.०९.०८.२०१७ रोजीचा कार्यादेश.

टिपणी..

श्री साईबाबा संस्थानमार्फत सेवाभावी तत्वावर ३०० बेडचे श्री साईनाथ रुग्णालय चालविणेत येत असून तेथे दररोज हजारो गोर गरीब रुग्ण उपचार घेत आहेत. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये ऑपरेशन थिएटर, आय.सी.यु, लॅब, औषध भाडांर, स्ट्रेचर लिफ्ट तसेच विविध आजारांचे ओपीडी व जनरल वॉर्ड मध्ये रुग्णांवर उपचार केले जातात. सदर ठिकाणी आग प्रतिबंधात्मक उपाय-योजने करीता सध्या आगीचे प्रकारानुसार वेगवेगळया प्रकारचे फायर सिलेंडर प्राथमिक स्वरुपाचे आगींवर तात्काळ नियंत्रणाकरीता बसविणेत आलेले असून सध्या विभागाकडील ४ अग्निशमन वाहनांव्दारे नियंत्रण करणेत येते परंतू मोटया स्वरुपाची आग किंवा आगीची घटणा घडलेस त्यावर तात्काळ नियंत्रणा करीता स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणे आवश्यक आहे.

संस्थानचे विविध विभागातील इमारतींचे अग्नी सुरक्षिततेकरीता संस्थानचे सर्व इमारतीचे फायर ऑडीट लाईफ लाईन सर्व्हीसेस, वारी यांचेमार्फत यापुर्वी करणेत आलेले आहे. फायर ऑडीटमध्ये निघालेल्या त्रुटीचे निवारण करणेकामी फायर विभागामार्फत संदर्भ क्र२ नुसार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद या कंपनीची सल्लागार म्हणून नेमणुक करणेत आलेली आहे. फायर ऑडीटमध्ये सुचविलेल्या आवश्यक बाबींची पुर्तता करणेची कार्यवाही मंदिर व मंदिर परिसरापासून सुरु करणेत आलेली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये ३०० बेडस असुन सदर बेडस रुग्णांनी नेहमी उपचारार्थ भरलेले असतात. श्री साईनाथ रुग्णालय परीसरात सेंट्रल ऑक्सीजन प्लॅन्ट कार्यान्वीत असुन त्यातुन संपुर्ण रुग्णालयास पाईपलाईनव्दारे ऑक्सीजनचा पुरवठा केला जातो. तसेच रुग्णालयाचे दोनही इमारतींचे वर तिस-या मजल्याचा वापर रुग्णालयाचे वापरासाठी होणार आहे. साईनाथ रुग्णालयाचे फेर ऑडीट सल्लागार यांचे मार्फत नव्याने दि.०५.०३.२०२१ रोजी करणेत आलेले असुन फायर ऑडीट रिपोर्ट इकडील विभागाकडे प्राप्त झालेला आहे.

आता फायर सल्लागार यांनी केलेल्या ऑडीटनुसार श्री साईनाथ रुग्णालयाचे अग्निसुरक्षिततेकामी करावयाच्या उपाययोजना ज्यामध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणेमध्ये, हायड्रंट सिस्टीम , रायझर सिस्टीम , स्प्रिंकलर सिस्टीम , ॲड्रेसेबल फायर डिटेक्शन सिस्टीम , अलार्म सिस्टीम प्रस्थपित करणेकामी सल्लागार यांचे मार्फत ई - टेंडर तयार करुन संस्थान आवक नं.०१३३० दि.०१.०५.२०२१ रोजी प्राप्त झालेले आहे. फायर सल्लागार यांचे अहवालानुसार श्री साईनाथ रुग्णालय परिसरात स्थायी अग्निशमन यंत्रणा बसविणेकामी शासनाचे स्टेट शेडयुल्ड रेट सन २०२०-२०२१ नुसार ( S.S.R.) रु.१,९०,९१,१५०/- तसेच 18 % GST रु.३४,३६,४०७/- असा एकूण अंदाजे रु.२,२५,२७,५५७/- इतका खर्च अपेक्षित आहे. संस्थानचे मंदिर व इतर परिसरातील फायर ऑडीटमध्ये निघालेल्या त्रुटीचे निवारण करणेकामी फायर विभागाचे सन २०२१ - २०२२ चे वार्षिक बजेटमध्ये संस्थानचे सर्व इमारतींसाठी ( ६४ इमारती ) १० कोटी खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय** – संस्थानचे मंदिर व इतर परिसरातील फायर ऑडीटमधील त्रुटीचे निवारण करणेकामी फायर विभागाचे सन २०२१ -२०२२ बजेटमध्ये १० कोटी खर्चास मान्यता घेण्यात आलेली असुन श्री साईनाथ रुग्णालय परिसरातील फायर ऑडीटमधील त्रुटीचे निवारण करणेकामी संस्थानचे फायर सल्लागार यांनी दिलेल्या अहवालानुसार श्री साईनाथ रुग्णालय व परीसरामध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणीकामी अंदाजे रु.२,२५,२७,५५७/- इतका खर्च अपेक्षित असून त्याबाबत सिव्हील ॲप्लीकेशन संस्थानचे विधी विभागामार्फत सादर करणे आवश्यक आहे.

संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय परिसरातील दोन इमारती व परीसरामध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी येणा-या खर्चाबाबत नवीन टेंडर प्रक्रीया राबवीणेकामी सल्लागार यांचे अहवालानुसार येणा-या अंदाजे रु.२,२५,२७,५५७/- (अक्षरी रुपये – दोन कोटी पंचविस लाख सत्ताविस हजार पांचशे सत्तावन्न मात्र ) खर्चास मान्यता तसेच सिव्हील ॲप्लीकेशन संस्थानचे विधी विभागामार्फत सादर करणेबाबत सदरचा विषय मा. तदर्थ (Ad-Hoc ) समितीपुढे मान्यतेस्तव सविनय सादर...

11/6/17

( कान्हुराज बगाटे, भा.प्र.से )

मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

10/6/17

ERP NO
FRS-Meeting-174-2021

विषय क्र.- ११

फायर ॲण्ड सेफ्टी विभाग

मा.तदर्थ (Ad-Hoc ) समिती सभेपुढील विषयाची टिपणी **56**

---

**विषय :- श्री साईबाबा हॉस्पीटलचे सर्व इमारतींमध्ये फायर विभागाचे सल्लागार मे ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांचे ऑडीट अहवालानुसार स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणे व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत...**

**संदर्भ :-** १. आवक नं.०१३३१ दि.०१.०५.२०२१ रोजी साईनाथ रुग्णालयचे ई – निविदा टेंडर

२.जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी /२५७०/२०१७ दि.०९.०८.२०१७ रोजीचा कार्यादेश..

टिपणी..

श्री साईबाबा संस्थानमार्फत सेवाभावी तत्वावर २४७ बेडचे श्री साईबाबा हॉस्पीटल चालविणेत येत असून तेथे दररोज हजारो रुग्ण उपचार घेत आहेत. श्री साईबाबा हॉस्पीटल मध्ये आयसीसीयु, जीआयसीयु , औषध भांडार , ऑपरेशन थिएटर , ब्लड बॅक , अपघात विभाग , रॅडीओलॉजी , प्रयोगशाळा, लिफ्ट तसेच इतर आवश्यक विभाग कार्यरत असुन विविध आजारांचे ओपीडी व जनरल वॉर्ड मध्ये रुग्णांवर उपचार केले जातात. सदर ठिकाणी आग प्रतिबंधात्मक उपाय-योजने करीता सध्या आगीचे प्रकारानुसार वेगवेगळया प्रकारचे फायर सिलेंडर प्राथमिक स्वरुपाचे आगींवर तात्काळ नियंत्रणाकरीता बसविणेत आलेले असून सध्या ४ अग्निशमन वाहनांव्दारे नियंत्रण केले जाते परंतू मोठया स्वरुपाची आग किंवा आगीची घटणा घडलेस त्यावर तात्काळ नियंत्रणा करीता स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणे आवश्यक आहे.

संस्थानचे विविध विभागातील इमारतींचे अग्नि सुरक्षिततेकरीता संस्थानचे सर्व इमारतीचे फायर ऑडीट लाईफ लाईन सर्व्हीसेस, वारी यांचेमार्फत यापुर्वी करणेत आलेले आहे. फायर ऑडीटमध्ये निघालेल्या त्रुटीचे निवारण करणेकामी फायर विभागामार्फत संदर्भ क्र.२ नुसार मे.ग्राफीक इंफ्रास्टक्चर प्रा.लि.औरंगाबाद या कंपनीची सल्लागार म्हणून नेमणुक करणेत आलेली आहे. फायर ऑडीटमध्ये सुचविलेल्या आवश्यक बाबीची पुर्तता करणेची कार्यवाही मंदिर व मंदिर परिसरापासून सुरु करणेत आलेली आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये २४७ बेडस असुन सदर बेडस रुग्णांनी नेहमी उपचारार्थ भरलेले असतात. श्री साईबाबा हॉस्पीटल परीसरात सेंट्रल ऑक्सीजन प्लॅन्ट कार्यान्वीत असुन त्यातुन संपुर्ण रुग्णालयास पाईपलाईनव्दारे ऑक्सीजनचा पुरवठा केला जातो. तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलचे फेर ऑडीट फायर सल्लागार यांचे मार्फत नव्याने दि.०५.०३.२०२१ रोजी करणेत आलेले असुन फायर ऑडीट रिपोर्ट इकडील विभागाकडे प्राप्त झालेला आहे.

आता फायर सल्लागार यांनी केलेल्या ऑडीटनुसार श्री साईबाबा हॉस्पिटलअग्निसुरक्षिततेकामी करावयाच्या उपाययोजना ज्यामध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणेमध्ये, हायड्रंट सिस्टीम , रायझर सिस्टीम , स्प्रिंकलर सिस्टीम , ॲड्रेसेबल फायर डिटेक्शन सिस्टीम, अलार्म सिस्टीम प्रस्थपित करणेकामी सल्लागार यांचे मार्फत ई - टेंडर तयार करुन संस्थान आवक नं.०१३३१ दि.०१.०५.२०२१ रोजी प्राप्त झालेले आहे. फायर सल्लागार यांचे अहवालानुसार श्री साईबाबा हॉस्पीटल परिसरात स्थायी अग्निशमन यंत्रणा बसविणेकामी शासनाचे सन २०२०-२०२१ स्टेट शेडयुल्ड रेट ( S.S.R.) रु.१,५९,२१,९६०/- तसेच १८ % GST रु.२८,६५,९५३/- असा एकूण अंदाजे रु.१,८७,८७,९१३/- ( एक कोटी सत्याऐंशी लाख सत्याऐंशी हजार नऊशे तेरा मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

संस्थानचे मंदिर व इतर परिसरातील फायर ऑडीटमध्ये निघालेल्या त्रुटीचे निवारण करणेकामी फायर विभागाचे सन २०२१ - २०२२ चे वार्षिक बजेटमध्ये संस्थानचे सर्व इमारतींसाठी ( ६४ इमारती ) १० कोटी खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय** – संस्थानचे मंदिर व इतर सर्वपरिसरातील फायर ऑडीटमधील त्रुटीचे निवारण करणेकामी फायर विभागाचे सन २०२१ - २०२२ बजेटमध्ये १० कोटी खर्चास मान्यता घेण्यात आलेली असुन श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरातील फायर ऑडीटमधील त्रुटीचे निवारण करणेकामी संस्थानचे फायर सल्लागार यांनी दिलेल्या अहवालानुसार श्री साईबाबा हॉस्पिटल व परीसरामध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणीकामी अंदाजे रु.१,८७,८७,९१३/- ( एक कोटी सत्याऐंशी लाख सत्याऐंशी हजार नऊशे तेरा मात्र) इतका खर्च अपेक्षित असून त्याबाबत सिव्हील ॲप्लीकेशन संस्थानचे विधी विभागामार्फत सादर करणे आवश्यक आहे.

संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरातील सर्व इमारती व परीसरामध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी येणा-या खर्चाबाबत नवीन टेंडर प्रक्रीया राबवीणेकामी सल्लागार यांचे अहवालानुसार येणा-या अंदाजे रु.१,८७,८७,९१३/- ( एक कोटी सत्याऐंशी लाख सत्याऐंशी हजार नऊशे तेरा मात्र) खर्चास मान्यता तसेच सिव्हील ॲप्लीकेशन संस्थानचे विधी विभागामार्फत सादर करणेबाबत सदरचा विषय मा. तदर्थ (Ad-Hoc ) समितीपुढे मान्यतेस्तव सविनय सादर...

११/६/२१

( कान्हुराज बगाटे, भा.प्र.से )
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

१०/६/२१

ERP NO.
F&S. Meeting-176-2021

विषय क्र.- 92

**मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर**

विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी

**टिपणी,**

57

**विषय:- श्री साईबाबा हॉस्पिटलमधील जिवनदायी आरोग्य योजना विभागाचे विशेष लेखापरिक्षण अहवालबाबत..**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा हॉस्पिटलमधील जिवनदायी आरोग्य योजना विभागाचे विशेष लेखापरिक्षण करण्यासाठी मा.व्य.समिती सभा विषय क्र.१०५ निर्णय क्र.१०५ दि.२५.०२.२०१७ अन्वये सनदी लेखापरिक्षक मे. शिंदे चव्हाण गांधी ॲण्ड कं. चार्टर्ड अकौंटंटस्, लातूर यांची विशेष लेखापरिक्षक म्हणून जा.नं.एसएसएसटी/एसएसबीएच/वित्त/२८/२०१७ दि.०५ एप्रिल २०१७ रोजी विशेष लेखापरिक्षण करण्याचे आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन त्यांनी सदरचे विशेष लेखापरिक्षण शिर्डी येथे दि.०९.०४.२०१७ ते दि.१९.०४.२०१७ पर्यत संस्थानमध्ये थांबुन पुर्ण करुन त्याचा अहवाल दि.२०.०४.२०१७ रोजी संस्थानला सादर केला होता.

लेखापरीक्षण अहवाल दिनांक ०९.०६.२०२० रोजी झालेल्या मा. तदर्थ समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर करण्यात आला होता, त्यावर निर्णय क्र. ३४५ अन्वये, *"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील जिवनदायी आरोग्य योजना विभागाचे विशेष लेखापरिक्षण अहवालाचे समिती सदस्य मा. श्री. दिलीप स्वामी साहेब यांनी अवलोकन करुन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करावा"* असे ठरलेले आहे,

सदर विषयावर चर्चा करण्यासाठी मा. श्री. दिलीप स्वामी साहेब, तदर्थ (Ad-hoc) समिती सदस्य यांची वेळ घेण्यासाठी जा.नं.एसएसएसटी/एसएसबीएच/५३९/२०२० दि.०६ ऑगस्ट २०२० व जा.नं.एसएसएसटी/एसएसबीएच/८०८ /२०२० दि.०३ नोव्हेंबर २०२० चे पत्रान्वये कळिवण्यात आलेले आहे, परंतू मा. श्री. दिलीप स्वामी साहेब, तदर्थ (Ad-hoc) समिती सदस्य यांचेकडुन सदर विषयावर चर्चा करण्यासाठी वेळ मिळालेली नाही व मा. श्री दिलीप स्वामी साहेब, अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक येथून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर येथे बदली झालेली आहे. तथापि, मा. श्री दिलीप स्वामी साहेबांची बदली झाल्याने दि. ०४ डिसेंबर २०२० रोजी पुढील कार्यवाही बाबत योग्यते आदेश होणेबाबत सादर केलेल्या टिपणीवर "सदर काम यापुर्वीच सोपविलेले आहे. त्यामुळे त्याची पुर्तता त्यांनीच करावी लागेल" असा शेरा नमुद केला असल्याने जा.नं.एसएसएसटी/एसएसबीएच/१०५८/२०२० दि. २२ डिसेंबर २०२० रोजीचे पत्रासोबत लेखापरिक्षण अहवाल पाठवून सुस्पष्ट अभिप्राय मागविण्यात आला होता.

आता, जिपसो/मुकाअ/स्वीस/०६/२०२१. २० जानेवारी, २०२१ चे पत्रान्वये "उपरोक्त संदर्भिय पत्राव्दारे जिवनदायी आरोग्य योजनेचा लेखापरिक्षण अहवाल अवलोकनार्थ पाठवलेला आहे. सदर अहवालाचे मी अवलोकन केले असून चार्टर्ड अकौंटंट यांनी दिलेला अहवाल ऑडीटदृष्टया असल्याचे दिसून येते.

तथापि, योजनाचे नियमावली व इतर अनुषंगिक कागदपत्रे नसल्याने स्वयंस्पष्ट अभिप्राय देणे अवघड जात आहे. करीता इथंभू अभिलेख, योजनेचे शासन निर्णय इत्यादी तपासून खातरजमा करणेकामी सध्याचे सदस्य यांचेकडून तपासणी करणेकामी नियुक्ती करण्याची विनंती आहे." असे नमुद केले आहे.

तरी, श्री दिलीप स्वामी (भा.प्र.से.) साहेब यांचे पत्राचे अवलोकन होऊन पुढील कार्यवाहीसाठी योग्यते निर्णय होणेकामी सदर प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे सादर.

8/3/21

(कान्हूराज बगाटे भा.प्र.से.)

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

Re: SSH-Meeting-436-2020

विषय क्र.- 13



मा.तदर्थ समितीचें निर्णयार्थ
मालमत्ता विभाग

विषय – श्री.अभिजित देविदास शिंदे,एम.डी.एस.रेसिडेन्सी,मु.पो.लोणी बु.,ता.राहाता,जि.अहमदनगर यांना ऐतिहासिक वस्तू, शस्त्रास्त्रे,कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील वापरास दिलेल्या जागा वापराची मुदतवाढ मिळणेबाबत श्री.अभिजित देविदास शिंदे यांचा दि.१५/०२/२०२१ रोजीचा अर्ज.

टिपणी –

**अधिनियमातील तरतूद** - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना -**

**प्रकरणाची पुर्वपिठीका** - मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील पत्र जा.क्रं.सासंवि-१०१६ /८४०/प्र.क्र.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने संस्थानच्या मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.८० व ८५ मधील साईप्रसादालय इमारतीतील पहिल्या मजल्यावरील ७२०० चौ.फुट क्षेत्रफळ असलेली जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मधील तरतुदीनुसार श्री.अभिजित देविदास शिंदे यांना ऐतिहासिक वस्तु व शस्त्रास्त्रे यांचे कलादालन व प्रदर्शन मांडण्याकरीता ११ महिन्यांच्या लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर ११ वेळा वाढवून देण्यास

अ) प्रत्येक वेळी लिव्ह ॲण्ड लायसन्स करार करतांना मागील वर्षाच्या भाडयात १०% वाढ करण्यात यावी.

ब) या कलादालनात व प्रदर्शनात ठेवण्यात आलेल्या वस्तू या शिवकालीन व पुरातन असल्याचा उल्लेख करारनाम्यात करण्यात येणार नाही.

क) कोणत्याही व्यक्तीने त्या कलादालनात प्रदर्शनासाठी ठेवलेल्या वस्तू या शिवकालीन किंवा पुरातन नाहीत याबाबत घेतलेल्या कोणत्याही आक्षेपा संदर्भात फक्त लायसेन्सी हेच जबाबदार असतील.

ड) सदर कलादालन/प्रदर्शनामुळे भविष्यात काही कायदेविषयक बाबी किंवा अन्य कारणास्तव होणा-या नुकसानीची /खर्चाची संपूर्ण भरपाई लायसेन्सीने संस्थानला करुन देणे आवश्यक राहील. या व इतर अटी व शर्तींवर ऐतिहासिक वस्तू शस्त्रास्त्रे कलादालन व प्रदर्शन मांडण्याकरीता श्री.अभिजित देविदास शिंदे, रा.श्रीरामपूर यांना वापरास दिलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील गट नं.८० व ८५ पै. यामधील साईप्रसादालय इमारतीतील पहिल्या मजल्यावरील आय.टी. विभागाशेजारी असलेला हॉल अंदाजे रुंदी दक्षिणोत्तर ६० फुट व लांबी पूर्व-पश्चिम १२० फुट याचे साधारणत: क्षेत्रफळ ७२०० चौ.फुट या जागेच्या वापराची तिसरी मुदतवाढ दि.०१/११/२०१९ ते दि.३०/०९/२०२० या ११ महिने कालावधीसाठी, यापूर्वीची मासिक भाडेदराची रक्कम रु.१२,१००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.१२,१००/-+ रु.१,२१०/- अशी एकुण रक्कम रु.१३,३१०/- इतकी आकारुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देणेच्या व यापूर्वीप्रमाणेच लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला. त्यात व तदनंतर प्रस्तुत प्रकरणी मा.तदर्थ समितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय झालेले आहेत.

| मा.तदर्थ समितीची सभा दिनांक | निर्णय क्रमांक | झालेला निर्णय |
|---|---|---|
| ०४/१२/२०१९ | ५१० | "यावर सविस्तर चर्चा होऊन, तसेच सर्व वाचन केले व ऐकले असता असे दिसून येते की,सदरचे प्रदर्शन पाहण्यासाठी प्रवेश शुल्क आकारण्यात येते. याचा अर्थ असा की, नाममात्र शुल्कावर दिलेल्या इमारतीचा उपयोग वाणिज्यीक कारणासाठी केला जातो. येथे नमुद करावेसे वाटते की, शासनाने जा.क्रं.सासंवि-१०१६/८४०/प्र.क्र.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ चे पत्रान्वये खालील अटी शर्तींवर परवानगी दिलेली होती.<br>अ) प्रत्येक वेळी लिव्ह ॲण्ड लायसन्स करार करतांना मागील वर्षाच्या भाडयात १०% वाढ करण्यात यावी.<br>ब) या कलादालनांत व प्रदर्शनात ठेवण्यात आलेल्या वस्तू या शिवकालीन व पुरातन असल्याचा उल्लेख करारनाम्यात करण्यात येणार नाही.<br>क) कोणत्याही व्यक्तीने या कलादालनात प्रदर्शनासाठी ठेवलेल्या वस्तू या शिवकालीन किंवा पुरातन नाहीत याबाबत घेतलेल्या कोणत्याही आक्षेपा संदर्भात फक्त लायसेन्सी हेच जबाबदार असतील. |

| | | |
|---|---|---|
| | | ड) सदर कलादालन/प्रदर्शनामुळे भविष्यात काही कायदेविषयक बाबी किंवा अन्य कारणास्तव होणा-या नुकसानीची,खर्चाची संपूर्ण भरपाई लायसेन्सीने संस्थानला करुन देणे आवश्यक राहील.<br>शासनाचे जा.क्रं.सासंवि-१०१६/८४०/प्र.क्र.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ चे पत्र समितीच्या निदर्शनास आणून दिले. जर ११ महिन्याच्या Licence प्रमाणे पुढील दहा वर्ष मुदतवाढ सदर पत्राद्वारे दिली तर ती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) चे उल्लंघन होणारे ठरेल व तसे करणे हे कायद्याच्या कलमांशी प्रतारणा करणारे ठरेल,असे समितीला वाटते.<br>सदरची इमारत श्री साई मंदिरापासून १ किमी. अंतरावर आहे. समितीने सर्व बाबींचा साकल्यपुर्ण विचार केला. सदरची जागा ही ७२०० चौ.फुट आहे व त्याचा वाणिज्यिक वापर दिसून येतो. अशा परिस्थितीत सदरची जागा नाममात्र शुल्कावर पुढील कालावधीसाठी देणे संस्थानच्या आर्थिक हिताच्या आड येण्याची शक्यता आहे,असे वाटते. अशा परिस्थितीत सदरच्या कराराची मुदत ऑक्टोबर २०१९ मध्ये संपलेली असल्याने श्री.शिंदे यांना लगेचच जागा खाली करा असे सांगणे उचित होणार नाही. करिता समिती सर्वानुमते असा निर्णय घेते की,<br>१) श्री.शिंदे यांचेकडून नोव्हेंबर २०१९ पासून ३१ मार्च २०२० पर्यंत पाचपट जास्त म्हणजेच दरमहा रक्कम रु.६०,५००/- मात्र (१२,१००x५) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे असे शुल्क आकारण्यात येईल व असे शुल्क देण्यास ते तयार आहेत का? अशी विचारणा त्यांचेकडे करावी व त्यांनी त्यास तयारी दर्शविल्यास ३१ मार्च २०२० पर्यंत मुदतवाढ दरमहा रक्कम रु.६०,५००/- मात्र व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे या शुल्कावर द्यावी व पुढील कार्यवाही करावी.<br>२) सदर जागेचा सध्यस्थितीतील वाणिज्यीक वापरासाठीचा बाजारातील दर किती आहे याची पडताळणी संबंधीत विभागाकडून करावी व तसा अहवाल समितीला सादर करावा. त्यानंतर योग्य तो निर्णय समिती घेईल.<br>३) श्री.शिंदे यांना वरील क्रं.१ मधील नमुद बाब मान्य नसल्यास डिसेंबर २०१९ अखेर सदरची जागा खाली करण्यासाठी नोटीस श्री.शिंदे यांना द्यावी व सदरची जागा खाली करुन घेण्याची कारवाई करावी,असे सर्वानुमते ठरले." |
| ०६/०२/२०२० | ८७ | "प्रस्तुत प्रकरणी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५१० अन्वये श्री.शिंदे यांचेकडून नोव्हेबर २०१९ पासून ३१ मार्च २०२० पर्यंत पाचपट जास्त म्हणजेच दरमहा रक्कम रु.६०,५००/- मात्र (१२,१००x५) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे असे शुल्क आकारण्यात यावे. तसेच सदर जागेचा सध्यस्थितीतील वाणिज्यिक वापरासाठीचा बाजारातील दर किती आहे याची पडताळणी संबंधीत विभागाकडून करावी व तसा अहवाल समितीला सादर करावा,असा निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाबाबत श्री.शिंदे यांना दि.२६/१२/२०१९ रोजी पत्र देण्यात आले होते. यावर श्री.शिंदे यांनी दि.२५/०१/२०२० रोजीचे पत्रान्वये मा.तदर्थ (Ad-hoc) समिती जो निर्णय घेईल तो मान्य असेल असे कळविले आहे.<br>सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदरहू जागेबाबत दि.२२/०१/२०२० रोजी दिलेल्या मासिक भाडेदराचे प्रमाणपत्रानुसार रक्कम रु.८८,०२२/- इतके दर निश्चित केले आहे. मालमत्ता विभागाचे प्रशासकीय अधिकारी श्री.किसवे यांनी समितीचे असे निदर्शनास आणून दिले की,सदरची जागा श्रीं चे मंदिरापासून १ किमी. अंतरावर श्री साई प्रसादालयाचे इमारतीमध्ये आहे व सध्यस्थितीत सदरहू जागेचा बाजारभावाप्रमाणे वाणिज्यिक वापराचा दर रु.१ लाख पेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे.<br>अशा सर्व परिस्थितीत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५१० याद्वारे रद्द करण्यात येत आहे व श्री.शिंदे यांना मान्य असल्यास दि.०१ मार्च २०२० पासून पुढील ११ महिने कालावधीसाठी म्हणजेच दि.३१ जानेवारी २०२१ पर्यंत दरमहा रक्कम रु.१,००,०००/- मात्र परवाना शुल्क ॲडव्हान्समध्ये संस्थानकडे जमा करणेच्या व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे या अटीवर सदरची जागा वापरास देत असल्याचे व याबाबत आपली अनुमती दि.१५ फेब्रुवारी २०२० चे आत कळवावी,असे श्री.शिंदे यांना कळविण्यात यावे. श्री.शिंदे यांची संमती असल्यास पुढील कार्यवाही करण्यात यावी. तसेच श्री.शिंदे यांची संमती न आल्यास दि.२९ फेब्रुवारी २०२० पर्यंत सदरची जागा खाली करुन घेण्यात यावी," असे ठरले. |

| | | |
|---|---|---|
| २४/०२/२०२० | १६३ | "प्रस्तुत प्रकरणी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५१० अन्वये श्री.शिंदे यांचेकडून नोव्हेंबर २०१९ पासून ३१ मार्च २०२० पर्यंत पाचपट जास्त म्हणजेच दरमहा रक्कम रु.६०,५००/- मात्र (१२,१००x५) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे असे शुल्क आकारण्यात यावे. तसेच सदर जागेचा सध्यस्थितीतील वाणिज्यिक वापरासाठीचा बाजारातील दर किती आहे याची पडताळणी संबंधीत विभागाकडून करावी व तसा अहवाल समितीला सादर करावा,असा निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाबाबत श्री.शिंदे यांना दि.२६/१२/२०१९ रोजी पत्र देण्यात आले होते. यावर श्री.शिंदे यांनी दि.२५/०१/२०२० रोजीचे पत्रान्वये मा.तदर्थ (Ad-hoc) समिती जो निर्णय घेईल तो मान्य असेल असे कळविले आहे.<br>सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदरहू जागेबाबत दि.२२/०१/२०२० रोजी दिलेल्या मासिक भाडेदराचे प्रमाणपत्रानुसार रक्कम रु.८८,०२२/- इतके दर निश्चित केले आहे. मालमत्ता विभागाचे प्रशासकीय अधिकारी श्री.किसवे यांनी समितीचे असे निदर्शनास आणून दिले की,सदरची जागा श्रीं चे मंदिरापासून १ किमी.अंतरावर श्री साई प्रसादालयाचे इमारतीमध्ये आहे व सध्यस्थितीत सदरहू जागेचा बाजारभावाप्रमाणे वाणिज्यिक वापराचा दर रु.१ लाख पेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे.<br>अशा सर्व परिस्थितीत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५१० नुसार श्री.शिंदे यांना वापरास दिलेल्या संस्थान मालकीच्या उपरोक्त मिळकतीचे दि.०१/११/२०१९ ते दि.३१/०३/२०२० या कालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम रु.६०,५००/- व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारणेत येऊन सदर कालावधीसाठीचा पूर्वीप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा श्री.शिंदे यांचेकडून करुन घेण्यात यावा,असे ठरले.<br>तसेच श्री.शिंदे यांना मान्य असल्यास दि.०१ एप्रिल २०२० पासून पुढील ११ महिने कालावधीसाठी म्हणजेच दि.२८ फेब्रुवारी २०२१ पर्यंत दरमहा रक्कम रु.१,००,०००/- मात्र परवाना शुल्क ॲडव्हान्समध्ये संस्थानकडे जमा करणेच्या व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे या अटीवर सदरची जागा वापरास देत असल्याचे व याबाबत आपली अनुमती दि.१५ मार्च २०२० चे आत कळवावी,असे श्री.शिंदे यांना कळविण्यात यावे. श्री.शिंदे यांची संमती असल्यास पुढील कार्यवाही करण्यात यावी. तसेच श्री.शिंदे यांची संमती न आल्यास दि.३१ मार्च २०२० पर्यंत सदरची जागा खाली करुन घेण्यात यावी," असे ठरले. |

उपरोक्त दि.२४/०२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१६३ मधील निर्णयाप्रमाणे दि.०१ एप्रिल २०२० ते दि.२८ फेब्रुवारी २०२१ या ११ महिने कालावधीसाठी दरमहा रक्कम रु.१,००,०००/- मात्र परवाना शुल्क ॲडव्हान्समध्ये संस्थानकडे जमा करणेच्या व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे अदा करणेच्या अटी श्री.अभिजित देविदास शिंदे यांनी मान्य करुन दि.०१/०४/२०२० ते दि.२८/०२/२०२१ या ११ महिने कालावधीसाठीचा चौथ्या मुदतवाढीचा लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा दि.१४/१०/२०२० रोजी करुन दिलेला आहे व उक्त करारनाम्याच्या कालावधीमध्ये श्री.अभिजित देविदास शिंदे यांनी खालीलप्रमाणे भाडेच्या रकमा संस्थानच्या लेखाशाखेकडे जमा केलेल्या आहेत.

| दिनांक | पावती नंबर | भरणा केलेली रक्कम |
|---|---|---|
| ३१/०८/२०२० | CSH-20-147 | रु. १,००,०००/- |
| ०१/१२/२०२० | CSH-20-337 | रु. १,००,०००/- |
| २१/१२/२०२० | TRF 20-90 | रु. ७,००,०००/- |
| ०४/०१/२०२१ | CSH-20-391 | रु. १,००,०००/- |
| ०३/०२/२०२१ | CSH-20-458 | रु. १,००,०००/- |
| | एकूण | रु.११,००,०००/- |

श्री.अभिजित देविदास शिंदे यांना वापरास दिलेल्या उपरोक्त जागेच्या करारनाम्याची मुदत दि.२८/०२/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने त्यांनी दि.१५/०२/२०२१ रोजी इकडेस अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "श्री साईचे दर्शनासाठी येणा-या भाविकांना ऐतिहासिक वस्तू शस्त्रास्त्रे कलादालन शिवसृष्टी संग्रहालय यामधून शिवछत्रपती यांचे कार्याचा प्रचार आणि प्रसार जगासमोर करणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी दिलेल्या जागेचा वापर आम्ही करत आहोत. या संग्रहालयातून नक्कीच प्रेरणा भेटते.

आम्ही मा.साहेबांसी सांगू इच्छितो की मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील पत्र जा.क्रं.सासंवि/१०१६/८४०/प्र.क्र.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ अन्वये शिर्डी संस्थानच्या मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.८० व ८५ मधील साईप्रसादालय इमारतीतील पहिल्या मजल्यावरील असलेली जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था

(शिर्डी) (सुधारणा) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मधील तरतुदीनुसार आम्हाला ऐतिहासिक वस्तू व शस्त्रास्त्रे यांचे शिवकालीन कलादालन व संग्रहालय मांडण्याकरीता ११ महिन्यांच्या लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर ११ वेळा वाढवून देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर जागेचा ११ महिनेचा करार दि.०१/०४/२०२० ते दि.२८/०२/२०२१ पर्यंत आहे व तो फेब्रुवारी २०२१ अखेर त्याची मुदत संपत असल्याने पुढील ११ महिनेचा करार करणेकामी परवानगी मिळावी,ही विनंती," असेबाबत नमुद केलेले आहे.

सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर चक्रीय पध्दतीने मान्यतेसाठी सादर करणेत आला होता. मा.अध्यक्ष,तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.आस्था/१७८/२०२१ दि.१०/०५/२०२१ अन्वये सदरचा विषय एकतर तात्काळ करण्यासारखा नाही किंवा त्यावर सविस्तर चर्चा/विनिमय होणे गरजेचे आहे, असे अभिप्राय देवून विषय संचिका संस्थानकडे पाठविली आहे.

**विभागाचा अभिप्राय** - श्री.अभिजित देविदास शिंदे यांचे उपरोक्त अर्जाचे अनुषंगाने त्यांना ऐतिहासिक वस्तू व शस्त्रास्त्रे यांचे कलादालन व प्रदर्शन मांडण्याकरीता वापरास दिलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे, ता.राहाता येथील गट नं.८० व ८५ पै. यामधील साईप्रसादालय इमारतीतील पहिल्या मजल्यावरील आय.टी. विभागाशेजारी असलेला हॉल अंदाजे रुंदी दक्षिणोत्तर ६० फुट व लांबी पूर्व-पश्चिम १२० फुट याचे साधारणत: क्षेत्रफळ ७२०० चौ.फुट या जागेच्या वापराची पाचवी मुदतवाढ दि.०१/०३/२०२१ ते दि.३१/०१/२०२२ या ११ महिने कालावधीसाठी, यापूर्वीची मासिक भाडेदराची रक्कम रु.१,००,०००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.१,००,०००/- + रु.१०,०००/- अशी एकुण रक्कम रु.१,१०,०००/- इतके परवाना शुल्क ॲडव्हान्समध्ये संस्थानकडे जमा करता येईल व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पाचवी मुदतवाढ देता येईल आणि यापूर्वीप्रमाणेच लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

**प्रस्ताव** - श्री.अभिजित देविदास शिंदे यांना ऐतिहासिक वस्तू व शस्त्रास्त्रे यांचे कलादालन व प्रदर्शन मांडण्याकरीता वापरास दिलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे, ता.राहाता येथील गट नं.८० व ८५ पै. यामधील साईप्रसादालय इमारतीतील पहिल्या मजल्यावरील आय.टी.विभागाशेजारी असलेला हॉल अंदाजे रुंदी दक्षिणोत्तर ६० फुट व लांबी पूर्व-पश्चिम १२० फुट याचे साधारणत: क्षेत्रफळ ७२०० चौ.फुट या जागेच्या वापराची पाचवी मुदतवाढ दि.०१/०३/२०२१ ते दि.३१/०१/२०२२ या ११ महिने कालावधीसाठी, यापूर्वीची मासिक भाडेदराची रक्कम रु.१,००,०००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.१,००,०००/- + रु.१०,०००/- अशी एकुण रक्कम रु.१,१०,०००/- इतके परवाना शुल्क ॲडव्हान्समध्ये संस्थानकडे जमा करणेच्या व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पाचवी मुदतवाढ देणेच्या आणि यापूर्वीप्रमाणेच लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

11/6/21

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

LAB-meeting-201-2021

विषय क्र.- 98



**मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर**
**(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)**

---

**विषय:- कायम कर्मचा-यांचे खातेचौकशीचे कामकाजाकरीता कंत्राटी पध्दतीने खाते चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक असलेले महाराष्ट्र शासनाचे पॅनलवरील सेवा निवृत्त कर्मचारी/अधिकारी यांचे प्राप्त अर्जाबाबत...**

**विषयाची पुर्वपिठीका**

**(A)** श्री साईबाबा संस्थानचे कामगार विभागामार्फत गैरशिस्त वर्तन प्रकरणांची खातेचौकशी करणेकामी सन १९९२ पासून खातेचौकशी अधिकारी म्हणून ॲड. बी.वाय.काळवाघे, कोपरगाव हे काम पाहत असून त्यांचेमार्फत सध्या एक गैरशिस्त वर्तन करणारे कर्मचा-यांचे खातेचौकशी सुरु आहे. ॲड.काळवाघे यांना सध्या प्रतिमाह ३,०००/- इतके मानधन देण्यात येत होते.ॲड.काळवाघे यांनी दि.२०.०८.२००९ रोजीचे अर्जान्वये चौकशी अधिकारी मानधन वाढवुन दरमहा रु.१०,०००/- मिळावे अशी विनंती केली होती.

त्यास अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९-०९-२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९१ अन्वये, ॲडव्होकेट श्री बी.वाय.काळवाघे, खातेचौकशी अधिकारी यांना दि.०१.१०.२००९ पासुन रुपये ३,०००/- प्रतिमहा ऐवजी रु.५,०००/- प्रतिमहा मानधन देण्यात यावे, असे ठरले.

ॲड.काळवाघे यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३७७९/२००९ दि.२९.१०.२००९ रोजीचे आदेशान्वये दि.०१.१०.२००९ पासुन रु.५,०००/- प्रतिमहा मानधन म्हणून देण्यात येत आहे.

ॲड. बी.वाय.काळवाघे यांचे मानधन वाढीबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०-११-२०१६ रोजीचे सभेमध्ये विषय नं. २४ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता निर्णय क्र.७७८ नुसार, खाते चौकशी अधिकारी ॲड. बी. वाय. काळवाघे, कोपरगाव यांचे वयोमान जास्त झालेले असल्यामुळे त्यांचेकडून खातेचौकशीचे कामकाज अपेक्षीत गतीने पुर्ण होत नाही, याकरीता नवीन खाते चौकशी अधिका-याची नेमणूक करणेसाठी विहीत पद्धतीने जाहिरात प्रसिद्ध करणेत यावी. तसेच संस्थान पॅनेलवर असणा-या वकीलांनाही विचारणा करण्यात यावी व त्यानंतर आलेल्या अर्जानुसार खातेचौकशी अधिकारी नेमणूकीबाबत सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा,असा निर्णय घेण्यात आला.

तरी श्री साईबाबा संस्थानचे विविध विभागात गैरशिस्त वर्तन करणारे कर्मचा-यांचे खातेचौकशी करणेकरीता नविन खातेचौकशी अधिकारी नेमणेकरीता वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन अर्ज मागविणेत आले होते.

**(B)** त्यानुसार श्री साईबाबा संस्थानचे विविध विभागात गैरशिस्त वर्तन करणारे कर्मचा-यांची खाते चौकशी करणेकरीता नवीन खातेचौकशी अधिकारी नेमणेकरीता अर्ज सादर करणेसाठी दि.२५/०२/२०१७ रोजीचे दैनिक सार्वमत या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. तसेच जा.नं. एसएसएस/वशी-७ए/६११३/२०१७, दि.०३/०३/२०१७ अन्वये, संस्थान पॅनेलवर असणा-या वकीलांनाही अर्ज करणेस कळविण्यात आलेले होते. त्यानुसार विहीत मुदतीमध्ये (दि.१०/०३/२०१७ पर्यंत) १८ अर्ज व मुदतीनंतर १ अर्ज असे एकूण १९ अर्ज प्राप्त झालेले होते. तथापी, प्राप्त झालेल्या अर्जांबाबत कार्यवाही पुर्ण झाल्याचे दिसून येत नाही.

दरम्यानचे कालावधीत श्री.ए.एम.देशमुख यांनी ई-मेल अर्जाव्दारे, ते सन २००७ पासून महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन शाखेच्या पॅनेलवर असून शासनाचे कर्मचा-यांचे खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करीत असल्याचे नमूद करुन, समान पध्दतीने संस्थानमध्ये खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास तयार आहे. त्याकरीता शासन दराप्रमाणे मानधन व इतर चार्जेस मिळावेत. खाते चौकशीचे कामकाज शिर्डी येथे चालेल, असे नमूद करुन अर्ज दाखल केला.

श्री.देशमुख यांचे अर्जावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३९२ नुसार " यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेनुसार श्री.ए.एम.देशमुख यांची गैरशिस्त वर्तन करणा-या संस्थान कर्मचा-यांचे खातेचौकशीकामी खातेचौकशी अधिकारी म्हणून नेमणुक करणेस व याकामी त्यांना शासन निर्णयाप्रमाणे मानधन तसेच इतर चार्जेस देणेस मान्यता देण्यात आली. तसेच शासनाच्या पॅनलवरील आणखी खातेचौकशी अधिकारी संस्थानला सेवा देण्यास तयार असतील, त्यांनाही विचारणा करणेत येऊन, तसा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा,"असा ठराव पारीत झाला आहे.

पान नंबर २ वर...

त्यास अनुसरुन श्री.ए.एम.देशमुख, यांची जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-७ए/१५६१/२०१७, दि.०१-०७-२०१७ रोजीचे आदेशान्वये गैरशिस्त वर्तन करणा-या संस्थान कर्मचा-यांचे खाते चौकशी करणेकामी कंत्राटी पद्धतीने "खाते चौकशी अधिकारी" म्हणून नेमणुक करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण– १०१४/प्र.अ..५५/११-अ, मंत्रालय, मुंबई, दि.१६-०२-२०१५ नुसार, खाते चौकशी अधिकारी यांना प्रति खाते चौकशीकरीता, एक अपचारी असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी रु. १२,०००/- इतके मानधन देण्यात येईल, एका पेक्षा अधिक अपचारी असल्यास प्रत्येक अपचा-या मागे रु. १५,००/- इतके वाढीव मानधन मूळ मानधनाच्या रकमेत वाढवून देण्यात येईल. मात्र सदर मानधनाची कमाल मर्यादा रु. २४,०००/- इतकी राहिल. वरील मानधना व्यतिरिक्त चौकशीच्या कामासाठी चौकशी अधिका-याने स्वत: नियुक्त केलेल्या लिपिक/टंकलेखक यांच्या सेवेपोटी रु.२०००/- एवढी अतिरिक्त रक्कम मंजूर करण्यात येईल. प्रत्येक खातेचौकशी पुर्ण करुन अहवाल सादर केल्यानंतर उपरोक्तप्रमाणे मानधनाची रक्कम अदा करणेत येईल.

श्री.ए.एम.देशमुख, नाशिक, यांनी शिर्डी येथे येऊन, खातेचौकशीचे कामकाज करावे व त्यासाठी त्यांना कोणतेही इतर वेगळे भत्ते देय्य होणार नाहीत.

मानधन व इतर चार्जेस चे बदलाबाबत वेळोवेळी होणारे शासन निर्णय लागू राहतील. असे आदेशात नमुद आहे.

**(C)** दरम्यानच्या कालावधीत डॉ.मधुकर गिरी, लातुर यांनी त्यांच्या दिनांक २७/०६/२०१७ रोजीचे पत्रान्वये खाते चौकशीची प्रकरणे पाठविणेबाबत कळविले होते. सदरच्या पत्रावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९८३ नुसार, "यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री.मधुकर गिरी, लातूर यांची गैरशिस्त वर्तन करणा-या संस्थान कर्मचा-यांची खातेचौकशी करणेकामी कंत्राटी पद्धतीने खातेचौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणेस व त्यांना प्रति खाते चौकशीकरीता शासन निर्णयाप्रमाणे मानधन मान्यता देण्यात आली. श्री. मधुकर गिरी, लातूर यांनी शिर्डी येथे येऊन, खातेचौकशीचे कामकाज करावे व त्यासाठी त्यांना कोणतेही इतर वेगळे भत्ते अदा करु नये, असे ठरले."असा ठराव पारीत झाला आहे.

त्यास अनुसरुन श्री.मधुकर गिरी, लातुर यांची जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-७ए/४७०१ /२०१७, दि.०७-१२-२०१७ रोजीचे आदेशान्वये गैरशिस्त वर्तन करणा-या संस्थान कर्मचा-यांचे खाते चौकशी करणेकामी कंत्राटी पद्धतीने "खाते चौकशी अधिकारी" म्हणून नेमणुक करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण– १०१४/प्र.अ..५५/११-अ, मंत्रालय, मुंबई, दि.१६-०२-२०१५ नुसार, खाते चौकशी अधिकारी यांना प्रति खाते चौकशीकरीता, एक अपचारी असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी रु. १२,०००/- इतके मानधन देण्यात येईल, एका पेक्षा अधिक अपचारी असल्यास प्रत्येक अपचा-या मागे रु. १५,००/- इतके वाढीव मानधन मूळ मानधनाच्या रकमेत वाढवून देण्यात येईल. मात्र सदर मानधनाची कमाल मर्यादा रु. २४,०००/- इतकी राहिल. वरील मानधना व्यतिरिक्त चौकशीच्या कामासाठी चौकशी अधिका-याने स्वत: नियुक्त केलेल्या लिपिक/टंकलेखक यांच्या सेवेपोटी रु.२०००/- एवढी अतिरिक्त रक्कम मंजूर करण्यात येईल. प्रत्येक खातेचौकशी पुर्ण करुन अहवाल सादर केल्यानंतर उपरोक्तप्रमाणे मानधनाची रक्कम अदा करणेत येईल.

डॉ.मधुकर गिरी, लातुर, यांनी शिर्डी येथे येऊन, खातेचौकशीचे कामकाज करावे व त्यासाठी त्यांना कोणतेही इतर वेगळे भत्ते देय्य होणार नाहीत.

मानधन व इतर चार्जेस चे बदलाबाबत वेळोवेळी होणारे शासन निर्णय लागू राहतील. असे आदेशात नमुद आहे.

**(D) खातेचौकशी अधिकारी नेमणेबाबत शासन निर्णय व खातेचौकशी अधिकारी यांना द्यावयाचे मानधनाबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.**

खातेचौकशी अधिकारी यांचे मानधनाबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण– १०१४/प्र.अ..५५/११-अ, मंत्रालय, मुंबई, दि.१६-०२-२०१५ नुसार खालीलप्रमाणे शासन निर्णय झालेला आहे.

**शासन निर्णय**

१. कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या चौकशी अधिका-यांच्या प्रचलीत मानधनात बदल/वाढ करुन एक अपचारी असलेलल्या विभागीय चौकशी प्रकरणी रु. ८०००/- इतक्या मानधना ऐवजी रु. १२,०००/- इतके मानधन देण्यात यावे. सुधारीत मानधन या आदेशाच्या दिनांका पर्यंत त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी व त्या पुढील प्रकरणाबाबत अनुज्ञेय राहील.

२. एका पेक्षा अधिक अपचारी असल्यास प्रत्येक अपचा-या मागे रु. १५,००/- इतके वाढीव मानधन मूळ मानधनाच्या रकमेत (रु १२,०००) वाढवून देण्यात यावे. मात्र सदर मानधनाची कमाल मर्यादा रु. २४,०००/- इतकी राहिल.

पान नंबर ३ वर...

३. वरील मानधना व्यतिरिक्त चौकशीच्या कामासाठी चौकशी अधिका-याने स्वत: नियुक्त केलेल्या लिपिक/टंकलेखक यांच्या सेवेपोटी रु.२०००/- एवढी अतिरिक्त ठोक रक्कम मंजूर करावी.

या शासन निर्णयाप्रमाणे संस्थानमध्ये नेमणूक करण्यात येणारे खातेचौकशी अधिका-यास प्रति खातेचौकशी एक आरोपीकरीता १२,०००/- एकापेक्षा जास्त आरोपी असल्यास प्रती आरोपी १५,००/- इतकी वाढ तसेच तसेच टंकलेखन कामाकरीता अतिरीक्त २०००/- प्रमाणे रक्कम अदा करावी लागेल.

**(E)** सद्यस्थितीत ॲड.श्री.बी.वाय काळवाघे यांना दरमहा रु.५,०००/- मानधन देणेत येत होते. श्री.ॲड.बी.वाय.काळवाघे, कोपरगांव यांचे ८८ ते ८९ वयोमानानुसार त्यांचेकडे फक्त एकच चालु असलेली खाते चौकशी श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर, सहा.शिक्षीका,श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांचे बचाव प्रतिनिधी श्री.म.दी.धनेश्वर यांनी उलट तपासणीत संस्थानचे वतीने नेमलेल्या एकाच साक्षीदारांस आतापर्यंत ५७ तारखा देवुन, त्यांनी व्यवस्थापनाचे वतीने नेमण्यात आलेले साक्षीदार श्री.विकास महादेव शिवगजे यांना उलट तपासणीमध्ये २८१ प्रश्न आतापर्यंत विचारलेले असुन देखील त्यांची उलट तपासणी पुर्ण झालेली नाही. तसेच रुग्णालये विभागाकडील श्री.साहेबराव लंके, वित्त व्यवस्थापक यांची खातेचौकशी श्री.काळवाघे यांनी पूर्ण केली असून त्याचा निष्कर्ष अहवाल येणे बाकी आहे.

श्री.ए.एम.देशमुख, खातेचौकशी अधिकारी यांना व डॉ.मधुकर गिरी, खातेचौकशी अधिकारी यांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण– १०१४/प्र.अ..५५/११-अ, मंत्रालय, मुंबई, दि.१६-०२-२०१५ नुसार प्रति खाते चौकशीकरीता, एक अपचारी असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी रु. १२,०००/- इतके मानधन व खाते चौकशी अधिकारी यांना प्रति खाते चौकशीकरीता, एक अपचारी असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी रु. १२,०००/- इतके मानधन देण्यात येईल, एका पेक्षा अधिक अपचारी असल्यास प्रत्येक अपचा-या मागे रु. १५,००/- इतके वाढीव मानधन मूळ मानधनाच्या रकमेत वाढवून देण्यात येईल. मात्र सदर मानधनाची कमाल मर्यादा रु. २४,०००/- इतकी राहिल. वरील मानधना व्यतिरिक्त चौकशीच्या कामासाठी चौकशी अधिका-याने स्वत: नियुक्त केलेल्या लिपिक/टंकलेखक यांच्या सेवेपोटी रु.२०००/- एवढी अतिरिक्त रक्कम मंजूर करण्यात येईल. प्रत्येक खातेचौकशी पुर्ण करुन अहवाल सादर केल्यानंतर उपरोक्तप्रमाणे मानधनाची रक्कम अदा करणेत येईल, या अटी शर्तीवर मानधन देणेत येत आहे.

ॲड.बी.वाय.काळवाघे,खातेचाकशी अधिकारी, कोपरगांव यांचे वयोमान ८८ वर्षे असल्याने व त्यांनी दि.२४.११.२०२० रोजीचे राजीनामा पत्र दिलेले असुन, जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१६३५/२०२० दि.०४.१२.२०२० अन्वये राजीनामा मंजुर करणेत आलेला आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे पॅनलवरील श्री.पा.म.ताकटे, नाशिक यांचेकडे जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१७२६/२०२० दि.१५.१२.२०२० रोजीचे आदेशान्वये श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर, सहा.शिक्षीका, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी रोजीचे आदेशान्वये खातेचौकशी फाईल्ससह त्यांचेकडे खातेचौकशी करणेकामी पोष्टाने रजिष्टर ए.डी.पाठविणेत आलेल्या आहेत.

श्री.ए.एम.देशमुख,नाशिक यांना तीन अपचारी यांची खातेचौकशी करणेकरीता नेमण्यात आलेले आहे. परंतु त्यांचे वयोमान जास्त असल्याने व आतापर्यत ५ ते ६ महिने झाले परंतु ते अद्यापपर्यंत शिर्डी येथे आलेले नसुन, त्यांनी आजारी असल्याबाबत लेखी कळविलेले आहे.श्री.देशमुख यांचे सध्याचे वय ७३ वर्षे आहे. श्री.देशमुख यांचेकडे देण्यात आलेल्या तीन खाते चौकश्या पुर्ण करुन अहवाल दि.३०.११.२०२० रोजी रजिष्टर पोष्ट ए.डीद्वारा सामान्य प्रशासन शाखा, आवक विभागास सादर केलेले आहे.

श्री.मधुकर गिरी, लातुर यांना एक अपचारी खातेचौकशी करणेकरीता नेमणेत आलेले आहे. श्री.गिरी हे लातुर येथे राहत असून ते शिर्डीपासुन लांब राहत असल्याने त्यांनाही अप-डाऊन करणे शक्य होत नाही. त्यांचेकडे रुग्णालयाकडील डॉ.योगेश बाळकृष्ण गेटे, इ एन टी सर्जन, श्री साईनाथ रुग्णालय खातेचौकशी ते करत आहे.श्री.गिरी यांचे सध्याचे वय ७१ वर्षे आहे.

**(F)** आता, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.चौप्रनि-१११९/प्र.क्र.५८/११-अ, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० मधील मुद्दा क्र .०२ नुसार दिनांक २६/०५/२००६ च्या शासन निर्णयामध्ये सेवानिवृत्त अधिका-यांना चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यासाठीच्या अटी व शर्ती नमुद केल्या आहेत, त्यातीलच एक अट अशी आहे की, चौकशी अधिका-याचे त्या वर्षाच्या दिनांक १ जुलै रोजी ७० वर्षापेक्षा जास्त नसावे. त्याअनुषंगाने शासनाच्या अ व ब आणि क व ड मधील शासकीय कर्मचारी / अधिकारी यांचेविरुध्द चौकशी करणा-या ज्या सेवानिवृत्त कंत्राटी चौकशी अधिका-यांची दि.०१ जुलै, २०२० रोजी वय वर्षे ७० पूर्ण झाली आहेत अथवा ज्या कंत्राटी चौकशी अधिका-यांचे वय नजीकच्या काळात ७० वर्षे पूर्ण होणार आहेत त्यांचा कंत्राटी चौकशी अधिकारी म्हणून कार्यकाल संपुष्टात आला आहे, असे नमुद आहे.

पान नंबर ४ वर...

(G) ॲड.बी.वाय.काळवाघे, खातेचौकशी अधिकारी,कोपरगांव यांचे वयोमान सध्या ८८ ते ८९ वर्षे आहे.

तसेच श्री.ए.एम.देशमुख यांचे सध्याचे वय ७३ असून, डॉ.मधुकर गिरी यांचे सध्याचे वय ७१ वर्षे आहे. त्यामुळे शासनाच्या दि.१४/१०/२०२० रोजीचे पत्रानुसार सध्या कार्यरत असलेले खातेचौकशी अधिकारी ॲड.बी.वाय.काळवाघे, श्री.ए.एम.देशमुख व डॉ.मधुकर गिरी यांना खाते चौकशी अधिकारी म्हणून कार्यकाल संपुष्टात आणून गैरशिस्त वर्तन करणारे कर्मचा-यांचे खातेचौकशी करीता नवीन खाते चौकशी अधिका-याची नेमणूक करणेसाठी अहमदनगर जिल्ह्यातील वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देऊन नवीन खाते चौकशी अधिका-याची नेमणूक करावी लागेल, असे मत आहे.

या कामी खालील दोन पर्याय उपलब्ध आहेत.

१) खातेचौकशी अधिकारी नेमणुकीबाबत शासन निर्णयास अधिन राहून व त्यातील अटी-शर्तीनुसार वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन खाते चौकशीचे कामकाजास इच्छुकांचे अर्ज मागविणेत येतील.

किंवा

२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पत्र पाठवुन खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करणेस पात्र असणा-या सेवा निवृत्त शासकिय अधिका-यांची नावे मागवून त्यापैकि उचित ती कार्यवाही करता येईल याबाबत दि.२४.१०.२०२० रोजीची टिपणी सादर करणेत आलेली होती.

दि.२४.१०.२०२० रोजीचे टिपणीवर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, "शासन नियुक्त पॅनलवरील सूचीतील अधिकारी यांना विचारणा करण्यात यावा." असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुबई यांचेकडील पत्र क्र.चौप्रनि-१११९/प्र.क्र.५८/११-अ, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजीचे पत्र व त्यासोबत जोडलेली यादीतील एकुण ०१ ते ६० महाराष्ट्र शासन सेवा निवृत्त कर्मचारी/अधिकारी यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२२६८/२०२० दि.२१.११.२०२० रोजीचे पत्र पाठवुन, विभागीय चौकशीकामी इच्छुकांचे अर्ज दि.१५.१२.२०२० अखेर पर्यंत मागविणेत आले. त्याप्रमाणे विहीत वेळेत प्राप्त झालेल्या अर्जानुसार प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करुन, समितीचे निर्णयानुसार पुढील कार्यवाही करता येईल.

(H) कंत्राटी तत्वावर नविन **खातेचौकशी अधिकारी या पदासाठी विहीत मुदतीमध्ये दि. १५.१२.२०२० पर्यंत प्राप्त झालेल्या अर्जांबाबत माहिती.**

| अ. नं. | आवक नंबर/ दिनांक | अर्जदाराचे नाव व पत्ता | शेरा |
|---|---|---|---|
| १. | ७८०१/ ०२.१२.२०२० | श्री.ज्ञानेश्वर अर्जुन मेहेरे,स्वयंदिप, 60, गुडलक सोसायटी,गाडगे नगर, रॉय इंग्लीश स्कुलजवळ, हिंगणा रोड, नागपूर 440036.भ्रमणध्वनी क्र.9134920141 9271357051 | प्रत्यक्ष शिर्डीला येऊन कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| २. | ७८८९/ ०५.१२.२०२० | श्री.हरी पुंजाजी जाधव म्हाडा कॉलनी, बळीराम शाळे समोर, एन-7,घ.क्र.आर28/53, सिडको,औरंगाबाद. भ्र.क्र.9423148944/दू.क्र.0240-2480944 | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| ३. | ८०१०/ ०५.१२.२०२० | श्री. डि.बी.जिद्देवार 179 नेल्को सोसायटी, सुभाषनगर, जयताळा रोड, नागपूर-440 022. | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास **नागपूर** येथे करणेस इच्छुक आहे. |
| ४. | ८१५१/ ०७.१२.२०२० | श्री.मंगल एस. करुणाकर 22, तथास्तू, दुर्गा नगर, मानेवाडा रोड, पोस्ट ऑफीसच्या मागे, नागपूर 440024. भ्रमणध्वनी क्र. 9422966517 | शासनाचे मानधना व्यतिरिक्त प्रवास खर्च व राहणेची व्यवस्था संस्थान मार्फत होत असल्यास संमती आहे. |
| ५. | ८१५०/ ०७.१२.२०२० | श्री. हरिभाऊ रावजी लोणारे 73, नाशिक नगर, मेढा रोड, भंडारा भ्र.क्र.94236441248. | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |

पान नंबर ५ वर...

| अ. नं. | आवक नंबर/ दिनांक | अर्जदाराचे नाव व पत्ता | शेरा |
|---|---|---|---|
| ६. | ८२२२/ ०८.१२.२०२० | श्री.सुभाष हरी दुसाने<br>प्लॉट नं. 142,शिवप्रताप कॉलनी,उन्नती नगर,देवपूर, धुळे<br>भ्र.क्र.9422296465 | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| ७. | ८२२३/ ०९.१२.२०२० | श्री.मारोती रामचंद्र वाघधरे<br>प्लॉट नं 209, सावरबांधे<br>ले-आऊट, शारदामाता मंदिराजवळ, हुडकेश्वर रोड,नागपूर 440034.<br>भ्रमणध्वनी क्र.9850753084 | जाणे-येणेकरीता खाजगी वाहनाकरीता लागणारे पेट्रोलचा खर्च दिल्यास मी मानधन घेवुन खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |
| ८. | ८२२४/ ०८.१२.२०२० | श्री.पा.म. ताकटे<br>11-बी, नंदराय को-ऑप हौसिंग सोसायटी, गंधर्व नगरी,<br>मोटवानी रोड, नाशिक रोड<br>422201.भ्रमणध्वनी क्र.8390918899 | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| ९. | ८२२५/ ०८.१२.२०२० | श्री.भालचंद्र गजाननराव पंडित<br>A-18, मानवसेवा नगर, सेमिनरी हिल्स,नागपूर 440006.<br>भ्र.क्र.9766638087. | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| १०. | ८२२६/ ०८.१२.२०२० | श्री.संजय भगवंत धर्माधिकारी<br>एफ-21, एन-4, सिडको,<br>औरंगाबाद 431 003<br>भ्रमणध्वनी 9420812322 | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| ११. | ८२२८/ ०७.१२.२०२० | श्री.बबन महादेव मोरे<br>ग्रुप नं.2 चाळ, नं.275,रु.नं.357,<br>टागोरनगर, विक्रोळी (पूर्व) मंबु ई-400 083.<br>भ्र.क्र.9223252952 | जाणे-येणे करीता संस्थान वाहनाची व्यवस्था केली व संस्थानमार्फत, राहण्याची, जेवणाची व्यवस्था केल्यास इच्छुक आहे. |
| १२. | ८२२७/ ०८.१२.२०२० | श्री.दलजितसिंह गुरुचरणसिंह खालसा,<br>101, साईश्रध्दा अपार्टमेंट, डोसाहट<br>हॉटेलच्या समोर, रिंग रोड,गोंदिया-441 614.<br>भ्र.क्र. 7720817112 | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| १३. | ८२८४/ १०.१२.२०२० | श्री. कारभारी पुंडलीक जाधव<br>मो.क्र.942228473/7972778264<br>श्रीकृष्ण छाया, प्लॉट नं.18, अपूर्वा कॉलनी,<br>शिवराम नगर, नारायण बापू<br>चौक जेल रोड, नाशिक रोड,नाशिक | संगणक व लिपीक, संस्थानचे विश्राम गृहात राहण्याची व्यवस्था केल्यास चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |
| १४. | ८२८३/ १०.१२.२०२० | श्री.सुधाकर रा.चव्हाण<br>सी-36, सुयोग आदित्य रेसिडेन्सी,बिबनेवाडी, पुणे-37 020-24216164 | शासनाचे मानधना व्यतिरिक्त प्रवास खर्च मिळाल्यास संमती आहे. |
| १५. | ८३१४/ ११.१२.२०२० | श्री.सुरेश शिवाजी कस्तुरे<br>फ्लॅट 403, अे विंग, म्हाडा एम.आय.जी. इमारत क्र.2,गंगासागर सहकारी गृहनिर्माण संस्था, सूर्या शॉपिंग सेंटर समोर, मिरा रोड (पूर्व),जि.ठाणे 401107.भ्रमणध्वनी 9969388639 | शासनाचे मानधना व्यतिरिक्त प्रवास खर्च मिळाल्यास स्विकृती दिलेली आहे. |

पान नंबर ६ वर...

| अ. नं. | आवक नंबर/ दिनांक | अर्जदाराचे नाव व पत्ता | शेरा |
|---|---|---|---|
| १६. | ८४८६/ १२.१२.२०२० | श्री. जे.आर.बंकापुरे<br>16, प्रज्ञाधाम सोसायटी, पाईप लाईन रोड,लुईसवाडी, ठाणे (प) 400 604.<br>भ्र.क्र..9819479226 | शासनाचे मानधना व्यतिरिक्त प्रवास खर्च व राहणेची व्यवस्था संस्थान मार्फत होत असल्यास संमती आहे. |
| १७. | ८४८७/ १४.१२.२०२० | श्री. भि. क. उसारे<br>बी-101, देवगिरी व्हॉली, मिटमिटा,औरंगाबाद<br>भ्र.क्र.7588530594/9892810630 | कंत्राटी तत्वावर चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |
| १८. | ८४८५/ १४.१२.२०२० | श्री.वसंत नारायण पाटील<br>बंगला क्र.1, निसर्ग कॉलनी,देवस्व सोसायटीच्या मागे,विदयानगर, वरसोली, अलीबाग, रायगड 402201<br>भ्रमणध्वनी 9922000051,9823508740 | कंत्राटी तत्वावर चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |
| १९. | ८६२१/ १४.१२.२०२० | श्री. कन्हैया रतनलाल बजाज<br>53, पावभूमी सोमलवाडा,नागपूर-440025.<br>भ्र. क्र.9423119837 | नागपूर ते शिर्डी प्रवास करणे शक्य नसल्याने नकार कळविलेला आहे. |
| २०. | ८६२०/ १५.१२.२०२० | श्री.अशोक विठ्ठल शिंदे<br>अक्षय विला, बी विंग, फ्लॅट नं. 7, दुसरा मजला, आनंद नगर,सिंहगड रोड, मकरंद पार्क,वडगांव बुद्रुक, पुणे-51.<br>भ्रमणध्वनी 9623576724,9284397997 | कंत्राटी तत्वावर चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |

(II) कंत्राटी तत्वावर नविन खातेचौकशी अधिकारी या पदासाठी १ ते ६० शासन निवृत्त अधिकारी यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२२६८/२०२० दि.२१.११.२०२० रोजीचे पत्र पोष्टाने रजिष्टर ए.डी.ने पाठविले असता, पत्र स्विकारले नसल्याने इकडील कार्यालयास पाकिट परत आलेले बाबतची माहिती खालीलप्रमाणे.

| अ. नं. | आवक नंबर/ दिनांक | अर्जदाराचे नाव व पत्ता |
|---|---|---|
| १. | ७८१५/ ०३.१२.२०२० | श्री.जगन्नाथ एकनाथ पवार,<br>1345,स्नेहसदन,त्रिमुर्ती कॉलनी, सिरम इस्टिटयूट जवळ,हडपसर,<br>पुणे-411 028 भ्र.क्र.7588593279/8975707000 |
| २. | ७८१६/ ०३.१२.२०२० | श्री. विलास किसन आल्हाट<br>महात्मा फुले नगर, गस्यांडिंग सेटर समोर,हडपसर, पुणे-411 028. |
| ३. | ७८७७/ ०३.१२.२०२० | श्री. दू.र.चंद्रिकापूरे, सी-11, 702, मानसरोवर, लोकधारा,<br>कल्याण (पूर्व) जि.ठाणे 421 306. |
| ४. | ८२४२ ०९.१२.२०२० | श्री. सदाशिव संभाजी बेनके, 302, गायत्री सदन स.गृ.वन.सं.कात्रप,<br>बदलापूर (पूर्व) ता.अंबरनाथ, जि.ठाणे-421 503.भ्र. क्र.9967838299 |

**विभागाचा अभिप्राय व प्रस्ताव :-**

कंत्राटी पध्दतीने खाते चौकशी अधिकारी नेमणूकीबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे पत्रातील व ज्यांचे वय हे ७० वर्षापेक्षा कमी असलेले सेवा निवृत्त कर्मचारी / अधिकारी एकुण १ ते ६० यांना इच्छुक आहे किंवा नाही याबाबत पत्र पाठविलेले आहे. त्याबाबत इच्छुक असलेले सेवा निवृत्त कर्मचारी/ अधिकारी यांचे एकुण २० अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे. ०४ सेवा निवृत्त कर्मचारी यांना पाठविणेत आलेले पत्र न स्विकारल्याने इकडील कार्यालयास परत आलेले आहे.

पान नंबर ७ वर...

**(अ) तक्ता**

उपरोक्त प्राप्त अ.नं. १ ते २० पैकी एकुण अकरा सेवा निवृत्त अधिकारी/ कर्मचारी अ.नं. १,२,५, ६,८,९,१०,१२,१७,१८,२० यांनी कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहेत असे लेखी अर्जाद्वारे कळविलेले आहे.

| अ. नं. | अर्जदाराचे नाव | शेरा |
|---|---|---|
| १. | श्री.ज्ञानेश्वर अर्जुन मेहेरे | प्रत्यक्ष शिर्डीला येऊन कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| २. | श्री.हरी पुंजाजी जाधव | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| ५. | श्री. हरिभाऊ रावजी लोणारे | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| ६. | श्री.सुभाष हरी दुसाने | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| ८. | श्री.पा.म. ताकटे | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| ९. | श्री.भालचंद्र गजाननराव पंडित | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| १०. | श्री.संजय भगवंत धर्माधिकारी | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| १२. | श्री.दलजितसिंह गुरुचरणसिंह खालसा, | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| १७. | श्री. भि. क. उसारे | कंत्राटी तत्वावर चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |
| १८. | श्री.वसंत नारायण पाटील | कंत्राटी तत्वावर चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |
| २०. | श्री.अशोक विठ्ठल शिंदे | कंत्राटी तत्वावर चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |

**(ब) तक्ता**

उपरोक्त अ.नं.१ ते २० पैकी अ.नं. ३,४,७,११,१३,१४,१५,१६,१९ अनुक्रमे प्रत्यकाने वेगवेगळी मागणी केलेली असुन, त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | अर्जदाराचे नाव | शेरा |
|---|---|---|
| ३. | श्री. डि.बी.जिद्देवार | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास **नागपूर** येथे करणेस इच्छुक आहे. |
| ४. | श्री.मंगल एस. करुणाकर | शासनाचे मानधना व्यतिरिक्त प्रवास खर्च व राहणेची व्यवस्था संस्थान मार्फत होत असल्यास संमती आहे. |
| ७. | श्री.मारोती रामचंद्र वाघधरे | जाणे-येणेकरीता खाजगी वाहनाकरीता लागणारे पेट्रोलचा खर्च दिल्यास मी मानधन घेवुन खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |
| ११. | श्री.बंबन महादेव मोरे | जाणे-येणे करीता संस्थान वाहनाची व्यवस्था केली व संस्थानमार्फत, राहण्याची, जेवणाची व्यवस्था केल्यास इच्छुक आहे. |
| १३. | श्री. कारभारी पुंडलीक जाधव | संगणक व लिपीक, संस्थानचे विश्राम गृहात राहण्याची व्यवस्था केल्यास चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |
| १४. | श्री.सुधाकर रा.चव्हाण | शासनाचे मानधना व्यतिरिक्त प्रवास खर्च मिळाल्यास संमती आहे. |
| १५. | श्री.सुरेश शिवाजी कस्तुरे | शासनाचे मानधना व्यतिरिक्त प्रवास खर्च मिळाल्यास स्विकृती दिलेली आहे. |
| १६. | श्री. जे.आर.बंकापुरे | शासनाचे मानधना व्यतिरिक्त प्रवास खर्च व राहणेची व्यवस्था संस्थान मार्फत होत असल्यास संमती आहे. |
| १९. | श्री. कन्हैया रतनलाल बजाज | नागपूर ते शिर्डी प्रवास करणे शक्य नसल्याने नकार कळविलेला आहे. |

पान नंबर ८ वर...

## प्रस्ताव :-

१) महाराष्ट्र शासन मान्य पॅनलवरील सेवानिवृत्त अधिका-यांपैकी कंत्राटी चौकशी अधिकारी म्हणून काम करण्यासाठी इच्छुक असलेल्या २० अर्जदारांपैकी उपरोक्त प्रस्तावातील तक्ता (अ) मध्ये नमुद ११ उमेदवारांचा कंत्राटी चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणेस मान्यता मिळावी.

२) एका केससाठी फक्त ३ वेळा जाणे येणे व मोफत निवास व्यवस्था करणेस मान्यता असावी. जर केसेस जास्त असतील तर एकत्रितपणे फक्त तीन वेळा वाहन व निवास व्यवस्था करणेस, तदनंतर मात्र अशी व्यवस्था खंडीत करणेस मान्यता असावी. सुनावणी कालावधी जास्तीत जास्त ३ महिनेच अंतिम निर्णयासह मर्यादीत ठेवणेस मान्यता असावी.

महाराष्ट्र शासनाचे पॅनलवरील सेवानिवृत्त ६० अधिकारी/कर्मचारी यांना कंत्राटी पध्दतीने खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक असलेबाबत पत्र पाठविणेत येऊन, ६० पैकी २० इच्छुक असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांनी संस्थानला पत्र पाठविलेले आहेत.

३) सदर कंत्राटी चौकशी अधिकारी यांना शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण– १०१४/प्र.अ..५५/११-अ, मंत्रालय, मुंबई, दि.१६-०२-२०१५ मधील तरतूदीनुसार मानधन अदा करण्यास व शासन त्यांचे पॅनलवरील चौकशी अधिकारी यांचे मानधनात वाढ करेल त्यानुसार ती लागु करण्यास मान्यता मिळावी.

यास्तव, कंत्राटी पध्दतीने मानधनावर खातेचौकशी अधिकारी नेमणूकीबाबत उपरोक्त प्रस्तावात नमूद मुद्दा क्रं.१ , २ व ३ नुसार मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव मा. तदर्थ समितीसमोर चक्रीय पध्दतीने सादर करणेस मान्यता असावी.

तरी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचेसमोर दि.१०.०५.२०२१ रोजी चक्रीय पध्दतीने निर्णयास्तव सादर करणेत आलेला होता.

१) उपरोक्त विषयांकित चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील मुद्यांचे अवलोकन व्हावे. चक्रिय पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावावर मा.श्री. श्रीकांत आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी दि.१०.०५.२०२१ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

विषय पाहिला. दि.३०.११.२०१६ चे व्यवस्थापन समितीच्या निर्णयानंतर त्या अनुषंगाने व्यवस्थापन समितीसमक्ष काही प्रस्ताव आणला होता का ? त्यावर काय निर्णय झाला ? याबाबत स्पष्टता नाही.

तसेच चौकशी अधिकारी कशा पध्दतीने नेमावेत, याबाबत तदर्थ समिती समक्ष कुठलाही विषय आणल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तावामध्ये श्री. साहेबराव लंके, वित्त व्यवस्थापन यांची श्री.काळवाघे यांनी चौकशी पुर्ण केली असून निष्कर्ष बाकी आहे असे नमुद आहे. मात्र सदर विषय निम्न स्वाक्षरीकार यांच्याकडे आणून ठेवल्यानंतर श्री. काळवाघे यांना त्यांचा निर्णय पाठविला किंवा नाही याबाबत स्पष्टता नाही.

त्याचप्रमाणे श्री.पा.म.ताकटे, नाशिक यांच्याकडे श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर, सहा.शिक्षिका, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांचे विरुध्दची खातेचौकशी रजिस्टर्ड पोष्टाने दि.१५.१२.२०२० रोजीच्या आदेशान्वये पाठविण्यात आल्याचे नमुद केलेले आहे.त्या अनुषंगाने व्यवस्थापन समिती किंवा तदर्थ समिती यांचा निर्णय झाल्याचे नमुद केलेले नाही. निर्णय झालेला असल्यास त्याची प्रत तदर्थ समितीसमक्ष हजर करावा.

वरील बाबी स्पष्ट करुन सदर विषय तदर्थ समिती समक्ष ठेवण्यात यावा.असे नमुद आहे.

२) उपरोक्त विषयांकित चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील मुद्यांचे अवलोकन व्हावे. चक्रिय पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावावर श्री.भानुदास पालवे, अपर आयुक्त (महसुल), नाशिक तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी दि.१७.०५.२०२१ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

मा.अध्यक्ष, तदर्थ समिती तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर यांनी दि.१०.०५.२०२१ रोजीचे त्रृटीची पुर्तता करुन सदर विषय पुन्हा तदर्थ समिती समोर ठेवण्यात यावा.

३) उपरोक्त विषयांकित चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील मुद्यांचे अवलोकन व्हावे. चक्रिय पध्दतीने सादर केलेल्या विषयावर श्रीमती गिता बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर तथा सदस्या, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी दि.११.०५.२०२१ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

पान नंबर ९ वर...

९

सदरच्या विषयाचे अवलोकन केले असता सन २०१६ पासून सबंधीत व्यवस्थापन समिती समोर याबाबत प्रस्ताव आणला होता किंवा कसे तसेच त्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला किंवा नाही या बाबी स्पष्ट होत नाही. चौकशी अधिकारी नेमण्याच्या पध्दतीबाबत तदर्थ समिती समोर कोणताही विषय मांडण्यात आलेला नाही. या प्रस्तावामध्ये श्री.काळवाघे यांनी विषयामध्ये साहेबराव लंके, वित्त व्यवस्थापक यांची खातेचौकशी पुर्ण केली असून, निष्कर्ष अहवाल येणे बाकी आहे, असे नमुद केले आहे. त्यामुळे याबाबत त्यांनी त्यांचा निर्णय पाठविला आहे किंवा कसे हे अवगत होत नाही.

त्याचप्रमाणे पा.म.ताकटे यांच्याकडे श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर, सहा.शिक्षिका, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी विरुध्द नमुद असणारी खातेचौकशी रजिस्टर पोष्टाने पाठविलेबाबत नमुद केले आहे. परंतु त्या खाते चौकशीस अनुसरुन व्यवस्थापन समिती किंवा तदर्थ समिती यांचे निर्णय नमूद नाही. त्यामुळे वरिल नमुद बाबींची स्पष्टता आणून विषय पुन्हा तदर्थ समितीसमोर मांडण्यात यावा.

मा.श्री. श्रीकांत आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्रीमती गिता बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर तथा सदस्या, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री.भानुदास पालवे, अपर आयुक्त (महसुल), नाशिक तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी उपरोक्त प्रस्तावाबाबत नमुद केलेल्या बाबींची माहिती जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/४९६/२०२१ दि.१२.०५.२०२१ रोजीचे पत्र इ-मेल व हार्ड कॉपी आपणांस अवगत करणेकरीता पाठविणेत आलेले आहे.

सदरचे पत्रात," कायम कर्मचा-यांचे खातेचौकशीचे कामकाजाकरीता कंत्राटी पध्दतीने खाते चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक असलेले महाराष्ट्र शासनाचे पॅनलवरील सेवा निवृत्त कर्मचारी/अधिकारी यांचे प्राप्त अर्जाबाबत चक्रीय पध्दतीने प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्याबाबत चक्रीय पध्दतीने आणलेल्या प्रस्तावाबाबत दि.१०.०५.२०२१ रोजीचा निर्णय सादर केलेला आहे.

सदरचे प्रस्तावाबाबत खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

**मुद्दा क्रं. १)** निर्णय पाहिला. दि.३०.११.२०१६ चे व्यवस्थापन समितीच्या निर्णयानंतर त्या अनुषंगाने व्यवस्थापन समितीसमक्ष काही प्रस्ताव आणला होता का ? त्यावर काय निर्णय झाला ? याबाबत स्पष्टता नाही.

- उपरोक्त सादर करणेत आलेल्या प्रस्तावाबाबत त्यातील (B) मध्ये सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. अवलोकन होणेस विनंती आहे.

**मुद्दा क्रं. २)** तसेच चौकशी अधिकारी कशा पध्दतीने नेमावेत, याबाबत तदर्थ समिती समक्ष कुठलाही विषय आणल्याचे दिसून येत नाही.

- अ) श्री.ए.एम. देशमुख, नाशिक यांनी ई-मेल इकडील कार्यालयास पाठविलेला असून ते सन २००७ पासून महाराष्ट्र शासनाचे पॅनलवर असून खातेचौकशीचे कामकाज करत असल्याचे कळविलेले होते.

त्यांचे अर्जावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३९२ नुसार त्यांना चौकशी अधिकारी म्हणून नेमलेले होते.

ब) डॉ.मधुकर गिरी, लातुर यांनी दि.२७.०६.२०१७ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास पाठविलेले आहे. त्यावर मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४.११.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९८३ अन्वये त्यांना चौकशी अधिकारी म्हणून नेमलेले आहे.

क) उपरोक्त प्रस्तावातील (D) मध्ये महाराष्ट्र शासन निर्णयानुसार खाते चौकशी मानधन अदा करण्यात येते.

**मुद्दा क्रं. ३)** प्रस्तावामध्ये श्री.साहेबराव लंके, वित्त व्यवस्थापक यांची श्री.काळवाघे यांनी चौकशी पूर्ण केली असून निष्कर्ष बाकी आहेत असे नमुद आहे. मात्र सदर विषय निम्न स्वाक्षरीकार यांच्याकडे आणून ठेवल्यानंतर सदर श्री.काळवाघे यांनी त्यांचा निर्णय पाठविला किंवा नाही याबाबत स्पष्टता नाही.

-श्री.काळवाघे यांचे वयोमान ८८ असल्याने, ऐकु येण्यास व दृष्टी कमकुत झाल्याने त्यांनी दि.२४.११.२०२० रोजीचे राजीनामा पत्र दिलेले आहे.त्यांचा राजीनामा मंजुर केलेला आहे. इकडील जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१६३५/२०२० दि.०४.१२.२०२० रोजीचे पत्रान्वये श्री.लंके यांच्या खातेचौकशी फाईल्स, एच.आर.मॅनेजर, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचेकडे पाठविणेत आलेल्या आहे. श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी श्री.पा.म.ताकटे, नाशिक हे महाराष्ट्र शासनाचे पॅनलवर असल्याने, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेवुन, त्यांचेकडुन श्री.लंके यांचा निष्कर्ष अहवाल तयार करुन घेतलेला आहे.

पान नंबर १० वर...

**मुद्दा क्रं. ४)** त्याचप्रमाणे श्री.पा.म.ताकटे, नाशिक यांच्याकडे श्रीमती जहॉआरा शहबुद्दीन मिरजकर , सहाय्यक शिक्षिका, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांचे विरुध्दची खाते चौकशी रजिष्टर्ड पोष्टाने दि.१५.१२.२०२० रोजीचे आदेशान्वये पाठविण्यात आल्याचे नमुद केलेले आहे. त्या अनुषंगाने व्यवस्थापन समिती किंवा तदर्थ समिती यांचा निर्णय झाल्याचे नमूद केलेल नाही. निर्णय झालेला असल्यास त्याची प्रत तदर्थ समितीसमक्ष हजर करावी.

- श्री.काळवाघे यांचे वयोमान ८८ असल्याने व श्रीमती मिरजकर यांची खातेचौकशी दि.१४.०६.२०१८ पासुन सुरु असुन त्यांचेकडून अद्यापपर्यत पुर्ण झालेली नव्हती. तसेच श्री.काळवाघे यांनी दि.२४.११.२०२० रोजी राजीनाम पत्र दिलेले असल्याने खातेचौकशी पुर्ण होणेचे दृष्टीने महाराष्ट शासनाचे पॅनलवरील श्री.पा.म.ताकटे, नाशिक यांना लवकरात लवकर खातेचौकशी पुर्ण करुन अहवाल प्रशासनास सादर करणेकरीता कळंविणेत आलेले होते.

आपले लक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा विनियम २०१३ खालील कलम ७ (१) (क) चे तरतुदीकडे वेधण्यात येत आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा विनियम, प्रकरण ३, दंडात्मक कारवाई आणि शिस्तभंग प्राधिकारी (७) कार्यवाही चालु करण्याचा अधिकार :- (१) (क) विनिमय ८ मधील उपविनिमय (२) खाली शिस्तभंग प्राधीका-यानी नियुक्त केलेल्या चौकशी प्राधिका-याची कोणतीही प्रलंबीत चौकशी दुस-या चौकशी प्राधिका-याकडे हस्तांतरीत करु शकते / शकतात, जर अशी चौकशी वेळेत समाप्त करण्याची गरज आहे यासंबधी तिची / त्यांची खात्री पटली. असे नमुद आहे.

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.चौप्रनि-१११९/प्र.क्र.५८/११-अ, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० मधील मुद्दा क्र .०२ नुसार दिनांक २६/०५/२००६ च्या शासन निर्णयामध्ये सेवानिवृत्त अधिका-यांना चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यासाठीच्या अटी व शर्ती नमुद केल्या आहेत, त्यातीलच एक अट अशी आहे की, चौकशी अधिका-याचे त्या वर्षाच्या दिनांक १ जुलै रोजी ७० वर्षापेक्षा जास्त नसावे.

श्री.ए.एम.देशमुख यांचे वयोमान ७३ वर्षे व श्री.गिरी यांचे वय ७१ असल्याने त्यांचा खातेचौकशी अधिकारी म्हणून कार्यकाल महाराष्ट्र शासनाचे दि.१४.१०.२०२० रोजीचे पत्रान्वये संपुष्टात आला आहे.

खातेचौकशी साधारणपणे ३ (तीन) महिन्यात पुर्ण करणेबाबत शासनाचे निर्देश आहेत. श्री.काळवाघे यांचेकडील खातेचौकशी हे तीन वर्षापासून प्रलंबीत होती. त्यांचे वय ८८ वर्षे होते व त्यानी प्रकृती अस्वास्थ्यामुळे राजीनामा दिलेला आहे. या बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाचे पॅनलवरील चौकशी अधिकारी यांचेकडून शासन निर्णयात नमूद अटी व शर्तीनुसारच श्री.ताकटे यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. " असे नमुद आहे.

जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/४९६/२०२१ दि.१२.०५.२०२१ रोजीचे पत्र इ-मेल व हार्ड कॉपी द्वारे अध्यक्ष महोदय व समिती सदस्य यांना कायम कर्मचा-यांचे खातेचौकशीचे कामकाजाकरीता कंत्राटी पध्दतीने खाते चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक असलेले महाराष्ट्र शासनाचे पॅनलवरील सेवा निवृत्त कर्मचारी/अधिकारी यांचे प्राप्त अर्जाबाबत उपरोक्त नमुद बाबी अवगत करणेकरीता पाठविणेत आलेला आहे.

कायम कर्मचा-यांचे खातेचौकशीचे कामकाजाकरीता कंत्राटी पध्दतीने खाते चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक असलेले महाराष्ट्र शासनाचे पॅनलवरील सेवा निवृत्त कर्मचारी/अधिकारी यांचे प्राप्त अर्जाबाबत कंत्राटी पध्दतीने चौकशी नेमणूकीबाबतचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचेसमोर निर्णयास्तव सविनय सादर.

16/6/21

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी**

15/6 15/6 15/6

ER 175

विषय क्र.- ९५



# मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर

सामान्य प्रशासन विभाग (आस्थापना),

**विषय – कोव्हीड-१९ मूळे ज्या विभागांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेल्या आहेत अशा विभागातील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेले आहेत. अशा तात्पुरत्या स्वरुपात सेवा खंडीत करणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे, एप्रिल, २०२१, मे, २०२१ व जून, २०२१ या कालावधीतील मानधन मानवतेच्या दृष्टीकोनातून अदा करणेबाबत.. .. ..**

टिपणी-

**विषयाची पूर्वपीठीका -**

(अ-१) मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीचे शासन निर्णयानुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास, म्हणजेच एकूण ४८२६ पदांना (स्थायी २९०८ पदे + अस्थायी १९१८ पदे) खालील अटी-शर्तीस अधिन राहुन मान्यता दिलेलीआहे. या अटी-शर्तींचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे –

*(१) समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील*

*(०२) सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.*

*(०३) सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.*

*(०४) सेवा प्रवेश नियमांमध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख असावा.*

*(०५) आकृतीबंधातील मंजुर पदांवर काम करणा-या कर्मचा-यांना शासनाप्रमाणे निवृत्तीवेतन लागू असणार नाही.*

*(०६) समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही.*

*(०७) समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.*

*(०८) समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.*

*(०९) आस्थापनेवरील खर्च सिमीत करण्यासाठी राज्य शासनाच्या अधिका-यांची आकृतीबंधामध्ये निश्चित पदांवर प्रतीनियुक्तीने नियुक्ती करण्याची तरतूद ठेवावी.*

*(१०) तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.*

*(११) आकृतीबंधातील पदांवर नविन कर्मचा-यांची नियमित पदावर नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचा-यांचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असावा व त्याचे वेतन वेतनश्रेणीतील सुरूवातीच्या टप्प्यावर निश्चित करावे.*

(अ-२) दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ चे शासन निर्णयानुसार मंजूर आकृतीबंधात, उपरोक्त परिच्छेद अ-२ व अ-५ मध्ये नमूद केलेल्या वाढीव पदांची मान्यता विचारात घेतां, सध्या एकूण ४८३८ (४८२६+०२+१०) पदांचा आकृतीबंध मंजूर असून, यामध्ये स्थायी पदे २९२० (२९०८+१२) + कंत्राटी पदे १९१८ यांचा समावेश आहे.

(अ-३) दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे प्रस्तावाव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल - ८११ व कुशल - १०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

या प्रस्तावाचे अनुषंगाने, उपरोक्त परिच्छेद अ मध्ये नमुद केलेल्या विवेचनास तसेच संदर्भांकित पत्रव्यवहारास अनुसरुन, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३ / २२ / प्र.क्र.७० / का.१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ अन्वये शासन निर्णय पारित केलेला आहे.

(अ-४) मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी **" श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत "** या शीर्षाखाली पारित केलेल्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -

*" .. ..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे **सन २००१ ते २००४** या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या **६३५** कर्मचा-यांपैकी कुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,९१३/- (रु. पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,११३/- (रु. पाच हजार एकशे तेरा फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन **किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस मंजुरी देऊन** शासनाच्या दि. ०७.०८.२००९ रोजीच्या शासन **निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.*

पान २ वर .... कृ.मा.प. .. ..

Gen Admin- 175

नियुक्तीबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-४/२१०२/२०२० दिनांक ०५ नोव्हेंबर, ई-मेल पत्र पाठविणेत आलेले आहे. सदरचे ई-मेल पत्राबाबत अद्यापपर्यंत कुठलाही निर्णय आलेला नाही.

तथापि, दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० व दिनांक २८ ऑगष्ट, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४२१ नुसार कार्यवाही करणेसाठी दिनांक १९ नोवूहेंबर, २०२० रोजी टिपणी / प्रस्ताव सादर करणेत येऊन संस्थान आस्थापनेवर घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/ २२००/ (०१ ते ६३५)/ २०१९ दिनांक ०२ जानेवारी, २०२० अन्वये देणेत आलेले आदेश रद्द करुन त्यांच्या सेवा दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२० पासून संबंधित ठेकेदार यांचेकडे वर्ग करणेसाठी जा.क्र. एसएसएस/साप्रशा/आस्था/१५१९/२०२० दिनांक २१ नोव्हेंबर, २०२० अन्वये आदेश पारित करणेत आलेला होता. तसेच जा.क्र. एसएसएस/ साप्रशा/आस्था/ १६१२/२०२० दिनांक ०१/१२/२०२० रोजी आदेशान्वये संस्थान आस्थापनेवार घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा दिनांक ०२ डिसेंबर, २०२० पासून पुढील आदेश हाईपावेता खंडीत करणेबाबत आदेश पारित करणेत आलेला होता. परंतू सदरचे प्रकरणाबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक ०१ डिसेंबर, २०२० रोजी जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्याचे मौखिक निर्देश दिल्याने ते पारित करता आलेले नाहीत.

तथापि दरम्यान श्री. अनिल कचरु कोते व इतर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० दि. १०/९/२०२० रोजी दाखल केले. सदर रिट पिटीशन मध्ये श्री अनिल कोते व इतर यांनी मा. तदर्थ समितीचे दिनांक १३/०७/२०२० रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ३६० रद्द करणेस तसेच त्यावर कोणतीही कार्यवाही न करणेबाबत विनंती केलेली आहे. सदर प्रकरण मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सध्या न्यायप्रविष्ठ आहे. सदर प्रकरणामध्ये महाराष्ट्र शासन व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना प्रतिवादी

करण्यात आलेले आहे. या प्रकरणामध्ये संस्थानने आपले प्रतिज्ञापत्राव्दारे म्हणणे दि. ०४/११/२०२० रोजी मां. उच्च न्यायालयात सादर केले आहे. महाराष्ट्र शासनानेही सदर प्रकरणामध्ये प्रतिज्ञापत्राव्दारे दाखल केले असल्याचे समजते तथापि शासनाने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राचा तपशिल इकडे उपलब्ध नाही.

सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असतांना मा. तदर्थ समितीच्या दिनांक १३/०७/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३६० यावर अंमलबजावणी करावयाची झाल्यास सदर प्रकरणी महाराष्ट्र शासनाकडून दाखल करण्यात आलेली भूमिका तसेच संस्थानकडून दाखल करण्यात आलेले परिच्छेद निहाय शेरे आणि दाखल करण्यात आलेले प्रमाणपत्र यात सुसंगती असणे आवश्यक आहे. तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने निर्णय घेऊन त्याआधारे विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्र. सांसवि- २०१३/२२/प्र.क्र.७०/का.१६, मंत्रालय मुंबई, दिनांक १७/०९/२०२० नुसार आदेश परित केलेले आहे. सदर शासनाचे निर्णयाचे आधारे सदर कर्मचा-यांना दिनांक ०२/०१/२०२० पासून संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून घेण्यात आलेले आहे.

मात्र आता, तदर्थ (Ad-hoc) समितीचे ठरावांची अंमलबजावणी करतांना वरील पार्श्वभूमीवर परस्पर विरोधी भूमिका नसावी अशी सर्वसाधारण प्रशासकीय निकड लक्षात घेऊन दि. २१ नोव्हेंबर, २०२० चे आदेशाची अंमलबजावणी करतांना प्रशासकीय अडचण निर्माण झालेली आहे. संस्थानस्तरावर तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णय आणि शासन निर्णय हे परस्पर पुरक ठरत नाहीत. सबब तदर्थ (Ad-hoc) समितीचा निर्णय अंमलबजावणी करण्यास्तव शासन स्तरावरुन याबाबत मार्गदर्शन होणेसाठी जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/२२९०/२०२० दि. २१/११/२०२० अन्वये विनंती करणेत आलेली आहे. तसेच याबाबत मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांनीही मार्गदर्शन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तथापि सदर प्रकरणी मा. महाराष्ट्र शासन व मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांचेकडून कुठलेही मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

**ड) श्री. अनिल कचरु कोते व इतर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० दि. १०/९/२०२० रोजी दाखल केलेली आहे. याबाबत-**

१) दिनांक २३/११/२०२० व दिनांक ०१/१२/२०२० रोजी सुनावणी होऊन मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी जे मौखिक निर्देश दिले त्याबाबत संस्थानचे वकील ॲड. अनिल बजाज यांनी लेखीपत्र ई-मेलव्दारे कळविले आहे-

The Writ Petition No. 6224 of 2020 was listed on board on dt. 23/11/2020 and the Hon'ble Court orally instructed the undersigned not to terminate the employment of the 598 workers who are subject matter of the present Writ petition, and again when the Writ Petition was listed on dt. 01.12.2020 the court orally instructed to maintain the status-quo.

The Dy. CEO Mr. Thakre & Mr. Nalge were present on the said date and are aware of the same. This is for your records and necessary actions.

२) मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे दिनांक ०८ डिसेंबर, २०२० रोजीचे सुनावणीबाबत मा. न्यायालय यांनी खालीलप्रमाणे लेखी आदेश दिलेले आहेत-

1. It is submitted that Mr.Bajaj, learned Advocate for respondent no. 2 is not well.
2. Place the mattet on 6th January 2021.

पान ४ वर .... कृ.मा.प. .. ..

प्रस्तावावर मा. उच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिकेची प्रत व त्यामध्ये संस्थान प्रशासनाने व शासनाने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत सदरहू विषयाच्या अनुषंगाने निर्णय घेण्याकरता अवलोकनासाठी हजर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सोबत दिनांक १६/०२/२०२१ रोजीचे चक्रीय पध्दतीचे निर्णयाची प्रत सोबत अवलोकनार्थ सादर केलेली आहे.

त्यानुसार दिनांक २०/०२/२०२१ रोजी मा. अध्यक्ष साहेब यांनी मागविलेले सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती अवलोकनार्थ सादर केलेल्या आहेत. मा. अध्यक्ष साहेब यांचेकडे प्र. आस्थापना विभाग प्रमुख ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतनाबाबतच्या चक्रीय पध्दतीचे विषयाबाबतचे निर्णयार्थ अहमदनगर येथे दिनांक २३/०२/२०२१ रोजी जाऊन आलेले आहेत. तथापि ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतनाबाबत दिनांक २४/०२/२०२१ पर्यंत निर्णय झालेला नसल्याने.

The payment of wages Act 1936 नियम ५ मध्ये वेतनाबाबत पुढील प्रमाणे तरतुद आहे-

(a) Any railway, factory or industrial or other establishment upon or in which less than one thousand persons are employed, shall be paid before expiry of the seventh day.

(b) Any other railway, factory or industrial or other establishment, shall be paid before the expiry of the tenth day.

तसेच दिनांक १७/०२/२०२१ रोजीचे अर्जान्वये श्री अविनाश बाबासाहेब जगताप व इतर ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांनी त्यांना वेतन न मिळाल्याने त्यांचे कुटूंबाला अर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे घरात कौटुंबिक कलह निर्माण होत असलेमुळे वेतन मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

**उपरोक्त सर्वबाबींचे अवलोकन करुन ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतन रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे अंतिम आदेशापर्यंत कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने अदा करणे विधीवत व अनिवार्य आहे. सदरची बाब मा. तदर्थ समिती अध्यक्ष व सदस्य यांना उक्त विवेचणासह माहितीस्तव तथा अवलोकनार्थ जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ३६९६ /२०२१ दि. २४/०२/२०२१ रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आलेली आहे.**

**उ) माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतन अदा करणेबाबत दिनांक २५/०२/२०२१ रोजी चक्रीय पध्दतीने खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.**

**(१) दिनांक २५/०२/२०२१ रोजची चक्रीय पध्दतीचे निर्णयातील मुद्दा क्र. ५ मध्ये मा. श्रीकांत एल. आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर, तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-**

आज संस्थान प्रशासनाने काही बाबी नमूद करुन ५९८ कर्मचा-यांना त्यांचे वेतन देण्याबाबत ब-याच बाबींचा अहापोह केलेला आहे. मुलतः सदर ५९८ कर्मचा-यांचे status सुपष्ट नसल्याने त्यांच्या बाबतीत वेतन हा शब्दच अयोग्य आहे आणि म्हणूनच आजपर्यंत सदर कर्मचा-यांनी दिलेल्या सेवेबाबत त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे व असे अनुदान मा. उच्च न्यायालयाचे मंजूर केलेले आहे. अशा परिस्थितीत सरसकट वेतन हा शब्द न वापरुन त्यांना दरमहा केलेल्या कामाचा मेहनताना देणे व ही बाब वेळोवेळी ठरविणे, हेच योग्य आहे, कारण सर्व बाबी मा. उच्च न्यायालयासमक्ष न्यायप्रविष्ट आहेत. म्हणूनच संस्थान प्रशासन सुध्दा दि. २८/०१/२०२१ च्या प्रस्तावामध्ये सदर ५९८ कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अदा करण्याबाबत मान्यता मागत आहे, जी देणेत येत आहे. करिता सदर ५९८ कर्मचा-यांना माहे जानेवारी, २०२१ व फेब्रुवारी, २०२१ मध्ये त्यांनी काम केलेले असल्यास त्यांनी केलेल्या कामाचा मेहनताना मानवतेच्या दृष्टीकोनतून सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहून देण्यास माझी मान्यता आहे.

**(२) दिनांक २८/०१/२०२१ रोजीचे चक्रीय पध्दतीचे विषय सादर करतांना श्री. कान्हूराज बगाटे, (भा.प्र.से), मा. मुख्य कार्यकारी अधिका-तथा-सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती, यांचा निर्णय खालीलप्रामणे –**

५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनरचे वेतन रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद यांचे अंतिम आदेशापर्यंत कामाचे हजर दिवासानुसार विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**(३) दिनांक २५/०२/२०२१ रोजची चक्रीय पध्दतीचे निर्णयाबाबत दिनांक २७/०२/२०२१ रोजी श्री. भानुदास ह. पालवे, अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक-तथा-सदस्य तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-**

मा. उच्च न्यायालयाचे मान्यतेस अधिन राहून माह जाने, २०२१ व माहे फेब्रु, २०२१ या महिन्याचे महेनताना सानुग्रह अनुदान म्हणून मंजुरीस माझी हरकत नाही.

पान ६ वर .... कृ.मा.प. .. ..

यांअन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर वापर करुन, शासनास, संपूर्ण महाराष्ट्र राज्यमध्ये ३० एप्रिल, २०२१ पर्यंत पुढील उपाययोजनांची अंमलबजावणी करणे इष्ट वाटत आहे.

त्यानुसार लागू केलेल्या उपाय योजना आदेशातील क्र. ०९ मध्ये धार्मिक स्थळांबाबत खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

९. धार्मिक पूजा स्थळे / उपासना स्थळे

- धार्मिक पूजा स्थळे / उपासना स्थळे बंद राहतील.
- धार्मिक स्थळी सेवा देणारे सर्व कर्मचारी, त्यांची कर्तव्ये नियमितपणे बजावतील, परंतु बाहेरील अभ्यागतांना तेथे जाण्यास परवानगी असणार नाही.
- या ठिकाणी काम करणा-या सर्व कर्मचा-यांचे, भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्वांनुसार लवकरात लवकर लसीकरण करुन घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे. जेणेकरुन ही ठिकाणे पुन्हा शीघ्रतेने सुरु करता येतील.

तसेच, मा. जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचेकडील क्र. डी.सी./ कार्या ९ब१/ ८६६/२०२१, दिनांक ०५ एप्रिल, २०२१ अन्वये असे आदेशित केले आहे की,

".. .. त्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रदुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दि. १३ मार्च, २०२० पासुन लागू करुन खंड २, ३, ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोरोना (कोव्हीड-१९) वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्याकरणेसाठी सक्षम प्रधिकारी म्हणुन घोषित करण्यात आलेले आहे.

ज्याआर्थी, दिनांक ०४/०४/२०२१ रोजीचे आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्याचे अनुषंगाने सुधारित मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत. तदनुषंगाने अहमदनगर जिल्ह्यामध्ये कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा संसर्ग व प्रादुर्भाव रोखणेकामी प्रतिबंधात्मक आदेश दि. ३०/०४/२०२१ रोजीचे रात्री २४.०० वाजेपर्यंत लागू करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी अहमदनगर जिल्ह्यात व लगतच्या जिल्ह्यामध्ये कोरोना बाधीत रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यास्तव या कार्यालयाव्दारे वेळोवेळी निर्गमित केलेल्या कोरोनरा विषाणू प्रतिबंधात्मक आदेशांची प्रभावीपणे अंबलबजावणी होणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, कारोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोनजेचे एक भाग म्हणुन नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमा होण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून, मी जिल्हादंडाधिकारी अहमदनगर मला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन, अहमदनगर जिल्हा महसुल स्थळ सीमेच्या हद्दीमध्ये या आदेशान्वये दि. ०५/०४/२०२१ रोजीचे रात्री. ०८.०० पासुन ते दि. ३०/०४/२०२१ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये खालील बाबींस मनाई करीत आहे.

त्यानुसार कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक ३० एप्रिल, २०२१ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत लागू करणेत आलेला असल्यामुळे सर्व प्रकारचे प्रतिबंधात्मक उपायोजना करणेसाठी दिनांक ०५/०४/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे साईसभागृह येथे मा. प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली प्रशासकीय स्तरावर बैठक घेणेत येऊन संस्थान व्यवस्थापन संचलित श्री साईबाबा समाधी मंदिरांसह सर्व मंदिरे ( व्दारकामाई, गुरुस्थान, चावडी, प्रधान लेंडीबाग, नंदादीप, श्री दत्त मंदिर, श्री गणेश, श्री शनी, श्री महादेव मंदिर व श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिर आदि) दिनांक ०५/०४/२०२१ रोजी संध्याकाळी ८.०० वाजेपासून भक्तांसाठी पुढील आदेश होईपावेतो दर्शनाकरीता (मुख दर्शनासह) बंद करणेत आलेले आहे.

तसेच जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३७/२०२१ दिनांक ०६/०४/२०२१ नुसार सर्व भक्तनिवासस्थाने ( साईप्रसाद निवासस्थान, व्दारावती भक्तनिवासस्थान, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, साई अश्रम भक्तनिवासस्थान , साई आश्रम धर्मशाळा) हे दिनांक ०६ एप्रिल, २०२१ पासून भक्तांचे तात्पुरते निवासासाठी बंद करणेत आलेले आहेत. सदरचे विभागांचे कार्यालयीन कामकाजा व्यातिरिक्त या विभागाकडे कार्यरत असलेले ५९८ मधील संस्थान कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा खंडीत करणेत आलेल्या आहेत.

कॅन्टीन विभाग हे अंशता बंद करणेत आलेले आहेत. सदर विभागांतील कार्यालयीन कामकाजा व्यातिरिक्त या विभागाकडे कार्यरत असलेले ५९८ मधील कार्यरत असलेले संस्थान कायम कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा खंडीत करणेत आलेल्या आहेत. प्रसादालय विभागही अंशता बंद करण्यात अलेला आहे. प्रसादालय विभागातील ५९८ मधील कार्यरत असलेले कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा अवश्यक्तेनुसार चक्रीय पध्दतीने मा. प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने चालू ठेवण्यात आलेल्या आहेत. प्रसादालय विभागामार्फत कोव्हीड सेंटर व दोन्ही रुग्णालयांचे ठिकाणी दोन वेळेची भोजन व्यवस्था करणेत येत आहे. तर कॅन्टीन विभागामार्फत कोव्हीड सेंटर व दोन्ही रुग्णालयांचे ठिकाणी रुग्णांना व सर्व कर्मचारी यांना चहा / दुध पुरविणेत येत आहे. तसेच कोव्हीड सेंटर व दोन्ही रुग्णालयांचे ठिकाणी बिस्कीट व मिनरल वॉटर यांची विक्री चालू आहे.

पान ८ वर ....कृ.मा.प. .. ..

**त्यानुसार खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आलेला होता-**

मा.प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन व मा.जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचेकडील शासन परिपत्रकात कर्मचा-यांचे वेतनाबाबत कुठल्याही प्रकारच्या सुचना / निर्देश देण्यात आलेले नसल्याने, खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

१) उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे अत्यावश्यक सेवेच्या विभागांकडील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी कर्तव्यावर उपस्थित असल्याने त्यांचे माहे एप्रिल, २०२१ चे मानधन त्यांचे हजर दिवासांनुसार विहीत पध्दतीनी सानुग्रह अनुदाना प्रित्यार्थ अदा करणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

२) ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचेपैकी काही विभागांचे अवशक्तेनुसार सेवा चक्रीय पध्दतीने चालू असून त्यांचे माहे एप्रिल, २०२१ चे हजर दिवासांचे मानधन सानुग्रह अनुदान प्रित्यर्थ अदा करणेस तसेच इतर दिवसांचे मानधानबाबत सहानुभुतीचे दृष्टीने विचार होऊन निर्णय होणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

३) ज्या विभागांचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा खंडीत करणेत आलेल्या आहेत. अशा विभागातील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा खंडीत करणेपूर्वीचे कालावधीचे माहे एप्रिल, २०२१ चे मानधन हजर दिवसांनुसार विहीत पध्दतीने अदा करणेस तसेच सेवा खंडीत केलेनंतरचे कालावधीचे माहे एप्रिल, २०२१ चे मानधनाबाबत सहानुभुतीचे दृष्टीने विचार होऊन निर्णय होणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

४) शैक्षणीक संकुलाकडील ५९८ मधील कायम कंत्राटी शिक्षक यांचे माहे एप्रिल, २०२१ चे मानधन हजर दिवसानुसार विहीत पध्दतीनी सानुग्रह अनुदाना प्रित्यार्थ अदा करणेच्या मान्यतेस्तव इतर दिवसांचे मानधानबाबत सहानुभुतीचे दृष्टीने विचार होऊन निर्णय होणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**मा. तदर्थ समितीचे सभेपुढे दिनांक ०५ मे, २०२१ रोजी चक्रीय पध्दतीने उपरोक्तप्रमाणे सादर करणेत आलेल्या प्रस्तावर खालीलप्रमाणे निर्णय झालेले आहेत.**

**(१) दिनांक १०/०५/२०२१ रोजची चक्रीय पध्दतीचे निर्णयात मा. श्रीकांत एल. आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर, तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-**

विषय पाहिला. पूर्वीचे निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे मुलतः सदर ५९८ कर्मचा-यांचे status स्पष्ट नसल्याने आजपर्यंत सदर कर्मचा-यांनी दिलेल्या सेवेबाबत त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे व असे अनुदान मा. उच्च न्यायालयाने मंजूर केलेले आहे. अशा परिस्थितीत सदर ५९८ कर्मचा-यांना, माहे एप्रिल, २०२१ मध्ये काम केलेले असल्यास त्यांना केलेल्या कामाचा मेहनताना मानवतेच्या दृष्टीकोनातून सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहून देण्यास माझी मान्यता आहे.

जे कामगार काम करत नाहीत त्यांच्या बाबतीत कोव्हीड-१९ च्या परिस्थितीत निर्णय घेण्यासाठी सर्वसमावेषक चर्चा गरजेची वाटते. करिता सदराची बाब नियमीत बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावी.

**(२) दिनांक ११/०५/२०२१ रोजी श्रीमती गिता प्र. बनकर, सहा. धर्मदाय आयुक्त, अहमदनगर-तथा-सदस्या तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-**

प्रस्ताव वाचला. पूर्वीचे निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे मुळातच ५९८ कर्मचा-यांची स्थिती स्पष्ट नाही. त्यामुळे आजपावेतो संबंधित कर्मचा-यांनी दिलेल्या सेवेबाबत त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे. असे अनुदान मा. उच्च न्यायालयांनी मंजूर देखील केले आहे. सद्यपरिस्थिती पहाता ५९८ कर्मचा-यांना, माहे एप्रिल, २०२१ मध्ये त्यांनी काम केले असल्यास त्यांना त्यांचे कामाचा महेनताना म्हणून मानवता दृष्टीकोन लक्षात घेऊन सानुग्रह अनुदान मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अनुसरुन देण्यास हरकत नाही.

ज्यांनी काम केलेले नाही त्यांचेबाबतीत कोव्हीड-१९ चा विचार करता योग्य तो निर्णय घेण्यासाठी सर्वसमावेषक चर्चा होणे आवश्यक आहे. करिता सदरची बाब नियमित बैठकीत ठेवल्यास उचित होईल.

**(३) दिनांक १७/०५/२०२१ रोजी चक्रीय पध्दतीने श्री. भानुदास ह. पालवे, अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक-तथा-सदस्य तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-**

५९८ कर्मचा-यांना माहे एप्रिल, २०२१ मध्ये काम केले असल्यास केलेल्या कामाचा मेहनताना मानवतेच्या दृष्टीकोनातून सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधिन राहून देणेस माझी मान्यता आहे.

पान १० वर ....कृ.मा.प. .. ..

त्यानुसार ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे मे, २०२१ चे हजर दिवसानुसारचे मानधन सानुग्रह अनुदाना प्रित्यार्थ अदा करणेबाबत जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/४०७ /२०२१ दि. १८/०५/२०२१ नुसार आदेशीत करणेत आलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय:**

कोव्हीड-१९ मुळे ज्या विभागांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात बंद करणेत आलेल्या आहेत. अशा विभागांचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेल्या आहेत. अशा तात्पुरत्या स्वरुपात सेवा खंडीत केलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा खंडीत कालावधीतील वेतनाबाबत मा. तदर्थ समितीचे दिनांक १०/०५/२०२१ व दिनांक ११/०५/२०२१ रोजीचे चक्रीय पध्दतीचे निर्णयानुसार जे कामगार काम करत नाहीत त्यांच्या बाबतीत कोव्हीड-१९ च्या परिस्थितीत निर्णय घेणेसाठी सर्वसमावेशक चर्चा गरजेची वाटते, करिता सदरची बाब नियमीत बैठकीत चर्चेसाठी ठेवणेबाबत निर्देशित करणेत आलेले आहेत.

**त्यानुसार माहे एप्रिल, २०२१, मे, २०२१ व जून, २०२१ मध्ये ज्या विभागांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात बंद करणेत आलेल्या आहेत आशा विभागांचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेल्या आहेत. अशा तात्पुरत्या सेवा खंडीत करणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा खंडीत कालावधीत संबंधीत कर्मचारी यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून सनुग्रह अनुदान म्हणून मानधन देणेबाबत चा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.**

11/6/21

**( कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.),**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

LAB-Meeting-168-2021

विषय क्र.- १६



**मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर**

**(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)**

---

**विषय:- श्री.अरुण गणपत जाधव, वायरमन, विद्युत विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत...**

**टिपणी**

**(इ) विषयाची पूर्वपिठीका:-**

श्री.जाधव हे विद्युत विभागात वायरमन या पदावर कार्यरत आहेत. त्यांची दि.०९.०५.२०२१ रोजी रात्री २०.०० वा. ते पहाटे ०४.०० वा. अशी डयुटी साईनगर, जनरेटर रुम येथे लावलेली होती. श्री.जाधव हे नेमलेल्या डयुटीचे ठिकाण सोडून श्री साईबाबा हॉस्पीटल येथे रात्री ११.१४ वा. तेरात्री १२.२८ वा. ॲडमीट केलेले कोरोना संसर्ग रुग्णांच्या वार्डात फिरत असतांना रुग्णालयाचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये ते दिसून आलेले आहेत. त्यांनी कामाची जागा सोडल्यामुळे श्री साईबाबा हॉस्पिटल या विभागाचा विदयुत पुरवठा खंडीत झाला असता तर रुग्णांचे जिवितास धोका निर्माण झाला असता. असे त्यांचे विरुध्द उप कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांचे निवेदन आलेले आहे.

श्री.जाधव हे थेट कोव्हीड उपचार घेत असलेल्या अतिदक्षता विभाग उदा. ICCU, GICU तसेच इतर सर्व कोव्हीड उपचार घेत असलेल्या वार्डमध्ये PPE KIT परिधान न करता तसेच कोणत्याही प्रकारची दक्षता सुरक्षा न बाळगता श्री.सचिन चौधुले यांचे बरोबर वार्डमध्ये विनापरवानगी जाऊन कोव्हीड उपचार घेत असलेल्या रुग्णांचे संपर्कात आल्याने सदर विषाणू मोठया प्रमाणात संक्रमीत होण्याची दाट शक्यता आहे. तसेच श्री.जाधव हे संक्रमित झालेस **सुपर स्प्रेडर** म्हणून समाजातील लोकांमध्ये त्वरीत मिसळून त्याचा प्रादूर्भात वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

श्री. जाधव यांनी मा.जिल्हाधिकारी यांनी कोव्हीडचे संदर्भात दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन केलेले आहे. त्यांनी साथरोग कायदा १८९७ चे कलम आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील तरतूदींचा भंग केलेला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ३(१) अन्वये संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :-

(i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल .

(ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ;

(iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.

श्री.जाधव यांनी उपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ चे कलम ३ (१) चे उल्लंघन केलेले आहे.

म्हणुन सदर गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.जाधव यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६४/२०२१ दि.१९-०५-२०२१ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून, त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आलेला होता.तथापी, श्री.जाधव यांना सदर कारणे दाखवा नोटीस दि.१९-०५-२०२१ रोजी प्राप्त झालेली आहे.

श्री.अरुण गणपत जाधव, यांची संस्थान सेवेत दि.०६.०८.२००४ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांना यापुर्वी गैरशिस्तवर्तनाबाबत शिक्षा करणेत आलेली नाही.

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये **किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.

(४) वेतनावाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

पान नंबर २ वर...

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्व सामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

**मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्या व्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

**प्रस्ताव:-**

**अ)** श्री.अरुण जाधव यांना उपरोक्त गैरशिस्तवर्तनाचे गांभीर्य विचारात घेता त्यांना संस्थान सेवेतून," तात्पुरते सेवा निलंबीत" करुन, त्यांची विभागीय खाते चौकशी करता येईल. सेवा निलंबन कालावधीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (पदग्रहन अवधी आणि निलंबन, सेवेतुन बडतर्फी आणि काढुन टाकणे या कालखंडातील प्रदाने) विनीयम, २०१३ चे कलम १७ (अ) अन्वये त्यांना निलंबन कालावधीत निम्या वेतनावर रजेवर असताना जेवढे रजा वेतन मिळाले असते तेवढे वेतन अधिक रजा वेतनावरील महागाई भत्ता इतका निर्वाह भत्ता देता येईल.

तरी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचेसमोर दि.२८.०५.२०२१ रोजी चक्रीय पध्दतीने निर्णयास्तव सादर करणेत आलेला होता.

१) उपरोक्त विषयांकित चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील मुद्यांचे अवलोकन व्हावे. चक्रिय पध्दतीने सादर केलेल्या विषयावर श्री.जाधव यांचेबाबत मा.श्री. श्रीकांत आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी दि.२८.०५.२०२१ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

अभिलेखावरुन असे दिसून येते की, सदर कर्मचा-याला दि.१९ मे २०२१ रोजी लेखी नोटीस दिलेली आहे. सदर नोटीस मिळाल्याची पोहच सुध्दा नोटीसीवर नमूद आहे. सदर प्रस्तावही दि.१९ मे २०२१ रोजीच तयार केलेला आहे. आज श्री. काकासाहेब ढेमरे, लिपिक, जे सबंधीत विभागात काम करतात, त्यांना विचारले असता नोटीसीचा खुलासा सदर कर्मचा-याने दिला किंवा नाही, याबाबत ते स्पष्ट करत नाहीत. आवक टपालात खुलासा दिला असल्यास मला माहित नाही, असे उत्तर ते देतात. सदर कर्मचा-याने त्याचा खुलासा दिलाच नाही असे स्पष्टपणे टिपणीत नमूदही नाही. अशा परिस्थितीत सदर कर्मचा-याने खुलासा दिला किंवा नाही, या बाबतीत स्पष्टीकरण समिती समक्ष प्रथमत: सादर करावे. खुलासा दिला असल्यास तो समिती समक्ष सादर करावा. असे नमुद आहे.

२) उपरोक्त विषयांकित चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील मुद्यांचे अवलोकन व्हावे. चक्रिय पध्दतीने सादर केलेल्या विषयावर श्री.जाधव यांचेबाबत श्री.भानुदास पालवे, अपर आयुक्त (महसुल), नाशिक तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी दि.२८.०५.२०२१ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

श्री.अरुण जाधव यांना दि.१९.०५.२०२१ रोजी कारणे दाखवा नोटीस दिलेली असतांना विहीत मुदतीमध्ये त्यांनी लेखी खुलासा दाखल केलेला नाही.यावरुन उपरोक्त 'अ' मधील प्रस्ताव मान्य करणेस हरकत नाही.

३) उपरोक्त विषयांकित चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील मुद्यांचे अवलोकन व्हावे. चक्रिय पध्दतीने सादर केलेल्या विषयावर श्री.जाधव यांचेबाबत श्रीमती गिता बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर तथा सदस्या, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी दि.०७.०६.२०२१ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

पान नंबर ३ वर...

प्रस्ताव वाचला. प्रस्तावावरुन स्पष्ट होते की, संबंधीत अरुण गणपत जाधव यांना १९ मे २०२१ रोजी लेखी नोटीस देवून खुलासा सादर करणेबाबत कळविले होते. त्या नुसार या विषयावर मा.अध्यक्ष व इतर सदस्य मा.अप्पर आयुक्त, महसूल नाशिक यांनी अभिप्राय सादर केला आहे. त्यापैकी मा.अध्यक्ष तदर्थ समिती यांनी संबंधीत कर्मचा-याचा लेखी खुलासा समितीस समक्ष सादर करण्याचे कळविले आहे. प्रस्तावाचे वाचन केले असता ही बाब मला स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक वाटते की संबधीत कर्मचारी यांनी दिनांक २४.०५.२०२१ रोजी त्याचा खुलासा सादर केला आहे. परंतु, मा.अध्यक्ष यांना खुलासा समिती समक्ष सादर करणेबाबतचा अभिप्राय २८.०५.२०२१ रोजी दिलेला आहे.

सदरच्या प्रस्तावावरुन श्री.अरुण जाधव यांची खातेचौकशी होणारच आहे. त्यामध्ये सर्व बाबी स्पष्ट होतील तसेच सादर केलेल्या एफआयआर बाबत देखील खातेचौकशी व अनुषंगीक फौजदारी प्रक्रियेअंतर्गत योग्य ती चौकशी व तपास होणार असून त्याबाबत सर्व माहिती चौकशीअंती समोर येणार आहे. तसेच खुलासामध्ये संबंधीत कर्मचा-याची त्याची बाजु मांडलेली आहे. त्यामुळे खाते चौकशी पूर्वीच निलंबन करणे योग्य वाटत नाही.

सबब, सदरचा प्रस्ताव माझेतर्फे नामंजूर करण्यात येतो.

श्री.जाधव यांनी दि.२४.०५.२०२१ रोजीचा सादर केलेला खुलासा वरिष्ठांकडे सादर केलेला आहे. सबंधीत विभागास दि.२८.०५.२०२१ रोजी सायंकाळी १७.०० वा. देण्यात आलेला आहे. श्री.जाधव यांनी सादर केलेल्या खुलाशात ," मला संदर्भिय नोटीस बजविणेत आली असून तिचा खुलासा मी पुढीलप्रमाणे देत आहे. – माझी दि.०९.०५.२०२१ रोजी नियमित डयुटी तक्त्याप्रमाणे ५०० रुम भक्तनिवास या ठिकाणी डयुटी होती. परंतू साईनगर जनरेटर कक्ष येथे डयुटीस असलेले कर्मचारी श्री.सुनिल वाघ (वायरमन) यांचे मामांचे कोरोनामुळे निधन झाल्यामुळे त्यांनी अचानक सुट्टी घेतली व त्यामुळे मला साईनगर जनरेटर कक्ष या ठिकाणी डयुटीसाठी जावे लागले.

मी साईनगर जनरेटर कक्ष येथे डयुटीवर असतांना माझा मित्र श्री.सचिन चौगुले यांचा मला फोन आला की, माझ्या काकांची प्रकृती चिंताजनक असून ते साईबाबा हॉस्पिटल येथे ॲडमिट आहे. तसेच दोन दिवसापूर्वीच श्री.सचिन चौगुले यांचे काका श्री.ज्ञानेश्वर कोते यांचे मुलाचे व पत्नीचे कोव्हीड-१९ मुळे निधन झालेले असल्यामुळे माझा मित्र थोडासा घाबरलेल्या मनस्थितीत होता. माझी डयुटी साईबाबा हॉस्पिटल परिसरात असल्यामुळे मी श्री.महादू कांदळकर यांना माझ्या पॉईटवर बोलावून घेवून साईबाबा हॉस्पिटल येथे गेलो.

माझ्या मित्राने मला सांगीतले की काकांना जास्त त्रास होत आहे. म्हणून मी आहे तसाच तोंडाला दोन मास्क लावून हॉस्पिटला गेलो.हॉस्पिटलला गेल्यानंतर पेंशट फोन घेत नव्हते त्यामुळे आम्हाला ब-याच वॉर्डमध्ये फिरावे लागले. मी हॉस्पीटलला गेल्यानंतर कोणत्याही वस्तूला स्पर्श होणार नाही याची मी दक्षता घेतली तसेच साईबाबा हॉस्पिटलला ज्या विद्युत कर्मचारी यांची डयुटी असते त्यांना रात्री १२.०० वाजेच्या आसपास हॉस्पिटलमध्ये राऊंड घेऊन विद्युत पुरवठा व्यवस्थीत सुरु आहे किंवा नाही याची पाहणी करावी लागते व त्या उद्देशाने देखील मी हॉस्पिटलमध्ये गेलो होतो. मी कोणत्याही कोव्हीड पेशंटच्या जवळ गेलो नाही किंवा त्यांच्या थेट संपर्कात आलेलो नाही.

मी उपरोक्त प्रमाणे खुलासा देत असून कामाची व्यवस्था आपसात केलेली होती. सदर काळात माझ्याकडून कुठलाही अनुचित प्रकार घडलेला नाही. तरी मेहरबान साहेबांनी मला एक वेळ क्षमा करावी हि विनंती. मी यापुढे उपरोक्त कुठल्याही गोष्टी माझ्याकडुन घडणार याची मी काळजी घेईल." असे म्हटलेले आहे.

सदरचा लेखी खुलासा श्री. जाधव यांनी उप कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांचेमार्फत सादर केलेला असुन त्यांनी त्यावर माहितीसाठी सविनय सादर असा अभिप्राय नोंदविलेला आहे.

श्री.जाधव यांनी दि.२४.०५.२०२१ रोजीचा सादर केलेला खुलासा वरिष्ठांकडे सादर केलेला आहे. सबंधीत विभागास दि.२८.०५.२०२१ रोजी सायंकाळी १७.०० वा. देण्यात आलेला आहे. सदरचा खुलाशावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, **खुलासा अमान्य करण्यात येत आहे**. असा अभिप्राय दिलेला आहे.

जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/६४२/२०२१ दि.२९.०५.२०२१, जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/६५५/२०२१ दि.३१.०५.२०२१ रोजीचे पत्र इ-मेल व हार्ड कॉपी द्वारे अध्यक्ष महोदय व समिती सदस्य यांना श्री.जाधव यांचा खुलासा अवगत करणेकरीता पाठविणेत आलेला आहे.

श्री.अरुण गणपत जाधव, वायरमन, विद्युत विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबतचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचेसमोर निर्णयास्तव सविनय सादर.

11/6/21

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी**

BQ 8/11/6 8/11/6

विषय क्र.- ९७



**मा. तदर्थ समितीचे सभेतील विषयाची टिपणी**

**सामान्य प्रशासन (वशी - ०८)**

**विषय :- साईभक्तांना मोफत उदी प्रसाद पोस्टाने पाठविणेकामी मान्यता मिळणेबाबत...**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील

**प्रस्तावना :-**

सध्या देशात/महाराष्ट्र राज्यात कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव आहे त्यामुळे राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायद्यान्वये अधिसुचना निर्गमीत करण्यात आलेली आहे सदरच्या अधिसूचनेचा कालावधी कधीपर्यंत असेल हे आज सांगता येणार नाही.

सध्या देशात/महाराष्ट्र राज्यात कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्यामुळे महाराष्ट्रातील व इतर राज्यातील साईभक्त यांना एप्रिल २०२१ पासून ते आजपावेता ब-याच साईभक्तांची बाबांवर श्रध्दा असूनही शिर्डी येथे दर्शनासाठी येता येत नाही. तसेच बरेच साईभक्त फोनव्दारे संस्थानकडे बाबांची उदी पाठविणेबाबत मागणी करत असतात. त्यामुळे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी साईभक्तांच्या भावनेचा विचार करुन बाबांच्या उदीप्रसादाने साईभक्तांचे समाधान होण्याच्या दृष्टीने भक्तांना उदीप्रसादाची मागणी केल्यास त्यांना संस्थानमार्फत मोफत उदीप्रसाद पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल अशी घोषणा जाहीर केली आहे. तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी लवकरच पावसाळा सुरु होत असल्यामुळे पाकीटांना पाणी लागून उदीप्रसाद खराब होऊ नये भक्तांना उदीप्रसाद व्यवस्थित मिळावा या हेतूने पॉली कोटेड पाकीटे छपाई करणेबाबत निर्देश दिले आहेत.

**विभागाचा अभिप्राय : -**

उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केलेप्रमाणे साईभक्तांना मोफत उदीप्रसाद पाठविणेकामी चांगल्या प्रकारचे पॉली कोटेड पाकीटे छपाई करणेकामी दरपत्रकांची मागणी करुन छपाई करुन घेता येईल. त्याकरीता शिर्डी परिसरातील प्रेसधारकांकडून दरपत्रकांची मागणी करण्यात येईल व ज्या छपाई धारकाचा निम्नतम दर असेल अशा प्रेसधारकास छपाई कामाचा कार्यादेश देता येईल जोपर्यंत मंदिर चालू होत नाही तोपर्यंत जसजशी भक्तांची मागणी येईल त्याप्रमाणात पाकीटांची छपाई करण्यात येऊन उदीप्रसाद संस्थानमार्फत मोफत पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

संस्थानमार्फत दि.१८ मे, २०२१ रोजी श्रीसाईभक्तांना मोफत उदी प्रसाद मिळणेकरीता आवाहन करणेत आलेले आहे. त्यानुसार साधारणतः दैनदिन ५००० भक्तांकडून ई मेलव्दारे/व्हॉटसअप मेसेज दृवारे उदीप्रसादाची मागणी होत आहे. त्याअनुषंगाने दि.१०.०६.२०२१ रोजी पर्यंत अंदाजे खर्च खालीलप्रमाणे-

**(कालावधी दि.१८ मे, २०२१ ते दि.१० जून, २०२१ पर्यंत एकूण दिवस २३)**

| अ.नं. | विभागामार्फत भक्तांकडून आलेली उदीप्रसाद मागणी | उदीप्रसादाची मागणी केलेल्या भक्तांची संख्या | उदीप्रसाद पोस्टाने पाठविणेकामी.प्रती नग रु.५/- प्रमाणे पोस्टेज खर्च | पाकीटे छपाईकामी अंदाजे प्रती नग रु.१.४० पैसे प्रमाणे येणारा अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | जनसंपर्क विभागामार्फत व्हॉटसपव्दारे आलेली मागणी व माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत मेलव्दारे आलेली मागणी | दैनदिन ५००० ×२३ दिवस = १,१५,०००/- | ५,७५,०००/- | १,६१,०००/- |
| | **एकूण** | **संख्या - १,१५,०००/-** | **रक्कम रु. ५,७५,०००/-** | **रक्कम रु. १,६१,०००/-** |

**पा.नं.२ वर**

**प्रस्ताव :-**

सध्या देशात/महाराष्ट्र राज्यात कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्यामुळे महाराष्ट्रातील व इतर राज्यातील साईभक्त यांना एप्रिल २०२१ पासून ते आजपावेता ब-याच साईभक्तांची बाबांवर श्रध्दा असूनही शिर्डी येथे दर्शनासाठी येता येत नसल्याने संस्थानमार्फत दि.१८ मे, २०२१ रोजी श्रीसाईभक्तांना मोफत उदी प्रसाद मिळणेकरीता आवाहन करणेत आलेले होते त्यानुसार साधारणतः दैनदिन ५००० भक्तांकडून ई मेल दृवारे/व्हॉटसअप मेसेजद्वारे उदीप्रसादाची मागणी होत आहे. तरी उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे प्रथमतः दि.१० जून, २०२१ पर्यंत साधारणतः १,१५,००० साईभक्तांची उदीप्रसादाची मागणी गृहीत धरल्यास अंदाजे रक्कम रु.७,३६,०००/- एवढा खर्च होणे अपेक्षीत आहे.

त्याअनुषंगाने, संस्थानमार्फत श्री साईभक्तांना एकदाच मोफत उदीप्रसाद पाठविणेस, पाकीटे छपाई व स्टीकरची खरेदी करणेकामी तसेच उदीप्रसाद पाठविणेकामी येणा-या योग्य त्या अनुषंगीक खर्चास व स्थानिक प्रेसधारंकाकडून दरपत्रके मागवून कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

ELE-meeting-388/2020

विषय क्र.- १८



**मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर**
**विभागाचे नांव :- विद्युत विभाग**

**विषय :- साईपालखी निवारा येथील संस्थानला देणगी मिळालेल्या इमारतींमध्ये लोडकरीता जनरेटर सेट, कॉम्पॅक्ट सबस्टेशन, मीटरींग क्युबीकल, इलेक्ट्रीकल पॅनेल, केबल इत्यादि खरेदी करुन बसविणे तसेच वातानुकूलित यंत्रणा व गिझरकरीता वायरींग करणेबाबत ..**

**प्रस्तावना :-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-
(क).मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.
शासन निर्णय परिच्छेद क्र.४.१ खरेदी किंमत रु. ३ लाखापेक्षा अधिक असेल तेव्हा ई-निविदा प्रणालीचा वापर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव :-** श्री साईबाबा संस्थानला दानशुर साईभक्त, श्री.काशिनाथ गोविंद पाटील, वसई यांचेकडून साई पालखी निवारा, निघोज, निमगांव, येथील 'बी' आणि 'डी' या दोन इमारती देणगी स्वरुपात मिळालेल्या आहे. या दोन इमारतीपैकी 'बी' इमारत साईभक्तांच्या निवास व्यवस्थेकामी सुरु करणेबाबत साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदरच्या आदेशामध्ये विद्युत विभागामार्फत ०१). सर्व रुम्समध्ये वातानुकुलीत व्यवस्था नियमित सुरु राहील अशी व्यवस्था करावी. ०२). लाईट गेल्यास जनरेटरची व्यवस्था उपलब्ध ठेवावी. तसेच. ०३). सदर इमारतीचे टेरेसवर पत्राशेड असल्याने तेथे गरम पाण्याकरीता सोलर बसविण्यात येणार नाही, त्यामुळे सर्व रुममध्ये गिझर बसवून द्यावेत व विभागासंबंधीत इतर कामकाज करणे. ०४). इमारत साईभक्तांच्या वापराकरीता सुरु झाल्यानंतर मेन्टेनन्स करीता आवश्यक कर्मचा-यांची नेमणूक करावी असे कळविण्यात आलेले आहे.

**या परीसराकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे एल.टी.वीजपुरवठयाचा दाब शिल्लक नसल्याने तसेच ट्रान्सफॉर्मरची क्षमता अत्यल्प (६३ के.व्ही.ए.) असून** त्यावर इतर गावातील लोड असल्याने संस्थानला देणगी मिळालेल्या 'बी' **इमारतीमधील ६४ रुम्समधील नाईट लॅम्प, टयुबलाईट व सिलींग फॅनकरीता** महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून एल.टी.वीजपुरवठा जोडून घेण्यात आलेला आहे. तसेच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर पर्यायी व्यवस्थेकरीता जनरेटरसेटची कोणतीही व्यवस्था सदर ठिकाणी उपलब्ध नाही.

सध्या फक्त 'बी' इमारत सुरु करणार असल्याने सदरच्या इमारतीमधील एकुण ६४ रुम्समध्ये वातानुकुलीत यंत्रणेकरीता तसेच गिझरकरीता नविन वायरींग करुन डि.बी.बसवाव्या लागणार आहे.

संस्थानला देणगी मिळालेल्या 'बी' या इमारतीचा इलेक्ट्रीकल लोडचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

**इमारत क्र. B : – इलेक्ट्रीकल लोडचा तपशिल.**

| अ.क्र. | तपशिल | संख्या | वॅट | सिंगल फेज लोड | एकुण थ्री फेज लोड |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | ए.सी. | ६४ नग | १५०० | ९६००० | ३२००० |
| ०२) | गिझर | ६४ नग | ३००० | १९२००० | ६४००० |
| ०३) | फॅन | १५० नग | ६० | ९००० | ३००० |
| ०४) | २० वॅट एल.ई.डी.टयुब | १८० नग | २० | ३६०० | १२०० |
| ०५) | १० वॅट एल.ई.डी.टयुब / बल्कहेड फिटींग | १९२ नग | १० | १९२० | ६४० |
| ०६) | ०३ वॅट एल.ई.डी.बल्ब | ६४ नग | ०३ | १९२ | ६४ |
| ०७) | टि.व्ही. | ६४ नग | ६० | ३८४० | १२८० |
| ०८) | एल.ई.डी.स्ट्रीट लाईट फिटींग | १० नग | १५० | १५०० | ५०० |
| ०९) | पंप (२० एच.पी.) | ०१ नग | १४९२० | - | १४९२० |
| १०) | | | | एकुण लोड (वॅटमध्ये) :- | १,१७,६०४.०० |
| ११) | | | | एकुण लोड (किलोवॅटमध्ये) :- | ११७.६०४ KW |
| | | | | लोड केव्हीएमध्ये :- | ११७.६०४ ÷ ०.८ |
| | | | | | १४७.०० केव्हीए |

२/-

84

उपरोक्तप्रमाणे निघोज निमगांव येथील साई पालखी निवा-यातील **B** या इमारतीचा एकुण लोड १४७.५० केव्हीए असून या इमारतीचे विद्युत पुरवठा करणेकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून उच्चदाब वीजपुरवठा जोडून घ्यावा लागणार आहे. तसेच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर पर्यायी व्यवस्थेकरीता जनरेटरसेट बसवून वीजपुरवठा करावा लागणार आहे. त्याकरीता २५० केव्हीए क्षमतेचा एक जनरेटरसेट, २०० केव्हीए क्षमतेचे कॉम्पॅक्ट सबस्टेशन, मीटरींग क्युबीकल, मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेल, सब पॅनेल, केबल इत्यादि खरेदी करुन बसवावे लागणार आहेत. जनरेटरसेट, कॉम्पॅक्ट सबस्टेशन, मीटरींग क्युबिकल, इलेक्ट्रीकल पॅनेल याकरीता बी इमारतीजवळ जागा नसल्याने हे सर्व इलेक्ट्रीकल इक्वीपमेंट डी इमारतीचे तळमाळयाचे ठिकाणी बसवावे लागणार आहेत.

विद्युतीकरण कामाकरीता करावयाच्या कामाचा खर्च हा शासनमान्य सी.एस.आर. सन २०१९-२०२० प्रमाणे तयार केलेला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | C.S.R. No. | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 7-3-12 | Supplying, erecting & terminating 3 x 185 sq. mm. aluminium 11kV(UE), XLPE armoured cable on wall/ceiling or laid in provided trench / pipe in an approved manner as per specification no.CB-HT | 900 Mtrs. | 2.560.46 | 23,04,414.00 |
| 02) | 7-5-6 | Providing and erecting Heat shrinkable outdoor termination kit for 11 kV (E) XLPE HT cable 3x120 to 185 sq. mm. with necessary material as per specification no. CB-JT/HT. | 02 Nos. | 13,889.69 | 00,27,779.38 |
| 03) | 7-5-13 | Providing and erecting Heat shrinkable indoor termination kit for 11 kV (E) XLPE HT cable 3x120 to 185 sq. mm. with necessary material as per specification No. CB-JT/HT | 06 Nos. | 14,190.39 | 00,85,142.34 |
| 04) | 6-4-1 | Supplying, erecting, testing, commissioning 11 KV H.T. metering cubical (Compact Type) approved by MSEDCL/Licensee fabricated with 2mm. (14 SWG) M. S. sheets with supporting angle and channel, painted with powder coating / epoxy paint of required shade copper bus bar size 25x6 mm electronic security lock and heavy duty mechanical lock, with counter meter for measuring no of times the opening of doors, top side cover ( C.T., P.T COVER) interlock with meter doors, epoxy coated 3 nos C.T having required ratio between 5/5A to 50/5A, VA10, Class0.2S, 11000/V3/110/V3 VA 50, class 0.2 epoxy terminal block suitable for provided trivector meter, and provision for incoming and outgoing cables etc complete duly tested by Licensee with necessary Test Certificates and erected on provided plinth/ C.C foundation | 01 No. | 1.64.512.69 | 01.64.512.69 |
| 05) | 10-1-50 | Supplying and Erecting approved make Compact Substation with 200 kVA,3 phase, 50 c/s ONAN Type thermal class K10, 21KA for 3 Sec. SF6 insulated Non-Extensible Compact switchgear (Type DV-NE / RT2-NE) consisting of one No. Direct Cable module and One No. Fixed Manual Vacuum Circuit Breaker in SF6 insulated stainless steel enclosure, with series trip, self powered microprocessor based numerical over current relay (IDMTL + Inst.) protection. Interconnection between HT switchgear and transformer shall be using 1Cx3x185 sq.mm Al. unarmorured XLPE Cable. Copper wound transformer 200KVA 11KV/433V Dyn11 Oil filled, INDOOR TYPE TRANSFORMER BUSHINGS, hermetically sealed transformer with corrugated wall, without conservator type of design & Top Normal Porcelain Bushings for HT & LT with Off load tap switch of rating +5% to -10% @2.5%. Temp Rise - Oil/Winding 40/45 Deg cell. Losses (Subject to IS 1180 Energy Efficiency level 2 ) - Max @ 50% Loading : As per IS 1180 and Max @ 100% Loading : As per IS 1180 and Impedance As per IS 1180 with LV PANEL- 315 AMPS ALUMINUM BUSBAR ( 100% for Phase and 50% for Neutral, Current Density - 1amp/sqmm) with Outgoings 315Amps 433V 4P 50Hz 35KA ICOG Fixed Manual Type Air Circuit Breaker (ACB) with Microprocessor based release for Overload, short circuit & earth Fault protection, Multifunctional Meter with Class 1.0 Accuracy with RS 485 Port, RYB, ON/OFF Trip Indications, OUTDOOR ENCLOSURE having IP54 IP54 degree of protection for HT & LT switchgear compartment & IP23 degree of protection for Transformer compartment, Powder /Colour Coated Enclosure, with Interconnection Between HT switchgear & Transformer using 1Cx3x185Sq.mm XLPE Aluminium Single core cable. Interconnection between Transformer & LT switchgear using Al. Busbars. Internal earthing connections by using 50x6 mm GI Strips including Transformer Neutral, Complete with necessary permission of Electrical Inspector as per specification No SS- TR/COMP. | 01 No. | 20.73.311.81 | 20.73.311.81 |
| 06) | 9-2-2 | Supplying and erecting copper strip of required size used for earthing on wall and/or any other purpose with necessary copper clamps fixed on wall painted with bituminous paint in an approved manner with joints required. as per specification No (EA-EP). | 450 Kgs. | 912.34 | 04,10,553.00 |
| 07) | 9-1-5 | Supply, Installation, Testing and commissioning of UL Certified / CPRI Tested Maintenance Free Earthing comprising of Electrode of 17.2 mm diameter Low Carbon Steel with 250 micron Molecular Copper Bonded Earthing Rod of Length 3m along with 25 kg Carbon Based environment friendly back fill Ground Enhancing compound required to fill up the excavated earth with required quantity as per specification no EA-MOBI | 30 Nos. | 15.148.26 | 04,54,447.80 |
| 08) | 7-6-7 | Supplying & laying (including excavation) 25 cm dia RCC Hume pipe of standard thickness at required depth up to 90 cms. below road / ground surface, for covering provided cable & necessary back filling with light ramming to make the road/ground surface as it was (Except bitumen carpet). | 500 Mtrs. | 784.35 | 03,92,175.00 |
| | | | | **Amount Rs.:-** | **59,12,336.02** |

३/-

| Sr. No. | C.S.R. No. | Description | Qty: | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Carry Forward Amount Rs.:- | 59,12,336.02 |
| 09) | NON C. S. R. | Providing and construction (including excavation) 9" brick masonry inspection cable chamber 750mm x 750 mm x 600mm internal side size with 75 mm thick RCC cover, filling screened sand and smooth internal plaster etc including watering, streaking joint on exposed faces, rocking at joint on exposed faces and watering complete and clearing the site by removing debris & making the site good. | 40 Nos. | 8,885.00 | 03,55,400.00 |
| 10) | 6-1-19 | Supplying and erecting Iron, sheet metal work consisting of CRCA Sheets, Various sections of iron, Plates, Chequered Plates, Rods, Bars, MS pipes, etc. for panel board or any other purposes complete with bending, cutting, drilling and welding complete erected at the position with necessary materials duly painted with one coat of red oxide and two coats of enamel paint to match the switchgears or as per directions by the authority | 2000 Kgs. | 163.92 | 03,27,840.00 |
| 11) | 7-1-15 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 3½ core 25sq mm aluminium conductor with continuous 5.48 sq mm (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall / trusses / pole or laid in provided trench / pipe as per specification no. CB-LT/AL | 200 Mtrs. | 256.97 | 00,51,394.00 |
| 12) | 7-1-16 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 3½core 35sq mm. aluminium conductor with continuous 5.48 sq mm (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall / trusses / pole or laid in provided trench / pipe as per specification no. CB-LT/AL | 500 Mtrs | 310.25 | 01,55,125.00 |
| 13) | 7-1-17 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 3½ core 50 sq mm. aluminium conductor with continuous 5.48 sq mm (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall / trusses / pole or laid in provided trench / pipe as per specification no. CB-LT/AL | 50 Mtrs. | 402.24 | 00,20,112.00 |
| 14) | 7-1-23 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 3½ core 240 sq mm. aluminium conductor with continuous 12.97 sq mm (8 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/ trusses/pole or laid in provided trench / pipe as per specification no. CB-LT/AL | 600 Mtrs. | 1,447.40 | 08,68,440.00 |
| 15) | 7-7-3 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3 to 4 core 16 sq mm / 3 to 4 core 25 sq mm / 3 core 35 sq. mm for PVC armoured cable as per specification No. CB-GL | 25 Nos. | 114.11 | 00,02,852.75 |
| 16) | 7-7-4 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 4 core 35 Sq.mm./3 core 50 Sq.mm. for PVC armoured cable as per specification no. CB-GL | 50 Nos. | 149.42 | 00,07,471.00 |
| 17) | 7-7-5 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 4 core 50 sq mm for PVC armoured cable as per specification No. CB-GL | 10 Nos. | 191.43 | 00,01,914.30 |
| 18) | 7-7-11 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3½ core 240 sq mm for PVC armoured cable as per specification No. CB-GL | 78 Nos. | 392.61 | 00,30,623.58 |
| 19) | 7-10-2 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 25 sq mm complete as per specification No. CB-CL/AL | 100 Nos. | 10.16 | 00,01,016.00 |
| 20) | 7-10-3 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 35 sq mm complete as per specification No. CB-CL/AL | 200 Nos. | 17.84 | 00,03,568.00 |
| 21) | 7-10-4 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 50 sq mm complete as per specification No. CB-CL/AL | 40 Nos. | 21.56 | 00,00,862.40 |
| 22) | 7-10-10 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 240 sq mm. complete as per specification No. CB-CL/AL | 312 Nos. | 94.10 | 00,29,359.20 |
| 23) | 5-1-16 | Supplying and erecting Triple pole metal / iron clad HRC fuse switch 415 / 500 V. 100 A. with neutral link with ISI marked HRC fuses on angle iron / G.I. frame as per specification no. SW-SWR/TPHRC | 03 Nos. | 6,679.821 | 00.20,039.463 |
| 24) | 10-2-29 | Supplying and fixing PVC Synthetic elastomer electrically insulating mat with class B insulation conforming to IS:15652 – 2006 & CPRI tested having 3mm thickness upto 11kV | 30 Sq. Mtr. | 5.759.24 | 01.72.777.20 |
| 25) | 10-2-22 | Providing printed instruction chart for treating persons suffering from electric shock, printed in English & Marathi and duly laminated. | 02 Nos. | 143.17 | 00,00,286.34 |
| 26) | 10-2-23 | Providing pair of duly tested rubber hand gloves as per IS:4770 suitable for working upto 22kV supply. | 02 Nos. | 693.84 | 00,01,387.68 |
| | | | | Amount Rs.:- | 79,62,804.933 |

| Sr. No. | C.S.R. No. | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| | | | Carry Forward Amount Rs.:- | | 79,62,804.933 |
| 27) | 10-2-31 | Supplying shock proof leather Safety Shoes of Electrical grade of standard size as IS: 11226, 14544 duly tested, with necessary test certificate from manufacturer. | 02 Pair | 2,031.96 | 00,04,063.92 |
| 28) | 11-1-18 | Supplying and erecting Diesel Generating Set with Alternator of 250 KVA output continuous rating, 3 phase, 415 volts, 50 cycles, 0.8 P.F. A.C. supply totally enclosed air cooled / water cooled / liquid cooled multi-cylinder diesel engine developing suitable BHP not less than 154 BHP at 1500 RPM with 10% overload for one hour in 12 hours alongwith standard accessories like fly wheel, lubricating oil cooler, "A" class governor, heavy duty fuel and lubricating oil filter, oil bath air filter, lubricating oil pressure gauge, end exhaust manifold, standard set of tools with adjustable spanners, screw drivers, feeder gauge, cylinder head to cover, joint cylinder head to exhaust, element lube oil filter, techocum hour counter, 12/24 volts electric starting equipment complete with standard battery, dynamo, cutouts, ammeter, necessary wiring, pressure gauge, starter etc. and heavy duty residential type exhaust silencer and vertical hot air duct both logged with asbestos rope, save oil trays, exhaust piping of required length, standard wall/ floor mounted fuel tank with level indicator and piping and drip proof alternator, self excited, self regulated, screen protected, with static excitation system, capable of delivering the rated system output at 415 volts, 3 phase, 0.8 PF, 50 HZ, 4 wire, running at 1500 RPM, conforming to IS-4722-2001 with voltage regulation +/- 5% of rated voltage from no load to full load. Both the engine and alternator fitted on a common fabricated steel base plate with ant vibration mountings and both connected to each other by flexible flange coupling. The alternator and control panel shall be connected with provided suitable capacity armoured cable and complete with Acoustic enclosure ( canopy ) made out of 18 SWG-CRCA Sheet, sound absorbing material used of ROCKWOOL of 64 density and 100 mm thick conforming to IS:8183. The resin bonded ROCKWOOL covered from inside the canopy by perforated sheet with ¾ mm holes, sound level not more than 75 DB at a distance of 1 mtr, as PVCT norms complete with erecting, commissioning and satisfactory testing as per requirement with first filling of fuel, oil etc. with guarantee of complete system for one year with obtaining all necessary certificate from Electrical Inspector. (Extra separate 1000 Ltr.Diesel Tank) | 01 Nos. | 20,23,954.88 | 20,23,954.88 |
| 29) | 11-2-15 | Supplying, erecting, testing and commissioning of Microprocessor based AMF panel suitable for Diesel Generating Set of above 200 kVA upto 250 kVA capacity Single/Three phase, 230/415 Volts, 50Hz A.C. with all standard features, safeties etc as detailed below as per specification no. GEN-AMF.<br>01).Power module A pair of Electromechanically interlocked contactors (For mains and generator) overload relay for generator contractor. Neutral contactors for mains and generator, Power sockets for connections.<br>02). Control and metering module:<br>Line voltage monitor,<br>Generator voltage monitor,<br>Ammeter 3 times attempts starts facility,<br>Air circuit breaker of capacity – 1600 Amp,<br>Rating for Auto / manual operation.<br>Auto / manual switch,<br>Emergency stop push button,<br>Manual start push button,<br>Frequency meter,<br>Engine hour meter,<br>Two earthing studs,<br>03).Protection module:<br>The engine shut down in the unlikely event of Low lube oil pressure,<br>High cylinder head temperature,<br>V belt failure,<br>04). Indicator with alarm,<br>Load on generator.<br>05). Indicators:<br>Load on mains,<br>Engine fails to start,<br>Emergency stop,<br>Battery charger. | 01 Nos. | 2,36,074.60 | 02,36,074.60 |
| | | | | Amount Rs.:- | 1,02,26,898.333 |

| Sr. No. | C.S.R. No. | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Carry Forward Amount Rs.:- | 1,02,26,898.333 |
| 30) | 7-6-4 | Supplying & erecting G.I. pipe 'A' class 75 mm dia. Erected for enclosing PVC armoured cable on wall/pole as per specification No. CB-CE | 12 Mtrs. | 711.56 | 00,08,538.72 |
| 31) | 10-2-33 | Supplying and erecting D.C.P. type Fire Extinguisher 9 kg capacity cartridge type with Gun Metal cap 150 gram CO2 gas cartridge, powder and brackets conforming to IS 2171-1985 and complete erected with necessary clamps made from 50x6 mm M.S. flat with nuts & bolts grouted in wall complete. | 02 Nos. | 4,511.69 | 00,09,023.38 |
| 32) | 10-2-24 | Providing round bottom FIRE Bucket of 9 Liters capacity as per IS : 2546 made out of 24 gauge G.I. sheet with extra handle at bottom duly painted white inside and red outside with FIRE Mark, on provided stand/ wall hook. | 08 Each | 536.98 | 00,04,295.84 |
| 33) | 10-2-25 | Providing floor mounting stand for keeping 4 Nos. of FIRE buckets 1500mm in length, 900mm in height frame made out of 30x30x4 mm. angle iron with cross supports for legs, welded with 4 hooks & duly painted with one coat of red lead & two coats of silver paint. | 02 Nos | 4,149.53 | 00,08,299.06 |
| 34) | Non C. S. R | Supply, installation, testing and commissioning of Main Distribution Panel with ON/OFF indicator with Digital Meter of Voltmeter, Ampere and 03 nos. three phase KW Meter, 03 nos. LED Indicator for Incoming supply, LED Indicator for every main switch for ON passion and four pole Bus Bar as per specification and relevant is standard specification :-<br>**A). M. S. E. B. Incomer:-**<br>01). 1000 A. 3 POLE ACB = 01 No.<br>**B). From M. S. E. B. to DG AMF Panel:-**<br>01). 800 A 3 POLE ACB = 01 No.<br>**C). For APFC Panel:-**<br>01). 800 A 3 POLE ACB = 01 No.<br>**D). For M. S. E. B. Bypass:-**<br>01). 800 A 3 POLE ACB = 01 No.<br>**E). From DG AMF Panel:-**<br>01). 800 A 3 POLE ACB = 01 No.<br>**F). For Main Outgoing:-**<br>01). 800 A 3 POLE ACB = 01 No.<br>**B). Out Going:-**<br>01). 800 A. FOUR POLE MCCB = 01 Nos.<br>02). 400 A. FOUR POLE MCCB = 02 Nos.<br>03). 250 A. FOUR POLE MCCB = 02 Nos.<br>04). 125 A. FOUR POLE MCCB = 02 Nos.<br>05). 63 A. FOUR POLE MCCB = 04 Nos | 01 No. | 19,10,277.66 | 19,10,277.66 |
| 35) | Non C. S. R. | Supply, installation, testing and commissioning of Lighting Panel with ON/OFF LED indicator with Digital Meter of Voltmeter, Ampere and KW Meter, 03 nos. LED Indicator for Incoming supply and four pole Bus Bar as per specification and relevant is standard specification :-<br>**A). Incomer:-**<br>01). 250 A. FOUR POLE MCCB = 01 No.<br>**B). Out Going:-**<br>01). 63 A. 4 POLE MCCB = 06 No.<br>01). 32 A. 4 POLE MCCB = 04 No. | 01 Nos. | 1,46,153.07 | 01,46,153.07 |
| 36) | Non C. S. R | Supply, installation, testing and commissioning of Power Panel with ON/OFF indicator with Digital Meter of Voltmeter, Ampere and KW Meter, 03 nos. LED Indicator for Incoming supply and four pole Bus Bar as per specification and relevant is standard specification :-<br>**A). Incomer:-**<br>01). 400 A. 4 POLE MCCB = 01 No.<br>**B). Out Going:-**<br>01). 250 A. FOUR POLE MCCB = 04 Nos.<br>02). 125 A. FOUR POLE MCCB = 20 Nos. | 01 No | 2,68,807.67 | 02,68,807.67 |
| 37) | 6-7-10 | Supplying and erecting 100 kVAR, 415 V Three phase, 50 cycles, THYRISTER SWITCHED MICRO APFC PASSIVE FILTER PANEL, consisting of suitable steps of APP type capacitor units confirming to IS-13585 ( Part– I) 1994 with harmonic filter reactors, as per specification no ESD-APFC | 01 Nos. | 2,79,833.29 | 02,79,833.29 |
| 38) | 1-2-11 | Supplying and erecting PVC trunking (PVC casing-capping) of size 32 mm with accessories on wall / ceiling as per specification No: WG-MA/CON, para no. 1.1.2 | 2000 Mtrs | 52.84 | 01,05,680.00 |
| 39) | 1-3-6 | Supplying & erecting mains with 2 x 4 sq.mm FRLSH copper PVC insulated wire laid in provided conduit / trunking / inside pole / Bus bars or any other places. as per specification No:WG-MA/BW | 3500 Mtrs. | 95.498 | 03,34,243.00 |
| | | | | Amount Rs.:- | 1,33,02,050.023 |

E/-

| Sr. No. | C.S.R. No. | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Carry Forward Amount Rs.:- | 1,33,02,050.023 |
| 40) | Non CSR | Supplying & erecting Axial Exhaust Fan 230 V, A.C, 12 watts, 50 cycles, size 150mm, speed 1400/2000 RPM complete erected in position with necessary materials. | 100 Nos. | 800.00 | 00,80,000.00 |
| 41) | 1-3-4 | Supplying & erecting mains with 1 x 2.5 sq.mm FRLSH copper PVC insulated wire laid in provided conduit / trunking / inside pole / Bus bars or any other places. As per specification No: WG-MA/BW. (For Earthing) | 3500 Mtrs. | 34.999 | 01,22,496.50 |
| 42) | 1-8-6 | Supplying and erecting modular type switch 16 / 20 A with indicator, ISI mark, approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 256 Nos | 157.04 | 00,40,202.24 |
| 43) | 1-8-11 | Supplying and erecting modular type 3 pin 6 / 16A multi socket with safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 128 Nos | 195.45 | 00,25,017.60 |
| 44) | 1-8-26 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 1 module complete duly erected in an approved manner. | 256 Nos. | 143.85 | 00,36,825.60 |
| 45) | 1-8-27 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 2 module duly erected in an approved manner | 128 Nos. | 150.04 | 00,19,205.12 |
| 46) | 1-8-34 | Supplying and erecting unbreakable concealed type modular switch box with double mounting plate for 1 module duly erected flush to wall with required chiseling and finishing with cement morter / POP as per required to match the background in an approved manner | 10 Nos. | 234.54 | 00,02,345.40 |
| 47) | 1-8-35 | Supplying and erecting unbreakable concealed type modular switch box with double mounting plate for 2 module duly erected flush to wall with required chiseling and finishing with cement morter / POP as per required to match the background in an approved manner. | 10 Nos. | 235.78 | 00.02.357.80 |
| 48) | 5-4-10 | Supplying & erecting triple pole and neutral distribution board (TPNDB) with door surface/ flush mounted SP / TP MCBs of 12poles / 4 ways, on iron / G.I. frame / wooden board. (Vertical Busbar type) as per specification No. SW-SWR/MCBDB | 16 Nos. | 5,333.96 | 00,85,343.36 |
| 49) | 5-3-2 | Supplying, erecting & marking SPMCB 6A to 32A, C-series (for motor/power) in provided distribution board as per specification No. SW-SWR/MCB | 192 Nos. | 191.74 | 00,36,814.08 |
| 50) | 5-6-8 | Providing, erecting & commissioning 4 pole RCCB of electro magnetic type with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 100A. complete as per specification No. SW-RCCB/RCCB | 16 Nos. | 5,732.11 | 00,91,713.76 |
| 51) | 3-1-8 | Supply and erecting ISI mark midget type 3.0 Ltr instant type water heater of ABS plastic body 3 kW compiling IS3412 of 1994 heating element 230/250 Volts 50 Cycle A.C. supply with inlet and outlet, thermostatic control and thermal cutoff with 3 core PVC flexible wire leads duly tested and marking Sr. No. and date of erection. | 64 Nos. | 4,485.68 | 2,87,083.52 |
| | | | | Total Amount Rs.:- | 1,41,31,455.003 |
| | | | | Round Up Rs.:- | 1,41,31,455.00 |

उपरोक्तप्रमाणे विद्युतीकरण कामाचे अंदाजपत्रक तयार करुन आर्किटेक्ट मे.निकम पाटील असोशिएटस, श्रीरामपूर यांचेकडे तपासणीकरीता पाठविण्यात आले होते. आर्किटेक्ट मे.निकम पाटील असोशिएटस, श्रीरामपूर यांनी सदरील अंदाजपत्रक तपासून योग्य असलेबाबत पत्र पाठवून कळविले आहे.

**मागणी :-** उपरोक्तप्रमाणे,

०१). निघोज निमगांव येथील साई पालखी निवा-यातील **B** या देणगी मिळालेल्या इमारतीच्या इलेक्ट्रीकल लोडकरीता २५० केव्हीए क्षमतेचा एक जनरेटरसेट, २०० केव्हीए क्षमतेचे कॉम्पॅक्ट सबस्टेशन (ESS), मीटरींग क्युबीकल, मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेल, सब पॅनेल, केबल इत्यादि खरेदी करुन बसविणे व नविन वायरींग करणेकरीता रक्कम रु.१,४१,३१,४५५/- मात्र अपेक्षित खर्च आहे.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची मान्यता घेतल्यानंतर मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची तसेच महाराष्ट्र शासनाची मान्यता घ्यावी लागेल.

०२). सदरच्या २५० केव्हीए एक जनरेटर सेट करीता, २०० केव्हीए कॉम्पॅक्ट सबस्टेशन (ESS)करीता, जनरेटर रुम रुमचे ठिकाणी बांधकाम विभागामार्फत जनरेटर करीता प्लॅट फॉर्म व कॉम्पॅक्ट सबस्टेशन करीता प्लॅटफॉर्मचे बांधकाम करणे, जनरेटर रुममध्ये केबलकरीता नाली तयार करणे व जनरेटर व सबस्टेशन रुमचा मोकळा भाग बंदिस्त करणे ही कामे बांधकाम विभागाकडून करावी लागणार आहेत.

७/-

०३). सदर ठिकाणी उच्चदाब वीज जोडणी करुन घ्यावयाची असल्याने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे सिक्युरिटी डिपॉझिट भरावे लागेल.

०४). मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाची तसेच महाराष्ट्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर इलेक्ट्रीकल कामाकरीता बाहेरील ठेकेदार यांचेकडून ई-निविदा मागविणेकामी जादा खपाच्या मुंबई येथील इंग्रजीतील एका वर्तमानपत्रात, पुणे येथील मराठीतील एका वर्तमानपत्रात तसेच स्थानिक मराठीतील एका वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी सादर करावा लागणार आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे अ.क्र.०१ ते ०४ करीता मान्यता मिळणेस विनंती.

29/11/24

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

LAB-meeting-167-2021



विषय क्र.- १९

# मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर

## (कामगार विभाग)

---

**विषयः- महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (रोजगाराचे विनियमन व सेवेच्या शर्ती) कायदा २०१७ मधील तरतुदींनुसार कंत्राटी कर्मचा-यांना सार्वजनीक सुट्टया, रजा लागू करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेबाबत...**

**टिपणी -**

उपरोक्त संदर्भीय श्री साईबाबा व साईनाथ हॉस्पीटल येथील कंत्राटी परिचारक व परिचारीका व आऊटसोर्स व सर्व पॅरामेडिकल स्टाफ यांचा दि.३०.०४.२०२१ रोजीचा बेमुदत कामबंद अंदोलन व मागण्याबाबतचा अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झाला सदर अर्जात त्यांनी दिनांक १२.०५.२०२१ रोजी कामबंद अंदोलनाबाबत नमुद केले असुन खालील प्रमाणे मागण्या केलेल्या आहे.

५) सेवेत कायम करण्यात यावे अथवा समान काम समान वेतन मिळावे अथवा रु.४४९००/- वेतन मिळावे.

६) महिन्याला किमान ०४ पगारी सुट्टया मिळाव्यात ( आठवडा सुटी व्यतरिक्त )

७) मेडिक्लेम मिळावा.

८) कोविड- १९ विमा संरक्षण मिळावे.

तसेच कंत्राटी परिचारक व परिचारीका इनसोर्स व आऊटसोर्स व सर्व पॅरामेडीकल स्टाफ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटल यांचा बेमुदत काम बंद आंदोलन (१२ मे जागतिक परिचर्या दिन) विषयीचे दि.०६/०३/२०२१, दि. २९/०३/२०२१, दि.३०/०३/२०२१ व दि.१५/०४/२०२१ रोजीचे अर्ज प्राप्त झाला असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

कंत्राटी पॅरामेडीकल कर्मचा-यांच्या वेतन संरचनेत ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारणा करून सुधारीत वेतन वाढ मिळावी पॅरामेडीकल स्टाफ व लिपीक, टंकलेखक, वाहन चालक यांच्या कामातील तफावत लक्षात घेऊन वेतन वाढ मिळावी.

**मिळणारे वेतन पुढील प्रमाणे (कंत्राटी)**

| अ.नं. | विभाग | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन | मिळणारे वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | लिपीक | ५२००-२२०० | १९०० | १८६२८.५ |
| २ | टंकलेखक | ५२००-२२०० | १९०० | १८६२८.५ |
| ३ | वाहन चालक | ५२००-२२०० | १९०० | १८६२८.५ |
| ४ | नर्सेस + पॅरामेडीकल स्टाफ | ९३००-३४८०० | ४४०० | १८६२८.५ |

लिपीक टंकलेखक, वाहन चालक, काम तांत्रीक व नर्सेस, फिजीओथेरेपी डॉक्टर, लॅब टेक्नीशीयन, ब्लड बॅंक टेक्नीशयीयन, एक्स रे, एमआरआय टेक्नीशीयन, डायलेसिस टेक्नीशियन, फार्मासिस्ट, (काम अत्यावश्यक) काम वेगवेगळे पण पगार समान ही बाब लक्षात घेऊन लवकरात लवकर निर्णय घ्यावा.

उपरोक्त विषयान्वये आम्ही सर्व कंत्राटी परिचारक व परिचारीका (१८०) व पॅरामेडीकल स्टाफ श्री साईबाबा संस्थानमध्ये ११ ते ... वर्षे कंत्राटी पॅरामेडीकल स्टाफ म्हणुन कार्यरत आहोत. आम्ही वेळोवेळी सुधारीत वेतनवाढीसाठी आपल्या प्रशासनाकडे अर्ज केले आहे. परंतु प्रशासनाने त्याची अजुन कोणत्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. दि.२४/०९/२०२० रोजी काम बंद आंदोलन मागे घेण्यास सांगीतले होते व त्यावेळी रूग्णांची हेळसांड होऊ नये म्हणुन व एक सामाजीक भान ठेऊन आंदोलन मागे घेतले होते. परंतु संस्थान प्रशासनाने आजपर्यंत कुठल्याही प्रकारची मागणी मान्य केलेली नाही.

**मागण्या पुढीलप्रमाणे.**

अनुक्रमे १. किमान वेतन ४४,९००/- मिळावे.

संदर्भ १. श्री साईबाबा संस्थान दि.२०/११/२०१४ विषय नं.२९, निर्णय क्र.१०१६ प्रत सादर.

२.भारत सरकार आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय विभाग परिचर्या दि.२०/०९/२०१६ कोर्ट जजमेंट ईन दि.२९/०१/२०१६ WP©527/2011 प्रत सादर. महाराष्ट्र परिचर्या परिषद दि.२४/११/२०१७ M.N.C./G/CIR-417/28779/2017 प्रत सादर.

पा नं ०२ वर ...

३. स्पष्टीकरण १. इतर कर्मचा-यांच्या व परिचारीका, पॅरामेडीकल यांच्या कामात फरक असल्याने वेतन वाढ मिळावी. उदा. साथीच्या रोगामध्ये काम करत असतांना सरळ पेशंटच्या संपर्कात येऊन आजारी पडण्याचे प्रमाण जास्त आहे. आणि स्वताचा जीव कुटुंबाचा जीव धोक्यात घालुन जीवावरती उदार होऊन जोखीम पत्कारावी लागते.
२. परमानंट स्टाफ व त्यांच्या कुटुंबातील सदस्य आजारी पडल्यास ज्याप्रमाणे बाहेरील हॉस्पिटलचे व मेडीसीन बिल अदा केले जाते तसे कॉन्ट्रॅक्ट परिचारीकांना दिले जात नाही म्हणुन पगार वाढ मिळावी. (इतर कर्मचा-यांच्या तुलनेत परिचारीकांचा सरळ पेशंटशी संपर्क आहे.)
३. लिपीक, टंकलेखक, वाहन चालक व परिचारीका यांच्या कामातील जोखीम बघुन वेतन वाढ मिळावी.
अनुक्रमे २. महिन्याला किमान ४ पगारी सुट्या मिळाव्यात. (आठवडा सुट्टया व्यतिरीक्त)
**संदर्भ-** श्री साईबाबा संस्थान व मे. सुमित फॅसिलीटीज लि.पुणे प्रा.लि.कॅम्प, शिर्डी श्री साईबाबा संस्थान यांच्यातील करार जा.नं.एसएसएस/वशी/२८९७/२०२० ३१ डिसेंबर २०२०.
**स्पष्टीकरण१** – कायमच पेशंटच्या संपर्कात असल्याने आजारी पडण्याचे प्रमाण जासत आहे. याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. आरोग्यावर होणारा परीणाम हा इतर होणत्याही हानीपेक्षा गांभीर्यदायक आहे.
२. सुट्टया न मिळाल्यामुळे मानसिक व शारिरीक थकवा येऊन याचा परीणाम पेशंटच्या कॉलीटी केअर वरती होतो.
अनुक्रमे ३. मेडिक्लेम मिळावा.
**संदर्भ-** श्री साईबाबा संस्थान व मे. सुमित फॅसिलीटीज लि. पुणे प्रा लि पुणे कॅम्प शिर्डी श्री साईबाबा संस्थान यांच्यातील करार जा.नं.एसएसएस/वशी/२८९७/२०२०/३१ डिसेंबर २०२०.
स्पष्टीकरण १. ड्युटीवर असतांना कर्मचारी आजारी पडल्यास, काही कमी जास्त झाल्यास अथवा एखादी दुर्घटना घडल्यास अवलंबीताच्या उदर निर्वाहासाठी मेडीक्लेम मिळावा.

या प्रमुख मागण्यांसाठी वेळोवेळी अर्ज करून देखील सुध्दा संस्थान प्रशासन कोणत्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. तरी संस्थान प्रशासनाने सकारात्मक भुमिका घेऊन आमच्या मागण्या पुर्ण करण्यासाठी कार्यवाही करावी ही नम्र विनंती.

इतर कंत्राटी स्टाफला त्यांच्या बेसीक सॅलरी व ग्रेड पे प्रमाणे पेमेंट दिले जाते. परंतु नर्सेस स्टाफला त्यांच्या बेसीक सॅलरी व ग्रेड पे प्रमाणे पेमेंट दिले जात नाही.

श्री साईबाबा संस्थान संचलित येथे Covid Center येथे आत्तापर्यंत जवळपास ४००० रूग्णांनी चांगल्या प्रकारे उपचार घेऊन Covid वरती मात केलेली आहे. यात कंत्राटी नर्सेस, लॅब टेक्नीशीयन, एमआरआय, एक्स रे टेक्नीशीयन, फार्मासिस्ट व इतर टेक्नीशीयन यांचा मोलाचा वाटा आहे.
साईबाबा व साईनाथ हॉस्पिटल येथे इतर हॉस्पिटलच्या तुलनेत IPD, OPD चे प्रमाण जास्त आहे. MJPJAY योजनेअंतर्गत होणा-या शस्त्रक्रियेत Shri Saibaba Super Speciality Hospital महाराष्ट्रात अव्वल आहे. तरी यामुळे येथील कंत्राटी नर्सेस व टेक्नीशियन, फार्मासिस्ट व इतर यांचेवर कामाचा अती ताण तणाव आहे.
कामाचे स्वरूप बघता देण्यात येणारे वेतन हे तुटपुंज्या स्वरूपात आहे.

तीन वर्षापासुन सर्व मागण्यांचा पाठपुरावा करीत आहोत. तरी संस्थान प्रशासनाने कुठल्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. तरी संस्थान प्रशासनाने सकारात्मक भुमिका घेऊन आम्हा पॅरामेडीकल स्टाफच्या मागण्या पुर्ण करून आम्हाला न्याय मिळुन द्यावा ही आपणास नम्र विनंती.

४. श्रध्दा सबुरी . . .
५. आम्हाला साईबाबांचे काम बंद पाडण्याची अजिबात ईच्छा नाही. परंतु आज आमचे जीव आणि आमचे कुटुंब धोक्यात आहे. परंतु प्रशासन वेळोवेळी अर्ज करून देखील गांभीर्याने घेत नाही.
६. दि.३० एप्रिल २०२१ अखेर पर्यंत आमच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करावा अथवा आम्ही आमच्या १२ मे (जागतिक परीचर्या दिन) काम बंदच्या भुमीकेवरती ठाम आहोत. बाबत नमुद करण्यात आले आहे.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत कंत्राटी कार्मचारी (इनसोर्स) यांना सध्या खालीलप्रमाणे सुविधा देण्यात येत आहेत.**

१) सध्या उद्योग, उर्जा, कामगार विभाग मंत्रालय, मुंबई यांचे कडील मुळ किमान वेतन दाराबाबत सुधारित अधिसुचना क्र.किवेअ-१०१५-४१८/ प्र.क्र १४०/कामगार-०७ दि. २४.०७.२०१९ नुसार शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट झोन नं.०३ नुसार किमान वेतन आदा करण्यात येत आहे. व उद्योग, उर्जा, कामगार विभागांचे अधिसुचना क्र. किवेअ/ २०२१(१) / कार्या-१०/९२० दि.०५.०२.२०२१ नुसार विशेष भत्ता आदा करण्यात येत आहे. किमान वेतन व विशेष भत्याच्या एकुण रक्कमेवर ४० % वेतनवाढ करुन वेतन आदा करणेत येत आहे. ४० % वेतनवाढ देणे संदर्भातील मा.व्यवसथापन समिती सभा दि.२५.०२.२०१७, निर्णय क्र.१४१- अन्वये संस्थानमध्ये कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायद्यानुसार कामबंद आंदोलन करता येत नाही, त्यांच्या मागण्या त्यांनी संबंधीत कंत्राटदारास कळवायला हव्या आहेत.

पा नं ०३ वर

सदरहू कंत्राटी कर्मचारी शासनाचे किमान वेतनदरावर सुमारे १५ ते १६ वर्षापासुन कंत्राटदारामार्फत संस्थानमध्ये काम करत आहेत व वयोमर्यादा ओलांडल्यामुळे त्यांनी इतरत्र सेवेची संधी गमावलेली आहे. या सर्व बाबींचा विचार करता सहानुभूतीच्या दृष्टीने संस्थानमध्ये आजअखेर कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना दि.०१ एप्रिल, २०१७ पासून त्यांच्या प्रती दिन वेतनावर ४०% वाढ देण्यात यावी, तसेच संबंधीत कंत्राटदारामार्फत सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचा रु.१० लाख पर्यंतचा अपघात विमा उतरविणेत यावा, असा धोरणात्मक निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

कामगार कायद्यानुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना फक्त किमान वेतन देणे बंधनकारक आहे. महागाई निर्देशंकानुसार त्यामध्ये वेळोवेळी शासनाकडून जी वाढ मंजूर करणेत येते, ती कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येते. किमान वेतन निश्चित करताना शासनाकडून चालू महागाई व इतर अनुषंगिक घटक यांचा विचार करुन किमान वेतन निश्चित केले जाते. त्यामुळे किमान वेतनापेक्षा जास्त वेतनवाढ देणे बंधनकारक नाही. मात्र सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून विशेष बाब म्हणून वरीलप्रमाणे ४०% वेतनवाढ भविष्यात कोणतीही वेतनवाढ न मागण्याच्या अटीवर मंजुर करणेत आली. परंतु सदरहू वेतनवाढ देणेपुर्वी कंत्राटदारामार्फत या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संघटनेकडून संस्थान विरोधात यापुढे आंदोलन करणार नाही,असे हमीपत्र लिहून घेण्यात यावे. असा, पारीत झालेला आहे.

२) तसेच कंत्राटी कर्मचा-यांना रजा देणे संदर्भात मा. व्यवस्थापन समिती सभा दि १३.१२.२०१८ निर्णय क्र. ७२८ अन्वये कायदयातील तरतूदी नुसार कंत्राटी कामगारांना भरपगारी आठवडा (Paid Weekly Off) सुट्टया देण्यात येत आहे.

३) सदर कंत्राटी कर्मचा-यांना मोफत वैद्यकिय सेवा व नियमावलीस मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९.११.२०११ निर्णय क्र.७६५(२३) अन्वये मान्यता मिळालेली असुन, सदर नियमावली दि.०१.०१.२०१२ पासुन लागु करण्यात आलेली आहे सदर वैद्यकिय उपचारासाठी वार्षिक मर्यादा व सेवेचा कालावधी खालीलप्रमाणेः-

०१ ते ०५ वर्षे पर्यंत सेवा झालेले कंत्राटी कर्मचारी बिलमर्यादा रक्कम रू.३०,०००/- पर्यंत

०५ ते १० वर्षे पर्यंत सेवा झालेले कंत्राटी कर्मचारी बिलमर्यादा रक्कम रू.४०,०००/- पर्यंत

१० वर्षे व त्यापेक्षा अधिक सेवा झालेले कंत्राटी कर्मचारी बिलमर्यादा रक्कम रू.५०,०००/- पर्यंत

४)सदर कंत्राटी कर्मचा-यांना एकुण हजर दिवसावर ८.३३% प्रमाणे दिपावली निमित्त सानुग्रह अनूदान देण्यात येत आहे.

५)सदर कुशल, अकुशल कंत्राटी कर्मचा-यांना संबंधित ठेकेदारामार्फत गणवेश, ओळखपत्र देण्यात येते.

६)तसेच संस्थानकडे ठेकेदारामार्फत काम करीत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांस नुकसान भरपाई अधिनियमन १९२३(वर्कमन कॉम्पेनसेशन ॲक्ट,१९२३ नुसार कंत्राटी कर्मचा-यांचा रु.१० लाख पर्यंतचा विमा उतरविण्यात येतो.त्याकामी विम्याची,अंशदानाची रक्कम संस्थान कंत्राटदारास अदा करते.

या व्यतिरीक्त सदर कंत्राटी कामगारांना इतर कायदेशीर आर्थीक देणी, सुविधा देणेची जबाबदारी ही करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार संबंधित कंत्राटदाराची आहे.

याबाबत संबंधित ठेकेदार यांचेशी निविदेतील व कार्यादेशातील अटी व शर्ती मान्य असलेबाबत करारनामा करण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना-**

श्री साईबाबा संस्थानला कंत्राटी पध्दतीने कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी दरवर्षी निविदा प्रक्रिया राबवून ठेकेदारांची नेमणूक करण्यात येऊन त्यांना विभागांना लागणारे कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी आदेश देण्यात येतात. सध्या दि.०१.०१.२०२१ ते दि.३१.१२.२०२१ अखेर संस्थानमधील विविध विभागांना आवश्यक असणा-या अकुशल, कुशल कर्मचारी पुरविणेकामी मे.बी.व्ही.जी.इंडिया.लि.पुणे यांना व मे. सुमित फॅसेलिटीज मॅनेजमेंट, पुणे व दि.०१.०३.२०२० ते दि.३०.०६.२०२१ अखेर सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी मे.मॉडर्न वीर रेज सिक्युरिटी पुणे व मे.ईगल हंटर सोल्युशन, दिल्ली या दोन ठेकेदारांची नेमणूक करण्यात आलेली असून,

श्री साईबाबा संस्थानचे सध्या ४० विभाग कार्यरत असुन कंत्राटदारामार्फत संस्थानमध्ये आज अखेर इनसोर्स पध्दतीने एकूण २०३८ अकुशल, कुशल , सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी काम करत आहे.

सध्या रुग्णालये विभाग अंतर्गत कंत्राटी कर्मचारी ( इनसोर्स) कार्यरत असुन सदर कर्मचारी पुढील प्रमाणे – कुशल, अकुशल( कार्यालयीन कामकाज) तसेच पॅरामेडीकल वर्गवारीनुसार काही कर्मचारी काम करत आहेत. त्यामध्ये कंत्राटी परिचारक व परिचारीका., फिजीओथेरपिस्ट- टेक्नीशियन, डायलेसिस टेक्नीशियन, एम.आर.आय.टेक्नीशियन, फार्मासिस्ट, लॅब टेक्नीशियन, बायोमेडीकल टेक्नीशियन,ई.डी.पी.टेक्नीशियन, ई.सी.जी. टेक्नीशियन, एक्स-रे टेक्नीशियन,.बी.ए.एम.एस. इत्यादि सर्व कंत्राटी पध्दतीने काम करत आहेत. तसेच संस्थानचे इतर विभागामध्येही इतर कंत्राटी ( इनसोर्स) कर्मचारी काम करीत आहे.

**पानं ०४ वर ...**

संस्थानमध्ये कंत्राटदारामार्फत काम करीत असलेल्या सर्व कंत्राटी कर्मचा-यांना सध्या महाराष्ट्र शॉप ॲण्ड कमर्शियल इस्टॅब्लिशमेंट ॲक्ट,१९४८, झोन नं.३ नुसार किमान वेतन दिले जात असून, अधिक किमान वेतनावर ४०% वेतनवाढ देणेत येत आहे. तसेच सदरचे कंत्राटी कर्मचा-यांना मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१३.१२.२०१८ निर्णय क्र ७२८ नुसार भरपगारी आठवडा (Paid Weekly Off) देण्यात येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या ठरावाचे अवलोकन केले असता. मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम-२०१७ मध्ये कामगारांना देय असलेल्या रजा व सुट्टया यांचा ठरावात समावेश नाही व अधिनियमात नमुद नसलेल्या ०४ साप्ताहिक सुट्टयाचे वेतन त्यांना आदा करावे लागत आहे. आता, रुग्णालयाकडील कंत्राटी परिचारक व परिचारिका व आऊटसोर्स तसेच सर्व पॅरामेडिकल स्टाफ यांनी आठवडा सुट्टया व्यतरिक्त किमान चार पगारी सुट्टया मिळाव्या अशी मागणी केली आहे.

तथापि, आता महाराष्ट्र शॉप्स ॲंड इस्टॅब्लिशमेंटस ॲक्ट-२०१७ नुसार कार्यवाही करावयाची झाल्यास यापुर्वी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१३.१२.२०१८ निर्णय क्र ७२८ नुसार कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येत असलेल्या भरपगारी आठवडा (Paid Weekly Off) सुट्टया बाबत सदरचा ठराव निरस्त करुन खालील नमुद प्रमाणे रजा, सुट्टया बाबत कार्यवाही करता येईल.

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र दुकाने व व्यापारी संस्था (नोकरीचे नियम व सेवाशर्तीच्या अटी) कायदा २०१७ ची अंमलबजावणी १९ डिसेंबर २०१७ पासून संपूर्ण महाराष्ट्रात सुरु केलेली आहे. नव्या कायद्याच्या अंमलबजावणमुळे यापूर्वीचा महाराष्ट्र दुकाने व व्यापारी संस्था अधिनियम १९४८ हा कायदा रद्द झाला आहे.

**महाराष्ट्र शॉप ॲण्ड कमर्शिअल इस्टॅब्लिशमेंट ॲक्ट,२०१७ रजेबाबत खालील तरतूदी आहेत.**

ठेकेदारामार्फत लावण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना नव्या तरतुदीप्रमाणे प्रत्येक कंत्राटी कर्मचा-यास एका कॅलेंडर वर्षात २४० दिवस किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी काम केलेल्या प्रत्येक कर्मचा-याला-

०१) प्रत्येक कंत्राटी कर्मचा-यास साप्ताहिक सुट्टी देण्यात येईल.तथापि, उद्योग, उर्जा व कामगार विभाग मंत्रालय , मुंबई यांचे कडील अधिसुचनेत (छ) किमान वेतनामध्ये साप्ताहिक सुट्टीच्या वेतनाचा समावेश असेल असे नमुद आहे.

०२) प्रत्येक कंत्राटी कामगाराला प्रत्येक कॅलेंडर वर्षात ८ दिवसांची भरपगारी किरकोळ रजा देता येईल व अशी रजा प्रत्येक तिमाहिला संबंधित कामगाराच्या रजा खात्यात जमा करण्यात येईल. अशी रजा घेतली गेली नाही. तर ती वर्षा- अखेरीस रद्द करण्यात येईल.

०३) प्रत्येक कामगारास त्याने काम केलेल्या प्रत्येक २० दिवसांसाठी १ दिवसाची भरपगारी रजा पुढील वर्षात देता येईल. तथापि, एका वर्षात ३ महिन्यांपेक्षा कमी नसलेल्या कालावधीसाठी नोकरीवर असलेल्या प्रत्येक कंत्राटी कर्मचारी त्याने काम केलेल्या प्रत्येक ६० दिवसाला ५ दिवसांपेक्षा कमी नसलेल्या कालावधीच्या सलग किंवा अन्यथा रजेस पात्र होईल. प्रत्येक कंत्राटी कामगार जास्तीत जास्त ४५ दिवसांची रजा साठवू शकेल.

०४) तसेच कंत्राटी कर्मचारी प्रत्येक वर्षात ८ राष्ट्रीय सणांच्या सुटयांसाठी पात्र राहील. (ज्यामध्ये २६ जानेवारी, १मे, १५ ऑगस्ट व २ ऑक्टोबर ) व उर्वरित ४ दिवस सणांच्या सुट्टया आपापसात चर्चा करुन देता येईल.

**विभागाचा अभिप्राय:-**

०१) महाराष्ट्र शॉप ॲण्ड कमर्शिअल इस्टॅब्लिशमेंट ॲक्ट,२०१७ नुसार प्रत्येक कंत्राटी कर्मचा-यास साप्ताहिक सुट्टी द्यावी लागेल.तथापि, उद्योग, उर्जा, कामगार विभाग मंत्रालय, मुंबई यांचे कडील मुळ किमान वेतन दाराबाबत सुधारित अधिसुचना क्र.किवेअ-१०१५-४१८/ प्र.क्र १४०/कामगार-०७ दि. २४.०७.२०१९ नुसार शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट झोन नं.०३ नुसार प्रत्येक कामगारास दिले जाणारे किमान वेतनात साप्ताहिक सुट्टीच्या वेतनाचा समावेश असल्याने, या व्यतरिक्त वेगळी भरपगारी साप्ताहिक सुट्टी देय होत नाही. (टिप-उद्योग, उर्जा व कामगार विभाग मंत्रालय,मुंबई यांचे कडील अधिसुचनेत (छ) किमान वेतनामध्ये साप्ताहिक सुट्टीच्या वेतनाचा समावेश असेल असे नमुद आहे. )

०२) प्रत्येक कंत्राटी कामगाराला प्रत्येक वर्षात ८ दिवसांची भरपगारी किरकोळ रजा देता येईल व अशी रजा प्रत्येक तिमाहिला संबंधित कामगाराच्या रजा खात्यात जमा करण्यात येईल. संस्थानने कंत्राटदारास दिलेल्या कार्यादेशातील मुदतीत किरकोळ रजा देता येईल. अशी रजा घेतली गेली नाही. तर ती वर्षा- अखेरीस रद्द करण्यात येईल.

**पा नं ०५ वर ...**

०३) प्रत्येक कंत्राटी कर्मचा-यांने एका वर्षात २४० दिवस किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी काम केलेल्या प्रत्येक २० दिवसांसाठी १ दिवसाची भरपगारी रजा देता येईल. म्हणजे एकावर्षात सदर कंत्राटी कर्मचा-यास १८ रजा देय होतील. प्रत्येक कंत्राटी कामगार जास्तीत जास्त ४५ दिवसांची रजा साठवू शकेल. तथापि, संस्थान दर वषी नविन ठेकेदारांची नेमणुक करीत असल्याने ठेकेदाराची गुदत संपण्याच्या शेवटच्या महिन्यात कर्मचा-यांच्या खात्यावर जमा झालेल्या रजेमधून त्याने घेतलेल्या भरपगारी रजा वजा जाता शिल्लक रजेचे रोखीकरण करुन रककम आदा करता येईल. जेणेकरुन नविन ठेकेदाराची नेमणूक झाल्यावर त्यांना त्याच्या कार्यारंभ आदेशा पासून रजेचा हिशोब ठेवता येईल.

०४) तसेच कंत्राटी कर्मचारी प्रत्येक वर्षात ८ राष्ट्रीय सणांच्या सुटयांसाठी पात्र राहील. (ज्यामध्ये २६ जानेवारी, १मे, १५ ऑगस्ट व २ ऑक्टोबर ) व उर्वरित ४ दिवस सणांच्या सुट्टया आपापसात चर्चा करुन देता येईल. सदर सुट्टया राष्ट्रीय सणाचे दिवशीच घ्यावा लागतील. विभाग प्रमुख हे त्या ठेकेदारास राष्ट्रीय सणांच्या सुटयांबाबत वेळोवेळी कळवतील सदर रजा/सुट्टयांचे रेकॉर्ड लेखी स्वरुपात रितसर अर्ज भरुन संबंधित ठेकेदार /विभाग प्रमुख यांना ठेवावे लागेल.

उपरोक्त अधिनियमातील बदलानुसार कंत्राटदारामार्फत काम करीत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना द्यावयाच्या सार्वजनीक सुट्टया, किरकोळ व हक्काची रजा लागू करणेबाबतची बाब धोरणात्मक असल्याने प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर सादर करावा लागेल.

**प्रस्ताव-**

**अ)** १) संस्थान मधील/ हॉस्पीटल मधील सर्व (इनसोर्स) कंत्राटी कामगारांना महाराष्ट्र शॉप ॲण्ड कमर्शिअल इस्टॅब्लिशमेंट ॲक्ट,२०१७ नुसार अनुज्ञेय रजा लागू करणे व प्रस्तावात नमूद केल्यानुसार कार्यवाही करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय घेणे.

२) कंत्राटी कामगारांचे रजेसंदर्भात मा.व्यवस्थापन समितीचे या पुवीचे सर्व निर्णय निरस्त करणे.

किंवा

**ब)** सध्या कंत्राटी कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार पूर्ण महिन्याचे वेतन-३० दिवस (किमान वेतनामध्ये साप्ताहिक सुट्टीच्या वेतनाचा समावेश असेल असे - उद्योग, उर्जा व कामगार विभाग मंत्रालय , मुंबई यांचे कडील अधिसुचनेत नमुद आहे.) अधिक मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१३.१२.२०१८, निर्णय क्र.७२८ अन्वये कंत्राटी कर्मचा-यांना ०४ भरपगारी आठवडा सुट्टी देण्यात येत आहे. सदर निर्णयाप्रमाणे कार्यवाही चालू ठेवावी किंवा कसे.

उपरोक्त **'अ'** किंवा **'ब'** बाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

११/६/१८

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

8/6

विषय क्र.- २०



लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग

**मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय**

---

**विषय :- मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी, प्रो.प्रा. सोन्याबापु गंगाधर शेळके यांना देण्यात आलेल्या कामाचा ठेका रद्द करून, त्यांना काळया यादीत (Black List) समाविष्ट करणेसाठी मान्यता मिळणेबाबत....**

**टिपणी,**

**प्रस्तावना** - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील सन २०१९-२०२० करीता मोतीचुर लाडु, सुटी बुंदी तयार करुन पॅकींग करुन देणे व बर्फी प्रसाद तयार करुन देणेबाबत मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांना जा.नं.एसएसएस/वशी-लाडुप्रसाद/१८१७/२०१९, दि.१२/०८/२०१९ रोजीचे कार्यादेशान्वये, दि.१६/०८/२०१९ पासुन दि.१५/०८/२०२० अखेर कंत्राट देणेत आलेले असुन, त्याबाबत दि.०७/०९/२०१९ रोजी संबंधित ठेकेदारासोबत ०१ ते ३७ अटी-शर्तींचा करारनामा करणेत आलेला आहे. सदर कंत्राटाची मुदत दि.१५/०८/२०२० रोजी संपुष्टात आल्याने, त्यांना दि.१३/०७/२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील विषय क्र.४४ निर्णय क्र.३९८ नुसार जा.नं.एसएसएस/वशी-लाडुप्रसाद/११०१/२०२०, दि.२०/०८/२०२० रोजीचे मुदतवाढ आदेशान्वये, दि.१६/०८/२०२० रोजीपासुन सध्याच्या आहे त्याच दराने व आहे त्याच अटी-शर्तींवर ऑक्टोंबर २०२० अखेर किंवा नविन ठेकेदाराची ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

सदर कंत्राटबाबत झालेल्या करारनाम्यातील अटी-शर्ती क्र.१५ मध्ये- "पार्टी नं ०२ यांनी कामास लावलेल्या कामगारांचे नियमित पगार/वेतन वाटप किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार किमान वेतन दराप्रमाणे व पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३९ चे तरतुदीस अनुसरून महिना पुर्ण झाल्यानंतर पुढील महिन्याचे १० तारखेचे आत विहित मुदतीत पुर्ण करण्याची कायदेशीर जबाबदारी पार्टी नं.०२ वर राहिल. कामगारांचे पगार वाटप बॅंक अकाऊंट पद्धतीने करणे पार्टी नं.०२ वर बंधनकारक राहील. कामगारांचे पगार १० तारखेपर्यंत न केल्यास त्यानंतरच्या विलंबासाठी प्रती कामगार प्रतीदिन किमान रू २०/- इतका दंड आकारला जाईल व तो देयकामधुन ताबडतोब वसुल केला जाईल" असे नमुद आहे. सदर अटी-शर्तीचे पालन करणे ठेकेदारावर बंधनकारक आहे.

संबंधित ठेकेदारास त्यांचेमार्फत लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे कामास लावणेत आलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचा-यांची मासिक वेतन त्यांचे बॅंक खाती आदा करुन त्याबाबतची बीले व अनुषंगीक कागदपत्रे (जसे - बॅंक यादी, पगारपत्रक, पी.एफ. चलन व जीएसटी चलन इ.) इकडील कार्यालयास तातडीने जमा करणेबाबत समक्ष कार्यालयात बोलावुन सुचना/समज व त्याबाबत जा.नं.एसएसएस/वशी-लाडुप्रसाद /२८५९/२०१९, दि.२८/१०/२०१९ रोजी व जा.नं.एसएसएस/वशी-लाडुप्रसाद/३०९६/२०१९, दि.११/११/२०१९ रोजीची नोटीस देण्यात आली होती.

**तसेच** जा.नं.एसएसएस/वशी-लाडुप्रसाद/६९/२०२०, दि.०१/०४/२०२०, ७०/२०२०, दि.१५/०४/२०२०, ९२/२०२०, दि.२०/०८/२०२०, ९५/२०२०, दि.२८/०८/२०२०, ९९/२०२०, दि.१०/०९/२०२०, १४०२/२०२०, दि.१४/०९/२०२०,व जा.क्र.एसएसएस/ वशी-लाडुप्रसाद/१६७२/२०२०, दि.०१/१०/२०२० रोजीचे पत्रान्वये, माहे एप्रिल, मे, जुन जूलै व ऑगस्ट २०२० चे बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचा-यांची मासिक वेतन त्यांचे बॅंक खाती आदा करुन, त्याबाबतची बीले व अनुषंगीक कागदपत्रे (जसे - बॅंक यादी, पगारपत्रक, पी.एफ. चलन व जीएसटी चलन इ.) इकडील कार्यालयास तातडीने जमा करणेबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुसार मे. शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी (प्रो.प्रा. श्री सोन्याबापु शेळके) यांनी त्यांचेकडील कामास असलेल्या कंत्राटी कामगारांचे माहे एप्रिल २०२० चे वेतन रु.५,५४,७०७/- मात्रचा कार्पोरेशन बॅंकेचा चेक क्र.३५०७२६, दि.२०/०८/२०२० रोजी युनियन बॅंक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांचेकडे संबंधित कर्मचा-यांच्या नावाच्या यादीसह जमा करुन, त्याची पोहोच इकडील कार्यालयास दि.२०/०८/२०२० रोजी दुपारी जमा केली होती. त्यासअनुसरून मे. शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांचेमार्फत मोतीचुर लाडु, बुंदी व बर्फी प्रसाद निर्मितीचे काम करणा-या कुशल व अकुशल कामगारांना माहे एप्रिल २०२० महिन्यातील कोव्हीड-१९ चे बीलात दर्शविल्याप्रमाणे (PF, CGST, SGST सह) एकुण रुपये ८,४०,५०७/- चे बील सादर केले असुन, त्यांनी करारनाम्यातील अटी-शर्ती क्र.१५ चा भंग केल्याने त्यांना रु. २,१०,०८०/- इतकी दंडाची रक्कम व (TDS) इतर वजावटी करून त्यांचे माहे एप्रिल २०२० चे बीलातील उर्वरीत रु.६,०५,४९७/- इतकी रक्कम, मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांचे बॅंक खात्यावर माहे एप्रिल २०२० चे वेतनापोटी दि.१०/०९/२०२० रोजी श्री साईबाबा संस्थानचे लेखाशाखा विभागामार्फत RTGS व्दारे वर्ग करणेत आली आहे. त्यानुसार त्यांनी वेतन आदा केलेबाबतची अनुषंगीक कागदपत्रे (जसे - पगारपत्रक, पी.एफ. चलन व जीएसटी चलन इ.) दि.२०/०९/२०२० रोजी इकडील कार्यालयास जमा केली होती.

दि.०१/१०/२०२० रोजी आवक क्र.५७४७,चे (इकडील कार्यालयास प्राप्त दि.१२/१०/२०२०) पत्रान्वये ठेकेदाराकडील काही कंत्राटी कर्मचा-यांनी त्यांचे माहे एप्रिल २०२० चे वेतन बॅक खाती जमा झाले नसल्याबाबत तक्रार केली आहे.

त्यासअनुसरुन उपरोक्त पत्रात नमुद केलेल्या तक्रारीबाबत चौकशी करणेकामी संबंधीत कर्मचा-यांपैकी काही कर्मचा-यांना दुरध्वनीवर संपर्क करून त्यांना त्यांचे माहे एप्रिल २०२० चे वेतन त्यांचे बॅक खात्यावर जमा झाले किंवा नाही याबाबत खात्री करणेकामी पासबुकाची (अद्यावत नोंदी घेतलेल्या) छायांकीत प्रत लाडु विभागामध्ये जमा करणेबाबत कळविले होते. त्यानुसार त्यांचेकडील एका कर्मचा-याने अद्यावत केलेल्या पासबुकाची छायांकीत प्रत इकडील कार्यालयात जमा केली आहे.

सदरचे पासबुक तपासले असता, त्यामध्ये संबंधितांचे खात्यावर माहे एप्रिल २०२० चे वेतन जमा झालेबाबत दिसुन आले नाही. यावरुन अर्जातील तक्रारीनुसार एकुण १०४ कर्मचा-यांचे माहे एप्रिल २०२० चे वेतन संबंधीत बॅकेने कर्मचा-यांच्या खात्यावर वर्ग केल्याचे दिसुन आले नाही.

याबाबत श्री भगतराम कुमावत, शाखा प्रबंधक - कार्पोरेशन बॅक (सध्या युनियन बॅक ऑफ इंडीया) शाखा-शिर्डी यांचेकडे दुरध्वनीवरुन चौकशी केली असता, मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांना यादी व चेक मिळाल्याची आम्ही पोहोच दिली आहे. तथापि, त्यांचे सदर दिवशी त्यांचे बॅक खात्यावर पैसे शिल्लक नसल्याचे सांगितले व त्यांच्या खात्यावर संस्थानकडुन रक्कम जमा झाल्यानंतर मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांनी सदर कर्मचा-यांचा माहे एप्रिल २०२० चे वेतन त्यांचे खात्यावर जमा न करता श्री सागर साहेबराव खरात यांचे नावे चेक देऊन रु.३,५०,०००/- इतकी रक्कम सदरचे खात्यातुन काढुन घेतली असल्याचे सांगितले. म्हणजेच ठेकेदार मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी प्रो.प्रा- श्री सोन्याबापु गंगाधर शेळके यांनी त्यांचेकडील कर्मचा-यांना त्यांचे खात्यावर वेतन जमा केले असलेबाबत बॅकेत जमा केलेला चेक व कर्मचा-यांची बॅक यादीची छायांकीत प्रत पोहोच म्हणुन देऊन संस्थानची फसवणुक केली आहे.

सदरबाबत दि.२१/१०/२०२० रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात संबंधीत बॅक शाखा व्यवस्थापक व ठेकेदार मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांचेतर्फे (त्यांचा मुलगा) श्री चंद्रकांत सोन्याबापु शेळके यांना समक्ष बोलवुन चौकशी केली असता, सदर कर्मचा-यांचे माहे एप्रिल २०२० महिन्याचे वेतनाचा चेक व कर्मचा-यांच्या नावाची यादी बॅकेत जमा केल्याची पोहोच दिली. प्रत्यक्षात कामगारांचे बॅक खात्यावर वेतन जमा केले नसलेबाबत त्यांनी कबुल केले आहे व त्याच वेळी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी संबंधीतास त्यांना संस्थानने अदा केलेल्या रक्कमेचा चेक देणेबाबत तोंडी निर्देश दिले होते.

त्यानुसार मे. ठेकेदार मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांनी दि.२२/१०/२०२० रोजी कारपोरेशन बॅकेचा चेक क्र.३५०७३०, दि.३१/१०/२०२०, रक्कम रू.६,३०,४२७/- मात्रचा चेक संस्थानचे लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे जमा केला होता, सदरचा चेक दि.२६/१०/२०२० रोजी लेखाशाखा विभागाकडे जमा केला होता, सदरचा चेक स्टेट बॅक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांचेकडे Clearing करीता पाठविला असता बॅकेने "Fund Insufficient" असे कारण देऊन, दि.०२/११/२०२० रोजी संस्थानकडे परत पाठविला आहे व चेक बाऊन्स झालेप्रकरणी संस्थानला रु.२९५/- इतके रिटर्न चार्जेस आकारले आहेत.

दि.२८/१०/२०२० रोजी मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांनी त्यांचेकडे कामास असलेले बाह्यस्त्रोत कर्मचारी यांना माहे एप्रिल -२०२० चे वेतन त्यांचे बॅक खाती वर्ग करून त्यांचेकडील ०८ कर्मचा-यांची अद्यावत बॅक पासबुकाच्या छायांकित प्रती इकडील कार्यालयास जमा करण्यात आल्या होत्या, सदरच्या जमा केलेली पासबुक (छायांकित प्रती) तपासली असता ठेकेदार मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांनी संबंधीत कर्मचा-यांना माहे एप्रिल -२०२० चे वेतन त्यांचे बॅक खाती अदा केले असल्याचे दिसुन आले आहेत. सदरच्या ०८ कर्मचा-यांच्या पासबुकांच्या छायांकित सादर केल्या, व उर्वरीत कर्मचा-यांच्या पासबुकाच्या छायांकीत प्रती नंतर जमा करतो असे ठेकेदाराने सांगितले होते.

. तथापि, सदरबाबत त्यांनी सांगितलेप्रमाणे माहे एप्रिल-२०२० चे वेतन संबंधीत कर्मचा-यांच्या बॅक खात्यावर जमा केले किंवा नाही याबाबत चौकशी करणेकामी दि.३१/१०/२०२० रोजी सकाळी ११.३० वा. कार्पोरेशन बॅक, शाखा-शिर्डी येथे मी स्वत: व लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाचे लिपीक – श्री विलास सोनवणे सोबत जाऊन बॅकेचे शाखा प्रबंधक – श्री भगतराम कुमावत यांचेशी समक्ष चर्चा करून, मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांचेकडील कर्मचा-यांचे वेतनाबाबत चौकशी केली असता, त्यांनी आमचेकडे एकुण ३१ कर्मचा-यांची यादी सादर करुन रुपये – १,८८,२४३/- इतकी रक्कम संबंधित ३१ कर्मचा-यांच्या खाती वर्ग केली असलेबाबतची माहिती दिली. तदनंतर कर्मचा-यांचे वेतन खाते असलेली युको बॅक, शाखा-शिर्डी येथे जाऊन वेतनाबाबत समक्ष चौकशी केली असता, केवळ ३१ कर्मचा-यांचे खात्यावर रक्कम जमा झाले असलेबाबत माहिती मिळाली, म्हणजे मे. शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांनी ७३ कर्मचा-यांचे वेतन अद्यापपावेतो त्यांचे खातेवर जमा केलेले नाही असे दिसुन आले.

यापुर्वी सन २०१६ मध्येही उपरोक्त नमुद केलेप्रमाणेच सध्याचे ठेकेदार यांचा मुलगा श्री चंद्रकांत सोन्याबापु शेळके (शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर) यांचेकडुनही अशाच प्रकारे संस्थानमध्ये श्री साई प्रसादालय विभागाचे चपाती पुरी व अन्नपाकिटे यांचे ठेका असतांना उद्भवली होती, त्यावेळी त्यांना दंड करून, आंतिम ताकीत पत्र देवुन देखील कामात सुधारणा न झाल्याने दि.०२/०२/२०१६ रोजीचे

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०२, निर्णय क्र. ७३ अन्वये, काळया यादीत समाविष्ट करण्यात आले होते. तथापी शिवसाई केटरर्स अॅण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर यांना काळया यादीत समाविष्ट करण्यात आल्याने सदर ठेकेदाराने त्याचे एजन्सीचे नाव बदलुन ते मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी प्रो.प्रा- श्री सोन्याबापु गंगाधर शेळके या नावाने कागदपत्रे तयार करून,संस्थानचे लाडुव बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील मोतीचुर लाडु, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद तयार करण्याचा तसेच इतर विभागाकडील कामाचे ठेके मिळविले आहेत.

सबब, संबंधित ठेकेदार यांनी त्यांचेशी करणेत आलेल्या करारनाम्यातील अटी-शर्ती क्र.२८ मध्ये – "उपरोक्त सर्व अटी-शर्ती व्यतीरिक्त निविदेतील अटी-शर्तीतील एक किंवा अनेक अटी-शर्तीचा भंग पार्टी नं.०२ किंवा त्यांचे कामगारांकडुन झाल्यास पार्टी नं०२ ची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन ती संस्थानखाती जमा करुन घेणेत येईल, त्याबाबत पार्टी नं.०२ चे कोणतीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही" असे नमुद केले आहे. सदरबाबत संबंधित ठेकेदार यांनी कामास लावलेल्या कर्मचा-यांचे माहे एप्रिल २०२० चे व मे, जुन जुलै व ऑगस्ट, व सप्टेंबर २०२० चे वेतन अदा केले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

सदरबाबत जा.नं.एसएसएस/वशी-लाडुप्रसाद/१८०३/२०२०, दि.१२/१०/२०२० व जा.नं.एसएसएस /वशी-लाडुप्रसाद/१९७५/२०२०, दि.२८/१०/२०२० अन्वये, कारणे दाखवा नोटीस बजावुन, "तुम्ही करारनाम्यातील अटी-शर्ती क्र.१५ चे उल्लंघन केलेले असुन, तुमचेवर करारनाम्यातील अटी-शर्ती क्र.२८ मध्ये नमुद केलेप्रमाणे कारवाई करणेत येवुन, तुम्हांस काळया यादीमध्ये समाविष्ट का करणेत येवु नये?" याबाबत लेखी खुलासा सदरची नोटीस मिळालेपासुन ०७ दिवसाचे आत इकडील कार्यालयास सादर करावा. सात दिवसांचे आत लेखी खुलासा इकडील कार्यालयास प्राप्त न झाल्यास एकतर्फी निर्णय घेणेत येईल व त्यानुसार पुढील योग्य ती उचीत कार्यवाही करणेत येईल, असे कळविण्यात आले होते. तथापी, त्यांनी अद्यापावेतो लेखी खुलासा सादर केलेला नाही. यावरून त्यांना सदरची बाब मान्य असल्याचे दिसुन येत आहे.

उपरोक्तप्रमाणे परिस्थिती विचारात घेता, मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी, प्रो.प्रा.- श्री सोन्याबापु गंगाधर शेळके यांची संस्थान खाती जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रू.७,५०,०००/- जप्त करून व त्यांच्या कामाचा ठेका रद्द करून त्यांना पुढील ०३ वर्षे कालावधीकरीता काळया यादीत समावेश करणेत यावा असे विभागाचे नम्र मत आहे.

तसेच मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी, प्रो.प्रा- श्री सोन्याबापु गंगाधर शेळके यांना काळया यादीत समाविष्ट केलेनंतर त्यांचेमार्फत लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे कामास असलेल्या १०४ बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचा-यांचे माहे मे, जुन जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोंबर २०२० चे आदा न केलेले वेतन नविन ठेकेदाराची नेमणुक झालेनंतर संबंधित ठेकेदाराशी चर्चा करुन त्यांचेमार्फत सदरचे वेतन आदा करता येईल. याबाबत टिपणी सादर करण्यात आली होती, सदरचे टिपणीवर मा. उपमुख्यकार्यकारी अधिकारी यांनी "याबाबत मा.मुख्यलेखाधिकारी यांचे अभिप्राय घ्यावे" असे निर्देश दिले होते. त्यासअनुसरुन सदरची टिपणी मुख्यलेखाधिकारी यांचेकडे अभिप्राय घेणेकामी सादर करण्यात आली होती. त्यावर मुख्यलेखाधिकारी यांनी -

१) नविन ठेकेदाराची नेमणुक झालेनंतर सदर ठेकेदाराला विभागाने वेतनाबाबतचे सर्व तपशिल पुरविल्यास त्यांचेमार्फत वेतन आदा करण्यास नाही.

२) कर्मचारी भविष्य निर्वाह निधीचा भरणा विलंबाने होणार असल्याने त्याबाबतचे विलंब शुल्क संस्थानने ठेकेदाराला आदा करावे लागेल. सदर विलंब शुल्काची रक्कम जुन्या ठेकेदाराच्या देय रकमेतुन वसुल करता येईल असे अभिप्राय दिले आहेत.

तरी संबंधित बिले ही कोव्हीड -१९ च्या कर्मचारी कामावर नसतांनाही मानवतेच्या दृष्टीकोनातुन किमान वेतनाच्या ५० टक्के आदा करणे आवश्यक होते, तथापि, ठेकेदाराचे नाकर्तेपणामुळे वेतन आदा करणेस विलंब झाला असुन, तातडीची गरज व विषेश बाब म्हणुन मानवतेच्या दृष्टीकोनातुन फक्त उपरोक्त थकीत बीले (माहे मे २०२० ते ऑक्टोंबर २०२०) नविन ठेकेदाराची नेमणुक झालेनंतर संबंधित ठेकेदाराशी चर्चा करुन त्यांचेमार्फत सदरचे वेतन आदा करता येईल. तरी मुख्यलेखाधिकारी यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेऊन, त्यानुसार कार्यवाही करता येईल.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-**

**अ)** लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे कामास असलेल्या कर्मचा-यांच्या तक्रारी (वेळेवर पगार न करणे, प्रॉ.फंड व GST इ. कागदपत्रे विहीत वेळेत न सादर करणे) त्यांना केलेला दंड, त्यानंतर त्यांना वेतन आदा करणेबाबत दिलेली पत्रे व नोटीसा, करारनाम्यातील अटी-शर्ती क्र.१५,२५,२८, व ३६ चा भंग, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश वजा सुचना विचारात घेता, मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी, प्रो.प्रा- श्री सोन्याबापु गंगाधर शेळके यांची संस्थान खाती जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रू.७,५०,०००/- जप्त करून व त्यांच्या कामाचा ठेका रद्द करून त्यांना पुढील ०३ वर्षे कालावधीकरीता काळया यादीत समावेश करणेत यावा असे वाटते.

**ब)** मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी, प्रो.प्रा- श्री सोन्याबापु गंगाधर शेळके यांना काळया यादीत समाविष्ट केलेनंतर त्यांचेमार्फत लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे कामास असलेल्या १०४ बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचा-यांचे माहे मे २०२० ते ऑक्टोंबर २०२० चे आदा न केलेले वेतन नविन ठेकेदाराची नेमणुक झालेनंतर संबंधित ठेकेदाराशी चर्चा करुन त्यांचेमार्फत सदरचे वेतन आदा करता येईल.

तरी मुख्यलेखाधिकारी यांनी दिलेले खालीलप्रमाणे अभिप्राय विचारात घेऊन, त्यानुसार वेतन आदा करणेची कार्यवाही करता येईल.

१) नविन ठेकेदाराची नेमणुक झालेनंतर सदर ठेकेदाराला विभागाने वेतनाबाबतचे सर्व तपशिल पुरविल्यास त्यांचेमार्फत वेतन आदा करण्यास हरकत नाही.

२) कर्मचारी भविष्य निर्वाह निधीचा भरणा विलंबाने होणार असल्याने त्याबाबतचे विलंब शुल्क संस्थानने ठेकेदाराला आदा करावे लागेल. सदर विलंब शुल्काची रक्कम जुन्या ठेकेदाराच्या देय रकमेतुन वसुल करता येईल.

तरी उपरोक्त "**अ**" व "**ब**" मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेसाठीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

(कानुहराज बगाटे, भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(1907)

विषय क्र.- २९

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ
मालमत्ता विभाग



विषय – संस्था साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी संस्थान परिसरात चालवत असलेल्या विविध स्टॉल/गाळयांचे जागा भाडे माफ होणेबाबत मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील जा.नं.श्रीसासंएक्रेसो/१९४/२०२१ दि.०५/०३/२०२१ रोजीचे पत्र.

टिपणी -

**अधिनियमातील तरतूद -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना** – मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी यापूर्वी त्यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/१२/२०२० दि.२०/०५/२०२० रोजीच्या पत्रान्वये विषयांकित आशयाचे संस्थानकडे पत्र सादर केलेले असून त्यासोबत जोडलेल्या परिशिष्टातील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या मालकीच्या उक्त सोसायटीस विविध व्यवसायासाठी वापरास दिलेल्या एकूण ३९ ठिकाणच्या जागांपैकी ३७ ठिकाणच्या जागांमधील व्यवसाय दि.१८/०३/२०२० पासून कोरोना या साथरोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी भारत सरकार व महाराष्ट्र शासनाने अत्यावश्यक सेवा वगळता संपूर्ण देशात लॉकडाऊन तसेच संचारबंदी आदेश लागु केलेले आहेत. त्यामुळे दि.२८/०३/२०२० पासून शिर्डी येथे श्री साईबाबा मंदिर दर्शनासाठी बंद करण्यात आलेले आहे. यास्तव संस्थेमार्फत चालविणेत येणारे उपरोक्त थंडपेय,दुध व दुग्धजन्य पदार्थ,प्रसाद नॉव्हेल्टी,जनरल स्टोअर्स,शालेय साहित्य विक्री, मोबाईल क्लोकरुम,मोफत पादत्राणे व मोफत बॅग क्लोकरुम इ. सर्व व्यवसाय बंद करणेत आलेले आहेत. त्यामुळे संस्थेचे कर्मचारी यांचे वेतन व इतर खर्च भागविणे संस्थेला शक्य होत नाही. तरी लॉकडाऊनचे कालावधीसाठीचे उपरोक्त व्यवसायांसाठी संस्थान मालकीच्या संस्थेला भाडेतत्वावर वापरास दिलेल्या जागांचे मासिक भाडे माफ होणेकामी संस्थानकडे विनंती केलेली आहे.

सदर पत्राचे अनुषंगाने संस्थानचे मा.तदर्थ समितीचे दि.१९/१२/२०२० रोजीच्या सभेपुढे श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थान मालकीच्या भाडेतत्वावर वापरास दिलेल्या उपरोक्त तक्त्यातील गाळे/स्टॉल/जागांचे भाडे माहे एप्रिल २०२० पासून ते लॉकडाऊन उठेपर्यंत म्हणजेच श्रीं चे मंदिर दर्शनासाठी खुले होईपर्यंतचे मासिक भाडे माफ करणे अथवा न करणे अथवा अंशत: माफ करणेच्या निर्णयार्थचा प्रस्ताव सादर करणेत आला. त्यात निर्णय क्रं.५६० अन्वये सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला असलेचा निर्णय झालेला आहे.

दरम्यानचे काळात मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/१९४/२०२१ दि.०५/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये "संस्था श्री साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी संस्थान मान्यतेने संस्थान परिसरात मोफत पादत्राणेगृह व मोफत बॅग क्लोकरुम व्यवस्था तसेच थंडपेय,दुध व दुग्धजन्य पदार्थ,प्रसाद,नॉव्हेल्टी,जनरल स्टोअर,शालेय साहित्य विक्री व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम चालवून साईभक्तांना सेवा सुविधा पुरवित आहे.

जगभरात कोरोना या साथ रोगाचा प्रादुर्भाव वाढल्याने भारतात कोरोना या साथ रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी भारत सरकार व महाराष्ट्र शासनाने अत्यावश्यक सेवा वगळता संपूर्ण देशात लॉकडाऊन तसेच जमावबंदी लागु करण्यात आल्याने संस्था साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी चालवत असलेलया सर्व सेवा सुविधा दि.१८/०३/२०२० पासून ते दि.१५/११/२०२० अखेर बंद ठेवण्यात आल्याने कर्मचारी वेतन व इतर खर्चामुळे संस्थेचेही मोठे नुकसान झाले आहे.

संस्थेस संस्थान मालकीच्या खालील नमुद केलेल्या ठिकाणी त्यासमोर दर्शविलेले व्यवसाय करणेकामी जागा वापरास दिलेल्या आहेत.

| अ.नं. | जागेचा तपशिल | क्षेत्र | व्यवसाय | मासिक भाडे रक्कम रु. | एकूण रक्कम रु. (दि.१८/०३/२०२० ते दि.१५/११/२०२० पर्यंत) |
|---|---|---|---|---|---|
| १ | साईआश्रम-१ आर ब्लॉकचे दक्षिणेस. | १०० चौ.फुट | दुग्धजन्य पदार्थ,प्रसाद विक्री व जनरल स्टोअर | ८९९/- | ७,१४८/- |
| २ | साईआश्रम-२ | १०० चौ.फुट | दुग्धजन्य पदार्थ व थंडपेय विक्री स्टॉल. | ३६५/- | २,९०२/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | साईप्रसादालय, इन गेट लगत | १०० चौ.फुट | प्रसाद विक्री स्टोअर | ३६५/- | २,९०२/- |
| ४ | साईनाथ मंगल कार्यालय परिसर | १०० चौ.फुट | दुग्धजन्य पदार्थ व थंडपेय विक्री स्टॉल. | १,३०५/- | १०,४०४/- |
| ५ | द्वारावती निवासस्थान परिसर | १०० चौ.फुट | नॉव्हेल्टी स्टोअर व क्लोकरुम. | ५९५/- | ४,७३१/- |
| ६ | साईबाबा भक्तनिवासस्थान डी ब्लॉक गाळा नं.२ | ३१९ चौ.फुट | प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर | ६,०४०/- | ४८,०२८/- |
| ७ | साईबाबा भक्तनिवासस्थान डी ब्लॉक गाळा नं.३ | ३१९ चौ.फुट | प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर | ६,०४०/- | ४८,०२८/- |
| ८ | साईबाबा भक्तनिवासस्थान डी ब्लॉक गाळा नं.४ | ३१९ चौ.फुट | प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर | ६,०४०/- | ४८,०२८/- |
| ९ | साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था गेटजवळ. | १०० चौ.फुट | शालेय साहित्य विक्री केंद्र | ७१४/- | ५,६७७/- |
| १० | साईबाबा इंग्लिश मेडीयम स्कुल गेटजवळ. | १०० चौ.फुट | शालेय साहित्य विक्री केंद्र | ७१४/- | ५,६७७/- |
| ११ | साईबाबा कन्या विद्या मंदिर गेटजवळ. | १०० चौ.फुट | शालेय साहित्य विक्री केंद्र | ७१४/- | ५,६७७/- |
| १२ | साईनाथ रुग्णालय कॅन्टीन समोर. | १०० चौ.फुट | जनरल स्टोअर,दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय विक्री स्टॉल | ५९५/- | ४,७३१/- |
| १३ | साईप्रसाद परिसर सुलभ शौचालया शेजारी | १२० चौ.फुट | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | १,४२२/- | ११,३०७/- |
| १४ | साईआश्रम-१ परिसर | १४४ चौ.फुट | थंडपेय विक्री स्टॉल | ५,८४५/- | ४६,४७७/- |
| १५ | साईआश्रम-१ परिसर | ९० चौ.फुट | थंडपेय विक्री स्टॉल | ५,८४५/- | ४६,४७७/- |
| १६ | साईआश्रम-२ परिसर | ९० चौ.फुट | थंडपेय विक्री स्टॉल | ५,८४५/- | ४६,४७७/- |
| १७ | साईप्रसादालय परिसर | ८० चौ.फुट | थंडपेय विक्री स्टॉल | ५,८४५/- | ४६,४७७/- |
| १८ | द्वारावती निवासस्थान परिसर | ९० चौ.फुट | थंडपेय विक्री स्टॉल | ५,८४५/- | ४६,४७७/- |
| १९ | साईउद्यान इमारत परिसर | ९० चौ.फुट | थंडपेय विक्री स्टॉल | ५,८४५/- | ४६,४७७/- |
| २० | साईप्रसाद इमारत नं.२ परिसर | १६८ चौ.फुट | थंडपेय विक्री स्टॉल | ५,८४५/- | १२,४४५/- दि.१८/०३/२०२० ते दि.२१/०५/२०२०) |
| २१ | साईबाबा भक्तनिवासस्थान परिसर | १२० चौ.फुट | थंडपेय विक्री स्टॉल | ५,८४५/- | ४६,४७७/- |
| २२ | साईआश्रम भाग-१ परिसर | ९० चौ.फुट | प्रसाद विक्री स्टोअर | ५,८४५/- | ४६,४७७/- |
| २३ | द्वारावती इमारत परिसर | ९० चौ.फुट | प्रसाद विक्री स्टोअर | ५,८४५/- | ४६,४७७/- |
| २४ | साईउद्यान इमारत परिसर | १५० चौ.फुट | प्रसाद विक्री स्टोअर | ५,८४५/- | ४६,४७७/- |
| २५ | साईआश्रम-१ परिसर | ९० चौ.फुट | जनरल स्टोअर | ५,८४५/- | ४६,४७७/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २६ | बस स्टॅन्डसमोर जुने स्वागतकक्षाचे जागेत. | १५० चौ.फुट | बॅग क्लोकरुम (मोफत सुविधा) | १,६७१/- | १३,२८८/- |
| २७ | सुलभ शौचालय इमारतीत. | ६२५ चौ.फुट | बॅग क्लोकरुम (मोफत सुविधा) | ११,७९०/- | ९३,७५०/- |
| २८ | साईप्रसाद नं.२ परिसर | २५० चौ.फुट | बॅग क्लोकरुम (मोफत सुविधा) | ११,७९०/- | २५,१०२/- (दि.१८/०३/२०२० ते दि.२१/०५/२०२०) |
| २९ | साईप्रसाद नं.१ उत्तर बाजूस | ६४ चौ.फुट | प्रसाद विक्री स्टोअर | ११,७९०/- | ९३,७५०/- |
| ३० | साईप्रसाद नं.१ उत्तर बाजूस | ९६ चौ.फुट | दुध व दुग्धजन्य पदार्थ विक्री स्टोअर | ११,७९०/- | ९३,७५०/- |
| ३१ | साईप्रसाद नं.१ उत्तर बाजूस | २०० चौ.फुट | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | ११,७९०/- | २५,१०२/- (दि.१८/०३/२०२० ते दि.२१/०५/२०२०) |
| ३२ | साईउद्यान इमारत परिसर | १५० चौ.फुट | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | ११,७९०/- | ९३,७५०/- |
| ३३ | साईप्रसाद इमारत परिसर | १८० चौ.फुट | पादत्राणेगृह (मोफत सुविधा) | ११,७९०/- | ९३,७५०/- |
| ३४ | साईउद्यान इमारत परिसर | १५० चौ.फुट | पादत्राणेगृह (मोफत सुविधा) | ११,७९०/- | ९३,७५०/- |
| ३५ | मंदिर परिसर गेट नं.१ लगत | ८८ चौ.फुट | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | १,१५८/- | ९,२०८/- |
| ३६ | मंदिर परिसर गेट नं.४ लगत | २०४ चौ.फुट | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | १,३१६/- | १०,४६४/- |
| ३७ | मंदिर परिसर गेट नं.४ परिसर | | पादत्राणेगृह (मोफत सुविधा) | मोफत | -- |
| ३८ | साईनाथछाया इमारत | ४३७.२१ चौ.फुट | बॅग क्लोकरुम (मोफत सुविधा) व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम. | ११,४८६/- | ९१,३३२/- |
| ३९ | गुरुस्थान मंदिराशेजारी (दक्षिणेस) | ३७.७० चौ.फुट | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | ११,४१४/- | ९०,७६०/- |
| | | | एकूण | | १५,५६,६८८/- |

उपरोक्त तक्त्यातील अ.नं.१२ व अ.नं.२६ या ठिकाणचे व्यवसाय दरम्यानचे काळात चालू होते. तसेच अ.नं.२०,२८ व ३१ या व्यवसायांचे पत्राशेड संस्थानचे आदेशान्वये दि.२२/०५/२०२० रोजी काढून घेवून जागा संस्थानचे ताब्यात देण्यात आली आहे. त्या व्यतिरिक्त उर्वरित सर्व व्यवसाय/गाळे दि.१८/०३/२०२० पासून ते दि.१५/११/२०२० या कालावधीत बंदच होते.

कोरोना या साथ रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी भारत सरकार व महाराष्ट्र शासनाने अत्यावश्यक सेवा वगळता संपूर्ण देशात लॉकडाऊन तसेच संचारबंदी आदेश लागु केलेले आहेत. त्यामुळे दि.१८/०३/२०२० पासून शिर्डी येथे श्री साईबाबांचे मंदिर दर्शनासाठी बंद करणेत आलेले आहे. यास्तव संस्थेमार्फत चालविणेत येणारे उपरोक्त थंडपेय,दुध व दुग्धजन्य पदार्थ,प्रसाद नॉव्हेल्टी जनरल स्टोअर,शालेय साहित्य विक्री मोबाईल क्लोकरुम मोफत पादत्राणेगृह व मोफत बॅग क्लोकरुम इ.सर्व व्यवसाय बंद करणेत आलेले होते. त्यामुळे संस्थेचे कर्मचारी वेतन व इतर खर्च भागविणे संस्थेला शक्य झालेले नाही.

तरी लॉकडाऊनचे कालावधीसाठीचे उपरोक्त व्यवसायासाठी संस्थान मालकीच्या संस्थेला भाडेतत्वावर वापरास दिलेल्या जागांचे मासिक भाडे रु.१५,५६,६८८/- (अक्षरी रु.पंधरा लाख छप्पन्न हजार सहाशे अठ्ठयाऐंशी मात्र) माफ होणेकामी इकडेस विनंती केलेली आहे."

सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर चक्रीय पध्दतीने मान्यतेसाठी सादर करणेत आला होता. मा.अध्यक्ष,तदर्थ समिती,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.आस्था/१७८/२०२१ दि.१०/०५/२०२१ अन्वये सदरचा विषय एकतर तात्काळ करण्यासारखा नाही किंवा त्यावर सविस्तर चर्चा/विनिमय होणे गरजेचे आहे, असे अभिप्राय देवून विषय संचिका संस्थानकडे पाठविली आहे.

**विभागाचा अभिप्राय** - लॉकडाऊनचे कालावधीत संस्थेमार्फत चालविणेत येत असलेले उपरोक्त व्यवसाय बंद करणेत आलेले असले तरी संस्थान मालकीच्या उपरोक्त ठिकाणच्या मिळकती उक्त संस्थेच्याच ताब्यात होत्या. शिवाय उक्त संस्थे व्यतिरिक्त इतर विभाग/संस्था/व्यक्ती यांना संस्थान मालकीच्या भाडेतत्वावर वापरास दिलेल्या जागांचे संबंधात देखील संबंधीत विभाग/संस्था/व्यक्ती या उक्त कालावधीतील जागा वापराचे भाडे माफ करुन मिळणेकामी विनंती करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**प्रस्ताव** - मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील उपरोक्त दि.०५/०३/२०२१ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थान मालकीच्या उपरोक्त परिशिष्टात दर्शविलेल्या भाडेतत्वावर वापरास दिलेल्या गाळे/स्टॉल/जागांचे भाडे अ.नं.१२ व २६ या ठिकाणचे व्यवसाय उक्त काळात चालू असलेने त्या जागा वगळून इतर ३७ ठिकाणच्या गाळे/स्टॉल/जागांचे दि.१८/०३/२०२० पासून ते दि.१५/११/२०२० या कालावधीसाठी होणारे एकूण भाडे रक्कम रु.१५,३८,६६९/- इतके श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना माफ करणे अथवा न करणे अथवा अंशत: माफ करणेच्या निर्णयार्थ सादर.

11/6/21

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ
मालमत्ता विभाग

विषय - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२५/१/१ क्षेत्र सुमारे ०.३७.१७ आर मध्ये असलेल्या श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालय,शिर्डी ही शाळा स्थलांतरीत करुन त्या ठिकाणी साईबाबा सुपर हॉस्पिटलचा विस्तार (पुनर्बांधणी) करणेबाबत.

टिपणी –

**अधिनियमातील तरतुद** - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम २१(२) मध्ये पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्त व्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग,समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

आणि कलम २१(२)(एक) मध्ये **राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रीडा अकादमी वा संस्था,सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय,दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवुन घेण्यासाठी खर्च करता येईल** वगैरेबाबतची तरतुद आहे. तसेच

**कलम १७(२)(ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील,**

आणि **कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.**

**प्रकरणाची पुर्वपिठीका** – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे शिर्डी येथील सर्वे नं.१२५ (नगरपंचायत मिळकत नं.१६६६) क्षेत्र ४० आर मध्ये खाली नमूद केलेल्या इमारती अहमदनगर एज्यूकेशन सोसायटी, अहमदनगर यांचे श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिर्डी यांचे वापरासाठी देण्यात आलेल्या आहेत.
१) यू आकाराची इमारत.२) रुग्णालय शेजारची नवीन इमारत.३) साई सरस्वती इमारत.
या इमारतींचा तपशिल खालीलप्रमाणे –

| अ.नं. | इमारतीचे नाव | बांधकामाचा प्रकार | वर्ग खोल्या | बांधकामाचे क्षेत्रफळ (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १ | जूनी यू टाईप इमारत | पत्रा छत | ११ वर्ग खोल्या | ०७२०.०८ |
| २ | न्यू स्कूल इमारत (तळ+पहीला मजला) | आरसीसी | ०६ वर्ग खोल्या | ०३७५.१४ |
| ३ | साई सरस्वती इमारत | आरसीसी | १७ हॉल/खोल्या ०३ स्वच्छतागृहे | १४४१.७८ |
| | एकूण | | | २५३७.०० |

वरील तीनही इमारती मिळून २९ वर्ग खोल्या व ०४ हॉल्स मिळून एकूण बांधकाम क्षेत्रफळ (बिल्टअप एरीया) २५३७.०० चौमी येत आहे.

उक्त सर्वे नं.१२५/१/१ क्षेत्र १ एकर ही जमीन व त्यामधील यू आकाराची इमारत दि.०५/०४/१९६१ रोजी संस्थानने अहमदनगर एज्यूकेशन सोसायटी यांचेकडून रक्कम रु.३४,०००/- इतके रकमेस कायम खरेदी घेतलेली आहे. सदर क्षेत्रापैकी ०.०२.८३ आर क्षेत्र शिर्डी नगरपंचायतीचे रस्त्यात गेलेले असलेने उक्त ०.४० आर क्षेत्रापैकी सध्यस्थितीत संस्थान मालकीचे उर्वरित क्षेत्र ०.३७.१७ आर इतके आहे. सदर जागेत संस्थानने प्रथम यू आकाराची (१० खोल्या) इमारत शालेय उपयोगासाठी भाडयाने देणेचे दृष्टीने बांधली. त्यानंतर संस्थानने अहमदनगर एज्यूकेशन सोसायटीस सदर इमारत दि.१५/१०/१९६१ रोजी मासिक भाडे रु.३१०/- ने ठरवून भाडयाने दिली. पाच वर्षांचा भाडेपट्टा दि.०१/०६/१९६२ ते दि.३१/०३/१९६७ व

त्यानंतरचा दहा वर्षांसाठी भाडेपट्टा दि.२८/०५/१९७० रोजी झालेला असून सदर भाडेपट्टयाची मुदत दि.०१/०६/१९६७ पासून दहा वर्षे राहील,असे नमूद आहे. त्यानंतरचा या इमारतीचा लेखी भाडेपट्टा झालेला नाही.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटी,अहमदनगर या संस्थेमार्फत शिर्डी येथील संस्थान मालकीचे उपरोक्त सर्वे नं.१२५/१ जागेमधील पुढील तीन इमारतींमध्ये श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय चालविले जात आहे. १) यू आकाराची इमारत २) नवीन इमारत ३) साई सरस्वती इमारत. या तीन इमारतींपैकी साई सरस्वती इमारतीचे जागेचे थकीत भाडे व कब्जा मिळणेकामी संस्थानमार्फत कोपरगाव कोर्टात पुढीलप्रमाणे केसेस चालू होत्या.

| अ.नं. | कोर्ट प्रकरण |
|---|---|
| १ | अपिल नं.६७/९२ (७९/२००१ हायकोर्टाकडून कोपरगाव कोर्टाकडे वर्ग) |
| २ | अपिल नं.३६०/१९९२ (८५/२००१ हायकोर्टाकडून कोपरगाव कोर्टाकडे वर्ग) |
| ३ | स्पे.मु.नं.१७/१९९२ |
| ४ | स्पे.मु.नं.३२/१९९४ |
| ५ | स्पे.मु.नं.२०५/१९९६ |
| ६ | स्पे.मु.नं.१/२००० |
| ७ | स्पेशल रिव्हीजन अर्ज कर्जाऊ रकमेबाबत नं.९०५/१९९७ |

मध्यंतरीच्या काळात सर्वश्री माजी विश्वस्त भास्कर शंकर बोरावके,चांगदेव ना.डूबे पाटील, शांताराम रं.मिराणे व मधुकर सो.दंडवते व तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांनी दि.१५/०१/२००२ रोजी उपरोक्त दाव्याचा समझोत्याने निकाल करण्याचे संदर्भात अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे पदाधिका-यांशी चर्चा विनिमय केला. त्याप्रमाणे साई सरस्वती इमारतीचे सध्याचे जागेवरुन रुग्णालयाचे दृष्टीने स्थलांतर व साई सरस्वती इमारतीचा ताबा संस्थानला मिळणेचे दृष्टीनेही सर्वांगिण चर्चा झाली. प्रस्तुत चर्चेमध्ये अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे ताब्यात दि.१७/०७/१९८० व तदनंतर दि.२१/०७/१९८२ रोजी दिलेल्या क्षेत्राचे वार्षिक भाडे पी.डब्ल्यू.डी.खात्याने रु.४८,२४०/- इतके ठरवून दिले आहे. त्याप्रमाणे दि.३१/०३/२००२ पावेतो होणारे देय भाडे ऐवजी दहा वर्षांचे भाडयाची रक्कम रु.४८,२४०/- x १०= रु.४,८२,४००/- स्विकारुन कोर्टातील वाद सामोपचाराने मिटविण्यात यावे. त्याचप्रमाणे स्पेशल रिव्हीजन अर्ज नं.९०५/९७ चे संदर्भातील दि.२३/०८/१९९६ पर्यंतचे संस्थानने क्लेम केलेली रक्कम रु.५७,५८३/- स्विकारावी व सदरची केसही मागे घेण्यात यावी,असा विचार झाला होता. तसेच इमारतीचे तीन वर्षाची भाडयाची रक्कम त्वरीत द्यावी व उर्वरित रक्कम तीन समान हप्त्यात फेडण्यात यावी,असा अंतिम विचार झाला. तसेच साई सरस्वती इमारतीचे सध्याचे जागेवरुन स्थलांतर झालेनंतर रुग्णालयाचे दृष्टीने चांगले होईल,असा विचार संस्थानतर्फे मांडला असता संस्थान दुस-या जागेवर इमारत बांधून देत असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव संस्थानकडून प्राप्त झालेनंतर उभयतांचे विचार विनिमयाबाबत निर्णय घेता येईल, अशीही चर्चा झाली आहे व त्याबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२-०३/०३/२००२ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता.

त्यावर निर्णय क्रं.७४ प्रमाणे **यावर सविस्तर चर्चा होवून प्रदिर्घ काळ प्रलंबित असलेला स्थानिक वाद एकदाचा संपुष्टात आणणेच्या दृष्टीने उपरोक्त स्थानिक मा.विश्वस्तांनी वरीलप्रमाणे अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे पदाधिका-यांशी केलेल्या समझोत्यास खास बाब म्हणून मान्यता देण्यात आली. तसेच अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे इमारतीचे दुरुस्तीबाबत प्रस्ताव सादर केला असून तो आवश्यक तपशिल व खर्चाच्या अंदाजासह निर्णयासाठी मा.व्यवस्थापन मंडळाच्या सभेपूढे सादर करावा,असे ठरले.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२-०३/०३/२००२ रोजीचे सभेतील निर्णयाप्रमाणे मे.कोपरगाव कोर्टात चालू असलेली उपरोक्त प्रकरणे दि.२७/११/२००२ रोजी समझोत्याने मागे घेतलेली आहेत.

तदनंतर सन २००५ मध्ये सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणेबाबतचे संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०२/२००५ रोजीचे सभेत **निर्णय क्रं.६६ प्रमाणे "श्री साईबाबांनी त्यांचे हयातीत गोरगरीब व पिडीतांची सेवा केली आहे. याकरीता संस्थानचे नियोजित सुपर स्पेशालिटी सेवेचा लाभ सर्व थरातील रुग्णांना मिळणेसाठी ४०% सेवा धर्मादाय (Charitable) व ६०% सेवा पूर्ण सशुल्क (Paying) रुग्णांसाठी ठेवण्यात याव्यात. यामुळे रुग्णालयासाठी असलेली जागा अपुरी पडेल त्याकरीता नुतन रुग्णालय इमारतीलगत असलेली संस्थानची अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे शाळेसाठी देण्यात आलेली जागा ताब्यात घेवून त्या बदल्यात विद्यालयास इतरत्र पर्यायी इमारत बांधून देण्यात यावी,असे ठरले, "** वगैरेबाबत निर्णय झालेला आहे.

तदनंतर सन २०११ मध्ये मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२८/०८/२०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.६३१ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

**"यावर सविस्तर चर्चा होवून उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. याकामी आर्किटेक्ट नेमण्यात येवून त्यांचे सल्ल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम ३७ अन्वये आवश्यक तो फेरबदल प्रस्ताव तयार करुन तो शिर्डी नगरपंचायतीमार्फत मा.संचालक,नगररचना,पुणे यांचेकडे सादर करणेत यावा,असे ठरले."**

तदनंतर सन २०१५ मध्ये श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय,शिर्डी यांना संस्थान मालकीचे शिर्डी येथील उपरोक्त सर्वे नं.१२५/१ मधील वापरासाठी दिलेल्या जागेच्या करारनाम्याबाबत व भाडेपट्टयाची रक्कम ठरविणेबाबत विषय नं.५८ प्रमाणे मा.त्रिसदस्यीय समितीच्या दि.२८/११/२०१५ रोजीच्या सभेपूढे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

त्यावर निर्णय क्रं.५७६ अन्वये सविस्तर चर्चा होवून **संस्थानच्या शैक्षणिक संकुलास जागा अपुरी पडत असून सध्या कनिष्ठ महाविद्यालय साईआश्रम धर्मशाळा येथे चालू केलेले आहे. शैक्षणिक संकुलासाठी जागेची निकड पाहता श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयाची जागा संस्थानला परत घेणेसाठीची कार्यवाही चालू करावी. सबब श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयास मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२५/१ मधील वापरासाठी दिलेल्या जागेच्या करारनाम्याबाबत व भाडेपट्टयाची रक्कम ठरविणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

त्या अनुषंगाने संस्थानचे विधी विभागामार्फत उक्त जागा संस्थेकडून खाली करुन घेणेकामी संस्थान पॅनलवरील वकील ॲड.जे.के.गोंदकर यांचेमार्फत उक्त संस्थेचे चेअरमन व इतर पदाधिकारी यांना दि.०८/०९/२०१६ रोजी नोटीस निर्गत करण्यात आलेली आहे.

उक्त संस्थेचे पदाधिकारी यांना मा.व्यवस्थापन समितीसमोर चर्चेसाठी दि.१९/०९/२०१६ रोजी उपस्थित राहणेकामी सूचित करणेत आले होते.

तदनंतर प्रमुख कार्यवाह,अहमदनगर एज्यूकेशन सोसायटी,अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.१२७/एईएस २०१६-१७ दि.१९/०९/२०१६ अन्वये पत्र सादर केले असून त्यात त्यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे हॉस्पिटल विस्तारीकरणाचे कामासाठी शाळेची जागा अनुकूल असल्यामुळे संस्थानने मागणी केलेली आहे. शाळेतील विद्यार्थ्यांचे शिक्षणासाठी संस्थानने संस्थेस पर्यायी शाळा बांधून देणार आहात व त्यानुसार संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीने दि.२८/०८/२०११ चे सभेतील निर्णय क्रं.६३१ अन्वये तसा ठरावही संमत केलेला आहे. तरी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शाळेची इमारत त्वरीत बांधून देणेबाबत सत्वर कार्यवाही करावी वगैरेबाबत मजकूर नमूद केलेला असून त्यासमवेत उक्त शाळेच्या इमारतीसंबंधात संक्षिप्त टिपणी व इतर कागदपत्रे आणि संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त दि.२८/०८/२०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.६३१ ची प्रत सादर केलेली आहे.

सदर निर्णयाचे संबंधातील प्रस्तावात शिर्डी येथील सर्वे नं.१२४/११,१२ मधील संस्थान मालकीची १ हेक्टर २० आर जागा (श्री.संजय रामराव शेळके,श्री.विलास रंगनाथ शेळके यांचेकडून खरेदी केलेली) असून ०.८० आर (२ एकर) जागा देता येईल. सदर जागा सध्याचे शाळेपासून अंदाजे १ किमी. अंतरावर आहे. सदर जागेवर शाळा स्थलांतरीत करणेबाबत हरकत नसलेबाबत अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे प्रमुख कार्यवाह यांनी त्यांचेकडील दि.१०/१२/२००८ अन्वयेच्या पत्रान्वये कळविलेले आहे. सदरहू जमीन शिर्डी शहर विकास आराखडयात आरक्षण क्रं.३८ क्रिडांगणाखालील आहे. त्यामुळे या जागेवर शाळा इमारत बांधणेपूर्वी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम ३७ अन्वये आवश्यक तो फेरबदल करावा लागेल,असे नमुद असून सदर प्रस्तावावर निर्णय क्रं.६३१ प्रमाणे उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे. याकामी आर्किटेक्ट नेमण्यात येवून त्यांचे सल्ल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम ३७ अन्वये आवश्यक तो फेरबदल प्रस्ताव तयार करुन तो शिर्डी नगरपंचायतमार्फत मा.संचालक,नगररचना,पुणे यांचेकडे सादर करणेत यावा,असा निर्णय झालेला आहे.

**प्रमुख कार्यवाह,अहमदनगर एज्युकेशन सोसायटी,अहमदनगर यांचेकडील उपरोक्त दि.१९/०९/२०१६ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने इकडील दि.२३/१०/२०१६ रोजीच्या कार्यालयीन टिपणीचे अनुषंगाने संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेकामी खालीलप्रमाणे प्रस्ताव तयार करणेत आला.**

उपरोक्त दि.२८/०८/२०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.६३१ प्रमाणे अद्यापपावेतो कार्यवाही झालेली नाही. परिणामी शिर्डी शहर विकास आराखडयात उक्त सर्वे नं.१२४ पैकीचे क्षेत्र आरक्षण क्रं.३८ क्रिडांगण खालील आहे. त्यात अद्याप बदल झालेला नाही. त्यामुळे संस्थेच्या मागणीप्रमाणे शिर्डी येथील सर्वे नं.१२४/११,१२ मधील संस्थान मालकीचे क्षेत्र १ हेक्टर २० आर पैकी ०.८० आर जागेत उक्त शैक्षणिक संस्थेच्या शाळेसाठी बांधकाम करता येणार नाही.

तथापि १) उक्त शैक्षणिक संस्थेस शाळेचे बांधकाम करुन द्यावयाचे ठरल्यास त्यासाठी अन्य जागा सूचवावी लागेल.

२) उक्त शैक्षणिक संस्थेस शाळेसाठी अन्य जागेत शाळेचे बांधकाम करुन द्यावयाचे झाल्यास विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम २१(२)(ग) प्रमाणे राज्य शासनाच्या पूर्वमंजूरीने कोणतीही शैक्षणिक संस्था,क्रीडा अकादमी अथवा संस्था,सार्वजनिक ग्रंथालय,रुग्णालय, दवाखाना,निराश्रित अथवा शारीरीकदृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय अथवा धार्मिक संस्था

किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी केलेली,कला व साहीत्य या क्षेत्राशी संबंधित असलेली कोणतीही अन्य बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटना अथवा सोसायटी स्थापन करणे व त्यांची देखभाल करणे किंवा स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयींसाठी वाढ होण्यासाठी अशा संस्थांना अथवा व्यक्तींना किंवा शिर्डी नगरपंचायतीला वित्तसहाय्य देणे, अशी तरतूद आहे.

म्हणजेच उक्त संस्थेस शाळेचे बांधकाम करुन द्यावयाचे झाल्यास त्यासाठी शासनाची मान्यता घ्यावी लागेल, असे नम्र मत आहे.

३) उक्त शैक्षणिक संस्थेस शाळेचे बांधकाम करुन द्यावयाचे ठरल्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७ (३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता,राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे.

म्हणजेच उक्त संस्थेस दिर्घ मुदतीसाठी जागा शासनाच्या पूर्वमंजूरीने भाडेकराराने देता येईल,असे नम्र मत आहे.

४) उक्त संस्थेस शाळेचे बांधकाम करुन दिल्यास व सदर जागा संस्थेस भाडयाने दिल्यास महाराष्ट्र नगरपालिका (एकत्रित मालमत्ता कर) नियम १९६९ चे नियम १० (२) - जी कोणतीही इमारत किंवा जमीन निव्वळ शैक्षणिक किंवा धार्मिक कारणासाठी किंवा विनामुल्य वैद्यकीय कारणासाठी सेवा देण्यासाठी वापरण्यात येत आहे, अशा इमारती किंवा जमीनींना नियम ४ व ५ नुसार असेल त्या कराच्या दराच्या निम्म्या दराने कर आकारणी होईल.

**स्पष्टीकरण १** – जी जमीन किंवा इमारत किंवा तिचा भाग, जो शैक्षणिक किंवा धार्मिक किंवा विनामुल्य वैद्यकिय सेवा देणा-या संस्थेला किंवा संस्थानच्या मालकीचा असेल व जो भाडयाने दिला असेल किंवा जो वर दिलेल्या प्रयोजनाखेरीज अन्य प्रयोजनासाठी वापरण्यात येत असेल त्याला सवलत देण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे.

म्हणजेच संस्थानने उक्त संस्थेस शाळा बांधून दिल्यास संस्थानला नगरपालिका करातून सूट मिळणार नाही, तसेच सदर संस्थेकडून संस्थानला मिळणारे भाडयाचे उत्पन्न हे आयकराच्या संदर्भात गणले जाईल, असे नम्र मत आहे.

**तरी अ) उक्त शैक्षणिक संस्थेस शाळेचे बांधकाम करुन द्यावयाचे ठरल्यास त्यासाठी अन्य जागा सूचवावी लागेल. करीता प्रथमत: उक्त संस्थेच्या शाळेसाठी संस्थानमार्फत अन्य जागेत बांधकाम करुन द्यावयाचे किंवा कसे तसेच सदरची जागा पूर्वीप्रमाणे भाडेकराराने द्यावयाची किंवा कसे याबाबतच्या तसेच ब) उक्त अहमदनगर एज्युकेशन सोसायटी यांना त्यांचे शिर्डी येथील श्री साईनाथ माध्य.व उच्च माध्यमिक विद्यालय,शिर्डीसाठी वापरास दिलेली संस्थानची जागा संस्थानला परत मिळणेकामी संस्थान पॅनलवरील वकील ॲड.जे.के.गोंदकर यांचेमार्फत दि.०८/०९/२०१६ रोजी दिलेली नोटीस रद्द करुन त्याबाबत अहमदनगर एज्युकेशन सोसायटीस व पदाधिका-यांना लेखी कळवावे असेबाबत प्रमुख कार्यवाह,अहमदनगर एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.१५८/१६-१७ दि.०८/१०/२०१६ अन्वये इकडेस कळविलेले आहे. उक्त संस्थेस अन्यत्र शाळा बांधून देणेबाबतचा निर्णय झालेला नसल्याने संस्थेस दिलेली नोटीस रद्द न करता तूर्तास स्थगित ठेवता येईल. त्यासाठीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता.**

**तदनुषंगाने संस्थानचे सभा कामकाज विभागाने त्यांचेकडील दि.१७/१२/२०१६ रोजीचे परिपत्रकान्वये सदर प्रस्तावात श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिर्डी ही शाळा कशाच्या आधारे संस्थान बांधून देणार याचा बोध होत नाही. आवश्यकतेनुसार चर्चा करुन नंतरच सदरचा प्रस्ताव सादर करावा असेबाबत संस्थानचे मा.अध्यक्ष महोदय यांनी दि.१२/१२/२०१६ रोजी सुचना दिलेल्या असलेबाबत इकडेस कळविलेले आहे. त्यामुळे सदरचा प्रस्ताव अद्यापही अनिर्णित राहीलेला आहे.**

दरम्यानचे काळात श्री.संदिप विजय कुलकर्णी व श्री.उत्तमराव रंभाजी शेळके,माजी विश्वस्त,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी साईबाबा सुपर हॉस्टिलच्या पुनर्बांधणीबाबत संस्थानकडे दि.०५/०१/२०२१ रोजीचा संयुक्त अर्ज सादर केलेला आहे. त्यात त्यांनी "आम्ही साईबाबा सुपर हॉस्पिटलमध्ये गेलो असता तसेच सुपर हॉस्पिटल प्रशासनाकडून माहिती घेतली असता असे समजले की,साईबाबा हॉस्पिटलमध्ये राज्याच्या विविध भागातून दररोज मोठया प्रमाणावर रुग्ण येतात व दिवसेंदिवस ही संख्या वाढतच आहे. हॉस्पिटलमध्ये विविध प्रकारच्या रुग्णसेवा दिल्या जातात. विविध सर्जरी केल्या जातात. हॉस्पिटलमध्ये जनरल वॉर्ड,स्पेशल वॉर्ड, I.C.U.वॉर्ड आहेत. परंतु ती संख्या अत्यंत अपुरी असून ब-याच वेळेस पेशंटला व्हरांडयात ॲडमिट करावे लागते. जागेअभावी पेशंट दुस-या हॉस्पिटलला पाठवावे लागतात. हॉस्पिटलमध्ये महात्मा फुले आरोग्य योजना, आयुष्यमान आरोग्य योजना लागू असल्याने राज्यातून नव्हे तर देशभरातून रोज मोठया प्रमाणावर रुग्ण येतात. जागेअभावी त्यांची गैरसोय होते. त्यामुळे हॉस्पिटलचे पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे.

साईबाबा सुपर हॉस्पिटल लगतच अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे साईनाथ माध्यमिक विद्यालय आहे. सदर विद्यालयाची जागा ही संस्थान मालकीची असून इमारतही संस्थान मालकीची असून ती कराराने सदर संस्थेला दिलेली आहे. तेंव्हा आपणास नम्र विनंती की,सदर शाळेची सर्व जागा हॉस्पिटलच्या पुनर्बांधणीसाठी संस्थानने ताब्यात घेऊन सदर संस्थेला दुसरीकडे शाळेची भव्य इमारत बांधून द्यावी व विद्यार्थ्यांची गैरसोय टाळावी. तसेच सदर जागेत सहा/आठ मजली भव्य इमारत बांधावी. त्यामध्ये हॉस्पिटलची सर्व डिपार्टमेंट चालू करता येतील व मोठया प्रमाणावर रुग्णांसाठी बेड व इतर सुविधा निर्माण करता येतील. तरीही आपणास नम्र विनंती की, आपण सदर संस्थेशी चर्चा करुन सदर जागा संस्थानच्या ताब्यात घेऊन साईबाबा सुपर हॉस्पिटलची सहा/आठ मजली इमारत बांधून रुग्णांच्या सेवेसाठी निर्माण करण्यात यावी,ही नम्र विनंती," असेबाबत नमुद केलेले आहे.

उपरोक्त अर्जाचे अवलोकन केले असता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीची मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२५/१ (नगरपंचायत मिळकत नं.१६६६) मधील अहमदनगर एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर यांना श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिर्डी करीता वापरास दिलेल्या सुमारे ०.४० आर (एक एकर) क्षेत्र संस्थानने ताब्यात घेवून त्या ठिकाणी हॉस्पिटलचे Expantion करुन पुर्नबांधणी करणेत यावी व अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे साईनाथ माध्यमिक विद्यालयासाठी संस्थानने अन्य ठिकाणी जागा देवून शाळेची भव्य इमारत बांधून द्यावी" असेबाबत नमुद केलेले आहे.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटी यांचे शिर्डी येथील श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयासाठी वापरास दिलेली संस्थान मालकीची उपरोक्त जमीन सर्वे नं.१२५/१ पै. या जागेसंबंधात संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे वेळोवेळी खालीलप्रमाणे निर्णय झालेले असलेचे दिसून येत आहे.

| अ.नं. | मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक | निर्णय क्रं. | सभेत झालेला निर्णय |
|---|---|---|---|
| १ | दि.०२-०३/०३/२००२ | ७४ | यावर सविस्तर चर्चा होवून प्रदिर्घ काळ प्रलंबित असलेला स्थानिक वाद एकदाचा संपुष्टात आणणेच्या दृष्टीने उपरोक्त स्थानिक मा.विश्वस्तांनी वरीलप्रमाणे अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे पदाधिका-यांशी केलेल्या समझोत्यास खास बाब म्हणून मान्यता देण्यात आली. तसेच अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे इमारतीचे दुरुस्तीबाबत प्रस्ताव सादर केला असून तो आवश्यक तपशिल व खर्चाच्या अंदाजासह निर्णयासाठी मा.व्यवस्थापन मंडळाच्या सभेपूढे सादर करावा,असे ठरले. |
| २ | दि.०८/०२/२००५ | ६६ | "श्री साईबाबांनी त्यांचे हयातीत गोरगरीब व पिडीतांची सेवा केली आहे. याकरीता संस्थानचे नियोजित सुपर स्पेशालिटी सेवेचा लाभ सर्व थरातील रुग्णांना मिळणेसाठी ४०% सेवा धर्मादाय (Charitable) व ६०% सेवा पूर्ण सशुल्क (Paying) रुग्णांसाठी ठेवण्यात याव्यात. यामुळे रुग्णालयासाठी असलेली जागा अपुरी पडेल त्याकरीता नुतन रुग्णालय इमारतीलगत असलेली संस्थानची अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे शाळेसाठी देण्यात आलेली जागा ताब्यात घेवून त्या बदल्यात विद्यालयास इतरत्र पर्यायी इमारत बांधून देण्यात यावी,असे ठरले," |
| ३ | दि.२८/०८/२०११ | ६३१ | "यावर सविस्तर चर्चा होवून उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. याकामी आर्किटेक्ट नेमण्यात येवून त्यांचे सल्ल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम ३७ अन्वये आवश्यक तो फेरबदल प्रस्ताव तयार करुन तो शिर्डी नगरपंचायतीमार्फत मा.संचालक,नगररचना,पुणे यांचेकडे सादर करणेत यावा,असे ठरले." |
| ४ | दि.२८/११/२०१५ | ५७६ | संस्थानच्या शैक्षणिक संकुलास जागा अपुरी पडत असून सध्या कनिष्ठ महाविद्यालय साईआश्रम धर्मशाळा येथे चालू केलेले आहे. शैक्षणिक संकुलासाठी जागेची निकड पाहता श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयाची जागा संस्थानला परत घेणेसाठीची कार्यवाही चालू करावी. सबब श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयास मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२५/१ मधील वापरासाठी दिलेल्या जागेच्या करारनाम्याबाबत व भाडेपट्टयाची रक्कम ठरविणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला. |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम २१(२) मध्ये पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग,समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

आणि कलम २१(२)(एक) मध्ये **राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रीडा अकादमी वा संस्था,सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय,दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवुन घेण्यासाठी खर्च करता येईल** वगैरेबाबतची तरतुद आहे. तसेच

**कलम १७(२)(ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील,**

आणि **कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.**

**विभागाचा अभिप्राय -** उपरोक्त निर्णय क्रं.६६ चे अनुषंगाने व उपरोक्त कलम २१(२)(एक), १७(२)(ढ) व कलम १७(३) मधील तरतुदीचे अनुषंगाने सध्यस्थितीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे कन्या विद्या मंदिर व इंग्लिश मिडीयम स्कूल हे संस्थान मालकीच्या मौजे शिर्डी येथील जमीन सर्वे नं.१०९/११ पै.चे क्षेत्रात (नगरपंचायत मिळकत नं.ए २०००३८,ए २०००३९, ए २०००४०) आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे शैक्षणिक संकुलाचे बांधकाम मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील संस्थान मालकीची जमीन गट नं.१८३ यामध्ये प्रगतीपथावर आहे. सदरचे बांधकाम पूर्ण झालेनंतर संस्थानचे उक्त कन्या विद्या मंदिर व इंग्लिश मिडीयम स्कूल हे देखील संस्थानचे निमगाव-को-हाळे येथील शैक्षणिक संकुलामध्ये स्थलांतरीत करण्यात येणार आहे. तदनंतर सध्यस्थितीत कन्या विद्या मंदिर व इंग्लिश मिडीयम स्कूलसाठीच्या वापरात असलेली संस्थान मालकीच्या उपरोक्त मिळकती/जागा हया रिकाम्या होणार आहे. त्या जागेत अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय स्थलांतरीत करता येईल व सध्यस्थितीत अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयास वापरास दिलेले व साईबाबा सुपर हॉस्पिटलचे लगत असलेले संस्थान मालकीची मिळकत जमीन सर्वे नं.१२५/१ ही जागा खाली करुन घेवून त्या ठिकाणी संस्थानचे साईबाबा सुपर हॉस्पिटलचे विस्तारीकरण करता येईल.

**प्रस्ताव** – संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०२/२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६६ चे अनुषंगाने व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम २१(२)(एक), १७(२)(ढ) व कलम १७(३) मधील तरतुदीचे अनुषंगाने सध्यस्थितीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे कन्या विद्या मंदिर व इंग्लिश मिडीयम स्कूल हे संस्थान मालकीच्या मौजे शिर्डी येथील जमीन सर्वे नं.१०९/११ पै.चे क्षेत्रात (नगरपंचायत मिळकत नं.ए २०००३८,ए २०००३९, ए २०००४०) आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे शैक्षणिक संकुलाचे बांधकाम मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील संस्थान मालकीची जमीन गट नं.१८३ यामध्ये प्रगतीपथावर आहे. सदरचे बांधकाम पूर्ण झालेनंतर संस्थानचे उक्त कन्या विद्या मंदिर व इंग्लिश मिडीयम स्कूल हे देखील संस्थानचे निमगाव-को-हाळे येथील शैक्षणिक संकुलामध्ये स्थलांतरीत करण्यात येणार आहे. तदनंतर सध्यस्थितीत कन्या विद्या मंदिर व इंग्लिश मिडीयम स्कूलसाठीच्या वापरात असलेली संस्थान मालकीच्या उपरोक्त मिळकती/जागा हया रिकाम्या होणार आहे. त्या जागेत अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय स्थलांतरीत करणेच्या व सध्यस्थितीत अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयास वापरास दिलेले व साईबाबा सुपर हॉस्पिटलचे लगत असलेले संस्थान मालकीची मिळकत जमीन सर्वे नं.१२५/१ ही जागा खाली करुन घेणेच्या तसेच त्या ठिकाणी संस्थानचे साईबाबा सुपर हॉस्पिटलचे विस्तारीकरण करणेच्या निर्णयार्थ सादर.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

**मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय**

लेखाशाखा अनुदान

**विषय:- संस्थानचे साईनाथ हॉस्पीटल(२०० रुम)चे पश्चिमेकडील भागात साचणा-या पावसाच्या पाण्याची विल्हेवाट लावणेसाठी पावसाळी गटरलाईन टाकणे साठी संस्थानकडून रु.५०.४५ लक्ष निधी मिळणेकामी शिर्डी नगरपंचायतीचे प्रस्तावावर निर्णय घेणेबाबत...**

**प्रस्तावना :-**

मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत यांनी दि.१५/१२/२०२०रोजीचे पत्रान्वये, शिर्डी शहरातील श्री साईनाथ हॉस्पीटलचे पूर्वेकडील १८ मी. रुंद रिंगरोडचे बाजूने पावसाळी गटर लाईन टाकणेसाठी रक्कम रु.५०.४५ लक्ष मात्र निधीची मागणी केली असून, याबाबत खालीलप्रमाणे कळविले आहे.

"शिर्डी नगरपंचायतहद्दीत तसेच शिर्डी शहरालगतच्या नांदूर्खी व कनकुरी या गावांमध्ये ऑगष्ट, सप्टेंबर२०२० मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे, शिर्डी शहरातील ओढे-नाल्यास मोठया प्रमाणात पावसाचे पाणी येवून पुर सदृष परिस्थिती झाली होती. त्यामुळे, शहरातील भुयारी गटरही ओव्हरफ्लो होवून, पाणी शिर्डी शहराचे पश्चिमेकडील भाग, साईआनंदनगर, पुनमनगर, हेडगेवारनगर, म्हाळोबानगर, श्री साईनाथ हॉस्पीटल, द्वारावती भकतनिवास इ. ठिकाणी व घरांमध्ये पाणी जावून नागरी वसाहती,मोकळया जागा इत्यादि ठिकाणी मोठया प्रमाणात पाणी साचले होते. सदर पाण्याची विल्हेवाट लावणेसाठी, लगतचे विकसित करणेत आलेले रस्ते तोडावे लागले. यास्तव शहरातील रहिवासी,श्री साईबाबा संस्थान, नगरपंचायत इत्यादिंच्या मालमत्तेचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. तसेच दरम्यानचे काळात सदर भागात डास, दुर्गंधी निर्माण झाली होती.

अतिवृष्टी आपत्तीचे वेळी नगरपंचायतमार्फत तातडीने उपाययोजना करून, आवश्यक ठिकाणी रस्ते तोडून, पाणी जाणेसाठी चर खोदून, पावसाचे पाण्याची विल्हेवाट लावण्यात आली. तथापी अशी परिस्थिती भविष्यात पुन्हा उद्भवू नये, यासाठी शिर्डी शहरातील २०० रुम व श्री साईनाथ हॉस्पीटलचे पश्चिमेकडील भाग इ. ठिकाणी साचणा-या पावसाच्या पाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी, शिर्डी नगरपंचायत हद्दीतील १८ मी. रिंगरोडलगत नांदूर्खी रस्ता ते नाला क्र.३४ पर्यंत पावसाळी पाणी गटर करणेसाठी खालील काम प्रस्तावीत केले आहे.

अ) - कामाचे नाव- शिर्डी हद्दीतील १८ मी. रिंगरोडलगत नांदूर्खी रस्ता ते नाला क्र.३४ पर्यंत पावसाळी गटर करणे

ब) - अंदाजपत्रकीय किंमत- रु.५०४५०००/-

क) - तांत्रिक मंजूरी- मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,संगमनेर यांचेकडील जा.क्र.प्रशा-४/नप/६२७४/२०२० दि.३०/०९/२०२०

उपरोक्त काम नगरपंचायत करण्यास तयार आहे. तथापी, यासाठी मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. सदर कामासाठी नगरपंचायतकडे पुरेसा निधी उपलब्ध नाही. तसेच सध्या कोविड-१९ मुळे नगरपंचायतचे उत्पन्न स्त्रोत कमी झाल्याने, निधीची मोठया प्रमाणात कमतरता आहे. तरी उपरोक्तकामी श्री साईबाबा संस्थानमार्फत निधी उपलब्ध होणेस विनंती आहे." असे त्यांनी त्यांचे प्रस्तावात नमूद केले आहे.

**संस्थानतर्फे शिर्डी नगरपंचायतीस अनुदान देणेबाबत अधिनियमातील तरतुद :-**

श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ चे कलम २१ मधील (२) (दोन) नुसार, छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्यशासनाच्या पुर्व मंजूरीने, स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांचेमध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी परिणामी संस्थानांच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्याची तरतूद आहे.

**संस्थान बांधकाम विभागाचा अभिप्राय:-**

१) शिर्डी नगरपंचायत हद्दीतील सदर रिंगरोड प्रथम प्राधान्यगटातील संस्थान निधीतून भूसंपादन करून विकसीत करण्यात आलेल्या रस्त्यांपैकी असून या १८ मी. रिंगरोडचे बाजूने ४५० एम.एम. व्यासाची स्टॉर्म वॉटर ड्रेनेज टाकण्यात आली आहे. तथापि ऑगस्ट सप्टेंबर २०२० मध्ये अतिवृष्टीमुळे पाण्याची आवक जास्त असल्याने नाला क्र. ३४ मधून सर्व पाणी वाहण्यास अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे शहरातील भुयारी गटर ओव्हरफ्लो होवून श्री साईनाथ हॉस्पीटल, द्वारावती भक्तनिवास इ. ठिकाणी मोठया प्रमाणात पाणी साचले होते. सदर पाण्याची विल्हेवाट लावणेसाठी लगतचे विकसित करणेत आलेले रस्ते तोडावे लागले होते. करिता पाण्याचा निचरा होणेसाठी नाला कायमस्वरूपी व्यवस्था होणे गरजेचे आहे.

२) या अंदाजपत्रकात ७६३.४० मी. लांबीत ९००एम.एम. व्यासाची पाईपलाईन टाकणे, २८ चेंबर्स बांधकाम करणे व इतर अनुषंगिक कामांची तरतूद आहे.

३) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग संगमनेर यांनी अंदाजपत्रकाची तांत्रिक तपासणी करून त्यास तांत्रिक मान्यता दिलेली असून दर सन २०१९-२० चे राज्य दरसूचीनुसार आहेत.

सोबत, शिर्डी नगरपंचायतीने सविस्तर अंदाजपत्रक सादर केले आहे

**विभागाचा अभिप्राय** :-

श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ मध्ये शिर्डी नगरपंचायतीस अनुदान देणेबाबत तरतूद आहे. मा. तदर्थ समितीने सदरहू प्रस्तावास मान्यता दिल्यास मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद मध्ये सिव्हील ॲप्लीकेशन करून, त्यास मान्यता मिळाल्यास मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेनंतर शिर्डी नगरपंचायतीस अनुदान अदा करण्याची कार्यवाही करता येईल.

**प्रस्ताव:-** संस्थानचे साईनाथ हॉस्पीटल(२०० रुम)चे पश्चिमेकडील भागात साचणा-या पावसाच्या पाण्याची विल्हेवाट लावणेसाठी पावसाळी गटरलाईन टाकणे साठी संस्थानकडून रु.५०.४५ लक्ष निधी शिर्डी नगरपंचायतीस देणेचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर

6/3/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

432-2020

8/3/2021

विषय क्र.- २४

**मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर**
**कामगार विभाग**

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय
आवक नं.: 1163
दिनांक:- 24/6/2021

**विषय:- मयत कंत्राटी कर्मचारी कै.चंद्रकांत पावसे व कै.सतिष येवले यांचे वारसास आर्थिक मदत देणेस मान्यता मिळणेबाबत...**

111

**टिपणी-**

उपरोक्त विषयांकित खा.श्री सदाशिव लोखंडे, यांनी दि.१९.१२.२०२० रोजीचे पत्रान्वये वर्षा चंद्रकांत पावसे, रा. शिर्डी ता. राहाता जि. अहमदनगर येथील रहिवाशी असून त्यांचे पति कै.चंद्रकांत नाथा पावसे, कंत्राटी कर्मचारी यांचे निधन झाल्याने त्यांची विमा रक्कम कै.चंद्रकांत पावसे यांचे वारसांना मिळणेबाबत कळविलेले होते.

त्यावर, कामगार विभागामार्फत कै.चंद्रकांत नाथा पावसे, कंत्राटी कर्मचारी, श्री साई प्रसादालय विभाग यांचे दि.१६.११.२०२० रोजी अपघाती निधन झाल्याने, त्यांना नियमाप्रमाणे अपघाती विमा रक्कम त्यांचे वारस वर्षा चंद्रकांत पावसे यांना देणेबाबत मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांना पत्र देण्यात आलेले होते.

तसेच सतिष नारायण येवले, कंत्राटी कर्मचारी यांचे दि.३१.१०.२०२० रोजी अपघाती निधन झालेने त्यांचे वारसदार यांनी दि.०७.१२.२०२० रोजीचे अर्जान्वये कै.सतिष नारायण येवले यांची विमा रक्कम मिळणेबाबत मागणी केलेली होती. त्यानुसार संबंधित एजन्सी मे.मॉडर्न फॅसेलिटीज मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांना कै. सतिष येवले यांचे वारसास अपघाती विमा रक्कम देणेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०७ए/३०५३/२०२०, दि.१३.०१.२०२१ अन्वये पत्र देण्यात आलेले होते.

त्यावर, मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांचे पत्र इकडिल कार्यालयास प्राप्त झाले होते, त्यात त्यांनी, आमचे कंपनीला श्री साईबाबा संस्थानच्या संबंधित विभागांना कुशल, अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरवठा करण्याचे काम दिनांक ०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२० अखेर पर्यंत एक वर्ष या कालावधीकरीता दिलेले होते. सदर कार्यादेशाची मुदत संपुष्टात आल्यानंतर, संस्थानची ई निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सदर कामास मुदतवाढ दिल्यास ते काम करण्यास सहमती असलेबाबत पत्राची मागणी संस्थानने केली होती. मात्र मुदतवाढीच्या अल्प कालावधीकरीता कंत्राटी कर्मचा-यांच्या प्रत्येकी रु.१० लाख रक्कमेच्या अपघात विमा पॉलीसीची जबाबदारी आमच्या कंपनीची असणार नाही अशी स्पष्ट चर्चा संस्थान प्रशासनासोबत झालेली होती व तसे पत्र देखील संस्थानला सादर केले होते. मात्र त्यानंतर पुन्हा संस्थान प्रशासनाने चर्चेसाठी बोलावून सांगीतले की आम्ही तूमचे कंपनीला १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणार आहोत त्यामुळे तुम्ही तसे पत्र सादर करा त्यानुसार आम्ही संस्थानला पत्र सादर केले होते त्यामध्ये स्पष्ट नमूद केलेले होते की सदर कामास किमान १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ दिल्यास पुर्वीच्याच अटी शर्तीनिंसार सदर काम करण्यास आम्ही तयार आहोत. मात्र संस्थानने दिलेली मुदतवाढ ही दि.०१.१०.२०२० ते दि.३१.१२.२०२० या अल्प कालावधीकरीता असल्याने (किमान १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ न दिल्याने) आम्ही सादर केलेल्या पत्रात पुर्वीच नमूद केलेनुसार मुदतवाढीच्या अल्प कालावधीकरीता कंत्राटी कर्मचा-यांच्या अपघात विमा पॉलीसीची जबाबदारी आमच्या कंपनीची होत नाही. तरी संस्थानने कंत्राटी कर्मचारी कै.चंद्रकांत नाथा पावसे यांचे दि.१६.११.२०२० रोजी अपघाती निधन झाल्याने अपघाती विमा रक्कम त्यांचे वारस यांना देणेबाबत कळविले आहे. मात्र त्याबाबत आम्ही आपणांस कळवू इच्छितो की सदर घटना ही मुदतवाढीच्या कालावधीत झालेली असल्याने पत्रात नमूद केलेनुसार मुदतवाढीच्या अल्प कालावधीकरीता कंत्राटी कर्मचा-यांच्या अपघात विमा पॉलीसीची जबाबदारी आमच्या कंपनीची होत नाही त्यामुळे उपरोक्त सर्व बाबी विचारात घेऊन सदर विमा पॉलसीची जबाबदारी आमचे कंपनीवर निश्चित करण्यात येऊ नये ही नम्र विनंती, असे नमूद केलेले आहे.

उपरोक्त विषयांकित मे.मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट, पुणे यांचे पत्र इकडिल कार्यालयास प्राप्त झाले असून, त्यात त्यांनी, आमच्या एजन्सीला दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२० या कालावधीसाठी श्री साईबाबा संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल व कुशल कंत्राटी पध्दतीने काम मिळालेले होते कर्मचारी पुरविण्याचे काम मिळाले होते. त्यानुसार आपलेकडील संदर्भीय पत्रामध्ये कार्यादेशातील अट क्र.२० नुसार आमचे एजन्सीस सर्व कंत्राटी कर्मचारी यांची प्रत्येकी १० लाखपर्यंत अपघात विमा उतरविणेबाबत बंधनकारक होते. सबब आमचे एजन्सीस कार्यादेश मिळालेनंतर दि.०७.१०.२०१९ रोजी नॅशनल इन्शोरन्स कंपनी मार्फत दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२० अखेर कार्यादेशातील मुदतीपर्यंत (०१वर्षाकरीता) प्रत्येकी सर्व कंत्राटी कर्मचा-यांचा अपघात विमा उतरवुन कार्यादेशातील अट क्र.२० ची पुर्तता करुन विमा पॉलिसीची सत्यप्रत कामगार विभागास सादर केलेली आहे.

**प्रस्तावना:-**

मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे व मे.मॉडर्न फॅसेलिटीज मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांना संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल,कुशल कर्मचारी पुरविणेकामी दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२० अखेर कार्यादेश देण्यात आलेले होते. सदर आदेशातील अट व शर्त क्र.२० व २३ नुसार कंत्राटी कर्मचा-यांचा प्रत्येकी रु.१० लाख रक्कमेचा विमा व वर्कमेन कॉम्पेनसेशन पॉलिसी घेवुन संस्थानला सादर करणेबाबत नमूद केलेले आहे. तथापि, त्यांची सदर कामाची दि.३०.०९.२०२० रोजी मुदत संपल्याने त्यांना दि.०१.१०.२०२० ते दि.३१.१०.२०२० अखेर मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यानुसार त्यांनी संस्थानला पत्र सादर केलेले होते.

पान नं. ०२ वर ...

सदर पत्रात त्यांनी १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ दिल्यास आम्ही कार्यादेशातील सर्व अटी शर्तींनुसार काम करण्यास तयार आहोत. परंतू अल्प मुदतवाढ दिल्यास कंत्राटी कर्मचारी अपघात विमा व वर्कमॅन कॉम्पेनसेशन या पॉलिसीबाबतची जबाबदारी मुदतवाढीच्या कालावधीत आमचे कंपनीची राहणार नाहीबाबत नमूद केलेले होते.

१. दि.१६.११.२०२० रोजी कंत्राटी कर्मचारी श्री पावसे यांचे अपघाती निधन झालेने संबंधित ठेकेदार मे.बी.व्ही.जी.इंडिया. लि.पुणे यांना कामगार विभागामार्फत सदर कर्मचा-यास अपघात विमा देणेबाबत पत्र देण्यात आलेले आहे.

२. दि.३१.१०.२०२० रोजी कंत्राटी कर्मचारी श्री येवले यांचे अपघाती निधन झालेने संबंधित ठेकेदार मे.मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांना कामगार विभागामार्फत सदर कर्मचा-यास अपघात विमा देणेबाबत पत्र देण्यात आलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय:-**

१) मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे व मे.मॉडर्न फॅसेलिटीज मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांची कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी मुदत दि.३०.०९.२०२० रोजी संपूष्टात आलेली होती. त्यानंतर त्यांना दि.०१.१०.२०२० ते दि.३१.१२.२०२० अखेर अल्प मुदतवाढ दिल्याने त्यांचे पत्रात नमूदप्रमाणे त्यांनी सदर कालावधीत कंत्रटी कर्मचारी विमा पॉलिसी उतरविणेची जबाबदारी आमचे कंपनीची नसलेबाबत नमूद केलेले असल्याने संबंधित मयत कंत्राटी कर्मचारी यांचे वारसास सदर विमा रक्कम मिळणार नाही.

२) कंपनीला मुदतवाढ कालावधीत सेवाआकार ०.०००००००००१% असल्याने कोणताही सेवाआकार देण्यात आलेला नाही.

श्री साईबाबांचे दर्शनास येणारे साईभक्तांचे दर्शन रांगेत निधन झाल्यास सहानुभुतीचे दृष्टीने संस्थानमार्फत साईभक्तांचे वारसास सध्या रक्कम रु.२५,०००/- इतकी आर्थिक मदत देण्यात येत असते.

सबब, सदर मयत कंत्राटी कर्मचारी यांची संस्थानमध्ये कंत्राटदारामार्फत १२ ते १५ वर्षे सेवा दिलेली असते अशा कर्मचा-यांचे अचानक निधन झाल्यामुळे मयताचे कुटुंबास आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो व पर्यायाने सदर कुटुंब आर्थिक अडचणीत सापडते. करीता, सदर कंत्राटी कर्मचा-याने संस्थानमध्ये सेवा दिलेली असल्याने कंत्राटदाराचे मुदतीनंतर एखादा कंत्राटी कर्मचारी मयत झाल्यास सदर कर्मचा-याचे वारसास आर्थिक मदत भेटत नाही. कै.चंद्रकांत नाथा पावसे व कै.सतिष नारायण येवले यांचे संबंधित कंत्राटदार यांचे कॉन्ट्रॅक्टरची मुदत संपुष्टात आलेवर निधन झालेने त्यांचे वारसास विमा रक्कम अथवा आर्थिक मदत मिळणार नाही. करीता, सहानुभुतीचे दृष्टीने विचार करुन संस्थानचे वतीने सदर दोन्ही कर्मचा-यांचे वारसास आर्थिक मदत देणेत यावी असे मत आहे.

**प्रस्ताव:-**

कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नेमण्यात आलेल्या ठेकेदारांना देण्यात येणा-या कार्यादेशामध्ये १० लाख रक्कमेचा विमा व वर्कमॅन कॉम्पेनसेशन अंतर्गत विमा पॉलिसी उतरविणेबाबत तरतूद करण्यात आलेली असते. तथापि, कंत्राटदाराचे मुदतीनंतर एखादा कंत्राटी कर्मचारी मयत झाल्यास सदर कर्मचा-याचे वारसास आर्थिक मदत भेटत नाही. कै.चंद्रकांत नाथा पावसे व कै.सतिष नारायण येवले यांचे संबंधित कंत्राटदार यांचे कॉन्ट्रॅक्टरची मुदत संपुष्टात आलेवर निधन झालेने त्यांचे वारसास विमा रक्कम अथवा आर्थिक मदत मिळणार नाही. करीता, कै.चंद्रकांत नाथा पावसे व कै.सतिष नारायण येवले यांचे वारसांना संस्थानमार्फत योग्य ती आर्थिक मदत देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

21/6/21

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

21/6

LAB. Meeting - 148 - २०२१

विषय क्र.- 25



**मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर**

**(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)**

---

**विषय:- श्री.विजय तुकाराम मोकळ, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत...**

**टिपणी**

**विषयाची पूर्वपिठीका:-**

१) श्री.मोकळ हे दि.०७.०९.२०२० ते २५.११.२०२०,दि.२९.११.२०२० ते दि.३१.१२.२०२० अखेर ११३ दिवस या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहीलेत. तसेच दि.०१.०१.२०२१ पासुन ते आजतागायत विनापरवानगी गैरहजर आहेत.त्यामुळे आरोग्य विभागात कामाची गैरसोय झाली. असे त्यांचे विरुध्द प्र.अधिक्षक,आरोग्य विभाग यांचे निवेदन आलेले आहे.

२) त्यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१५९५/२०२० दि.२८.११.२०२० रोजीचे आदेशान्वये गैरशिस्तवर्तनाबाबत शिक्षा म्हणून दि.०१.१२.२०२० ते दि.०७.१२.२०२० अखेर ०७ दिवस श्रींच्या चारही आरत्या करीता उपस्थित राहणेकरीता कळंविणेत आलेले होते.परंतु ते श्रींचे आरत्यांना गैरहजर राहिले आहेत.त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | दिनांक | काकड आरती | मध्यान्ह आरती | धुपारती | शेजारती |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | ०१.१२.२०२० | गैरहजर | गैरहजर | गैरहजर | गैरहजर |
| ०२. | ०२.१२.२०२० | गैरहजर | गैरहजर | गैरहजर | गैरहजर |
| ०३. | ०३.१२.२०२० | गैरहजर | गैरहजर | गैरहजर | गैरहजर |
| ०४. | ०४.१२.२०२० | गैरहजर | गैरहजर | गैरहजर | गैरहजर |
| ०५. | ०५.१२.२०२० | गैरहजर | गैरहजर | गैरहजर | गैरहजर |
| ०६. | ०६.१२.२०२० | गैरहजर | गैरहजर | गैरहजर | गैरहजर |
| ०७. | ०७.१२.२०२० | गैरहजर | गैरहजर | गैरहजर | गैरहजर |

श्री.मोकळ यांनी वरिष्ठांचे आदेशाचा अवमान केलेला असुन, त्यांचे सदरचे कृत्य गैरशिस्त वर्तनात मोडते.असे त्यांचे विरुध्द प्र.अधिक्षक,मंदिर विभाग यांचे निवेदन आलेले आहे.

सदर गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.मोकळ यांना अनुक्रमे जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१९३१/२०२० दि.२१.१०.२०२०, जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२२६०/२०२० दि.२०.११. २०२०, जा.नं.एसएसएस /साप्रशा/वशी-शिस्त/२८१५/२०२० दि.२४.१२.२०२०, जा.नं.एसएसएस /साप्रशा/वशी-शिस्त/३१३७/२०२१ दि.१८.०१.२०२१ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून, त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. त्यांना रजिष्टर पोष्ट ए.डी.ने तीनही नोटीसा त्यांचे पत्त्यावर पाठविणेत आलेल्या होत्या.एक नोटीस स्विकारणेस नकार दिल्याने दि.०५.११.२०२० रोजी इकडील कार्यालयास परत आली. तथापी, श्री.मोकळ यांना सदर कारणे दाखवा नोटीसा प्राप्त होवुन देखिल,त्यांनी लेखी खुलासा सादर केलेला नाही. यावरुन सदर गैरशिस्त वर्तन केल्याचे त्यांना मान्य आहे असे दिसुन येते.

श्री.विजय तुकाराम मोकळ, यांची संस्थान सेवेत दि.०५.१२.२००६ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांना गैरशिस्तवर्तनाबाबत झालेल्या शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | आज अखेरपर्यंत दिलेल्या शिक्षा | किती वेळा |
|---|---|---|
| ०१ | ताकीद | २२ |
| ०२ | सक्त ताकीद | १३ |
| ०३ | चार दिवस तात्पुरते सेवा निलंबीत | ०२ |
| ०४ | दोन दिवस तात्पुरते सेवा निलंबीत | ०४ |
| ०५ | परिविक्षाधीन कालावधीमध्ये वाढ | ०१ |
| ०६ | लेखी समज | ०३ |
| ०७ | ठपका | २८ |
| ०८ | वार्षिक वेतनवाढ (सन २०१८/२०२०) एक वर्षासाठी रोखणे | ०२ |
| | एकुण झालेल्या शिक्षेची संख्या | ७५ |

पान नंबर २ वर...

श्री.विजय तुकाराम मोकळ, यांना गैरशिस्त वर्तनाबाबत एकुण ७५ वेळा शिक्षा झालेली आहे.

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये **किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(१) ठपका ठेवणे, (२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.

(४) वेतनावाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

**मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(७) सक्तीची सेवा निवृत्ती, (८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्या व्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

दि.०२.०१.२०२१ रोजीचे शिस्त–भंग/शास्ती उप समिती सभेत वरील गैरशिस्तवर्तनबाबत निर्णया करीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

दि.०२.११.२०२० रोजीचे शिस्त–भंग/शास्ती उप समिती सभेतील निर्णयानुसार, सदर कर्मचारी ८२ दिवस गैरहजर होते. नोटीस देऊनही त्याचा खुलासा दिलेला नाही.यापुर्वी त्यांना ७५ शिक्षा झालेल्या आहेत. सबब, त्यांचा गैरहजर कालावधची विनावेतन करण्यात यावी व निलंबनाची कार्यवाही करुन विभागीय चौकशी करावी.अशी शिफारस करणेत येत आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत:-**

श्री.विजय तुकाराम मोकळ,सफाई कामगार, आरोग्य विभाग यांची दि.०७.०९.२०२० ते २५.११.२०२०,दि.२९.११.२०२० ते दि.३०.११.२०२० अखेर ८२ दिवस या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहीलेत. तसेच दि.३१.१२.२०२० पासुन ते आजतागायत विनापरवानगी गैरहजर आहेत.

श्री.विजय तुकाराम मोकळ,सफाई कामगार, आरोग्य विभाग यांना उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत संस्थान सेवेतून "तात्पुरते सेवा निलंबीत" करुन, त्यांची विभागीय खाते चौकशी करता येईल. तरी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचेसमोर निर्णयास्तव सादर.

28/1/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

6/1/21

विषय क्र.- २६

**मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय**
**बांधकाम विभाग**



**विषय - मौजे शिर्डी येथिल सर्व्हे नं.१४८ पै. मधील जागेत संस्थानचे अग्निशमन वाहन पार्किंगकरीता पत्राशेड उभारणी करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निवीदेतील निम्नतम दराचे निविदाधारका समवेत चर्चा वाटाघाटी करून निर्णय होणेबाबत ...**

**टिपणी-**

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नाव | मौजे शिर्डी येथिल सर्व्हे नं.१४८ पै. मधील जागेत संस्थानचे अग्निशमन वाहन पार्किंगकरीता पत्राशेड उभारणी करणे. |
| २) | प्रशासकिय मान्यता | मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.२७/०३/२०२० रोजीचे सभेतील नि.क्र.१८३ |
| ३) | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.१३,८१,३३३/- |
| ४) | प्रस्तावित कामाबाबत माहिती | • श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रशासकीय कार्यालयाचे पूर्वेकडील बाजूस फायर ॲण्ड सेफ्टी विभागाकडील ०२ अग्निशमन वाहने उभी राहणेकरीता १९ फूट उंच, ४२ फूट लांब व ३५ फूट रुंद आकाराचे पत्राशेड व स्टोअर (वर्कशॉप) करीता ०१ रुम, तसेच कर्मचा-यांकरीता एक रुम (टॉयलेट बाथरुमसह) तयार करणे.<br>• अंदाजपत्रकातील प्रमुख बाबी - खोदकाम करणे, ३०० एमएम व्यासाचे आर. सी.सी. पाईल कॉक्रीटींग करणे, आर. सी.सी. बिम कॉक्रीटींग करणे, मुरूम भराई व सोलींग करणे ट्रिमिक्स एम ३० कॉक्रीटींग करणे, स्ट्रक्चरल स्टिल वर्क व छतास व भिंतीना कलर कोटेड पत्रे बसविणे इ. कामाचा समावेश आहे. |
| ५) | निवीदा तपशील | दि.२१/१०/२०२० रोजी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई – निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. सदरहू कामासाठी दि.०५/११/२०२० पर्यंत निवीदा जमा करणेस अंतिम मुदत देणेत आली होती. सदरचे अंतिम मुदतीत ०८ निवीदाधारकांनी ई-निवीदा जमा केल्या होत्या. दि.१८/११/२०२० रोजीचे खरेदी समितीचे सभेत तांत्रिक निवीदा उघडणेत आल्या असून सर्व ०८ निविदाधारक हे पात्र झाले आहेत. पात्र निविदांचा वाणिज्यीक लिफाफा दि.०५/०१/२०२१ रोजीच्या मा.खरेदी समितीच्या सभेपुढे उघडणेत आला आहे. |
| अ) | निविदा कालावधी | दि.२१/१०/२०२० ते दि.०५/११/२०२० |
| ब) | तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक व वेळ | दि.१८/११/२०२० सकाळी ११.०० वाजता. |
| क) | निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या | ०८ (आठ), त्यापैकी पात्र निवीदाधारक ०८ |
| ड) | सर्व निविदाधारकांनी संकेतस्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय? | होय, जमा केले आहेत. |
| इ) | सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (ईएमडी) जमा केली आहेत काय? | होय.<br>रु.१४,०००/- मात्र |
| ई) | निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम | रु.१३,८१,३३३/- |

तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यीक देकाराचा तपशिलः

| अ.नं. | ठेकेदारचे नांव | निविदा रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | संकेत नानासाहेब नवले, कोपरगाव | रु.११,७४,३६५.०० | |
| २. | सिद्धेश्वर तुकाराम मुरकूटे, शिर्डी | रु.१०,०६,५१८.०८ | |
| ३. | **कासम इलियास कच्छी, मनमाड** | **रु.९,९३,७९५.६४** | **निम्नतम** |
| ४. | पाराजी भागवत जाधव, संगमनेर | रु.१३,१३,१२८.३१ | |
| ५. | ऋषिकेश बी. सदाफळ, राहाता | रु.११,८८,१००.४७ | |
| ६. | विजय एम. वमने, श्रीराममपुर | रु.१२,५४,११४.८८ | |
| ७. | संकेत संजय गणेश, लोणी | रु.११,२९,५४०.५४ | |
| ८. | सागर सुरेश घोलप, पाथरे, ता.राहाता | रु.१२,४९,३८१.३४ | |

पान क्र.०२ वर...

CON-meeting-122-2021

| | | |
|---|---|---|
| ७) | निम्नतम निविदा धारकाचा तपशिल - | |
| अ) | ठेकेदाराचे नांव | **कासम इलियास कच्छी, मनमाड** |
| ब) | निविदा रक्कम | **रु.९,९३,७९६.००** |
| क) | निविदा टक्केवारी कमी / अधिक | २८.०५५% कमी |
| ८) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार | मा. तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. |

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, निर्णय क्र.सीएटी २०१७/प्रक्र८/इमा-२ दि.२७/०९/२०१८ मधील शर्त क्र. ४.६.२ नुसार १० टक्क्यांपेक्षा कमी दराच्या निविदेला निविदाधीन रक्कमेच्या १% एवढया किंमतीची बॅकेची प्रतीपुर्ती हमी परफॉर्मन्स सिक्युरिटी हमी म्हणून जमा करणे तसेच शर्त क्र.४.६.३ (अ) नूसार प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १० टक्के पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढया जास्त दराने आहे तेवढया रक्कमेचा बॅकेची प्रतिपुर्ती हमी घेणेबाबत तरतूद नमूद आहे आणि शर्त क्र.४.६.३ (ब) नूसार प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १५ टक्के पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १५% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे तेवढया रक्कमेसाठी दोन पटीने बॅकेची प्रतिपुर्ती हमी घेणेबाबत तरतूद नमूद आहे.

त्यानूसार अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा निविदाधीन रक्कम २८.०५५% कमी असल्याने १०% पर्यंत १% अधिक १०% ते १५% पर्यंत ५% व त्यापुढील टक्केवारीसाठी (२८.०५५% - १५% = १३.०५५ चे दोन पटीने म्हणजेच २६.११% मिळून एकूण (१% + ५% + २६.११%) = ३२.११% नुसार होणारी रक्कम रु.३,१९,१०८/- मात्र या रक्कमेपोटी बॅकेची प्रतिपुर्ती हमी जमा करून घेता येईल.

वर नमूद तपशिलानूसार मौजे शिर्डी येथिल सर्व्हे नं.१४८ पै. मधील जागेत संस्थानचे अग्निशमन वाहन पार्किंगकरीता पत्राशेड उभारणी करणे कामाकरीता पात्र निविंदापैकी निम्नतम दराचे ठेकेदार **कासम इलियास कच्छी, मनमाड** यांचे दर **रु.९,९३,७९६.००/-** मात्रची निम्नतम निविदा स्विकारणेकामी त्यांचेशी खरेदी उप समितीपुढे चर्चा-वाटाघाटीने निर्णय होवून त्यांना कार्यादेश देणेस मान्यतेसाठी सदरचा विषय मा.तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रिय पध्दतीने सादर करणेत आला होता.

मा.अध्यक्ष सो. यांचेकडील जा. नं.आस्था/१७४८/२०२१,दि.१०/०५/२०२१ रोजीचे पत्रान्वये सदर प्रस्तावाबाबत पुढीलप्रमाणे निर्देश प्राप्त झालेले आहेत. *"सोबत दिलेल्या सुचित नमूद असलेले विषय हे एकतर तात्काळ करण्यासारखे नाहीत किंवा त्यावर सविस्तर चर्चा/ विचार विनिमय होणे गरजेचे आहे."*

तरी वर नमूद तपशिलानूसार मौजे शिर्डी येथिल सर्व्हे नं.१४८ पै. मधील जागेत संस्थानचे अग्निशमन वाहन पार्किंगकरीता पत्राशेड उभारणी करणे कामाकरीता पात्र निविंदापैकी निम्नतम दराचे ठेकेदार **कासम इलियास कच्छी, मनमाड** यांचे दर **रु.९,९३,७९६.००/-** मात्रची निम्नतम निविदा स्विकारणेकामी त्यांचेशी खरेदी उप समितीपुढे चर्चा-वाटाघाटीने निर्णय होवून त्यांना कार्यादेश देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- 26



## मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर

## विभागाचे नांव :- विदयुत विभाग

**विषय :- एअर सर्कीट ब्रेकर्सचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन-२०२१-२०२२ साठी देणेकामी उघडण्यात आलेल्या निविदांमधील निविदाधारकाशी वाटाघाटी / चर्चा होऊन निर्णय होणेबाबत. . . . .**

प्रस्ताव :- मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४-१२-२०१९ रोजीचे सभेतील विषय नं.४० निर्णय क्र.५१९ अन्वये एअर सर्कीट ब्रेकर्सचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन-२०२०-२०२१ साठी देणेकामी बाहेरील ठेकेदार यांचेकडून ई-निविदा मागविणेकामी मराठीतील व इंग्रजीतील जादा खपाच्या वृत्तपत्रांच्या मुंबई, पुणे येथील आवृत्तीत जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. १५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली होती.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४-१२-२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१९ अन्वये एअर सर्कीट ब्रेकर्सचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन-२०२१-२०२२ साठी देणेकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियामध्ये ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या चार निविदाधारकांचे तांत्रिक ई-निविदा दि. २०-०२-२०२० रोजी मा.खरेदी समितीचे सभेत उघडून निविदाधारकांच्या निविदा फी, बयाणा रक्कम तसेच कागदपत्राची तपासणी संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षण विभागामार्फत करण्यात आलेली आहे. त्यामध्ये चारही निविदाधारक पात्र झालेले होते.

**एअर सर्कीट ब्रेकर्सचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन-२०२०-२०२१ साठी देणेकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या ०४ ई-निविदा (कमर्शियल बीड) दि.०२-०३-२०२० रोजी मा.खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या ई-निविदा (कमर्शियल बीड) नुसार मे.श्री साई पॉवर कंट्रोल्स कुकटपल्ली, हैद्राबाद यांचे न्युनतम दर रु. १२,७४,८९८/- इतके सादर केले होते.**

**परंतू मे.श्री साई पॉवर कंट्रोल्स कुकटपल्ली, हैद्राबाद यांनी दि.२४-०२-२०२० रोजी संस्थानला ई-मेल पाठवून कळविलेले होते की, ''आम्ही एअर सर्कीट ब्रेकर्सचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी झालेलो आहे. परंतू आम्ही हैद्राबाद येथील असून शिर्डी हे आमचे क्षेत्र नाही. परंतू आमचेकडून चुकून सदरचे टेंडर भरण्यात आलेले आहे. त्यामुळे आम्ही सदरच्या ई-निविदा प्रक्रियेमधून माघार घेत आहोत. तरी सदरच्या ई-मेलचा विचार करण्यात यावा तुमच्या असुविधेकरीता आम्ही क्षमस्व आहोत.''**

ई-निविदेच्या टेक्नीकल बीडमध्ये पान क्र.१५ वर कॉन्ट्रॅक्टरने दयावयाच्या हमी पत्रातील खालील अट नमूद आहे.

I/We understand that, the amount of earnest money will not bear interest and shall be liable to be forfeited to the Sansthan if I/we fail (i) to keep the offer open for the period mentioned above and (ii) if this offer is accepted, fail to sign and complete the contract documents as required by The Chief Executive Officer, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi or furnish the security deposit as specified under terms and conditions of the contract. The amount of earnest money may be adjusted towards the security deposit or refunded to me/us unless the same or any part thereof has been forfeited as aforesaid.

उपरोक्तप्रमाणे,

मे.श्री साई पॉवर कंट्रोल्स कुकटपल्ली, हैद्राबाद यांनी पाठविलेल्या दि.२४-०२-२०२० रोजीचे ई-मेल वर निर्णय होणेस तसेच त्यांनी ई-निविदा प्रक्रियेतून माघार घेतल्यामुळे त्यांनी भरलेल्या अर्नेस्ट मनी डिपॉझिटवर निर्णय होणेस, तसेच

मे.श्री साई पॉवर कंट्रोल्स कुकटपल्ली, हैद्राबाद यांनी सदरच्या ई-निविदा प्रक्रियेमधून माघार घेतलेली असल्याने व इतर राहिलेल्या ई-निविदेतील L-2 निविदाधारक मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई यांनी रुपये १५,३८,३३६/- इतका दर नमूद केला असून त्यांना मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत चर्चा / वाटाघाटी करीता बोलवावे किंवा कसे यावर निर्णय होणेकामी विद्युत विभागामार्फत दि.११-०५-२०२० रोजी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर पुढीलप्रमाणे निर्णय झालेला होता.

निर्णय क्र.२५६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, एअर सर्कीट ब्रेकर्सचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन २०२०-२१ साठी देणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे कुकटपल्लीश्री साई पॉवर कंट्रोल्स., हैद्राबाद यांना दरांबाबत चर्चा/वाटाघाटी करणेसाठी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर बोलविण्यात यावे, असे ठरले.**

२/-

**दि.११-०५-२०२० रोजीचे विषयावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी भ्रमण दुरध्वनीवरुन Lowest समवेत चर्चा झाली Amount कमी करत नाही त्यांना Work Order देण्यात यावी असे निर्देश दिले होते.**

परंतू मे.श्री साई पॉवर कंट्रोल्स कुकटपल्ली, हैद्राबाद यांनी दि.२३-०५-२०२० रोजी संस्थानला ई-मेल पाठवून खालीलप्रमाणे कळविले होते.

Dear Sir,

Refer to our trailing mail on unwillingness to participate in AMC tender (tender no-SSST/ Electrical /2020/04/C ) due to Covid movement restrictions between states. The mail was sent by us before opening of Price bid i.e, on 24.02.2020.

Further, wish to inform you that we are unable to reach Shirdi and provide our services due to prevailing situation of Covid-19. Also it will be difficult for us to reach in case of any breakdown within short time, Due Covid issue. Kindly excuse us for this time. Thanking you and Sorry for the inconvenience caused.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.११-०५-२०२० चे सभेतील निर्णय क्र.२५६ नुसार मे.श्री साई पॉवर कंट्रोल्स कुकटपल्ली, हैद्राबाद यांना दि.०९-०६-२०२० रोजी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे होणारे सभेपुढे चर्चा / वाटाघाटी करीता उपस्थित राहणेकामी दि.०१-०६-२०२० व दि.०६-०६-२०२० रोजी ई-मेलसव्दारे कळविण्यात आले होते.

परंतू त्यांनी संस्थांनला दि.०३-०६-२०२० रोजी ई-मेल पाठवून खालीलप्रमाणे कळविले होते.
Dear Sir,

Refer to our trailing mails and your mail for Negotiation.Due to Covid – 19 related restrictions we are unable to attend negotiation. Sorry for the inconvenience

तरी मे.श्री साई पॉवर कंट्रोल्स कुकटपल्ली, हैद्राबाद यांनी पाठविलेल्या दि.२३-०५-२०२० व दि.०३-०६-२०२० रोजीचे ई-मेलस् वर निर्णय होणेकामी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.१३-०७-२०२० रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

**निर्णय क्र.३९४ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन-२०२०-२०२१ या वर्षासाठी एअर सर्कीट ब्रेकर्सचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.श्री साई पॉवर कंट्रोल्स कुकटपल्ली, हैद्राबाद यांनी ई-निविदा प्रक्रियेतून माघार घेतल्यामुळे त्यांची संस्थानकडे जमा असलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर प्रकरणी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी असे ठरले.**

त्यानुसार एअर सर्कीट ब्रेकर्सचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन-२०२०-२०२१ साठी देणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.श्री साई पॉवर कंट्रोल्स कुकटपल्ली, हैद्राबाद यांनी ई-निविदा प्रक्रियेतून माघार घेतल्यामुळे त्यांची अर्नेस्ट मनी डिपॉझिटची रक्कम रुपये ६५,०००/- मात्र मा.तदर्थ (Ad-hoc) समितीत झालेल्या निर्णयानुसार दि.१२-०८-२०२० रोजीचे मंजुर टिपणी अन्वये लेखाशाखा विभागामार्फत जप्त करुन संस्थानच्या कोषागारात जमा करण्यात आलेली आहे.

त्यानंतर एअर सर्कीट ब्रेकर्सचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन-२०२१-२०२२ साठी देणेकामी ऑनलाईन फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुचा तपशिल | एअर सर्कीट ब्रेकर्सचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन-२०२१-२०२२ साठी देणेबाबत. |
| ०२ | मागणी | - |
| ०३ | ई-निविदा प्रसिध्दी | ०१). दि.२८-०९-२०२० ते दि.१५-१०-२०२० |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते ? | दि.२८-०९-२०२० रोजी दैनिक हिंदुस्थान टाईम्स, मुंबई , दैनिक सकाळ, पुणे व दैनिक लोकमत, अहमदनगर या वर्तमानपत्रात, www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व ठेकेदारांना ई-मेल व्दारे. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | दि.२६-०९-२०२० रोजी ९० ठेकेदारांना ई-मेलव्दारे. |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दि.२८-०९-२०२०, वेळ सकाळी १०.०० वाजेपासून<br>टेक्निकल बीड दि. २१-१०-२०२०<br>कमर्शियल बीड दि. ०५-०१-२०२१ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या. | ०३ |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या. | ०३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | | नमुने मागविण्यात आले नाही. | |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. | |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का. | | ई-निविदेत नमूद केले आहे. | |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर- | | | |
| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | | ई-निविदा रक्कम रुपये | |
| १ | मे.ओके एजन्सीज मुलुंड, मुंबई | | रु. १६,०८,३६१/- | |
| २ | मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई | | रु. १६,६९,०२९/- | |
| ३ | मे.धुपर ब्रदर्स ट्रेडींग प्रा.लि., पुणे | | रु. १५,१७,३२९/- | |
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर | | | |
| | अ.क्र. | वर्ष | परिमाण | दर प्रती सेट रु. |
| | - | - | - | - |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल- | | | |
| | अ.क्र. | तपशिल | वर्ष | खर्च परिमाण |
| | - | - | - | - |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | | - | |
| १६ | मागील वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्टची रक्कम | | रु. १५,००,०००/- | |
| १७ | मागील ठेकेदाराचे नाव | | मे.टेक इंडिया इंजिनिअर्स.प्रा.लि., मुंबई | |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | | उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील मे.धुपर ब्रदर्स ट्रेडींग प्रा.लि., पुणे यांचे न्युनतम दर रक्कम रु. १५,१७,३२९/- इतके येतात. | |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | | मे.धुपर ब्रदर्स ट्रेडींग प्रा.लि., पुणे | |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | | होय. | |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितींची नावे. | | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी,<br>उप कार्यकारी अभियंता (बांधकाम) तथा प्र.कार्यकारी अभियंता आणि उपकार्यकारी अभियंता (विद्युत) | |
| २२ | इस्टिमेट कॉस्ट | | रु. १५,००,०००/- | |
| २३ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अदांजे रु. ----- प्रति सेट मार्केट रेट रु. ---- | | | |
| २४ | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी / जास्त |
| | - | - | - | - |

२५). **संक्षिप्त टिप :-** विद्युत विभागाचे मागणीप्रमाणे एअर सर्कीट ब्रेकर्सचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन-२०२१-२०२२ साठी देणेकामी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदर ई-निविदेमध्ये ०३ निविदाकारांनी भाग घेतला होता. यामध्ये तीनही निविदाधारक पात्र झालेले आहे. याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या तीन निविदाधारकांच्या कमर्शियल निविदा दि.०५-०१-२०२१ रोजी मा.खरेदी समितीचे सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडण्यात आल्या. यामध्ये उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील मे.धुपर ब्रदर्स ट्रेडींग प्रा.लि., पुणे यांचे न्युनतम दर रु. १५,१७,३२९/-इतके येत आहे.

तरी न्युनतम दरधारक मे.धुपर ब्रदर्स ट्रेडींग प्रा.लि., पुणे यांचेशी ई-निविदेत दिलेल्या दराबाबत चर्चा / वाटाघाटी होऊन निर्णय होणेस विनंती.

27/11/21

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

LAB- meeting- 171-2021

1867

विषय क्र.- २८

**मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर**
**(कामगार विभाग)**



---

**विषयः- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील कंत्राटी महिला कर्मचा-यांना प्रसुती रजेचे वेतन देणेबाबतचे प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत...**

**टिपणी:-**

उपरोक्त विषयांकित संदर्भ क्र.०१ अन्वये एच.आर विभग, रुग्णालये यांची टिपणी प्राप्त झाली असुन त्यात त्यांनी वितीशा विखे, महिला समाजसेवक यांचे दि.१६.११.२०२०, दि.१८.११.२०२० व दि.१९.११.२०२० रोजीचे ई-मेल प्राप्त झाले असून, श्री साईबाबा शिर्डी संस्थान शिर्डी येथे संस्थानात अनेक महिला कंत्राटी स्वरुपात काम करता. साई बाबा शिर्डी संस्थान शिर्डी येथे संस्थानात कंत्राटी महिलांनाही प्रसूती वेतन / पगार दिला जात नाही.फक्त शासकीय नोकरी करणाऱ्या महिलांनाच नाही तर निमशासकीय, खाजगी संस्था येथेही कंत्राटी सोरुपात काम करणाऱ्या महिलांना प्रसूती रजेचा अधिकार देण्यात आला आहे. मात्र अनेक वेळा कंत्राटी महिलांबाबत त्यांचा वैवाहिक दर्जा, विवाह झाला तर पुढे काय वा गरोदरपण, त्यानंतर येणारे बाळंतपण अथवा बालसंगोपन या अगदी मूलभूत असलेल्या कारणांवरून महिलांना संधी नाकारली जाते. असे व्हायला नको म्हणून खरं तर शासनाने दक्षता घ्यायला हवी खरं तर घटनेच्या '१९-अ' या कलमानुसार, प्रत्येक महिला /व्यक्तीला कोणताही व्यवसाय वा नोकरी आत्मसन्मानपूर्वक करण्याचा अधिकार आहे. काही वेळेस महिलांच्या कामाचे स्वरूप असे असते की जेथे जास्त वेळ उभे राहण्याची आवश्यकता असते वा हालचालींची अपेक्षा असते अशा ठिकाणी काम करणाऱ्या महिलांना गरोदरपणात आस्थापनेने तिची अवघडलेली अवस्था लक्षात घेऊन अतिरिक्त ताण येईल असे काम देऊ नये, असेही कायद्यामध्ये नमूद केलेले आहे.सर्वांत महत्त्वाचे म्हणजे साई बाबा शिर्डी संस्थान शिर्डी येथे संस्थानात प्रसूती काळातील पगारी रजा वा यासंबंधीच्या अन्य लाभांसाठी त्या महिला कर्मचार्यांने आपल्या आस्थापनेकडे अथवा वरिष्ठ अधिकार्यांकडे विहित नमुन्यानुसार अर्ज केलेले होते . तरी साई बाबा शिर्डी संस्थान शिर्डी यानी कंत्राटी महिलांनाही प्रसूती वेतन / पगार दिल नाही. महत्वाचे म्हणजे जर कोणत्याही आस्थापनेने अथवा कंपनीने महिलेला प्रसूती रजा वा तिला रजेच्या काळात मिळणारे वेतन देण्याचे नाकारले तर रजा नाकारल्याच्या कारणास्तव त्या व्यक्तीला कमीत कमी तीन महिने तुरूंगवास व दोन हजार रुपयांचा दंड अशी किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात, असे नमूद केलेले आहे.

तसेच, यापुर्वी याबाबत महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि.१७.११.२०२० रोजीचे पत्र इकडिल कार्यालयास दि.०१.१२.२०२० रोजी प्राप्त झाले असून, त्यात त्यांनी उपरोक्त विषयाबाबतचे श्रीमती वितिशा विखे, महिला समाजसेवक यांचे ई-मेलव्दारे प्राप्त झालेला दि.१६.११.२०२० रोजीचा तक्रार अर्ज सोबत जोडला आहे. सदर अर्जामध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील कंत्राटी महिला कर्मचा-यांना प्रसुती रजा व वेतन देण्याच्या अनुषंगाने तक्रार केली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबत अर्जदारास परस्पर कळविण्यात यावे. तसेच याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात यावाबाबत विनंती केलेली आहे.

**सद्यस्थिती:-**

संस्थानला वेगवेगळ्या कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कुशल, अकुशल व कंत्राटी सुरक्षा कर्मचारी पुरविणेचे कंत्राट दिलेले असून त्यानुसार ते कंत्राटी कर्मचारी पुरवठा करीत आहेत. संबंधित ठेकेदारास देण्यात आलेल्या कार्यादेशातील अट व शर्त क्र.१ मधील (ब) नुसार त्यांनी नेमलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना सध्या लागू असलेले किमान वेतनदर, भविष्य निर्वाह निधी तसेच किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदी अंतर्गत शॉप ॲण्ड कमर्शियल इस्टॅब्लिशमेंट झोन- ३ प्रमाणे शासनाकडून वेळोवेळी जाहीर होणारे व अनुज्ञेय असणारे किमान वेतन ( मुळ वेतन व स्पेशल अलाउन्सवर ) प्रॉव्हीडंट फंड अंशदान दर व जी.एस.टी. यातच शासनाकडून वेळोवेळी होणा-या बदलानुसार वेतन देण्यात येत आहे. तसेच अट व शर्त क्र.०९ मध्ये नमूद केलेनुसार, आपण कंत्राटी पध्दतीने कामांस घेतलेल्या अकुशल/कुशल कामगारांचे भविष्य निर्वाह निधी, कामगार कल्याण निधी, इन्क्रीमेंट, ग्रृप इन्शुरन्स, वर्कमॅन कॉम्पेनसेशन पॉलीसी, व्यवसाय कर, आयकर, उपदान (ग्रॅच्युटी), ई.एस.आय.सी.कॉन्ट्रीब्युशन, टी.डी.एस., घरभाडे भत्ता, बोनस, सानुग्रह अनुदान, GST, पगारी रजा, सुट्टया व इतर कायदेशीर आर्थिक देणी इत्यादि संबधीची सर्व कायदेशीर पुर्तता करणेची जबाबदारी आपली राहील.त्याची आर्थिर्क तोशीस/झळ संस्थानला सहन करावी लागणार नाही हे तुमचेवर बंधनकारक राहील, असे नमूद आहे.

संस्थानमधील कायम महिला कर्मचा-यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी शासन निर्णय क्र.सा.स.वि.२०१२/प्र.क्र.१९/पुनर्बांधणी-७/का.सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई दि.२८.१०.२०१३ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेले सेवानियम. विनीमय- नियमित रजेचे प्रकार ५ या मध्ये प्रसूती रजेचा समावेश आहे.

**प्रसूती रजा-** संस्थान मधील कायम महीला कर्मचारी यांना महिला कर्मचारी २० दिवसापेक्षा कमी नाही एवढ्या कालावधीसाठी पुर्ण वेतनासहीत प्रसूती रजा प्राप्त करण्यास पात्र असेल तथापी अशी रजा यासंबंधी अर्ज केल्यानंतर १८० दिवसांपर्यंत वाढविली जाऊ शकते.मात्र संबंधित वेळेत २ मुलांपेक्षा जास्त मुले नसेपर्यंतच महिला कर्मचा-यांसाठी प्रसुती रजा उपलब्ध असेल. तसेच अशी रजा बाळाच्या जन्माअगोदर किंवा जन्मानंतर घेतली जाऊ शकते. सदरबाबत जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४८७९/२०१५ दि.१९.०१.२०१५ च्या अन्वये आदेश पारित करण्यात आलेला आहे.

पान नं. ०२ वर ...

उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये शासन पत्र प्राप्त झालेनंतर संदर्भ क्र.४ अन्वये कामगार विभागाचे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२७८५/२०२०, दि.२२.१२.२०२० रोजीचे पत्रान्वये संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड.श्री अशोकराव पाटील यांना कंत्राटी महिला कर्मचा-यांना प्रसुती रजादेणेबाबत अभिप्राय मिळणेकामी पत्र देण्यात आलेले होते. सदर पत्रावर ॲड.श्री अशोकराव पाटील यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

I have gone through the contents of your letter dtd .22-12 2020 seeking my opinion and perused contents thereof. The key point in the said letter is applicability of maternity benefits /maternity leave to the female employees engaged through independent contractors. In this background I would like to invite your attention to the provisions of sec.3 (o) of the Maternity Benefit Act, 1961 (hereinafter referred to as Act 1961). The said section defines "woman" means a woman employed, whether directly or through any agency for wages in any establishment. In short, the said definition clearly indicates that, any woman engaged through agency is entitled to get the maternity benefits. It is no doubt that, the contractors business is itself an establishment and its is admitted position that, the said independent contractor is a employer for its employees may be male or female. In my opinion said independent agency is bound to extend the benefits to the female employees employed by him. The various Labour laws provides that, in case the contractor fails to discharge his liabilities then principal employer is compelled to compensate such defaults of the contractor. If the principal employer discharges the liability arising due to default of contractor then so many amounts of benefits can be recovered from the concern agency. I would like to further clarity that, the Act 1961 has used the word maternity leave and the benefits of the said leave. Meaning thereby, in my opinion if such leave is not compensated by concemed contractor/ agency then principal employer may extend the said leave benefits to the female employee and recover so much amount from the concerned agency. In my opinion it is advisable to instruct the concerned agency to sanction the maternity leave/ benefits to the woman applied for and in case he commits a default then principal employer would extend the said benefit and the later on recover the same from the concerned agency. You are requested to take second opinion, if required.

**सध्या कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येत असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे:-**

१. अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचा-यांना उदयोग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचेकडील, दि.२४ जुलै २०१९ रोजीचे मुळ किमान वेतन दराबाबत अधिसुचनेस अनुसरून किमान वेतन अधिनियम, १९४८, अंतर्गत शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट झोन नं.०३ या अधिसुचनेस उदयोगातील किमान वेतन दरास अनुसरून मुळवेतन व मा.कामगार आयुक्त, मुंबई, यांचेकडील वेळोवेळी स्पेशल अलौंन्स दरामध्ये होणारी वाढ देणेत येवून कंत्राटदारामार्फत काम करीत असलेले सर्व कंत्राटी अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचा-यांना नियमानुसार सुधारीत किमान वेतनदराप्रमाणे वेतन देणेत येत आहे.

२. मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५.०२.२०१७, निर्णय क्र.१४१ अन्वये किमान वेतनावर ४०% वेतनवाढ देण्यात येत आहे. तथापि, दि.१७.०३.२०२० पासून कोव्हीड – १९ चे प्रादुर्भावामुळे श्री साईबाबा मंदिर दर्शनासाठी बंद केलेले असल्याने, (रुग्णालये विभाग-४६६ कंत्राटी कर्मचारी वगळता) उर्वरित सर्व कंत्राटी कर्मचारी यांची ४०% टक्के वेतनवाढ माहे मे २०२० पासून बंद करण्यात आलेली आहे.

३. सदर कंत्राटी कर्मचा-यांना मोफत वैद्यकिय सेवा व नियमावलीस मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९.११.२०११ निर्णय क्र.७६५(२३) अन्वये मान्यता मिळालेली असुन, सदर नियमावली दि.०१.०१.२०१२ पासुन लागु करण्यात आलेली आहे सदर वैद्यकिय उपचारासाठी वार्षिक मर्यादा व सेवेचा कालावधी खालीलप्रमाणे:-

०१ ते ०५ वर्षे पर्यंत सेवा झालेले कंत्राटी कर्मचारी बिलमर्यादा रक्कम रू.३०,०००/- पर्यंत
०५ ते १० वर्षे पर्यंत सेवा झालेले कंत्राटी कर्मचारी बिलमर्यादा रक्कम रू.४०,०००/- पर्यंत
१० वर्षे व त्यापेक्षा अधिक सेवा झालेले कंत्राटी कर्मचारी बिलमर्यादा रक्कम रू.५०,०००/- पर्यंत

४. संस्थानकडे ठेकेदारामार्फत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना एकुण हजर दिवसावर ८.३३% प्रमाणे दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे.

५. संस्थानकडे ठेकेदारामार्फत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांना मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०.११.२०१६ निर्णय क्र.८१० नुसार तसेच शासन आदेश क्र.सासंवि १०१६/७७७/प्र.क्र.१०४/का.१६ दि.१५.०४.२०१७ अन्वये शैक्षणिक फि परतावा देण्यात येत आहे.

६. संस्थानकडे ठेकेदारामार्फत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांस नुकसान भरपाई अधिनियमन १९२३(वर्कमन कॉम्पेनसेशन ॲक्ट,१९२३ नुसार कंत्राटी कर्मचा-यांचा रु.१० लाख पर्यंतचा विमा उतरविण्यात येतो.

७. जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२९६४/२०१८, दि.२९.१२.२०१८ अन्वये दि.०१.१२.२०१८ पासून कंत्राटी कर्मचा-यांना पगारी आठवडा सुट्टी (Paid Weekly Off) लागू करण्यात आलेल्या आहेत.

पान नं. ०३ वर ...

सदरचे कंत्राटी कर्मचारी हे श्री साईबाबा संस्थानने नेमलेल्या ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने काम करीत असून सदर कंत्राटी कर्मचा-यांना ठेकेदारामार्फत वेतन अदा केले जात आहे. आज मितीस अंदाजे १९४५ कंत्राटी कर्मचारी कामास असून पैकी ३४१ स्त्री कर्मचारी आहेत. अशा सर्व कंत्राटी कर्मचा-यांना किमान वेतन अधिनियम व शासनाकडून वेळोवेळी होणा-या स्पेशल अलाउन्स दरामध्ये वाढ करुन सर्व कंत्राटी कर्मचा-यांना ठेकेदारामार्फत वेतन अदा केले जात आहे.

**प्रस्तावना:-**

**१) प्रसुतीलाभ अधिनियम, १९६१ मधील नियमावली-**

**अ)** ज्या आस्थापनेत किमान १० किंवा त्यापेक्षा अधिक कामगार असतील त्या ठिकाणी हा कायदा लागू होतो.

**ब)** स्त्री कर्मचा-यांना प्रसुती रजा सुरु झाल्याचे दिनांकाचे अगोदर तिने काम केलेल्या ०३ महिन्याच्या सरासरी वेतनानुसार दर दिवशी जे वेतन येते, त्या दरानुसार स्त्रीला प्रसुती लाभ पात्र असतो.

**क)** ज्या स्त्रीने प्रसुतिच्या आधी ८० दिवसापेक्षा कमी काम केले असेल तर ती स्त्री प्रसुतीलाभ मिळण्यास पात्र होऊ शकत नाही.

**ड)** स्त्रीला प्रसुतिलाभ हा जास्तीत जास्त २६ आठवडे इतका कालावधीचा मिळू शकतो. वैद्यकीय अधिका-याने प्रमाणित केलेल्या प्रसूतीच्या संभाव्य तारखेच्या अगोदर व नंतर या कालावधीतच हि सवलत मिळेल. इतर कालावधीत अनुपस्थिती विनावेतन धरण्यात येईल.

**इ)** प्रसुतीलाभ मिळण्यास पात्र असणा-या स्त्रीने व्यवस्थापनास प्रसुतिबाबत सुचना देणे आवश्यक असून त्या स्त्रीने प्रसुतिलाभ कालावधीत इतरत्र कोठेही काम करु नये.

**ई)** स्त्री प्रसुतिलाभ घेण्यापूर्वीच मरण पावली असेत तर ती रक्कम नामनिर्देश केलेल्या व्यक्तिस मिळू शकते.

**उ)** प्रसुतिलाभ घेणारी स्त्री ही व्यवस्थापनाकडून वैद्यकीय (मेडीकल) बोनस मिळण्यास पात्र असते.

**ऊ)** जर गर्भपात झाला असेल तर योग्य त्या वैद्यकीय पुराव्यासह व दाखल्यासह स्त्रीने व्यवस्थापनेकडे अर्ज करुन सहा आठवडे इतका कालावधीसाठी तिला रजा वेतन मिळू शकते.

**ए)** बाळंतपण / गरोदरपण/गर्भपात/मुदतपूर्व प्रसुति यामुळे उदभवणा-या आजारपणासाठी वरील फायद्याव्यतिरिक्त अधिक एक महिन्याची पगारी रजा मिळण्यास पात्र आहे..

**ऐ)** बाळाचे वय १५ महिने होई पर्यंत स्त्री कामगारास तीच्या नेहमीच्या कामाचे वेळेतील विश्रांतीचे वेळे-व्यतिरिक्त अधिक दोन वेळ जादा विश्रांती मुलाच्या संगोपनासाठी घेण्यास पात्र आहे.

**ओ)** प्रसुतिलाभ मिळण्यासाठी पात्र असणा-या कारणासाठी जर स्त्री कामावरुन गैरहजर असेल तर या कालावधीमध्ये व्यवस्थापनाने केलेली बडतर्फी, कामावरुन कमी करणे, बंद करणे हे बेकायदेशीर आहे.

**औ)** व्यवस्थापनाने प्रसुतिलाभ रजिस्टर ठेवणे बंधनकारक आहे.

**अं)** या कायद्यान्वये पात्र असणा-या स्त्रीने अर्ज/नोटीस/सूचना व्यवस्थापनास देणे आवश्यक आहे.

२) सध्या संस्थान मध्ये इनसोर्स -३४१ व आऊटसोर्स १४५ महीला कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहे.

३) प्रसुती रजा मंजूरीसाठी संस्थानकडे कंत्राटी पध्दतीने कार्यरत स्त्रि कर्मचा-याने आपले कंत्राटदाराकडे प्रसुतीची वैद्यकीय अधिका-याने दिलेली संभाव्य तारीख नमूद करुन अर्ज करावा. सदर अर्जासोबत वैद्यकीय अधिका-याचे प्रसूतीचे संभाव्य तारखेबाबतचे प्रमाणपत्र जोडावे. प्रसुती रजेपूर्वी स्त्रिला अपत्य नसल्याचे किंवा फक्त एकच हयात अपत्य असल्याचे स्वयंघोषणापत्र अर्जासोबत जोडावे लागेल.

४) कंत्राटदाराकडे असा परिपूर्ण अर्ज आल्यानंतर त्यांनी तो विभाग प्रमुखमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे मंजूरीसाठी सादर करावा.

५) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मंजूरीनंतर संबंधित विभागप्रमुख / कंत्राटदार यांनी दरमहा हजेरी रजिस्टरवर प्रसुती रजा किंवा (M.L) असे लिहून २ (ब) मध्ये नमूद केल्यानुसार पगार काढावा व त्यानुसार संस्थानने संबंधित ठेकेदाराला वेतनाची प्रतिपुर्ती करावी.

६) प्रसुती वेतन आदा करण्याची कार्यपध्दती- अर्जदार महिलेने रुग्णालय विभागाकडील वैद्यकीय अधिकारी यांचे कडून रजा कालावधी मंजूर करुन घेण्यात यावा. मंजूर झालेल्या दिवसाचे वेतन आदा करणेसाठी संबधीत विभाग प्रमुखांनी वैद्यकीय अभिप्रायानुसार प्रशासकीय मान्यता घेवून संबधीत ठेकेदारास कळवून त्याची ०१ प्रत कामगार विभागास द्यावी. कामगार कार्यरत असणा-या विभागाने संबधीत महिलेच्या रजेबाबत रजिस्टर अद्यावत ठेवावे.

७) रजा वेतन अदा करणेसाठी -प्रत्येक स्त्री प्रसुती रजा सुरु झाल्याचे तारखेचे अगोदर तीने काम केलेल्या ०३ महिन्याच्या सरासरी वेतनानुसार दर दिवशी जे वेतन येते त्या दरानुसार त्या स्त्रिला प्रसुतिलाभा नुसार येणारे वेतन आदा करता येईल. (प्रसुतीलाभ अधिनियम व मा.शासनाने वेळोवेळी केलेल्या बदलानुसार सदर रजेत/वेतनात बदल करता येईल.)

पान नं. ०४ वर ...

**विभागाचा अभिप्राय:-**

ॲड.अशोकराव पाटील यांचे अभिप्रायात प्रसुती रजा देणे ही ठेकेदाराची जबाबदारी आहे. परंतु अंतीम जबाबदारी ही प्रिन्सीपल एमप्लॉयरची (संस्थान) असते, असे नमूद केलेले आहे.

सबब, प्रसुतीलाभ अधिनियम, १९६१ नुसार ठेकेदारामार्फत/ बाह्यएजन्सीमार्फत संस्थानमध्ये काम करीत असलेल्या इनसोर्स व आऊटसोर्स महिला कंत्राटी कर्मचा-यांना प्रसुती रजा देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

11/6/14

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

8/6

विषय क्र.- २९

**मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय**

( सामान्य प्रशासन विभाग)



**विषय:- प्रभारी पोलीस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा, शिर्डी या पदनामाचे शासकीय अधिकारी यांना संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन देणेबाबत...**

**टिपणी,**

अ) **श्री. हर्षवर्धन गवळी, यांनी दि.२४/०२/२०२१ रोजी पासून पोलीस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा, शिर्डी** या पदाचा प्रभारी अधिकारी म्हणून कार्यभार घेतलेला आहे. श्री. हर्षवधन गवळी यांनी दि.२६/०२/२०२१ रोजीचे विनंती अर्जाने, निवासासाठी साईसहवास बिल्डींग येथे कुटूंबीयासह राहण्यासाठी निवासस्थान मिळणेबाबत विनंती केली आहे.

शासकीय कर्मचारी/ अधिकाऱ्यांना निवासाकरीता संस्थान निवासस्थाने उपलब्ध करुन देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेतील **निर्णय क्र.५९८** व दि.०७/०८/२०१४ रोजीचे सभेतील **निर्णय क्रं.६६७** मध्ये,

१. पोलीस इन्स्पेक्टर, शिर्डी.
२. मुख्याधिकारी, नगरपंचायत शिर्डी.
३. तहसिलदार, राहाता.
४. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी.
५. उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी.
६. पोलीस निरिक्षक, वाहतूक शाखा, शिर्डी पोलीस स्टेशन.
७. **पोलीस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा.**
८. राज्य गुप्तवार्ता अधिकारी.

या पदनामाच्या शासकीय अधिकाऱ्यांना शासनाकडून मिळत असलेले प्रतिमहा घरभाडे भत्ता व नियमाप्रमाणे होणारा विद्युत आकार संस्थानकडे जमा करेणेचे अटीवर उपलब्धतेनुसार निवासासाठी संस्थान निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच या पदनामाच्या अधिका-यांची इतरत्र बदली झाल्यास त्यांचेकडून त्वरीत निवासस्थान खाली करुन घेण्यात यावे, असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन वेळावेळी शासकीय अधिका-यांना संस्थान निवासस्थाने उपलब्ध करुन देणेत आलेली असून, सध्या खालील पदनामाचे शासकीय अधिकारी संस्थान निवासस्थानात राहत आहे.

| अ.नं. | अधिकारी / कर्मचारी | देण्यात आलेले निवासस्थान | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. सतिष दिघे, माजी मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | साईसहवास - ०२/०२ | शिर्डी येथून इतरत्र बदली - तथापी, निवासस्थानास दि.२१/०३/२०२१ अखेर पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली आहे. |
| ०२ | श्री.गोविंद पंढरीनाथ शिंदे, उप विभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी | साईसहवास - ०३/०२ | |
| ०३ | श्री. नारायण न्याहाळदे , पोलिस निरिक्षक, शहर वाहतुक नियंत्रण शाखा, शिर्डी | साईसहवास – ०३/०६ | |
| ०४ | श्री. प्रविण लोखंडे, पोलीस निरिक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन, | साईसहवास ०४/०१ | |
| ०५ | श्री. वासुदेव देसले, पोलीस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा | साईसहवास ०४/०४ | शिर्डी येथून इतरत्र बदली - तथापी, अद्याप संस्थान निवासस्थान ताबा सोडलेला नाही. |
| ०६ | श्री.निलेश जगन्नाथ लहामगे, सहा. गुप्तवार्ता अधिकारी, राज्य गुप्तवार्ता विभाग | साईध्यान - २/३७ | |

ब) मा. शासनाचे दि.१४ जुलै, २०१६ रोजीचे पत्रातील निर्देशानुसार संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७ (३) नुसार भविष्यात संस्थानच्या मालकीची निवासस्थाने संस्थान अधिकारी / कर्मचारी यांच्याखेरीज अन्य कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांना भाडेतत्वावर अथवा ११ महिन्यांच्या कराराने अथवा Leave & License तत्वावर अशा कोणत्याही स्वरुपात शासन मान्यतेशिवाय देण्यात येऊ नयेत, संस्थानची निवासस्थाने भाडेतत्वावर द्यावयाची झाल्यास त्याकरीता प्रथम शासनाची मान्यता घ्यावी, असे निर्देश दिलेले आहेत.

श्री. हर्षवर्धन गवळी यांचेकडे पोलीस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा, शिर्डी या पदाचा प्रभारी अधिकारी म्हणून कार्यभार आहे. प्रभारी पोलीस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा, शिर्डी या पदनामास संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन देणेबाबत उपरोक्त परिच्छेद 'अ' मध्ये नमूद मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेतील **निर्णय क्र.५९८** व दि.०७/०८/२०१४ रोजीचे सभेतील **निर्णय क्रं.६६७** मध्ये सदर पदनामाचा समावेश नाही. त्यामुळे श्री. हर्षवर्धन गवळी, प्रभारी पोलीस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा, शिर्डी यांना संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन द्यावयाचे झाल्यास त्यासाठी मा. तदर्थ समितीची मान्यता घेवून, शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी श्री. हर्षवर्धन गवळी, प्रभारी पोलीस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा, शिर्डी यांना त्यांचे मागणीनुसार संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन देणेकामी उचित निर्णयास्तव सविनय सादर.

8/3/21

(**कान्हूराज बगाटे,** भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

GIA-MEETING-433-2020

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय
आवक क्रं: 7377
दिनांक- 6/3/2024

विषय क्र.- 30

## मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय

**(सामान्य प्रशासन विभाग)**

**विषय:- शासकीय अधिका-यांना निवासासाठी संस्थान निवासस्थान देणेबाबत...**

**टिपणी -**

अ) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५९८ अन्वये, "(१) पोलीस इन्स्पेक्टर, शिर्डी पोलीस स्टेशन (२) मुख्याधिकारी, नगरपंचायत शिर्डी (३) तहसिलदार, राहाता यांना निवासासाठी संस्थान निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात यावी. मात्र त्यांचेकडून त्यांना शासनाकडून मिळत असलेला प्रतिमहा घरभाडे भत्ता (H.R.A.) तसेच नियमाप्रमाणे विद्युतआकार संस्थानमध्ये जमा करुन घेण्यात यावा." असा निर्णय झालेला आहे.

तसेच, मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६७ अन्वये, "(१) उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी (२) उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी (३) पोलीस निरिक्षक, वाहतुक शाखा, शिर्डी पोलीस स्टेशन (४) पोलीस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा (५) राज्य गुप्तवार्ता अधिकारी या पदनामाच्या शासकीय अधिका-यांना निवासासाठी उपलब्धतेनुसार संस्थान निवासस्थाने देणेत यावी. त्यांना शासनाकडून मिळत असलेला प्रतिमहा घरभाडे भत्ता (H.R.A.) व नियमाप्रमाणे होणारा विद्युतआकार संस्थानमध्ये जमा करणेचे अटीवर निवासव्यवस्था उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच या पदनामाच्या अधिका-यांची इतरत्र बदली झाल्यास त्यांचेकडून त्वरीत संस्थान निवासस्थान खाली करुन घेण्यात यावे, असे ठरले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार वर नमूद शासकीय अधिकारी यांना प्रशासकीय मान्यतेने विहीत अटी - शर्तीनुसार तसेच सदर कर्मचा-यांना शासनाकडून मिळणारा प्रतिमहा घरभाडे भत्ता (H.R.A.), निवासस्थान सेवा शुल्क व नियमाप्रमाणे होणारा विद्युतआकार दरमहा संस्थानचे लेखाशाखा विभागात जमा करणेचे अटींवर वेळोवेळी संस्थान निवासस्थान परवानाधारक तत्वाने निवासासाठी उपलब्ध करुन देणेत आलेली आहेत / येत आहेत.

ब) महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांचे क्र. सासंवि-२०१२/५१८/प्र.क्र.२० (मु.बां-भाग १)/ का. १६ दि.१४ जुलै, २०१६ रोजीचा शासन आदेश अ.नं.३ मध्ये असे नमूद केलेले आहे की, "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील कलम १७ (३) नुसार भविष्यात संस्थानच्या मालकीची निवासस्थाने संस्थान अधिकारी / कर्मचारी यांच्याखेरीज अन्य कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांना भाडेतत्वावर अथवा ११ महिन्यांच्या कराराने अथवा Leave & Licence तत्वावर अशा कोणत्याही स्वरुपात शासन मान्यतेशिवाय देण्यात येऊ नयेत. संस्थानची निवासस्थाने भाडेतत्वावर द्यावयाची झाल्यास त्याकरीता प्रथम शासनाची मान्यता घेण्यात यावी."

मा. शासनाचे उपरोक्त आदेशानुसार, व मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५९८ व मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६७ नुसार मान्यता दिलेल्या पदनामाच्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना वेळोवेळी संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन देणेकामी प्रस्ताव शासनाचे विधी व न्याय विभाग यांचेकडे परवानगी मिळणेकामी सादर करणेत आलेले आहे व येत आहेत. त्यानुसार मा. शासनाने यापुर्वीचे प्रस्तावानुसार संबंधित शासकीय अधिकारी यांना विहीत अटी - शर्तीनुसार संस्थान निवासस्थाने उपलब्ध करुन देणेस शासन परवानगी दिलेली आहे.

क) आता, उप विभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी विभाग, शिर्डी व पोलीस निरिक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन या पदनामाचे शासकीय अधिकारी यांना निवासासाठी संस्थानचे अधिकारी निवासस्थान उपलब्ध करुन देणेबाबत शासन परवानगी मिळणेसाठीचे प्रस्ताव अनुक्रमे इकडील जा.नं.एसएसएस/साप्रशा-आस्था/१९४९/२०२०, दि.२४/१०/२०२० व जा.नं.एसएसएस/साप्रशा-आस्था/२२६२/२०२०, दि.२१/११/२०२० अन्वये सादर केले असता, मा. शासनाचे विधी व न्याय विभाग, यांनी शासन पत्र क्र.सासंवि-१०२०/४७५/प्र.क्र.१७७/का.१६ दि.१० डिसेंबर, २०२० व पत्र क्र. सासंवि-१०२०/५४२/प्र.क्र.१८८/का.१६, दि.१० डिसेंबर, २०२० रोजीचे पत्राने कळविले आहे की, उपरोक्त संदर्भाकींत पत्रान्वये प्राप्त प्रस्तावासोबत त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने संस्थानच्या अधिनियमातील कलम १७(३) नुसार अभिप्रेत समितीचा ठराव जोडलेला नाही. त्यामुळे प्रस्तावास शासन मान्यतेबाबतची कार्यवाही करता येत नाही, असे कळविले आहे.

ड) संस्थान अधिनियम कलम १७(३) खालील प्रमाणे आहे.

**"विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही."**

*पुढील पानावर... कृ.मा.प.*

Ga Admin- 382

उपरोक्त संस्थान अधिनियम कलम १७ (३) मध्ये नमूद केलेप्रमाणे विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्व मंजूरीने भाडेतत्वावर देता येईल, अशी तरतुद आहे. याबाबत महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांनी क्र. सासंवि-२०१२/५१८/प्र.क्र.२० (मु.बां-भाग १)/ का. १६ दि.१४ जुलै, २०१६ रोजीचे शासन आदेशाने उपरोक्त **परिच्छेद 'ब'** पॅरा क्र.१ प्रमाणे संस्थानला यापुर्वी कळविलेले आहे.

तरी, उपरोक्त **परिच्छेद 'अ'** मधील पॅरा १ व २ मध्ये नमूद पदनामाचे शासकीय अधिकारी यांना यापुढे संस्थान मालकीचे निवासस्थाने भाडेतत्वावर अथवा ११ महिन्यांच्या कराराने अथवा Leave & Licence तत्वावर द्यावयाचे झाल्यास संस्थान अधिनियम कलम १७ (३) नुसार राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजुरीने संबंधित शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना शासनाकडून मिळत असलेला प्रतिमहा घरभाडे भत्ता (H.R.A.) व नियमाप्रमाणे होणारा विद्युतआकार तसेच संस्थानने निवासस्थानाचे निश्चीत केलेले सेवाशुल्क दरमहा संस्थानचे लेखाशाखा विभागात जमा करणेचे अटींवर तात्पुरत्या स्वरुपात निवासासाठी उपलब्ध करुन देणेस मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

23/11

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से )
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

23/11

४७५

विषय क्र.- 39

(12350) (1668)

## मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय

( सामान्य प्रशासन विभाग )

127

**विषय:- श्रीमती यास्मिन अकबर पठाण यांचा अनुकंपा तत्वावर संस्थानमध्ये नोकरी मिळणेबाबत दि.१३/०१/२०२१ व १४/०१/२०२१ रोजीचा अर्ज...**

टिपणी -

अ) **श्रीमती यास्मिन अकबर पठाण,** मु.पो. शिर्डी यांनी दि.१३/०१/२०२१ व दि. १४/०१/२०२१ रोजी अनुकंपा तत्वावर संस्थानमध्ये नोकरी मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे. सदरहू अर्जात त्यांनी असे नमूद केले आहे की, " मी पठाण सास्मिन अकबर, रा. शिर्डी येथील रहिवाशी असून सदर अर्ज करण्यास माझ्या कौटुंबिक, वैयक्तीक कारणामुळे व माझी मानसिकता व्यवस्थीत नसल्याकारणाने विलंब झाला आहे. तरी मी कारणे विनंती अर्ज करते की, **माझे वडील नामे अकबर हमजेखान पठाण हे आपल्या संस्थानच्या सेवेत मदतनीस म्हणून कायम स्वरुपी नोकरीत होते. त्यांचे दि.२२/०३/२००७ रोजी निधन झाले आहे.** तसेच मी त्यांची मुलगी पठाण यास्मिन अकबर असून आपल्या साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल (स्टाफनर्स) या पदावर कंत्राटी पध्दतीने कार्यरत आहे. माझे लग्न २००८ मध्ये झालेले होते व मला एक मुलगा नामे अरशान चिराग शेख आहे. माझा व माझ्या पतीचा सन २०१२ मध्ये घटस्फोट झालेला असून मी सध्या विभक्त राहत आहे. तसेच माझ्यावर माझ्या मुलाचा खर्च अवलंबून आहे. कंत्राटी बेसवर असलेल्या पेमेंटवर माझा व माझ्या मुलांचा उदरनिर्वाह होऊ शकत नाही. त्यामुळे सदर बाबींचा संस्थानने सहानुभुतीपुर्वक आणि सहकार्याच्या भावनेने विचार करुन माझ्या वडीलांच्या जागी माझा अनुकंपा तत्वावर कायमस्वरुपी पदासाठी विचार करावा ही विनंती."

ब) शासनाचे विधी व न्याय विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.सासंवि-१०१९/८१३/प्र.क्र.१५३/का.१६ मंत्रालय, मुंबई -३२ दि.२७ ऑगस्ट, २०२० अन्वये संस्थानसाठी अनुकंपा तत्वावर नियुक्ती बाबतचे स्वतंत्र नियमावलीस शासन मान्यता दिलेली असून, सदर नियमावलीतील **अटी - शर्ती क्र.१० नुसार** अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज करण्यासाठी खालील प्रमाणे तरतुद आहे.

(अ) अनुकंपा नियुक्तीसाठी दिवंगत संस्थान अधिका-यांच्या / कर्मचा-यांच्या कुटूंबातील पात्र नातेवाईकाने संस्थान अधिकारी / कर्मचारी दिवंगत झाल्याच्या दिनांकापासून **१ वर्षाच्या मुदतीत** संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे विहीत नमुन्यात परिपूर्ण अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

(आ) सेवेत असतांना दिवंगत संस्थान अधिका-यांच्या / कर्मचा-यांच्या कुटूंबातील अज्ञान वारसदारांपैकी कोणत्याही एकाने **सज्ञान म्हणजे १८ वर्षाचा झाल्यावर एक वर्षाच्या आत** अनुकंपा नियुक्तीसाठी परिपूर्ण अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

(इ) पात्र वारसदारास विहीत १ वर्षाच्या मुदतीनंतर २ वर्षे इतक्या कालावधीपर्यंत (मृत्युच्या दिनांकापासून ३ वर्षापर्यंत) तसेच दिवगंत संस्थान अधिका-याच्या / कर्मचा-याच्या अज्ञान वारसदाराच्या बाबतीत तो उमेदवार सज्ञान झाल्यानंतर विहीत १ वर्षाच्या मुदतीनंतर २ वर्षापर्यंत (**सज्ञान झाल्यानंतर ३ वर्षापर्यंत**) अर्ज सादर करण्यास विलंब झाल्यास असा विलंब क्षमापित करण्याचे अधिकार संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येत आहेत.

क) कै. अकबर हमजेखान पठाण, मदतनीस, बांधकाम विभाग यांचे मृत्युप्रमाणपत्रावरुन त्यांचे निधन दि.२२/०३/२००७ रोजी झालेले असून, मयताची मुलगी श्रीमती यास्मिन अकबर पठाण यांनी **तब्बल १३ वर्षे ९ महिने** इतक्या उशिराने संस्थानमध्ये वडीलांचे जागेवर अनुकंपा तत्वावर कायम स्वरुपी नोकरी मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केला असून, उपरोक्त **परिच्छेद 'ब'** मधील संस्थान व्यवस्थापनासाठी केलेल्या अनुकंपा तरतुदीनुसार अर्ज करण्याचे विहीत मुदतीनंतर अर्जदाराने अर्ज सादर केला आहे. त्यानुसार अर्जदार अनुकंपा नियुक्तीस पात्र होत नाही.

याबाबत दि.२१/०१/२०२१ रोजीचे कार्यालयीन टिपणी पुढील योग्य त्या आदेशास्तव सादर करणेत आली होती. त्यावर वरिष्ठ अधिकारी यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

१) टिपणीत नमूद तरतुदी या शासनाने अनुकंपा नियुक्तीसाठी केलेली नियमावली दि.२७/०८/२०२० नुसार आहेत. त्यापुर्वी संस्थानकडे अशी नियमावली नव्हती. त्यामुळे टिपणीतील तरतुदी या निमावली लागु झाल्याच्या दिनांकापासून लागु होतील, असे मत आहे.

२) वस्तुस्थिती तदर्थ समितीसमोर सादर करुन पात्र / अपात्रतेबाबत निर्णय घेणे योग्य राहील.

मा. वरिष्ठांनी दिलेले उपरोक्त निर्देश व संस्थान व्यवस्थानासाठी मा. शासनाने दि.२७/०८/२०२० अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी लागु केलेली स्वतंत्र नियमावलीतील उपरोक्त **परिच्छेद 'ब'** मध्ये नमूद तरतुदी विचारात घेता, श्रीमती यास्मिन अकबर पठाण यांनी दि.१३/०१/२०२१ रोजीचे अर्जाने (१३ वर्षे ९ महिने इतक्या उशिराने) अनुकंपा तत्वावर संस्थानमध्ये कायम स्वरुपी नोकरी मिळणेबाबत केलेल्या विनंती अर्जाची नोंद अनुकंपा प्रतिक्षायादीवर घेणेबाबत निर्णयार्थ मा. तदर्थ समिती समोर सादर.

23/1/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

GA MEETING-420-2020

मा.मुख्य कार्यकारी अधि...
आवक नं.: 6909
दिनांक:- 23/12/2020

**विषय क्र.- 32**

**मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय**
**(सामान्य प्रशासन विभाग)**

**विषय:- संस्थानचे जुन्या सेवाधाम इमारतीचे बाहेरीत बाजूस असलेल्या खोल्या / रुम विविध कर्मचारी संघटना व इतर संस्थाना त्यांचे कार्यालयासाठी भाडे तत्वावर उपलब्ध करुन देणेकामी सदर जागेचे भाडे निश्चीत होणेबाबत...**

**टिपणी:-**

**विषयाची पूर्वपीठीका:-** संस्थानचे सेवाधाम इमारतीतील खोल्या **सन २०१३ पुर्वी** खालीलप्रमाणे विविध कर्मचारी संघटना, कर्मचारी गृहनिर्माण संस्था, होमगार्ड कार्यालय व विद्युत महामंडळाचे कार्यालयासाठी त्यावेळच्या प्रचलित दरानुसार **प्रतिमहा रु.१०/- व मिटर रिडींगप्रमाणे होणारा विद्युत आकार वेळोवेळी संस्थानकडे जमा करणेचे अटीवर उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.** त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | खोली क्र. |
|---|---|---|
| ०१ | श्री. चंद्रकांत शंकरराव गुरव, वर्ग ४ कर्मचारी (सध्या सेवानिवृत्त ) | ५४, ८१ |
| ०२ | श्री साईबाबा कर्मचारी संघटनेस त्यांचे कार्यालयासाठी (अध्यक्ष – श्री. राजेंद्र जगताप) | ५५, ८० |
| ०३ | श्री साईबाबा कर्मचारी संघटनेस त्यांचे कार्यालयासाठी (अध्यक्ष – श्री.रामराव शेळके) | ६८, ६९ |
| ०४ | श्री साईनाथ कर्मचारी गृहनिर्माण संस्थेस त्यांचे कार्यालयासाठी (श्री.रामराव शेळके) | ५६ |
| ०५ | होमगार्ड कार्यालय | ७० |
| ०६ | एम.एस. ई. बी कार्यालय | ७१ |

उपरोक्त प्रमाणे अ.नं. १ यांना निवासासाठी व अ.नं. २ ते ६ यांना त्यांचे कार्यालयासाठी देण्यात खोल्या बांधकाम विभागाकडील दि.११/०७/२०१८ रोजीचे पत्रास अनुसरुन सदर इमारतीचे दुरुस्ती व रंगकाम करणेचे कामासाठी रिक्त करुन देणेबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत संबंधीतांना कळविणेत आले होते. त्यास अनुसरुन अ.नं. ३ ते ६ मध्ये नमूद संबंधित कार्यालयांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या खोल्या बांधकाम विभागाचे कामासाठी रिक्त करुन दिलेल्या आहेत.

**तथापी,** अ. नं. १ मध्ये नमूद केलेप्रमाणे श्री. चंद्रकांत शंकरराव गुरव, वर्ग ४ कर्मचारी (सध्या सेवानिवृत्त) यांचे ताब्यात असलेल्या खोली क्र.५४ व ८१ तसेच, अ.नं.२ नुसार श्री साईबाबा कर्मचारी संघटना (अध्यक्ष - राजेंद्र जगताप) यांचे ताब्यात असलेल्या खोली क्र.५५, ८० हया त्यांनी रिक्त करुन दिलेल्या नसून, पुर्वीच्याच अटी - शर्तीवर आजपावेतो त्यांच्या ताब्यात आहे.

अ) **आता**, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी वेल फेअर संघटना, शिर्डी चे अध्यक्ष, श्री. अरुण गणपतराव जाधव यांनी दि.०३/०३/२०२० रोजीचे पत्राने, ***"श्री साईबाबा संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या प्रश्नांबाबत आमची श्री साईबाबा संस्थान कर्मचारी वेल फेअर संघटना, शिर्डी स्थापन झालेली असून कर्मचा-यांना न्याय मिळवून देणेसाठी आमची संघटना सक्षम आहे. परंतु आमच्या संघटनेच्या कामकाजाकरीता आम्हाला कार्यालयाची आवश्यकता आहे. हयापुर्वी संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या संघटनेकरीता संस्थानमार्फत कार्यालयाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन आम्हासही कार्यालयाकरीता संस्थानचे सेवाधाम इमारतीमधील एक रुम मिळावी, "*** अशी विनंती केली आहे.

ब) **सध्या**, सेवाधाम इमारतीतील आतील बाजूच्या खोल्यांचा वापर साईभक्तांच्या निवासासाठी करणेत येत असून, सदर निवासस्थान वापरापोटी प्रतीरुम प्रतिदिवस (२४ तासासाठी) रु.५०/- याप्रमाणे अत्यल्प शुल्क घेऊन, संस्थानचे साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत साईभक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.

तसेच, सेवाधाम इमारतीतील बाहेरील बाजूच्या असलेल्या खोल्या पैकी सध्या खोली क्र.७० व ७१ हया रिक्त असून त्यातील एक खोली श्री साईबाबा संस्थान वेल फेअर संघटनेचे कार्यालयासाठी देता येईल, **परंतू,** अशा प्रकारे विविध कर्मचारी संघटना व इतर संस्थेला त्यांचे कार्यालयासाठी सेवाधाम इमारतीचे बाहेरील बाजूस असलेल्या खोल्या भाडे तत्वावर उपलब्ध करुन द्यावयाच्या झाल्यास त्यासाठी सुधारीत दराने सेवाआकार निश्चीत करणे आवश्यक आहे.

*पुढील पानावर .... कृ.मा.प.*

**क)** त्यास अनुसरुन याकामी संस्थानचे बांधकाम विभागास इकडील जा. नं.२७३९/२०२० दि.१०/०३/२०२० व जा.क्र.५५८/२०२० दि.२२/०७/२०२० अन्वये सेवाधाम इमारतीत सध्या रिक्त असलेल्या खोली क्र.७० व ७१ चे एकूण बांधकाम क्षेत्र व त्यानुसार सदर जागेचे बाजार भावाप्रमाणे भाडे मिळणेबाबत कळविणेत आले होते.

बांधकाम विभागाने त्यांचेकडील पत्र दि.२७/०७/२०२० अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाचे शिर्डी येथील शाखा अभियंता यांचेशी समक्ष चर्चा करुन त्यांचे विभागाकडील भाडे ठरविण्याचे पध्दतीनुसार सदरहू जागेचे **भाडे ६४.७१ चौ. मिटर** असे येत असून, त्यानुसार खालीलप्रमाणे भाडे होत आहे, असे कळविले आहे.

i) रुम नं.७० चे एकूण बांधकाम क्षेत्र १०.६५ चौ. मीटर असून, त्याकरीता वरील दरानुसार रु.६८९/- मात्र दरमहा.

ii) रुम नं.७१ चे एकूण बांधकाम क्षेत्र १७.३३ चौ.मीटर असून, त्याकरीता वरील दरानुसार रु.१,१२१/- मात्र दरमहा.

**तथापी,** बांधकाम विभागाने उपरोक्त दर हे सेवाधाम इमारत बांधकामाचे वर्ष विचारात घेऊन सदर जागेचे भाडे कळविले असल्याचे दिसून येते.

**ड)** संस्थानचे सेवाधाम इमारतीतील बाहेरील बाजूस असलेल्या खोल्या / रुम यापुर्वीचे व नव्याने मागणी करणा-या विविध कर्मचारी संघटना व इतर संस्थेच्या कार्यालयासाठी त्यांचे मागणीनुसार भाडे तत्वावर उपलब्ध करुन देणेकामी खालील पर्यायापैकी एका पर्यायाची निवड होऊन, त्याप्रमाणे सुधारीत सेवाआकार (भाडे) व प्रत्यक्ष मिटर रिडींगप्रमाणे होणारा विद्युत आकार दरमहा आकारणी करणेचे अटीवर उपलब्ध करुन देता येईल.

१. सन २०१३ व त्यापुर्वी श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी व इतर संस्थेच्या कार्यालयासाठी देणेत आलेल्या **प्रचलित दराप्रमाणे दरमहा रु.१०/- व मिटर रिडींगप्रमाणे होणारे विद्युत आकार घेऊन उपलब्ध करुन देता येईल.**

किंवा

२. संस्थानचे बांधकाम विभागाने दि.२३/०७/२०२० रोजीचे पत्राने, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शिर्डी येथील शाखा अभियंता यांचेशी समक्ष चर्चा करुन त्यांचे विभागाकडील भाडे ठरविण्याचे पध्दतीनुसार इमारत बांधकामाचे वर्ष विचारात घेऊन सदरहू जागेचे **रु.६४.७१ प्रती चौ. मिटर** याप्रमाणे भाडे कळविले असून, त्यानुसार **रुमचे एकूण बांधकाम (चटई) क्षेत्रानुसार दरमहा भाडे आकारणी करुन उपलब्ध करुन देता येईल.**

किंवा

३. सध्या सेवाधाम इमारतीतील आतील बाजूच्या खोल्या श्री साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत प्रतीरुम प्रतिदिवस (२४ तासासाठी) **रु.५०/- याप्रमाणे** अत्यल्प शुल्क घेऊन, साईभक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. त्यानुसार (रु.५० प्रतिदिवस x३०दिवस याप्रमाणे) **दरमहा रु.१५००/- भाडे आकारणी करुन उपलब्ध करुन देता येईल.**

तरी, संस्थानचे सेवाधाम इमारतीतील तळमजल्यावरील बाहेरील बाजूच्या असलेल्या खोल्या यापुर्वीचे व नव्याने मागणी करणा-या कर्मचारी संघटना व इतर संस्थेच्या कार्यालयासाठी भाडे तत्वावर देणेकामी उपरोक्त **अ.नं. १ ते ३** पैकी योग्य तो सुधारीत सेवाआकार (भाडे) निश्चीत होणेस विनंती.

तसेच, त्यानुसार श्री साईबाबा संस्थान कर्मचारी वेल फेअर संघटना, शिर्डी यांचे विनंती अर्जानुसार त्यांना संस्थानचे सेवाधाम येथील रिक्त असलेले रुमपैकी एक रुम कार्यालयासाठी उपलब्ध करुन देणेस मान्यता असावी.

10/9/2020

(कान्हूराज बगाटे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

GA-DP-2-2020

विषय क्र.- 33



मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय
बांधकाम विभाग

**विषय:- संस्थानचे साईगार्डन प्रकल्पांतर्गत मे. लेजर व्हिजन लि. हॉंगकॉंग यांचे समवेत आर्बिट्रेशन कार्यवाही करणेबाबत.**

टिपणी-

मौजे निमागांव कोऱ्हाळे येथील संस्थानचे गट नं.१९८, १९९, २०० व २०१ मध्ये मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजीचे सभेत साईगार्डन करण्याचे ठरले होते. या प्रकल्पातंर्गत श्री साईबाबांच्या जिवनावर अधारीत लेजर शो तयार करणेसाठी लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांना US$५५,००,००० मात्रचा कार्यादेश देणेत आला होता. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचेशी झालेल्या करारानुसार त्यांनी केलेल्या कामापोटी Payment Stages ०१ ते ०४ व ०७ ते ०८ करीता US$२१,४५,००० अदा करणेत आलेले आहे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांचे दि.०५/११/२०१२, दि.१७/१२/२०१२ व दि.२६/०२/२०१३ रोजीचे पत्रान्वये करारनाम्यातील Payment Schedule ०५ व ०६ नुसार US$ १५,४०,००० ची बिले सादर केलेली होती.

संस्थानचे मा.त्रिसदस्य समितीचे दि.१५/०३/२०१४ रोजीचे सभेतील नि.क्र.१८२ अन्वये मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे बिल अदा करणेकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले होते. त्यानुसार संस्थानचे वकील श्री. संजय चौकीदार यांनी CAST/८७०८/२०१४ दि.२५/०७/२०१४ अन्वये मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल केले होते.

प्रस्तुत प्रकरणी मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांची Payment Schedule ०५ व ०६ नुसार US$१५,४०,००० ची बिले प्रलंबीत असल्यामुळे दि.०३/०३/२०१७ रोजीच्या (संस्थानकडे प्राप्त दि.२३/०३/२०१७) पत्रान्वये त्यांचेशी केलेले करारनाम्यातील अट क्र.२५ नुसार संस्थानला टर्मिनेशन नोटीस दिलेली होती. त्यास संस्थानचे वतीने दि.११/०४/२०१७ रोजीचे पत्राने उत्तर पाठविणेत आले आहे. याप्रकरणी मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या तज्ञ समितीचे अहवालावर दि.०७/०४/२०१७ रोजी मा.उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश केला आहे.

"The learned AGP has placed on record a copy of the report submitted by the Committee. The same is taken on record.

2. We would like to know the stand of the Committee in the matter. Stand over to 21.04.2017."

मा.उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेशानुसार प्रस्तुत प्रकरणी मा. व्यवस्थापन समितीचे म्हणणे न्यायालयात सादर करणेकामी दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेत निर्णय क्र.२७९ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

*".. मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग संदर्भात मा.उच्च न्यायालयात समितीचे मत सादर करावयाचे आहे. या प्रकल्पाबाबत सविस्तर विषय चर्चेला ठेवणेत आलेला असून सदर प्रकल्प मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेमार्फत पूर्ण करायचा की, सदर प्रकल्पाबाबत करारनामा रद्द करायचा याचा निर्णय समितीने घ्यायचा आहे. यापूर्वी मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना २१,४५,००० मात्र डॉलर्सचे बिल अदा करणेत आलेले असून त्यांनी पुढील कामाचे १५,४०,००० मात्र डॉलर्स बिलाची मागणी केलेली आहे. सदर बिले या प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री.कापरे यांनी प्रमाणित केलेली आहेत. तसेच मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना पुढील काम थांबविणेत यावे, असे पत्र दि.०७.०३.२०१३ रोजी संस्थानचे वतीने देणेत आले होते. त्यामुळे मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांनी त्यानंतरचे काम थांबविले आहे. परंतू तत्पुर्वी त्यांनी केलेल्या कामाची व करारनाम्यातील **Payment Schedule** नुसार देय असलेल्या रकमेची मागणी केलेली आहे. सदर प्रकल्प व करारनामा रद्द झाल्यास त्यांना देय असलेल्या १५,४०,००० मात्र डॉलर्स रकमेबाबत संस्थानवर जबाबदारी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबर चर्चा/ वाटाघाटी करुन सदर प्रकल्प पूर्ण करणेबाबत समितीने निर्णय द्यावा, अशी माहिती कार्यकारी अधिकारी यांनी समिती सदस्यांना दिली.*

*यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साईगार्डन प्रकल्प लवकर कार्यान्वीत होणेकामी, तत्कालीन व्यवस्थापन समितीने लेझर शो उभारणी व त्यासाठी आवश्यक असलेले बांधकाम करणे ही दोन्ही कामे एकाच कंपनीला द्यायला हवी होती. तसेच लेझर शो उभारणीकामी मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग या कंपनीचा करारनामा व त्यामधील बीले अदायगीसाठीची कलमे सदोष असल्याचे दिसून येते. याकरीता सदर करारनामा रद्द करुन अर्बिस्ट्रेशनची प्रक्रिया सुरु करणेची कार्यवाही करणेत यावी. याचबरोबर गेल्या १० वर्षामध्ये तंत्रज्ञानामध्ये खुपच बदल झालेला असून इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या किंमतीही कमी झालेल्या आहेत.*

पान नं.०२ वर...

*या सर्व बाबींचा विचार करता, मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणेत येऊन, त्यांना अदा करण्यात आलेली बीलाची रक्कम वसूल करणेबाबत कायदेशीर कारवाई करणेत यावी व साईगार्डन प्रकल्पामधील लेझर शो उभारणीकामी विहीत पध्दतीने नवीन ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.*

*तसेच या प्रकरणाची निवृत्त न्यायमूर्तीमार्फत चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायमुर्तींची नेमणूक होणे व मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणे यासाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकरीता त्यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा व शासनाचे मार्गदर्शनाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी."* असे ठरले.

उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकामी त्यांचेकडे दि.१४/०७/२०१७ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला होता.

प्रस्तुत प्रकरणी मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांचे दि.१९/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये त्यांचेशी केलेले करारनाम्यातील अट क्र.२५ नुसार संस्थानला टर्मिनेशन नोटीस दिलेली होती. सदर नोटीसबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेत मे. लेजर व्हिजन लि. हॉंगकॉंग यांचे समवेत अर्बिट्रेशनची कार्यवाही करावी असा निर्णय झालेला आहे. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.१४/१२/२०१८ रोजीचे पत्रानुसार लेजन व्हिजन यांचेबरोबर झालेल्या करारनाम्यातील क्लॉज ३१ नुसार आर्बिट्रेशन करणेपुर्वी प्रथम Mediation साठी जाणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता.

सदर सभेत निर्णय क्रं.४१ अन्वये, संस्थानचे साईगार्डन प्रकल्पासंबधी मे.लेजर व्हिजन लि. हॉंगकॉंग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसीस अनुसुरुन करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे प्रथम मे.लेजर व्हिजन लि.हॉंगकॉंग यांना मिडीएशनची नोटीस द्यावी, असे ठरले त्यासाठी राजस्थान उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश मा.श्री.पळशीकर यांना मिडीएटर म्हणून प्रस्तावित करावे, असे समिती सदस्य मा.ॲड. मोहन जयकर यांनी सूचविले, त्यास समितीने मान्यता दिली. तसेच मे. लेजर व्हिजन लि. हॉंगकॉंग यांनी मिडीएशनसाठी तयारी न दर्शविल्यास करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे अर्बिट्रेशनची कार्यवाही करावी, असे ठरले होते.

त्यानूसार संस्थानचे वतीने ॲड.जुन्नरकर ॲण्ड असोशिएटस, मुंबई यांचेमार्फत लेजन व्हिजन यांना दि.११/०२/२०१९ रोजीचे पत्राने मिडीएशन करीता नोटीस दिली होती. यामध्ये मिडीएटर म्हणून श्री नितिन जी ठक्कर, सिनिअर काऊंसिल, मुंबई यांची नेमणूक करणेबाबत कळविले होते. उपरोक्त प्रमाणे झालेली कार्यवाही मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेपुढे माहिती व मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. सदरहू सभेतील निर्णय क्र.१८९ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"..यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे साईगार्डन प्रकल्पासंबधी मे. लेजर व्हिजन लि. हॉंगकॉंग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसीस अनुसरुन करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे मे. लेजर व्हिजन लि. हॉंगकॉंग यांना संस्थानचे वतीने ॲड.जुन्नरकर ॲण्ड असोशिएटस, मुंबई यांचेमार्फत मिडीएशन करीता नोटीस देण्यात आलेली असुन त्याची नोंद घेण्यात आली. तसेच यासाठी निवृत्त मुख्य न्यायाधीश मा.श्री.पळशीकर यांचे ऐवजी निवृत्त मुख्य न्यायाधीश मा.श्री.ए.पी. कानडे यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली."*

संस्थानचे वतीने ॲड.जुन्नरकर ॲण्ड असोशिएटस, मुंबई यांचेमार्फत लेजन व्हिजन यांना दि.१७/१०/२०१९ रोजीचे पत्राने मिडीएशन साठी त्यांनी घातलेल्या अटी अमान्य केल्या असल्याचे कळविले आहे. तसेच ॲड.जुन्नरकर ॲण्ड असोशिएटस, मुंबई यांनी दि.१८/१०/२०१९ रोजीचे पत्राने मिडीएटर श्री. नितीन ठक्कर यांना Mediation Failure Report देणेबाबत कळविले आहे.

याबाबत तत्कालीन विश्वस्त श्री. मोहन जयकर यांनी त्यांचे दि.२३/१०/२०१९ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे कळविले होते.

*"Pursuant to the appointment of Mr. Nitin Thakker, Senior Advocate as the learned Mediator, Mr. Thakker had endeavoured to hold mediation meetings. However, M/s. Laservision Ltd., Hongkong came up with absurd suggestions and consequently the Mediator vide his Email dated 22nd October, 2019 has reported failure of the mediation proceedings. A copy of the Email sent by Mr. Thakker to M/s. Junnarkar & Associates is enclosed. Consequently steps will now have to be taken for initiating arbitration proceedings.*

*I will now prepare a notice to be addressed to M/s. Laservision Ltd., Hongkong which will be sent through the Solicitors appointed for the Trust M/s. Junnarkar & Associates and will keep you informed of further proceedings."*

पान नं.०३ वर...

पान क्र.०३

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांनी मिडीएशनसाठी तयारी न दर्शविल्यास करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे अर्बिट्रेशनची कार्यवाही करावी, असे ठरले आहे. विश्वस्त श्री. मोहन जयकर यांनी मे.जून्नरकर ॲण्ड असो., मुंबई यांचे मार्फत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांना अर्बिट्रेशन करणेकामी नोटीस देणेत येत असल्याचे दि.२३/१०/२०१९ रोजीचे पत्राने कळविले होते.

तथापी आर्बिट्रेशची कार्यवाही लवकर सुरु व्हावी या करीतासंस्थानचे वतीने मा. उच्च.न्यायालयात काम पहाणारे ॲड. नितीन भवर यांचेमार्फत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशनची कार्यवाही सुरु करणेसाठी दि.०९/११/२०१९ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार ॲड. नितीन भवर यांना संस्थानचे वतीने जा. क्र.३१५३/२०१९, दि.१४/११/२०१९ रोजीचे पत्राने मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशन प्रक्रियेची पुढील कार्यवाही करणेस कळविणेत आले होते.

तसेच सदरहू प्रकरणी पुढील कार्यवाही ॲड. नितीन भवर, औरंगाबाद यांचेमार्फत करणेत येणार असल्याने मे. जुन्नरकर ॲण्ड असो., मुंबई यांचेमार्फत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांना अर्बिट्रेशन करणेकामी नोटीस पाठविणेत येऊ नये अशा सुचना ॲड. श्री मोहन जयकर यांना संस्थानचे जा. क्रं.३६०५/२०१९, दि.१६/१२/२०१९ रोजीचे पत्राने देणेत आल्या. यावर ॲड मोहन जयकर यांनी दि.१८/१२/२०१९ रोजीचे ईमेल व्दारे खालीलप्रमाणे कळविले आहे.

"I have received your letter dated the 16th instant in connection with the arbitration to be initiated against M/s. Laseervision Ltd. HongKong. You have informed me that you have taken a decision to appoint Mr. Nitin Bhavar, Advocate to act on behalf of the Sansthan in the said arbitration.

I hope you are aware of the following:

a) The arbitration is an international arbitration.

b) That the venue of the arbitration is Mumbai.

c) The arbitration involves a claim of several crores of rupees.

d) That Mr. Kanade has already been appointed as the Arbitrator by M/s. Junnarkar & Associates pursuant to authority given by the Board.

Could you please inform me whether the instructions given by you are in abrogation of or in supersession of the decision taken by the Board.

I do not have any personal animosity against Mr. Nitin Bhavar but I am sure a dispute of this magnitude affecting the Sansthan should be dealt with deftly especially when Board after due deliberation had taken the decision to appoint M/s. Junnarkar & Associates.

You have informed me that the initiation of the arbitration proceedings has taken time, I hope you have perused the Arbitration Clause which specifically requires the process of mediation to be first gone through and it is only upon the failure in the mediation that arbitration proceedings can be commenced. The mediation proceedings which were pending before Mr. Nitin Thakkar, Senior Advocate of Mumbai High Court in Mumbai has given his Failure Report and it is pursuant thereto that the arbitration proceedings have to commence. I will therefore await your instructions. If, however, you are keen on appointing Mr. Nitin Bhavar, I have no objection and I leave it to your learned opinion.

त्यानूसार मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशनची कार्यवाही संस्थानचे पॅनल वरील ॲड. नितीन भवर यांचेमार्फत करणेत यावी अथवा ॲड. श्री मोहन जयकर यांनी उपरोक्त पत्रात नमूद केलेप्रमाणे मे. जुन्नरकर ॲण्ड असो., मुंबई यांचेमार्फत करणेत येत असलेली कार्यवाही सुरू ठेवावी याबाबत निर्णय होणेसाठी मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.२४/०२/२०२० रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील निर्णय क्र.१०१ अन्वये सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.

त्यानंतर मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.११/०५/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.२३७ अन्वये सदरहू विषयावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशन कार्यवाहीकरणेकामी आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्बिट्रेशन बाबत काम करणा-या वकीलांची नावे मागविणेत येऊन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव लवकरात लवकर मा. तदर्थ (Ad-hoc)समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले."*

पान नं.०४ वर...

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे उपरोक्त निर्णयानुसार मे. लेजर व्हिजन लि. हॉंगकॉंग यांचे समवेत अर्बिट्रेशन कार्यवाही करणेकामी खालील आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्बिट्रेशन बाबत काम करणा-या वकीलांची नावे मा. तदर्थ समितीचे दि.१३/०७/२०२० रोजीचे सभेपुढे सादर करणेत आली.

१) ॲड. अमृत मुकुंद वेरनेकर, डब्ल्यु -०४, जिवन ज्योत, १८/२०, कावासजी पटेल रोड, फोर्ट, मुंबई -४०००००१.

२) ॲड. जुन्नरकर ॲण्ड असोसिएट्स, ३११/३१२, इंबसी सेंटर, नरीमन पॉईंट, मुंबई – ४०००२१.

३) ॲड. अशुतोष सी. गावनेकर, तिसरा मजला, रुषभ टॉवर, जकारीया क्रॉस बंदर रोड, सेवरी पश्चिम, मुंबई- ४०००१५.

४) ॲड. शारदुल सिंग, ॲडव्होकेट अली चेंबर्स, ५वा मजला, नागिनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई - ४०००००१.

उपरोक्तपैकी ॲड.अमृत मुकुंद वेरनेकर, मुंबई यांनी संस्थानचे वर्ग ०४ कर्मचारी निवासस्थान इमारतींचे बांधकाम करणेकामाचे ठेकेदार अस्मिता इडींया लि., मुंबई यांचे विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी या लवादात Sole Arbitrator Dr. Justice F.I. Rebello यांचे समोर संस्थान वकिल म्हणून काम पाहिले आहे. तसेच ॲडव्होकेट वेरनेकर यांनी आतंरराष्ट्रीय पातळीवरील M/s Soma Canada Steel Inc. of Canada V/s M/s Indian Steel Corporation Ltd of India यांचे लवादात भारतीय कंपनीकडून कामकाज पाहिलेले आहे. तसेच ॲड. जुन्नरकर ॲण्ड असोसिएट्स, मुंबई हे संस्थानचे वतीने सदरहू प्रकरणी मिडीएशनसाठी वकिल म्हणून काम पाहीले आहे.

मे.लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन कार्यवाही करणेकामी वकिलाची नेमणूक करणेबाबत मा. तदर्थ (Ad-hoc) समितीच्या दि.१३/०७/२०२० रोजीचे सभेपुढे मे.लेजर व्हिजन लि.,हॉंगकॉंग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन कार्यवाही करणेकामी ॲडव्होकेटची नेमणूक करणेबाबत वरीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील निर्णय क्र.३६६ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"समितीचे सदस्य १) मा.श्री.श्रीकांत ल. आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर, २) मा.श्री.दिलीप स्वामी, अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक ३) मा.श्रीमती गीता बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी चर्चेअंती खालील निर्णय घेतला.*

*या विषयावर सविस्तर चर्चा झाली, यामध्ये Arbitration चे काम पाहणारे वकील नेमण्याअगोदर Arbitration & Conciliation Act चे कलम ११ प्रमाणे मे.लेजन व्हिजन लि.हॉंगकॉंग यांना Arbitrationचे नामनिर्देशन (nominate) करुन नोटीस देणे अपेक्षित आहे. याबाबत तदर्थ समितीचे सदस्य प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी निवृत्त न्यायमुर्ती मा.श्री.ए.एम.ढवळे यांचेशी विचारणा केली असता ते Arbitrator म्हणून काम करण्यास तयार आहेत असे त्यांनी सांगितले असल्याचे समिती समोर सांगण्यात आले. करीता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संस्थानतर्फे मा.न्यायमुर्ती श्री.ए.एम ढवळे यांना dhavalearun@gmail.com या ई-मेलवर Arbitrator म्हणून काम करण्याबाबत रीतसर विनंती पाठवावी. सदरचे विषयाबाबत निर्णय दि.२४ जुलै,२०२० च्या तदर्थ समितीच्या पुढील बैठकीमध्ये घेण्यात येईल.*

*समिती सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री.अरुण डोंगरे, (भा.प्र.से.) यांनी त्यांचे वस्तुस्थितीवर आधारीत खालील मत मांडले.*

*मे.लेजन व्हिजन लि.हॉंगकॉंग यांचेसमवेत Arbitration करणेकामी ॲडव्होकेट यांची नेमणूक करणेसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रकरणात कामकाज केलेले निवृत्त मा.उच्च न्यायालयाचे न्यायाधीश व विधिज्ञ यांचे आवश्यक फी व इतर अनुषंगीक खर्च इत्यादी बाबत वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावे व तदनंतर त्यांची नेमणूक करणेकामी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीने एकमताने निर्णय घ्यावा."*

मा.तदर्थ समितीचे दि.२८/०८/२०२० रोजीचे सभेत दि.१३/०७/२०२० रोजीच्या सभेतील इतिवृत्त वाचून कायम करतांना या सभेतील निर्णय क्र.३६६ बाबत खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास निर्णय क्र.४२१ अन्वये मान्यता देण्यात आली.

*"मा.सदस्य सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.13.07.2020 च्या विषय क्र.12 चे निर्णय क्र.366 बाबत असे प्रतिपादन केले की, सदरचा निर्णय घेताना पूर्वीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.डोंगरे यांनी असे मत मांडलेले होते की, मे.लेजर व्हिजन लि. हॉंगकॉंग यांचे समवेत arbitration करणेकामी arbitrator यांची नेमणूक करणेसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रकरणात कामकाज केलेले निवृत्त मा.उच्च न्यायालयाचे न्यायाधीश व विधिज्ञ यांचे आवश्यक फी व इतर अनुषंगीक खर्च इत्यादि बाबत वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत व तदनंतर त्याची नेमणूक करावी, याची पुर्नरावृत्ती करत त्याकामी आग्रह धरला होता.*

पान नं.०५ वर...

*पुढे चर्चे दरम्यान त्यांनी पूर्वीच्या निर्णयात मा.न्यायमूर्ति श्री.ए.एम.ढवळे यांची arbitrator म्हणून केलेली निवड यावर मत मांडले की, अशा एकाच व्यक्तिचे नांव सुचवण्याऐवजी आणखी काही व्यक्तींची नांवे सुचवावीत. पुढील चर्चे दरम्यान विद्यमान सदस्य सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ति मा.श्री.धर्माधिकारी साहेब अशी दोन नावे निवृत्त न्यायाधीशांचे यादीत असल्याने निदर्शनास आणले. यावर मा.तदर्थ समिती अध्यक्ष यांनी तुम्हाला श्री.ढवळे यांचे नावाबाबत काही Problem आहे का? अशी शंका उपस्थित केली. तथापी यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी न्यायतत्वशास्त्राचा विचार करता विशिष्ट नावाचा ठराव रास्त नसल्याचे नमुद केले. तसेच याबाबत मा.उच्च न्यायालयात संपर्क करुन arbitrator नियुक्तीबाबतची प्राप्त माहिती समितीसमोर मांडली. ती खालील प्रमाणे.*

*Arbitrator नेमणेकरीता उभय पक्षकारांच्या संमतीची आवश्यकता असुन एखादे पक्षकाराने त्यास संमती दिली नाही तर उपयोग होणार नाही, असे विदीत केले. त्यावर तदर्थ समिती अध्यक्ष यांनी सदर माहिती अर्धवट असुन Sec.11 of Arbitration and Conciliation Act प्रमाणे हे International Arbitration असल्याने संस्थानने nominsy केलेले Arbitrator सदर कंपनीस मंजूर नसतील तर Arbitrator appoint करण्याचे अधिकार मा.सर्वोच्च न्यायालयाला आहे, असे अध्यक्षांनी नमुद केले. व मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायमुर्ती मा.श्री.धर्माधिकारी साहेब यांचे मोबाईलवर संपर्क करण्याची तयारी दर्शविली.व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचेशी बोलावे असे सुचवले. त्यावर सदस्य सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अध्यक्ष यांनीच बोलावे असे सुचविल्यावरुन अध्यक्ष श्री.आणेकर यांनी मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायमूर्ति मा.श्री.बी.पी.धर्माधिकारी साहेब यांचे मोबाईलवर मिटींग दरम्यान लगेच संपर्क साधून त्यांना प्रस्तूतच्या प्रकरणात संस्थानचे वतीने arbitrator म्हणून काम करण्याची विनंती केली असता त्यांनी त्यास सहमती दर्शविली. या निर्णयास समितीचे सदस्य सचिव श्री.बगाटे यांनी सहमती दिल्यामुळे मा.न्यायमुर्ती (निवृत्त) श्री.ए.एम.ढवळे साहेब यांचे ऐवजी मा. मुख्य न्यायमुर्ती (निवृत्त) श्री.बी.पी.धर्माधिकारी साहेब यांची या प्रकरणात संस्थानचे arbitrator म्हणून सर्वानुमते नियुक्ती केली. संस्थानने पुढील कार्यवाही करावी. असे ठरले."*

प्रस्तुत प्रकरणी मा. मुख्य न्यायमुर्ती (निवृत्त) श्री. बी. पी. धर्माधिकारी यांना या प्रकरणात संस्थानचे आर्बिट्रेटर म्हणून नियुक्ती करणेपूर्वी The Arbitration and conciliation Act, 1996 नुसार कार्यवाही करणेसाठी संस्थानमार्फत आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्बिट्रेशनबाबत काम करणा-या वकीलाची नेमणूक संस्थानमार्फत करणे आवश्यक आहे. अर्बिट्रेशन प्रकरणी संस्थानची बाजू मांडणा-या ॲडव्हकेट यांच्या कायदेशीर अभिप्रायानुसार आर्बिट्रेटर यांचेकडे लवाद प्रकरणाची माहिती व कागदपत्रे सादर करणे तसेच लेजर व्हिजन यांना संस्थानचे वतीने नेमण्यात आलेल्या आर्बिट्रेटरकरीता सहमती मागविणेकामी कायदेशीर पत्रव्यवहार करणेकरीता आंतरराष्ट्रीय दर्जाच्या ॲडव्हेकट यांची नेमणूक करणे आवश्यक आहे.

The Arbitration and conciliation Act, 1996 नुसार लेजर व्हिजन यांचे समवेत अर्बिट्रेशनबाबत कार्यवाही करणेसाठी संस्थानचे वतीने अंतरराष्ट्रीय स्तरावरील ॲडव्हकेटची नेमणूक करणेसाठी अभिप्राय मागविणेकामी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा मा.अध्यक्ष, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना जा.क्र.२८१८, दि.२४/१२/२०२०, जा.क्र.३२४४, दि.२३/०१/२०२१ व जा.क्र.३७३५, दि.०१/०३/२०२१ रोजीचे पत्राने विनंती करणेत आली होती. याबाबत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा मा.अध्यक्ष, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडील जा.क्र.आस्था/१३४/२०२१, दि.१०/०३/२०२१ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे अभिप्राय प्राप्त झालेला आहे.

*"तदर्थ समितीच्या दि.१३/०७/२०२० रोजीच्या सभेतील विषय क्र.१२ चा निर्णय क्र.३६६ जो दि.२८/०८/२०२० च्या सभेमध्ये कायम होतांना नमूद केलेल्या निर्णय क्र.४२१(३) प्रमाणे अर्बिट्रेशन सुरु करण्याबाबत मे. लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना नोटीस देवून पुढील कारवाई संस्थानचे सद्याचे पॅनलवरील विधिज्ञ यांचे कडून करुन घेणे अपेक्षित होते ते त्वरीत करावे, कारण मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे मर्यादा अधिनियम (Limitation Act) मधील मर्यादेला दिलेली स्थगिती दि.१५ मार्च २०२१ पासून रद्द होत आहे, असे समजते."*

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे दि.१३/०७/२०२० रोजीचे सभेत मे.लेझर व्हिजन लि.हॉंगकॉंग यांचेसमवेत आर्बिट्रेशन कार्यवाही करणेकामी ॲडव्होकेटची नेमणूक करणेबाबत विषय ठेवेणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.३६६ अन्वये आर्बिट्रेटर नेमणेबाबत चर्चा झाली, तसेच मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे दि.२८/०८/२०२० रोजीचे सभेत निर्णय क्र.४२१ (३) अन्वये आर्बिट्रेटर नेमणेबाबत ठराव झाला.

दि.२८/०८/२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे मा.अध्यक्ष व श्री.स्वामी साहेब, सदस्य यांनी स्वाक्षरीत केलेल्या इतिवृत्तावर सदस्य / मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांची भूमिका अभिलेखावर कायम ठेवुन (under protest) स्वाक्षरी करुन दि.२८/१०/२०२० रोजीचे पत्रान्वये प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा मा.अध्यक्ष, तदर्थ समिती यांचेकडे पाठविलेले आहे.

मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे श्री. उत्तमराव रंभाजी शेळके यांनी दाखल केलेल्या जनहित याचिका नं.१२० / २०१९ यावर मा.न्यायालयाने दि.०४/११/२०२० रोजी दिलेल्या आदेशामध्ये दि.२८/०८/२०२० रोजी झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्तात सदस्य सचिव / मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मते अंतर्भूत करणेबाबत निर्देशित केलेले आहे.

पान नं.०६ वर...

मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सदस्य सचिव / मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मते अंतर्भूत करुन स्वाक्षरीत केलेले दि.२८/०८/२०२० रोजीच्या सभेचे इतिवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा मा.अध्यक्ष, तदर्थ समिती यांचेकडे स्वाक्षरीकरीता पाठविलेले असून सदरचे इतिवृत्त अद्याप स्वाक्षरी होऊन प्राप्त झालेले नसल्यामुळे विषयांकित प्रकरणावरील कार्यवाही करणेबाबत अडचण येत असल्याचे मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा मा.अध्यक्ष, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दि.१५/०३/२०२१ रोजीचे पत्राने विदीत करणेत आले होते.

मा. तदर्थ समितीचे दि.२८/०८/२०२० रोजीचे सभेत दि.१३/०७/२०२० रोजीच्या सभेतील इतिवृत्त कायम करतांना निर्णय क्र.४२१ अन्वये मा. मुख्य न्यायमुर्ती (निवृत्त) श्री.बी.पी.धर्माधिकारी साहेब यांची या प्रकरणात संस्थानचे arbitrator म्हणून बहूमताने नियुक्ती करणेबाबत ठरले. याबाबत मा. मुख्य न्यायमुर्ती (निवृत्त) श्री.बी.पी.धर्माधिकारी साहेब यांना रजीस्टर पोस्टाव्दारे मा. मुंबई उच्च न्यायालयाचे पत्त्यावर पाठविणेत आले होते. तथापी, सदरहू पत्र संस्थानकडे परत आलेले असून त्यावर "LEFT" असा शेरा नमूद करणेत आला आहे.

उपरोक्त कार्यवाहीबाबत तसेच संस्थानचे दि.२४/१२/२०२०, दि.२३/०१/२०२१, दि.०१/०३/२०२१ व दि.१५/०३/२०२१ रोजीचे पत्राने विनंती केलेल्या विषयाबाबत मार्गदर्शन प्राप्त होणेसाठी दि.०१/०६/२०२१ रोजीचे पत्राने विनंती करणेत आली होती.

मा. मुख्य न्यायमुर्ती (निवृत्त) श्री.बी.पी.धर्माधिकारी साहेब यांची या प्रकरणात संस्थानचे arbitrator म्हणून बहूमताने नियुक्ती करणेत आले असल्याचे व याप्रकरणी पुढील कार्यवाही करणेसाठी मार्गदर्शन करणेसाठी विनंती करणेबाबत त्यांना दि.०१/०६/२०२१ रोजीचे पत्राने त्यांचे नागपूर येथिल पत्यावर रजिस्टर पोस्टाव्दारे कळविणेत आले आहे.

**विभागाचा अभिप्राय -**

सदरहू प्रकरणी अर्बिट्रेटर नेमणूक करणेपूर्वी लवाद प्रकरणाची माहिती व कागदपत्रे सादर करणे तसेच लेजर व्हिजन यांना संस्थानचे वतीने नेमण्यात आलेल्या आर्बिट्रेटरकरीता सहमती मागविणेकामी कायदेशीर पत्रव्यवहार करणेकरीता ॲडव्होकेट यांची नेमणूक करणेकामी खालील आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्बिट्रेशन बाबत काम करणा-या वकीलांची नावे मा. तदर्थ समितीचे दि.१३/०७/२०२० रोजीचे सभेपुढे सादर करणेत आली होती.

१) ॲड. अमृत मुकुंद वेरनेकर, डब्ल्यु -०४, जिवन ज्योत, १८/२०, कावासजी पटेल रोड, फोर्ट, मुंबई - ४००००१.
२) ॲड. जुन्नरकर ॲण्ड असोसिएट्स, ३११/३१२, इंबसी सेंटर, नरीमन पॉईंट, मुंबई – ४०००२१.
३) ॲड. अशुतोष सी. गावनेकर, तिसरा मजला, रुषभ टॉवर, जकारीया क्रॉस बंदर रोड, सेवरी पश्चिम, मुंबई- ४०००१५.
४) ॲड. शारदुल सिंग, ॲडव्होकेट अली चेंबर्स, ५वा मजला, नागिनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई - ४००००१.

उपरोक्तपैकी ॲड.अमृत मुकुंद वेरनेकर, मुंबई यांनी संस्थानचे वर्ग ०४ कर्मचारी निवासस्थान इमारतींचे बांधकाम करणेकामाचे ठेकेदार अस्मिता इर्डीया लि., मुंबई यांचे विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी या लवादात Sole Arbitrator Dr. Justice F.I. Rebello यांचे समोर संस्थान वकिल म्हणून काम पाहिले आहे. तसेच ॲडव्होकेट वेरनेकर यांनी आतंरराष्ट्रीय पातळीवरील M/s Soma Canada Steel Inc. of Canada V/s M/s Indian Steel Corporation Ltd of India यांचे लवादात भारतीय कंपनीकडून कामकाज पाहिलेले आहे. तसेच ॲड. जुन्नरकर ॲण्ड असोसिएट्स, मुंबई हे संस्थानचे वतीने सदरहू प्रकरणी मिडीएशनसाठी वकिल म्हणून काम पाहीले आहे.

उपरोक्तपैकी एका वकिलाची अथवा आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्बिट्रेशन बाबत काम करणा-या अन्य वकीलाची सदरहू प्रकरणी ॲडव्होकेट म्हणून नेमणूक करणेत यावी असे मत आहे.

**प्रस्ताव –**

तरी सदरहू प्रकरणी लवाद प्रकरणाची माहिती व कागदपत्रे सादर करणे तसेच लेजर व्हिजन यांना संस्थानचे वतीने नेमण्यात आलेल्या आर्बिट्रेटरकरीता सहमती मागविणेकामी कायदेशीर पत्रव्यवहार करणेकरीता ॲडव्होकेट यांची नेमणूक करणेचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

17/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

16.6 16/6

विषय क्र.- 38

# मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय

136

## बांधकाम विभाग

**विषय : श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग प्रकल्पाचे बांधकाम ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन परीपत्रक दि.२९/०७/२०२० अन्वये मागणी केलेली सुरक्षा ठेव रक्कम रू.३,६१,७३,४३६/- मात्र विनाशर्त बॅंक गॅरेंटीच्या (दोषदायित्व निवारण कालावधीपर्यंत) बदल्यास मुक्त करणेच्या मागणीबाबत...**

**टिपणी -**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद** - अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

**शासन निर्णय -** १) शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१३१३/प्र.क्र.१३३/का.१६, दि.१६/०२/२०१८ रोजीचे निर्णयान्वये, शिर्डी सर्व्हे नं.२/४, ३/१ व ३/७ मधिल संस्थान मालकीच्या क्षेत्रफळावर नविन दर्शनरांग प्रकल्प उभारणीसाठी येणा-या रू.११२,४०,९०,०५९/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

२) शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१३१३/प्र.क्र.१३३/का.१६, दि.१६/०८/२०१९ रोजीचे पत्रान्वये, शासनाचे विधि सल्लागार-नि-सहसचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी संस्थानने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली असून सदर पत्रात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

*"२. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मे. भानू कन्स्ट्रक्शन मुंबई या भागीदारी पेढीस श्रीम भानु कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई कंपनीने विधिवत Take Over केले आहे करिता श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारत बांधकाम प्रकल्पासंबंधी येथून पुढील सर्व व्यवहार तसेच कर कपात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे श्रीम भानु कन्स्ट्रक्शन प्रा.लि. मुंबई यांच्या नावाने करण्यास मान्यता देण्यात येत आहे."*

**मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय**:- मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५०६ अन्वये, श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारत बांधकामाकरीता निम्नतम निविदाधारक ठेकेदार भानु कन्स्ट्रक्शन, मुंबई यांना जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीचे बांधकाम श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचेमार्फत सुरु आहे. सदरहू इमारतीचे बांधकाम सध्या निविदेप्रमाणे G+2 असून त्यामध्ये खालीलप्रमाणे सुविधा आहेत.

- **तळमजला** - नियोजित दर्शनरांग इमारतीमध्ये ०३ भव्य प्रवेश हॉल आहेत, त्यामध्ये भक्तांना मोबाईल व चप्पल लॉकर्स, बायोमेट्रीक पास काऊंटर - ४८, पेड पास काउंटर -२०, लाडू काउंटर - १०, उदी व कापडकोठी काऊंटर – १०, बुक स्टॉल, डोनेशन ऑफिस,चहा / कॉफी काउंटर, सिक्युरिटी चेक एकाच ठिकाणी व एकाच वेळी – ४० व्यक्तींची, जीने – ११, लेडीज व जेन्टस टॉयलेट व्यवस्था इ.
- **पहिला व दुसरा मजला** - भक्तांकरीता बसण्याची व्यवस्था असेलेले एकूण १२ मोठे हॉल (एक हॉल साईज - १५.१० मी. X ३१.१५ मी.), चहा / कॉफी काउंटर, विदयुतीकरण व्यवस्था जनरेटर बॅकअपसह, वायुविजन व्यवस्था, उदवाहक / लिफ्ट व्यवस्था - १०, जीने - ११, लेडीज व जेन्टस टॉयलेट व्यवस्था, आर.ओ. प्रक्रियेव्दारे शुध्द पिण्याचे पाण्याची व्यवस्था, फायर फायटींग व्यवस्था इ.

या व्यतिरिक्त या प्रकल्पात सांडपाणी प्रक्रिया संयंत्र, रॅम्प, प्रथमोपचार केंद्र, रांपूर्ण इंटेरीअर वर्क, सायनेजेस, अंतर्गत रस्ते, स्ट्रीट लाईट, इलेक्ट्रीकल सबस्टेशन, जनरेटर व्यवस्था, वायुविजन व्यवस्था, लॅण्डस्केपींग, रेनवॉटर हार्वेस्टिंग, पिंपळवाडी रस्त्यावरुन मंदिर परिसरातील जुन्या दर्शनरांगेला जोडण्यासाठी कनेक्टींग ब्रिज, संरक्षण भिंत इत्यादी सुविधांचा समावेश करणेत आला आहे.

सदरहू प्रकल्पाचा ठळक तपशिल व बांधकामाच्या प्रगतीची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| **कामाचे नाव** | श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणे. |
| **आर्किटेक्ट** | माथूर ॲण्ड काप्रे असो. नवी दिल्ली. |
| **ठेकेदार** | श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई. |
| **कार्यादेश** | १) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८.<br>२) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/१९९९/२०१९, दि.२२/०८/२०१९. |
| **मंजूर निविदा रक्कम** | रु.१०९.५० कोटी. |
| **भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांचेशी केलेल्या करारनाम्याचा दिनांक** | दि.२२/१०/२०१८. |

पान क्र.०२ वर...

| | |
|---|---|
| **श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचेशी केलेल्या करारनाम्याचा दिनांक** | दि.२२/०८/२०१९. |
| **कामाचा कालावधी** | १२ महिने (दि.१९/१०/२०१८ ते दि.१८/१०/२०१९). |
| **मूदतवाढ** | मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ चे सभेतील नि.क्र.४३० खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.<br>*"..यावर सविस्तर चर्चा होऊन, ठेकेदार यांना ESS, UGT व STP चे बांधकामासाठी अद्याप संस्थानकडून जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रकल्पाचे सर्व काम पूर्ण करण्यासाठी या जागा उपलब्ध करणेत आल्यानंतर तेथुन पुढे चार महिन्यांची मूदतवाढ निविदेतील पृष्ठ क्रं.०५ वरील अ.नं.०७ ची Incentive अदा करणेबाबतची शर्त रद्द करण्याचे अटीवर देण्यास मान्यता देण्यात आली".* |
| **एकूण बांधकाम क्षेत्रफळ** | निविदेत नमूद एकूण बांधकाम क्षेत्रफळ – २२२१४.०० चौ. मी. (FSI Area.) |
| **कामाची सद्यस्थिती** | • **मुख्य इमारत -**<br>**तळमजला** - आर.सी.सी काम पूर्ण, बांधकाम पूर्ण, प्लास्टर पूर्ण, ग्रेनाईट फ्लोरींग व डॅडोचे काम प्रगतीत, विंडो सिल व जॅम्बला ग्रीन मार्बल तसेच जॅम्बला रेड आग्रा स्टोन बसविणे प्रगतीत, प्लंबींगचे काम प्रगतीत, एच.व्ही.ए.सी चे काम प्रगतीत, फायर फायटींगचे काम प्रगतीत, इलेक्ट्रीकल कन्डयूटींग व वायरींगचे काम प्रगतीत, टॉयलेट वॉटरप्रुफिंगचे काम प्रगतीत.<br>**पहिला मजला** - आर.सी.सी काम पूर्ण, बांधकाम पूर्ण, प्लास्टर पूर्ण, ग्रेनाईट फ्लोरींग व डॅडोचे काम प्रगतीत, विंडो सिल व जॅम्बला ग्रीन मार्बल तसेच रेड आग्रा स्टोन बसविणे प्रगतीत, एच.व्ही.ए.सी चे काम प्रगतीत, प्लंबींगचे काम प्रगतीत, फायर फायटींगचे काम प्रगतीत, इलेक्ट्रीकल कन्डयूटींग व वायरींगचे काम प्रगतीत, टॉयलेट वॉटरप्रुफिंगचे काम प्रगतीत.<br>**दुसरा मजला** - आर.सी.सी काम पूर्ण, बांधकाम अंतिम टप्प्यात, प्लास्टर अंतिम टप्प्यात, विंडो सिल व जॅम्बला ग्रीन मार्बल तसेच रेड आग्रा स्टोन बसविणे प्रगतीत, एच.व्ही.ए.सी चे काम प्रगतीत, फायर फायटींगचे काम प्रगतीत, इलेक्ट्रीकल कन्डयूटींग व वायरींगचे काम प्रगतीत.<br>**टेरेस** - प्रस्तावित तिसरा मजल्यामुळे रॅम्पचे उत्तर व दक्षिण बाजूचे स्लॅब कास्टींग बाकी आहे. पॅरापेट बांधकाम, टेरेस वॉटरप्रुफिंग, ओव्हर हेड टँक, ममटी रूम, लिफ्ट रूमचे काम प्रलंबित आहे.<br>• **कनेक्टींग कॉरीडॉर** - कनेक्टींग कॉरीडॉरपैकी मंदिर परिसरातील पी.आर.ओ चे समोरील कारंजाचे भागातील आर.सी.सी. काम, बांधकाम, प्लास्टर पूर्ण झाले आहे. स्टोन क्लॅडींगचे काम प्रगतीत आहे.<br>• प्रशासकीय इमारतीस जोड़णा-या कॉरीडॉरचे आर.सी.सी. काम प्रगतीत आहे.<br>• नियोजीत दर्शनरांग प्रकल्पातील Connecting Corridor above Pimpalwadi Road (From Proposed Main Building to Mandir Complex) चे आर.सी.सी. फुटींग व कॉलमचे काम प्रगतीत आहे.<br>• **इतर कामे** – परीसर विकास कामे, स्टॉर्म वॉटर लाईन, सिव्हरेज लाईन, फायर हायड्रंट लाईन, इलेक्ट्रीकल केबलकरीता पाईपलाईन, ट्रेंच बांधकाम, चेंबर बांधकाम, पिण्याचे पाण्याची पाईपलाईन, रस्त्याचे संदर्भातील इतर कामे प्रगतीत.<br>• स्टोन क्लॅडींगचे काम प्रगतीत.<br>• ESS चे काम प्रगतीत आहे.<br>• STP & UGT चे कामास सुरूवात करणेत येत आहे. |

ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी पत्र क्र.SHRIM BHANU/SP/2020/111, दि.३०/११/२०२० अन्वये महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परीपत्रक क्र.संकिर्ण १०२०/प.क्र.१००/२०२०/व्यय-१२, दि.२९/०७/२०२० ला अनुसरुन त्यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा ठेव रक्कम परत मिळणेबाबत संस्थानकडे खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

पान क्र.०३ वर...

*"With reference to your work Order No.SSST/Const/2520/2018, dated.23/08/2018, Clause No.5 Total Security Deposit of project shall be 5% of Contract sum. Initially we have Deposited 50% security Deposit amounting Rs.1,90,75,000/- deposited by RTGS No.IBKLR92018082400065652. dtd.24/08/2018. (Sansthan Receipt No.TRF-18-418, dtd.12/01/2019) Including EMD Rs.83,00.000/- deposited through E-procurement Ref. No. 5472291626027, UTR No.CP14765528, State Bank of India on dtd.04/07/2018 (Sansthan Receipt No.1002, dtd.03/12/2018).*

*As per above mention GR clause No.3.1 kindly release 50% security deposit amounting Rs.1,36,87,500/- against bank guarantee.*

*Also from our R. A. Bills retention money @ 5% amounting Rs.2,24,85,936/- is deducted. As per above GR Clause no.2.2 B Only 1% retention money shall be recovered in the form of Bank Guarantee. Kindly release our total retention money Rs.2,24,85,936/- accordingly."*

वर नमूद ठेकेदार यांचे पत्र व शासन परीपत्रक सोबत अवलोकनार्थ जोडले आहे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परीपत्रक क्र.संकिर्ण-१०२०/प.क्र.१००/२०२०/व्यय-१२, दि.२९/०७/२०२० मध्ये खालील तरतूदी नमूद आहे.

*"... ... उपरोक्त विषयाबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.*

*२. राज्यात कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील शासनाची कामे करणा-या कंत्राटदारांना सोसाव्या लागत असलेल्या अडचणींसंदर्भात उपाययोजना करणे व त्यांना सहाय्य करणे आवश्यक असून त्यादृष्टीने खालील उपाययोजना करण्यात यावी.*

*१) शासकीय कामाच्या पूर्णत्वासाठी* ***मुदतवाढीची*** *विनंती कंत्राटदाराने केल्यास त्यास दि.१५ मार्च, २०२० ते दि.१५ सप्टेंबर, २०२० अशी सहा महिन्यांची मूदतवाढ देण्यात येईल. या कालावधीसाठी त्याचेवर कोणतीही दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार नाही. मात्र कंत्राटदारास या कालावधीसाठी कोणतेही दावे (Claims) करता येणार नाहीत. भाववाढी संदर्भात कंत्राटातील अटी व शर्ती लागू राहतील. वरील सुविधा ज्या प्रकरणी दि.१५ मार्च, २०२० पूर्वी निविदा शर्तींचा अन्यथा भंग झाला नसेल अशा कंत्राटांना लागू राहतील.*

*२) ज्या कामांमध्ये* ***सुरक्षा अनामत रक्कम*** *(Security Deposit) चालू देयकांमधून (RA Bills) मधून करण्यात येते, अशा प्रकरणी प्रत्येक चालू देयकातून करावयाची वजावट यांचे प्रमाण कमी करुन आणि / अथवा वजावटीचा कालावधी अधिक देयकांकरीता वाढविण्यात येईल. तथापि, संपूर्ण सुरक्षा अनामत रक्कम वसूल करण्यात येईल. याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.*

.....

.....

***२.२) मात्र ज्या कंत्राटांमध्ये मुळ सुरक्षा अनामत*** *(Security Deposit)* ***निवीदा रकमेच्या २ टक्क्यांपेक्षा अधिक आहे.*** *(RA Bill* ***मधून वसूल करायची रक्कम निविदा रकमेच्या १% पेक्षा जास्त आहे.)***

.....

.....

*(ब) जर वजावट रक्कम निविदा रकमेच्या १% वर वसुली झाली असेल*

*तर ती रक्कम कंत्राटदाराला एकूण वसूल करावयाची रक्कम (निविदाप्रमाणे RA Bill मधून वसूल करावयाची रक्कम) विनाशर्त बॅंक गॅरेंटीच्या (दोष दायित्व निवारण कालावधीपर्यंत) बदल्यास मुक्त करावी.*

*२.३) वरील सुविधा ज्या प्रकरणी दि.१५ मार्च, २०२० पर्वी विविदा शर्तींचा अन्यथा भंग झाला नसेल, अशा रू.५० लक्ष पेक्षा अधिक रकमेच्या कंत्राटांना लागू राहतील.*

.....

.....

*५. वर परिच्छेत १ ते ४ मध्ये नमूद केलेल्या सवलतींचा लाभ घेण्यास इच्छुकता दर्शविल्यानंतर कंत्राटदारास दैवी आपत्ती (Force Majeure Clause) संबंधातील कंत्राटातील अथवा सर्वसाधारण तरतूद लागू करण्याबाबत विनंती करता येणार नाही.*

*६. सदर मार्गदर्शक सूचना ह्या अंतरिम स्वरूपाच्या असून नवीन निविदा काढताना त्यांच्या अटी व शर्तींमध्ये या सूचनांचा आधार घेवून बदल करण्यात येवू नयेत. तथापि यथास्थिती नवीन कंत्राटांनाही या सूचनांचा लाभ देण्यास हरकत नाही.*

*७. सदर मार्गदर्शक सूचना दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत अंमलात राहतील.*

.....

.....

*९) शासकीय कंपन्या, शासकीय उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, निमशासकीय संस्था या सदर मार्गदर्शक सूचना योग्य त्या फेरफारांसह लागू करु शकतील."*

पान क्र.०४ वर...

ठेकेदार यांचे मागणीबाबत व शासन परीपत्रकास अनुसरून आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो., नवि दिल्ली यांनी दि.०३/१२/२०२० खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

".. .. *1) Security Deposit:*

a) *The contractor has asked for refund of 50% of the security deposit, deposited at the time of award of the works of Rs.2,73,75,000/-. Therefore Rs.1,36,87,500/- has been demanded as per clause 3.1 of the GO.*

b) *The above clause clearly stipulates that the same is payable if work executed value is more than 50% of the contract amount.*

c) *The works executed under the contract have not achieved the 50% criteria hence the same is not payable at the moment, however once the value exceeds 50% of the contract value, same shall become payable.*

*2) Retention Money from R. A. Bills:*

a) *The contractor has asked for refund of the retention money deducted from the RA Bills over the value of 1% of the contract value, under clause 2.2 (b) of the GO.*

b) *This clause clearly stipulates that the amount may be released against a bank guarantee. Therefore, the Sansthan may release the total retention amount deducted against RA Bills of Rs.2,24,85,936/- against a bank guarantee furnished by the Contractor."*

निविदेतील अटी व शर्तींनूसार ठेकेदार यांचेमार्फत व त्यांचे रनिंग बिलामधून खालीलप्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम जमा / कपात करणेत आलेली आहे.

| A) | **Details of Security Deposit -** | | **Amount Rs.** |
|---|---|---|---|
| 1 | EMD Deposited: | Deposited through E-procurement Ref. No.5472291626027, UTR No.CP14765528, State Bank of India on dtd.04/07/2018. (Sansthan Receipt No.1002, dtd.03/12/2018). | 83,00,000/- |
| 2 | ISD Deposited: | Deposited by RTGS No:IBKLR92018082400065652, dtd.24/08/2018. (Sansthan Receipt No.TRF-18-418, dtd.12/01/2019). | 1,90,75,000/- |
| | | **(A) Initial Security Deposit (EMD + ISD):** | **2,73,75,000/-.** |
| **B)** | **Security Deposit Recovered from RA Bills -** | | |
| 3 | Security Deposit recovered from bills @ 5% of gross value of the bill. | RA Bill No.1 | 16,37,901/- |
| 4 | | RA Bill No.2 | 81,19,661/- |
| 5 | | RA Bill No.3 | 14,42,065/- |
| 6 | | RA Bill No.4 | 20,16,824/- |
| 7 | | RA Bill No.5 | 17,42,900/- |
| 8 | | RA Bill No.6 | 13,74,046/- |
| 9 | | RA Bill No.7 | 15,70,130/- |
| 10 | | RA Bill No.8 | 21,15,303/- |
| 11 | | RA Bill No.9 | 11,14,629/- |
| 12 | | RA Bill No.10 | 13,52,477/- |
| | | **(B) Security Deposit recovered from R. A. Bills Rs.:** | **2,24,85,936/-** |
| | | **TOTAL SECURITY DEPOSIT WITH SANSTHAN (A+B):** | **4,98,60,936/-.** |

या प्रकल्पाचे ई-निविदेत ठेकेदार यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा ठेव रक्कम (Security Deposit) परत करणेबाबत निविदेत खालीलप्रमाणे नमूद आहे.

पान क्र.०५ वर...

**Page No.16, (Total Security Deposit) -**

5% of Contract Value.

The successful Contractor shall have to pay 5% of the Contract amount as security deposit. The earnest money deposit of 1% paid by the Contractor along with the submission of the tender shall be converted into initial security deposit. The initial security deposit @ 2.5% of contract value inclusive of EMD shall be paid by the Contractor within 07 days from the date of receipt of Work Order, in the form of Demand Draft drawn on any of the Nationalized or Scheduled Commercial Bank in the name of Chief Executive Officer, payable at Shirdi. The Contractor shall complete the contract documents within 7 days from date of receipt of Work Order by them, as acceptance of their tender, failing which their earnest money will be forfeited to Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. The balance security deposit of 2.5% of the contract amount will be recovered from Running Account bills @ 5% of the gross value of bill till the total amount of security deposit reaches 5% of contract amount or the value of work executed, whichever is more.

**Page No.19, Clause No.11 (Appendix A to Detail Tender Notice) -**

**Defects Liability Period:**

01 year from the date of issue of completion certificate by Sansthan. 10 years for specialized items as mentioned in Special Conditions of Contract.

**Page No.19, Clause No.12 (Appendix A to Detail Tender Notice) -**

**Return of Security Deposit (5 %):**

50% with settlement of final bill and 50% on successful completion of defects liability period.

**Page No. 79, Clause No.154 -**

The balance 50% amount of Retention Money may be returned by the Employer to the Contractor after satisfactory expiry of the defect liability period, if there is nothing outstanding against the Contractor and provided that all defects pointed out by the Architect and the Executive Engineer have been made good accordingly to the true intent and meaning and certified by the Architect and Executive Engineer and also provided that there was no case of fraud, dishonest or fraudulent concealment relating to works or materials or any matter dealt with in the completion certificate and in case of any defects and insufficiencies in the work or materials which on reasonable examination would not have disclosed and provided always that the Contractor shall have been paid the final bill after he has rendered a 'No Claim Certificate' and also contractor has submitted a "No Dues Certificate" from the Authorities from where water and electricity etc. were obtained by him for construction of work under this Contract.

**विभागाचा अभिप्राय** - निविदेतील सुरक्षा ठेव रक्कम (Security Deposit) वसूल / कपात करणेचे तरतुदीनुसार ठेकेदार यांचे प्रत्येक रनिंग बिलातून ५% प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम कपात करणेत येत आहे. आता पर्यंत ठेकेदार यांचे संस्थानकडे एकूण रू.४,९८,६०,९३६/- मात्र इतकी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून जमा आहे.

ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन परिपत्रक दि.२९/०७/२०२० अन्वये सदर शासन परिपत्रकातील शर्त क्र.३.१ अन्वये EMD व ISD ची जमा असलेल्या रकमेपैकी ५०% रक्कम रू.१,३६,८७,५००/- मात्र (EMD + ISD - 50%) तसेच रनिंग बिलातून कपात केलेली सुरक्षा ठेव रक्कम रू.२,२४,८५,९३६/- मात्र अशी एकूण रक्कम रू.३,६१,७३,४३६/- मात्र बिनाशर्त बॅंक गॅरेंटीच्या (दोषदायित्व निवारण कालावधीपर्यंत) बदल्यास परत मिळणेची विनंती ठेकेदार यांनी केली आहे.

वर नमूद महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाचे दि.२९/०७/२०२० रोजीचे शासन परीपत्रकानुसार सदरहू रक्कम विनाशर्त बॅंक गॅरेंटीच्या (दोषदायित्व निवारण कालावधीपर्यंत) बदल्यास मुक्त करावी असे नमूद केलेले आहे.

पान क्र.०६ वर...

तथापी सदरहू सवलतींचा लाभ घेण्यास इच्छुकता दर्शविल्यानंतर कंत्राटदारास दैवी आपत्ती (Force Majeure Clause) संबंधातील कंत्राटातील अथवा सर्वसाधारण तरतूद लागू करण्याबाबत विनंती करता येणार नाही. तसेच शासकीय कंपन्या, शासकीय उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, निमशासकीय संस्था या सदर मार्गदर्शक सूचना योग्य त्या फेरफारांसह लागू करु शकतील असे नमूद केलेले आहे.

दहावे रनिंग बिलापर्यंत (Upto R. A. Bill No.10) ठेकेदार यांचे बिलातून रक्कम रु.२,२४,८५,९३६/- मात्र कपात करणेत आलेले आहे. सदर शासन परिपत्रकानुसार व आर्किटेक्ट यांनी प्रस्तावित केलेनुसार ठेकेदार यांना शासन परिपत्रकातील शर्त क्र.२.२ (ब) अन्वये फक्त रनिंग बिलातून कपात केलेली सुरक्षा ठेव रक्कम रू.२,२४,८५,९३६/- मात्र विनाशर्त बॅंक गॅरेंटीच्या (दोषदायित्व निवारण कालावधीपर्यंत) बदल्यास परत करता येईल, असे मत आहे.

तथापी सदरहू बाब ही धोरणात्मक स्वरूपाची असल्याने याबाबत मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णय होणे आवश्यक आहे, असे मत आहे.

**प्रस्ताव** – तरी श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग प्रकल्पाचे बांधकाम ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन परिपत्रक दि.२९/०७/२०२० अन्वये मागणी केलेली एकूण सुरक्षा ठेव रक्कम रू.३,६१,७३,४३६/- मात्र पैकी रनिंग बिलातून कपात केलेली सुरक्षा ठेव रक्कम रू.२,२४,८५,९३६/- मात्र विनाशर्त बॅंक गॅरेंटीच्या (दोषदायित्व निवारण कालावधीपर्यंत) बदल्यास मुक्त करणेचे मागणीबाबत निर्णय होणेस विनंती.

10/12/2020

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

9/12

9/12/2020

Gen Meeting
300-2020

विषय क्र.- ३५

142

**मा. तदर्थ समितीचे सभेसमोरील विषय**
**विभागाचे नावं- एच आर विभाग, रुग्णालये**

**विषय – डॉ. वैभव बबन तांबे, निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत...**

**सेवेशी सविनय सादर,**

दि.१९/०९/२०२० रोजी पहाटे ०३.३० वाजेच्या दरम्यान शिर्डीतील एक अल्पवयीन मुलगी यांना अचानक श्वसनाचा त्रास होवु लागल्याने त्यांचे वडीलांनी त्यांना श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल येथे अपघात विभागात उपचारासाठी (केसपेपर ओ.पी.डी. नं. १००६५९८, नाव गोपनीय ) आणले होते. त्यावेळी अपघात विभाग येथे डॉ. वैभव बबन तांबे, निवासी वैद्यकीय अधिकारी यांची रात्री ०८ ते सकाळी ०८ अशी डयुटी नेमलेली होती.

दि.१९/०९/२०२० रोजी दुपारी १२.०० वाजेच्या दरम्यान रुग्णाचे वडील व त्यांचे सहकारी यांनी वैद्यकीय संचालक व वैद्यकीय प्रशासक यांना, डॉ.वैभव तांबे यांनी रुग्णाला तपासणीचा बहाणा करीत लज्जा उत्पन्न होईल असे गैरवर्तन केले व गुप्तांगांची तपासणी केली तसेच तुझ्या हृदयाला बॉयफेंडची गरज आहे, ब्रॉयफेंड करुन घे असे म्हटले व स्वःतचा मोबाईल नंबर त्या मुलीला दिला असे गैरवर्तन केल्याची तोंडी तक्रार केली व लेखी तक्रार संध्याकाळपर्यंत देवू व तसेच याबाबत आम्ही पोलीस कारवाई करणार असल्याचे सांगितले परंतू अद्यापपर्यंत लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही. या प्रकाराची माहिती प्र. वैद्यकीय संचालक यांनी मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री रविंद्र ठाकरे यांना त्या दिवशी दुरध्वनीव्दारे दिली होती.

दि. २०/०९/२०२० रोजी दु. ०२ ते ०८ यावेळेत डॉ. तांबे हे डयुटीवर असतांना दु. ०३ वाजेच्या दरम्यान शिर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. गंधाले साहेब यांनी वैद्यकीय संचालक यांना दुरध्वनीद्वारे माहिती दिली तसेच श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये येवून वैद्यकीय प्रशासक यांच्या समोर प्रत्यक्ष डॉ. तांबे यांची प्राथमिक चौकशी केली असता डॉ. तांबे यांनी नातेवाईकांनी केलेले आरोप मान्य केले आहे.

त्यामुळे शिर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.गंधाले साहेब यांनी पुढील चौकशीसाठी डॉ. वैभव बबन तांबे, यांना पोलिस स्टेशनला घेवून गेले याबाबत मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री रविंद्र ठाकरे साहेब यांना दुरध्वनीव्दारे अवगत करण्यात आले होते.

तदनंतर दि. २०/०९/२०२० रोजी रात्री उशिरा डॉ. वैभव बबन तांबे यांचेवर शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी येथे गुन्हा दाखल होवून अटक झाल्याचे प्रसारमाध्यमा मार्फत समजते. असे प्र. वैद्यकीय संचालक यांचा अहवाल प्राप्त झाला आहे.

त्यावरील निर्देशानुसार इकडील जा. नं. एसएसएस/एसएसबीच/एचआर/६८३/२०२० दि. २२/०९/२०२० अन्वये मा. पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांना पत्र देवून डॉ. तांबे यांचेवर दाखल झालेले गुन्हाबाबत माहिती मागविण्यात आली होती.

पोलीस निरीक्षक, शिर्डी यांनी दि. २२/०९/२०२० रोजीचा अहवाल सादर केला आहे. त्यात त्यांनी दि. २०/०९/२०२० रोजी फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार डॉ. वैभव तांबे यांचेविरुध्द शिर्डी पोलीस स्टेशन येथे गुरन- ६२७/२०२० भादंवि कलम ३५४(अ),(ब) सह लैंगिक अपराधापासुन बालकांचे शोषण प्रतिबंध अधिनियम २०१२ चे कलम ८ व १० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून डॉ. वैभव तांबे यांना दि. २०/०९/२०२० रोजी रात्री २३. ३३ वा. चे सुमारास अटक करण्यात आली असून त्यांना दि. २१/०९/२०२० रोजी मा. सत्र न्यायालय कोपरगांव येथे हजर केले असता यांनी दि. २३/०९/२०२० रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मिळालेली आहे. त्यांना सध्या शिर्डी पोलीस स्टेशन पोलीस कोठडी रिमांड मध्ये ठेवण्यात आलेले आहे.

यापूर्वी देखील डॉ. तांबे यांनी खालीलप्रमाणे गैरवर्तन केलेले आहे.

| अ. नं. | जावक नंबर / दिनांक | गैरवर्तनाचे स्वरूप | झालेली शिक्षा |
|---|---|---|---|
| १ | ७९-०५/०३/२०१२ | दि. २०/०३/२०१२ रोजी विनापरवानगी, अचानक कामावरुन गैरहजर राहीलेले आहेत. | सक्त ताकीद - येथूनपुढे विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावर गैरहजर राहू नये. |
| २. | ७७१-०३/११/२०१२ | माहे जानेवारी ते मे २०१२ मध्ये कामाचे विहीत वेळेत कामावर येतांना व बाहेर जातांना निर्गमनाचे वेळी एकही वेळेस फिंगर प्रिंट पंचिंग केलेले नाही. | ताकीद - येथूनपुढे कामाचे विहीत वेळेत आगमन व निर्गमनाचे वेळी नियमितपणे फिंगर प्रिंट पंचिग करावे. |
| ३ | ७९१-०३/११/२०१२ | माहे जुन २०१२ मध्ये कामाचे विहीत वेळेत कामावर येतांना आगमन व बाहेर जातांना | सक्त ताकीद - येथूनपुढे कामाचे विहीत वेळेत आगमन व निर्गमनाचे वेळी नियमितपणे |

| अ. नं. | जावक नंबर / दिनांक | गैरवर्तनाचे स्वरूप | झालेली शिक्षा |
|---|---|---|---|
| | | निर्गमनाचे वेळी नियमितपणे फिंगर प्रिंट पंचिंग केलेले नाही. | फिंगर प्रिंट पंचिग करावे. |
| ४ | ८१२-०३/११/२०१२ | माहे जुलै २०१२ मध्ये कामाचे विहीत वेळेत कामावर येतांना आगमन व कामाची वेळ संपलेनंतर बाहेर जातांना निर्गमनाचे वेळी एकही वेळेस फिंगर प्रिंट पंचिंग केलेले नाही. | सक्त ताकीद - येथूनपुढे कामाचे विहीत वेळेत आगमन व निर्गमनाचे वेळी नियमितपणे फिंगर प्रिंट पंचिग करावे. अन्यथा पंचिंग न केलेल्या कालावधीचे वेतन अदा केले जाणार नाही. |
| ५ | ७३-१६/०४/२०१३ | माहे ऑगस्ट २०१२ मध्ये कामाचे विहीत वेळेत कामावर येतांना आगमन व कामाची वेळ संपलेनंतर बाहेर जातांना निर्गमनाचे वेळी एकही वेळेस फिंगर प्रिंट पंचिंग केलेले नाही. | सक्त ताकीद - येथूनपुढे कामाचे विहीत वेळेत आगमन व निर्गमनाचे वेळी नियमितपणे फिंगर प्रिंट पंचिग करावे. अन्यथा पंचिंग न केलेल्या कालावधीचे वेतन अदा केले जाणार नाही. |
| ६ | ८४-१६/०४/२०१३ | माहे सप्टेबर २०१२ मध्ये कामाचे विहीत वेळेत कामावर येतांना आगमन व कामाची वेळ संपलेनंतर बाहेर जातांना निर्गमनाचे वेळी नियमितपणे फिंगर प्रिंट पंचिंग केलेले नाही. | सक्त ताकीद - येथूनपुढे कामाचे विहीत वेळेत आगमन व निर्गमनाचे वेळी नियमितपणे फिंगर प्रिंट पंचिग करावे. |
| ७ | ८४०-२५/११/२०१३ | दि. २८/०९/२०१३ ते ३०/०९/२०१३ अखेर ०३ दिवस रजा अर्जाशिवाय, विनापरवानगी कामावरुन गैरहजर राहीलात. | समज- इतःपर मंजूर रजेशिवाय कामावरुन गैरहजर राहू नये. तसेच सदर कालावधीची किरकोळ रजा मंजूर करण्यात आली. |
| ८ | ३५१-१२/०९/२०१४ | दि. १८/०६/२०१४ रोजी रात्रपाळीत डयुटीवर हजर होता परंतू हजेरी पत्रकावर स्वाक्षरी केलेली नव्हती. | सक्त ताकीद - येथूनपुढे कामावर आलेनंतर कामावर हजर असलेबाबत हजेरीपत्रकावर स्वाक्षरी करावी. |
| ९ | २२२-२१/०४/२०१५ | श्री घेवरीकर यांचा तक्रार अर्ज की- लग्नाचे अमिष दाखवुन मानसिक व शारीरीक शोषन केल्याबाबत श्री घेवरीकर यांचा अर्ज | श्री घेवरीकर यांना उत्तर की, तुम्ही संबंधित शासकीय ॲथॉरटीकडे याबाबत दाद मागू शकता. |
| १० | ६४४-११.०६.२०१६ | दि. ०९/१०/२०१५ रोजी सकाळी ९ वा मोबाईल व्हॅनवर डयुटीवर होती परंतू तुम्ही दु. ०१ वा काजावर हजर झाले. तसेच दि. १२/१०/२०१५ रोजी दु. ०२.३० वा सीआरयु १येथे डयुटीवर असतांना उशिराने कामावर हजर झाले | ठपका- यापुढे तुमचेकडून वरिलप्रकारचे गैरशिस्त वर्तन घडणार नाही याची दक्षता घ्यावी |
| ११ | १६३४-२७/०७/२०१६ | दि. ३०/१२/२०१५ रोजी अपघात विभागात सकाळी ०८.३० वा डयुटी नेमलेली असतांना तुम्ही सकाळी ११ वा डयुटीवर आलात. | ठपका- यापुढे तुमचेकडून वरिलप्रकारचे गैरशिस्त वर्तन घडणार नाही याची दक्षता घ्यावी |
| १२ | १६४६ २८/०७/२०१६ | दि. १४/०४/२०१६ रोजी सीआरयु – ३ येथे रात्री ०८.३० वा डयुटी असतांना तुम्ही अचानक कामावर आला नाहीत | ठपका- यापुढे तुमचेकडून वरिलप्रकारचे गैरशिस्त वर्तन घडणार नाही याची दक्षता घ्यावी |
| १३ | १७२८-०३/०८/२०१६ | दि. १९/०४/२०१६ रोजी ॲम्ब्युलंस वर डयुटी असतांना तुम्ही डयुटीवर आला नाहीत. | ठपका- यापुढे तुमचेकडून वरिलप्रकारचे गैरशिस्त वर्तन घडणार नाही याची दक्षता घ्यावी |
| १४ | २४८-०५/०९/२०१८ | दि. ०३/०६/२०१८ रोजी अपघात विभाग दु. ०२ वा. डयुटी असतांना ते दु. ०५ वा. डयुटीवर आलात. | समज- यापुढे तुमचेकडून वरिलप्रकारचे गैरशिस्त वर्तन घडणार नाही याची दक्षता घ्यावी |
| १५ | ७२-२७/०५/२०१९ | दि. ०८/०३/२०१९ रोजी प्र. वैद्यकीय प्रशासक यांनी राऊंड घेतला असता ते डयुटीवर आलेले नव्हते | समज- डयुटीवर आलेनंतर हजेरी पुस्तकावर नियमित स्वाक्षरी करावी. तसेच रजा/ सुट्टीबाबत वरिष्ठांच्या पुर्वपरवानगीशिवाय रजा / सुट्टी उपभोगू नये. |

डॉ. तांबे यांचे गैरवर्तनाचे गांभीर्य लक्षात घेवून त्यांना सदरचे गैरशिस्त वर्तनाचा निर्णय होईपर्यंत तात्काळ संस्थानचे सेवेतून तात्पुरते सेवा निलंबित करता येईल.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १४ पोटकलम (२) विशेषकरुन आणि पोट-कलम (१) मधील तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, कार्यकारी अधिकारी, विश्वस्त व्यवस्थेची सर्व मालमत्ता व अभिलेख यांच्या अभिरक्षेसाठी जबाबदार असेल आणि तो, मंदिरास देण्यात येणा-या अर्पणवस्तू गोळा करुन त्या ठेवण्याची योग्य ती व्यवस्था करील आणि समितीच्या नियंत्रणास अधीन राहून. त्या कार्यकारी अधिका-सास-

(क) (तिन) समितीच्या कोणत्याही अधिका-याचे किंवा कर्मचा-याचे त्या समितीकडे निलंबन प्रस्तावित करण्याचे

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपील) विनियम, २०१३**

प्रकरण २ विनीयम ४. निलंबन :-

(१) समिती किंवा समितीने यासाठी शक्ती प्रदान केलेले कोणतेही प्राधिकारी सर्वसाधारण किंवा विशेष आदेश पारित करुन संस्थानाच्या कर्मचाऱ्याला निलंबीत ठेवु शकतात-

(अ) जेव्हा त्याच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई योजलेली असेल किंवा प्रलंबीत असले, किंवा

(ब) जेव्हा वर उल्लेख केलेल्या प्राधिका-यांच्या मतानुसार तो संस्थानाच्या हितसंबंधांना बाधा आणणा-या कारवायात गुंतला असेल, किंवा

(क) जेव्हा त्याच्या विरुध्दच्या एखाद्या फौजदारी गुन्ह्याच्या प्रकरणाचा तपास, चौकशी किंवा, खटला चालु असेल: मात्र जेव्हा निलंबन आदेश समिती व्यतिरिक्त इतर प्राधिकाऱ्यांनी पारित केला असेल तर अशा प्राधिकाऱ्यानी ताबडतोब ज्या परिस्थितीत आदेश पारित करण्यात आला त्यासंबंधी समितीला कळवणे आवश्यक आहे.

(२) संस्थानाचा कर्मचारी समितीच्या आदेशाव्दारा पुढीलप्रमाणे निलंबीत ठेवला आहे असे मानले जाईल.

(अ) जर त्याला फौजदारी दोषारोपाबद्दल किंवा इतर कारणासाठी ४८ तासापेक्षा जास्त काळ पोलीस किंवा न्यायालयीन कोठडीत स्थानबध्द केले असेल तर त्याच्या स्थानबध्दतेच्या तारखेपासुन

(ब) जर त्याला ४८ तासापेक्षा जास्त काळ तुरंगवासाची शिक्षा झाली असेल तर आणि त्याला अशा गुन्हा शाबीतीमुळे ताबडतोब कामावरुन बडतर्फ केले नसेल, किंवा कमी केले नसेल किंवा सक्तीने सेवानिवृत्त केले नसेल तर गुन्हा शाबीतीच तारखेपासुन.

**स्पष्टीकरण:-** सदर उपविनियमाच्या खंड (ब) मध्ये उल्लेख केलेल्या ४८ तासाच्या कालावधीची गणना गुन्हा शाबीती नंतर तुरुंगवासाच्या प्रारंभापसुन केला जाइल आणि यासाठी तुरुगवासाचे खंडीतकालखंड विचारात घेतले जातील:-

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी)** सेवा (पदग्रहन अवधी आणि निलंबन, सेवेतून बडतर्फी आणि काढुण टाकणे या कालखंडातील प्रदाने) विनियम, २०१३ प्रकरण ४ कलम १७ (अ) अन्वये निलंबन बडतर्फी आणि कामावरुन काढुण टाकणे या कालखंडातील वेतने अंतर्गत वेतन देता येईल.

(१७) निलंबनाच्या कालखंडातील निर्वाह भत्ता आणि पूरक भत्ता:- योग्य प्राधिकाऱ्याच्या आदेशानुसार निलंबीत केलेल्या किंवा निलंबीत आहे असे मानले गेलेला संस्थानाचा कर्मचारी पुढील प्रदानांसाठी पात्र असेल, ते म्हणजे:-

(अ) निर्वाह भत्ता - त्याची रक्कम जर संस्थानाचा कर्मचारी निम्या वेतनावर रजेवर असताना त्याला जेवढे रजा वेतन मिळाले असते तेवढे वेतन अधिक अशा रजा वेतनावरील महागाई भत्ता एवढी असेल:

मात्र जेव्हा निलंबनाचा कालावधी सहा महिन्यापेक्षा जास्त असेल तेव्हा निलंबनाचा आदेश पारित करणारे किंवा तसा आदेश त्यांनी पारित केला आहे असे मानले गेलेले प्राधिकारी सहा महिन्यानंतरच्या कालखंडासाठी निर्वाह भत्ताच्या रकमेत पुढील प्रमाणे बदल करतात:-

(१) जर सदर प्राधिकाऱ्यांच्या मतानुसार निलंबनाच्या कालखंडात झालेली वाढ थेट संस्थानाच्या कर्मचाऱ्यामुळे झाली नसेल (या संबंधीच्या कारणाची लेखी नोंद करणे आवश्यक आहे) तर निर्वाह भत्त्यात योग्य रकमेची वाढ केली जाऊ शकते. अशी वाढ पहिल्या तिन महिन्याच्या कालावधीत अनुज्ञेय असलेल्या निर्वाह भत्त्याच्या रकमेच्या ५०% या पेक्षा जास्त नसेल;

(२) जर सदर प्राधिकाऱ्यांच्या मतानुसार निलंबनाच्या कालखंडात झालेली वाढ थेट संस्थानाच्या कर्मचाऱ्यामुळे झाली असेल (या संबंधीच्या कारणाची लेखी नोंद करणे आवश्यक आहे) तर निर्वाह भत्त्यात योग्य रकमेने घट केली जाऊ शकते, अशी वाढ पहिल्या तिन महिन्याच्या कालावधीत अनुज्ञेय असलेल्या निर्वाह भत्त्याच्या रकमेच्या ५० % यापेक्षा जास्त नसेल;

(३) महागाईभत्त्याचा दर वरील उपखंड (१) आणि (२) खाली अनुज्ञेय असलेल्या वाढलेल्या किंवा घट झालेल्या, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे,निर्वाह भत्त्यावर आधारीत असेल:

(ब) इतर पूरक भत्ता वरील उपखंड (१) आणि (२) खाली अनुज्ञेय असलेल्या वाढलेल्या किंवा घट झालेल्या, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, किंवा भत्त्यावर आधारीत असेल,

मात्र जोपर्यत संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या ज्या खर्चासाठी भत्ता प्रदान केला जातो तो खर्च भागवला जात आहे यासंबधी सदर प्राधिकाऱ्याची खात्री होत नाही तोपर्यंत तो पूरक भत्ता प्राप्त होण्यास पात्र असणार नाही.

**विभागाचा अभिप्राय:-**

पोलीस निरीक्षक, शिर्डी यांनी दिलेल्या माहितीनुसार डॉ. वैभव तांबे यांचेविरुध्द शिर्डी पोलीस स्टेशन येथे गुरन- ६२७/२०२० भादंवि कलम ३५४(अ), (ब) सह लैंगिक अपराधापासुन बालकांचे शोषण प्रतिबंध अधिनियम २०१२ चे कलम ८ व १० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून डॉ. वैभव तांबे यांना दि. २०/०९/२०२० रोजी रात्री २३. ३३ वा. चे सुमारास अटक करण्यात आली असून त्यांना दि. २३/०९/२०२० रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मिळालेली आहे. यावरुन डॉ. तांबे यांना ४८ तास पोलीस कोठडी झाली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १४ पोटकलम (२) क (३) नुसार निलंबन प्रस्तावित करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपील) विनियम, २०१३ प्रकरण २ विनीयम ४ (१) (क) नुसार जेव्हा त्याच्या विरुध्दच्या एखाद्या फौजदारी गुन्ह्याच्या प्रकरणाचा तपास, चौकशी किंवा, खटला चालु असेल: मात्र जेव्हा निलंबन आदेश समिती व्यतिरिक्त इतर प्राधिकाऱ्यांनी पारित केला असेल तर अशा प्राधिकाऱ्यानी ताबडतोब ज्या परिस्थितीत आदेश पारित करण्यात आला त्यासंबंधी समितीला कळवणे आवश्यक आहे.

डॉ. तांबे यांचे गैरवर्तनाचे गांभीर्य लक्षात घेवून त्यांना सदरचे गैरशिस्त वर्तनाचा निर्णय होईपर्यंत तात्काळ संस्थानचे सेवेतून तात्पुरते सेवा निलंबित केले आहे, त्यास कार्योत्तर मान्यता असावी.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

23/9/2020

विषय क्र.- ३६



# मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर
## विभाग- श्री साईबाबा इं. मि. स्कुल, शिर्डी

**विषय – सन २०२१ - २०२२ शैक्षणिक वर्षात शालेय व स्कुलबस शुल्कात १० टक्के फीस वाढीबाबत...**

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद** –सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी,शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक:- नवीन प्रस्ताव**

**प्रास्ताविक - संदर्भ:- १ )** दिनांक १५/०३/२०१४ रोजी झालेल्या **मा. त्रिसदस्य समितीचे** सभेत निर्णय क्र. २५० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडियम करीता सन २०१४-१५ शैक्षणिक वर्षासाठी शालेय शुल्कात १०% व स्कुल बस शुल्कात १०% वाढ करणेस मान्यता देण्यात आली. **तसेच सन २०१४-१५ नंतर पुढील शैक्षणिक वर्षाकरिता प्रती वर्षी शालेय शुल्कात १०% व स्कुल बस शुल्कात १०%ने वाढ करण्यात यावी असे ठरले.**

**संदर्भ:- २ )** दिनांक ०७ /०३/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र. १८९ यावर सविस्तर चर्चा होऊन, **शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील शालेय शुल्कात नवीन स्लॅब नुसार १०% व स्कुल बस शुल्कात १०% वाढ करुन , सुधारित शुल्क शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये आकारणेत यावे, असे ठरले.**

**संदर्भ:- ३ )** दिनांक २६/०२/२०१९ रोजीचे सभेत निर्णय क्र. ११६ यावर सविस्तर चर्चा होऊन, **शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये आकारण्यात येणा-या शालेय शुल्क व स्कुलबस शुल्कामध्ये प्रत्येकी १०% वाढ करुन शैक्षणिक वर्ष २०१९- २० करीता शालेय शुल्क व स्कुलबस शुल्क आकारणेस मान्यता देण्यात आली.**

**संदर्भ:- ४ )** दिनांक २४/०२/२०२० रोजीचे सभेत निर्णय क्र. १४० यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये **शैक्षणिक वर्ष २०२० - २०२१ या शैक्षणिक वर्षाकरीता प्रवेश देणेकामी शालेय व स्कुलबस शुल्कात वाढ न करता शैक्षणिक वर्ष २०१९- २० प्रमाणे शालेय व स्कुलबस शुल्क आकारण्यात यावे, असे ठरले.**

**विभागाची मागणी:-**

दिनांक २४/०२/२०२० रोजीचे सभेत निर्णय क्र. १४० नुसार, संस्थानचे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये **शैक्षणिक वर्ष २०२० - २०२१ या शैक्षणिक वर्षात शालेय व स्कुलबस शुल्कत कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही.**

परंतू....

दिनांक १५/०३/२०१४ रोजी झालेल्या **मा. त्रिसदस्य समितीचे** सभेत निर्णय क्र. २५० यावर सविस्तर चर्चा होऊन, **" श्री साईबाबा इंग्लिश मिडियम करीता सन २०१४-१५ शैक्षणिक वर्षासाठी शालेय शुल्कात १०% व स्कुल बस शुल्कात १०% वाढ करणेस मान्यता देण्यात आली. तसेच सन २०१४-१५ नंतर पुढील शैक्षणिक वर्षाकरिता प्रती वर्षी शालेय शुल्कात १०% व स्कुल बस शुल्कात १०% ने वाढ करण्यात यावी असे ठरले " आहे.**

३) **दिनांक १५/०३/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.२५० नुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये शैक्षणिक शुल्कात १० टक्के फीस वाढ करावयाची झाल्यास १०% प्रस्तावित वाढ करुन येणारे शैक्षणिक शुल्क खालीलप्रमाणे राहील.**

**पान नं. ०२ वर....**

पान नं. ०२

| अ.नं | वर्ग | शैक्षणिक वर्ष वार्षिक शालेय शुल्क रुपये सन २०२०-२१ | सद्यस्थितीच्या शालेय शुल्कात १०% प्रस्तावित वाढ रुपये | मागील शुल्क + १०% प्रस्तावित वाढ करुन होणारी रक्कम रुपये | दोन सत्रांची पुर्णाकीत करुन येणारे (१०चे पटीत) एकुण वार्षीक शालेय शुल्क रुपये सन २०२१-२२ |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | (३+४) ५ | ६ |
| | | | | | |
| १ | ज्यु के.जी | रु. ४४४०/- | रु. ४४४/- | रु. ४८८४/- | रु. ४८८०/- |
| २ | सि.के.जी | रु. ४४४०/- | रु. ४४४/- | रु. ४८८४/- | रु. ४८८०/- |
| ३ | इ.१ली | रु. ४८००/- | रु. ४८०/- | रु.५२८०/- | रु.५२८०/- |
| ४ | इ.२ री | रु. ४८००/- | रु. ४८०/- | रु.५२८०/- | रु.५२८०/- |
| ५ | इ.३री | रु. ४९६०/- | रु. ४९६/- | रु. ५४५६/- | रु. ५४६०/- |
| ६ | इ.४थी | रु. ४९६०/- | रु. ४९६/- | रु. ५४५६/- | रु. ५४६०/- |
| ७ | इ.५वी | रु. ५३२०/- | रु. ५३२/- | रु. ५८५२/- | रु. ५८५०/- |
| ८ | इ.६वी | रु. ५३२०/- | रु. ५३२/- | रु. ५८५२/- | रु. ५८५०/- |
| ९ | इ.७वी | रु. ५३२०/- | रु. ५३२/- | रु. ५८५२/- | रु. ५८५०/- |
| १० | इ.८ वी | रु. ६२००/- | रु. ६२०/- | रु. ६८२०/- | रु. ६८२०/- |
| ११ | इ.९ वी | रु. ६२००/- | रु. ६२०/- | रु. ६८२०/- | रु. ६८२०/- |
| १२ | इ.१०वी | रु. ६३९०/- | रु. ६३९/- | रु. ७०२९/- | रु. ७०३०/- |

४) **दिनांक १५/०३/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.२५० नुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये स्कूलबस शुल्कात १० टक्के वाढ फीस करावयाची झाल्यास १०% प्रस्तावित वाढ करुन येणारे स्कुलबस शुल्क खालीलप्रमाणे राहील.**

| अ.नं | शाळेपासून संबधित स्टॉप पर्यंत स्लॅब नुसार ठरविलेले किलोमीटरचे अंतर | सध्या असलेले वार्षीक स्कुलबस एकूण शुल्क रुपये सन२०२०-२१ | मा. व्यवस्थापन समिती निर्णया नुसार १०% प्रस्तावित वाढ करुन होणारे रुपये | मागील शुल्क + १०% प्रस्तावित वाढ करुन होणारी वार्षीक रक्कम रुपये | पुर्णाकींत रक्कम करुन (१०चे पटीत ) आकारण्यात येणारी वार्षीक स्कुल बस शुल्क रुपये सन २०२१-२२ |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | (३+४) ५ | ६ |
| | | | | | |
| १ | ०१ ते ०६ किलोमीटर | रु.२८२०/- | रु.२८२/- | रु.३१०२/- | रु.३१००/- |
| २ | ०७ ते ११ किलोमीटर | रु.३१३०/- | रु.३१३/- | रु.३४४३/- | रु.३४४०/- |
| ३ | १२ ते १५ किलोमीटर | रु.४३६०/- | रु.४३६/- | रु.४७९६/- | रु.४८००/- |
| ४ | १६ ते २० किलोमीटर | रु.५४६०/- | रु.५४६/- | रु.६००६/- | रु.६०००/- |
| ५ | २१ ते २५ किलोमीटर | रु.५९५०/- | रु.५९५/- | रु.६५४५/- | रु.६५४०/- |

**शैक्षणिक वर्ष २०२१- २२ मध्ये प्रस्तावित १० टक्के फीस वाढीनंतर स्कुलबस करीता आकारण्यात येणा-या शुल्काची रक्कम ( किलोमीटर व अंतरानुसार) खालीलप्रमाणे राहील.**

पान नं. ०३ वर....

| अ.नं | स्कुल बस स्टॉपचे नांव | शाळेपासुन संबधित स्टॉपपर्यंत जाणे व येणे किलामीटरचे अंतर | सध्या असलेले स्कुलबस एकूण वार्षिक शुल्क रुपये सन २०२०-२१ | मा. व्यवस्थापन समिती निर्णय नुसार १० % प्रस्तावित वाढ रुपये | मागील शुल्क + १०% प्रस्तावित वाढ करुन होणारी रक्कम रुपये | पुर्णाकींत रक्कम करुन (१०चे पटीत ) आकारलेली स्कुल बस फी सन २०२१-२०२२ रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | (४+५) ६ | ७ |
| १ | शिरडी /परिसर | ०६ कि.मी | रु.२८२०/- | रु.२८२/- | रु.३१०२/- | रु.३१००/- |
| २ | लुटे वस्ती | ०८ कि.मी | रु.३१३०/- | रु.३१३/- | रु.३४४३/- | रु.३४४०/- |
| ३ | नांदुर्खी बुद्रक | ०९ कि.मी | रु.३१३०/- | रु.३१३/- | रु.३४४३/- | रु.३४४०/- |
| ४ | राहाता | १०कि.मी | रु.३१३०/- | रु.३१३/- | रु.३४४३/- | रु.३४४०/- |
| ५ | नांदुर्खी खुर्द | १० कि.मी | रु.३१३०/- | रु.३१३/- | रु.३४४३/- | रु.३४४०/- |
| ६ | सावळीविहिर | ११ कि.मी | रु.३१३०/- | रु.३१३/- | रु.३४४३/- | रु.३४४०/- |
| ७ | बन ( बिरेगांव ) | १२ कि.मी | रु.४३६०/- | रु.४३६/- | रु.४७९६/- | रु.४८००/- |
| ८ | कनकुरी गांव | १२ कि.मी | रु.४३६०/- | रु.४३६/- | रु.४७९६/- | रु.४८००/- |
| ९ | नवनाथनगर | १२ कि.मी | रु.४३६०/- | रु.४३६/- | रु.४७९६/- | रु.४८००/- |
| १० | साकुरी गांव | १२ कि.मी | रु.४३६०/- | रु.४३६/- | रु.४७९६/- | रु.४८००/- |
| ११ | पिंपळवाडी | १३ कि.मी | रु.४३६०/- | रु.४३६/- | रु.४७९६/- | रु.४८००/- |
| १२ | डो-हाळे गांव | १५ कि.मी | रु.४३६०/- | रु.४३६/- | रु.४७९६/- | रु.४८००/- |
| १३ | को-हाळे गांव | १८ कि.मी | रु.५४६०/- | रु.५४६/- | रु.६००६/- | रु.६०००/- |
| १४ | रुई गांव | १८कि.मी | रु.५४६०/- | रु.५४६/- | रु.६००६/- | रु.६०००/- |
| १५ | चांदेकसारे (पानमळा ) | २१ कि.मी | रु.५९५०/- | रु.५९५/- | रु.६५४५/- | रु.६५४०/- |

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत –**

दिनांक १५/०३/२०१४ रोजी झालेल्या **मा. त्रिसदस्य समितीचे** सभेत निर्णय क्र. २५० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडियम करीता सन २०१४-१५ शैक्षणिक वर्षासाठी शालेय शुल्कात १०% व स्कुल बस शुल्कात १०% वाढ करणेस मान्यता देण्यात आली. **तसेच सन** २०१४-१५ नंतर पुढील शैक्षणिक वर्षाकरिता प्रती वर्षी शालेय शुल्कात १०% व स्कुल बस शुल्कात १०%ने वाढ करण्यात यावी असे ठरले.

दि.१०.०६.२०२१ रोजी सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात १०% फी वाढीबाबत चक्रीय पध्दतीने विषय सादर करणेबाबत टिपणी करण्यात आलेली होती. त्यावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी **''१०% वाढ प्राप्त परिस्थितीत नको कारण कोव्हीड-१९ मुळे रास्त नाही''** असे अभिप्राय दिलेले आहेत.

त्यानुसार कोव्हीड-१९ च्या परिस्थितीमुळे पालकांची आर्थिक स्थिती हलाखीची झालेली असून प्राप्त परिस्थितीत उपरोक्त निर्णयाप्रमाणे सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात शैक्षणिक व बस शुल्कात १० % वाढ करणे रास्त नाही. तरी सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात शैक्षणिक व बसचे शुल्कात १० % वाढ न करता मागील शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ प्रमाणे पालकांकडुन फी घेता येईल. तरी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

11/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

9/6

'परिशिष्ट अ' विषय क्र.- 9/9



मा.तदर्थ (Ad-hoc) समितीपुढे चक्रिय पध्दतीने सादर

सभाकामकाज विभाग

**विषय- दि.१९.१२.२०२० रोजी web based Microsoft team या ॲपव्दारे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

टिपणी-

दि.१९.१२.२०२० रोजी web based Microsoft team या ॲपव्दारे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्तावर मा.अध्यक्ष व सर्व मा.सदस्य यांची स्वाक्षरी झालेली असून सदरहू सभेमध्ये झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधीत विभागांना पुढील कार्यवाहीसाठी देण्यात आलेल्या आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त पुढील सभेमध्ये वाचून कायम झाल्यानंतर माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम ४ (१) क,ख नुसार मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयांची माहिती सर्व सामान्य लोकांना/नागरीकांना उपलब्ध करुन देणेकामी दि.१५/०६/२००५ पासून संस्थानचे www.sai.org.in या अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

तथापी दि.१९.१२.२०२० रोजी झालेल्या सभेनंतर मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची नियमीत सभा झालेली नसल्याने दि.१९.१२.२०२० रोजीचे सभेचे इतिवृत्त संस्थानचे www.sai.org.in या अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले नाही.

दि.१९.१२.२०२० रोजी web based Microsoft team या ॲपव्दारे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे मा.अध्यक्ष व सर्व मा.सदस्य यांची स्वाक्षरी असलेल्या इतिवृत्ताची सत्यप्रत सोबत अवलोकनार्थ सादर केलेली आहे, त्याची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यास चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात यावी, ही विनंती.

27.5.21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

---

दि.१९.१२.२०२० रोजी web based Microsoft team या ॲपव्दारे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यास चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आली.

07/06/2021

(श्रीमती गिता पी.बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर. तथा
सदस्या, तदर्थ (**Ad-hoc**) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

28/7/2021

(भानुदास ह. पालवे)
अपर आयुक्त,नाशिक विभाग, नाशिक. तथा
सदस्य, तदर्थ (**Ad-hoc**) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

27.5.21

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा
सदस्य सचिव, तदर्थ (**Ad-hoc**) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

28/5

(श्रीकांत एल.आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर. तथा
अध्यक्ष, तदर्थ (**Ad-hoc**) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

विषय क्र.- 9/2



# मा.तदर्थ (Ad-Hoc) समिती सभेपुढील विषय.

## (संरक्षण विभाग)

**विषय :- संरक्षण विभागाकडील बॅगेज स्कॅनरचे दुरुस्ती देखभालकामी वार्षिक CAMC कंत्राट देणेकामी प्राप्त ई-निवीदेतील निम्नतम दरधारक मे.क्रिस्टल व्हीजन इमेज सिस्टीम्स प्रा.लि. पुणे यांचेशी चर्चा वाटाघाटीअंती प्राप्त दराची निवीदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत...**

टिपणी -

| | | |
|---|---|---|
| ०१. | कामाचे नाव | संरक्षण विभागाकडील बॅगेज स्कॅनरचे दुरुस्ती देखभालकामी वार्षिक CAMC कंत्राट |
| ०२. | प्रशासकीय मान्यता | मा.तदर्थ समिती दि.१३/०७/२०२०<br>निर्णय क्र.४०९ |
| ०३. | अंदाजे खर्च | रु.६,१३,६००/- |
| ०४. | प्रस्तावाची थोडक्यात माहीती | संरक्षण विभागामार्फत श्री साई मंदिराचे प्रवेशद्वार व दर्शन रांगेचे प्रवेशद्वारावर बसविणेत आलेले बॅगेज स्कॅनर मशिनचे दुरुस्ती देखभालकामी CAMC कंत्राट देणेकामी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती दि.१३/०७/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०९ अन्वये ई-निवीदा प्रक्रिया राबविण्यात यावी असे ठरले आहे. |
| ०५. | ई-निवीदा तपशिल | प्रथम ई-निवीदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in प्रसिध्द केलेनंतर मुदतीत (२८/०९/२०२० अखेर) एकही निवीदा प्राप्त झालेली नसल्याने खरेदी नियमावलीतील तदतुद क्र.४.४.३.१ नुसार, निवीदा स्पर्धात्मक होणेसाठी कमीत कमी तीन निवीदा असणे आवश्यक असल्याने ई-निवीदेस दि.२९/०९/२०२० ते दि.०६/१०/२०२० अखेर सायं.०५.०० वाजेपर्यंत प्रथम मुदवाढ देण्यात आली होती. सदरची मुदतवाढ देवूनही दि.०६/१०/२०२० रोजी सायं.०५.०० वाजेपर्यंत फक्त एकच ई-निवीदा प्राप्त झालेली असल्याने पुन्हा ई-निवीदेस दि.०७/१०/२०२० ते दि.१४/१०/२०२० अखेर सायं.०५.०० वाजेपर्यंत दुस-यांदा मुदवाढ देणेत आली. मुदतवाढीअंती ई-निवीदेस (ID.2020_SAI_609717-1) दि.१४/१०/२०२० अखेर एकच निवीदा प्राप्त आहे. |
| | i. कामाची मुदत | ०१ वर्षे |
| | ii. तांत्रिक निवीदा उघडणेची दिनांक व वेळ | ०३/११/२०२० |
| | iii. प्राप्त ई-निवीदा | ०१ |
| | iv. प्राप्त ई-निवीदा धारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन जमा केले आहेत का? | होय |
| | v. सर्व निवीदा धारकांनी EMD भरलेले कागदपत्र जमा केले आहेत का? | होय |
| | vi. मागील वर्षाकरीता निम्नत्तम दर रु. | --- |
| | vii.मागील निम्नत्तम दरधारक | --- |

पान नं.०२ वर...

ई-निवीदा प्रक्रियातील तांत्रिक दृष्टया पात्र निवीदाधारकांनी दिलेल्या दराचा तपशिल.

| अ.नं. | निवीदाधारकाचे नाव | नग | ई निवीदेतील प्रति बॅगेज स्कॅनर करीता दर रक्कम रु. | एकुण रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | मे.क्रिस्टल व्हीजन इमेज सिस्टीम्स प्रा.लि. पुणे | ०४ | १,३०,०००/- + टॅक्स | ५,२०,०००/- + टॅक्स | L1 |

सध्या श्री साई मंदिर भाविकांना दर्शनाकरीता खुले करण्यात आलेले असल्याने मंदिराचे प्रवेशद्वारावर बसविण्यात आलेले बॅगेज स्कॅनर भाविकांचे सुरक्षेचे दृष्टीने सुस्थितीत सुरु असणे गरजेचे आहे. सदरील ई-निवीदा दिनांक १५.९.२०२० ते २८.९.२०२० या कालावधी करीता महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईडवर अपलोड करणेत आलेली होती. सदर कालावधी मध्ये एकही निविदा प्राप्त झालेली नसल्याने दिनांक ०६.१०.२०२० पर्यत मुदतवाढ देणेत आलेली होती. सदर कालावधीमध्ये ही एकच निविदा असल्याने दिनांक १४.१०.२०२० पर्यंत दुस-यांदा मुदतवाढ देणेत आलेली आहे. खरेदी नियमावलीतील तरतुद क्रं. ४.४.३.१. मध्ये- *"रुपये दहा (१०) लाखापेक्षा कमी रक्कमेची निविदा असल्यास दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर देखील ३ निविदापेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तरी पुढे जाण्याचा निर्णय घेऊ शकेल व त्यासाठी सुसाध्य कारणे नमुद करेल. अशा प्रसंगी, किमंतीच्या वाजवीपणाची खात्री करण्यासाठी खरेदी समितीला अतिरिक्त काळजी घ्यावी लागेल"*. असे नमुद आहे.

खरेदी नियमावलीतील तरतुदीनुसार खरेदी समितीचे मान्यतेने प्राप्त एक ई-निवीदेचे कमर्शियल बीड उघडणेत आलेले आहेत. प्राप्त निवीदाधारक मे.क्रिस्टल व्हीजन इमेज सिस्टीम्स प्रा.लि. पुणे हे सदरील बॅगेज स्कॅनर मशिनचे उत्पादक व पुरवठादार आहेत.

उपरोक्त तपशिलानुसार संरक्षण विभागाकडील बॅगेज स्कॅनरचे दुरुस्ती देखभालकामी वार्षिक CAMC कंत्राट देणेकामी मे.क्रिस्टल व्हीजन इमेज सिस्टीम्स प्रा.लि. पुणे यांचे रक्कम रु.५,२०,०००/- (अक्षरी रु. पाच लाख वीस हजार मात्र) + टॅक्स या दराबाबत चर्चा करुन त्यांना प्रस्तावीत कामी कार्यादेश देणेस मान्यतेकरीता प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-Hoc) दि.११/१२/२०२० रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. या दिवशीचे ऑनलाईन सभेत ई-निवीदेतील निम्नतम दराचे निवीदाधाकांसमवेत चर्चा / वाटाघाटी करणेसाठी व चर्चा वाटाघाटीचा अहवाल मा.तदर्थ समितीला सादर करणेकामी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.

१. मुख्य कार्यकारी अधिकारी (उपलब्धतेनुसार)
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी
३. मुख्य लेखाधिकारी
४. संबंधित विभागाचे अधिक्षक.

वरीलप्रमाणे समितीचे सभेपुढे मे.क्रिस्टल व्हीजन इमेल सिस्टीम्स प्रा.लि. पुणे यांना निवीदेत नमुद केलेले दराबाबत चर्चा वाटाघाटी करणेकामी बोलविणेत आले होते. परंतु त्यांनी वैयक्तीक कारणाने शिर्डी येथे बैठकीस हजर राहता येत नसल्याने दि.१९/१२/२०२० चे ई-मेलद्वारे ई-निवीदेत नमुद केलेले दरांमध्ये सुट देवून खालीलप्रमाणे सुधारीत निम्नतम दर देवू केलेले आहेत.

| | प्रति नग बॅगेज स्कॅनर चे वार्षीक CAMC कंत्राटाचे दर (Without GST) | बॅगेज स्कॅनर नग | एकुण रक्कम (Without GST) |
|---|---|---|---|
| ई.निवीदेत देवू केलेले दर | १,३०,०००/- | ०४ | ५,२०,०००/- |
| चर्चा वाटाघाटी अंती दि.१९/१२/२०२० चे ई-मेलद्वारे देवू केलेले दर | १,२०,०००/- | ०४ | ४,८०,०००/- |

पान नं.०३ वर...

**प्रस्ताव :-** तरी संरक्षण विभागाकडील ०४ नग बॅगेज स्कॅनरचे दुरुस्ती देखभालकामी वार्षिक CAMC कंत्राट देणेकामी निवीदाधारक मे.क्रिस्टल व्हीजन इमेल सिस्टीम प्रा.लि. पुणे यांनी चर्चा वाटाघाटी अंती देऊ केलेले वार्षिक दर रु.४,८०,०००/- + टॅक्स मात्र रकमेची निवीदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर.

22/12/2020

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

22/12/2020

---

वरील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे संरक्षण विभागाकडील बॅगेज स्कॅनरचे दुरुस्ती देखभालकामी वार्षिक CAMC कंत्राट देणेकामी प्राप्त ई-निवीदेतील निम्नतम दरधारक मे.क्रिस्टल व्हीजन इमेज सिस्टीम्स प्रा.लि. पुणे यांनी चर्चा वाटाघाटी अंती दि.१९/१२/२०२० चे ई-मेलद्वारे ई-निवीदेत नमुद केलेले दरांमध्ये सुट देवून देवू केलेले सुधारीत निम्नतम वार्षिक दर रु.४,८०,०००/- + टॅक्स मात्र रकमेची निवीदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता देण्यात येत आहे.

23/12/2020

श्रीमती गीता प्रवीण बनकर
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य तदर्थ समिती.

23/12/2020

गीताजली बावीस्कर
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य तदर्थ समिती.

प्रमाणित माझे
करणे आवश्यक आहे
-मान्य

22/12/2020

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

(श्रीकांत अणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष तदर्थ समिती.

विषय क्र.- 913



**मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषयाची टिपणी.**
**(संरक्षण विभाग)**

**विषय :- श्री साईबाबा मंदिरालगत पर्यटन पोलीस चौकी निर्माण करणेकामी पोलिस विभागास निधी उपलब्ध करुन देणेबाबत...**

**टिपणी.**

पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी दि.३०/१२/२०२० रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, दि.२६/१२/२०२० रोजी मा.श्री सुबोध कुमार जयस्वाल सो. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी श्री साईबाबा मंदीर व शिर्डी पोलीस स्टेशनला भेट दिलेली असुन सदर भेटी दरम्यान घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये शिर्डी हें आंतरराष्ट्रीय दर्जाचे धार्मीक पर्यटनस्थळ असल्याने तसेच शिर्डीमध्ये जगभरातून विविध जाती धर्माचे नागरीक श्री साईबाबांच्या दर्शनाकरीता शिर्डीमध्ये येत असल्याने भाविकांच्या सोईकरीता शिर्डीमध्ये साईबाबा मंदिरालगत एक शिर्डी पोलिस स्टेशन अंतर्गत पर्यटन पोलिस चौकी निर्माण करणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत

त्या अनुषंगाने पर्यटन पोलिस चौकीसाठी श्री साईबाबा मंदिराच्या गेट नं.४ लगत असलेल्या मोकळया जागेत आपल्याकडील अभिंयंता मार्फतीने चांगले डिझाईन तयार करुन आपणा मार्फत कायम स्वरुपी सुसज्ज अशा "२०*२०" च्या चौकीचे बांधकाम करुन देण्यास विनंती आहे. तिर्थक्षेत्र तथा पर्यटन चौकीच्या माध्यमातुन साईभक्तांना सुरक्षीतता, सोईसुविधांच्या अनुषंगाने येणा-या अडीअडचणी किंवा समस्यांचे निराकरण मार्गदर्शन, व्यक्तीगत सुरक्षा प्रदान करण्याकरीता सदर पर्यटन चौकीचा मोठया प्रमाणावरती उपयोग होईल. सदरच्या चौकीमध्ये अहमदनगर पोलीस दलामार्फत व शिर्डी पोलीस स्टेशनच्या वतीने खालीलप्रमाणे व्यवस्था करण्यात येणार आहे.

१) तिर्थक्षेत्र तथा पर्यटन चौकीच्या ठिकाणी १ अधिकारी, ४ पुरुष अंमलदार, २ महिला अंमलदार, तसेच तेलगु, तमील, इंग्रजी, हिंदी, मराठी, गुजराती भाषा अवगत असणारे अधिकारी व पोलीस कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

२) सदर चौकीच्या ठिकाणी येणारे वरिष्ठ अधिकारी यांना बसण्याकरीता स्वतंत्र रुम व्यवस्था.

३) साई भक्तांच्या अडीअचणीचे निराकरण करण्याकरीता सदर ठिकाणी २४ तास पोलीस ठाणे अंमलदार यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्या ठिकाणी कार्यालयात अधिका-यांकरीता चांगल्या दर्जाच्या ३ एक्झुकेटीव्ह चेअर्स, स्वागत कक्षात १० चांगल्या खुच्या, १० प्लास्टीक खुर्चा, २ टेबल, १ वायरलेस संच, लॅण्डलाईन फोन, पि.ए.सिस्टीम, माहिती प्रसारीत करण्याकरीता डिजीटल सिस्टीम, स्टेशन डायरी, मिसींग रजिस्टर, तक्रार रजिस्टर, इतर रजिस्टर ठेवण्यात येणार आहे. जेणेकरुन भाविकांच्या तक्रारीची लागली दखल घेता येईल.

४) साईभक्तांच्या शिर्डीमध्ये स्थायिक असलेल्या देशातील विविध दुभाषीक लोकांची यादी तयार करण्यात येऊन त्यांच्या मार्फतीने योग्य तो समन्व ठेऊन साईभक्तांच्या तक्रारीचे निरसन करण्यात येणार आहे.

५) श्री साईबाबा संस्थानच्या वतीने साईभक्तांकरीता राबविण्यात येत असलेल्या विविध योजना व शिर्डी शहरातील हॉटेल, लॉजेस, रेल्वेस्टेशन, शिर्डी विमानतळ, बसस्थानक, विविध रेस्टॉरंट, वाहतुक व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, शिर्डी लगत असलेले इतर पर्यटनस्थळे याबाबत असलेली अद्यावत माहिती संकलीत करुन साईभक्तांच्या माहितीकरीता ठेवण्यात येणार आहे.

६) साईबाबा मंदिरात मंदिर परिसरात मिसींग होणा-या लोकांकरीता मिसींग सेलची स्थापना करण्यात येणार आहे.

७) साईभक्तांच्या अडीअडचणीचे तात्काळ निरसन व्हावे त्यांना तात्काळ मदत मिळावी याकरीता सदर ठिकाणी २४ तास पुरुष व महिला अंमलदार यांची नेमणूक करण्यात येणार आहे.

८) सदर ठिकाणी येणा-या साईभक्तांकरीता पाणी पिण्याकरीता उत्तम व्यवस्था करण्यात येणार आहे.

९) तिर्थक्षेत्र तथा पर्यटन चौकीच्या ठिकाणी नेमण्यात येणारे अधिकारी व पोलिस अंमलदार यांना विशेष प्रशिक्षण देण्यात येणार असुन चौकीच्या उद्देश व कार्याबाबत अवगत करण्यात येणार आहे.

**पान नं.०२ वर...**

तरी सदर तिर्थक्षेत्र तथा पर्यटन चौकीचे दि.२६/०१/२०२१ रोजी मा.पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या शुभहसते उदघाटन करण्यात येऊन सदरची चौकी कार्यान्वीत करण्याचे वरिष्ठ स्तरावती निश्चित झालेले असल्याने आपणा मार्फत करण्यात येणारे चौकीचे बांधकाम त्वरीत प्रभावाने करण्यात यावे, जेणेकरुन आपल्या व मा.पोलिस महासंचालक सो. यांच्या उपस्थितीत दि.२६/०१/२०२१ रोजी चौकीचे उदघाटन होईल पर्यटन चौकीचे कामकाज त्या दिवसापासुन सुरु करता येईल, असे नमुद आहे.

सदर अर्जाचे अनुषंगाने इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/३०६०/२०२१ दि.१३/०१/२०२१ चे पत्राने मा.पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांना शिर्डी येथे पर्यटन पोलिस चौकीसाठी साईबाबा मंदिराच्या गेट नं.०४ च्या समोर असलेली मोकळी जागा संस्थान मालकीची नाही, त्यामुळे संस्थानमार्फत सदर जागेत बांधकाम करता येणार नाही.

दि.०८/०१/२०२१ रोजी श्रीमती दिपाली काळे, अप्पर पोलीस अधिक्षक, श्रीरामपुर यांनी संस्थान मालकीची सेवाधाम इमारतीचे पश्चिम बाजूकडील रोडदर्शनी असलेल्या रुम नं.५७ व ५८ या दोन रुमची समक्ष पाहणी केली असता सदरच्या रुम पर्यटन पोलिस चौकीसाठी तुर्तास वापरता येतील असे स्थळ निरीक्षणाचे वेळी ठरले होते.

तथापी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहीत झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्व मंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही, अशी तरतूद असल्याने पोलीस अधिक्षक अहमदगर यांना संस्थानचे सेवाधाम इमारत क्र.५७ व ५८ या पोलीस चौकीचे वापरासाठी सार्वजनीक बांधकाम विभाग निश्चीत करील त्या मासिक भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन ११ महिन्यांचे लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने संस्थानचे मा.तदर्थ समितीचे कार्योत्तर मान्यतेस अधीन राहून वापरासाठी मान्यता देण्यात येत असल्याचे कळविले होते.

तदनंतर उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी विभाग, शिर्डी यांनी दि.१४/०१/२०२१ चे पत्राने श्री साई मंदिरालगत पर्यटन पोलीस चौकी बांधुन व त्याकामी इतर सुविधा (लाईट, पाणी व निधी) मंजूर होण्याची विनंती केली आहे.

तसेच दि.१६/०१/२०२१ चे पत्राने उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी यांनी कळविले आहे की, आपण सुचविलेली जागा व रुम ही पर्यटन पोलीस चौकीसाठी योग्य वाटत नसुन प्रथमदर्शनी दिसत नाही, त्यामुळे वरिष्ठ अधिकारी, आम्ही व आमच्या अधिनीस्त अधिकारी यांनी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी च्या मालकीची गेट नं.०४ च्या बाजूस असलेली इलेक्ट्रीक डी.पी. शेजारील जागा पर्यटन चौकी मुख्हेबल ठेवणेकरीता अंतीम केलेली आहे. त्याबाबत आम्ही शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांच्याशी दि.२७/१२/२०२० रोजी पत्रव्यवहार करुन सदर ठिकाणी सुसज्ज अशी १२X२० फुट (Movable) पर्यटन चौकी ठेवण्याबाबत परवानगी देणेबाबत पत्रव्यवहार केलेला असुन दि.१५/०१/२०२१ रोजी झालेल्या श्री साईबाबा संस्थानच्या 0 नंबर मिटींग हॉलमधील मिटींगमध्ये पर्यटन पोलीस चौकी करीता निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा विषय मांडण्यात आला, सदर विषयाच्या अनुषंगाने Ad-hoc Committee समोर पर्यटन पोलीस चौकीच्या निधीला अंतीम मंजूरी घेवून कोटेशनचे पैसे देऊ असे कळविले आहे. तरी स्वस्तीक इनडिझाईनचे प्रोप्रायटर यांनी दिलेल्या कोटेशनप्रमाणे रु.८,३४,०००/- (आठ लाख चौतीस हजार मात्र) रक्कमेचा निधी संबंधीत प्रोप्रायटर यांचे अकाऊंटरवर मंजूर करुन वितरीत करण्यात यावा, असे कळविले आहे. तसेच त्याबाबत मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना व उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी यांना चौकी करीताचा निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, ता.राहाता हे उपलब्ध करुन देणार असलेबाबत पत्र द्यावे, अशी विनंती केलेली आहे.

पान नं.०३ वर...

तदनंतर उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी यांनी दि.२०/०१/२०२० चे पत्राने पोलीस मदत केंद्राकरीता सुमारे ८.५ ते १० लाख रुपये पर्यंतचा खर्च होणार असुन सदरची रक्कम अहमदनगर पोलीस वेलफेरच्या खात्यावरती देण्यात यावी, तसेच सदर पोलीस मदत केंद्राकरीता लागणारी इलेक्ट्रीक कनेक्शन व पिण्याच्या पाण्याची पाऊन इंचीची पाईप लाईन पोलीस मदत केंद्रास जोडुन देण्यास विनंती केलेली आहे.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ मध्ये विश्वस्तव्यवस्थेचा निधी विनीयोग संबंधी तरतुद खालील प्रमाणे.**

२१.(१) (ट) कलम १७ च्या पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कर्तव्ये पार पाडणे.

(१क) पोट-कलम (१) च्या तरतुदींना अधीन राहून, विश्वस्त व्यवस्थेस, राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, आणि राय शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तींच्या अधीन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यांसारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहाय्यक अनुदान देता येईल.

२१.(२) पोट कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असेल अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता येईल व खर्च करता येईल –

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रीडा अकादमी या संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारिरीक दृष्टया विकलांग व्यक्तीसाठी आधारगृह किंवा इतर धर्मदाय या धार्मिक संस्था यांची स्थापना देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला या साहित्य क्षेत्राशी संबंधीत असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी; किंवा

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीस सहाय्य करणेसाठी.

**उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी यांनी दि.१६/०१/२०२१ चे पत्राने पर्यटन पोलीस चौकीकरीता रु.८,३४,०००/- इतका खर्च कळविला असुन त्यासंदर्भात पत्रासमवेत स्वस्तीक इनडिझाईनचे प्रोप्रायटर यांनी दिलेले रु.८,३४,०००/- चे कोटेशन सोबत जोडले आहे. आता दि.२०/०१/२०२० चे पत्राने पर्यटन पोलीस मदत केंद्राकरीता सुमारे ८.५ ते १० लाख खर्च कळविला असुन सदरची रक्कम अहमदनगर पोलीस वेलफेअरच्या त्यावरती देण्यात यावी असे कळविले आहे. तसेच पोलीस मदत केंद्राकरीता लागणारी इलेक्ट्रीक कनेक्शन व पिण्याच्या पाण्याची पाऊन इंचीची पाईप लाईन जोडुन देण्यास कळविले आहे. दोन्ही रक्कमेमध्ये तफावत दिसुन येत असुन दोन्ही रक्कमेपैकी कमी रक्कम रु.८,३४,०००/- विचारार्थ घेता येईल. तसेच विज व पाणी संस्थान नियमाप्रमाणे आकार आकारुन पुरविता येईल, असे नम्र मत आहे.**

*पान नं.०४ वर...*

**विभागाचा स्पष्टस्पष्ट अभिप्राय :- मा.मुंबई उच्च न्यायालय (खंडपीठ औरंगाबाद) यांनी दि.३०/०१/२०१९ रोजी "Shri Sai Baba Sansthan Trust, Shall not disburse an amount of the Trust for other purposes than routine expense" असे आदेश दिलेले आहेत. मा. न्यायालयाचे आदेशानुसार पोलीस विभागास वरीलप्रमाणे पर्यटन पोलीस चौकीकरीता निधी देता येत नाही. तथापी विशेष बाब म्हणुन देणे झाल्यास सदरचे प्रस्तावास मा.कोर्टाची व शासनाची मान्यता घेणे आवश्यक राहील.**

तरी श्री साई मंदिर परिसरात पर्यटन चौकी उभारणीकामी आवश्यक असलेला निधी रु.८,३४,०००/- (अक्षरी रु. आठ लाख चौतीस हजार मात्र) पोलिस विभागास देणेबाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर.

22/1/2024

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

---

वरील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांना श्री साई मंदिर लगत पर्यटन पोलीस चौकी निर्माण करणेकामी आवश्यक निधी रु.८,३४,०००/- (अक्षरी रु. आठ लाख चौतीस हजार मात्र) देणेबाबत मा.मुंबई उच्च न्यायालय (खंडपीठ औरंगाबाद) येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मा.न्यायालयाचे व शासनाचे मान्यतेनंतर वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे.

श्रीमती गीता प्रवीण बनकर
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य तदर्थ समिती.

(ब्री.एच.पालवे) 24/1/2024
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य तदर्थ समिती.

22/1/24

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

(श्रीकांत अणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष तदर्थ समिती.

प्रस्ताव, टिपणी वाचली. प्रस्तावाचा विचार करता सर्व खोपी व साईट कनेक्शन या अनुषंगाने रु.८,५०,०००/- मागणी योग्य वाटते. या विषयानुषंगा मा. उच्च न्यायालयामध्ये एसी-ए दाखल करणेत यावे.

25/1/2024

**दिनांक – २५ जानेवारी, २०२१ रोजी चक्रिय पध्दतीने आणलेल्या विषयावरील निर्णय**

**विषय - श्री साईबाबा मंदिरालगत पर्यटन पोलीस चौकी निर्माण करणेकामी पोलीस विभागास निधी उपलब्ध करुन देणेबाबत..**

. . .

१) प्रस्तावाचे तसेच सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. पोलीसांची मूळ मागणी ही पर्यटन पोलीस चौकी तयार करुन देण्याबाबत होती. मात्र असे दिसून येते की, पत्रव्यवहारादरम्यान पोलीसांनी दरपत्रक मागविल्यानंतर साधारणतः ८,३४,000/-रुपयांपर्यंत अशी पोलीस चौकी निर्माण होणे शक्य दिसून येते. त्याचप्रमाणे त्यांनी इतर सुविधा म्हणजेच पिण्याचे पाणी पाऊण इंची पाईपलाईनने तसेच इलेक्ट्रिक कनेक्शन असे संस्थान मार्फत जोडून द्यावे अशी विनंती केलेली आहे. पर्यायाने सब-मिटर लावणे अपेक्षित आहे. मात्र याचा विचार झालेला दिसून येत नाही. अशा परिस्थितीत रु.८,५०,000/- ची मागणी ही संयुक्तिक वाटते.

२) येथे नमूद करावेसे वाटते की, यापूर्वी शिर्डीतून, पुरुष, महिला, लहान मुले बेपत्ता झाल्याच्या बाबी तदर्थ समितीसमक्ष ब-याच वेळा आलेल्या आहेत. त्यामुळे पोलीसांची मागणी ही स्तुत्य उपक्रमासारखी आहे. अशा परिस्थितीत दरपत्रकाप्रमाणे रु.८,५०,000/- देतांना उपयोगिता प्रमाणपत्र पोलीसांकडून प्राप्त करुन घेणे उचित राहील. करिता रु.८,५०,000/- वरील कामासाठी पोलीस वेलफेअर निधीमध्ये देण्यात यावेत व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे असे माझे मत आहे. सिव्हील ॲप्लिकेशन करण्यात यावा.

(श्रीकांत ल.आणेकर)
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर

विषय क्र.- ९/४

10

# मा.तदर्थ (Ad-Hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर

## खरेदी विभाग, श्री साईबाबा हॉस्पिटल

**विषय– श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक असणारे N-95 Face Mask खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

टिपणी,

दि.०१/०९/२०२० रोजीचे मंजुर टिपणीन्वये Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक असणारे N-95 Face Mask, Short notice E-Tender प्रक्रिया राबवून खरेदीकामी संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत जास्त खपाच्या स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात देऊन खरेदी करणेस व N-95 Face Mask खरेदीकामी येणा-या रक्कम रु.२०,५०,०००/- चे खर्चास मा.तदर्थ समिती सभेची चक्रिय पध्दतीने मान्यता मिळालेली होती.

त्यास अनुसरुन तांत्रिकदृष्टया मसुदा अंतिम करणेकामी बनविण्यात आलेल्या तज्ञ समितीकडून दि.२८/०९/२०२० रोजी उपरोक्त खरेदीकामीचा मसुदा तपासून घेण्यात आलेला असून त्यांनी सुचविलेल्या आवश्यक त्या बदलानुसार दुरुस्ती करुन अंतिम करण्यात येऊन वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०६/१०/२०२० पासुन दि.१३/१०/२०२० पर्यंत संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात देण्यात आली व www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा देण्यात आलेली होती.

त्यानुसार प्राप्त झालेल्या १५ ऑनलाईन ई-निविदा दि.१५/१०/२०२० रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता करण्यात आला असून एकुण १५ निविदाधारकांपैकी ११ निविदाधारकांच्या निविदा अपात्र झालेल्या असून तांत्रिकदृष्टया पात्र ०४ निविदाधारकांच्या ऑनलाईन कमर्शियल ई-निविदा दि.०३/११/२०२० मा. खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे, त्यामध्ये M/s. Clear Point Pharma Pvt Ltd., Mumbai यांचे दर प्रती नग रु.४२/- हे निम्नत्तम प्राप्त झालेले होते.

तथापि M/s. Clear Point Pharma Pvt Ltd., Mumbai यांचे प्रतिनिधी यांनी दि.०५/११/२०२० रोजीचे ई-मेल अन्वये पुढीलप्रमाणे विनंती केली होती. "आम्ही Venus Safety and Health Pvt Ltd., या कंपनीच्या वतीने आपल्या संस्थेमध्ये Nisoh Certified N-95 Face Mask च्या ई-निविदेमध्ये भाग घेतला होता, व ई-निविदा उघडल्यानंतर आम्हाला असे समजले की, आमच्या फर्मची L1 म्हणून निवड झालेली आहे. परंतु पुरवठा आदेश निर्गमित होणेपुर्वी आम्ही कंपनीच्या अधिका-यांशी संपर्क साधला त्यांनी असे कळविले की, महाराष्ट्र शासनाने N-95 Face Mask च्या किंमतीचे नियमन केल्यामुळे कंपनी कोणत्याही पुरवठाधारकांना प्राधिकृत न करता कंपनीच्या अटी व शर्तीप्रमाणे थेट रुग्णालयाशीच व्यवहार करणार आहे, त्यासाठी आपण कंपनीचे अधिकृत व्यक्ती श्री.तानाजी घाडगे मोबाईल नं.07506005268/ 0982139112/ E-mail-sales2@venusohs.com, sales5@ venusohs.com यांचेशी संपर्क साधावा."

वरीलप्रमाणे प्राप्त ई-मेलच्या अनुशंगाने M/s. Clear Point Pharma Pvt. Ltd., Mumbai यांना पुरवठा आदेश न देता Venus Safety and Health Pvt Ltd., या कंपनीशी ई-मेल अन्वये पत्र व्यवहार करणेस दिनांक २८.११.२०२० रोजीचे मंजुर टिपणीन्वये मान्यता मिळाली होती.

त्यास अनुसरुन इकडील जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच/ वेशी-स्टोअर (पीएस)/ १०१९/ २०२०, दिनांक १०.१२.२०२० रोजीचे पत्रान्वये मे.वेनस सेफ्टी ॲण्ड हेल्थ प्रा.लि., मुंबई यांना "शासन निर्णय क्र.कोरोना-२०२०/ प्र.क्र.३०६/ आरोग्य-५, दिनांक २० ऑक्टोबर २०२० मध्ये राज्यात मास्कचे दर निश्चित करुन दिलेले असून त्यामध्ये V4400-N-95 (without valve) मास्कचे मुल्य रु.२८/- मात्र निश्चित केलेले आहे. तसेच या शासन निर्णयामधील अ.नं.०७ मध्ये "रुग्णसेवा देणा-या महाराष्टातील शासकीय व खाजगी रुग्णालये/ नर्सिंग होम/ कोवीड केअर सेंटर/ डेडीकेटेड कोविड हॉस्पिटल्स इ. यांना मास्कचा पुरवठा करताना मास्कच्या विहीत अधिकतम विक्री मुल्य मर्यादेच्या ७०% दराने उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील", असे नमुद आहे. म्हणजेच शासन निर्णयानुसार V4400-N-95 (without valve) मास्कचे मुळ दर हे प्रति नग रु.१९.६० मात्र राहतील.

तरी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या अखत्यारित येत असून, संस्थान संचलित रुग्णालये व कोविड हॉस्पिटलकरीता सदरहू मास्क खरेदी करावयाचे असल्यामुळे उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन, आपल्या कंपनीच्या नियम व अटीसह V4400-N-95 (without valve) मास्कचे प्रति नग रु.१९.६० मात्र दराचे कोटेशन इकडील कार्यालयास ई-मेलद्वारे पाठविण्याचे करावे म्हणजे आपणास लवकरात लवकर पुरवठा आदेश देणे सोयीचे होईल," असे कळविणेत आले होते.

त्यावर मे.वेनस सेफ्टी ॲण्ड हेल्थ प्रा.लि., मुंबई यांनी दिनांक १४.१२.२०२० रोजीचे ई-मेलद्वारे महाराष्ट्र शासनाने मास्कसाठी निश्चित करुन दिलेल्या दराने व अटी/ शर्तीनुसार संस्थानला V4400-N-95

(without valve) मास्कचा पुरवठा करणेस सहमती दर्शविली आहे. त्यांनी V4400-N-95 (without valve) मास्कचे शासन निर्णयानुसार रु.१९.६० + ५% जीएसटी मात्र याप्रमाणे प्रति नग रु.२०.५८ मात्र अंतिम दर देऊ केलेले आहेत. परंतु त्यांनी मागणी करण्यात येणा-या नगसंख्येची रक्कम आगाऊ मिळावी तसेच मालाचा पुरवठा करणेकामी संपुर्ण रकमेच्या ५% मात्र रक्कम वाहतुक खर्च म्हणून मिळावा, अशी विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय- मे.वेनस सेफ्टी ॲण्ड हेल्थ प्रा.लि., मुंबई यांनी शासन निर्णयानुसार रु.१९.६० + ५% जीएसटी मात्र याप्रमाणे प्रति नग रु.२०.५८ मात्र अंतिम दर देऊ केलेले आहेत. त्यांचे अंतिम दर स्विकारणेत येऊन, त्यांना २५००० नग मास्क पुरवठा करणेचा आदेश देण्यात यावा. परंतु सदरहू नगसंख्या ३ टप्प्यामध्ये त्यांचेकडून स्विकारणेस व त्यासाठी प्रत्येक वेळी रुग्णालय वित्त विभागामार्फत, वैद्यकिय संचालक यांचे मान्यतेने त्यांना आगाऊ रक्कम देणेस मान्यता असावी. त्याचप्रमाणे त्यांचे विनंतीनुसार संपुर्ण रकमेच्या ५% मात्र रक्कम वाहतुक खर्चाचा विचार करता, येणारी रक्कम ही रु.२५,७२५/- मात्र येत असून ही रक्कम खुपच जास्त होत आहे, याकरीता सदरहू मास्क संस्थान वाहनाने घेऊन येणे योग्य राहील, तसेच सदरहू दर शासनाने निश्चित केलेले असल्यामुळे पुरवठाधारकाबरोबर दरांबाबत वाटाघाटी करणेची आवश्यकता नाही, असे इकडील विभागाचे मत आहे.

तरी श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी २५००० नग V4400-N-95 (without valve) मास्क खरेदी करणेकामी मे.वेनस सेफ्टी ॲण्ड हेल्थ प्रा.लि., मुंबई यांचे प्रति नग रु.१९.६० + ५% जीएसटी (एकूण रु.२०.५८) मात्र अंतिम दराने त्यांना रु.५,१४,५००/- मात्र रकमेचा पुरवठा आदेश देणेस व त्यांचेकडून आवश्यकतेनुसार टप्प्या-टप्प्याने आगाऊ रकमेसह मालाची मागणी करणेस तसेच खरेदी करण्यात येणा-या मास्कंची वाहतुक संस्थान वाहनाने करणेस मान्यता मिळणेकामी सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेसमोर चक्रीय पध्दतीने सादर.

6/1/2021

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्यकार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी २५००० नग V4400-N-95 (without valve) मास्क खरेदी करणेकामी मे.वेनस सेफ्टी ॲण्ड हेल्थ प्रा.लि., मुंबई यांचे प्रति नग रु.१९.६० + ५% जीएसटी (एकूण रु.२०.५८) मात्र अंतिम दराने त्यांना रु.५,१४,५००/- मात्र रकमेचा पुरवठा आदेश देणेस व त्यांचेकडून आवश्यकतेनुसार टप्प्या-टप्प्याने आगाऊ रकमेसह मालाची मागणी करणेस तसेच सदरहू मास्कची वाहतुक संस्थान वाहनाने करणेस मान्यता देण्यात आली.

(गीता प्रविण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

8/1/2021
(भानुदास ह. पालवे)
अप्पर विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्यकार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

विषय क्र.- 9/५



# मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर
## श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी
## टिप्पणी

**विषय– Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून दैनंदिन वापराकरीता आवश्यक असणारे सॅनीटायझर तातडीने खरेदीकामी पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणे बाबत.**

दि.१३/१०/२०२० रोजीच्या चक्रिय पध्दतीचे मंजुर टिप्पणी व मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभा दि.११/१२/२०२० निर्णय क्र.४५५ (३४) अन्वये Corona Virus (Covid-19) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून दैनंदिन वापराकरीता आवश्यक असणारे सॅनीटायझर खरेदीकामी Short notice E-Tender प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२४,७५,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यास अनुसरुन तांत्रिकदृष्टया मसुदा अंतिम करणेकामी संस्थान अंतर्गत बनविण्यात आलेल्या तज्ञ समितीकडून दि.२५/११/२०२० रोजी उपरोक्त खरेदीकामीचा मसुदा तपासून घेण्यात आलेला असून त्यांनी सुचविलेल्या आवश्यक त्या बदलानुसार दुरुस्ती करुन सदरहू मसूदा अंतिम करण्यात आला व नियमानूसार वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०३/१२/२०२० ते दि.१४/१२/२०२० पर्यंत संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात ठेवण्यात आलेली होती, व WWW.mahatenders.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर ई निविदा प्रसिध्द करणेत आलेली होती, तसेच पुरवठाधारक / अधिकृत विक्रेते यांना जाहीरातीबाबत ई मेलद्वारे देखील कळविण्यात आले होते, त्यास अनूसरुन ५ लिटरचे ५००० जार ८०% अल्कोहोल बेस सॅनीटाझर खरेदीकामी १९ ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

प्राप्त १९ ऑनलाईन ई-निविदांचे टेक्नीकल बीड दि.०५/०१/२०२१ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आले असता, त्यामध्ये सर्व १९ पात्र ठरले होते त्याप्रमाणे दि.२५/०१/२०२१ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे ऑनलाईन कमर्शियल ई-निविदा उघडण्यात आलेल्या असून प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. त्यामध्ये M/s. Lokranjan Breweries Private Limited, Pune यांचे प्रती नग रु.३२५/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले आहे. या दरामध्ये आणखी काही सुट मिळणेकामी त्यांना विचारणा केली असता, त्यांनी दिनांक २५/०१/२०२१ रोजी ई-निविदेमध्ये दिलेले दर फारच निम्नतम दिलेले असल्यामुळे त्या दरामध्ये आणखी सुट देणेस असहमती दर्शविली आहे

त्यानुसार M/s. Lokranjan Breweries Private Limited, Pune यांचे ई-निविदेमधील प्रती नग रु.३२५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, या दराने त्यांना ५ लिटरचे ५००० जार ८०% अल्कोहोल बेस सॅनीटाझर पुरविणेकामीचा पुरवठा आदेश देणेकामी सदरहू प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर.

(रविंद्र ठाकर)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे M/s. Lokranjan Breweries Private Limited, Pune यांचे ई-निविदेमधील प्रती नग रु.३२५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, या दराने त्यांना ५ लिटरचे ५००० जार ८०% अल्कोहोल बेस सॅनीटाझर पुरविणेकामीचा पुरवठा आदेश देणेस मान्यता देण्यात आली.

(गिता प्रविण बनकर)
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानूदास ह.पालवे)
अप्पर विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(रविंद्र ठाकरे)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती



ERPNO - 407

विषय क्र.- ३/६



## मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर

श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी

**विषय:- श्री साईनाथ रुग्णालयामध्ये नव्याने कार्यान्वित होणा-या विविध वॉर्ड/ विभागाकरीता ऑक्सीजन व नायट्रस गॅसच्या पाईपलाईनचे काम करणेकामी M/s. United Services, Kalyan यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

टिपणी,

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०९/०६/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३४६ अन्वये श्री साईनाथ रुग्णालयातील वार्ड/ विभागाने मागणी केलेले ऑक्सीजन व नायट्रस गॅसच्या पाईपलाईनचे काम विहीत पध्दतीने ई निविदा मागवून करण्यास व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.९,८१,०५९/- चे खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यास अनुसरुन तांत्रिकदृष्टया मसुदा अंतिम करणेकामी बनविण्यात आलेल्या तज्ञ समितीकडून दि.१२/१०/२०२० रोजी उपरोक्त खरेदीकामीचा मसुदा तपासून घेण्यात आलेला असून त्यांनी सुचविलेल्या आवश्यक त्या बदलानुसार दुरुस्ती करुन अंतिम करण्यात येऊन दि.२९/१०/२०२० रोजीचे मंजुर टिपणीन्वये श्री साईबाबा संस्थानचे श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये मशिनरी, हत्यारे, उपकरणे व सर्जिकल साहित्य इ. खरेदीकामीच्या ऑनलाईन ई-निविदा मागविणेकामी संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली असून महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर दि.०५/१२/२०२० ते दि.२१/१२/२०२० या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. तसेच निविदाधारकांच्या शंका निरसन करण्यासाठी दि.०८/१२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षामध्ये मा.मुख्यलेखाधिकारी, प्रशासकीय अधिकारी, वैद्यकिय संचालक व वैद्यकिय अधिक्षिका यांचे उपस्थितीत Pre-bid मिटींग आयोजित करण्यात आली होती. सदरचे Pre-bid मिटींगमध्ये निविदांधारकांनी उपस्थित केलेल्या शंका व त्यानुसार करण्यात आलेल्या शंकाचे निरसन बायोमेडीकल विभागामार्फत करण्यात आलेले होते. निविदाधारकांनी उपस्थित केलेल्या शंकाचे निरसन करुन तयार केलेली Amendment शासनाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येऊन सदरहू ई-निविदेस पुढील पाच दिवस दि.२६/१२/२०२० पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली होती.

त्यानुसार प्राप्त ऑनलाईन ई-निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| S.N. | Name of Tender | Tender ID_No. | No.of Received Tender |
|---|---|---|---|
| 1 | Medical Gas Pipeline For Shri Sainath Hospital, Shirdi. | 2020_SAI_625091_1 | ४ |

वरीलप्रमाणे खरेदीकामी प्राप्त झालेल्या एकुण ०४ तांत्रिक ई-निविदा दि.०५/०१/२०२१ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तक्ता तयार करण्यात आला असून तो बायोमेडीकल विभाग यांचे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यानूसार बायोमेडीकल विभागाकडून तपासून घेण्यात आलेला असून ०४ निविदाधारक तांत्रिकदृष्टया पात्र असलेबाबत त्यांनी कळविलेले आहे, तसेच ज्या पुरवठाधारकांनी काही Document Online Upload केले नव्हते त्यांना दूरध्वनीद्वारे अवगत करुन ई मेल द्वारे Document मागविण्यात येऊन Document ची पूर्तता करुन घेण्यात आलेली आहे. आपण सन २०१६-१७, २०१७-१८ व २०१८-१९ म्हणजेच मागील तीन वर्षांचा Average Turnover ३० लाख मागविला होता परंतू M/s. Sachine Mantri Appliances, Ambajogai यांनी सन 2018-19 - 1125645/-, 2019-20 - 1146849/- व April 2020 to Dec.2020 - 1,60,00,000/- (Unaudited) चा Turnover दिलेला आहे त्यामुळे त्यांना अपात्र ठरविण्यात आलेले आहे. तर उर्वरीत ०३ निविदाधारकांना पात्र ठरविण्यात आलेले आहे.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

| Sr. No. | Name of Supplier |
|---|---|
| 1 | M/s. Spark Industries, Pune |

| | |
|---|---|
| 2 | M/s. United Services, Kalyan |
| 3 | M/s. Shivam Oxygen, Jalgaon |

वरीलप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयातील वार्ड / विभागाने मागणी केलेले ऑक्सीजन व नायट्रस गॅसच्या पाईपलाईनचे काम करणेकामी पात्र असलेल्या ०३ ऑनलाईन कमर्शिअल निविदा दि.२५/०१/२०२१ रोजीचे मा. खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आलेल्या असून त्यांनी देऊ केलेल्या दरांच्या तुलनात्मक तक्त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

**1) तांत्रिकदृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यिक देकराचा तपशील :-**

| Sr. No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | UNITED SERVICES | | Shivam Oxygen | | Spark Industries | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount |
| 1.00 | Medical Gas Pipeline with Installation For Shri Sainath Hospital, Shirdi | | | | | | | | |
| 1.01 | 22mm Copper pipe 0.9mm thickness | 200.00 | MTR | 725.00 | 145000.00 | 1026.00 | 205200.00 | 1025.00 | 205000.00 |
| 1.02 | 15mm Copper pipe 0.9mm thickness | 350.00 | MTR | 520.00 | 182000.00 | 814.00 | 284900.00 | 900.00 | 315000.00 |
| 1.03 | 22mm Isolation Valve | 6.00 | Nos. | 1600.00 | 9600.00 | 4500.00 | 27000.00 | 3300.00 | 19800.00 |
| 1.04 | 15mm Isolation Valve | 12.00 | Nos. | 1300.00 | 15600.00 | 3300.00 | 39600.00 | 2680.00 | 32160.00 |
| 1.05 | Medical gas outlets front loaded din standard Or BS standard. (Oxygen Vacuum, Air, Nitrous Oxide ) with skp | 60.00 | Nos. | 1700.00 | 102000.00 | 3450.00 | 207000.00 | 2180.00 | 130800.00 |
| 1.06 | 3 Gas Zonal Value Box | 2.00 | Nos. | 8500.00 | 17000.00 | 16000.00 | 32000.00 | 10000.00 | 20000.00 |
| 1.07 | 2 Gas Zonal Value Box | 2.00 | Nos. | 7500.00 | 15000.00 | 14500.00 | 29000.00 | 6700.00 | 13400.00 |
| 1.08 | 3 Gas Digital Alarm System | 2.00 | Nos. | 18500.00 | 37000.00 | 21500.00 | 43000.00 | 16500.00 | 33000 |
| 1.09 | 2 Gas Digital Alarm System | 2.00 | Nos. | 16000.00 | 32000.00 | 18000.00 | 36000.00 | 14000.00 | 28000.00 |
| 1.10 | BPC Flow meter with Humidifier Bottle | 30.00 | Nos. | 950.00 | 28500.00 | 890.00 | 26700.00 | 1770.00 | 53100.00 |
| 1.11 | Vacuum Jar 600 ml unit for Word with skp, tubing & clamp | 25.00 | Nos. | 1300.00 | 32500.00 | 1550.00 | 38750.00 | 1875.00 | 46875.00 |
| 1.12 | Vacuum jar unit 1000ml for special room with skp, tubing & clamp | 5.00 | Nos. | 1580.00 | 7900.00 | 1900.00 | 9500.00 | 2475.00 | 12375.00 |
| 1.13 | Suction Trolley with 2000 ml x 2 jar & central controller with skp, tubing | 2.00 | Nos. | 8000.00 | 16000.00 | 13000.00 | 26000.00 | 9250.00 | 18500.00 |
| 1.14 | LAMC Cost- LAMC Cost should be including Taxes. | | | | | | | | |

| Sr. No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | UNITED SERVICES | | Shivam Oxygen | | Spark Industries | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount |
| | It should be fixed for next 5 years. | | | | | | | | |
| 1.15 | LAMC Cost For 2th Year | 1.00 | Nos. | 19203.00 | 19203.00 | 15000.00 | 15000.00 | 50000.00 | 50000.00 |
| 1.16 | LAMC Cost For 3th Year | 1.00 | Nos. | 19203.00 | 19203.00 | 20000.00 | 20000.00 | 60000.00 | 60000.00 |
| 1.17 | LAMC Cost For 4th Year | 1.00 | Nos. | 25604.00 | 25604.00 | 25000.00 | 25000.00 | 70000.00 | 70000.00 |
| 1.18 | LAMC Cost For 5th Year | 1.00 | Nos. | 32005.00 | 32005.00 | 30000.00 | 30000.00 | 80000.00 | 80000.00 |
| 1.19 | LAMC Cost For 6th Year | 1.00 | Nos. | 38406.00 | 38406.00 | 35000.00 | 35000.00 | 90000.00 | 90000.00 |
| | Total in Figures | | | | 774521.00 | | 1129650.00 | | 1278010.00 |

2) निम्नत्तम निविदाधारकांचा तपशील :-

| Sr. No | Name of Supplier | Description of Work / Item(s) | No.of Qty. | Units | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| 1.00 | M/s. United Services, Kalyan | Medical Gas Pipeline with Installation For Shri Sainath Hospital, Shirdi | | | | |
| 1.01 | | 22mm Copper pipe 0.9mm thickness | 200.00 | MTR | 725.00 | 145000.00 |
| 1.02 | | 15mm Copper pipe 0.9mm thickness | 350.00 | MTR | 520.00 | 182000.00 |
| 1.03 | | 22mm Isolation Valve | 6.00 | Nos. | 1600.00 | 9600.00 |
| 1.04 | | 15mm Isolation Valve | 12.00 | Nos. | 1300.00 | 15600.00 |
| 1.05 | | Medical gas outlets front loaded din standard Or BS standard. (Oxygen Vacuum, Air, Nitrous Oxide ) with skp | 60.00 | Nos. | 1700.00 | 102000.00 |
| 1.06 | | 3 Gas Zonal Value Box | 2.00 | Nos. | 8500.00 | 17000.00 |
| 1.07 | | 2 Gas Zonal Value Box | 2.00 | Nos. | 7500.00 | 15000.00 |
| 1.08 | | 3 Gas Digital Alarm System | 2.00 | Nos. | 18500.00 | 37000.00 |
| 1.09 | | 2 Gas Digital Alarm System | 2.00 | Nos. | 16000.00 | 32000.00 |
| 1.10 | | BPC Flow meter with Humidifier Bottle | 30.00 | Nos. | 950.00 | 28500.00 |
| 1.11 | | Vacuum Jar 600 ml unit for Word with skp, tubing & clamp | 25.00 | Nos. | 1300.00 | 32500.00 |
| 1.12 | | Vacuum jar unit 1000ml for special room with skp, tubing & clamp | 5.00 | Nos. | 1580.00 | 7900.00 |
| 1.13 | | Suction Trolley with 2000 ml x 2 jar & central controller with skp, tubing | 2.00 | Nos. | 8000.00 | 16000.00 |
| | | | | | Total Amt. in Rs. (Work) | 640100 |
| 1.14 | | LAMC Cost- LAMC Cost should be including Taxes. It should be fixed for next 5 years. | | | | |
| 1.15 | | LAMC Cost For 2th Year | 1.00 | Nos. | 19203.00 | 19203.00 |
| 1.16 | | LAMC Cost For 3th Year | 1.00 | Nos. | 19203.00 | 19203.00 |
| 1.17 | | LAMC Cost For 4th Year | 1.00 | Nos. | 25604.00 | 25604.00 |
| 1.18 | | LAMC Cost For 5th Year | 1.00 | Nos. | 32005.00 | 32005.00 |
| 1.19 | | LAMC Cost For 6th Year | 1.00 | Nos. | 38406.00 | 38406.00 |
| | | | | | Total Amt. in Rs. (LAMC) | 134421.00 |
| | | | | | Final Total Amt. in Rs. (Work + LAMC) | 774521.00 |

उपरोक्त तुलनात्मक दरांच्या तक्त्याचा विचार करता, ऑक्सीजन व नायट्रस गॅसच्या पाईपलाईनचे काम करणेकरीता M/s. United Services, Kalyan यांचे रक्कम रु.६,४०,१००/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत. त्याचबरोबर त्यांनी वॉरंटी संपल्यानंतर पुढील पाच वर्षाकरीता LAMC ची रक्कम रू.१,३४,४२१/- मात्र दिलेली आहे. म्हणजेच सदर काम करणेस व त्याकामी येणा-या LAMC करीता एकुण रक्कम रू.७,७४,५२१/- मात्र खर्च येणार असून खरेदी नियमावलीस अनुसरुन M/s. United Services, Kalyan यांनी ई-निविदेमध्ये देऊ केलेल्या निम्नतम दरामध्ये आणखी सुट मिळणेकामी वरीष्ठांच्या मंजुरीने त्यांचेशी दिनांक ०३.०२.२०२१ रोजी दुरध्वनीद्वारे चर्चा/वाटाघाटी केली असता, त्यांनी दिलेल्या एकूण रु.७,७४,५२१/- मात्र निम्नतम दरावर एकत्रित ५% सुट देऊ केली व तसे ई-मेलद्वारे लेखी स्वरुपात कळविले आहे. त्याचप्रमाणे सदरहू कामाकरीता

वापरण्यात येणा-या मटेरिअलचे Specification आपल्या मागणीप्रमाणे असलेबाबत बायोमेडीकल विभागामार्फत खात्री करणेत आलेली आहे.

त्यानुसार श्री साईनाथ रुग्णालयातील वार्ड/ विभागाने मागणी केलेले ऑक्सीजन व नायट्रस गॅसच्या पाईपलाईनचे काम करणेकामी M/s. United Services, Kalyan यांनी चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले रु.७,३५,७९५/- मात्र अंतीम निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेस तसेच सदरहूकामी राबविणेत आलेल्या खरेदीचे कार्यवाहीस मंजुरी मिळणेकामी सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर.

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, श्री साईनाथ रुग्णालयातील वार्ड/ विभागाने मागणी केलेले ऑक्सीजन व नायट्रस गॅसच्या पाईपलाईनचे काम करणेकामी M/s. United Services, Kalyan यांनी चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले रु.७,३५,७९५/- मात्र अंतीम निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेस तसेच सदरहूकामी राबविणेत आलेल्या खरेदीचे कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

(गिता प्रविण बनकर)
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

4/2/2021
(भानूदास ह.पालवे)
अप्पर विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(रविंद्र ठाकरे)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

4/2
(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

विषय क्र.- 9/10



# मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर

## श्री साईबाबा हॉस्पिटल, जनसंपर्क विभाग

**विषय – श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेच्या कामकाजाच्या ई-निविदा प्रक्रियेबाबत...**

<u>प्रास्ताविक</u> – दि.२७ मार्च २०२० रोजीचे मा.तदर्थ समितीचे सभेतील विषय नं.५० व निर्णय क्र. २२९ अन्वये, सन २०२०-२१ या वर्षाकरीता श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,९०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.

सदर निर्णयाच्या ठरावाची दि.२४ एप्रिल २०२० रोजी कामापुरती नक्कल सभाकामकाज विभागाकडून प्राप्त होताच मा.उच्च न्यायालयाची परवाणगी मिळणेकामी संस्थानचे विधी विभागाकडे त्वरीत देण्यात आली. त्यानुसार त्यांचेकडून पुढील उचीत कार्यवाही करण्यात येऊन, विधी विभागाने दि.३० जानेवारी २०२१ रोजीच्या पत्रान्वये, मा.कोर्टाने सिव्हील ॲप्लीकेशन नं.४४८६/२०२० बाबत मान्यता दिल्याचे कळवून मा.कोर्टाचे आदेशाची हायकोर्टचे वेबसाईटवरील प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेली आहे. त्यानुसार श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी मा.तदर्थ समितीचे निर्णयानुसार, अंदाजे रक्कम रु.२,९०,००,०००/- मात्रचे खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळालेली आहे.

सन २०२०-२१ या एका वर्षाकरीताची ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामीचा ई-निविदा व दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करावयाचा जाहिरात मसुदा तपासूण, दि.२८ एप्रिल २०२० रोजी मान्यतेस्तव सादर केला होता. त्यास मान्यता मिळून सदर मसुद्यावर तत्कालीन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांच्या स्वाक्षरी झालेल्या आहेत. मात्र आता सन २०२१-२२ या वर्षाकरीता ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार असल्याने, ई-निविदा व जाहिरात मसुदा यामध्ये आवश्यक बदल करुन दस्ताऐवज समितीचे मान्यतेस्तव दि.०१ फेब्रुवारी २०२१ रोजीचे टिपणी अन्वये सादर करणेत आला होता. त्यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांनी मा.तदर्थ समितीसमोरील मुळ प्रस्ताव सन २०२०-२१ साठीचे निविदा प्रक्रियेसाठी होता. ठराव व Civil Application त्यानुसार झाले आहे. मात्र आता निविदा २०२१-२२ साठी राबवायची असे प्रस्तावित आहे. त्यामुळे हि बाब मा.तदर्थ समितीचे निदर्शनास आणून द्यावी असे मत नमुद केले असून, त्याप्रमाणे मान्यता मिळालेली आहे.

<u>विभागाचाअभिप्राय / स्पष्ट मत</u> - दि.२७ मार्च २०२० रोजीचे मा.तदर्थ समितीचे सभेतील निर्णय क्रं.२२९ नुसार, सन २०२०-२१ या वर्षाकरीता श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,९०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.

त्यानुसार सिव्हील ॲप्लीकेशन नं.४४८६/२०२० मधील मा.कोर्टाचे दि.२८ जानेवारी २०२१ रोजीचे आदेशाची प्रत विधी विभागाकडून प्राप्त झाली आहे. त्यानुसार श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग स्वच्छतेचे काम आउटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी मान्यता मिळालेली आहे.

तथापी, मा.मुख्यलेखाधिकारी यांचे निर्देशाप्रमाणे, उपरोक्त कामाची ई-निविदा प्रक्रिया राबविताना मुळ प्रस्तावातील सन २०२०-२१ ऐवजी सन २०२१-२२ या एका वर्षाकरीताची ई-निविदा प्रक्रिया राबविणेचा बदल करणेकामी मा.तदर्थ समितीचे निदर्शनास आणून देणे आवश्यक असल्याने, सदर बदल करणेसाठी मा.तदर्थ समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे, असे नम्र मत आहे.

पान नं.०२ वर

पान नं.०२

मागणी - श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी मा.तदर्थ समितीचे निर्णयानुसार, अंदाजे रक्कम रु.२,९०,००,०००/- मात्रचे खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळालेली आहे. मात्र ई-निविदा प्रक्रिया राबविताना मुळ प्रस्तावातील सन २०२०-२१ ऐवजी सन २०२१-२२ या एका वर्षाकरीताची ई-निविदा प्रक्रिया राबविणेचा बदल करणे आवश्यक असल्याने, त्यास मान्यता मिळणेस सदरचा विषय चक्रीय पध्दतीने मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर.

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

---

मा.उच्च न्यायालयाचे C.A.4486/2020 मध्ये अॅफिडेव्हीट देवून करावे आवश्यक आहे. तरी या अहवाल मंजूर

(गीता प्रविण बनकर)
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

सदरचा बदल मा. उच्च न्यायालयात C A No. 4486/2020 मध्ये शपथपत्र सादर करुन अधिसूचना काढून मान्य करणेत यावी

(भानुदास ह. पालवे) 4/4/2021
अप्पर विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

सदरचा बदल मा. उच्च न्यायालयास C.A.नं. 4486/2020 मध्ये शपथपत्र दाखल करुन बदल मिळण्याच्या अधीन मान्य.

(श्रीकांत आणेकर) 4/2
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

ERP. 400-2020

विषय क्र.- 9/6



मा. तदर्थ (Ad-Hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर
श्री साईनाथ रुग्णालय

विषय:- शिकाऊ इंटर्न डॉक्टर्स यांचे करिता श्री साई प्रसादालय विभागामार्फत मोफत नाष्टा पाकिटे मिळणेबाबात...

टिपणी.

श्री साईनाथ रुग्णालय विभागाकडे प्रतिवर्षी चार चार महिने कालावधीकरिता संपुर्ण वर्षभर विरार होमीओपॅथिक कॉलेज विरार, मुंबई या कॉलेजचे शिकाऊ डॉक्टर्स (इंटर्न डॉक्टर्स) सेवा देण्याकरिता येत असतात.त्यानुसार सध्या १० (दहा) शिकाऊ डॉक्टर्स कार्यरत आहेत.त्यांना संस्थानमार्फत कोणत्याही प्रकारचे मानधन अथवा पगार दिला जात नाही. त्यांची संस्थान मार्फत साईनाथ रुग्णालय येथील डॉक्टरांचे निवासस्थान (Bachlor Room) या ठिकाणी मोफत रहाण्याची सुविधा करण्यात येते, तसेच प्रसादालय विभागामार्फत त्यांना त्यांचे निवासस्थानाचे ठिकाणी मोफत भोजनही दिले जाते.

वस्तुस्थिती :- सदर डॉक्टर्स यांना शिफ्ट ड्युटीमध्ये सेवा देण्यात येत असल्यामुळे त्यांना बाहेर जाऊन नाष्टा करणे शक्य होत नाही. सदरचे डॉक्टर्स प्रथमोपचार केंद्र मंदिर परिसर, दर्शन लाईन गेट नं.०२ तसेच उत्सव काळामध्ये देखील त्यांच्या सेवा उपयोगी पडत आहेत आणि कोव्हीड काळात देखील त्यांनी रुग्णालयाकरीता सेवा दिलेल्या आहेत व देत आहेत. त्यांच्या सेवा रुग्णालयाकरीता कायमच उपयोगी आहेत.

विभागाचा अभिप्राय :- वरील १० डॉक्टर्स यांना मोफत नाष्टा पाकिटे दिल्यास प्रती पाकिट रु. ०५/- प्रमाणे एकुन १० पाकिटासाठी प्रतीदिनी रु. ५०/- व प्रतीमहिना रु.१,५००/- यानुसार वर्षासाठी एकुन रु. १८,२५०/-पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च संस्थान अन्नदान खर्ची दाखवता येईल. संस्थानचे लेखाशाखा विभागातील देणगी कार्यालयाकडे कार्यरत कर्मचाऱ्यांना दररोज मोफत नाष्टा पाकिटे दिली जातात त्याच धर्तीवर सदर डॉक्टरांना नाष्टा पाकिटे देणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त इंटर्न डॉक्टर्स जोपर्यंत विरार होमीओपॅथिक कॉलेज विरार यांचेकडिल सेवार्थी विद्यार्थी डॉक्टर्स यांची सेवा सुरु राहील तोपर्यंत त्यांना दररोज सकाळी श्री साई प्रसादालय विभागामार्फत कायमस्वरुपी १० (दहा) नाष्टा पाकिटे मोफत मिळणेसाठी सदरहू प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-Hoc) समिती सभेसमोर चक्रीय पध्दतीने सादर..

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्यकार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी.

---

प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयातील इंटर्न डॉक्टर्स जोपर्यंत विरार होमीओपॅथिक कॉलेज विरार यांचेकडिल सेवार्थी विद्यार्थी डॉक्टर्स यांची सेवा सुरु राहील तोपर्यंत त्यांना दररोज सकाळी श्री साई प्रसादालय विभागामार्फत कायमस्वरुपी १० (दहा) नाष्टा पाकिटे मोफत देणेस मान्यता देण्यात आली.

(गीता प्रविण बनकर)
सहा. धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानुदास ह.पालवे)
अप्पर विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्यकार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

विषय क्र.- 9/e

**मा तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर चक्रीय पध्दतीने विषय**
**विभागाचे नाव – श्री साईबाबा हॉस्पिटल**

**विषय- श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत परिचारक/ परिचारीकांचा नेमणूक कराराचा कालावधी संपुष्टात येत असलेबाबत . . .**

टिपणी -

**अधिनियम कलम २००४ तरतुद -**

कलम १३(४) मधील समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-याची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवाकर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-यांची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ – "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी."तसेच अट शर्त क्र. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

मंजुर आकृतीबंधामध्ये, कंत्राटी पध्दतीने भरावयाची पदे ११ महिन्यांच्या कराराने भरावी व कराराचे दरवर्षी नुतनीकरण करावे असे नमुद आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.–**

१) मा व्यवस्थापन समिती दि. १८/१०/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७६२.

अ-०१ वर्षाचे परिविक्षाधीन कालावधीसाठी ३७ व ११ महिने कालावधीसाठी २७ असे एकुण ६४ नेमणूक पत्र देण्यात मान्यता देण्यात आली.

ब- तसेच ६४ पैकी १४ उमेदवार हजर होणार नसल्याने, १४ रिक्त जागांवर मुलाखती घेतलेल्या पात्र उमेदवारांना नेमणूक देण्यात यावी, असे ठरले.

२) मा व्यवस्थापन समिती दि. ०९/०८/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७१०.

उपरोक्त परिचारीकांना बिंदू नामावलीप्रमाणे नेमणूका होईपर्यंत अथवा ११ महिने यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पूर्वीच्याच मानधन व शर्ती/अटीवर मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आली.

३) मा व्यवस्थापन समिती दि. ०७/०८/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र ६६१.

यावर सविस्तर चर्चा होऊन, १०० बिंदू नामावलीप्रमाणे प्रवर्गातील व इतर वर्गवारीमधील दोनही हॉस्पिटलमधील परिचारकांची रिक्त पदे भरण्यासाठी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन अर्ज मागणी करणेत यावी. जाहीरातीनुसार पदे भरण्यास काहीसा कालावधी लागणार असल्याने सध्या ११ महिने कालावधीसाठी नेमणूक केलेल्या परिचारक / परिचारीकांना त्यांची मुदत संपलेपासून ६ महिने अथवा जाहीरातीनुसार पदे भरण्याची कार्यवाही होईपर्यंत सध्याचेच अटी / शर्तीवर दरमहा रू. १०,०००/- एकत्रित वेतनावर नेमणूका देण्यात याव्यात, असे ठरले.

४) मा व्यवस्थापन समिती दि. १३/०२/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र ८३.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या ०६ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या परिचारक / परिचारीका यांची मुदत संपलेपासून पुढे ०५ महिने अथवा जाहिरातीद्वारे पदे भरण्याची कार्यवाही होईपर्यंत सध्याचेच अटी / शर्तीवर दरमहा रू. १०००/- एकत्रित वेतनावर मुदतवाढ देण्यात यावी. तसेच प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून जाहिरातीनुसार सर्व पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा घेण्यात

यावी. लेखी परिक्षेमध्ये किमान ७०% गुण प्राप्त करणा-या उमेदवारास प्रात्यक्षिक परिक्षेकरीता बोलविण्यात यावे. प्रात्यक्षिक परिक्षेतून प्रत्येक प्रवर्गासाठी गुणांनुसार एका पदाकरिता पहिले ५ उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे, असे ठरले.

५) मा व्यवस्थापन समिती दि. १२/०६/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४७७.

यावर सविस्तर चर्चा होऊन, दि. २५/१२/२०१० रोजीचे जाहिरातीस अनुसरून मुलाखतीद्वारे प्रवर्गानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास वैद्यकीय संचालक, रूग्णालये यांचे अहवालानुसार सध्या ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असलेल्या आवश्यक परिचारिका / परिचारक यांना पुढील ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.

६) मा व्यवस्थापन समिती दि. २८/०८/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६६६.

सध्या ११ महिने कालावधीकरीता कार्यारत असलेल्या २३ परिचारक / परिचारीका यांचेपैकी श्री चांगदेव पंढरीनाथ काळे यांचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त असल्साने त्यांना पुढील मुदतवाढ देऊ नये. तसेच श्रीमती सरीना आढाव, श्रीमती शुभदा गायकवाड, श्रीमती कुंभार यांचे काम असामाधानकारक आहे, असा वैद्यकिय अधिक्षक /वैद्यकीय संचालक यांनी अहवाल दिलेला असल्याने त्यांना पुढील मुदतवाढ देऊ नये. उर्वरित इतर १९ परिचारक / परिचारीका यांना पुढील मुदवाढ देण्यात यावी.

सध्या कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारामार्फत व ११ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या व नव्याने घेण्यात येणा-या परिचारक / परिचारीका यांना प्रतिमहा रू. ११,०००/- वेतन देण्यात यावे, असे ठरले.

७) मा व्यवस्थापन समिती दि. १२/०६/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४१६.

यावर सविस्तर चर्चा होऊन, ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणुक करण्यात आलेल्या परिचारीका / परिचारक यांचेबाबत वैद्यकिय अधिक्षक व वैद्यकिय संचालक यांचे अहवालानुसार परिचारक / परिचारीका यांना उपरोक्त कॉलम नं ४ मध्ये संबंधितांचे नावापूढे दर्शविलेल्या तारखेपासून पुढे ११ महिने कालावधीकरीता, याआधी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी / शतीनुसार तात्पुरती नेमणूक देण्यात यावी, असे ठरले.

८) मा व्यवस्थापन समिती दि. ३०/०३/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र २७८.

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

९) मा व्यवस्थापन समिती दि. २३/०५/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३३९.

यावर सविस्तर चर्चा होऊन, ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणुक करण्यात आलेल्या परिचारीका / परिचारक यांचेबाबत प्र वैद्यकिय अधिक्षक व प्र वैद्यकिय संचालक यांचे गोपनीय अहवालाचा विचार करता, उपरोक्त तक्त्यातील अ नं ०१ ते ०७ व अ.नं ०९ ते १२ तसेच अ नं १४ ते १७ वरील परिचारक / परिचारीका यांना टप्या-टप्याने त्यांची मुदत संपत असलेल्या तारखेपासून पुढे ११ महिने कालावधीसाठी पुर्वीचे आदेशातील अटी-शर्तींवर तात्पुरत्या नेमणूका देण्यात याव्या, असे ठरले.

१०) मा व्यवस्थापन समिती दि. १६/०४/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र १३३.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकीय संचालक, रूग्णालये यांचे मागणीनुसार उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या अ नं १ ते १३ परिचारक / परिचारीका यांना त्यांचे नावापुढील स्तंभ क्र ५ मध्ये दर्शविलेल्या तारखेनंतर पुढील ११ महिने कालावधीसाठी पुर्वीचे आदेशातील अटी-शर्तींवर तात्पुरती नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली.

११) मा व्यवस्थापन समिती दि. १६/०२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र १६७.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील तक्त्यामध्ये नमुद अ नं १ ते १३ परिचारक / परिचारीका यांना स्तंभ क्र ५ मध्ये दर्शविलेल्या तारेखनंतर पुढील ११ महिने कालावधीसाठी अथवा आरक्षित वर्गासाठी उमेदवार उपलब्ध होईपर्यंत जे अगोदर घडेल तोपर्यंत पुर्वीचे आदेशातील अटी-शर्तींवर कंञाटी पध्दतीने तात्पुरत्या नेमणूका देणेस मान्यता देण्यात आली.

१२) मा व्यवस्थापन समिती दि. २२/१२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ९६०.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे रूग्णालयात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या प्रस्तावित परिचारक / परिचारीका यांची मुदत संपुष्टात येत असलेल्या दिनांकापासुन पुढे

११ महिने कालावधीसाठी अथवा आरक्षित वर्गासाठी उमेदवार उपलब्ध होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या नेमणूका देण्यात याव्यात, असे ठरले.
तसेच संस्थान रूग्णालयामधील परिचारीका / परिचारक यांची रिक्त पदे मुलाखतीद्वारे कंत्राटी पध्दतीने भरणेत यावीत, अशा सुचना केल्या.
१३) मा व्यवस्थापन समिती दि. २८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३४६.
श्री साईबाबा संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कंञाटी कर्मचा-यांप्रमाणेच दि. २५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १४१ मधील अटीस अधीन राहून श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील ११ महिने कालावधी तसेच कंञाटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या स्टाफनर्स, टेक्निशियन कर्मचा-यांना त्यांचे प्रतिदिन वेतनावर ४०% वेतनवाढ देण्यात यावी.
१४) मा व्यवस्थापन समिती दि. ०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १०४९.
याकरीता व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा. श्री चंद्रशेखर कदम यांचे अध्यक्षतेखाली समिती सदस्य मा. श्री भाऊसाहेब वाकचौरे व मा श्री प्रताप भोसले यांची समिती तयार करणेत आली. या समितीने प्रस्तावित परिचारक / परिचारीकांना मुदतवाढ देणे योग्य होईल का, याची शहानिशा करून त्याचा अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.
१५) मा व्यवस्थापन समिती दि. ०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं १२८.
प्रस्तावास मान्यता देण्यात आली.
१६) मा व्यवस्थापन समिती दि. ०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र १३९.
दिनांक ०२/०२/२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरूस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र. १२८-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

प्रस्तावित ११ परिचारक/ परिचारीकांना सध्या रू. १५,४००/- मात्र प्रतिमहा एकत्रित वेतनावर बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूक देण्यात यावी. त्याचबरोबर सदरहू परिचारक / परिचारीका यांना पुर्वीप्रमाणे ११ महिने कालावधीसाठी नेमणूक देणेकामी शासनाचे मार्गदर्शन घेण्यासाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.
१७) मा व्यवस्थापन समिती दि. ०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र २२५ (२५).
श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये ११-११ महिने कालावधीसाठी कंञाटी पध्दतीने कार्यरत असलेल्या ११ परिचारक / परिचारीका यांना दिनांक ०२.०२.२०१८ रोजीचे व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र १२८ अन्वये बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूक देणेबाबत ठरलेले आहे. परंतु आता, ज्या शासन निर्णयाचे अनुशंगाने निर्णय क्र १२८ घेण्यात आला, त्या शासन निर्णयास स्थगिती मिळालेली आहे. त्यामुळे सदरहू परिचारक / परिचारीका यांना पुर्वीप्रमाणेच ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.
१८) मा व्यवस्थापन समिती दि. ०४/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३३६.
यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद परिचारीकांचा ११ महिने नेमणूकीचा कालावधी संपुष्टात आल्यापासुन ०४ दिवस ब्रेक देऊन या औद्योगिक न्यायालय अहमदनगर यांचे दि. ३०/०३/२०१९ रोजीचे आदेशास अनुसरून ११ महिने कालावधीकरीता याआधी नेमणूका केलेल्या परिचारीकांकडून दि. ०७/०८/२००९ रोजीचे शासन निर्णयामध्ये नमुद केलेनुसार कराराचे नुतनीकरण करणेस मान्यता देण्यात आली.
१९) मा तदर्थ (Ad-hoc) समिती दि. ०६/०२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र ८६.
यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत परिचारक / परिचारीका उपरोक्त प्रस्तावातील तक्ता क्र १ मधील अ.नं. १ ते ९ यांचा नेमणूक कराराचा कालावधी दि. ०६/०३/२०२० रोजी संपत असल्याने त्यांना दि. ११/०३/२०२० पासून पुन्हा ११ महिने कालावधीसाठी व अ.नं. १० कविता योसेफ पंडीत

यांचा नेमणूक कालावधी दि. ०८/०३/२०२० रोजी संपत असल्याने त्यांना दि. १३/०३/२०२० पासून पुन्हा ११ महिने कालावधीसाठी सध्याचेच वेतनावर नव्याने करारनामा करून घेण्यास मान्यता देण्यात आली.

**प्रस्तावना-**

११ महिने नेमणुकीवर असलेल्या परिचारिकांची मुदत संपुष्टात येत असलेबाबत प्रभारी वैद्यकीय अधिक्षीका, श्री साईनाथ रूग्णालय व प्रभारी वैद्यकीय संचालक, रूग्णालये यांचे अनुक्रमे दि.०७/१२/२०२० व दि.०९/१२/२०२० रोजीचे पत्र प्राप्त झाले असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

श्री साईनाथ / साईबाबा हॉस्पिटलमधील खालील स्टाफनर्स यांना ११ महिने नेमणुकीवर मुदतवाढ देण्यात होती. सदरची मुदतवाढ संपुष्टात येत असलेबाबतची माहिती खालीलप्रमाणे देत आहोत.

| अ नं | परिचारक / परिचारीकांचे नाव | पदनाम | कामावर हजर तारीख | नेमणूक संपुष्टात येत असल्याची तारीख | कामाबाबतचा अहवाल |
|---|---|---|---|---|---|
| १ | कु प्रतिमा रामचंद्र कोळगे | स्टाफनर्स | ११/०३/२०२० | १०/०२/२०२१ | यांची वर्तणुक चांगली असुन ते हुकूमाप्रमाणे कामे करीत आहेत. त्यांची कामकाज समाधानकारक आहेत. |
| २ | श्रीमती कावेरी सुदाम म्हस्के | स्टाफनर्स | ११/०३/२०२० | १०/०२/२०२१ | |
| ३ | कु मनिषा स्टिफन आवारे | स्टाफनर्स | ११/०३/२०२० | १०/०२/२०२१ | |
| ४ | श्रीमती वैशाली भगवान महागडे | स्टाफनर्स | ११/०३/२०२० | १०/०२/२०२१ | |
| ५ | श्री आशिष शरद सुर्यवंशी | स्टाफनर्स | ११/०३/२०२० | १०/०२/२०२१ | |
| ६ | सौ आशा रमेश जगताप | स्टाफनर्स | ११/०३/२०२० | १०/०२/२०२१ | |
| ७ | श्री राहुल प्रकाश आहोळ | स्टाफनर्स | ११/०३/२०२० | १०/०२/२०२१ | |
| ८ | कु प्राजक्ता दिपक जाधव | स्टाफनर्स | ११/०३/२०२० | १०/०२/२०२१ | |
| ९ | सौ रूथ निलेश श्रीवास्तव | स्टाफनर्स | ११/०३/२०२० | १०/०२/२०२१ | |
| १० | कु कविता योसेफ पंडीत | स्टाफनर्स | १३/०३/२०२० | १२/०२/२०२१ | |

**पुर्वइतिहास-**

श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकरीता आवश्यक असलेल्या परिचारक / परिचारीकांच्या ७५ जागांसाठी दि. २५/०६/२००८ रोजी जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. जाहिरातीस अनुसरून दि. १७/०८/२००८ रोजी मुलाखतील घेणेत आल्या त्यांनंतर मा व्यवस्थापन समिती दि. १८/१०/२००८ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, अ) ०१ वर्षाचे परिविक्षाधीन कालावधीसाठी ३७ वं ११ महिने कालावधीसाठी २७ असे एकुण ६४ नेमणूक पत्र देण्यात मान्यता देण्यात आली. ब) तसेच ६४ पैकी १४ उमेदवार हजर होणार नसल्याने, १४ रिक्त जागांवर मुलाखती घेतलेल्या पात्र उमेदवारांना नेमणूक देण्यात यावी, असे ठरले.

बिंदुनामावलीनुसार प्रवर्गातील पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्याने मुलाखतीत पात्र ठरलेल्या २७ उमेदवारांना ११ महिने कालावधीसाठी तात्पुरते नेमणूक आदेश देण्यात आलेले आहेत.

काही उमेदवार हजर न झाल्याने त्यांचे नेमणूक आदेश रद्द करून मुलाखत घेणेत आलेल्या प्रतिक्षा यादीतील ५ उमेदवारांना ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूका देणेत आलेल्या आहेत असे दिसते.

११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक दिलेल्या २९ परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रसताव मा व्यवस्थापन समिती दि. ०९/०८/२००९ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ७१० नुसार परिचारीकांना बिंदू नामावलीप्रमाणे नेमणूका होईपर्यंत अथवा ११ महिने यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पूर्वीच्याच मानधन व शर्तीवर मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आली.

उपरोक्त ११ महिने कालावधीसाठी नेमणूक दिलेल्या परिचारीकांपैकी १४ परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. ०७/०८/२०१०

रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ६६१ नुसार १०० बिंदू नामावलीप्रमाणे प्रवर्गातील व इतर वर्गवारीमधील दोनही हॉस्पिटलमधील परिचारकांची रिक्त पदे भरण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागणी करणेत यावी. जाहिरातीनुसार पदे भरण्यास काहीसा कालावधी लागणार असल्याने सध्या ११ महिने कालावधीसाठी नेमणूक केलेल्या परिचारक / परिचारीकांनां त्यांची मुदत संपलेपासून ६ महिने अथवा जाहीरातीनुसार पदे भरण्याची कार्यवाही होईपर्यंत सध्याचेच अटी / शर्तीवर दरमहा रू. १०,०००/- एकत्रित वेतनावर नेमणूका देण्यात याव्यात, असे ठरले.

उपरोक्त परिचारीकांची ६ महिन्याची नेमणुकीची मुदत संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. १३/०२/२०११ रोजीचे सभेत सादर करणेत आला त्यावर निर्णय क्र ८३ नुसार, सध्या ०६ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या परिचारक / परिचारीका यांची मुदत संपलेपासून पुढे ०५ महिने अथवा जाहिरातीद्वारे पदे भरण्याची कार्यवाही होईपर्यंत सध्याचेच अटी / शर्तीवर दरमहा रू. १०,०००/- एकत्रित वेतनावर मुदतवाढ देण्यात यावी. तसेच प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून जाहिरातीनुसार सर्व पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा घेण्यात यावी. लेखी परिक्षेमध्ये किमान ७०% गुण प्राप्त करणा-या उमेदवारास प्रात्यक्षिक परिक्षेकरीता बोलविण्यात यावे. प्रात्यक्षिक परिक्षेतून प्रत्येक प्रवर्गासाठी गुणांनुसार एका पदाकरिता पहिले ५ उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे, असे ठरले.

उपरोक्त निर्णयानुसार ०५ महिने कालावधीसाठी नेमणूक दिलेल्या परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रस्ताव दि. १२/०६/२०११ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ४७७ नुसार, दि. २५/१२/२०१० रोजीचे जाहिरातीस अनुसरून मुलाखतीद्वारे प्रवर्गानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास वैद्यकीय संचालक, रूग्णालये यांचे अहवालानुसार सध्या ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असलेल्या आवश्यक परिचारीका / परिचारक यांना पुढील ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.

उपरोक्त परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. २८/०८/२०११ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ६६६ नुसार, सध्या ११ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या २३ परिचारक / परिचारीका यांचेपैकी श्री चांगदेव पंढरीनाथ काळे यांचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त असल्याने त्यांना पुढील मुदतवाढ देऊ नये. तसेच श्रीमती सरीना आढाव, श्रीमती शुभदा गायकवाड, श्रीमती कुंभार यांचे काम असमाधानकारक आहे, असा वैद्यकिय अधिक्षक / वैद्यकीय संचालक यांनी अहवाल दिलेला असल्याने त्यांना पुढील मुदवाढ देऊ नये. उर्वरित इतर १९ परिचारक / परिचारीका यांना पुढील मुदतवाढ देण्यात यावी.

सध्या कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारामार्फत व ११ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या व नव्याने घेण्यात येणा-या परिचारक / परिचारीका यांना प्रतिमहा रू. ११,०००/- वेतन देण्यात यावे, असे ठरले.

उपरोक्त परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. १२/०६/२०१२ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ४१६ नुसार, ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणुक करण्यात आलेल्या परिचारीका / परिचारक यांचेबाबत वैद्यकिय अधिक्षक व वैद्यकिय संचालक यांचे अहवालानुसार परिचारक / परिचारीका यांना उपरोक्त कॉलम नं ४ मध्ये संबंधितांचे नावापूढे दर्शविलेल्या तारखेपासून पुढे ११ महिने कालावधीकरीता, याआधी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी / शतीनुसार तात्पुरती नेमणूक देण्यात यावी, असे ठरले.

उपरोक्त परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. ३०/०३/२०१३ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र २७८ नुसार, चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. २३/०५/२०१४ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ३३९ नुसार, ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणुक करण्यात आलेल्या परिचारीका / परिचारक

यांचेबाबत प्र वैद्यकिय अधिक्षक व प्र वैद्यकिय संचालक यांचे गोपनीय अहवालाचा विचार करता, उपरोक्त तक्त्यातील अ नं ०१ ते ०७ व अ.नं ०९ ते १२ तसेच अ नं १४ ते १७ वरील परिचारक / परिचारीका यांना टप्या-टप्याने त्यांची मुदत संपत असलेल्या तारखेपासून पुढे ११ महिने कालावधीसाठी पुर्वीचे आदेशातील अटी-शर्तींवर तात्पुरत्या नेमणूका देण्यात याव्या, असे ठरले..

उपरोक्त परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. १६/०४/२०१५ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र १३३ नुसार, वैद्यकीय संचालक, रूग्णालये यांचे मागणीनुसार उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या अ नं १ ते १३ परिचारक / परिचारीका यांना त्यांचे नावापुढील स्तंभ क्र ५ मध्ये दर्शविलेल्या तारेखनंतर पुढील ११ महिने कालावधीसाठी पुर्वीचे आदेशातील अटी-शर्तींवर तात्पुरती नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली.

उपरोक्त परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. १६/०२/२०१६ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र १६७ नुसार, प्रस्तावातील तक्त्यामध्ये नमुद अ नं १ ते १३ परिचारक / परिचारीका यांना स्तंभ क्र ५ मध्ये दर्शविलेल्या तारेखनंतर पुढील ११ महिने कालावधीसाठी अथवा आरक्षित वर्गासाठी उमेदवार उपलब्ध होईपर्यंत जे अगोदर घडेल तोपर्यंत पुर्वीचे आदेशातील अटी-शर्तींवर कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या नेमणूका देणेस मान्यता देण्यात आली.

उपरोक्त परिचारीकांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने त्यांचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. २२/१२/२०१६ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ९६०, संस्थानचे रूग्णालयात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या प्रस्तावित परिचारक / परिचारीका यांची मुदत संपुष्टात येत असलेल्या दिनांकापासुन पुढे ११ महिने कालावधीसाठी अथवा आरक्षित वर्गासाठी उमेदवार उपलब्ध होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या नेमणूका देण्यात याव्यात, असे ठरले.

तसेच संस्थान रूग्णालयामधील परिचारीका / परिचारक यांची रिक्त पदे मुलाखतीद्वारे कंत्राटी पध्दतीने भरणेत यावीत, अशा सुचना केल्या.

मा व्यवस्थापन समिती दि. २२/१२/२०१६ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावरील अ.नं. ०४ च्या कु कांचन विनायक शिंदे ह्या कामावरून गैरहजर असल्याचे प्रभारी वैद्यकीय अधिक्षिका यांनी कळविल्याने त्यांचे व्यतिरीक्त इतर परिचारक / परिचारीकांना उपरोक्त निर्णय क्र ९६० नुसार, संस्थानचे रूग्णालयात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या परिचारक / परिचारीका यांची मुदत संपुष्टात येत असलेल्या दिनांकापासुन पुढे ११ महिने कालावधीसाठी अथवा आरक्षित वर्गासाठी उमेदवार उपलब्ध होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या नेमणूका दिल्या आहे.

श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या नेमणूका दिलेल्या परिचारक / परिचारीकांचा नेमणूक कालावधी डिसेंबर २०१७ ते जुन २०१८ या कालावधीत टप्या-टप्याने संपुष्टात येत असल्याने त्यांना पुन्हा नव्याने ११ महिने कालावधीसाठी अथवा आरक्षित वर्गासाठी उमेदवार उपलब्ध होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात नेमणूका देणेबाबत निर्णय घेणेकरीता प्रस्ताव दि. ०८/१२/२०१७ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र १०४९ नुसार, याकरीता व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा. श्री चंद्रशेखर कदम यांचे अध्यक्षतेखाली समिती सदस्य मा. श्री भाऊसाहेब वाकचौरे व मा श्री प्रताप भोसले यांची समिती तयार करणेत आली. या समितीने प्रस्तावित परिचारक/ परिचारीकांना मुदतवाढ देणे योग्य होईल का, याची शहानिशा करून त्याचा अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.

प्रस्तावातील नमुद ११ महिने कालावधीकरीता कार्यरत परिचारीका यांनी दि. १९/०१/२०१८ रोजीचे पत्रान्वये, आपण सांगितल्याप्रमाणे आम्ही आमची कोर्ट केस मागे घेतलेली असुन केस withdrawal copy सोबत जोडत आहोत. तरी आम्हाला ११ महिने ब्रेकनंतर पुन्हा duty Rejoin करून घेण्यात यावे, असे कळविले होते.

तदनंतर, मा व्यवस्थापन समिती दि. ०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र १२८ अन्वये प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

तदनंतर मा व्यवस्थापन समिती दि. ०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र १३९ अन्वये, दिनांक ०२/०२/२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरूस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र. १२८-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

प्रस्तावित ११ परिचारक/ परिचारीकांना सध्या रू. १५,४००/- मात्र प्रतिमहा एकत्रित वेतनावर बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूक देण्यात यावी. त्याचबरोबर सदरहू परिचारक / परिचारीका यांना पुर्वीप्रमाणे ११ महिने कालावधीसाठी नेमणूक देणेकामी शासनाचे मार्गदर्शन घेण्यासाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

तदनंतर, मा व्यवस्थापन समिती दि. ०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र २२५ (२५) अन्वये, श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये ११-११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या ११ परिचारक / परिचारीका यांना दिनांक ०२.०२.२०१८ रोजीचे व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र १२८ अन्वये बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूक देणेबाबत ठरलेले आहे. परंतु आता, ज्या शासन निर्णयाचे अनुशंगाने निर्णय क्र १२८ घेण्यात आला, त्या शासन निर्णयास स्थगिती मिळालेली आहे. त्यामुळे सदरहू परिचारक / परिचारीका यांना पुर्वीप्रमाणेच ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

उपरोक्त निर्णयास अनुसरून श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील एकुण ११ परिचारक / परिचारीकांपैकी १० परिचारीकांकडून ११ महिने कालावधीसाठी ॲफीडेव्हीट करून घेतलेले आहे. कु आशुमती संपत सदाफुले ह्या नेमणूक आदेशातील अटी-शर्ती नुसार १५ दिवसाचे आत कामावर हजर न झाल्याने त्यांचा नेमणूक आदेश संपुष्टात आलेला आहे. तदनंतर त्यांनी कामावर हजर करून घेणेसाठी संस्थानविरोधात औद्योगिक न्यायालय अहमदनगर येथे कोर्टकेस दाखल केलेली असुन सदर केसचे कामकाज संस्थानमार्फत ॲड अशोक पाटील हे पहात आहे.

उपरोक्त १० अस्थायी (११ महिने कालावधीसाठी) परिचारक / परिचारीका यांनी संस्थानविरोधात तक्रार युएलपी क्रमांक ४१-५०/२०१८ औद्यागिक न्यायालय, अहमदनगर येथे दाखल केलेली असुन सदर केसचे कामकाज संस्थानमार्फत ॲड अशोक पाटील, अहमदनगर हे पहात आहेत.

सदर कोर्ट केसमध्ये परिचारक/परिचारीका यांनी खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

मा.न्यायालयास तक्रारदारातर्फे नम्र प्रार्थना की,

अ) जाब देणार यांनी तक्रादाराबाबत तक्रारीत नमुद केलेल्या अनुचीत कामगार प्रथांचा अवलंब केल्याचे जाहीर करुन त्या बेकायदेशीर अयोग्य असुन त्या रद्द करण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

ब) तक्रारदारास समान कामास समान मोबदला तत्वाने प्रथम नेमणूकीपासुन दिलेले वेतन व देय वेतन व फायदे फरकासहीत अदा करण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

क) तक्रारदारास प्रथम नेमणुकीपासुन किंवा २४० दिवस सेवेपासुन किंवा योग्य त्या काळापासुन परिचारीका म्हणून कायम करुन सर्व फायदे फरकासहीत अदा करण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

ड) तक्रारदारास सध्याचे नेमणुकपत्र देताना घेण्यात आलेला करार हा बेकायदेशीर असल्याचे जाहीर करावे.

इ) सोबतच्या अंतरीम आदेश अर्जातील बाबी कायम व्हाव्यात.

ई) इतर योग्य ते न्यायोचित आदेश तक्रारदाराच्या बाजुने व्हावेत.

तसेच त्यांनी अंतरीम आदेशास्तव अर्ज सादर केला असुन त्यात त्यांनी खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

अ) तक्रारीच्या सुनावणीच्या काळात तक्रारदारास सेवेतून कमी न करण्याविषयक आदेश, सेवेत ठेवण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

ब) तक्रारदारास समान कामास समान मोबदला तत्वाने कायम परिचारिका प्रमाणे मुळ वेतन, ग्रेड पे आणि इतर वेतन देण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

क) तक्रारीचे कामकाज तक्रारीचे स्वरुप पाहाता त्वरीत पुर्ण करण्याविषयक आदेश व्हावेत.

ड) इतर योग्य ते न्यायोचित आदेश तक्रारदाराच्या बाजुने व्हावेत.

त्यावर मा. औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांनी दि. १८/०६/२०१८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

Perused the applications for dispensing with the notice Under Rule 115 and other papers. Heard Mr. Modgekar Advocate. The Complainants are stated to be in the employment for years and were services are likely to be terminated. Issue show cause notice returnable on 22-06-2018. Till then only the services of the complainants was notbe terminated except by following due process of law.

तदनंतर, उपरोक्त परिचारीका यांनी मा औद्योगिक न्यायालय अहमदनगर येथे दाखल केलेल्या तक्रार युएलपी क्र.४१/२०१८ ते क्र.५०/२०१८ यावर मा न्यायालयाने दि. ३०/०३/२०१९ रोजी EXH U2 वर खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

1. Application Exh.U-2 is partly allowed.
2. Respondent is directed not to terminate service of complainant without following due process of law till disposal of complaint.
3. Respondent is directed to Renew contractual agreement of complainant strictly as per rules and regularations of Government Resolution dated 7 August 2009 till disposal of main complaint.

मा न्यायालयाचे उपरोक्त दि. ३०/०३/२०१९ रोजीचे आदेशास अनुसरून याआधी नेमणूका केलेल्या प्रस्तावातील १० परिचारक / परिचारीकांकडून दि. ०७/०८/२००९ रोजीचे शासन निर्णयामध्ये नमुद केलेनुसार कराराचे नुतनीकरण करणेबाबतचा प्रस्ताव दि. ०४/०७/२०१९ रोजीचे मा व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ३३६ नुसार, यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद परिचारीकांचा ११ महिने नेमणूकीचा कालावधी संपुष्टात आल्यापासुन ०४ दिवस ब्रेक देऊन या औद्योगिक न्यायालय अहमदनगर यांचे दि. ३०/०३/२०१९ रोजीचे आदेशास अनुसरून ११ महिने कालावधीकरीता याआधी नेमणूका केलेल्या परिचारीकांकडून दि. ०७/०८/२००९ रोजीचे शासन निर्णयामध्ये नमुद केलेनुसार कराराचे नुतनीकरण करणेस मान्यता देण्यात आली. सदर निर्णयानुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील ०९ परिचारीकांकडून दि.०७/०४/२०१९ ते दि.०६/०३/२०२० व ०१ परिचारीकाकडून दि.०९/०४/२०१९ ते दि. ०८/०३/२०२० अशा एकुण ११ महिने कालावधीसाठी दि. २४/०७/२०१९ रोजी करारनामा करून घेतलेला आहे.

उपरोक्त परिचारीकांचा ११ महिने कालावधी अनुक्रमे दि. ०६/०३/२०२० रोजी व दि. ०८/०३/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने याबाबतचा प्रसताव मा तदर्थ (Ad-hoc) समिती दि. ०६/०२/२०२० रोजीचे सभेत सादर करणेत आला त्यावर निर्णय क्र ८६ नुसार, यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत परिचारक / परिचारीका उपरोक्त प्रस्तावातील तक्ता क्र १ मधील अ.नं. १ ते ९ यांचा नेमणूक कराराचा कालावधी दि. ०६/०३/२०२० रोजी संपत असल्याने त्यांना दि. ११/०३/२०२० पासून पुन्हा ११ महिने कालावधीसाठी व अ.नं. १० कविता योसेफ पंडीत यांचा नेमणूक कालावधी दि. ०८/०३/२०२० रोजी संपत असल्याने त्यांना दि. १३/०३/२०२० पासून पुन्हा ११ महिने कालावधीसाठी सध्याचेच वेतनावर नव्याने करारनामा करून घेण्यास मान्यता देण्यात आली. सदर निर्णयानुसार प्रस्तावातील परिचारीकांकडून दि. २३/०३/२०२० रोजी खालीलप्रमाणे ११ महिने कालावधीसाठी करारनामे करून घेतले आहे.

दरम्यानचे कालावधीत सदर १० परिचारक, परिचारीका (११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक), श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय यांनी संस्थान विरुध्द मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६१६४ ते ६१७१,६१७३/२०२० दि. १५/०९/२०२० रोजी दाखल केले आहे. सदर तक्रारी संदर्भात मा. न्यायालयाची नोटीस इकडील कार्यालयास दि. १९/१०/२०२० रोजी प्राप्त झाली आहे. सदर कोर्ट केसमध्ये त्यांनी खालीलप्रमाणे मागणी / प्रार्थना केलेली आहे.

A) By issuing appropriate writ, order, direction or any other appropriate order in the nature of writ, Hon'ble High Court may be pleased to quash and set aside the order below Exh. U-13 in Complaint (ULP) No. 42/2018 passed by Learned Member Industrial Court, Ahmednagar on 20.02.2020.

B) By issuing appropriate writ, order, direction or any other appropriate order in the nature of writ, Hon'ble High Court may be pleased to allow application at Exh. U-13 in Comlaint (ULP) No. 42/2018 pending in the file of learned Member Industrial Court, Ahmednagar.

C) Pending hearing and final disposal of this Writ Petition, Hon'ble High Court may be pleased to direct respondent to pay equal wages to petitioner for permanent post of Staff Nurse with respondent.

D) Grant ad-interim relief in terms of prayer clause "C" in favour of petitioner;

E) Such other just and equitable relief as the facts and circumstances of the case warrants may kindly be awarded in favour of the petitioner.

सदर १० परिचारक, परिचारीका (११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक), श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय यांनी संस्थान विरुध्द दाखल केलेल्या मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६१६४ ते ६१७१,६१७३/२०२० संबधीत पुढील कामकाज संस्थान हायकोर्ट ॲडव्होकेट श्री. अनिल बजाज, औरंगाबद यांचेमार्फत चालू आहे.

तक्ता क्र ०१

| अ नं | परिचारक / परिचारीकांचे नाव | कामावर हजर तारीख | करारनामा संपुष्टात येत असल्याची तारीख |
|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| १ | कु मनिषा स्टिफन आवारे | ११/०३/२०२० | १०/०२/२०२१ |
| २ | श्रीमती वैशाली भगवान महागडे | ११/०३/२०२० | १०/०२/२०२१ |
| ३ | श्री आशिष शरद सुर्यवंशी | ११/०३/२०२० | १०/०२/२०२१ |
| ४ | सौ आशा रमेश जगताप | ११/०३/२०२० | १०/०२/२०२१ |
| ५ | कु प्रतिमा रामचंद्र कोळगे | ११/०३/२०२० | १०/०२/२०२१ |
| ६ | श्री राहुल प्रकाश आहोळ | ११/०३/२०२० | १०/०२/२०२१ |
| ७ | कु प्राजक्ता दिपक जाधव | ११/०३/२०२० | १०/०२/२०२१ |
| ८ | श्रीमती कावेरी सुदाम म्हस्के | ११/०३/२०२० | १०/०२/२०२१ |
| ९ | सौ रूथ निलेश श्रीवास्तव | ११/०३/२०२० | १०/०२/२०२१ |
| १० | कु कविता योसेफ पंडीत | १३/०३/२०२० | १२/०२/२०२१ |

उपरोक्त परिचारक / परिचारीकांचे ११ महिने करारनामा कालावधी स्तंभ क्र ०४ मध्ये नमुद केलेप्रमाणे संपुष्टात येत आहे.

श्री साईबाबा संस्थान रूग्णालयाकरीता सन २००९ चे मंजुर आकृतीबंधानुसार परिचारक / परिचारीका ची मंजुर पदसंख्या व सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र ०२

| अ नं | रूग्णालय | मंजुर पदे | | | भरलेली पदे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्थायी | काल्पनिक पदे (११ महिनेसाठी) | एकुण | स्थायी | अस्थायी (११ महिने) | काल्पनिक पदे (११ महिनेसाठी) | आऊटसोर्सिंग / बाह्ययंत्रणेद्वारे | एकुण |
| ०१ | ०२ | ०३ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ |
| १ | साईनाबा | २०० | ०० | २०० | १०१ | ०८ | ०० | ८४ | १९३ |
| २ | साईनाथ | १२७ | २५ | १५२ | ५२ | ०२ | २५ | ५८ | १३७ |
| एकूण | | २६२ | २५ | ३५२ | १५३ | १० | २५ | १४२ | ३३० |

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करून अनुमान-**

प्रति कर्मचारी एकत्रित मासिक वेतन रू. १५,४००/- याप्रमाणे रू. १,५४,०००/-.

**विभागाचा अभिप्राय-**

उपरोक्त १० अस्थायी (११ महिने कालावधीसाठी) परिचारक / परिचारीका यांनी संस्थानविरोधात दाखल केलेल्या तक्रार युएलपी क्रमांक ४१-५०/२०१८ औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे प्रलंबित आहे. मा न्यायालयाने दि. ३०/०३/२०१९ रोजी दि. ०७/०८/२००९ रोजीचे शासन निर्णयामध्ये नमुद केलेनुसार कराराचे नुतनीकरण करणेबाबत अंतरीम आदेशात दिलेले आहेत.

शासन निर्णय क्र सासंवि-२००९/४३३/३७/०९ का सोळा दि. ०७/०८/२००९ मध्ये कंत्राटी पध्दतीने भरावयाची पदे ११ महिनेचे कराराने भरावी व कराराचे दरवर्षी नुतनीकरण करावे असे नमुद आहे.

तरी, प्रस्तावातील नमुद परिचारीकांचा ११ महिनेचा कराराचा कालावधी (तक्ता क्र १ स्तंभ क्र ४ मध्ये दर्शविलेल्या दिनांकाअखेर) संपुष्टात आल्याचे लगतचे दिनांकापासुन ०४ दिवस ब्रेक देऊन पुन्हा ११ महिने कालावधीसाठी सध्याचेच वेतनावर नव्याने करारनामा करून घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

(रविंद्र ठाकरे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

---

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे / नाही.

(गीता प्रविण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानुदास पालवे, भा.प्र.से.)
अप्पर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(रविंद्र ठाकरे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- ९/९०



## मा. तदर्थ समिती सभेसमोर सादर

खरेदी विभाग, श्री साईबाबा हॉस्पिटल शिर्डी

**विषय– दर्शनरांगेमधील कोरोना संशयित साईभक्त रुग्णांची Rapid Antigen Test करणेकामी आवश्यक असणा-या Strips खरेदी करणेकामी Short notice E-Tender प्रक्रिया राबवून प्रशासकीय पातळीवर प्राप्त निम्नत्तम दरधारकास पुरवठा आदेश देणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

टिपणी,

सध्या देशासह जगभरामध्ये कोविड-१९ या संसर्गजन्य कोरोना विषाणूने थैमान घातलेले असून, या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने संपुर्ण ताळेबंदी लागू केलेली होती. याच पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून महाराष्ट्र शासनानेही संपुर्ण ताळेबंदी लागू करुन सर्व आस्थापनांसह राज्यामधील सर्व धार्मिक स्थळे भाविकांच्या दर्शनासाठी बंद करण्याचे आदेश दिलेले होते. त्यास अनुसरुन दिनांक १७ मार्च २०२० पासून श्रींचे समाधी मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी बंद करण्यात आलेले होते.

आता, काही प्रतिबंधात्मक अटी/ शर्तींवर राज्यातील सर्व व्यवहार सुरळीत करणेत येत असून, शासन आदेशानुसार दिनांक १६.११.२०२० पासून श्रींचे समाधी मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आलेले आहे. दर्शनासाठी येणा-या भाविकांना कोरोना सारख्या आजाराचा संसर्ग होऊ नये, याकरीता श्री साईबाबा संस्थानमार्फत सर्व प्रकारची काळजी घेतली जात आहे. यामध्ये दिनांक १६.११.२०२० रोजी श्रींचे समाधी मंदिर दर्शनासाठी सुरु झालेपासून महाद्वार क्र.०२ येथे रुग्णालयामार्फत ०१ डॉक्टर, ०१ स्टाफ नर्स व ०१ मदतनीस यांचे वैद्यकिय पथक आवश्यक ती औषधे, थर्मल स्कॅनर तसेच पल्स ऑक्सीमिटरसह साईभक्तांच्या सेवेकरीता तैनात करणेत आलेले आहे.

परंतु दर्शनासाठी येणारे साईभक्त वेगवेगळया ठिकाणाहून/ राज्यातून येत असल्यामुळे त्यांच्यामध्ये जर कोरोना संसर्गित साईभक्त आढळून आला, तर त्या साईभक्ताची संस्थानमार्फत Rapid Antigen Test करण्याचे निर्देश मा.मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी दिलेले आहेत. यासाठी साईआश्रम धर्मशाळा येथे संस्थानमार्फत चालविण्यात येत असलेले कोविड रुग्णालय बंद करणेत येऊ नये, याबाबत मा.मुख्यकार्यकारी अधिकारी सो. यांनी दिनांक ०७.०१.२०२१ रोजीचे पत्रान्वये मा.जिल्हाधिकारी सो. यांना कळविलेले असून, सदरहू रुग्णालय कोरोना संसर्गित रुग्णांवरील उपचाराकरीता संस्थानमार्फत आजही सुरु आहे.

तसेच दर्शनरांगेमध्ये एखादा साईभक्त कोरोना आजाराची लक्षणे असणारा अथवा संशयित आढळल्यास त्यांची Rapid Antigen Test करणेकामी रुग्णालयाच्या प्रयोगशाळा विभागातील व संस्थान संचलित कोविड सेंटर येथे काम करणारे प्रशिक्षीत तंत्रज्ञ PPE Kit व N-95 फेस मास्कसह स्वॅब घेणेकामी दर्शनरांगेमध्ये ठेवणेत आलेले आहेत. जर संशयित साईभक्त Rapid Antigen Test मध्ये Positive आढळला तर त्याला संस्थानमार्फत रुग्णवाहिकेने साईआश्रम धर्मशाळा येथील संस्थान संचलित कोविड सेंटर येथे भरती करुन त्याच्यावर मोफत उपचार करणेत येत आहेत.

दर्शनरांगेमध्ये येणा-या साईभक्तांच्या संख्येच्या प्रमाणात दिवसभरात जास्तीत-जास्त जवळपास ३० ते ३५ साईभक्तांची Rapid Antigen Test करावी लागेल, असा अंदाज आहे. त्याकामी पुढील सहा महिन्यांसाठी अंदाजे एकुण ६००० Rapid Antigen Test करणे अपेक्षीत आहे. याकरीता श्री साईबाबा रुग्णालयातील वैद्यकिय प्रशासक कक्षामार्फत मा.वैद्यकिय संचालक यांचे स्वाक्षरीने ६००० नग Rapid Antigen Test Kit चे मागणीपत्र इकडील विभागाकडे प्राप्त झालेले आहे.

उपरोक्त ६००० Rapid Antigen Test करीता आवश्यक असणा-या Strips खरेदीकामी येणारा अंदाजे खर्च निश्चित करणेकामी अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडून दुरध्वनीव्दारे दरपत्रक मागविण्यात आले असून ते खालीलप्रमाणे--

| Sr. No. | Item Description | Qty. in Strips | JK Sales & Services, Aurangabad | Aditya Enterprises Diagnostic Surgical, Beed | Average Rate Per Strip in Rs. | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate per Strip in Rs. Incl. GST | Rate per Strip in Rs. Incl. GST | | |
| 1 | Rapid Antigen Test Strip (Covid – 19Ag) | 6000 | 436.80 | 350.00 | 393.40 | 2360400.00 |



36-2021

वरीलप्रमाणे ६००० Strips खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.२३,६०,४००/- (अक्षरी रु.तेवीस लाख साठ हजार चारशे) मात्र खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :-**

श्रींचे दर्शनासाठी दर्शनरांगेमध्ये येणा-या साईभक्तांमधील कोरोना संशयित रुग्णांची Rapid Antigen Test करणेकामी अंदाजे ६००० Strips इतकी नगसंख्या अपेक्षित आहे. सदरहू Strips अल्पावधीत खरेदी करणेसाठी संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत जास्त खपाच्या वर्तमानपत्रामध्ये व आय.टी. विभागामार्फत संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रदर्शित करुन व महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Short Notice E-Tender प्रसिध्दीस देऊन, आवश्यकतेनुसार Strips खरेदी करता येईल, असे नम्र मत आहे.

तरी श्रींचे दर्शनासाठी दर्शनरांगेमध्ये येणा-या साईभक्तांमधील कोरोना संशयित रुग्णांची Rapid Antigen Test करणेकामी अंदाजे ६००० Strips इतकी नगसंख्या अपेक्षित आहे. सदरहू Strips अल्पावधीत खरेदी करणेसाठी संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत जास्त खपाच्या वर्तमानपत्रामध्ये व आय.टी. विभागामार्फत संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रदर्शित करुन व महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Short Notice E-Tender प्रसिध्दीस देऊन, त्यान्वये विहीत कार्यपध्दतीने प्रशासकीय पातळीवर निम्नत्तम दरधारकास पुरवठा आदेश देण्यास व याकामी येणा-या अंदाजे रु रु.२३,६०,४००/- (अक्षरी रु.तेवीस लाख साठ हजार चारशे मात्र) चे खर्चास मंजुरी मिळणेकामी सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर चक्रीय पध्दतीने सादर.

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांमधील कोरोना संशयित साईभक्त रुग्णांची Rapid Antigen Test करणेकामी आवश्यक असणा-या ६००० नग Strips खरेदीकामी Short Notice E-Tender प्रसिध्द करुन विहीत कार्यपध्दतीने प्रशासकीय पातळीवर निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२३,६०,४००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(गीता प्रविण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानुदास ह.पालवे)
अपर विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्यकार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय
दि. 16/02/2021

विषय – **दर्शन रांगेमधील कोरोना संशयित साईभक्त रुग्णांची** Rapid Antigen Test **करणेकामी आवश्यक असणा-या** Strips **खरेदी करणेकामी** Short notice E-Tender **प्रक्रिया राबवून प्रशासकीय पातळीवर प्राप्त निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत...**

विषयाचे अवलोकन केले. विषय समजून घेतला. साई आश्रम-2 येथे असेलेले **Dedicated Covid Center** बंद करण्याबाबत शासनाचे निर्देश असल्याबाबत वाद नाही. मात्र संस्थान प्रशासनाने सदर सेंटर सुरु ठेवण्याबाबत मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे केलेल्या प्रस्तावावर अद्यापही निर्णय नाही. अशा परिस्थितीत आणलेला प्रस्ताव हा तर्काला धरुन नाही.

येथे हेही नमूद करणे गरजेचे आहे की, शासनाचे, मंदिरात येणा-या संशयित व्यक्तिंची Rapid Antigen Test करावी, असे दिशा निर्देशही नाहीत. अशा परिस्थितीत जेव्हा ही बाब सर्वश्रुत आहे की, कोव्हिड-19 ची लक्षणं ही बदलत जात आहेत, त्यामुळे 'संशयित रुग्ण' या व्याख्येत कुठल्या भक्तांना बसवायचे व हे सर्व कशा पध्दतीने हाताळायचे हे अनाकलनीय आहे. हेही सर्वश्रुत आहे की, **RTPCR** ची सुविधा शिर्डीमध्ये उपलब्ध नाही, जी चाचणी कोव्हिड-19 साठी विश्वसनीय (**authentic**) आहे. तसेच **RTPCR** चाचणीचा अहवाल साधारणतः 6 ते 8 तासांत मिळतो आहे.

वरील परिस्थितीत आणलेला प्रस्ताव हा मंजूर करणे माझेतर्फे शक्य नाही. करिता माझेतर्फे नामंजूर.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 16/02/2021

चक्रिय पध्दतीने आणलेला विषय



विषय : दर्शनरांगेमधील कोरोना संशयित साईभक्त रुग्णांची Rapid Antigen Test करणेकामी आवश्यक असणाऱ्या Strips खरेदी करणेकामी Short notice E-Tender प्रक्रिया राबवून प्रशासकीय पातळीवर प्राप्त निम्मत्तम दरधारकास पुरवठा आदेश देणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव वाचला. या पूर्वी दिनांक ०७.०१.२०२१ रोजी मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांच्या अभिप्रायानुसार "स्पष्टता आवश्यक आहे" असा अभिप्राय नोंदविण्यात आला होता. त्यानंतर सदरचा प्रस्ताव सादर करण्यात आला. सरद प्रस्तावाचे अवलोकनानंतर व मा. अध्यक्ष यांच्या अभिप्रायाच्या अवलोकनानंतर ही बाब स्पष्ट होते की, संस्थान प्रशासनाने मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे कोव्हीड सेंटर सुरु ठेवण्याबाबतच्या प्रस्तावावर निर्णय झालेला नाही. सदरचा प्रस्ताव हा मंदिरात येणाऱ्या संशयित भक्तांच्या Rapid Antigen Test करण्याबाबतचा आहे परंतू या ठिकाणी ही बाब नमूद करणे गरजेचे वाटते की याबाबत शासन स्तरावरुन असे कोणतेही निर्देश नाहीत. Covid १९ या रोगांची लक्षणे ही निश्चित अशी सांगीतलेली नाहीत तसेच या रोगाची आणि बऱ्याच Allergy तसेच इतर आजारांची प्राथमिक लक्षणांमध्ये साम्यता आहे. त्यामुळे भाविकांना Covid १९ चा संशयित रुग्ण म्हणून ओळखणे किंवा ठरविणे हे विचारा पलीकडे आहे. या ठिकाणी RTPCR ही चाचणी विश्वसनीय मानली जाते परंतू सदरची चाचणी शिर्डी मध्ये उपलब्ध नसून त्याचा अहवाल येण्याचा कालावधी देखील सहा ते आठ तासांचा, किंवा त्या पेक्षा अधिक आहे. याही पेक्षा पूर्वी झालेल्या आदेशानुसार थर्मल स्नॅनिंग आणि पल्स रेट या प्राथमिक पॅरामिटर्स सुरु करण्यात आलेल्या आहेत.

२. त्यामुळे सदर परिस्थितीचा विचार करता Rapid Antigen Test करणे योग्य वाटत नाही. त्यामुळे सदरचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येतो.

04/03/2021

(गीता प्र. बनकर)

सहायक धर्मादाय आयुक्त तथा

सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,

श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि. ०४.०३.२०२१

झालेले आहे

विषय क्र.- 9/99

## मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोरील चक्रीय पध्दतीने विषय

विभागाचे नाव - श्री साईबाबा हॉस्पिटल

विषय - श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक रिक्त पदे भरणे बाबत . . .

टिपणी -

संस्थान अधिनियम २००४-

१३(४) - समितीस, संस्थान विश्वस्त व्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची कार्यकारी अधिका-याव्यतिरिक्त व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु, ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रूपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत, केली जाणार नाही.

शासननिर्णय-

शासननिर्णय क्रमांक सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का. १६, मंत्रालय, मुंबई दि. ०७/०८/२००९.

श्री साईबाबा संस्थानचे रूग्णालयासाठी मंजुर असलेल्या दि. ०७/०८/२००९ रोजीचे आकृतीबंधात अट-शर्त क्र ३ मध्ये, नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्द देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी असे नमुद आहे.

तसेच अट शर्त क्र. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

प्रस्तावना-

शासननिर्णय क्रमांक सांसवि२००९/४३३/(३७/०९) दि.०७/०८/२००९ का.१६ अन्वये श्री साईबाबा संस्थान कर्मचारी आकृतीबंध मंजूर करण्यात आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी एकुण ७४४ पदे मंजुर असुन परफ्युजनिस्टचे ०१ पदासाठी वेगळी मंजुर घेणेत आल्याने एकुण ७४५ पदे मंजुर आहेत. तसेच श्री साईनाथ रूग्णालयासाठी ४४३ पदे मंजुर आहेत.

साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ रुग्णालयातील माहे ०१ जानेवारी २०२० ते ३१ डिसेंबर २०२० या एक वर्षाची ओपीडी, आयपीडी, ओटी इ. रुग्ण संख्या खालीलप्रमाणे आहे.

| तपशिल | साईबाबा हॉस्पिटल | साईनाथ रुग्णालय |
|---|---|---|
| ओपीडी | १०३४७८ | १८३१११ |
| आयपीडी | ७८५४ | ७३३३ |
| तपासण्या | २३७८ | १८०१०१ |
| शस्त्रक्रिया | ५७८४ | ५९५४ |

सन २००९ मध्ये आकृतीबंध मंजूर झालेनंतरची ओपीडी व आयपीडीची रुग्ण संख्या दिवसेंदिवस वाढत असुन आकृतीबंधातील सर्वच्यासर्व मंजूर असलेल्या पदांची आवश्यकता आहे.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील सध्या भरलेली, रिक्त व अतिरिक्त पदांचा गोषवारा परिशिष्ट अ मध्ये सादर केला आहे. परिशिष्ट ब मध्ये श्री साईबाबा रुग्णालयाकरीता ०२ तपासणी सहाय्यक स्पेशालिटीनुसार (हृदयविकार तज्ञ), ०२ कनिष्ठ क्ष-किरण शास्त्रज्ञ, ०६ अपघात कक्ष अधिकारी, १३ निवासी वैद्यकीय अधिकारी श्री साईनाथ रुग्णालयाकरीता ०१ मेडीकल ऑफीसर (फिजिशियन), ०१ मेडीकल ऑफीसर (भूलतज्ञ) ०१ मेडीकल ऑफीसर (नेत्रतज्ञ), ०१ कनिष्ठ भूलतज्ञ, ०१ मेडीकल ऑफीसर (सोनोलॉजीस्ट), ०१ मुख्य रक्तसंक्रमण अधिकारी, ०२ रक्तसंक्रमण अधिकारी, ०२ कॅज्युअल्टी मेडीकल ऑफिसर, ०७ रेसिडेंट मेडीकल ऑफिसर भरणेकरीता सादर केली आहे. परिशिष्ट क मध्ये साईबाबा रूग्णालयाकरीता ०१ वैद्यकीय संचालक, ०१ उपवैद्यकीय संचालक, ०१ वैद्यकीय प्रशासक, ०१ जनसंपर्क व्यवस्थापक, ०१ संगणक व्यवस्थापक, ०१ जैव कचरा प्रबंधक व श्री साईनाथ रूग्णालयाकरीता ०१ वैद्यकीय अधिक्षक असे एकुण ४७ पदे भरणेकरीता सादर केली आहे.

संस्थान रूग्णालयासाठी सन २००९ चे मंजुर आकृतीबंधात वैद्यकीय संचालक इत्यादी पदे खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | रूग्णालय | पदाचे नाव | वेतनश्रेणी, ग्रेड पे | मंजुर संख्या | रिक्त संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | साईबाबा | वैद्यकीय संचालक | १५६००-३९१००, ७६०० | १ | १ |
| २ | | निवासी उपवैद्यकीय संचालक | १५६००-३९१००, ७६०० | १ | १ |
| ३ | | वैद्यकीय अधिक्षक | १५६००-३९१००, ६६०० | १ | १ |
| ४ | | वैद्यकीय प्रशासक | १५६००-३९१००, ६६०० | १ | १ |
| ५ | | जनसंपर्क व्यवस्थापक | ९३००-३४८००, ४४०० | १ | १ |
| ६ | | संगणक व्यवस्थापक | ९३००-३४८००, ४४०० | १ | १ |
| ७ | | जैव कचरा प्रबंधक | ९३००-३४८००, ४२०० | १ | १ |
| ८ | साईनाथ | वैद्यकीय अधिक्षक | १५६००-३९१००, ६६०० | १ | १ |

संस्थान आकृतीबंधात मंजुर पदांचे सेवाप्रवेश नियम, बिंदूनामावली, पदोन्नती साखळी अंतीम झाली नसल्याने परिशिष्ट ब व क मध्ये नमुद केलेले आवश्यक पदे ११ महिने कालावधीकरीता जाहीरात प्रसिध्द करून थेट मुलाखतीद्वारे भरावी लागेल.

जाहीरातीस अनुसरून आलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेणेकामी १) मुख्य कार्यकारी अधिकारी २) उप मुख्य कार्यकारी अधिकारी ३) जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा त्यांचे प्रतिनिधी ४) वैद्यकीय संचालक ५) वैद्यकीय अधिक्षिका यांची समिती गठीत करता येईल.

परिशिष्ट ब व क मधील वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय प्रशासनातील पदांबाबत जाहीरातीस अनुसरून आलेल्या उमेदवारांची खालील नियमावली (Marking scheme) नुसार निवड करता येईल.

Qualification and experience weightage

| Sr no | Details | MBBS Qualification | Diploma / Degree qualification | Superspeciality qualification |
|---|---|---|---|---|
| 01 | All years of MBBS exam aggregate average marks | 60% (Maximum 60 marks) | NA | NA |
| 02 | Diploma / Degree exam average marks | NA | 60% (Maximum 60 marks) | NA |

| Sr no | Details | MBBS Qualification | | Diploma / Degree qualification | Superspeciality qualification |
|---|---|---|---|---|---|
| 03 | Superspeciality exam average marks | NA | | NA | 60% (Maximum 60 marks) |
| 04 | Contractual Medical Officer or bonded Service in government | 6 months 3 marks<br>1 year 6 marks<br>1.5 years 10 marks<br>2 years 15 marks<br>2+ years 20 marks | | 6 months 3 marks<br>1 year 6 marks<br>1.5 years 10 marks<br>2 years 15 marks<br>2+ years 20 marks | 6 months 3 marks<br>1 year 6 marks<br>1.5 years 10 marks<br>2 years 15 marks<br>2+ years 20 marks |
| 05 | Personal Interview (Maximum 20 marks) | Additional Qualification | Experience other than Govt. Service | Participation in social activity related to Health. | Personality and communication skill |
| | | 5marks | 5marks | 5marks | 5marks |
| | **Total Marks** | 100 | | 100 | 100 |

Note: Candidates possessing DNB qualification will be given 36 average marks out of 60 i.e. 60% of the 60 marks.

परिशिष्ट क मधील वैद्यकीय प्रशासनाव्यतिरीक्त इतर पदांना मार्कींग स्किम मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निश्चित करता येईल.

निवड समितीने निवड केलेल्या ब व क मधील आवश्यक वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय प्रशासनातील रिक्त पदे मा डीन, बी.जे.मेडीकल कॉलेज, पुणे यांनी तयार करून दिलेले पात्रतेनुसार (सेवाप्रवेश) कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी घेऊन त्यांना संबंधीत पदाचे वेतनश्रेणीच्या जवळपासचे (मुळ वेतन+ग्रेड पे+महागाई भत्ता+एनपीए) मासिक एकत्रित मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देता येईल असे मत आहे. तसेच जनसंपर्क व्यवस्थापक, संगणक व्यवस्थापक, जैव कचरा प्रबंधक ही रिक्त पदे मा डीन, बी.जे.मेडीकल कॉलेज, पुणे यांनी तयार करून दिलेले पात्रतेनुसार (सेवाप्रवेश) कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी घेऊन त्यांना संबंधीत पदाचे वेतनश्रेणीच्या जवळपासचे (मुळ वेतन+ग्रेड पे+महागाई भत्ता) मासिक एकत्रित मानधन देता येईल.

विभागाचा अभिप्राय-

१. परिशिष्ट ब व क मधील आवश्यक वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय प्रशासनातील रिक्त पदे मा डीन, बी.जे.मेडीकल कॉलेज, पुणे यांनी तयार करून दिलेले पात्रतेनुसार (सेवाप्रवेश) कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी घेऊन त्यांना संबंधीत पदाचे वेतनश्रेणीच्या जवळपासचे (मुळ वेतन+ग्रेड पे+महागाई भत्ता+एनपीए) मासिक एकत्रित मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देता येईल असे मत आहे. तसेच जनसंपर्क व्यवस्थापक, संगणक व्यवस्थापक, जैव कचरा प्रबंधक ही रिक्त पदे मा डीन, बी.जे.मेडीकल कॉलेज, पुणे यांनी तयार करून दिलेले पात्रतेनुसार (सेवाप्रवेश) कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी घेऊन त्यांना संबंधीत पदाचे वेतनश्रेणीच्या जवळपासचे (मुळ वेतन+ग्रेड पे+महागाई भत्ता) मासिक एकत्रित मानधन देता येईल.

२. परिशिष्ट ब व क मध्ये नमुद केलेल्या पदांकरीता दोन वेगवेगळ्या स्वतंत्र जाहीरात विस्तृत स्वरूपात संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करता येईल तसेच संक्षिप्त स्वरूपात (इंग्रजी व मराठी भाषेत) दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करता येईल.

३. महाराष्ट्र शासन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजगता मार्गदर्शन केंद्र, अहमदनगर यांचे www.mahaswayam.gov.in या वेबसाईटवरून पदभरतीच्या पात्र उमेदवारांच्या यादया डाऊनलोड करून पात्र उमेदवारांना मुलाखतीची संधी देता येईल.

४. ११ महिने कालावधीकरीता जाहीरातीस अनुसरून आलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेणेकामी १) मुख्य कार्यकारी अधिकारी २) उप मुख्य कार्यकारी अधिकारी ३) जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा त्यांचे प्रतिनिधी ४) वैद्यकीय संचालक ५) वैद्यकीय अधिक्षिका यांची समिती गठीत करणेत यावी. गठीत केलेल्या समितीने निवड केलेल्या उमेदवारांची निवड यादी संस्थानचे संकेतस्थळावर जाहीर करून नेमणूक आदेश देता येईल. परिशिष्ट ब व क मध्ये नमुद केलेल्या पदांचे मुलाखती दोन वेगवेगळ्या तारखांना नियोजन करून घेता येईल.

उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेले परिशिष्ट अ मधील पॅरामेडीकल व इतर आवश्यक रिक्त पदापैकी काही पदांवर संस्थानला कुशल / अकुशल कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत सेवा पुरविणेत येत असुन सदर रिक्त पदांची जाहीरात प्रसिध्द केल्यानंतर जास्त प्रमाणात अर्ज येण्याची शक्यता असल्याने सदरची पदे भरणेबाबत सविस्तर प्रस्ताव अलाहीदा सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

उपरोक्त प्रस्तावातील परिशिष्ट ब व क मधील रिक्त पदे भरणेकरीताचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समिती समोर दि.०१/०२/२०२१ रोजी चक्रीय पद्धतीने सादर केला होता.

त्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सदस्य, तदर्थ समिती यांनी मान्यता दिली आहे. मा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर, अध्यक्ष, तदर्थ समिती, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर सदस्य तदर्थ समिती, अप्पर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक, सदस्य तदर्थ समिती यांनी दि.०१/०२/२०२१ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिला आहे.

'विषय वाचला. विषयाशी संबंधीत मनुष्यबळ व्यवस्थापक श्री आर बी नवले यांच्याकडून अभिलेखाबाबत विचारणा केली असता असे लक्षात आले की, Dean, बी.जे. मेडीकल कॉलेज, पुणे यांना, संस्थानसाठी वैद्यकीय अधिकारी व प्रशासनातील पात्रतेबाबत अभ्यास करून सेवा शर्ती नियम तयार करून देण्यास विनंती करण्यात आली होती. मात्र असे लक्षात आले की, असे नियम संस्थान प्रशासनाने स्वीकृत केलेले नाहीत. मुळातच संस्थान प्रशासनाने आकृतीबंधातील शर्तीनुसार सेवा प्रवेश नियम तयार करणे गरजेचे आहे. वरील परिस्थितीत सेवा शर्ती नियम स्वीकृत न करता पुढील कार्यवाही करणे अपेक्षित नाही. करिता आता आणलेला प्रस्ताव परीपूर्ण नसल्याने प्रशासनाने परीपूर्ण प्रस्ताव आणावा, जेणेकरून त्यावर निर्णय घेता येईल.'

श्री साईबाबा संस्थानचे मंजुर आकृतीबंधातील पदांचे सेवाप्रवेश नियम मंजुर करणेकरीता प्रस्ताव मा तदर्थ समिती सभेत दि.२८/०८/२०२० रोजी सादर करणेत आला होता. त्यावर मा अध्यक्ष, तदर्थ समिती तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर यांनी परिपुर्ण विषय सादर करण्याचे निर्देश दिलेले आहे. सदरचा विषय मा तदर्थ समिती मध्ये मंजुर झालेनंतर प्रारूप सेवाप्रवेश नियम संस्थान कर्मचा-यांचे हरकती करीता प्रसिध्द करून एक महिना मुदत द्यावी लागेल. हरकतीवर सुनावणी होऊन निकाली / योग्य ती कार्यवाही केल्यानंतर सेवाप्रवेश नियम अंतीम होईल. अंतीम झाल्यानंतर पुन्हा मा तदर्थ समितीची मान्यता घेऊन उच्च न्यायालय / शासनाकडे मान्यतेसाठी सादर करावा लागेल. शासनास पुर्तता करणेकरीता वेळ लागेल. एकंदर या सर्व प्रकीयेस किमान ६ महिने किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी लागण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीमध्ये संस्थानचे हॉस्पिटलमधील दैनंदिन रूग्णांची संख्या विचारात घेता वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे रूग्णांना वेळेवर सुविधा

देणेसाठी आवश्यक आहे सदरची पदे फक्त ११ महिने कालावधीकरीता भरणेत येणार आहे. सदर पदाची विहीत अर्हता ही मा अधिष्ठाता, बी जे मेडीकल कॉलेज, पुणे यांनी तयार करून दिलेल्या अर्हतेप्रमाणे आहे. ही पंदे नियमीत नाही. ११ महिनेनंतर सेवाप्रवेश नियम अंतीम झालेनंतर त्यानुसार पुन्हा भरती करून अंमलबजावणी करणेत येणार आहे.

मा अधिष्ठाता, बी.जे.मेडीकल कॉलेज पुणे यांनी प्रस्तावीत केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार यापुर्वी रिक्त वैद्यकीय अधिका-यांची आवश्यक पदे तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने भरलेली असुन सदर रिक्त झालेली व आवश्यक वैद्यकीय अधिका-यांची पदे ही तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीकरीता भरावयाची असुन त्यांचा नेमणूकीवरच्या पदावर कायम स्वरूपी हक्क राहणार नाही.

तरी, रूग्णालयाची तातडीची गरज पाहता अधिष्ठाता, बी.जे. मेडीकल कॉलेज, पुणे यांनी तयार करून दिलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधी करीता वैद्यकीय अधिका-यांची पदे जाहीरात प्रसिध्द करून थेट मुलाखतीद्वारे भरणे करीता उपरोक्त प्रस्तावीत केलेप्रमाणे व विभागाच्या अभिप्रायानुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक रिक्त पदे भरणेस मान्यता असावी.

सोबत सुधारीत परिशिष्ट अ, ब व क सादर केले आहेत.

23/2/2021

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

---

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे / नाही.

(गीता प्रविण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानुदास पालवे, भा.प्र.से.)
अप्पर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

2/3/2021

22/2/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी



ERP NO. 427

**चक्रीय पध्दतीने आणलेला विषय**
**दि. 01/03/2021**

**विषय –** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक रिक्त पदे भरणे बाबत...**

1) संस्थान प्रशासन, वेळोवेळी निर्णयासाठी विषय तदर्थ समितीसमोर ठेवतांना परीपूर्ण प्रस्ताव ठेवत नाही, ही बाब वेळोवेळी तदर्थ समितीच्या लक्षात आलेली आहे. त्याचाच एक भाग म्हणजे दि. 01/02/2021 रोजी आणलेला हा विषय. शासनाने मान्यता दिलेल्या आकृतीबंधातील शर्तीनुसार सेवा प्रवेश नियम आजपर्यंत तयार केलेले नाहीत. बी.जे. मेडीकल कॉलेज, पुणे यांचे डीन यांनी संस्थानसाठी वैद्यकीय अधिकारी व प्रशासनातील इतर कर्मचारी यांच्या पात्रतेबाबत अभ्यास करुन सेवाशर्ती नियम तयार करुन देण्याची विनंती करण्यात आलेली होती. तसे नियम त्यांनी संस्थान प्रशासनास दिलेले आहेत. सदर नियम, सेवाशर्ती या स्वीकृत न करता आता संस्थान प्रशासनाला कंत्राटी पध्दतीने 11 महिने मुदतीकरिता वैद्यकीय अधिकारी व पॅरा मेडीकलची पदे बाहय यंत्रणेद्वारे भरणेची आहेत.

2) वर नमूद केल्याप्रमाणे बी.जे. मेडीकल कॉलेज, पुणे यांचे डीन यांनी जे सेवा शर्ती नियम तयार करुन दिले आहेत ते आदर्श समजून सादर केलेला प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाच्या पूर्वपरवानगीच्या अधिन राहून विचारात घेता येवू शकतो, असे मला वाटते.

3) दि.01/02/2021 रोजीच्या विषयावरील परीपूर्ण प्रस्ताव आणण्याच्या निम्न स्वाक्षरीकार यांच्या आदेशानंतरही आज आणलेला प्रस्ताव संपूर्ण अभ्यास न करता आणलेला आहे. कारण ***'13 निवासी वैद्यकीय अधिकारी'*** जे मुळ प्रस्तावात नमूद आहेत ते आकृतीबंधात शासनाने मंजूर केलेली पदे नाहीत. म्हणूनच मुख्य लेखाधिकारी श्री. घोरपडे यांनी सदर बाबत माहिती घेतल्यानंतर ***'9 निवासी वैद्यकीय अधिकारी'*** अशी दुरुस्ती करुन, हा प्रस्ताव एकूण 43 पदे भरण्यासाठी ठेवण्यात आला.

4) संस्थान प्रशासनाने निवड समितीमध्ये उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना का समाविष्ट केले, याचा अर्थबोध होत नाही. मुलतः सेवा शर्ती नियम नसतांना संपूर्ण पारदर्शकता

येण्यासाठी तदर्थ समितीतील एक सदस्य यांचा अंतर्भाव या निवड समितीत होणे क्रमप्राप्त आहे. करिता माझेतर्फे खालीलप्रमाणे मंजुरी देण्यात येत आहे.

(अ) बी.जे. मेडीकल कॉलेज, पुणे यांचे डीन यांनी तयार कलेल्या सेवाशर्ती व नियम हे आदर्श धरुन मा. उच्च न्यायालयाचे पूर्वपरवानगीने 11 महिन्यांसाठी कंत्राटी पध्दतीने एकूण 43 पदे भरण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

**विषय - श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता ऑक्सीजन व नायट्रस गॅस मंजूर दराने खरेदीस व याकामी येणा-या खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत...**

टिपणी,

श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता ऑक्सीजन, नायट्रस व Carbon Dioxide गॅस खरेदीकामी M/s. Balaji Trading Co., Sangamner यांचे अ.नं. ऑक्सीजन, नायट्रस गॅस करीता दर निम्नत्तम होते तर Carbon Dioxide गॅस त्यांनी दि. २०/०३/२०१८ रोजीच्या ई-मेलव्दारे Carbon Dioxide मोफत देणेबाबत कळविले होते.

त्यामुळे M/s. Balaji Trading Co., Sangamner यांना दि. २२/०३/२०१८ रोजीचे मा. उपसमिती सभेत चर्चेसाठी बोलविण्यात आले होते सदर सभेसाठी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. परंतू त्यांनी चर्चेअंती कुठल्याच प्रकारे सुट दिलेली नव्हती. सदर निम्नत्तम पुरवठा धारकास पुरवठा आदेश दयावा लागणार असल्यामुळे पुरवठा धारकाने दिलेल्या दराबाबत चौकशी केले असता त्यांनी दिलेले दर बाजारभावाच्या तुलनेत वाजवी असलेबाबत खात्री करणेत आलेली आहे. त्यानुसार सदर खरेदीकामी रक्कम रू. ६९,२४,८१२/- मात्र रकमेचा मे.बालाजी ट्रेडींग कंपनी, संगमनेर यांना इकडील पत्र क्र.६२८ दि.२१/०४/२०१८ अन्वये पुढील ५ वर्षाकरीता पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. त्याचा तपशील खालील प्रमाणे

| Sr. No. | Name of Item | Qty. | Units | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Oxygen Gas | 123875 | Cubic | 32.14 | 3981342.50 |
| 2 | Nitrous | 10149895 | Litre | 0.29 | 2943469.55 |
| 3 | Carbon Dioxide | 3000 | Cubic | Supply Free of Cost | |
| | | | **Total Amt. in Rs.** | | ६९२४८१२.०० |

उपरोक्त दराने M/s. Balaji Trading Co., Sangamner हे सर्व प्रकारच्या गॅसचा पुरवठा करत आहेत सन २०१८–१९ मध्ये प्रस्तावीत खर्च दाखवितांनी मागील चार वर्षाचा अंदाजे खर्च घेण्यात येऊन ऑक्सीजन गॅसचा प्रती वर्ष २४७७५ Cubic याप्रमाणे ५ वर्षाकरीता १२३८७५ Cubic इतका तर नायट्रस गॅसचा प्रती वर्ष २०२९९७९ Litre याप्रमाणे ५ वर्षाकरीता १०१४९८९५ Litre खप घेण्यात आलेला आहे. परंतू सन २०१८–१९ पासून गॅसचा खप अतिरिक्त होत असलेले निदशनास येत आहे.

तसेच कोरोना व्हायरस संबंधित प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत शासनामार्फत संस्थानचे रुग्णालय अधिगृहीत करणेबाबत दि.१५/०४/२०२० रोजी आदेश देण्यात आलेला असून त्याअन्वये संस्थानच्या साईआश्रम धर्मशाळा नं – २ मध्ये भविष्यात होणा-या जंतु संसर्गाच्या प्रादुर्भावाची दक्षता घेणेकामी सुरवातीला कमी बेड ने सुरुवात करुन नंतर ५० बेडचे ऑक्सीजन सुविधा व ५ बेडचे व्हेंटीलेटर असे DCHC सेंटर उभारणेत आले होते. सदर सेंटरकरिता दैनंदिन १०० ते ११० Oxygen Cylinders ची आवश्यकता लागत आहे. सदरहू आजारात रुग्णाची ऑक्सीजन लेव्हल लवकर कमी होत असल्यामुळे त्या रुग्णांना बाहेरुन ऑक्सीजन द्यावा लागत असल्यामुळे ऑक्सीजनचा वापर सदर कालावधीत मोठया प्रमाणात झालेला आहे.

सन २०१८ पासून आजपर्यंत आवश्यकतेनुसार वापर झालेल्या ऑक्सीजन व नायट्रस गॅसचा तपशील खालीलप्रमाणे–

| अ.नं. | वर्ष | ऑक्सीजन गॅस (Cubic) | झालेला खर्च रक्कम रु. | नायट्रस गॅस (Litre) | झालेला खर्च रक्कम रु. | एकत्रित झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१८-१९ | २४८२९ | ७९८००४.०६ | १७६८००० | ५१२७२०.०० | १३१०७२४.०६ |
| २ | २०१९-२० | ३५९३८ | ११५५०४७.०० | ४५२२००० | १३११३८०.०० | २४६६४२७.०० |
| ३ | २०२०-२१ | ४६८९३ | १५०७१४१.०२ | २८९०००० | ८३८१००.०० | २३४५२४१.०२ |
| | एकूण | १०७६६० | ३४६०१९२.०८ | ९१८०००० | २६६२२००.०० | ६१२२३९२.०८ |
| | सरासरी प्रती वर्षे लागणारा गॅस | ३५८८६ | | ३०६०००० | | |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन करता ऑक्सीजन गॅसचा प्रतीवर्षी सरासरी ३५८८६ Cubic इतका तर नायट्रस गॅसचा प्रतीवर्षी सरासरी ३०६०००० Litre इतका खप झालेला आहे. म्हणजेच गॅसचा खप वाढलेला आहे. त्यामुळे सर्व प्रकारचे गॅस खरेदीकामी ५ वर्षे कालावधी करीता मंजूर असलेल्या रु.६९,२४,८१२/- मात्र रक्कम फेब्रुवारी- २०२१ अखेर रक्कम रु.६१,२२,३९२/- मात्र रक्कमेची बीले अदा करण्यात आलेली असून रु.८,०२,४२०/- मात्र रक्कम शिल्लक आहे.

(१) श्री साईनाथ रुग्णालयात Oxygen Generation Plant उभारणीचे काम प्रगतीपथावर असून त्यास अजून काही वेळ लागू शकतो, त्यामुळे सदर गॅसची आवश्यकता आहे. तसेच सदर प्लॅंट कार्यान्वित झाल्यानंतरसुध्दा श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयांकरिता ऑक्सिजन सिलेंडर Standby ठेवणे आवश्यक आहे.

(२) साईआश्रम धर्मशाळा येथील कोविड सेंटर (DCHC) मध्ये लिक्वीड ऑक्सिजन अथवा जनरेशन प्लॅंट नसलेमुळे उपचार घेणा-या रुग्णांना देखील ऑक्सिजन सिलेंडरद्वारे ऑक्सिजन देणेत येत आहे. सदरचे सिलेंडर हे निविदा प्रक्रियेमधून निवड झालेले मे.बालाजी ट्रेडींग कंपनी, संगमनेर यांचेकडूनच खरेदी करण्यात येत आहेत.

(३) श्री साईबाबा रुग्णालयात 13 KL क्षमतेचा Liquid Oxygen Plant कार्यान्वित असून सदरहू प्लॅंटकरिता पुरेशा प्रमाणात Liquid Oxygen सद्यस्थितीला उपलब्ध होत नाही.

या बाबींमुळे श्री साईनाथ रुग्णालयामध्ये Oxygen Generation Plant ची उभारणी केल्यानंतरसुध्दा M/s. Balaji Trading Co., Sangamner यांचेकडून गॅस खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच सदरचा ऑक्सिजन गॅस हा अत्यावश्यक सेवेमध्ये येत असल्यामुळे त्यांची खरेदी थांबवता किंवा कमी करता येणार नाही. सध्याचे परिस्थितीत रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे वारंवार बेडच्या संख्येत वाढ करावी लागत आहे. तरी अद्यापपावेतो सदरहू गॅसचा झालेला वापर पहाता, ऑक्सीजन गॅस प्रतीवर्षी सरासरी ३५८८६ Cubic इतका तर नायट्रस गॅस प्रतीवर्षी सरासरी ३०६०००० Litre इतका याप्रमाणे घ्यावयाचा झाल्यास एक वर्षाकरिता रक्कम रु.२०,४०,७७६/- मात्र खर्च येणार आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| Sr. No. | Name of Item | App. Qty. Per Year | Units | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Oxygen Gas | ३५८८६ | Cubic | ३२.१४ | ११५३३७६.०४ |
| 2 | Nitrous | ३०६०००० | Litre | ०.२९ | ८८७४००.०० |
| | | | | एक वर्षाकरीता एकूण अंदाजे खर्च | २०४०७७६.०४ |

सध्या कोरोना रुग्णांची संख्या फार मोठ्या प्रमाणात वाढत असून त्यामुळे ऑक्सीजनचा खप मोठ्या प्रमाणात वाढू शकतो त्यामुळे सदरहू ऑक्सीजन व नायट्रस गॅस खरेदीकामीचे प्रस्तावास तातडीने मान्यता घ्यावी लागणार आहे.

सध्या श्री साईनाथ रुग्णालयातील आवारात Oxygen Generation Plant बसविण्याकामी चक्रिय पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावास मा.तदर्थ समितीची मान्यता मिळालेली असून, दिनांक २०.०४.२०२१ रोजीचे आदेशानुसार मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांची देखील मान्यता मिळालेली आहे व त्यास अधीन राहून, दिनांक १९.०४.२०२१ रोजी जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, दिनांक २७.०४.२०२१ अखेर दरपत्रके मागविण्यात आलेली आहेत.

तसेच रिलायंन्स फाऊंडेशन या कंपनीकडून देणगी स्वरुपात सदरचा प्लॅंट मिळणेकामी देखील प्रयत्न चालू आहेत, त्याबाबत त्यांनी तशी प्राथमिक तयारी दाखविलेली आहे. त्यामुळे कोटेशनद्वारे अथवा देणगी स्वरुपात सदरचा प्लॅंट मिळालेस तो कार्यान्वित होणेकामी १५ ते २० दिवसांचा अवधी लागणार असलेमुळे तोपर्यंत सदरचे Oxygen Cylinders विकत घेणे आवश्यक आहे. नवीन Oxygen Generation Plant कार्यान्वित झाल्यानंतर सदर पुरवठाधारकाकडून ऑक्सीजन गॅसची खरेदी परिस्थितीनुसार कमी करणेत येईल. प्लॅंट उभारणीनंतर सदर प्लॅंटमधून फक्त ऑक्सीजन गॅस मिळणार असलेमुळे नायट्रस व $CO_2$ गॅस मात्र पूर्वीप्रमाणेच विकत घ्यावा लागेल.

तरी पुढील एक वर्षाच्या कालावधीत वापरण्यात येणारा ऑक्सीजन, नायट्रस व $CO_2$ गॅस मे.बालाजी ट्रेडींग कंपनी, संगमनेर यांचेकडून त्यांचे निविदा प्रकियेमधील निम्नतम मंजूर दराने खरेदी करणेस व याकामी

येणा-या अंदाजे रु.२०,४०,७७६/- मात्रचे खर्चास तसेच मे.बालाजी ट्रेडींग कंपनी, संगमनेर यांना कार्यादेश देणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेकामी सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर.

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, मे.बालाजी ट्रेडींग कंपनी, संगमनेर यांचेकडून त्यांचे मंजुर दराने पुढील एक वर्ष कालावधीसाठी संस्थान रुग्णालयांसाठी आवश्यक असणा-या ऑक्सीजन, नायट्रस व $CO_2$ गॅसची खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२०,४०,७७६/- मात्रचे खर्चास तसेच मे.बालाजी ट्रेडींग कंपनी, संगमनेर यांना कार्यादेश देणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्यात आली.

(गिता प्रविण बनकर)
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानूदास ह.पालवे)
अप्पर विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(रविंद्र ठाकरे)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

विषय क्र.- 9 / 33

**मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोरील चक्रीय पध्दतीने विषय**

**विभागाचे नाव - श्री साईबाबा हॉस्पिटल**

**विषय - श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक रिक्त पदे भरणेसाठी थेट मुलाखती घेणेकामी गठीत करावयाचे समितीमध्ये तदर्थ (Ad-hoc) समितीमधील एक सदस्य निश्चित करणेबाबत....**

टिपणी -

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक रिक्त पदे भरणेबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर दि.०१/०३/२०२१ रोजी चक्रीय पध्दतीने सादर केला होता.

सदर प्रस्तावावर दि.०१/०३/२०२१ रोजी खालीलप्रमाणे मा अध्यक्ष यांनी मंजुरी दिली आहे.

१) संस्थान प्रशासन, वेळोवेळी निर्णयासाठी विषय समितीसमोर ठेवतांना परीपूर्ण प्रस्ताव ठेवत नाही, ही बाब वेळोवेळी तदर्थ समितीच्या लक्षात आलेली आहे. त्याचाच एक क्षण म्हणजे दि.०१/०२/२०२१ रोजी आणलेला हा विषय. शासनाने मान्यता दिलेल्या आकृतीबंधातील शर्तीनुसार सेवा प्रवेश नियम आजपर्यंत तयार केलेले नाहीत. बी.जे. मेडीकल कॉलेज, पुणे यांचे डीन यांनी संस्थानसाठी वैद्यकीय अधिकारी व प्रशासनातील इतर कर्मचारी यांच्या पात्रतेबाबत अभ्यास करून सेवाशर्ती नियम तयार करून देण्याची विनंती करण्यात आलेली होती. तसे नियम त्यांनी संस्थान प्रशासनास दिलेले आहेत. सदर नियम, सेवाशर्ती या स्वीकृत न करता आता संस्थान प्रशासनाला कंत्राटी पध्दतीने ११ महिने मुदतीकरिता वैद्यकीय अधिकारी व पॅरा मेडीकलची पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरणेची आहेत.

२) वर नमूद केल्याप्रमाणे बी.जे. मेडीकल कॉलेज, पुणे यांचे डीन यांनी जे सेवा शर्ती नियम तयार करून दिले आहेत ते आदर्श समजून सादर केलेला प्रस्ताव मा उच्च न्यायालयाच्या पूर्वपरवानगीच्या अधिन राहून विचारात घेता येवू शकतो, असे मला वाटते.

३) दि.०१/०२/२०२१ रोजीच्या विषयावरील परीपूर्ण प्रस्ताव आणण्याच्या निम्न स्वाक्षरीकार यांच्या आदेशानंतरही आज आणलेला प्रस्ताव संपूर्ण अभ्यास न करता आणलेला आहे. कारण १३ निवासी वैद्यकीय अधिकारी जे मुळ प्रस्तावात नमूद आहेत ते आकृतीबंधात शासनाने मंजूर केलेली पदे नाहीत. म्हणूनच मुख्यलेखाधिकारी श्री घोरपडे यांनी सदर बाबत माहिती घेतल्यानंतर ९ निवासी वैद्यकीय अधिकारी अशी दुरूस्ती करून हा प्रस्ताव एकूण ४३ पदे भरण्यासाठी ठेवण्यात आला.

४) संस्थान प्रशासनाने निवड समितीमध्ये उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना का समाविष्ट केले, याचा अर्थबोध होत नाही. मुलत: सेवा शती नियम नसतांना संपूर्ण पारदर्शकता येण्यासाठी तदर्थ समितीतील एक सदस्य यांचा अंतर्भाव या निवड समितीत होणे क्रमप्राप्त आहे. करिता माझेतर्फे खालीलप्रमाणे मंजुरी देण्यात येत आहे.

अ) बी.जे. मेडीकल कॉलेज, पुणे यांचे डीन यांनी तयार केलेल्या सेवाशर्ती व नियम हे आदर्श धरून मा. उच्च न्यायालयाचे पूर्वपरवानगीने ११ महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने एकूण ४३ पदे भरण्यास मंजुर देण्यात येत आहे.

ब) निवड समिती, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा त्यांचे प्रतिनिधी, वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षिका तसेच तदर्थ समितीचे एक सदस्य (तदर्थ समितीच्या मान्यतेने) अशी गठीत करण्यात यावी.'

दि.०२/०३/२०२१ रोजी सदस्य तदर्थ समिती तथा अप्पर आयुक्त नाशिक विभाग, नाशिक व दि.०३/०३/२०२१ रोजी सदस्य तदर्थ समिती तथा सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी मा अध्यक्ष यांचे मंजुरीनुसार मंजुरी दिली आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-**

सध्या संस्थानचे रूग्णालयामार्फत कोव्हीड केअर हॉस्पिटल चालविणेत येत असुन त्याचवेळी श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटल हे पुर्ण क्षमतेने सुरू झालेले आहे. सध्या वैद्यकीय अधिकारी यांचा तुटवडा असुन कोव्हीड सेंटर व दैनंदिन हॉस्पिटल सुरळीत सुरू राहणेकरीता वैद्यकीय अधिका-यांची अत्यंत आवश्यकता आहे. अशा परिस्थितीमध्ये संस्थानचे हॉस्पिटलमधील दैनंदिन रूग्णांची संख्या विचारात घेता वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे रूग्णांना वेळेवर सुविधा देणेसाठी आवश्यक असल्याने याकरीता मा. उच्च न्यायालयाचे पूर्वपरवानगीने ११ महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने एकूण ४३ पदे भरण्यास उपरोक्तप्रमाणे मंजुरी देणेत आलेली आहे. मा उच्च न्यायालयाचे पुर्वमान्यता घेऊन जाहीरात प्रसिध्द करून उमेदवारांकडून अर्ज मागवुन मुलाखतीचे नियोजन करून वैद्यकीय अधिका-यांच्या नेमणूका होईपर्यंत बराचसा कालावधी लागु शकतो. याकरीता सोव्हील ॲप्लीकेशनमध्ये खालील बाबी नमुद करता येतील. उपरोक्त नमुद ४३ पदांची दोन वेगवेगळ्या जाहीराती प्रसिध्द करून अर्ज मागविणेस मान्यता असावी व तसे सिव्हील ॲप्लीकेशन विधी विभागामार्फत सादर करता येईल. व त्यानंतर मा उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार कार्यवाही करता येईल. यास मान्यता असावी.

तसेच, उपसेक्त निर्णयातील ब नुसार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा त्यांचे प्रतिनिधी, वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षिका तसेच तदर्थ समितीचे एक सदस्य (तदर्थ समितीच्या मान्यतेने) अशी समिती गठीत करणेबाबत निर्णय झालेला आहे. सदर निर्णयानुसार गठीत करावयाचे समितीमधील तदर्थ (Ad-hoc) समितीचे एक सदस्य निश्चित करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

13/3/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

---

(गीता प्रविण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

13/3/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सदस्य, तदर्थ समिती

7/4/2021

(भानुदास पालवे, भा.प्र.से.)
अप्पर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती.

131

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि. 23/03/2021

विषय – **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक रिक्त पदे भरणेसाठी थेट मुलाखती घेणेकामी गठीत करावयाचे समितीमध्ये तदर्थ समितीमधील एक सदस्य निश्चित करणेबाबत...**

प्रस्ताव वाचला, प्रस्ताव मंजूर. तदर्थ समितीचे सदस्य श्री. भानुदास पालवे, अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक किंवा दुस-या सदस्या श्रीमती गीता बनकर, सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्यापैकी जे सदस्य तयार असतील त्यांचा समावेश निवड समितीमध्ये करण्यात यावा. सिव्हील ॲप्लिकेशन करण्यात यावा.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 23/03/2021

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि. २६.०३.२०२१

**विषय : श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक रिक्त पदे भरणेसाठी थेट मुलाखती घेणेकामी गठीत करावयाचे समितीमध्ये तदर्थ समितीमधील एक सदस्य निश्चित करणेबाबत ...**

प्रस्ताव वाचला. सदर प्रस्ताव मंजूर करण्यास माझी कोणतीही हरकत नाही. परंतू, गठीत करावयाच्या समितीमध्ये मा. अध्यक्ष यांनी सुचविल्याप्रमाणे तदर्थ समितीचे सदस्य श्री. भानुदास पालवे, अप्पर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे नाव निवड समितीमध्ये समाविष्ट करण्यास माझी कोणतीही हरकत नाही. माझ्याकडे न्यायीक प्रकरणे मोठया प्रमाणात प्रलंबित असल्यामुळे तसेच इतर रुग्णालय संबंधीचे कामे असल्यामुळे मला निवड समितीमध्ये काम करण्यास वेळ उपलब्ध नाही.

Geeta 26/03/2021

(गीता प्र. बनकर)

सहायक धर्मादाय आयुक्त तथा

दि. २६.०३.२०२१ सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,

श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

**विषय : श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिन्सचे सन 2021-2022 करीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत...**

**संदर्भ :** मा.तदर्थ समिती सभा दि.11/05/2020 विषय क्र.04 निर्णय क्र.301

**अधिनियम 2004 मधील तरतुद:** 1) पृ. क्र. 355, समितीच्या अधिका-यांचे अधिकार व कर्तव्ये 14(2) ख
2) पृ. क्र. 356, समितीची कर्तव्ये व अधिकार 17 (2) झ
3) पृ. क्र. 359, विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग 21 (1) (क),21 (2) (ग)ह

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये (दि.31/01/2021 पर्यंत) एकुण रु. 66,44,01,890/- इतक्या रकमेचे 1223 मेडीकल इक्विपमेंटस् व मशिनरी, उपकरणे, तसेच फर्निचर खरेदी करणेत आले असुन सन 2006 पासून नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी सन 2020-21 या वर्षाकरीता 247 नग मशिन्सचे संबंधीत 22 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता एकुण रु. 1,01,15,767/- इतक्या रकमेचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले होते.

तसेच, श्री साईनाथ रूग्णालयात (दि. 31/01/2021 पर्यंत) एकुण रु. 5,22,21,300/- इतक्या रकमेचे 1200 मेडीकल इक्विपमेंटस् व मशिनरी, उपकरणे खरेदी करणेत आले असुन (सन 1999 पासून) नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी सन 2020-21 या वर्षाकरीता 95 नग मशिन्सचे संबंधीत 21 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभाली करीता एकुण रु. 26,27,402/- इतक्या रकमेचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले होते.

सदर कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन्स सध्या व्यवस्थित काम देत आहेत. त्यामुळे विवीध कंपन्यासोबत केलेले सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचे सन 2021-22 (दि 01/04/2021 तेदि 31/03/2022) या एक वर्षाच्या कालावधी करीता नुतनीकरण करणे आवश्यक आहे. तसेच ज्या मशिन्सचे वॉरंटी कालावधी संपले आहे अशा मशिन्सचे नव्याने LAMC/CAMC करणे आवश्यक आहे.

उपरोक्त मशिन्सचे स्पेअरपार्टस हे Monopoly या प्रकारचे असल्यामुळे बाजारात उपलब्ध होत नाही म्हणुन सदरच्या मशिनचे LAMC/CAMC त्याच कंपन्यांकडे करणे आवश्यक आहे.

सन 2021-22 या वर्षाकरीता श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी परीशिष्ट 'अ' नुसार 257 नग मशिन्सचे संबंधीत 29 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी अंदाजे रू. 1,18,65,820/- इतका खर्च तसेच श्री साईनाथ रूग्णालयासाठी परीशिष्ट 'ब' नुसार एकुण 113 नग मशिन्सचे संबंधीत 26 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी अंदाजे रू. 36,08,811/- इतका खर्च अपेक्षित होता.

त्याप्रमाणे दोन्ही रुग्णालयां करीता एकत्रित प्रस्ताव चक्रीय पध्दतीने दि. 30/01/2021 रोजी सादर करण्यात आलेला होता. त्यावर दि.16/02/2021 रोजी मा.तदर्थ समितीचे अध्यक्ष साहेब यांचेकडे सदरचा विषय चर्चा व मान्यतेसाठी घेऊन गेले असता दि.16/02/2021 च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहे.

**पत्र-**

" विषय समजून घेतला. विषयात नमूद एक उदाहरण म्हणजे पॅथलॅब् मधील 5 Part Diff. Blood Cell Counter मशीन सन 2012 मध्ये विकत घेतानाची किंमत रु.14,74,375.38/- होती. त्यास AMC रु.1,55,038/- होते. म्हणजेच गेल्या नऊ वर्षात संस्थान प्रशासनाने सदर मशिनची किंमत सुध्दा दिलेली आहे. असे समजले की, सदर मशिनची सुरुवातीस 2 वर्षाची वॉरंटी मोफत होती, तरी पण आजपर्यंत अशा मशिनची 70 टक्केपेक्षा जास्त किंमत संस्थान प्रशासनाने AMC साठी दिलेली आहे.

संबंधीत विभागाचे श्री.राजेश वाकडे, वरिष्ठ जैव वैद्यकीय अभियंता यांचेशी चर्चा केली असता, पूर्वी केलेल्या सर्व्हीसेस व वापरलेले पार्टस तसेच विविध मशिनसाठी कुठल्या भागापुरती AMC करणे आवश्यक आहे, अशा सर्व बाबींचा विचार करुन नवीन प्रस्ताव दाखल करण्याचे त्यांनी मान्य केले. असा अभ्यायसपूर्ण प्रस्ताव आणावा. "

तसेच त्यानंतर दि.17/02/2021 रोजी मा. तदर्थ समितीचे मा. सदस्य, अप्पर विभागीय आयुक्त, नाशिक व दि. 04/03/2021 रोजी मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी 'मा.अध्यक्ष साहेब यांच्या अभिप्रायानुसार प्रस्ताव सादर करावा' असे आदेश दिले आहेत.

त्यानुसार संस्थानचे दोन्ही रुग्णालयातील ज्या विविध मशिनचे AMC/CMC करणे आवश्यक आहे, अशा मशिन्सची यादीतील ज्या मशिनचे WHO Guidelines नुसार वापरायोग्य कालावधी संपला आहे, अशा मशिन्स यादीतून वजा करुन वापरकर्ते यांना नविन मशिन्ससाठी मागणीपत्र पाठविण्यास मा.वैद्यकीय अधिक्षिका तथा प्र.वैद्यकीय संचालिका यांचे आदेशाने कळविणेत आले आहे. नविन मशिन्स करीता खरेदी कार्यवाही पूर्ण होउन नवीन मशिन्स प्राप्त होईपर्यंत उपरोक्त वजा करणेत आलेले मशिन्स करीता आवश्यकते नुसार On call Basis नुसार दुरूस्ती करून घेता येईल असे नम्र मत आहे.

तसेच मा. अध्यक्ष साहेबांनी आदेश दिल्याप्रमाणे, विविध पुरवठाधारकांशी ई-मेल व्दारे संपर्क साधून विचारणा केली असता, त्यांनी पाठविलेल्या ई-मेल नुसार कोणत्याही मशिनचा एखादया ठरावीक भागापुरती AMC करणेसाठी पुरवठाधारक तयार नाहीत. त्याप्रमाणे सदर मशिन या रुग्णालयातील विविध भागात 24 x 7 तास विविध वापरकर्त्या कडून सतत वापरले जातात. तसेच इतर कोणत्याही रुग्णालयापेक्षा संस्थानचे दोन्ही रुग्णालयातील मशिन्सचा वापर हा खूपच अधिक प्रमाणात होतो. त्यामुळे उपरोक्त मशिन्सचा कोणताही पार्ट कधीही खराब होऊ शकतो. त्यामुळे पुरवठाधारक एखादया ठराविक भागाकरीता AMC/CMC करणेस तयार नाही.

तसेच मा. तदर्थ समितीचे निर्णयानुसार, AMC/CMC करणे योग्य मशिनचे कंपनीने दिलेल्या सर्व्हीसमध्ये आजपावेतो वापरलेले स्पेअरपार्ट व संस्थानमार्फत झालेला खर्च याची माहिती एकत्रित करुन नविन प्रस्ताव बनविण्यात आला आहे

मा.वैद्यकीय संचालिका यांचे सुचनेनुसार, पुढील 01 वर्षाच्या कालावधीकरीता AMC/CMC चे कार्योदेश पुरवठाधारकांना देईपर्यंत 200 अत्यावश्यक मशिन्सकरीता मार्च 2021 नंतर पुढील 3 महिन्याच्या कालावधीसाठी सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेस मान्यता मिळणेसाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर केला आहे

**मागणी:** त्यानुसार, सन 2021-2022 करीता, दुरुस्ती व देखभाल करणेसाठी

अ) श्री साईबाबा हॉस्पिटलच्या परीशिष्ट 'अ-1' नुसार एकुण 135 नग अत्यावश्यक मशिन्सचे संबंधीत 24 कंपन्यांकडे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे. त्याकरीता एकूण रू. 65,80,816 /- इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच

ब) श्री साईनाथ रुग्णालयातील परीशिष्ट 'ब-1' नुसार एकुण 85 नग अत्यावश्यक मशिन्सचे संबंधीत 23 कंपन्यांकडे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे. त्याकरीता एकूण अंदाजे रू. 23,55,021 /- इतका खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** वरील संस्थान अधिनियमानुसार दुरूस्ती व देखभाल करता येईल.

वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट बाबत मा.व्य. समितीच्या दि. 20/05/2007 च्या सभेतील विषय क्र.33 निर्णय क्र.386 अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे. "दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागातील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअरकंडीशनर्स, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षीक मेन्टेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशीत केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डीलरला देण्यात यावे असे ठरले."

**विभागाचा अभिप्राय–**

संस्थानचे दोन्ही रुग्णालयातील ज्या विविध मशिनचे AMC/CMC करणे आवश्यक आहे, अशा मशिन्सची यादीतील ज्या मशिनचे WHO Guidelines नुसार वापरायोग्य कालावधी संपला आहे, अशा

अ) श्री साईबाबा हॉस्पिटल येथील परीशिष्ट 'य' नुसार एकूण 122 नग मशिन्स व

आ) श्री साईनाथ रुग्णालयातील परीशिष्ट 'र' नुसार एकूण 27 नग मशिन्स करीता वापरकर्ते यांना त्याच प्रकारच्या नविन मशिन्ससाठी मागणीपत्र पाठविण्यास मा.वैद्यकीय अधिक्षिका तथा प्र.वैद्यकीय संचालिका यांचे आदेशाने कळविणेत आले आहे.

इ) श्री साईबाबा हॉस्पिटल येथील परीशिष्ट 'अ-1' मध्ये एकुण 135 नग मशिन्स पैकी 7 नग मशिनचे WHO Guidelines नुसार वापरायोग्य कालावधी संपला असून देखील सदर मशिन्सचा समावेश केला आहे. कारण सदर मशिन्स या अत्यंत तातडीच्या वेळी (Life Saving Equipment) वापरल्या जातात आणि त्याकरीता पर्यायी मशिन्स उपलब्ध नाहीत. आणि पर्यायी मशिन्स उपलब्ध नाहीत.त्यामुळे सदर मशिनचे यावर्षी AMC/CMC करणे आवश्यक आहे.

नविन मशिन्स करीता खरेदी कार्यवाही पूर्ण होउन नवीन मशिन्स प्राप्त होईपर्यंत उपरोक्त वजा करणेत आलेले मशिन्स करीता आवश्यकते नुसार On call Basis नुसार दुरूस्ती करून घेता येईल असे नम्र मत आहे. त्याकरीता कंपन्या कडून On call Basis नुसार दर मागविण्यात आले आहेत.

तसेच मा. अध्यक्ष साहेबांनी आदेश दिल्याप्रमाणे, विविध पुरवठाधारकांशी ई-मेल व्दारे संपर्क साधून विचारणा केली असता, त्यांनी पाठविलेल्या ई-मेल नुसार कोणत्याही मशिनचा एखादया ठरावीक भागापुरती AMC करणेसाठी पुरवठाधारक तयार नाहीत. दोन्ही रुग्णालयातील सर्व मशिन्स विविध भागात 24 x 7 तास विविध वापरकर्त्या कडून सतत वापरले जातात. तसेच इतर कोणत्याही रुग्णालयापेक्षा संस्थानचे दोन्ही रुग्णालयातील मशिन्सचा वापर हा खूपच अधिक प्रमाणात होतो. त्यामुळे उपरोक्त मशिन्सचा कोणताही पार्ट कधीही खराब होऊ शकतो. त्यामुळे पुरवठाधारक एखादया ठराविक भागाकरीता AMC/CMC करणेस तयार नाही.

तसेच मा. तदर्थ समितीचे निर्णयानुसार, AMC/CMC करणे योग्य मशिनचे कंपनीने दिलेल्या सर्व्हीसमध्ये आजपावेतो वापरलेले स्पेअरपार्ट व संस्थानमार्फत झालेला खर्च याची माहिती एकत्रित करुन नविन प्रस्ताव बनविण्यात आला आहे. संस्थानचे दोन्ही रुग्णालयांतील एकुण 220 नग मशिन्सचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी एकुण 24 कंपनी प्रतिनीधींशी वाटाघाटी करणे आवश्यक आहे.

तरी सन 2021-2022 करीता, अत्यावश्यक मशिन्सचे दुरुस्ती व देखभालीकरीता,

अ) श्री साईबाबा हॉस्पिटलच्या परीशिष्ट 'अ-1' नुसार एकुण 135 नग अत्यावश्यक मशिन्सचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्याकरीता एकूण रू. 65,80,816 /- इतक्या खर्चास मान्यता असावी. तसेच

आ) उपरोक्त परीशिष्ट 'अ-1' मध्ये एकुण 135 नग अत्यावश्यक मशिन्स पैकी 7 नग मशिनचे WHO Guidelines नुसार वापरायोग्य कालावधी संपला असून त्यांचे देखील यावर्षी AMC/CMC करणेस मान्यता असावी..

इ) श्री साईनाथ रुग्णालयातील परीशिष्ट 'ब-1' नुसार एकुण 85 नग अत्यावश्यक मशिन्सचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्याकरीता एकूण अंदाजे रू. 23,55,021 /- इतक्या खर्चास मान्यता असावी. आणि

ई) दोन्ही रुग्णालयांसाठी एकत्रित एकुण 220 नग मशिन्स करीता त्यांनी दिलेल्या दरांबाबत 24 कंपनी प्रतिनिधी सोबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष चर्चा वाटाघाटी करुन दर निश्चित करणेस मान्यता असावी.

तसेच उपरोक्त विषय मान्यतेस्तव मा. तदर्थ समिती समक्ष चक्रीय पध्दतीने फेरसादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी

22/04/21

---

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, सन 2021-2022 करीता, तरी सन 2021-2022 करीता, अत्यावश्यक मशिन्सचे दुरुस्ती व देखभालीकरीता,

अ) श्री साईबाबा हॉस्पिटलच्या परीशिष्ट 'अ-1' नुसार एकुण 135 नग अत्यावश्यक मशिन्सचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्याकरीता एकूण रू. 65,80,816 /- इतक्या खर्चास तसेच

आ) उपरोक्त परीशिष्ट 'अ-1' मध्ये एकुण 135 नग अत्यावश्यक मशिन्स पैकी 7 नग मशिनचे WHO Guidelines नुसार वापरायोग्य कालावधी संपला असून त्यांचे देखील यावर्षी AMC/CMC करणेस

इ) श्री साईनाथ रुग्णालयातील परीशिष्ट 'ब-1' नुसार एकुण 85 नग अत्यावश्यक मशिन्सचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्याकरीता एकूण अंदाजे रू. 23,55,021 /- इतक्या खर्चास आणि

ई) दोन्ही रुग्णालयांसाठी एकत्रित एकुण 220 नग मशिन्स करीता त्यांनी दिलेल्या दरांबाबत 24 कंपनी प्रतिनिधी सोबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष चर्चा वाटाघाटी करुन दर निश्चित करणेस व त्यानुसार कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.

16/04/2021
(गीता प्रविण बनकर)
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

19/4/2021
(भानुदास ह.पालवे)
अप्पर विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

16/4
(श्रीकांत आपेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

विषय क्र.- 9/34

## मा.तदर्थ (Ad-Hoc) समिती सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर

श्री साईबाबा हॉस्पिटल

**विषय– श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागात न होणा-या तपासण्या बाहेरील लॅबधारकांकडून आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी कोटेशन मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

टिपणी,

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.१०.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६१० अन्वये, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागात न होणा-या जवळपास ६३ प्रकारच्या तपासण्या बाहेरील लॅबमधून आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी NABL मान्यताप्राप्त लॅब धारकांकडून तपासण्यांचे निकस व तपासण्याची पध्दती ठरवून एक वर्ष कालावधीसाठी कोटेशन मागवून तपासण्यांचे दर निश्चित करणेस मान्यता मिळालेली होती. त्यास अनुसरुन विहीत पध्दतीने कोटेशन मागवून त्यामधील निम्नतम दरधारक मे.कृष्णा डायग्नोस्टीक प्रा.लि., पुणे यांना दिनांक १४.०९.२०१९ रोजी कार्यादेश देण्यात आला होता.

आता, मे.कृष्णा डायग्नोस्टीक प्रा.लि., पुणे यांची मुदतवाढ संपुष्टात आलेली असल्यामुळे मे.कृष्णा डायग्नोस्टीक प्रा.लि., पुणे यांनी दिनांक १६.०१.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे कळविले आहे की, "सध्याच्या महामारीच्या काळात संस्थेने रुग्णसेवा चालू ठेवली आहे. अजून सांसर्गिक कोरोना-१९ चा प्रादुर्भाव कमी होण्याची लक्षणे दिसत नाहीत. सदर सेवा मागील मंजुर दराने पुढील एक वर्ष कालावधीसाठी अखंडीत कार्यान्वित ठेवण्यासाठी आमची आपणास विनंती."

मे.कृष्णा डायग्नोस्टीक प्रा.लि., पुणे यांची सेवा समाधानकारक असून, त्यांचेबाबतीत रुग्णांच्या प्रतिक्रियाही चांगल्या येत आहेत. तसेच मध्यंतरी कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर सर्व लॅबधारकांनी तपासण्यांचे दर वाढविले होते. परंतु मे.कृष्णा डायग्नोस्टीक प्रा.लि., पुणे यांनी ठरवून दिलेल्या दरामध्ये, निर्धारित वेळेतच लॅब रिपोर्ट रुग्णांना उपलब्ध करुन दिलेले होते. मे.कृष्णा डायग्नोस्टीक प्रा.लि., पुणे यांचे काम समाधानकारक असल्यामुळे त्यांनाच मागील वर्षाच्या अटी/ शर्ती व निश्चित केलेल्या दराने पुढील एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेसाठी मान्यता मिळणेकामी प्रयोगशाळा विभागाने दिनांक ०४.०२.२०२१ रोजी मंजुरीसाठी टिपणी सादर केली असता, त्यावर "नव्याने निविदा खरेदी विभागामार्फत मागवून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, तसेच मुदतवाढीकरीता विषय मा.तदर्थ समितीसमोर सादर करावा," असे निर्देश प्राप्त झालेले आहेत. त्यास अनुसरुन पुढील कार्यवाही करणेकामी प्रयोगशाळा विभागाने सदरहू प्रकरण इकडील कार्यालयाकडे वर्ग केलेले आहे.

<u>विभागाचे स्पष्ट मत-</u> श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागात दैनंदिन रुग्णांच्या विविध प्रकारच्या रक्त व लघवीच्या तपासण्या केल्या जातात. परंतु सर्व प्रकारच्या तपासण्या दोन्ही रुग्णालयातील लॅबमध्ये काही तांत्रिक कारणास्तव होऊ शकत नाहीत किंवा कोणत्याही एका लॅबमध्ये त्या होत नसतात. तसेच अशा तपासण्याचा खर्च जास्त असून त्याची क्वचित प्रसंगीच आवश्यकता भासते. त्यामुळे अशा प्रकारच्या जवळपास ६८ तपासण्या NABL मान्यताप्राप्त लॅबधारकांकडून आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणे योग्य वाटते. सदरहू तपासण्या करणेकामी विविध प्रयोगशाळांमध्ये वेगवेगळे शुल्क आकारले जाते, तसेच रुग्णामध्ये असलेल्या आजाराच्या लक्षणानुसार तपासण्या करण्यात येतात व या तपासण्यांचा खर्च रुग्ण स्वतः करतो, त्यामुळे या तपासण्यांचा अंदाजे खर्च निश्चित करता येत नाही. यापुर्वी ज्या तपासण्या संस्थान रुग्णालयांमध्ये होत नाहीत, त्या तपासण्या रुग्ण बाहेरील खाजगी प्रयोगशाळेमध्ये

करत होते व याकामी त्यांना जादा खर्च येत होता. यासाठी संस्थान रुग्णालयांच्या प्रयोगशाळेमध्ये न होणाऱ्या तपासण्यांचे दर बाहेरील लॅबधारकास निश्चित करुन दिलेमुळे रुग्णांना निश्चितच त्याचा फायदा होत आहे. आऊटसोर्स पध्दतीने बाहेरील लॅबधारकाकडून करावयाच्या तपासण्या खालीलप्रमाणे आहेत.

| Sr. No. | Name of Test | Method of Test |
|---|---|---|
| 1 | ACA assay (Anti Cardiolipin Antibody) | Enzyme Immunoassey |
| 2 | ACE (Angiotensin Converting Enzyme) | Enzymetic / Spectophotometry |
| 3 | Sr. Ammonia | Biochemistry |
| 4 | ANA (Antinuclear Antibody) | Enzyme Immunoassey / IFA |
| 5 | Anti DS DNA | Enzyme Immunoassey |
| 6 | Anti Mitochondrial Ab | IF |
| 7 | Anti Thyroid Abs | CMIA/CLIA/ Enzyme Immunoassey |
| 8 | Anti Sm Ab | CMIA/IF |
| 9 | ASO Titre | Nephelometry/Latex Particle Agglutination |
| 10 | Anti CCP | CMIA/CLIA |
| 11 | Alfa Fetoprotein | CMIA/CLIA |
| 12 | APTT | Coagulametry / Clotting |
| 13 | C-ANCA | IFA/EIA |
| 14 | CA – 125 | CMIA/CLIA |
| 15 | CD 4 Count | Flow Cytometry |
| 16 | CA-125 | CMIA/CLIA |
| 17 | CA 19.9 | CMIA/CLIA |
| 18 | CEA | CMIA/CLIA |
| 19 | CPK | Biochemical/Spectrophotometry |
| 20 | P-ANCA | EIA/IFA |
| 21 | Anaemia Profile | CC/M/B/CMIA/EP/HPLC |
| 22 | Sr. Iron | CMIA/Specophotometry |
| 23 | Sr. Ferritin | CLIA |
| 24 | Sr. Folic Acid | CMIA/CLIA |
| 25 | Sr. Vit B12 | CMIA/CLIA |
| 26 | Vit D3 | PIA/CLIA/CMIA |
| 27 | G6 PD Test | Biochemical/Spectrophotometry |
| 28 | HB Electrophoresis | HPLC |
| 29 | HGH (Human Growth Harmone) | CLIA |
| 30 | Beta HCG | CMIA/CLIA |
| 31 | FSH | CMIA/CLIA |
| 32 | LH | CMIA/CLIA |
| 33 | Prolactin | CMIA/CLIA |
| 34 | Cortisol | CMIA/CLIA |
| 35 | Insulin | CMIA/CLIA |
| 36 | Testosterone | CMIA/CLIA |
| 37 | PTH (Parathyroid Harmone) | CMIA/CLIA/ELISA |
| 38 | PTH-intact | CMIA/CLIA |

| Sr. No. | Name of Test | Method of Test |
|---|---|---|
| 39 | IGF-1 (Insulin Growth Factor) | Radio Immnuassay |
| 40 | D – Dimer | ELFA/ Immunoturbidometry |
| 41 | Homocystine | CMIA |
| 42 | LDH | Biochemical/Spectrophotometry |
| 43 | Leptospira Antibody | EIA/Immunochromatography |
| 44 | Sr.Lipase | Biochemical/Spectrophotometry |
| 45 | Sr. Phosphorus | Biochemical/Spectrophotometry |
| 46 | TB-Gold | EIA |
| 47 | TB-PCR | PCR |
| 48 | Torch Panel | EIA/CMIA/ELFA |
| 49 | Trop T | IC |
| 50 | Urine Microalbumin | IT/B/Spectrophotometry |
| 51 | Cholinesterase | Biochemical/Spectrophotometry |
| 52 | TB-C/S (TB- Culture and Sensitivity) | Automated |
| 53 | UPCR (Urine Protein Cretatine Ratio) | Biochemical/Spectrophotometry |
| 54 | RA Factor Quantitative | Nephlometry |
| 55 | Digoxin Level | CLIA |
| 56 | C. Peptide | CLIA |
| 57 | HIV Elisa | ELISA |
| 58 | CRP Quantitative | CLIA |
| 59 | Immunoglobulin Profile | Nephlometry |
| 60 | Albumin Creatinine Ratio (Urine) | IT/B/Spectrophotometry |
| 61 | HBV DNA Viral Load | PCR/CMIA |
| 62 | HBEAG | CMIA/ Enzyme Immunoassey |
| 63 | Anti HBC | CMIA/ELFA/Enzyme Immunoassey |
| 64 | IL6 | |
| 65 | Sr. ADA | |
| 66 | APLA | |
| 67 | RTPCR | |
| 68 | Antigen test for Covid | |
| 69 | Anti Body Titre | Quantitative |

तरी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागात न होणा-या उपरोक्त तक्त्यातील जवळपास ६९ प्रकारच्या तपासण्या बाहेरील लॅबमधून आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी NABL मान्यताप्राप्त लॅब धारकांकडून तपासण्यांचे निकष व तपासण्याची पध्दती ठरवून एक वर्ष कालावधीसाठी कोटेशनद्वारे तपासण्यांचे दर निश्चित करणेस तसेच रुग्णांच्या सोयीकरीता सर्व प्रकारच्या तपासण्या एकाच लॅबमध्ये व्हाव्यात यासाठी, ज्या लॅबधारकाचे जास्तीत जास्त तपासण्यांकामी निम्नतम दर असतील, त्या लॅबधारकास सर्व तपासण्यांचा कार्यादेश देण्यास मान्यता मिळणेस तसेच कोटेशनप्रक्रिया राबविणेत येऊन, निम्नतम दरधारकास कार्यादेश देईपर्यंत रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता सध्या सदरहू तपासण्यांचे काम करत असलेले मे.कृष्णा डायग्नोस्टीक

प्रा.लि., पुणे यांची सेवा चालू ठेवणेस मंजुरी मिळणेकामी सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर.

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्यकार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

(भानुदास ह.पालवे)
अपर विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(गीता प्रविण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्यकार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय, दि. 06/05/2021

**विषय–श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागात न होणा-या तपासण्या बाहेरील लॅब धारकांकडून आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी कोटेशन मागविणेस मान्यता मिळणेबाबत...**

विषयाचे वाचन केले. त्यावरुन असे दिसून येते की, पूर्वी मे. कृष्णा डायग्नोस्टिक प्रा. लि. पुणे यांना काही तपासण्या करुन घेण्याबाबत कार्यादेश दिलेला होता व तो कालावधी संपुष्टात आलेला आहे. येथे जरुर नमूद करावेसे वाटते की, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे कोटेशन प्रक्रिया राबवून निम्नतम दरधारकास कार्यादेश देईपर्यंत मे. कृष्णा डायग्नोस्टिक प्रा. लि. पुणे यांच्याकडून तपासण्या करुन घेणे प्रस्तावित आहे. मात्र असे करत असतांना सरसकट एक वर्षासाठी मे. कृष्णा डायग्नोस्टिक प्रा. लि. पुणे यांना कार्यादेश देणे योग्य नाही. करिता संस्थान प्रशासनाने कोटेशन प्रक्रिया लवकरात लवकर म्हणजे एका महिन्याचे आंत पूर्ण करावी व निर्णयासाठी तदर्थ समितीसमक्ष विषय आणावा. तसेच ती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आजपासून सुमारे दोन महिन्यांसाठी म्हणजेच **दि. 06 जुलै, 2021 पर्यंत** मे. कृष्णा डायग्नोस्टिक प्रा. लि. पुणे यांच्याकडून प्रस्तावित नमूद केलेल्या तपासण्या फक्त कन्सल्टंट/एम.डी. यांनी सल्ला दिल्यास करुन घेण्यात याव्यात.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 06/05/2021

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि. ०६.०५.२०२१

**विषय : श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागात न होणाऱ्या तपासण्या बाहेरील लॅब धारकाकडून आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी कोटेशन मागविणेस मान्यता मिळणेबाबत. . .**

संस्थान प्रशासनाने वरील विषयाशी अनुसरुन दिलेला प्रस्ताव वाचला. प्रस्तावावरुन असे स्पष्ट होते की, पूर्वी मे. कृष्णा डायग्नोस्टिक प्रा. लि. पुणे यांना काही तपासण्या करुन घेण्याबाबत आदेश दिला होता. परंतू तो कालावधी संपुष्टात आला आहे. विषयामध्ये नमूद असल्याप्रमाणे कोटेशन प्रक्रिया करुन निम्नतम दर धारकास कार्यादेश होईपर्यंत मे. कृष्णा डायग्नोस्टिक प्रा. लि. पुणे यांचेकडून तपासण्या कार्यान्वित ठेवण्यासाठी नमूद केले आहे. परंतू, याबाबत विचार करावयाचा झाल्यास विनंतीप्रमाणे एक वर्षासाठी कार्यान्वित ठेवणे योग्य वाटत नाही. त्यामुळे संस्थान प्रशासनाने कोटेशन प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करुन (लवकर म्हणजेच एक महिन्यामध्ये पूर्ण करावी) व निर्णयासाठी तदर्थ समिती समक्ष विषय मांडण्यात यावा. सदरची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ०६.०७.२०२१ पर्यंत मे. कृष्णा डायग्नोस्टिक प्रा. लि. पुणे यांचेकडून प्रस्तावित नमूद केलेल्या तपासण्या संबंधित अधिकाऱ्यांनी सल्ला दिल्यास करुन घ्याव्यात.

06/05/2021

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि. ०६.०५.२०२१

विषय क्र.- 9/38

142

## मा.तदर्थ (Ad-Hoc) समिती सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर

खरेदी विभाग, श्री साईबाबा हॉस्पिटल

**विषय:- श्री साईनाथ रूग्णालयातील X-ray या विभागाकरीता जुने X-ray Machine परत (Buyback) करून नविन Floor Mounted digital Radiography system with Dual Detector खरेदी करणेबाबत.**

टिपणी,

श्री साईनाथ रूग्णालयातील X-ray या विभागाने मागणीपत्रकान्वये ०१ नग नविन Floor Mounted digital Radiography system with Dual Detector ची मागणी केलेली आहे. X-ray विभागात सध्या असलेले जुने Radiography System (500 M.A. X-ray Machine – II T.V. Double Tube MCH -0435) हे सन २००८ मध्ये रक्कम रू. २२००००/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले आहे. मशिन खरेदी करून १३ वर्ष झालेले असून सदर मशिनवर सरासरी एका वर्षामध्ये २१००० X-ray काढण्यात आलेले आहे. सदर मशिनची Service संपली असल्याबाबत M/s. Siemens Ltd, Mumbai यांनी पत्र दिलेले आहे. त्यामुळे X-ray विभागाने जुने X-ray Machine बायबॅक करून नविन अद्यावत Floor Mounted digital Radiography system with Dual Detector ची मागणी केलेली आहे.सदर मशिनव्दारे पेशंटचे काढण्यात आलेल्या X-ray ची Accuracy चांगली होऊ शकते. मशिन खरेदी केल्यास Cassette ची आवश्यकता लागणार नाही. श्री साईनाथ रूग्णालयात नविन Software आल्यास ओ.पी.डी. मधील डॉक्टरांना रूग्णाचा X-ray हा त्यांच्या ओ.पी.डी. मधील Computer मध्ये पहाता येईल जेणेकरून X-ray Film चा वार्षिक खर्च कमी होईल त्यामुळे सदर विभागाने नविन मशिनची मागणी केलेली आहे. जुन्या X-ray Machine ची दि. ३१/०३/२०२१ अखेर घसारा किंमत रक्कम रू.५२२६५.९८ इतकी येत आहे.

नविन Floor Mounted Digital Radiography system with Dual Detector खरेदीकामी अंदाजे रक्कमेसाठी बायोमेडीकल विभागाने पुरवठाधारकांना ई-मेल केलेले होते. त्यास अनूसरून त्यांनी ई-मेल अन्वये खालीलप्रमाणे दरपत्रक दिलेले आहे-

| Sr. No. | Item Description | Qty. | M/s. Siemens Healthineers, Mumbai | | M/s. Carestream Health India Pvt.Ltd., | | Average Rate Per in Rs. | | Total Amount in Rs.+Warranty 5 year+next 5 year CAMC |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Machine Cost in Rs (5 Years Warranty) | CAMC for Next 5 Years after Warranty Period | Machine Cost in Rs (5 Years Warranty) | CAMC for Next 5 Years after Warranty Period | Machine Cost in Rs. (5 Years Warranty) | CMC Price in Rs. | |
| 1 | Floor Mounted Digital Radiography system with Dual Detector | 1 | 15800000/- | 9128343/- | 13429999.98 | 8644821/- | 14620000/- | 8886582/- | 23506582/- |
| | | | | | | | | Total Amt. in Rs. | 23506582/- |

वरीलप्रमाणे दरानुसार उपरोक्त Floor Mounted Digital Radiography system with Dual Detector (5 Year warranty + next 5 year CAMC) खरेदीकामी रु.२,३५,०६,५८२/- (अक्षरी रक्कम– दोन कोटी पस्तीस लाख सहा हजार पाचशे ब्याऐंशी मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी**– श्री साईनाथ रूग्णालयातील X-ray या विभागाने मागणीपत्रकान्वये ०१ नग नविन Floor Mounted Digital Radiography system with Dual Detector ची मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४/ प्र.क्र. ८२/ भाग – ३/ उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोंबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२. –नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

३) जुन्या X-ray Machine ची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०२१ अखेर किंमत रू.५२२६५.९८ इतकी होत आहे. सदरची रक्कम ही रू.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपुर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार आहे.

४) नविन Floor Mounted Digital Radiography system with Dual Detector खरेदीकामी अंदाजे खर्च हा ५०,००,०००/- पेक्षा जास्त येत असल्यामुळे मा. उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घ्यावी लागणार आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-**

श्री साईनाथ रूग्णालयातील X-ray या विभागाने मागणीपत्रकान्वये ०१ नग नविन Floor Mounted digital Radiography system with Dual Detector ची मागणी केलेली आहे.

X-ray विभागात सध्या असलेले जुने Radiography System (500 M.A. X-ray Machine – II T.V. Double Tube MCH -0435) हे सन २००८ मध्ये रक्कम रू. २२००००/- मात्र रक्कमेत खरेदी केलेले आहे. मशिन खरेदी करून १३ वर्ष झालेले असून मशिनची Service संपली असल्याबाबत M/s. Siemens Ltd, Mumbai यांनी पत्र दिलेले आहे. त्यामुळे X-ray विभागाने जुने X-ray Machine बायबॅक करून नविन अद्यावत Floor Mounted digital Radiography system with Dual Detector ची मागणी केलेली आहे. सदर मशिनव्दारे पेशंटचे काढण्यात आलेल्या X-ray ची Accuracy चांगली होऊ शकते. मशिन खरेदी केल्यास Cassette ची आवश्यकता लागणार नाही. श्री साईनाथ रूग्णालयात नविन Software आल्यास ओ.पी.डी. मधील डॉक्टरांना रूग्णाचा X-ray हा त्यांच्या ओ.पी.डी. मधील Computer मध्ये बघता येईल जेणेकरून X-ray Film चा वार्षिक खर्च कमी होईल त्यामुळे सदर विभागाने नविन मशिनची मागणी केलेली आहे. जुन्या X-ray Machine ची दि. ३१/०३/२०२१ अखेर घसारा किंमत रक्कम रू. ५२२६५.९८ इतकी येत आहे. त्यामुळे त्यांचे मागणीनुसार ०१ नग नविन Floor Mounted Digital Radiography system with Dual Detector खरेदीकामी तदर्थ समितीची मान्यता मिळालेनंतर सदर खर्च हा रू. ५०,००,०००/- पेक्षा जास्त येत असल्यामुळे मा. उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन तसेच जुन्या X-ray Machine ची घसारा किंमत रू.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे खरेदीपुर्वी शासनाची पूर्वमान्यता घेऊन विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस हरकत नाही, असे नम्र मत आहे.

श्री साईनाथ रूग्णालयातील X-ray या विभागाकरीता एक नग नविन अद्ययावत Floor Mounted Digital Radiography system with Dual Detector मशिन विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,३५,०६,५८२/- (अक्षरी रक्कम– दोन कोटी पस्तीस लाख सहा हजार पाचशे ब्याऐंशी मात्र) चे खर्चास तसेच सदरहु खरेदीकामी अंदाजे रक्कम ही रू.५०,००,०००/- पेक्षा जास्त येत असल्यामुळे मा.उच्च न्यायालयाचे,

औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेस, त्याचप्रमाणे सदरहू विभागातील जुन्या X-ray Machine ची घसारा किंमत रू.५०,०००/- पेक्षा जास्त येत असल्यामुळे Buyback करणेकामी शासनाची पूर्वमान्यता घेणेकामीचा प्रस्ताव तदर्थ समितीच्या सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर.

8/5/24

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्यकार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

प्रस्तावात नमुद केलेनुसार, श्री साईनाथ रुग्णालयातील X-ray या विभागाकरीता ०१ नग नविन अद्ययावत Floor Mounted Digital Radiography system with Dual Detector मशिन विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,३५,०६,५८२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहु खरेदी प्रक्रिया राबविणेपुर्वी प्रस्तावित खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता घेणेकामी संस्थान वकिलामार्फत सिव्हील अर्ज दाखल करणेत यावा व मा.खंडपीठाच्या मंजुरीनंतर खरेदी प्रक्रिया राबविणेत यावी. त्याचप्रमाणे सदरहू विभागातील जुने X-ray Machine, Buyback करणेकामी मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांची पूर्वमान्यता घेणेकामी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

फक्त मशीन खुली झाली आहे या कारणाने संस्थानला नेहमीपुरती मार्थीच काही, संस्थान, फक्त एक्सरे काढतो एवढेच नागपुर कमाईची.

(गीता प्रविण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानुदास ह.पालवे) 15/5/2024
अपर विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

8/5/24

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्यकार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि.१२.०५.२०२१

विषय : **श्री साईनाथ रुग्णालयातील x-ray या विभागाकरिता जुने x-ray machine परत (Buyback) करुन न वीन Floor Mounted Digital Radiography System with Dual Detector खरेदी करणेबाबत ...**

प्रस्तावाचे पूर्ण वाचन केले असता संस्थान प्रशासनाने त्यामध्ये कुठेही जुने x-ray machine वापरली जावू शकत नाही याबाबत त्यांचे म्हणणे नमूद केलेले नाही. त्यामुळे केवळ x-ray machine जुने झाले आहे या कारणास्तव सद्य परिस्थितीचा विचार करता नवीन मशीन खरेदी कामी येणारा खर्च हा अनावश्यक वाटतो. त्यामुळे माझेतर्फे सदरचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे.

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि.१२.०५.२०२१

146

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय, दि. 11/05/2021

**विषय–श्री साईनाथ रुग्णालयातील X-ray या विभागाकरिता जुने X-ray Machine परत (Buyback) करुन नवीन Floor Mounted Digital Radiography System with Dual Detector खरेदी करणेबाबत.**

विषयाचे वाचन केले. जुन्या **X-ray Machine** मधून **X-ray** निघत नाहीत किंवा ती वापरता येवू शकत नाही, असे प्रशासनाचे म्हणणे नाही. अशा परिस्थितीत फक्त मशीन जुनी झाली आहे या कारणास्तव संस्थानला नेहमीप्रमाणे आर्थिक आवक नसतांना असा खर्च अनाठायी वाटतो, करिता नामंजूर.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 11/05/2021

विषय क्र.- 9/30 147 123-21

# मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर

श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी

विषय– संस्थानच्या श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात नव्याने सुरु होणा-या RTPCR Lab साठी Consumable मटेरियल खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत...

टिपणी,

सध्या जगभरात थैमान घातलेल्या कोरोना विषाणु (कोविड १९) ची साथ परत वाढत असुन सदरच्या विषाणूचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत चाललेला आहे. त्यानुसार पुर्वी सदर साथीचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता श्री साईबाबा संस्थानमार्फत साईधर्मशाळा येथील इमारती अधिगृहीत करुन खालील प्रमाणे राखीव ठेवण्यात आल्या होत्या. तदनंतर संदर्भ क्र.०१ अन्वये दि.१४/०४/२०२१ पासुन श्री साईबाबा रुग्णालय Additional Covid Hospital म्हणुन घोषित करणेत आले.

| अ.नं | इमारत क्र | दिनांक पासुन सुरु | कोविड अधिगृहण इमारत |
|---|---|---|---|
| ०१ | इमारत B | ०४/०६/२०२० | Dedicated Covid Halth Center (DCHC) |
| ०२ | इमारत E | ११/०९/२०२० | Dedicated Covid Hospital (DCH) |
| ०३ | इमारत F | ०४/०६/२०२० | Corona Care Center (CCC) |
| ०४ | श्री साईबाबा हॉस्पीटल | १५/०४/२०२१ | Additional Covid Hospital |

सदर सेंटरमध्ये मार्च २०२१ अखेर एकुण ५००४ रुग्णांवर कोविड उपचार करण्यात आले. तसेच सध्या कोविड रुग्णांचे वाढते प्रमाण बघता श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईनाथ रुग्णालयात आर.टी.पी.सी.आर लॅब उभारणी कामी संदर्भ क्र. ०२ अन्वये सिव्हील अप्लीकेशन नं. ४५९८/२०२१, दि. २०/०४/२०२१ मा. उच्च न्यायालय खंडपीठ, मुंबई खंडपीठ औरंगाबाद मार्फत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहे.

## FINAL ORDER

4. The another prayer made by the applicant / petitioner is that, full fledged Covid testing lab be directed to be installed at the Sansthan Rugnalaya. Mr. Bajaj, the learned counsel on instructions submits that, for establishment of the lab about Rs.1.05Cr. expenses would be required. Some of the staff of Sansthan has already been deputed for training to conduct RT-PCR test. It is also further submitted that, the said lab would also be useful for carrying out other blood and pathological tests.

## ORDER

B. The Sansthan is permitted to install the laboratory for the purpose of Covid– 19 testing and spent approximately an amount of Rs.1.05Cr. The laboratory shall also be meant for other pathological tests along with Covid– 19 test. The said laboratory shall be installed at Sainath Rugnalaya Shirdi. The Sansthan shall also comply with all the legal requirements including seeking permission from competent authorities for establishment of laboratory.

Consumables List-

| Sr. no. | Name of Item & Specification | Type of purchase | Pack size | Unit | Approx. rate Rs. (including all tax) | Req. for 30,000 test | Cost for 30,000 test (Including All Taxes) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Magmax Viral/ Pathogen Nucleic Acid Isolation kit | CS, Parabhani | 2000 Test | 1 | 180,000 | 15 | 27,00,000 |
| 2 | 10 ml TP \| step MMX NO ROX EA | CS, Parabhani | 1600 Test | 1 | 96,000 | 19 | 18,24,000 |
| 3 | TAQPATH RTPCR COVID 19-1000 RXN Each | CS, Parabhani | 1000 Test | 1 | 220,000 | 30 | 66,00,000 |
| 4 | Deep Well 96 Plate-SO Pcs Each | CS, Parabhani | 960 Test | 1 | 25,000 | 33 | 8,25,000 |
| 5 | KF 96 Tip com for DW Magnates 10x10 Pcs/ Box | CS, Parabhani | 9600 Test | 1 | 53,000 | 4 | 2,12,000 |
| 6 | KF 96 Plate (200 ul)-48/ CS case of 48 | CS, Parabhani | 4800 Test | 1 | 15,000 | 7 | 1,05,000 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | microAmp Optical 96 Well Reaction Plate (0.2 ml) | CS, Parabhani | 10 Plate | 1 | 7,310 | 40 | 2,92,400 |
| 8 | microAmp Optical Adhesive film | CS, Parabhani | 100 Films | 1 | 22,700 | 4 | 90,800 |
| 9 | Tipone 10ul Graduated Filter Tip Sterile | CS, Parabhani | 960 Tips | 1 | 7,434 | 30 | 2,23,020 |
| 10 | Tipone 10/ 20ul Graduated Filter Tip Sterile | CS, Parabhani | 960 Tips | 1 | 7,434 | 40 | 2,97,360 |
| 11 | Tipone 200ul Graduated Filter Tip Sterite | CS, Parabhani | 960 Tips | 1 | 7,788 | 50 | 3,89,400 |
| 12 | Tipone 1000ul Graduated Filter Tip Sterite | CS, Parabhani | 960 Tips | 1 | 8,024 | 50 | 4,01,200 |
| 13 | Filter Paper Sheet Muel | CS, Gadchiroli | 1 sheet | 1 | 1,888 | 2 | 3,776 |
| 14 | 0.2 ml Thin wall PCR Tube, Domed Shielded Cap | CS, Gadchiroli | 1000 | 1 | 6,726 | 2 | 13,452 |
| 15 | 0.2 ml Thin wall 8 Strip PCR Tube, Indivisual Shielded Cap | CS, Gadchiroli | 120 Tips | 1 | 16,520 | 3 | 49,560 |
| 16 | 1.5 ml Tubeone Miorocentrifuge tubes | CS, Gadchiroli | 500 tubes | 1 | 1,062 | 5 | 5,310 |
| 17 | 2 ml Tubeone Microcentrifuge tubes | CS, Gadchiroli | 500 tubes | 1 | 3,776 | 5 | 18,880 |
| 18 | Cryovials 2 ml | CS, Parabhani | 1000 vials | 1 | 14,000 | 30 | 4,20,000 |
| 19 | Cryo Box 100 place or 81 place | CS, Parabhani | 1 box | 1 | 885 | 300 | 2,65,500 |
| 20 | Cryo Tags 38x19 mm | CS, Parabhani | 1000 tags | 1 | 3,400 | 30 | 1,02,000 |
| 21 | PCR Cooler Pink | CS, Gadchiroli | 1 unit | 1 | 8,614 | 2 | 17,228 |
| 22 | PCR Cooler BLUE | CS, Gadchiroli | 1 unit | 1 | 8,614 | 2 | 17,228 |
| 23 | Isotherm systems Starter set for 1.5/ 2 ml Tubes | CS, Gadchiroli | 1 unit | 1 | 18,000 | 1 | 18,000 |
| 24 | Nuclease free Water | CS, Parabhani | 300 ml | 1 | 3,422 | 50 | 1,71,100 |
| 25 | Molecular Grade Absolute Alcohol 99.99% | CS, Parabhani | 500 ml | 1 | 500 | 250 | 1,25,000 |
| 26 | Rack for 1.5/ 2 ml Centrifuge Tube Rack | CS, Gadchiroli | 1 rack | 1 | 472 | 5 | 2,360 |
| 27 | 15 ml Tube Rack | CS, Gadchiroli | 1 rack | 1 | 450 | 20 | 9,000 |
| 28 | Parafilm 4"x 125' | CS, Gadchiroli | 1 role | 1 | 2,230 | 10 | 22,300 |
| 29 | 15 ml conical tubes | CS, Gadchiroli | 100 tubes | 1 | 1,500 | 2 | 3,000 |
| 30 | 50 ml conical tubes | CS, Gadchiroli | 100 tubes | 1 | 1,800 | 2 | 3,600 |
| 31 | Reagent Reservoir | CS, Gadchiroli | 10 | 1 | 1,500 | 2 | 3,000 |
| 32 | 50 ml bottle | CS, Gadchiroli | 100 | 1 | 2,200 | 2 | 4,400 |
| 33 | 100 mo bottle | CS, Gadchiroli | 12 | 1 | 500 | 2 | 1,000 |
| 34 | VTM kits | --- | | 1 | 24 | 4,5000 | 10,80,000 |
| 35 | Vaccine Carrier | --- | | 1 | 2,000 | 10 | 20,000 |
| | | | | | | Total- | 1,63,35,874 |

प्रति दिवस ५०० चाचणी नुसार एकुण ०२ महिन्यांच्या कालावधी करीता (एकुण ३०,००० चाचणी करीता) आवश्यक असणा-या Consumables Material साठी रु.१,६३,३५,८७४/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

<u>खरेदीसाठीची तरतूद-</u> उद्योग उर्जा आणि कामगार विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/ प्रक्र८२/ भाग-३/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ मधील नियम क्र.४.२, "दरपत्रक प्रक्रिया व ४.५ तातडीचा आदेश खरेदी प्रक्रिया" नुसार खरेदीचे मुल्य कितीही असले तरी, तातडीच्या खरेदी आदेशाच्या प्रक्रियेमध्ये दरपत्रकासाठी विनंती, या पध्दतीचा स्विकार देकार मागविणेसाठी करण्यात येईल. स्पर्धा होण्यासाठी कमीत-कमी ३ दरपत्रकाची आवश्यकता असेल.

प्रस्ताव-

(१) प्रति दिवस ५०० चाचणी नुसार एकुण ०२ महिन्यांच्या कालावधीकरीता आवश्यक असणा-या Consumables साठी अंदाजे रु.१,६३,३५,८७४/- (अक्षरी रुपये एक कोटी त्रैसष्ठ लाख पस्तीस हजार आठशे चौ-याहत्तर) मात्र खर्चास मान्यता असावी. त्यामुळे सदरच्या खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यास संस्थान वकिलामार्फत स्वतंत्र सिव्हील अर्ज दाखल करणेस मान्यता असावी.

तसेच Terms & Conditions मध्ये On Site Work, Add on Modules, Devices and API's Required for Integration, Customization/ Integration with 3rd Party, Travel, Lodging and Boarding, 3rd Party License Application, PACS System इ. करीता अतिरीक्त खर्च संस्थानला करावा लागेल असे नमुद केलेले आहे. परंतु प्रत्यक्षात खर्चाचा तपशिल मात्र दिलेला नाही.

संस्थानचे दोन्ही रुग्णालयांमध्ये संगणक प्रणाली वार्षिक भाडेतत्वावर कार्यान्वित करणेकामी प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणेस तसेच याकामी येणा-या अंदाजे खर्च रक्कम रु. 3,97,00,000/- (कर विरहीत) खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे समोर चक्रीय सादर केलेल्या प्रस्तावावर मा. अध्यक्ष सो. तदर्थ समिती यांनी सदरचा विषय तदर्थ समितीच्या सभेसमोर ठेवावा विषयाचे सविस्तर प्रेझेंटेशन करावे, असे निर्देश दिलेले होते.

त्यानुसार दि. 09/03/2021 रोजी दोन्ही हॉस्पिटलचे प्रेझेंटेशन तसेच HMIS संगणकीय प्रणाली विकसीत करणारे कंपनीचे प्रतिनीधी यांचे समवेत अहमदनगर येथे समक्ष प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अध्यक्ष तदर्थ समिती व सहा. धर्मादाय आयुक्त, सदस्य तदर्थ समिती यांना तसेच दि. 25/03/2021 रोजी नाशिक येथे अप्पर विभागीय आयुक्त, सदस्य तदर्थ समिती यांना सॉफ्टवेअर कंपनीच्या प्रतिनीधींचे समवेत नविन HMIS संगणकीय प्रणालीचे प्रेझेंटेशन व सध्या कार्यान्वित असलेल्या HMIS संगणकीय प्रणालीचे व Hardware बाबतचे प्रेझेंटेशन दाखविण्यात आलेले आहे.

त्यानुसार सदरचा विषय मा. तदर्थ समितीचे सभेसमोर चक्रीय पद्धतीने सादर करण्याची कार्यवाही सुरु असताना दि. 20/05/2021 रोजी इकडील विभागास प्राप्त झालेल्या विधी विभागाचे पत्राअन्वये खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

"श्री. संजय भास्करराव काळे यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे पी.आय.एल.नं.86/2018 दाखल केलेले असून, सदर पी.आय.एल.मध्ये आता नविन सिव्हील ॲप्लीकेशन दाखल केलेले आहे.

त्यामध्ये, श्री. संजय भास्करराव काळे यांनी मा. कोर्टास विनंती केली श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयामध्ये विविध नोंदी (उदा. ऑपरेशन थियटर चार्जेस, सर्जरी चार्जेस, ॲनास्थेसिया चार्जेस) घेणेकामी अद्यावत संगणक प्रणाली नोही, त्यामुळे सदर नोंदी रजिष्टरला नोंदविणेत येतात. त्यामुळे संस्थानला अद्यावत संगणक प्रणाली खरेदी करणेचे आदेश देणेत यावे, अशी मा. कोर्टास विनंती केलेली आहे. त्यानुसार मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद मध्ये आय.पी.एल.नं.86/2018 मध्ये सिव्हील मध्ये मुद्दा क्र. 18 मध्ये खालीलप्रमाणे निर्देशीत आहे.

A. Allow the Civil Application.

B. Direct the Saibaba Sansthan to purchase software/hardware to deal with the issues of patient details, medicine stocks, inventory ect in the Hospitals of the Sansthan.

C. Grant any other relief in the interest of the public at large which the Applicant has not prayed.

Scanned with CamScanner

मागणी -

संस्थानचे ॲड. अनिल बजाज यांनी पत्राद्वारे शपथपत्र तातडीने दाखल करणेस व सदर प्रकरणाची दि. 25/05/2021 रोजीची तारीख कळविलेली आहे. यामुळे दोन्ही हॉस्पिटलमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त संगणकीय प्रणाली खरेदी करून कार्यान्वित करणेकामी येणाऱ्या अंदाजीत खर्चास मान्यता मिळणेस्तव सदरच्या प्रस्तावास मान्यता देता येईल, असे मत आहे.

विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय –

प्रस्ताविकेत नमुद केलेप्रमाणे सद्यस्थितीत साईबाबा हॉस्पिटल येथे सन २००६ मध्ये कार्यान्वित केलेली व सध्या कालबाहय झालेली संगणकीय प्रणाली वापरात आहे. सदरची प्रणाली कार्यान्वित असलेली संगणके, सर्व्हर, नेटवर्क व इतर अनुषंगीक साहित्यही कालबाह्य झालेली आहेत. तसेच, साईनाथ हॉस्पिटल येथे संगणकीय प्रणाली कार्यान्वित नसल्यामुळे सर्व कामकाज हे मानविय पद्धतीने सुरु आहे.

संस्थानचे दोन्ही रुग्णालयांचा अवाका व दिवसेंदिवस रुग्णांची वाढणारी संख्या याचा विचार करता उपचार घेणा-या रुग्णांना आवश्यक उपचार व अनुषंगीक सुविधा वेळेवर मिळणेकामी तसेच प्रशासकीय कामकाजात अचुकता, सुसुत्रता व कामकाज अधिक गतीमान होणेचे दृष्टीने दोन्ही रुग्णालयांकरीता अद्ययावत संगणकीय प्रणाली कार्यान्वित करणे अत्यावश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे, संस्थानचे दोन्ही रुग्णालयांमध्ये संगणक प्रणाली कार्यान्वित करणेकामी प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणेस तसेच याकामी येणा-या अंदाजे खर्च रक्कम रु. 3,97,00,000/- (कर विरहीत) खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे समोर चक्रीय पद्धतीने सादर.

(कान्हूराज बगाटे भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

---

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, संस्थानचे दोन्ही रुग्णालयांमध्ये अद्ययावत तंत्रज्ञान युक्त संगणक प्रणाली कार्यान्वित करणे अत्यावश्यक आहे. सबब, संस्थानचे दोन्ही रुग्णालयांमध्ये अद्ययावत HMIS ही संगणकीय प्रणाली कार्यान्वित करणेकामी प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणेस, तसेच याकामी येणा-या अंदाजे खर्च रक्कम रु. 3,97,00,000/- (कर विरहीत) खर्चास मान्यता देण्यात आली.

संगणकीय प्रणाली खरेदी (कार्यान्वित) करणेकामी प्रचलित Hardware, तसेच Networking बाबत प्रस्तावामध्ये उल्लेख नाही त्यामुळे याबाबतचा विचार करून परिपूर्ण प्रस्ताव नियमीत सभेमध्ये सादर करावा असे मत आहे
Pay
२४/५/२०२१

(गीता प्रविण बनकर)
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानुदास ह. पालवे)
अप्पर विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(कान्हूराज बगाटे. भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

Scanned with CamScanner

विषय क्र.- 9/80

## मा.तदर्थ (Ad-Hoc) समिती सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर

श्री साईबाबा हॉस्पिटल

**विषय:- शिर्डी येथे जम्बो कोविड सेंटर चालू करणेबाबत.**

टिपणी,

विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.सासंवि-१०२१/ प्र.क्र.८५/ का.१६, दि.०४.०५.२०२१ अन्वये, तसेच मा.खा.श्री.सदाशिव लोखंडे, सदस्य, लोकसभा शिर्डी मतदारसंघ यांनी दि.२६.०४.२०२१ रोजीचे पत्राद्वारे मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना, "वरील विषयान्वये विनंती की, माझ्या शिर्डी लोकसभा मतदार संघात व आमच्या अहमदनगर जिल्यात कोरोना बाधित रूग्णांची मोठी संख्या आहे, देशातील पहिल्या दहा कोरोना बाधित जिल्हयामध्ये अहमदनगर जिल्हयाचा समावेश आहे, अनेक रूग्ण बेड उपलब्ध नसल्यामुळे मृत्यु पावलेले आहे. महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा असल्यामुळे तालुक्याच्या ठिकाणावरून जिल्हयाच्या ठिकाणी येण्यासाठी बरेच अंतर पार करावे लागते, त्यात तालुका ते जिल्हा मध्यंतरी ऑक्सिजन व व्हेन्टीलेटर ची सुविधा नसल्यामुळे अनेक रूग्ण रस्त्यातच गतप्राण होत आहेत.

जिल्हयातील शिर्डी हे अतिशय महत्वपूर्ण ठिकाण असून जिल्हयातील अकोले, संगमनेर, कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, राहुरी, व नेवासा हे सात तालुके व नाशिक जिल्हयातील सिन्नर तालुका व येवला त्याचप्रमाणे औरंगाबाद जिल्हयातील वैजापूर तालुका व गंगापुर तालुका शिर्डी लगत आहेत.

शिर्डी येथे साईबाबा विश्वस्त व्यवस्था मंडळ यांचे सहाशे बेडचे सर्व सोयींनी युक्त हॉस्पिटल असून शिर्डी येथील भक्त निवासातील अत्याधुनिक अशा ३ हजार रूम उपलब्ध आहेत. त्याच बरोबर शिर्डी शहरातील अतिशय प्रशस्थ अशा १० हजार हॉटेल्स रूम तसेच शेती महामंडळाची देखील जागा उपलब्ध आहेत, शिर्डी देवस्थानाकडे दररोज १ लाख लोकांची जेवणाची व्यवस्था होऊ शकते, त्यासाठी देवस्थानाकडे नियमित कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे. शिर्डी येथे २ हजार ऑक्सिजन बेड व २०० आय.सी.यु. बेडचे जम्बो कोविड सेंटर चालू केल्यास जिल्हा रूग्णालयावरील ताण कमी होऊन कोविड रूग्णांना चांगले उपचार होऊ शकतात. शिर्डी देवस्थानाकडे दररोज १ लाख लोकांची जेवणाची व्यवस्था होऊ शकते.

बी.के.सी. मुंबई येथील जम्बो कोविड सेंटरचे प्रमुख डॉ. ढेरे शिर्डी परिसरातील असल्यामुळे ते सदरकामी मार्गदर्शन व मदत करण्यास तयार आहेत. त्यांच्या अनुभवाचा फायदा निश्चितच होईल. श्री साईबाबा विशस्त मंडळ शिर्डी, अनेक साईभक्त असणारे उद्योगपती परिसरातील डॉक्टर्स व एन.जी.ओ. हे जम्बो कोविड शिर्डी येथे चालु करण्यास मदतनीस तयार आहेत.

तरी जिल्हयातील कोरोनाची भयावह परिस्थिती लक्षात घेता कोरोना रूग्णांच्या उपचारासाठी व सामान्य नागरिकांच्या उत्तम आरोग्यासाठी तातडीने शिर्डी येथे जम्बो कोविड सेंटर उभे करण्यासाठी परवानगी देण्यात यावी," अशी विनंती केलेली आहे.

मा.खा.श्री.सदाशिव लोखंडे, सदस्य, लोकसभा शिर्डी मतदारसंघ यांचे जा.क्र.उंबरगाव/ ४६/ २०२१, दि.२७.०४.२०२१ रोजीचे पत्रान्वये, "अहमदनगर जिल्हयात रुग्णसंख्या दिवसेंदिवस हजारोंच्या संख्येने वाढत असल्यामुळे जम्बो कोविड सेंटर शिर्डी येथे तत्काळ चालू करणे आवश्यक आहे. श्री साईबाबा विश्वस्व्यवस्था यांचे साईआश्रम १ व साईआश्रम २ येथे ४२०० बेड उपलब्ध आहेत, पहिल्या फेजमध्ये साईआश्रम २ याठिकाणी १००० ऑक्सिजन बेड, २०० आय.सी.यु. बेड तत्काळ मंजूर करण्यात यावे.

दुस-या फेजमध्ये साईआश्रम १ याठिकाणी १००० ऑक्सिजन बेड व २००० बेडचे कोविड केअर सेंटर चालू करता येईल. शिर्डी येथे साईबाबा विश्वस्त व्यवस्थेचे सहाशे बेडचे हॉस्पिटल आहे. तसेच जेवणासाठी भोजनगृह व कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे. नुकताच जिल्हा प्रशासनाने ८०० बेडचे कोविड सेंटर शिर्डी येथे चालू करण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी राज्य शासनाकडे पाठवलेला आहे.

अशा प्रकारे साईबाबा विश्वस्तव्यवस्थेचे साईआश्रम १ व साईआश्रम २ येथे ४२०० बेडचे जम्बो कोविड सेंटर तीन ऑक्सिजन जनरेशन प्लॅंटसह चालू करण्यास तात्काळ मंजुरी देण्यात यावी," अशी विनंती केलेली आहे.

विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.सासंवि-१०२१/ प्र.क्र.८५/ का.१६, दि.०४.०५.२०२१ अन्वये, "अहमदनगर जिल्हयात कोरोना बाधीत रूग्णांची मोठी संख्या आहे. शिर्डी येथे साईबाबा विश्वस्तव्यवस्थेचे ६०० बेडचे सर्व सोयींपी युक्त हॉस्पिटल असून भक्तनिवासातील अत्याधुनिक अशा ३००० रूम्स उपलब्ध आहेत. शिर्डी शहरात अतिशय प्रशस्त अशा दहा हजार हॉटेल रूम्स आहेत. तसेच शेती महामंडळाची देखील जागा उपलब्ध आहे. जिल्हयातील कोरोनाची भयावह परिस्थिती लक्षात घेता कोरोना रूग्णांच्या उपचारासाठी व सामान्य नागरिकांच्या उत्तम आरोग्यासाठी तातडीने शिर्डी येथे जम्बो कोविड सेंटर उभे करण्यासाठी परवानगी दयावी अशी विनंती सदर निवेदनात केली आहे.

सदर निवेदन तदर्थ समितीपुढे ठेऊन निवेदनाच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार कोणत्याही बाबीस तदर्थ समितीने मान्यता दिल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार व आवश्यक त्या परवानग्या घेऊन योग्य तो कायदेशीर प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा," अशी विनंती केलेली आहे.

त्यास अनुसरुन उपरोक्त संदर्भ क्र.५ अन्वये, जा.नं.एसएसएस/ वशी-मुकाअस्वीय/ ४०७/ २०२१, दि.०४.०५.२०२१ रोजीचे पत्रान्वये, "कोविड – १९ च्या पार्श्वभुमीवर सध्या शिर्डी आणि परिसरात असलेली रुग्णसंख्या विचारात घेता सद्यस्थितीत असलेली हॉस्पिटलची यंत्रणा अत्यंत अपूरी आहे. सध्या श्री साईबाबा संस्थानकडून खालीलप्रमाणे व्यवस्था करण्यात येत आहे.

१) CCC चालविण्यात येत असुन तेथे ३०० इतके रुग्णांची व्यवस्था करण्यात येत आहे.

२) DCHC चालविण्यात येत असुन तेथे ३०० इतके रुग्णांची व्यवस्था करण्यात येत आहे.

३) DCH १४० इतके रुग्ण आहेत.

कोविड – १९ ची तिसरी लाटेची भाकित करण्यात आलेले आहे. त्याचा विचार करता संदर्भिय पत्राचे अनुषंगाने मा. खासदार श्री सदाशिव लोखंडे (सदस्य, शिर्डी लोकसभा) यांचेकडून श्री साईबाबा संस्थानमध्ये प्रथम फेज मध्ये १००० बेड ऑक्सीजन सुविधा व २०० ICU बेड तात्काळ मंजूरीची त्यांनी उपयुक्त सुचना केलेली आहे. तसेच दुस-या फेजमध्ये २००० बेड व १००० बेड ऑक्सीजन सुविधासह त्यांचे सुचनांचे अनुषंगाने सदर व्यवस्था करण्यासाठी मात्र केंद्रशासनाचे पत्र Circular No.E-4/2020-MPLADS (Pt) Ministry of Statistics and Programme Implementation MPLADS Division दि.३०/०४/२०२१ अनुसार खासदार निधी खर्च करण्यासाठी मात्र शासकिय दवाखाने असण्याची अट आहे.

तथापी मा. खासदार यांचे विनंती नुसार सकारात्मक कार्यवाही करणेसाठी संस्थानकडे वरील प्रयोजनार्थ असलेले Infrastructure विचारात घेता वरील केंद्राचे पत्राचे अनुषंगाने शिर्डी संस्थानला याचा अपवाद करणे आवश्यक आहे, असे मत आहे.

तरी वरील बाबत उपाययोजना कार्यान्वित होण्यासाठी केंद्र शासनाचे वरील अट शिथिल केल्यास सदर व्यवस्था करता येईल. यामुळे शिर्डी परिसरातील व अहमदनगर जिल्ह्यातील दुष्काळी भागात गरीब व गरजू रुग्णांना सहाय्य होणार आहे. तरी याबाबत प्रथम फेजमध्ये १००० बेड (ऑक्सीजन व २०० ICU बेड, तसेच दुस-या फेजमध्ये १००० ऑक्सीजन बेड व २००० बेडचे कोव्हिड केअर सेंटर) चालू करणेबाबत मा विधी व न्याय विभागाकडून कार्यावाहीस्तव यथोचित आदेश होणेस विनंती आहे," असे मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविणेत आलेले आहे.

तसेच उपरोक्त जा.नं.एसएसएस/ वशी-मुकाअस्वीय/ ४१७/ २०२१, दि.०५.०५.२०२१ रोजीचे पत्रान्वये, "उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांचे पत्र क्र. क्र. कावि/ आ.व्य - ०४/१८४/२०२१ दि.२९/०४/२०२१ रोजीचे पत्रानुसार शिर्डी येथे विषयांकित २००० बेडचे ऑक्सीजन २००० बेडचे कोविड केअर सेंटर व २०० आय.सी. यु. बेड असे एकूण ४२०० बेउचे जम्बो कोविड केअर सेंटरची मागणी मा. खा. श्री सदाशिव लोखंडे, सदस्य, लोकसभा शिर्डी मतदार संघ यांनी केलेली आहे.

उक्त अनुषंगाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे सद्यस्थितीत खालीलप्रमाणे CCC, DCHC, व DCH कार्यान्वित करणेत आलेले आहे.

१) CCC चालविण्यात येत असुन तेथे ३०० इतके रुग्णांची व्यवस्था करण्यात येत आहे.

२) DCHC चालविण्यात येत असुन तेथे ३०० इतके रुग्णांची व्यवस्था करण्यात येत आहे.

३) DCH १४० इतके रुग्ण आहेत.

तसेच उत्तम मागणीचे अनुषंगाने शिर्डी उपविभागीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.कावि/ आ.व्य - ०४/१८४/२०२१ दि.२९/०४/२०२१ यांचेही पत्र लक्ष वेधण्यात येत आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे सुविधा व मनुष्यबळ प्राधान्याने उपलब्ध करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | पदाचे नाव | पदाची संख्या |
|---|---|---|
| १ | एम.डी.फिजीशियन / M.D. Physian | 20 |
| २ | एम.बी.बी.एस. / M.B.B.S. | 60 |
| ३ | बी.ए.एम.एस. / B.A.M.S. / Other | 60 |
| ४ | नर्सिंग स्टाफ / Nursing Staff | 120 |
| ५ | वार्ड बॉईज / Ward Boyes | 80 |
| ६ | सफाई कर्मचारी / Sweeper Boy | 60 |

वरील सुविधा व मनुष्यबळ उपलब्ध झाल्यास संस्थानकडील असलेली भक्तनिवासाची याकामी उपलब्धता करण्यात कोणतीही अडचण नाही. तसेच यासाठी आवश्यक असणारी मुलभूत व्यवस्था जसे पाणीपुरवठा, वीज, स्वच्छता कामी संस्थान निश्चितपणे उचित कार्यवाही करेल तथापी लागणारे तांत्रिक आवश्यक मनुष्यबळ, औषधे, अतिरिक्त ऑक्सीजन यंत्रणा उपलब्ध करणे याबबत मात्र शासनाकडून उचित व्यवस्था व्हावी असे अपेक्षा आहे," असे मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविलेले आहे.

या उपरोक्त जा.नं.एसएसएस/ वशी-मुकाअस्वीय/ ४१७/ २०२१, दि.०५.०५.२०२१ रोजीचे पत्रास शासनाची मान्यता मिळेपर्यंत, जम्बो कोविड सेंटर उभारणीकामी शासन मान्यतेस व मा.तदर्थ समितीचे मान्यतेस अधीन राहून खालीलप्रमाणे एकूण १२०० रुग्णांच्या बेडची व्यवस्था श्री साईआश्रम फेज २ येथे साईधर्मशाळा इमारत ए, बी, ई व एफ या इमारतीमध्ये करणे शक्य आहे.

त्यानुसार श्री साईआश्रम फेज २ येथे साईधर्मशाळा इमारत ए, बी, ई व एफ या इमारतीमध्ये प्रत्येक मजल्यावर एकूण ०८ हॉल असून एका इमारतीमध्ये असे ०४ मजले मिळून एकूण ३२ हॉल उपलब्ध आहेत. प्रत्येक इमारतीमध्ये तळमजल्यावरील एक हॉल वैद्यकिय कर्मचारी/ नर्सिंग स्टाफ करीता राखीव ठेवल्यास एका इमारतीमध्ये एकूण ३१ हॉल रुग्णांसाठी वापरता येतील. तसेच प्रत्येक हॉलमध्ये १० रुग्णांच्या बेडची व्यवस्था केल्यास एका इमारतीमध्ये एकूण ३०० बेड असे चार इमारती मिळून एकूण १२०० बेडची व्यवस्था होऊ शकते. त्यासाठी याकामीच्या संस्थानमधील रुग्णालये विभागास प्रामुख्याने खालील ०३ बाबींवर येणारा प्राथमिक अपेक्षीत खर्च खालीलप्रमाणे-

(१) ऑक्सिजन पुरवठा-

| अ.नं. | तपशील | प्रति नग अंदाजे खर्च रु. | अंदाजे एकूण खर्च रु. |
|---|---|---|---|
| A | श्री साईआश्रम फेज २ येथे साईधर्मशाळा इमारत ए, बी, ई व एफ या इमारतीमध्ये प्रत्येक हॉलमध्ये १० रुग्णांसाठी याप्रमाणे प्रति इमारत ३०० ऑक्सिजन आऊटलेट, पाईपलाईन तसेच प्रत्येक इमारतीसाठी ०१ मॅनीफोल्ड याप्रमाणे (एक वर्षाकरिता) | २५,००,०००/- | १,००,००,०००/- (एकूण १२०० रुग्णांसाठी १२०० ऑक्सिजन आऊटलेट, पाईपलाईन व ०४ मॅनीफोल्ड करिता) |
| B | ऑक्सिजन पुरवठयाकरिता ऑक्सिजन जनरेटर ०२ नग (क्षमता १८०० एलपीएम) एक वर्षाकरिता | रु.३,८०,००,०००/- | रु.७,६०,००,०००/- (२ नगांकरिता) |
| C | पर्यायी ऑक्सिजन पुरवठयाकरिता ०२ नग Liquid Medical Oxygen Plant 13KL(पाच वर्षाकरिता) | रु.१,२५,२२,१३६/- | रु.२,५०,४४,२७२/- (२ नगांकरिता) |
| | | एकूण रु. | ११,१०,४४,२७२/- |

(२) Injection, Tablet, Disinfectant, Syrup. Laboratory material, Consumable& Surgical material-

| अ.नं. | तपशील | अंदाजे एकूण खर्च रु. |
|---|---|---|
| 1 | साईआश्रम येथील जम्बो कोविड सेंटरमधील ॲडमिट रुग्णांकरिता Injection, Tablet, Disinfectant, Syrup. Laboratory इ. | रु.४०,००,००,०००/- प्रति माह ३००० रुग्ण याप्रमाणे १२ महिन्यांकरिता (३०००x १२ महिने |

| | | |
|---|---|---|
| | साहित्य खरेदीकामी | =३६००० रुग्णांकरिता) |
| 2 | साईआश्रम येथील जम्बो कोविड सेंटरमधील ॲडमिट रुग्णांकरिता Consumable & Surgical material | रु.१७,०३,०९,०००/- प्रति माह ३००० रुग्ण याप्रमाणे १२ महिन्यांकरिता (३०००x १२ महिने = ३६००० रुग्णांकरिता) |
| ३ | साईआश्रम येथील जम्बो कोविड सेंटर व श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील डीसीएचसी करिता कंझुमेबल मटेरियल खरेदीकामी | रु.१,३७,३१,८३२/- |
| | एकूण रु. | ५८,४०,४०,८३२/- |

(३) मनुष्यबळ-

| तपशिल | बेड संख्या | फिजिशियन | भुलतज्ञ | बालरोगतज्ञ | सिस्टर इन्चार्ज | स्टाफ नर्स | प्लांटेक्नीशियन | बायो.इंजि. | वॉर्ड बॉय वॉर्डआया | स्वच्छता कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चार बिल्डींगमध्ये (१६ मजले) २५६ हॉल | १२८० | २४ | १५ | १५ | १२८ | ८०० | १६ | ८ | ५४६ | ९६ |

उपरोक्त मनुष्यबळ हे चार शिफ्ट करीता नमुद असुन ७ दिवस कोव्हीडड्युटी केल्यानंतर ३ दिवस क्वारंटाईन कालावधीकरीता कर्मचारी अतिरीक्त लागतीलते वरील तक्त्यात नमुद नाहीत. १२०० बेडकरीता किमान २ मेट्रन व ४ सहाय्यकमेट्रनची आवश्यकता आहे.याकामी अंदाजे रु.४२,००,००,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तसेच आणखी पर्याय म्हणून मनुष्यबळाकरिता मुंबई व ठाणे येथे जम्बो कोविड सेंटर करिता वापरण्यात येत असलेल्या कार्यपध्दतीचा देखील आऊटसोर्स पध्दतीने राबविणेबाबतचा पर्याय विचाराधीन आहे. त्यासाठी तात्विक मान्यता देण्यात यावी.

| अ.नं. | तपशील | वार्षिक खर्च एकूण रु. |
|---|---|---|
| १ | ऑक्सिजन पुरवठा | ११,१०,४४,२७२/- |
| २ | औषधे व कंझुमेबल मटेरीयल | ५८,४०,४०,८३२/- |
| ३ | मनुष्यबळ | ४८,००,००,०००/- |
| | एकूण खर्च रु. | ११७,५०,८५,१०४/- |

सदर खर्च एकत्रितपणे व अंदाजे दर्शविण्यात आलेला असून त्यात वाढ किंवा घट ही होऊ शकते. तरी ज्याप्रमाणे मा.खंडपीठामधील सिव्हील अर्ज नं.४५९८/२०२१ वरील दिनांक २०.०४.२०२१ रोजीचे आदेशानुसार RTPCR लॅबकरिता व सिव्हील अर्ज नं.४६८५/२०२१ वरील दिनांक २०.०४.२०२१ रोजीचे आदेशानुसार ऑक्सिजन जनरेटरकरिता तातडीने मंजुरी मिळालेली आहे. त्याचप्रमाणे सध्याची वाढती कोविड रुग्णांची संख्या पाहता, सदर प्रस्तावास देखील तातडीची बाब म्हणून उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करणेस व येणा-या अंदाजे रु.११७,५०,८५,१०४/- मात्रचे खर्चास तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्यानुसार पुरवठा आदेश देणेस मंजुरी मिळणेस्तव, त्याचप्रमाणे या येणा-या खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणेसाठी सिव्हील अर्ज दाखल करणेकामी सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर.

9/5/2021

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्यकार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

(गीता प्रविण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानुदास ह.पालवे)
अपर विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

9/5/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्यकार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय, दि. 12/05/2021

विषय – **शिर्डी येथे जम्बो कोव्हिड सेंटर चालू करणेबाबत...**

सर्व टिपणीचे वाचन केले. त्यावरुन खालील बाबी मा. उच्च न्यायालयासमक्ष सिव्हील ॲप्लिकेशनमध्ये स्पष्ट करणे गरजेचे आहे:-

(1) सर्वप्रथम हे विचारात घेणे गरजेचे आहे की, संस्थान मानवतेच्या दृष्टीकोनातून ज्या काही गोष्टी शक्य आहेत त्या करत असते. कोव्हिड-19 महामारी सुरु झाल्यानंतर संस्थानने मुख्यमंत्री सहायता निधीत भरभक्कम अशी 51 कोटी रुपयांची मदत मा. उच्च न्यायालयाच्या परवानगीने दिलेली आहे.

(2) नुकतेच दिनांक 05 मार्च 2021 रोजीचे पत्रान्वये मा. उप मुख्यमंत्री यांनी केलेल्या सुचनेनुसार व विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी पाठविलेल्या प्रस्तावानुसार शिर्डी विमानतळासाठी संस्थानमार्फत 100 कोटींचा प्रस्ताव तदर्थ समितीने मान्य करुन पाठविलेला आहे. तत्पूर्वीही शिर्डी विमानतळासाठी 50 कोटी रुपयांचा निधी शासनाला देण्यात आलेला आहे. जम्बो कोव्हिड सेंटरचा प्रस्ताव व त्यासाठी लागणा-या खर्चाचा विचार करता विमानतळासाठी दिलेल्या व आता मंजूर केलेल्या निधीची बाब मा. उच्च न्यायालयासमक्ष संस्थान प्रशासनाने यासाठी करणा-या सिव्हील ॲप्लिकेशनमध्ये स्पष्ट करावी.

(3) अभिलेखावरुन असे दिसून येते की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीच विधी व न्याय विभागाला पत्र लिहून जम्बो कोव्हिड सेंटर सुरु करण्याबाबत संस्थान प्रशासनाला आदेश द्यावेत असे पत्र दिलेले आहे. असे करत असतांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तदर्थ समिती समक्ष कुठल्याही बाबी प्रस्ताव स्वरुपात ठेवलेल्या नाहीत.

(4) मुळातच असा प्रस्ताव राज्य शासनाला देणे, ही धोरणात्मक बाब आहे. त्याचप्रमाणे असे धोरण जर राबवायचे असल्यास त्याला लागणा-या निधीचा विचार करता मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या पि.आय.एल. क्र. 152/2018, 76/2018 व पि.आय.एल. क्र. 18/2011 मधील निर्णयांचा विचार करता सर्व कार्यवाही ही तदर्थ समितीला विश्वासात न घेता केल्याचे दिसून येते. त्यामुळे मूळ प्रस्तावच जर तदर्थ समितीच्या मान्यतेने झालेला नाही तर अशा परिस्थितीत त्याचे काय परिणाम आहेत ही बाब मा. उच्च न्यायालयाचे समक्ष ठेवून त्यावर संस्थान प्रशासनाने निर्णय घेणे अपेक्षित आहे. ही बाब संस्थान प्रशासनाने यासाठी दाखल करणार असलेल्या सिव्हील ॲप्लिकेशन मध्ये जरुर नमूद करावी.

(5) जम्बो कोव्हिड सेंटरसाठी जे मनुष्यबळ तसेच वैद्यकीय कर्मचारी म्हणजेच दोन मेट्रन व चार सहायक मेट्रनची आवश्यकता आहे, त्याचा अपेक्षित खर्च दाखवला आहे. वरील परिस्थितीत सद्या कंत्राटी कर्मचा-यांचा कशा पध्दतीने जम्बो कोव्हिड सेंटरच्या कामी समावेश/वापर करता येईल याचा अभ्यास केलेला नाही. तो अभ्यासपूर्वक भाग मा. उच्च न्यायालयासमक्ष सिव्हील ॲप्लिकेशनमध्ये स्पष्ट करावा. प्रस्तावातील पान क्र. 3 वरील मनुष्यबळाची पदांची संख्या आणि पान क्र. 4 वर 'मनुष्यबळ' या शिर्षाखाली दाखवलेली पदांची संख्या यामध्ये तफावत आहे. त्याचप्रमाणे त्याबाबचा अपेक्षित खर्च पान क्र. 3 वर 42 कोटी रुपये व शेवटी पान क्र. 4 वर 48कोटी रुपये असा दर्शविल्याचे दिसून येतो, जो अनाकलनीय आहे.

(6) सद्या कार्यरत असलेले कंत्राटी कर्मचारी यांचा वापर जम्बो कोव्हिड सेंटरमध्ये कसा करणार आहेत, हे स्पष्ट नमूद न करता प्रस्तावाचे पान क्र.4 वर मनुष्यबळासाठी 96 स्वच्छता कर्मचारी प्रस्तावीत केलेले आहेत, जे केवळ अनाकलनीय आहे. जेव्हा 3000 रुम्सचे भक्तनिवास भक्तांसाठी उपयोगात येणार नाही तेव्हा त्या प्रमाणात

सध्याचे मनुष्यबळ उपयोगात येणार नाही. अशा परिस्थितीत 96 अतिरिक्त मनुष्यबळ मा. उच्च न्यायालयासमक्ष स्पष्ट करणे गरजेचे आहे.

(7) जम्बो कोव्हिड सेंटर हे संस्थानच्या सुमारे 3000 रुम्समध्ये जर करावयाचे आहे तर कोव्हिड-19 महामारी ओसरल्यानंतर सर्व सोयीसुविधा निर्माण केलेल्या सदरच्या रुम्स कशा पध्दतीने वापरल्या जातील किंवा त्यावर केलेला खर्च/त्यातील वस्तू इतर ठिकाणी वापरता येतील का इत्यादि बाबी स्पष्ट केलेल्या नाहीत, त्या सर्व बाबी मा. उच्च न्यायालयासमक्ष सिव्हील ॲप्लिकेशनमध्ये स्पष्ट कराव्यात.

(8) संस्थान प्रशासनाने दिनांक 16/04/2021 रोजी 13 किलो लिटर क्षमतेचा **Liquid Medical Oxygen Gas Plant** भाडेतत्वावर स्थापीत करण्याबाबतचा तसेच दि. 17/04/2021 रोजी 1200 **LPM** क्षमतेचा **Oxygen Generation Plant** कोव्हिड-19 महामारीचे दरम्यान स्थापीत करण्याबाबतचा विषय तदर्थ समिती समक्ष आणला होता. त्यानंतर सदर विषयावर भर देण्यात आला नाही. मात्र जम्बो कोव्हिड सेंटरचा प्रस्ताव विचारात घेत असतांना जेव्हा सरसकट सुमारे **11,10,44,272/-** रुपये खर्च करुन **Oxygen Generation Plant** टाकणे, ज्याचा कोव्हिड-19 महामारीचा प्रभाव ओसरल्यानंतर कदाचित पूर्णपणे वापर होवू शकणार नाही तेव्हा अशा परिस्थितीत भाडेतत्वावर ऑक्सिजन पुरवठयाचा विचार मा. उच्च न्यायालयासमक्ष सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करतांना करावा.

(9) गेल्या दिड वर्षात तदर्थ समितीचे कॉम करत असतांना असे लक्षात आले आहे की, श्री साईबाबा रुग्णालयाच्या लगत साईनाथ माध्यमिक विद्यालयाची जी इमारत अस्तित्वात आहे ती भाडेतत्वावर दिलेली आहे. सद्य स्थितीत कुठल्याही शाळा सुरु नाहीत व नजिकच्या भविष्यात सुरु होण्याची शक्यताही वाटत नाही. अशा परिस्थितीत संबंधीत विभागांची मान्यता घेवून सदर शाळेची इमारत रुग्णालयामध्ये परावर्तित होवू शकते.

अशा परिस्थितीत हा सुध्दा विचार संस्थान प्रशासनाने करणे आवश्यक आहे. तसेच शाळेसाठी दुसरी इमारत प्रस्तावीत होवू शकते. सद्याच्या प्रस्तावात असलेला प्रस्तावीत ऑक्सिजन जनरेशन प्लॅन्ट सदर वाढीव हॉस्पीटलच्या सोयी सुविधांसाठी वापरता येवू शकतो.

(10) साईआश्रम-1 हे भक्तनिवास 1536 खोल्यांचे आहे. मुख्यत्वे करुन जेव्हा या खोल्यांमध्ये ब-याचशा सोयी सुविधा आज मितीला उपलब्ध आहेत. कोव्हिड-19 च्या मार्गदर्शक सुचनांनुसार सदरची संपूर्ण इमारत शासनाची मान्यता घेऊन रुग्णालयात परावर्तीत करता येवू शकते. संस्थान प्रशासनाने आणलेल्या प्रस्तावात नमूद केले आहे की, शिर्डीमध्ये बरीच हॉटेल्स आहेत, ज्यामध्ये 10000 हॉटेल रुम्स आहेत. अशा परिस्थितीत संस्थानने सद्याच्या कोव्हिड-19 महामारीचे काळात सरसकट 1536 रुम्सचे भक्तनिवास रुग्णालयात परावर्तीत केल्यास त्याचा पुढेही वापरत होवू शकतो. जम्बो कोव्हिड सेंटर तात्पुरत्या स्वरुपात सुरु करुन पैशाचा अपव्यव होवू शकतो. याचीही स्पष्टता मा. उच्च न्यायालयासमक्ष दाखल करावयाच्या सिव्हील ॲप्लिकेशन मध्ये करावी.

(11) येथे जरुर नमूद करावेसे वाटते की, नुकतेच दिनांक 20 एप्रिल, 2021 रोजी मा. उच्च न्यायालयाने सिव्हील ॲप्लिकेशन नं. 4598 सन 2021 मध्ये राज्य शासनाला योग्य तो आवश्यक औषधपुरवठा करण्याबाबत आदेशित केलेले होते. अशा परिस्थितीत संस्थान प्रशासन जर एवढया मोठया प्रमाणावर जम्बो कोव्हिड सेंटरची उभारणी करण्याची तयारी दर्शवित आहे तर अशा परिस्थितीत जेव्हा देशविदेशातून शासनास निरनिराळ्या औषधांच्या व इतर साधनसामुग्रीच्या स्वरुपात मदत मिळत आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून औषधे, साधनसामुग्री इत्यादि बाबत काय मदत मिळू शकते

याचाही विचार करुन त्याचा समावेश मा. उच्च न्यायालयासमक्ष सिव्हल ॲप्लिकेशन दाखल करतांना करावा.

(12) येथे आणखी असे नमूद करावेसे वाटते की, मार्च 2020 पासून संस्थानची आर्थिक आवक जवळजवळ बंदच आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. अशा परिस्थितीत आज रोजी संस्थानचा हॉस्पीटलचा खर्च, विविध विभागांसाठीचा येणारा खर्च, एकूण कर्मचारी वर्गाचे पगाराचा खर्च वगैरे असा सर्व मार्गाने होणारा खर्च किती आहे, प्रस्तावीत बांधकामे, निळवंडे धरणातून पाण्याची योजना इत्यादिसाठीचा खर्च, आज संस्थानच्या तिजोरीत किती रुपये शिल्लक आहेत, संस्थानच्या विविध उपक्रमांसाठीचा अंदाजित खर्च किती आहे, असे जम्बो कोव्हिड सेंटर चालविण्यासाठी कुठल्या तज्ञ संस्थेची/व्यक्तींची मदत घेतली आहे/घेत आहात, संस्थानचे हॉस्पीटल विभागाकडे नियमित पदावर किती वरिष्ठ अधिकारी आहेत, किती तज्ञ वैद्यकीय अधिकारी आहेत त्यांचे अनुभवाचा व्यासंग किती आहे, जास्तीचा वैद्यकीय कर्मचारी वर्ग कुठल्या मार्गाने व कशा स्वरुपात उपलब्ध करणार आहात, त्यासाठीचा आकृतीबंध कसा, किती कालावधीसाठी मंजूर करुन घेणार आहात, या सर्व बाबी मा. न्यायालयासमक्ष सिव्हील ॲप्लिकेशन मध्ये स्पष्ट करण्यात याव्यात.

(13) संस्थान प्रशासनाला प्राप्त झालेल्या विविध अर्जांवरुन भोजनगृहात सुमारे एक लाख लोकांच्या भोजनाची व्यवस्था होवू शकते असे प्रस्तावात नमूद केलेले आहे. मात्र प्रशासनाने त्याबाबत प्रस्तावात स्पष्टता केलेली नाही. तसेच असे जेवण द्यावयाचे असल्यास त्याबाबतच्या खर्चाचा तपशील दिलेला नाही. असे जेवण किती दर आकारुन द्यावयाचे याबाबतही स्पष्टता नाही. जी स्पष्टता मा. उच्च न्यायालयासमक्ष सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करतांना करावी.

(14) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राज्य शासनाला प्रस्ताव देताना किंवा आता तदर्थ समिती समक्ष असा प्रस्ताव आणतांना संस्थानची सद्याची आर्थिक परिस्थिती निदर्शनास आणून दिलेली नाही. संस्थान प्रशासनाकडे फिक्सड कॉरपस फंडस किती आहेत, त्यावर येणारे व्याज किती आहे, त्यातून संस्थान कुठल्या बाबींवर भविष्यात खर्च करु शकते तसेच सद्य स्थितीत श्रींचे मंदिर सुरु नसतांना संस्थान प्रशासनाचा रोजचा खर्च, कर्मचा-यांचे पगार, देखभालीवरील खर्च, दोन्ही हॉस्पीटलसाठीचा येणारा खर्च या सर्व बाबींवर येणारा खर्च किती हे स्पष्ट होणे गरजेचे आहे.

(15) कोव्हिड-19 महामारी ही कदाचित नजिकच्या भविष्यात संपणारी नाही. अशा परिस्थितीत प्रस्तावीत बाबींवर अंमलबजावणी केली व महामारी सुमारे एक ते दिड वर्ष पुढे चालू राहिली तर अशा परिस्थितीत संस्थान प्रशासनाचा आर्थिक ताळमेळ काय असेल याचा सुतराम अभ्यास संस्थान प्रशासनाने केलेला दिसून येत नाही. असा अभ्यास मा. उच्च न्यायालयासमक्ष दाखल करणे गरजेचे आहे.

वरील परिस्थितीत, वरील सर्व बाबी मा. उच्च न्यायालयासमक्ष सिव्हील ॲप्लिकेशन करतांना स्पष्ट करण्याच्या अधीन राहून मंजूर.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 12/05/2021

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि. १४.०५.२०२१

**विषय : शिर्डी येथे जम्बो कोव्हिड सेंटर चालू करणेबाबत ...**

सर्व विषयाचे बारकाईने अवलोकन केले असता काही मुददे प्राधान्याने स्पष्ट होणे आवश्यक वाटते. मला येथे असे नमूद करणे आवश्यक वाटते की, संस्थानने मानवतेच्या दृष्टिकोनातून विचार करुन कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव सुरु झाल्यानंतर मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये ५१ कोटी रुपयांची मदत मा. उच्च न्यायालयाच्या परवानगीने दिलेली आहे. सदरच्या विषयाचा विचार करावयाचा झाल्यास संबंधित सन्मानीय मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी परस्पर विधी व न्याय विभागाला पत्र लिहून जम्बो कोव्हीड सेंटर सुरु करण्याबाबत संस्थान प्रशासनाला आदेश व्हावेत असे नमूद केले आहे. परंतू त्या बाबतीत पहावयाचे झाल्यास मा. उच्च न्यायालय यांनी धोरणात्मक निर्णय घेत असतांना तसा प्रस्ताव प्रथमत: तदर्थ समितीसमक्ष ठेवणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्यामुळे सदरचा प्रस्ताव शासनाला पाठवितांना तो तदर्थ समितीच्या मान्यतेने झालेला नाही. त्यामुळे ही बाब देखील मा. उच्च न्यायालयासमक्ष स्पष्ट करणे आवश्यक आहे.

एकंदरीत तदर्थ समिती कार्य करत असतांना खूप मोठया अश्या प्रस्तावांची मान्यता झालेली आहे. यामध्ये नमूद करणे आवश्यक म्हणजे शिर्डी विमानतळासाठी ५० कोटी रुपयांचा निधी शासनाला देण्यात आला, शिर्डी विमानतळासाठी संस्थानमार्फत १०० कोटी रुपयांचा प्रस्ताव तदर्थ समितीने मान्य करुन पाठविला आहे, संस्थान हे सद्यस्थितीमध्ये देखील साईनाथ रुग्णालय हे पूर्ण चॅरिटेबल तत्त्वांवर चालविते त्यामुळे त्याचा देखील विचार करणे आवश्यक आहे. तसेच, सद्यपरिस्थितीचा विचार करावयाचा झाल्यास संस्थान प्रशासनाची आर्थीक आवक मार्च-२०२० म्हणजेच कोरोना प्रादुर्भावापासुन अंशत: सुरु आहे. अश्या परिस्थितीमध्ये संस्थान प्रशासनासाठी हॉस्पीटल, विविध विभाग, कर्मचारी वर्गाचे पगार पूर्वीपासून मंजुरीस असलेल्या प्रस्तावाचे बांधकाम, निळवंडे पाणी योजना, नुकतेच मंजूर

केलेले मोठमोठे प्रस्ताव व त्याची पूर्तता याचा विचार करता संस्थानच्या तिजोरीमध्ये शिल्लक असणा-या रक्कमेचा आणि होवू घातलेल्या या सर्व खर्चाबाबतचा विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयासमक्ष जम्बो कोव्हीड सेंटर सुरु करण्यात येण्यासाठीच्या प्रस्तावामध्ये वरील सर्व बाबींचे स्पष्टीकरण करणे फारच आवश्यक वाटते.

तसेच, जम्बो कोव्हीड सेंटरचा प्रस्ताव विचारात घेता संस्थानची आर्थीक आवक आणि कोव्हीड-१९ ची महामारी यांची सांगड घालणे देखील आवश्यक आहे कारण कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव तज्ज्ञांच्या मते भविष्यात लवकर संपुष्टात येईल असे नाही. त्यामुळे या गोष्टींचा समन्वय साधणे प्राथमिकदुष्ट्या गरजेचे आहे आणि ही बाब मा. उच्च न्यायालयासमक्ष योग्यरित्या स्पष्ट करणेदेखील तितकेच गरजेचे आहे. त्यामुळे येणाऱ्या सर्व खर्चाचा विचार करता मा. उच्च न्यायालयासमक्ष वरील नमुद सर्व बाबी योग्यरित्या स्पष्ट करण्याच्या अधीन राहुन मंजूर.

14/05/2021

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि.१४.०५.२०२१

विषय क्र.- ७ / ४९



## मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर

श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी

**विषय:- १० लिटर क्षमतेचे ५५०० नग Oxygen Concentrator Machine खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

टिपणी,

विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे कार्यालयाकडील क्र.कोरोना- २०२१/ साशा.३/ १४९९३, जा.क्र.६७१०, दि.०७.०५.२०२१ रोजीचे पत्रान्वये, "कोविड-१९ या विषाणूच्या प्रसारामुळे संपुर्ण देशात मोठया प्रमाणात प्रादुर्भाव झालेला असून नाशिक विभागातील सर्व जिल्हयात रुगणसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे नाशिक विभागातील सर्व शासकीय व खाजगी रुग्णालयातील रुग्ण मोठया प्रमाणात दाखल होत आहेत. यापैकी ब-याच रुग्णांना ऑक्सिजन बेड व व्हॅटिलेटरची आवश्यकता पडते. त्यामुळे लिक्विड ऑक्सिजनद्वारे मिळणारा पुरवठा कमी पडत असून भविष्यात रुग्णांची वाढती संख्या व ऑक्सिजनची गरज लक्षात घेता नाशिक विभागातील शासकीय रुग्णालयांमध्ये विशेषतः तालुकास्तरीय कोविड सेंटरसाठी अत्यावश्यक असलेल्या ऑक्सिजनची गरज भाविण्याकरिता Oxygen Concentrators मिळवणे अनिवार्य झाले आहे.

आपणास विनंती करण्यात येते की, आपले संस्थानातर्फे किमान ५००० Oxygen Concentrators (१० लिटर क्षमतेचे) नाशिक विभागासाठी उपलब्ध करुन द्यावेत. आपणाकडून प्राप्त Oxygen Concentrators नाशिक विभागातील पाचही जिल्हयातील शासकीय रुग्णालयांमध्ये कोविड सेंटरसाठी आवश्यकतेनुसार तातडीने पाठविण्यात येतील." असे कळविलेले आहे.

सध्या कोरोना या संसर्गजन्य आजाराने भारतासह जगभरामध्ये थैमान घातलेले असून याच पार्श्वभूमीवर वरील पत्राच्या अनुशंगाने मा.मुख्यकार्यकारी अधिकारी सो. व मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेमध्ये झालेल्या चर्चेस अनुसरुन ५००० नग Oxygen Concentrator Machine श्री साईबाबा संस्थानमार्फत खरेदी करणेबाबतचे निर्देश प्राप्त झालेले आहेत. तसेच साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथे ५०० नग Oxygen Concentrator Machine आवश्यक असल्याबाबत वैद्यकिय संचालक व वैद्यकिय अधिक्षीका यांनी सुचविले आहे. सध्या दोन्ही रुग्णालयांमध्ये ऑक्सीजन पुरवठयाकरीता एकच पर्याय उपलब्ध आहे. त्यासाठी भविष्यातील कोविड रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता आणखी एखादा पर्याय उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार संस्थानचे दोन्ही हॉस्पीटलकरीता ५०० Oxygen Concentrator Machine खरेदी करणे आवश्यक आहे.

सदरचे १० लिटर क्षमतेचे ५५०० नग Oxygen Concentrator Machine खरेदीकामी अंदाजे खर्च निश्चित करणेसाठी काही पुरवठाधारकांकडून ई-मेलद्वारे दरपत्रके मागविले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दरपत्रके सादर केलेली आहेत.

| Companies name | Model | Rate per nos. (Includive of all taxes) | Total amount Rs |
|---|---|---|---|
| BPL Healthcare, Mumbai | OXY10NEOD | Rs 1,34,400/- | 73,92,00,000/- |
| GenWorks Health Pvt. Ltd., Benglore | SANRAI | Rs 1,40,000/- | 77,00,00,000/- |
| Kaashi Visweshwara Minerals Pvt. Ltd., | --- | Rs 1,20,000/- | 66,00,00,000/- |
| Average Cost Rs. | | 1,31,466.66 | 72,30,66,667/- |

उपरोक्त तक्यातील दरांचा विचार करता, 10 ltr capacity चे Oxygen Concentrator Machine साठी प्रति नग रु.१,३१,४६६.६६ मात्र या दराने 10 ltr capacity चे ५५०० नग Oxygen Concentrator Machine खरेदी करणेकामी अंदाजे रु.७२,३०,६६,६६७/- (अक्षरी रुपये बहात्तर कोटी तीस लाख सहासष्ट हजार सहाशे सदुसष्ट मात्र) खर्च अपेक्षीत आहे.

**खरेदीसाठीची तरतूद-** उद्योग उर्जा आणि कामगार विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/ प्रक्र८२/ भाग-३/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ मधील नियम क्र.४.२, "दरपत्रक प्रक्रिया व ४.५ तातडीचा आदेश खरेदी प्रक्रिया" नुसार खरेदीचे मुल्य कितीही असले तरी, तातडीच्या खरेदी आदेशाच्या प्रक्रियेमध्ये दरपत्रकासाठी विनंती, या पध्दतीचा स्विकार देकार मागविणेसाठी करण्यात येईल. स्पर्धा होण्यासाठी कमीत-कमी ३ दरपत्रकाची आवश्यकता असेल.

(१) सदरहू खरेदीकामी येणा-या खर्चास मा.तदर्थ समितीची मंजुरी मिळालेनंतर, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील अर्ज दाखल करणेत येऊन, मा.खंडपीठाची परवानगी घेणेस मान्यता मिळावी.

(२) शासकीय खरेदी नियमावलीतील ४.२ व ४.५ नुसार एक आठवडयाची (७ दिवस) मुदत देऊन, संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर व पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे व मंत्रालय प्रसिध्दी विभागामार्फत राज्यस्तरीय (महाराष्ट्र) जास्त खपाच्या दोन वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन 10 ltr capacity चे ५५०० नग Oxygen Concentrator Machine खरेदीकामी सिलबंद दरपत्रके प्राप्त करता येतील, त्यास मान्यता मिळावी.

(३) ५५०० नग Oxygen Concentrator Machine खरेदी करणेकामी अंदाजे रु.७२,३०,६६,६६७/- (अक्षरी रुपये बहात्तर कोटी तीस लाख सहासष्ट हजार सहाशे सदुसष्ट मात्र) चे खर्चास मान्यता मिळावी.

(४) त्यानंतर दरपत्रके घेऊन प्राप्त झालेल्या दरामधून निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देण्यास मान्यता मिळावी.

तरी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे 10 ltr capacity चे ५५०० नग Oxygen Concentrator Machine खरेदी करणेकामी उपरोक्त ०१ ते ०४ मुद्दयास मान्यता मिळणेस्तव सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर.

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान, विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे 10 ltr capacity चे ५५०० नग Oxygen Concentrator Machine खरेदी करणेकामी उपरोक्त ०१ ते ०४ मुद्दयांप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

(गिता प्रविण बनकर)
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानूदास ह.पालवे)
अप्पर विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय, दि. 12/05/2021

**विषय–10 लिटर क्षमतेचे 5500 नग Oxygen Concentrator Machine खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत...**

संपुर्ण विषयाचा अभ्यास केला. मुळातच **Oxygen Concentrator Machines** पर्यायी व्यवस्था या उद्देशाने खरेदी करण्याचे प्रस्तावित केले आहे. टिपणीवरुन असे दिसून येते की, कुठल्याही तज्ञाने 10 लिटर क्षमतेचेच **Oxygen Concentrator** का घ्यावयाचे व 5 लिटर या क्षमतेचे **Oxygen Concentrator** का घ्यावयाचे नाही, याची स्पष्टता नाही. सदर **Oxygen Concentrator Machines** च्या खरेदीनंतर त्यांचे वाटपाबाबत समानतेचा विचार केलेला दिसून येत नाही. हे विसरता कामा नये की, श्री. साईबाबांचे भक्त हे देशविदेशातून येतात. अशा परिस्थितीत समान वाटपाबाबत सर्वसमावेषक विचार मा. उच्च न्यायालयासमक्ष मांडणे गरजेचे आहे.

**Oxygen Concentrator Machines** चे 5500 नगाबाबत सुध्दा फारसी स्पष्टता नाही.

वरील परिस्थितीत वरील बाबी मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लिकेशन करतांना स्पष्ट करण्याच्या अधीन राहून मंजूर.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 12/05/2021

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि. १४.०५.२०२१

विषय : १० लिटर क्षमतेचे ५५०० नग Oxygen Concentrator Machine खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत . . .

विषय वाचला. सदरच्या विषयाच्या अवलोकनावरुन असे स्पष्ट होते की, यातील तज्ज्ञ लोकांनी Oxygen Concentrator Machines १० लिटर क्षमतेचे का घेणे आवश्यक आहे व ५ लिटर क्षमतेचे Oxygen Concentrator Machines का घेवू नये याबाबत कोठेही स्पष्ट कैलेले नाही. संदर्भिय विषयावरुन मा. विभागीय आयुक्त, नाशिक यांचे पत्राचा विचार करता Oxygen Concentrator Machines खरेदी नंतर त्याच्या समान वाटपाबाबत कोठेही अवगत केलेले नाही. परंतू, या बाबींचा विचार करणे खुप महत्त्वाचे आहे. त्यामुळे समान वाटपाबाबत विचार विनिमय करुन मा. उच्च न्यायालयासमक्ष त्या गोष्टी योग्यरित्या मांडणे आवश्यक आहे. तसेच, Oxygen Concentrator Machines च्या नगाबाबत देखील आवश्यक ती स्पष्टता आणलेली नाही. त्यामुळे त्या सर्व बाबी मा. उच्च न्यायालयाच्यासमक्ष सिव्हील ॲप्लीकेशन करते वेळी स्पष्ट करण्याच्या अधीन राहून मंजूर करण्यात येते.

Geeta 14/05/2021

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि. १४.०५.२०२१

ERP No - 133/2021



विषय क्र.- 9/82

# मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर सादर

विभागाचे नाव – ई.डी.पी. विभाग (साईबाबा हॉस्पिटल)

**विषय – दोन्ही हॉस्पिटलमध्ये सुरु असलेल्या Internet सुविधेकरीताचे सध्याचे कार्यान्वित असलेले Firewall Router चे 3 वर्ष कालावधीसाठी License Subscription चे Upgradation करणेस मान्यता मिळणेबाबत...**

प्रास्तावीक –

श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलमध्ये उपचार घेणकामी आलेल्या गरीब व गरजू रुग्णांना तातडीची सेवा देणेसाठी, विविध विभागांमध्ये शासकीय संकेतस्थळांद्वारे करण्यात येणारे ऑनलाईन कामकाज व इतर कामकाज हे इंटरनेट सुविधेद्वारे करण्यात येते.

हॉस्पिटलचे महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, मेडीकल रेकॉर्ड, धर्मदाय आयुक्त चॉरिटी, रेडीओलॉजी, ICTC, NABH, Covid-19 इत्यांदींचे दैनंदिन ऑनलाईन कामकाज करणेकामी 10 MBPS क्षमतेची इंटरनेट सुविधा हॉस्पिटलकरीता उपलब्ध करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने, हॉस्पिटलमधील कार्यरत असलेल्या इंटरनेट सुविधेच्या सुरक्षीततेच्या दृष्टीकोणासाठी Cyberoam कंपनीचे Firewall Router कार्यान्वित करण्यात आलेले आहे. सदरच्या Firewall Router मुळे Internet Bandwidth Management, Automated Failover of Internet Links, Web Application Management, Internet User Wise Management तसेच Radiology विभागाकरीता Static IP Port Forwarding इ. अशा विविध बाबींवर नियंत्रण ठेवता येते.

सदरचे Firewall Router खरेदी करणेकामी दि. 23/05/2014 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. 326 अन्वये मान्यता मिळालेली होती. त्यानुसार No.SSS/SSBH/EDP/ 4012/2015 अन्वये दि. 24/02/2015 रोजी M/s. Racca Infotech, Pvt. Ltd., Nashik या निम्नत्तम पुरवठाधारकास कार्यादेश देण्यात येऊन, त्यांचेकडून Cyberoam कंपनीचे Firewall Router हे 3 वर्ष कालावधीच्या License Subscription सह खरेदी करण्यात आलेले होते.

तद्नंतर, सदरहू Firewall Router च्या License Subscription ची मुदत Statement नुसार दि. 08/04/2018 रोजी संपुष्टात येणार असल्याकारणाने सदच्या Router च्या License Subscription चे पुढील 03 वर्षांकरीता नुतनीकरण करणेकामी दि. 12/03/2018 रोजीच्या टिपणीअन्वये मान्यता घेण्यात आलेली होती.

त्यानुसार, सदरहू License Subscription चे पुढील 03 वर्षांकरीता नुतनीकरण करणेकामी दरपत्रके प्रक्रीया राबविण्यात येऊन, M/s. Ravineel Enterprises, Shirdi या निम्नत्तम पुरवठाधारकास No. SSS/SSBH/EDP/588/2018 दि. 16/04/2018 रोजी कार्यादेश देण्यात आलेला होता. सदरच्या License Subscription ची मुदत Statement नुसार दि. 26/04/2021 रोजी संपुष्टात आलेली आहे.

परंतु, सदरहू firewall Router ची, असलेली Cyberoam ही कंपनी सध्या बंद झालेली असून, सदरची कंपनी ही Sophos या कंपनीने Take Over केलेली असलेबाबतची माहिती दि. 30/03/2021 रोजीच्या ई-मेलअन्वये कंपनीने कळविलेली आहे.

त्यानुसार, उपरोक्त विविध पुरवठाधारकांकडून नविन Firewall Router हे पुढील 3 वर्षांकरीताच्या License Subscription सह नव्याने खरेदी करणेबाबतचे अंदाजीत दर घेण्यात आलेले असून, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे,

| Sr. No. | Product Code | Description | Qty. | Vendor Name | | | Total Average Budgetary Price |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | M/s. Monarch Pune. | M/s. S.B. Electronic Pune. | M/s. Alpha Network & Systems Nashik. | |
| | | | | Exclusive of All Taxes. | | | |
| 1. | FortiGate - 200F - | FG-200F Appliance 18 x GE RJ45 (including 1 x MGMT port, 1 X HA port, 16 x switch ports), 8 x GE SFP slots, 4 x 10GE SFP+ slots, SoC4 and CP9 hardware accelerated. – 24x7 support | 01 | 2,20,411 | 2,42,000 | 1,86,000 | 2,16,137 |

Scanned with CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | FC-10-F200F-950-02-36 | Unified Threat Protection (UTP) (IPS, Advanced Malware Protection, Application Control, Web Filtering, Antispam Service, and 24x7 FortiCare) For 3 Year | | 3,49,511 | 3,65,000 | 2,79,444 | 3,31,318 |
| | - | Installation of Firewall | | - | 75,000 | - | 25000 |
| | | | Total Price - | 5,69,922 | 6,82,000 | 4,65,444 | 5,72,455 |
| | | | | | | Total Price (Exclusive of All Taxes) - | 5,72,455/- |

कोणी हॉस्पिटलकरीता उपरोक्त तपशीलील नमुद Specification प्रमाणे नविन Firewall Router हे पुढील 3 वर्षांकरीताच्या License Subscription सह खरेदी करणेसाठी येणाऱ्या अंदाजीत व त्याकामी ई-निविदा प्रक्रीया राबविणेकामी मान्यता मिळणेसाठ, सदरचा प्रस्ताव चक्रीय पद्धतीने मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करणेकामी दि. 31/03/2021 रोजी मान्यतेसाठ टिपणी सादर करण्यात आलेली होती.

सदर टिपणीवर मा. प्रशासकीय अधिकारी यांनी "सध्याचे उपलब्ध Router ची उपयोगिता काय असेल ते नमुद करा" असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार हॉस्पिटलमध्ये सध्या उपलब्ध असलेल्या Firewall Router ची उपयोगिता खालीलप्रमाणे, असून त्याबाबतचे Details सोबत जोडलेले आहेत.

- Monitor Traffic –

Ability to monitor network traffic and monitor the traffic passing through it. Information traveling through a network is in the form of packets. Data coming in and out of your systems creates opportunities for threats to compromise your operations. Monitoring and analyzing network traffic, firewalls leverage pre-established rules and filters to keep your systems protected. Firewall inspects each of these packets for any hazardous threats. Also can manage your levels of protection based and immediately block threats.

- Protection against Trojans –

Blocks dangerous malware type Trojans. A Trojan silently sits on your computer spying over all the works you do with it. Whatever the information they gather will be sent to a web server. A firewall in this instance will immediately block Trojans before they cause any damages to your system.

- Prevents Hacking –

Unfortunately, the trend of businesses moving more toward digital operations invites thieves and bad actors to do the same. With the rise of data theft and criminals holding systems hostage, firewalls have become even more important, as they prevent hackers from gaining unauthorized access to your data, emails, systems, and more. A firewall can stop a hacker completely or deter them to choose an easier target.

- Access Control –

Firewalls comes with an access policy that can be implemented for certain hosts and services. Some hosts can be exploited with the attackers. So the best in case is to block such hosts from accessing the system. If a user feels that they need protection from these types of unwanted access, this access policy can be enforced.

- Better Privacy –

Privacy is one of the major concerns of a user. By proactively working to keep your data and your customers' data safe, you build an environment of privacy that your clients can trust. Hackers constantly look out for privacy information for getting clues about the user. But by using a firewall many of the services offered by a site such as the domain name service and the finger can be blocked. Hence, the hackers are with no chance of getting privacy details. Additionally firewalls can block the DNS information of the site system. Due to this the names and the IP address will not be visible to the attackers.

- Bandwidth control and monitoring –

Bandwidth control sometimes referred to as traffic shaping is one of the best firewall features. We don't always have unlimited amounts of bandwidth. That means it's vital to take control of the bandwidth we do have available. With a firewall, you can control bandwidth available for sites, applications, and users.

Scanned with CamScanner

- Web filtering –

A web filter firewall is defined as a software program that oversees the data packets that your computer sends and receives. In doing this, it filters any compromising content that has been forbidden or flagged. These rules can be set to stop access to any potentially threatening, unsecure sites. It can also be used to prevent employees accessing certain sites that may reduce productivity (like social networking websites).

- Logging –

Access to logs on a firewall gives you up-to-the-minute information about what is happening on your network. Sought after firewall features include being able to give graphs in real time and show you what vulnerabilities or attacks are happening, etc.

उपरोक्त नमुद असलेल्या अनेक प्रकारच्या उपयोगिता करीता Firewall Router चा वापर करण्यात येतो.

त्याअनुपंगाने, दि. 03/04/2021 रोजीच्या मान्यतेस्तव फेर सादर केलेल्या मंजुर टिपणीअन्वये,- दोन्ही हॉस्पिटलकरीता नविन Firewall Router हे पुढील 3 वर्षांकरीताच्या License Subscription सह खरेदी करणेसाठी येणाऱ्या अंदाजीत एकूण रक्कम रु. 5,72,455/- (कर विरहीत) मात्रच्या खर्चास व त्याकामी ई-निविदा प्रक्रीया राबविणेकामी मान्यता मिळणेस्तव चक्रीय पद्धतीने मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर प्रस्ताव स्वाक्षरीकरीता सादर करण्यात आलेला होता.

**दि. 08/04/2021 रोजीचे पत्राअन्वये -**

सादर केलेल्या प्रस्तावाबाबत मा. अध्यक्ष सो., तदर्थ समिती यांनी Firewall Router बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

"It is clear from the office note that no correspondence is made with Sophos about the liability of Cyberoam as regards extension of license subscription. In addition to their liability towards Cyberoam Company in cases of extension of subscription. This is necessary because every time the Company would get closed and the Trust will be asked to purchase new software. Sansthan to comply."

उपरोक्त अभिप्रायाप्रमाणे ई-मेलअन्वये व दुरध्वनीद्वारे संपर्क साधून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**दि. 10/04/2021 रोजीचे ई-मेलअन्वये -**

Sophos कंपनीचे प्रतिनीधींना सध्याचे Cyberoam कंपनीचे कार्यान्वित असलेल्या Firewall Router Upgrade बाबतचे Details विभागामार्फत कळविण्यात आलेले होते.

**दि. 14/04/2021 रोजीचे प्राप्त ई-मेलअन्वये –**

Cyberoam कंपनीचे कार्यान्वित असलेले Firewall Router चे Upgrade करणेबाबतचे Details मध्ये Sophos या कंपनीने Cyberoam 100iNG साठी Sophos XG330 हे Model दिलेले आहे. तसेच License Upgrade करणेसाठी दि. 31/03/2021 रोजी पर्यंतची मुदत कळविलेली होती.

**दि. 20/04/2021 रोजीचे प्राप्त ई-मेलअन्वये –**

सध्याचे Cyberoam कंपनीचे Firewall Router Upgrade करणेबाबत एप्रिल महिना अखेरपर्यंत मुदत असलेबाबत त्यांनी कळविलेले होते.

**दि. 22/04/2021 रोजीचे प्राप्त ई-मेलअन्वये –**

सध्याचे Cyberoam कंपनीचे कार्यान्वित असलेले Firewall Router Upgrade करणेकामी दि. 15/06/2021 ही तारीख अंतीम असलेबाबत त्यांनी कळविलेले आहे. तसेच, त्यांनी Tender करीता आवश्यक असणारे Specification दिलेले आहेत.

**दि. 23/04/2021 व दि. 28/04/2021 रोजीचे ई-मेलअन्वये -**

सध्याचे कार्यान्वित असलेल्या Firewall Router चे License Subscription पुढील 3 वर्ष कालावधीसाठी Upgradation करणेकामी, विविध पुरवठाधारकाकडून लागणारा अंदाजीत खर्च घेण्यात आलेला असून, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे,

Scanned with CamScanner

| Sr. No. | Product Code | Description | Qty. | Vendor Name | | Total Average Budgetary Price |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | M/s. VIBS Infosol Pvt. Ltd., Pune | M/s. S.B. Electronics, Pune | |
| | | | | Exclusive of All Taxes. | | |
| 1. | XG 330 Appliance | XG 330 rev.2 HW Appliance with 8 GB ports, 2 SFP ports, 2 SFP+ ports, 1 expansion bay for optional FleXi Port module, SSD + Base License (incl. FW, VPN & Wireless) for unlimited users + power cable (NG HW Appliance Free Along with the 3 year FSP under CR Upgrade Promotional Scheme) | 01 | 0 | Free (Till 15th June 2021) | 0 |
| | XNH330*** | XG 330 Subscriptions FullGuard Plus NBW* For 36 Months | | 9,80,168/- | 8,76,150/- | 9,28,159 |
| | | | | Total Price (Exclusive of All Taxes) - | | 9,28,159/- |

- Sophos या कंपनीने Cyberoam कंपनी ही Take Over केलेली असल्याने कंपनीमार्फत सदरचे Firewall Router चे 300 ते 500 Users साठी 3 वर्षांकरीता License Subscription Upgradation करणेकामी उपरोक्त दरपत्रकात नमुद असलेप्रमाणे, अंदाजीत एकूण रक्कम रु. 9,28,159/- (कर विरहीत) मात्रचा खर्च लागणार आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत –

Sophos कंपनीशी पत्रव्यवहार केलेनंतर, दोन्ही हॉस्पिटलकरीताचे सध्याचे Cyberoam कंपनीचे कार्यान्वित असलेल्या Firewall Router चे License Subscription 300 ते 500 Users साठी 3 वर्षांकरीता Upgradation करणेसाठी अंदाजीत एकूण रक्कम रु. 9,28,159/- (कर विरहीत) मात्रचा खर्च दर्शविलेला आहे.

तसेच, यापुर्वी दि. 03/04/2021 रोजीच्या मंजूर टिपणीअन्वये चक्रीय पद्धतीने मान्यतेस्तव सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे, Fortinet कंपनीचे 500 User साठी नविन FortiGate Firewall Router हे 3 वर्षांकरीताच्या License Subscription सह खरेदी करणेसाठी, अंदाजीत एकूण रक्कम रु. 5,72,455/- (कर विरहीत) मात्रचा खर्च दर्शविलेला आहे.

त्यानुसार, Sophos व Fortinet या दोन्ही कंपन्यांचे Technology, Features, Specification व Services हया तुलनात्मकदृष्टया बहुतांशी सारख्याच आहे. तथापी, Cyberoam Firewall Router चे Upgradation करणेसाठी Sophos कंपनीचे विविध पुरवठाधारकांकडून प्राप्त झालेला अंदाजीत खर्च हा जास्त प्रमाणात असल्याचे दिसत आहे.

त्याअनुषंगाने, Sophos व Fortinet या दोन्ही कंपन्यांचे Technology, Features, Specification व Services हया तुलनात्मकदृष्टया बहुतांशी सारख्याच असल्याने, सध्याचे कार्यान्वित असलेल्या Firewall Router चे License Subscription 3 वर्षांकरीता Upgradation करणेसाठीच्या ई-निविदेच्या मसुद्यामध्ये दोन्ही कंपन्यांना समाविष्ट करून त्याकामी ई-निविदा प्रक्रीया राबविता येईल व निम्नत्तम असलेल्या कंपनीस कार्यादेश देता येईल, असे मत आहे.

तसेच, सध्याचे कार्यान्वित असलेल्या Firewall Router चे License Subscription 3 वर्षांकरीता Upgradation करणेसाठी Sophos कंपनीमार्फत प्राप्त झालेल्या अंदाजीत एकूण रक्कम रु. 9,28,159/- (कर विरहीत) मात्रचा खर्च, व यापुर्वी चक्रीय पद्धतीने सादर केलेल्या प्रस्तावामधील Fortinet कंपनीमार्फत नविन Firewall Router हे 3 वर्षांकरीताच्या License Subscription सह खरेदी करणेसाठी दर्शविलेला अंदाजीत एकूण रक्कम रु. 5,72,455/- (कर विरहीत) मात्रचा खर्च, असे या दोन्ही रक्कमेची सरासरी एकूण रक्कम रु. 7,50,307/- अक्षरी – सात लाख पन्नास हजार तीनशे सात (कर विरहीत) मात्रच्या अंदाजीत खर्चास मान्यता देता यईल, असे मत आहे.

Scanned with CamScanner

मागणी -

तरी, उपरोक्त विषयांकीत प्रकरणी हॉस्पिटलमध्ये सध्याचे कार्यान्वित असलेल्या Firewall Router चे License Subscription 3 वर्षांकरीता Upgradation करणेसाठी येणाऱ्या अंदाजीत एकूण रक्कम रु. 7,50,307/- अक्षरी – सात लाख पन्नास हजार तीनशे सात (कर विरहीत) मात्रच्या खर्चास,

तसेच, सदरहूकामी राबविणेत येणाऱ्या ई-निविदेच्या मसुद्यामध्ये Sophos व Fortinet या दोन्ही कंपन्यांना समाविष्ट करण्यात येऊन ई-निविदा प्रक्रीया राबविणेकामी मान्यता मिळणेस्तव, सदरचा प्रस्ताव चक्रीय पद्धतीने मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर.

10/5/24

(कान्हूराज बगाटे भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

---

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, हॉस्पिटलमध्ये सध्याचे कार्यान्वित असलेल्या Firewall Router चे License Subscription 3 वर्षांकरीता Upgradation करणेसाठी येणाऱ्या अंदाजीत एकूण रक्कम रु. 7,50,307/- अक्षरी – सात लाख पन्नास हजार तीनशे सात (कर विरहीत) मात्रच्या खर्चास, तसेच, सदरहूकामी राबविणेत येणाऱ्या ई-निविदेच्या मसुद्यामध्ये Sophos व Fortinet या दोन्ही कंपन्यांना समाविष्ट करण्यात येऊन ई-निविदा प्रक्रीया राबविणेस मान्यता देण्यात आली.

24/05/2024

(गीता प्रविण बनकर)
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानुदास ह. पालवे)
अप्पर विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.
सदस्य, तदर्थ समिती

24/5

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

Scanned with CamScanner

विषय क्र.- 9/83



मा. तदर्थ (Ad. Hoc) समितीचे सभेपुढील विषय

श्री साईनाथ रुग्णालय, शिरडी

टिपणी –

विषय – श्री साईनाथ रुग्णालयामध्ये दि. २९ मार्च ते २ एप्रिल २०२१ या कालावधीत मोफत जयपुर फुट शिबीराचे आयोजन करणेस व येणा-या अंदाजे तीन लाख पन्नास हजार रुपये खर्चास मान्यता मिळणे बाबत...

- **अधिनियम २००४ मधील तरतुद** – कलम १७ (१) व १७ (२) (ण) मानव जातीच्या कल्याण किंवा मानवाला आपतीमध्ये सहाय्य करण्या-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.
- **व्यवस्थापन समिती ठराव** – नवीन प्रस्ताव
- **प्रास्ताविक** – श्री साईबाबांच्या शिकवणुकीस अनुसरुन गरीब व गरजु रुग्णांची सेवा हींच ईश्वर सेवा या अनुषंगाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी व महावीर विकलांग सहाय्यता समिती, जयपुर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री साईनाथ रुग्णालयात अपंग भगिनी व बांधवांकरीता दि. २९, ३०, ३१ मार्च व ०१, ०२ एप्रिल २०२१ रोजी मोफत जयपुर फुट शिबीराचे आयोजन करण्याचे मानस आहे.

कृत्रिम पाय रोपण शिबीरामध्ये शिरडी व शिरडी परिसरातील गरीब व गरजु अपंग रुग्णांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. कृत्रिम पाय रोपण करण्यासाठी खाजगी रुग्णालयात सुमारे रु. १५ ते २० हजार खर्च आकाराला जातो. सदरहु शिबीरामध्ये किमान २०० ते ३०० रुग्णांना लाभ मिळेल असा अंदाज आहे. सदर शिबीरामध्ये दाखल झालेल्या रुग्णांची योग्य ती चाचणी करण्यात येणार असुन त्यानंतर निवड करण्यात आलेल्या पाय नसलेल्या रुग्णांना त्यांच्या पायाचे माप घेऊन कृत्रिम पाय बसविण्यात येणार आहेत.

मोफत जयपुर फुट शिबीराच्या अनुषंगाने खालील विभागामार्फत कार्यवाही होणे तसेच अनुषंगीक खर्चास मान्यात मिळणे आवश्यक आहे.

| अ.नं | विभाग | विभगामार्फत करावयाचे कामाचा तपशिल | कामाचे दिनांक | अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | बांधकाम विभाग | ३) शिबीर नियोजित जागी प्रत्यक्ष पाहणी करुन जयपुर फुट करिता वर्कशॉप, स्टोअर रुम, तपासणी कक्ष, प्रतिक्षा कक्ष अशा रुम बनवुन देणे.<br>४) मंडप, मंडपमध्ये कारपेट, स्टेज व कनातची व्यवस्था करणेत यावी. | २९/०३/२०२१ ते ०२/०४/२०२१ | रु.५०,०००/- |
| ०२ | जनसंपर्क विभाग श्री साईबाबा हॉस्पीटल | वृत्तपत्र व वृत्तवाहीनीवर जयपुर फुट शिबीराची प्रसिध्दी करुन गरजु रुग्णांना सहभागी होणेकामी आवाहन करणे. | २९/०३/२०२१ पुर्व | रु. १०,०००/- |
| ०३ | विघुत विभाग | शिबीरस्थळी मंडपामध्ये आवश्यकतेनुसार इलेक्ट्रीक पॉईंट तसेच १० नग स्टॅड फॅनची व्यवस्था करणेत यावी. | २९/०३/२०२१ ते ०२/०४/२०२१ | - |
| ०४ | कॅटीन विभाग | शिबीरामध्ये मोफत आवश्यकतेनुसार रुग्णांसाठी दिवसभरात वेळोवेळी २०० कप चहा व येणा-या मान्यवर तथा डॉक्टर्स व कारागीर यांच्यासाठी खारे व गोड असे ०६ नग बिस्कीट बॉक्स, व ३० बॉक्स बिस्लेरी पाणी मोफत पुरविण्यात यावे. | २९/०३/२०२१ ते ०२/०४/२०२१ | रु.१०,०००/- |
| ०५ | ध्वनीक्षेपण विभाग | ३) शिबीरस्थळी ध्वनीक्षेपण विभागामार्फत रुग्णांना सुचना देणेकामी साऊंड सिस्टीमची व्यवस्था करणेत यावी.<br>४) शिबीराची ऑडीओक्लीप तयार करुन शिरडी लगत १०० कि.मी. परिसरात वाहनाव्दारे प्रसिध्दी करणेकामी कर्मचारी तैनात ठेवुन प्रसिद्धी करणे. | २९/०३/२०२१ ते ०२/०४/२०२१<br>२२/०३/२०२१ ते २८/०३/२०२१ | - |

(पान क्र. ०२)

| अ.नं | विभाग | विभागामार्फत करावयाचे कामाचा तपशिल | कामाचे दिनांक | अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| ०६ | सी.सी.टी.व्ही. विभाग | शिबीरस्थळी सि.सि.टी.व्ही. विभागाकडुन शिबीर उद्घाटन समारंभ वेळी चित्रिकरणसाठी फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग व्यवस्था करणेत यावी. तसेच संस्थानच्या सर्व टि.व्ही. वर सदर शिबीराचे जाहितरातकामी प्रसिद्धी करावी. | शिबीर उध्दाटन समारंभ प्रसंगी | रु.१०,०००/- |
| ०७ | वाहन विभाग | ३) मागणी प्रमाणे शिबीरात सहभागी होणा-या प्रतिनिधींना ने-आण करणेकामी आवश्यकतेप्रमाणे चार चाकी गाडीची व्यवस्था करणेत यावी.<br>४) तसेच शिबीर कार्यक्रम प्रसिध्द करणेकामी शिरडी व शिरडी परिसर भोवतालचे १०० कि.मी. संस्थान वाहन पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी. | २९/०३/२०२१ ते ०२/०४/२०२१<br>२२/०३/२०२१ ते २८/०३/२०२१ | रु.३०,०००/- |
| ०८ | व्दारावती भक्तनिवास | शिबीराकरीता येणा-या २० – ३० तंत्रज्ञ व डॉक्टर्स यांच्याकरीता १० ए.सी. रुमची व्यवस्था मोफत करण्यात यावी. | २८/०३/२०२१ ते ०३/०४/२०२१ | रु.७०,०००/- |
| ०९ | साई प्रसाद निवासस्थान | शिबीरकाळात येणा-या रुग्ण व रुग्णाच्या नातेवाईकांसाठी बसस्थानक वरील सर्व रुम तथा हॉल्ची व्यवस्था मोफत करण्यात यावी. | २८/०३/२०२१ ते ०३/०४/२०२१ | रु.२०,०००/- |
| १० | श्री साईप्रसादालय | शिबीरकाळात येणा-या २० ते ३० तंत्रज्ञ व डॉक्टर्स यांच्या करीता सकाळचा नाष्टी, तसेच दोन वेळचे जेवणाची व्यवस्था व्हि.आय.पी. कक्षात अथवा मागणीनुसार रुग्णालयात मोफत करण्यत यावी. त्यासाठी आवश्यक कर्मचारी व्यवस्था करण्यात यावी. | २८/०३/२०२१ ते ०३/०४/२०२१ | रु.२०,०००/- |
| ११ | जनसंपर्क विभाग | शिबीरकाळात येणा-या २० ते ३० तंत्रज्ञ व डॉक्टर्स यांची व्हि.आय.पी. दर्शनाची अथवा आरतीची व्यवस्था आवश्यकतेनुसार मोफत करणेत यावी. | शिबीरकाळात आवश्यकतेप्रमाणे | रु.१०,०००/- |
| १२ | कामगार विभाग / संरक्षण विभाग | शिबीरस्थळी तीनही शिफ्टमध्ये प्रति शिफ्ट ०२ प्रमाणे साधारण ०६ सुरक्षारक्षक उपलब्ध करुन देण्यात यावे. | २९/०३/२०२१ ते ०२/०४/२०२१ | रु.१०,०००/- |
| १३ | बगीचा विभाग | शिबीर कार्यक्रमाचे जागी बगीचा विभागाकडुन ३० कुंडे व २० बुकें तसेच स्टेज डेकोरेशन फुलसजावट करणेत यावी. | २९/०३/२०२१ ते ०२/०४/२०२१ | रु.१०,०००/- |
| १४ | साईबाबा भक्तनिवास | शिबीराकरीता बैठक व्यवस्थेकामी ५०० खुर्ची व मोठ्या सतरंजी ०५ नग पुरविण्यात यावे. | २९/०३/२०२१ ते ०२/०४/२०२१ | - |
| १५ | पाणी पुरवठा | शिबीराकरीता ०५ नग बेसिन व्यवस्था करण्यात यावे. | २९/०३/२०२१ ते ०२/०४/२०२१ | - |
| १६ | मंदीर विभाग | शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी मागणीनुसार पुजारी, पुजा साहीत्यासह उपलब्ध करावेत. | शिबीर उध्दाटन समारंभ प्रसंगी | - |
| १७ | उदी प्रसाद / प्रशासन शाखा | शिबीराकरीता डॉक्टर्स व मान्यवर यांना प्रसाद म्हणुन उदीपाकीट साधारण ५०० नग पॅकेटची मोफत व्यवस्था करणेत यावी. | | - |

| अ.नं | विभाग | विभगामार्फत करावयाचे कामाचा तपशिल | कामाचे दिनांक | अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| १८ | श्री साईनाथ रुग्णालय | शिबीरासाठी लागणारे अनुषंगीक (उदा. रांगोळी, फ्लेक्स बोर्ड, टि.व्ही. न्युज, शॉल, बाहेरील हॉटेल जेवण बील, डिसपोझिबल प्लेट, डीश, चमचे, ग्लास, पिण्याचे पाणी जार, टेबल, खुर्ची, सोफा, गॅस सिलेंडर, मंडप, कनात इ.) खर्चास मान्यता मिळावी. | | रु.१,००,०००/- |
| | | एकुण खर्च रुपये | | रु.३,५०,०००/- |

शिबीराकरीता अंदाजे रक्कम रु.३,५०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरहु खर्च श्री साईनाथ रुग्णालय अंदाज पत्रकाच्या शिबीरखर्च खातेतुन करता येईल. आज अखेर अंदाज पत्रकाच्या शिबीर खर्चा खात्यावर एकुण रक्कम रु.९,९१,०४२/- शिल्लक आहे.

तरी कोष्टकात दर्शविलेप्रमाणे शिबीरासाठी संस्थानच्या इतर विभागांकडुन लागणा-या अनुषंगीक बाबींची पुर्तता होणेस तसेच शिबीरासाठी होणा-या अपेक्षित अंदाजे रु.३,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad. Hoc) समितीचे सभेसमोर चक्रीय पध्दतीने निर्णयास्तव सादर.

3/3/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी

---

**उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.**

19/03/2021

(गीता प्रविण बनकर)
सदस्य तदर्थ समिती तथा
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

कोरोना महामारीचे पार्श्वभूमी लक्षात घेता सदयाविमान प्रस्ताव नामंजूर करणे योग्य होईल

(भानुदास ह पालवे)
सदस्य, तदर्थ समिती तथा,
प्र. अप्पर विभागीय आयुक्त, नाशिक

3/3/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी

19/3

(श्रींकांत आणेकर)
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदगनर

विषय क्र.- ९/४४



टिपणी

विषय – श्री साईनाथ रुग्णालयात दि. २४ ते २५ एप्रिल २०२१ या कालावधीत किडणीस्टोन शिबीराचे आयोजन व त्याकामी लागणा-या एकुण रक्कम रु. ५,००,०००/- मात्रचे अनुषंगीक खर्चास मान्यता मिळणेबाबत...

अधिनियम २००४ मधील तरतुद – कलम १७(१) व १७(२)(ण) मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालनां देईल.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय –

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८८० –

किडणीस्टोन शिबीरासाठी येणा-या खर्चात रु.५,००,०००/- मात्र पर्यंत वाढ करणेस मान्यता देण्यात आली.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि. २६/०७/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४९३ –

डॉ. केतन शुक्ला यांच्याकडुन सदर शिबीरात केल्या जाणा-या Lithotripsy उपचाराचे प्रत्येक रुग्णासाठी रु. २,५००/- याप्रमाणे होणारे बील गुजरात किडणी स्टोन फाऊंडेशन, अहमदाबाद यांना अदा करणेस व शिबीराकामी होणा-या मेडीसीन खर्चास व इतर अनुषंगीक प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष येणा-या अंदाजे रु.१०,००,०००/- खर्चास तसेच उपरोक्त विभागांकडुन विभागाअतंर्गत कामे करुन घेणेस मान्यता देण्यात आली.

प्रास्तविक – किडनीस्टोन शिबीर हे वर्षातुन दोन ते तीन वेळा आयोजित केले जाते. किडनीस्टोन शिबीरात (Percutanecous Nephrolithotomy) (P.C.N.L) मोठे स्टोन असलेल्या रुग्णांवर स्कोपीने शस्त्रक्रिया मोफत करणेत येतात. तसेच छोटया १ ते २ से.मी आकाराच्या स्टोनवर (Sound Waves) Lithotripsy च्या सहाय्याने उपचार केले जातात. यासाठी डॉ. केतन शुक्ला हे रुग्णांना त्यांच्या रुग्णालयात प्रत्येक Lithotripsy साठी रु.१०,०००/- इतका दर आकारत असतात. परंतु ते संस्थानकडुन प्रति रुग्ण निव्वळ खर्च म्हणुन रु.२,५००/- अशी आकारणी करतात. व त्याप्रमाणे (Lithotripsy) चे उपचारावरील होणारा एकुण खर्च ग्लोबल किडनीस्टोन फाऊंडेशन, अहमदाबाद यांना अदा केला जातो.

अशा प्रकारचे उपचारासाठी रुग्णांना खाजगी रुग्णालयात प्रत्येकी ३० ते ४० हजार रुपये खर्च येतो. सदर खर्च गरीब रुग्णांना पेलवणारा नसल्याने ते उपचारापासुन वंचित राहतात. करीता अशा रुग्णांवर श्री साईनाथ रुग्णालयात या शिबीरात मोफत उपचार केले जातात.

विभागाचा अभिप्राय – श्री साईनाथ रुग्णालयात सदर शिबीर घेण्यासाठी डॉ. राम नाईक, जनरल सर्जन, श्री साईनाथ रुग्णालय व डॉ. केतन शुक्ला यांचेतील फोनवरील चर्चेनुसार सदर शिबीर २४ ते २५ एप्रिल २०२१ अखेर घेण्याचा मानस आहे. डॉ. केतन शुक्ला यांच्याकडुन सदर शिबीरात केल्या जाणा-या Lithotripsy एकुण उपचाराचे, प्रत्येक रुग्णासाठी रु.२,५००/- याप्रमाणे होणारे बील ग्लोबल किडनी स्टोन फाऊंडेशन, अहमदाबाद यांना अदा करता येईल व शिबीराकामी श्री साईबाबा संस्थान पॅनलवरील भुलतज्ञ डॉक्टर्स यांना शिबीरकाळात बोलविण्यास व त्यांचे ठरवुन दिलेले मानधन वित्त विभागामार्फत आदा करता येईल.

सदर शिबीराच्या अनुषंगाने खालील विभागांमार्फत त्यांचे नावासमोर दर्शविलेंप्रमाणे कार्यवाही करुन घ्यावी लागेल. तसेच शिबीरासाठी येणारे तज्ञ डॉक्टर्स व त्यांचे सहकारी यांच्या राहण्याची, जेवणाची, दर्शन, आरतीची व इतर अनुषंगिक बाबींची व्यवस्था शिबीराच्या एक दिवस अगोदर व एक दिवस नंतर अशी दि. २३ ते २६ एप्रिल २०२१ या कालावधीत करावी लागेल.

| अ.नं | विभाग | विभागाने करावयाची कार्यवाही | अंदाजे खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | कॅटीन विभाग | १) दि. २४ ते २५ एप्रिल या दोन दिवसांकरीता अंदाजे १०० रुग्णांना दैनंदिन रुग्णालयातील रुग्णांप्रमाणे दोन वेळेच्या चहाची व्यवस्था मोफत करणे बाबत.<br>२) दि. २४ ते २५ एप्रिल या दोन दिवसांकरीता डॉ. केतन शुक्ला व १५ सहकारी व इतर रुग्णालय स्टाफ असे एकुण ५० व्यक्तींकरीता आवश्यक त्यावेळी चहा, कॉफी, बिस्कीट, मिनरल बॉटरची मोफत व्यवस्था करणे बाबत. | ५,०००/- |
| ०२ | श्री साईप्रसादालय | १) दि. २४ ते २५ एप्रिल या दोन दिवसांकरीता अंदाजे १०० रुग्णांना रुग्णालयातील रुग्णांप्रमाणे दोन वेळची जेवणाची व्यवस्था मोफत करणे बाबत.<br>२) दि. २४ ते २५ एप्रिल या दोन दिवसांकरीता डॉ. केतन शुक्ला व १५ सहकारी व इतर रुग्णालय स्टाफ असे एकुण १०० व्यक्तींकरीता विनामुल्य नाष्टा व्यवस्था मोफत करणे बाबत | १५,०००/- |

A10 - 2021

| अ.नं | विभाग | विभागांने करावयाची कार्यवाही | अंदाज खर्च |
|---|---|---|---|
| ०२ | श्री साईप्रसादालय | ३) दि. २४ ते २५ एप्रिल या दोन दिवसांकरीता डॉक्टर्स, तंत्रज्ञ, व इतरांची दोन वेळची जेवणाची व्यवस्था व्हि.आय.पी कक्षामध्ये अथवा रुग्णालयामध्ये (५० व्यक्तींकरीता) मोफत करणे बाबत. | - |
| ०३ | साईप्रसाद निवासस्थान | चार दिवसांकरीता अहमदाबाद येथुन आलेल्या डॉ. केतन शुक्ला व इतर सहकारी डॉक्टर यांचे करीता ०३ व्हि.आय.पी ए.सी रुमची मोफत व्यवस्था साईनिवास अतिथीगृहात करणे बाबत. (दि. २३ ते २६ एप्रिल २०२१) | १०,०००/- |
| ०४ | व्दारावती भक्तनिवास | किडनीस्टोन शिबीराकामी येणा-या अंदाजे १०-१५ सहकारी टेक्नीशियन यांचेकरीता ०४ व्हि.आय.पी ए.सी. रुमची मोफत व्यवस्था (दि. २३ ते २६ एप्रिल २०२१) करणे बाबत. | १०,०००/- |
| ०५ | जनसंपर्क विभाग | १) शिबीरासाठी आलेल्या मान्यवरांची आवश्यकतेनुसार दर्शन, आरतीची व्यवस्था मोफत करणे बाबत.<br>२) शिबीर संपन्न झालेनंतर सविस्तर बातमी प्रसिध्द करणे बाबत. | ५,०००/- |
| ०६ | विद्युत विभाग | किडनीस्टोन शिबीराकामी आवश्यकतेनुसार योग्य ठिकाणी मागणी प्रमाणे विद्युत जोडणी व सामुग्रीची व्यवस्था करणे बाबत. | - |
| ०७ | वाहन विभाग | १) डॉ. केतन शुक्ला व त्यांचे सहकारी यांचे करिता शिबीर कालावधीत मागणीप्रमाणे वातानुकुलीत गाडीची मोफत व्यवस्था करणेबाबत.<br>२) डॉ. केतन शुक्ला यांना मुंबई/पुणे/औरंगाबाद/शिरडी विमानतळ तसेच आवश्यकतेनुसार रेल्वे स्टेशन येथुन आणणे व परत सोडणेसाठी वातानुकुलीत गाडीची मोफत व्यवस्था करणेबाबत. | २०,०००/- |
| ०८ | संरक्षण विभाग | तीन शिफ्टमध्ये तीन अतिरिक्त सुरक्षारक्षक शिबीर काळात पुरविणेबाबत. | - |
| ०९ | वित्त विभाग, श्री साईबाबा हॉस्पीटल | शिबीराकामी आलेल्या खर्चाची बिले संबंधितांना वेळेत आदा करणेबाबत. | - |
| १० | मेडीकल स्टोअर, श्री साईबाबा हॉस्पीटल | शिबीराकामी लागणारे औषधे व साहित्य शिबीरपुर्व तातडीने खरेदी करुन पुरविणेबाबत. | ३,००,००० /- |
| ११ | कामगार विभाग | शिबीरकाळात प्रत्येक शिफ्टकामी (सकाळ, दुपार, रात्री) अतिरिक्त ०३ सुरक्षारक्षक, तसेच ०३ वॉर्डबाय, ०३ आया, ०३ परिचारीका, ०३ परिचारक, ०३ ओ.टी.आसिस्टंट दि. २४ ते २५ एप्रिल २०२१ रोजी श्री साईनाथ रुग्णालयात पुरविणेबाबत. | ३०,०००/- |
| १२ | मंदीर विभाग | १) शिबीर उदघाटन कार्यक्रमाकरीता श्रींचे पुजा करणेकामी पुजा साहित्यासह पुजारी मागणीनुसार उपलब्ध करुन देणेबाबत.<br>२) ०३ नग श्रींची मुर्ती मोफत पुरविणेबाबत. | ५,०००/- |
| १३ | श्री साईनाथ रुग्णालय | डॉ. केतन शुक्ला व त्यांचे इतर सहकारी एकुण १० लोकांसाठी दोन्ही वेळेच्या जेवणाची व्यवस्था बाहेरील हॉटेलमध्ये करणेकामी तसेच फ्लेक्स बोर्ड, रांगोळी, हॉटेल बिल, पिण्याचे पाण्याचे जार बिल, पॅनल वरील भुलतज्ञ डॉक्टर्स यांचे शिबीराकामी मानधन बिले इत्यादी वित्त विभागामार्फत अदा करणे बाबत. | १,००,००० /- |
| | | एकुण रक्कम रुपये | ५,००,०००/- |

श्री साईनाथ रुग्णालयाच्या सन २०२० – २०२१ च्या वार्षिक अंदाज पत्रकामध्ये शिबीर खर्चाकरीता रु. १० लाख मंजुरी आहे. आज अखेर अंदाजपत्रकाच्या शिबीर खर्च खात्यावर एकुण रक्कम रु.९,९१,०४२/- शिल्लक आहे.

<u>प्रस्ताव</u> – विभागाच्या अभिप्रायात नमुद केलेप्रमाणे शिबीरासाठी संस्थानच्या इतर विभागांकडुन लागणा-या अनुषंगीक बाबींची पुर्तता होणेसाठी तसेच शिबीरासाठी होणा-या अपेक्षित अंदाजे रु.५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad. Hoc) समितीचे सभेसमोर चक्रीय पदधतीने निर्णयास्तव सादर.

10/3/21
(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी

---

**उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.**

(गीता प्रविण बनकर)
सदस्य तदर्थ समिती तथा
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

(भानुदास हरपाळवे)
सदस्य, तदर्थ समिती तथा,
प्र. अप्पर विभागीय आयुक्त, नाशिक

10/3/21
(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी

(श्रीकांत आणेकर)
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदगनर

चक्रीय पध्दतीने दि. 22/04/2021 रोजी आणलेल्या विषयावरील निर्णय

विषय – श्री साईनाथ रुग्णालयात दि. 24 ते 25 एप्रिल 2021 या कालावधीत किडणीस्टोन शिबीराचे आयोजन व त्याकामी लागणा-या रक्कम रु.5,00,000/- मात्रचे अनुषंगीक खर्चास मान्यता मिळणेबाबत.

कोरोना-19 च्या महामारीच्या परिस्थितीत आणलेला प्रस्ताव सद्याच्या परिस्थितीनुरुप नाही करिता माझेतर्फे प्रस्ताव नामंजूर.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 22/04/2021

चक्रीय पद्धतीने दि. 23/04/2021 रोजी आणलेल्या विषयावरील निर्णय

विषय - श्री साईनाथ रुग्णालयात दि. 24 ते 25 एप्रिल 2021 या कालावधीत किडनीस्टोन शिबीराचे आयोजन व त्याकामी लागणाऱ्या एकक्रम रु 5,00,000/- मात्रचे अनुषंगीक खर्चास मान्यता मिळणेबाबत

सद्य परिस्थितीचा विचार करता, हा प्रस्ताव कोरोना-19 च्या पार्श्वभूमीवर योग्य नाही सबब नामंजूर

23/04/2021

23/04/2021
Ace (a)
member Adhoc

विषय क्र.- 9 / ४५

## मा. तदर्थ (Ad.Hoc) समितीचे सभेपुढील विषय,

विभाग:- श्री साईनाथ (धर्मादाय) रुग्णालय, शिर्डी (वैद्यकिय आर्थिक अनुदान विभाग)

टिपणी-

**विषय:-** हरिभाऊ महादेव धुमाळ यास वैद्यकिय आर्थिक अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत...

मान्यतेस्तव सविनय सादर,

**अधिनिय २००४ मधील तरतुद :-** कलम १७ (१) व १७ (२) (ण ) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९/१२/२०२० विषय नं.१२, निर्णय क्र.५४७.

**नियमावली** -श्री साईबाबा संस्थानने वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी स्वतंत्र सुधारित नियमावली तयार केलेली असुन, दि.२९/०१/२०२१ पासुन लागु करणेत आलेली आहे. यास सदर्भ क्र.१ व २ अन्वये, शासनाची मान्यता आहे. **सदर नियमावलीचे काटेकोरपणे पालन करणेचे निर्देश राज्य शासनाने दिलेले आहे.** अनुदान हे केवळ भारतातील सरकारी, जिल्हा परिषद वा महानगरपालिका रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सावर्जनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) अथवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांनी चालविलेले रुग्णालय, यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी खर्चाच्या २५% अगर रुपये ५०,०००/- पैकी जी कमी पुर्णाकिंत रक्कम असेल तेवढी रक्कम, पॅनलवरील ८१ रुग्णालयांना रुग्णाचे नावे सुधारित नियमावलीतील खालील आजारांकरीता देण्यात येते.

१) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार, २) रक्तासंबंधी आजार,
३) जी.बी.एस (Gullian Barre Sundrome), ४) कॉक्लीअर इंम्प्लांट,
५) सर्व प्रकारच्या ट्रान्सप्लॅन्ट (Transplant), शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार

**प्रास्तविक :-** उपरोक्त विषयांकीत संदर्भान्वये, मा.ना. अजित दादा पवार साहेब, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी श्री हरिभाऊ महादेव धुमाळ, रा.करंजखोप, ता.कोरेगाव,जि. सातारा हे कॅन्सर आजाराने आजारी असुन त्यांचेवर पवार मल्टीस्पेशिलिटी हॉस्पीटल ॲण्ड डायग्नोस्टीक सेंटर प्रा.लि.धनकवाडी, पुणे येथे उपाचार करण्यात येणार आहे. त्यासाठी रु. ५,००,०००/- एवढा खर्च अपक्षित आहे. या संदर्भातील वैद्यकीय कागदपत्रे सोबतजोडयात आलेली आहे.

श्री धुमाळ यांची कौटुंबिक आर्थिक परिस्थिती फारच हलाखींची असल्याने उपचारासाठी येणारा एवढा मोठा खर्च पेलणे त्यांना अशक्य आहे.तरी ही वस्तुस्थिती विचारात घेऊन त्यांना श्री शिर्डी संस्थान मार्फत जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळावी अशी विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थानच्या सुधारीत वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार श्री हरिभाऊ महादेव धुमाळ, याच्या आजाराचा समावेश सुधारित नियमावलीमध्ये आहे. परंतु उपचार घेत असलेले, पवार मल्टीस्पेशिलिटी हॉस्पीटल ॲण्ड डायग्नोस्टीक सेंटर प्रा.लि. धनकवाडी, पुणे या रुग्णालयाचा समावेश मान्यताप्राप्त यादीत नसल्याने, श्री साईबाबा संस्थान मार्फत वैयक्तिक नावाने अथवा खाजगी रुग्णालयाच्या नावाने अनुदान देण्यात येत नाही.

**विभागाचाअभिप्राय:-**आजार व रुग्णालय नियमावलीतील असल्यास रुग्णाने खालील कागदपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

| अ.नं. | अनुदार मागणी सोबत रुग्णाने सादर करावयाची कागदपत्रे | रुग्णाने सादर केलेली कागदपत्र. |
|---|---|---|
| १) | **अनुदान मागणी अर्ज-** अर्जदार हा रेशनकार्ड पैकी एक असावा. | अनुदान अर्ज सादर केलेला नाही. |
| २) | **रेशन कार्डची -** स्व:साक्षकिंत प्रमाणित केलेली झेरॉक्स. | स्व:साक्षकिंत प्रमाणित नाही. |
| ३) | **उत्पन्नाचा दाखला-**पिवळे रेशन कार्ड धारक असल्यास ८५,०००/- व केशरी रेशन कार्ड धारक असल्यास १,६०,०००/- आतील. स्व:साक्षकिंत प्रमाणित. | सादर केलेला आहे. स्व:साक्षकिंत प्रमाणित नाही. |
| ४) | **रुग्णालयाचे प्रमाणपत्र –** रुग्णालयाचे लेटरहेडवर खर्च, खर्चाची रक्कम अंकी व अक्षरी, शस्त्रक्रिया असेल तर शस्त्रक्रियेची तारीख / उपचार असेल तर उपचाराचा कालावधी, उपचाराचा तपशीलवार खर्च द्यावा. तसेच सदर रुग्ण महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभार्थी नाही असा स्पष्ट उल्लेख असावा. या प्रमाणपत्रावर संबंधीत डॉक्टरांचे नाव, पदवी, रजि.नं. व शिक्का आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्रावर फॉर डॉक्टरांची सही नसावी. याप्रमाणे स्व:साक्षकिंत प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत. | खर्चाची रक्कम अक्षरी,शस्त्रक्रियेची तारीख नाही.उपचाराचा कालावधी नाही रुग्ण महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभार्थी नसल्याचा स्पष्ट उल्लेख नाही. स्व:साक्षकिंत प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत नाही |
| ५) | **उत्पन्नाबाबतचे प्रतिज्ञापत्र –** प्रतिज्ञापत्र हे रुग्ण अगर रुग्णाचे कुटूंबातील व्यक्तीने मा.तहसिलदार किंवा नोटरी यांचे स्वाक्षरीने करावे. यामध्ये कुटूंबातील सर्व व्यक्तिंची संपुर्ण नावे, वय, नातेसंबंध, व्यवसाय, वार्षिक उत्पन्न व रुग्ण महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेचा व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभार्थी नाही असा उल्लेख असावा. या प्रमाणपत्राची स्व:साक्षकिंत प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत. | सादर केलेले नाही. |
| ६) | **आधार कार्ड -** आधार कार्डची स्व:साक्षकिंत प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत. | स्व:साक्षकिंत प्रमाणित नाही. |

(पान क्र.२ वर)

श्री हरिभाऊ महादेव धुमाळ, यांचा कॅन्सर आजाराचा समावेश सुधारित नियमावलीमध्ये आहे. परंतु उपचार घेत असलेले, पवार मल्टीस्पेशिलिटी हॉस्पीटल ॲण्ड डायग्नोस्टीक सेंटर प्रा.लि. धनकवाडी, पुणे या रुग्णालयाचा समावेश मान्यताप्राप्त यादीत नसल्याने, त्यांना वैद्यकीय आर्थिक अनुदान उपलब्ध करुन देता येणार नाही. याबाबत मा.ना. अजित दादा पवार साहेब, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना पत्राने कळविणेबाबत दि.२६/०३/२०२१ रोजी टिपणी सादर केली असता. त्यावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी स्पेशल केस करावी, असे निर्देश दिलेले आहेत.

यापुर्वी एक विशेष बाब म्हणुन, श्री प्रकाश आनंदराव गायकवाड यांना वैद्यकीय आर्थिक अनुदान उपलब्ध करुन द्यावयाचे असल्याने, याबाबतचा प्रस्ताव दि. १९/१२/२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad.Hoc) समितीचे सभेत निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता. यावर श्री प्रकाश आनंदराव गायकवाड यांना कॅन्सर आजार असुन तो संस्थान नियमावलीतील मान्यता प्राप्त आजार आहे. मात्र उपचार घेत असलेले रुग्णालय मान्यता प्राप्त यादीतील नाही.मात्र आजार मान्यता प्राप्त यादीत असल्याने एक विशेष बाब म्हणुन संस्थानमार्फत आर्थिक अनुदान रक्कम रु.२५,०००/- मात्र उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.तसेच या निर्णयाचा संदर्भ इतर अशा प्रकारच्या प्रकरणांना लागु करण्यात येऊ नये, असा निर्णय क्र.५४८ झालेला आहे.

श्री साईबाबा संस्थानच्या वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत आता बदल करणेत आलेला असुन, सुधारित वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावली शासन मान्यतेने व दि. १९/१२/२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad.Hoc) समितीचे सभेतील निर्णय क्र.५४७ अन्वये दि.२९/०१/२०२१ पासुन लागु करणेत आलेली आहे. **तसेच राज्य शासनाने सुधारीत नियमावलीचे काटेकोरपणे पालन करणेत यावे असे निर्देश दिलेले आहेत.**

सुधारीत नियमावलीनुसार आजार व रुग्णालय या दोन्हीचा समावेश असणे आवश्यक आहे. श्री हरिभाऊ महादेव धुमाळ, यांचा कॅन्सर हया आजाराचा समावेश सुधारित नियमावलीमध्ये आहे. परंतु उपचार घेत असलेले, पवार मल्टीस्पेशिलिटी हॉस्पीटल ॲण्ड डायग्नोस्टीक सेंटर प्रा.लि. धनकवाडी, पुणे या रुग्णालयाचा समावेश मान्यता प्राप्त यादीत नसल्याने त्यांना वैद्यकीय आर्थिक अनुदान उपलब्ध करुन देता येत नाही. एक विशेष बाब म्हणुन अनुदान द्यावयाचे असल्यास, मा.तदर्थ (Ad.Hoc) समितीची तसेच शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**प्रस्ताव :-** श्री हरिभाऊ महादेव धुमाळ, यांना एक विशेष बाब म्हणुन वैद्यकीय आर्थिक अनुदान उपलब्ध करुन देणेसाठी चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर.

(रविंद्र ठाकरे)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

---

उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

(गीता प्रविण बनकर)
सदस्य, तदर्थ समिती तथा
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

(भानुदास पालवे)
सदस्य, तदर्थ समिती तथा
अप्पर विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक

(रविंद्र ठाकरे)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

SSH-MEETING-42-2021

200

चक्रीय पध्दतीने दि. 22/04/2021 रोजी आणलेल्या विषयावरील निर्णय

विषय – हरिभाऊ महादेव धुमाळ यास वैद्यकीय आर्थिक अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत...

सर्व बाबींचा विचार करता ही बाब विशेष बाब ठरु शकत नाही. तसेच श्री.प्रकाश गायकवाड यांचे बाबतीत दि. 19/12/2020 रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विचार करता अर्जदाराच्या अर्जातील बाबी व श्री. गायकवाड यांचे अर्जातील बाबी यात साम्य नाही. अशा परिस्थितीत माझेतर्फे नामंजूर.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 22/04/2021

चक्रीय पद्धतीने दि. 23/04/2021 रोजी आणलेल्या विषयावरील निर्णय.

विषय: हरिभाऊ महादेव घुमाळ यास वैद्यकीय अनुदान उपलब्ध करून देणे बाबत.

प्रस्ताव वाचला. प्रस्तावरून विचार करावयास ही विशेष बाब नाही. दि 19/12 2020 रोजी प्रकाश गायकवाड यांच्या अर्जाशी साम्य नाही सबब नामंजूर.

23/04/2021

23/04/2021
Acc (a)
Member Adh
Committee
S.S.S. T Shird

विषय क्र.-७ / ४६

# मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषयाची टिपणी



**विभाग – श्री साई प्रसादालय**

**विषय :- श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपात्या)/पुरी मनुष्यबळाद्वारे तयार करणेकामी सध्या कार्यरत असेलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत..**

## टिप्पणी

अधिनियम २००४ मधील तरतुद :- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ नूसार भक्तांना तसेच भक्तांच्या सोयीसाठी आवश्यकत ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**प्रस्तावना :-** श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनात देण्यात येणारी चपाती/पुरी ही उक्ते आऊटसोर्सिंग पध्दतीने तयार करुन घेण्यात येत आहे. त्यानूसार श्री साई प्रसादालयातील चपाती/पुरी तयार करणेकामी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती दि.२७/०३/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२०६ नूसार, जा.नं.एसएसएस/वशी/१२१/२०२० दि.२८/०४/२०२० अन्वये, यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पा.संस्था नाशिक यांना दि.०१/०४/२०२० ते ३१/०३/२०२१ अखेर ०१ वर्ष कालावधीकरीता प्रती क्विंटल कोरडा आटा+मैदा आटा करीता जीएसटी वगळून रु.१५९६/- (अक्षरी रक्कम रु. एक हजार पाचशे शेहान्नव मात्र) सर्व करांसह याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेला आहेत. या कामाची मुदत दि.३१/०३/२०२१ अखेर संपुष्टात येत असल्याने पुढील एक वर्ष कालावधीसाठी चपाती/पुरी तयार करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहेत. त्यासाठी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेची मान्यता घेणेकामीचा विषय सभा कामकाज विभागाकडे दिनांक २२/१२/२०२० रोजी सुपूर्द केलेला आहे. तथापी अदयापपावेतो मा.तदर्थ समितीची सभा झालेली नाही.

सदरहु ई-निविदा प्रक्रिया उपरोक्त टेंडर कालावधी संपेपर्यंत मुदतीत पुर्ण होईल असे वाटत नसल्याने तसेच सदरचे ई-निविदा प्रक्रियेस मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची मान्यता झाल्यांनतर सदरहु विषयाचा निर्णय प्राप्त होणे, वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करणे, प्री बीड मिटींग घेणे, शासन निर्णयानूसार प्राप्त झालेल्या निविदांची संख्या जर तीन पेक्षा कमी असेल तर निविदा प्राप्त होणेसाठी पहिल्यांदा मुदतवाढ देणे, त्यानंतरही निविदांची संख्या जर ०३ पेक्षा कमी असेल तरी देखील दुस-यांदा मुदतवाढ देणे,तदनंतर प्राप्त झालेल्या निविदांचे टेक्नीकल बीड व प्राईस बीड मा.खरेदी समिती सभेपुढे उघडणे, लेखाशाखा विभागामार्फत तपासून घेणे, निम्नतम दरधारक ठेकेदारास कार्यादेश देणेकामी प्रस्तुत विषयाची टिपणी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेत सादर करणे. तदनंतर संबंधीत ठेकेदारास कार्यादेश देणे. या कामासाठी बराच कालावधी निघून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर बाबींचा विचार करता श्री साई प्रसादालयात स्वामी नारायण चपाती/पुरी तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पा.संस्था नाशिक यांना दिनांक ०१/०४/२०२१ पासून ते सन-२०२१-२०२२ ची ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणे गरजेचे आहे.

**मागणी :-** प्रास्तविक नूसार यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पा.संस्था नाशिक यांचे चपाती/पुरी तयार करणेच्या कामाची मुदत दिनांक ३१/०३/२०२१ अखेर संपुष्टात येत असल्याने तसेच वर नमूद अधोरेखांकित केलेल्या अडचणींमुळे सदरहु ई-निविदा प्रक्रिया उपरोक्त टेंडर कालावधी संपेपर्यंत मुदतीत पुर्ण होईल असे वाटत नाही. करीता चपाती अभावी साईभक्तांची गैरसोय होवू नये. याकरीता सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पा.संस्था नाशिक यांना सध्या देण्यात येत असलेल्या प्रती क्विंटल कोरडा गहु आटा + मैद्यास रक्कम रु.१५९६/- + जीएसटी याप्रमाणे दिनांक ०१/०४/२०२१ पासून ते सन-२०२१-२०२२ ची ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीसाठी आहे याच मंजूर दरात चक्रीय पध्दतीने मुदतवाढ मिळणे गरजेचे आहे. तसेच माहे एप्रिल-२०१९ ते माहे मार्च-२०२० या मागील वर्षाचे चपाती/पुरी बनविण्याचे मजूरीचे बिलांची रक्कम रु. ३०,३३,८४७/- इतकी होते, त्यानूसार प्रति महिना मुदतवाढ कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.२,५२,८२०/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख बावन्न हजार आठशे वीस मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान :- आर्थिक**

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत :-** प्रस्तावित व मागणीनूसार श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती/पुरी तयार करणेच्या कामाची मुदत दिनांक ३१/०३/२०२१ अखेर संपुष्टात येत असल्याने पुढील एक वर्ष कालावधीसाठी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पा.संस्था नाशिक यांना सध्या देण्यात येत असलेल्या प्रती क्विंटल कोरडा गहु आटा + मैद्यास रक्कम रु.१५९६/- + जीएसटी या मंजूर दराप्रमाणे दिनांक ०१/०४/२०२१ पासून ते सन-२०२१-२०२२ ची ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचे प्रस्तावावर मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णय होणेस सविनय सादर.

26/11/21

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

EPP - 19 - 2021

मागील पानावर....

उपरोक्त संदर्भिय प्रस्तावास मा.तदर्थ समितीची मान्यता होवून पुढील सन-२०२१-२०२२ ची ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीसाठी सदरहु ई-निविदा प्रक्रियेस बराच कालावधी जाणार आहे. करीता तुर्त कामाची निकड म्हणून व भक्तांची प्रसादभोजनातील चपातीअभावी गैरसोय होवू नये याकरीता मुदतवाढ देणे गरजेचे आहे.

श्री साई प्रसादालयात स्वामी नारायण चपाती/पुरी मनुष्यबळाव्दारे तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पा.संस्था नाशिक यांना दिनांक ०१/०४/२०२१ पासून ते सन-२०२१-२०२२ ची ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीकरीता आहे त्याच मंजूर दरात व केलेल्या करारनाम्यातील अटी/शर्तीस अधिन मुदतवाढ देणेत येत आहे. याकामी सबंधीत ठेकेदारास विहीत पध्दतीने दरमहाचे कामाचे बील आदा करणेत यावे तसेच पुढील कालावधीसाठी ई-निविदा प्रक्रीया सुरु करण्यात यावी.

(श्रीमती गीता प्रविण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

28/1/2021
(भानूदास हरीभाऊ पालवे)
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

26/1/21
(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

चक्रीय पध्दतीने सादर केलेल्या तीन विषयावरील एकत्रित निर्णय,
दि. २७ जानेवारी, २०२१

विषय –श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपात्या)/पुरी मनुष्यबळाद्वारे तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

व

विषय –श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती मशिनद्वारे चपाती तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

व

विषय –श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाद्वारे अन्नपाकिटे (नाष्टापाकिटे) तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

वरील तीनही प्रस्तावावरुन असे दिसून येते की, सदरच्या करारांची मुदत दि. ३१/०३/२०२१ रोजी संपत असतांनाही पुढील कराराबाबत कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली नाही. आता सदर कार्यवाहीस वेळ लागतो, या सबबीखाली अस्तित्वात असलेल्या कंत्राटदारांना मुदतवाढ मागितलेली आहे. अशा परिस्थितीत निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी जो कालावधी गरजेचा आहे, फक्त त्याचाच विचार करणे योग्य वाटते. करिता अस्तित्वात असलेल्या कंत्राटदारांना दि. ३० एप्रिल २०२१, पर्यंत मुदतवाढ देण्यात येते व या दरम्यान निविदा प्रकिया राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. अन्नपाकिटांबाबतच्या विषयाचा सिव्हील ॲप्लिकेशन करावा.

(श्रीकांत ल.आणेकर)
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर

विषय : श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपात्या)/पुरी मनुष्यबळाद्वारे तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

व

विषय : श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती मशिनद्वारे चपाती तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

व

विषय : श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाद्वारे अन्नपाकिटे (नाष्टापाकिटे) तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत

वरील तिनही प्रस्ताव वाचले. त्यावरुन असे लक्षात येते की, त्या करारांची मुदत ३१.०३.२०२१ पर्यंत आहे. अद्याप करार संपुष्टात आल्यानंतर आवश्यक असणारी कार्यवाही सुरु नाही. परंतू प्रक्रिया पूर्ण होण्याचा कालावधी विचारात घेता, ३०.०४.२०२१ पर्यंत कंत्राटदारांना मुदतवाढ देणे योग्य होईल व दरम्यान निविदा प्रक्रिया करण्यास मान्यता देण्यात येते. अन्नपाकीटांबाबत मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन करावा.

27/01/2021

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ समिती,
साईबाबा संस्थान शिर्डी.

विषय क्र.- ७/४७



# मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषयाची टिपणी

**विभाग – श्री साई प्रसादालय**

**विषय :- श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती मशिनव्दारे चपाती तयार करणेकामी सध्या कार्यरत असेलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत..**

## टिप्पणी

अधिनियम २००४ मधील तरतुद :- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ नूसार भक्तांना तसेच भक्तांच्या सोयीसाठी आवश्यकत ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**प्रस्तावना :-** श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनात देण्यात येणारी चपाती, चपाती मशिनव्दारे उक्ते आऊटसोर्सिंग पध्दतीने तयार करुन घेण्यात येत आहे. त्यानूसार श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर मनुष्यबळ पुरवून चपाती तयार करणेकामी मा.तदर्थ(Ad-hoc) समिती दि.२७/०३/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२०७ नूसार, जा.नं.एसएसएस/वशी/११९/२०२० दि.२८/०४/२०२० अन्वये, यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पा.संस्था नाशिक यांना दि.०१/०४/२०२० ते ३१/०३/२०२१ अखेर ०१ वर्ष कालावधीकरीता प्रती क्विंटल कोरडा आटा+मैदा आटा करीता जीएसटी वगळून रु.२६९/- (अक्षरी रक्कम रु.दोनशे एकोणसत्तर मात्र) याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेले आहेत. या कामाची मुदत दि.३१/०३/२०२१ अखेर संपुष्टात येत असल्याने पुढील एक वर्ष कालावधीसाठी चपाती मशिनवर चपाती तयार करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहेत. त्यासाठी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेची मान्यता घेणेकामीचा विषय सभा कामकाज विभागाकडे दिनांक २२/१२/२०२० रोजी सुपूर्द केलेला आहे, तथापी अदयापपावेतो मा.तदर्थ समितीची सभा झालेली नाही.

सदरहु ई-निविदा प्रक्रिया उपरोक्त टेंडर कालावधी संपेपर्यंत मुदतीत पुर्ण होईल असे वाटत नसल्याने तसेच सदरचे ई-निविदा प्रक्रियेस मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची मान्यता झाल्यांनतर सदरहु विषयाचा निर्णय प्राप्त होणे, वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करणे, प्री बीड मिटींग घेणे, शासन निर्णयानूसार प्राप्त झालेल्या निविदांची संख्या जर तीन पेक्षा कमी असेल तर निविदा प्राप्त होणेसाठी पहिल्यांदा मुदतवाढ देणे, त्यानंतरही निविदांची संख्या जर ०३ पेक्षा कमी असेल तरी देखील दुस-यांदा मुदतवाढ देणे,तदनंतर प्राप्त झालेल्या निविदांचे टेक्नीकल बीड व प्राईस बीड मा.खरेदी समिती सभेपुढे उघडणे, लेखाशाखा विभागामार्फत तपासून घेणे, निम्नतम दरधारक ठेकेदारास कार्यादेश देणेकामी प्रस्तुत विषयाची टिपणी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेत सादर करणे. तदनंतर संबंधीत ठेकेदारास कार्यादेश देणे. या कामासाठी बराच कालावधी निघून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर बाबींचा विचार करता, श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर चपाती तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पा.संस्था नाशिक यांना दिनांक ०१/०४/२०२१ पासून ते सन-२०२१-२०२२ ची ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणे गरजेचे आहे.

**मागणी :-** प्रास्तविक नूसार यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पा.संस्था नाशिक यांचे चपाती मशिनवर चपाती तयार करणेच्या कामाची मुदत दिनांक ३१/०३/२०२१ अखेर संपुष्टात येत असल्याने तसेच वर नमूद अधोरेखांकित केलेल्या अडचणींमुळे सदरहु ई-निविदा प्रक्रिया उपरोक्त टेंडर कालावधी संपेपर्यंत मुदतीत पुर्ण होईल असे वाटत नाही. करीता चपाती अभावी साईभक्तांची गैरसोय होवू नये. याकरीता सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पा.संस्था नाशिक यांना सध्या देण्यात येत असलेल्या प्रती क्विंटल कोरडा गहु आटा + मैद्यास रक्कम रु.२६९/- + जीएसटी. (अक्षरी रक्कम रु. दोनशे एकोणसत्तर मात्र) याप्रमाणे दिनांक ०१/०४/२०२१ पासून ते सन-२०२१-२०२२ ची ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीसाठी आहे याच मंजूर दरात चक्रीय पध्दतीने मुदतवाढ मिळणे गरजेचे आहे. तसेच माहे एप्रिल-२०१९ ते माहे मार्च-२०२० या मागील वर्षाचे चपाती/पुरी बनविण्याचे मजूरीचे बिलांची रक्कम रु.१९,९२,६३४/- इतकी होते, त्यानूसार प्रति महिना मुदतवाढ कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.१,६६,०५३/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख सहासस्ट हजार त्रेपन्न मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान :- आर्थिक**

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत :-** प्रस्तावित व मागणीनूसार श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनव्दारे चपाती तयार करणेच्या कामाची मुदत दिनांक ३१/०३/२०२१ अखेर संपुष्टात येत असल्याने पुढील एक वर्ष कालावधीसाठी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पा.संस्था नाशिक यांना सध्या देण्यात येत असलेल्या प्रती क्विंटल कोरडा गहु आटा + मैद्यास रक्कम रु.२६९/-+ जीएसटी (अक्षरी रक्कम रु. दोनशे एकोणसत्तर मात्र) या मंजूर दराप्रमाणे दिनांक ०१/०४/२०२१ पासून ते सन-२०२१-२०२२ ची ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचे प्रस्तावावर मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णय होणेस सविनय सादर.

26/11/21

(कानुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

EPP 26-2021

मागील पानावर....

207

उपरोक्त संदर्भिय प्रस्तावास मा.तदर्थ समितीची मान्यता होवून पुढील सन-२०२१-२०२२ ची ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीसाठी सदरहु ई-निविदा प्रक्रियेस बराच कालावधी जाणार आहे. करीता तुर्त कामाची निकड म्हणून व भक्तांची प्रसादभोजनातील चपातीअभावी गैरसोय होवू नये याकरीता मुदतवाढ देणे गरजेचे आहे.

श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर चपाती तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पा.संस्था नाशिक यांना दिनांक ०१/०४/२०२१ पासून ते सन-२०२१-२०२२ ची ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीकरीता आहे त्याच मंजूर दरात व केलेल्या करारनाम्यातील अटी/शर्तीस अधिन राहुन मुदतवाढ देणेत येत आहे. याकामी सबंधीत ठेकेदारास विहीत पध्दतीने दरमहाचे कामाचे बील आदा करणेत येवून पुढील कालावधीसाठी ई-निविदा प्रक्रीया सुरु करण्यात यावी.

28/1/2021

(श्रीमती गीता प्रविण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानूदास हरीभाऊ पालवे)
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

208

चक्रीय पध्दतीने सादर केलेल्या तीन विषयावरील एकत्रित निर्णय,
दि. २७ जानेवारी, २०२१

विषय –श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपात्या)/पुरी मनुष्यबळाद्वारे तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

व

विषय –श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती मशिनद्वारे चपाती तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

व

विषय –श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाद्वारे अन्नपाकिटे (नाष्टापाकिटे) तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

वरील तीनही प्रस्तावावरुन असे दिसून येते की, सदरच्या करारांची मुदत दि. ३१/०३/२०२१ रोजी संपत असतांनाही पुढील कराराबाबत कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली नाही. आता सदर कार्यवाहीस वेळ लागतो, या सबबीखाली अस्तित्वात असलेल्या कंत्राटदारांना मुदतवाढ मागितलेली आहे. अशा परिस्थितीत निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी जो कालावधी गरजेचा आहे, फक्त त्याचाच विचार करणे योग्य वाटते. करिता अस्तित्वात असलेल्या कंत्राटदारांना दि. ३० एप्रिल २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येते व या दरम्यान निविदा प्रकिया राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. अन्नपाकिटांबाबतच्या विषयाचा सिव्हील ॲप्लिकेशन करावा.

(श्रीकांत ल.आणेकर)
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर

विषय : श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपात्या)/पुरी मनुष्यबळाद्वारे तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

व

विषय : श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती मशिनद्वारे चपाती तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

व

विषय : श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाद्वारे अन्नपाकिटे (नाष्टापाकिटे) तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत

वरील तिनही प्रस्ताव वाचले. त्यावरुन असे लक्षात येते की, त्या करारांची मुदत ३१.०३.२०२१ पर्यंत आहे. अद्याप करार संपुष्टात आल्यानंतर आवश्यक असणारी कार्यवाही सुरु नाही. परंतू प्रक्रिया पूर्ण होण्याचा कालावधी विचारात घेता, ३०.०४.२०२१ पर्यंत कंत्राटदारांना मुदतवाढ देणे योग्य होईल व दरम्यान निविदा प्रक्रिया करण्यास मान्यता देण्यात येते. अन्नपाकीटांबाबत मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन करावा.

27/01/2021

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ समिती,
साईबाबा संस्थान शिर्डी.

विषय क्र.- 9/8C

210

# मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषयाची टिपणी

**विभाग – श्री साई प्रसादालय**

**विषय -: श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी सध्या कार्यरत असेलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत..**

## टिप्पणी

अधिनियम २००४ मधील तरतुद :- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ नूसार भक्तांना तसेच भक्तांच्या सोयीसाठी आवश्यकत ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**प्रस्तावना :-** श्री साई प्रसादालयामार्फत सकाळी ६ ते १० यो वेळेत भक्तांना अल्पोपहार म्हणून देण्यात येणारी अन्नपाकीटे उक्ते आऊटसोर्सिंग पध्दतीने तयार करुन घेण्यात येत आहे. त्यानूसार श्री साई प्रसादालयामार्फत अन्नपाकीटे तयार करणेकामी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती दि.२७/०३/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२०५ नूसार, जा.नं.एसएसएस/वशी/१२०/२०२० दि.२८/०४/२०२० अन्वये, यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पा.संस्था नाशिक यांना दि.०१/०४/२०२० ते ३१/०३/२०२१ अखेर ०१ वर्ष कालावधीकरीता प्रती अन्न पाकीटास कर (GST) वगळून मजूरी रु.१.८९ पैसे याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेला आहेत. या कामाची मुदत दि.३१/०३/२०२१ अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे पुढील एक वर्ष कालावधीसाठी अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची मान्यता घ्यावी लागणार असून त्यासाठी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेची मान्यता घेणेकामीचा विषय सभा कामकाज विभागाकडे दिनांक २२/१२/२०२० रोजी सुपूर्द केलेला आहे. तथापी अदयापपावेतो मा.तदर्थ समितीची सभा झालेली नाही.

सदरहु ई-निविदा प्रक्रिया उपरोक्त टेंडर कालावधी संपेपर्यंत मुदतीत पुर्ण होईल असे वाटत नसल्याने तसेच सदरचे ई-निविदा प्रक्रियेस मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची मान्यता झाल्यांनतर सदरहु विषयाचा निर्णय प्राप्त होणे, वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करणे, प्री बीड मिटींग घेणे, शासन निर्णयानूसार प्राप्त झालेल्या निविदांची संख्या जर तीन पेक्षा कमी असेल तर निविदा प्राप्त होणेसाठी पहिल्यांदा मुदतवाढ देणे, त्यानंतरही निविदांची संख्या जर ०३ पेक्षा कमी असेल तरी देखील दुस-यांदा मुदतवाढ देणे,तदनंतर प्राप्त झालेल्या निविदांचे टेक्नीकल बीड व प्राईस बीड मा.खरेदी समिती सभेपुढे उघडणे, लेखाशाखा विभागामार्फत तपासून घेणे, निम्नतम दरधारक ठेकेदारास कार्यादेश देणेकामी प्रस्तुत विषयाची टिपणी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेत सादर करणे. तदनंतर संबंधीत ठेकेदारास कार्यादेश देणे. या कामासाठी बराच कालावधी निघून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर बाबींचा विचार करता श्री साई प्रसादालयामार्फत अन्नपाकीटे तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पा.संस्था नाशिक यांना दिनांक ०१/०४/२०२१ पासून ते सन-२०२१-२०२२ ची ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणे गरजेचे आहे.

**मागणी :-** प्रास्तविक नूसार यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पा.संस्था नाशिक यांची अन्नपाकीटे तयार करुन पुरविणेच्या कामाची मुदत दिनांक ३१/०३/२०२१ अखेर संपुष्टात येत असल्याने तसेच वर नमूद अधोरेखांकित केलेल्या अडचणींमुळे सदरहु ई-निविदा प्रक्रिया उपरोक्त टेंडर कालावधी संपेपर्यंत मुदतीत पुर्ण होईल असे वाटत नाही. करीता अन्नपाकीटा (नाष्टापाकीटा) अभावी साईभक्तांची गैरसोय होवू नये. याकरीता सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पा.संस्थानाशिक यांना सध्या देण्यात येत असलेल्या प्रती अन्न पाकीटास कर (GST) वगळून मजूरी रु.१.८९ पैसे (अक्षरी रु.एक पैसे एकोणनव्वद मात्र) याप्रमाणे दिनांक ०१/०४/२०२१ पासून ते सन-२०२१-२०२२ ची ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीसाठी आहे याच मंजूर दरात चक्रीय पध्दतीने मुदतवाढ मिळणे गरजेचे आहे. तसेच माहे एप्रिल-२०१९ ते माहे मार्च-२०२० या मागील वर्षात अन्नपाकीटे तयार करणेच्या मजूरीचे बिलांची रक्कम रु.८७,३३,२५७/- इतकी होते, त्यानूसार प्रति महिना मुदतवाढ कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.७,२७,७७१/- (अक्षरी रक्कम रुपये सात लाख सत्तावीस हजार सातशे ऐकाहत्तर मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान :- आर्थिक**

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत :-** प्रस्तावित व मागणीनूसार श्री साई प्रसादालयामार्फत अन्नपाकीटे तयार करणेच्या कामाची मुदत दिनांक ३१/०३/२०२१ अखेर संपुष्टात येत असल्याने पुढील एक वर्ष कालावधीसाठी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पा.संस्था नाशिक यांना सध्या देण्यात येत असलेल्या प्रती अन्न पाकीटास कर (GST) वगळून मजूरी रु.१.८९ पैसे (अक्षरी रु.एक पैसे एकोणनव्वद मात्र) या मंजूर दराप्रमाणे दिनांक ०१/०४/२०२१ पासून ते सन-२०२१-२०२२ ची ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचे प्रस्तावावर मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णय होणेस सविनय सादर.

21/1/2021

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी

ERF-22-2021

211

उपरोक्त संदर्भिय प्रस्तावास मा.तदर्थ समितीची मान्यता होवून पुढील सन-२०२१-२०२२ ची ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीसाठी सदरहु ई-निविदा प्रक्रियेस बराच कालावधी जाणार आहे. करीता तुर्त कामाची निकड म्हणून व भक्तांची अल्पोपहार अभावी गैरसोय होवू नये याकरीता मुदतवाढ देणे गरजेचे आहे.

श्री साई प्रसादालयामार्फत अन्नपाकीटे तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यशोधरा महिला सहकारी औदयोगिक उत्पा.संस्था नाशिक यांना दिनांक ०१/०४/२०२१ पासून ते सन-२०२१-२०२२ चीं ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीकरीता आहे त्याच मंजूर दरात व केलेल्या करारनाम्यातील अटी/शर्तीस अधिन राहुन मुदतवाढ देणेत येत आहे. याकामी सबंधीत ठेकेदारास विहीत पध्दतीने दरमहाचे कामाचे बील आदा करणेस व पुढील कालावधीसाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया सुरु करणेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे खंडपीठ औरंगाबाद येथे CA दाखल करणेस मान्यता देण्यात येत आहे.

28/1/2021

(श्रीमती गीता प्रविण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानूदास हरीभाऊ पालवे)
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

प्रस्तावित केले प्रमाणे मान्य

26/1/21

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

चक्रीय पध्दतीने सादर केलेल्या तीन विषयावरील एकत्रित निर्णय,
दि. २७ जानेवारी, २०२१

विषय –श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपात्या)/पुरी मनुष्यबळाद्वारे तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

व

विषय –श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती मशिनद्वारे चपाती तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

व

विषय –श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाद्वारे अन्नपाकिटे (नाष्टापाकिटे) तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

वरील तीनही प्रस्तावावरुन असे दिसून येते की, सदरच्या करारांची मुदत दि. ३१/०३/२०२१ रोजी संपत असतांनाही पुढील कराराबाबत कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली नाही. आता सदर कार्यवाहीस वेळ लागतो, या सबबीखाली अस्तित्वात असलेल्या कंत्राटदारांना मुदतवाढ मागितलेली आहे. अशा परिस्थितीत निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी जो कालावधी गरजेचा आहे, फक्त त्याचाच विचार करणे योग्य वाटते. करिता अस्तित्वात असलेल्या कंत्राटदारांना दि. ३० एप्रिल २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येते व या दरम्यान निविदा प्रकिया राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. अन्नपाकिटांबाबतच्या विषयाचा सिव्हील ॲप्लिकेशन करावा.

(श्रीकांत ल.आणेकर)
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर

विषय : श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपात्या)/पुरी मनुष्यबळाद्वारे तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

व

विषय : श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती मशिनद्वारे चपाती तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

व

विषय : श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाद्वारे अन्नपाकिटे (नाष्टापाकिटे) तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत

वरील तिनही प्रस्ताव वाचले. त्यावरुन असे लक्षात येते की, त्या करारांची मुदत ३१.०३.२०२१ पर्यंत आहे. अद्याप करार संपुष्टात आल्यानंतर आवश्यक असणारी कार्यवाही सुरु नाही. परंतू प्रक्रिया पूर्ण होण्याचा कालावधी विचारात घेता, ३०.०४.२०२१ पर्यंत कंत्राटदारांना मुदतवाढ देणे योग्य होईल व दरम्यान निविदा प्रक्रिया करण्यास मान्यता देण्यात येते. अन्नपाकीटांबाबत मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन करावा.

27/01/2021

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ समिती,
साईबाबा संस्थान शिर्डी.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय
आवक नं.: 5969
दिनांक:- 09.01.2021

विषय क्र.- 9/89



# मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषयाची टिपणी.

## विभाग :- श्री साई प्रसादालय

विषय :- श्री साई प्रसादालयातील हाऊस किपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलकामी तसेच वाढपी कामगार पुरविणेकामी सध्या कार्यरत असेलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत..

**टि प्प णी**

**प्रस्तावना :-** श्री साई प्रसादालयतील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोल तसेच दररोज १०० वाढपी कामगार पुरविणेकामी आऊटसोर्स पध्दतीने मे.फोकस फॅसिलिटी अॅण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वशि/प्रसादा/ २३४१/२०१९ दि.१४/०९/२०१९ रोजीचे कार्यादेश देण्यात आलेला आहे. उपरोक्त कार्यादेशानूसार त्यांचे कामाची मुदत दि.१४/०९/२० अखेर संपुष्टात येत असल्याने, श्री साई प्रसादालयातील स्वच्छता व हाऊसकिपींग, पेस्टकंट्रोल कामाअभावी भक्तांची गैरसोय होऊ नये याकरीता पुढील कालावधीसाठी ई-निविदा प्रक्रिया सुरु करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी इकडील विभागामार्फत **मा.तदर्थ (Ad-hoc) समिती दि.०९/०६/२०२० रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदरचे सभेतील निर्णयान्वये, सदहु विषय स्थगीत ठेवण्यात आलेला आहे.**

करीता इकडील विभागामार्फत दि.१२/०९/२०२० रोजी संबधीत ठेकेदारास मुदतवाढ देणेकामी तसेच पुढील कालावधीसाठी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नव्याने ई-निविदा प्रक्रीया राबविणेकामीचा प्रस्ताव चक्रीय पध्दतीने मा.तदर्थ (Ad-hoc) समिती दि.१२/०९/२०२० रोजी सादर करणेत आलेला होता. सदरचे चक्रीय पध्दतीचे मान्यतेनूसार, सदरहु ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो सध्याचेच ठेकेदार मे.फोकस फॅसिलिटी अॅण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वशि/प्रसादा/१५८२/२०२० दि.२४/०९/२०२० नूसार, दि.१४/०९/२०२० पासून पुढे तीन महिने अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतो या दोहोंपैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरीता आहे त्याच दरात व अटी/शर्तीस अधिन राहुन मुदतवाढीचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदरचे मुदतवाढीचा कार्यादेश देखील दि.१४/१२/२०२० रोजीअखेर संपुष्टात येत आहे.

**उपरोक्त विषयांकितकामी सध्या कार्यरत असलेल्या हाऊसकिपींग ठेकेदारास मुदतवाढ देणेकामी तसेच श्री साई प्रसादालयातील हाऊसिकपींग/स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम तसेच दररोज १०० वाढपी कामगार आऊटसोर्स पदधतीने पुरविणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहीरात देवून ई-निविदा मागविणेकामी मा.तदर्थ समिती दि.१२/०९/२०२० रोजीचे सभेत चक्रीय पध्दतीने मान्यता मिळालेली आहे. तसेच मा.तदर्थ समिती दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४५५/४ सदरहु विषयाचे अवलोकन होवून मान्यता मिळालेली आहे.**

**त्यानूसार इकडील विभागामार्फत संस्थानचे वकील, अॅड.चौकीदार यांना व विधी विभागास पुढील कालावधीसाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी सन-२०२१-२०२२ या एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.४,५५,४०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चार कोटी पंचावन्न लाख चाळीस हजार मात्र) इतका खर्च अपेक्षीत असल्याने सदरचे खर्चास मंजूरी मिळणेकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे खंडपीठ औरंगाबाद येथील पी.आय.एल.नं.१२०/२०१९ मध्ये सिव्हील अॅप्लीकेशनचा मसुदा तातडीने तयार करुन मिळणेकामी अॅड.संजय आर.चौकीदार यांना जा.क्र.एसएसएस/वशि/प्रसादा/१५७९/२०२० दि.२४/०९/२०२० रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. तथापी अॅड.संजय चौकीदार यांनी दि.२४/०९/२०२० रोजीचे ई-मेल पत्राव्दारे खाजगी कारणास्तव जनहित याचिका १२०/२०१९ मध्ये संस्थानचे वतीने त्यांना दिलेले वकील पत्र मागे घेत असल्याबाबत व लवकरात लवकर दुसरे अॅडव्होकेट यांची नेमणूक करणेबाबत विधी विभागाने कळविले आहे. तसेच याबाबत विधी विभागास वेळोवेळी अंतर्गत दुरध्वनीव्दारे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, अॅड.चौकीदार यांचेमार्फत सुरु असलेले संस्थानचे कोर्ट केसेस अॅड.बजाज यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत. दरम्यान विधी विभागाने जा.क्रंएसएसएस/वशि/विधी/२०६०/२०२० दि.०३ नोव्हेंबर,२०२० रोजीचे पत्रान्वये एकूण २१ सिव्हील अर्जास लवकरात लवकर मंजूरी घेणेकामी कार्यवाही करणेबाबत अॅड बजाज यांना कळविण्यात आल्याचे विधी विभागाकडून कळविणेत आले आहे.**

**त्यामुळे सदर पत्र देवून जवळपास तीन महिने होत आहे. तरी देखील आजतागायत सिव्हील अॅप्लीकेशनचा मसुदा अदयापपावेतो तयार करुन मिळालेला नाही.**

सदरहु ई-निविदा प्रक्रिया उपरोक्त टेंडर कालावधी संपेपर्यंत मुदतीत पुर्ण होईल असे वाटत नसल्याने तसेच सदरचे ई-निविदा प्रक्रियेस मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची मान्यता झाल्यांनतर सदरहु विषयाचा निर्णय प्राप्त होणे, वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करणे, प्री बीड मिटींग घेणे, शासन निर्णयानूसार प्राप्त झालेल्या निविदांची संख्या जर तीन पेक्षा कमी असेल तर निविदा



ERP-32

मागील पानावर...

प्राप्त होणेसाठी पहिल्यांदा मुदतवाढ देणे, त्यानंतरही निविदांची संख्या जर ०३ पेक्षा कमी असेल तरी देखील दुस-यांदा मुदतवाढ देणे,तदनंतर प्राप्त झालेल्या निविदांचे टेक्नीकल बीड व प्राईस बीड मा.खरेदी समिती सभेपुढे उघडणे, लेखाशाखा विभागामार्फत तपासून घेणे, निम्नतम दरधारक ठेकेदारास कार्यादेश देणेकामी प्रस्तुत विषयाची टिपणी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेत सादर करणे. तदनंतर संबंधीत ठेकेदारास कार्यादेश देणे. या कामासाठी बराच कालावधी निघून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तथापी, आता दि.१४ नोव्हेंबर,२०२० रोजीचे दिपावली पाडव्याचे मुहूर्तावर श्रींचे मंदीर व श्री साई प्रसादालय भक्तांसाठी खुले करण्यात आलेले आहे. त्यानूसार श्री साई प्रसादालयात दररोज सरासरी ८,००० ते १०,००० भक्त प्रसादभोजनाचा लाभ घेत आहेत. त्याचप्रमाणे श्री साई प्रसादालयामार्फत अंध/अपंग, मुकबधीर शाळा, वृध्दाश्रम, आश्रम शाळा, साईबाबा व साईनाथ या दोन्ही हॉस्पीटलचे रुग्ण, संस्थानचे कोव्हीड सेंटर हॉस्पीटलमधील संक्रमित रुग्ण तसेच क्वारंटाईन केलेले व्यक्ती त्याचप्रमाणे कोरोना विषाणू प्रादुर्भाव सुरक्षिततेसाठी बंदोबस्तासाठी आलेले पोलीस/शासकीय कर्मचारी इत्यादींना दररोज अंदाजे ४००० ते ५००० व्यक्तींसाठी मोफत प्रसादभोजन सेवा पुरविण्यात येत आहेत.

करीता संदर्भिय क्रं.०२ मे.फोकस फॅसिलिटी अॅण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई, हाऊसकिपींग ठेकेदार यांनी करुन दिलेल्या करारनामातील अटी/शर्ती क्रं.३७ नूसार, " नविन टेंडर कालावधीसाठी निविदा मागविण्यासाठी नविन करार करणेसाठी काही कालावधीची आवश्यकता असते त्यामुळे गरज भासल्यास पुढील तीन महिनेपर्यंत अथवा अधिक कालावधीसाठी सध्याचेच मंजूर दरात व याच करारानूसार मुदतवाढ देण्यात येईल. " असे आहे.

उपरोक्त ठेकेदारामार्फत हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलकामी काम करत असलेल्या कामगारांना कोव्हीड-१९ काळात चक्रीय पध्दतीने दररोज ३५ ते ४० कामगार यांना सध्या प्रसादालयात स्वच्छतेची कामे देण्यात येत आहे. तथापी आवश्यक तेवढी भक्तांची भोजन संख्या नसल्याने वाढपी कामगार लावणेत येत नाहीत. सामान्य प्रशासन जा.क्रं.एसएसएस/साप्रशा/आस्था/३३२/२०२० दि.२४ जुन,२०२० चे आदेशान्वये, तथापी सदर कामगारांना मानवतेच्या दृष्टीकोनातून वेतन आदा करणेत येत होते. सदरचे टेंडर हे एकत्रित असल्याने इतर विभांगाप्रमाणेच सध्याचे ठेकेदाराकडील कामगारांना त्यांचे मुदतवाढीच्या कालावधीत सामान्य प्रशासन विभागाचे आदेशान्वये वेतन आदा करावे लागत होते. आता दि.१६/११/२०२० पासून जे कामगार कामावर आहेत त्यांना वेतन आदा करण्यात येते त्यानूसार सध्या हाऊसकिपींग कामगार हे कामावर घेण्यात येत आहेत व त्यांचे हजर दिवसांचे वेतन अदा करण्यात येत आहे. तुर्त लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग बंद असल्याने तेथील कायम कामगार प्रसादालयात वर्ग करुन त्यांचेकडून वाढपीचे कामे करुन घेण्यात येत आहे. त्यामुळे कंत्राटी वाढपी कामगार लावण्यात येत नाहीत तसेच त्यांना वेतनही आदा केले जात नाही. तथापी ०१ जानेवारी २०२१ पासून लाडू निर्मिती विभाग चालू झालेनंतर मात्र गर्दीचे प्रमाणात आवश्यकतेनूसार सदरचे १०० वाढपी कामगार हे कामावर बोलवावे लागतील. कारण भक्त संख्या वाढली असून त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर टेंडर हे एकत्रीत असल्याने भक्तांची प्रसादभोजन घेणेकामी तसेच हाऊसकिपींग व स्वच्छता अभावी गैरसोय होवू नये यासाठी सध्याचे हाऊसकिपींग ठेकेदार यांना फेर मुदतवाढ दयावी लागेल असे मत आहे.

मागणी :- वरील प्रस्तावनेचा विचार करता, सदरहु ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो सध्याचेच ठेकेदार मे.फोकस फॅसिलिटी अॅण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई यांना दि.१४/१२/२०२० पासून पुढे नव्याने ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीकरीता आहे त्याच मंजूर दरात तसेच आहे त्याच करारनाम्यातील व टेंडरमधील अटी/शर्तीस अधिन राहुन फेर मुदतवाढीचा कार्यादेश दयावा लागेल अशी इकडील विभागाचे नम्र मत आहे.

मान्यतेतर श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार मे.फोकस फॅसिलिटी अॅण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई यांनी उपरोक्तकामी BOQ-A व BOQ-B असे दोन दरपत्रक भरुन दिलेले आहे. सदरचे BOQ-A मधील दरपत्रकात तपशिलामध्ये "निविदा कालावधी संपल्यानंतर पुढील ई-निविदा प्रक्रियेस काही काळ उशिर झाल्यास सदर मुदतवाढ कालावधीसाठी BOQ-A ची एकूण रक्कम + BOQ-B मधील अ.नं.४, अ.नं.५ व अ.नं.७ यांची वार्षिक रक्कम ही समान १२ हफ्त्यामध्ये विभागून येणारी मासिक रककम + जीएसटी याप्रमाणे येणारी रक्कम मजूरी म्हणून आदायगी करण्यात येईल." असे मान्य केलेले आहे.

पुढील पानावर...

संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान :- आर्थिक

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत :- वरील प्रास्तविकचा विचार करता, सदरहु ई-निविदा प्रक्रियेस बराच कालावधी जाणार आहे. त्यामुळे भक्तांची हाऊसकिपींग व स्वच्छतेअभावी गैरसोय होवू नये म्हणून प्रस्तावित कामाच्या कार्यादेशाची मुदत दि.१४/१२/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने याबाबत कामाची अडचण होवू नये म्हणून तातडीने निर्णय होणे अत्यंत गरजेचे आहे. करीता तुर्त कामाची निकड म्हणून दि.१४/१२/२०२० पासून पुढे सध्याचेच ठेकेदार मे.फोकस फॅसिलिटी ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस,मुंबई यांना ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीकरीता सध्याचेच मंजूर दरात आहे त्याच अटी/शर्तीस अधिन राहुन फेर मुदतवाढ देणेकामीचा प्रस्तावावर तातडीने निर्णय होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे सदर प्रस्तावावर चक्रीय पध्दतीने निर्णय होणेस सविनय सादर.

9/11/2020

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी

---

आता, सदरहु ई-निविदा प्रक्रियेस बराच कालावधी जाणार आहे. करीता तुर्त कामाची निकड म्हणून दि.१४/१२/२०२० पासून पुढे सध्याचेच ठेकेदार मे.फोकस फॅसिलिटी ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस,मुंबई यांना मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता होईपावेतो व मान्यतेतर वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नव्याने ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीकरीता आहे त्याच मंजूर दरात व केलेल्या करारनाम्यातील अटी/शर्तीस अधिन राहुन मुदतवाढ देण्यात येवून याकामी प्रति माह रक्कम रु.२३,००,०००/- (कोरोना-१९ कालावधीतील बीलानूसार) अक्षरी रु.तेवीस लाख मात्र इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

(श्रीमती गीता प्रविण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानूदास हरीभाऊ पालवे)
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

9/11/2020

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आगेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

217

**चक्रीय पध्दतीने आणलेला विषय**
**दि. 11/01/2021**

विषय – **श्री. साई प्रसादालयातील हाऊस किपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोल कामी तसेच वाढपी कामगार पुरविणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.....**

1. संस्थान प्रशासन वेळोवेळी चक्रीय पध्दतीने विषय सादर करते. संदर्भांकीत विषयात पूर्वीच तदर्थ समितीने तीन महिन्यांची मुदत दिली होती. ती मुदत दि. 14/12/2020 रोजी संपुष्टात आली. या दरम्यान तदर्थ समितीसमक्ष बरेच विषय चक्रीय पध्दतीने सादर करण्यात आले. कदाचित त्यातील काही विषय या विषयाइतके तात्काळ निर्णय घेण्यासारखेही नव्हते.

2. त्याच प्रमाणे दि. 11/12/2020 व 19/12/2020 रोजी तदर्थ समितीच्या बैठका झाल्या. त्या दोन्ही बैठकांत असा कुठलाही प्रस्ताव सादर करण्यात आला नाही.

3. या विषयाबाबत समजावून घेत असतांना श्री. भाऊसाहेब थोरात, लिपिक यांनी असे सांगितले की, तदर्थ समितीने दि. 12/09/2020 रोजी चक्रिय पध्दतीने मान्यता दिल्यानंतर त्याबाबत आजपर्यंत मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करण्यात आलेले नाही. मात्र त्याबाबत कारवाई चालू आहे.

4. वरील परिस्थितीत कार्योत्तर परवानगी देणे अयोग्य वाटते. करिता सदर प्रस्ताव अध्यक्ष व सदस्या श्रीमती बनकर यांच्यातर्फे अमान्य करण्यात येत आहे.

तसेच असे दिसून येते की, सदरचा विषय तदर्थ समितीचे सदस्य सचिव यांनी प्रस्ताव मान्य करुन पाठविला आहे. मात्र सदरचा विषय अजूनही समितीचे दुसरे सदस्य श्री. पालवे यांच्या समक्ष ठेवला गेलेला नाही. अशा परिस्थितीत मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक 23 नोव्हेंबर 2020 च्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करावी.

(श्रीमती गीता बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त,अहमदनगर
तथा सदस्या, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

**दिनांक – 11/01/2021**

संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान :- आर्थिक 218

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत :- वरील प्रास्तविकचा विचार करता, सदरहु ई-निविदा प्रक्रियेस बराच कालावधी जाणार आहे. त्यामुळे भक्तांची हाऊसकिपींग व स्वच्छतेअभावी गैरसोय होवू नये म्हणून प्रस्तावित कामाच्या कार्यादेशाची मुदत दि.१४/१२/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने याबाबत कामाची अडचण होवू नये म्हणून तातडीने निर्णय होणे अत्यंत गरजेचे आहे. करीता तुर्त कामाची निकड म्हणून दि.१४/१२/२०२० पासून पुढे सध्याचेच ठेकेदार मे.फोकस फॅसिलिटी ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस,मुंबई यांना ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीकरीता सध्याचेच मंजूर दरात आहे त्याच अटी/शर्तीस अधिन राहुन फेर मुदतवाढ देणेकामीचा प्रस्तावावर तातडीने निर्णय होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे सदर प्रस्तावावर चक्रीय पध्ततीने निर्णय होणेस सविनय सादर.

9/11/2021

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी

---

आता, सदरहु ई-निविदा प्रक्रियेस बराच कालावधी जाणार आहे. करीता तुर्त कामाची निकड म्हणून दि.१४/१२/२०२० पासून पुढे सध्याचेच ठेकेदार मे.फोकस फॅसिलिटी ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस,मुंबई यांना मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता होईपावेतो व मान्यतेतर वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नव्याने ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होवून नविन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीकरीता आहे त्याच मंजूर दरात व केलेल्या करारनाम्यातील अटी/शर्तीस अधिन राहुन मुदतवाढ देण्यात येवून याकामी प्रति माह रक्कम रु.२३,००,०००/- (कोरोना-१९ कालावधीतील बीलानुसार) अक्षरी रु.तेवीस लाख मात्र इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

(श्रीमती गीता प्रविण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

12/11/2021
(भानूदास हरीभाऊ पालवे)
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

9/11/2021
(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

# मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने आणलेल्या विषयाची टिपणी

श्री साई प्रसादालय विभाग

विषय : पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील (पी.व्ही.पी.पी.) महाविदयालय, प्रवरानगर येथे उभारण्यात येणा-या हॉस्पीटलमधील रुग्णांना नाष्टा व जेवन पुरविणेबाबत ...

टिपणी :-

प्रस्तावना - संदर्भ क्र. १ पत्रात उप-विभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचा अग्रेषित विनंती पत्रात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे :

*'लोणी खुर्द (प्रवरानगर), ता. राहता येथी पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील (पी.व्ही.व्ही.पी.) महाविदयालय येथे कोरोना बाधित रुग्णांकरीता कोव्हीड हॉस्पीटल (डी.सी.एस.सी.) उभारण्यात येणार असून सदर हॉस्पीटल मध्ये ४०० बेड व १०० ऑक्सीजन बेड असे एकूण ५०० बेडची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्या ठिकाणी कोराना बाधित रुग्णांना वैदयकीय सेवा तसेच इतर अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करुन देणेच्या अनुषंगाने त्याची पुर्वतयारी म्हणून मा. आमदार, श्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिनांक २२/०४/२०२१ रोजी संबंधीत यंत्रणाची आढावा बैठक घेण्यात आलेली असून, सदर बैठकीमध्ये पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील (पी.व्ही.व्ही.पी.) महाविदयालय येथील कोव्हीड हॉस्पीटल (डी.सी.एच.सी.) मधील कोरोना बाधित रुग्णांना दोन वेळचे जेवण व नाष्टा देण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. तरी दिनांक २६/०४/२०२१ पासून उक्त कोव्हीड हॉस्पीटल मधील कोरोना बाधित रुगणांची संख्या विचारात घेऊन सदर रुग्णांना जेवन व नाष्टाची सुविधा श्री साईबाबा विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत उपलब्ध करुन देणेस विनंती'*

संदर्भ क्र. २ अन्वये शिर्डी -बाहेर यापुर्वी आप्तकालीन परिस्थितीत (कोपरगांव येथील पुरग्रस्थ नागरीकांकरीता) नाष्टा पाकीटे देण्यासाठी तत्कांनीन मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०७/०८/२०१६ रोजीचे बैठकीतील निर्णय ५०८ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद केले आहे :

**'गोदावरी नदीला महापुर आल्याने नदी काठचे शहर, गांव, वाडया व वस्त्यांमध्ये महापूराचे पाणी घुसल्याने तेथील रहिवाश्यांवर मोठी आपत्ती निर्माण झालेली असल्यामुळे त्यांना नैसर्गिक संकटसमयी संस्थानमार्फत देण्यात आलेल्या अन्नपाकीटास व त्याकामी आलेल्या रुपये १,९८,८५७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच भविष्यात कोणत्याही प्रकारची आपत्कालीन परिस्थिती उदभवल्यास वरिष्ठांच्या सुचनेनुसार संस्थानमार्फत मोफत अन्नपाकीटे उपलब्ध करुन देण्यात यावी, असा धोरणात्मक निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.'**

यासंदर्भात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मध्ये कलम १७ (२) मधील (ण) मध्ये समितीचे पुढीलप्रमाणे कर्तव्य असतील :

*मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.*

सध्या संपूर्ण महाराष्ट्रात सर्वात जास्त कोरोनाचे रुग्ण आढळून येत आहेत. तसेच अहमदनगर जिल्हयातही मोठया प्रमाणात रुग्ण आढळून येत आहे. त्याचबरोबर शिर्डीमध्येही जादाचे रुग्ण आढळून येत आहे. या सर्व रुग्णांची तसेच क्वारंटाईन नागरीकांची साई धर्मशाळा, साईबाबा हॉस्पीटल व साईआश्रम भक्तनिवास येथे उपचाराची सुविधा संस्थानमार्फत करण्यात येत आहे. या सर्वाची नाष्टा व दोन वेळच्या भोजनाची सुविधा कायम कर्मचा-याकरवी करण्यात येत आहे. सध्या विभागात काम करणारे जवळ जवळ २५० कंत्राटी कर्मचारी बंद करण्यात येत आहे. फक्त कायम कर्मचा-याकरवी सोशल डिस्टन्स ठेवून नाष्टा व भोजनाची, परिसर सफाई, चपाती बनविणे व इतर भोजन संबंधीत कामे करण्यात येत आहेत. सध्या आऊटसोर्सचे सर्व कर्मचारी बंद करण्यात आलेले आहेत. आजचे स्थितीत इकडील विभागामार्फत कोव्हीड सेटर व क्वारंटाईनचे ठिकाणी खालील तपशीलाप्रमाणे नाष्टा व भोजनाची सुविधा पुरविण्यात येत असून, कदाचित भविष्यात या संख्येत वाढही होऊ शकते :

पान नं. २ ... वर

ERP-62

220

| अ.नं. | तपशील | नाष्टा / भोजन | दैनंदिन संख्या |
|---|---|---|---|
| १. | कोव्हीड सेंटर<br>साई धर्मशाळा | नाष्टा व दोन वेळचे भोजन | ५५० |
| २. | क्वारंटाईन सेंटर<br>साईआश्रम भक्तनिवास (१०० रुम) | नाष्टा व दोन वेळचे भोजन | ३०० |
| ३. | साईबाबा हॉस्पीटल्स – कोव्हीड रुग्ण | नाष्टा व दोन वेळचे भोजन | ११० |
| | | कोव्हीड रुग्णांकरीता एकूण (अ) : | ९६० |
| ४. | साईनाथ हॉस्पीटल रुग्ण | दोन वेळचे भोजन | १५० |
| ५. | पोलीस | दोन वेळचे भोजन | ४० |
| ६. | अनाथ आश्रम, वृध्दाश्रम, मुक बधीर विदयालय | दोन वेळचे भोजन | १८० |
| ७. | विभागातील कर्तव्यावरील कर्मचारी | प्रत्येकी एक वेळेस भोजन | १५० |
| | | इतर एकूण (ब) : | ५२० |
| | | एकूण अ+ब : | १४८० |

संदर्भीय पत्राचे अनुषंगाने पुढील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे :

संस्थानमार्फत कोरोना रुग्णाकरीता साई धर्मशाळा येथे कोव्हीड सेंटर गेली एक वर्षापासून सुरु करण्यात आले आहे. सध्याच्या वाढत्या रुग्ण संख्येनुसार त्यात बेडची वाढ करण्यात आलेली आहे. आजमितीस तेथे ५०० ते ६०० रुग्ण आहेत. या सर्वांची सकाळच्या नाष्टयांची व दोन वेळच्या भोजनाची व्यवस्था श्री साई प्रसादालयामार्फत तसेच क्वारटाईन नागरीक व डॉक्टर्स यांची नाष्टा व दोन वेळच्या भोजनाची सुविधा साईआश्रम भक्तनिवास (१००० रुम) येथे करण्यात येत आहे. त्यामुळे शिर्डीमध्ये संस्थान अंतर्गत असलेल्या कोव्हीड रुग्णांची नाष्टा व भोजनाची व्यवस्था चांगल्या पध्दतीने करण्यात येत आहे. गेली एक वर्षापासून फक्त शिर्डीतीलच संस्थान नियंत्रणात असलेल्या कोव्हीड सेंटरलाच नाष्टा व भोजन पुरविण्यात येत आहे. इतर कुठल्याही कोव्हीड सेंटरला नाष्टा व भोजन पुरविण्यात येत नाही व तशी आजपावेतो कोणी मागणी केली नाही, याचे अवलोकन होणे गरजेचे आहे.

**मागणी** :- आता, उप-विभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी लोणी येथे सुरु होणा-या कोव्हीड हॉस्पीटल येथे दि. २६/०४/२०२१ पासून ५०० रुग्णांकरीता नाष्टा व दोन वेळच्या भोजनाची सुविधा पुरविणेची मागणी केली आहे. सध्या रुग्णाच्या वाढत्या संख्येबरोबरच कोव्हीड सेंटरमध्येही वाढ होत आहे. शिर्डीतील बरेचशा सामाजिक संस्था, राजकीय व्यक्ती, जवळच्या तालुक्यातील सामाजिक संस्था व राजकीय व्यक्ती शासनाच्या मान्यतेने कोव्हीड सेंटर उभारण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेही अशा प्रकारच्या नाष्टा व भोजनाची मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही वैश्वीक आपत्ती असून, अशी परिस्थिती कधीही उदभवली नाही. त्यामुळे भविष्यात अशा योजनासंबंधीत संस्थानचे धोरण निश्चित होणे आवश्यक आहे. शिवाय एकदा चालू केलेली योजना (नाष्टा, भोजन पुरविणे) परत बंद अडचणीचे होईल. या अतिरीक्त नाष्टा व भोजनाची सुविधा दयावयाची झाल्यास, अतिरीक्त वाढीव कर्मचा-यांची आवश्यकता भासणार आहे.

प्रस्तावित पत्रानुसार नाष्टा व भोजनाची पुर्तता करावयाची झाल्यास, पॅकींगमध्ये पाठविणे शक्य होणार नाही. भोजन लोणी येथील कर्मचारी शिडी येथे येऊन व सोबत स्टेनलस स्टीलची डबे अथवा टिप आणून, श्री साई प्रसादालयातून घेणे अभिप्रेत आहे. शिडी ते लोणी येथील अंतर जवळजवळ २५ ते २० कि.मी. आहेत व सध्या उन्हाळयाचे दिवस आहेत, त्यामुळे कदाचित भोजन पॅकींग केलेने खराब होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. तसेच इतरांनी मागणी केल्यानंतर त्यांनाही ही सुविध दयावी लागणार आहे. शिवाय संबंधीत कोव्हीड सेंटरला यापुर्वी संस्थानने वृध्दाश्रम, अनाथ आश्रम, मुक बधीर विदयालय यांना भोजन पुरविणेकामी बनविणेत आलेल्या नियमावलीचे पालन करावे लागणार आहे, जे 'परिशिष्ट अ' म्हणून सोबत जोडलेले आहे.

पान नं. ३ ... वर

**विभागाचा अभिप्राय :-** संदर्भीय पत्राचे अनुषंगाने कार्यवाही करावयाची झाल्यास, वरील सर्व बाबींचा विचार करुन, धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. सध्या नाष्टा पाकीटांचा सशुल्क दर रुपये ५/- प्रती पॅकेट असून, व्ही.आय.पी. भोजन दर रुपये ५०/- व सर्वसाधारण हॉलमध्ये रुपये १०/- असा होता. आता सर्वसाधारण हॉल मोफत करण्यात आलेला आहे. तसेच ही वैश्वीक आपत्ती असून, अशी परिस्थितीत कधीही उदभवली नाही, त्यामुळे भविष्यात अशा योजनासंबंधीत संस्थानचे धोरण निश्चित होणे आवश्यक आहे. तसेच

(अ) उप-विभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी दि. २२/०४/२०२१ रोजीचे संदर्भीय पत्राचे मागणीनुसार पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील (पी.व्ही.पी.पी.) महाविदयालय, प्रवरानगर येथे उभारण्यात येणा-या ५०० खाटांचे कोव्हीड सेंटर / हॉस्पीटलमधील रुग्णांना नाष्टा व जेवन मोफत पुरविणेबाबत

किवा

(ब) उप-विभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी दि. २२/०४/२०२१ रोजीचे संदर्भीय पत्राचे मागणीनुसार पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील (पी.व्ही.पी.पी.) महाविदयालय, प्रवरानगर येथे उभारण्यात येणा-या ५०० खाटांचे कोव्हीड सेंटर / हॉस्पीटलमधील रुग्णांना सशुल्क (नाष्टा प्रती रुग्ण रुपये ५/- व भोजन प्रती रुग्ण, प्रती वेळेस रुपये १०/- या माफक दरात) पुरविणेबाबत विचार करावा लागेल, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त बाबींचा विचार करता, लोणी येथील कोव्हीड सेंटरला, कोव्हीड सेटर कार्यान्वित असेपर्यंत ५०० खाटांचे रुग्णांना नाष्टा व भोजन मोफत अथवा सशुल्क दरात पुरविणेकामी वरील 'अ' व 'ब'बाबत निर्णय होणे गरजेचे राहील, करीता सदरहु प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सादर करणेस मान्यता असावी, ही विनंती.

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था, शिर्डी

---

यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या कोरोना ही वैश्वीक आपत्ती असून, त्यात मोठया प्रमाणात भारत देशही बाधीत झालेला आहे. त्याची मोठया प्रमाणात झळ जिल्हा व तालुक्यात बसत आहे. त्याकरीता मानवतेच्या दृष्टीकोनातून व वैश्वीक आपत्तीचा विचार करता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्तावित केलेल्या अभिप्रायातील 'अ' व 'ब' बाबत विचार होऊन -

(अ)उप-विभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी दि. २२/०४/२०२१ रोजीचे संदर्भीय पत्राचे मागणीनुसार पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील (पी.व्ही.पी.पी.) महाविदयालय, प्रवरानगर येथे उभारण्यात येणा-या ५०० खाटांचे कोव्हीड सेंटर / हॉस्पीटलमधील रुग्णांना नाष्टा व जेवन मोफत देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

किंवा

(ब) उप-विभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी दि. २२/०४/२०२१ रोजीचे संदर्भीय पत्राचे मागणीनुसार पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील (पी.व्ही.पी.पी.) महाविदयालय, प्रवरानगर येथे उभारण्यात येणा-या ५०० खाटांचे कोव्हीड सेंटर / हॉस्पीटलमधील रुग्णांना सशुल्क (नाष्टा प्रती रुग्ण रुपये ५/- व भोजन प्रती रुग्ण, प्रती वेळेस रुपये १०/- या माफक दरात पुरविणेस मान्यता देण्यात येत आहे.

मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांचे अभिप्रायाप्रमाणे फेरप्रस्ताव तयार करुन समितीसमोर पुन्हा सादर करावा
Pay 29/4/2021

(श्रीमती गीता प्रविण बनकर)
सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानूदास हरीभाऊ पालवे)
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(रविंद्र ठाकरे)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

222

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय, दि. 28/04/2021

विषय – पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील (पी.व्ही.पी.पी.) महाविद्यालय, प्रवरानगर येथे उभारण्यात येणा-या हॉस्पीटलमधील रुग्णांना नाष्टा व जेवन पुरविणेबाबत...

टिपणीचे वाचन केले. प्रशासनाने नोंदलेल्या बाबी सुध्दा विचारात घेतल्या. उप विभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांच्या पत्रावरुन हे स्पष्ट होत नाही की, अशा समर्पित कोव्हीड सेंटरबाबत शासनाची, औषधोपचार तसेच भोजन इत्यादि बाबत काय योजना आहे.. तसेच संपूर्ण विषयाचा अभ्यास संस्थान प्रशासनाने केलेला दिसून येत नाही, कारण सदर समर्पित कोव्हीड सेंटर मोफत औषधोपचार, निवास इत्यादि करणार आहेत किंवा त्याबाबत मोबदला घेणार आहेत, याबाबतीत स्पष्टता नाही. संस्थान प्रशासनाने धोरण निश्चित करण्याचा विचार करतांना 30 कि.मी. च्या परिघात असे किती समर्पित कोव्हीड सेंटर्स आहेत तसेच ते मोफत औषधोपचार करणार आहेत काय? इत्यादि बाबतीत विचार केलेला दिसून येत नाही. त्याचप्रमाणे अशा प्रकारची योजना राबवतांना संस्थान प्रशासनावर, कामगार विभागावर तसेच भोजनगृह इत्यादि बाबत किती भार पडणार आहे. तसेच एक नाष्टा पाकिट/एक जेवणाचे पाकिटा यासाठी संस्थान प्रशासनाला किती खर्च येणार आहे, याचा खुलासा केलेला नाही. संस्थान प्रशासनाने वरील सर्व बाबी तदर्थ समितीसमक्ष स्पष्ट कराव्यात, जेणेकरुन पुढील निर्णय घेता येईल.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 28/04/2021

चक्रीय पद्धतीने आणलेला विषय
दि. 28/04/2021

विषय: पद्मश्री डॉ विठ्ठलराव विखे पाटील (पी.व्ही.पी.) महाविद्यालय, प्रवरानगर येथे उभारण्यात येणाऱ्या हॉस्पीटलमधील रुग्णांना नाष्टा व जेवण पुरविणेबाबत.

प्रस्ताव वाचला. प्रस्तावामधील नमूद बाबी वाचल्या यामधून शासनाची कोवीड सेंटरसाठी असणारी योजना स्पष्ट होत नाही. तसेच संस्थान प्रशासनाने कोव्हीड सेंटर मोफत औषधोपचार, निवास इ. बाबत किंवा मोबदला घेणार असलेबाबत नमूद केलेले नाही. तसेच 30 km च्या परिघामध्ये असणाऱ्या कोव्हीड आहेत किंवा कसे तसेच मोफत औषधोपचार इ. बाबी नमूद नाहीत. या अनुषंगिक बाबी करू पाहताना येणारा खर्च व संस्थान प्रशासनाच्या संबंधित विभागावर येणारा भार स्पष्ट होत नाही. त्यामुळे या बाबींच्या स्पष्टीकरण प्राप्ती नंतर निर्णय घेणे उचित होईल.

(signed)
गी प्र बनकर
सहायक धर्मादाय आयुक्त
तथा सदस्य तदर्थ (Ad hoc)
समिती श्री साईबाबा
संस्थान शिर्डी

28/04/2021

महाराष्ट्र शासन

महसुल विभाग

224

उपविभागीय अधिकारीपविभागीय दंडाधिकारीतथा उ ,

शिर्डी भाग शिर्डी यांचे कार्यालय जिल्हा अहमदनगर

email-sdoshirdi@gmail.nic.in

दुरध्वनी क्र. :- (०२४२३)२५५७५७

क्र/एमएजी-04/161/2021

शिर्डी दि 22/04/2021

प्रति,

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी

28 APR 2021

आवक नं. 1243

प्रसादालय विभाग

अर्कशिट नं.- 60

विभागाकडे दाखल तारीख 28/4/21

टपाल प्रकार - इतर पत्रव्यवहार

कार्यवाहीसाठी देणेचे -

विभाग प्रमुख/अधिक्षक

विषय-पदमश्री डॉ.विठठलराव विखे पाटील(पी.व्ही.व्ही.पी)महाविदयालय प्रवरानगर येथे उभारण्यात येणाऱ्या कोव्हीड हॉस्पीटल मधिल रुग्णांना जेवणाचे पाकीटे पुरविण्या बाबत.

संदर्भ-मा.आमदार श्री राधाकृष्ण विखे पाटील यांची दिनांक 22.04.2021 रोजीची आढावा बैठक

महोदय,

उपरोकत विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, लोणी खु (प्रवरानगर) ता राहाता येथील पदमश्री डॉ विठठलराव विखे पाटील (पी.व्ही.व्ही.पी) महाविदयालय येथे कोरोना बाधित रुग्णां करिता कोव्हीड हॉस्पीटल (डी.सी.एचसी) उभारण्यात येणार असुन सदर हॉस्पीटल मध्ये 400 बेड व 100 ऑक्सीजन बेड असे एकूण 500 बेडची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्या ठिकाणी कोरोना बाधित रुग्णांना वैदयकिय सेवा तसेच इतर अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करुन देणेच्या अनुषंगाने त्याची पुर्वतयारी म्हणुन मा.आमदार श्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिनांक 22.04.2021 रोजी संबधित यंत्रणांची आढावा बैठक घेण्यात आलेली असुन सदर बैठकी मध्ये पदमश्री डॉ विठठलराव विखे पाटील (पी.व्ही.व्ही.पी) महाविदयालय येथील कोव्हीड हॉस्पीटल (डी.सी.एच.सी) मधिल कोरोना बाधित रुग्णानां दोन वेळेचे जेवण व नाष्टा मोफत देण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. तरी **दिनांक 26.04.2021** पासुन उक्त कोव्हीड हॉस्पीटल मधिल कोरोना बाधित रुग्णांची संख्या विचारात घेऊन रुग्णांना जेवण व नाष्टा पाकीट करिता कोणतेही सशुल्क न आकारता मोफत स्वरुपात जेवण व नाष्टयाची सुविधा श्री साईबाबा विश्वस्त व्यवस्था शिर्डी मार्फत उपलब्ध करुन देणेस विंनती.

उपविभागीय अधिकारी

शिर्डी भाग शिर्डी

प्रत- प्राचार्य पदमश्री डॉ विठठलराव विखे पाटील (पी.व्ही.व्ही.पी) महाविदयालय लोणी खु प्रवरानगर यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्त

मा.तदर्थ समिती सभेपुढील विषय

अभिलेख कक्ष

विषय:- जुन्या वाहनांचा फेरलिलाव तसेच निरूपयोगी डेडस्टॉक भंगार साहित्याची जाहीर लिलावाने विक्री करणेबाबत..

महाराष्ट्र अधिनियम २००४ तरतूद- अधिनियमातील कलम १४(२) (ग) व कलम १७ (४) .

प्रस्तावीक:-महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील कलम १४ (२) (ग) मध्ये" समितीच्या अधिका-यांचे अधिकार व कर्तव्यास अधिन राहून अशा प्रकारच्या नाशवंत अर्पण वस्तूंची लिलावाद्वारे किंवा अन्य प्रकारे, विल्हेवाट लावण्याचे आणि त्यांचे उत्पन्न विश्वस्तव्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करण्याचे वगैरे अधिकार आहेत. तसेच कलम १७(४)मध्ये " विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित केलेले, पन्नास हजार रूपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहीर, दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज, समितीकडून विकण्यात येणार नाही,तारण म्हणुन ठेवण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाही." अशी तरतूद आहे. त्यामुळे वापरून निरूपयोगी / खराब झालेल्या भंगार साहित्याचा जडजवाहीर, दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता या प्रकारात समावेश होत नाही, असे स्पष्ट मत आहे. अभिलेख कक्ष विभागास प्राप्त प्रस्तावांतील साहित्यांची घसारावजा किंमत ५० हजार रुपयांचे आत असलेने विभांगानी सादर केलेल्या प्रस्तावांना जाहिर लिलावाने विक्री करणेस प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच मा. व्यवस्थापन समितीची व महाराष्ट्र शासनाची संस्थानचे जुन्या वाहनांची जाहिर लिलावाने विक्री करणेस संदर्भ क्रं.२, दि.१४/०७/२०१७ रोजीचे शासन आदेशानुसार मंजुरी मिळालेल्या २३ वाहनांपैकी दि.२१/०५/२०१८ च्या जाहिर लिलावात ८ वाहने विक्री झाली आहे व दि ०८/०८/२०१९ रोजी आयोजीत जाहिर लिलावात ११ वाहने विक्री झाली. आता, शासनाकडुन लिलावाची मान्यता मिळालेल्या २३ वाहनांपैकी ४ वाहने लिलावासाठी शिल्लक आहेत. जुन्या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करणेसाठी संदर्भ क्रं.३, दि.१८/०३/२०२० रोजीचे वाहन विभागाकडील प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

संदर्भ क्रं.५, दि.०८/११/२०१९ व संदर्भ क्रं.६ दि.२७/०७/२०२० चे परिपत्रकान्वये सध्या इकडील कार्यालयाकडे सामान्य प्रशासन विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग, वाहन विभाग, मेकॅनिकल विभाग, पाणी पुरवठा विभाग इ. विभागांनी त्यांचेकडील निरूपयोगी दैनंदिन वापराने खराब झालेले भंगार डेडस्टॉक साहित्याची व जुन्या वाहनांची विहीत पध्दतीने,जाहीर लिलावाद्वारे विक्री करणेसाठी प्रशासकिय मान्यता घेतलेली आहे. मान्यता मिळालेल्या डेडस्टॉक साहित्याची अंतर्गत लेखापरिक्षण विभागाकडून दि. ३१.०३.२०२० अखेरपर्यंत घसारा वजा जाता किंमतीचा तसेच तयार करणेत आलेल्या लॉटचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | विभागाचे नांव | साहित्याचे लॉटचा तपशिल | साहित्यांची दि.३१.०३.२०२० अखेर एकुण घसारा किंमत रुपये |
|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन विभाग | लॉट नं.१) - निरुपयोगी झेरॉक्स मशिन- ०३ नग, | ४९९३२.९४ |
| | | | पुर्णांकित रक्कम -४९,९३३/- |
| २. | माहिती तंत्रज्ञान विभाग | लॉट नं.२) - निरुपयोगी प्लॉस्टिक खुर्च्या व Revolving Chair -१६ नग | २९६७१.७८ |
| | | | पुर्णांकित रक्कम -२९६७२/- |
| ३. | पाणीपुरवठा विभाग | लॉट नं.३) पाणीपुरवठा विभागाकडील डेडस्टॉक वस्तु.. उदा. रिव्हॉलविंग चेअर, वॉटर मिटर,वॉटर मोटर इ. | ४१,८९९.४४ |
| | | | पुर्णांकित रक्कम -४१,८९९/- |
| ४. | मेकॅनिकल विभाग | लॉट नं.४) वातानुकुलीत यंत्राणा,रेफ्रीजरेशन,वॉटर कुलर,एअर कर्टन,सोलर यंत्रणा, स्टीम जॅक विसल, वर्कशॉप मशिनरी इ. | १,३१,४८४.४२ |
| | | | पुर्णांकित रक्कम -१,३१,४८४/- |
| | | एकुण पुर्णांकित रक्कम – | २,५२,९८८/- |

लॉट नं.५- निरूपयोगी भंगार साहित्याचे लिलावासोबतच वाहन विभागाकडील जुन्या ०४ वाहनांचा फेरलिलाव करणेसाठी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे, उपप्रादेशिक परिवहन विभागाने सदर वाहनांच्या दि.१४/०९/२०२० अखेर कळविलेल्या घसारावजा किंमतीचा तपशिल खालीलप्रमाणे –

| अ.नं. | वाहनाचा प्रकार | वाहन क्रमांक | वाहनाची रजि. दिनांक | टॅक्स | विमा | RTO घसारावजा किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महिंद्रा लोगान,सीडी प्लेअरसह | MH-17-Y-3636 | 10/12/2007 | O.T.T. | 31/03/2021 | ३०,०००/- |
| २ | टाटा सुमो, कारटेपसह | MH-17-V-1701 | 15/12/2006 | O.T.T. | 31/03/2021 | ५०,०००/- |
| ३ | स्कुल बस | MH-17-C-8851 | 22/02/2002 | 31/01/2021पर्यंत | 31/03/2021 | ७०,०००/- |
| ४ | टाटा विंगर रुणवाहिका | MH-17-AG-2418 | 26/04/2011 | टॅक्स माफ | 31/03/2021 | १,००,०००/- |

प्रस्ताव-

१. वाहन विभागाकडील जुन्या ०४ वाहनांचा फेरलिलाव करणेकामी तसेच अभिलेख कक्ष विभागाकडे आलेल्या इतर विभागांच्या

पान ०२ वर..

मान्यताप्राप्त प्रस्तावांतील निरूपयोगी भंगार साहित्यांचा जाहीर लिलाव एकाच दिवशी करणेसाठी तारीख निश्चित करणे..

२. जाहिर लिलावांची तारीख निश्चित केलेनंतर, डेडस्टॉक भंगार साहित्याची जाहीर लिलावाने विक्री करणेसाठी उपरोक्त विभागांनी कळविलेप्रमाणे प्रत्येक लॉटची लिलाव बोली दि.३१/०३/२०२० अखेरचे घसारा किंमतीपासुन पुढे सुरुवात करणे व जुन्या वाहनांची लिलाव बोली दि.१४/०९/२०२० अखेर उप प्रादेशिक परिवाहन कार्यालय (RTO) कडुन प्राप्त किंमतीपासुन पुढे सुरुवात करणे..

३. प्रस्तावीत जाहीर लिलावात स्पर्धा निर्माण व्हावी करिता, जनसंपर्क विभागामार्फत अहमदनगर, नाशिक या ०२ जिल्हयातील एका मराठी वर्तमानपत्रात जाहीरात देणे व आय.टी.विभागामार्फत संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्दी करणे..

४. जाहीर लिलावकामी मा. तदर्थ समिती सदस्यांना निमंत्रित करणे..

५. शासनाकडील निर्देशाप्रमाणे विक्री करण्यात आलेल्या डेडस्टॉक साहित्याचा व जुन्या वाहनांचे जाहीर लिलावाबाबतचा पूर्तता अहवाल महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभागास कळविणे..

उपरोक्त अ.नं.०१ ते ०५ प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेपुढे मान्यतेसाठी चक्रिय पध्दतीने सादर.

29/11/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

---

मा. तदर्थ समितीचा निर्णय

संस्थानचे वाहन विभागाकडील जुन्या ०४ वाहनांचा फेरलिलाव करणेकामी तसेच अभिलेख कक्ष विभागाकडे आलेल्या इतर विभागांच्या मान्यताप्राप्त प्रस्तावांतील निरूपयोगी भंगार साहित्याचा जाहीर लिलाव एकाच दिवशी करणेसाठी तारीख निश्चित करणेस, जाहिर लिलावांची तारिख निश्चित केलेनंतर, डेडस्टॉक भंगार साहित्याची जाहीर लिलावाने विक्री करणेसाठी संबधीत विभागांनी कळविलेप्रमाणे प्रत्येक लॉटची लिलाव बोली दि.३१/०३/२०२० अखेरचे घसारा किंमतीपासुन पुढे सुरुवात करणेस व जुन्या वाहनांची लिलाव बोली दि.१४/०९/२०२० अखेर उप प्रादेशिक परिवाहन कार्यालय (RTO) कडुन प्राप्त किंमतीपासुन पुढे सुरुवात करणेस, प्रस्तावीत जाहीर लिलावात स्पर्धा निर्माण व्हावी करिता, जनसंपर्क विभागामार्फत अहमदनगर, नाशिक या ०२ जिल्हयातील एका मराठी वर्तमानपत्रात जाहीरात देणे व आय.टी विभागामार्फत संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्दी करणेस, जाहीर लिलावकामी मा. तदर्थ समिती सदस्यांना निमंत्रित करणेस, तसेच शासनाकडील निर्देशाप्रमाणे विक्री करण्यात आलेल्या डेडस्टॉक साहित्याचा व जुन्या वाहनांचे जाहीर लिलावाबाबतचा पूर्तता अहवाल महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभागास कळविणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आली.

04/12/2021

(श्रीमती गीता पी.बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर. तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

4/12/2021

(भानुदास एच. पालवे)
अपर आयुक्त,नाशिक विभाग, नाशिक. तथा
तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्यकार्यकारीअधिकारी,तथा
सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

4/12

(श्रीकांत एल.आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,अहमदनगर. तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

विषय क्र.- 9/42



मा.तदर्थ (Ad-hoc)समिती सभेपुढील विषय

अभिलेख कक्ष

विषय:- सन-२०२१-२२ या आर्थिक वर्षामधील संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणा-या निरूपयोगी भंगार/ सादिल स्वरूपाच्या साहित्याची विक्री करणेकामी ई-निविदामागविणेबाबत..

प्रस्ताविक:- साईबाबा संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणा-या निरूपयोगी सादिल स्वरूपाच्या भंगार तसेच डेडस्टॉक साहित्याची सन-२०२०-२१ या आर्थिक वर्षात ई-निविदा पध्दतीने तसेच वर्तमानपत्रात जाहीरात देवून मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार दर मागविण्यात आलेले होते. त्याप्रमाणे प्राप्त झालेल्या मंजुर उच्चतम दराने जमा झालेल्या निरूपयोगी भंगार साहित्याची विक्री करणेत आलेली आहे. आजपावेतो (माहे- नोव्हेंबर-२०२० अखेर) अशा प्रकारच्या भंगार साहित्याचे विक्रीतून एकूण- रू.१२,४७,४६०/- (अक्षरी- बारा लाख सत्तेचाळीस हजार चारशे साठ रूपये मात्र ) संस्थान फंडात जमा करणेत आलेले आहे.

दरवर्षीचे प्रचलित पध्दतीनुसार महाराष्ट्र अधिनियम २००४ मधील कलम १४(२) (ग) व कलम १७(४) ला अधिन राहून रू.५०,०००/- चे आतील दैनंदीन वापराने जमा होणारे निरूपयोगी डेडस्टॉक भंगार साहित्याची यादीनुसार, अभिलेख कक्ष विभागामार्फत विक्री केली जाते तसेच अभिलेख कक्ष विभागाकडील साहित्याचे यादी व्यतिरिक्त इतर साहित्यांची विक्री करावयाची असल्यास संबधित विभागामार्फत कोटेशन मागवुन विक्री करणेत येते, ही प्रचलित पध्दत आहे व अशा प्रकारच्या दैनंदिन वापराने तयार होणा-या निरूपयोगी भंगार / डेडस्टॉक साहीत्याची विक्री करण्याचे अधिकार मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०५.२००८ चे सभेतील निर्णय क्रं.४७६ नुसार मा. व्यवस्थापन समितीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान केलेले आहेत.

सन २०२०-२१ या वर्षात नेमून दिलेल्या व्यापा-यांना भंगार साहित्य विक्रीची मुदत दि.३१.०३.२०२१ रोजी पुर्ण होत असल्याने सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात संस्थानचे दैनंदिन वापराने जमा होणारे भंगार साहित्याची विक्रीची यादी खालीलप्रमाणे..

| अ.नं | साहित्याचे नाव | परिमाण |
|---|---|---|
| १ | रिकामे तेला तूपाचे लहान/मोठे तोंडाचे चांगले डबे | प्रति नग |
| २ | रिकामे तेला तूपाचे लहान/मोठे तोंडाचे तोंड फुटलेले/ चेपलेले/काळे पडलेले खराब डबे | प्रति नग |
| ३ | रिकामे काजूचे डबे (आहे त्या स्थितीत) | प्रति नग |
| ४ | निरूपयोगी गोण्या (कलतान) चांगले (५० किलो भरतीच्या) | प्रति नग |
| ५ | निरूपयोगी गोण्या (कलतान) खराब (५० किलो भरतीच्या) | प्रति नग |
| ६ | प्लॅस्टिक गोण्या | प्रति किलो |
| ७ | प्लॅस्टिक वस्तू (उदा. कचरा कुंडया /बादल्या/मग, छोटे/मोठे फुटलेले ड्रम, फुटलेल्या पाण्याच्या फायबर टाक्या, तुटलेल्या प्लॅस्टिक खुर्च्या) | प्रति किलो |
| ८ | प्लॅस्टिक ड्रम २० लि. ते ५० लि.चे आतील सर्व कलर ( चांगले) | प्रति नग |
| ९ | प्लॅस्टिक ड्रम ५१ लि. ते १०० लि. पर्यंतचे सर्व कलरचे (चांगले) | प्रति नग |
| १० | दुधाच्या रिकाम्या प्लॅस्टिक पिशव्या (भरलेल्या बारदान /गोणीसह) | प्रति किलो |
| ११ | रिकामे खोक्याचा चांगला पुठ्ठा (कार्टून) | प्रति किलो |
| १२ | रिकामे खोक्याचा तेलकट / खराब पुठ्ठा | प्रति किलो |
| १३ | उत्तरपत्रिका व ड पेपर रद्दी (फाडुन भरलेल्या प्लॅस्टिक गोणीसह) | प्रति किलो |
| १४ | लोखंडी भंगार साहित्य | प्रति किलो |
| १५ | लोखंडी कीस | प्रति किलो |
| १६ | लोखंडी पत्र्याचे भंगार साहित्य | प्रति किलो |
| १७ | तांब्याचे भंगार साहित्य | प्रति किलो |
| १८ | पितळी भंगार साहित्य | प्रति किलो |
| १९ | स्टीलचे भंगार साहित्य | प्रति किलो |
| २० | ॲल्युमिनिअम भंगार साहित्य | प्रति किलो |
| २१ | जळालेले इले.बल्ब, टयुबबार | प्रति किलो |
| २२ | इले.टयुबचे जळालेले कॉपर चोक | प्रति नग |
| २३ | इले.टयुबचे जळालेले इलेक्ट्रॉनिक चोक | प्रति नग |
| २४ | सोडीयम लाईटचे जळालेले चोक | प्रति नग |
| २५ | वापरलेले काळे ऑईल | प्रति लिटर |
| २६ | मूर्तीवर वाहीलेले निर्माल्य तेल | प्रति लिटर |
| २७ | विटलेल्या,फाटलेल्या,जीर्ण झालेल्या कापडी वस्तू (उदा.चादर,बेडशीट, ब्लॅकेट, खराब झालेल्या गादया, गादीच्या /उशीच्या खोळी,टॉवेल) | प्रति किलो |
| २८ | निरूपयोगी/जीर्ण झालेल्या कापूस गादया(रूग्णालय सोडून फक्त भक्तनिवासस्थान कडील) | प्रति नग |
| २९ | निरूपयोगी/जीर्ण झालेल्या फोम गादया(रूग्णालय सोडून फक्त भक्तनिवासस्थान कडील) | प्रति नग |
| ३० | लाकडी भंगार साहित्य | प्रति किलो |

पान. ०२ वर..

| अ.नं | साहित्याचे नाव | परिमाण |
|---|---|---|
| ३१ | जनरेटरच्या पांढ-या बॅट-या मोठी साईज | प्रति नग |
| ३२ | जनरेटरच्या काळया बॅट-या मोठी साईज | प्रति नग |
| ३३ | संगणकाच्या निकामी बॅट-या मोठी साईज | प्रति नग |
| ३४ | संगणकाच्या वापरून खराब झालेले प्रिन्टर,रिबन, टोनर, टेलीफोन,घडयाळे,कचकडी इत्यादी वस्तु | प्रति किलो |
| ३५ | रिकाम्या पाण्याच्या प्लॅस्टिक बाटल्या | प्रति किलो |
| ३६ | कागदाची चूर केलेली रद्दी | प्रति किलो |
| ३७ | रंगीत कागदाची रद्दी (कुपनबुकें, केसपेपरसह इतर रंगीत फाडलेली) | प्रति किलो |
| ३८ | संगणकाच्या निकामी छोटया बॅट-या | प्रति किलो |
| ३९ | खराब झालेले कारपेट | प्रति किलो |
| ४० | बाईडींग पुठ्ठा | प्रति किलो |
| ४१ | बीडाचे भंगार साहित्य | प्रति किलो |

प्रस्ताव–

१) उपरोक्त नमुद केल्यानुसार अ.क्रं.१ ते ४१ मधील भंगार साहित्य सन २०२१-२२ या वर्षात उच्चतम दराने विक्री करण्यासाठी ई-निविदा मागविण्यास मान्यता असावी.

२) सदर ई-निविदा जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत अहमदनगर, नाशिक या ठिकाणच्या मराठी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यास..

३) सदर ई-निविदेच्या तांत्रिक व वाणीज्यीक निविदा संस्थानच्या खरेदी समितीसमोर उघडण्यास मान्यता असावी.

४) ई-निविदेद्वारे प्राप्त उच्चतम दर धारकास दि. ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२२ या कालावधीत प्राप्त भंगार साहित्य विकत घेण्यासाठी आदेश देण्यास मान्यता असावी.

उपरोक्तप्रमाणे मुद्दा क्रं १ ते ४ नुसार निर्णयासाठी मा. तदर्थ समितीसमोर चक्रिय पध्दतीने सविनय सादर..

9/1/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

मा. तदर्थ समितीचा निर्णय

सन-२०२१-२२ या आर्थिक वर्षामधील संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणा-या निरूपयोगी भंगार/ सादिल स्वरूपाच्या साहित्याची विक्री करणेकामी अ.क्रं.१ ते ४१ मधील भंगार साहित्य सन २०२१-२२ या वर्षात उच्चतम दराने विक्री करण्यासाठी ई-निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदर ई-निविदा जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत अहमदनगर, नाशिक या ठिकाणच्या मराठी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यास, ई-निविदेच्या तांत्रिक व वाणीज्यीक निविदा संस्थानच्या खरेदी समितीसमोर उघडण्यास, ई-निविदेद्वारे प्राप्त उच्चतम दरधारकास दि. ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२२ या कालावधीत प्राप्त भंगार साहित्य विकत घेण्यासाठी आदेश देण्यास चक्रीय पध्दतीने मान्यता देण्यात आली.

04/01/2020

(श्रीमती गीता पी.बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर. तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

4/1/2021

(आनुदास एच. पालवे)
अपर आयुक्त,नाशिक विभाग, नाशिक. तथा
तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्यकार्यकारीअधिकारी,तथा
सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

4/1

(श्रीकांत एल.आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,अहमदनगर. तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

विषय क्र.- ७/५३

## मा.तदर्थ समिती सभेपुढील विषय

### अभिलेख कक्ष

**विषय:- सन-२०२१-२२ या आर्थिक वर्षात निरूपयोगी भंगार साहित्य विक्रीकामी प्राप्त ई-निविदातील उच्चत्तम दरासंदर्भात निर्णय होणेबाबत..**

प्रस्ताविक:- मा. तदर्थ समिती दि.०४/०२/२०२१ रोजीचे चक्रीय पध्दतीने मंजुर निर्णयानुसार सन-२०२१-२२ या वर्षात संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणारे निरूपयोगी भंगार साहित्याची विहीत पध्दतीने विक्री करणेसाठी मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार ऑनलाईन व्यापा-यांकडून भंगार साहित्य विक्रीकामी ई-निविदा मागविणेत आलेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| ०१ | विक्री करावयाचे साहित्य/वस्तूचा तपशिल | अ.नं.१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे |
| ०२ | मागणी | अ.नं.१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे |
| ०३ | ई-निविदा प्रसिध्दी | दि. ०८/०३/२०२१ ते १९/०३/२०२१ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in संस्थान वेबसाईटवर व मागिल वर्षाच्या व्यापा-यांना दुरध्वनीवरुन |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले | -- |
| ०६ | निविदा सुरू झालेची दिनांक व वेळ | दि. ०८/०३/२०२१, टेक्नीकल बीड – २५/०३/२०२१, कमर्शियल बीड – १५/०४/२०२१ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०८ |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०७ |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | - |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम अदा केली आहे का | होय . |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का | - |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर- | |

| S. No. | Description of Work / Item(s) | Qty. | Units | Shaik Samad Sayyad | MAHAKALI INDUSTRIES | Tulsidas Velji And Co. | HIMALAYA EXIM AND TRADE | KHWAJA GARIB NAWAZ PLASTIC | Sanat Enterprises | DOSTANA SCRAP CENTER |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate |
| 1 | रिकामे तेलातूपाचे लहान/मोठे तॉडाचे चांगले डबे | 1.00 | प्रति नग | 0.00 | 33.04 | 40.00 | 5.00 | 5.00 | 20.00 | 39.00 |
| 2 | रिकामे तेलातूपाचे लहान/मोठे तॉडाचे तॉड फुटलेले / चेपलेले/काळे पडलेले खराब डबे | 1.00 | प्रति नग | 0.00 | 27.14 | 0.00 | 3.00 | 5.00 | 10.00 | 31.20 |
| 3 | रिकामे काजूचे डबे (आहे त्या स्थितीत) | 1.00 | प्रति नग | 0.00 | 12.98 | 0.00 | 5.00 | 10.00 | 12.00 | 15.00 |
| 4 | निरूपयोगी गोण्या (कलतान) चांगले (५० किलो भरतीच्या) | 1.00 | प्रति नग | 0.00 | 0.00 | 17.82 | 1.50 | 15.00 | 0.00 | 12.00 |
| 5 | निरूपयोगी गोण्या (कलतान) खराब (५० किलो भरतीच्या) | 1.00 | प्रति नग | 0.00 | 0.00 | 14.91 | 1.50 | 8.00 | 0.00 | 10.50 |
| 6 | प्लॉस्टिक गोण्या | 1.00 | प्रति किलो | 11.25 | 0.00 | 13.50 | 5.00 | 10.00 | 7.00 | 11.00 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | प्लॉस्टिक वस्तू (उदा. कचरा कुंडया /बादल्या/मग, छोटे/मोठे फुटलेले ड्रम, फुटलेल्या पाण्याच्या फायबर टाक्या, तुटलेल्या प्लॅस्टिक खुर्च्या इ.) | 1.00 | प्रति किलो | 0.00 | 0.00 | 0.00 | 5.00 | 15.00 | 18.00 | 17.00 |
| 8 | प्लॉस्टिक ड्रम २० लि. ते ५० लि.चे आतील सर्व कलर ( चांगले) | 1.00 | प्रति नग | 0.00 | 0.00 | 0.00 | 7.00 | 10.00 | 20.00 | 20.00 |
| 9 | प्लॉस्टिक ड्रम ५१ लि. ते १०० लि. पर्यंतचे सर्व कलरचे (चांगले) | 1.00 | प्रति नग | 0.00 | 0.00 | 0.00 | 20.00 | 50.00 | 30.00 | 30.00 |
| 10 | दुधाच्या रिकाम्या प्लॉस्टिक पिशव्या (भरलेल्या बारदान /गोणीसह) | 1.00 | प्रति किलो | 0.00 | 0.00 | 0.00 | 5.00 | 3.00 | 10.00 | 19.00 |
| 11 | रिकामे खोक्याचा चांगला पुठ्ठा (कार्टून) | 1.00 | प्रति किलो | 0.00 | 0.00 | 0.00 | 4.00 | 10.00 | 8.00 | 13.00 |
| 12 | रिकामे खोक्याचा तेलकट / खराब पुठ्ठा | 1.00 | प्रति किलो | 0.00 | 0.00 | 0.00 | 2.50 | 0.00 | 2.00 | 12.00 |
| 13 | उत्तर पत्रिका व इतर तत्सम रद्दी (भरलेल्या बारदान गोणीसह) | 1.00 | प्रति किलो | 12.50 | 0.00 | 0.00 | 2.00 | 10.00 | 8.00 | 11.00 |
| 14 | निरूपयोगी लोखंडी भंगार साहित्य | 1.00 | प्रति किलो | 0.00 | 0.00 | 0.00 | 15.00 | 25.00 | 22.00 | 20.00 |
| 15 | लोखंडी कीस | 1.00 | प्रति किलो | 9.50 | 0.00 | 0.00 | 10.00 | 10.00 | 11.00 | 4.00 |
| 16 | निरूपयोगी लोखंडी पत्र्याचे भंगार साहित्य | 1.00 | प्रति किलो | 0.00 | 0.00 | 0.00 | 10.00 | 15.00 | 14.00 | 10.00 |
| 17 | निकामी तांब्याचे भंगार साहित्य | 1.00 | प्रति किलो | 0.00 | 0.00 | 0.00 | 250.00 | 400.00 | 350.00 | 300.00 |
| 18 | निरूपयोगी पितळी भंगार साहित्य | 1.00 | प्रति किलो | 0.00 | 0.00 | 0.00 | 200.00 | 300.00 | 250.00 | 275.00 |
| 19 | निकामी स्टीलचे भंगार साहित्य | 1.00 | प्रति किलो | 0.00 | 0.00 | 0.00 | 20.00 | 30.00 | 25.00 | 51.00 |
| 20 | निकामी ॲल्युमिनिअम भंगार साहित्य | 1.00 | प्रति किलो | 0.00 | 0.00 | 0.00 | 50.00 | 100.00 | 70.00 | 95.00 |
| 21 | जळालेले इले.बल्ब, टयुबबार इ. | 1.00 | प्रति किलो | 7.50 | 0.00 | 0.00 | .50 | 0.00 | 0.00 | 1.50 |
| 22 | इले.टयुबचे जळालेले कॉपर चोक | 1.00 | प्रति नग | 0.00 | 0.00 | 0.00 | .50 | 10.00 | 15.00 | 16.00 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 23 | इले.टयुबचे जळालेले इलेक्ट्रॉनिक चोक | 1.00 | प्रति नग | 0:00 | 0:00 | 0:00 | 50 | 5:00 | 0:00 | 4:00 |
| 24 | सोडीयम लाईटचे जळालेले चोक | 1.00 | प्रति नग | 0:00 | 0:00 | 0:00 | 20:00 | 5:00 | 0:00 | 75:00 |
| 25 | वापरलेले काळे ऑईल | 1.00 | प्रति लिटर | 0:00 | 0:00 | 0:00 | 15:00 | 15:00 | 7:00 | 18:00 |
| 26 | मूर्तीवर वाहीलेले निर्माल्य तेल | 1.00 | प्रति लिटर | 0:00 | 0:00 | 0:00 | 20:00 | 15:00 | 15:00 | 30:00 |
| 27 | विटलेल्या,फाटलेल्या, जीर्ण झालेल्या कापडी वस्तू (उदा.चादर,बेडशीट, ब्लँकेट, खराब झालेल्या गादया, गादीच्या /उशीच्या खोळी,टॉवेल) | 1.00 | प्रति किलो | 0:00 | 0:00 | 0:00 | 2:00 | 10:00 | 0:00 | 11:00 |
| 28 | निरूपयोगी/जीर्ण झालेल्या कापूस गादया(रुग्णालय सोडून फक्त भक्त निवासस्थान कडील) | 1.00 | प्रति नग | 0:00 | 0:00 | 0:00 | 25:00 | 2:00 | 0:00 | 51:00 |
| 29 | निरूपयोगी/जीर्ण झालेल्या फोम गादया(रुग्णालय सोडून फक्त भक्त निवासस्थान कडील) | 1.00 | प्रति नग | 0:00 | 0:00 | 0:00 | 20:00 | 50:00 | 0:00 | 41:00 |
| 30 | लाकडी भंगार साहित्य | 1.00 | प्रति किलो | 5:00 | 0:00 | 0:00 | 2:00 | 2:00 | 3:00 | 2:00 |
| 31 | जनरेटरच्या पांढ-या बॅट-या मोठी साईज | 1.00 | प्रति नग | 0:00 | 0:00 | 0:00 | 200:00 | 1700:00 | 1000:00 | 2800:00 |
| 32 | जनरेटरच्या काळया बॅट-या मोठी साईज | 1.00 | प्रति नग | 0:00 | 0:00 | 0:00 | 200:00 | 1100:00 | 400:00 | 2500:00 |
| 33 | संगणकाच्या निकामी बॅट-या मोठी साईज | 1.00 | प्रति नग | 10:00 | 0:00 | 0:00 | 200:00 | 100:00 | 120:00 | 1100:00 |
| 34 | संगणकाच्या वापरून खराब झालेले प्रिंन्टर,रिबन, टोनर, टेलीफोन,घडयाळे,कच कडी इत्यादी वस्तु | 1.00 | प्रति किलो | 10:00 | 0:00 | 0:00 | 10:00 | 5:00 | 10:00 | 9:00 |
| 35 | रिकाम्या पाण्याच्या प्लॅस्टिक बाटल्या | 1.00 | प्रति किलो | 0:00 | 0:00 | 0:00 | 2:00 | 15:00 | 25:00 | 17:00 |
| 36 | कागदाची चूर केलेली रद्दी | 1.00 | प्रति किलो | 5:50 | 0:00 | 0:00 | 2:00 | 3:00 | 3:00 | 2:00 |
| 37 | रंगीत कागदाची रद्दी (कुपनबुके, केसपेपरसह इतर रंगीत फाडलेली) | 1.00 | प्रति किलो | 10:25 | 0:00 | 0:00 | 2:00 | 3:00 | 3:00 | 10:25 |
| 38 | संगणकाच्या निकामी छोटया बॅट-या | 1.00 | प्रति किलो | 0:00 | 0:00 | 0:00 | 10:00 | 55:00 | 120:00 | 81:00 |
| 39 | खराब झालेले कारपेट | 1.00 | प्रति किलो | 0:00 | 0:00 | 0:00 | 3:00 | 1:00 | 0:00 | 0:00 |
| 40 | वाईंडींग पुठ्ठा | 1.00 | प्रति किलो | 0:00 | 0:00 | 0:00 | 3:00 | 1:00 | 3:00 | 5:00 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 41 | बीडाचे भंगार साहित्य | 1.00 | प्रति किलो | 21.50 | 0.00 | 0.00 | 15.00 | 26.00 | 16.00 | 15.00 |

१३ यापूर्वी केलेल्या खरेदीचा तपशिल आणि खरेदी दर-

| अ.नं. | वर्ष | परिमाण | दर प्रती नग रू. |
|---|---|---|---|
| अ.नं.२३ मध्ये नमूद केलेप्रमाणे. | | | |

१४ मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल-

| अ.नं. | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|
| -- | -- | ---- |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | ---- |
| १६ | मागील खरेदी दर | - |
| १७ | मागील पुरवठादार | - |
| १८ | सध्याचे न्युनत्तम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं.१२ प्रमाणे |
| १९ | सध्याचे न्युनत्तम निविदाकाराचे नांव | वरील अ.नं.१२ प्रमाणे |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नांवे | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>मा.मुख्य लेखाधिकारी,<br>मा.प्रशासकीय अधिकारी,<br>प्र.अधिक्षक, अभिलेख कक्ष विभाग |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशिल अंदाजे रू -/----.प्रती | |

२३ मागील दर व सध्याचे प्राप्त दर यातील तुलनात्मक तक्ता

| अ.नं. | तपशिल | मागील वर्षीचे खरेदी दर | सध्याचे प्राप्त दर | कमी/जास्त |
|---|---|---|---|---|
| 1 | रिकामे तेलातूपाचे लहान / मोठे तोंडाचे चांगले डबे | 50.74 | 39.00 | 11.74 ने कमी |
| 2 | रिकामे तेलातूपाचे लहान/मोठे तोंडाचे तोंड फुटलेले / चेपलेले/काळे पडलेले खराब डबे | 31.10 | 31.20 | .10 ने जास्त |
| 3 | रिकामे काजूचे डबे (आहे त्या स्थितीत) | 13.25 | 15.00 | 1.75 ने जास्त |
| 4 | निरूपयोगी गोण्या (कलतान) चांगले (५० किलो भरतीच्या ) | 17.25 | 17.82 | .57 ने जास्त |
| 5 | निरूपयोगी गोण्या (कलतान) खराब (५० किलो भरतीच्या ) | 13.72 | 14.91 | 1.19 ने जास्त |
| 6 | प्लॉस्टिक गोण्या | 13.03 | 13.50 | .47 ने जास्त |
| 7 | प्लॉस्टिक वस्तू (उदा. कचरा कुंडया /बादल्या/मग,छोटे/मोठे फुटलेले ड्रम, फुटलेल्या पाण्याच्या फायबर टाक्या इ.) | 21.50 | 18.00 | 3.50 ने कमी |
| 8 | प्लॉस्टिक ड्रम २० लि. ते ५० लि.चे आतील सर्व कलर ( चांगले) | 41.00 | 20.00 | 21 ने कमी |
| 9 | प्लॉस्टिक ड्रम ५१ लि. ते १०० लिं. पर्यंतचे सर्व कलरचे (चांगले) | 56.00 | 50.00 | 6 ने कमी |
| 10 | दुधाच्या रिकाम्या प्लॉस्टिक पिशव्या (भरलेल्या बारदान /गोणीसह) | 14.00 | 19.00 | 5 ने जास्त |
| 11 | रिकामा खोक्याचा चांगला पुठ्ठा (कार्टून) | 9.25 | 13.00 | 3.75 ने जास्त |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 12 | रिकामा खोक्याचा तेलकट / खराब पुठ्ठा | 8.52 | 12.00 | 3.48 ने जास्त |
| 13 | उत्तर पत्रिका व इतर तत्सम रद्दी (भरलेल्या बारदान गोणीसह) | 11.25 | 12.50 | 1.25 ने जास्त |
| 14 | निरूपयोगी लोखंडी भंगार साहित्य | 21.52 | 25.00 | 3.48 ने जास्त |
| 15 | लोखंडी कीस | 7.50 | 11.00 | 3.50 ने जास्त |
| 16 | निरूपयोगी लोखंडी पत्र्याचे भंगार साहित्य | 13.20 | 15.00 | 1.80 ने जास्त |
| 17 | निकामी तांब्याचे भंगार साहित्य | 301.25 | 400.00 | 98.75 ने जास्त |
| 18 | निरूपयोगी पितळी भंगार साहित्य | 195 | 300.00 | 105 ने जास्त |
| 19 | निकामी स्टीलचे भंगार साहित्य | 37.50 | 51.00 | 13.50 ने जास्त |
| 20 | निकामी ॲल्युमिनिअम भंगार साहित्य | 71.50 | 100.00 | 28.50 ने जास्त |
| 21 | जळालेले इले.बल्ब, ट्युबबार इ. | 0.30 | 7.50 | 7.20 ने जास्त |
| 22 | इले.ट्युबचे जळालेले कॉपर चोक | 18.00 | 16.00 | 2 ने कमी |
| 23 | इले.ट्युबचे जळालेले इलेक्ट्रॉनिक चोक | 32.50 | 5.00 | 27.50 ने कमी |
| 24 | सोडीयम लाईटचे जळालेले चोक | 85.00 | 75.00 | 10 ने कमी |
| 25 | वापरलेले काळे ऑईल | 17.00 | 18.00 | 1 ने जास्त |
| 26 | मूर्तीवर वाहीलेले निर्माल्य तेल | 36.90 | 30.00 | 6.90 ने कमी |
| 27 | विटलेल्या,फाटलेल्या,जीर्ण झालेल्या कापडी वस्तू (उदा.चादर,बेडशीट, ब्लॅकेट, खराब झालेल्या गादया, गादीच्या /उशीच्या खोळी,टॉवेल, इ.) | 7.85 | 11.00 | 3.15 ने ~~कमी~~ जास्त |
| 28 | निरूपयोगी/जीर्ण झालेल्या कापूस गादया (रूग्णालय सोडून फक्त निवासस्थान विभागाकडील) | 41.00 | 51.00 | 10 ने जास्त |
| 29 | निरूपयोगी/जीर्ण झालेल्या फोम गादया (रूग्णालय सोडून फक्त निवासस्थान विभागाकडील) | 51.00 | 50.00 | 1 ने कमी |
| 30 | निरूपयोगी /अनावश्यक लाकडी भंगार साहित्य | 3.00 | 5.00 | 2 ने जास्त |
| 31 | निरूपयोगी जनरेटरच्या पांढ-या बॅट-या मोठी साईज | 1786.00 | 2800.00 | 1014 ने जास्त |
| 32 | निरूपयोगी जनरेटरच्या काळया बॅट-या मोठी साईज | 1550.00 | 2500.00 | 950 ने जास्त |
| 33 | संगणकाच्या निकामी बॅट-या मोठी साईज | 151.00 | 1100.00 | 949 ने जास्त |
| 34 | संगणकाच्या वापरून खराब झालेले प्रिंन्टर,रिबन,टोनर,टेलीफोन,घडयाळे इ. | 7.00 | 10.00 | 3 ने जास्त |
| 35 | रिकाम्या पाण्याच्या प्लॉस्टिक बांटल्या | 23.43 | 25.00 | 1.57 ने जास्त |
| 36 | कागदाची चूर केलेली रद्दी | 3.01 | 5.50 | 2.49 ने जास्त |
| 37 | रंगीत कागदाची रद्दी | 10.25 | 10.25 | समान |
| 38 | संगणकाच्या निकामी छोटया बॅट-या | 45.00 | 120.00 | 75 ने जास्त |
| 39 | निरूपयोगी खराब झालेले कारपेट | 2.50 | 3.00 | .50 ने जास्त |
| 40 | बाईंडींग पुठ्ठा | 3.50 | 5.00 | 1.5 ने जास्त |
| 41 | बीडाचे भंगार | 17.00 | 26.00 | 9 ने जास्त |

२४ सदर खरेदीसाठी विभागाने निश्चित केलेला अंदाजे खर्च रू. -- निरंक

प्रस्ताव-

१) ऑनलाईन प्राप्त झालेल्या ०८ निविदाधारकापैंकी ०७ पात्र निविदाधारकांनी सादर केलेल्या दरांमध्ये अ.नं.१२ मधील क्रं.८ प्लॅस्टिक ड्रम २० लि ते ५० लि.चे आतील सर्व कलर (चांगले) या साहित्याचे दर, सना इंटरप्राईजेस, राहाता व दोस्ताना स्क्रॅप सेंटर,

कोपरगाव यांचे दर (रु.२०) सारखे आलेले असल्याने उच्चतम दराबाबत, दोघांशी कोवीड १९ चे पार्श्वभूमीवर ई-मेलद्वारे उच्चतम दर मागविणेत आले असुन त्यात दोस्ताना स्क्रॅप सेंटर, कोपरगाव यांचा दर (३१ रु) जास्त असुन सदर दर देणेस मान्य केले आहे.

२) उपरोक्त अ.क्रं १२ मधील क्रं. ३४, संगणकाच्या वापरुन खराब झालेले प्रिन्टर,रिबन, टोनर,टेलीफोन,घडयाळे,कचकडी इ.वस्तु या साहित्याचे दर, हिमालया इक्झीम ॲन्ड ट्रेड, चाळीसगाव व सना इंटरप्राईझेस, राहाता यांचे दर (रु.१०) सारखे आलेले असल्याने उच्चतम दराबाबत दोघांशी कोवीड १९ चे पार्श्वभूमीवर ई-मेलद्वारे उच्चतम दर मागविणेत आले असुन त्यात सना इंटरप्राईझेस, राहाता यांचा दर (रु.१०.५०) जास्त असुन सदर दर देणेस मान्य केले आहे.

३) तसेच उपरोक्त अ.क्रं १२ मधील क्रं. ३७, रंगीत कागदाची रद्दी (कुपनबुके, केसपेपरसह इतर रंगीत रद्दी फाडलेली) या साहित्याचे दर, शफीक समा सय्यद, कोपरगाव व दोस्ताना स्क्रॅप सेंटर, कोपरगाव यांचे दर (रु.१०.२५) सारखे आलेले असल्याने उच्चतम दरांबाबत दोघांशी कोवीड १९ चे पार्श्वभूमीवर ई-मेलद्वारे उच्चतम दर मागविणेत आले असुन त्यात शफीक समा सय्यद, कोपरगाव यांचा दर (रु.१०.७५) जास्त असुन सदर दर देणेस मान्य केले आहे.

तरी, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी ऑनलाईन प्राप्त झालेल्या ०८ निविदामधील पात्र ०७ निविदाधारकांनी सादर केलेल्या उपरोक्त अ.नं.१२ मध्ये दर्शविलेले उच्चत्तम दरांस तसेच समान आलेल्या साहित्यांबाबत कोवीड १९ चे पार्श्वभूमीवर ई-मेलद्वारे उच्चतम दर मागविणेत आले असुन जादा दर दिलेल्या निविदाधारकास कार्यादेश देण्यास मान्यता मिळणेस तसेच मान्यतेनंतर उच्चतम दरधारकास कार्यादेश देणेसाठी सदरचा विषय मा. तदर्थ (Ad-hoc ) समितीपुढे चक्रीय पध्दतीने सादर..

10/5/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

मा. तदर्थ समितीचा निर्णय

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात निरुपयोगी भंगार साहित्य विक्रीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील अ.नं.१२ मध्ये दर्शविलेल्या साहित्यांच्या दरांपैकी प्राप्त उच्चतम दराने साहित्य विक्री करणेस व उच्चतम दर धारकांस कार्यादेश देणेस मान्यता देण्यात आली. तसेच समान दर आलेल्या साहित्यांची विक्रीबाबत कोवीड १९ चे पार्श्वभूमीवर ई-मेलद्वारे मागविणेत आलेल्या दरांमध्ये जादा दर दिलेल्या निविदाधारकास कार्यादेश देण्यास चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आली.

09/06/2021

(श्रीमती गीता पी.बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर. तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

9/6/2021

(भानुदास एच. पालवे)
अपर आयुक्त,नाशिक विभाग, नाशिक. तथा
तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

2/6

(श्रीकांत एल.आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,अहमदनगर.तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

विषय क्र.- 9148



मा.तदर्थ समितीचे सभेपुढील विषय

लेखाशाखा

**विषय :- संस्थान आयकर कामकाजाची निकड व कालमर्यादा विचारात घेऊन नव्याने कर सल्लागार लेखापरिक्षण संस्थेची नियुक्ती करणेबाबत..**

टिपणी:-

संस्थानचे आयकर विवरणपत्र दाखल करणे, करनिर्धारण करणे, आयकर विभागाच्या वेळोवेळी आलेल्या नोटीसांची पुर्तता करणे, आवश्यकतेप्रमाणे आयकर अपील दाखल करणे इ. कामकाजाकरिता मा.तदर्थ समितीने दि.१०.१२.२०२० रोजी चक्रीय पद्धतीने मे.आर.आर. मुनी ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंट, मुंबई यांची करनिर्धारण वर्षनिहाय रु.३ लाख + जीएसटी या फी वर नियुक्ती करण्यास मान्यता दिली होती. त्यास अनुसरुन दि.१८.१२.२०२० रोजी मे.आर.आर. मुनी यांना नियुक्ती आदेश देण्यात आला होता. तथापि, दि.१९.१२.२०२० रोजीचे ई-मेल व्दारे यापुर्वी त्यांनी दिलेल्या प्रस्तावा व्यतिरिक्त फी ची मागणी ते करत आहे. दि.२०.१२.२०२० रोजीचे ई-मेल व्दारे त्याप्रमाणे फी निश्चित करणेबाबत अथवा त्यांचेकडे असलेले कागदपत्रे फाईल्स घेऊन जाणेबाबत त्यांनी दि.२४.१२.२०२० चे ई मेल व्दारे कळविले आहे.

दि.०१.१२.२०२० रोजीचे ई-मेल प्रस्तावात त्यांनी (१) दि.०१.०४.२०१९ पासुन मासिक रु.७५,०००/- अधिक कर अथवा (२) कर निर्धारण वर्ष निहाय २०१३-१४ पासुन प्रत्येकी रु.३ लाख अधिक कर असा प्रस्ताव दिला होता. आयकर विषयक कामकाजाची कालमर्यादा व निकड याचा विचार करुन मा.तदर्थ समितीने प्रस्ताव क्र.२ प्रमाणे मान्यता दिली होती. तथापी सीए आर.आर.मुनी यांनी दि.०१.०४.२०२० ते दि.३१.१२.२०२० कालावधी करिता मासिक रु.७५,०००/- असे एकुण रु. ६,७५,०००/- व त्यापुढे प्रति करनिर्धारण वर्षनिहाय रु. ३ लाख अधिक त्यांवरील कर अशी मागणी केली आहे. नियुक्ती आदेशानुसार त्यांच्या पहिल्या प्रस्तावा व्यतिरीक्त रु.६,७५,०००/- इतकी जास्त फी मागणी त्यांनी केली आहे. मा.तदर्थ समितीच्या मान्यतेपेक्षा बाढीव मागणी असुन, त्यांच्या पहिल्या प्रस्तावा व्यतिरीक्त ते मागणी करत असुन, सदर बाबत मा.मुख्यलेखाधिकारी, लेखाधिकारी यांनी त्यांचेबरोबर चर्चा केली असुन, तरी ते पुढील काम करण्यास तयार नाहीत.

सध्या आयकर विभागाकडून आलेल्या नोटिसांसंबधीत पुढील कामे अत्यंत तातडीने करावी लागणार आहेत. करनिर्धारण वर्ष २०१८-१९ चे ऑनलाईन करनिर्धारण करणे संबंधीत आवश्यक कागदपत्रे दि.०१.०१.२०२१ अखेर सादर करण्यास आयकर विभागाने नोटीसीद्वारे कळविले आहे, कर निर्धारण वर्ष २०१७-१८ चे अपिल संबधीत माहिती दि.०७.०१.२०२१ अखेर दाखल करावी लागणार आहे, आर्थिक वर्ष २०१९-२० चे वैधानिक लेखापरिक्षणाअंती दि.३१.०१.२०२१ अखेर आयकर विवरणपत्र दाखल करणे आवश्यक आहे, करनिर्धारण वर्ष २०१३-१४ व २०१५-१६ चे अपिल सुनावणी प्रलंबित असुन आयकर विभागाकडून त्याबाबत पुर्तता करावी लागणार आहे. तर २०१४-१५ चा फेर करनिर्धारणा विरुद्ध मा.उच्च न्यायालयामध्ये रिट अर्ज न्यायप्रविष्ठ आहे.

सीए आर.आर.मुनी फी मुळे नियुक्ती आदेश स्विकारण्यास तयार नाही. त्यामुळे संस्थानचे दुसरे आयकर सल्लागार मे.व्ही.के.बेसवाल ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस मुंबई. आयकर अपिलचे काम रु.१ मोबदल्यावर करत आहेत. त्यांना कर निर्धारणासंबधीत माहिती संकलित करुन माहिती ऑनलाईन दाखल करणेबाबत ई-मेल व्दारे कळविले आहे. तथापी ते अपिलबाबत काम करणार असल्याचे व संस्थानने सर्व माहिती संकलित करुन दिल्यानंतर फक्त ऑनलाईन दाखल करण्यास ते मदत करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. आयकर विषयक संस्थानचे अत्यंत संवेदशील काम असुन त्याकरिता स्वतंत्र अनुभवी लेखापरिक्षण कर सल्लागार संस्थेची आवश्यकता आहे. सदर बाबत यापुर्वी संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षणाचे कामकाज करणारे सीए अभय शास्त्री, पुणे यांच्या मे.एसएसएएएम ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, संस्थेने उपरोंलिखीत संस्थानचे आयकर विषयक संपुर्ण कामकाज करण्याची तयारी दर्शविली असुन, दि.२४.१२.२०२० रोजीचे ई-मेल मध्ये त्यांनी –

१) प्रति कर निर्धारण वर्षनिहाय रु.२,५०,०००/- अधिक कर अशी फी मागणी केली आहे.

२) आयकर विषयक कामकाजात आयकर अपील पर्यंत संपुर्ण कामकाज ते स्वतः व स्वतंत्र प्रतिनिधी मार्फत करण्यास तयार आहेत.

6 P P - 87

३) आयकर विषयक वादाचा असलेला महत्वाचा निनावी देणगी संबधीतचा मुद्दा याबाबत सदर लेखापरिक्षण संस्थेने श्री. विश्वात्मक जंगली महाराज आश्रम, कोकमठाण या ट्रस्टचे आयकर अपिल कामकाज केले असुन, त्याचा निर्णय ट्रस्टच्या बाजुने लागला आहे. सदर अपिल आदेश दि.२९.०३.२०१९ रोजी झाला असुन, विशेष बाब म्हणजे आयकर विभाग सदर आदेशा विरुध्द पुढील ITAT अपिल मध्ये गेलेला नाही. संस्थानचा हाच मुद्दा विवादाचा असुन, त्याबाबत मे.एसएसएएएम ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांना अनुभव दिसत आहे.

४) श्री अभय शास्त्री, चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांनी यापुर्वी संस्थानचे लेखापरिक्षणाचे, विदेशी चलन व्यवहार, आयकर कलम 35 AC इ. बाबत कामकाज केले असुन त्यांना संस्थानचे आर्थिक व्यवहारांसंबधीत संपुर्ण माहिती आहे.

५) त्यांनी मागणी कलेली फी रु.२,५०,०००/- ही सीए आर.आर.मुनी यांना मंजुर करण्यात आलेल्या रु.३ लाख फी पेक्षा कमी आहे.

६) तसेच सीए अभय शास्त्री यांनी संस्थानचे आयकर दाखल्यांचे पुनर्नोंदणीचे संपुर्ण कामकाज विनामोबदला करण्याचे यापुर्वी कळविले आहे.

तरी संस्थानचे आयकर विषयक अत्यंत तातडीचे, कालमर्यादा असलेले कामकाज तसेच उपरोक्त बाबींचा विचार करता सीए आर.आर.मुनी मुंबई हे कर निर्धारण वर्ष निहाय रु.३ लाख अधिक त्यावरील कर व इतर प्रत्यक्ष खर्च फी चा नियुक्ती आदेश स्विकारण्यास तयार नसल्याने त्यांचे ऐवजी मे.एसएसएएएम ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, पुणे यांची कर निर्धारण वर्ष निहाय रु.२.५० लाख अधिक त्यावरील कर व इतर प्रत्यक्ष खर्च अटी शर्तींवर संस्थानचे आयकर-कामकाज-करण्याकरिता नियुक्ती करण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पद्धतीने मान्यता मिळणेकामी सादर.

9/9/2021

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

26/12 26/12

निर्णय :- दिनांक १०/१२/२०२० रोजीचा तदर्थ समितीचा, चक्रीय पद्धतीचा श्री.आर.आर.मुनी, मुंबई यांना कर सल्लागार म्हणुन नियुक्त केल्याचा आदेश रद्द करण्यात येऊन प्रस्तावित कालावधीकरीता (कर निर्धारण वर्ष २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० पर्यंतची आयकर विषयक प्रलंबित कामे) व कर निर्धारण वर्ष २०२०-२१ चे आयकर विवरणपत्र दाखल करणे, कर निर्धारण, व आवश्यकतेनुसार आयकर अपिल कामकाजाकरीता सीए. अभय शास्त्री यांच्या मे.एसएसएएम अॅण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटन्टस, पुणे. या लेखापरिक्षण संस्थेची प्रति कर निर्धारण वर्षनिहाय फी रु.३,५०,०००/- अधिक त्यावरील कर व इतर प्रत्यक्ष खर्च या अटी शर्तींवर संस्थानचे आयकर कामकाज करण्याकरिता नियुक्ती करण्यात येत आहे व आयकर कायद्यानुसार संस्थानच्या आयकर दाखल्यांची नोंदणी व पुर्नोंदनी करण्याचे कामकाजही त्यांनी करावे. तसेच पुढील कर निर्धारण वर्ष २०२१-२२ पासुन आयकर विषयक कामकाजाकरीता विहित पद्धतीने कर सल्लागार लेखापरिक्षण संस्थेची नियुक्ती करण्यात यावी.

श्रीमती गीता प्र. बनकर
सदस्या, तदर्थ समिती तथा
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

भानुदास ह. पालवे
सदस्य, तदर्थ समिती तथा
अपर महसूल विभागीय आयुक्त, नाशिक

8/1/2021

कान्हूराज ह. बगाटे, भा.प्र.से.
सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

श्रीकांत ल. अणेकर
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर

विषय क्र.- 9/ ५५



मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय
लेखाशाखा विभाग

**विषय :- आर्थिक वर्ष-२०१९-२० च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन शासनास सादर करण्यास मान्यता मिळणेबाबत...**

टिपणी :-

महाराष्ट्र राज्य शासनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४, संस्थानसाठी लागू केला असून त्यानुसार संस्थानचे कामकाज सुरु आहे. अधिनियम २००४ मध्ये कलम १७(२)(ग) मधील तरतुदीनुसार "विश्वस्तव्यवस्थेच्या हिशोबाची राज्य शासन निर्देश देईल अशा व्यक्तिकडून पुढील लगत वर्षातील अशा तारखेपर्यंत वार्षिक लेखापरिक्षा करण्याची व्यवस्था करील व २९(१) मधील तरतुदीनुसार समिती त्या विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमाखर्चाचा तपशिल दर्शविणारा, दि.३१ मार्च रोजी संपणा-या प्रत्येक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षणाचा अहवाल, तसेच ज्यांना विश्वस्तव्यवस्थेकडून आर्थिक सहाय्य देण्यात आले अशा देणगी स्विकारणा-या संस्थांची (पूर्ण पत्त्यांसह) तपशिलवार यादी व असे आर्थिक सहाय्य मागण्यामागील उद्देश व सहाय्याची रक्कम याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या छाननी समितीचा अहवाल, यांसह वार्षिक अहवाल तयार करवून घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मादाय आयुक्ताला, त्या वर्षाच्या ३० सप्टेंबरच्या आत सादर करील" अशी तरतूद आहे.

महाराष्ट्र राज्य विधी व न्याय विभाग यांनी सासंवि-१०२०/२७०/प्र.क्र.८९/का.१६ दि.२१.०९.२०२० अन्वये मे.अे.एस. बेदमुथा ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस्, औरंगाबाद यांची सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून मान्यता दिली होती, त्यास अनुसरुन जा.क्र.एसएसएस/लेखा-अंलेप/१५२७/२०२०/दि.२२.०९.२०२० अन्वये वैधानिक लेखापरिक्षणाचा कार्यादेश देण्यात आला होता. शासनाकडून वैधानिक परिक्षक नियुक्ती उशिराने झाली. तसेच कोरोना विषाणू महामारीमुळे आयकर विभागाने लेखापरिक्षण पूर्ण करणे व आयकर विवरणपत्र भरणे मुदत दि.१५.०१.२०२१ व दि.३१.०१.२०२१ अशी वाढविली आहे. वैधानिक लेखापरिक्षण कार्यादेशास अनुसरुन मे.अे.एस. बेदमुथा ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस्, औरंगाबाद यांनी लेखापरिक्षण पूर्ण करुन वैधानिक लेखापरिक्षण अहवाल दि.०५.०१.२०२१ रोजी दिला आहे. सदर अहवालाची नोंद घेऊन त्यांची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मादय आयुक्तांना सादर करणे आवश्यक आहे. अहवालात निदर्शनास आणून दिलेल्या दोष/अपुर्ततांची दोष दुरुस्ती संबंधीत विभागांकडून करुन दोष दुरुस्ती अहवाल तयार करण्याची कार्यवाही हाती घेण्यात येईल. संस्थान अधिनियम २००४ मधील कलम २९(२) नुसार दरवर्षी संस्थानचा वार्षिक अहवाल (प्रशासकीय व लेखापरिक्षण अहवाल) प्राप्त झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधी मंडळासमोर ठेवणे बंधनकारक आहे. तसेच संस्थानचे आयकर विवरणत्र दाखल करण्याची अंतिम तारीख दि.१५.०१.२०२१ अशी आहे. त्याकरीता आयकर सल्लागार यांचेमार्फत आयकर विवरणपत्राची तयारी करणे आवश्यक आहे.

तरी शासननियुक्त वैधानिक लेखापरिक्षक मे.अे.एस. बेदमुथा ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस्, औरंगाबाद यांनी दि.०५.०१.२०२१ रोजी सादर केलेला आर्थिक वर्ष २०१९-२० चा वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणेस व त्याची एक प्रत शासनास राज्य विधीमंडळाच्या अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर ठेवणेकामी व एक प्रत धर्मादाय आयुक्त यांना सादर करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे चक्रीय पद्धतीने मान्यता मिळणेकामी सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

ERP-B2

निर्णय :- यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०१९-२० च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन शासनास सादर करण्यास चक्रीय पद्धतीने मान्यता देण्यात येत आहे.

श्रीमती गीता प्र. बनकर
सदस्या, तदर्थ समिती तथा
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

भानुदास ह. पालवे
सदस्य, तदर्थ समिती तथा
अपर महसूल विभागीय आयुक्त, नाशिक

कान्हूराज ह. बगाटे, भा.प्र.से.
सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

श्री. श्रीकांत ल. अणेकर
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर

(1)

विषय क्र.- 9/५६

# मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय



लेखाशाखा विभाग

**विषय :- सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०२०-२१ चे सुधारित अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत...**

टिपणी :-

**अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे कामकाज सध्या मा. तदर्थ (Ad-hoc) समिती पाहत आहे. अधिनियमातील कलम १७ अन्वये मा. व्य. मंडळाची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम-(२) (क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकाविषयीची तरतुद पुढील प्रमाणे आहे : "(समिती) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्तांकडे पाठवील." सदर तरतुदीन्वये विषयांकीत अंदाजपत्रक राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविणे आवश्यक आहे. सोबत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक व सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक, रुग्णालये विभागासह तयार करण्यात आलेले असून त्यातील जमा-खर्चाच्या ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत:

**अ) I.संस्थान** (रुग्णालये वगळुन) **जमेचे अंदाजपत्रक** *(आकडे रुपयांत)*

| अं. क्र. | तपशिल | अंदाजपत्रक २०२०-२१ | | अंदाजपत्रक २०२१-२२ | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुळ अंदाजपत्रक २०२०-२१ | सुधारित अंदाजपत्रक २०२०-२१ | अंदाजपत्रक २०२१-२२ | वाढ/घट % (टक्के) |
| I | प्रारंभीची शिल्लक | १६,२५,००,००० | २५,२०,००,००० | २०,२०,००,००० | -२०% |
| १ | देणगीव्दारे मिळणारी अपेक्षित जमा | ४८८,०३,५०,००० | १५३,५१,००,००० | ४६२,०१,५०,००० | २०१% |
| २ | अपेक्षित महसुली जमा | २४३,९१,००,००० | २२१,३९,२५,००० | २६५,०५,८०,००० | १४% |
| II | एकूण जमा (१+२) :- | ७३१,९४,५०,००० | ३७४,९०,२५,००० | ७२७,०७,३०,००० | ९४% |
| III | अपेक्षित निर्गतवणूक | ९६५,०३,१६,००० | ४४७,८४,८९,००० | २७६,१२,१४,००० | -३८% |
| | एकूण अपेक्षित जमा (I+II+III) | १७१३,२२,६६,००० | ८४७,९५,१४,००० | १०२४,१९,४४,००० | २१% |

**II. संस्थान** (रुग्णालये वगळुन) **खर्चाचे अंदाजपत्रक** *(आकडे रुपयांत)*

| अं. क्र. | तपशिल | अंदाजपत्रक २०२०-२१ | | अंदाजपत्रक २०२१-२२ | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुळ अंदाजपत्रक २०२०-२१ | सुधारित अंदाजपत्रक २०२०-२१ | अंदाजपत्रक २०२१-२२ | वाढ/घट % (टक्के) |
| १ | अपेक्षित भांडवली खर्च | ७५६,५१,१६,००० | ४,६०,१४,८८,००० | ५,१७,८०,९६,००० | १३% |
| २ | अपेक्षित महसुली खर्च | १५६,३२,३९,००० | १,०२,९०,६६,००० | १,४६,०२,७८,००० | ४२% |
| ३ | अपेक्षित किरकोळ खर्च | २,२४,२८,००० | ८०,८५,००० | १,६९,७४,००० | ११०% |
| ४ | न्यासाच्या उदिष्टांवरील अपेक्षित खर्च | ६८०,८७,४०,००० | १,८२,२३,६८,००० | २,४७,३६,६१,००० | ३६% |
| ५ | व्यवस्थापन निधीतील अपेक्षित खर्च | ९६,२२,४३,००० | ८५,६०,०७,००० | ९६,२४,३५,००० | १२% |
| I | एकूण खर्च (१ ते ५) :- | १६९८,१७,६६,००० | ८,३१,७०,१४,००० | १०,०९,१४,४४,००० | २१% |
| II | अंतिम शिल्लक | १५,०५,००,००० | १६,२५,००,००० | १५,०५,००,००० | -७% |
| | एकूण अपेक्षित खर्च (I+II) :- | १७१३,२२,६६,००० | ८४७,९५,१४,००० | १०२४,१९,४४,००० | २१% |

**ब) I. रुग्णालय विभाग जमेचे अंदाजपत्रक** *(आकडे रुपयांत)*

| अं. क्र. | तपशिल | अंदाजपत्रक २०२०-२१ | | अंदाजपत्रक २०२१-२२ | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुळ अंदाजपत्रक २०२०-२१ | सुधारित अंदाजपत्रक २०२०-२१ | अंदाजपत्रक २०२१-२२ | वाढ/घट % (टक्के) |
| I | प्रारंभीची शिल्लक | १,०९,००,००० | १,०९,००,००० | १,०९,००,००० | ०.००% |
| II | अपेक्षित महसुली जमा | ८५,००,००,००० | ६३,२७,००,००० | ७६,४२,००,००० | २०.७८% |
| III | संस्थानकडुन वर्ग (तुट) | ११६,२७,००,००० | ८९,६३,६९,००० | १,२५,६०,५४,००० | ४०.१३% |
| | एकूण अपेक्षित जमा (I+II+III) | २०२,३६,००,००० | १,५३,९९,६९,००० | २,०३,११,५४,००० | ३१.९०% |

**II. रुग्णालय विभाग खर्चाचे अंदाजपत्रक** *(आकडे रुपयांत)*

| अं. क्र. | तपशिल | अंदाजपत्रक २०२०-२१ | | अंदाजपत्रक २०२१-२२ | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुळ अंदाजपत्रक २०२०-२१ | सुधारित अंदाजपत्रक २०२०-२१ | अंदाजपत्रक २०२१-२२ | वाढ/घट % (टक्के) |
| १ | अपेक्षित भांडवली खर्च | २०,४०,००,००० | ११,६१,७६,००० | ११,६४,००,००० | ०.१९% |
| २ | अपेक्षित महसुली खर्च | १०४,७५,९८,००० | ९५,८८,०५,००० | १०८,३१,२२,००० | १२.९७% |
| ३ | अपेक्षित किरकोळ खर्च | १२,६०,००० | ११,४६,००० | १३,९०,००० | २१.२९% |
| ४ | न्यासाच्या उदिष्टांवरील अपेक्षित खर्च | ७५,९८,४२,००० | ४५,२९,४२,००० | ८१,९३,४२,००० | ८०.८९% |
| I | एकूण खर्च (१ ते ४) :- | २०१,२७,००,००० | १५२,९०,६९,००० | २०२,०२,५४,००० | ३२.१२% |
| II | अंतिम शिल्लक | १,०९,००,००० | १,०९,००,००० | १,०९,००,००० | ०.००% |
| | एकूण अपेक्षित खर्च (I+II) :- | २०२,३६,००,००० | १५३,९९,६९,००० | २०३,११,५४,००० | ३१.९०% |

**ब) अधिनियम २००४** चे कलम २२(२) मधील तरतुदींनुसार, "व्यवस्थापन निधीत रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपूर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी, समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्थापन निधितून कोणत्याही अतिरिक्त रक्कमा या निधित जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी निर्देश देईल." उपरोक्त तरतुदीप्रमाणे व्यवस्थापन निधितून गतवर्षाच्या उत्पन्नाच्या १० टक्के खर्च अपेक्षित आहे. सन २०२०-२१ या अंदाजपत्रकामध्ये व्यवस्थापन निधितून होणारा संभाव्य खर्च या तरतुदीच्या अधिन राहून करता येईल. सन २०२०-२१ व २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी व्यवस्थापन निधीतुन अपेक्षित वाढीव खर्च झाल्यास शासनाकडे प्रस्ताव दाखल करावा लागेल.

**क)** संस्थानच्या विविध विभागांमार्फत साईभक्तांना पुरविण्यात येणाऱ्या पायाभुत सुविधेत वाढ करणे तसेच त्यांना दळणवळणाच्या विविध सोयी उपलब्ध करून देणे याकामी नगरपंचायती अंतर्गत कामास व इतर खर्चासाठी अनुदान शीर्षाखाली खर्च प्रस्तावित केलेला आहे. श्री साईबाबा संस्थान अधिनियमातील कलम २१ अंतर्गत संबंधित विभागाकडून छाननी समितीच्या अभिप्रायानुसार शासनाकडून मंजुरी प्राप्त करुन घेण्याच्या अटीस अधीन राहून अंदाजपत्रकात अनुदान या शीर्षाखाली भरीव तरतुद दर्शविण्यात आली आहे.

**ख)** मा. व्यवस्थापन समितीच्या स्थापनेनंतर विविध मुलभूत व मोठया प्रमाणात भांडवली खर्च-तथा-योजना सुरु करणे प्रस्तावित आहे. आयकर अधिनियम १९६१ चे कलम १०(२३) (सी) ५ मधिल तरतुदीमध्ये पाच वर्षापुर्वी झालेल्या बदलामुळे प्रत्येक आर्थिक वर्षाच्या उत्पन्नापैकी ८५टक्के उत्पन्न त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तेवढा खर्च न झाल्यास शिल्लक राहीलेले अखर्चित उत्पन्न पुढील पाच वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. अन्यथा सहाव्या वर्षी त्यावर कर आकारण्याची तरतुद आहे. मागील वर्षातील अखर्चित उत्पन्न पुढीलप्रमाणे.

| अ.नं. | आर्थिक वर्ष | शिल्लक अखर्चित रक्कम (रुपये) | खर्च करावयाची अंतिम मुदत |
|---|---|---|---|
| ०१ | २०१५-१६ | २२४,५५,८९,३७७ | ३१.३.२०२१ |
| ०२ | २०१६-१७ | ३०२,३२,७६,६०२ | ३१.३.२०२२ |

आयकर कायद्यानुसार सदर अखर्चित उत्पन्न राष्ट्रीयकृत बॅकांमध्ये वार्षीक गुंतवणुकीच्या माध्यमातुन ठेवण्यात येत आहे. हे अखर्चित उत्पन्न चालू वर्षात वा पुढील पाच वर्षात खर्च होणे आवश्यक असल्याने भांडवली खर्चामध्ये मोठया प्रमाणात वाढ करणे क्रमप्राप्त झाले आहे. कोव्हिड-१९ कालावधीमध्ये नियोजीत खर्च प्रकल्प राबविण्यात अडचणी आल्या आहेत. त्यामुळे सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकातील नियोजनाप्रमाणे उत्पन्न व खर्च यामध्ये मोठी घट झाली आहे. त्यामुळे सुधारित अंदाजपत्रक मोठया रकमेने कमी झाले आहे. त्यामुळे चालु वर्षाच्या उत्पन्नाच्या ८५ % खर्च व अखर्चित उत्पन्नाचे विनीयोगाचे प्रमाण फारच कमी आहे. सदरचे अखर्चित उत्पन्न वेळेत खर्च न केल्यास त्यावर आयकर लागु होऊन तो भरणे क्रम प्राप्त होईल, अशा आयकराची रक्कमही मोठी असेल. तरी आयकराचे नियोजनाचे दृष्टीने धोनणात्मक निर्णय होऊन नियोजीत प्रकल्प पुर्णत्वास जाणे गरजेचे आहे. अपेक्षित जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकाची विवरणे, परिशिष्ठ "अ" व "ब" सोबत जोडण्यात आली आहेत.

तरी संस्थानचे रुग्णालये विभागासह सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे प्रस्तावित मूळ अंदाजपत्रक व सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे सुधारीत अंदाजपत्रक मान्यतेस्तव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीच्या सभेसमोर चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेकामी सादर.

29/1/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

---

**निर्णय** – यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे रुग्णालये विभागासह सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे प्रस्तावित मूळ अंदाजपत्रक व सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे सुधारीत अंदाजपत्रकास चक्रीय पध्दतीने मान्यता देण्यात येत आहे.

01/02/2021

श्रीमती गीता प्र. बनकर
सदस्या, तदर्थ समिती तथा
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

भानुदास ह. पालवे
सदस्य, तदर्थ समिती तथा
अपर महसुल विभागीय आयुक्त, नासिक

कान्हूराज ह. बगाटे, भा.प्र.से.
सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

1/2/21

श्रीकांत ल. अणेकर
**अध्यक्ष, तदर्थ समिती तथा**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर

मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषयांची टिपणी.
लेखाशाखा विभाग

विषय:- संस्थानच्या नावाने परकीय चलनासंबंधीत बचत खाते स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा, नवी दिल्ली येथे उघडणेबाबत

प्रस्तावना:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना पोष्टामार्फत, देणगी काऊटरवर व दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीमधून भारतीय चलनाबरोबरच परकीय चलनातील नोटा, नाणी व चेक प्राप्त होत असतात.

मा व्यवस्थापन मंडळाच्या दि.२२/१०/२००० रोजी सभेतील निर्णय क्र.४४० प्राप्त झालेल्या परकीय चलनाचे रूपांतर भारतीय चलनात होणेकामी, सध्या संस्थानच्या नावाने परकीय चलनासंबंधीत बचत खाते बॅंक ऑफ बडोदा, नाशिक येथे खाते क्र. 17660100004641 (Forex) हे उघडण्यात आलेले आहे. संस्थानला प्राप्त होणा-या सर्व परकीय चलनाचा भरणा सदर खात्यात करण्यात येऊन, सर्व परकीय चलनासंबंधीत आर्थिक व्यवहार याच खात्यातून करण्यात येत असतात. मागील ०३ आर्थिक वर्षात जमा झालेल्या परकीय चलनाच्या रक्कमेचा तपशिल पुढीलप्रमाणे..

| अ.नं. | परकीय चलनाची आर्थिक वर्ष | रक्कम रुपये. पैसे. |
|---|---|---|
| ०१ | सन-२०१६-२०१७ | 13,57,57,326/- |
| ०२ | सन-२०१७-२०१८ | 12,27,73,389/- |
| ०३ | सन-२०१८-२०१९ | 12,54,78,211/- |

सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल सादर करणे बाकी आहे.

परकीय चलनात प्रामुख्याने ऑस्ट्रेलिया, बहरिन, न्युझीलॅंड, फ्रान्स, कॅनडा, जपान, युरोप, हॉंगकॉंग, ओमन, फिलीपाईन, कुवेत, मलेशिया, मालदिव, मॅरेशियस, रशिया, दक्षिण अफ्रिका, स्विडन, नेपाळ, इंग्लंड, कतार, सौदी अरेबिया, स्कॉटलॅंड, इंडोनेशिया, सिंगापूर, थायलॅंड, संयुक्त अरब अमिरती, नेपाळ, श्रीलंका, अमेरिका आदी देशांची चलन प्राप्त होत असतात.

आता, Government of India, Ministry of Home Affairs, New Delhi. Public Notice dtd. 13th October, 2020 जाहिर केलेली असून, त्यामध्ये पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

## PUBLIC NOTICE

Subject:- Procedure for opening & operating the designated "FCRA ACCOUNT"

As provided under the amended section 17(1) of the foreign contribution (regulation) Act , 2010.

The Foreign Contribution (Regulation) Amendment Act, 2020 has come into operating vide Gazette Notification dated. 29th September, 2020. The amended section 17 of the Foreign Contribution (Regulation) Act, 2010 provides as under:

"17.(1) Every person who has been granted a certificate or given prior permission under section 12 shall receive foreign contribution only in an account designated as "FCRA Account" by the bank, which shall be opened by him for the purpose of remittances of foreign contribution in such branch of the State Bank of India at New Delhi, as the Central Government may, by notification, specify in this behalf.

Provided that such person may also open another "FCRA Account" in any of the scheduled bank of his choice for the purpose of keeping of utilising the foreign contribution which has been received from his "FCRA Account" in the specified branch of State Bank of India at New Delhi.

Provided further that such person may also open one or more accounts in one or more scheduled banks of his choice to which he may transfer for utilizing any foreign contribution received by him in his "FCRA Account" in the specified branch of the State Bank of India at New Delhi of kept by him in another "FCRA Account" in a scheduled bank of his choice:

Provided also that no funds other than foreign contribution shall be received of deposited in any such account.

(2) The Specified branch of the State Bank of India at New Delhi or the branch of scheduled bank where the person referred to in sub-section (1) has opened his foreign contribution account or the authorised person in foreign exchange, shall report to such authority as may be specified.-

..२..

(a) the prescribed amount of foreign remittance;
(b) the source and manner in which the foreign remittance was received; and
(c) other particulars,
In such from and manner as be prescribed.''

2. The Central Government has specified the New Delhi Main Branch (NDMB) of the State Bank Of India (SBI), 11, Sansad Marg, New Delhi-110 001 for the purposes of opening the aforementioned "FCRA Account" to received foreign Contribution (henceforth called FC).

3. Each Person/NGO/association may kindly note all the amendments made through The Foreign Contribution (Regulation) Amendment Act, 2020 for compliance henceforth. The amended section 17 mandates that each person/NGO/association which has been granted FCRA certificate of registration or prior permission shall henceforth such FC only in a designated "FCRA" account to be opened in the above-mentioned specified branch of SBI. The relevant particulars of this branch of this i.e. NDMB are as follows:

| | |
|---|---|
| Branch Code | : 00691 |
| IFSC | : SBIN0000691 |
| SWIFT | : SBININBB104 |
| e-mail | : agmforex.00691@sbi.co.in |
| | : agmcommercial.00691@sbi.co.in |
| | : sbi.00691@sbi.co.in |

4. All the person/NGOs/associations who have already granted certificate of registration or prior permission by the Central Government to receive FC and whose present accounts are in banks or branches other than the specified branch i.e. NDMB shall have to open "FCRA Account" in the NDMB. The Central Government has decided to grant sufficient time to the existing "FCRA Account " holders for transitioning to the new regime. They can open the "FCRA Account" in the NDMB till 31st March 2021.

5. However, all fresh applicants for certificate of registration of prior permission under the FCRA, 2010 shall have to first open the "FCRA Account" in the NDMB to receive any FC if they are granted certificate of registration or prior permission by the Central Government later on.

6. The existing FCRA account holders have to open the "FCRA Account" in the NDMB upto 31st March 2021 or earlier. They shall be eligible to receive FC in the "FCRA Account" in the NDMB w.e.f 1st April, 2021 or from the date of opening of the "FCRA Account" in the NDMB whichever is earlier. After that date they shall not be eligible to receive FC in any account other than the "FCRA Account" opened in the NDMB. in this regard, suitable directions are being issued to all scheduled banks in the country.

7. To open the afore-mentioned "FCRA Account" in the NDMB the applicant entity/NGO/association needs not the visit the NDMB at Delhi. They may approach either the nearest SBI Branch or any other SBI Branch of their choice for taking action with regard to opening of their "FCRA Account".

8. In this regard, a Standard Operating Procedure (SOP) to facilitate, opening and operating the "FCRA Account" in NDMB has been worked out which will be soon uploaded on this portal.

9. It is further clarified that the application person/NGO/association has complete liberty to retain its present "FCRA Account" as the another "FCRA Account" in any branch of a scheduled bank of its choice. They can link this account with the designated "FCRA Account" opened at the NDMB.

10. The NDMB will not levy any transfer charges/fees for transferring the FC from the "FCRA Account" to "another FCRA Account" or other utilization account/ accounts in a branch of any scheduled bank.

11. All the persons/NGOs/associations who already have been granted certificate of registration or prior permission by Government may take note that they shall not receive any FC in any account other than the designated "FCRA Account" opened at NDMB of the SBI, 11. Sansad Marg, New Delhi-110 001 from the date of opening of such account OR 1st April 2021. Whichever is earlier.

12. NGOs/associations are also advised to the frequently visit through the FCRA web portal at fcraonline.nic.in for further updates in this matter.

गृहमंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दि.१३/१०/२०२० रोजी उपरोक्त प्रमाणे पब्लिक नोटीस जाहिर केलेली असून, परकीय चलनातील व्यवहार असणा-या, देशातील सर्वांकरीता परकीय चलन विनिमयसाठी (F.C.R.A.) असलेले खाते हे स्टेट बॅंक ऑफ इंडिया, नवी दिल्ली येथे दि.३१.०३.२०२१ अखेर उघडून, त्या खात्यामार्फत, परकीय चलनासंबंधी संपुर्ण व्यवहार सक्तीचे केलेले आहेत. याबाबत स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी या स्थानिक बॅंकेकडे चौकशी केली असता, संस्थानचे नावाने स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा नवी दिल्ली येथे दि.३१.०३.२०२१ अखेर परकीय चलन खाते उघडणे अनिवार्य आहे. तसेच त्यासाठी पुढीलप्रमाणे कागदपत्रांच्या प्रती आवश्यकता असल्याचे त्यानी सांगीतले आहे.

१. संस्थानचे नोंदणी प्रमाणपत्र
२. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४.
३. FCRA रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र.
४. संस्थानचे पॅन कार्ड
५. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी/उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे KYC (पॅनकार्ड, आधारकार्ड, फोटो)
६. संस्थानच्या नावाने सध्या बॅंक ऑफ बडोदा, शाखा नाशिक येथे असलेल्या परकीय चलना संबंधीत बचत खात्याचा तपशिल इत्यादी.

त्याअनुषंगाने, दि.०९/०२/२०२१ रोजी, लेखापरिक्षक श्री. अभय शास्त्री, M/s SSAAM& CO., Chartered Accountants, पुणे, यांना ई मेल पाठवून, "परकीय चलन बचत खाते स्टेट बॅंक ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचेकडे उघडणे संस्थानला बंधनकारक आहे काय" ? याबाबत अभिप्राय मागविला असता, त्यांनी पुढील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

**"Yes it is mandatory to open the FCRA Bank Ac at SBI Branch, New Delhi."**

विभागाचा अभिप्राय –

१. गृहमंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दि.१३/१०/२०२० रोजी उपरोक्त प्रमाणे पब्लिक नोटीस जाहिर केलेली असून, त्यानुसार संस्थांनचे नावाने स्टेट बॅंक ऑफ इंडिया, नवी दिल्ली येथे परकीय चलनाचे खाते उघडणे बंधनकारक असल्याने ते उघडता येईल.

२. त्यासाठी आवश्यक असलेले उपरोक्त कागदपत्र बॅंकेस देता येतील.

३. त्यासाठी उपरोक्त कागदपत्रे स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी येथे सादर करुन, स्टेट बॅंक ऑफ इंडिया, नवी दिल्ली येथे बचत खाते हे स्थानिक बॅंकेमार्फत उघडण्याची कार्यवाही करता येईल.

४. सध्या संस्थानच्या नावाने, बॅंक ऑफ बडोदा, शाखा नाशिक येथे असलेले परकीय चलनाचे खाते हे स्टेट बॅंक ऑफ इंडिया, नवी दिल्ली येथील नव्याने उघडण्यात येणा-या खात्याशी लिंक करता येईल.

प्रस्ताव –

अ) गृहमंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दि.१३/१०/२०२० रोजी उपरोक्त प्रमाणे पब्लिक नोटीस जाहिर केलेली असून, त्यानुसार संस्थानचे नावाने स्टेट बॅंक ऑफ इंडिया, नवी दिल्ली येथे परकीय चलनाचे खाते उघडणे बंधनकारक असल्याने ते स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी या स्थानिक बॅंकेमार्फत उघडणेस तसेच -

ब) परकीय चलनासंबंधीत खाते नव्याने स्टेट बॅंक ऑफ इंडिया, नवी दिल्ली येथे उघडणेकामी उपरोक्त अ.नं.०१ ते ०६ हे कागदपत्र बॅंकेस देणेस तसेच-

क) सध्या संस्थानच्या नावाने, बॅंक ऑफ बडोदा, शाखा नाशिक येथे असलेले परकीय चलनाचे खाते हे स्टेट बॅंक ऑफ इंडिया, नवी दिल्ली येथील नव्याने उघडण्यात येणा-या परकीय चलनाच्या खात्याशी लिंक करणेस -

तरी गृहमंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दि.१३/१०/२०२० रोजी उपरोक्तप्रमाणे पब्लिक नोटीस जाहिर केलेली असून, त्यानुसार संस्थानच्या नावाने स्टेट बँक ऑफ इंडिया, नवी दिल्ली येथे परकीय चलनाचे खाते उघडणे बंधनकारक असल्याने, ते उघडणेकरीता उपरोक्तप्रमाणे 'अ' 'ब' व 'क' यास मान्यता मिळणेकामी, सदर प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सविनय सादर.

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे/नाही.

(गिता प्रविण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानुदास पालवे, भा.प्र.से.)
अप्पर आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(रविंद्र ठाकरे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- ९/५६

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय
लेखाशाखा विभाग

**विषय:- आयकर कायद्यातील तरतूदींन्वये सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबत...**

टिपणी :-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांस सर्व माध्यमाद्वारे मिळणारे उत्पन्न हे आयकर कायदा १९६१ चे कलम १०(२३)(C)(V) अन्वये संपूर्ण करमुक्त आहे. या कलमांतर्गत सन २००२ मध्ये सुधारणा झालेल्या असून, सुधारीत तरतूद पुढीलप्रमाणे आहे.

"Provided also that the fund of trust or institution [or any university or other educational institution or any hospital or other medical institution] referred to in sub-clause (iv) or sub-clause (v) [or sub-clause (vi) or sub-clause (VIA)]

d) applied its income, or accumulates it for application, wholly and exclusively to the objects for which it is established and in a case where more than fifteen percent of its income is accumulated on or after the 1st day of April-2002, the period of the accumulation of the amount exceeding fifteen percent of its income shall in no case exceed five years."

उपरोक्त सुधारीत तरतुदीनुसार एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ८५% उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि ते खर्च न झाल्यास या ८५% उत्पन्नापैकी अखर्चित राहिलेली रक्कम त्यापुढील ५ आर्थिक वर्षामध्ये खर्च करता येईल व दरम्यान या रकमेची आयकर कलम ११ अन्वये विहित पध्दतीने गुंतवणूक करावी लागेल. पुढील ५ वर्षाच्या मुदतीत ही अखर्चित रक्कम पुर्णपणे खर्च न झाल्यास सहाव्या आर्थिक वर्षात ती करपात्र म्हणून हिशोबात धरली जाईल व त्या रकमेवर आयकर कायद्यातील तरतुदीनुसार त्या आर्थिक वर्षासाठी लागु असलेल्या महत्तम आकारणी दराने आयकर आकारणी केली जाईल.

संस्थानचे सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र आयकर कार्यालयाकडे दाखल करावयाचे आहे. सदर आयकर विवरणासोबत सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाची रक्कम कशी व कोणत्या उद्दीष्टांसाठी खर्च करण्यात येईल याबाबतचा मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय सोबत जोडणे बंधनकारक असते. सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या अखर्चित उत्पन्नाचा पुढील पाच वर्षात खर्चाच्या नियोजनाचा ढोबळ मसुदा खालीलप्रमाणे :-

*(रुपये कोटीमध्ये)*

| अ.नं. | तपशिल | रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | मंदिराची विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे, स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे, देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे. | १०० |
| २ | भक्तांना प्रसाद भोजन देणे आणि अन्नछत्र चालविणे, पाणी योजनेकरिता. | ५० |
| ३ | भक्तांना दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोई व सुविधा पुरविणे, दर्शन सुविधा. | ५० |
| ४ | भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी भक्तनिवास, विश्रामगृहे बांधणे, त्याची दुरुस्ती देखभाल करणे. भक्तांकरिता साईसिटी प्रकल्प निर्मिती. | ५० |

...२,

ERP-68

| | | |
|---|---|---|
| ५ | शासन मान्यतेने नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, सोसायटी यांचे शैक्षणिक संस्था, क्रिडा, संस्था वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरीकदृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मदाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला व साहित्य क्षेत्राशी संबधीत असलेली संस्था, कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेणे, शैक्षणिक संकुल. | ५० |
| ६ | स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी, संस्थानच्या सोईमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करणे. | ५० |
| ७ | भक्तांच्या-जनतेच्या सोयीसाठी संस्थानच्या २५ कि.मी. परिसरातील रस्त्यांची कामे करणे. | ५० |
| ८ | मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवता आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देणे. | ५० |
| ९ | संस्थानच्या वार्षिक अंदाजपत्रकीय तरतुदीत नमुद केलेनुसार संस्थानचे नियोजीत उद्दीष्टांवर खर्च करणे. | ५० |
| | एकुण :- | ५०० |

तरी संस्थानचे सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र आयकर विभागाकडे दाखल करण्याकरीता सन २०१९-२० चे अखर्चित उत्पन्न पुढील पाच वर्षात खर्च करण्याच्या नियोजनाचा ढोबळ जोडून संस्थानचे आर्थिक वर्ष २०१९-२० चे आयकर विवरणपत्र आयकर विभागाकडे दाखल करण्यास मान्यता मिळणेकामी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे चक्रीय पद्धतीने मान्यता मिळणेकामी सादर.

6/1/2020

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

निर्णय :- यावर सविस्तर चर्चा होऊन आयकर कायद्यातील तरतुदीन्वये सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाच्या विनियोगाबाबतच्या उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन करण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली व संस्थानचे सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र आयकर विभागाकडे दाखल करण्यात यावे असे ठरले.

श्रीमती गीता प्र. बनकर
सदस्या, तदर्थ समिती तथा
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

भानुदास ह. पालवे
सदस्य, तदर्थ समिती तथा
अपर महसूल विभागीय आयुक्त, नाशिक

6/1/2020

कान्हूराज ह. बगाटे, भा.प्र.से.
सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

श्रीकांत ल. अणेकर
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| ५ | शासन मान्यतेने नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, सोसायटी यांचे शैक्षणिक संस्था, क्रिडा, संस्था वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरीकदृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मदाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला व साहित्य क्षेत्राशी संबंधीत असलेली संस्था, कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेणे, शैक्षणिक संकुल. | ५० |
| ६ | स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी, संस्थानच्या सोईमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करणे. | ५० |
| ७ | भक्तांच्या-जनतेच्या सोयीसाठी संस्थानच्या २५ कि.मी. परिसरातील रस्त्यांची कामे करणे. | ५० |
| ८ | मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवता आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देणे. | ५० |
| ९ | संस्थानच्या वार्षिक अंदाजपत्रकीय तरतुदीत नमुद केलेनुसार संस्थानचे नियोजीत उद्दीष्टांवर खर्च करणे. | ५० |
| | एकुण :- | ५०० |

तरी संस्थानचे सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र आयकर विभागाकडे दाखल करण्याकरीता सन २०१९-२० चे अखर्चित उत्पन्न पुढील पाच वर्षात खर्च करण्याच्या नियोजनाचा ढोबळ जोडून संस्थानचे आर्थिक वर्ष २०१९-२० चे आयकर विवरणपत्र आयकर विभागाकडे दाखल करण्यास मान्यता मिळणेकामी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे चक्रीय पद्धतीने मान्यता मिळणेकामी सादर.

6/11/2020

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

निर्णय :- यावर सविस्तर चर्चा होऊन आयकर कायद्यातील तरतुदीन्वये सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाच्या विनियोगाबाबतच्या उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन करण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली व संस्थानचे सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र आयकर विभागाकडे दाखल करण्यात यावे असे ठरले.

श्रीमती गीता प्र. बनकर
सदस्या, तदर्थ समिती तथा
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

भानुदास ह. पालवे
सदस्य, तदर्थ समिती तथा
अपर महसूल विभागीय आयुक्त, नाशिक

विषय क्र.- 9/५९

249

## मा.तदर्थ समितीचे सभेत नोंद घेण्यासाठीचा विषय
## लेखाशाखा विभाग

**विषय - माहे ऑगस्ट-२०२० ते नोव्हेंबर-२०२० मासिक जमा-खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत...**

टिपणी -

लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडून खर्च होणा-या रकमांचा जमा-खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे ऑगस्ट-२०२० ते नोव्हेंबर-२०२० या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा.तदर्थ समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. जमा-खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | महिना | जमा | खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | ऑगस्ट-२०२० | ३०,४२,४७,५६८/- | १३,७२,०७,३४३/- |
| ०२ | सप्टेंबर-२०२० | ७,४८,९९,४८६/- | १०,४३,८१,२२९/- |
| ०३ | ऑक्टोबर-२०२० | ४,६१,१३,५१७/- | १४,७०,४२,२२५/- |
| ०४ | नोव्हेंबर-२०२० | १४,७२,७१,०४७/- | ३२,८४,६०,०९९/- |

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे ऑगस्ट-२०२० ते नोव्हेंबर-२०२० या कालावधीतील मासिक जमा खर्चाची चक्रिय पद्धतीने नोंद घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर.

2/4/2021

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

**निर्णय :-** माहे ऑगस्ट-२०२० ते नोव्हेंबर-२०२० या कालावधीतील जमा खर्च तक्त्यांचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.

15/04/2021

(श्रीमती गिता पी. बनकर)
सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर. तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

7/4/2021

(भानुदास एच. पालवे)
अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक. तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

2/4/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा
सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

7/4

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

ERP - ~~47~~ 83

विषय क्र.- 9 | ६०
ACC - Meeting - 10 - 2021

13323 7738

250

## मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषयांची टिपणी.

## लेखाशाखा विभाग

**विषय:- दि.२५/११/२०२० व दि.१२/०१/२०२१ रोजी दक्षिणापेटीतील रक्कम मोजणी करत-असताना त्यामध्ये प्राप्त झालेल्या सोन्याचा मुलामा असलेल्या श्री साईबाबांची मुर्ती-फोटोंच्या फ्रेमबाबत...**

**प्रास्तविक:-** कोविड(१९) विषाणुच्या प्रादुर्भावामुळे, मंदिर व मंदिर परिसरातील दक्षिणपेटीतील रक्कम मोजणी सध्या आठवडयातुन एकदा (दर मंगळवारी) केली जात आहे. सदर दक्षिणापेटयांमध्ये रोख रक्कम, नाणी परकीय चलन,चेक/डीडी, सोने-चांदी, मौल्यवान खडे, कपडे व इतर किरकोळ वस्तूंचा समावेश असतो त्यास अनुसरुन-

**अ) बुधवार दि.२५/११/२०२०** रोजी दक्षिणापेटीतील रक्कमेची मोजणी करण्यात आली होती. दक्षिणापेटीतील रक्कमेची मोजणी करत असतांना, त्यामध्ये सोन्याचा मुलामा असलेला, श्री साईबाबांची मुर्ती फोटोची फ्रेम वजन ५१९.९२० ग्रॅम प्राप्त झालेले आहे. सोबत पटेल ज्वेलर्स, पनवेल, नवी मुंबई यांचे जीएसटी क्रमांक असलेले बिल नं. 1840/10965, दि.१८/११/२०२० एकूण रक्कम रुपये. १४,२९५/- मात्र. मिळालेली आहे.

**ब) तसेच, मंगळवार दि.१२/०१/२०२१** रोजी दक्षिणापेटीतील रक्कमेची मोजणी करत असतांना, श्री साईबाबांची मुर्ती फोटो असलेली गोल्ड प्लेटेड १३ x १७ आकाराची फ्रेम, प्राप्त झालेली असून, सदर फ्रेम सोबत बिल प्राप्त झालेले नाही. सदर फ्रेमची बाजारातील अंदाजे किंमत रक्कम रु. ५०००/- मात्र. पर्यंत आहे.

सदर दोनही फ्रेम संस्थानचे अधिकृत सोने-चादी मूल्यांकनकार यांनी तपासल्या असता, सदर फ्रेम प्लास्टीकच्या आहेत व त्यामधील श्री साईबाबांच्या मुर्तीला सोन्याचा मुलामा केलेला आहे. सदर मुलामाचे वजन खुपच कमी आहे, ते आपण काढू शकत नाही ते काढल्यास विनाकारण दोनही फ्रेमचे नुकसान होऊन सोनेही हाती लागू शकत नसल्याने, संस्थानचे आर्थिक नुकसान होईल. त्यामुळे सदर दोनही फ्रेम जशा आहे तशा विकण्यास हरकत नाही. असे अभिप्रायही मूल्यांकनकार यांनी लेखी स्वरुपात दिलेले आहेत. ते अवलोकनार्थ सोबत जोडलेले आहे. त्यामुळे सदर फ्रेमच्या नोंदी वस्तू-नोंद रजिस्टरला घेतल्या असून, त्या संस्थानचे अधिकारी/ कर्मचारी यांचे उपस्थितीत पंचनामा करुन सिलबंद करुन ठेवलेल्या आहेत. सिलबंद करतेवेळी सदर दोनही फ्रेमचे सी.सी.टी.व्ही. विभागामार्फत व्हिडीओ (VDO) चित्रीकरण करण्यात आलेले आहेत.

सदर फ्रेमबाबत उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**तथापि, अ)** सदर फ्रेमच्या नोंदी सोने-चांदी रजिस्टरला घेतल्यास त्या संपूर्ण फ्रेम काढून घेऊन नंतर फक्त सोन्याची देणगी पावती करावी लागणार आहे. त्यामुळे सदर दोनही फोटोतील सोन्याची किंमत खूपच कमी होणार आहे. यामध्ये संस्थानचे आर्थिक नुकसान होणार आहे.

**तसेच, आ)** सदर दोनही फ्रेमच्या नोंदी किरकोळ वस्तू नोंद रजिस्टरला घेतल्यास, त्या आहे त्याच किंमतीला साईभक्तांना प्रसादरुपाने विकता येईल, यामध्ये संस्थानचे आर्थिक नुकसान होणार नाही.

**विभागाचा अभिप्राय-**

संस्थानचे अधिकृत सोने-चांदी मूल्यांकनकार यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेता, सदर फ्रेमची नोंद सोने-चांदी रजिस्टरला घेतल्यास, त्यातील सोनेही हाती लागू शकत नसल्याने, त्यामध्ये संस्थानचे आर्थिक नुकसान होणार आहे. त्यामुळे संस्थानचे अधिकृत सोने-चांदी मूल्यांकनकार यांनी त्यांच्या अभिप्रायात नमूद केलेल्या किंमत रु.१४,२९५/- व किंमत रु.५०००/- मात्र. या किंमतीला दोनही फ्रेम साईभक्तांस प्रसादरुपाने खरेदी करणेकामी उपलब्ध करुन दिल्यास यामध्ये संस्थानचे आर्थिक नुकसान होणार नाही. त्यामुळे सदर दोनही फ्रेमच्या नोंदी किरकोळ वस्तू नोंद रजिस्टरला घेऊन, त्या जशा आहे तशा, त्याच किंमतीला, श्री साईभक्तांना प्रसादरुपाने खरेदी करणेसाठी उपलब्ध करुन दिल्यास, यामध्ये संस्थानचे आर्थिक नुकसान होणार नाही, असे मत आहे.

**प्रस्ताव:-** तरी उपरोक्त दोनही फ्रेमबाबत संस्थानचे अधिकृत मूल्यांकनकार यांचे अभिप्राय विचारात घेऊन, (अ) सदर फ्रेमच्या नोंदी किरकोळ वस्तू नोंद रजिस्टरला घेऊन, त्या श्री साईभक्तांना प्रसादरुपाने खरेदी करणेकामी उपलब्ध करुन दयाव्यात, किंवा (ब) त्यांच्या सोने-चांदी रजिस्टरमध्ये नोंदी घेऊन, त्या इतर सोने वस्तूप्रमाणे संस्थानकडे ठेवाव्यात. याकामी निर्णय होणेसाठी, सदर प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सविनय सादर.

22/03/21

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

17/3 17/3

प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे/नाही, प्रस्ताव (अ) मंजूर.

17/04/2024
(गिता प्रविण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

20/4/2024
(भानुदास पालवे)
अप्पर आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

22/03/24
(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
सदस्य, तदर्थ समिती

17/4
(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय

लेखाशाखा अनुदान

**विषय : सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या दोन वर्षामध्ये प्रत्येक वर्षी रु. ५० कोटी, असे एकूण रु.१०० कोटी इतका निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडून शिर्डी विमानतळाच्या विकासासाठी देणेच्या प्रस्तावावर निर्णय घेणेबाबत...**

**प्रस्तावना :-**

**प्रस्तावना :-**

शिर्डीपासून १५ किलो मीटर आंतरवर मौजे काकडी गावात शिर्डी विमानतळाची उभारणी करण्यात आली असून देशातंर्गत तसेच आंतरराष्ट्रीय साईभक्तांना कमी वेळात श्री साईबाबांचे दर्शन उपलब्ध झाले आहे. संध्या इंदोर, चेन्नई, हैद्राबाद, दिल्ली, बंगलोर, अहमदाबाद अशी विमानसेवा सुरू करण्यात आलेली आहे. शिर्डी परिसरात विमानतळ उभारणी झालेने या परिसराचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली आहे.

**विधी व न्याय विभागाचे पत्र:-**

विधी व न्याय विभागाचे पत्र क्र. सासंवि-१०२१/८ (VIP)/प्र.क.१९/का.१६ दि. ०५ मार्च २०२१ चे पत्रान्वये मा. उप मुख्यमंत्री यांच्या दालनात झालेल्या बैठकीमध्ये सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या दोन वर्षामध्ये प्रत्येक वर्षी रु. ५० कोटी, असे एकूण रु.१०० कोटी इतका निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या देवस्थानकडून शिर्डी विमानतळाच्या विकासासाठी द्यावा, असे निर्देश दिलेले असून त्या अनुषंगाने नियमानुसार व कायदेशीर असा योग्य प्रस्ताव तदर्थ समितीची मान्यता व मा. उच्च न्यायालयाची पूर्व परवानगी घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत, संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे.

सदर पत्रासोबत उपमुख्यमंत्री कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय येथून श्री गजानन पाटील, उपसचिव यांचे स्वाक्षरीने मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांना लिहलेली टिपणी जोडलेली आहे. त्यामधील तपशील खालीलप्रमाणे

कोपरगाव, शिर्डी जि. अहमदनगर येथे होत असलेले विकसित करण्यासाठी येणा-या विविध समस्या व त्यामध्ये सुधारणा करणे या संदर्भात दि. २८.१२.२०२० रोजी मा. उपमुख्यमंत्री यांचे दालनात झालेल्या बैठकीमध्ये मा. उपमुख्यमंत्री महोदय यांनी सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या दोन वर्षामध्ये प्रत्येक वर्षी रु. ५० कोटी, असे एकूण रु.१०० कोटी इतका शिर्डी देवस्थान ट्रस्टकडून शिर्डी विमानतळाच्या विकासासाठी देण्यात यावा तश सूचना देवस्थान समितीला देण्याचे मा. उपमुख्यमंत्री महोदय यांनी निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

**अर्थसहाय्य देणेबाबत संस्थान अधिनियमतील तरतुद:-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल."

अधिनियम कलम २१ च्या पोट-कलम (१क) अन्वये, भक्तांच्या सोयीसाठी बस, वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यासारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल, अशी तरतूद आहे.

**विभागाचा अभिप्राय :-**

१. संस्थानमार्फत यापूर्वी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील निर्णय क्र.सासंवि-२०११/ (प्र.क्र.४४)/का. १६ दि. २४ जून २०११ अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेनुसार शिर्डी विमानतळासाठी रु.५० कोटी निधी यापूर्वी देण्यात आलेला आहे. त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संस्थानला प्राप्त झालेले आहे.

२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांचा रु.१०० कोटी मात्रचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. १३.१२.२०१८ रोजीचे सभेपुढे सादर केला असता, निर्णय क्रं. ७३२ अन्वये स्थगीत ठेवण्यात आलेला आहे.

३. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील कलम २१ पोटकलम (१क) नुसार भक्तांचे सोयीसाठी विमानतळ विकासासाठी निधी देण्याची तरतूद आहे. शिर्डी येथील विमानतळ महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांचेमार्फत विकसीत करण्यात येत आहे.

४. शिर्डी विमानतळाचा उपयोग हा साईदर्शनाला येणा-या भाविकांचे सोयीसाठी होत आहे.

५. शिर्डी विमानतळाच्या विकासामुळे विमानाच्या फे-यांमध्ये वाढ होण्यास मदत होईल. तसेच प्रवाशांना चांगल्या सुविधा मिळाल्यामुळे प्रवासी संख्या वाढण्यास मदत होईल. पर्यायाने शिर्डी येथे येणा-या भाविकांचे साईदर्शन सुलभ व कमी वेळेत होईल.

६. शिर्डी विमानतळाचे विकासामुळे अहमदनगर जिल्ह्याचा उत्तर भाग, तसेच नाशिक, औरंगाबाद व बीड या लगतच्या जिल्ह्यांमध्ये पर्यटन वृद्धी, कृषि विकास, उद्योग व्यापार यास भरीव चालना मिळेल. तसेच शिर्डी परिसरात रोजगार निर्मिती होईल. परिणामी शिर्डी परिसराचे व अहमदनगर, नाशिक, बीड व औरंगाबाद या जिल्ह्यांतील अर्थकारणावर त्याचा अनकूल परिणाम होईल.

७. मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. ३०.०१.२०१९ रोजी "Shri Sai Baba Sasthan Trust, shall not disburse an amount of the Trust for other purposes than routine expense" असे आदेश दिलेले आहे.

८. मा. तदर्थ समिती, मा. उच्च न्यायालय, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेनंतर, सन २०२१-२२, २०२२-२३ या दोन वर्षात, प्रत्येकी रु.५० कोटी प्रमाणे एकूण रु.१०० कोटी मात्र, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांना अदा करण्यात येईल.

प्रस्ताव:- सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या दोन वर्षामध्ये प्रत्येक वर्षी रु.५०कोटी, असे एकूण रु.१००कोटी इतका निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडून, शिर्डी विमानतळाच्या विकासासाठी देणेबाबतचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर चक्रिय पद्धतीने निर्णयार्थ सादर.

13/3/24

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे.

प्रस्ताव व मा अध्यक्ष यांचा निर्णय वाचला. मा उच्च न्यायालयाच्या आदेश C.A करुन पर्यवलणीच्या अटीनि शासून मंजूर करण्यात येतो. Applied

(श्रीमती.गिता पी. बनकर) 16/3/2024
सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दाखल याचिकेत पारवाणगी मागितल्याने प्रलंबित ठेवुन 3 दिवसांचा अवधी आहे.

(भानुदास एच.पालवे)
अप्पर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(कान्हूराज बगाटे) भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय
दि. 16/03/2021

**विषय – सन 2021-22 व सन 2022-23 या दोन वर्षांमध्ये प्रत्येक वर्षी रु.50कोटी,असे एकूण रु.100कोटी इतका निधी श्री. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी कडून शिर्डी विमानतळाच्या विकासासाठी देणेच्या प्रस्तावावर निर्णय घेणेबाबत...**

प्रस्ताव वाचला व कागदपत्रांचे अवलोकन केले. मा. उच्च न्यायालयासमक्ष सिव्हील ॲप्लिकेशन करुन, परवानगीच्या अधिन राहून सदर प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 16/03/2021

विषय क्र.- 9/ ६२

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय

लेखाशाखा विभाग

**विषय :- श्री साईबाबा संस्थानचे CSR Registration करणेबाबत...**

टिपणी :-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही नोंदणीकृत धर्मदाय (Charitable) व धार्मिक (Religious) ट्रस्ट आहे. ट्रस्टचे कामकाज श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ नुसार चालते.

Ministry of Corporate Affairs यांचे दि.२२.०१.२०२१ चे नोटीफीकेशन नुसार दि.०१.०४.२०२१ पासून ज्या ट्रस्टकडे 12AA नोंदणी प्रमाणपत्र (आयकर नोंदणी प्रमाणपत्र) व 80G नोंदणी प्रमाणपत्र आहे त्यांनी Ministry of Corporate Affairs यांचेकडे CSR-1 फॉर्म भरुन नोंदणी केली तरच त्यांना CSR (Corporate Social Responsibility) अंतर्गत मदत/सहाय्य स्विकारता येईल.

संस्थानकडे सद्यस्थितीत CSR Registration क्रमांक नाही. श्री साईबाबा संस्थानला अनेक कंपन्या त्यांचे CSR फंडमधून औषधे, मशिनरी इ. देणेबाबत प्रस्ताव सादर करतात. सद्यस्थितीत रिलायन्स फाऊंडेशनने Oxygen Generation Plant संस्थानला देणगीदाखल देण्यास मान्यता दिलेली असून RT-PCR Lab सुद्धा देणगीदाखल देण्याची तत्वतः तयारी दर्शविली आहे. सदर Oxygen Generation Plant देणगीदाखल देण्यासाठी त्यांनी दुरध्वनीवरुन Ministry of Corporate Affairs यांचे दि.२२.०१.२०२१ चे नोटीफीकेशन नुसार संस्थानचे 1) 12AA Registration 2) 80G प्रमाणपत्र 3) CSR Registration इ. कागदपत्रांची मागणी केली आहे.

आता Ministry of Corporate Affairs, Government of India यांचे दि.२२.०१.२०२१ चे नोटीफीकेशन नुसार CSR अंतर्गत देणगी रक्कम मशिनरी/औषधे/वस्तु स्विकारतांना CSR Registration करणे आवश्यक आहे. संस्थानचे आयकर दाखल्याची नोंदणी व पुनर्नोंदणी करण्याचे काम मे. एसएसएएएम ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे यांना दिलेले असून सदर फर्मचे चार्टर्ड अकौंटंट सौरभ पाटील यांचा ई-मेल संस्थानला दि.२६.०४.२०२१ ला प्राप्त झाला असून त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

As per guidelines issued by MCA, From 1st April 2021, CSR Funding will be released only to that NGOs, Trusts, Religious Trusts, Societies, 12AA registered entities, 80 G granted entities, Section 8 Company that are registered with MCA by filing Form CSR-1

Therefore please provide following documents to file form CSR - 1 with MCA:-

1. Copy of PAN Card of the NGO
2. Mail ID and Mobile Number
3. Details of Governing Body Members (PAN and email I'd)
4. Copy of Registration Certificate
5. Board Resolution for authorising signatory (format enclosed)
6. Digital Signature of the Authorised Person with his PAN Number

प्रस्ताव :-

१) उपरोक्त नमुद केल्यानुसार संस्थानला CSR Registration करण्यास मान्यता असावी.

२) CSR Registration साठी उपरोक्त नमुद कागदपत्रे नोंदणीसाठी वापरण्यास मान्यता असावी.

३) सदर नोंदणीचे काम मे.एसएसएएएम ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे यांचेकडून करुन घेण्यास व त्याकामी येणा-या अनुषंगीक खर्चास मान्यता असावी.

४) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना CSR Registration करणेसाठीचे सर्व फॉर्म, करारनामे, Power of Attorney, अर्ज तसेच CSR-1 (MCA Portal) फॉर्म ऑनलाईन भरण्यासाठी, त्यासंबंधीत सर्व कागदपत्रे स्वाक्षरी करण्यासाठी प्राधिकृत करण्यास मान्यता असावी.

उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव चक्रीय पद्धतीने मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर मान्यतेसाठी सविनय सादर.

(रविंद्र ठाकरे)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

निर्णय :- उपरोक्तप्रमाणे प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

प्रस्ताव क्र. १ ते ४ मान्य.
परंतु मे. एस.एस.ए.ए.एम. अँड कं. कुणे यांनी मागितलेली फी १,०००/- + GST याबाबत न्यायाचा विनंती करावी. सी.ए. म्हणून आनुषंगिक कामे मोफत करणार असल्याचे विनंती करावे.

श्रीमती गीता प्र. बनकर
सदस्या, तदर्थ समिती तथा
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

प्रस्ताव १ ते ४ मंजूर, मात्र एस.एस.ए.ए.एम. कं. ऐपनी पुणे यांनी मागितलेली फी ६ ... GST याबाबत विनंती करावी. ... मुख्य ... आणि ते मोफत करणार असल्याचे विनंती करावी.

भानुदास ह. पालवे
सदस्य, तदर्थ समिती तथा
अपर महसूल विभागीय आयुक्त, नाशिक

रविंद्र ठाकरे
सदस्य तथा प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

न्या. श्रीकांत ल. अणेकर
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर

**चक्रीय पध्दतीने दि. 27/04/2021 रोजी आणलेल्या विषयावरील निर्णय**

**विषय –** **श्री साईबाबा संस्थानचे CSR Registration करणेबाबत...**

प्रस्ताव 1 ते 4 मंजूर मात्र श्री. लंके यांनी सांगितलेप्रमाणे मे.एसएसएएएम अॅण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे यांनी या कामासाठी मागितलेली फी रु.10,000/- + GST याबाबत त्यांना विनंती करण्यात यावी, कारण त्यांना सी.ए. म्हणून काम देत असतांना इतर अनुषंगिक कामे ते मोफत करतील, असे त्यांनी स्वत:हूनच मान्य केले आहे, ही आठवण त्यांना जरुर करुन देण्यात यावी.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 27/04/2021

विषय क्र.- 9/ ८३

## मा. तदर्थ समितीचे सभेपुढील चक्रीय पद्धतीचा विषय

लेखाशाखा अनुदान

**विषय :- आर्थिक अनुदान मागणीकरिता आलेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत..**

**प्रास्तविक:-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडे अर्थसहाय्य मागणीसाठी दररोज, नोंदणीकृत संस्था, शासकीय कार्यालये, निमशासकीय संस्था, तसेच वैयक्तीकरित्या अर्ज येत असतात. सदरच्या अर्जाद्वारे, १) बांधकाम, २) आश्रमातील लोकांचा खर्च, ३) वाचनालयासाठी पुस्तके-फर्निचर, ४) दवाखान्यासाठी मशिनरी / औषधे, ५) संमेलने, स्पर्धा, शिबिरे, ६) दुष्काळी भागाकरीता चारा/अन्नधान्य/पाणी ७) मुलांच्या शिक्षणासाठी मदत, ८) विधवा/निराधार/अपंग यांना दैनंदिन खर्चासाठी मदत, ९) व्यवसाय सुरू करणेकरीता मदत, १०) मुलांचे लग्नासाठी मदत, ११) जळीत झाल्याने मदत, अशाप्रकारे अनेक कारणासाठी अनुदान मागणी केली जाते.

**संस्थान अधिनियम तरतुद:-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल."

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, अधिनियम २००४ चे कलम २१(२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या विविध प्रयोजनासाठी पुरेशा तरतूदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या तीस टक्कयापेक्षा अधिक नसेल एवढा भाग,समितीस वेळोवेळी खालील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

**कलम २१ (२) (एक)** " छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्य शासनाचे पूर्व मान्यतेने नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रूग्णालय, आधारगृह, किंवा इतर धर्मदाय अथवा धार्मिक संस्था, अथवा कला वा साहित्याशी संबंधित असलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, किंवा नोंदणीकृत सोसायटी यांची स्थापना व देखभाल करून घेणेसाठी, अशी तरतुद आहे.

**संस्थानकडे अनुदान मागणीसाठी दाखल झालेले अर्ज**

दि.०१.११.२०२० ते ३१.१२.२०२० कालावधीत आर्थिक अनुदान मागणी करीता आलेले अर्ज खालीलप्रमाणे-

| अ.नं. | अर्जदाराचा/ संस्थेचे नाव व पत्ता | प्रयोजन | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री रामप्रसाद चतुर्वेदी, दिल्ली | कुटुंबाचे उपजिविकासाठी | |
| २ | जिल्हा रुग्णालय अहमदनगर | एमआरआय मशीन | |
| ३ | जिल्हा रुग्णालय अहमदनगर | रुग्णवाहिका | |
| ४ | जिल्हा रुग्णालय अहमदनगर | कॅथलॅब उभारणीसाठी | |
| ५ | मान. आ. चंद्रकांत रघुवंशी, नंदुरबार | धार्मिक स्थळांवरील सेवेकरी, पुजारी यांचेसाठी | विधी व न्याय विभाग महा. शासन |
| ६ | श्री साईबाबा मंदीर संस्थान,बदनापूर | भक्तनिवारा व आर्थिक मदत | विधी व न्याय विभाग महा. शासन |
| ७ | दर्शना वाघमारे, टिटवाळा | घर कर्ज भरण्यासाठी | |
| ८ | श्री अर्जुन गणपती कोल्हापूरे, कोल्हापूर | घर बांधकामासाठी | |
| ९ | श्री दिनेश श्रीकृष्ण बहिवाळ | किडणी प्रत्यारोपण | |
| १० | श्री सचिन खोले, | मेंदूचे ऑपेशनसाठी | |
| ११ | श्री संत सेवालाल महाराज गौरक्षण धर्माळ ट्रस्ट | गोशाळा मदत | |
| १२ | श्री अभिजीत दानवे | कर्ज भरण्यासाठी | |
| १३ | श्री ओम देशमुख | शैक्षणीक मदत | |
| १४ | विश्वरत्न महात्मा फुले ज्ञानोदय शिक्षण संस्था, पुणे | शैक्षणीक मदत | |
| १५ | इन्फंट इंडिया | एचआयव्ही बाधितांसाठी | |
| १६ | मनोजकुमार जाधव, चाळीसगांव | कर्ज भरण्यासाठी | |
| १७ | सतिषकुमार रोहीत | आर्थिक मदत | |
| १८ | डॉ. बाबासहोब आंबेडकर सुपर मल्टीस्पेशालिटी चॅरिटेबल ट्रस्ट, नागपूर | हॉस्पीटल उभारणीसाठी | |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | श्री महेश सरनाईक | वैद्यकीय मदत | |
| २० | श्री आनंद मारुती लोखंडे | शैक्षणीक मदत | |
| २१ | एस. आर साहू | आर्थिक मदत | |
| २२ | श्री बिरेंद्र कुमार | आर्थिक मदत | |
| २३ | Sri Sai Santhvana Mandir Trust, Udupi | मंदीर जिर्णोद्धारासाठी | |
| २४ | संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगांव | शाळा इमारत बांधकाम | |
| २५ | श्री आनंद लोखंडे, | लॅपटॉपसाठी | |
| २६ | श्रीमती निशा गजवानी, | लघुउद्योगासाठी | |
| २७ | कुमारी ए. मनिषा, तंजावर | शैक्षणीक मदत | |
| २८ | श्री चंद्र शेखर, बंगलोर | कर्ज भरण्यासाठी | |
| २९ | श्री हुशाल साहेबराव थिटे, इंदापूर | घरबांधणीसाठी मदत | |
| ३० | कु. अक्षदा विलास कापडी, सिन्नर | बॅकेचे कर्ज भरण्यासाठी | |
| ३१ | श्रीसेवा गौशाला काजळेश्वर, अकोला | गोशाळा मदत | |
| ३२ | श्री देवोल भगवान | उद्योगासाठी मदत | |
| ३३ | श्री रोहीत जयपुरिया | शैक्षणीक मदत | |
| ३४ | श्री पियुश चौधरी | आर्थिक मदत | |
| ३५ | कु. शहा साहिल सुनिल | शैक्षणीक मदत | |

विभागाचा अभिप्राय :-

१) वैयक्तीक आर्थिक मदत देणेबाबत अधिनियमात स्पष्ट तरतूद नाही.

२) आर्थिक मदत मागणीकरीता दिलेल्या अर्जाबाबतची सद्यस्थितीची अर्जदार विचारणा करीत असतात. त्याबाबत संबंधितांना त्यांच्या "अर्जाबाबतची सद्यस्थिती कळविणेबाबतच्या विषयावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८.१०.२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्र.७६६ अर्जदारास अर्जाची सद्यस्थिती कळविण्याची आवश्यकता नाही" असे ठरले आहे. "

३) वैद्यकीय उपचारासाठी श्री साईनाथ रुग्णालयाकडून वैद्यकीय अनुदान दिले जाते त्यामुळे वैद्यकीय उपचारासाठींचे अर्ज विचारात घेऊ नये.

४) अधिनियम २००४ मध्ये ज्या बाबीसाठी अनुदानाची स्पष्ट तरतूद आहे फक्त त्याच अर्जाचा अनुदान देतांना विचार व्हावा असे मत आहे.

प्रस्ताव:- दि.०१.११.२०२०ते ३१.१२.२०२० या कालावधीत अर्थसहाय्य मागणीसाठी आलेले अर्ज नस्तीबंद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

29/3/24
(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

---

उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे.

07/03/2024
(श्रीमती.गिता पी. बनकर)
सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

16/4/2024
(भानुदास एच.पालवे)
अप्पर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

8/4/2024
(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- 9/ ६८

## मा. तदर्थ समितीचे सभेपुढील चक्रीय पद्धतीचा विषय

लेखाशाखा अनुदान

**विषय :-** आर्थिक अनुदान मागणीकरिता आलेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत..

**प्रास्तविक:-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडे अर्थसहाय्य मागणीसाठी दररोज, नोंदणीकृत संस्था, शासकीय कार्यालये, निमशासकीय संस्था, तसेच वैयक्तीकरित्या अर्ज येत असतात. सदरच्या अर्जाद्वारे, १) बांधकाम, २) आश्रमातील लोकांचा खर्च, ३) वाचनालयासाठी पुस्तके-फर्निचर, ४) दवाखान्यासाठी मशिनरी / औषधे, ५) संमेलने, स्पर्धा, शिबिरे, ६) दुष्काळी भागाकरीता चारा/अन्नधान्य/पाणी ७) मुलांच्या शिक्षणासाठी मदत, ८) विधवा/निराधार/अपंग यांना दैनंदिन खर्चासाठी मदत, ९) व्यवसाय सुरू करणेकरीता मदत, १०) मुलांचे लग्नासाठी मदत, ११) जळीत झाल्याने मदत, अशाप्रकारे अनेक कारणासाठी अनुदान मागणी केली जाते.

**संस्थान अधिनियम तरतुद:-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल."

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, अधिनियम २००४ चे कलम २१(२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या विविध प्रयोजनासाठी पुरेशा तरतूदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या तीस टक्कयापेक्षा अधिक नसेल एवढा भाग,समितीस वेळोवेळी खालील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

**कलम २१ (२) (एक)** " छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्य शासनाचे पूर्व मान्यतेने नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रूग्णालय, आधारगृह, किंवा इतर धर्मदाय अथवा धार्मिक संस्था, अथवा कला वा साहित्याशी संबंधित असलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, किंवा नोंदणीकृत सोसायटी यांची स्थापना व देखभाल करून घेणेसाठी, अशी तरतुद आहे.

**संस्थानकडे अनुदान मागणीसाठी दाखल झालेले अर्ज:-**

दि.०१.०१.२०२१ ते २८.०२.२०२१ कालावधीत आर्थिक अनुदान मागणी करीता आलेले अर्ज खालीलप्रमाणे-

| अ.नं. | अर्जदाराचा/ संस्थेचे नाव व पत्ता | प्रयोजन | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर | हॉस्पीटल बांधणीसाठी | |
| २ | ईशा सुनिल वाडकर, मुंबई | शैक्षणीक मदत | |
| ३ | श्री. श्रेयश कुलकर्णी | वैद्यकीय मदत | |
| ४ | डॉ. जे. सी. दारुवाला, मुंबई | शैक्षणीक मदत | |
| ५ | श्री. अभिजीत दानवे | आर्थिक मदत | |
| ६ | श्री. उदयराज श्रीपती शिंदे, कोल्हापूर | शैक्षणीक मदत | |
| ७ | श्री. संजीव शर्मा | वैद्यकीय मदत | |
| ८ | श्री. नितीन लव्हेकर | आर्थिक मदत | |
| ९ | श्री जी. माधवराव | आर्थिक मदत | |
| १० | श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी | वैद्यकीय यंत्रसामुग्रीसाठी | |
| ११ | श्री. डी. बागची | आर्थिक मदत | |
| १२ | पुणे विद्यार्थी गृहाचे महाराष्ट्र विद्यालय व ज्युनिअर कॉलेज | विद्यालयाचे नुतनीकरणसाठी | |
| १३ | श्री. ए. मोहम्मद | वैद्यकीय मदत | |
| १४ | श्री. कुंदन शिवचरण लढ्ढा , जळगांव | आर्थिक मदत | |
| १५ | श्री सिद्दार्थ सराटे | श्रीराम जन्मभुमी मंदीरासाठी | |
| १६ | मराठी विज्ञान परिषद, मुंबई | विज्ञान प्रसार कार्यासाठी | |
| १७ | डॉ दळवी स्मारक रुग्णालय एवं अनुसंधान केंद्र, ट्रस्ट, नागपूर | वैद्यकीय उपकरणांसाठी | |
| १८ | श्री. रविंद्र श्रीवास्तव | श्रीराम जन्मभुमी मंदीरासाठी | |
| १९ | सौ. सुनंदा साहेबराव मांदळे, बुलढाणा | आर्थिक मदत | |
| २० | श्री. निर्मलकुमार चांदवाणी, सुरत | वैद्यकीय मदत | |
| २१ | श्री. विठ्ठल रामराव जाधव, पुणे | व्यवसायासाठी | |

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | कु. सृष्टी प्रदिप भोंडे, लोणी | शैक्षणीक मदत | |
| २३ | श्री. अशोक कानवडे, संगमनेर | व्यवसाय उभारणीसाठी | |
| २४ | श्री. एम. प्रदीपकुमार | श्रीराम जन्मभुमी मंदीरासाठी | |
| २५ | श्री स्वामी समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर | इमारत बांधकामासाठी | |
| २६ | कोपरगांव इमारत बांधकाम कामगार असोसिएशन | इमारत बांधकाम | |
| २७ | चर्च गेट मेडिकल धर्मार्थ सोसायटी | हॉस्पीटल इमारत बांधकाम | |
| २८ | सर्वज्ञ बहूउद्देशीय संस्था, अमरावती | आश्रमशाळेसाठी मदत | |
| २९ | दि नॅशनल असोशिएन फॉर द ब्लाईंड नाशिक | वृद्धाश्रमाकरिता | |
| ३० | श्री निर्मल कुमार सिंग | उद्योगधंद्यासाठी | |
| ३१ | श्री शिवानंद वासुदेव केंपवाड, सांगली | शैक्षणीक मदत | |
| ३२ | श्री गौतमकुमार, सिरसा | समाजसेवेसाठी | |
| ३३ | श्री शरद डी. धनावडे, अहमदनगर | आर्थिक मदत | विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचे पत्र |

विभागाचा अभिप्राय :-

१) वैयक्तीक आर्थिक मदत देणेबाबत अधिनियमात स्पष्ट तरतूद नाही.

२) आर्थिक मदत मागणीकरीता दिलेल्या अर्जाबाबतची सद्यस्थितीची अर्जदार विचारणा करीत असतात. त्याबाबत संबंधितांना त्यांच्या "अर्जाबाबतची सद्यस्थिती कळविणेबाबतच्या विषयावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८.१०.२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्र.७६६ अर्जदारास अर्जाची सद्यस्थिती कळविण्याची आवश्यकता नाही" असे ठरले आहे. "

३) वैद्यकीय उपचारासाठी श्री साईनाथ रुग्णालयाकडून वैद्यकीय अनुदान दिले जाते त्यामुळे वैद्यकीय उपचारासाठींचे अर्ज विचारात घेऊ नये.

४) अधिनियम २००४ मध्ये ज्या बाबीसाठी अनुदानाची स्पष्ट तरतूद आहे फक्त त्याच अर्जाचा अनुदान देतांना विचार व्हावा असे मत आहे.

प्रस्ताव:- दि.०१.०१.२०२१ ते २८.०२.२०२१ या कालावधीत अर्थसहाय्य मागणीसाठी आलेले अर्ज नस्तीबंद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

29/3/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

---

उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे.

07/05/2021

(श्रीमती.गिता पी. बनकर)
सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

16/4/2021

(भानुदास एच.पालवे)
अप्पर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

2021
10/5/2021 90/2021

ERP-95

विषय क्र.- 9 / ६५

(11)

तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषय 262

लेखाशाखा

विषय :- संस्थानचे आयकर विषयक संपुर्ण कामकाज करणेकामी पात्र झालेले लेखापरिक्षण संस्थाचा तुलनात्मक दर तक्त्याचे अवलोकन होऊन कर सल्लागार नेमणुक होणेबाबत...

टिपणी:-

संस्थानमधील दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत असुन, त्या अनुषंगाने आर्थिक व्यवहारात व कामकाजातही मोठया प्रमाणात वाढ होत आहे. तसेच आर्थिक व्यवहारांसंबंधीत केंद्र व राज्य शासनाकडुन वेळोवेळी विविध आर्थिक, आयकर, जीएसटी इ. विषयक कायदे पारित होतात. या कायद्यांतील अद्यायवत तरतुदींचा प्रभाव संस्थानचे दैनंदिन आर्थिक कामकाजावर पडत असतो. कर विषयक कामकाज अचुकतेने होणे व वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्यांच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही करण्यासाठी व अंतर्गत सक्षम नियंत्रण राहण्याच्या दृष्टीने आयकर सल्लागार, जीएसटी कर सल्लागार यांच्या नेमणुका करण्यात येतात. मागील कर सल्लागार मे.उल्हास बोरसे ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस नासिक यांची दि.३१.०३.२०२१ अखेर रु.१,४९,८६०/- फी वर नियुक्ती करण्यात आली होती. त्यांची मुदत पुर्ण होत असुन, पुढील नियुक्तीकरिता संस्थानचे संकेतस्थळावर माहिती दि.२९.०१.२०२१ ते १५.०२.२१ अखेर कालावधीत प्रसिध्द करण्यात आली होती.

प्रसिध्द करण्यात आलेल्या माहितीस अनुसरुन विहीत मुदतीत प्राप्त झालेले तांत्रिक माहितीचे १० प्रस्ताव दि.०५.०३.२०२१ रोजी मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले. पैकी पात्र ८ लेखापरिक्षण संस्थांचे वाणिज्यिक लिफाफे दि.२२.०३.२०२१ रोजी उघडण्यात आले असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| S. No. | Name of the firm | Annual Fees Quoted with all taxes | Remarks |
|---|---|---|---|
| १ | M/s.V.K.Dhingra & Co. C.A. New.Delhi. | १,२५,००० | L1 |
| २ | M/s Ulhas Borse & Co. C.A. Nashik | १,३१,००० | L2 |
| ३ | M/s Sanjay Goyal & Co. C.A. Nashik | १,४१,००० | L3 |
| ४ | M/s R.P.D. & Asso. C.A. Nashik | १,४४,००० | L4 |
| ५ | M/s.SAAI & Co. C.A. Ahmednagar | १,४५,८४८ | L5 |
| ६ | M/s.Jayesh Desale & co. C.A. Nashik | १,५०,००० | L6 |
| ७ | M/s KBPS & Co. C.A. Mumbai | १,९८,००० | L7 |
| ८ | M/s SSAAM Co. C.A. Pune | २,९५,००० | L8 |

तरी तुलनात्मक दर तक्त्यातील न्युनतम दरधारक मे.व्हि.के.धिंगरा ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, न्यु.दिल्ली यांची दि.०१.०४.२०२१ ते दि.३१.०३.२०२२ कालावधी करिता संस्थानचे कर विषयक संपुर्ण कामकाज करणेकामी कर सल्लागार म्हणुन नेमणुक होणेकामी प्रस्ताव निर्णयार्थ मा.तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रिय पध्दतीने निर्णयार्थ सादर.

30/3/21

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

30/3

निर्णय:-

प्रस्तावातील तुलनात्मक दर तक्त्यातील न्युनतम दरधारक मे.व्हि.के.धिंगरा ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, न्यु.दिल्ली यांची दि.०१.०४.२०२१ ते दि.३१.०३.२०२२ या कालावधी करिता संस्थानचे संपुर्ण आयकर विषयक कामकाज करणेकामी कर सल्लागार म्हणुन नेमणुक करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

15/04/2021

श्रीमती गीता प्र.बनकर
सदस्या, तदर्थ समिती तथा
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

2/4/2021

भानुदास ह पालवे
सदस्य, तदर्थ समिती तथा
अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक

कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.
सदस्य तदर्थ समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

7/4

श्रीकांत ल.अणेकर
**अध्यक्ष, तदर्थ समिती तथा,**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर

विषय क्र.- १/६६ ERP-93 (12)

264

मा.तदर्थ समितीचे सभेपुढील विषय
लेखाशाखा

**विषय:- पुर्व लेखापरिक्षण (Pre-Auditor) कामकाज करणेकामी पात्र लेखापरिक्षण संस्थाचा तुलनात्मक दर तक्ता याचे अवलोकन होऊन पुर्व लेखापरिक्षक नेमणुक होणेबाबत...**

टिपणी:-

संस्थानमध्ये दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीत संस्थानच्या सर्व विभागांतुन बिले अदायगी करीता लेखाशाखा विभागात येतात. सदर बिले अदायगीपुर्व तपासणी करताना मा.व्यवस्थापन समितीची मान्यता, मा.शासनाची मान्यता, संस्थान अधिनियमांतील तरतुदी व लेखा विषयक नियमांस अनुसरुन लेखाशिर्ष, कर वजावटी इ.सर्व बाबींचे काटेकोरपणे पालन होत असलेबाबत व पुरवठादारांना अचुक रक्कम अदा करुन त्याच्या नोंदी लेखापुस्तकांमध्ये घेण्या संबधीत सर्व बिलांची तपासणी केली जाते तसेच वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने व आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्यांच्यात सुधारणा करण्यासाठी पुर्व लेखापरीक्षक म्हणुन स्वतंत्र सक्षम लेखापरिक्षण संस्थेच्या नेमणुक करण्यात येते. आर्थिक वर्ष २०२०-२१ या कालावधी करिता मे.उल्हास बोरसे ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, नाशिक यांची संस्थान व रुग्णालये विभागासाठी सर्व करांसह प्रत्येकी रु.१,००,०००/- अशी एकुण रुपये दोन लाख वार्षिक फी वर नियुक्ती करण्यात आली होती. त्यांची मुदत दि.३१.०३.२०२१ अखेर संपुष्टात येत आहे.

पुढील आर्थिक वर्ष २०२१-२२ करीता संस्थान व रुग्णालये विभागासाठी पुर्व लेखापरिक्षक (Pre Auditor) नेमणुक करणेकामी दि.०३/०२/२०२१ ते दि.१८/०२/२०२१ याकालावधीत संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्यात आली होती. त्यामध्ये नामांकित साधारणतःरु.५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनुभव असलेल्या लेखापरिक्षण संस्थांकडुन प्रस्ताव मागविण्यात आले होते. एका बंद पाकिटामध्ये लेखापरिक्षण संस्थेची माहिती व दुस-या बंद पाकिटामध्ये अपेक्षीत फी सह अर्ज करण्यासाठी आवाहन करण्यात आले होते. त्यास अनुसरुन विहीत मुदतीत १० प्रस्ताव प्राप्त झाले होते. तांत्रिक माहितीचे सदर १० प्रस्ताव दि.०५.०३.२०२१ रोजी मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले. पैकी ८ लेखापरिक्षण संस्थां पात्र झाल्या असुन त्यांचे वाणिज्यिक लिफाफे दि.२२.०३.२०२१ रोजी मा.उप मुख्यक कार्यकारी यांचे समक्ष उघडण्यात आले असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| S. No | Name of the CA Firm | For Sansthan Expected Annual Fees with all taxes | For Hospital Expected Annual Fees with all taxes | Remark |
|---|---|---|---|---|
| १ | M/s. V. K. Dhingra & Co. C.A. New.Delhi. | ८४,००० | ८४,००० | L1 |
| २ | M/s Ulhas Borse & Co. C.A. Nashik | ९१,००० | ९१,००० | L2 |
| ३ | M/s. Jayesh Desale & co. C.A. Nashik | १,००,००० | १,००,००० | L3 |
| ४ | M/s Grand mark & Asso. C.A. Nashik | १,०८,००० | १,०८,००० | L4 |
| ५ | M/s. A. S. Bedmutha & Co. C.A. Aurangabad | १,८०,००० | १,८०,००० | L5 |
| ६ | M/s. Shankar Chaudhary & Co.Cost Accountant Mumbai. | ३,००,००० | ३,००,००० | L6 |
| ७ | M/s. Tushar Pagar & Co.C.A. Nashik | ४,१३,००० | ४,१३,००० | L7 |
| ८ | M/s K. K. Chanani & Asso. C.A. Mumbai | ४,९५,६०० | ४,९५,६०० | L8 |

तुलनात्मक दर तक्त्यात न्युनतम दरधारक मे. व्ही. के. धिंगरा ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, न्यु दिल्ली ही लेखापरिक्षण संस्था असुन, तुलनात्मक दर तक्त्याचे अवलोकन होऊन, आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता संस्थान व रुग्णालये विभागासाठी पुर्व लेखापरिक्षक यांची नेमणुक होणेकामी प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रिय पध्दतीने निर्णयार्थ सादर.

30/3/21

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

निर्णय:-

प्रस्तावीत तुलनात्मक दर तक्त्यातील न्युनतम दरधारक मे. व्हि. के. धिंगरा अॅन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, न्यु.दिल्ली यांची संस्थान व रुग्णालये विभागासाठी आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता पुर्व लेखापरिक्षक (Pre- Audit) म्हणुन सर्वकरांसह प्रत्येकी रु.८४,०००/- अशा एकुण रु.१,६८,०००/- फी वर नेमणुक करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

15/04/2024

श्रीमती. गीता प्र.बनकर
सदस्या, तदर्थ समिती तथा
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

7/4/2024

भानुदास ह पालवे
सदस्य, तदर्थ समिती तथा
अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक

कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.
सदस्य तदर्थ समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

7/4

श्रीकांत ल.अणेकर
**अध्यक्ष, तदर्थ समिती तथा,**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर

(13)

विषय क्र.- 9/. EO GRP-94

मा.तदर्थ समितीचे सभेपुढील विषय - 266
लेखाशाखा

विषय:-आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता वैधानिक लेखापरिक्षक नियुक्ती कामी प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा फीचा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ व शासनास सादर करणेस मान्यता मिळणेबाबत..

टिपणी:-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद कलम १७(२) (ग) अन्वये, *"विश्वस्त व्यवस्थेच्या हिशोबाची, राज्य शासन निर्देश देईल अशा व्यक्तीकडून पुढील लगत वर्षातील अशा तारखेपर्यत वार्षिक लेखापरिक्षण करण्याची व्यवस्था करील."* अशी तरतुद आहे. तसेच कलम २९(०१) अन्वये. *"समिती त्या विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमा खर्चाचा तपशिल दर्शविणारा दि.३१ मार्च, रोजी संपणा-या प्रत्येक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षकांचा अहवाल, तसेच ज्यांना या विश्वस्त व्यवस्थेकडून आर्थिक सहाय्य देण्यात आले अशा देणगी स्विकारणा-या संस्थेची (संपूर्ण पत्यासह) तपशिलवार यादी व असे आर्थिक सहाय्य मागण्यामागील उद्देश व सहाय्याची रक्कम याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या छानणी समितीचा अहवाल, यांसह वार्षिक अहवाल तयार करवून घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत शासनाला व एक प्रत धर्मादाय आयुक्ताला त्या वर्षाच्या ३० सप्टेंबरच्या आत सादर करील."* अशी तरतुद आहे.

शासनाचे निर्देशानुसार आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता वैधानिक लेखापरिक्षक नियुक्तीकामी दि.२९/०१/२०२१ ते दि.१५/०२/२०२१ संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर व मुंबई व शिर्डीतील एक इंग्रजी व एक मराठी प्रथितयश वर्तमानपत्रांत आवश्यक अटींसह माहिती प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार लेखापरिक्षण संस्थांना बंद पाकिटामध्ये लेखापरिक्षण संस्थेची माहिती व दुस-या बंद पाकिटामध्ये अपेक्षीत फी सह अर्ज करण्यासाठी आवाहन करण्यात आले होते. त्यास अनुसरुनः वहीत मुदतीत एकुण ०९ प्रस्ताव प्राप्त झाले. सदर प्रस्तांवांचे तांत्रिक लिफाफे दि.०५.०३.२०२१ रोजी मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले. त्यातील पात्र ०६ लेखापरिक्षण संस्थांचे वाणिज्यिक लिफाफे दि.२२.०३.२०२१ रोजीचे मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले आहेत. त्यांच्या फी चा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असुन तो खालील प्रमाणे-

| S. No. | Name of the firm | Expected Annual Fees with all taxes | Remarks |
|---|---|---|---|
| 1 | M/s. K. K. Chanani & Associates C.A. Mumbai | 76,110 | L1 |
| 2 | M/s. V. K. Dhingra & Co. C.A. New. Delhi. | 84,000 | L2 |
| 3 | M/s. KBPS & Co. C.A. Mumbai | 1,44,000 | L3 |
| 4 | M/s. Mukund M. Chitale & Co. C.A. Mumbai. | 2,06,500 | L4 |
| 5 | M/s. SSAAM Chartered Accountant Pune | 5,90,000 | L5 |
| 6 | M/s. D. K. Kale & Co. C.A. Ahmednagar | 19,50,000 | L6 |

आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता वैधानिक लेखापरिक्षक नियुक्ती संबधीत संस्थान अधिनियमातील तरतुद व मा.विधी व न्याय विभाग यांचे सासंवि-२००९/२५४/(१५)-का-सोळा दि.१६ जुलै,२००९ रोजीचे पत्रास अनुसरुन पात्र झालेल्या एकुण ६ प्रस्तावांच्या फी चा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ व शासनास सादर करणेस चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेकामी मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

निर्णय:-

यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता वैधानिक लेखापरिक्षक नियुक्ती कामी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर तसेच मुंबई व शिर्डीतील एक इंग्रजी व एक मराठी प्रथितयश वर्तमानपत्रांत प्रसिध्द करण्यात आलेल्या माहितीस अनुसरुन, प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या फी च्या तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करण्यात येऊन सदरचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास मान्यता देण्यात आली.

15/04/2024

श्रीमती गीता प्र.बनकर
सदस्या, तदर्थ समिती तथा
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

15/4/2024

भानुदास ह.पालवे
सदस्य, तदर्थ समिती तथा
अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक

कान्हुराज बग्माटे, भा.प्र.से.
सदस्य तदर्थ समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

7/4

श्रीकांत ल.अणेकर
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर

GRP-91

विषय क्र.- 9/६८

268

**मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय**
**लेखाशाखा विभाग**

**विषय :- करनिर्धारण वर्ष २०१८-१९ चे करनिर्धारण आदेशाविरुद्ध आयकर विभागाकडे अपील करण्यास मान्यता मिळणेबाबत...**

टिपणी :-

मा.उपायुक्त, आयकर विभाग मुंबई यांनी करनिर्धारण वर्ष २०१८-१९ चे करनिर्धारण करुन दि.३१.०३.२०२१ रोजी करनिर्धारण आदेश No. ITBA/AST/S/156/2020-21/1032066042(1) अन्वये रु.६०,९१,५४,१२०/- देय कर कळविला असून दि.३१.०३.२०२१ No.ITBA/AST/S/156/2020-21/1032066042(1) अन्वये ३० दिवसांचे आत शासन खाती भरणेबाबत कळविले आहे. यामध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी धर्मादाय ट्रस्ट गृहीत धरुन मंदिर परिसरातील दक्षिणापेटीमध्ये प्राप्त झालेल्या देणगीवर आयकर आकारणी केली आहे. संस्थानचे आयकरा संबंधीत कामकाज करणारे संस्थान नियुक्त कर सल्लागार मे.एसएसएसएएम ॲण्ड कं., चार्टर्ड अकौटंटस्, पुणे यांनी आयकर निर्धारणाचे काम पाहिले होते. अशाचप्रकारे मागील करनिर्धारण वर्षांचे आयकर निर्धारणाविरुद्ध आयकर अपील दाखल करण्यात आले आहे.

आयकर अपील कामकाज करणेकामी मे.व्ही.के. बेसवाल ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस्, मुंबई, यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच आयकर विषयक कामकाजामध्ये सेवानिवृत्त प्रिन्सीपल कमीशनर, आयकर विभाग श्री.एस.डी. श्रीवास्तव, दिल्ली हे मार्गदर्शन करत आहेत. मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालय येथे आयकरा संबंधीत संस्थानची बाजू मांडण्याकरीता संस्थान नियुक्त ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.एस. गणेश, दिल्ली हे काम पाहत आहेत.

करनिर्धारण वर्ष २०१८-१९ चे आयकर निर्धारण आदेशाविरुध्द आयकर विभागाकडे अपील दाखल करणे आवश्यक आहे. त्याकरिता देय होणारी २०% रक्कम भरण्याची तरतूद आहे. तथापि, मागील मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार करनिर्धारण वर्ष २०१३-१४ व २०१५-१६ चे अपील सुनावणी होईपर्यंत स्थगिती असलेबाबत संदर्भ देऊन आयकर विभागाकडे Stay Petition अर्ज दाखल करावा लागेल. तसेच आवश्यकतेनुसार मा.न्यायालयांकडे रिट अर्ज दाखल करावे लागतील.

तरी करनिर्धारण वर्ष २०१८-१९ चे दि.३१.०३.२०२१ रोजीचे करनिर्धारण आदेशाविरुध्द आयकर विभागाकडे संस्थान नियुक्त विनामोबदला काम पाहणारे कर सल्लागार सीए व्ही.के. बेसवाल ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस्, मुंबई यांचेमार्फत अपील कार्यवाही करण्यास तसेच त्याकरीता संस्थान नियुक्त कर सल्लागार मे.एसएसएसएएम ॲण्ड कं., चार्टर्ड अकौटंटस्, पुणे यांचेमार्फत आवश्यक ती कागदपत्रे दाखल करण्यास व त्यानंतर आवश्यकतेप्रमाणे मा.उच्च न्यायालय, मा.सर्वोच्च न्यायालय येथे न्यायालयीन कार्यवाही करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

4/4/21.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**निर्णय :-** करनिर्धारण वर्ष २०१८-१९ चे आयकर निर्धारण आदेशाविरुद्ध विहीत पद्धतीने संस्थान नियुक्त कर सल्लागार यांचेमार्फत आयकर विभागाकडे अपील दाखल करण्यास व त्याकरीता देय २० टक्के रक्कम भरण्यामध्ये सुट मिळण्याकरीता आयकर विभागाकडे व आवश्यकतेप्रमाणे मा.उच्च न्यायालय, मा.सर्वोच्च न्यायालय येथे रिट अर्ज दाखल करण्यास व सदर कामकाजाकरीता येणा-या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.

15/04/2021

श्रीमती गीता प्र. बनकर
सदस्या, तदर्थ समिती तथा
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

7/4/2021

भानुदास ह. पालवे
सदस्य, तदर्थ समिती तथा
अपर महसूल विभागीय आयुक्त, नाशिक

7/4/21

कान्हूराज ह. बगाटे, भा.प्र.से.
सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

7/4

न्या. श्रीकांत ल. अणेकर
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर

CPP-92

विषय क्र.- 9 / ६९

(15)

270

मा.तदर्थ समितीचे सभेपुढील विषय

लेखाशाखा

**विषय:- सन २०२१-२२ या आर्थिक वर्षा करिता अंतर्गत लेखापरिक्षण नियुक्ती कामी प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा फीचा तुलनात्मक तक्ता शासनास सादर करणेबाबत..**

**टिपणी:-**

संस्थानमध्ये दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे, वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने व आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्यांच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही करण्यासाठी व अंतर्गत नियंत्रण सक्षम राहण्यासाठी पुर्व लेखापरीक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक व करसल्लागार म्हणुन बाहेरील सक्षम संस्थेंच्या नेमणुका करण्यात येतात.

अधिनियमातील तरतुदीनुसार वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणुक मा. विधी व न्याय विभागामार्फत करण्यात येते. तथापी शासनाच्या सासंवि-२०१७/१२९४/प्र.क्र.१३४/का.१६/ दि.०८.११.२०१७ चे पत्रान्वये "*श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मध्ये विश्वस्तव्यवस्थेच्या हिशेबाची, राज्य शासन निर्देश देईल. अशा व्यक्तीकडून पुढील लगत वर्षातील अशा तारखेपर्यंत वार्षिक लेखापरिक्षा करण्याची व्यवस्था करिल, अशी तरतुद करण्यात आली आहे. सदर तरतुद विचारात घेता श्री साईबाबा संस्थानच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या नियुक्तीप्रमाणेच अंतर्गत लेखा परिक्षणासाठी लेखापरिक्षकांची नियुक्ती शासन मान्यतेनेच करणे आवश्यक आहे. सबब, याप्रमाणे भविष्यात कार्यवाही करण्यात यावी.*" असे कळविले आहे.

शासनाच्या निर्देशानुसार आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता विहीत पध्दतीने संस्थान व रुग्णालये विभाग याकरिता मे.ए.एस.बेदमुथा ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, औरंगाबाद यांची सर्व करांसह रू.१,३८,०६०/- फी वर अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक करण्यात आली होती. त्यांची मुदत दि.३१.०३.२०२१ अखरे संपुष्टात येत असुन, पुढील आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत लेखापरिक्षक नेमणुक करणे आवश्यक आहे.

आर्थिक वर्ष २०२१-२२ चे अंतर्गत लेखापरिक्षक नियुक्ती करिता दि.०४/०२/२०२१ ते दि.२२/०२/२०२१ याकालावधीत संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर तसेच मुंबई व शिर्डीतील एक इंग्रजी व एक मराठी प्रथितयश वर्तमानपत्रांत माहिती प्रसिध्द करण्यात आली होती. त्यामध्ये नामांकित साधारणतःरु.५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनुभव असलेल्या लेखापरिक्षण संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. एका बंद पाकिटामध्ये लेखापरिक्षण संस्थेची माहिती व दुस-या बंद पाकिटामध्ये अपेक्षीत फी सह अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यास अनुसरुन विहीत मुदतीत २४ प्रस्ताव पात्र झाले होते. तांत्रिक माहितीचे सदर २४ प्रस्ताव दि.०५.०३.२०२१ रोजी मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले. पैकी २० लेखापरिक्षण संस्था पात्र झाल्या असुन, त्यांचे वाणिज्यिक लिफाफे दि.२२.०३.२०२१ रोजी मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले असुन, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे-

| S. No. | Name of the CA Firm | Expected Annual Fees with all taxes | Remark |
|---|---|---|---|
| 1 | M/s.V.K.Dhingra & Co. C.A. New.Delhi. | 98,000 | L1 |
| 2 | M/s Ulhas Borse & Co. C.A. Nashik | 1,01,000 | L2 |
| 3 | M/s.Jayesh Desale & co. C.A. Nashik | 1,06,000 | L3 |
| 4 | M/s. GRANDMARK & Asso. C.A. Nashik | 2,12,400 | L4 |
| 5 | M/s.A.S.Bedmutha & Co. C.A. Aurangabad | 2,25,000 | L5 |
| 6 | M/s.MMJK & Co. C.A. Pune | 3,54,000 | L6 |
| 7 | M/s KBPS & Co. C.A. Mumbai | 3,60,000 | L7 |
| 8 | M/s .Shankar Chaudhary & Co. Cost Accountant Mumbai | 4,00,000 | L8 |

| S. No. | Name of the CA Firm | Expected Annual Fees with all taxes | Remark |
|---|---|---|---|
| 9 | M/s.SAAI & Co. C.A. Ahmendnagar | 5,58,140 | L9 |
| 10 | M/s.C.V.Chitale & Co. C.A. Pune | 5,90,000 | L10 |
| 11 | M/s. R. Devendra Kumar & Asso. Mumbai | 7,78,800 | L11 |
| 12 | ASA & Asso. LLP C.A. New.Delhi. | 11,14,444 | L12 |
| 13 | M/s. Joshi Apte & Asso.Cost Accountant Pune | 11,80,000 | L13 |
| 14 | M/s. Manoj Mohan & Asso. C.A. Noida Up | 13,81,131 | L14 |
| 15 | M/s K.K.Chanani & Associates C.A. Mumbai | 14,75,000 | L15 |
| 16 | RSM & Asso. C.A. New Delhi | 21,24,000 | L16 |
| 17 | M/s.Mehrotra & Mehrotra C.A. New Delhi | 23,60,000 | L17 |
| 18 | M/s.Vinod Singhal & Co.LLP C.A. Jaipur | 27,43,500 | L18 |
| 19 | M/s. RANK & Asso. C.A. Mumbai | 29,02,800 | L19 |
| 20 | M/s. D.K.Kale & Co. C.A. Ahmednagar | 29,50,000 | L20 |

आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता अंतर्गत लेखापरिक्षक नियुक्ती संबधीत मा.विधी व न्याय विभाग यांचे सासंवि-२०१७/१२९४/प्र.क्र.१३४/का.१६/ दि.०८.११.२०१७ रोजीचे निर्देशास अनुसरुन संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर तसेच मुंबई व शिर्डीतील एक इंग्रजी व एक मराठी प्रथितयश वर्तमानपत्रांत प्रसिध्द करण्यात आलेल्या माहितीस अनुसरुन, पात्र झालेल्या एकुण २० प्रस्तावांच्या फी चा तुलनात्मक तक्ता अंतर्गत लेखापरिक्षक नियुक्तीकामी शासनास सादर करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रिय पध्दतीने निर्णयार्थ सादर.

30/3/17

(कान्हूराज बगाटे भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

**निर्णय:-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता अंतर्गत लेखापरिक्षक नियुक्ती कामी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर तसेच मुंबई व शिर्डीतील एक इंग्रजी व एक मराठी प्रथितयश वर्तमानपत्रांत प्रसिध्द करण्यात आलेल्या माहितीस अनुसरुन, प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या फी च्या तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करण्यात येऊन सदरचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास मान्यता देण्यात आली.

15/04/2021

श्रीमती गीता प्र.बनकर
सदस्या, तदर्थ समिती तथा
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

17/4/2021

भानुदास ह.पालवे
सदस्य, तदर्थ समिती तथा
अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक

कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.
सदस्य तदर्थ समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

7/4

श्रीकांत ल.अणेकर
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर

Ptd - 08/05/2021

विषय क्र.- 9/60

मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषयांची टिपणी

लेखाशाखा विभाग



विषय – स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा श्रीरामपूर यांचेकडुन ए.टी.एम. व्दारे प्राप्त होणा-या देणगी रक्कमेचे रिपोर्ट मिळत नसलेने, सदर खाते स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी येथे वर्ग करणेबाबत.

संस्थानला सहजा-सहजी देणगी देता यावी म्हणून, संस्थानने साईभक्तांसाठी स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा श्रीरामपूर या बॅंकेची ए.टी.एम. सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. श्री साईभक्त त्यांचेकडील ए.टी.एम. कार्डचा वापर करुन, ए.टी.एम. सुविधेव्दारे संस्थानला देणगी देत असतात. देणगी स्वरूपात प्राप्त झालेल्या रक्कमेचे रिपोर्ट बॅंक सस्थांनला पाठवित असते.

ए.टी.एम. सुविधेव्दारे प्राप्त होणा-या देणगी रक्कमेच्या रिपोर्टमध्ये, साईभक्तांचे नाव, पत्ता, देणगीची रक्कम, देणगी दिल्याची तारीख, देणगी देण्याचा उद्देश इत्यादी माहिती एक्सेल फाईलमध्ये बॅंकांकडून संस्थानला प्रत्येक महिन्याला ई-मेलव्दारे मिळत असते. तसेच प्राप्त देणगीची रक्कम संस्थानच्या नावे सदर स्टेट बॅंक ऑफ इंडिया, श्रीरामपूर बॅंकेत असलेल्या बचत खाते क्रं. ११३२८५०४५१८ मध्ये जमा होत असते. मिळालेल्या रिपोर्टनुसार संस्थानकडुन, श्री साईभक्तांना, त्यांनी दिलेल्या देणगी रक्कमेच्या पावत्या देऊन, रक्कम जमा-नावे करण्यात येत असते. परंतु-

अ) स्टेट बॅंक ऑफ इंडिया, श्रीरामपूर यांनी एप्रिल-२०१६ पासून देणगी रक्कमेचे रिपोर्ट दिलेले नव्हते. रिपोर्ट प्रलंबित असल्याने ते वेळेत पाठविणेबाबत, त्यांना वेळोवेळी पत्र पाठवुन, ई-मेल पाठवुन, दुरध्वनीव्दारे तसेच प्रत्यक्ष बॅंकेत वेळोवेळी जाऊन, विनंती केलेली आहे. परंतु, तरीही बॅंकेने रिपोर्ट पाठविले नसल्याने, मा. मुख्य कार्यकारी आधिकारी यांनी दि. १५ मे, २०१९ अन्वये बॅंकेचे अध्यक्ष यांना D. O. Letter पाठविलेले होते. त्यास अनुसरुन, बॅंकेने माहे फेब्रुवारी २०२० मध्ये, एप्रिल २०१६ ते डिसेंबर-२०१९ अखेर, सर्व रिपोर्ट पाठविलेले आहेत. परंतु, ते सर्व रिपोर्ट हे बॅंक स्टेटमेंटच्या तपशिलाशी मिळते–जूळते नसल्याचे, स्टेट बॅंक ऑफ इंडिया, श्रीरामपूर यांना आपण पत्राव्दारे, ई-मेलव्दारे, दुरध्वनीव्दारे व प्रत्यक्ष भेटून निदर्शनास आणुन दिलेले आहे. तरी स्टेट बॅंक ऑफ इंडिया, श्रीरामपूर यांनी याबाबत, अद्याप कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

ब) स्टेट बॅंक ऑफ इंडिया, श्रीरामपूर यांना, मा मुख्य कार्यकारी आधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत दिनांक १५ सप्टेंबर २०२०, व २१ नोव्हेंबर २०२० रोजी, बॅंकेकडून देणगी रक्कमेचे रिपोर्ट मिळत नसल्याने कायदेशिर कारवाई करण्यात येत असल्याबाबत पत्राव्दारे कळविण्यात आले होते. त्यास अनुसरून, बॅंकेचे वरिष्ठ आधिकारी, श्री पांडे मुकेश, मूंबई (AGM) यांनी तात्पूरता फक्त एक सूधारित रिपोर्ट पाठविलेला आहे. परंतु, पाठविण्यात आलेल्या रिपोर्ट हा आपल्या बॅंकेपासबुकला जुळत नसल्याने, आपण त्यांना सूधारित रिपोर्ट पाठविण्याबाबत कळविलेले आहे. परंतु, अद्याप याबाबत त्यांचेकडुन काहीही प्रतिसाद मिळालेला नाही.

उपरोक्त, 'अ' व 'ब' प्रमाणे, आपण स्टेट बॅंक ऑफ इंडिया, श्रीरामपूर यांना स्वत:, पत्राव्दारे, ई-मेलव्दारे, दुरध्वनीव्दारे तसेच प्रत्यक्ष बॅंकेत वेळोवेळी जाऊन प्रलंबित रिपोर्ट मिळणेबाबत विनंती केलेली आहे. परंतु, त्याचेकडुन काहीच प्रतिसाद मिळत नाही. संस्थानला ए.टी.एम. सुविधाद्वारे एप्रिल २०१६ पासुन वार्षिक सरासरी ५ लाख ते ६ लाखा पर्यंत देणगी रककम जमा होत आहे. प्राप्त होणा-या देणगी रक्कमेबाबत भक्ताचे नाव, पत्ता, देणगी रक्कम पाठविणेचा उददेश (अन्नदान निधी, मेडीकल निधी, इमारत निधी, शैक्षणिक निधी व सर्वसाधारण निधी) याबाबत कोणतीही माहीती बॅंकेकडून उपलब्ध होत नाही. प्राप्त होणारी देणगी रक्कम लेखापरीक्षणाकरीता सर्वसाधारण निधी मध्ये जमा करण्यात येत आहे. तसेच ए.टी.एम.व्दारे प्राप्त होणा-या देणगीबाबतचे खाते हे स्टेट बॅंक ऑफ इंडिया, श्रीरामपूर येथे असल्याने, सदर बॅंकेत नियमित प्रत्यक्ष जाऊन संपर्क करणे अडचणीचे होत आहे.

त्याअनुषंगाने, दि.२१ डिसेंबर, २०२० रोजी, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखाधिकारी यांनी, स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांचे शाखा व्यवस्थापक, श्री कृष्ण मिश्रा यांचेशी समक्ष चर्चा केली असता, स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा श्रीरामपूर येथे असलेले ए.टी.एम.चे खाते स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी येथे वर्ग करता येईल. परंतु, खाते वर्ग केल्यानंतर वर्ग केलेल्या तारखेपासुन स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांचेकडून देणगी रक्कमेचे रिपोर्ट देण्यात येतील, असे श्री मिश्रा यांनी सांगितले, त्यानुसार सदर खाते स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांचेकडे वर्ग केले तर, येथूनपुढे स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांचे कडुन मिळालेल्या रिपोर्टनुसार, संस्थानकडुन श्री साईभक्तांना, त्यांनी दिलेल्या देणगी रक्कमेच्या पावत्या व उदी-प्रसाद देऊन, रक्कम वेळेत जमा-नावे करता येईल. तसेच, स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा श्रीरामपूर यांचे कडून, प्रलंबित असलेले रिपोर्ट मिळवणेबाबत पाठपुरावा करता येईल, असे त्यांनी सांगितले.

विभागाचा अभिप्राय:-

१. श्री साईभक्तांना ए.टी.एम. व्दारे देणगी देता यावी म्हणून आणि स्टेट बॅंक ऑफ इंडिया यांची शाखा शिर्डी येथे नसल्याने, तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी साहेब व मा. मुख्य लेखाधिकारी साहेब यांचे निर्देशानुसार, स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा श्रीरामपूर येथे ए.टी.एम.देणगीसाठी बचत खाते क्र.११३२८५०४५१८ हे सुरु करण्यात् आले होते.

२. परंतू, स्टेट बॅंक ऑफ इंडिया, श्रीरामपूर यांचेकडून देणगी रक्कमेचे रिपोर्ट मिळत नसल्याने, देणगीदार साईभक्तांना त्यांच्या देणगी रक्कमेच्या पावत्या व उदी-प्रसाद पाठविता येत नाही. याबाबत स्टेट बॅंक ऑफ इंडिया, श्रीरामपूर यांना वेळोवेळी पत्र देऊन, इमेलव्दारे, दुरध्वनीव्दारे, प्रत्यक्ष भेटून तसेच बॅंकेचे मा. अध्यक्ष यांना मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी डी.ओ.लेटर देऊनही त्यांचेकडून काहीच प्रगती होत नाही. तसेच त्यांची शाखा श्रीरामपूर येथे असल्याने, तेथे सतत प्रत्यक्ष जाणे अडचणीचे होत आहे.

३. त्यामुळे, आता, स्टेट बॅंक ऑफ इंडिया यांची शाखा शिर्डी येथे असल्याने, संस्थानच्या कामकाजच्या सोईच्यादृष्टीने, स्टेट बॅंक ऑफ इंडिया, श्रीरामपूर येथे असलेले ए.टी.एम. संबंधीत खाते त्याच बॅंकेच्या शिर्डी शाखेत वर्ग करण्यास हरकत नाही. सबब बॅंक तसेच बॅंकेतील बचत खाते नंबर बदलत नसून, फक्त शाखा बदलत आहे. म्हणजेच पुर्वी असलेले श्रीरामपूर शाखेतील बचत खाते हे त्याच बॅंकेच्या शिर्डी शाखेत हस्तांतरीत होत आहे.

तरी, बॅंकेडून संस्थानला प्राप्त देणगी रक्कमेचे रिपोर्ट मिळत नसल्याने, सध्या स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा श्रीरामपूर यांचेकडे असलेले ए.टी.एम. सुविधाद्वारे प्राप्त होणा-या देणगीचे बचत खाते क्रं. ११३२८५०४५१८ हे, स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी येथे वर्ग करणेस मान्यता मिळणेकामी, सदर प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पदधतीने निर्णयार्थ सादर.

16/8/24

(कान्हूराज बगाटे भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे/~~नाही~~.

16/8/2024

(गिता प्रविण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर तथा
सदस्य, तदर्थ समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

20/8/2024

(~~भानुदास~~ पालवे)
अप्पर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक तथा
सदस्य, तदर्थ समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

16/8/24

(कान्हूराज बगाटे भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
सदस्य, तदर्थ समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

16/8

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा
अध्यक्ष, तदर्थ समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- 9/09



**मा.तदर्थ समितीचे सभेत नोंद घेण्यासाठीचा विषय**
**लेखाशाखा विभाग**

**विषय - माहे डिसेंबर-२०२० व जानेवारी-२०२१ मासिक जमा-खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत...**

टिपणी -

लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडून खर्च होणा-या रकमांचा जमा-खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे डिसेंबर-२०२० व जानेवारी-२०२१ या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा.तदर्थ समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. जमा-खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | महिना | जमा | खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | डिसेंबर-२०२० | ३३,४७,९५,२१०/- | १७,५७,८७,२१९/- |
| ०२ | जानेवारी-२०२१ | ३६,४१,४०,४३४/- | १७,००,२९,८१६/- |

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे डिसेंबर-२०२० व जानेवारी-२०२१ या कालावधीतील मासिक जमा खर्चाची चक्रिय पद्धतीने नोंद घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर.

(रविंद्र ठाकरे)
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

---

**निर्णय :-** माहे डिसेंबर-२०२० ते जानेवारी-२०२१ या कालावधीतील जमा खर्च तक्त्यांचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.

(श्रीमती गीता बनकर)
सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर. तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

12/1/2021
(भानुदास पालवे)
अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक. तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा
सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर तथा
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

**Accounts Office**
**Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi**

**Statement of Receipts and Payments for the month of December-2020 & January-2021**

Budget Provision for 2020-21
Receipts - 16,96,97,66,000
Payments - 16,98,17,66,000

**December-2020**

| Sr.No. | Particulars | For the month of December-2020 | Previous Amount | Progressive Total Amount | Percent | Balance |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Receipts | 33,47,95,210 | 1,22,30,24,239 | 1,55,78,19,449 | 9.18 | 15,41,19,46,551 |
| 2 | Payments | 17,57,87,219 | 1,05,90,93,933 | 1,23,48,81,152 | 7.27 | 15,74,68,84,848 |
| 3 | Payments below Rs.5,00,000/- sanctioned by the Chief Exccutive Officer. | 6,02,622 | 10,95,261 | 16,97,883 | - | - |
| 4 | Total Investments as on31st December2020 | 22,26,72,35,520 | - | - | - | - |

**January-2021**

| Sr.No. | Particulars | For the month of January-2021 | Previous Amount | Progressive Total Amount | Percent | Balance |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Receipts | 36,41,40,444 | 1,55,78,19,448 | 1,92,19,59,892 | 11.33 | 15,04,78,06,108 |
| 2 | Payments | 17,00,29,816 | 1,23,48,81,153 | 1,40,49,10,968 | 8.27 | 15,57,68,55,032 |
| 3 | Payments below Rs.5,00,000/- sanctioned by the Chief Executive Officer. | 8,57,542 | 16,97,883 | 25,55,425 | - | - |
| 4 | Total Investments as on31st January2021 | 22,42,83,94,412 | - | - | - | - |

(Ravindra Thakare)
**I/c.Chief Executive Officer,**
**Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi**

विषय क्र.- 9 | 02

# मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय

लेखाशाखा विभाग

विषय :- **संस्थान व रुग्णालये विभागाकडील मालमत्ता विमा, कामगार कायदा १९२३ अन्वये कर्मचारी विमा व श्री साईभक्तांचा अपघाती विमा पॉलीसीचे नुतनीकरणासाठी राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुन बंद पाकिटामध्ये दरपत्रक मागविणे व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

टिपणी :-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालमत्तेचे विमा संरक्षण, कामगार कायदा १९२३ अन्वये कामगार विमा व श्री साईभक्तांना अपघाती विमा संरक्षण मिळणेसाठी, दरवर्षी संस्थान राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून दरपत्रके मागवून, त्यातील न्युनतम दरांचे दरपत्रके स्विकारून विमा संरक्षण घेत असते. त्याअनुषंगाने मागील वर्षी घेतलेल्या सदर विमा पॉलीसीचा तपशिल खालील प्रमाणे.

**(अ) संस्थान मालमत्ता विमा व कामगार विमा -** संस्थानच्या मालमत्तेचा विमा, दि.१० जुलै,२०२० ते दि.०९ जुलै, २०२१ या एका वर्षासाठी, उतरविणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडुन दर मागविण्यात आले होते. त्यातील युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी, शिर्डी यांचे निम्नत्तम दर, म्हणजेच रक्कम रू.३६,२५,०००/- मात्रचे दर स्विकारण्यात आले होते. या विमा पॉलिसीची मुदत दि.०९ जुलै, २०२१ रोजी संपत आहे. त्याअनुषंगाने पुढील एक वर्ष कालावधीकरीता, (दि.१० जुलै २०२१ ते दि. ०९ जुलै २०२२) संस्थान मालमत्तेच्या विम्याचे नुतनीकरण करणे गरजेचे आहे. नुतनीकरण करण्यात येणा-या विमा पॉलीसीचा तपशिल पुढीलप्रमाणे. -

| Sr. No. | Particulars | Insured Sum (in Crore) |
|---|---|---|
| 1 | Cash in Transit Insurance | 0.70 |
| 2 | Fidelity Guarantee Insurance | 6.33 |
| 3 | Burglary & Housebreaking Policy | 306.60 |
| 4 | Cash in Safe, Drawers | 0.60 |
| 5 | Comprehensive Fire Policy (Including STFI, Terrorism & Earthquake Cover) | 363.93 |
| | **Total -** | **678.15** |
| 6 | Group Insurance Under Provisions of Workmen Compensation Act,1923 Monthly staff salary is Rs.5.67 Crores. | (Approx 1956 Personnel) |

**(ब) रुग्णालये विभाग मालमत्ता विमा व कामगार विमा -** रुग्णालये विभागाच्या मालमत्तेचा विमा दि.११ जुलै, २०२० ते दि.१० जुलै, २०२१ या एका वर्षासाठी, उतरविणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडुन दर मागविण्यात आले होते. त्यातील दि ओरीएंटल इंन्शुरन्स कंपनी लि. कोपरगाव यांचे निम्नत्तम दर, म्हणजेच रक्कम रू. १४,००,०००/- मात्रचे दर स्विकारण्यात आले होते. या विमा पॉलिसीची मुदत दि.१० जुलै, २०२१ रोजी संपत आहे. त्याअनुषंगाने पुढील एक वर्ष कालावधीकरीता,(दि.११ जुलै, २०२१ ते दि.१० जुलै, २०२२) रुग्णालये मालमत्ताच्या विम्याचे नुतनीकरण करणे गरजेचे आहे. नुतनीकरण करण्यात येणा-या विमा पॉलीसीचा तपशिल पुढीलप्रमाणे.-

| Sr. No. | Particulars | Insured Sum (in Crore) |
|---|---|---|
| 1 | Cash in Transit Insurance | 0.11 |
| 2 | Fidelity Guarantee Insurance | 0.42 |
| 3 | Burglary & Housebreaking Policy | 22.32 |
| 4 | Cash in Safe, Drawers | 0.25 |
| 5 | Comprehensive Fire Policy (Including STFI, Terrorism & Earthquake Cover) | 25.56 |
| | **Total-** | **48.66** |
| 6 | Group Insurance Under Provisions of Workmen Compensation Act,1923 Monthly staff salary is Rs.2.87 Crores. | (Approx 550 Personnel) |

उपरोक्त "अ" व "ब" तक्त्यामधील अ.क्र. ५ मध्ये नमुद चल अचल मालमत्ता संबंधीची रक्कम मागील वर्ष, सन .२०२०-२१ पर्यंत वस्तुच्या मुळ किमंतीनुसार विमा संरक्षण घेण्यात येत होते.तथापि, त्यामधील काही वस्तुंचे जिवनमान (वापराचा कालावधी) संपत आलेला / संपलेला आहे. त्यामुळे सदर

वस्तुच्या संदर्भात भविष्यात काही घटना घडल्यास विमा कंपनीकडुन परतावा रक्कम जास्त मिळणार नाही. सबब मुळ किमतीवर विमा घेतल्यास त्यासाठी प्रिमिअमची रक्कम जास्त भरावी लागणार असुन, त्या प्रमाणात विमा संरक्षण परतावा रक्कम मिळणार नाही. या सर्व बाबींचा विचार करता, चालु आर्थिक वर्ष, सन २०२१-२२ पासुन, उपरोक्त "अ" व "ब" तक्त्यातील अ.क्र.५ मधील चल अचल मलमत्ता (Buildings, Windmills, Furniture & Fixtures, Plant & Machinery, Equipment, Instrument, Computers, Solar Project व Gas Plant इत्यादी) वस्तुच्या किमती घसारा वजा जाता किंमत गृहित धरुन, त्यानुसार विमा संरक्षण घेतल्यास प्रिमिअमची रक्कम कमी भरावी लागेल, असे मत आहे. त्यामुळे उपरोक्त कंसात नमुद असलेल्या चल अचल मालमत्तेच्या रकमा घसारा वजा जाता गृहित धरलेल्या आहे.

(क) श्री साईभक्तांचा अपघात विमा- सदर विमा पॉलिसीमध्ये शिर्डी येथे "श्रीं" चे दर्शनार्थ येणाऱ्या भक्तांचे सुरक्षिततेसाठी अपघाती वा घातपाती विमा संरक्षण असावे, म्हणून साईभक्तांसाठी विमा पॉलिसी घेणेत येत असते. सदरहु दुर्दैवी घटना संस्थान मालकीचे सर्व इमारती व त्यांचा परिसर, निवासस्थाने, रुग्णालये व गर्दीच्या काळात फुटपाथवर जिथपर्यंत भक्तांची दर्शन लाईन जाईल तिथपर्यंत, तसेच मंदिर परिसर (चावडी, व्दारकामाई, गुरुस्थान व त्यांच्या परिसरात) पालखी/रथ मिरवणूकीच्या दिवशी शिर्डी गावातील पालखी रोड, श्री रामनवमी उत्सवाच्या वेळेस बाबांच्या स्नानासाठी कावडीने पाणी आणणारे साईभक्त, खंडोबा मंदिर ते साई समाधी मंदिरापर्यंत पालखी घेऊन येणारे साईभक्त, यांची एका वर्षाकरीता एका वेळेस २५ साईभक्तांसाठी, विमा पॉलीसी घेण्यात येते.

| Sr. No. | Particulars | Insured Sum (in Crore) |
|---|---|---|
| 1 | For Death only (25 Devotee) 25 Devotee x Rs.5,00,000/- | 1.25 |
| 2 | For Loss of two limbs 25 Devotee x Rs.5,00,000/- | 1.25 |
| 3 | For Loss of one limb 25 Devotee x Rs.2,50,000/- | 0.62 |
| 4 | For Accidental Hospitalization 25 Devotee x Rs.25,000/- | 0.6 |
| | Total | 3.18 |

| ०९. | संस्थान पॅनलवरील वकील | १५ | १५ | - | - |
| १०. | सर्व विभागांचे प्रमुख/ प्र.अधीक्षक | ४० | ४० | - | - |
| ११. | सर्व विभाग (कार्यालयीन कामकाजासाठी) प्रति विभाग १ नग नुसार. | ४० | ४० | २०० | ५०० |
| १२. | विधी व न्याय विभाग (मंत्रालय मुंबई) | ५० | ५० | ५० | ५० |
| | एकुण नग | ११०५ | ११०५ | १२१० | १५१० |
| | एकुण खर्च | ९९४५०/- | ७७,३५०/- | २०५७०/- | ३०,२००/- |

(एकुणअक्षरी रुपये- एक लाख सात हजार पाचशे पन्नास मात्र )

प्रस्ताव-

299

तरी विभागाच्या अभिप्रायात नमूद केल्याप्रमाणे श्री साई दैनंदिनी, श्री साईबाबा दिनदर्शिका (१ पानी) - २०२१ विनामूल्य भेट देणेकामी व भेट दिलेल्या दैनंदिनी व दिनदर्शिकांचे मूल्य रु.१,०७,५५०/- (अक्षरी रु. एक लाख सात हजार पाचशे पन्नास मात्र) प्रकाशने विभाग खाती *(Publication Exp.)* खर्ची टाकणेस व सदर विषय मा.तदर्थ समितीसमोर चक्रीय पध्दतीने सादर करणेस मान्यता असावी.

5/3/21

*(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)*
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

---

वरील प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साई दैनंदिनी, श्री साईबाबा दिनदर्शिका (१ पानी) - २०२१ विनामूल्य भेट देणेकामी व भेट दिलेल्या दैनंदिनी व दिनदर्शिकांचे मूल्य रु.१,०७,५५०/- (अक्षरी रु. (अक्षरी रु. एक लाख सात हजार पाचशे पन्नास मात्र) प्रकाशने विभाग खाती *(Publication Exp.)* खर्ची टाकणेस चक्रीय पध्दतीने मान्यता देण्यात येत आहे.

16/03/2021

*(श्रीमती गीता प्रवीण बनकर)*
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य तदर्थ समिती

17/3/2021

*(भानुदास पालवे)*
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य तदर्थ समिती

5/3/21

*(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)*
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

16/3

(श्री. श्रीकांत अणेकर,)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश अहमदनगर
अध्यक्ष तदर्थ समिती

विषय क्र.- ९/१०

५२
300

मा. तदर्थ समितीसमोर चक्रीय पध्दतीने मान्यतेसाठी सविनय सादर

शताब्दी कक्ष

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

दि. ०४ फेब्रुवारी २०२१

**विषय – श्री रामनवमी उत्सव-२०२१ कार्यक्रमांचे नियोजन व उत्सव साजरा करणेसाठी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

मान्यतेस्तव सविनय सादर,

**अ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. कलम २१ (१) (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे;

४. कलम २१ (१) (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे;

प्रस्तावना-

साईभक्त श्री गोपाळराव गुंड यांच्या पुढाकाराने शिर्डीमध्ये सन १८९७ पासून उरुस (यात्रा) भरावयास सुरुवात झाली त्यानंतर सन १९११ मध्ये साईभक्त (कै) श्री.कृष्ण जोगेश्वर भिष्म यांच्या कल्पनेतून व श्री साईबाबांच्या मान्यतेने व /आशिर्वादाने श्री रामनवमी उत्सव (शिर्डी गावची यात्रा) शिर्डी येथे सुरु झाली. (संदर्भ श्री साईसच्चरित अध्याय क्र.६ मध्ये उल्लेख आलेला आहे.)

**संस्थानमार्फत साज-या होणा-या तीन उत्सवांचे निमंत्रण देणेबाबत सन १९५६ साली अमलात आलेल्या योजना कानू व नियम यामध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.**

i. आजवर चालत आलेल्या रुढीनुसार शिरडी येथे श्रीरामनवमी, गुरुपौर्णिमा, गोकुळ अष्टमी व पुण्यतिथी यादिवशी नेहेमीप्रमाणे उत्सव साजरे करणें व जत्रा भरविणे.

ii. त्यांनी भक्तमंडळाच्या सभासदांचे नावांची, त्यांचे पत्ते वगैरे सह, रजिस्टरें ठेवून ती अद्यावत राखली पाहिजेत.

iii. तीन मुख्य उत्सवांची आमंत्रणे भक्तमंडळाच्या सर्व सभासदांना पाठवण्याची त्यांनी व्यवस्था केली पाहिजे.

उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार व पुर्वापार रुढी परंपरेनुसार संस्थान व्यवस्थापनामार्फत धार्मिक पुजा विधी, उत्सव साजरे केले जात आहेत.

यंदाचा **श्री रामनवमी उत्सव २०२१ मंगळवार दि.२० एप्रिल २०२१ ते गुरुवार दि.२२ एप्रिल २०२१ (चैत्र शु.८ शके १९४३ ते चैत्र शु.१० शके १९४३)** असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

**ब) सन-२०२१ मध्ये साजरा करावयाचे श्री रामनवमी उत्सवासाठी पुढीलप्रमाणे नियोजन करावे लागणार आहे.**

| अ.नं | तपशील | श्री रामनवमी -२०२१ चे उत्सवाचे अनुषंगाने करावयाचे नियोजन//कामे |
|---|---|---|
| ०१ | उत्सव निमत्रंण पत्रिका व उदीप्रसाद | अधिनियमातील तरतुदीनुसार भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना तसेच मान्यवरांना उत्सवाच्या निमत्रंण पत्रिका पाठवाव्या लागतात. यंदाचे श्री रामनवमी उत्सवात सभासदांना, प्रतिष्ठीत व्यक्ती/ग्रामस्थ यांना पाठविणेसाठी १,८०,००० पत्रिका छपाई करुन घेणेसाठी स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तसेच नेहमीप्रमाणे वर्तमानपत्रातून प्रेस नोट (न्यूज अॅटम) प्रसिध्दीस देण्यात येईल. |
| | सांस्कृतिक कार्यक्रमाची पार्श्वभुमी | श्री.गो.र.दाभोळकर लिखित व संस्थान प्रकाशित श्री साईसच्चरित या ग्रंथात तसेच याच ग्रंथाचे गद्य रुपांतर असलेल्या (ले.कर्नल.श्री.मु.ब. निंबाळकर लिखीत) श्रीसाईंचे सत्यचरित्र या ग्रंथातल्या अध्याय क्र.२९ मध्ये पुढीलप्रमाणे मजकूर आहे.<br>**श्री साईसच्चरित**<br>साईबाबा महासंत \| धीर उदार आणि दान्त \| यात्रेकरुंसी कृपावंत \| पैसे अत्यंत वांटिती\|\|४<br>दिडक्या चवल्या हाताचा कीस \| अधेल्या-पावल्यांचा पाऊस \| रुपये दहा कोणास वीस \| |

पान नं. ०२ वर...

| अ.नं | तपशील | श्री रामनवमी -२०२१ चे उत्सवाचे अनुषंगाने करावयाचे नियोजन//कामे |
|---|---|---|
| | | कोणास पन्नास ते देत ॥५॥ हे काय सणासुदा दिसी \| कार्यविशेषीं कां पर्वकाळासी \| प्रतिदिवशीं उक्त प्रमाणेंसीं \| संतोषेंसीं अर्पीत ॥६॥ पहूड येती भवय्ये नाचती \| गवय्ये गाती भाट वानिती \| तमासगीर मुजरे देती \| भजनीं रंगती हरिभक्त ॥७॥ ऐसे महाराज उदारवृत्ती \| दानधर्मी सढळ स्थिती \| ऐकूनि कर्णोपकर्णी ही कीर्ति \| इच्छा धरिती दर्शनाची ॥८॥ कधीं आलिया बाबांचे चित्तीं \| पांथस्थांतेंही पैसे वांटिती \| दीनदुबळयांचा परामर्ष घेती \| कृपामुर्ति साईनाथ ॥९॥ |
| | | **श्री साईचे सत्य चरित्र**<br>साईबाबा थोर, उदार व दान करणारे महान संत होते. यात्रेकरुंना कृपावंत होऊन ते खूप पैसा वाटीत असत. दिडक्या-चवल्या (एक पैसा व दोन आण्यांची नाणी. त्या काळची अगदी कमी किंमतीची नाणी.४ पैसे - १ आणा, १६ आणे= १ रुपया) अगदी सहजपणे आणि अधेल्या पावल्यांचा (चार व आठ आण्यांचा म्हणजे आजच्या पंचवीस व पन्नास पैशांच्या नाण्यांचा) पाऊस पाडत; म्हणजे भरपूर पैसे वाटत असत. कोणाला दहा, कोणाला वीस, तर कोणाला पन्नास रुपये ते देत असत. हे काय सणाच्या किंवा उत्सवाच्या दिवशी काही विशेष कार्य असताना किंवा पुण्यकाळ असतानाच नव्हे, तर दररोज वर म्हटल्याप्रमाणे मोठ्या खुशीने ते वाटीत असत. पहूडे व भवय्ये ( तमासगीर व नाचे लोक)येत असत आणि नाचत असत, गवई गाणे गात असत आणि भाट स्तुती करीत असत. तमासगीर मुजरे देत असत आणि हरिभक्त भजन करण्यात रंगून जात असत. महाराजांची अशा उदार स्वभावाची व दानधर्म करण्यात सढळ हाताची कीर्ती कर्णोपकर्णी ऐकून हे लोक दर्शनाची इच्छा मनात धरीत असत.कधी मनाला आले, तर बाबा प्रवाशांनाही पैसे वाटीत असत. साईनाथ दयेची मूर्ती होते. दीन-दुबळयांच्या गरजा व दु:खे काय आहेत याची सहृदयपणे ते विचारपूस करीत असत आणि त्यांना मदत करीत असत.<br>थोडक्यात श्री साईबाबांच्या काळापासूनच शिर्डीत सांस्कृतिक कार्यक्रम होत असल्याचे आढळून येते व श्री साईबाबा हे कोणाचीही सेवा-चाकरी मोफत वा विनामुल्य घेत नसत ते स्वत: सढळहस्ताने कलाकारांना मानधन देत असत हीच परंपरा आजही शिर्डीत सुरु आहे. |
| ०२ | सांस्कृतिक कार्यक्रम<br>प्रारंभ दिवस,<br>मंगळवार दि.२०/०४/२०२१<br>चैत्र शु ८ शके १९४३ | <u>संस्थानमार्फत</u><br>सन २०२० मध्ये कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव असल्याने श्री रामनवमी उत्सव २०२० हा साध्या पध्दतीने साजरा करण्यात आला.<br>सध्या भारतात व महाराष्ट्रात कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव अतिशय कमी झालेला असुन, भारतातील व महाराष्ट्रातील मंदिरे स्थानिक राज्य सरकारच्या आदेशाने भाविकांना दर्शनासाठी खुली केली आहेत. श्री साईबाबांचे मंदिरही राज्य सरकारच्या आदेशाने खुले करण्यात आले आहे. श्री रामनवमी उत्सव हा एप्रिल महिन्यात असल्याने तोपर्यंत कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव आणखी कमी होईल. या रोगावरची लसही तयार झालेली असल्याने सन २०२१ मधील श्री रामनवमी उत्सव नियमीतपणे पार पडेल अशी आशा आहे.<br>आता सन २०२१ उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम निश्चीत करावे लागतील. सांस्कृतिक कार्यक्रमाचा स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करण्यात येईल. श्री रामनवमी उत्सवातील (२०१९) कलाकार कार्यक्रम साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप (१६ गुठें) याठिकाणी आयोजित करण्यात आले होते. आता सायंकाळी ७.३० ते रात्रौ १०.०० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेजवर (१६गुठें) आयोजित करता येईल. |
| | मुख्य दिवस<br>बुधवार दि.२१/०४/२०२१<br>चैत्र शु ९ शके १९४३ | १) सायंकाळी ७.३० ते रात्रौ १०.०० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप स्टेजवर (१६ गुठें) आयोजित करता येईल.<br>२) कलाकार हजेरी कार्यक्रमात रात्रौ. १०.३० ते पहाटे ५.०० पर्यत (दि.२१/०४/२०२१) यावेळेत इच्छुक कलाकारांच्या साईभजनांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल. या मुख्य दिवशी समाधी मंदीर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | सांगता दिवस<br>गुरुवार दि.२२/०४/२०२१<br>चैत्र शु.१० शके १९४३ | सायंकाळी ७.३० ते १०.०० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप स्टेजवर आयोजित करता येईल. |

पान नं. ०३ वर...

| अ.नं | तपशील | श्री रामनवमी -२०२१ चे उत्सवाचे अनुषंगाने करावयाचे नियोजन//कामे |
|---|---|---|
| | | ग्रामस्थामार्फत<br>श्री रामनवमी उत्सवात (यात्रा) शिर्डी ग्रामस्थांमार्फत स्वतंत्रपणे सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येते या कार्यक्रमाचे मानधन मात्र संस्थानतर्फे आदा केले जाते. मागील सन-२०१९ मध्ये श्री रामनवमी उत्सवात ग्रामस्थांमार्फत साईनगर मैदानावर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावर्षी सांस्कृतिक कार्यक्रमासाठी ग्रामस्थांकडून मागणी आल्यास त्यांना मा. तदर्थ समितीच्या निर्णयानुसार स्टेज व मंडप उभारुन देणेबाबत कार्यवाही करता येईल. |
| | ब) कीर्तन कार्यक्रम | सन २०२० मध्ये कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव असल्याने श्री रामनवमी उत्सव २०२० मध्ये मंदिर विभागातील पुजारी यांचे किर्तन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. दासगणू महाराज प्रतिष्ठाण गोरटे यांचेमार्फत पाठविण्यात येणा-या कीर्तनकारामार्फत श्री रामनवमी उत्सवातील तीनही दिवशी परंपरेनुसार कीर्तन केले जाते. आताही परंपरेनुसार किर्तनाचा कार्यक्रम ठेवता येईल. सन २०१९ मधील श्री रामनवमी उत्सवात कीर्तनकारास रु.१५,००१/- मानधन देण्यात आले होते. यावर्षी श्री रामनवमी उत्सवातील कीर्तनकारास उचित अथवा मागील श्री रामनवमी उत्सवाप्रमाणे मानधन देणेबाबत निर्णय घ्यावा लागेल. |
| ०३ | श्री सत्यनारायण पूजा व अभिषेक पूजा | उत्सव काळात साईभक्तांची गर्दी असल्याने मंदिर विभागामार्फत पार पाडल्या जाणा-या श्री साई सत्यव्रत पुजा व अभिषेक पूजा भक्तांच्या गर्दीचा अंदाज घेऊन चालू किंवा बंद ठेवता येईल. |
| ०४ | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात दि.२०/०४/२०२१ रोजी सकाळी ५.१५ वाजता श्री व्दारकामाई मंदिरात श्री साईसच्चरिताचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दि.२१/०४/२०२१ सकाळी ५.०० वाजता त्याची समाप्ती होईल. मा. तदर्थ समितीचे सदस्य पहिले ०५ अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक याप्रमाणे ४८ भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नावे दि.१९/०४/२०२१ रोजी नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणाकरीता नावे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. अखंड पारायणाकरीता व्दारकामाई रात्रभर उघडी ठेवण्यात येईल. श्री रामनवमी उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा.तदर्थ समितीच्या सदस्यांची नावे ठरविणे आहे. याबाबतची टिपणी मा.तदर्थ समितीचे सभेत अलाहिदा स्वतंत्रपणे सादर करण्यात येईल. |
| ०५ | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी मंगळवार दि.२०/०४/२०२१ रोजी रात्रौ ९.१५ वाजता श्रींचे पालखीचे गावातून मिरवणूक व मुख्य दिवशी बुधवार दि.२१/०४/२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजता श्रींच्या रथाची गावातून मिरवणूक निघेल. |
| ०६ | कावडी व निशाणाची मिरवणूक | उत्सवाचे मुख्य दिवशी दिनांक २१/०४/२०२१ रोजी सकाळी ५.१५ वाजता श्रींचे कावडी व सायंकाळी ४.०० वाजता निशाणाची मिरवणूक राहिल. श्री रामनवमीचे दिवशी सकाळी श्रींचे मंगलस्नानासाठी परिसरातील गांवकरी व साईभक्त गोदावरी नदीचे पवित्र पाणी कावडीने घेऊन येतात. यासाठी समाधी मंदिराचे बाहेरील बाजूस दक्षिण गेटच्यासमोर अभिषेक मुर्ती ठेऊन स्वतंत्र व्यवस्था करण्यात येते. कावडीधारकांना श्रीफळ प्रसाद दिला जातो. या वर्षीही तशी कार्यवाही करण्यात येईल. |
| ०७ | विद्युत रोषणाई | श्री रामनवमी उत्सवात विद्युत विभागामार्फत समाधी मंदीर, व्दारकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात येईल. विद्युत रोषणाईचे कामासाठी येणा-या साईभक्तांची निवास, भोजन, चहा-नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत दरवर्षी विनामुल्य करण्यात येते. त्याप्रमाणे याही वर्षी विनामुल्य करण्यात येईल. मात्र विद्युत रोषणाईचे सामान आणणे व नेणेकामीचे ट्रक भाडे व जाणे-येण्याचा खर्च देण्यात येतो. या उत्सवातही त्याप्रमाणे विद्युत विभागामार्फत कार्यवाही करण्यात येईल. |
| ०८ | संरक्षण व्यवस्था | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच सांस्कृतिक कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणाचे परवानगीबाबत मा. पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल.. |

पान नं. ०४ वर...

| अ.नं | तपशील | श्री रामनवमी -२०२१ चे उत्सवाचे अनुषंगाने करावयाचे नियोजन//कामे |
|---|---|---|
| ०९ | प्रसाद-भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नासह भक्तांना मोफत प्रसाद भोजन दिले जाते. मा. तदर्थ समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय तसेच निमंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीसाठी येणा-या व्यक्तीची प्रसाद भोजनाची व्यवस्था नेहमीप्रमाणे केली जाईल. साईभक्तांचे सोयीसाठी स्वतंत्र चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादीची कॅंटीनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टान्न प्रसाद नेहमीप्रमाणे देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी सुरु करणेत येईल. याकामी सबंधित विभागाकडुन नियोजन करणेत येईल.<br>सन २०२१ चे श्री रामनवमी उत्सवात तिनही दिवसांचे प्रसाद भोजनात मिष्टांन्न पदार्थ देणेसाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर निश्चिती करता येईल. |
| १० | देणगी काऊंटर्स | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊंटर्स तीन शिफ्टमध्ये सुरु ठेवण्यात येतील. तसेच उत्सव कालावधीत देणगी काऊंटर्सची वेळ सकाळी ५ वा. ते रात्रौ ११ वा. पर्यत करण्यात येईल. |
| ११ | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पुर्वतयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता विविध विभागांकडून आलेल्या मागणीची छाननी केल्यानंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचे स्तरावर ज्या-त्या खात्यास जादा कंत्राटी कर्मचारी वर्ग देण्यात येईल. |
| १२ | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे व्दारावती, भक्तनिवासस्थान इ. इमारतीमधून तसेच साई आश्रम, व साई धर्मशाळा परिसरात स्वतंत्र मंडप टाकून पालखी पदयात्रीसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदिर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ. व उन्हाळी मंडपही टाकणेत येतील. आवश्यकतेनुसार व गरजेनुसार त्यात वाढ करता येईल याकामी बांधकाम विभागासह इतर संबंधित विभागामार्फत नियोजन करणेत येईल. पालखी धारकांची आलेल्या पत्रानुसार सर्व निवासस्थाने एकत्रित नियोजन करतील. |
| १३ | प्रथमोपचार केंद्र | मागील उत्सवात संस्थानमार्फत दिक्षीतवाडा येथे तीनही दिवशी तीन शिफ्ट मध्ये प्रसादालय परिसरात व पिंपळवाडी रोड वरील दर्शनरांग प्रवेशव्दार येथे पहिल्या व तिस-या दिवशी दोन शिफ्ट मध्ये व मुख्य दिवशी तीन शिफ्ट मध्ये असे दोन ठिकाणी प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात आले होते. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदिर परिसरात ठेवण्यात आली होती. त्याप्रमाणे या उत्सवातही कार्यवाही करण्यात येईल. |
| १४ | पालखी व्यवस्था | श्री रामनवमी उत्सवात मुंबई तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था श्री साईबाबा धर्मशाळा येथे करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवस्था करण्यात येईल. त्याचप्रमाणे येणा-या पालख्यांसाठी पिण्याचे पाण्याची व्यवस्था सिन्नर ते शिर्डी रस्त्यावर मागील श्री रामनवमी उत्सवाप्रमाणे यंदाही करावी लागणार आहे. त्या सबंधी खर्चाची टिपणी पाणीपुरवठा विभाग तयार करुन मंजूरीसाठी सादर करत आहे. गरजेनुसार पालख्या मुक्कामाचे ठिकाणी खर्डी, लतीफवाडी, घाटनदेवी, खंबाळे, वेल्लोळी, नाशिक, शिंदे, सिन्नर (एम.आय.डी.सी), खोपडी, दत्तमंदीर, पांगरी, वावी, हॉटेल वनराई, पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोण फाटा, सायाळे, जवळके, डो-हाळे, इ. ठिकाणी पालखी मंडप, वीज व्यवस्था व पाणी व्यवस्था करणेत येईल. |
| १५ | कुस्त्या हंगामा | कुस्ती या क्रिडा प्रकाराची साईबाबांना अतिशय आवड होती. श्री साईबाबा हे स्वत: एक कसलेले पहिलावान होते, मोहोद्दिन नावाच्या एका पहिलवानांशी साईबाबांची कुस्ती झाल्याचा उद्देश श्री साई सच्चरित या ग्रथांच्या ५ व्या अध्यायामध्ये आढळून येतो. साईबाबांना असलेल्या कुस्तीच्या आवडीवरुनही श्री रामनवमी उत्सवात कुस्ती हगामा भरवण्याची कल्पना पुढे आली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>श्री रामनवमी उत्सवात कुस्त्यांचा हगामा गावक-यांमार्फत भरविण्यात येतो. सन २०१९ चे उत्सवात कुस्त्यांचे हगामासाठी व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रु.१५,००,०००/- मात्र मंजूर होती. त्यापैकी रुपये रु. ९,०३,६६०/-मात्र खर्च झालेला आहे.<br>तरी श्री रामनवमी उत्सवात कुस्त्या हगामासाठी व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी यावर्षी अंदाजपत्रकीय तरतुदीत रक्कम रु.११,००,०००/-तरतुद दर्शविण्यात आलेली आहे. मा. तदर्थ समितीचे मंजुरीनुसार सदर तरतुद कमी /जास्त करता येईल. |
| १६ | पाणीपुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सव काळात कॅनॉलला पाणी सोडणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल याची व्यवस्था करण्यात येईल. |

पान नं. ०५ वर...

| अ.नं | तपशील | श्री रामनवमी -२०२१ चे उत्सवाचे अनुषंगाने करावयाचे नियोजन//कामे |
|---|---|---|
| १७ | खर्चाचे अंदाजपत्रक | श्री रामनवमी उत्सव-२०२० करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ८७,७६,३०० (रुपये सत्याऐंशी लाख शहात्तर हजार तीनशे ) मात्र इतक्या रकमेस मंजुरी देण्यात आली होती. परंतु सन २०२० मध्ये कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव असल्याने श्री रामनवमी उत्सव २०२० मध्ये संस्थानमार्फत फक्त निमंत्रण पत्रिका छपाई व भक्तमंडळ सभासदांना उदी व प्रसाद पाठविणेकामी पोष्टेज खर्च रुपये ७,८८,०४७/- (रुपये सात लाख एठ्ठ्याऐंशी हजार सत्तेचाळीस) मात्र इतका खर्च झाला होता.<br>आता श्री रामनवमी २०२१ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ८१,१९,८५८ (रुपये एक्याऐंशी लाख एकोणीस हजार आठशे आठ्ठावन्न ) मात्र मंजूरीसाठी सादर केलेले आहे. |

श्री रामनवमी उत्सव -२०२१ अंदाजपत्रक

| अ.नं | तपशील | विभाग | श्री रामनवमी उत्सव-२०२० | | श्री रामनवमी उत्सव-२०२१ |
|---|---|---|---|---|---|
| | | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | तरतूद |
| ०१ | मंडप कमानी स्टेज | बांधकाम विभाग | १५,३६,००० | - | १६,४८,५२८ |
| ०२ | कलाकार, कीर्तनकाराची बिदागी , निवासाव्यवस्था व इतर खर्च | मंदिर विभाग | ९,०२,५०० | - | ९,३६,२०० |
| ०३ | भक्तांना मिष्टान्न, फर्निचर खर्च | प्रसादालय विभाग | ६,१९,००० | - | ५,००,००० |
| ०४ | विद्युत रोषणाई | विद्युत विभाग | १०,००,००० | - | १०,००,००० |
| ०५ | पत्रिका व उदी-प्रसाद पोष्टाने पाठविणेकामी पोष्टेज खर्च | वशी-५/८ | १४,००,००० | ७८८०४७ | १०,००,००० |
| ०६ | एल.ई.डी पडदा व सीसीटीव्ही कॅमेरे व साऊंड सिस्टीम | सी.सी.टी.व्ही/ ध्वनीक्षेपण | ३,८४,९०० | - | ४०५००० |
| ०७ | फुल सजावट | बगीचा | २,५०,००० | - | २,५०,००० |
| ०८ | जादा कामगार | कामगार | ६,२३,००० | - | ३,५५,१३० |
| ०९ | पदयात्री पालख्या पिण्याचे पाणी व्यवस्थेसाठी प्लांबींग साहित्य, कापडी व डिजीटल बॅनर, जनरेटर, भाडोत्री वाहन, डिझेल, पेट्रोल, रॉकेल इंधन खर्च. आयत्या वेळचा प्रासंगिक खर्च (जादा टॅकर भाडोत्री लावावयाचे झाल्यास) | पाणी पुरवठा | ९,००,००० | - | ९,००,००० |
| १० | सांस्कृतिक कार्यक्रम व कुस्ती हगामा | लेखाशाखा | ११,००,००० | - | ११,००,००० |
| ११ | इतर खर्च<br>भाडोत्री मालवाहतुक /कार्यालयीन वाहन खर्च, भाडोत्री क्रेन खर्च व क्रेटस व भांडी भाडेतत्वावर घेणेकामी. | वाहन विभाग, लाडू व बर्फी प्रसाद निमिती विभाग | ६०,९०० | - | २५,००० |
| | | एकूण रुपये | ८७,७६,३०० | ७,८८,०४७ | ८१,१९,८५८ |

मंदिर व मंदिर परिसरात करावयाच्या फुल सजावटीसाठी देणगीदार साईभक्तांचा प्रस्ताव प्राप्त न झाल्यास संस्थानमार्फत फुल सजावट करणेसाठी उपरोक्त अ.नं.७ मध्ये तरतूद करणेत आलेली आहे.

अधिनियमातील तरतुदीनुसार उत्सव आयोजित करणे व पार पाडण्याची अंमलबजावणी करावयाची असल्याने मा. उच्च न्यायालयात उत्सवाच्या अंदाजपत्रकाच्या मान्यतेसाठी सिव्हील ॲपलिकेशन दाखल करण्याची आवश्यकता नाही असे नम्र आहे.

सध्या भारतात व महाराष्ट्रात कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव अतिशय कमी झालेला असुन, भारतातील व महाराष्ट्रातील मंदिरे स्थानिक राज्य सरकारच्या आदेशाने भाविकांना दर्शनासाठी खुली केली आहेत. श्री साईबाबांचे मंदिरही राज्य सरकारच्या आदेशाने खुले करण्यात आले आहे. श्री रामनवमी उत्सव हा एप्रिल महिन्यात असल्याने तोपर्यंत कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव आणखी कमी होईल. या रोगावरची लसही तयार झालेली असल्याने सन २०२१ मधील श्री रामनवमी उत्सव नियमीतपणे पार पडेल अशी आशा आहे.

शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या कोव्हीड प्रतिबंधात्मक उपायांच्या तथा निर्देशानुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्याची अंमलबजावणी करता येईल.

..६..

MEETING - 412-2020



क) तरी उपरोक्त परिच्छेद 'ब' मध्ये नमुद केलेप्रमाणे, श्री रामनवमी उत्सव-२०२१ साजरा करणेकामी कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ८१,१९,८५८/- (रुपये एक्याऐंशी लाख एकोणीस हजार आठशे आठ्ठावन्न मात्रचे) खर्चास चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर

(सचिंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

निर्णय - प्रस्ताव मंजूर. मा उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.
प्रस्ताव मंजूर

(श्रीमती गीता प्रवीण बनकर)
सदस्य तदर्थ समिती तथा
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

(भानुदास हो पालवे)
सदस्य तदर्थ समिती तथा
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक

(सचिंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(श्रीकांत अणेकर)
अध्यक्ष, तदर्थ समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी
तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,अहमदनगर

विषय क्र.- ९|८९

306

# मा. तदर्थ समितीसमोर चक्रीय पध्दतीने मान्यतेसाठी सविनय सादर

## शताब्दी विभाग

### श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

दि. ११.०२.२०२१

मान्यतेस्तव सविनय सादर,

**विषय- संस्थानमार्फत साज-या होणा-या सन २०२१ मधील तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२). अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

संस्थान व्यवस्थापनाने तयार केलेले श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) भक्त मंडळ विनियम सन २०१३ मध्ये शासनाने मान्य केलेले आहेत. या विनियमातील कलम (४) भक्त मंडळाच्या सभासदांचे हक्क आणि विशेषाधिकार यामध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

१) भक्तमंडळांच्या सभासदांना संस्थानच्या तीन उत्सवाचे, म्हणजे रामनवमी, गुरुपौर्णिमा आणि साईबाबांची पुण्यतिथी या उत्सवांचे निमंत्रण पाठविण्यात येईल. असे निमंत्रण डाकेने, एक्सप्रेस कुरीयरने, फॅक्स, ई-मेल व्दारा किंवा इलेक्ट्रॉनीक संपर्काच्या इतर पध्दतीने पाठविण्यात येईल.

२) वर उल्लेख केलेल्या तीन अधिकृत उत्सवानंतर प्रत्येक सभासद डाकेने 'उदी प्रसाद' प्राप्त होण्यास पात्र असेल.

**प्रस्तावना** – संस्थानमार्फत साज-या होणा-या वर्षभरातील तीनही उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका संस्थानचे भक्तमंडळाच्या सभासदांना पाठविणेकामी खालील दोन भागात कार्यवाही केली जाते.

अ)

१) मंदिराकडून उत्सवाची माहिती मागविणे.
२) ई-निविदा मागविणेकामी मसुदा तयार करणे.
३) सदरचा मसुदा वरिष्ठांकडुन तपासुन मान्य करुन घेणे.
४) वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करणे.
५) ई निविदा भरणेकामी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करुन देणे.
६) ई-निविदेचा कालावधी संपल्यानंतर मा. खरेदी समितीचे सभेपुढे तांत्रिक बिड (Technical Bid) उघडणे.
७) तांत्रिक बिड उघडल्यानंतर पात्र छपाईधारकांचे दरपत्रक (Commercial Bid) मा. खरेदी समिती सभेपुढे उघडुन तुलनात्मक तक्ता तयार करुन सादर करणे.
८) निम्नतम दर असलेल्या छपाईधारकास दराबद्दल चर्चा / वाटाघाटीसाठी प्रत्यक्ष मा. तदर्थ समितीचे सभेत उपस्थित राहणेबाबत कळविणे.
९) वाटाघाटी / चर्चेअंती निम्नतम दर निश्चित करणे.

ब)

१) छपाईधारकास छपाई कामाचा कार्यादेश देणे.
२) तीनही उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छपाईकामी निम्नतम छपाईधारकाकडून छपाईकामाचा करारनामा तयार करुन घेणे.
३) प्रत्येक उत्सवाच्या निमंत्रण पत्रिकेचा मसुदा व रंगसंगती वरिष्ठांकडुन मान्य करुन घेणे.
४) रंगसंगती निश्चित झाल्यानंतर छपाई कामास सुरवात करणेबाबत कळविणे .
५) पाकीटे व पत्ते चिटकविणे, फ्रॅंकिंग करणे.
६) पत्रिकांची राज्याच्या नावानुसार विभागणी करुन पोष्टात टाकणे.

पान नं. ०२ वर...
कृ.मा.पा.....



SRP 15-2021

भक्त मंडळ विनियम सन २०१३ मधील कलम (४) नुसार संस्थान व्यवस्थापनामार्फत साज-या करणेत येणा-या श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा, श्री पुण्यतिथी (विजयादशमी) उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका व उदीप्रसाद भक्तमंडळ सभासदांना पोष्टाव्दारे पाठविणेत येतो. सध्या १.८०,००० इतके संस्थान भक्तमंडळाचे सभासद असून, सभासद संख्येत वाढ किंवा घट होऊ शकते. तसेच व्यवस्थापनामार्फत देणगीदार भक्त, मा. मंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मान्यवर अधिकारी व शिर्डी ग्रामस्थ यांना निमंत्रण पाठविण्यात येतात.

उपरोक्त नमूद केलेल्या अधिनियमातील तरतुदीस अधिन राहून सन २०२० मधील उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०९.०३.२०२० रोजी मान्यता दिली होती. परंतु श्री रामनवमी उत्सव सुरु होण्यास अत्यंत कमी कालावधी शिल्लक असल्याने भक्तमंडळ सभासदांना वेळेत निमंत्रणपत्रिका मिळाव्यात या हेतूने तातडीची बाब म्हणून शासन खरेदी नियमावलीस अधिन राहून श्री रामनवमी उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छपाईकामी दुरध्वनीवरुन दरपत्रके मागविण्यात येऊन, निम्नतम प्रेसधारक सोहेल एंटरप्राईजेस, मुंबई यांचेकडून रु.२.११६८ या दराने १,७२,००० निमंत्रण पत्रिका छपाई करुन घेण्यात आल्या त्यासाठी रक्कम रु. ३,६४,०९०/- मात्र इतका खर्च आला आहे.

मध्यंतरीच्या काळात साधारणतः १७ मार्च २०२० पासून संपूर्ण भारतात कोव्हीड १९ (कोरोना व्हायरस) या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने श्री साईबाबांचे मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी अनिश्चित काळासाठी बंद करण्यात आले होते ते दर्शनासाठी परत कधी सुरु होईल याची शाश्वती नव्हती. त्यामुळे गर्दी करण्यावर, गर्दीचे कार्यक्रम करण्यावर शासनामार्फत निर्बंध घालण्यात आलेले होते.

त्यानंतर श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका,पाकीटे छपाईकामी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन दि.३०.०४.२०२० ते दि. ०८.०५.२०२० अखेर ई-निविदा मागविणेत आल्या होत्या.याकामी एकूण ७ निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदरच्या ई-निविदेत प्रवरा ऑफसेट, लोणी यांचे सर्व करांसह दर रु. २.०६ पैसे असे (७,४१,६००/-) निम्नतम दर आले होते. राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायद्यान्वये अधिसुचना निर्गमीत करण्यात आली असल्याने मा. तदर्थ समितीचे निर्देशाप्रमाणे निमंत्रणपत्रिका न छापता श्री गुरुपौर्णिमा उत्सव व पुण्यतिथी उत्सव २०२० चा उदीप्रसाद भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना, पोस्टाव्दारे पाठविण्यात आला व श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा व पुण्यतिथी उत्सव साधेपणाने साजरे करण्यात आले.

सन २०२१ मध्ये साजरा करण्यात येणा-या तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका खालील तपशीलाप्रमाणे छपाई करणे आहे.

निमंत्रण पत्रिका

| निमंत्रण पत्रिका छपाई तपशिल | प्रति उत्सव अंदाजे निमंत्रण पत्रिका संख्या |
|---|---|
| अ) निमंत्रण पत्रिका- फोर कलर छपाई<br>आकार-९.५" x९.५" (फोल्डसह)<br>कागदाचा प्रकार १२० GSM आर्ट पेपर<br>ब) पाकीटे (फोर कलर) आकार -५" x १०"<br>९० GSM आर्ट पेपर<br>क) पत्रिका घडी करुन पाकीटात भरणे पाकीटांसाठी गमटेप वापरणे. | १,८०,००० पत्रिका X ३ उत्सव = एकूण ५,४०,००० पत्रिका |

विभागाचा अभिप्राय –

सध्या भारतात व महाराष्ट्रात कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव अतिशय कमी झालेला असुन, भारतातील व महाराष्ट्रातील मंदिरे स्थानिक राज्य सरकारच्या आदेशाने भाविकांना दर्शनासाठी खुली केली आहेत. श्री साईबाबांचे मंदिरही राज्य सरकारच्या आदेशाने खुले करण्यात आले आहे. श्री रामनवमी उत्सव हा एप्रिल महिन्यात असल्याने तोपर्यंत कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव आणखी कमी होईल त्याचप्रमाणे या रोगावरची लसही उपलब्ध झाली आहे. त्यामुळे सन २०२१ मधील तीनही उत्सव नियमीतपणे पार पडतील अशी अशा आहे. सबब तीनही उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका छापून घेणे क्रमप्राप्त ठरेल

तीनही उत्सवाच्यां निमंत्रणपत्रिका छापून घ्यावयाच्या ठरल्यास छपाईकामी ई-निविदेसाठी जाहिरात देणे, ई-निविदा मागविणे, ई-निविदा उघडणे, वाटाघाटीसाठी मा. तदर्थ समितीचे सभेसमोर निमंत्रीत करणे, इतिवृत्त प्राप्त होणे, छपाईधारकास छपाई कामाचा कार्यादेश देणे, निमंत्रणपत्रिकेचा मजकूर देणे, निमंत्रण पत्रिकेचे नमुणे तयार करणे, प्रूफ तपासणे, त्यानंतर मान्य होणे व प्रेसधारकाकडून पुरवठा होणे, भक्त मंडळ सभासदास पाठविणे अशा कामास साधारणतः २ महिन्याचा कालावधी लागतो.

आता, श्री रामनवमी उत्सव २०२१ साठी ५० दिवस शिल्लक राहिले आहेत. त्या अनुषंगाने भक्तमंडळ सभासदांना व मान्यवरांना उत्सवाच्या अगोदर १ महीना निमंत्रण पत्रिका पाठविण्याची पुर्वतयारी करावी लागते. कारण, परदेशातील भक्तमंडळ सभासदांना एअरमेल द्वारे व भारतातील विविध राज्यातील भक्तमंडळ सभासदांना उत्सवाची निमंत्रण पत्रिका पोष्टाने पाठविणेत येतात. उत्सवाच्या अगोदर पत्रिका मिळाल्यानंतर भक्त उत्सवासाठी शिर्डी येथे येण्याचे नियोजन करतात.

पान नं. ०३ वर...

शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या कोव्हीड प्रतिबंधात्मक उपायांच्या तथा निर्देशानुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका छपाई करण्याची अंमलबजावणी करता येईल.

संस्थानमार्फत साज-या होणा-या सन २०२१ मधील उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबतचा विषय चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेकामी मा. तदर्थ समितीचे सभेसमोर दि.०१.०२.२०२१ रोजी सादर करण्यात आला असता त्यावर मा.अध्यक्ष, तदर्थ समिती तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर व सदस्य तथा मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अहमदनगर, व सदस्य तदर्थ समिती तथा अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिला आहे.

विषय वाचला. विषयाशी संबंधीत लिपीक श्री. अनिल पाठक यांच्याकडून माहीती घेतली असता कोव्हीड १९ च्या महामारीच्या उद्रेकानंतर श्री रामनवमी उत्सवाचे स्वरुप काय असेल हेच अजून ठरलेले नाही. त्यानी हेही सांगितले की, तो निर्णय मुख्य प्रशासकीय अधिकारी यांचेकडे विचाराधिन आहे. अशा परिस्थितीत सदर उत्सव कार्यक्रमाचे पत्रिका छपाईचा निर्णय घेणे योग्य वाटत नाही. संस्थान प्रशासनाने प्रथमत: श्री रामनवमी उत्सव कसा साजरा करावयाचा आहे त्याचे प्रारुप समितीसमोर आणावे, जेणेकरुन यावर निर्णय घेता येईल.

अभिप्रायात दिलेल्या निर्णयाप्रमाणे दि. ०१/०२/२०२१ रोजी श्री रामनवमी उत्सव २०२१ कसा साजरा करावयाचा आहे, त्याचे स्वरुप कशा पध्दतीचे असेल, त्यासाठी येणा-या अंदाजे खर्चाबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे समक्ष चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आला होता. त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

" प्रस्ताव मंजूर, मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करुन मान्यता घेण्यात यावी."

मा. तदर्थ समितीचे दि. ०८/०२/२०२१ चे निर्णयानुसार मा. न्यायालयात मान्यतेसाठी दिवाणी अर्ज दाखल करणेबाबत कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

प्रस्ताव :-

तरी सन-२०२१ मधील संस्थानमार्फत साज-या करण्यात येणा-या ०३ उत्सवांसाठी उपरोक्तप्रमाणे नमुद केलेल्या निमंत्रण पत्रिका छापून व पाकीटे छपाई करणेकामी ई-निविदा प्रकिया राबविणेस, त्याकामी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस, प्राप्त झालेल्या ई-निविदेबाबत विहीत कार्यवाही करुन निमंत्रण पत्रिका छपाई करणेस व तीनही उत्सव मिळून अंदाजे एकुण ५,४०,००० निमंत्रण पत्रिका व पाकिटे छपाईकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१२,००,०००/- ( अक्षरी- रुपये बारा लाख, मात्रचे ) खर्चास चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर

23/2/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

---

दिनांक :-

निर्णय :-

मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांचे अभिप्रायाशी सहमत आहे.

(श्रीमती गीता प्रवीण बनकर)
सदस्य तदर्थ समिती तथा
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

10/3/2021
(भानुदास ह. पालवे)
सदस्य तदर्थ समिती तथा
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक

23/2/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(श्रीकांत अणेकर)
अध्यक्ष, तदर्थ समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी
तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,अहमदनगर

309

**चक्रीय पध्दतीने आणलेला विषय**

**दि. 09/03/2021**

**विषय – संस्थान मार्फत साज-या होणा-या सन 2021 मधील तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत...**

संपूर्ण विषय वाचला. कोव्हीड-19 महामारीच्या पार्श्वभूमिवर अजुनही उत्सवांबाबत स्पष्टता नाही. अशा परिस्थितीत निमंत्रण पत्रिका व पाकीटे छपाईकामी येणारे अंदाजित रकमेच्या खर्चास मंजूरी देण्यात येत आहे, मात्र पत्रिका छपाईपूर्वी तदर्थ समितीला अवगत करावे, जेणेकरुन मागील वर्षाप्रमाणे छपाईचा खर्च वाया जाणार नाही. तसेच या बाबतीत मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करुन परवानगी घेण्यात यावी.

(श्रीकांत एल. आणेकर)
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर**
**तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी**

**दिनांक – 09/03/2021**

**चक्रीय पध्दतीने आणलेला विषय**

**दि. ०९.०३.२०२१**

विषय : संस्थान मार्फत साजऱ्या होणाऱ्या सन २०२१ मधील तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत ...

सदरचा प्रस्ताव वाचला. उत्सवांबाबत विचार करावायाचा झाल्यास कोव्हीड-१९ रोगाच्या प्रादुर्भावाचा प्रामुख्याने विचार करणे आवश्यक आहे. त्या करिता उत्सवांबाबत शासनाकडून लागलेल्या निर्बंधावर कोणतीही स्पष्टता अथवा शिथिलता आहे काय याबाबत अवगत करणे आवश्यक आहे. त्यामुळे निमंत्रण पत्रिका व पाकीटे छपाई कामी येणारे अंदाजित रकमेच्या खर्चास मंजूरी देण्यात येते मात्र, त्याबाबत तदर्थ समितीस पत्रिका छपाईपूर्वी अवगत करणे आवश्यक आहे, याचे कारण असे की, मागील वर्षी कोव्हीड-१९ च्या लॉकडाऊनमुळे छपाई खर्च वाया गेला. तसेच या प्रस्तावाबत मा. उच्च न्यायालयात सिव्हील अप्लीकेशन करुन परवानगी घेणे उचित होईल.

09/3/2021

(गीता प्र. बनकर)

सहायक धर्मादाय आयुक्त तथा

सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,

श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि. ०९.०३.२०२१

विषय क्र.- 9/62



# मा. तदर्थ (Ad hoc) समितीचे सभेपुढील विषय
## बांधकाम विभाग

विषय : श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील सध्याचे साई सभागृह / पारायण हॉलमध्ये मिटींग हॉल तयार करणेसाठी फर्निचर व इंटेरिअर कामे करणेसाठी अपेक्षित रक्कम रु.४६,०५,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच याकामी ई-निविदा मागविणेसाठी मान्यता देणेबाबत..

टिपणी-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतूद आहे.

प्रस्तावना:- कोविड-१९ या साथ रोगाच्या अनुषंगाने बंद करणेत आलेले श्री साईबाबा समाधी मंदिर दि.१६/११/२०२० रोजी साईभक्तांच्या दर्शनासाठी खुले करण्यात आले आहे. तथापी, मंदिर परिसरातील साईसत्यव्रत पुजा, अभिषेक पुजा बंद ठेवण्यात आलेल्या आहेत. याचबरोबर साईभक्तांकरीता ग्रंथ वाचनाचा पारायण हॉलही सध्या बंद आहे. साईसभागृह (मिटींग हॉल) मधिल सध्याचे फर्निचर हे सुमारे १८ वर्षे जुने आहे. तेथिल भिंतीला मार्बल डॅडो असल्याने सभा चालू असतांना काही प्रमाणात Noise तयार होऊन वक्त्याचा आवाज सुस्पष्ट ऐकू येत नाही. शिर्डी येथे केंद्र व राज्य शासनातील मंत्री, वरिष्ठ सनदी अधिकारी व इतर मान्यवर श्री साईबाबांचे दर्शनासाठी येतात. त्यावेळी त्यांचे स्वागत व सत्कार सदर साई सभागृहामध्ये करण्यात येतो. त्यामुळे या मिटींग हॉलमधील फर्निचर, इंटेरिअर, ऑडीओ, व्हिडीओ व इतर अनुषंगिक व्यवस्था अद्ययावत करणे आवश्यक आहे. त्यामुळे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी मंदिर परिसरात समक्ष पाहणी दरम्यान सध्या साईभक्तांकरीता बंद असलेला पारायण हॉल हा मिटींग हॉल म्हणून वापरात आणणेकामी पारायण हॉलमध्ये अथवा साई सभागृहातील सध्याचे जुने फर्निचर काढून त्या ठिकाणी अद्ययावत व सुशोभित असे नविन फर्निचर व इतर अनुषंगिक इंटेरीअर कामे करणेबाबत सुचित केले आहे.

त्यानुसार सदरहू हॉलमधील फर्निचर व इतर कामे करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.न | कामाचा तपशिल | खर्च (रू.) |
|---|---|---|
| ०१. | वॉल पॅनेलिंग | ३,७८,४९०.०० |
| ०२. | अॅकॉस्टीक पॅनेलिंग | ३,०९,८६४.०० |
| ०३. | अकॉस्टीक डोअर फ्रेम | १,८४,२८७.०० |
| ०४. | प्लायवूड व टोवीनीअरमध्ये पेलमेट | १४,२९३.०० |
| ०५. | खिडक्यांसाठी रोल ब्लाईंडस | ११,९११.०० |
| ०६ | कारपेट | १,५८,७९८.०० |
| ०७. | जिप्सम सिलींग (भिंतीचे बाजूला) | ४८,५२३.०० |
| ०८. | फॉल्स सिलींग (मध्यभागी) | ७२,७३९.०० |
| ०९. | रंगकाम २ कोट | ११,३००.०० |
| १०. | स्टोअरेज | ५४,६२१.०० |
| ११. | कन्सोल | ३९,६००.०० |
| १२. | कॉन्फरन्स टेबल | ३,११,२५०.०० |
| १३. | स्टेज प्लॅटफॉर्म | २१,९३८.०० |
| १४. | डेकोरेटीव्ह आरटीफॅक्टस | १,००,०००.०० |
| १५. | गोदरजे कंपनी हाय बॅक चेअर्स – ०३ नग. | ५१,०००.०० |
| १६. | गोदरेज कंपनी मेडीयम बॅक चेअर्स – २९ नग | २,७५,५००.०० |
| १७. | एल.ई.डी टिव्हीसाठी फ्रेम | १४,३००.०० |
| १८. | अॅपल आयमॅक कॉम्प्युटर -०१ नग | १,२५,०००.०० |
| १९. | ऑडीओ, व्हिडीओ सिस्टीम | १,००,०००.०० |
| २०. | साईबाबांचे भिंतीवरील चित्र (Mural) | १,३५,०००.०० |
| २१. | प्रोजेक्टर स्क्रीन -०१ नग | ६८,५००.०० |
| २२. | विद्युत संबंधीत कामे | २,९४,०००.०० |
| २३. | एल. ई. डी. स्क्रीन- साईज ५५" – ०३ नग | ४,०५,०००.०० |
| २४. | मोटोराईज्ड टच स्क्रीन ऑडीओ कॉन्फरन्स सिस्टीम टिव्ही -०३ नग | २,६८,५००.०० |
| २५. | स्प्लीट ए.सी. -०४ नग | २,४८,०००.०० |
| २६. | आय टी विभागाकडील कामे | २,००,०००.०० |
| | एकूण | ३९,०२,४१४.०० |
| | Add GST 18% | ७,०२,४३५.०० |
| | Total Rs. | ४६,०४,८४९.०० |
| | R/o Rs. | ४६,०५,०००.०० |

पान ०२ वर

EPP-BO-2021

**विभागाचा अभिप्राय-** उपरोक्त प्रमाणे पारायण हॉलचा वापर मिटींग हॉल म्हणून करणेकामी अथवा साई सभागृहातील सध्याचे जुने फर्निचर काढून त्या ठिकाणी इंटेरिअर, ईलेक्ट्रीकल, मेकॅनिकल व ध्वनीक्षेपणाचे कामे करणेसाठी अंदाजे रक्कम रु.४६,०५,०००/-मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम ई-निविदा मागवून करता येईल. तथापि सदर काम हे महत्वाचे व मोठ्या स्वरुपाचे असल्याने त्यासाठी आर्किटेक्ट यांचे सल्ल्याने इंटेरिअर डिझाईन, आराखडे निविदा प्रपत्र तयार करुन घेणे आवश्यक आहे. सदरचे काम शैक्षणिक संकुल प्रकल्पाचे सिव्हील फर्निचर व इंटेरिअर डिझाईनचे काम करणारे आर्किटेक्ट डि. ओ. निकम पुणे यांचेकडून कामाच्या १.२६% इतक्या मंजूर आर्किटेक्ट फि वर करुन घेता येईल, असे मत आहे.

**प्रस्ताव –** तरी मंदिर परिसरातील सध्याचे पारायण हॉलमध्ये अथवा साई सभागृहातील सध्याचे जुने फर्निचर काढून त्या ठिकाणी मिटींग हॉल तयार करणेसाठी फर्निचर व इंटेरिअर कामे करणेसाठी उपरोक्त प्रमाणे येणारे अंदाजे रु.४६,०५,०००/- मात्रचे खर्चास व शैक्षणिक संकूल प्रकल्पाचे आर्किटेक्ट डि ओ निकम, पुणे यांचेकडून शैक्षणिक संकूल प्रकल्पाचे कामासाठी असलेल्या १.२६% इतक्या दराने आर्किटेक्ट फि वर इंटेरिअर डिझाईन, ड्रॉईंग, सविस्तर अंदाजपत्रक व निविदा प्रपत्र तयार करुन घेणेस व याकामी ई -निविदा मागविणेस मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेसाठी चक्रीय पध्दतीने सादर.

5/1/2024

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

मंदिर परिसरातील सध्याचे साई सभागृह / पारायण हॉलमध्ये अद्ययावत मिटींग हॉल तयार करणेसाठी फर्निचर व इंटेरिअर कामे करणेसाठी अपेक्षित रक्कम रु.४६,०५,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच या कामी आर्किटेक्ट डि. ओ. निकम, पुणे यांचेकडून कामाच्या किंमतीचे १.२६% इतक्या फि मध्ये इंटेरिअर डिझाईन, ड्रॉईंग, सविस्तर अंदाजपत्रक, निविदा प्रपत्र या सेवा घेऊन त्यानुसार ई-निविदा मागविणेसाठी मा. तदर्थ (Ad-hoc) समितीकडून चक्रीय पध्दतीने मान्यता देणेत आली .

| | | | |
|---|---|---|---|
| (श्रीमती गीता बनकर)<br>सहा.धर्मादाय आयुक्त<br>अहमदनगर, सदस्या | (भानुदास पालवे) 5/1/2024<br>अपर आयुक्त<br>विभागिय आयुक्त कार्यालय, नासिक, सदस्य | (कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | (श्रीकांत एल. आणेकर)<br>प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर.<br>तथा अध्यक्ष, तदर्थ समिती. |

सदरचा प्रस्ताव वाचणेत आला. नमूद खर्च संयुक्तिक नसून तशी आवश्यकता वाटत नाही. करिता माझेतर्फे अमान्य करण्यात येतो.

06/01/2024

चक्रीय पध्दतीने सादर केलेल्या खालील दोन विषयावरील एकत्रित निर्णय,
दि. ०६ जानेवारी, २०२१

विषय - श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील सध्याचे साई सभागृह/पारायण हॉलमध्ये मिटींग हॉल तयार करणेसाठी फर्निचर व इंटेरिअर कामे करणेसाठी अपेक्षित रक्कम रु.४६,०५,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच याकामी ई-निविदा मागविणेसाठी मान्यता देणेबाबत..

व

विषय - श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील साई सभागृह अथवा पारायण हॉलचा वापर प्रतिक्षालय (वेटींग हॉल) म्हणून करणेसाठी सदर हॉलमध्ये फर्निचर व इंटेरिअर कामे करणेसाठी अपेक्षित रक्कम रु.८,६५,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच याकामी ई-निविदा मागविणेसाठी मान्यता देणेबाबत..

(१) सदरचे दोन्ही विषय श्री. एस.एम. जोरी, उप अभियंता, बांधकाम विभाग यांच्याकडून समजावून घेतले. पारायण हॉलचा वापर प्रतिक्षालयात करावयाचा आहे. मात्र मंदिर गतीविधी पूर्ववत सुरु झाल्यास पारायण हे मेडिटेशन हॉलमध्ये करता येईल असे तोंडी सांगण्यात आले. मात्र मेडीटेशन कुठे करावयाचे असे विचारल्यानंतर, त्यासाठी नवीन दर्शन रांग सुरु झाल्यानंतर प्रशासकीय इमारतीचे तळमजल्यावरील जागा मेडीटेशनसाठी वापरता येईल असे सांगण्यात आले. मात्र या सर्व बाबी अभ्यासल्या गेल्याचे टिपणीवरुन तरी दिसून येत नाही.

(२) सद्य स्थितीत कोव्हिड -१९ मध्ये पारायण तसेच मेडीटेशन बंद असल्याचे दिसून येते. मात्र याचा अर्थ पर्यायी जागा लगेचच उपलब्ध नसताना सर्वसामन्य भक्तांना दिलेल्या त्या सर्व सोयीसुविधा बाजुला ठेवून कधीतरी होणा-या बैठकीसाठी प्रतिक्षालय तयार करणे संयुक्तिक वाटत नाही.

(३) साई सभागृह अद्ययावत करण्याचा विषय हा खर्चिक दिसून येतो. तसेच त्यात नमूद केलेप्रमाणे अतिविशिष्ट महत्वाच्या व्यक्ति जेव्हा दर्शनासाठी येतात त्यांच्या सोयीसाठी साईसभागृह अद्ययावत करणे संयुक्तिक वाटत नाही, जेव्हा की साईनिवास अतिथिगृह येथे अद्ययावत मिटींग हॉल उपलब्ध आहे. करिता एवढामोठा खर्च (रु.४६ लाखापेक्षा जास्त) मला अयोग्य वाटतो. करिता दोन्ही विषय माझ्यातर्फे नामंजूर.

(श्रीकांत ल.आणेकर)
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर

Received
06/01/2021

विषय क्र.- ९/८३

315

# मा. तदर्थ (Ad- hoc) समिती सभेपुढील विषय
## बांधकाम विभाग

विषय: श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील साई सभागृह अथवा पारायण हॉलचा वापर प्रतिक्षालय (वेटींग हॉल)म्हणून करणेसाठी सदर हॉलमध्ये फर्निचर व इंटेरीअर कामे करणेसाठी अपेक्षित रक्कम रु.८,६५,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच याकामी ई- निविदा मागविणेसाठी मान्यता देणेबाबत..

टिपणी-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतूद आहे.

प्रस्तावना:- कोविड-१९ या साथ रोगाच्या अनुषंगाने बंद करणेत आलेले श्री साईबाबा समाधी मंदिर दि.१६/११/२०२० रोजी साईभक्तांच्या दर्शनासाठी खुले करण्यात आले आहे. तथापी, मंदिर परिसरातील साईसत्यव्रत पुजा, अभिषेक पुजा बंद ठेवण्यात आलेल्या आहेत. याचबरोबर साईभक्तांकरीता ग्रंथ वाचनाचा पारायण हॉलही सध्या बंद आहे. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी मंदिर परिसरात समक्ष पाहणी दरम्यान सध्या साईभक्तांकरीता बंद असलेला पारायण कक्ष अथवा साई सभागृह मिटींग हॉल म्हणून वापरात आणणेकामी आवश्यक ती कामे करणेसाठी निर्देश दिले आहेत. सदरचे हॉलमध्ये पार्टीशन करुन ०४ कक्ष तयार करता येतील. सदर कक्षामध्ये इंटेरिअर व फर्निचर कामे करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | अंदाजे रक्कम |
|---|---|---|
| १ | कक्ष तयार करणेकामी प्लायवूड पार्टीशन-४.५फूट उंचीचे | १,५६,५४३.०० |
| २ | आतील रंगकाम | ३८,०३२.०० |
| ३ | सेंटर टेबल-४ नग | ६०,०००.०० |
| ४ | साईड टेबल-८ नग | ६८,०००.०० |
| ५ | थ्री सीटर सोफा ०६ नग | २,१०,०००.०० |
| ६ | टु सिटर सोफा ०८ नग | २,००,०००.०० |
| | एकूण- | ७,३२,५७५.०० |
| | जीएसटी १८% - | १,३१,८६३.५० |
| | एकूण अंदाजपत्रकीय रक्कम - | ८,६४,४३८.५० |
| | पूर्णांकित रक्कम - | ८,६५,०००.०० |

सध्याचे मिटींग हॉलचा वापर प्रतिक्षालय म्हणून करणे अथवा पारायण हॉलमध्ये प्रतिक्षालय करणेसाठी वरीलप्रमाणे फर्निचर व इंटेरिअर कामे करणेसाठी अंदाजे रक्कम रु.८,६५,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

प्रस्ताव- तरी साई सभागृह आणि पारायण कक्ष यापैकी एका हॉलचा वापर प्रतिक्षालय म्हणून करणेसाठी इंटेरिअर व फर्निचर कामे करणेसाठी येणारे अंदाजे रक्कम रु.८,६५,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास व सदरचे कामासाठी ई-निविदा मागविणेकरीता सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

5/1/2021

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

मंदिर परिसरातील सध्याचा पारायण हॉल आणि साई सभागृह यापैकी एका हॉलचा वापर प्रतिक्षालय म्हणून करणेसाठी सदर हॉलमध्ये फर्निचर व इंटेरीअर कामे करणेसाठी अपेक्षित रक्कम रु.८,६५,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच याकामी ई- निविदा मागविणेसाठी चक्रीय पध्दतीने मान्यता देणेत आली .

(श्रीमती गीता बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त
अहमदनगर, सदस्या

(भानुदास पालवे) 5/1/2021
अपर आयुक्त
विभागिय आयुक्त कार्यालय, नासिक, सदस्य

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर.
तथा अध्यक्ष, तदर्थ समिती.

सदरचा प्रस्ताव वाचणेत आला. वर नमुद खर्च अयुक्तिक नसून तशी आवश्यकता वाटत नाही. करिता माझेतर्फे अमान्य करण्यात येतो.

06/01/2021

Rpawar/d/eng folder/gavane/meeting note file 01/doc

EEF - BI - 2021

चक्रीय पध्दतीने सादर केलेल्या खालील दोन विषयावरील एकत्रित निर्णय,
दि. ०६ जानेवारी, २०२१

विषय - श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील सध्याचे साई सभागृह/पारायण हॉलमध्ये मिटींग हॉल तयार करणेसाठी फर्निचर व इंटेरिअर कामे करणेसाठी अपेक्षित रक्कम रु.४६,०५,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच याकामी ई-निविदा मागविणेसाठी मान्यता देणेबाबत..

व

विषय - श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील साई सभागृह अथवा पारायण हॉलचा वापर प्रतिक्षालय (वेटींग हॉल) म्हणून करणेसाठी सदर हॉलमध्ये फर्निचर व इंटेरिअर कामे करणेसाठी अपेक्षित रक्कम रु.८,६५,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच याकामी ई-निविदा मागविणेसाठी मान्यता देणेबाबत..

(१) सदरचे दोन्ही विषय श्री. एस.एम. जोरी, उप अभियंता, बांधकाम विभाग यांच्याकडून समजावून घेतले. पारायण हॉलचा वापर प्रतिक्षालयात करावयाचा आहे. मात्र मंदिर गतीविधी पूर्ववत सुरु झाल्यास पारायण हे मेडिटेशन हॉलमध्ये करता येईल असे तोंडी सांगण्यात आले. मात्र मेडीटेशन कुठे करावयाचे असे विचारल्यानंतर, त्यासाठी नवीन दर्शन रांग सुरु झाल्यानंतर प्रशासकीय इमारतीचे तळमजल्यावरील जागा मेडीटेशनसाठी वापरता येईल असे सांगण्यात आले. मात्र या सर्व बाबी अभ्यासल्या गेल्याचे टिपणीवरुन तरी दिसून येत नाही.

(२) सद्य स्थितीत कोव्हिड -१९ मध्ये पारायण तसेच मेडीटेशन बंद असल्याचे दिसून येते. मात्र याचा अर्थ पर्यायी जागा लगेचच उपलब्ध नसतांना सर्वसामन्य भक्तांना दिलेल्या त्या सर्व सोयीसुविधा बाजुला ठेवून कधीतरी होणा-या बैठकीसाठी प्रतिक्षालय तयार करणे संयुक्तिक वाटत नाही.

(३) साई सभागृह अद्ययावत करण्याचा विषय हा खर्चिक दिसून येतो. तसेच त्यात नमूद केलेप्रमाणे अतिविशिष्ट महत्वाच्या व्यक्ति जेव्हा दर्शनासाठी येतात त्यांच्या सोयीसाठी साईसभागृह अद्ययावत करणे संयुक्तिक वाटत नाही, जेव्हा की साईनिवास अतिथिगृह येथे अद्ययावत मिटींग हॉल उपलब्ध आहे. करिता एवढामोठा खर्च (रु.४६ लाखापेक्षा जास्त) मला अयोग्य वाटतो. करिता दोन्ही विषय माझ्यातर्फे नामंजूर.

(श्रीकांत ल.आणेकर)
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर

Received
06/01/2021

विषय क्र.- ९/.८४

# मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय
## बांधकाम विभाग

**विषय : सर्व्हे नं. १२४ मधील भांडार इमारतीचे छताचे पत्रे बदलणे, रंगकाम करणे व इतर अनुषंगिक कामासाठी अंदाजे रु.३९,६२,७५५/- मात्र खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

टिपणी.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना :** संस्थानचे सर्व्हे नं.१२४ मध्ये जी. आय. पत्र्याचे छत असलेली मध्यवर्ती भांडार (क्षेत्रफळ १८५२ चौ. मी.) इमारत सन २००२ मध्ये बांधण्यात आलेली आहे. सदरहु इमारतीचे काही भागातील पत्रे खराब झाल्याने पाणी गळती होवू नये यासाठी विभागामार्फत जॉइंटचे ठिकाणी डांबर वापरून लिकेज बंद करण्यात आले आहे. याकामी कायमस्वरूपी उपाययोजना व्हावी यासाठी प्र. अधिक्षक, भांडार विभाग यांनी दि. १३/०८/२०२० रोजीचे पत्राने सदर गोडावूनचे पत्रे बदलणे, गोडावूनचे आतील व बाहेरील बाजूने रंगकाम करणे, ३ दरवाजांची रुंदी वाढविणे व गोडावूनमध्ये हवा खेळती राहण्यासाठी सिलींग फॅन फिट करणे इ. कामे करून मिळणेबाबत विनंती केली होती.

उपरोक्त बाबी विचारात घेता, गोडावूनमध्ये होणारी पाणी गळती बंद करण्याचे दृष्टीने सध्याचे जी.आय. पत्रे काढून त्याऐवजी कलरकोटेड शीट बसविणे व गोडावूनमध्ये उजेड व हवा खेळती राहावी यासाठी गोडावूनचे छतावर टर्बो व्हेंटिलेटर सिस्टीम बसविणे योग्य राहील असे मत आहे. तसेच रंगकाम करून १८ वर्ष झाले असल्याने सदर इमारतीचे रंगकाम करणे आवश्यक आहे.

या इमारतीचे छताचे जी. आय. पत्रे काढणे, शेडला नविन कलरकोटेड शीट बसविणे, आतील व बाहेरील रंगकाम करणे तसेच टर्बो व्हेंटिलेटर सिस्टीम बसविणे कामासाठी प्रचलित जिल्हा दरसुची (सन २०१९-२०) मधील दरानुसार अंदाजे रु.३९,६२,७५५/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्ताव -** तरी सर्व्हे नं. १२४ मधील मध्यवर्ती भांडार इमारतीचे पत्रे बदलणे, रंगकाम करणे व टर्बो व्हेंटिलेटर सिस्टीम बसविणेसाठी अपेक्षित रु.३९,६२,७५५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणे व सदरचे काम विहीत पद्धतीने ई-निविदा मागवून करुन घेणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

6/3/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारीअधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(B) 4109.

---

मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १२४ मधील मध्यवर्ती भांडार इमारतीचे पत्रे बदलणे, रंगकाम करणे व टर्बो व्हेंटिलेटर सिस्टीम बसविणेसाठी अपेक्षित रु.३९,६२,७५५/- मात्रचे खर्चास तसेच सदरचे काम विहीत पद्धतीने ई-निविदा मागवून करुन घेणेस चक्रीय पध्दतीने मान्यता देणेत आली.

अनुदानाचे वितरण झाल्यानंतर सदर कामाचे निविदा प्रसिद्ध करणेस हरकत नाही 6/3/21

| | | | |
|---|---|---|---|
| (श्रीमती गीता बनकर) | (भानुदास पालवे) | (कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.) | (श्रीकांत एल. आंधोरे) |
| सहा.धर्मादाय आयुक्त | अपर आयुक्त | मुख्य कार्यकारी अधिकारी, | प्रमुख जिल्हा व सत्रन्यायाधिश,अहमदनगर |
| अहमदनगर, सदस्या. | विभागिय आयुक्त कार्यालय नाशिक, सदस्य. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी. | तथा अध्यक्ष, तदर्थ समिती. |

CON-meeting-440-2020

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि. 09/03/2021

विषय – **सर्व्हे नं. 124 मधील भांडार इमारतीचे छताचे पत्रे बदलणे, रंगकाम करणे व इतर अनुषंगिक कामासाठी अंदाजे रु.39,62,755/- मात्र खर्चास मान्यता मिळणेबाबत...**

संस्थान प्रशासनाची टिपणी वाचली. ती अतिशय त्रोटक स्वरुपात लिहिलेली आहे. कारण जुने पत्रे लिलावाने विकणार किंवा त्यांचा इतर ठिकाणी उपयोग करणार, या बाबतीत स्पष्टता नाही. अशा परिस्थितीत जुने पत्रे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उपस्थितीत लिलाव करण्याच्या अटीवर व त्याची येणारी पूर्ण रक्कम संस्थान तिजोरीत जमा करण्याच्या अटीवर मंजूर.

(श्रीकांत एल. आणेकर)
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर**
**तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी**

दिनांक – 09/03/2021

320

## चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

## दि. ०९.०३.२०२१

विषय : सर्व्हे नं. १२४ मधील भांडार इमारतीचे छताचे पत्रे बदलणे, रंगकाम करणे व इतर अनुषंगिक कामासाठी अंदाजे रु. ३९,६२,७५५/- मात्र खर्चास मान्यता मिळणेबाबत .

प्रस्ताव वाचला. प्रस्तावामध्ये जुन्या पत्र्यांची विल्हेवाट कश्या पध्दतीने करावयाची आहे याबाबत स्पष्टता नाही. त्यामुळे जुनी पत्रे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उपस्थितीत लिलाव करण्याचे व येणारी संपूर्ण रक्कम संस्थानचे तिजोरीत जमा करण्याचे अटींवर मंजूर.

09/03/2021

(गीता प्र. बनकर)

सहायक धर्मादाय आयुक्त तथा

सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,

श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि. ०९.०३.२०२१

विषय क्र.- ९/ ८५

321

# मा. तदर्थ(Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय

## बांधकाम विभाग

विषय:- संस्थान निधीतून शिर्डी शहरातील सहा रस्ते विकसन कामाचे ठेकेदार टारमॅट लि. यांचे रु. १९,४३,७५,४०८/- मागणीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.०६/११/२०२० रोजीचे ऑर्डरने निवृत्त न्यायमुर्ती श्री. आर. एम. सावंत यांची Sole Arbitrator म्हणून केलेली नेमणूक, दि.०२/१२/२०२० व दि.१८/०१/२०२१ रोजी झालेल्या Preliminery meeting चे इतिवृत्त तसेच संस्थान वकील ॲड. शानबाग यांचे फीबाबत.

टिपणी.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :

१.अधिनियम कलम १७ (२) (च) "..विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित असे कोणतेही दावे खटले व इतर कायदेशिर कार्यवाही न्यायालयात किंवा न्यायाधिकरणापुढे किंवा इतर प्राधिकरणापुढे दाखल करील व त्यासंबंधात बचाव करील.

  *"..... श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतीचे बांधकाम हे सदर कामाचे ठेकदार भानू कंन्स्ट्रक्शन, मुंबई यांना बांधकामाचे एकूण क्षेत्रफळानुसार (Lumpsum) दिलेले असून Item wise दिलेले नाही. त्यामुळे दर्शन रांग इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकाम करावयाचे असल्यास त्यासाठी स्वतंत्र ई-निविदा प्रक्रिया राबबावी लागेल. तथापी सध्या दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याची आवश्यकता नाही, असे ठरले."*
- मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०६ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.
  *".....यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत रक्कम रु.३४.०७ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच त्याव्यतिरिक्त अधिकचे FSI करीता प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्क व छाननी शुल्क आदा करणेसाठी नियमानुसार येणाऱ्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात आली. सदरहु प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, व शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले."*
- मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०६ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.
  *"..... मा. व्यवस्थापन समितीच्या दि.२६.०७.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०६ अन्वये श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत रक्कम रु.३४.०७ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच त्याव्यतिरिक्त अधिकचे FSI करीता प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्क व छाननी शुल्क आदा करणेसाठी नियमानुसार येणाऱ्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात आली. सदरहु प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, व शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणे यावी, असे ठरले.*

पान ०२ वर...

*तथापी याबाबत सदर प्रकल्पाचे आर्किटेक्ट यांचे समवेत चर्चा करणेत आली. त्यावेळी सदर कामात टेरेस वॉटर प्रुफींग, ओव्हर हेड टँक, ममटी रुम, इलेक्ट्रीकल सबस्टेशन बिल्डींग विस्तारीकरण करणे, वॉटर सप्लाय पाईप लाईन, ड्रेनेज पाईपलाईन, एच.व्ही.ए.सी. पाईपलाईन, लिफ्ट संदर्भातील किरकोळ कामे, डी.जी.सेट, ट्रांसफार्मर, इले.केबलींग इत्यादी कामात वाढ होईल, त्यामुळे वर नमुद खर्चात रक्कम रु.६.२७ कोटी रुपयांनी वाढ होईल. त्यामुळे दर्शनरांग इमारतीचे तिसरा मजला बांधकामासाठी एकूण रक्कम रु.४०.३४ कोटी खर्च अपेक्षित आहे.*

*यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत रक्कम रु.४०.३४ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच त्याव्यतिरिक्त अधिकचे FSI करीता प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्क व छाननी शुल्क आदा करणेसाठी नियमानुसार येणाऱ्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात आली."*

- मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.२८/०८/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४८ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

*".....या विषयावर सदस्य सचिव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे मत मांडले की, सध्याच्या मंजूर दर्शन रांगेच्या इमारतीमध्ये एकंदर 10,800 भक्तांना सामावून घेण्याची/बसण्याची क्षमता आहे. सद्य स्थितीत संस्थानच्या प्रसादालयामध्ये सुमारे 50,000 साईभक्त दररोज प्रसाद घेत असतात. या गोष्टीचा विचार करता दिवसाला 60,000 भक्त शिर्डीला दर्शनासाठी येतात असे म्हणता येईल. म्हणून तिस-या मजल्याची आवश्यकता भविष्यात असल्याचे तत्कालीन समितीने म्हटलेले आहे. 28 दिवसांत निर्णयात बदल झाल्याबाबत येथे प्रश्न उपस्थित करता येणार नाही. भविष्यातील निकड लक्षात घेता तत्कालीन समितीने तिस-या मजल्याच्या बांधकामाचा निर्णय घेतलेला आहे. एकूण बांधकाम खर्चात 10-12 टक्के वाढ होण्याची शक्यता आहे त्यामुळे 10-12 टकके वाढीव खर्चाचा विचार केला तर पुढील बांधकाम थांबणार आहे. महामारीच्या पार्श्वभूमीवर विचार करता अशीच परिस्थिती कायम टिकून राहील असे नक्कीच नाही. नजिकच्या काळात या परिस्थितीत सुधारणा होवू शकते म्हणून तिस-या मजल्याच्या बांधकामाचे समर्थन करणेच योग्य राहील व त्यासाठी आग्रही भुमिका मांडली.*

*यावर चर्चा करीत असतांना असे निदर्शनास आले की, तिस-या मजल्याच्या आवश्यकतेबाबत व त्यासाठीच्या मंजुरी मिळविण्याचे बाबत सविस्तर असा अभ्यास करण्यात आलेला नाही. तिस-या मजल्याचा दि. 06.06.2019 रोजीचा निर्णय क्र.311 अन्वये ठेवलेला प्रस्ताव केवळ 28 दिवसांतच म्हणजे दि.4.07.2019 रोजी निर्णय क्र.345 अन्वये तत्कालीन समितीने बदललेला आहे व तिस-या मजल्याची आवश्यकता नसल्याचे मत व्यक्त केलेले आहे. आता तिस-या मजल्याचे बांधकामाची आवश्यकता असल्याचे दाखविण्यात आले आहे परंतु त्याला पुरक अशी स्थिती दिसत नाही. सद्याच्या कोव्हिड-19 च्या पार्श्वभूमीवर एकंदर विचार करता भविष्यात साईभक्तांची साधारण आवक किती असेल याबाबत कुठलाही अभिलेख समिती समोर सादर करण्यात आलेला नाही असे मत तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी व्यक्त केले त्यावर सदस्य श्री. स्वामी साहेब यांनी सहमती दर्शविली व त्यांचे असेही मत पडले की, रु.40.34 कोटी व त्यामध्ये होणारी वाढ याचा विचार करता सद्यस्थितीत असा अधिकचा आर्थिक भार संस्थानवर टाकणे संस्थानचे हिताचा दिसत नाही. दर्शन रांगेच्या जी+2 इमारतीस राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. तिस-या मजल्याची तांत्रिक मंजुरी देण्यापूर्वी संस्थानने शासनास प्रथम प्रशासकीय मंजुरी दाखवावी असे म्हटलेले आहे.*

*सबब संस्थानने अभ्यासपूर्वक सर्वकष प्रस्ताव ठेवावा असा निर्णय 2x1 मताधिक्याने घेण्यात आला."*

प्रस्तावना - श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीचे बांधकाम श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचेमार्फत सुरु आहे. सदरहू इमारतीचे बांधकाम सध्या निविदेप्रमाणे G+2 असून त्यामध्ये खालीलप्रमाणे सुविधा आहेत.

- तळमजला - नियोजित दर्शनांग इमारतीमध्ये ०३ भव्य प्रवेश हॉल आहेत, त्यामध्ये भक्तांना मोबाईल व चप्पल लॉकर्स, बायोमेट्रीक पास काऊंटर - ४८, पेड पास काउंटर -२०, लाडू काउंटर - १०, उदी व कापडकोठी काऊंटर - १०, बुक स्टॉल, डोनेशन ऑफिस, चहा / कॉफी काउंटर, सिक्युरिटी चेक एकाच ठिकाणी व एकाच वेळी - ४० व्यक्तींची, जीने - ११, विदयुतीकरण व्यवस्था जनरेटर बॅकअपसह, लेडीज व जेन्टस टॉयलेट व्यवस्था इ.
- पहिला व दुसरा मजला - भक्तांकरीता बसण्याची व्यवस्था असेलेले एकूण १२ मोठे हॉल (एक हॉल साईज - १५.१० मी. x ३१.१५ मी.), चहा / कॉफी काउंटर, विदयुतीकरण व्यवस्था जनरेटर बॅकअपसह, वायुविजन व्यवस्था, उदवाहक / लिफ्ट व्यवस्था - १०, जीने - ११, लेडीज व जेन्टस टॉयलेट व्यवस्था, आर. ओ. प्रक्रियेव्दारे शुध्द पिण्याचे पाण्याची व्यवस्था, फायर फायटींग व्यवस्था इ.

या व्यतिरिक्त या प्रकल्पात सांडपाणी प्रक्रिया संयंत्र, रॅम्प, प्रथमोपचार केंद्र, संपूर्ण इंटेरीअर वर्क, सायनेजेस, अंतर्गत रस्ते, स्ट्रीट लाईट, इलेक्ट्रीकल सबस्टेशन, जनरेटर व्यवस्था, वायुविजन व्यवस्था, लॅण्डस्केपींग, रेनवॉटर हार्वेस्टिंग, पिंपळवाडी रस्त्यावरुन मंदिर परिसरातील जुन्या दर्शनरांगेला जोडण्यासाठी कनेक्टींग ब्रिज, संरक्षण भिंत इत्यादी सुविधांचा समावेश करणेत आला आहे. सदरहू प्रकल्पाचा ठळक तपशिल व बांधकामाच्या प्रगतीची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव : | श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणे. |
| आर्किटेक्ट : | माथूर ॲण्ड काप्रे असो., नवी दिल्ली. |
| ठेकेदार : | श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई. |
| कार्यादेश : | १) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८.<br>२) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/१९९९/२०१९, दि.२२/०८/२०१९. |
| मंजूर निविदा रक्कम : | रु.१०९.५० कोटी. (Lumpsum Contract). |

पान ०३ वर...

| | |
|---|---|
| भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांचेशी केलेल्या करारनाम्याचा दिनांक : | दि.२२/१०/२०१८. |
| श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचेशी केलेल्या करारनाम्याचा दिनांक : | दि.२२/०८/२०१९. |
| कामाचा कालावधी : | १२ महिने (दि.१९/१०/२०१८ ते दि.१८/१०/२०१९). |
| मुदतवाढ : | मा. व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१९ - निर्णय क्र.४३० - *यावर सविस्तर चर्चा होऊन, ठेकेदार यांना ESS, UGT व STP चे बांधकामासाठी अद्याप संस्थानकडून जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रकल्पाचे सर्व काम पुर्ण करण्यासाठी या जागा उपलब्ध करणेत आल्यानंतर तेथुन पुढे चार महिन्यांची मुदतवाढ निविदेतील पृष्ठ क्रं.०५ वरील अ.नं. ०७ ची Incentive अदा करणेबाबतची शर्त रद्द करण्याचे अटीवर देण्यास मान्यता देण्यात आली.* |
| एकूण बांधकाम क्षेत्रफळ : | निविदेत नमूद एकूण बांधकाम क्षेत्रफळ - २२,२१४ चौ. मी. (FSI Area.) |
| कामाची सद्यस्थिती : | • **मुख्य इमारत -**<br>**तळमजला** - आर.सी.सी काम पूर्ण, बांधकाम पूर्ण, प्लास्टर पूर्ण, ग्रेनाईट फ्लोरींगचे काम प्रगतीत, विंडो सिल व जॅम्बला ग्रीन मार्बल तसेच रेड आग्रा स्टोन बसविणे प्रगतीत, प्लंबींगचे काम प्रगतीत, एच.व्ही.ए.सी चे काम प्रगतीत, फायर फायटींगचे काम प्रगतीत, इलेक्ट्रीकल कन्डयूटींग व वायरींगचे काम प्रगतीत, टॉयलेट वॉटरप्रुफिंग काम प्रगतीत.<br>**पहिला मजला** - आर.सी.सी काम पूर्ण, बांधकाम पूर्ण, प्लास्टर पूर्ण, ग्रेनाईट फ्लोरींगचे काम प्रगतीत, विंडो सिल व जॅम्बला ग्रीन मार्बल तसेच रेड आग्रा स्टोन बसविणे प्रगतीत, एच.व्ही.ए.सी चे काम प्रगतीत, फायर फायटींगचे काम प्रगतीत, इलेक्ट्रीकल कन्डयूटींग व वायरींगचे काम प्रगतीत.<br>**दुसरा मजला** - आर.सी.सी काम पूर्ण, बांधकाम अंतिम टप्प्यात, प्लास्टर अंतिम टप्प्यात, ग्रेनाईट फ्लोरींगचे काम प्रगतीत, विंडो सिल व जॅम्बला ग्रीन मार्बल तसेच रेड आग्रा स्टोन बसविणे प्रगतीत, एच.व्ही.ए.सी चे काम प्रगतीत, फायर फायटींगचे काम प्रगतीत, इलेक्ट्रीकल कन्डयूटींग व वायरींगचे काम प्रगतीत.<br>**टेरेस** - प्रस्तावित तिसरा मजल्यामुळे रॅम्पचे उत्तर व दक्षिण बाजूचे स्लॅब कास्टींग बाकी आहे. पॅरापेट बांधकाम, टेरेस वॉटरप्रुफिंग, ओव्हर हेड टँक, ममटी रूम, लिफ्ट रूमचे काम प्रलंबित आहे.<br>**कॅनोपी** – कॅनोपीचे वॉटरप्रुफिंगचे काम प्रगतीत.<br>• **कनेक्टींग कॉरीडॉर -**<br>कनेक्टींग कॉरीडॉरपैकी मंदिर परिसरातील पी.आर.ओ चे समोरील कारंजाचे भागातील आर.सी.सी. काम, बांधकाम, प्लास्टर पूर्ण झाले आहे. प्रशासकीय इमारतीस जोडणा-या कॉरीडॉरचे कामाचे आर.सी.सी. काम जवळपास ९०% पूर्ण झालेले आहे. Connecting Corridor above Pimpalwadi Road (From Proposed Main Building to Mandir Complex) चे काम सध्या प्रगतीत आहे.<br>**इतर कामे** -स्टॉर्म वॉटर लाईन, सिव्हरेज लाईन, फायर हायड्रंट लाईन, इलेक्ट्रीकल केबलकरीता पाईपलाईन व ट्रेंच, चेंबर बांधकाम, रस्त्याचे संदर्भातील इतर कामे इ., पिण्याचे पाईपलाईन इ. कामे प्रगतीत.<br>• **स्टोन क्लॅडींग -** मुख्य इमारतीचे तसेच कनेक्टींग कॉरीडॉरचे स्टोन क्लॅडींगचे काम प्रगतीत.<br>• **ESS चे काम प्रगतीत आहे.**<br>• **UGT चे आर.सी.सी. राफ्टचे व पडदीचे काम प्रगतीत आहे.** |

विषयांकित इमारतीवर तिस-या मजल्याचे वाढीव बांधकाम करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०६ अन्वये रु.४०.३४ कोटी मात्र इतक्या अपेक्षित खर्चास मान्यता मिळालेली आहे. तसेच याव्यतिरिक्त अधिकचे FSI करीता प्रिमियम चार्जेस भरणे, विकसन शुल्क, छाननी शुल्क, आर्किटेक्ट फी अदा करणेसाठी अतिरिक्त खर्च येणार आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०६ अन्वये, नियोजीत श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीच्या प्रस्तावित तिस-या मजल्याचे बांधकामासाठी येणारे अपेक्षित खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकरीता मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग,.मंत्रालय, मुंबई यांचेकडे संस्थानकडील पत्र जा.क्र.२३२८/२०१९, दि.१४/०९/२०१९ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

पान ०४ वर...

तदनंतर मा. कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी पत्र क्र.सासंवि-१०१७/१३१३/प्र.क्र.१३३ (भाग-२) का.१६, दि.२२/१०/२०१९ अन्वये, *"श्रीम भानू कंस्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाच्या रकमेमधून टेरेस लेव्हलचे वरील भागातील कामे ठेकेदार यांचे स्कोपमधून कमी करण्यात येत असल्याचे सदर कामे कमी केल्यामुळे याबाबतचा न होणारा खर्च कमी करण्यात येणार आहे किंवा कसे, सदरहू रक्कम किती असेल, याबाबतची सविस्तर माहिती शासनास सादर करण्यात यावी."* असे कळविले आहे.

याबाबत आर्किटेक्ट यांना दि.०९/११/२०१९ रोजीचे पत्राव्दारे संबंधित तपशिल सादर करणेबाबत कळविणेत आले होते. आर्किटेक्ट यांचेकडून दि.०२/१२/२०१९ रोजी सदर कामाचे कार्यादेशाच्या रकमेमधून कमी होणारे खर्चाचा तपशिल प्राप्त झाला आहे. सदर कमी होणा-या खर्चाचा तपशिल मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे इकडील पत्र जा.क्र.३४२०/२०१९, दि.०५/१२/२०१९ व्दारे सादर करणेत आला आहे.

त्यावर मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मुंबई यांनी पत्र क्र. सासंवि-१०१७/१३१३/प्र.क्र.१३३ (भाग-२) का.१६, दि.१३/१२/२०१९ चे अनुषंगाने खालील बाबींची पूर्तता करुन पुनश्च परिपूर्ण प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणेबाबत कळविले होते.

- मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी श्री.उत्तमराव शेळके यांनी दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.१२०/२०१९ संदर्भात दिलेला आदेश तसेच सिव्हिल ॲप्लिकेशन क्र.१३०२९/२०१९ संदर्भात दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने कार्यवाही करून प्रस्ताव सादर करणे.
- सदर प्रस्तावास संबंधित यंत्रणेकडून तांत्रिक मान्यता घेणे.
- अधिकचे एफ्एसआय करीता प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्कव छाननी शुल्क यांच्या रकमेसह मान्यता.
- तिस-या मजल्याच्या बांधकामासाठी निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे किंवा कसे ?

वर नमूद बाबींचे अनुषंगाने आजपावेतो करणेत आलेल्या पूर्ततेची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | शासन पत्रातील बाब | पूर्ततेची सद्यस्थिती |
|---|---|---|
| ०१ | मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी श्री. उत्तमराव शेळके यांनी दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.१२०/२०१९ संदर्भात दिलेला आदेश तसेच सिव्हिल ॲप्लिकेशन क्र.१३०२९/२०१९ संदर्भात दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने कार्यवाही करून प्रस्ताव सादर करणे. | श्री साईबाबा मंदिर शिर्डी.दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकाम करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०६ अन्वये रु.४०.३४ कोटी मात्र इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच त्याव्यतिरिक्त अधिकचे FSI करीता प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्क व छाननी शुल्क आदा करणेसाठी नियमानुसार येणाऱ्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात आली आहे.<br>आता तिस-या मजल्याचे प्रस्तावीत बांधकामासाठी छाननी शुल्क, विकास शुल्क, प्रिमियम चार्जेस इत्यादीसह अपेक्षीत रु.४७.२५ कोटी मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चासह (G+3) इमारतीसाठी एकूण रक्कम रुपये १५७,४०,४८,९१४/- मात्रचे सुधारीत अंदाजपत्रकीय रकमेचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. |
| ०२ | सदर प्रस्तावास संबंधित यंत्रणेकडून तांत्रिक मान्यता घेणे. | याबाबत मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडे अधिक्षक अभियंता, अहमदनगर यांचेमार्फत तांत्रिक मान्यता मिळणेसाठी इकडील जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/३८१३/२०१९, दि.३०/१२/२०१९ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहु अंदाजपत्रक मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी सांक्षकीत करुन दिले आहे व त्यांचेकडील दि.१०/०७/२०२० रोजीचे पत्राने पुढीलप्रमाणे कळविले आहे.<br>*".. .. सदर कामाची किंमत ही १५ कोटी पेक्षा जास्त असल्याने प्रस्तावाची छाननी करुन सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा रू.१५२.७५ कोटी किंमतीचा प्रस्ताव आपल्यामार्फत विधी व न्याय विभागास सादर करण्यासाठी पाठविण्यात येत आहे."*<br>*तसेच सदर कामास सुधारीत प्रशासकिय मान्यता प्राप्त झाल्यानंतर तिस-या मजल्याचे काम सुरू करणेपुर्वी सा.बां. विभागाकडून तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे व त्यासाठी आवश्यक असलेले छाननी शुल्क सा.बां. विभागाकडे भरणे आवश्यक असल्याचे वर नमूद पत्रात कळविले आहे."* |
| ०३ | अधिकचे एफएसआय करीता प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्क व छाननी शुल्क यांच्या रकमेसह मान्यता. | याबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना इकडील कार्यालयाचे दि.१७/१२/२०१९ रोजी पत्र देणेत आले. त्याअनुषंगाने शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी पत्र क्र.जा.क्र.नप/टे-८/२/११४८/२०१९, दि.२०/१२/२०१९ अन्वये छाननी शुल्क, विकास शुल्क, प्रिमियम चार्जेस, बांधकाम कामगार उपकर व सुरक्षा ठेव या सदराखाली एकूण रू.६,९०,८३,३८७/- इतकी रक्कम कळविली आहे. तसेच मंजूर नकाशातील बांधकामानुसार उपरोक्त रकमेत बदल होऊ शकतो असे कळविले आहे. |

पान ०५ वर...

| अ.क्र. | शासन पत्रातील बाब | पूर्ततेची सद्यस्थिती |
|---|---|---|
| | | आता तिस-या मजल्याचे प्रस्तावत बांधकामासाठी छाननी शुल्क, विकास शुल्क, प्रिमियम चार्जेस इ. सह अपेक्षीत रु. ४७.२५ कोटी मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चासह (G+3) इमारतीसाठी एकूण रक्कम रुपये १५७,४०,४८,९१४/- मात्रचे सुधारीत अंदाजपत्रकीय रकमेचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.<br>संस्थान मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२१/०८/२०१९ मधिल निर्णय क्र.४७६ अन्वये, *"....यावर सविस्तर चर्चा होवून, श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकाम करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षित रू.४०.३४ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच त्याव्यतिरीक्तअधिकचे FSI करीता प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्कव छाननी शुल्क आदा करणेसाठी नियमानुसार येणा-या अतिरीक्त खर्चास मान्यता देण्यात आली."*<br>प्रस्तावित तिसरा मजला बांधकामास शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची परवानगी मिळणेकरीता संस्थानमार्फत पत्र जा.क्र.२८०२/२०१९, दि.२३/१०/२०१९ अन्वये अर्ज करणेत आलेला आहे. शिर्डी नगरपंचायत यांचेमार्फत सदर प्रस्ताव दि.०२/११/२०१९ रोजी सहा. संचालक, अहमदनगर यांचेकडे शिफारस मिळणेकरीता सादर करणेत आला आहे.<br>तसेच बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.२४.८ नुसार वाढीव चटई क्षेत्र (FSI) मंजूर होणेसाठी मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे.<br>तसेच मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर व मा. पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडे ना-हरकत दाखला मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला आहे.<br>त्यावर मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना अग्रेषीत त्यांचेकडील पत्र क्र. मह. कार्या./जमिन-३ब/का.वि.११४/२०२०, दि.०२/०६/२०२० अन्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.<br>*".. ..विषयांकीत जमिन ही शिर्डी नगरपंचायत क्षेत्रातील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अंतर्गत होणा-या बांधकामाबाबत असल्याने उक्त अधिनियमातील कलम १८ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार बांधकाम परवानगीचे अधिकार हे नियोजन प्राधिकारी म्हणून आपणास असल्याने शिर्डी नगरपंचायत क्षेत्रातील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अंतर्गत होणा-या बांधकामाबाबत ना-हरकत प्रमाणपत्र देणेबाबतची कार्यवाही आपलेमार्फत करणेत यावी." असे कळविले आहे.*<br>तसेच मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी दि.०७/१२/२०२० रोजीचे पत्रान्वये काही मुद्दयांचेअधिन राहून ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. |
| ०४ | तिस-या मजल्याच्या बांधकामासाठी निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे किंवा कसे ? | याबाबत संस्थानचे पत्र क्र. जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/३६४०/२०१९, दि.१७/१२/२०१९ अन्वये तिस-या मजल्याचे प्रस्तावित बांधकामासाठी निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे किंवा कसे? याबाबत मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडून त्यांचे विभागाचे कार्यपद्धतीस अनुसरून मार्गदर्शन होणेबाबत विनंती करणेत आली.<br>याबाबत अधिक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, अहमदनगर यांनी त्यांचेकडील जा.क्रं.प्रशा-०१/४८९८/२०१९, दि.१८/१२/२०१९ रोजीचे पत्रान्वये संस्थानकडे काही मुद्दयांची पूर्तता करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार प्रकल्पाचे आर्किटेक्ट यांनी खालील मुद्यांवर पूर्तता करणेबाबत कळविले आहे.<br>१) सदरील कामाचे मूळ मंजूर अंदाजपत्रक. २) संस्थानने नेमलेल्या विषयांकित कामावरील आर्किटेक्ट किंवा स्ट्रक्चरल कंन्सल्टंट यांची वाढीव मजला बांधकाम करणेबाबतचे अभिप्राय. ३) कामाचे आर्किटेक्ट यांनी दिलेल्या अभिप्रायावर साईबाबा संस्थानची सहमती व Justification. ४) Comparative Statement सह Working Estimate / Revise Estimate.<br>त्यानुसार दि.२३/१२/२०१९ रोजीचे पत्राव्दारे आर्किटेक्ट यांनी स्ट्रक्चरल कन्सलटंट जे.एस.सबरवाल यांचे पत्रासह अभिप्राय सादर केला आहे.<br>त्याअनुषंगाने अधिक्षक अभियंता यांचेकडे संस्थानकडील पत्र क्रं. जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/३८१४/२०१९, दि.३०/१२/२०१९ अन्वये सदर बाबींची पूर्तता करणेत आली. |

पान ०६ वर...

| अ.क्र. | शासन पत्रातील बाब | पूर्ततेची सद्यस्थिती |
|---|---|---|
| | | सदर पूर्ततेच्या अनुषंगाने अधिक्षक अभियंता, अहमदनगर यांनी पत्र क्रं. जा.क्रं.प्रशा-०४/४१४/२०२०, दि.०४/०२/२०२० रोजीचे पत्रान्वये मा. मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडे खालीलप्रमाणे अभिप्राय सादर केला आहे. *"श्री साईबाबा संस्थानच्या प्रस्तावात नमूद केलेनुसार ठळक बाबी खालीलप्रमाणे आहे.*<br>• *प्रगतीतील G+2 इमारतीचे काम सन २०१७-१८ चे दरसूचीवर आधारीत असून या दरानुसार तिस-या मजल्याचे बांधकामास रु.३४.०० कोटी खर्च अपेक्षित आहे.*<br>• *सन २०१९-२० चे प्रचलित दरसूचीनुसार तिस-या मजल्याचे बांधकामास रु.४०.३४ कोटी खर्च अपेक्षित आहे.*<br>• *G+2 इमारतीच्या विद्यामान ठेकेदाराकडून तिस-या मजल्याचे काम करुन घेतल्यास नविन निविदा निश्चिती प्रक्रियेमधील व्यपगत होणारा कालावधी टाळता येणे शक्य असून RCC Structure चे काम साथोसाथ हाती घेणे शक्य होईल.*<br>• *तिस-या मजल्यासाठी नविन ठेकेदार निश्चित केल्यास खालील गुतांगुंत निर्माण होऊ शकते असे नमूद आहे.*<br>*अ) जुन्या निविदेतील टेरेस वाटरप्रुफींग, ओव्हर हेड वॉटर टॅक, ममटी रुम बांधकाम, पॅरापेट बांधकाम, फायर फायटींग पाईपलाईन,. लिफ्ट सुविधा, वॉटर सप्लाय पाईपलाईन, हाय लेव्हल इलेक्ट्रीकल सप्लाय लाईन इ. बाबी मागे ठेवाव्या लागतील.*<br>*ब) प्रकल्प पूर्णत्वाचा कालावधी लांबण्याची शक्यता.*<br>*क) दोन वेगवेगळया निविदांचा DLP गुंतागुंतीचा होणे शक्य असून त्यामुळे बांधकामातील राहिलेले दोष, त्रुटी आढळल्यास त्या एकामेकांवर ढकलण्याची शक्यता होऊ शकते.*<br>*ड) महत्वाची असलेली लिकेजेसच्या बाबींस नक्की कोणता ठेकेदार जबाबदार आहे हे निश्चित करणे गुंतागुंतीचे होईल.*<br>*ई) कायदेशिर गुंतागुंत उदभवण्याची शक्यता आहे.*<br>*प्रकल्पाचे आर्किटेक्ट यांनी नमूद केलेल्या वरील अडचणींचा विचार करता प्रकल्प लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने नविन निविदा प्रक्रिया न राबविता जुन्या G+2 इमारतीच्या ठेकेदाराकडून निविदा अटी व शर्तींप्रमाणे तिस-या मजल्याचे बांधकाम करुन घेणे सोईचे होईल अशी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेने व्यक्त केलेली धारणा योग्य वाटते. तथापी याबाबतचा निर्णय शासनस्तरावरुन घेणे आवश्यक आहे".*<br>याबाबत मा. मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी दि.१०/०७/२०२० चे पत्रान्वये, पुढीलप्रमाणे कळविले आहे.<br>*"....सदर कामाच्या तिस-या मजल्याच्या बांधकामासाठी निविदा प्रक्रिया राबविणेबाबत सा. बां. विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२/दि.२७/०९/२०१८ नुसार रू.३.०० लक्ष रकमेवरील कामांकरीता दि.२६/११/२०१४ पासून ई-निविदेचा अवलंब करण्यात येत असल्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे."* |

मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी त्यांचेकडील दि.१०/०७/२०२० रोजीचे पत्राने सदर कामास सुधारीत प्रशासकिय मान्यता प्राप्त झाल्यानंतर तिस-या मजल्याचे काम सुरू करणेपुर्वी सा.बां. विभागाकडून तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे व त्यासाठी आवश्यक असलेले छाननी शुल्क सा.बां. विभागाकडे भरणे आवश्यक असल्याचे कळविले आहे.

तथापी, यापूर्वी संस्थानचे पत्र क्र.एसएसएसटी/बांधकाम/४९२२/२०२० दि.१६/०३/२०२० अन्वये सदरहू तपासणी शुल्क रू.१,६३,०२,५०४/- मात्र क्षमापित करणे व तांत्रिक तपासणी विनाशुल्क करणेबाबत मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग,मुंबई यांचेकडे इकडील जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/४९२२/२०२० दि.१६/०३/२०२० अन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

त्यावर मा. विधी व न्याय विभाग यांनी त्यांचेकडील पत्र क्र. सासंवि-१०१७/१३१३/प्र.क्र.१३३/(भाग-२)/ का. १६, दि.०१/१२/२०२० रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

*"...२. शासनाच्या संदर्भाकित क्र.१ दि. १६/०२/२०१८ रोजीचे शासन निर्णयान्वये, श्री साईबाबा दर्शनरांग इमारतीच्या (G+2) बांधकामाच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या प्रस्तावासाठी त्यापुर्वी तांत्रीक मान्यता घेण्यात आली आहे. त्यावेळी तांत्रीक तपासणी शुल्काची मागणी केलेली नसताना आता तांत्रिक शुल्काची मागणी का करण्यात येत आहे, हे कृपया सा.बां. प्रादेशिक विभाग नाशिक यांचेकडून स्पष्ट करुन घ्यावे व त्याबाबत शासनास माहिती सादर करावी."*

शासनाचे सदरहु पत्रास अनुसरुन सा. बां. प्रादेशिक विभाग, नाशिक यांना जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/३२३१/२०२१, दि.२२/०१/२०२१ अन्वये अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे.

पान ०७ वर...

**तिसरा मजला बांधकामाचे सदर प्रस्तावाबाबत वर नमूद विवेचनाबरोबरच खालील बाबी विचारात घेणे, आवश्यक आहे.**

- सध्या प्रगतीत असलेल्या (G+2) इमारतीचे बांधकाम ठेकेदार श्रीम कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी दि.२९/०८/२०१९, दि.३१/१०/२०१९, दि.०५/१२/२०१९ रोजीचे पत्रान्वये तसेच दि.१३/०२/२०२१ चे ई-मेलव्दारे, प्रस्तावित तिसरा मजला बांधकामामुळे लिफ्ट एरिया, स्टेअर केस व रॅम्प एरियावरील स्लॅब व इतर टेरेस लेव्हलचे कामे मागील तिन महिन्यांपासून म्हणजे दि.३१/०५/२०१९ पासून पूर्ण करणे शक्य होत नसल्याचे कळविले आहे. तसेच आता ठेकेदार यांना दि.०२ मार्च, २०२१ रोजीचे पत्राव्दारे तिसरा मजला बांधकाम प्रस्तावित असल्याने (G+2) इमारतीच्या लिफ्ट स्लॅबचे कॉक्रीटींग व इतर अनुषंगिक कामे खोळंबलेली असल्याचे कळविले आहे.
- ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचे कार्यकारी संचालक, श्री. दर्शन भानुशाली यांनी पत्र दि.१५/१०/२०१९ अन्वये तिस-या मजल्याचे बांधकाम करावयाचे झाल्यास आम्ही सदर काम अंदाजपत्रकीय रकमेत करणेस तयार आहोत असे कळविले आहे.
- आर्किटेक्ट यांनी दि.०२/१२/२०१९ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांना दिलेल्या कामाच्या स्कोपमध्ये समावेश असलेल्या टेरेस वॉटर प्रुफींग, ओव्हर हेड वॉटर टॅंक, ममटी रूम, पॅरापेट, फायर फायटींग पाईप लाईन, लिफ्ट, वॉटर सप्लाय पाईप लाईन इ. टेरेस लेव्हलचे वरील भागातील कामे ठेकेदार यांचे स्कोपमधून कमी करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कामे प्रस्तावित तिसरा मजला बांधकामासोबत करणे आवश्यक आहे. त्यांची एकूण रक्कम रू.२,२५,५९,९२९/- इतकी होत आहे. त्यामुळे सदर रक्कम श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांना देणेत आलेल्या ठेक्याच्या रकमेमधून कपात करणे आवश्यक आहे. सदरहू रकमेचा समावेश तिसरा मजला बांधकामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.४०.३४ कोटी मध्ये करणेत आलेला आहे.
- प्रस्तावित तिसरा मजला बांधकामासह सदर प्रकल्पाचे एकूण अंदाजपत्रकीय रकमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | अंदाजपत्रकीय रक्कम (रु.) |
|---|---|---|
| अ) | **सध्या बांधकाम चालू असलेली (G+2) इमारत:** | |
| ०१. | शिर्डी सर्व्हे नं.२/४, ३/१ व ३/७ मधील संस्थान मालकीचे जागेत श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारत (G+2) उभारणेसाठी तसेच अनुषंगीक कामासाठी येणा-या खर्चास शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१३१३/प्र.क्र.१३३/का.१६, दि.१६/०२/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता देणेत आली आहे. (सदर काम प्रगतीत आहे). | ११२,४०,९०,०५९/- |
| ०२. | सध्या बांधकाम सुरु असलेल्या (G+2) इमारतीचे बांधकाम ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचे स्कोपमधून कमी करावयांच्या टेरेस लेव्हलचे वरील भागातील कामांची अंदाजपत्रकीय रक्कम. | (-) २,२५,५९,९२९/- |
| | एकूण (अ) | ११०,१५,३०,१३०/- |
| ब) | **प्रस्तावित तिसरा मजला बांधकाम:** | |
| ०३. | श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतीचे प्रस्तावीत तिसरा मजला बांधकामाची अंदाजपत्रकीय रक्कम. | ४०,३४,३५,३९७/- |
| ०४. | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि.२०/१२/२०१९ रोजीचे पत्राने छाननी शुल्क, विकास शुल्क, प्रिमियम चार्जेस, बांधकाम कामगार उपकरव सुरक्षा ठेव या सदराखाली प्रस्तावित तिस-या मजल्याचे बांधकामासाठी अंदाजे शुल्क रक्कम. | ६,९०,८३,३८७/- |
| | एकूण (ब) | ४७,२५,१८,७८४/- |
| | प्रस्तावाची एकूण अंदाजपत्रकीय रक्कम (अ) +(ब) रु. | १५७,४०,४८,९१४/- |

- सध्या बांधकाम चालू असलेल्या (G+2) इमारतीसाठी माथूर अॅन्ड काप्रे असोसिएटस, नवी दिल्ली यांची महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांचेकडील पत्र क्र.सासंवि-१०१६/६०४/प्र.क्र.८५/का.१६ दि.१९/०९/२०१६ अन्वये आर्किटेक्ट म्हणून नेमणूकीसाठी करारनामा करणेस मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार माथूर अॅन्ड काप्रे असोसिएटस, नवी दिल्ली यांची सदर प्रकल्पासाठी ३.५% इतक्या फी वर आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. प्रस्तावित तिसरा मजला बांधकामासाठीही त्यांची पूर्वीचेच अटी-शर्ती व फीवर आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.
- सध्या बांधकाम चालू असलेल्या इमारतीचे (G+2) टेरेस लेव्हलवरील ममटी रुम बांधकाम, लिफ्ट मशीन रुम बांधकाम, पॅरापेट वॉल बांधकाम, स्टोन क्लॅडींग, टेरेस वॉटरप्रुफींग, ओव्हर हेड वॉटर टॅंक, फायर फायटींग पाईपलाईन, वॉटरसप्लाय पाईपलाईन, उत्तर व दक्षिण बाजूकडील रॅम्प एरियावरील स्लॅब, लिफ्ट बसविणे तसेच लिफ्टची इलेक्ट्रोमेकॅनिकल उपकरणे बसविणे, एचव्हीएसी आउटडोअर युनिट टेरेसवर बसविणे इ. ही कामे प्रस्तावित तिसरा मजला बांधकामामुळे स्थगित आहेत.
- प्रस्तावित तिस-या मजल्याचे वाढीव बांधकामास शासनाची प्रशासकिय मान्यता घेणे, सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता घेणे, बांधकामाचे सामासिक अंतरात शिथिलता घेणे, बांधकाम परवानगी घेणे, मा. उच्च न्यायालय मान्यता घेणे इ. कार्यवाहीसाठी प्रस्तावास मा.तदर्थ समितीचे मान्यतेनंतर दोन ते तिन महिन्यांचा कालावधी लागू शकतो. त्यामुळे सध्या चालू असलेल्या इमारत (G+2) बांधकामाचे गतीवर त्याचा परीणाम होत आहे. ठेकेदारही आता विलंब झालेल्या कामांसाठी चालू राज्य दरसुचीनुसार भाववाढ मागणी करत आहेत.

पान ०८ वर...

- मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे नमूद दि.२८/०८/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४८ अन्वये सध्याच्या कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर एकंदर विचार करता भविष्यात साईभक्तांची साधारण आवक किती असेल याबाबत कुठलाही अभिलेख समितीसमोर सादर करण्यात आलेला नाही असे मत तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी व्यक्त केले, त्यावर सदस्य श्री.स्वामी साहेब यांनी सहमती दर्शविली व त्यांचेही मत पडले की, रु.४०.३४ कोटी व त्यामध्ये होणारी वाढ याचा विचार करता सद्यस्थितीत असा अधिकचा आर्थिक भार संस्थानवर टाकणे संस्थानच्या हिताचे दिसत नाही, असे नमूद आहे. तसेच संस्थानने अभ्यासपूर्वक सर्वंकष प्रस्ताव ठेवावा असा निर्णय २ x १ मताधिक्याने घेण्यात आलेला आहे.

याबाबत दि.०१ जानेवारी २०११ ते ३१ डिसेंबर, २०२० अखेर श्रींचे समाधी मंदिरात दर्शन घेतलेल्या साईभक्तांची वर्षनिहाय संख्या संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागाकडून प्राप्त करणेत आली असून ती खालीलप्रमाणे आहे.

**Devotees count from 2011 to 2020.**

| Year | Paid Pass | Free Pass | Total |
|---|---|---|---|
| 2011 (From Jul 2011) | 411458 | | 411458 |
| 2012 | 1196442 | | 1196442 |
| 2013 | 1393134 | | 1393134 |
| 2014 | 1603512 | | 1603512 |
| 2015 | 1606405 | | 1606405 |
| 2016 | 1564856 | | 1564865 |
| 2017 | 2200357 | 13510455 | 15710812 |
| 2018 | 2887916 | 13701418 | 16589334 |
| 2019 | 2913673 | 12716579 | 15630252 |
| 2020 | 771083 | 3022291 | 3793374 |

वरील पैकी सन-२०२० मध्ये कोविड-१९ चे पार्श्वभूमीवर समाधी मंदिर दिर्घ कालावधीसाठी बंद होते त्यामुळे सन-२०२० मधिल संख्या विचारात घेता येणार नाही. फ्री पासची संख्या सन-२०१७ पासून उपलब्ध आहे. म्हणजेस पेड पास व फ्री पास अशा एकूण दर्शन घेतलेल्या भक्तांची संख्या सन-२०१७ पासून उपलब्ध आहे. त्यात वाढ होऊ शकते.

याचबरोबर दि.०१ जानेवारी, २०११ ते ३१ डिसेंबर, २०१९ अखेर श्रींचे प्रसाद भोजन घेतलेल्या साईभक्तांची संख्या श्री साईप्रसादालय विभागाकडून प्राप्त करणेत आली असून ती खालीलप्रमाणे आहे.

| सन | प्रसाद भोजन घेणा-या साईभक्तांची संख्या | वाढ झालेल्या साईभक्तांची संख्या | वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०११ | १,१८,८७,६५३ | - | - |
| २०१२ | १,३८,९३,६९५ | २०,०६,०४२ | १६.८७% |
| २०१३ | १,३१,१९,१११ | -७,७४,५८४ | -५.५७ % |
| २०१४ | १,३२,१८,९९५ | ९९,८८४ | ०.७६% |
| २०१५ | १,३१,२६,४८७ | -९२,५०८ | -०.६९% |
| २०१६ | १,२७,६०,०७७ | -३,६६,४१० | -२.७९% |
| २०१७ | १,४८,४५,३७० | २०,८५,२९३ | १६.३४% |
| २०१८ | १,६०,४७,५८५ | १२,०२,२१५ | ८.०९% |
| २०१९ | १,६४,६०,००७ | ४,१२,४२५ | २.५७% |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सन २०१३, २०१५ व २०१६ या वर्षामध्ये प्रसादभोजन घेणा-या साईभक्तांची संख्या त्या अगोदरचे वर्षापेक्षा कमी झालेली आहे. सन २०१२ व २०१७ या वर्षामध्ये वाढीचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे १६% पेक्षा अधिक होते. परंतू नंतर भविष्यात वाढ होऊ शकते. सन २०१२ ते २०१९ या ०७ वर्षामध्ये प्रसाद भोजन घेणा-या साईभक्तांची संख्या एकूण १८.४७ % ने वाढलेली आहे.

प्रस्ताव – तरी श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याचे प्रस्तावित बांधकामासंबंधी खालील बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे.

- श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकामासाठी दि.२१/०८/२०१९ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.४७६ अन्वये यापुर्वी मंजूर अंदाजपत्रकीय रक्कम रू.४०.३४ कोटी व्यतिरिक्त शिर्डी नगरपंचायत छाननी शुल्क, विकास शुल्क, प्रिमियम चार्जेस, बांधकाम कामगार उपकर व सुरक्षा ठेव शुल्क यासाठी अपेक्षित रू. ६.९१ कोटी मात्रचे अंदाजे खर्चास मान्यता देणे (एकत्रित रू.४७.२५ कोटी).

पान ०९ वर...

- प्रस्तावित तिसरा मजला बांधकामासाठी माथूर ॲन्ड काप्रे असोसिएटस, नवी दिल्ली यांची पूर्वीचेच अटी-शर्तींवर तसेच प्रकल्पाच्या किंमतीचे ३.५ % इतक्या फी वर आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेस मान्यता देणे.
- मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी श्री. उत्तमराव शेळके यांनी दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.१२०/२०१९ संदर्भात दिलेला आदेश तसेच सिव्हिल ॲप्लिकेशन क्र.१३०२९/२०१९ संदर्भात दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल करून सदरहू प्रस्तावास मान्यता घेणे.
- सध्या बांधकाम चालू असलेल्या (G+2) इमारतीसाठी रू.११२.४०९ कोटी मात्र इतक्या अंदाजपत्रकीय रकमेस राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. आता तिस-या मजल्याचे प्रस्तावित बांधकामासाठी अपेक्षित रू.४७.२५ कोटी मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चासह (G+3) इमारतीसाठी एकूण रक्कम रू.१५७,४०,४८,९१४/- मात्रचे सुधारीत अंदाजपत्रकीय रकमेच्या प्रस्तावाबाबत व. राज्य शासनाने कळविलेल्या बाबींची पूर्तता करून पुनश्च परिपूर्ण प्रस्ताव राज्य शासनाचे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता देणे.
- प्रस्तावित तिस-या मजल्याचे वाढीव बांधकामासाठी मा.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी कळविल्याप्रमाणे ई-निविदा मागविणे अथवा विद्यमान (G+2) इमारतीचे बांधकाम ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचेकडून सध्या प्रगतीत असलेल्या (G+2) इमारत बांधकामासाठीचे निविदादराने तसेच करारातील अटी व शर्तीनुसार करून घेणे यापैकी योग्य त्या पर्यायावर निर्णय घेणे.

तरी उपरोक्त बाबींवर मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत चक्रीय पध्दतीने निर्णय होणेस विनंती.

25/3/24

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिसरा मजला बांधकामाचे उपरोक्त प्रस्तावितील नमूद बाबींना चक्रीय पध्दतीने मान्यता देणेत आली. प्रस्तावित तिस-या मजल्याचे वाढीव बांधकामासाठी ई निविदा मागविण्यात याव्यात/ सदर वाढीव बांधकाम ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचेकडून सध्या प्रगतीत असलेल्या (G+2)इमारत बांधकामासाठीचे निविदादराने तसेच करारातील अटी व शर्तीनुसार करुन घेण्यात यावे.

| | | | |
|---|---|---|---|
| (श्रीमती गीता बनकर) | (प्रभुदास पालवे) | (कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.) | (श्रीकांत एल. आपेकर) |
| सहा.धर्मादाय आयुक्त | अपर आयुक्त | मुख्य कार्यकारी अधिकारी | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर. |
| अहमदनगर, सदस्या | विभागिय आयुक्त कार्यालय, नाशिक, सदस्य | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | तथा अध्यक्ष, तदर्थ समिती. |

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय दि. 07/04/2021

विषय – श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकामासाठी एकूण रु.157.405 कोटी मात्रचे सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देणे तसेच सदर वाढीव बांधकामासाठी ई-निविदा मागविण्यात याव्यात अथवा सदर वाढीव बांधकाम ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचेकडून सध्या प्रगतीत असलेल्या (G+2) इमारत बांधकामासाठीचे निविदादराने तसेच करारातील अटी व शर्तीनुसार करुन घेणेयावर निर्णय होणेबाबत...

1) सदरचा विषय यापूर्वीच तदर्थ समितीसमक्ष आला होता व त्याबाबत दिनांक 28.08.2020 रोजी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला होता:-

*'' या विषयावर सदस्य सचिव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे मत मांडले की, सध्याच्या मंजूर दर्शन रांगेच्या इमारतीमध्ये एकंदर 10,800 भक्तांना सामावून घेण्याची/बसण्याची क्षमता आहे. सद्य स्थितीत संस्थानच्या प्रसादालयामध्ये सुमारे 50,000 साईभक्त दररोज प्रसाद घेत असतात. या गोष्टीचा विचार करता दिवसाला 60,000 भक्त शिर्डीला दर्शनासाठी येतात असे म्हणता येईल. म्हणून तिस-या मजल्याची आवश्यकता भविष्यात असल्याचे तत्कालीन समितीने म्हटलेले आहे. 28 दिवसांत निर्णयात बदल झाल्याबाबत येथे प्रश्न उपस्थित करता येणार नाही. भविष्यातील निकड लक्षात घेता तत्कालीन समितीने तिस-या मजल्याच्या बांधकामाचा निर्णय घेतलेला आहे. एकूण बांधकाम खर्चात 10-12 टक्के वाढ होण्याची शक्यता आहे त्यामुळे 10-12 टकके वाढीव खर्चाचा विचार केला तर पुढील बांधकाम थांबणार आहे. महामारीच्या पार्श्वभूमीवर विचार करता अशीच परिस्थिती कायम टिकून राहील असे नक्कीच नाही. नजिकच्या काळात या परिस्थितीत सुधारणा होवू शकते म्हणून तिस-या मजल्याच्या बांधकामाचे समर्थन करणेच योग्य राहील व त्यासाठी आग्रही भुमिका मांडली.*

370

*यावर चर्चा करीत असतांना असे निदर्शनास आले की, तिस-या मजल्याच्या आवश्यकतेबाबत व त्यासाठीच्या मंजुरी मिळविण्याचे बाबत सविस्तर असा अभ्यास करण्यात आलेला नाही. तिस-या मजल्याचा दि. 06.06.2019 रोजीचा निर्णय क्र.311 अन्वये ठेवलेला प्रस्ताव केवळ 28 दिवसांतच म्हणजे दि.4.07.2019 रोजी निर्णय क्र.345 अन्वये तत्कालीन समितीने बदललेला आहे व तिस-या मजल्याची आवश्यकता नसल्याचे मत व्यक्त केलेले आहे. आता तिस-या मजल्याचे बांधकामाची आवश्यकता असल्याचे दाखविण्यात आले आहे परंतु त्याला पुरक अशी स्थिती दिसत नाही. सद्याच्या कोव्हिड-19 च्या पार्श्वभूमीवर एकंदर विचार करता भविष्यात साईभक्तांची साधारण आवक किती असेल याबाबत कुठलाही अभिलेख समिती समोर सादर करण्यात आलेला नाही असे मत तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी व्यक्त केले त्यावर सदस्य श्री. स्वामी साहेब यांनी सहमती दर्शविली व त्यांचे असेही मत पडले की, रु.40.34 कोटी व त्यामध्ये होणारी वाढ याचा विचार करता सद्यस्थितीत असा अधिकचा आर्थिक भार संस्थानवर टाकणे संस्थानचे हिताचा दिसत नाही. दर्शन रांगेच्या जी+2 इमारतीस राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. तिस-या मजल्याची तात्रिक मंजुरी देण्यापूर्वी संस्थानने शासनास प्रथम प्रशासकीय मंजुरी दाखवावी असे म्हटलेले आहे.*

*सबब संस्थानने अभ्यासपूर्वक सर्वकष प्रस्ताव ठेवावा असा निर्णय 2x1 मताधिक्याने घेण्यात आला.''*

2) सदरचा प्रस्ताव पुन्हा काही बाबी नमूद करुन आणलेला आहे. मुळातच या विषयावर सखोल चर्चा होणे गरजेचे आहे व त्यासाठी हा विषय चक्रिय पध्दतीने घेणे केवळ अशक्य आहे.

3) संबंधीत विभागाचे श्री. संजय जोरी, उप अभियंता यांनी असे सांगितले की, सदरचे बांधकाम सदर विषयाच्या निर्णयावर अवलंबून आहे. मुळातच असे म्हणणे अयोग्य आहे, कारण जी बाब विचाराधीन आहे त्यासाठी पूर्वी झालेल्या बांधकामाचा निर्णय व बांधकामाची प्रगती थांबवणे संस्थानचे हिताचे नाही. अशा परिस्थितीत संस्थान प्रशासनाने

पूर्वीप्रमाणे बांधकाम सुरु ठेवावे व पूर्ण करावे. या विषयाचा बांधकाम पूर्णत्वाशी कुठलाही संबंध नाही. भविष्यात या विषयावर कुठलाही निर्णय झालातरी त्यावेळी झालेल्या बांधकामाबाबत निर्णय घेता येईल.

4) मांडलेला विषय मंजूर होणार आहे किंवा मंजूरच करावा अशा पध्दतीने विचार करुन बांधकाम थांबवणे सर्वथा अयोग्य आहे. हे भक्तांच्या व संस्थानच्या हिताचे नाही.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 07/04/2021

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि. १५.०४.२०२१

**विषय : श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिसऱ्या मजल्याचे बांधकामासाठी एकूण रु. १५७.४०५ कोटी मात्रचे सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देणे तसेच सदर वाढीव बांधकामासाठी ई-निविदा मागविण्यात याव्यात अथवा सदर वाढीव बांधकाम ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि. मुंबई यांचेकडून सध्या प्रगतीत असलेल्या (G +2) इमारत बांधकामासाठीचे निविदादराने तसेच करारातील अटी व शर्तीनुसार करुन घेणेयावर निर्णय होणेबाबत...**

सदरचा प्रस्ताव वाचला. तसेच प्रस्तावावर मा. अध्यक्ष तदर्थ समिती व इतर सन्माननीय सदस्य यांचा अभिप्राय वाचला. प्रस्तावावरुनल असे लक्षात येते की, सदरचा प्रस्ताव हा चक्रीय पध्दतीने घेण्यापेक्षा सखोल चर्चा करुन ठरविणे योग्य वाटते. सद्य परिस्थितीमध्ये बांधकाम थांबविणे संस्थान हिताचे वाटत नाही. त्यामुळे पूर्वीप्रमाणे बांधकाम सुरु ठेवणे व पूर्ण करणे आवश्यक वाटते. संबंधित विषयाचा व बांधकाम पूर्ण करण्याचा कुठेही संबंध नाही. त्यामुळे सदर प्रस्ताव मंजूर होणार आहे किंवा मंजूरच करावा यापेक्षा बांधकाम पूर्ण करणे योग्य आहे. त्यामुळे बांधकाम न थांबविता ते पूर्ण करावे.

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि. १५.०४.२०२१

विषय क्र. - 9 / ey

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय



बांधकाम विभाग

विषय – श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळ्यानिमित्त कोपरगाव- कोल्हार रस्ता (प्र. रा. मा. ०८) यावर तात्पुरत्या स्वरुपात उभारलेल्या स्वागत कमानीचे फायबर क्लॅडींगचे दुरुस्ती / नुतनीकरण करणेकामी येणारे रक्कम रु.८,८९,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत..

टिपणी-

श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्त ०१ ऑक्टोबर २०१७ ते १९ ऑक्टोबर २०१९ या कालावधीत संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव साजरा करणेत आला. या निमीत्त शिर्डी शहराचे उत्तर बाजूस कोपरगाव कोल्हार रस्ता प्रेरामा ०८ यावर कि.मी.९१/५०० या साखळी क्रमांकामध्ये कायमस्वरुपी स्वागत कमान उभारणे प्रस्तावीत होते.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाची सांगता मा. पंतप्रधान महोदय यांचे कार्यक्रमाने दि.१९/१०/२०१८ रोजी होणार होती. सदरहू कार्यक्रमास अत्यंत कमी कालावधी शिल्लक राहीलयाने कायमस्वरुपी आर.सी.सी. कमान उभारणे ऐवजी देणगीदार साईभक्ता मार्फत कोपरगाव-कोल्हार रस्ता (प्र.रा.मा.८) यावर शिर्डी शहराचे उत्तर बाजुस चारी क्र.११ व शासकीय विश्रामगृहाचे मधील जागेत (चेनेज ९१/५००) स्ट्रक्चरल स्टीलमध्ये फायबर क्लॅडींग वापरून सुशोभित स्वागत कमान उभारणेबाबत ठरले. त्यास कार्यकारी अभियंता, जा.बॅंक. प्रकल्प (सा.बां) विभाग, अहमदनगर यांनी दि.२१/०६/२०१८ रोजीच्या पत्राने ना-हरकत दाखला दिला होता. त्यामधे खालीलप्रमाणे अटी नमूद केल्या होत्या.

१. स्वागत कमानीची Structural Stability व Safety ची जबाबदारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची राहील.
२. भविष्यात सदर रस्त्याचे रुंदीकरण झाल्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी स्वखर्चाने कमानीचे रुंदीकरण करतील अथवा कमान काढुन घेतील.
३. स्वागत कमानीचे बांधकाम करतेवेळी रस्ता वाहतूकीस अडथळा होणार नाही तसेच अपघात होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची राहील.
४. स्वागत कमानीची देखभाल दुरूस्ती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत करण्यात येईल.

स्वागत कमान उभारणी करीता साईभक्त डॉ. सुमनजी, चेअरमन साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांनी दि.०४/०७/२०१८ रोजीचे पत्राने देणगीदाखल स्वागत कमान उभारणेबाबत इच्छा प्रगट केली होती. त्यानुसार त्यांना देणगीदाखल कमानीचे काम सुरु करणेसाठी दि.११/०७/२०१८ रोजीचे पत्राने कळविण्यात आले होते. साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांचेमार्फत सदरहू कमानीचे कामातील सिव्हील व फॅब्रीकेशनचे काम करणेसाठी अरिहंत इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांना रु.१० लक्ष + १८ % जीएसटी या दराने काम दिलेले होते. तसेच दरवर्षी रामनवमी उत्सवात भव्य देखावे उभारणारे श्री अमन विधाते व विलास महाडिक, व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेमार्फत स्वागत कमानीवर एफ.आर.पी. शिटमध्ये सजावट करणेचे काम करण्यात आले आहे.

तथापि साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांचेमार्फत झालेल्या कामाचे बिल अदा केले जात नसल्याने व शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमापुर्वी स्वागत कमान उभारणे आवश्यक असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६३१ अन्वये खालील प्रमाणे निर्णय पारीत झालेला आहे.

*"संस्थान मार्फत नगर – मनमाड हायवेवर देणगीदारामार्फत तात्पुरत्या स्वागत कमानी तयार करण्यांचे काम चालु आहे. सदर कमानी उभारणेकामी देणगीदाराने रक्कम न दिल्यास ती संस्थानमार्फत अदा करणेस मान्यता देण्यात आली."*

त्यानुसार ठेकेदार अरिहंत इंजिनिअरींग वर्क्स यांचेमार्फत स्वागत कमानीचे काम पूर्ण करुन घेण्यात आले. ठेकेदार यांनी त्यांचे दि.२४/१०/२०१८ रोजीचे पत्रान्वये साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांचेमार्फत बिल अदा करणेत येत नसल्यामुळे संस्थानमार्फत बिल अदा होणेबाबत विनंती केली होती. संस्थानमार्फत साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांना ठेकेदार यांचे उर्वरीत बिलाची रक्कम अदा करणेबाबत विनंती करणेत आली. तथापि साईधाम फाऊंडेशन यांनी सदरची रक्कम न दिल्यामुळे मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७१९ अन्वये ठेकेदार यांना देय रक्कम संस्थानमार्फत अदा करणेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार ठेकेदार अरिहंत इंजिनिअरींग वर्क्स यांना रक्कम रु.८,८०,०००/- मात्र रक्कम अदा करणेत आली.

पान क्र.०२ वर ...

Con Meeting - 39 - 2021

अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांचे दि.२१/०२/२०१९ रोजीचे पत्रान्वये तात्पुरत्या स्वरुपात उभारणेत आलेली स्वागत कमान काढुन घेणेबाबत कळविले होते. त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला असता, सदर प्रस्तावावर निर्णय क्रं.१९२ खालील प्रमाणे पारीत झालेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, शताब्दी सोहळ्यानिमित्त कोपरगाव कोल्हार रस्ता प्रामा ०८ वर तात्पुरत्या स्वरुपात उभारणेत आलेल्या स्वागत कमान बांधकामाचे तीन खाजगी सक्षम एजन्सी कडून Structural Stability ची तपासणी करुन प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व त्यानुसार स्वागत कमान आहे त्याच ठिकाणी राहू देणेबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविणेत यावा, असे ठरले."*

उपरोक्त निर्णयानुसार स्वागत कमान बांधकामाची तीन खाजगी सक्षम एजन्सी कडून Structural Stability ची तपासणी करुन घेणेसाठी १) श्री.आर. आर. कुलकर्णी, पूणे २) श्री. मधूकर डि. बाल्टे, अहमदनगर ३)श्री. मिलींद राठी, जळगाव या ०३ सल्लागारांना दि.२९/०६/२०१९ रोजीचे पत्राने कळविणेत आले होते. याबाबत तिनही एजन्सीने दिलेले अभिप्राय मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आले. सदरहू सभेतील निर्णय क्रं.४०८ अन्वये कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प, अहमदनगर यांची मान्यता घेऊन कमानीची दुरुस्ती करणेसाठी आवश्यक ती कार्यवाही करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

कमानीचे सदृढीकरणाचे काम करणेस मान्यता मिळणेकामी कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प, अहमदनगर यांचेकडे नकाशा सादर करणेत आला होता. त्यांचेकडील जा.क्र/रेषा/२१२८/२०१९ दि.२१/०९/२०१९ रोजीचे पत्राने, कमानीचे सदृढीकरणासाठी दिलेला नकाशा प्रमाणे कमानीचे सदृढीकरण करण्यात येऊन Structural Stability प्रमाणपत्र सादर करणेबाबत कळविले होते. त्यानुसार कमानीचे सदृढीकरण करणेसाठी मेकॅनिकल विभागामार्फत फॅब्रीकेशन कामाची दुरुस्ती करणेत आलेली असून बांधकाम विभागामार्फत सल्लागार श्री.बाल्टे यांनी दिलेल्या नकाशाप्रमाणे फाऊंडेशनचे सदृढीकरणाचे काम करणेत आले आहे. त्यानुसार कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प, अहमदनगर यांना सल्लागार श्री.बाल्टे यांनी दिलेले Structural Stability प्रमाणपत्र सादर करणेत आले आहे.

कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प, अहमदनगर यांचेकडील जा.क्र.रेषा/साईबाबा संस्थान / २०५१/सन-२०२०/ दि.०४/११/२०२० रोजीचे पत्राने खालील अटी-शर्तींच्या अधिन राहून स्वागत कमानीचे कामास ना-हरकत दाखला दिलेला आहे.

१) रस्त्यावरील कमानीकरीता शासनाने यापूर्वी वेळोवेळी निर्गमीत केलेल्या निर्णयांचे अनुपालन करण्याची जबाबदारी ही सर्वस्वी आपली राहील.

२) उक्त कमीनीचे प्रतीवर्षी Structural Stability Certificate प्रत्यक्ष पहाणीअंती आपल्यामार्फत सादर करणे आपले मार्फत सादर करणे बंधणकारक राहील.

३) उक्त कमानीमुळे रस्ता वाहतूकीस कोणत्याही प्रकारे अडथळा होणार नाही याबाबत आपण खबरदारी घ्यावी.

४) सदर कमानीमुळे कोणत्याही अपघात किंवा वादविवाद झाल्यास / उद्भवल्यास त्याबाबतची सर्व जबाबदारी (समाजिक, कायदेशीर, प्रशासकीय व इ.) ही सर्वस्वी आपलीच राहिल.

शताब्दी महोत्सवानिमीत्त संस्थान मार्फत तात्पुरत्या स्वरुपात उभारलेल्या उपरोक्त कमानीची फॅब्रीकेशन व सिव्हील विषयक कामे करुन सदृढीकरण करणेत आले आहे. तथापी कमान उभारुन अंदाजे ०२ वर्ष ०४ महीन्यांचा कालावधी झालेला आहे. कमानीचे बाहेरील बाजूस असलेले सजावटीचे फायबर क्लॅडींगचे काही भाग निघालेले आहेत. त्यामुळे कमानीचे फायबर क्लॅडींग कामाचे देखभाल दुरुस्ती / नुतनीकरण करणे गरजेचे आहे.

साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांचेमार्फत कमानीचे फायबर क्लॅडींगचे काम करणारे ठेकेदार पॉईंट ब्लॅक, मुंबई यांचे कडून कमानीचे फायबर क्लॅडींगचे दुरुस्तीचे कामासाठी अपेक्षित खर्चाचा तपशिल मागविलेला होता. त्यानुसार पॉईंट ब्लॅक, मुंबई यांनी दि.२२/०२/२०१९ रोजीचे ई-मेल व्दारे खालील प्रमाणे खर्च कळविला आहे.

| Sr. No. | Description | Qty | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Renovation of decorative FRP sheets of Welcome Gate on Kopargaon- Kolhar Road near Government Rest House, Shirdi. Including fiber patch work at structural steel and decorative FRP sheet for strengthening. Repairing or replacing of external damaged sheets and colouring in attractive sheds. Including all labour, material, loading and unloading of material, transportation, with necessary staging and scaffolding etc. complete. | 3,504 | Sqft | 215 | 7,53,360.00 |
| | | | | Total Amount Rs.: | 7,53,360.00 |
| | | | | Add GST 18% Extra Rs.: | 1,35,605.00 |
| | | | | Total Estimated Cost of Work Rs.: | 8,88,965.00 |
| | | | | Say R/o Rs.: | 8,89,000.00 |

प्रस्ताव – तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळ्यानिमित्त कोपरगाव- कोल्हार रस्ता (प्र. रा. मा. ०८) यावर तात्पुरत्या स्वरुपात उभारलेल्या स्वागत कमानीचे फायबर क्लॅडींग दुरुस्ती / नुतनीकरणाचे कामासाठी येणा-या अंदाजे रक्कम रु.८,८९,०००/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

(कान्हूराज बगाटे, भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

01/03/2021

चक्रीय पध्दतीने दि. 22/04/2021 रोजी आणलेल्या विषयावरील निर्णय

**विषय –** **श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळयानिमीत्त कोपरगांव-कोल्हार रस्ता (प्र.रा.मा.08) यावर तात्पुरत्या स्वरुपात उभारलेल्या स्वागत कमानीचे फायबर क्लॅडींगचे दुरुस्ती/नुतनीकरण करणेकामी येणारे रक्कम रु.8,89,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

विषय वाचला. प्रस्तावावरुन हे स्पष्ट होते की, सदर कमान देणगीदारामार्फत केलेली आहे व त्याच वेळी संस्थान कमानीची दुरुस्ती करेल किंवा कमान काढून घेईल असेही ठरलेले आहे. मुळातच कमानीचा उद्देश हा संपुष्टात आलेला आहे. सदर कमान ही तात्पुरत्या स्वरुपाची आहे. त्यासाठी शिर्डी नगरपरिषदेची परवानगी असल्याबाबत कुठेही अभिलेख नाही किंवा तसे नमूदही नाही. अशा सर्व परिस्थितीत सदर तात्पुरत्या कमानीच्या दुरुस्तीकरिता सुमारे नऊ लाख रुपये खर्च हा अनाठायी आहे, करिता माझेतर्फे प्रस्ताव नामंजूर.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 22/04/2021.

चक्रीय पद्धतीने 23/04/2024 रोजी आणलेल्या विषयावरील निर्णय

विषय : श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळ्यानिमित्त कोपरगाव - कोल्हार रस्ता (प्र.रा.मा.08) यावर तात्पुरत्या स्वरूपात उभारलेल्या स्वागत कमानीचे फायबर कॅलडींगचे दुरुस्ती / नुतनीकरण करणेकामी येणारे एककम रु 8,89,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत !

प्रस्ताव वाचला कमान ही देवगीदारामार्फत केल्याचे स्पष्ट होते तसेच त्याबाबत दुरुस्ती किंवा काढून घेणे हे ठरलेले आहे. कमानीचा उद्देश संपुष्टात आला असून आता शिर्डी नगरपरिषदेकडून परवानगीबाबत काहीही नमूद नाही त्यामुळे येणारा खर्च अंदाजे 9 लाख अनाकलनीय आहे सबब प्रस्ताव नामंजूर

23/04/2024

Accd
Acc @ member
Ad-hoc committee
S.S.T. Shirdi

विषय क्र.- ९ | ९६

378

## मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर चक्रिय पद्धतीने सादर
## बांधकाम विभाग

**विषय - श्री साईनाथ रुग्णालयामध्ये १२०० LPM क्षमतेचा Oxygen Generation Plant उभारणेकामी आवश्यक सिव्हील कामे करणेकामी येणारे रक्कम रुपये ३९,०२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणे तसेच तातडीची बाब म्हणन कमी (०३ दिवस) कालावधीमधे ठेकेदारांकडून कोटेशन मागविणेस, निम्नतम दर देणारे ठेकेदार कार्यादेश देणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेस विनंती.**

टिपणी-

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था , शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद** –अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना –** सध्या कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्याने रुग्णांची संख्या मोठया प्रमाणात वाढत असल्याने बरेचशे रुग्णांना ऑक्सीजनची गरज पडत आहे. त्यामुळे ऑक्सीजनचा पुरसा साठा बाहेरुन उपलब्ध होत नसल्यामुळे श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईनाथ रुग्णालयामध्ये Oxygen Generation Plant तातडीने उभा करणे गरजेचे आहे. करीता श्री साईनाथ रुग्णालयामध्ये १२०० LPM क्षमतेचा Oxygen Generation Plant उभारणेकामी खरेदी विभाग श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी सादर केलेल्या रु.१.६० कोटी + जीएसटी मात्रचे प्रस्तावास मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे.

सदरहू विषयाबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठाकडे खर्चाला मान्यतेसाठी सिव्हील ॲप्लिकेशन करणेत आले होते. याबाबत मा. उच्च न्यालयाने दि.२०/०४/२०२१ रोजी खालीलप्रमाणे आदेश केलेला आहे.

1. The present civil application is filed seeking permission to invite quotations for installing Oxygen Generation Plant for the hospitals run by the applicant through Shri Saibaba Sansthan, Shirdi.
2. We have heard the learned Counsel.
3. At present, the State and the Country are plagued by Covid-19 pandemic. Shortage of oxygen exists. The applicant has come-up with a request to permit it to install Oxygen Generation Plant. It is submitted that the Oxygen Generation Plant would be installed at Sainath Hospital. The applicant Trust, at present, is catering to Covid19 patients. It has about 450 beds. Oxygen is in short supply.
4. We can understand that installation of Oxygen Generation Plant is the need of the hour and the same is to be installed on priority basis immediately so as to overcome the shortage of oxygen need for the Covid-19 patients.
5. In view of the emergent situation and the acute shortage of oxygen faced throughout the State and further that the present applicant is also catering to the Covid-19 patients, we permit the applicant to deviate from the normal procedure of inviting tenders and instead invite quotations from suppliers for installation of Oxygen Generation Plant at Sainath Hospital and for that purpose spent amount approximately to the tune of Rs.1,60,00,000/-+GST.
6. The applicant shall while selecting the supplier for installing the Oxygen Generation Plant shall consider the experience of the said party and also the time period within which the Oxygen Generation Plant would be installed. The same shall be installed on priority basis and at war footing at the shortest possible time and make it operational. However the applicant for installation of Oxygen Generation Plant shall obtain requisite permissions if required from competent authorities and comply all other legal requirements.
7. In case after utilising the Oxygen generated from it for it's patients if the excess oxygen is capable of being supplied by the applicant then the same may also be supplied to the Government Hospitals catering to the Covid-19 patients for the present.

पान क्र.२ वर...

श्री साईबाबा संस्थान करीता रिलायंस ग्रुप मार्फत Oxygen Generation Plant देणगीदाखल उभारणेत येणार आहे. त्यासाठी आवश्यक सिव्हील काम संस्थानमार्फत करावे लागणार आहे. १२०० LPM क्षमतेचा Oxygen Generation Plant उभारणेकामी १८ मीटर लांब, ०८ मीटर रुंद व ०७ मीटर उंच शेडचे बांधकाम करणेसाठी सन २०२० -२०२१ चे राज्य दरसुची मधील दरांनुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

६. सध्याचे सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची मुदत दि.२८.०२.२०२१ अखेर संपुष्टात येत असल्याने, पुढील एक वर्ष(दि.०१.०३.२०२१ ते दि.२८.०२.२०२२) कालावधीसाठी संस्थानला सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नविन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकामी विविध वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणे, प्राप्त झालेल्या तांत्रीक निविदा उघडणे, तांत्रीक निविदेसोबत जोडलेल्या कागदपत्रांची तपासणी करणे, तदनंतर, वाणिज्यीक निविदा उघडून, तुलनात्मक तक्ता तयार करुन, मा.तदर्थ समिती सभेसमोर सादर करुन निर्णय होणे तसेच मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद, यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणे, यासाठी बराच कालावधी लागणार असल्याने सदरची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सध्या आहे तेच ठेकेदार मे.ईगल हंटर सोल्युशन लि.नवि दिल्ली व मे.मॉडर्न विर रेज सिक्युरिटी फोर्स, पुणे यांना आहे त्याच अटी शर्तींवर व सेवाशुल्कावर (१.००%) या दराने सुरक्षा कंत्राटी व माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेसाठी मुदतवाढ देणेस चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत दि.१६.०२.२०२१ रोजी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

तथापि, सदर प्रस्तावावर मा.अध्यक्ष महोदय यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

''प्रस्ताव वाचला. संबंधीत विभागाचे श्री कांदळकर यांच्याकडून विषय समजून घेतला. याच संबंधीत असलेला विषय 'माहे जानेवारी २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेण्यात आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी २०२१ व तदनंतरचे वेतन अदा करणेबाबतच्या' दि.२८.०१.२०२१ रोजीच्या प्रस्तावावर मा.उच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिकेची प्रत व त्यामध्ये संस्थान प्रशासनाने व शासनाने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत सदरहू विषयाच्या अनुषंगाने निर्णय घेण्याकरीता अवलोकनासाठी हजर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. जे अभिलेख या विषयासाठीही आवश्यक आहेत. तसेच दि.१६ जानेवारी २०२१ रोजीचे पत्राव्दारे कळविल्याप्रमाणे दि.२४.१२.२०२० रोजीच्या '२०२१२२ करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करण्यासाठी ई-निविदा मागविणेस चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत' या विषयावरील निर्णय अजूनही प्रलंबित आहे. करिता वरील दोन्ही विषय हे एकमेकांशी निगडीत असल्याने सर्व बाबींची स्पष्टता करुन प्रस्ताव ठेवावा.''

**उपरोक्त निर्देशांचे अवलोकन केले असता त्याबाबत स्पष्टीकरण-**

सोबत ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचेबाबत मा.उच्च न्यायालय येथे दाखल केलेले याचिका क्र. WP NO. 6224 / 2020 ची प्रत व त्यामध्ये संस्थान प्रशासनानें व शासनाने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत अवलोकनार्थ सादर करण्यात आलेली आहे.

पान नं.६ वर .. ...

413

विभागाचा अभिप्राय:-

सबब, सध्याचे सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची मुदत दि.२८.०२.२०२१ अखेर संपुष्टात येत असल्याने, पुढील एक वर्ष(दि.०१.०३.२०२१ ते दि.२८.०२.२०२२) कालावधीसाठी संस्थानला सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नविन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकामी विविध वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणे, प्राप्त झालेल्या तांत्रीक निविदा उघडणे, तांत्रीक निविदेसोबत जोडलेल्या कागदपत्रांची तपासणी करणे, तदनंतर, वाणिज्यीक निविदा उघडून, तुलनात्मक तक्ता तयार करुन, मा.तदर्थ समिती सभेसमोर सादर करुन निर्णय होणे तसेच मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद, यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणे, यासाठी बराच कालावधी लागणार असल्याने सदरची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सध्या आहे तेच ठेकेदार मे.ईगल हंटर सोल्युशन लि.नवि दिल्ली व मे.मॉडर्न विर रेज सिक्युरिटी फोर्स, पुणे यांना आहे त्याच अटी शर्तींवर व सेवाशुल्कावर (१.००%) या दराने सुरक्षा कंत्राटी व माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेसाठी मुदतवाढ देणेस मान्यतेस्तव सादर.

तरी उपरोक्तप्रमाणे सादर केलेल्या फेरप्रस्तावावर चक्रिय पध्दतीने निर्णय होणेस विनंती.

22/2/2021

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

उपरोक्त प्रस्तावास चक्रीय पध्दतीने मान्यता देणेत आली आहे.

मा. अध्यक्ष तदर्थ समिती श्री साईबाबा संस्थान यांनी नोंदविलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे. मा. उच्च न्यायालयाचे आदेशाधीन राहून

( श्रीमती गीता पी. बनकर )
सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्या, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती

मा. अध्यक्ष तदर्थ समिती यांचे अभिप्रायाशी सहमत आहे व तसेच माझेही अभिप्राय

(मा.श्री.भानुदास ह. पालवे)
अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
सदस्य, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती

22/2/2021

22/2/2021

( कान्हूराज बगाटे, भा.प्र.से. )
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
तथा सदस्य सचिव,मा.तदर्थ (Ad-hoc) समिती

( श्रीकांत आणेकर )
प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती

चक्रीय पध्दतीने आणलेले दोन विषय एकत्रित निर्णय 414

दि. 25/02/2021

विषय – सन 2021-22 करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टरर्सची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविणेकामी फेरप्रस्ताव सादर करणेस व निविदा पक्रिया पूर्ण होईपर्यंत आहे त्या कॉन्ट्रॅक्टर्स यांना मुदतवाढ देणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत...

आणि

विषय – माहे जानेवारी 2020 मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या 598 कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, 2021 व तदनंतरचे वेतन अदा करणेबाबत...

संदर्भ: 1)दि. 22/12/2020 रोजीचा सन 2021-22 करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टरर्सची नेमणूक करण्यासाठी ई-निविदा मागविणेस चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबतचा विषय व त्यावरील दि. 24/12/2020 चा आदेश.

2) दि. 16/02/2021 रोजीचा, सन 2021-22 करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टरर्सची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविणेकामी फेरप्रस्ताव सादर करणेस व निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आहे त्या कॉन्ट्रॅक्टर्स यांना मुदतवाढ देणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबतच्या विषयावरील निर्णय.

3) दि. 22/02/2021 रोजीचा खुलासेवार आणलेला विषय - सन 2021-22 करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टरर्सची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविणेकामी फेरप्रस्ताव सादर करणेस व निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आहे त्या कॉन्ट्रॅक्टर्स यांना मुदतवाढ देणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

4) संस्थान प्रशासनाचे पत्र क्र. एसएसएस/साप्रशा/आस्था/3696/2021, दि. 24 फेब्रुवारी, 2021.

1) निम्न स्वाक्षरीकार यांनी दि. 24/12/2020 रोजी संदर्भांकित क्र.1 विषयावर निर्णय दिल्यानंतर सदर बाब मा. उच्च न्यायालयाच्या आदेशास अधीन राहून मान्य असल्या बाबतचा आदेश तदर्थ समितीच्या सदस्या श्रीमती बनकर, सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी नोंदविलेला आहे. संस्थान प्रशासनाने आणलेला प्रस्ताव जसा आहे तसा तदर्थ समितीचे सदस्य सचिव यांनी मान्य केला. मात्र सदर प्रस्तावावर तत्कालीन प्रभारी अपर महसूल आयुक्त व तदर्थ समितीच्या तत्कालीन सदस्या श्रीमती गीता बावीस्कर यांचा निर्णय घेण्यात आलेला नाही. म्हणजेच तदर्थ समितीसमक्ष चक्रीय पध्दतीने आणलेल्या प्रस्तावावर अद्यापही निर्णय नाही. अशा परिस्थितीत संस्थान प्रशासनाने पुन्हा दिनांक 29/01/2021 रोजी फेरप्रस्ताव आणला, ज्यात मुद्दा क्र. 9 खालील प्रमाणे आहेः-

> *'9) उपरोक्त मुद्दा क्र. 1 ते 8 यांचे अवलोकन करुन, दि. 24/12/2020 रोजी मा. तदर्थ समितीसमोर चक्रिय पध्दतीने सादर केलेला प्रस्तावावर झालेला निर्णय निरस्त करुन नव्याने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता मिळावी.'*

2) वर नमूद केल्याप्रमाणे संस्थान प्रशासनाला दि. 24/12/2020 रोजी घेतलेला निर्णय निरस्त करावयाचा आहे मात्र वर नमूद केले प्रमाणे तदर्थ समितीच्या तत्कालीन सदस्या यांचा निर्णय नसल्याने एकतर तो निर्णय पूर्ण नाही किंवा असल्यास संख्याबळाप्रमाणे त्यावर निम्न स्वाक्षरीकार यानी दिलेल्या निर्णयानुसार मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे अधीन राहून मंजूर केला असल्याने व त्यास तदर्थ समितीच्या सदस्या श्रीमती बनकर यांनी दुजोरा दिल्याने संख्याबळाचे आधारे सदर विषय दि. 24/12/2020 रोजीच निर्णयीत झालेला आहे. ज्यामध्ये संस्थान प्रशासनाने मा. उच्च न्यायालयासमक्ष सिव्हील ॲप्लिकेशन करुन निर्णय घ्यावा.

3) संस्थान प्रशासनाने आता 22/02/2021 रोजी नवीन प्रस्ताव आणला आहे. सदर बांबीशी सलंग्न असलेला 598 कर्मचा-यांचा सहभाग सदर विषयात आहे. सदर विषयाचे अवलोकन केले असता, हे स्पष्ट होते की, संस्थान प्रशासनाला शासनाने मंजूर केलेल्या

आकृतीबंधा व्यतिरिक्त तदर्थ समितीकडून 334 पदे जादा वाढवून हवे आहेत. या बाबतीत टिपणीमध्ये 'ब' शिर्षाखाली खालील बाब लिहिलेली आहे:-

*'संरक्षण विभागासाठी कायम व कंत्राटी असे एकूण 629 कर्मचारी आकृतीबंध मंजूर आहे. मंजूर आकृतीबंधानुसार आज मितीस संस्थानमध्ये नवीन विभाग व तेथील सुरक्षेकामी सुरक्षा पॉईंट वाढल्याने, मंजूर आकृतीबंधा व्यतिरिक्त सध्या 334 पदे जादा आहेत. प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, अध्यक्ष, मा. तदर्थ (Ad-hoc) समिती यांचे दि. 24.12.2020 रोजीचेअभिप्रायानुसार मंजूर आकृतीबंधानुसार निविदा मागावयाची झाल्यास संरक्षण विभागास सुरक्षेकामी खालील अडचणी उदभवू शकतात.....'*

4) वरील तपशिलावरुन हे स्पष्ट होते की, तदर्थ समितीकडून जी गोष्ट मंजूर करुन हवी आहे ती मुळातच तदर्थ समितीच्या कक्षेबाहेरील आहे. संस्थान प्रशासनाने अशा वाढीव पदांची शासनाकडे मागणी न करता, मा. उच्च न्यायालयाने नेमून दिलेल्या तदर्थ समितीकडून मंजूर करुन घेणे, मला अयोग्य वाटते कारण आकृतीबंध मंजूर करण्याचे सर्वाधिकार हे शासनास आहेत. करिता आता आणलेला प्रस्ताव वरील कारणांसाठी व दि. 24/12/2020 रोजीच्या निम्न स्वाक्षरीकार यांनी दिलेल्या कारणांसाठी माझेतर्फे अमान्य करण्यात येत आहे.

5) आज संस्थान प्रशासनाने काही बाबी नमूद करुन 598 कर्मचा-यांना त्यांचे वेतन देण्याबाबत ब-याच बाबींचा उहापोह केलेला आहे. मुलतः सदर 598 कर्मचा-यांचे **status** स्पष्ट नसल्याने त्यांच्या बाबतीत 'वेतन' हा शब्दच अयोग्य आहे आणि म्हणूनच आजपर्यंत सदर कर्मचा-यांनी दिलेल्या सेवेबाबत त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे व असे अनुदान मा. उच्च न्यायालयाचे मंजूर केलेले आहे. अशा परिस्थितीत सरसकट वेतन हा शब्द न वापरुन त्यांना दरमहा केलेल्या कामाचा मेहनताना देणे व ही बाब वेळोवेळी ठरविणे, हेच योग्य आहे, कारण सर्व बाबी मा. उच्च न्यायालयासमक्ष न्यायप्रविष्ट आहेत. म्हणूनच संस्थान प्रशासन सुध्दा दि. 28/01/2021 च्या प्रस्तावामध्ये सदर 598 कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अदा करण्याबाबत मान्यता मागत आहे, जी देणेत येत आहे. करिता सदर 598 कर्मचा-यांना माहे जानेवारी 2021 व फेब्रुवारी 2021 मध्ये त्यांनी काम केलेले असल्यास त्यांनी केलेल्या कामाचा

मेहनताना मानवतेच्या दृष्टीकोनातून सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहून देण्यास माझी मान्यता आहे.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 25/02/2021

विषय क्र.- ९।१०५

**मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर**

**कामगार विभाग**



**विषयः- सन- २०२१ -२२ करीता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नविन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करण्यासाठी निवीदा मागविणेकामी फेरप्रस्ताव सादर करणेस व निविदाप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत आहे त्या कॉन्ट्रॅक्टर्स यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत...**

**टिपणी-**

उपरोक्त विषयाबाबत चक्रिय पध्दतीने विषय मा.तदर्थ समिती समोर सादर करणेत आला होता. त्याबाबत दि.२५.०२.२०२१ रोजी खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

१. निम्न स्वाक्षरीकार यांनी दि.२४.१२.२०२० रोजी संदर्भांकित क्र.१ विषयावर निर्णय दिल्यानंतर सदरबाब मा.उच्च न्यायालयाच्या आदेशास अधीन राहुन मान्य असल्याबाबतचा आदेश तदर्थ सिमतीच्या सदस्या श्रीमती बनकर, सहाय्यक धर्मदाय आयुक्त, अहमदनगर यांनी नोंदविलेला आहे. संस्थान प्रशासनाने आणलेला प्रस्ताव जसा आहे तसा तदर्थ समितीचे सदस्य सचिव यांनी मान्य केला. मात्र सदर प्रस्तावावर तत्कालीन प्रभारी अपर महसूल आयुक्त व तदर्थ समितीच्या तत्कालीन सदस्या श्रीमती गीता बावीस्कर यांचा निर्णय घेण्यात आलेला नाही. म्हणजेच तदर्थ समितीसमक्ष चक्रीय पध्दतीने आणलेल्या प्रस्तावावर अद्यापही निर्णय नाही. अशा परिस्थितीत संस्थान प्रशासनाने पुन्हा दि.२९.०१.२०२१ रोजी फेरप्रस्ताव आणला, ज्यात मुद्दा क्र.९ खालीलप्रमाणे आहे.

*(९) उपरोक्त मुद्दा क्र.१ते ८ यांचे अवलोकन करुन, दि.२४.१२.२०२० रोजी मा.तदर्थ समितीसमारे चक्रिय पध्दतीने सादर केलेला प्रस्तावावर झालेला निर्णय निरस्त करुन नव्याने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता मिळावी.*

२. वर नमूद केलेप्रमाणे संस्थान प्रशासनाला दि.२४.१२.२०२० रोजी घेतलेला निर्णय निरस्त करावयाचा आहे मात्र वर नमूद केलेप्रमाणे तदर्थ समितीच्या तत्कालीन सदस्या यांचा निर्णय नसल्याने एकतर तो निर्णय पूर्ण नाही किंवा असल्यास संख्याबळाप्रमाणे त्यावर निम्न स्वाक्षरीकार यांनी दिलेल्या निर्णयानुसार मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे अधीन राहून मंजूर केला असल्याने व त्यास तदर्थ समितीच्या सदस्या श्रीमती बनकर यांनी दुजोरा दिल्याने संख्याबळाचे आधारे सदर विषय दि.२४.१२.२०२० रोजीचे निर्णयीत झालेला आहे. ज्यामध्ये संस्थान प्रशासनाने मा.उच्च न्यायालयासमक्ष सिव्हील ॲप्लीकेशन करुन निर्णय घ्यावा.

३. संस्थान प्रशासनाने आता दि.२२.०२.२०२१ रोजी नवीन प्रस्ताव आणला आहे. सदर बाबीशी संलग्न असलेला ५९८ कर्मचा-यांचा सहभाग सदर विषयात आहे. सदर विषयाचे अवलोकन केले असता, हे स्पष्ट होते की, संस्थान प्रशासनाला शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधाव्यतिरिक्त तदर्थ समितीकडून ३३४ पदे जादा वाढवून हवे आहेत. याबाबतीत टिपणीमध्ये 'ब' शिर्षाखाली खालील बाब लिहीलेली आहेः-

*'संरक्षण विभागासाठी कायम व कंत्राटी असे एकूण ६२९ कर्मचारी आकृतीबध मंजूर आहे. मंजूर आकृतीबंधानुसार आज मितीस संस्थानमध्ये नवीन विभाग व तेथील सुरक्षेकामी सुरक्षा पॉईंट वाढल्याने, मंजूर आकृतीबंधाव्यतिरिक्त सध्या ३३४ पदे जादा आहेत. प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, अध्यक्ष, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती यांचे दि.२४.१२.२०२० रोजीचे अभिप्रायानुसार मंजूर आकृतीबंधानुसार निविदा मागावयाची झाल्यास संरक्षण विभागास सुरक्षेकामी खालील अडचणी उदभवू शकतात.'*

वरील तपशीलावरुन हे स्पष्ट होते की, तदर्थ समितीकडून जी गोष्ट मंजूर करुन हवी आहे, ती मुळातच तदर्थ समितीच्या कक्षेबाहेरील आहे. संस्थान प्रशासनाने अशा वाढीव पदांची शासनाकडे मागणी न करता, मा. उच्च न्यायालयाने नेमून दिलेल्या तदर्थ समितीकडून मंजूर करुन घेणे, मला अयोग्य वाटते कारण आकृतीबंध मंजूर करण्याचे सर्वाधिकार हे शासनास आहेत. करिता आता आणलेला प्रस्ताव वरील कारणांसाठी व दि.२४.१२.२०२० रोजीच्या निम्न स्वाक्षरीकार यांनी दिलेल्या कारणांसाठी माझेतर्फे अमान्य करण्यात येत आहे.

**फेरसादर-**

संस्थानच्या कामाचे स्वरुप विचारात घेवुन, तत्कालिन त्रिसदस्य समिती तसेच व्यवस्थापन समिती यांनी वेळोवेळी निर्णय घेवून, संस्थानमधील काही विभागांचे कामे बाह्ययंत्रणेव्दारे करण्याचा निर्णय घेतलेला आहे व त्यानुसार सर्व भक्तनिवासांचे हाऊसकिपींगची कामे, प्रसादालय, हॉस्पीटलचे हाऊसकिपींगचे काम बाह्ययंत्रणेव्दारे करणेत येत आहे.

त्याच धर्तीवर संस्थानला मनुष्यबळाची कमतरता पडू नये म्हणून व संस्थानवर कामगारांचे वेतन व भत्ते कायम कामगारांप्रमाणे दायित्व येवू नये म्हणून बाह्ययंत्रणेमार्फत **(Outsource)** मनुष्यबळ पुरविण्याचा निर्णय घेण्यात आलेले होते.

संस्थानचे विविध विभागांची सुरक्षा २४ तास कार्यरत ठेवण्यासाठी व देशभरातील भक्तांच्या सुरक्षेशी संबंधित संवेदनशील बाब असल्याने सुरक्षा कर्मचारी पुरविणेची बाब बाह्ययंत्रणेव्दारे देण्यात आलेले आहे.

**विभागाचा अभिप्रायः-**

१. संस्थानचे सध्याचे ठेकेदार मे.मॉडर्न विर रेज सिक्युरिटी फोर्स, पुणे व मे.ईगल हंटर सिक्युरिटी सर्व्हिसेस, नवी दिल्ली हे असून त्यांना १ मार्च २०२० ते दि.२८.०२.२०२१ असा बाह्ययंत्रणेव्दारे ६९४ सुरक्षा कामगार पुरविण्याचे काम देण्यात आलेले आहे.

२. मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३/ २२/ प्र.क्र.७०/ का.१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ चे शासन निर्णयानुसार संस्थान आस्थापनेवर ५९८ कंत्राटी कामगार कायम कंत्राटी म्हणून वर्ग झाले. त्यापैकी सुरक्षा विभागातील १४५ कामगार होते.

३. सदर १४५ कामगार कायम कंत्राटी म्हणून संस्थान आस्थापनेवर वर्ग झाल्याने ठेकेदाराकडून १४५ कामगार त्याच्या मुळ कार्यारंभ आदेशापेक्षा कमी म्हणजे ८३९ वजा १४५ = ६९४ कामगार पुरविण्यात येत असून, त्यानुसारच त्यात सेवादर व कामगारांचे वेतन अदा करण्यात येत आहे.

४. संस्थान आकृतीबंधात संरक्षण विभागासाठी कायम १९५ व कंत्राटी ४३४ असे ६२९ पदे मंजूर आहेत. मात्र ठेकेदाराकडून १४५ कामगार वजा जाता फक्त ६९४ कामगार सुरक्षा रक्षक म्हणून घेण्यात येत आहे.

५. मंजूर आकृतीबंधापेक्षा ३३४ कामगार जास्त दिसत असले (यामध्ये कायम कंत्राटी म्हणून वर्ग केलेल्या १४५ कामगारांचा तसेच कायम व बाह्यस्त्रोत्रामार्फत घेतलेले १८९ कामगारांचा समावेश आहे.) तरी संस्थानच्या सुरक्षारक्षक पुरविणे, त्यांची ड्युटी लावणे, पर्यवेक्षण करणे, हजेरी, शिस्त, शिक्षा, परीक्षण इत्यादि सर्व बाबी या बाह्यस्त्रोत ठेकेदारामार्फत होतात. तसेच सदर कामगारांचे वेतन, भत्ते ठेकेदारामार्फतच अदा करण्यात येतात. त्यामुळे बाह्ययंत्रणेमार्फत करण्यात येणा-या कामासाठीचे मनुष्यबळासाठी आकृतीबंधाच्या मंजूर पदसंख्येचा निकष लागू पडत नाही असे नम्र मत आहे.

६. संस्थानमध्ये सध्या बाह्यस्त्रोत ठेकेदारामार्फत ६९४ कामगार पुरविण्यात येत असून (यामध्ये कायम कंत्राटी १४५ कामगारांचा समावेश नाही.) त्यांची नियुक्ती खालील ठिकाणी करण्यात येते.

i)मंदीर सर्व महाव्दार चेकींग

ii)मंदीर व मंदीर परिसर

iii)श्री साईप्रसाद, श्री साई उद्यान, शांती निकेतन, पिंपळवाडी रोड, दर्शनरांग, १६ गुंठे परिसर, नविन प्रसादालय, शेती महामंडळ, हेलीपॅड, निमगांव हौसिंग.

iV)श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटल परिसर

V) व्दारावती भक्तनिवास, कनकुरी तळे, मध्यवर्ती भांडार, साईनगर परिसर

Vi) शैक्षणिक संकुल, वाहन विभाग, श्री साईबाबा भक्तनिवास, साईधर्मशाळा, श्री साईआश्रम भक्तनिवास व परिसर तसेच साईपालखी निवारा, शिर्डी बसस्थानक, मुंबई कार्यालय व परिसर.

७. मा.उच्च न्यायालयात ५९८ कायम कंत्राटी कामगारांसंदर्भातील न्याय निर्णयानुसार त्यातील १४५ सुरक्षा रक्षाकांसदर्भात मा.तदर्थ समिती समोर स्वतंत्र्य प्रस्ताव सादर करुन मान्यता घेता येईल.

८. भविष्याची तरतूद म्हणून ई-निविदेमध्ये पुरविणेत येणा-या कामगारांचे संख्येत वाढ किंवा घट करण्याचा संस्थानचा अधिकार राहील व त्यानुसार ठेकेदाराला कामगार पुरवावे लागतील. पुरविलेल्या कामगारांचे मासीक बिलानुसार सेवाआकार देण्यात येईल. अशी अट समाविष्ट करता येईल. व सदर अटीचा अंमल हा मा.तदर्थ समितीचे मान्यतेने करता येईल.

प्रस्ताव:-

अ) संस्थानकडे कायम व कंत्राटी म्हणून वर्ग केलेले १४५ सुरक्षा रक्षक वगळता उर्वरीत ६९४ सुरक्षा कामगार पुरविणेसाठी संध्याचे ठेकेदार यांना दि.०१.०३.२०२१ ते निविदा प्रक्रिया पूर्ण होवून नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत मुदतवाढ मिळावी.

ब) बाह्ययंत्रणेमार्फत ६९४ सुरक्षा रक्षक पुरविणेसाठी ई-निविदा मागविण्यास मान्यता असावी.

विभागाचे अभिप्रायातील उपरोक्त १ ते ८ मुद्यांचे अवलोकन होवून प्रस्तावातील 'अ' व 'ब' संदर्भात उचित निर्णयास्तव चक्रिय पध्दतीने मान्यता असावी.

1/3/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

---

उपरोक्त प्रस्तावास चक्रीय पध्दतीने मान्यता देणेत आली आहे.

दिनांक 14/1/2020 रोजीचे तदर्थ समितीचे बैठकीमध्ये एकूण 813 सुरक्षा कर्मचारी पुरविण्याची मंजुरी मिळाली होती त्यापैकी सदयास्थितीत एकूण कार्यरत 639 सदर 145 वजा जाता 694 सुरक्षा कर्मचारी मुदत 30 एप्रिल 2021 पर्यंत मुदतवाढ देण्यास सदस्य नाही. यादरम्यान 694 कंत्राटी पुरविण्यासाठी मा. उच्च न्यायालयाच्या परवानगीने ई-निविदा मागविणे आवश्यक राहील. प्रस्तुत प्रस्ताव मा. उच्च न्यायालयास सविस्तर सादर करणे.

( श्रीमती गीता पी. बनकर )
**सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर**
**सदस्या, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती**

(मा.श्री.भानुदास ह. पालवे)
**अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक**
**सदस्य, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती**

1/3/21

( कान्हूराज बगाटे, भा.प्र.से. )
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
**तथा सदस्य सचिव,मा.तदर्थ (Ad-hoc) समिती**

( श्रीकांत आणेकर )
**प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर**
**अध्यक्ष, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती**

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय
दि. 01/03/2021

420

विषय – **सन 2021-22 करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टरर्सची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविणेकामी फेरप्रस्ताव सादर करणेस व निविदा पक्रिया पूर्ण होईपर्यंत आहे त्या कॉन्ट्रॅक्टर्स यांना मुदतवाढ देणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत...**

1) दि. 24/12/2020 रोजी निम्न स्वाक्षरीदार यांनी सर्व बाबींचा उहापोह करुन सर्व बाबी मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून, पूर्वपरवानगीने निविदा मागविण्याची परवानगी दिली होती. मात्र त्यानंतर पुन्हा या बाबतीत फेर प्रस्ताव दि. 25/02/2021 रोजी ठेवण्यात आला. त्यावर निम्न स्वाक्षरीदार यांनी संस्थान प्रशासन आकृतीबंधा व्यतिरिक्त तदर्थ समितीकडून 334 पदे अशा पध्दतीने वाढवून मागत आहे म्हणून दि. 24/12/2020 चा निम्न स्वाक्षरीदार यांचा निर्णय कायम ठेवला. सदर विषयावर मताधिक्याने जो निर्णय होईल तो अंमलात आणणे संस्थान प्रशासनाकडून अपेक्षित आहे. मात्र तसे न करता, पुन्हा आज रोजी प्रस्ताव आणलेला आहे, ज्यामध्ये फक्त 145 सुरक्षा रक्षकांबाबत काही बाबी स्पष्ट केल्या. संस्थान प्रशासनाचे असेही म्हणणे आहे की, ठेकेदारा मार्फत देण्यात येणा-या कामासाठी आकृतीबंधाच्या मंजूर पद संख्येचा निकष लागू पडत नाही. संस्थानचे हे मत अनाकलनीय आहे. जर पदसंख्याच संस्थान प्रशासनाच्या अखत्यातरीत ठेवली तर शासनाच्या आकृतीबंध मंजूर करण्याला अर्थच उरणार नाही, त्यामुळे संस्थान प्रशासनाची ही भूमिका मान्य करता येत नाही.

2) या सर्व बाबींचा खुलासेवार उहापोह निम्न स्वाक्षरीदार तसेच तदर्थ समितीच्या सदस्या श्रीमती गीता बनकर, सहायक धर्मदाय आयुक्त, अहमदनगर यांनी चक्रिय पध्दतीने दि. 11/01/2021 रोजी आणलेला विषय- ***'598 संस्थान कंत्राटी कर्मचारी यांनी मा. उच्च न्यायालय येथे दाखल केलेली रीट पिटीशन क्र. 6224/2020 मधील दि. 06/01/2021 रोजीचे सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार कार्यवाही करणेबाबत...''***

या विषयावर खुलासेवारपणे परिच्छेद क्र. 3 ते 6 प्रमाणे नमूद केलेले आहे. सदर खुलासा या निर्णयाचा भाग समजण्यात यावा.

3) सद्य परिस्थितीत संस्थान प्रशासनाला जास्तीची 334 पदे हवी आहेत, जी आकृतीबंधात मंजूर नाहीत. तसेच सद्याचा प्रस्ताव सुध्दा पाहिला असता, 145 सुरक्षा रक्षक जरी वगळले तरी ती संख्या मूळ आकृतीबंधात मिळवली असता जास्तच होते. कारण संस्थान प्रशासन 145 सुरक्षा रक्षक यांना थेट संस्थान प्रशासनाच्या कंत्राटी पध्दतीने दिलेल्या नेमणुकामध्ये समाविष्ट करीत आहे.

4) वरील परिस्थितीत 334 जादा पदे वाढवून देता येणार नसल्याने सद्या दिलेल्या प्रस्तावातील 839 पदांपैकी 334 पदे वगळून इतर 505 पदांकरिता पुढील दोन महिन्यांसाठी म्हणजेच दिनांक 03 एप्रिल, 2021 पर्यंत मुदत वाढ देण्यास माझी हरकत नाही. या दरम्यान वरील 505 कामगार पुरवण्यासाठी मा. उच्च न्यायालयाच्या परवानगीने ई-निविदा मागविता येईल. त्यासाठी संस्थान प्रशासनाने मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करावे.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 01/03/2021

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि. ०३.०३.२०२१

422

विषय : सन २०२१-२२ करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन security Contractor ची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविणेकामी फेरप्रस्ताव सादर करणेस व निविदाप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आहे त्या Contractors याना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत..

दि. २४.१२.२०२० रोजी मा. अध्यक्ष, तदर्थ समिती, श्री साई बाबा संस्थान यांनी वर नमूद विषयाचे सविस्तर अभिप्राय नोंदविलेले आहे. तसेच सदस्य म्हणून निम्मस्वाक्षरीकार यांनी देखील त्यावरती मा. उच्च न्यायालय यांचे समक्ष सिव्हील अप्लीकेशनच्या आदेशास अधिन राहून मंजूर करण्यास हरकत नाही असे मत नोंदविलेले आहे. मात्र त्यानंतर पून्हा दि. २५.०२.२०२१ रोजी फेरप्रस्ताव पाठविण्यात आला. त्या अनुषंगाने प्रस्ताव व मा. अध्यक्ष यांचा अभिप्राय वाचला असता संस्थानने झालेला निर्णय अंमलात आणण्याऐवजी फेरप्रस्ताव पाठविला आहे. त्यामध्ये केवळ १४५ सुरक्षा रक्षकांबाबत काही मुददे स्पष्ट केले आहेत. संस्थान प्रशासनाचे म्हणणे नुसार ठेकेदारामार्फत देण्यात येणाऱ्या कामासाठी आकृतीबंधाच्या मंजूर पद संख्येचा निकष लागू पडत नाही. अश्या स्वरुपाच्या संस्थान प्रशासनाच्या मतानुसार पदसंख्या ठेवली तर मान्यताप्राप्त शासनाचे आकृतीबंध उपयोगाचे राहणार नाही. त्यामुळे संस्थानचे हे मत मान्य करता येणार नाही.

२. तसेच दि. २४.१२.२०२० रोजीच्या प्रस्तावावरील निर्णयाबाबत सांगावयाचे झाल्यास याबाबत "५९८ संस्थान कंत्राट कर्मचारी यांनी मा. उच्च न्यायालय येथे दाखल केलेली रीट पेटीशन क्र. ६२२४/२०२० मधील दि. ०६.०१.२०२१ रोजीच्या सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार कारवाई करणेबाबत " दि. ११.०२.२०२१ रोजी आणलेले विषय यावर सविस्तर नमुद केलेले आहे. याबाबत वेगळे नमूद करणे आवश्यक नाही.

३. ज्या अर्थी संस्थान प्रशासनाला जास्तीचे वाढीव ३३४ पदे हवी आहेत, जी आकृतीबंधामध्ये मंजूर नाहीत. तसेच सादर प्रस्तावामध्ये देखील १४५ सुरक्षा रक्षक जरी वगळले तरी होणारी संख्या सूध्दा मूळ आकृतीबंधातील संख्येपेक्षा जास्त होते. याचे कारण असे की, संस्थान प्रशासन हे १४५ सुरक्षा रक्षक यांना संस्थान प्रशासनाच्या कंत्राटी पध्दतीने दिलेल्या नेमणूकांमध्ये समाविष्ट करीत आहेत. वरिल परिस्थितीत ३३४ जादा पदे वाढवून देता येणार नसल्याने सदर प्रस्तावातील ८३९ पैकी ३३४ पदे वगळून इतर ५०५ पदांकरिता पुढील दोन महिन्यांकरिता म्हणजेच दि. ०३.०४.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यास हरकत नाही. दरम्यान ५०५ कामगार पुरविण्यासाठी मा. उच्च न्यायालय यांच्या परवानगीने निवीदा मागविता येईल तसेच सिव्हील अप्लीकेशन दाखल करणे उचित होईल.

03/03/2021

(गीता प्र. बनकर)

सहायक धर्मादाय आयुक्त तथा

सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,

श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि. ०३.०३.२०२१

विषय क्र.-9/१०८

# मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर



## (कामगार विभाग)

---

**विषय:- संस्थानचे कंत्राटी कर्मचा-यांची बंद केलेली ४०% वेतनवाढ पुर्ववत सुरु करणेबाबतचे प्रस्तावास चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत...**

**टिपणी -**

उपरोक्त विषयांकित श्री साईबाबा संस्थान असंघटीत कर्मचारी संघटना, शिर्डी यांचे पत्र इकडिल कार्यालयास प्राप्त झाले असून, त्यात त्यांनी, श्री साईबाबा संस्थानमध्ये जवळपास २७५० कंत्राटी कर्मचारी गेली १२ ते १५ वर्षापासून कार्यरत आहेत. त्यामध्ये डॉक्टर, परिचारीका, वार्डबॉय, वाहन चालक, शिक्षक, स्वच्छता कर्मचारी, लिपीक, तारतंत्री, सॉफ्टवेअर इंजिनियर इत्यादींचा समावेश आहे. हे सर्व कर्मचारी संस्थानचे कायम कर्मचा-यांप्रमाणेच शैक्षणिक पात्रता धारक व उच्च शिक्षित आहेत. मात्र, या सर्वांना कायम कर्मचा-यांचे तुलनेत अतिशय तुटपुंजे वा कमी वेतन दिले जात आहे. संस्थानने शासनाचे समान काम समान वेतनाचे परिपत्रकाची व कामगार कायदा १९७० मधील कलम २५(IV) ची अद्याप अंमलबजावणी केलेली नाही. या परिपत्रकाचे अंमलबजावणीच्या सुचना मा.सहाय्यक कामगार आयुक्त, अ.नगर, यांनी दिलेल्या आहेत. तदनंतर संस्थानचे तत्कालीन व्यवस्थापन मंडळाने दि.२५.०२.२०१७ रोजीचे सभेमध्ये समान काम समान वेतनाचे तत्वावर अंतरिम वाढ म्हणून ४०% वेतनवाढ देण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार कर्मचा-यांना वेतन मिळत होते, मात्र माहे मार्च २०२० पासून संस्थानने अचानक ही ४०% वेतनवाढ बंद केलेली आहे. सदरची ४०% वेतनवाढ ही समानकाम समान वेतनाचे तत्वानुसार अंतरिम वाढ म्हणून देण्यात आलेली होती, ती अचानक बंद करता येणार नाही. मात्र, तरीही संस्थान प्रशासनाने ४०% वेतनवाढ (फरकासह) पुर्ववत सुरु करण्याच्या सुचना / आदेश संस्थान प्रशासनास द्यावेत, ही नम्र विनंतीबाबत असे नमूद केलेले आहे. सदर पत्रावर श्री हसन मुश्रीफ, पालकमंत्री, अहमदनगर, मंत्री, ग्रामविकास, महाराष्ट्र शासन, यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान शिर्डी तपासून उचीत कार्यवाही करावीबाबत निर्देशित केलेले आहे.

तसेच, जा.क्र.स्वी.स/३८ सन २०२०, जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांचे दि.२१.१२.२०२० रोजीचे पत्र प्राप्त झाले असून, त्यात श्री महेंद्र लक्ष्मण कोते, अध्यक्ष, साईबाबा संस्थान असंघटीत कर्मचारी संघटना, शिर्डी यांचे दि.२७.११.२०२० चे पत्र विषय कंत्राटी कर्मचा-यांची बंद केलेली ४०% वेतनवाढ पुर्ववत सुरु करणेबाबत नमूद केलेले असून, पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी इकडिल कार्यालयाकडे पाठविणेत आलेले आहे.

**प्रस्तावना:-**

श्री साईबाबा संस्थान असंघटीत कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी समानकाम समानवेतन मिळणेबाबत वेळोवेळी संस्थानकडे मागणी केल्याने -

त्यावर, मा.व्यवसथापन समिती सभा दि.२५.०२.२०१७, निर्णय क्र.१४१- अन्वये संस्थानमध्ये कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायद्यानुसार कामबंद आंदोलन करता येत नाही, त्यांच्या मागण्या त्यांनी संबंधीत कंत्राटदारास कळवायला हव्या आहेत. यापुर्वी कंत्राटी कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत कायम करणे, समान काम समान वेतन देणे, त्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा देणे या बाबतचे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेत आलेले असून त्याचाही पाठपुरावा चालू आहे. संस्थानचा प्रशासनावरील खर्च सुमारे ४५% पर्यंत होत आहे व कंत्राटी कामगारांना सध्या देत असलेल्या वेतनाव्यतिरिक्त प्रती व्यक्ती जवळपास २८% (सेवाकर १५% व पी.एफ.१३.३६%) रक्कम संस्थानला अदा करावी लागत आहे.

सदरहू कंत्राटी कर्मचारी शासनाचे किमान वेतनदरावर सुमारे १५ ते १६ वर्षापासुन कंत्राटदारामार्फत संस्थानमध्ये काम करत आहेत व वयोमर्यादा ओलांडल्यामुळे त्यांनी इतरत्र सेवेची संधी गमावलेली आहे. या सर्व बाबींचा विचार करता सहानुभूतीच्या दृष्टीने संस्थानमध्ये आजअखेर कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना दि.०१ एप्रिल, २०१७ पासून त्यांच्या प्रती दिन वेतनावर ४०% वाढ देण्यात यावी, तसेच संबंधीत कंत्राटदारामार्फत सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचा रु.१० लाख पर्यंतचा अपघात विमा उतरविणेत यावा, असा धोरणात्मक निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

पान नं. ०२ वर ...

कामगार कायद्यानुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना फक्त किमान वेतन देणे बंधनकारक आहे. महागाई निर्देशांकानुसार त्यामध्ये वेळोवेळी शासनाकडून जी वाढ मंजूर करणेत येते, ती कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येते. किमान वेतन निश्चित करताना शासनाकडून चालू महागाई व इतर अनुषंगिक घटक यांचा विचार करुन किमान वेतन निश्चित केले जाते. त्यामुळे किमान वेतनापेक्षा जास्त वेतनवाढ देणे बंधनकारक नाही. मात्र सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून विशेष बाब म्हणून वरीलप्रमाणे ४०% वेतनवाढ.भविष्यात कोणतीही वेतनवाढ न मागण्याच्या अटीवर मंजुर करणेत आली. परंतु सदरहू वेतनवाढ देणेपुर्वी कंत्राटदारामार्फत या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संघटनेकडून संस्थान विरोधात यापुढे आंदोलन करणार नाही, असे हमीपत्र लिहून घेण्यात यावे. असा, पारीत झालेने, माहे एप्रिल – २०१७ पासून ४०% वेतनवाढ देण्यात येत होती.

तथापि, कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी दि.१७.०३.२०२० पासून लॉकडाऊन लागू केलेला असल्याने, श्री साईबाबा मंदिर बंद करण्यात आलेले आहे. सबब, सर्व विभागातील कर्मचा-यांची कार्यालयातील व कार्यस्थळावरील उपस्थितीवर निर्बंध आणणेत आलेले असल्याने, उपरोक्त संदर्भ क्र.०२ चे आदेशान्वये, कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कुशल, अकुशल व सुरक्षा कर्मचारी यांना माहे एप्रिल २०२० चे अदा करावयाचे वेतनाबाबत तूर्त किमान वेतन कायद्यानुसार आणि किमान वेतन दरानुसार देय्य होणारे वेतन अदा करणेबाबत कार्यवाही करावी. कंत्राटी कर्मचा-यांना या कालावधीतील अदा करावयाचे ४०% वाढीव वेतनाबाबत मा.तदर्थ समितीचे निर्णयानुसार / मान्यतेने अलहिदा स्वतंत्र आदेश पारित करण्यात येईल, असा आदेश पारित करणेत आलेने, तूर्तास माहे एप्रिल २०२० पासून कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येत असलेले ४०% वेतन बंद करण्यात आलेले आहे.

तथापि, रुग्णालये विभागाने दि.१० सप्टेबर २०२० रोजीचे कार्यालयीन टिपणी अन्वये कोव्हिड – १९ या संसर्गजन्य बाधीत रुग्णांवर उपचार करताना, ज्या कंत्राटी कर्मचा-यांपैकी ज्यांचा रुग्णांशी थेट संबंध येतो, अशा एकूण ४६६ (श्री साईबाबा हॉस्पीटल - ३०९ व श्री साईनाथ रुग्णालय – १५७) या कंत्राटी कर्मचा-यांना जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/१४५६/२०२०, दि.०९.११.२०२० रोजीचा आदेशान्वये पुर्वीप्रमाणे ४०% वेतनवाढ देण्यात येत आहे.

सध्या, रुग्णालये विभागाकडे खालीलप्रमाणे कंत्राटी पॅरामेडीकल वर्गवारीनुसार कर्मचारी काम करत आहेत. त्यामध्ये १.कंत्राटी परिचारक व परिचारीका, २.फिजीओथेरपिस्ट- टेक्नीशियन, ३.डायलेसिस टेक्नीशियन, ४.एम.आर.आय.टेक्नीशियन, ५.फार्मासिस्ट, ६.लॅब टेक्नीशियन, ७.बायोमेडीकल टेक्नीशियन, ८.ई.डी.पी.टेक्नीशिकयन, ९.ई.सी.जी.टेक्नीशियन, १०.एक्स-रे टेक्नीशियन, ११.बी.ए.एम.एस. इत्यादि सर्व कंत्राटी पध्दतीने काम करत आहेत.

सदर कर्मचा-यांमधील बी.ए.एम.एस. डॉक्टर्स वगळता सर्व पॅरामेडीकल कर्मचा-यांना पुर्वीप्रमाणे ४०% वेतनवाढ देण्यात येत आहे. तथापि, सदर कर्मचारी ४० टक्के पगाराव्यतिरिक्त जादा वेतनवाढ मिळावीबाबत वारंवार मागणी करत असतात.

कंत्राटी कामगार कायद्यानुसार कंत्राटी कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे, कामगार भविष्यनिर्वाह निधी, कामगार कल्याण निधी, वार्षिक पगारवाढ (इंन्क्रीमेंट), ग्रुप इन्शुरन्स, वर्कमॅन कॉम्पेनसेशन, व्यवसाय कर, आयकर, उपदान (ग्रॅच्युटी), ई.एस.आय.सी. (कॉन्ट्रीब्युशन), टी.डी.एस., घरभाडे, बोनस, सानुग्रह, पगारी रजा / सुट्टया इ. कायदेशीर देणे बंधनकारक आहे.

**सध्या कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येत असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे:-**

१. अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचा-यांना उदयोग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचेकडील, दि.२४ जुलै २०१९ रोजीचे मुळ किमान वेतन दराबाबत अधिसुचनेस अनुसरून किमान वेतन अधिनियम, १९४८, अंतर्गत शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट झोन नं.०३ या अधिसुचनेस उदयोगातील किमान वेतन दरास अनुसरून मुळवेतन व मा.कामगार आयुक्त, मुंबई, यांचेकडील वेळोवेळी स्पेशल अलौन्स दरामध्ये होणारी वाढ देणेत येवून कंत्राटदारामार्फत काम करीत असलेले सर्व कंत्राटी अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचा-यांना नियमानुसार सुधारीत किमान वेतनदराप्रमाणे वेतन देणेत येत आहे.

२. सदर कंत्राटी कर्मचा-यांना मोफत वैद्यकिय सेवा व नियमावलीस मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९.११.२०११ निर्णय क्र.७६५(२३) अन्वये मान्यता मिळालेली असुन, सदर नियमावली दि.०१.०१.२०१२ पासुन लागु करण्यात आलेली आहे सदर वैद्यकिय उपचारासाठी वार्षिक मर्यादा व सेवेचा कालावधी खालीलप्रमाणे:-
   ०१ ते ०५ वर्षे पर्यंत सेवा झालेले कंत्राटी कर्मचारी बिलमर्यादा रक्कम रू.३०,०००/- पर्यंत
   ०५ ते १० वर्षे पर्यंत सेवा झालेले कंत्राटी कर्मचारी बिलमर्यादा रक्कम रू.४०,०००/- पर्यंत
   १० वर्षे व त्यापेक्षा अधिक सेवा झालेले कंत्राटी कर्मचारी बिलमर्यादा रक्कम रू.५०,०००/- पर्यंत

३. संस्थानकडे ठेकेदारामार्फत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना एकुण हजर दिवसावर ८.३३% प्रमाणे दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे.

**पान नं. ०३ वर ...**

४. संस्थानकडे ठेकेदारामार्फत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांना मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०.११.२०१६ निर्णय क्र.८१० नुसार तसेच शासन आदेश क्र.सासंवि १०१६/७७७/प्र.क्र.१०४/का.१६ दि.१५.०४.२०१७ अन्वये शैक्षणिक फि परतावा देण्यात येत आहे.

५. संस्थानकडे ठेकेदारामार्फत असलेल्या कुशल, अकुशल कंत्राटी कर्मचा-यांना संबंधित ठेकेदारामार्फत दोन गणवेश, ओळखपत्र देण्यात येते. तसेच सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांना गणवेश, बुट, टोपी, शिटी व काठी देण्यात येते.

६. संस्थानकडे ठेकेदारामार्फत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांस नुकसान भरपाई अधिनियमन १९२३(वर्कमन कॉम्पेनसेशन ॲक्ट,१९२३ नुसार कंत्राटी कर्मचा-यांचा रु.१० लाख पर्यंतचा विमा उतरविण्यात येतो.

७. जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२९६४/२०१८, दि.२९.१२.२०१८ अन्वये दि.०१.१२.२०१८ पासून कंत्राटी कर्मचा-यांना पगारी आठवडा सुट्टी (Paid Weekly Off) लागू करण्यात आलेल्या आहेत.

कोव्हीड -19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संस्थान व्यवस्थापन व मा.तदर्थ समितीचे मान्यतेने व निर्देशानुसार विविध उपाययोजना करण्यात आलेल्या होत्या, त्यात दि.१७ मार्च, २०२० पासून श्रींचे मंदिर दर्शनकरीता बंद ठेवण्यात आलेले होते. पर्यायाने शिर्डीत भक्तांचे येण्याचे प्रमाण बंद झाल्याने संस्थानचे सेवा देणारे विभाग बंद करण्यात आलेले होते. त्यामुळे कर्मचा-यांना कामावर न बोलवता कामावर गृहित धरुन देय्य असलेल्या वेतनाच्या COVID-P नुसार त्यांना ५०% पगार अदा करण्यात येत होते. तसेच, दि.०५ मे २०२० रोजीच्या आदेशान्वये कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येत असलेली ४०% वेतनवाढ बंद करण्यात आलेली आहे.

रुग्णालये विभाग यांचेकडील कोव्हीड – 19 या संसर्गजन्य रोगावरील उपचाराकामी कार्यरत असणारे ४६६ कंत्राटी कर्मचारी यांना दि.०१ सप्टेबर २०२० पासून ४०% वेतनवाढ लागू करणेत आलेली आहे.

आता दि.१६ नोव्हेंबर, २०२० पासून श्रींचे मंदिर दर्शनासाठी उघडण्यात आलेले असून, दैनंदिन १५,००० साईभक्तांना दर्शनाचा लाभ देण्यात येत आहे. पर्यायाने सेवा देणारे विभाग साई भक्तांसाठी चालू करण्यात आलेले आहे.

अ) श्री साईबाबा संस्थान असंघटीत कर्मचारी संघटना, शिर्डी यांचे दि.०३.१२.२०२० रोजीचे ४०% वेतनवाढ चालू करणेबाबतचे पत्रावर श्री हसन मुश्रीफ, पालकमंत्री, अहमदनगर, मंत्री, ग्रामविकास, महाराष्ट्र शासन, यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान शिर्डी तपासून उचीत कार्यवाही करावीबाबत केलेले निर्देश.

ब) मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी यांचेकार्यालयाकडील श्री साईबाबा संस्थान असंघटीत कर्मचारी संघटना यांनी मागणी केल्याप्रमाणे ४०% वेतनवाढ पुर्ववत सुरु करणेबाबतचे पत्रावर पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी इकडिल कार्यालयास प्राप्त झालेले पत्र.

श्री साईबाबा संस्थान असंघटीत कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी बंद केलेली ४०% वेतनवाढ पुर्ववत सुरु करणेबाबत केलेली मागणी व उपरोक्त अ व ब मधील नमूदप्रमाणे प्राप्त झालेले निर्देश यांचा विचार करता, उर्वरित पुर्वी ज्या कंत्राटी कर्मचा-यांना ४०% वाढ देण्यात येत होती, त्या कंत्राटी कर्मचा-यांना दि.१६.११.२०२० पासून पुर्वीप्रमाणे ४०% वेतनवाढ देणेबाबत दि.१६.०२.२०२१ रोजी मा.तदर्थ समिती सभेसमोर चक्रिय पध्दतीने प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी यांनी ''प्रस्ताव वाचला. संबंधीत विभागाचे श्री कांदळकर यांच्याकडून विषय समजून घेतला. श्रींचे मंदीर दि.१६ नोव्हेंबर, २०२० पासून सुरु झाले म्हणून दि.१६ नोव्हेंबर, २०२० पासून सरसकट ४०% वेतनवाढ चालू करावी, हे सकृतदर्शनी अयोग्य आहे. श्री. कांदळकर यांनी मान्य केले की, आजपर्यंत लाडू विभाग सुरु झालेला नाही. तसेच प्रसादालय सुध्दा पूर्ण क्षमतेने सुरु नव्हते. अशा परिस्थितीत ज्या कर्मचा-यांनी सेवा दिलेली नाही किंवा अजूनही देत नाहीत, अशा कर्मचा-यांना सरसकट ४०% वेतनवाढ देणे अयोग्य वाटते. मुळातच प्रस्ताव सादर करतांना अशा पध्दतीने अभ्यासही केलेला नाही. अशा परिस्थितीत योग्य अभ्यास करुन प्रस्ताव आणावा.'' असे निर्देश दिलेले आहेत.

तसेच, मा.अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक, सदस्य, मा.तदर्थ समिती, यांनी सदर प्रस्तावावर ''मा.अध्यक्ष तदर्थ समितीचे अभिप्रायाशी सहमत आहे. त्यामुळे योग्य अभ्यास करुन नव्याने प्रस्ताव द्यावा.'' असे निर्देश दिलेले आहेत.

पान नं. ०४ वर ....

**उपरोक्त निर्देशांचे अवलोकन केले असता त्याबाबत स्पष्टीकरण व फेरप्रस्ताव-**

**१) लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग:-**

लाडू व बर्फी प्रसाद बनविण्याचे काम आऊटसोर्स ठेकेदार यांना उक्त्या पध्दतीने देण्यात आलेले असून, सदरचे आऊटसोर्स कर्मचारी यांना ४०% वेतनवाढ देण्यात येत नाही. सदरचे आऊटसोर्स कर्मचारी वगळता, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे पुर्वीपासून ४०% वेतनवाढ देण्यात येणारे फक्त ३० कंत्राटी कर्मचारी असून सदर कर्मचारी लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग यांचे दि.१८.११.२०२० रोजीची टिपणी इकडिल कार्यालयास प्राप्त झाली होती, सदर टिपणीत त्यांनी लाडू व बर्फी प्रसाद विभागाकडे कार्यरत असलेले ३० कंत्राटी कर्मचारी इतर विभागाकडे वर्ग करणेबाबत कळविलेले होते.

त्यावर, श्री साईबाबा हॉस्पीटल विभाग व श्री साईनाथ रुग्णालये विभाग यांचे दि.२१.११.२०२० रोजीचे पत्र इकडिल कार्यालयास प्राप्त झाले होते. श्री साई धर्मशाळा येथे स्वतंत्र कोव्हीड रुग्णालय चालू झालेले असल्याने सदर ठिकाणी रुग्णालये विभागाकडील स्टाफ यांची ०७ दिवस नेमणूक करण्यात येते. तसेच ०७ दिवस संपलेनंतर सदर कर्मचा-यांना ०७ दिवस होम क्वारंटाईन केले जाते. त्यामुळे रुग्णालय विभागाकडे स्टाफ कमी पडत असल्यामुळे सदर पत्रात श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी १५ कंत्राटी कर्मचारी व श्री साईनाथ रुग्णालये १५ कंत्राटी कर्मचारी मिळणेकामी मागणी केलेली होती.

श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालये यांचे मागणीप्रमाणे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील ३० कंत्राटी कर्मचारी श्री साईबाबा हॉस्पीटल विभागाकडे १५ कंत्राटी कर्मचारी व श्री साईनाथ रुग्णालये विभागाकडे १५ कंत्राटी कर्मचारी याप्रमाणे कामगार विभागाचे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१५३०/२०२०, दि.२३.११.२०२० रोजीचे पत्रान्वये वर्ग करणेत आलेले आहेत.

लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील ३० कंत्राटी कर्मचारी दि.२३.११.२०२० पासून आजपावेतो श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालये विभागाकडे कार्यरत असून, रुग्णालये विभागाकडील इतर कंत्राटी कर्मचा-यांप्रमाणेच सदर कर्मचा-यांचे कामाचे स्वरुप आहे. तसेच ज्या कर्मचा-यांनी दि.१६.११.२०२० (मंदीर सुरु झालेपासून) ते दि.२३.११.२०२० अखेर सेवा दिलेली नाही, अशा कर्मचा-यांची त्या कालावधीत गैरहजेरी लावण्यात आलेली आहे. त्यामुळे ज्या कर्मचा-यांनी दि.१६.११.२०२० पासून सेवा दिलेली नाही त्या कर्मचा-यांना सदर कालावधीतील ४०% वेतनही अदा होणार नाही.

**२) श्री साईप्रसादालय विभाग:-**

कामगार विभागाचे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२८६७,२०२०, दि.१९.०३.२०२० रोजीचे आदेशान्वये श्री साईप्रसादालय विभागाकडील १६५ कंत्राटी कर्मचारी श्री साईबाबा हॉस्पीटल-६५, श्री साईनाथ रुग्णालय – ६०, मेकॅनिकल विभाग – १० व बगीचा विभाग-३० कर्मचारी अशा प्रकारे वर्ग करणेत आलेले होते.

त्यावर श्री साईनाथ रुग्णालये विभागाकडे वर्ग करणेत आलेल्या ६० कंत्राटी कर्मचा-यांपैकी २० कंत्राटी कर्मचारी श्री साईनाथ रुग्णालये विभाग यांचे दि.१६.०७.२०२० रोजीचे पत्रान्वये पुर्ववत श्री साईप्रसादालय विभागाकडे वर्ग करणेत आलेले होते.

तसेच, मॅकेनिकल विभाग यांनी त्यांचेकडे वर्ग करण्यात आलेले १० कंत्राटी कर्मचारी दि.०१.०९.२०२० रोजीचे पत्रान्वये पुर्ववत श्री साईप्रसादालय विभागाकडे वर्ग होणेबाबत कळविले होते. त्यावर कामगार विभागाचे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१०९८/२०२०, दि.१४.०९.२०२० रोजीचे आदेशान्वये सदरचे १० कर्मचारी पुर्ववत श्री साईप्रसादालयाकडे वर्ग करण्यात आलेले असून, आजपावेतो सदरचे १० कर्मचारी श्री साईप्रसादालय विभागाकडे कार्यरत आहेत.

तसेच, श्री साईप्रसादालय विभागाकडील इतर विभागाकडे वर्ग करणेत आलेले उर्वरित कंत्राटी कर्मचारी (जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१५४८/२०२० अन्वये) पुर्ववत दि.१६.११.२०२० पासून श्री साईप्रसादालय विभागाकडे कार्यरत आहेत.

श्री साईप्रसादालय विभाग यांचेकडून सदर कर्मचा-यांचे कामाचे स्वरुपाची माहिती पत्राव्दारे मागविली असता, त्यांचे पत्रात "श्री साई मंदिर कोव्हीड-१९ अंतर्गत सुरक्षिततेकरीता दि.१७.०३.२०२० रोजी दु.०३.०० वाजेपासून साईभक्तांना दर्शनासाठी बंद करणेत आले होते. त्यामुळे या कालावधीपासून श्री साईप्रसादालयातील कंत्राटी कर्मचा-यांना विभागात पूर्णवेळ काम नसलेने, कामगार विभागाचे मंजूरीने दि.१९.०३.२०२० पासून सदर कर्मचारी श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईनाथ रूग्णालये, मेकॅनिकल विभाग व बगीचा विभागाकडे वर्ग करणेत आले होते. सदर कर्मचारी वेळोवेळी मान्यतेने पुन्हा इकडिल विभागात वर्ग करण्यात आले. या कर्मचा-यांना कायम कर्मचा-यांबरोबरच विभागातील स्वच्छता, भांडे, भोजन गाड्या, ताटे घासणे इ. प्रसाद भोजन बनविणे व त्यासंबंधीत कामे त्यांच्याकडून करुन घेण्यात येत आहेत. तसेच सदरहु कर्मचारी दि.१६.११.२०२० पासून श्रींचे मंदीर साईभक्तांकरीता खुले झाल्यामुळे, श्री साई प्रसादालयही पुर्ववतपणे सुरु झाल्याने, सर्व १६५ कंत्राटी कर्मचारी प्रसादालयात वर्ग करणेत आलेले असून ते आज रोजी कार्यरत आहेत." असे कळविलेले आहे.

पान नं. ०५ वर ...

३) इतर विभाग:-

श्री साई मंदिर कोव्हीड-१९ अंतर्गत सुरक्षिततेकरीता दि.१७.०३.२०२० रोजी दु.०३.०० वाजेपासून साईभक्तांना दर्शनासाठी बंद करणेत आलेले होते. त्यांनतर दि.१६.११.२०२० रोजी मंदीर सुरु करणेत आलेले असल्याने संस्थानचे इतर विभाग पुर्ववत सुरु झालेले आहे.

तरी, मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी यांनी त्यांचे दि.१६.०२.२०२१ रोजीचे पत्रातील निर्देशांचे अवलोकन केले असता, दि.१६.११.२०२० पासून लाडू विभाग सुरु झालेला नाही तसेच श्री साईप्रसादालय विभाग पूर्ण क्षमतेने सुरु नव्हता हे सत्य आहे, परंतू लाडू विभाग व श्री साईप्रसादालय विभागाकडील सर्व कंत्राटी कर्मचारी हे दि.१६.११.२०२० पासून विभागाकडे / इतर विभागाकडे (श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईनाथ रुग्णालये, मेकॅनिकल विभाग व बगीचा विभाग) कार्यरत होते. तसेच, ज्या कर्मचा-यांनी दि.१६.११.२०२० पासून सेवा दिलेली नाही किंवा अजूनही देत नाही, अशा कंत्राटी कर्मचा-यांची दि.१६.११.२०२० पासून विभागामार्फतच हजेरी मस्टरवर गैरहजेरी दर्शविण्यात आलेली आहे. त्यामुळे अशा कर्मचा-यांना सेवा न दिलेल्या कालावधीतील वेतन देय्य होत नाही.

**विभागाचा अभिप्राय:-**

श्री साईबाबा संस्थान असंघटीत कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी बंद केलेली ४०% वेतनवाढ पुर्ववत सुरु करणेबाबत केलेली मागणी व उपरोक्त श्री हसन मुश्रीफ, पालकमंत्री, अहमदनगर, मंत्री, ग्रामविकास, महाराष्ट्र शासन व मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी यांचे प्राप्त झालेले निर्देश यांचा विचार करता, पुर्वी ज्या कंत्राटी कर्मचा-यांना ४०% वाढ देण्यात येत होती, त्या कंत्राटी कर्मचा-यांना दि.१६.११.२०२० पासून किंवा ते ज्या दिनांकाला प्रत्यक्ष कामावर हजर होतील तो दिनांक यांपैकी जो दिनांक नंतर असेल त्या दिनांकापासून सदर कर्मचा-यांना पुर्वीप्रमाणे ४०% वेतनवाढ देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

सबब, मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी व मा.अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक, सदस्य, मा.तदर्थ समिती यांचे निर्देशांप्रमाणे सुधारीत प्रस्तावावर चक्रिय पध्दतीने निर्णय होणेस विनंती.

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

उपरोक्त प्रस्तावावर चक्रीय पध्दतीने मान्यता देणेत आली आहे.

10/03/2021
( श्रीमती गीता पी. बनकर )
सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्या, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती

10/3/2021
(मा.श्री.भानुदास ह. पालवे)
अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
सदस्य, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती

( कान्हूराज बगाटे,भा.प्र.से. )
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
तथा सदस्य सचिव,मा.तदर्थ (Ad-hoc) समिती

10/3
( श्रीकांत आणेकर )
प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती

विषय क्र.- 9/१०७

# मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर

## (कामगार विभाग)

429

---

**विषय- संस्थानला सन २०२१-२२ करीता कंत्राटी पध्दतीने सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेबाबत चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत..**

टिपणी-

सन २०२१-२२ करीता संस्थानचे विविध विभागांना लागणारे सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १ | खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुचा तपशिल. | **सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्स नेमणूकीबाबत- २०२१-२२** |
| २ | मागणी | सुरक्षा अकुशल- ६२९ व सुरक्षा कुशल- ६५, एकूण- ६९४ |
| ३ | ई-निविदा प्रसिध्दी | दि.२४.०३.२०२१ ते दि.१५.०४.२०२१ |
| ४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते ? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट |
| ५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | -- |
| ६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दि.२४.०३.२०२१ रोजी सकाळी- ११.०० वा. |
| ७ | प्राप्त निविदाकारांची संख्या. | ०४ ( चार ) |
| ८ | पात्र निविदाकारांची संख्या. | ०४ ( चार ) |
| ९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | निविदेत नमुने मागविलेले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | होय. |
| ११ | जर नमूने दिले नाही, तर का. | निविदेत नमुने मागविलेले नाहीत. |

१२ निविदाकारांनी सादर केलेले दर-

| अ.क्र | निविदाकाराचे नाव | सादर केलेले दर प्रती नग रु | स्थिती |
|---|---|---|---|
| १. | मे.ईगल सिक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्व्हिसेस, मुंबई | ०.०१०० | L - 2 |
| २. | मे.मॉडर्न विर रेज सिक्युरिटी फोर्स, पुणे | ०.०००१ | L - 1 |
| ३. | मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम्स प्रा.लि. पुणे | ०.०००१ | L – 1 |
| ४. | मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस लि.मुंबई | २.२९०० | L - 3 |

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर -

| अ.क्र. | वर्ष | परिमाण | (सेवा कर दर) |
|---|---|---|---|
| १ | सन २०२० – २१ करीता | -- | सर्व्हिस चार्जेस दर १.००% |

१४ मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल -

| अ.क्र | तपशील | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|---|
| १ | सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी | २०२० – २१ | -- |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | -- |
| १६ | मागील खरेदी दर | सर्व्हिस चार्जेस दर १.००% |
| १७ | मागील पुरवठादार | **१)मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि. पुणे<br>२)मे.ईगल हंटर सोल्युशन लि.दिल्ली** |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | ०.०००१% |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | **१)मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि. पुणे<br>२)मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम्स, पुणे** |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>प्रशासकीय अधिकारी |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अंदाजे रु. | प्रति सेट मार्केट रेट रु. |

| २३ | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी / जास्त |
|---|---|---|---|---|
| | रु.१.००% | रु.०.०००१% | -- | -- |

पान नं.०२ वर..

संक्षिप्त टीप –

430

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती दि.०१.०३.२०२१ रोजीचे चक्रिय पध्दतीने मिळालेल्या मान्यतेअन्वये सन २०२१-२२ कालावधीसाठी संस्थानला कंत्राटी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकामी मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेकामी व निविदा मागविणेस तसेच जाहिरात प्रसिध्द करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार www.mahatenders.gov.in, व संस्थानचे वेबसाईटवर, वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली होती.

सदर ई-निविदेमध्ये ०४ निविदा धारकांनी भाग घेतला होता. प्राप्त निविदा (तांत्रिक निविदा) दि.१६.०४.२०२१ रोजी खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आले असून याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या ०४ निविदाधारकांच्या कमर्शिअल (वाणिज्यीक) निविदा दि.१९.०४.२०२१ रोजी खरेदी समिती सभेसमोर उघडणेत आलेल्या आहेत.

**उघडण्यात आलेल्या वाणिज्यिक निविदेचा तपशील खालीलप्रमाणे –**

| अ.नं. | कामाचा तपशिल | मे.ईगल सिक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्व्हिसेस, मुंबई | मे.मॉडर्न विर रेज सिक्युरिटी फोर्स, पुणे | मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम्स प्रा.लि. पुणे | मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस लि.मुंबई |
|---|---|---|---|---|---|
| १) | Service Charges ( in Percentage) for Supply of Security Guards (Ladies/Gents), Security Guards (Ex Servicemen), Security Supervisors, Security Gun men's, Security Officers, Gym Triner, Employees as mentioned on page no 10 of tender document (Excluding PF,GST, Group Insurance, Ex-gratia etc.) | ०.०१०० | ०.०००१ | ०.०००१ | २.२९०० |

दि.०१.०३.२०२१ च्या मा.तदर्थ समिती सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर २ x २ असा निर्णय झाल्याने, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल करावयाचा सिव्हील अर्ज दि.३०.०३.२०२१ रोजी नोटरी करुन ॲड.अनिल बजाज यांचेकडे दाखल करणेकामी पाठविलेला आहे. त्यानुसार मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे **सिव्हील ॲप्लीकेशन नं.-४६७४/२०२१** दाखल केले आहे. मात्र अद्याप त्यावर निर्णय झालेला नाही.

तसेच त्यानुसार मे.मॉडर्न विर रेज सिक्युरिटी फोर्स, पुणे व मे.ईगल हंटर सोल्युशन लि. दिल्ली यांना निविदा प्रक्रिया पूर्ण होईपावेतो दि.०१.०३.२०२१ ते दि.३०.०४.२०२१ अखेर दोन महिने दर रु. १.०० % या सर्व्हिस चार्जेस दराने मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

**प्रस्ताव-**

१) आता, याकामी, सन २०२१-२२ करीता प्राप्त झालेल्या ०४ निविदा व सदर ०४ ही निविदा पात्र ठरत असल्याने, सदर वाणिज्यीक निविदा दि.१९.०४.२०२१ रोजी खरेदी समिती सभेसमोर उघडल्या असता, सदर निविदामध्ये मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि. पुणे व मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम्स, पुणे यांचे दर ०.०००१% असे L-1 आलेले आहेत.

**पान नं.०३ वर..**

२) मा.तदर्थ समितीचे निर्णयानुसार मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल करावयाचा सिव्हील अर्ज दि.३०.०३.२०२१ रोजी नोटरी करुन ॲड.अनिल बजाज यांचेकडे दाखल करणेकामी पाठविलेला आहे. त्यानुसार मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन नं.- ४६७४/२०२१ दाखल केले आहे. मात्र अद्याप त्यावर निर्णय झालेला नाही.

३) सबब, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे दाखल करण्यात आलेल्या सिव्हील ॲप्लीकेशनचे अधिन राहून मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी फोर्स प्रा.लि. पुणे व मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम्स, पुणे यांचे दर ०.०००१% L-1 व समान असल्याने त्यांना दि.०१.०५.२०२१ ते दि.३०.०४.२०२२ अखेर संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविण्याचे कार्यादेश विभागून देणेबाबतचे प्रस्तावावर चक्रिय पध्दतीने निर्णय होणेस विनंती.

(रविंद्र ठाकरे)
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

---

उपरोक्त प्रस्तावावर चक्रीय पध्दतीने मान्यता देणेत आली आहे.

पूर्वी संस्थानला 505 पदाकरिता दि 30/4/2021 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती ती मुदतवाढ आज रोजी संपुष्टात दि. 30 एप्रिल 2021 पर्यंत देण्यात येत आहे. 30/4/2021

(श्रीमती गीता पी. बनकर)
**सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर**
**सदस्या, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती**

(मा.श्री.भानुदास ह. पालवे)
**अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक**
**सदस्य, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती**

(रविंद्र ठाकरे)
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
**तथा सदस्य सचिव,मा.तदर्थ (Ad-hoc) समिती**

(श्रीकांत आणेकर)
**प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर**
**अध्यक्ष, मा.तदर्थ (Ad-hoc) समिती**

**चक्रीय पध्दतीने आणलेला विषय दि. 20/04/2021**

**विषय – सन 2021-22 करिता कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेबाबत...**

1) संपूर्ण विषयाचा अभ्यास करता असे निदर्शनास येते की, दि. 25/02/2021 तसेच दि. 01/03/2021 रोजी झालेल्या निर्णयाप्रमाणे समितीच्या सदस्यांमध्ये 2x2 अशी मते विभागली गेली. सदस्य सचिव तसेच समितीचे दुसरे सदस्य श्री. पालवे यांनी 694 कर्मचा-यांसाठी निविदा काढण्यास परवानगी दिली मात्र समितीचे अध्यक्ष तसेच दुस-या सदस्या श्रीमती बनकर यांनी 505 पदांसाठी निविदा काढण्यासाठी परवानगी दिली. अशी परवानगी देतांना मा. उच्च न्यायालयासमक्ष सर्व बाबी स्पष्ट करण्यात याव्यात, असे संस्थान प्रशासनास दि. 25/02/2021 व 01/03/2021 च्या ठरावाप्रमाणे निर्देशित करण्यात आले होते.

2) आज रोजी ही बाब सिव्हील ॲप्लिकेशन अन्वये मा. उच्च न्यायालयासमक्ष प्रलंबित आहे व हे वादात नाही.

3) मूलतः सदरील 694 पदांकरिता काढलेली निविदा हीच तदर्थ समितीच्या निर्णयास अनुसरुन काढलेली नाही. मा. उच्च न्यायालयाने संस्थान प्रशासनाला 694 कर्मचा-यांसाठी निविदा काढावी, असे स्पष्ट आदेश दिलेले नाहीत. अशा परिस्थितीत सद्या आणलेला प्रस्ताव मुळातच मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये नसल्याने मान्य करता येणार नाही.

4) पूर्वी संस्थान प्रशासनाला 505 पदांकरिता दि. 30/04/2021 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती, ती मुदतवाढ त्याच अटी व शर्तींवर माझेतर्फे 30 जून 2021 पर्यंत देण्यास हरकत नाही.

(श्रीकांत एल. आणेकर)
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर**
**तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी**

**दिनांक – 20/04/2021**

चक्रिय पद्धतीने आणलेला विषय

दि. 20/04/2021



विषय : सन 2021-22 करिता कंत्राटी पद्धतीने सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेबाबत

प्रस्ताव वाचला. मूळातच या विषयास अनुसरून 694 व 505 पदांसाठी असे दोनास दोन असे वेगवेगळे मते निविदा परवानगी देण्यात आली आहे. वस्तुतः ही बाब मा. उच्च न्यायालय येथे प्रलंबित आहे. तसेच ही निविदा 694 पदांकरिता काढणे हे समितीच्या निर्णयास अनुसरून नाही अथवा मा. उच्च न्यायालय यांनीही तसे स्पष्ट आदेश दिलेले नाहीत. त्यामुळे सदरचा प्रस्ताव हा तदर्थ समितीच्या निर्णयास व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरून नाही.

त्यामुळे यापूर्वी दिलेल्या निर्णयानुसार संस्थान प्रशासनास 505 पदांकरिता 30/06/2021 पर्यंत मुदतवाढ देणेस हरकत नाही. सदरची मुदतवाढ त्याच अटी व शर्तीप्रमाणे आहे.

दि. 20/04/2021

(Geeta P. Bankar)
A.C.C Ahmednagar
member Ad-hoc
Committee S.S.S.T
Shirdi

विषय क्र.- 9/१०८

दिनांक: २८/०१/२०२१.

# मा. तदर्थ समितीचे समोर चक्रीय पध्दतीने मान्यतेस्तव सादर

सामान्य प्रशासन विभाग (आस्थापना),

**विषय - माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतन अदा करणेबाबत. .. .. ..**

टिपणी-

विषयाची पूर्वपीठीका -

(अ-१) मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीचे शासन निर्णयानुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास, म्हणजेच एकूण ४८२६ पदांना (स्थायी २९०८ पदे + अस्थायी १९१८ पदे) खालील अटी-शर्तीस अधिन राहुन मान्यता दिलेलीआहे. या अटी-शर्तींचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे –

*(१) समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.*

*(०२) सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.*

*(०३) सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.*

*(०४) सेवा प्रवेश नियमांमध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख असावा.*

*(०५) आकृतीबंधातील मंजुर पदांवर काम करणा-या कर्मचा-यांना शासनाप्रमाणे निवृत्तीवेतन लागू असणार नाही.*

*(०६) समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही.*

*(०७) समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.*

*(०८) समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.*

*(०९) आस्थापनेवरील खर्च सिमीत करण्यासाठी राज्य शासनाच्या अधिका-यांची आकृतीबंधामध्ये निश्चित पदांवर प्रतीनियुक्तीने नियुक्ती करण्याची तरतूद ठेवावी.*

*(१०) तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.*

*(११) आकृतीबंधातील पदांवर नविन कर्मचा-यांची नियमित पदावर नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचा-यांचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असावा व त्याचे वेतन वेतनश्रेणीतील सुरूवातीच्या टप्प्यावर निश्चित करावे.*

(अ-२) दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ चे शासन निर्णयानुसार मंजूर आकृतीबंधात, उपरोक्त परिच्छेद अ-२ व अ-५ मध्ये नमूद केलेल्या वाढीव पदांची मान्यता विचारात घेतां, सध्या एकूण ४८३८ (४८२६+०२+१०) पदांचा आकृतीबंध मंजूर असून, यामध्ये स्थायी पदे २९२० (२९०८+१२) + कंत्राटी पदे १९१८ यांचा समावेश आहे.

(अ-३) दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे प्रस्तावाव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल - ८११ व कुशल - १०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

या प्रस्तावाचे अनुषंगाने, उपरोक्त परिच्छेद अ मध्ये नमुद केलेल्या विवेचनास तसेच संदर्भांकित पत्रव्यवहारास अनुसरुन, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३ / २२ / प्र.क्र.७० / का.१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ अन्वये शासन निर्णय पारित केलेला आहे.

(अ-४) मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत " या शीर्षाखाली पारित केलेल्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -

*" .. ..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या ६३५ कर्मचा-यांपैकी कुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,९१३/- (रु. पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,११३/- (रु. पाच हजार एकशे तेरा फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस मंजुरी देऊन शासनाच्या दि. ०७.०८.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.*

पान २ वर .. .. कृ.मा.प. .. ..

*उपरोक्तप्रमाणे एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधित कर्मचा-याचा संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status)हा कंत्राटी कर्मचारी म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. "*

(अ-५) दिनांक ०५/०६/२०१९ ते दिनांक ३०/१०/२०१९ अखेरचे कालावधीत महाराष्ट्र शासन महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजासंदर्भात प्राप्त झालेले शासन निर्णयांचे मा. तदर्थ समितीचे दिनांक ०४ डिसेंबर, २०१९ रोजीचे सभेत सदरहू निर्णयाचे निर्णय क्र. ५७५ अन्वये वाचन करुन नोंद घेणेत आलेली आहे.

(अ-६) सामान्य प्रशासन विभागाकडील संदर्भ क्रमांक ०४ मध्ये नमूद केलेल्या विविध विवेचनात्मक टिपणीनुसार, दिनांक २३ मे, २०१९ रोजीचे कामगार विभागाकडील टिपणी-वजा-पत्रासोबत प्राप्त झालेल्या ६३५ कर्मचा-यांचे यादीनुसार, त्यामध्ये समाविष्ट असणारे कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर हजर असलेले) मधील हजर दिवसांची तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था / २२०० /(०१ ते ६३५) /२०१९ दिनांक ०२ जानेवारी, २०२० अन्वये नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार ५९८ कंत्राटी कर्मचारी कामावर हजर झालेले आहेत.

(ब) आता, २८ ऑगष्ट, २०२० रोजीचे सभेचे इतिवृत्त दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२० रोजी इकडील विभागास प्राप्त झालेले असून त्यातील निर्णय क्र. ४२१ मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे-

" दिनांक १३.०७.२०२० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा. तदर्थ (Ad-hoc) समित सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा. सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.

निर्णय क्र. ३६०- सदस्य सचिव श्री. बगाटे साहेब यांनी दि. १३.०७.२०२० चे विषय क्र. ६ निर्णय क्र. ३६ बाबत सदरचा निर्णय होतांना पूर्वीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. डोंगरे यांनी रेकॉर्डवर जे मुद्दे मांडले होते. तेच मुद्दे पुन्हा मांडतांना समिती सदस्य सचिव / मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत खालील प्रमाणे मत मांडले.

सन १९ नोव्हेंबर, २०११ रोजी तत्कालीन व्यवस्थापन समितीने कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत कार्यरत असलेल्या ९१६ कंत्राटी कर्मचा-यांना नियमीत नेमणूका देण्यास मान्यता देण्यात आली होती. व तो प्रस्ताव शासनास सादर केलेला होता. सदर ९१६ कंत्राटी कामगारांपैकी २२ ऑगष्ट, २००४ पुर्वी कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत असलेल्या ६३५ कंत्राटी कमगारांना पात्र ठरविण्यात आले व त्यानुसार शासन निर्णयाची शासनाने दि. १७.०९.२०१९ रोजी शासन निर्णय पारित करुन त्यास मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयाची संस्थान प्रशासनाने अंमलबजावणी करुन ५९८ कर्मचा-यांना कायम कंत्राटी स्वरुपात नेमणूक दि. ०२ जानेवारी, २०२० रोजी दिली आहे. सदर कार्यवाही ही, तात्कालीन व्यवस्थापन समितीच्या व शासन मान्यतेने केलेली आहे, असे मत मांडले.

५९८ कर्मचा-यांना राज्य शासनाचे विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय दि. १७.०९.२०१९ अन्वये ठेकेदाराचे आस्थापनेवरील एकूण ६३५ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूकीस मान्यता दिलेली आहे व या शासन निर्णयान्वये तात्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या ५९८ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी स्वरुपात दि. ०२.०१.२०२० रोजी नेमणूक दिलेली असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता द्यावी असे प्रतिपादन केले.

त्यावर तदर्थ समितीचे अध्यक्ष, श्री. आणेकर साहेब व सदस्य श्री. स्वामी साहेब यांनी असे प्रतिपादन केले की, सदरचा निर्णय हा संपूर्ण विषयाचा अभ्यास करुन 3 X 1 अशा मताधिक्याने मंजूर करण्यात आलेला असल्याने त्यात बदल करण्याचा प्रश्न येत नाही. सबब सदरचा निर्णय मताधिक्याने कायम करण्यात आला."

तसेच मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० रोजीचे चक्रीय पध्दतीने ५९८ कर्मचारी यांचेबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे-

(iv) वरील नमूद ५९८ कर्मचा-यांना, त्यांनी केलेल्या कामाप्रमाणे ऑग्स्ट, २०२० ते ३१ ऑक्टोबर, २०२० पर्यंत वरील नमूद दि. १३.०७.२०२० च्या तदर्थ समितीच्या सभेतील निर्णय क्र. ३५७ प्रमाणे वेतन द्यावे मात्र असे वेतन हे सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ द्यावे कारण त्यांचे बाबतीत संस्थान प्रशासनाने दि. १३.०७.२०२० रोजीच्या निर्णयानंतर योग्य तो प्रस्ताव आणलेला नाही व त्यांचा दर्जा (status) स्पष्ट नाही.

(v) मानवतेच्या दृष्टीकानातून सदर ५९८ कर्मचा-यांना ३१ ऑक्टोबर २०२० पर्यंत काम केलेले असल्याने त्यांना, अटी व शर्तींची पूर्तता केली असल्यास, वरील प्रमाणे दि. ०१ ऑक्टोबर, २०२० ते ३० सप्टेंबर, २०२० या कालावधीतील त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३% दराने सानुग्रह अनुदान देण्यात यावे.

(vi) सदर ५९८ कर्मचा-यांबाबत योग्य तो प्रस्ताव ठेवण्याची मुभा संस्थान प्रशासनास आहेच.

पान ३ वर ... कृ.मा.प. ...

(क) संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कर्मचारी यांचे नियुक्तीबाबत मा. अध्यक्ष तदर्थ समिती यांना जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२०६५/ २०२०, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२० नुसार यथोचीत मार्गदर्शन मिळणेबाबत विनंती करणेत आलेली होती. त्यावर मा. अध्यक्ष तदर्थ समिती यांनी जा.नं. आस्था/ ४७२/२०२० दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२० नुसार ई-मेल पत्र पाठविलेले आहे. ५९८ कर्मचारी यांचे नियुक्तीबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-४/२१०२/२०२० दिनांक ०५ नोव्हेंबर, ई-मेल पत्र पाठविणेत आलेले आहे. सदरचे ई-मेल पत्राबाबत अद्यापपर्यंत कुठलाही निर्णय आलेला नाही.

तथापि, दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० व दिनांक २८ ऑगष्ट, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४२१ नुसार कार्यवाही करणेसाठी दिनांक १९ नोव्हेंबर, २०२० रोजी टिपणी / प्रस्ताव सादर करणेत येऊन संस्थान आस्थापनेवर घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/ २२००/(०१ ते ६३५)/ २०१९ दिनांक ०२ जानेवारी, २०२० अन्वये देणेत आलेले आदेश रद्द करुन त्यांच्या सेवा दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२० पासून संबंधित ठेकेदार यांचेकडे वर्ग करणेसाठी जा.क्र. एसएसएस/साप्रशा/आस्था/१५१९/२०२० दिनांक २१ नोव्हेंबर, २०२० अन्वये आदेश पारित करणेत आलेला होता. तसेच जा.क्र. एसएसएस/ साप्रशा/आस्था/ १६१२/२०२० दिनांक ०१/१२/२०२० रोजी आदेशान्वये संस्थान आस्थापनेवार घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा दिनांक ०२ डिसेंबर, २०२० पासून पुढील आदेश हाईपावेतो खंडीत करणेबाबत आदेश पारित करणेत आलेला होता. परंतू सदरचे प्रकरणाबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक ०१ डिसेंबर, २०२० रोजी जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्याचे मौखिक निर्देश दिल्याने ते पारित करता आलेले नाहीत.

तथापि दरम्यान श्री. अनिल कचरु कोते व इतर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० दि. १०/९/२०२० रोजी दाखल केले. सदर रिट पिटीशन मध्ये श्री अनिल कोते व इतर यांनी मा. तदर्थ समितीचे दिनांक १३/०७/२०२० रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ३६० रद्द करणेस तसेच त्यावर कोणतीही कार्यवाही न करणेबाबत विनंती केलेली आहे. सदर प्रकरण मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सध्या न्यायप्रविष्ठ आहे. सदर प्रकरणामध्ये महाराष्ट्र शासन व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना प्रतिवादी करण्यात आलेले आहे. या प्रकरणामध्ये संस्थानने आपले प्रतिज्ञापत्राव्दारे म्हणणे दि. ०४/११/२०२० रोजी मा. उच्च न्यायालयात सादर केले आहे. महाराष्ट्र शासनानेही सदर प्रकरणामध्ये प्रतिज्ञापत्राव्दारे दाखल केले असल्याचे समजते तथापि शासनाने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राचा तपशिल इकडे उपलब्ध नाही.

सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असतांना मा. तदर्थ समितीच्या दिनांक १३/०७/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३६० यावर अंमलबजावणी करावयाची झाल्यास सदर प्रकरणी महाराष्ट्र शासनाकडून दाखल करण्यात आलेली भूमिका तसेच संस्थानकडून दाखल करण्यात आलेले परिच्छेद निहाय शेरे आणि दाखल करण्यात आलेले प्रमाणपत्र यात सुसंगती असणे आवश्यक आहे. तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने निर्णय घेऊन त्याआधारे विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्र. सांसवि- २०१३/२२/प्र.क्र.७०/का.१६, मंत्रालय मुंबई. दिनांक १७/०९/२०२० नुसार आदेश परित केलेले आहे. सदर शासनाचे निर्णयाचे आधारे सदर कर्मचा-यांना दिनांक ०२/०१/२०२० पासून संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून घेण्यात आलेले आहे.

मात्र आता, तदर्थ (Ad-hoc) समितीचे ठरावांची अंमलबजावणी करतांना वरील पार्श्वभूमीवर परस्पर विरोधी भूमिका नसावी अशी सर्वसाधारण प्रशासकीय निकड लक्षात घेऊन दि. २१ नोव्हेंबर, २०२० चे आदेशाची अंमलबजावणी करतांना प्रशासकीय अडचण निर्माण झालेली आहे. संस्थानस्तरावर तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णय आणि शासन निर्णय हे परस्पर पुरक ठरत नाहीत. सबब तदर्थ (Ad-hoc) समितीचा निर्णय अंमलबजावणी करण्यास्तव शासन स्तरावरुन याबाबत मार्गदर्शन होणेसाठी जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/२२९०/२०२० दि. २१/११/२०२० अन्वये विनंती करणेत आलेली आहे. तसेच याबाबत मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांनीही मार्गदर्शन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तथापि सदर प्रकरणी मा. महाराष्ट्र शासन व मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांचेकडून कुठलेही मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

**ड) श्री. अनिल कचरु कोते व इतर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० दि. १०/९/२०२० रोजी दाखल केलेली आहे. याबाबत-**

१) दिनांक २३/११/२०२० व दिनांक ०१/१२/२०२० रोजी सुनावणी होऊन मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी जे मौखिक निर्देश दिले त्याबाबत संस्थानचे वकील ॲड. अनिल बजाज यांनी लेखीपत्र ई-मेलव्दारे कळविले आहे-

The Writ Petition No. 6224 of 2020 was listed on board on dt. 23/11/2020 and the Hon'ble Court orally instructed the undersigned not to terminate the employment of the 598 workers who are subject matter of the present Writ petition, and again when the Writ Petition was listed on dt. 01.12.2020 the court orally instructed to maintain the status-quo.

पान ४ वर ... क्र.मा.प. ...

The Dy. CEO Mr. Thakre & Mr. Nalge were present on the said date and are aware of the same. This is for your records and necessary actions.

२) मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे दिनांक ०८ डिसेंबर, २०२० रोजीचे सुनावणीबाबत मा. न्यायालय यांनी खालीलप्रमाणे लेखी आदेश दिलेले आहेत-

1. It is submitted that Mr.Bajaj, learned Advocate for respondent no. 2 is not well.
2. Place the mattet on 6th January 2021.

३) तसेच दिनांक ०८ डिसेंबर, २०२० रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालय यांनी दिलेल्या मौखिक निर्देशाबबत ॲड. अनिल बजाज यांनी खालीलप्रमाणे लेखीपत्र ई-मेलव्दारे कळविले आहे-

The Writ Petition No. 6224 of 2020 was listed on board on dt. 23.11.2020 and the Hon'ble Court orally instructed the undersigned not to terminate the employment of the 598 workers who are subject matter of the present Writ petition, and again when the Writ petition was listed on dt. 01.12.2020 the court orally instructed to maintain the status-quo.

That, on dt. 08.12.2020 the matter was listed again on the board and as the undersigned was not well the matter was adjourned and the Hon'ble Court has again orally instructed to follow the same orders and not to terminate the employment of 598 workers.

रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० ची उपरोक्त सद्यस्थिती मा. तदर्थ समिती समक्ष सादर करणेस तसेच सदरचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी विविध विभागांमध्ये कर्तव्यावर उपस्थितीत असल्याने त्यांना माहे नोव्हेंबर, २०२० व तदनंतरचे वेतन अदा करणेबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे दिनांक १९/१२/२०२० रोजीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेत आलेला आहे.

परंतु दिनांक १९/१२/२०२० रोजीचे मा. तदर्थ समितीचे सभेतील निर्णय अद्यापपर्यंत इकडील विभागास प्राप्त झालेला नाही. तथापि माहे नोव्हेंबर, २०२० चे वेतन जा.क्र. एसएसएस/ साप्रशा / आस्था/ १८७१/ २०२० दिनांक ०५ जानेवारी, २०२१ नुसार ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे दिनांक १५ नोव्हेंबर, २०२० पर्यंत वेतन मा. तदर्थ समितीचे दिनांक १३/०७/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५७ प्रमाणे हजर दिवसाला पूर्ण व कामावर नसलेल्या दिवसाला अर्धवेतन तसेच दिनांक १६ नोव्हेंबर, २०२० पासून श्रींचे मंदिर भक्तांना दर्शनासाठी खुले करण्यात आले असल्याने कामाचे हजर दिवसानुसार, सानुग्रह अनुदाना प्रित्यर्थ अदा करणेबाबत आदेशित करणेत आलेले आहे. तसेच माहे डिसेंबर, २०२० चे वेतन जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ १९०६/२०२० दिनांक १३/०१/२०२१ रोजीचे आदेशानुसार दिनांक १६ नोव्हेंबर, २०२० पासून श्रींचे मंदिर भक्तांना दर्शनासाठी खुले करण्यात आले असल्याने कामाचे हजर दिवसानुसार, सानुग्रह अनुदाना प्रित्यर्थ अदा करणेबाबत आदेशित करणेत आलेले आहे.

ई) आता, ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा संस्थान आस्थापनेवरुन कंत्राटदाराच्या आस्थापनेवर वर्ग करण्या संदर्भात जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्याच्या मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशाप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असल्याने सदरचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी विविध विभागांमध्ये कर्तव्यावर उपस्थितीत आहेत. ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना माहे ऑगष्ट, २०२० ते डिसेंबर, २०२० पर्यंतचे वेतन हे सानुग्रह अनुदानाप्रित्यार्थ अदा करणेत येत आहे. (दिनांक १६ नोव्हेंबर, २०२० पासून श्रींचे मंदिर भक्तांना दर्शनासाठी खुले करण्यात आले असल्याने कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने वेतन अदा करणेत येत आहे.)

सबब ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतर चे वेतन रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद यांचे अंतिम आदेशापर्यंत कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने अदा करणेसाठीचे मान्यतेबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे निर्णयार्थ चक्रीय पध्दतीने सादर करता येईल.

विभागाचा प्रस्ताव-

५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा संस्थान आस्थापनेवरुन कंत्राटदाराच्या आस्थापनेवर वर्ग करण्यासंदर्भात जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्याच्या मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशाप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असल्याने सदरचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी विविध विभागांमध्ये कर्तव्यावर उपस्थितीत आहेत. तसेच माहे ऑगष्ट, २०२० ते डिसेंबर, २०२० पर्यंतचे वेतन मा. तदर्थ समितीचे मान्यतेने सानुग्रह अनुदानाप्रित्यार्थ अदा करणेत येत आहे.

पान ५ वर .. .. कृ.मा.प. .. ..

५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतन रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद यांचे अंतिम आदेशापर्यंत कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदानाप्रित्यार्थ अदा करणेस मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सविनय सादर.

28/1

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

---

## मा. तदर्थ समिती निर्णय

५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतन रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद यांचे अंतिम आदेशापर्यंत कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदानाप्रित्यार्थ अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

मा. उच्च न्यायालयाचे माध्यमेस अधिक राहून माहे जाने २०२१ व माहे फेब्रु २०२१ या महिन्याचे मेहनताना सानुग्रह अनुदान म्हणून कंत्रुटीस नाही

(श्रीमती गिता पी. बनकर)
सहा. धर्मादाय आयुक्त , अहमदनगर तथा
सदस्य , तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

(भानुदास ह. पालवे)
अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक, तथा
सदस्य , तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

28/1/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा
सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर. तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

चक्रीय पध्दतीने आणलेले दोन विषय एकत्रित निर्णय

दि. 25/02/2021

439

विषय – सन 2021-22 करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टरर्सची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविणेकामी फेरप्रस्ताव सादर करणेस व निविदा पक्रिया पूर्ण होईपर्यंत आहे त्या कॉन्ट्रॅक्टर्स यांना मुदतवाढ देणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत...

आणि

विषय – माहे जानेवारी 2020 मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या 598 कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, 2021 व तदनंतरचे वेतन अदा करणेबाबत...

संदर्भ: 1)दि. 22/12/2020 रोजीचा सन 2021-22 करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टरर्सची नेमणूक करण्यासाठी ई-निविदा मागविणेस चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबतचा विषय व त्यावरील दि. 24/12/2020 चा आदेश.

2) दि. 16/02/2021 रोजीचा, सन 2021-22 करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टरर्सची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविणेकामी फेरप्रस्ताव सादर करणेस व निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आहे त्या कॉन्ट्रॅक्टर्स यांना मुदतवाढ देणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबतच्या विषयावरील निर्णय.

3) दि. 22/02/2021 रोजीचा खुलासेवार आणलेला विषय - सन 2021-22 करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टरर्सची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविणेकामी फेरप्रस्ताव सादर करणेस व निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आहे त्या कॉन्ट्रॅक्टर्स यांना मुदतवाढ देणेकामी चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

4) संस्थान प्रशासनाचे पत्र क्र. एसएसएस/साप्रशा/आस्था/3696/2021, दि. 24 फेब्रुवारी, 2021.

1) निम्न स्वाक्षरीकार यांनी दि. 24/12/2020 रोजी संदर्भांकित क्र.1 विषयावर निर्णय दिल्यानंतर सदर बाब मा. उच्च न्यायालयाच्या आदेशास अधीन राहून मान्य असल्या बाबतचा आदेश तदर्थ समितीच्या सदस्या श्रीमती बनकर, सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी नोंदविलेला आहे. संस्थान प्रशासनाने आणलेला प्रस्ताव जसा आहे तसा तदर्थ समितीचे सदस्य सचिव यांनी मान्य केला. मात्र सदर प्रस्तावावर तत्कालीन प्रभारी अपर महसूल आयुक्त व तदर्थ समितीच्या तत्कालीन सदस्या श्रीमती गीता बावीस्कर यांचा निर्णय घेण्यात आलेला नाही. म्हणजेच तदर्थ समितीसमक्ष चक्रीय पध्दतीने आणलेल्या प्रस्तावावर अद्यापही निर्णय नाही. अशा परिस्थितीत संस्थान प्रशासनाने पुन्हा दिनांक 29/01/2021 रोजी फेरप्रस्ताव आणला, ज्यात मुद्दा क्र. 9 खालील प्रमाणे आहेः-

> *'9) उपरोक्त मुद्दा क्र. 1 ते 8 यांचे अवलोकन करुन, दि. 24/12/2020 रोजी मा. तदर्थ समितीसमोर चक्रिय पध्दतीने सादर केलेला प्रस्तावावर झालेला निर्णय निरस्त करुन नव्याने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता मिळावी.'*

2) वर नमूद केल्याप्रमाणे संस्थान प्रशासनाला दि. 24/12/2020 रोजी घेतलेला निर्णय निरस्त करावयाचा आहे मात्र वर नमूद केले प्रमाणे तदर्थ समितीच्या तत्कालीन सदस्या यांचा निर्णय नसल्याने एकतर तो निर्णय पूर्ण नाही किंवा असल्यास संख्याबळाप्रमाणे त्यावर निम्न स्वाक्षरीकार यानी दिलेल्या निर्णयानुसार मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे अधीन राहून मंजूर केला असल्याने व त्यास तदर्थ समितीच्या सदस्या श्रीमती बनकर यांनी दुजोरा दिल्याने संख्याबळाचे आधारे सदर विषय दि. 24/12/2020 रोजीच निर्णयीत झालेला आहे. ज्यामध्ये संस्थान प्रशासनाने मा. उच्च न्यायालयासमक्ष सिव्हील ॲप्लिकेशन करुन निर्णय घ्यावा.

3) संस्थान प्रशासनाने आता 22/02/2021 रोजी नवीन प्रस्ताव आणला आहे. सदर बाबीशी संलग्न असलेला 598 कर्मचा-यांचा सहभाग सदर विषयात आहे. सदर विषयाचे अवलोकन केले असता, हे स्पष्ट होते की, संस्थान प्रशासनाला शासनाने मंजूर केलेल्या

आकृतीबंधा व्यतिरिक्त तदर्थ समितीकडून 334 पदे जादा वाढवून हवे आहेत. या बाबतीत टिपणीमध्ये 'ब' शिर्षाखाली खालील बाब लिहिलेली आहेः-

*'संरक्षण विभागासाठी कायम व कंत्राटी असे एकूण 629 कर्मचारी आकृतीबंध मंजूर आहे. मंजूर आकृतीबंधानुसार आज मितीस संस्थानमध्ये नवीन विभाग व तेथील सुरक्षेकामी सुरक्षा पॉईंट वाढल्याने, मंजूर आकृतीबंधा व्यतिरिक्त सध्या 334 पदे जादा आहेत. प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, अध्यक्ष, मा. तदर्थ (Ad-hoc) समिती यांचे दि. 24.12.2020 रोजीचेअभिप्रायानुसार मंजूर आकृतीबंधानुसार निविदा मागावयाची झाल्यास संरक्षण विभागास सुरक्षेकामी खालील अडचणी उदभवू शकतात.....'*

4) वरील तपशिलावरुन हे स्पष्ट होते की, तदर्थ समितीकडून जी गोष्ट मंजूर करुन हवी आहे ती मुळातच तदर्थ समितीच्या कक्षेबाहेरील आहे. संस्थान प्रशासनाने अशा वाढीव पदांची शासनाकडे मागणी न करता, मा. उच्च न्यायालयाने नेमून दिलेल्या तदर्थ समितीकडून मंजूर करुन घेणे, मला अयोग्य वाटते कारण आकृतीबंध मंजूर करण्याचे सर्वाधिकार हे शासनास आहेत. करिता आता आणलेला प्रस्ताव वरील कारणांसाठी व दि. 24/12/2020 रोजीच्या निम्न स्वाक्षरीकार यांनी दिलेल्या कारणांसाठी माझेतर्फे अमान्य करण्यात येत आहे.

5) आज संस्थान प्रशासनाने काही बाबी नमूद करुन 598 कर्मचा-यांना त्यांचे वेतन देण्याबाबत ब-याच बाबींचा उहापोह केलेला आहे. मुलतः सदर 598 कर्मचा-यांचे **status** स्पष्ट नसल्याने त्यांच्या बाबतीत 'वेतन' हा शब्दच अयोग्य आहे आणि म्हणूनच आजपर्यंत सदर कर्मचा-यांनी दिलेल्या सेवेबाबत त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे व असे अनुदान मा. उच्च न्यायालयाचे मंजूर केलेले आहे. अशा परिस्थितीत सरसकट वेतन हा शब्द न वापरुन त्यांना दरमहा केलेल्या कामाचा मेहनताना देणे व ही बाब वेळोवेळी ठरविणे, हेच योग्य आहे, कारण सर्व बाबी मा. उच्च न्यायालयासमक्ष न्यायप्रविष्ट आहेत. म्हणूनच संस्थान प्रशासन सुध्दा दि. 28/01/2021 च्या प्रस्तावामध्ये सदर 598 कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अदा करण्याबाबत मान्यता मागत आहे, जी देणेत येत आहे. करिता सदर 598 कर्मचा-यांना माहे जानेवारी 2021 व फेब्रुवारी 2021 मध्ये त्यांनी काम केलेले असल्यास त्यांनी केलेल्या कामाचा

मेहनताना मानवतेच्या दृष्टीकोनातून सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहून देण्यास माझी मान्यता आहे.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 25/02/2021

**चक्रीय पध्दतीने आणलेले दोन विषय एकत्रित निर्णय**

**दि. २५.०२.२०२१**

विषय : माहे जानेवारी २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून समावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतन अदा करणेबाबत ...

संस्थान मार्फत सादर करण्यात आलेला प्रस्ताव वाचला. प्रस्ताव, मा. सदस्य अप्पर आयुक्त, नाशिक यांचा अभिप्राय तसेच मा. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांचा अभिप्राय वाचला. संस्थानमार्फत सादर करण्यात आलेल्या विषयांचे अवलोकन केले असता त्यामध्ये कंत्राटी कर्मचारी व वेतन अशा शब्दप्रयोग केल्याचे दिसून येते. त्यामुळे ५९८ कर्मचाऱ्यांची स्थिती (Status) अदयाप स्पष्ट न झाल्यामुळे त्यांच्याबाबत वेतन हा शब्द वापरणे अयोग्य आहे.

त्यामुळे त्यांना सानुग्रह मेहनताना हा शब्द वापरणे उचित होईल. याबाबत मा. उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असणाऱ्या न्यायप्रविष्ठ बाबींच्या आदेशास अधिन राहून मान्यता देण्यास हरकत नाही.

05/03/2021

(गीता प्र. बनकर)

सहायक धर्मादाय आयुक्त तथा

सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,

श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि. ०८.०३.२०२१

विषय क्र.- 9/905

दिनांक: २४ मार्च, २०२१.

## मा. तदर्थ समितीचे समोर चक्रीय पध्दतीने मान्यतेस्तव सादर

सामान्य प्रशासन विभाग (आस्थापना)

**विषय - माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे मार्च, २०२१ चे वेतन सानुग्रह अनुदान म्हणून अदा करणेबाबत. .. .. ..**

टिपणी-

विषयाची पूर्वपीठीका -

(अ-१) मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीचे शासन निर्णयानुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास, म्हणजेच एकूण ४८२६ पदांस (स्थायी २९०८ पदे + अस्थायी १९१८ पदे) खालील अटी-शर्तीस अधिन राहुन मान्यता दिलेलीआहे. या अटी-शर्तींचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे –

*(१) समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील*

*(०२) सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.*

*(०३) सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.*

*(०४) सेवा प्रवेश नियमांमध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख असावा.*

*(०५) आकृतीबंधातील मंजुर पदांवर काम करणा-या कर्मचा-यांना शासनाप्रमाणे निवृत्तीवेतन लागू असणार नाही.*

*(०६) समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही.*

*(०७) समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.*

*(०८) समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.*

*(०९) आस्थापनेवरील खर्च सिमीत करण्यासाठी राज्य शासनाच्या अधिका-यांची आकृतीबंधामध्ये निश्चित पदांवर प्रतीनियुक्तीने नियुक्ती करण्याची तरतूद ठेवावी.*

*(१०) तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.*

*(११) आकृतीबंधातील पदांवर नविन कर्मचा-यांची नियमित पदावर नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचा-यांचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असावा व त्याचे वेतन वेतनश्रेणीतील सुरूवातीच्या टप्प्यावर निश्चित करावे.*

(अ-२) दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ चे शासन निर्णयानुसार मंजूर आकृतीबंधात, उपरोक्त परिच्छेद अ-२ व अ-५ मध्ये नमूद केलेल्या वाढीव पदांची मान्यता विचारात घेता, सध्या एकूण ४८३८ (४८२६+०२+१०) पदांचा आकृतीबंध मंजूर असून, यामध्ये स्थायी पदे २९२० (२९०८+१२) + कंत्राटी पदे १९१८ यांचा समावेश आहे.

(अ-३) दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे प्रस्तावाव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल - ८११ व कुशल - १०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

या प्रस्तावाचे अनुषंगाने, उपरोक्त परिच्छेद अ मध्ये नमुद केलेल्या विवेचनास तसेच संदर्भांकित पत्रव्यवहारास अनुसरुन, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३ / २२ / प्र.क्र.७० / का.१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ अन्वये शासन निर्णय पारित केलेला आहे.

(अ-४) मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत " या शीर्षाखाली पारित केलेल्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -

*" .. ..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या ६३५ कर्मचा-यांपैकी कुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,९१३/- (रु. पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,११३/- (रु. पाच हजार एकशे तेरा फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस मंजुरी देऊन शासनाच्या दि. ०७.०८.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.*

पान २ वर .... कृ.मा.प. ...

*उपरोक्तप्रमाणे एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधित कर्मचा-याचा संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status)हा कंत्राटी कर्मचारी म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. "*

(अ-५) दिनांक ०५/०६/२०१९ ते दिनांक ३०/१०/२०१९ अखेरचे कालावधीत महाराष्ट्र शासन महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजासंदर्भात प्राप्त झालेले शासन निर्णयांचे मा. तदर्थ समितीचे दिनांक ०४ डिसेंबर, २०१९ रोजीचे सभेत सदरहू निर्णयाचे निर्णय क्र. ५७५ अन्वये वाचन करुन नोंद घेणेत आलेली आहे.

(अ-६) सामान्य प्रशासन विभागाकडील संदर्भ क्रमांक ०४ मध्ये नमूद केलेल्या विविध विवेचनात्मक टिपणीनुसार, दिनांक २३ मे, २०१९ रोजीचे कामगार विभागाकडील टिपणी-वजा-पत्रासोबत प्राप्त झालेल्या ६३५ कर्मचा-यांचे यादीनुसार, त्यामध्ये समाविष्ट असणारे कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर हजर असलेले) मधील हजर दिवसांची तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था / २२०० /(०१ ते ६३५) /२०१९ दिनांक ०२ जानेवारी, २०२० अन्वये नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार ५९८ कंत्राटी कर्मचारी कामावर हजर झालेले आहेत.

(ब) आता, २८ ऑगष्ट, २०२० रोजीचे सभेचे इतिवृत्त दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२० रोजी इकडील विभागास प्राप्त झालेले असून त्यातील निर्णय क्र. ४२१ मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे-

" दिनांक १३.०७.२०२० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा. तदर्थ (Ad-hoc) समित सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा. सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.

निर्णय क्र. ३६०- सदस्य सचिव श्री. बगाटे साहेब यांनी दि. १३.०७.२०२० चे विषय क्र. ६ निर्णय क्र. ३६ बाबत सदरचा निर्णय होतांना पूर्वीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. डोंगरे यांनी रेकॉर्डवर जे मुद्दे मांडले होते. तेच मुद्दे पुन्हा मांडतांना समिती सदस्य सचिव / मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत खालील प्रमाणे मत मांडले.

सन १९ नोव्हेंबर, २०११ रोजी तत्कालीन व्यवस्थापन समितीने कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत कार्यरत असलेल्या ९१६ कंत्राटी कर्मचा-यांना नियमीत नेमणूका देण्यास मान्यता देण्यात आली होती. व तो प्रस्ताव शासनास सादर केलेला होता. सदर ९१६ कंत्राटी कामगारांपैकी २२ ऑगष्ट, २००४ पुर्वी कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत असलेल्या ६३५ कंत्राटी कमगारांना पात्र ठरविण्यात आले व त्यानुसार शासन निर्णयाची शासनाने दि. १७.०९.२०१९ रोजी शासन निर्णय पारित करुन त्यास मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयाची संस्थान प्रशासनाने अंमलबजावणी करुन ५९८ कर्मचा-यांना कायम कंत्राटी स्वरुपात नेमणूक दि. ०२ जानेवारी, २०२० रोजी दिली आहे. सदर कार्यवाही ही, तात्कालीन व्यवस्थापन समितीच्या व शासन मान्यतेने केलेली आहे, असे मत मांडले.

५९८ कर्मचा-यांना राज्य शासनाचे विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय दि. १७.०९.२०१९ अन्वये ठेकेदाराचे आस्थापनेवरील एकूण ६३५ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूकीस मान्यता दिलेली आहे व या शासन निर्णयान्वये तात्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या ५९८ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी स्वरुपात दि. ०२.०१.२०२० रोजी नेमणूक दिलेली असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता द्यावी असे प्रतिपादन केले.

त्यावर तदर्थ समितीचे अध्यक्ष, श्री. आणेकर साहेब व सदस्य श्री. स्वामी साहेब यांनी असे प्रतिपादन केले की, सदरचा निर्णय हा संपूर्ण विषयाचा अभ्यास करुन 3 X 1 अशा मताधिक्याने मंजूर करण्यात आलेला असल्याने त्यात बदल करण्याचा प्रश्न येत नाही. सबब सदरचा निर्णय मताधिक्याने कायम करण्यात आला."

तसेच मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० रोजीचे चक्रीय पध्दतीने ५९८ कर्मचारी यांचेबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे-

(iv) वरील नमूद ५९८ कर्मचा-यांना, त्यांनी केलेल्या कामाप्रमाणे ऑगस्ट, २०२० ते ३१ ऑक्टोबर, २०२० पर्यंत वरील नमूद दि. १३.०७.२०२० च्या तदर्थ समितीच्या सभेतील निर्णय क्र. ३५७ प्रमाणे वेतन द्यावे मात्र असे वेतन हे सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ द्यावे कारण त्यांचे बाबतीत संस्थान प्रशासनाने दि. १३.०७.२०२० रोजीच्या निर्णयानंतर योग्य तो प्रस्ताव आणलेला नाही व त्यांचा दर्जा (status) स्पष्ट नाही.

(v) मानवतेच्या दृष्टीकानातून सदर ५९८ कर्मचा-यांना ३१ ऑक्टोबर २०२० पर्यंत काम केलेले असल्याने त्यांना, अटी व शर्तींची पूर्तता केली असल्यास, वरील प्रमाणे दि. ०१ ऑक्टोबर, २०२० ते ३० सप्टेंबर, २०२० या कालावधीतील त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३% दराने सानुग्रह अनुदान देण्यात यावे.

(vi) सदर ५९८ कर्मचा-यांबाबत योग्य तो प्रस्ताव ठेवण्याची मुभा संस्थान प्रशासनास आहेच.

पान ३ वर .... कृ.मा.प. .. ..

(क) संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कर्मचारी यांचे नियुक्तीबाबत मा. अध्यक्ष तदर्थ समिती यांना जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२०६५/ २०२०, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२० नुसार यथोचीत मार्गदर्शन मिळणेबाबत विनंती करणेत आलेली होती. त्यावर मा. अध्यक्ष तदर्थ समिती यांनी जा.नं. आस्था/ ४७२/२०२० दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२० नुसार ई-मेल पत्र पाठविलेले आहे. ५९८ कर्मचारी यांचे नियुक्तीबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-४/२१०२/२०२० दिनांक ०५ नोव्हेंबर, ई-मेल पत्र पाठविणेत आलेले आहे.

दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६०.व दिनांक २८ ऑगष्ट, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४२१ नुसार कार्यवाही करणेसाठी दिनांक १९ नोव्हेंबर, २०२० रोजी टिपणी / प्रस्ताव सादर करणेत येऊन संस्थान आस्थापनेवर घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/ २२००/ (०१ ते ६३५)/ २०१९ दिनांक ०२ जानेवारी, २०२० अन्वये देणेत आलेले आदेश रद्द करुन त्यांच्या सेवा दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२० पासून संबंधित ठेकेदार यांचेकडे वर्ग करणेसाठी जा.क्र. एसएसएस/साप्रशा/आस्था/१५१९/२०२० दिनांक २१ नोव्हेंबर, २०२० अन्वये आदेश पारित करणेत आलेला होता. तसेच जा.क्र. एसएसएस/ साप्रशा/आस्था/ १६१२/२०२० दिनांक ०१/१२/२०२० रोजी आदेशान्वये संस्थान आस्थापनेवार घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा दिनांक ०२ डिसेंबर, २०२० पासून पुढील आदेश हाईपावेता खंडीत करणेबाबत आदेश पारित करणेत आलेला होता. परंतू सदरचे प्रकरणाबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक ०१ डिसेंबर, २०२० रोजी जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्याचे मौखिक निर्देश दिल्याने ते पारित करता आलेले नाहीत.

तथापि दरम्यान श्री. अनिल कचरु कोते व इतर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० दि. १०/९/२०२० रोजी दाखल केले. सदर रिट पिटीशन मध्ये श्री अनिल कोते व इतर यांनी मा. तदर्थ समितीचे दिनांक १३/०७/२०२० रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ३६० रद्द करणेस तसेच त्यावर कोणतीही कार्यवाही न करणेबाबत विनंती केलेली आहे. सदर प्रकरण मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सध्या न्यायप्रविष्ठ आहे. सदर प्रकरणामध्ये महाराष्ट्र शासन व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना प्रतिवादी करण्यात आलेले आहे. या प्रकरणामध्ये संस्थानने आपले प्रतिज्ञापत्राव्दारे म्हणणे दि. ०४/११/२०२० रोजी मा. उच्च न्यायालयात सादर केले आहे. महाराष्ट्र शासनानेही सदर प्रकरणामध्ये प्रतिज्ञापत्राव्दारे दाखल केले असल्याचे समजते तथापि शासनाने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राचा तपशिल इकडे उपलब्ध नाही.

सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असतांना मा. तदर्थ समितीच्या दिनांक १३/०७/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३६० यावर अंमलबजावणी करावयाची झाल्यास सदर प्रकरणी महाराष्ट्र शासनाकडून दाखल करण्यात आलेली भूमिका तसेच संस्थानकडून दाखल करण्यात आलेले परिच्छेद निहाय शेरे आणि दाखल करण्यात आलेले प्रमाणपत्र यात सुसंगती असणे आवश्यक आहे. तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने निर्णय घेऊन त्याआधारे विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्र. सांसवि- २०१३/२२/प्र.क्र.७०/का.१६, मंत्रालय मुंबई, दिनांक १७/०९/२०२० नुसार आदेश परित केलेले आहे. सदर शासनाचे निर्णयाचे आधारे सदर कर्मचा-यांना दिनांक ०२/०१/२०२० पासून संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून घेण्यात आलेले आहे.

मात्र आता, तदर्थ (Ad-hoc) समितीचे ठरावांची अंमलबजावणी करतांना वरील पार्श्वभूमीवर परस्पर विरोधी भूमिका नसावी अशी सर्वसाधारण प्रशासकीय निकड लक्षात घेऊन दि. २१ नोव्हेंबर, २०२० चे आदेशाची अंमलबजावणी करतांना प्रशासकीय अडचण निर्माण झालेली आहे. संस्थानस्तरावर तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णय आणि शासन निर्णय हे परस्पर पुरक ठरत नाहीत. सबब तदर्थ (Ad-hoc) समितीचा निर्णय अंमलबजावणी करण्यास्तव शासन स्तरावरुन याबाबत मार्गदर्शन होणेसाठी जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/२२९०/२०२० दि. २१/११/२०२० अन्वये विनंती करणेत आलेली आहे. तसेच याबाबत मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांनीही मार्गदर्शन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तथापि सदर प्रकरणी मा. महाराष्ट्र शासन व मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांचेकडून कुठलेही मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

**ड) श्री. अनिल कचरु कोते व इतर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० दि. १०/९/२०२० रोजी दाखल केलेली आहे. याबाबत-**

१) दिनांक २३/११/२०२० व दिनांक ०१/१२/२०२० रोजी सुनावणी होऊन मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी जे मौखिक निर्देश दिले त्याबाबत संस्थानचे वकील ॲड. अनिल बजाज यांनी लेखीपत्र ई-मेलव्दारे कळविले आहे-

The Writ Petition No. 6224 of 2020 was listed on board on dt. 23/11/2020 and the Hon'ble Court orally instructed the undersigned not to terminate the employment of the 598 workers who are subject matter of the present Writ petition, and again when the Writ Petition was listed on dt. 01.12.2020 the court orally instructed to maintain the status-quo.

पान ४ वर... कृ.गा.प. ...

447

The Dy. CEO Mr. Thakre & Mr. Nalge were present on the said date and are aware of the same. This is for your records and necessary actions.

२) मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे दिनांक ०८ डिसेंबर, २०२० रोजीचे सुनावणीबाबत मा. न्यायालय यांनी खालीलप्रमाणे लेखी आदेश दिलेले आहेत-

1. It is submitted that Mr.Bajaj, learned Advocate for respondent no. 2 is not well.
2. Place the mattet on 6th January 2021.

३) तसेच दिनांक ०८ डिसेंबर, २०२० रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालय यांनी दिलेल्या मौखिक निर्देशाबबत ॲड. अनिल बजाज यांनी खालीलप्रमाणे लेखीपत्र ई-मेलव्दारे कळविले आहे-

The Writ Petition No. 6224 of 2020 was listed on board on dt. 23.11.2020 and the Hon'ble Court orally instructed the undersigned not to terminate the employment of the 598 workers who are subject matter of the present Writ petition, and again when the Writ petition was listed on dt. 01.12.2020 the court orally instructed to maintain the status-quo.

That, on dt. 08.12.2020 the matter was listed again on the board and as the undersigned was not well the matter was adjourned and the Hon'ble Court has again orally instructed to follow the same orders and not to terminate the employment of 598 workers.

रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० ची उपरोक्त सद्यस्थिती मा. तदर्थ समिती समक्ष सादर करणेस तसेच सदरचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी विविध विभागांमध्ये कर्तव्यावर उपस्थितीत असल्याने त्यांना माहे नोव्हेंबर, २०२० व तदनंतरचे वेतन अदा करणेबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे दिनांक १९/१२/२०२० रोजीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता. त्यावर दिनांक १९/१२/२०२० रोजीचे मा. तदर्थ समितीचे सभेतील निर्णय क्र. ५७४ खालीलप्रमाणे झालेला आहे. " प्रस्तुत प्रकरण मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ असल्याने माहे, नोव्हेंबर व डिसेंबर, २०२० या महिन्यांचे प्रत्यक्ष कामावर हजर असलेल्या दिवसाचे किमान विहीत वेतनदरानुसार १०० टक्के आणि कोव्हीड-१९ लॉकडाऊन कालावधीतील उर्वरीत दिवस कामावर हजर नसल्याने, त्या दिवसांचे किमान विहीत वेतनदरानुसार ५० टक्के अदा करण्यास मान्यता देण्यात आली. "

मा. अध्यक्षांनी खालील मत मांडले-

सदर ५९८ व्यक्तीचा दर्जा (status) निश्चित नाही. सर्व बाबी न्यायप्रविष्ट आहेत, त्यामुळे त्यांना सानुग्रह अनुदान म्हणून माहे नोव्हेंबर व डिसेंबर-२०२० चे हजर दिवसांबाबतचे अनुदान देण्यास हरकत नसावी.

समिती सदस्या श्रीमती बनकर यांनी सदरचा विषय न्यायप्रविष्ट असलेने त्यांना सानुग्रह अनुदान देण्यास हरकत नाही असे मत मांडले.

तथापि माहे नोव्हेंबर, २०२० चे वेतन जा.क्र. एसएसएस/ साप्रशा / आस्था/ १८७१/ २०२० दिनांक ०५ जानेवारी, २०२१ नुसार ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे दिनांक १५ नोव्हेंबर, २०२० पर्यंत वेतन मा. तदर्थ समितीचे दिनांक १३/०७/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५७ प्रमाणे हजर दिवसाला पूर्ण व कामावर नसलेल्या दिवसाला अर्धवेतन तसेच दिनांक १६ नोव्हेंबर, २०२० पासून श्रींचे मंदिर भक्तांना दर्शनासाठी खुले करण्यात आले असल्याने कामाचे हजर दिवसानुसार, सानुग्रह अनुदाना प्रित्यर्थ अदा करणेबाबत आदेशित करणेत आलेले आहे. तसेच माहे डिसेंबर, २०२० चे वेतन जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/१९०६/२०२० दिनांक १३/०१/२०२१ रोजीचे आदेशानुसार दिनांक १६ नोव्हेंबर, २०२० पासून श्रींचे मंदिर भक्तांना दर्शनासाठी खुले करण्यात आले असल्याने कामाचे हजर दिवसानुसार, सानुग्रह अनुदाना प्रित्यर्थ अदा करणेबाबत आदेशित करणेत आलेले आहे.

ई) ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा संस्थान आस्थापनेवरुन कंत्राटदाराच्या आस्थापनेवर वर्ग करण्या संदर्भात जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्याच्या मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशाप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असल्याने सदरचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी विविध विभागांमध्ये कर्तव्यावर उपस्थितीत आहेत. ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना माहे ऑगष्ट, २०२० ते डिसेंबर, २०२० पर्यंतचे वेतन हे सानुग्रह अनुदानाप्रित्यार्थ (दिनांक १६ नोव्हेंबर, २०२० पासून श्रींचे मंदिर भक्तांना दर्शनासाठी खुले करण्यात आले असल्याने दिनांक १६/११/२०२० पासून कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने वेतन अदा करणेत येत आहे.) अदा करणेत आलेले आहे.

सबब ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतन रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद यांचे अंतिम आदेशापर्यंत कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने अदा करणेसाठीचे मान्यतेसाठी दिनांक २८/०१/२०२१ रोजी मा. तदर्थ समितीचे सभेपुढे

पान ५ वर....कृ.मा.प. .. ..

चक्रीय पध्दतीने प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्यावर मा. अध्यक्ष साहेब यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ. औरंगाबाद, येथे दाखल करणेत आलेले ॲफिडयुटची प्रत सादर करणेबाबत मौखीक निर्देश दिलेले होते.

दिनांक १६/०२/२०२१ रोजी कामगार विभागामार्फत सन २०२१-२२ करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविणेकामी फेरप्रस्ताव सादर करणेस व निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आहे त्या कॉन्ट्रक्टर्स यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर केला होता. सदरचे प्रस्तावाबाबत मा. अध्यक्ष साहेब यांनी 'माहे जानेवारी २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेण्यात आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतन अदा करणेबाबतच्या दि. २८/०१/२०२१ रोजीच्या प्रस्तावावर मा. उच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिकेची प्रत व त्यामध्ये संस्थान प्रशासनाने व शासनाने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत सदरहू विषयाच्या अनुषंगाने निर्णय घेण्याकरता अवलोकनासाठी हजर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सोबत दिनांक १६/०२/२०२१ रोजीचे चक्रीय पध्दतीचे निर्णयाची प्रत सोबत अवलोकनार्थ सादर केलेली आहे.

त्यानुसार दिनांक २०/०२/२०२१ रोजी मा. अध्यक्ष साहेब यांनी मागविलेले सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती अवलोकनार्थ सादर केलेल्या आहेत. मा. अध्यक्ष साहेब यांचेकडे प्र. आस्थापना विभाग प्रमुख ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतनाबाबतच्या चक्रीय पध्दतीचे विषयाबाबतचे निर्णयार्थ अहमदनगर येथे दिनांक २३/०२/२०२१ रोजी जाऊन आलेले आहेत. तथापि ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतनाबाबत दिनांक २४/०२/२०२१ पर्यंत निर्णय झालेला नसल्याने.

The payment of wages Act 1936 नियम ५ मध्ये वेतनाबाबत पुढील प्रमाणे तरतुद आहे-

(c) Any railway, factory or industrial or other establishment upon or in which less than one thousand persons are employed, shall be paid before expiry of the seventh day.

(d) Any other railway, factory or industrial or other establishment, shall be paid before the expiry of the tenth day.

तसेच दिनांक १७/०२/२०२१ रोजीचे अर्जान्वये श्री अविनाश बाबासाहेब जगताप व इतर ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांनी त्यांना वेतन न मिळाल्याने त्यांचे कुटूंबाला आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे घरात कौटुंबिक कलह निर्माण होत असलेमुळे वेतन मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

उपरोक्त सर्वबाबींचे अवलोकन करुन ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतन रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे अंतिम आदेशापर्यंत कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने अदा करणे विधीवत व अनिवार्य आहे. सदरची बाब मा. तदर्थ समिती अध्यक्ष व सदस्य यांना उक्त विवेचणासह माहितीस्तव तथा अवलोकनार्थ जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ३६९६ /२०२१ दि. २४/०२/२०२१ रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आलेली आहे.

उ) माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतन अदा करणेबाबत दिनांक २५/०२/२०२१ रोजी चक्रीय पध्दतीने खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

(१) दिनांक २५/०२/२०२१ रोजची चक्रीय पध्दतीचे निर्णयातील मुद्दा क्र. ५ मध्ये मा. श्रीकांत एल. आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर, तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

आज संस्थान प्रशासनाने काही बाबी नमूद करुन ५९८ कर्मचा-यांना त्यांचे वेतन देण्याबाबत ब-याच बाबींचा अहापोह केलेला आहे. मुलतः सदर ५९८ कर्मचा-यांचे status स्पष्ट नसल्याने त्यांच्या बाबतीत वेतन हा शब्दच अयोग्य आहे आणि म्हणूनच आजपर्यंत सदर कर्मचा-यांनी दिलेल्या सेवेबाबत त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे व अशे अनुदान मा. उच्च न्यायालयाचे मंजूर केलेले आहे. अशा परिस्थितीत सरसकट वेतन हा शब्द न वापरुन त्यांना दरमहा केलेल्या कामाचा मेहनताना देणे व ही बाब वेळोवेळी ठरविणे, हेच योग्य आहे, कारण सर्व बाबी मा. उच्च न्यायालयासमक्ष न्यायप्रविष्ट आहेत. म्हणूनच संस्थान प्रशासन सुध्दा दि. २८/०१/२०२१ च्या प्रस्तावामध्ये सदर ५९८ कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अदा करण्याबाबत मान्यता मागत आहे, जी देणेत येत आहे. करिता सदर ५९८ कर्मचा-यांना माहे जानेवारी, २०२१ व फेब्रुवारी, २०२१ मध्ये त्यांनी काम केलेले असल्यास त्यांनी केलेल्या कामाचा मेहनताना मानवतेच्या दृष्टीकोनतून सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहून देण्यास माझी मान्यता आहे.

(२) दिनांक २८/०१/२०२१ रोजीचे चक्रीय पध्दतीचे विषय सादर करतांना श्री. कान्हूराज बगाटे, (भा.प्र.से), मा. मुख्य कार्यकारी अधिका-तथा-सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती, यांचा निर्णय खालीलप्रामणे –

पान ६ वर ... कृ.मा.प. ....

५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंरचे वेतन रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद यांचे अंतिम आदेशापर्यंत कामाचे हजर दिवासानुसार विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

(३) दिनांक २५/०२/२०२१ रोजची चक्रीय पध्दतीचे निर्णयाबाबत दिनांक २७/०२/२०२१ रोजी श्री. भानुदास ह. पालवे, अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक-तथा-सदस्य तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

मा. उच्च न्यायालयाचे मान्यतेस अधिन राहून माह जाने, २०२१ व माहे फेब्रु, २०२१ या महिन्याचे महेनताना सानुग्रह अनुदान म्हणून मंजुरीस माझी हरकत नाही.

(४) दिनांक २५/०२/२०२१ रोजची चक्रीय पध्दतीचे निर्णयाबाबत दिनांक ०८/०३/२०२१ रोजी श्रीमती गिता पी. बनकर, सहा. धर्मदाय आयुक्त, अहमदनगर-तथा-सदस्य तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

संस्थान मार्फत सादर करण्यात आलेला प्रस्ताव वाचला. प्रस्ताव, मा. सदस्य अप्पर आयुक्त नाशिक यांचा अभिप्राय तसेच मा. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांचा अभिप्राय वाचला. संस्थानमार्फत सादर करण्यात आलेल्या विषयाचे अवलोकन केले असता त्यामध्ये कंत्राटी कर्मचारी व वेतन अशा शब्दप्रयोग केल्याचे दिसून येते. त्यामुळे ५९८ कर्मचा-याची स्थिती status अद्याप स्पष्ट न झाल्यामुळे त्यांच्याबाबत वेतन हा शब्द वापरणे अयोग्य आहे.

त्यामुळे त्यांना सानुग्रह मेहनताना हा शब्द वापरणे उचित होईल. याबाबत मा. उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असणा-या न्यायप्रविष्ठ बाबींच्या आदेशास अधिन राहून मान्यता देण्यास हरकत नाही.

त्यानुसार ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे, जानेवारी, २०२१ व माहे फेब्रुवारी, २०२१ चे वेतन सानुग्रह अनुदानाप्रित्यार्थ अदा करणेस जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/ २२६०/२०२१ दिनांक २५/०२/२०२१ नुसार आदेश पारित करणेत आलेले आहे.

ऊ) मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट पिटीशिन ६२२४/२०२० बाबत दिनांक २२ मार्च, २०२१ रोजी खालीलप्रमाणे आदेशीत केलेले आहे.

1. The objection is regarding court fees. The petitioner shall comply the objection of deficit court fees.
2. Stand over to 05.04.2021.

आता, माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी माहे मार्च, २०२१ मध्ये विविध विभागांमध्ये कर्तव्यावर उपस्थितीत आहेत. त्यामुळे त्यांचे माहे मार्च, २०२१ चे वेतन कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ अदा करावे लागणार आहे.

विभागाचा प्रस्ताव-

५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे मार्च, २०२१ चे वेतन कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ अदा करणेच्या मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सविनय सादर.

29/3/21

( कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

पान ७ वर ....कृ.मा.प. .. ..

# मा. तदर्थ समिती निर्णय

५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे मार्च, २०२१ चे वेतन कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

५९८ कर्मचाऱ्यांना मार्च २०२१ मध्ये केलेल्या कामाचा मेहनताना सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाच्या आदेशास अधिन राहून मंजूरी देणेस हरकत नाही.
15/04/2021

(श्रीमती गिता पी. बनकर)
सहा. धर्मादाय आयुक्त , अहमदनगर तथा
सदस्य , तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

५९८ कर्मचाऱ्यांना मार्च २०२१ मध्ये केलेल्या कामाचा मेहनताना सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाच्या आदेशास अधिन राहून मंजूर करणेस हरकत नाही.
7/4/2021

(भानुदास ह. पालवे)
अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक, तथा
सदस्य , तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा
सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर. तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

चक्रीय पध्दतीने आणलेल्या विषयावर निर्णय

451

दि. 07/04/2021

विषय – माहे जानेवारी, 2020 मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या 598 कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे मार्च, 2021 चे वेतन सानुग्रह अनुदान म्हणून अदा करणेबाबत...

पूर्वीच्या निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे मुलतः सदर 598 कर्मचा-यांचे status स्पष्ट नसल्याने त्यांच्या बाबतीत 'वेतन' हा शब्दच अयोग्य आहे आणि म्हणूनच आजपर्यंत सदर कर्मचा-यांनी दिलेल्या सेवेबाबत त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे व असे अनुदान मा. उच्च न्यायालयाने मंजूर केलेले आहे. अशा परिस्थितीत सदर 598 कर्मचा-यांना, माहे मार्च 2021 मध्ये काम केलेले असल्यास त्यांना केलेल्या कामाचा मेहनताना मानवतेच्या दृष्टीकोनातून सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहून देण्यास माझी मान्यता आहे.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 07/04/2021

विषय क्र.- 9 | 990

(5)

**मा.तदर्थ समितीचे समोर चक्रीय पध्दतीने मान्यतेस्तव**

(सामान्य प्रशासन विभाग)

**विषय:- ५९८ संस्थान कंत्राटी कर्मचारी यांनी मा.उच्च न्यायालय येथे दाखल केलेली रीट पिटीशन क्र.६२२४/२०२० मधील दि.६.१.२०२१ रोजीचे सुनावणीदरम्यान मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार कार्यवाही करणेबाबत..**

**अ) प्रस्तावना-** मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी **" श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत..."** या शिर्षाखाली शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३/२२/प्र.क्र.७०/का.१६, दि.१७ सप्टेंबर, २०१९ अन्वये शासन निर्णय पारित केलेला आहे.

उपरोक्त शासन निर्णयास अनुसरून, दिनांक २३ मे, २०१९ रोजीचे कामगार विभागाकडील टिपणी वजा पत्रासोबत प्राप्त झालेल्या ६३५ कर्मचा-यांचे यादीनुसार, त्यामध्ये समाविष्ठ असणारे कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगस्ट, २००४ अखेर हजर असलेले) मधील हजर दिवसांची तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करून जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/२२००/(०१ते ६३५)/२०१९, दिनांक ०२ जानेवारी, २०२० अन्वये नेमणूक आदेश देण्यात आलेला होता. सदरचे नियुक्ती आदेशानुसार ५९८ कर्मचारी कामावर हजर झालेले आहेत.

सदरचे कर्मचा-यांचे सदर्भात मा. तदर्थ समितीचे **दिनांक १३ जुलै,२०२०** रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करणेत आला होता त्यावर **निर्णय क्रमांक ३६०** नुसार सदरचे ५९८ कंत्राटी कर्मचा-यांना देणेत आलेली नियुक्ती आदेश दिनांक ३१ जुलै, २०२० अखेरपासून रद्द करणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यामुळे श्री. अनिल कचरु कोते व इतर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० दाखल केले. सदर रिट पिटीशन मध्ये श्री अनिल कोते व इतर यांनी मा. तदर्थ समितीचे दिनांक १३/०७/२०२० रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ३६० रद्द करणेस तसेच त्यावर कोणतीही कार्यवाही न करणेबाबत विनंती केलेली आहे. सदरचे केसमध्ये महाराष्ट्र शासन व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना प्रतिवादी करण्यात आलेले आहे. या केसमध्ये संस्थानने आपले प्रतिज्ञापत्राव्दारे म्हणणे दि.०४/११/२०२० रोजी मा. उच्च न्यायालयात सादर केले आहे. महाराष्ट्र शासनानेही सदर प्रकरणामध्ये प्रतिज्ञापत्राव्दारे आपले म्हणणे दाखल केले आहे.

मा.उच्च न्यायालयात दि.६.१.२०२१ रोजी रिट पिटीशन क्र.६२२४/२०२० बाबत सुनावणी झालेली असून पुढील सुनावणी दि.१२.१.२०२१ रोजी होणार आहे.

**दि.६.१.२०२१ रोजी मा.उच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान खालील मुद्दाबाबतची माहिती पुढील सुनावणीचे अगोदर ॲफेडेव्हीट (शपथपत्र) द्वारे कोर्टात सादर करण्याचे तोंडी निर्देश दिलेले आहेत, तसेच याबाबत ॲड.बजाज यांनी दि.७.१.२०२१ रोजीचे ई मेल द्वारेही कळविलेले आहे.**

**मुद्दा क्र.०१- माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी हे ज्या कॉन्ट्रक्टर मार्फत कामावर होते ते कॉन्ट्रक्टर सध्या कार्यरत आहेत काय ?**

सन २०१९-२० मध्ये कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेबाबत (१) मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे (कालावधी दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२०), (२) मे.मॉडर्न फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे (कालावधी

दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२०) (३) मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिस्टीम ऑण्ड सर्व्हिसेस, मुंबई (कालावधी मुदतवाढीसह दि.१०.६.२०१८ ते दि.२९.०२.२०२०) हे कंत्राटदार कार्यरत होते. सद्यःस्थितीत फक्त मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे हे कॉन्ट्रक्टर सध्या कार्यरत आहेत.

**मुद्दा क्र.०२ – जर त्या कॉन्ट्रक्टरला सांगितले तर ते या कर्मचा-यांना पुन्हा स्वत:कडे घेऊन संस्थानकडे पाठवतील काय?**

अभिप्राय नाहीत कारण पुर्वीच्या कॉन्ट्रक्टरचा करार कालावधी संपलेला आहे.

**मुद्दा क्र.०३ – माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी हे ज्या कॉन्ट्रक्टर मार्फत कामावर होते ते कॉन्ट्रक्टर नसतील तर सध्या ते कॉन्ट्रक्टर आहे किंवा येतील त्या कॉन्ट्रक्टरमार्फत सदरचे ५९८ कंत्राटी कर्मचा-यांना संस्थानकडे घेता येईल काय?**

सध्या संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल व कुशल कर्मचारी पुरविणेबाबत कार्यादेश देण्यात आलेले आहेत. तथापी सदर बाब ही कॉन्ट्रक्टर यांचेवर अवलंबून आहे.

**मुद्दा क्र.०४- महाराष्ट्र शासन यांनी पारीत केलेला दि.१७ सप्टेंबर, २०१९ रोजीचे निर्णयानुसार कंत्राटी कर्मचा-यांना संस्थानमार्फत घेणेकामी काय कार्यवाही सुरू आहे?**

मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३ /२२/प्र.क्र.७०/का.१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ अन्वये पारित केलेल्या शासन निर्णयास अनुसरुन सदरचे ५९८ कर्मचारी यांना संस्थानचे आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून ११ महिन्याचे कालावधीकरीता देण्यात आलेली नेमणूक कालावधी ०१ डिसेंबर, २०२० रोजी संपुष्टात आलेला आहे. परंतु, श्री. अनिल कचरु कोते व इतर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या तोंडी निर्देशानुसार ५९८ कंत्राटी कर्मचारी यांना ११ महिन्यांचा कालावधी पुर्ण झालेनंतर त्यांना सेवा खंड देता आलेला नाही.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेकरीता कंत्राटी कर्मचारी पुरविणेकरीता नेमण्यात आलेल्या कॉन्ट्रक्टरचे कार्यादेशातील सध्याची मंजुर कंत्राटी कर्मचारी संख्या २०२५ आहे. सदरचे कॉन्ट्रक्टर यांचे होणारे बिलावर १८% G.S.T. आदा करावा लागतो. त्यानुसार सदरचे ५९८ कंत्राटी कर्मचा-यांना ठेकेदारामार्फत वेतन अदा करतांना द्याव्या लागणा-या वार्षीक साधारणत: १.५० कोटी रूपये पेक्षा जास्त G.S.T. रकमेची बचत झालेली आहे.

तथापी सदरचा ठराव तदर्थ समितीने केलेला असल्याने या परिस्थितीत ११ महिन्याचा करार खंडीत न झाल्याने ५९८ कर्मचा-यांचे कायमचे उत्तरदायीत्व संस्थानवर येणार आहे. ६३५ कामगारांना संस्थान आस्थपनेवर घेण्याबाबत अधिनियमातील तरतुदीनुसार शासन नियुक्त व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयाचा आधारे शासनाकडुन शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. त्यामुळे तदर्थ समितीने सदर निर्णय पुनर्विलोकनात घेण्याची आवश्यकता नव्हती असे प्रतिपादन असि.सॉलीसिटर जनरल यांनी मा. उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्राव्दारे केलेले आहे.

प्रस्ताव-

१. माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर सामावून घेणेत आलेल्या ५१८ कायम कंत्राटी कर्मचारी यांची दि.१७.०९.२०१९ चे शासन निर्णयाप्रमाणे ११ महिने कालावधीसाठी विहित अटी व शर्ती नुसार पुर्नेमणूक देणेसाठी.

२. मा.उच्च न्यायालयाने दि.६.१.२०२१ रोजी दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तावात नमूद ०१ ते ०४ मुद्दांमध्ये नमूद तपशिलाप्रमाणे मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे शपथपत्र सादर करणे.

उपरोक्त प्रस्तावातील मुद्दा क्र.०१ नुसार कार्यवाही करण्यास व मुद्दा क्र.२ नुसार मा.उच्च न्यायालयात शपथपत्र सादर करणेसाठी मान्यता मिळणेकरीता प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर त्रिक्रिय पध्दतीने सविनय सादर.

8/1/2021

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

## मा. तदर्थ समिती निर्णय

दिनांक -

विषयांकित प्रस्तावात नमूद केलेली वस्तुःस्थिती विचारात घेता, माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर सामावून घेणेत आलेल्या ५१८ कायम कंत्राटी कर्मचारी यांची दि.१७.०९.२०१९ चे शासन निर्णयाप्रमाणे सेवा खंडीत करून विहित अटी व शर्ती नूसार पुर्नःनेमणूक देणेत येत आहे व मा.उच्च न्यायालयाने दि.६.१.२०२१ रोजी दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तावात नमूद ०१ ते ०४ मुद्दांमध्ये नमूद तपशिलाप्रमाणे मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे शपथपत्र सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(श्रीमती गीता बनकर)
सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
तथा सदस्या, मा. तदर्थ समिती

(भानुदास पालवे) 12/1/2021
अपर महसुल विभागीय महसुल आयुक्त, नाशिक
तथा सदस्य, मा.तदर्थ समिती

8/1/2021

(कान्हूराज बगाटे, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
तथा सदस्य सचिव, मा. तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुखजिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
तथा- अध्यक्ष, तदर्थ समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

(8) 455

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय
दि. 11/01/2021

विषय – **598 संस्थान कंत्राटी कर्मचारी यांनी मा. उच्च न्यायालय येथे दाखल केलेली रीट पिटीशन क्र. 6224/2020 मधील दि. 06/01/2021 रोजीचे सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार कार्यवाही करणेबाबत...**

याबाबत तदर्थ समितीचे अध्यक्ष तसेच सदस्या श्रीमती बनकर यांनी एकत्र चर्चेअंती खालील मत मांडले.

1) अभिलेखावरुन असे दिसून येते की, तदर्थ समितीसमक्ष दि. 13/7/2020च्या बैठकीत विषय क्र.6(ब) हा ठेवण्यात आला होता. वरील विषय हा विषय क्र. 6(अ) च्या विषयाच्या निर्णयावर अवलंबून होता. म्हणजेच विषय क्र. 6(अ) मंजूर झाल्यास 6(ब) बाबत निर्णय घेणे तदर्थ समितीला आवश्यक होते.

2) अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रस्तावक्र.6(अ) हा नामंजूर झाला, म्हणजेच संस्थान प्रशासनाने आणलेला 598 कर्मचारी संस्थान सेवेत कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणे हा प्रस्ताव अमान्य करण्यात आला. त्यामुळे तदर्थ समितीला प्रस्ताव क्र. 6(ब) वर निर्णय घेण्याचे कारण नव्हते.

3) मुद्दा क्र. 1 चे उत्तर हे सदर प्रस्ताव क्र. 6(ब) मध्ये दडलेले आहे. सदर विषयीची ( दि. 13/07/2020 च्या बैठकीच्या बुकलेट मधील पान नं. 29 वर) खालील बाब नमूद आहेः-

*'कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरविणेसाठी मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सर्व्हिसेस, मुंबई कामगार विभागाकडील जावक क्र. एसएसएस/वशी-7ए/650/2018, दि. 08/06/2018 नुसार 815 सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेबाबत दिलेले आहेत. सदर ठेक्याचा कालावधी दि. 10/06/2018 ते 29/02/2020 अखेर पर्यंत होता. तदनंतर मे. मॉर्डर विर रेस सिक्युरिटी, पुणे व मे.ईगल हंटर सोल्युशन लि. दिल्ली यांना दि. 01/03/2020 पासून नव्याने कार्यादेश विभागून देणेत आलेला आहे. यामध्ये संरक्षण विभागाकडे 145 कंत्राटी कामगार दि. 02/01/2020 च्या आदेशान्वये कायम कंत्राटी म्हणून संस्थान आस्थापनेकडे वर्ग झालेले आहेत. तथापि, संरक्षण विभागाकडे 145 कामगार संख्या कमी करण्याऐवजी वर नमूद केले प्रमाणे 24 पॉईंट वाढल्याने 121 कामगारांची संख्या कमी करुन त्यांना 694 कामगार पुरविणे बाबतचा आदेश मे. मॉडर्न विर रेस सिक्युरिटी, पुणे यांना 353 व मे. ईगल हंटर सोल्युशन*

*लि. दिल्ली यांना 341 याप्रमाणे देण्यात आलेला आहे. त्यानुसारच करारनामा केलेला आहे आणि त्याप्रमाणे कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरवीत आहेत.'*

4) वर नमूद केले प्रमाणे हे स्पष्ट होईल की, 598 पैकी 145 कंत्राटी कर्मचारी हे वर नमूद केलेले मे. मॉडर्न विर रेस सिक्युरिटी,पुणे व मे. ईगल हंटर सोल्युशन लि. दिल्ली यांना दि. 01/03/2020 पासून पुढे दिलेल्या नव्या कार्यादेशात समाविष्ट आहेत. म्हणजे आजही सदर 145 कर्मचारी सदरचे मे. मॉडर्न विर रेस सिक्युरिटी,पुणे व मे. ईगल हंटर सोल्युशन लि. दिल्ली हे आजही कार्यरत आहेत व दि. 01/03/2020 पासून 11 महिन्यांसाठी त्यांचा कार्यादेश अस्तित्वात आहे.

5) वरप्रमाणे 598 कर्मचा-यांपैकी 145 वजा जाता उर्वरीत 453 पैकी सदर विषय क्र. 6(ब) मध्ये नमूद केलेप्रमाणे संरक्षण विभागातील 145 कर्मचारी संख्या कमी न करता 24 पॉईंट वाढल्याने 121 कामगारांची फक्त संख्या कमी करुन पुन्हा 694 कामगार पुरविण्याचा आदेश मे. मॉडर्न विर रेस सिक्युरिटी,पुणे यांना 353 व मे. ईगल हंटर सोल्युशन लि. दिल्ली यांना 341 प्रमाणे देण्यात आलेला आहे. म्हणजेच आजही सदर कंत्राटदार कार्यरत आहेत.

6) म्हणूनच मे. मॉडर्न फॅसिलीटी मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे यांना पुढील कार्यादेशासाठी निविदेत मंजूर 892 ऐवजी वर नमूद 145 कर्मचारी कमी करुन 747 एवढी संख्या करण्याचा प्रस्ताव दिला होता. (मात्र विषय क्र. 6(अ) नामंजूर झाल्याने सदर प्रस्ताव मान्य करण्यात आला नाही.) 598 पैकी उर्वरीत कर्मचा-यांबाबत हे स्पष्टपणे दिसून येते की, मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे यांना दि. 03 जुलै 2020 च्या पत्राद्वारे कर्मचारी मंजुरी संख्या 892 मधून 308 कर्मचारी कमी करुन (ज्यांना दि. 02/01/2020 रोजीच्या आदेशान्वये संस्थान प्रशासनाने कंत्राटी पध्दतीने घेण्यात आले) फक्त 584 मंजूर संख्या देण्यात आली. (वर नमूद केल्याप्रमाणे प्रस्ताव क्र. 6(अ) अमान्य झाल्याने 6(ब) वर निर्णय घेणे गरजेचे नव्हते.)

7) या ठिकाणी हे नमूद करणे जरुरीचे आहे की, दि. 13/07/2020 च्या बैठकीतील निर्णय क्र. 6(अ) मध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहेः-

*"The Committee has also resolved to extend liberty to the Sansthan to submit proposal in this regard as per their choice after due study of various Government Resolutions issued by the Government."*

8) मात्र वर नमूद केलेल्या संधीप्रमाणे आजपर्यंत सदर 598 कर्मचा-यांबाबत संस्थान प्रशासनाने कुठलाही प्रस्ताव आणलेला नाही.

9) **वर नमूद केलेप्रमाणे 598 कर्मचा-यांबाबत त्यांना पुन्हा संबंधीत कॉन्ट्रॅक्टर/ ठेकेदाराकडे वर्ग करणे आवश्यक असल्यानेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. 21 नोव्हेंबर 2020 रोजीचा जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/1519/2020 प्रमाणे खालील** आदेश पारीत केलेला आहे:-

*वाचा- 01. जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/2200/(01ते 631)/2019, दिनांक 02 जानेवारी, 2020. कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचारी यांना देणेत आलेले नियुक्ती आदेश.*

*02. मा. तदर्थ समितीचे दि. 13 जुलै, 2020 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 360.*

*03. मा. तदर्थसमितीचे दि. 28 ऑगस्ट, 2020 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 421.*

<u>आदेश</u>

*वाचा क्र. 02 व 03 मधील तदर्थ समितीचे निर्णयानुसार संस्थान आस्थापनेवरील कायम कंत्राटी कामगारांच्या सेवा पुन्हा कंत्राटदाराकडे वर्ग करणे आवश्यक आहे.*

*त्यानुसार उपरोक्त वाचा क्र. 01 अन्वये श्री. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवर घेण्यात आलेले 598 कायम कंत्राटी कर्मचारी (कुशल व अकुशल) यांना देण्यात आलेले नियुक्ती आदेश या आदेशान्वये दि. 01 नोव्हेंबर, 2020 पासून रद्द करण्यात येत आहेत.*

*तसेच दि. 01 नोव्हेंबर, 2020 पासून सदर कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा वाचा क्र. 01 च्या नियुक्ती आदेशापूर्वी ज्या कंत्राटदाराकडे कार्यरत होते त्याच कंत्राटदाराकडे कंत्राटी कामगार म्हणून वर्ग करणेत येत आहेत.*

*सदर आदेशाची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.'*

10) वरील अभिलेख स्पष्ट असतांनाही सदर विषयाची टिपणी तदर्थ समिती समोर मांडत असतांना -

**मुद्दा क्र. 2 – जर त्या कॉन्ट्रॅक्टरला सांगितले तर ते या कर्मचा-यांना पुन्हा स्वत:कडे घेवून संस्थानकडे पाठवतील काय?**

अभिप्राय नाहीत कारण पूर्वीच्या कॉन्ट्रॅक्टरचा करार कालावधी संपलेला अहे.

व

**मुद्दा क्र. 3- माह जानेवारी, 2020 मध्ये संस्थान आस्थापनेवर सामावून घेणेत आलेल्या 598 कायम कंत्राटी कर्मचारी हे ज्या कॉन्ट्रॅक्टर मार्फत कामावर होते ते कॉन्ट्रॅक्टर नसतील तर सद्या ते कॉन्ट्रॅक्टर आहेत किंवा येतील त्या कॉन्ट्रॅक्टरमार्फत सदरचे 598 कंत्राटी कर्मचा-यांना संस्थानकडे घेता येईल का ?**

सध्या संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल व कुशल कर्मचारी पुरविणेबाबत कार्यादेश देण्यात आलेले आहेत. तथापि, सदर बाब ही कॉन्ट्रॅक्टर यांचेवर अवलंबून आहे.

असे का नमूद केले आहे, हे स्पष्ट केलेले नाही.

11) येथे असेही नमूद करणे गरजेचे आहे की, सदर 598 कर्मचा-यांची संख्या पुन्हा पुढील कालावधीसाठी निविदा देण्यासाठी समाविष्ट केलेली आहे. याचे उदाहरण म्हणजे दि. 24/12/2020 रोजी चक्रीय पध्दतीने आणलेला विषय. ज्यामध्ये वर नमूद 598 कर्मचा-यां पैकी संरक्षण विभागाकडे वर्ग करण्यात आलेले 145 कर्मचारी संस्थान प्रशासनाला दोन्हीकडे म्हणजेच आकृतीबंधातील कंत्राटी कर्मचा-यांमध्ये तसेच कंत्राटदारांतर्फे घेण्यात आलेल्या कर्मचा-यांमध्ये समाविष्ट करुन हवी होती. दि. 24/12/2020 रोजीच्या सदरच्या विषयावर वर नमूद आक्षेप घेवून सदर 145 कर्मचा-यांची संख्या दोन्हीकडे समाविष्ट केल्यास शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधातील संख्येच्या अतिरिक्त संख्या होत असल्याने मा. उच्च न्यायालयाचे निर्देशास अधीन राहून सदर प्रस्ताव मंजूर केला होता. म्हणूनच सदर 598 कर्मचारी आजही अस्तित्वात असलेल्या कंत्राटदाराकडे वर्ग होवू शकतात.

12) जर मा. उच्च न्यायालयाने पूर्वीच्या कंत्राटदाराकडे सदर 598 कर्मचारी वर्ग होवू शकतात का?, अशी विचारणा केली असेल तर मा. उच्च न्यायालयासमोर या सर्व बाबी पारदर्शकरित्या स्पष्ट करणे गरजेचे आहे.

13) अभिलेखावरुन हे स्पष्ट होते की, सन 2021साठी कामगार पुरवणेचा पुरवठा आदेश हा मे. बी.व्ही.जी.इंडिया लि., मे. मॉडर्न विर रेस सिक्युरिटी, पुणे, मे. ईगल हंटर सोल्युशन लि. दिल्ली तसेच मे.सुमीत फॅसिलीटी लि. पुणे यांना दिलेला आहे.

14) वर नमूद केलेप्रमाणे मे. बी.व्ही.जी.इंडिया लि., मे. मॉडर्न विर रेस सिक्युरिटी, पुणे, मे. ईगल हंटर सोल्युशन लि. दिल्ली यांना दिलेल्या कार्यादेशात सदर 598 कर्मचा-यांची संख्या अंतर्भुत आहे. याच कारणाने कदाचित मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. 21 नोव्हेंबर, 2020 रोजी आदेश क्र. जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/1519/2020 हा काढला.

15) वरील आदेशाचे मूळ हे मे. सुमीत फॅसिलीटी लि. पुणे यांना दिलेल्या तसेच मे. बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे यांना दिलेल्या कार्यादेशातील खालील अटी व शर्तींवरुन स्पष्ट होते:-

*टिप-तथापि, जा.नं.एसएसएस/वशी-आस्था/2200/2020, दि. 02/01/2020 रोजीच्या आदेशान्वये सन 2001 ते 2004 अखेर ठेकेदारामार्फत कामास असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांपैकी 598 कंत्राटी कर्मचा-यांना 7 ऑगस्ट,2009 च्या आकृतीबंधातील मंजूर कंत्राटी पदांवर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्यात आलेली असल्याने, सदर 598 कंत्राटी कर्मचा-यांपैकी पूर्वी आपल्या एजन्सीकडे असलेल्या विभागाकडील कंत्राटी कर्मचा-यांना पूर्ववत आपणाकडे वर्ग करावयाचे ठरल्यास, तेवढया संख्येने कंत्राटी कर्मचारी पुरविणे आपणावर बंधनकारक राहील. संस्थान मधील संबंधीत विभागाचे (अधीक्षक/विभाग प्रमुखांच्या) मागणीनुसार व आवश्यकतेनुसार वेळोवेळी उपरोक्त प्रमाणे कंत्राटी पध्दतीने पुरवावयाचे अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचा-यांचे संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे. त्याप्रमाणे पुरेसे संख्येने कंत्राटी कर्मचारी पुरविणे तुमचेवर बंधनकारक आहे.*
*(सदर दि. 31 डिसेंबर 2020 रोजीची जा.नं.एसएसएस/वशी-7ए/2897/2020 व जा.नं.एसएसएस/वशी-7ए/2896/2020 पत्र या चक्रीय पध्दतीने आम्ही घेतलेल्या या निर्णयाचा भाग समजावा.)*

वरील अभिलेख असतांना टिपणीमध्ये दिशाभूल करणारी बाब का नमूद केली याचे आकलन आम्हाला झालेले नाही.

16) दिनांक 17/09/2019 रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे कंत्राटी पदावर कर्मचारी नेमणूक करण्याबाबत अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली होती. त्यांतील प्रमुख अट ही दि. 07.08.2009 रोजीच्या शासन निर्णयाने मंजूर केलेल्या आकृतीबंधाने नियुक्ती करणे अपेक्षित होते.

17) सदर नमूद आकृतीबंधात संस्थान प्रशासनाने मुख्यत्वेकरुन खालील बाबी पूर्ण करण्याच्या होत्या:-

(1) पदनिहाय सेवा प्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी.

(2) सदर सेवा प्रवेश नियमामध्ये प्रत्येक पदाची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी इत्यादि बाबी, पदोन्नती साखळीही स्पष्ट करावी.

(3) नियुक्ती करण्यापूर्वी पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देवून स्पर्धात्मक परीक्षा घेवून नियुक्ती करावी.

(4) आकृतीबंधाबाहेर जावून पद भरती करता येणार नाही.

(5) शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रीत मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी.

या ठिकाणी नमूद करणे गरजेचे आहे की, तदर्थ समितीसमक्ष दि. 19/12/2020 च्या बैठकीत सेवा प्रवेश नियम मान्यतेसाठी ठेवले होते. परंतु वेळे अभावी त्यावर निर्णय झालेला नाही. आजपर्यंत वर नमूद केलेल्या महत्वाच्या अटी व शर्तींचा पूर्ततेकामी तदर्थ समितीसमक्ष कुठलाही विषय आणलेला नाही.

18) आकृतीबंधातील पदे एकत्रीत मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरणेकामी तदर्थ समिती समक्ष **शासन निर्णय क्र. एसआरव्ही 2017/प्र.क्र.455/कार्या.12, दिनांक 09 फेब्रुवारी,2018** (प्रत सोबत जोडली आहे) प्रमाणे पुर्तता करुन कुठलाही प्रस्ताव आजपर्यंत सादर करण्यात आलेला नाही. करिता प्रस्ताव क्रमांक 1 नामंजूर.

19) तसेच आमचे मते टिपणीमध्ये नमूद केले प्रमाणे संस्थानला जीएसटी द्यावी लागल्याची बाब ही कायदेशीर पुर्तता या अनुषंगाने असून संस्थानवर त्यामुळे आर्थिक बोजा पडला असे म्हणणे सर्वथा चुकीचे आहे. तसेच टिपणीत नमूद प्रमाणे मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या तोंडी निर्देशानुसार 11 महिन्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर सदर कर्मचा-यांना सेवाखंड देता आला नाही, हे अनुचितरित्या ध्वनित केले आहे. कारण कायद्याचे तत्व ***actus curia neminem gravabit*** म्हणजेच **The act of Court will never prejudice anyone.** त्यामुळे मा. उच्च

न्यायालयाने दिलेला मौखिक आदेश निर्णयाच्या आड आला, असे ध्वनित करणे सर्वथा अयोग्य आहे.

20) मुद्दा क्र. 1- माहे जानेवारी, 2020 मध्ये संस्थान आस्थापनेवर सामावून घेणेत आलेल्या 598 कायम कंत्राटी कर्मचारी हे ज्या कॉन्ट्रॅक्टर मार्फत कामावर होते ते कॉन्ट्रॅक्टर सध्या कार्यरत आहेत काय ?

अभिलेखाप्रमाणे आमचेतर्फे नामंजूर.

मुद्दा क्र. 2 – जर त्या कॉन्ट्रॅक्टरला सांगितले तर ते या कर्मचा-यांना पुन्हा स्वत:कडे घेवून संस्थानकडे पाठवतील काय?

व

मुद्दा क्र. 3- माहे जानेवारी, 2020 मध्ये संस्थान आस्थापनेवर सामावून घेणेत आलेल्या 598 कायम कंत्राटी कर्मचारी हे ज्या कॉन्ट्रॅक्टर मार्फत कामावर होते ते कॉन्ट्रॅक्टर नसतील तर सद्या ते कॉन्ट्रॅक्टर आहेत किंवा येतील त्या कॉन्ट्रॅक्टरमार्फत सदरचे 598 कंत्राटी कर्मचा-यांना संस्थानकडे घेता येईल का ?

मुद्दा क्र. 2 व 3 –सध्या असलेले कॉन्ट्रॅक्टर्स पुन्हा या कर्मचा-यांना स्वत:कडे घेवून संस्थानकडे पाठवतील, तशी अट त्यांच्या कार्यादेशात आहे व तसा आदेश मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेला आहे.

वरीलप्रमाणे अध्यक्ष व सदस्या यांचा निर्णय मा. उच्च न्यायालयासमक्ष मांडावा.

मुद्दा क्र.4 महाराष्ट्र शासन यांनी पारीत केलेला दि. 17 सप्टेंबर 2019 रोजीचे निर्णयानुसार कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान मार्फत घेणेकामी काय कार्यवाही सुरु आहे?

दि. 17/09/20219 चा शासन निर्णय, ज्या दिनांक 07/08/2009 रोजीच्या आकृतीबंधातील अटींवर आहे तसेच दि. 09/02/2018 च्या शासन निर्णयाप्रमाणे कुठलाही प्रस्ताव तदर्थ समितीसमक्ष आणलेला नाही

(15)



21) वरीलप्रमाणे आमचे मत मा. उच्च न्यायालयाने मागणी केलेल्या शपथपत्रात नमूद करावे. तसेच असे दिसून येते की, सदरचा विषय हा तदर्थ समितीचे सदस्य सचिव यांनी हा प्रस्ताव मान्य करुनच पाठविला आहे. मात्र सदरचा विषय अजूनही समितीचे दुसरे सदस्य श्री. पालवे यांच्या समक्ष ठेवला गेलेला नाही. अशा परिस्थितीत मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक 23 नोव्हेंबर 2020 च्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करावी.

(श्रीमती गीता बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त,अहमदनगर
तथा सदस्या, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 11/01/2021

सोबत – वर नमूद प्रमाणे दि. 31/12/2020 ची दोन पत्र तसेच दि. 09/02/2018 चा शासन निर्णय.

विषय क्र.- ९१९९

मा. तदर्थ समितीचे सभेपूढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर

(सामान्य प्रशासन विभाग)



विषय :- **कर्मचारी निवासस्थान वापरास मुदतवाढ मिळणेबाबत श्रीमती सुरेखा मोहन यादव यांचे विनंती अर्जाबाबत...**

टिपणी,

(अ) **श्री. मोहन जगन्नाथ यादव, जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क विभाग** यांना सेवाकालावधीत संस्थानचे साईनगर कर्मचारी वसाहतीतील **साईस्मरण A/3** हे निवासस्थान तात्पुरत्या कालावधीसाठी लायसेन्सी तत्वावर निवासासाठी उपलब्ध करुन देणेत आलेले होते. तथापी, **श्री. मोहन यादव यांचे दि.२६/०९/२०२० रोजी निधन झाले असून**, त्यांना निवासासाठी देणेत आलेले साईस्मरण A/3 हे निवासस्थान अद्याप कै. मोहन यादव यांचे नावावर आहे.

ब) महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दि.१५ जून, २०१५ रोजीचे शासन निर्णयामध्ये, *शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचा राजीनामा किंवा सेवानिवृत्ती किंवा स्वेच्छानिवृत्ती किंवा त्यांची बदली झाल्यास संबंधित शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्याकडून किंवा शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना सेवेतून काढून टाकल्यास किंवा यांचे* ***निधन झाल्यास*** *त्यांच्या कुटुंबीयांकडून सदर शासकीय निवासस्थानात अनुज्ञेय कालावधीनंतरही अधिक वास्तव्य करण्याबद्दल अर्ज प्राप्त झाल्यास, घटनेच्या दिनांकापासून पहिल्या तीन महिन्यापर्यंत अनुज्ञप्ती शुल्क आकारुन राहणेस परवानगी देणेत यावी. शासकीय निवासस्थानात अनुज्ञेय कालावधीनंतरही शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी अधिक वास्तव्य केल्यास, सदर शासकीय निवासस्थानाचा ताबा सोडेपर्यंत दंडनीय दराने अनुज्ञप्ती शुल्काची आकारणी करण्यात यावी.* असे आदेशीत करणेत आलेले आहे.

शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दि.१५ जून, २०१५ रोजीचे शासन निर्णयानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४६४ अन्वये मान्यता देणेत आलेल्या निवासस्थान वाटपाच्या सुधारित नियमावलीमध्ये कर्मचारी निवासस्थान अतिरिक्त वापराबाबत खालील प्रमाणे तरतुदी आहेत.

**नियम क्र.२४** - संस्थान निवासस्थानाच्या वापराबाबत संस्थानने कर्मचा-यास दिलेला परवाना रद्द केल्यास अगर कोणत्याही कारणाने त्याची सेवा संपुष्टात आल्यास त्याने हे निवासस्थान त्याचेकडे राहणेस तो ज्या तारखेपासून अपात्र होईल त्या तारखेपासून विहीत सेवाआकार आणि बाजार भावानुसार संस्थान ठरवील तेवढी शुल्क रक्कम, अशी देय रक्कम संबधीत कर्मचा-याचे देय्यका मधून वसूल करणेचा अधिकार संस्थानला राहील.

**नियम क्र.२५** - महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दि.१५ जून, २०१५ रोजीचे शासन निर्णयानुसार सेवानिवृत्तीनंतर कर्मचा-यास जास्तीत जास्त ०६ महिने कालावधीसाठी संस्थान निवासस्थानामध्ये राहणेस मुदतवाढ देणेत येईल. सदरची मुदतवाढ निवासस्थानाचे अतिरिक्त वापरापोटी प्रथम ०३ महिने नियमित दराने व त्यापुढील कालावधीचे शासन निर्णयामध्ये नमूद अनुज्ञप्ती शुल्क दराने अथवा संस्थान निश्चित करेल त्या चालू बाजारभाव दराने भाडे वसुलीचे अटीवर देणेत येईल, या कालावधीनंतरही संबंधीत कर्मचा-याने निवासस्थान रिक्त न केल्यास त्याचेवर तात्काळ कायदेशीर कारवाई करणेत यावी, असे नमूद आहे.

क) उपरोक्त तरतुदीनुसार, कै. मोहन जगन्नाथ यादव यांची पत्नी, श्रीमती सुरेखा मोहन यादव यांचे दि.१९/१०/२०२० व दि.३०/११/२०२० रोजीचे विनंती अर्जानुसार कै. मोहन जगन्नाथ यादव, जनसंपर्क अधिकारी यांना निवासासाठी देणेत आलेल्या **साईस्मरण - A/3** या निवासस्थानात राहणेस (१) घटनेच्या दिनांकापासून **पहिल्या तीन** महिन्यांसाठी म्हणजेच दि.२६/०९/२०२० पासून दि.२६/१२/२०२० अखेरपर्यंत **नियमित दराने** शुल्क आकारणी करणेचे अटींवर व (२) त्यापुढील कालावधीसाठी शासन निर्णयामध्ये नमूद अनुज्ञप्ती शुल्क दराने (दंडणीय दराने) दि.२६/१२/२०२० ते २६/०३/२०२१ अखेरपर्यंत **पुढील तीन महिन्यांकरीता चालू बाजारभाव दराने** (एकूण क्षेत्रफळ ६५० चौ फुट x रु.१५ प्रती चौ. फुट या दराने) येणारे एकूण रु.९,७५०/- दरमहा भाडे व प्रत्यक्ष मिटर रिडींगप्रमाणे होणारे विद्युत बील वसुलीचे अटीवर अनुज्ञेय कालावधीसाठी मुदतवाढ देणेत आलेली आहे.

आता, संदर्भ क्र.७ चे दि.१६/०३/२०२१ रोजीचे अर्जाने, श्रीमती सुरेखा मोहनराव यादव यांनी असे नमूद केले आहे की, *" माझे पती कै. मोहन जगन्नाथ यादव हे साईबाबा संस्थान मध्ये जनसंपर्क अधिकारी या पदावर कार्यरत असतांना संस्थान ने आम्हास साईनगर Building A-3 मध्ये राहण्यासाठी flat दिलेला होता. परंतू माझे पतीचा आकस्मिक मृत्यू झाल्यामुळे आमचेसाठी दुसरे घर घेणे अशक्य असून माझे मुलीचे लग्न करायचे असून, मुलाचे शिक्षण (MBA Tech 3rd Year) चालू आहे.*

*या सर्व कालावधीत पुढील ३ महिन्यांसाठी त्याच flat मध्ये राहण्यासाठी परवानगी मिळावी, अशी विनंती केली आहे."*

***पुढील पानावर...कृ.मा.प.***

464

(ड) मा.शासनाचे उक्त निर्देश व मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४६४ मधील तरतूदीनुसार अनुज्ञेय कालावधीनंतर कर्मचा-यास जास्तीत जास्त ०६ महिने कालावधीसाठी संस्थान निवासस्थानामध्ये राहणेस मुदतवाढ देणेत येईल. सदरची मुदतवाढ निवासस्थानाचे अतिरिक्त वापरापोटी प्रथम ०३ महिने नियमित दराने व त्यापुढील कालावधीचे शासन निर्णयामध्ये नमूद अनुज्ञप्ती शुल्क दराने अथवा संस्थान निश्चित करेल त्या चालू बाजारभाव दराने भाडे वसुलीचे अटीवर देणेची तरतुद आहे.

उपरोक्त तरतुदीनुसार, श्रीमती सुरेखा मोहन यादव यांना उपरोक्त **परिच्छेद 'क'** चे पॅरा १ मध्ये नमूद केलेप्रमाणे पहिल्या तीन महिन्यांकरीता नियमित दराने व त्यापुढील तीन महिने कालावधीसाठी शासन निर्णयामध्ये नमूद अनुज्ञप्ती शुल्क दराने (दंडणीय दराने) दि.२६/०३/२०२१ अखेरपर्यंत **एकूण ६ महिन्यांकरीता मुदतवाढ देणेत आलेली** आहे. त्यामुळे उपरोक्त तरतुदीनुसार, श्रीमती यादव यांना दि.२६/०३/२०२१ नंतर पुढील कालावधीसाठी संस्थान निवासस्थान मुदतवाढ देणे अनुज्ञेय होत नाही.

**तथापी,** सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण -2013 /प्र.क्र.96/मिव्य-2,मंत्रालय, मुंबई-400 032 दि.15 जून, 2015 चे **१० (ब) नुसार** शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे सेवेत असतांना निधन झाल्यास आणि सदरहू शासन निर्णयातील अनुक्रमांक ७ नुसार शासकीय निवासस्थान ताब्यात ठेवण्यास संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी परवानगी दिली असल्यास, सदर कालावधीतही मृत कर्मचारी यांच्या कुटूंबियांची प्रयत्न करुन सुध्दा पर्यायी निवासस्थानाची व्यवस्था न झाल्यास, सदर कालावधी संपण्याआधी अर्जदाराकडून संबंधित कार्यकारी अभियंता यांना पुढील कालावधीसाठी निवासस्थान ताब्यात ठेवण्यासाठी अर्ज प्राप्त झाल्यास, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकः घभाव-२०१०/प्र.क्र.४/सेवा-५, दिनांक १९ एप्रिल, २०११ व त्यामध्ये वेळोवेळी होणा-या सुधारणानुसार, त्याला आकारल्या जाऊ शकणा-या **अनुज्ञप्ती शुल्काच्या दुप्पट दराने अनुज्ञप्ती शुल्काची आकारणी करुन, शासन निर्णयातील अनुक्रमांक ७ मध्ये नमूद केलेल्या कालावधीसह कमाल ९ महिन्याच्या कालावधी पर्यंत किंवा त्याच्या कुटूंबियास पर्यायी निवासस्थान मिळेपर्यंत, यापैकी ते आधी घडेल तोपर्यंत शासकीय निवासस्थान ताब्यात ठेवण्यास सवलत अनुज्ञेय असेल,** अशी तरतुद आहे.

तरी, श्रीमती सुरेखा मोहन यादव यांचे दि.१६/०३/२०२१ रोजीचे विनंतीनुसार अनुज्ञेय कालावधीनंतर आणखी ३ महिन्यांसाठी संस्थान निवासस्थानात राहणेसाठी मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्तावावर निर्णय होणेकामी मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने मान्यतेस्तव सादर करणेस मंजूरी मिळणेस विनंती.

29/3/21

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से)
मुख्यकार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

---

निर्णय- ॥ विशेष बाब म्हणून प्रस्ताव मंजूर - अनुज्ञप्ती शुल्काच्या दुप्पट दराने अनुज्ञप्ती शुल्काची आकारणी करुन, शासन निर्णयातील अ. क्र. ७ मधे नमूद केलेल्या कालावधीसह कमाल ९ महिन्याच्या कालावधी पर्यंत किंवा त्याच्या कुटूंबियांना पर्यायी निवासस्थान मिळाल्यास तोपर्यंत, यापैकी जे आधी होईल तोपर्यंत अनुज्ञेय.

29/3/21

(श्रीमती गीता प्रवीण बनकर)
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्या, तदर्थ समिती

29/3/2021

(श्री. भानुदास ह.पालवे)
अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

विशेष बाब म्हणून प्रस्ताव मान्य करण्यास अनुमती आहे.

29/3/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से )
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

Aanekar 16/4

(श्रीकांत ल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती.

विषय क्र.-9/992

मा. तदर्थ समितीचे सभेपूढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर 465

( सामान्य प्रशासन विभाग)

विषय:- संस्थानचे बेंगलोर येथील माहिती केंद्रातील कुशल कंत्राटी कर्मचारी यांचे मुदतवाढीचे अर्जाबाबत...

टिपणी -

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत साईभक्तांना सोई - सुविधा उपलब्ध करुन देणेकामी सिकंदराबाद, बेंगलोर व चेन्नई येथे माहिती केंद्र सुरु करणेत आलेले आहे. पैकी सिकंदराबाद येथील माहिती केंद्र सन २०१० पासून व बेंगलोर व चेन्नई येथील माहिती केंद्र सन २०११ पासून सुरु करणेत आलेले असून, सदर माहिती केंद्रावर कामकाज पहाणेसाठी कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर कर्मचा-यांची नेमणूक करणेत आलेली आहे. सदर कंत्राटी कर्मचारी यांना मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार वेळोवेळी मुदतवाढ व मानधनात वाढ देण्यात आलेली आहे.

त्यानुसार मा. तदर्थ समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५२ अन्वये, संस्थानचे बेंगलोर येथील माहिती केंद्रावर कार्यरत असलेले कंत्राटी कर्मचारी श्री. एस. कृष्णमुर्ती, कार्यालय प्रमुख, बेंगलोर यांना रु.१८०००/- इतक्या एकत्रित मानधनावर एक वर्ष कालावधीसाठी दि.०३/११/२०१९ ते दि.०२/११/२०२० अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

सदर मुदतवाढीचा कालावधी दि.०२/११/२०२० रोजी संपला असून श्री.एस.कृष्णमुर्ती, बेंगलोर यांनी दि.१८/०३/२०२१ रोजीचे अर्जाने मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे. सदर विनंती अर्जास अनुसरुन, प्र. अधिक्षक, प्रकाशने विभाग यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिला आहे.

"श्री. एस. कृष्णमुर्ती, माहिती केंद्र, बेंगलोर यांची दि.०२/११/२०२० अखेर मुदत संपली होती. श्री. कृष्णमुर्ती यांचेकडे मुदतवाढीबाबत अर्ज पाठविणेस वेळोवेळी कळविले असता, त्यांनी दि.१८/०३/२०२१ चे अर्जान्वये मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली असून, विनंती अर्जाचा विचार करता श्री. कृष्णमुर्ती यांना दि.०३/११/२०२० ते दि.०२/११/२०२१ अखेर मुदतवाढ देण्यास हरकत नाही, असा अभिप्राय दिलेला आहे."

तथापी, यापुर्वी सिकंदराबाद व चेन्नई येथील माहिती केंद्रावर काम करणारे कुशल कंत्राटी कर्मचारी यांना एक वर्षाच्या मुदतवाढी ऐवजी मुदत संपल्याच्या दिनांकापासून पुढे ४ दिवसांचा ब्रेक देऊन पुढे ११ महिन्यांसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार श्री. एस. कृष्णमुर्ती, माहिती केंद्र, बेंगलोर यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दि.०३/११/२०२० पासून पुढे ४ दिवसांचा ब्रेक देऊन दि.०७/११/२०२० पासून पुढे ११ महिन्यांसाठी मुदतवाढ देता येईल, असे मत आहे.

तरी, श्री. एस. कृष्णमुर्ती, बेंगलोर यांचा विनंती अर्ज व प्र. अधिक्षक, प्रकाशने विभाग यांनी दिलेल्या अभिप्रायास अनुसरुन, संस्थानचे बेंगलोर येथील माहिती केंद्रातील कुशल कंत्राटी कर्मचारी यांना दि.०३/११/२०२० ते दि.०६/११/२०२० अखेर ४ दिवसांचा ब्रेक देऊन दि.०७/११/२०२० पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी दरमहा रुपये १८०००/- इतक्या एकत्रित माधनावर मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने मान्यतेस्तव सादर करणेस मंजूरी मिळणेस विनंती.

29/4/21

(कान्हूराज बगाटे,भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

---

उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे, संस्थानचे बेंगलोर येथील माहिती केंद्रात कार्यरत असलेले श्री. एस. कृष्णमुर्ती, कुशल कंत्राटी कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दि.०३/११/२०२० ते दि.०६/११/२०२० अखेर ४ दिवसांचा ब्रेक देऊन / सेवाखंड देऊन दि.०७/११/२०२० पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने प्रतिमहा रु.१८०००/- (अक्षरी रुपये अठरा हजार मात्र) एकत्रित मानधनावर मुदतवाढ देण्यास चक्रीय पध्दतीने मान्यता देण्यात येत आहे.

20/04/2021

(श्रीमती गीता प्रवीण बनकर)
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्या, तदर्थ समिती

22/4/2021

(श्री. भानुदास ह. पालवे)
अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

29/4/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से )
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

20/4

(श्रीकांत ल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती.

विषय क्र.- ५/23



मा.तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ

(सामान्य प्रशासन विभाग)

दि.१६ मार्च, २०२१

**विषय : श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे आस्थापनेवर वर्ग ०१ प्रवर्गातील ०२ राजपत्रित अधिकारी व उप जिल्हाधिकारी प्रवर्गातील ०१ यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती होणेबाबत..**

टिपणी -

अ) मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२००९/४३३/(३७/०९)/का.१६, दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील पदांचा काही अटी-शर्तीस अधिन राहून आकृतीबंध मंजूर केलेला आहे.

या आकृतीबंधानुसार संस्थान आस्थापनेवरील विविध विभागांसाठी एकूण ४८२६ + त्यानंतर मंजूरी दिलेली १२ पदे अशा एकूण ४८३८ पदांना मंजूरी दिलेली असून, यामध्ये २९२० कायम कर्मचारी पदे + १९१८ कंत्राटी कर्मचारी पदांना मंजुरी देणेत आलेली आहे.

या आकृतीबंधाचे मंजुर शासन निर्णयात **प्रामुख्याने खालील अटी शर्तींचा** समावेश आहे –

३. समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी तसेच सदर पदावर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

४. सेवाप्रवेश नियमामध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळ मानाने निश्चित करणेत यावीत. सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.

याव्यतिरिक्त मंजूर आकृतीबंधाचे दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीचे आदेशात असे नमूद आहे की, मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी व सुरक्षा अधिकारी ही पदे सध्या राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीने भरणेत येतात. **तसेच शक्यतो संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील अधिकतम अधिकारी शासनाकडून प्रतिनियुक्तीने घ्यावेत, असेही स्पष्टपणे नमूद केलेले आहे.**

आ) श्रींच्या दर्शनासाठी शिर्डी येथे येणा-या साईभक्तांचे गर्दीत दिवसेंदिवस लक्षणीय वाढ होत आहे. त्यानुसार दैनदिन कामकाजात गतीमानता येणेकामी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून भक्तांना तात्काळ सेवा-सुविधा पुरविणेकामी विविध विभागांमार्फत कार्यवाही करणेत येत आहे. मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२००९/४३३/(३७/०९)/का.१६, दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ चे शासन निर्णयान्वये, शासनाने श्री साई भक्तांना आवश्यक मुलभुत सेवा सुविधा पुरविणेकामी संस्थानचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता दिलेली आहे. सदर आकृतीबंधात एकुण ३४ विभागांचा समावेश करण्यात आलेला असुन भविष्यातील कामाची गरज विचारात घेऊन प्रत्येक विभागांतर्गत कार्यालयीन तसेच तांत्रिक – अतांत्रिक स्वरूपाच्या पदांची निर्मिती केलेली आहे.

तसेच दरम्यानच्या कालावधीत श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव, सन २०१७-१८ च्या पार्श्वभुमीवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे शताब्दी कक्ष स्थापन करुन श्री साईबाबा संस्थानच्या आस्थापनेवर, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे निर्णयान्वये तात्पुरत्या स्वरुपातील अस्थायी पदे निर्माण करण्यात आली.

इ) संस्थान आस्थापनेवर मंजूर असलेल्या ०५ प्रशासकीय अधिकारी पदांपैकी डॉ. आकाश रामहरी किसवे यांची प्रतिनियुक्तीने व संस्थान आस्थापनेंवरील श्री दिलीप त्र्यंबक उगले हे दोन प्रशासकीय अधिकारी सध्या कार्यरत आहेत. संस्थान मंजूर आकृतीबंधातील ०५ प्रशासकीय अधिकारी पदांपैकी ०३ पदे रिक्त असून त्यांची ०६ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० + ग्रेड पे ५४०० इतकी आहे.

व संस्थान आकृतीबंधातील मुंबई कार्यालयातील ऑफीसर ऑन स्पेशल डयुटी हे पद रिक्त असून ०६ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० + ग्रेड पे ५४०० इतकी आहे.

सध्या संस्थानमध्ये ४० विभाग कार्यरत असुन त्यामध्ये श्री साईनाथ रूग्णालये, श्री साईबाबा मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, श्री साईबाबा औद्यगिक प्रशिक्षण केंद्र, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व ज्युनिअर कॉलेज, श्री साईबाबा इंग्लिश मिडीअम स्कुल, व श्री साईबाबा वरिष्ठ महाविद्यालय इत्यादी शैक्षणिक संकुल इत्यादी मोठे उपक्रम सुरू असुन, संस्थानचा कामाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे. श्री साईबाबांचे भक्तसंख्येबरोबरच संस्थानचे इतर उपक्रम देखील वाढत आहेत. उदा. यशदाचे सहयोगाने स्पर्धा परिक्षा केंद्र, गोशाळा तसेच इतर लोकसेवेचे उपक्रम करण्यासाठी

संस्थानकडे प्रशासकीय मुनष्यबळाची आवश्यकता आहे. सध्या संस्थानमध्ये प्रशासकीय अधिकारी ०३ पदे रिक्त असल्याने कामकाजात अडचण निर्माण होत आहे.

ई) उपरोक्त परिच्छेदामध्ये नमूद केलेली प्रशासकीय अधिकारी व ऑफीसर ऑन स्पेशल डयुटी ही पदे आकृतीबंधामध्ये मंजूर आहेत. तसेच मा.शासनाने आकृतीबंध मंजूर करतेवेळी शक्यतो संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील आधिकतम अधिकारी शासनाकडून प्रतिनियुक्तीने घ्यावेत, अशी तरतुद आहे.

त्यासअनुसरून, संस्थानचे जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२७२७/२०२०, दि.१९ डिसेंबर, २०२० रोजीचे पत्रान्वये, मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे आस्थापनेवर वर्ग ०१ प्रवर्गातील ०२ राजपत्रित अधिकारी व उप जिल्हाधिकारी प्रवर्गातील ०१ अधिकारी यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती होणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन पत्र क्र.सासंवि-१०२१/६३२/प्र.क्र.०१/का-१६, दि.०६ जानेवारी, २०२१ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असून, मा.शासनाने पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

३. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे आस्थापनेवर प्रतिनियुक्तीवर प्रशासकीय अधिका-यांची नेमणूक करण्याबाबत विंनती केली आहे. परंतु, सदर प्रस्तावास मा.तदर्थ समितीची मान्यता घेण्यात आली आहे किवा कसे याबाबत नमूद केलेल नाही.

४. तरी, सदर प्रस्तावास मा.तदर्थ समितीची मान्यता घेऊन प्रस्ताव पुनःश्च सादर करण्यात यावा.

उपरोक्त मा.शासनाच्या निर्देशाप्रमाणे व संस्थानचे कामकाज आधिक गतीमान होणेकामी मा. महाराष्ट्र शासनाकडुन प्रतिनियुक्तीने प्रशासकीय अधिकारी या पदासाठी ०६ व्या वेतन आयोगातील रुपये १५६००-३९१०० + ग्रेड पे ५४०० वेतनश्रेणीतील वर्ग १ दर्जाचे दोन अधिकारी व ऑफीसर ऑन स्पेशल डयुटी या पदासाठी ०६ व्या वेतन आयोगातील रुपये १५६००-३९१०० + ग्रेड पे ५४०० वेतनश्रेणीतील महसूल विभागातील उप जिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी यांची नेमणूक होणेबाबतचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सविनय सादर .

20/3/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

## मा. तदर्थ समिती निर्णय

दिनांक -

**विषयांकित प्रस्तावात नमूद केलेली वस्तुःस्थिती विचारात घेतां, मा. महाराष्ट्र शासनाकडुन प्रतिनियुक्तीने प्रशासकीय अधिकारी या पदासाठी ०६ व्या वेतन आयोगातील रुपये १५६००-३९१०० + ग्रेड पे ५४०० वेतनश्रेणीतील वर्ग १ दर्जाचे दोन अधिकारी व ऑफीसर ऑन स्पेशल डयुटी या पदासाठी ०६ व्या वेतन आयोगातील रुपये १५६००-३९१०० + ग्रेड पे ५४०० वेतनश्रेणीतील महसूल विभागातील उप जिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी यांची नेमणूक करणेबाबतच्या प्रस्तावास चक्रिय पध्दतीने मान्यता देणेत येत आहे.**

23/04/2021

(श्रीमती गीता बनकर)
सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
तथा सदस्या, मा. तदर्थ समिती

27/4/2021

(भानुदास पालवे)
अपर महसुल विभागीय महसुल आयुक्त, नाशिक
तथा सदस्य, मा.तदर्थ समिती

20/3/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
तथा सदस्य सचिव, मा. तदर्थ समिती

22/4

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
- तथा- अध्यक्ष, तदर्थ समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय क्र.- 9/1998

मा. तदर्थ समितीचे सभेपुढील विषय



(सामान्य प्रशासन विभाग)

विषय:- **संस्थानचे श्री साईबाबा व साईनाथ हॉस्पीटल मध्ये एकत्रित वेतनावर कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी नेमणूक दिलेल्या वैद्यकीय अधिकारी व आरएमओ यांना संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन दिल्यास त्यांचेकडून आकारावयाचे दरमहा भाडे निश्चीतीबाबतचे प्रस्तावास चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत...**

टिपणी,

अ) संस्थानमधील कायम (स्थायी) कर्मचा-यांच्या निवासासाठी वर्गवारीनुसार एकूण ३४० निवासस्थाने बांधण्यात आलेली आहेत. मा. व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४६४ अन्वये कर्मचारी निवासस्थाने वाटप व बदलून देण्याच्या सुधारीत नियमावलीस मान्यता देणेत आलेली आहे. सदर नियमावलीनुसार निवासस्थाने वाटपाबाबत सध्या मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली निवासस्थान वाटप समिती स्थापन करणेत आलेली असून सदरचे समितीमार्फत उपलब्ध निवासस्थाने कर्मचा-यांना वाटपाबाबतची अथवा बदलुन देण्याची कार्यवाही करणेत येत आहेत.

संस्थानच्या कायम (स्थायी) कर्मचा-यांना संस्थानचे निवासस्थान उपलब्ध करुन दिल्यास संबंधीत कर्मचा-यास दरमहा मिळत असलेला घरभाडे भत्ता (H.R.A.) व प्रवास भत्ता (T.A) अनुज्ञेय केला जात नाही. तसेच निवासस्थानचे वापरापोटी संस्थानने निश्चीत केलेले सेवाआकार सेवा शुल्क संस्थानचे हॉस्पीटल विभागाकडील वैद्यकीय अधिकारी व आरएमओ वगळता इतर संबंधीत कर्मचा-याचे वेतनातुन दरमहा कपात केली जाते.

ब) सध्या संस्थानचे श्री साईबाबा व साईनाथ हॉस्पीटल विभागात वैद्यकीय अधिकारी, निवासी वैद्यकीय अधिकारी यांच्या नेमणूका हया ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने केल्या जात आहेत. सदर कर्मचा-यांना देण्यात येत असलेल्या नेमणूक आदेशातील अटी - शर्तीमध्ये " तुम्हास संस्थान नियमाप्रमाणे वैद्यकीय सुविधा व उपलब्धेनुसार निवासस्थान याव्यतिरिक्त इतर सेवा सवलती लागू होणार नाही." असे नमूद केले जाते.

त्यानुसार संस्थानकडे ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूकीवर असलेले वैद्यकीय अधिकारी व आरएमओ हे नियमाप्रमाणे संस्थानचे निवासस्थान मिळणेसाठी अर्ज सादर करतात. सदर अर्जाचे अनुषंगाने त्यांना देणेत आलेल्या नेमणूक आदेशातील अटी- शर्तीनुसार संस्थान निवासस्थान अनुज्ञेय होत असल्याने उपलब्धतेनुसार निवासस्थान वाटप समितीचे सभेतील निर्णयानुसार निवासासाठी तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन दिले जाते.

तथापी, सदर कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यावर नेमणूकीवर असलेले वैद्यकीय अधिकारी व आरएमओ यांना दरमहा एकत्रित मानधन दिले जात असल्याने, त्यांचे मानधनातुन संस्थानचे कायम (स्थायी) कर्मचा-यांप्रमाणे घरभाडे भत्ता कपात केला जात नाही. त्यामुळे कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याकरीता नेमणूकीवर असलेले काही वैद्यकीय अधिकारी व आरएमओ हे गरज नसतांनाही संस्थान निवासस्थान घेतात व प्रत्यक्षात तेथे वास्तव्य करत नाहीत, असे निदर्शनास आले आहे.

क) याबाबत, सामान्य प्रशासन विभागाकडील दि.३०/१२/२०२० रोजीचे टिपणीवर मा. वरिष्ठ अधिकारी यांनी खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहे.

**" कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याकरीता नेमणूकीवर असलेले आरएमओ व वैद्यकीय अधिकारी यांना मोफत निवासस्थान उपलब्ध करुन दिल्यामुळे आवश्यकता आहे किंवा काय ? याचा विचार न करता सरसकट निवासस्थान मागणी होण्याची शक्यता आहे. याबाबत धोरण किंवा व्यवस्थापन समितीचा निर्णय दिसून येत नाही. त्यामुळे निश्चीत धोरण असावे."**

त्यानुसार, कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांकरीता नेमणूकीवर असलेल्या वैद्यकीय अधिकारी व आरएमओ यांना नेमणूक आदेशातील अटी - शर्तीनुसार संस्थानचे निवासस्थान उपलब्ध करुन दिल्यास निवासस्थानाचे वापरापोटी त्यांना ज्या वेतनश्रेणीनुसार दरमहा एकत्रित मानधन दिले जाते त्या वेतनश्रेणीतील मुळवेतन विचारात घेऊन त्यावर स्थायी (कायम) कर्मचा-यांना लागु असलेल्या घरभाडे भत्त्याच्या टक्केवारीनुसार घरभाडे म्हणून व प्रत्येक्ष मिटर रिडींगप्रमाणे होणारा विद्युत आकार त्यांचे दरमहाचे वेतनातुन कपात करणेबाबतचा प्रस्ताव दि.०५/०२/२०२१ रोजीचे टिपणी अन्वये मंजूरीसाठी सादर करणेत आला होता. सदर टिपणीवर मा. प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी खालील बाबींचा टिपणीत समावेश करुन फेर सादर करा, असे निर्देश दिले आहेत.

i) कंत्राटी RMO यांना किती मानधन दिले जाते.

ii) सदर पद कोणत्या वेतनश्रेणीशी समकक्ष आहेत व त्यापदासाठी घरभाडे भत्ता किती आहे.

पुढील पानावर.... कृ.मा.प.

469

ड) उपरोक्त निर्देशानुसार कंत्राटी आरएमओ व वैद्यकीय अधिकारी यांना देणेत येत असलेल्या एकत्रित मानधनाबाबत मनुष्यबळ व्यवस्थापक, रुग्णालये यांचे कार्यालयाकडून दुरध्वनीद्वारे मिळालेल्या माहितीनुसार, सध्या संस्थानचे श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालय विभागाकडे ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूकीवर असलेल्यां कंत्राटी आरएमओ व कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना ६ व्या वेतन आयोगानुसार त्या - त्या पदास लागू असलेल्या वेतनश्रेणीनुसार प्रारंभीक वेतनावर (बेसिक + ग्रेड पे + महागाई भत्ता १३९% + एनपीए ३५%) एकत्रीत मानधन दिले जाते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

i) ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूकीवर असलेले आरएमओ व वैद्यकीय अधिकारी यांना देण्यात येत असलेले एकत्रित मानधन बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | पदनाम | मंजूर आकृतीबंधानुसार सदर पदास लागु असलेली मुळ वेतनश्रेणी | सदर पदास लागु असलेल्या वेतनश्रेणीनुसार प्रारंभीक वेतन (बेसिक + ग्रेड पे) | महागाई भत्ता १३९ % ( D A) | नॉन प्रॅक्टीस अलाऊन्स ३५ % (NPA) | एकूण | पुर्णाकीत एकत्रित मानधन | घरभाडे भत्ता १० % (HRA) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ (४+५+६) | ८ | ९ (स्तंभ ४ नुसार) |
| ०१ | आरएमओ (कंत्राटी) | १५६०० – ३९१०० ग्रेड पे ५४०० | २१००० | २९१९० | ७३५० | ५७५४० | ५७,००० | २१०० |
| ०२ | वैद्यकीय अधिकारी (कंत्राटी) | १८७५० – ३९१०० ग्रेड पे ६६०० | २५३५० | ३५२३७ | ८८७३ | ६९४६० | ६९,००० | २५३५ |

ii) उपरोक्त प्रमाणे ११ महिने नेमणूकीवर असलेल्या कंत्राटी आरएमओ व वैद्यकीय अधिकारी यांना मंजूर आकृतीबंधानुसार सदरचे पदास लागु असलेल्या वेतनश्रेणीनुसार येणारे प्रारंभीक वेतनावर एकत्रित मानधन दिले जाते. त्यानुसार उपरोक्त तक्त्यातील स्तंभ क्र.४ नुसार प्रारंभीक वेतन विचारात घेतल्यास स्तंभ क्र.९ मध्ये दर्शविल्याप्रमाणे घरभाडे भत्त्याची रक्कम येते.

विभागाचा अभिप्राय:-

उपरोक्त बाबीचा विचार करता, ११ महिने कालावधीवर कंत्राटी आरएमओ व कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांच्या नेमणूका व इतर आस्थापना विषयक कामे एच आर विभाग, रुग्णालये यांचेमार्फत केले जाते. त्यासाठी यापुढे सदर कर्मचा-यांना देण्यात येणा-या नेमणूक आदेशातील अटी - शर्तीमध्ये पुढील बाबीचा समावेश करणेबाबत एच आर विभाग, रुग्णालय यांना आदेशीत करता येईल, असे मत आहे.

" तुम्हास संस्थान नियमाप्रमाणे उपलब्धतेनुसार निवासासाठी संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन दिल्यास सदर निवासस्थानचे वापरापोटी तुम्हाला देण्यात येणा-या एकत्रित मानधनाच्या मुळ वेतनश्रेणीच्या प्रारंभीक वेतनावर घरभाडे भत्त्याच्या टक्केवारीनुसार येणारी रक्कम ही घरभाडे म्हणून तुमचे एकत्रित मानधनातुन दरमहा कपात करण्यात येईल".

कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याकरीता नेमणूकीवर असलेल्या आरएमओ व वैद्यकीय अधिकारी यांना नेमणूक आदेशातील अटी- शर्तीनुसार संस्थानचे निवासस्थान उपलब्ध करुन दिल्यास निवासस्थानचे वापरापोटी त्यांना ज्या वेतनश्रेणीनुसार दरमहा एकत्रित मानधन दिले जाते त्या वेतनश्रेणीतील प्रारंभिक वेतन विचारात घेऊन त्यानुसार त्या - त्या वेळी लागू असलेल्या घरभाडे भत्ताच्या टक्केवारीनुसार येणारी रक्कम ही निवासस्थान भाडे म्हणून तसेच, प्रत्यक्ष मिटर रिडींगप्रमाणे येणारे विद्युत बिलाची रक्कम त्यांचे दरमहाचे एकत्रित मानधनाचे रकमेतुन कपात येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर पुढील योग्य उचित निर्णय होणेस विनंती.

16/3/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

पुढील पानावर.... कृ.मा.प.

उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानचे रुग्णालयात कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याकरीता नेमणूकीवर असलेल्या आरएमओ व वैद्यकीय अधिकारी यांना नेमणूक आदेशातील अटी- शर्तींनुसार संस्थानचे निवासस्थान उपलब्ध करुन दिल्यास निवासस्थानचे वापरापोटी त्यांना ज्या वेतनश्रेणीनुसार दरमहा एकत्रित मानधन दिले जाते त्या वेतनश्रेणीतील प्रारंभिक वेतन विचारात घेऊन त्यानुसार त्या - त्या वेळी लागू असलेल्या घरभाडे भत्ताच्या (स्तंभ ९ नुसार) टक्केवारीनुसार येणारी रक्कम ही निवासंस्थान भाडे म्हणून तसेच, प्रत्यक्ष मिटर रिडींगप्रमाणे येणारे विद्युत बिलाची रक्कम त्यांचे दरमहाचे एकत्रित मानधनाचे रकमेतुन कपात करणेस चक्रीय पध्दतीने मान्यता देणेत येत आहे.

23/04/2024

(श्रीमती गीता प्रवीण बनकर)
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्या तदर्थ समिती

27/4/2024

(श्री भानुदास ह. पालवे)
अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य तदर्थ समिती

16/3/24

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से )
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

22/4

(श्रीकांत ल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती.

विषय क्र.- 9/994

" मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर "

(सामान्य प्रशासन शाखा)



विषय – श्री साईबाबा संस्थानचे कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१८-१९ या वर्षाचा शैक्षणिक शुल्काचा परताव्याकामी रु. २,२२,८५३/- वाढीव खर्चास चक्रीय पध्दतीने मंजूरी मिळणेबाबत...

टिपणी-

(अ) विषयाची पुर्वपिठीका:- संस्थानचे स्थायी कर्मचा-याप्रमाणेच कंत्राटी कर्मचारी यांचे पाल्यांचा सन २०१८-१९ शैक्षणिक शुल्क परतावा करणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर करणेत आला होता; त्यावर मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०२/२०१९ चे सभेतील निर्णय क्र.१४३ पुढीलप्रमाणे पारित झालेला आहे.

*" संस्थनमधील कंत्राटी कर्मचारी यांना सन २०१८-१९ या वर्षाकरीता पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ३८,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात यावा असे ठरले."*

त्यानुसार महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव पाठविणे आलेला होता, त्यास अनुसरून क्र. सासंवि-२०१९/३७२/प्र.क्र.७८/का.१६ दि. २४/०६/२०१९ रोजीच्या शासन आदेशा अन्वये,- *" कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांना देण्यात आलेला शैक्षणिक शुल्काच्या परताव्यानुसार सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता, श्री साईबाबा संस्थानच्या विविध विभागात कार्यरत असलेल्या सर्व कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक फीचा परतावा करण्यास आणि त्याकरीता होणा-या अंदाजे ३८ लक्ष इतक्या खर्चास शासन मान्यता मिळालेली होती."*

(ब) सदर मान्यतेनुसार संस्थानचे विविध विभागात कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांना त्यांचे पाल्यांचा सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाचा फी परताव्याकामी जा.क्र. एसएसएस/साप्रशा/वशी-०६/८९९/२०१९ दि. १५/०६/२०१९ अन्वये परिपत्रक पारित करण्यात आलेले होते. सदर परिपत्रकान्वये कंत्राटी कर्मचा-यांना फॉर्म वाटप करुन, विहीत नमुन्यात माहिती गोळा करुन, सदरची माहिती तक्ते लेखाशाखा विभागाकडून तपासून घेण्यात येऊन, कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांचा शुल्क परताव्याच्या मंजूर रक्कमा त्यांच्या पगाराच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आलेल्या आहेत.

कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१८-१९ या वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा खालीलप्रमाणे अदा करण्यात आलेला आहे.

| अ.नं. | विभागाचे नांव | कर्मचारी संख्या | पाल्य संख्या | देय्य रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | कामगार विभाग | ०२ | ०२ | ८,५५०/- |
| ०२ | श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर | ०७ | ०८ | ४२,२८०/- |
| ०३ | माहीती तंत्रज्ञान | ०७ | ११ | ४६,७००/- |
| ०४ | सामान्य प्रशासन शाखा | १२ | १९ | ९९,७८०/- |
| ०५ | अभिलेख कक्ष | ०१ | ०१ | ४,५१०/- |
| ०६ | मेकॅनिकल विभाग | १३ | १७ | ७५,५२०/- |
| ०७ | फायर अॅण्ड सेफ्टी | ०६ | ०८ | ३५,३५०/- |
| ०८ | साईप्रसाद निवासस्थान | १० | १२ | ५४,५२०/- |
| ०९ | इंग्लिश मिडीयम स्कुल | १९ | २६ | १,४५,९९५/- |
| १० | औ.प्र.संस्था. | ०१ | ०१ | ४,३६०/- |
| ११ | जनसंपर्क विभाग | ०८ | १२ | ५२,९००/- |
| १२ | वाहन विभाग | २७ | ३७ | १,९१,३७७/- |
| १३ | साईबाबा भक्तनिवास्थान | ०६ | १० | ४३,८९०/- |
| १४ | साई धर्मशाळा | ०३ | ०६ | २६,३००/- |
| १५ | बगीचा विभाग | ०२ | ०२ | १९,८४०/- |
| १६ | व्दारावती भक्तनिवास | ०७ | १० | ४२,३००/- |
| १७ | भांडार विभाग | ०२ | ०२ | ८,०८०/- |
| १८ | साईआश्रम भक्तनिवास | ०६ | १० | ४४,७००/- |
| १९ | विद्युत विभाग | १३ | १६ | ७०,०२०/- |
| २० | लेखाशाखा | १८ | २३ | १,१३,४३८/- |

पान नं. ०२ वर

| अ.नं. | विभागाचे नांव | कर्मचारी संख्या | पाल्य संख्या | देय्य रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| २१ | प्रसादालय | ३७ | ४८ | २,१७,०७०/- |
| २२ | पाणी पुरवठा विभाग | ०६ | ०७ | ३३,१९०/- |
| २३ | आरोग्य विभाग | १८ | २५ | १,११,७३०/- |
| २४ | प्रकाशने विभाग | ०४ | ०४ | १७,६००/- |
| २५ | मालमत्ता विभाग | ०१ | ०१ | ८,८००/- |
| २६ | ध्वनिक्षेपण व टेलिफोन | ०५ | ०७ | ३३,५६०/- |
| २७ | सीसीटीव्ही कंट्रोल सेल | ०४ | ०७ | ३०,९९०/- |
| २८ | बांधकाम विभाग | ०३ | ०५ | २३,५५०/- |
| २९ | कनिष्ठ महाविद्यालय | ०४ | ०६ | ८८,२२०/- |
| ३० | मंदिर विभाग | १२ | १६ | ७२,४५०/- |
| ३१ | मंदिर विभाग | ०१ | ०१ | ५,८१०/- |
| ३२ | कॅन्टीन विभाग | १८ | २४ | १,०२,९२४/- |
| ३३ | लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग | ०६ | ०८ | २६,५७८/- |
| ३४ | संरक्षण विभाग | २२० | २९५ | १३,५६,३७३/- |
| ३५ | श्री साईबाबा हॉस्पीटल | ९१ | ११७ | ५,३५,२५०/- |
| ३६ | श्री साईनाथ रुग्णालय | ३९ | ५१ | २,२८,३४८ |
| | एकुण | ६३९ | ८५५ | ४०,२२,८५३/- |

(क) सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात संस्थानच्या ३६ विभागातील ६३९ कंत्राटी कर्मचा-यांच्या ८५५ पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेकामी एकुण रक्कम रु.४०,२२,८५३/- मात्र इतका खर्च आलेला असून मंजूर रक्कमेपक्षा रु, २,२२,८५३/- मात्र इतकी रक्कम जादा खर्च झालेली आहे.

(ड) उपरोक्त विषयांकीत प्रस्तावाचे अनुषंगाने कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१८-१९ या वर्षाच्या शैक्षणिक शुल्क परतावा करणेकामी जादा खर्च झालेल्या रक्कम रु. २,२२,८५३/- (अक्षरी रुपये- दोन लाख बावीस हजार आठशे त्रेपन्न मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेकामी दिनांक-३१ मार्च, २०२० रोजी जा.नं. एसएसएस-वशी-आस्था/५०८७/२०२० अन्वये प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेत आला होता. त्यावर महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांनी पत्र क्र.सासंवि १०१९/३७२/प्र.क्र.७८/का-१६, दिनांक-२४/०८/२०२०० रोजीच्या पत्रान्वये *'संस्थानातील कंत्राटी कर्मचारी यांचे पाल्यांच्या सन २०१८-१९ या वर्षाचे शैक्षणिक शल्क परतावा करण्याबाबत जादा झालेल्या खर्चाबाबत न्यायालयाची मान्यता घेणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत संस्थानातील वकीलांचे अभिप्राय घेऊन त्यानुसार प्रस्ताव पुनःश्च सादर करणेबाबत'* कळविले होते. त्यामुळे संस्थान पॅनलवरील ॲडव्होकेट श्री जे.के. गोंदकर यांचा पुढे नमुद केलेप्रमाणे अभिप्राय *" 14) We Further direct that any major policy decision or financial decision, wherein the amount involved in more than Rs. 50,00,000/- be submitted to the said committee for its approval, except for routine expences as referred to in the order dated 30th January 2019 in Public Interest Litigation No. 152/2018 and 86/2018"*

*असे परिस्थितीत नामदार हायकोर्टाचे आदेशाप्रमाणे रक्कम रु. ५०,००,०००/- पेक्षा जास्त रकमेचे अंतर्भावाचे धोरणात्मक निर्णयासाठी मा. व्यवस्थापन समितीने ना. हायकोर्टाची मान्यता घेणेबाबत आदेश केलेले आहे. मात्र कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१८-१९ या वर्षाच्या शैक्षणिक शुल्क परताव्याकामी मंजुर रकमेपेक्षा रु. २,२२,८५३/- या जादा खर्चाबाबतचे रकमेसाठी मा. ना. हायकोर्टाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. "* शासनास दिनांक- ०२ नोव्हेंबर, २०२० रोजी पाठविण्यात आला होता. परंतु दिनांक-१४ डिसेंबर, २०२० रोजीचे महाराष्ट्र शासन क्र.सासंवि १०१९/३७२/प्र.क्र.७८/का-१६ पत्रान्वये *' सदर अभिप्रायास व जादा झालेल्या खर्चास मा. तदर्थ समितीची मान्यता घेण्यात आल्याचे प्रस्तावात अगर पत्रात नमुद केलेले नाही. तरी सदर अभिप्राय व जादा झालेल्या खर्चास मा. तदर्थ समितीने मान्यता दिल्यास तदनंतर आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्तावा शासनास सादर करण्याबाबत आपणास विनंती करण्यात येत आहे. '* असे कळविले आहे.

पान नं. ०३ वर

सन २०१९-२० या आर्थिक वर्षात एकूण ६०६ कंत्राटी कर्मचा-यांच्या ८३५ पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा अदा करणेत आलेला आहे. कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाचा शैक्षणिक फी परतावा करणेकामी एकुण रक्कम रु.४३,१४,२७८/- मात्र इतका खर्च आलेला आहे.

(क) सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरिता कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांचा अदा करण्यात आलेल्या शैक्षणिक शुल्क परताव्याबाबत महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.सासंवि-१०१९/३७२/प्र.क्र.७८/का.१६, दि.२४ जुन, २०१९ रोजीचे पत्रातील बाब क्रमांक ३ नुसार मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कार्यपुर्तता अहवाल सादर करता येईल.

(ड) प्रस्ताव:- उपरोक्त परिच्छेदांमध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थानमधील कंत्राटी कर्म-यांच्या पाल्यांचे शैक्षणिक फी परतावा सन २०१९-२० मध्ये रुपये-४३,१४,२७८/- (अक्षरी रुपये- त्रेचाळीस लाख चौदा हजार दोनशे अठ्ठ्याहत्तर मात्र) इतकी रक्कम आदा केलेली आहे. सन २०२०-२१ या वर्षाकरिता अंदाजे रक्कम रुपये-५०,००,०००/- (अक्षरी रुपये- पन्नास लाख) मात्रचे खर्च अपेक्षित आहे.

१) सन २०२०-२१ या वर्षाकरिता अंदाजे रक्कम रुपये-५०,००,०००/- (अक्षरी रुपये- पन्नास लाख) मात्रचे अपेक्षित खर्चास मा.तदर्थ समितीचे चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणे.

२) मा.तदर्थ समितीचे चक्रिय पध्दतीने मान्यतेनंतर मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन त्यांची मान्यता घेणे.

३) मा. उच्च न्यायालयाची मान्यतेनंतर मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करणे, शासनाचे मान्यतेनंतर सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाची कंत्राटी कर्म-यांच्या पाल्यांचे शैक्षणिक फी परतावा आदा करता येईल.

39/3/29

(कान्हूराज बगाटे, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

30/3

---

प्रस्तावात नमुद अ.क्र. १ ते ३ प्रमाणे कार्यवाही करणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात येत आहे.

(श्रीमती गीता प्रवीण बनकर)
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य तदर्थ समिती

17/3/2021

(श्री भानुदास ह. पालवे)
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य तदर्थ समिती

39/3/29

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

10/5

(श्रीकांत अणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष तदर्थ समिती.

Fee Meeting - 115-2021

विषय क्र.-9/998

474

" मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर "

(सामान्य प्रशासन शाखा)

## टिपणी-

विषय – सन २०२०-२१... कंत्राटी कर्मचारी यांचे पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा देणेकामी चक्रिय पध्दतीने मंजुरी मिळणेबाबत...

(अ) संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार मा.कोर्ट रिसिव्हर यांचे काळापासून मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनें दरवर्षी संस्थान कर्मचा-यांना त्यांच्या पाल्याचा शैक्षणिक शुल्काचा परतावा दिला जातो.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ अन्वये मार्गदर्शक तत्वे वजा नियमावली ठरविण्यात आलेली आहे. सदरच्या मार्गदर्शक तत्वानुसार सध्या शैक्षणिक शुल्काचा परतावा देण्याची कार्यवाही चालु आहे. निर्णय क्र.८९ (१) शासनाने विद्यापीठांनी केवळ गुणवत्तेच्या निकाषावर (On Merit Basis) भरण्यात येणा-या (सुमारे ५० % पर्यंतच्या) जागांवर प्रवेश दिल्या जाणा-या विद्यार्थ्यांसाठी (निम्न दराने) निर्धारीत केलेल्या फी दर रकमेपर्यंतच, मर्यादीत असावा असे नमुद आहे. यास अनुसरुन शासकीय/शासन अनुदानित अभ्यासक्रमासाठीं आकरण्यात येणा-या शुल्काच्या मर्यादेपर्यंत शैक्षणिक शुल्क रकमेचा परतावा दिला जातो. तसेच ज्यु.के.जी ते इ.१० वी (इंग्रजी माध्यम) व आयटीआय या अभ्यासक्रमांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा संस्थानच्या शाळेतील फीचे मर्यादेपर्यंत आदा केला जातो.

**मा. महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचे पत्र- सासंवि २००७/२४२/(६०)-का.सोळा, मंत्रालय मुंबई दिनांक- १६ जुलै, २००९ अन्वये सदर योजना मा.व्यवस्थापन मंडळाचे सन १९९६ चे सभेतील निर्णयाप्रमाणे संस्थान कर्मचा-यांना लागू आहे. त्याच धर्तीवर ती यापुढेहीं प्रचलीत पद्धतीने चालु राहील, असे पत्रान्वये कळविलेले आहे.**

त्यास अनुसरुन मा.तदर्थ समितीचे दि. ०६/०२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८ नुसार- संस्थानमधील कंत्राटी कर्मचा-यांना सन २०१९-२० करीता त्यांचे पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.५०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठविणेत यावा, व याकामी मान्यतेसाठी मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.

दिवाणी अर्जातील विनंती / प्रार्थनेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे समक्ष दि. ०९ मार्च, २०२० रोजी सुनावणी होऊन, विषयाकींत प्रस्तावास मा. न्यायालयाचें आदेशातील पान क्र. ११, बाब क्रमांक १४ नुसार मंजुरी मिळालेली आहे. ती पुढीलप्रमाणे- 14 In Civil Application No. 3009 of 2020, by way of prayer clause (B), the application- Shri Saibaba Sansthan Shirdi, seeks permission to spend amount for the purpose mentined in paragraph No. 4 of the application and implementation of resolution Nos. 48, 58,68,77 and 80 adopted by Ad-hoc Committee on 6th February, 2020.

**मा. महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचे आदेश क्र.१०२०/२९६/ प्र.क्र.११०/ का.१६ दि. ०५ ऑक्टोंबर, २०२० नुसार पुढीलप्रमाणे-**

" *श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील स्थायी कर्मचा-यांना त्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक फीचा परतावा करण्यात येतो. त्याच धर्तीवर तसेच संदर्भाकित शासन आदेश क्र.(२) अनुसार कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांना देण्यात आलेला शैक्षणिक शुल्काच्या परताव्यानुसार सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता, श्री साईबाबा संस्थानच्या विविध विभागात कार्यरत असलेल्या सर्व कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक फीचा परतावा करण्यास आणि त्याकरीता होणा-या अंदाजे ५० लक्ष इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे.*

4. *सदर आदेशाच्या आधारे संस्थानच्या कंत्राटी कर्मचा-यांना इतर कोणताही सेवाविषयक किंवा आस्थापनाविषयक लाभ अथवा स्थायित्वाच्या अन्य सुविधांसाठी संस्थानवर दावा करता येणार नाही. याकरिता श्री साईबाबा संस्थानद्वारे सर्व कंत्राटी कर्मचा-यांकडून लेखी हमीपत्र घेण्यात येईल.*

5. *मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी उपरोक्त शासन आदेशाची अंमलबजावणी करुन झालेल्या खर्चाच्या विवरणपत्रासह कार्यपूर्तता अहवाल शासनास सादर करावा. "*

पान नं. ०२ वर

(ब) सदर मान्यतेनुसार संस्थानचे विविध विभागात कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांना त्यांचे पाल्यांचा सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाचा फी परताव्याकामी जा.क्र.एसएसएस/वशी-०६/१३७३/२०२० दि.३१.१०.२०२० रोजी परिपत्रक पारित करण्यात आलेले होते. सदर परिपत्रकान्वये विहित नमुन्यात माहिती तयार करुन, लेखाशाखा विभागाकडून तपासून घेणेत येऊन, कंत्राटी कर्मचा-यांचे पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परताव्याच्या मंजुर रक्कमा त्यांच्या बॅंक खात्यावर वर्ग करण्यात आलेल्या आहेत.

कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१९-२० या वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा खालीलप्रमाणे अदा करण्यात आलेला आहे.

| अ.नं. | विभागाचे नांव | कर्मचारी संख्या | पाल्य संख्या | देय्य रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | कामगार विभाग | ०२ | ०२ | १०,१२०/- |
| ०२ | बगीचा विभाग | ०२ | ०२ | २०,३२०/- |
| ०३ | औ.प्र.संस्था. | ०१ | ०१ | ४,८००/- |
| ०४ | ध्वनिक्षेपण व टेलिफोन | ०६ | ०७ | ३६,७२०/- |
| ०५ | श्री साईबाबा कनिष्ठ विद्यामंदिर | ०५ | ०६ | ९०,३८०/- |
| ०६ | साई धर्मशाळा | ०३ | ०६ | २९,४४०/- |
| ०७ | व्दारावती भक्तनिवास | ०७ | १० | ४३,३२०/- |
| ०८ | फायर ॲण्ड सेफ्टी | ०५ | ०७ | ३२,८४०/- |
| ०९ | साईबाबा भक्तनिवास्थान | ०६ | ०८ | ३९,०४०/- |
| १० | साईप्रसाद निवासस्थान | ०९ | १४ | ६९,८८०/- |
| ११ | श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर | ०९ | ११ | ६८,२८०/- |
| १२ | मेकॅनिकल विभाग | १३ | १७ | ८५,०००/- |
| १३ | साईआश्रम भक्तनिवास | ०६ | ०८ | ३९,९२०/- |
| १४ | लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती | ०४ | ०६ | ३०,०००/- |
| १५ | माहीती तंत्रज्ञान | ०६ | १० | ४९,३२०/- |
| १६ | प्रसादालय | ३७ | ४९ | २,५२,३२०/- |
| | प्रसादालय | ०१ | ०१ | ४,९६०/- |
| १७ | भांडार विभाग | ०२ | ०२ | ८,८८०/- |
| १८ | पाणी पुरवठा विभाग | ०५ | ०५ | २५,५२०/- |
| १९ | बांधकाम विभाग | ०२ | ०३ | १५,०८०/- |
| २० | विद्युत विभाग | १३ | १७ | ८४,८००/- |
| २१ | खरेदी विभाग | ०१ | ०१ | ४४४०/- |
| २२ | मंदिर विभाग | १३ | २० | ९६,७००/- |
| २३ | इंग्लिश मिडीयम स्कुल | २२ | ३४ | १,८६,५५२/- |
| २४ | संरक्षण विभाग | १९० | २६५ | १३,३९,०२५/- |
| २५ | लेखाशाखा | १४ | १८ | ८३,००६/- |
| | लेखाशाखा | ०२ | ०३ | १५,६००/- |
| २६ | वाहन विभाग | २९ | ४० | २,२८,६६०/- |
| २७ | आरोग्य विभाग | २० | २६ | १,३१,८१४/- |
| २८ | सामान्य प्रशासन शाखा | १३ | २१ | १,१९,१६०/- |
| २९ | जनसंपर्क विभाग | ०८ | १२ | ६०,५२०/- |
| ३१ | प्रकाशने विभाग | ०८ | ०८ | ३५,९६०/- |
| ३२ | कॅन्टीन विभाग | १७ | २४ | १,२२,२८०/- |
| ३३ | संरक्षण विभाग | ०३ | ०३ | १५,०८०/- |
| ३४ | सीसीटीव्ही विभाग | ०४ | ०६ | ३०,५२०/- |
| ३५ | श्री साईबाबा हॉस्पीटल | ७६ | १०६ | ५,३०,८५२/- |
| ३६ | श्री साईनाथ रुग्णालय | ४२ | ५६ | २,७३,१६९/- |
| | एकुण- | ६०६ | ८३५ | ४३,१४,२७८/- |

पान नं. ०३ वर

नमुद केलेप्रमाणे विवेचनास अनुसरुन, सन २०१८-१९ मध्ये संस्थान कंत्राटी कर्मचा-यांचे पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा करणेकामी जादा खर्च झालेलेली रक्कम रु. २,२२,८५३/- (अक्षरी रुपये- दोन लाख बाविस हजार आठशे त्रेपन्न मात्र) चे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेकामी मा. तदर्थ समितीचे चक्रिय पध्दतीने मंजुरीस्तव सादर. तसेच मा. तदर्थ समितीची मान्यता मिळालेनंतर, मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करता येईल.

21/3/24

(कान्हूराज बगाटे, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

प्रस्तावात नमुद केल्यानुसार सन २०१८-१९ मध्ये संस्थान कंत्राटी कर्मचा-यांचे पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा करणेकामी जादा खर्च झालेली रक्कम रु. २,२२,८५३/- (अक्षरी रुपये- दोन लाख बाविस हजार आठशे त्रेपन्न मात्र) चे खर्चास कार्योत्तर मान्यता खर्चास मान्यता देण्यात आली.

11/05/2024

(श्रीमती गीता प्रवीण बनकर)
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य तदर्थ समिती

12/7/2024

(श्री भानुदास ह. पालवे)
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य तदर्थ समिती

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

10/5

(श्रीकांत अणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष तदर्थ समिती.

विषय क्र.-9/990

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर 477
(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

---

**विषय:- कायम कर्मचा-यांचे खातेचौकशीचे कामकाजाकरीता कंत्राटी पध्दतीने खाते चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक असलेले महाराष्ट्र शासनाचे पॅनलवरील सेवा निवृत्त कर्मचारी/अधिकारी यांचे प्राप्त अर्जाबाबत...**

विषयाची पुर्वपिठीका

(A) श्री साईबाबा संस्थानचे कामगार विभागामार्फत गैरशिस्त वर्तन प्रकरणांची खातेचौकशी करणेकामी सन १९९२ पासून खातेचौकशी अधिकारी म्हणून ॲड. बी.वाय.काळवाघे, कोपरगाव हे काम पाहत असून त्यांचेमार्फत सध्या एक गैरशिस्त वर्तन करणारे कर्मचा-यांचे खातेचौकशी सुरु आहे. ॲड.काळवाघे यांना सध्या प्रतिमाह ३,०००/- इतके मानधन देण्यात येत होते.ॲड.काळवाघे यांनी दि.२०.०८.२००९ रोजीचे अर्जान्वये चौकशी अधिकारी मानधन वाढवुन दरमहा रु.१०,०००/- मिळावे अशी विनंती केली होती.

त्यास अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९-०९-२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९१ अन्वये, ॲडव्होकेट श्री बी.वाय.काळवाघे, खातेचौकशी अधिकारी यांना दि.०१.१०.२००९ पासुन रुपये ३,०००/- प्रतिमहा ऐवजी रु.५,०००/- प्रतिमहा मानधन देण्यात यावे, असे ठरले.

ॲड.काळवाघे यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३७७९/२००९ दि.२९.१०.२००९ रोजीचे आदेशान्वये दि.०१.१०.२००९ पासुन रु.५,०००/- प्रतिमहा मानधन म्हणून देण्यात येत आहे.

ॲड. बी.वाय.काळवाघे यांचे मानधन वाढीबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०-११-२०१६ रोजीचे सभेमध्ये विषय नं. २४ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता निर्णय क्र.७७८ नुसार, खाते चौकशी अधिकारी ॲड. बी. वाय. काळवाघे, कोपरगाव यांचे वयोमान जास्त झालेले असल्यामुळे त्यांचेकडून खातेचौकशीचे कामकाज अपेक्षीत गतीने पुर्ण होत नाही, याकरीता नवीन खाते चौकशी अधिका-याची नेमणूक करणेसाठी विहीत पद्धतीने जाहिरात प्रसिद्ध करणेत यावी. तसेच संस्थान पॅनेलवर असणा-या वकीलांनाही विचारणा करण्यात यावी व त्यानंतर आलेल्या अर्जानुसार खातेचौकशी अधिकारी नेमणूकीबाबत सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा,असा निर्णय घेण्यात आला.

तरी श्री साईबाबा संस्थानचे विविध विभागात गैरशिस्त वर्तन करणारे कर्मचा-यांचे खातेचौकशी करणेकरीता नविन खातेचौकशी अधिकारी नेमणेकरीता वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन अर्ज मागविणेत आले होते.

(B) त्यानुसार श्री साईबाबा संस्थानचे विविध विभागात गैरशिस्त वर्तन करणारे कर्मचा-यांची खाते चौकशी करणेकरीता नवीन खातेचौकशी अधिकारी नेमणेकरीता अर्ज सादर करणेसाठी दि.२५/०२/२०१७ रोजीचे दैनिक सार्वमत या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. तसेच जा.नं. एसएसएस/वशी-७ए/६११३/२०१७, दि.०३/०३/२०१७ अन्वये, संस्थान पॅनेलवर असणा-या वकीलांनाही अर्ज करणेस कळविण्यात आलेले होते. त्यांनुसार विहीत मुदतीमध्ये (दि.१०/०३/२०१७ पर्यंत) १८ अर्ज व मुदतीनंतर १ अर्ज असे एकूण १९ अर्ज प्राप्त झालेले होते. तथापी, प्राप्त झालेल्या अर्जाबाबत कार्यवाही पुर्ण झाल्याचे दिसून येत नाही.

दरम्यानचे कालावधीत श्री.ए.एम.देशमुख यांनी ई-मेल अर्जाव्दारे, ते सन २००७ पासून महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन शाखेच्या पॅनेलवर असून शासनाचे कर्मचा-यांचे खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करीत असल्याचे नमूद करुन, समान पध्दतीने संस्थानमध्ये खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास तयार आहे. त्याकरीता शासन दराप्रमाणे मानधन व इतर चार्जेस मिळावेत. खाते चौकशीचे कामकाज शिर्डी येथे चालेल, असे नमूद करुन अर्ज दाखल केला.

श्री.देशमुख यांचे अर्जावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३९२ नुसार " यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेनुसार श्री.ए.एम.देशमुख यांची गैरशिस्त वर्तन करणा-या संस्थान कर्मचा-यांचे खातेचौकशीकामी खातेचौकशी अधिकारी म्हणून नेमणुक करणेस व याकामी त्यांना शासन निर्णयाप्रमाणे मानधन तसेच इतर चार्जेस देणेस मान्यता देण्यात आली. तसेच शासनाच्या पॅनलवरील आणखी खातेचौकशी अधिकारी संस्थानला सेवा देण्यास तयार असतील, त्यांनाही विचारणा करणेत येऊन, तसा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा."असा ठराव पारीत झाला आहे.

पान नंबर २ वर..

त्यास अनुसरुन श्री.ए.एम.देशमुख, यांची जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-७ए/१५६१/२०१७, दि.०१-०७-२०१७ रोजीचे आदेशान्वये गैरशिस्त वर्तन करणा-या संस्थान कर्मचा-यांचे खाते चौकशी करणेकामी कंत्राटी पद्धतीने "खाते चौकशी अधिकारी" म्हणून नेमणुक करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण– १०१४/प्र.अ..५५/११-अ, मंत्रालय, मुंबई, दि.१६-०२-२०१५ नुसार, खाते चौकशी अधिकारी यांना प्रति खाते चौकशीकरीता, एक अपचारी असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी रु. १२,०००/- इतके मानधन देण्यात येईल, एका पेक्षा अधिक अपचारी असल्यास प्रत्येक अपचा-या मागे रु. १५,००/- इतके वाढीव मानधन मूळ मानधनाच्या रकमेत वाढवून देण्यात येईल. मात्र सदर मानधनाची कमाल मर्यादा रु. २४,०००/- इतकी राहिल. वरील मानधना व्यतिरिक्त चौकशीच्या कामासाठी चौकशी अधिका-याने स्वत: नियुक्त केलेल्या लिपिक/टंकलेखक यांच्या सेवेपोटी रु.२०००/- एवढी अतिरिक्त रक्कम मंजूर करण्यात येईल. प्रत्येक खातेचौकशी पुर्ण करुन अहवाल सादर केल्यानंतर उपरोक्तप्रमाणे मानधनाची रक्कम अदा करणेत येईल.

श्री.ए.एम.देशमुख, नाशिक, यांनी शिर्डी येथे येऊन, खातेचौकशीचे कामकाज करावे व त्यासाठी त्यांना कोणतेही इतर वेगळे भत्ते देय्य होणार नाहीत.

मानधन व इतर चार्जेस चे बदलाबाबत वेळोवेळी होणारे शासन निर्णय लागू राहतील. असे आदेशात नमुद आहे.

(C) दरम्यानच्या कालावधीत डॉ.मधुकर गिरी, लातुर यांनीं त्यांच्या दिनांक २७/०६/२०१७ रोजीचे पत्रान्वये खाते चौकशीची प्रकरणे पाठविणेबाबत कळविले होते. सदरच्या पत्रावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय.क्र.९८३ नुसार, "यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री.मधुकर गिरी, लातूर यांची गैरशिस्त वर्तन करणा-या संस्थान कर्मचा-यांची खातेचौकशी करणेकामी कंत्राटी पद्धतीने खातेचौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणेस व त्यांना प्रति खाते चौकशीकरीता शासन निर्णयाप्रमाणे मानधन मान्यता देण्यात आली. श्री. मधुकर गिरी, लातूर यांनी शिर्डी येथे येऊन, खातेचौकशीचे कामकाज करावे व त्यासाठी त्यांना कोणतेही इतर वेगळे भत्ते अदा करु नये, असे ठरले."असा ठराव पारीत झाला आहे.

त्यास अनुसरुन श्री.मधुकर गिरी, लातुर यांची जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-७ए/४७०१ /२०१७, दि.०७-१२-२०१७ रोजीचे आदेशान्वये गैरशिस्त वर्तन करणा-या संस्थान कर्मचा-यांचे खाते चौकशी करणेकामी कंत्राटी पद्धतीने "खाते चौकशी अधिकारी" म्हणून नेमणुक करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण– १०१४/प्र.अ..५५/११-अ, मंत्रालय, मुंबई, दि.१६-०२-२०१५ नुसार, खाते चौकशी अधिकारी यांना प्रति खाते चौकशीकरीता, एक अपचारी असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी रु. १२,०००/- इतके मानधन देण्यात येईल, एका पेक्षा अधिक अपचारी असल्यास प्रत्येक अपचा-या मागे रु. १५,००/- इतके वाढीव मानधन मूळ मानधनाच्या रकमेत वाढवून देण्यात येईल. मात्र सदर मानधनाची कमाल मर्यादा रु. २४,०००/- इतकी राहिल. वरील मानधना व्यतिरिक्त चौकशीच्या कामासाठी चौकशी अधिका-याने स्वत: नियुक्त केलेल्या लिपिक/टंकलेखक यांच्या सेवेपोटी रु.२०००/- एवढी अतिरिक्त रक्कम मंजूर करण्यात येईल. प्रत्येक खातेचौकशी पुर्ण करुन अहवाल सादर केल्यानंतर उपरोक्तप्रमाणे मानधनाची रक्कम अदा करणेत येईल.

डॉ.मधुकर गिरी, लातुर, यांनी शिर्डी येथे येऊन, खातेचौकशीचे कामकाज करावे व त्यासाठी त्यांना कोणतेही इतर वेगळे भत्ते देय्य होणार नाहीत.

मानधन व इतर चार्जेस चे बदलाबाबत वेळोवेळी होणारे शासन निर्णय लागू राहतील. असे आदेशात नमुद आहे.

**(D) खातेचौकशी अधिकारी नेमणेबाबत शासन निर्णय व खातेचौकशी अधिकारी यांना द्यावयाचे मानधनाबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.**

खातेचौकशी अधिकारी यांचे मानधनाबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण– १०१४/प्र.अ..५५/११-अ, मंत्रालय, मुंबई, दि.१६-०२-२०१५ नुसार खालीलप्रमाणे शासन निर्णय झालेला आहे.

शासन निर्णय

१. कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या चौकशी अधिका-यांच्या प्रचलीत मानधनात बदल/वाढ करुन एक अपचारी असलेलल्या विभागीय चौकशी प्रकरणी रु. ८०००/- इतक्या मानधना ऐवजी रु. १२,०००/- इतके मानधन देण्यात यावे. सुधारीत मानधन या आदेशाच्या दिनांका पर्यंत त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी व त्या पुढील प्रकरणाबाबत अनुज्ञेय राहील.

२. एका पेक्षा अधिक अपचारी असल्यास प्रत्येक अपचा-या मागे रु. १५,००/- इतके वाढीव मानधन मूळ मानधनाच्या रकमेत (रु १२,०००) वाढवून देण्यात यावे. मात्र सदर मानधनाची कमाल मर्यादा रु. २४,०००/- इतकी राहिल.

पान नंबर ३ वर...

३. वरील मानधना व्यतिरिक्त चौकशीच्या कामासाठी चौकशी अधिका-याने स्वत: नियुक्त केलेल्या लिपिक/टंकलेखक यांच्या सेवेपोटी रु.२०००/- एवढी अतिरिक्त ठोक रक्कम मंजूर करावी.

या शासन निर्णयाप्रमाणे संस्थानमध्ये नेमणूक करण्यात येणारे खातेचौकशी अधिका-यास प्रति खातेचौकशी एक आरोपीकरीता १२,०००/- एकापेक्षा जास्त आरोपी असल्यास प्रती आरोपी १५,००/- इतकी वाढ तसेच तसेच टंकलेखन कामाकरीता अतिरीक्त २०००/- प्रमाणे रक्कम अदा करावी लागेल.

(E) सद्यस्थितीत ॲड.श्री.बी.वाय काळवाघे यांना दरमहा रु.५,०००/- मानधन देणेत येत होते. श्री.ॲड.बी.वाय.काळवाघे, कोपरगांव यांचे ८८ ते ८९ वयोमानानुसार त्यांचेकडे फक्त एकच चालु असलेली खाते चौकशी श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर, सहा.शिक्षीका,श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांचे बचाव प्रतिनिधी श्री.म.दी.धनेश्वर यांनी उलट तपासणीत संस्थानचे वतीने नेमलेल्या एकाच साक्षीदारांस आतापर्यंत ५७ तारखा देवुन, त्यांनी व्यवस्थापनाचे वतीने नेमण्यात आलेले साक्षीदार श्री.विकास महादेव शिवगजे यांना उलट तपासणीमध्ये २८१ प्रश्न आतापर्यंत विचारलेले असुन देखील त्यांची उलट तपासणी पुर्ण झालेली नाही. तसेच रुग्णालये विभागाकडील श्री.साहेबराव लंके, वित्त व्यवस्थापक यांची खातेचौकशी श्री.काळवाघे यांनी पूर्ण केली असून त्याचा निष्कर्ष अहवाल येणे बाकी आहे.

श्री.ए.एम.देशमुख, खातेचौकशी अधिकारी यांना व डॉ.मधुकर गिरी, खातेचौकशी अधिकारी यांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण– १०१४/प्र.अ..५५/११-अ, मंत्रालय, मुंबई, दि.१६-०२-२०१५ नुसार प्रति खाते चौकशीकरीता, एक अपचारी असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी रु. १२,०००/- इतके मानधन व खाते चौकशी अधिकारी यांना प्रति खाते चौकशीकरीता, एक अपचारी असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी रु. १२,०००/- इतके मानधन देण्यात येईल, एका पेक्षा अधिक अपचारी असल्यास प्रत्येक अपचा-या मागे रु. १५,००/- इतके वाढीव मानधन मूळ मानधनाच्या रकमेत वाढवून देण्यात येईल. मात्र सदर मानधनाची कमाल मर्यादा रु. २४,०००/- इतकी राहिल. वरील मानधना व्यतिरिक्त चौकशीच्या कामासाठी चौकशी अधिका-याने स्वत: नियुक्त केलेल्या लिपिक/टंकलेखक यांच्या सेवेपोटी रु.२०००/- एवढी अतिरिक्त रक्कम मंजूर करण्यात येईल. प्रत्येक खातेचौकशी पुर्ण करुन अहवाल सादर केल्यानंतर उपरोक्तप्रमाणे मानधनाची रक्कम अदा करणेत येईल, या अटी शर्तींवर मानधन देणेत येत आहे.

ॲड.बी.वाय.काळवाघे,खातेचाकशी अधिकारी, कोपरगांव यांचे वयोमान ८८ वर्षे असल्याने व त्यांनी दि.२४.११.२०२० रोजीचे राजीनामा पत्र दिलेले असुन, जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१६३५/२०२० दि.०४.१२.२०२० अन्वये राजीनामा मंजुर करणेत आलेला आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे पॅनलवरील श्री.पा.म.ताकटे, नाशिक यांचेकडे जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/१७२६/२०२० दि.१५.१२.२०२० रोजीचे आदेशान्वये श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर, सहा.शिक्षीका, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी रोजीचे आदेशान्वये खातेचौकशी फाईल्ससह त्यांचेकडे खातेचौकशी करणेकामी पोष्टाने रजिष्टर ए.डी.पाठविणेत आलेल्या आहेत.

श्री.ए.एम.देशमुख,नाशिक यांना तीन अपचारी यांची खातेचौकशी करणेकरीता नेमण्यात आलेले आहे. परंतु त्यांचे वयोमान जास्त असल्याने व आतापर्यत ५ ते ६ महिने झाले परंतु ते अद्यापपर्यंत शिर्डी येथे आलेले नसुन, त्यांनी आजारी असल्याबाबत लेखी कळविलेले आहे.श्री.देशमुख यांचे सध्याचे वय ७३ वर्षे आहे. श्री.देशमुख यांचेकडे देण्यात आलेल्या तीन खाते चौकश्या पुर्ण करुन अहवाल दि.३०.११.२०२० रोजी रजिष्टर पोष्ट ए.डीद्वारा सामान्य प्रशासन शाखा, आवक विभागास सादर केलेले आहे.

श्री.मधुकर गिरी, लातुर यांना एक अपचारी खातेचौकशी करणेकरीता नेमणेत आलेले आहे. श्री.गिरी हे लातुर येथे राहत असून ते शिर्डीपासुन लांब राहत असल्याने त्यांनाही अप-डाऊन करणे शक्य होत नाही. त्यांचेकडे रुग्णालयाकडील डॉ.योगेश बाळकृष्ण गेटे, इ एन टी सर्जन, श्री साईनाथ रुग्णालय खातेचौकशी ते करत आहे.श्री.गिरी यांचे सध्याचे वय ७१ वर्षे आहे.

(F) आता, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.चौप्रनि-१११९/प्र.क्र.५८/११-अ, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० मधील मुद्दा क्र .०२ नुसार दिनांक २६/०५/२००६ च्या शासन निर्णयामध्ये सेवानिवृत्त अधिका-यांना चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यासाठीच्या अटी व शर्ती नमुद केल्या आहेत, त्यातीलच एक अट अशी आहे की, चौकशी अधिका-याचे त्या वर्षाच्या दिनांक १ जुलै रोजी ७० वर्षापेक्षा जास्त नसावे. त्याअनुषंगाने शासनाच्या अ व ब आणि क व ड मधील शासकीय कर्मचारी / अधिकारी यांचेविरुध्द चौकशी करणा-या ज्या सेवानिवृत्त कंत्राटी चौकशी अधिका-यांची दि.०१ जुलै, २०२० रोजी वय वर्षे ७० पूर्ण झाली आहेत अथवा ज्या कंत्राटी चौकशी अधिका-यांचे वय नजीकच्या काळात ७० वर्षे पूर्ण होणार आहेत त्यांचा कंत्राटी चौकशी अधिकारी म्हणून कार्यकाल संपुष्टात आला आहे, असे नमुद आहे.

पान नंबर ४ वर...

(G) ॲड.बी.वाय.काळवाघे, खातेचौकशी अधिकारी,कोपरगांव यांचे वयोमान सध्या ८८ ते ८९ वर्षे आहे.

तसेच श्री.ए.एम.देशमुख यांचे सध्याचे वय ७३ असून, डॉ.मधुकर गिरी यांचे सध्याचे वय ७१ वर्षे आहे. त्यामुळे शासनाच्या दि.१४/१०/२०२० रोजीचे पत्रानुसार सध्या कार्यरत असलेले खातेचौकशी अधिकारी ॲड.बी.वाय.काळवाघे, श्री.ए.एम.देशमुख व डॉ.मधुकर गिरी यांना खाते चौकशी अधिकारी म्हणून कार्यकाल संपुष्टात आणून गैरशिस्त वर्तन करणारे कर्मचा-यांचे खातेचौकशी करीता नवीन खाते चौकशी अधिका-याची नेमणूक करणेसाठी अहमदनगर जिल्ह्यातील वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देऊन नवीन खाते चौकशी अधिका-याची नेमणूक करावी लागेल, असे मत आहे.

या कामी खालील दोन पर्याय उपलब्ध आहेत.

१) खातेचौकशी अधिकारी नेमणुकीबाबत शासन निर्णयास अधिन राहून व त्यातील अटी-शर्तीनुसार वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन खाते चौकशीचे कामकाजास इच्छुकांचे अर्ज मागविणेत येतील.

किंवा

२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पत्र पाठवुन खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करणेस पात्र असणा-या सेवा निवृत्त शासकिय अधिका-यांची नावे मागवून त्यापैकि उचित ती कार्यवाही करता येईल याबाबत दि.२४.१०.२०२० रोजीची टिपणी सादर करणेत आलेली होती.

दि.२४.१०.२०२० रोजीचे टिपणीवर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, "शासन नियुक्त पॅनलवरील सूचीतील अधिकारी यांना विचारणा करण्यात यावा." असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुबई यांचेकडील पत्र क्र.चौप्रनि-१११९/प्र.क्र.५८/११-अ, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजीचे पत्र व त्यासोबत जोडलेली यादीतील एकुण ०१ ते ६० महाराष्ट्र शासन सेवा निवृत्त कर्मचारी/अधिकारी यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२२६८/२०२० दि.२१.११.२०२० रोजीचे पत्र पाठवुन, विभागीय चौकशीकामी इच्छुकांचे अर्ज दि.१५.१२.२०२० अखेर पर्यंत मागविणेत आले. त्याप्रमाणे विहीत वेळेत प्राप्त झालेल्या अर्जानुसार प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करुन, समितीचे निर्णयानुसार पुढील कार्यवाही करता येईल.

(H) कंत्राटी तत्वावर नविन **खातेचौकशी अधिकारी या पदासाठी विहीत मुदतीमध्ये दि. १५.१२.२०२० पर्यंत प्राप्त झालेल्या अर्जांबाबत माहिती.**

| अ. नं. | आवक नंबर/ दिनांक | अर्जदाराचे नाव व पत्ता | शेरा |
|---|---|---|---|
| १. | ७८०१/ ०२.१२.२०२० | श्री.ज्ञानेश्वर अर्जुन मेहेरे,स्वयंदिप, 60, गुडलक सोसायटी,गाडगे नगर, रॉय इंग्लीश स्कुलजवळ, हिंगणा रोड, नागपूर 440036.भ्रमणध्वनी क्र.9134920141 9271357051 ✗ | प्रत्यक्ष शिर्डीला येऊन कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| २. | ७८८९/ ०५.१२.२०२० | श्री.हरी पुंजाजी जाधव म्हाडा कॉलनी, बळीराम शाळे समोर, एन-7,घ.क्र.आर28/53, सिडको,औरंगाबाद. भ्र.क्र.9423148944/दू.क्र.0240-2480944 | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| ३. | ८०१०/ ०५.१२.२०२० | श्री. डि.बी.जिद्देवार 179 नेल्को सोसायटी, सुभाषनगर, जयताळा रोड, नागपूर-440 022. ✗ | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास नागपूर येथे करणेस इच्छुक आहे. |
| ४. | ८१५१/ ०७.१२.२०२० | श्री.मंगल एस. करुणाकर 22, तथास्तू, दुर्गा नगर, मानेवाडा रोड, पोस्ट ऑफीसच्या मागे, नागपूर 440024. भ्रमणध्वनी क्र. 9422966517 ✗ | शासनाचे मानधना व्यतिरिक्त प्रवास खर्च व राहणेची व्यवस्था संस्थान मार्फत होत असल्यास संमती आहे. |
| ५. | ८१५०/ ०७.१२.२०२० | श्री. हरिभाऊ रावजी लोणारे 73, नाशिक नगर, मेढा रोड, भंडारा भ्र.क्र.94236441248. ✗ | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |

पान नंबर ५ वर...

| अ. नं. | आवक नंबर/ दिनांक | अर्जदाराचे नांव व पत्ता | शेरा |
|---|---|---|---|
| ६. | ८२२२/ ०८.१२.२०२० | श्री.सुभाष हरी दुसाने<br>प्लॉट नं. 142,शिवप्रताप कॉलनी,उन्नती नगर,देवपूर, धुळे<br>भ्र.क्र.9422296465 | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| ७. | ८२२३/ ०९.१२.२०२० | श्री.मारोती रामचंद्र वाघधरे<br>प्लॉट नं 209, सावरबांधे<br>ले-आऊट, शारदामाता मंदिराजवळ, हुडकेश्वर रोड,नागपूर 440034.<br>भ्रमणध्वनी क्र.9850753084 | जाणे-येणेकरीता खाजगी वाहनाकरीता लागणारे पेट्रोलचा खर्च दिल्यास मी मानधन घेवुन खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |
| ८. | ८२२४/ ०८.१२.२०२० | श्री.पा.म. ताकटे<br>11-बी, नंदराय को-ऑप<br>हौसिंग सोसायटी, गंधर्व नगरी,<br>मोटवानी रोड, नाशिक रोड<br>422201.भ्रमणध्वनी क्र.8390918899 | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| ९. | ८२२५/ ०८.१२.२०२० | श्री.भालचंद्र गजाननराव पंडित<br>A-18, मानवसेवा नगर, सेमिनरी हिल्स,नागपूर 440006.<br>भ्र.क्र.9766638087. | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| १०. | ८२२६/ ०८.१२.२०२० | श्री.संजय भगवंत धर्माधिकारी<br>एफ-21, एन-4, सिडको,<br>औरंगाबाद 431 003<br>भ्रमणध्वनी 9420812322 | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| ११. | ८२२८/ ०७.१२.२०२० | श्री.बबन महादेव मोरे<br>ग्रुप नं.2 चाळ, नं.275,रु.नं.357,<br>टागोरनगर, विक्रोळी (पूर्व) मंबु ई-400 083.<br>भ्र.क्र.9223252952 | ज़ाणे-येणे करीता संस्थान वाहनाची व्यवस्था केली व संस्थानमार्फत, राहण्याची, जेवणाची व्यवस्था केल्यास इच्छुक आहे. |
| १२. | ८२२७/ ०८.१२.२०२० | श्री.दलजितसिंह गुरुचरणसिंह खालसा,<br>101, साईश्रध्दा अपार्टमेंट, डोसाहट<br>हॉटेलच्या समोर, रिंग रोड,गोंदिया-441 614.<br>भ्र.क्र. 7720817112 | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| १३. | ८२८४/ १०.१२.२०२० | श्री. कारभारी पुंडलीक जाधव<br>मो.क्र.942228473/7972778264<br>श्रीकृष्ण छाया, प्लॉट नं.18, अपूर्वा कॉलनी,<br>शिवराम नगर, नारायण बापू<br>चौक जेल रोड, नाशिक रोड,नाशिक | संगणक व लिपीक, संस्थानचे विश्राम गृहात राहण्याची व्यवस्था केल्यास चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |
| १४. | ८२८३/ १०.१२.२०२० | श्री.सुधाकर रा.चव्हाण<br>सी-36, सुयोग आदित्य रेसिडेन्सी,बिबनेवाडी, पुणे-37 020-24216164 | शासनाचे मानधना व्यतिरिक्त प्रवास खर्च मिळाल्यास संमती आहे. |
| १५. | ८३१४/ ११.१२.२०२० | श्री.सुरेश शिवाजी कस्तुरे<br>फ्लॅट 403, अे विंग, म्हाडा एम.आय.जी. इमारत क्र.2,गंगासागर सहकारी गृहनिर्माण संस्था, सूर्या शॉपिंग सेंटर समोर, मिरा रोड (पूर्व),जि.ठाणे 401107.भ्रमणध्वनी 9969388639 | शासनाचे मानधना व्यतिरिक्त प्रवास खर्च मिळाल्यास स्विकृती दिलेली आहे. |

पान नंबर ६ वर...

| अ. नं. | आवक नंबर/ दिनांक | अर्जदाराचे नाव व पत्ता | शेरा |
|---|---|---|---|
| १६. | ८४८६/ १२.१२.२०२० | श्री. जे.आर.बंकापुरे<br>16, प्रज्ञाधाम सोसायटी, पाईप लाईन रोड,लुईसवाड़ी, ठाणे (प) 400 604.<br>भ्र.क्र..9819479226 | शासनाचे मानधना व्यतिरिक्त प्रवास खर्च व राहणेची व्यवस्था संस्थान मार्फत होत असल्यास संमती आहे. |
| १७. | ८४८७/ १४.१२.२०२० | श्री. भि. क. उसारे<br>बी-101, देवगिरी व्हॉली, मिटमिटा,औरंगाबाद<br>भ्र.क्र.7588530594/9892810630 | कंत्राटी तत्वावर चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |
| १८. | ८४८५/ १४.१२.२०२० | श्री.वसंत नारायण पाटील<br>बंगला क्र.1, निसर्ग कॉलनी,देवस्व सोसायटीच्या मागे,विदयानगर, वरसोली, अलीबाग, रायगड 402201<br>भ्रमणध्वनी 9922000051,9823508740 | कंत्राटी तत्वावर चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |
| १९. | ८६२१/ १४.१२.२०२० | श्री. कन्हैया रतनलाल बजाज<br>53, पावभूमी सोमलवाडा,नागपूर-440025.<br>भ्र. क्र.9423119837 | नागपूर ते शिर्डी प्रवास करणे शक्य नसल्याने नकार कळविलेला आहे. |
| २०. | ८६२०/ १५.१२.२०२० | श्री.अशोक विठ्ठल शिंदे<br>अक्षय विला, बी विंग, फ्लॅट नं. 7, दुसरा मजला, आनंद नगर,सिंहगड रोड, मकरंद पार्क,वडगांव बुद्रुक, पुणे-51.<br>भ्रमणध्वनी 9623576724,9284397997 | कंत्राटी तत्वावर चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |

(I) कंत्राटी तत्वावर नविन खातेचौकशी अधिकारी या पदासाठी १ ते ६० शासन निवृत्त अधिकारी यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२२६८/२०२० दि.२१.११.२०२० रोजीचे पत्र पोष्टाने रजिष्टर ए.डी.ने पाठविले असता, पत्र स्विकारले नसल्याने इकडील कार्यालयास पाकिट परत आलेले बाबतची माहिती खालीलप्रमाणे.

| अ. नं. | आवक नंबर/ दिनांक | अर्जदाराचे नाव व पत्ता |
|---|---|---|
| १. | ७८१५/ ०३.१२.२०२० | श्री.जगन्नाथ एकनाथ पवार,<br>1345,स्नेहसदन,त्रिमुर्ती कॉलनी, सिरम इस्टिटयूट जवळ,हडपसर,<br>पुणे-411 028 भ्र.क्र.7588593279/8975707000 |
| २. | ७८१६/ ०३.१२.२०२० | श्री. विलास किसन आल्हाट<br>महात्मा फुले नगर, गस्यांडिंग सेटर समोर,हडपसर, पुणे-411 028. |
| ३. | ७८७७/ ०३.१२.२०२० | श्री. दू.र.चंद्रिकापूरे, सी-11, 702, मानसरोवर, लोकधारा,<br>कल्याण (पूर्व) जि.ठाणे 421 306. |
| ४. | ८२४२ ०९.१२.२०२० | श्री. सदाशिव संभाजी बेनके, 302, गायत्री सदन स.गृ.वन.सं.कात्रप,<br>बदलापूर (पूर्व) ता.अंबरनाथ, जि.ठाणे-421 503.भ्र. क्र.9967838299 |

<u>विभागाचा अभिप्राय व प्रस्ताव :-</u>

कंत्राटी पध्दतीने खाते चौकशी अधिकारी नेमणूकीबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे पत्रातील व ज्यांचे वय हे ७० वर्षापेक्षा कमी असलेले सेवा निवृत्त कर्मचारी / अधिकारी एकुण १ ते ६० यांना इच्छुक आहे किंवा नाही याबाबत पत्र पाठविलेले आहे. त्याबाबत इच्छुक असलेले सेवा निवृत्त कर्मचारी/ अधिकारी यांचे एकुण २० अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे. ०४ सेवा निवृत्त कर्मचारी यांना पाठविणेत आलेले पत्र न स्विकारल्याने इकडील कार्यालयास परत आलेले आहे.

पान नंबर ६ वर...

(अ) तक्ता

उपरोक्त प्राप्त अ.नं. १ ते २० पैकी एकुण अकरा सेवा निवृत्त अधिकारी/ कर्मचारी अ.नं. १,२,५, ६,८,९,१०,१२,१७,१८,२० यांनी कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहेत असे लेखी अर्जाद्वारे कळविलेले आहे.

| अ. नं. | अर्जदाराचे नाव | शेरा |
|---|---|---|
| १. | श्री.ज्ञानेश्वर अर्जुन मेहेरे | प्रत्यक्ष शिर्डीला येऊन कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| २. | श्री.हरी पुंजाजी जाधव | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| ५. | श्री. हरिभाऊ रावजी लोणारे | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| ६. | श्री.सुभाष हरी दुसाने | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| ८. | श्री.पा.म. ताकटे | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| ९. | श्री.भालचंद्र गजाननराव पंडित | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| १०. | श्री.संजय भगवंत धर्माधिकारी | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| १२. | श्री.दलजितसिंह गुरुचरणसिंह खालसा, | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहे. |
| १७. | श्री. भि. क. उसारे | कंत्राटी तत्वावर चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |
| १८. | श्री.वसंत नारायण पाटील | कंत्राटी तत्वावर चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |
| २०. | श्री.अशोक विठ्ठल शिंदे | कंत्राटी तत्वावर चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |

(ब) तक्ता

उपरोक्त अ.नं.१ ते २० पैकी अ.नं. ३,४,७,११,१३,१४,१५,१६,१९ अनुक्रमे प्रत्यकाने वेगवेगळी मागणी केलेली असुन, त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | अर्जदाराचे नाव | शेरा |
|---|---|---|
| ३. | श्री. डि.बी.जिद्देवार | कंत्राटी तत्वावर खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास नागपूर येथे करणेस इच्छुक आहे. |
| ४. | श्री.मंगल एस. करुणाकर | शासनाचे मानधना व्यतिरिक्त प्रवास खर्च व राहणेची व्यवस्था संस्थान मार्फत होत असल्यास संमती आहे. |
| ७. | श्री.मारोती रामचंद्र वाघधरे | जाणे-येणेकरीता खाजगी वाहनाकरीता लागणारे पेट्रोलचा खर्च दिल्यास मी मानधन घेवुन खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |
| ११. | श्री.बबन महादेव मोरे | जाणे-येणे करीता संस्थान वाहनाची व्यवस्था केली व संस्थानमार्फत, राहण्याची, जेवणाची व्यवस्था केल्यास इच्छुक आहे. |
| १३. | श्री. कारभारी पुंडलीक जाधव | संगणक व लिपीक, संस्थानचे विश्राम गृहात राहण्याची व्यवस्था केल्यास चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक आहे. |
| १४. | श्री.सुधाकर रा.चव्हाण | शासनाचे मानधना व्यतिरिक्त प्रवास खर्च मिळाल्यास संमती आहे. |
| १५. | श्री.सुरेश शिवाजी कस्तुरे | शासनाचे मानधना व्यतिरिक्त प्रवास खर्च मिळाल्यास स्विकृती दिलेली आहे. |
| १६. | श्री. जे.आर.बंकापुरे | शासनाचे मानधना व्यतिरिक्त प्रवास खर्च व राहणेची व्यवस्था संस्थान मार्फत होत असल्यास संमती आहे. |
| १९. | श्री. कन्हैया रतनलाल बजाज | नागपूर ते शिर्डी प्रवास करणे शक्य नसल्याने नकार कळविलेला आहे. |

पान नंबर ७ वर...

484

**प्रस्ताव :-**

१) महाराष्ट्र शासन मान्य पॅनलवरील सेवानिवृत्त अधिका-यांपैकी कंत्राटी चौकशी अधिकारी म्हणून काम करण्यासाठी इच्छुक असलेल्या २० अर्जदारांपैकी उपरोक्त प्रस्तावातील तक्ता (अ) मध्ये नमुद ११ उमेदवारांचा कंत्राटी चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणेस मान्यता मिळावी.

२) एका केससाठी फक्त ३ वेळा जाणे येणे व मोफत निवास व्यवस्था करणेस मान्यता असावी. जर केसेस जास्त असतील तर एकत्रितपणे फक्त तीन वेळा वाहन व निवास व्यवस्था करणेस, तदनंतर मात्र अशी व्यवस्था खंडीत करणेस मान्यता असावी. सुनावणी कालावधी जास्तीत जास्त ३ महिनेच अंतिम निर्णयासह मर्यादीत ठेवणेस मान्यता असावी.

महाराष्ट्र शासनाचे पॅनलवरील सेवानिवृत्त ६० अधिकारी/कर्मचारी यांना कंत्राटी पध्दतीने खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक असलेबाबत पत्र पाठविणेत येऊन, ६० पैकी २० इच्छुक असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांनी संस्थानला पत्र पाठविलेले आहेत.

३) सदर कंत्राटी चौकशी अधिकारी यांना शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-- १०१४/प्र.अ..५५/११-अ, मंत्रालय, मुंबई, दि.१६-०२-२०१५ मधील तरतूदीनुसार मानधन अदा करण्यास व शासन त्यांचे पॅनलवरील चौकशी अधिकारी यांचे मानधनात वाढ करेल त्यानुसार ती लागु करण्यास मान्यता मिळावी.

यास्तव, कंत्राटी पध्दतीने मानधनावर खातेचौकशी अधिकारी नेमणूकीबाबत उपरोक्त प्रस्तावात नमूद मुद्दा क्रं.१ , २ व ३ नुसार मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव मा. तदर्थ समितीसमोर चक्रीय पध्दतीने सादर करणेस मान्यता असावी.

1/4/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

---

उपरोक्त प्रस्तावात नमुद मुद्दा क्रं.१, २ व ३ मध्ये नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस चक्रीय पध्दतीने मान्यता देण्यात आली.

मा. अध्यक्ष तदर्थ समिती, तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांनी दि. 10/5/2021 रोजीचे मुदतीची पूर्तता इतर सदर विषय पुन्हा तदर्थ समितीसमोर ठेवण्यात यावा.

श्रीमती गिता बनकर
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर तथा
सदस्या, तदर्थ (Ad-hoc) समिती

श्री.भानुदास पालवे 17/5/2021
अपर आयुक्त (महसुल), नाशिक तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती

1/4/21

श्री.कान्हूराज बगाटे, (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती

मा.श्री. श्रीकांत आणेकर
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती

**चक्रीय पध्दतीने आणलेल्या विषयावर निर्णय**
**दि. 10/05/2021**

485

**विषय – कायम कर्मचा-यांचे खातेचौकशीचे कामकाजाकरिता कंत्राटी पध्दतीने खाते चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छुक असलेले महाराष्ट्र शासनाचे पॅनलवरील सेवानिवृत्त कर्मचारी/अधिकारी यांचे प्राप्त अर्जाबाबत...**

विषय पाहिला. दि. 30/11/2016 चे व्यवस्थापन समितीच्या निर्णयानंतर त्या अनुषंगाने व्यवस्थापन समितीसमक्ष काही प्रस्ताव आणला होता का? त्यावर काय निर्णय झाला? याबाबत स्पष्टता नाही.

तसेच चौकशी अधिकारी कशा पध्दतीने नेमावेत, याबाबत तदर्थ समिती समक्ष कुठलाही विषय आणल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तावामध्ये श्री. साहेबराव लंके, वित्त व्यवस्थापक यांची श्री. काळवाघे यांनी चौकशी पूर्ण केली असून निष्कर्ष बाकी आहेत असे नमूद आहे. मात्र सदर विषय निम्न स्वाक्षरीकार यांच्याकडे आणून ठेवल्यानंतर सदर श्री. काळवाघे यांनी त्यांचा निर्णय पाठविला किंवा नाही याबाबत स्पष्टता नाही.

त्याचप्रमाणे श्री. पा.म. ताकटे, नाशिक यांच्याकडे श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर, सहायक शिक्षिका, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांचे विरुध्दची खाते चौकशी रजिष्टर्ड पोस्टाने दि. 15/12/2020 रोजीच्या आदेशान्वये पाठविण्यात आल्याचे नमूद केलेले आहे. त्या अनुषंगाने व्यवस्थापन समिती किंवा तदर्थ समिती यांचा निर्णय झाल्याचे नमूद केलेले नाही. निर्णय झालेला असल्यास त्याची प्रत तदर्थ समितीसमक्ष हजर करावी.

वरील बाबी स्पष्ट करुन सदर विषय पुन्हा तदर्थ समिती समक्ष ठेवण्यात यावा.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 10/05/2021

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि. ११.०५.२०२१



**विषय : कायम कर्मचाऱ्यांचे खाते चौकशीचे कामकाजाकरिता कंत्राटी पध्दतीने खाते चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस इच्छूक असलेले महाराष्ट्र शासनाचे पॅनलवरील सेवा निवृत्त कर्मचारी/अधिकारी यांचे प्राप्त अर्जाबाबत . . .**

सदरच्या विषयाचे अवलोकन केले असता सन २०१६ पासून संबंधित व्यवस्थापन समिती समोर याबाबत प्रस्ताव आणला होता किंवा कसे तसेच त्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला किंवा नाही याबाबी स्पष्ट होत नाही. चौकशी अधिकारी नेमण्याच्या पध्दतीबाबत तदर्थ समिती समोर कोणताही विषय मांडण्यात आलेला नाही. या प्रस्तावामध्ये श्री काळवाघे यांनी विषयामध्ये साहेबराव लंके, वित्त व्यवस्थापक यांची खाते चौकशी पूर्ण केली असून निष्कर्ष अहवाल येणे बाकी आहे, असे नमूद केले आहे. त्यामुळे याबाबत त्यांनी त्यांचा निर्णय पाठविला आहे किंवा कसे हे अवगत होत नाही.

त्याचप्रमाणे, पा. म. ताकटे यांच्याकडे श्रीमती जहॉआरा शहाबुददीन मिरजकर, सहायक शिक्षिका, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी विरुध्द नमूद असणारी खाते चौकशी रजिस्टर पोस्टाने पाठविले बाबत नमूद केले आहे. परंतू, त्या खाते चौकशीस अनुसरुन व्यवस्थापन समिती किंवा तदर्थ समिती यांचे निर्णय नमूद नाही. त्यामुळे वरिल नमूद बाबींची स्पष्टता आणून विषय पुन्हा तदर्थ समितीसमोर मांडण्यात यावा.

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि. ११.०५.२०२१

विषय क्र.- ९/१९८



**मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर**
**(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)**

---

**विषयः- श्री.अरुण गणपत जाधव, वायरमन, विद्युत विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत...**

**टिपणी**

(अ) **विषयाची पूर्वपिठीकाः-**

श्री.जाधव हे विद्युत विभागात वायरमन या पदावर कार्यरत आहात. त्यांची दि.०९.०५.२०२१ रोजी रात्री २०.०० वा. ते पहाटे ०४.०० वा. अशी डयुटी साईनगर, जनरेटर रुम येथे लावलेली होती. श्री.जाधव हे नेमलेल्या डयुटीचे ठिकाण सोडून श्री साईबाबा हॉस्पीटल येथे रात्री ११.१४ वा. ते रात्री १२.२८ वा. ॲडमीट केलेले कोरोना संसर्ग रुग्णांच्या वार्डात फिरत असतांना रुग्णालयाचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये ते दिसून आलेले आहेत. त्यांनी कामाची जागा सोडल्यामुळे श्री साईबाबा हॉस्पिटल या विभागाचा विदयुत पुरवठा खंडीत झाला असता तर रुग्णांचे जिवितास धोका निर्माण झाला असता. असे त्यांचे विरुध्द उप कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांचे निवेदन आलेले आहे.

श्री.जाधव हे थेट कोव्हीड उपचार घेत असलेल्या अतिदक्षता विभाग उदा. ICCU, GICU तसेच इतर सर्व कोव्हीड उपचार घेत असलेल्या वार्डमध्ये PPE KIT परिधान न करता तसेच कोणत्याही प्रकारची दक्षता सुरक्षा न बाळगता श्री.सचिन चौधुले यांचे बरोबर वार्डमध्ये विनापरवानगी जाऊन कोव्हीड उपचार घेत असलेल्या रुग्णांचे संपर्कात आल्याने सदर विषाणू मोठया प्रमाणात संक्रमीत होण्याची दाट शक्यता आहे. तसेच श्री.जाधव हे संक्रमित झालेस **सुपर स्प्रेडर** म्हणून समाजातील लोकांमध्ये त्वरीत मिसळून त्याचा प्रादूर्भात वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

श्री. जाधव यांनी मा.जिल्हाधिकारी यांनी कोव्हीडचे संदर्भात दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन केलेले आहे. त्यांनी साथरोग कायदा १८९७ चे कलम आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील तरतूदींचा भंग केलेला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ३(१) अन्वये संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :-

(i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल .
(ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ;
(iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.

श्री.जाधव यांनी उपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ चे कलम ३ (१) चे उल्लंघन केलेले आहे.

म्हणुन सदर गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.जाधव यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६४/२०२१ दि.१९-०५-२०२१ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून, त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आलेला होता. तथापी, श्री.जाधव यांना सदर कारणे दाखवा नोटीस दि.१९-०५-२०२१ रोजी प्राप्त झालेली आहे.

श्री.अरुण गणपत जाधव, यांची संस्थान सेवेत दि.०६.०८.२००४ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांना यापुर्वी गैरशिस्तवर्तनाबाबत शिक्षा करणेत आलेली नाही.

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये **किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(१) ठपका ठेवणे,
(२) पदोन्नती रोखणे,
(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.
(४) वेतनावाढी रोखुन धरणे,
(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

पान नंबर २ वर...

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

**मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्या व्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

**प्रस्ताव:-**

श्री.अरुण जाधव यांचे उपरोक्त गैरशिस्तवर्ताबाबत जा.नं.एसएसएसटी/सीसीटीव्हीसेल/ ५०५/ २०२१ दि.१३.०५.२०२१ रोजीचे पत्रान्वये शिर्डी पोलीस स्टेशन यांना पत्र दिलेले आहे.

अ) श्री.अरुण जाधव यांना उपरोक्त गैरशिस्तवर्तनाचे गांभीर्य विचारात घेता त्यांना संस्थान सेवेतून, "तात्पुरते सेवा निलंबीत" करुन, त्यांची विभागीय खाते चौकशी करता येईल. सेवा निलंबन कालावधीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (पदग्रहन अवधी आणि निलंबन, सेवेतुन बडतर्फी आणि काढुन टाकणे या कालखंडातील प्रदाने) विनीयम, २०१३ चे कलम १७ (अ) अन्वये त्यांना निलंबन कालावधीत निम्या वेतनावर रजेवर असताना जेवढे रजा वेतन मिळाले असते तेवढे वेतन अधिक रजा वेतनावरील महागाई भत्ता इतका निर्वाह भत्ता देता येईल.

तरी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचेसमोर चक्रीय पध्दतीने निर्णयास्तव सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

---

उपरोक्त प्रस्तावात नमुद केले ' अ ' प्रमाणे कार्यवाही करणेस चक्रीय पध्दतीने मान्यता देण्यात आली.

श्रीमती गिता बनकर
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर तथा
संदस्या, तदर्थ (Ad-hoc) समिती

श्री.भानुदास पालवे
अपर आयुक्त (महसुल), नाशिक तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती

श्री.कान्हूराज बगाटे, (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती

मा.श्री. श्रीकांत आणेकर
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय, दि. 28/05/2021

**विषय–श्री अरुण गणपत जाधव, वायरमन, विद्युत विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत ...**

अभिलेखावरुन असे दिसून येते की, सदर कर्मचा-याला दिनांक 19 मे 2021 रोजी लेखी नोटीस दिलेली आहे. सदर नोटीस मिळाल्याची पोहच सुध्दा नोटीसीवर नमूद आहे. सदरचा प्रस्तावही दि. 19 मे 2021 रोजीच तयार केलेला आहे. आज श्री. काकासाहेब ढेमरे, लिपिक, जे संबंधीत विभागात काम करतात, त्यांना विचारले असता नोटीसीचा खुलासा सदर कर्मचा-याने दिला किंवा नाही, याबाबत ते स्पष्ट करत नाहीत. आवक टपालात खुलासा दिला असल्यास मला माहीत नाही, असे उत्तर ते देतात. सदर कर्मचा-याने त्याचा खुलासा दिलाच नाही असे स्पष्टपणे टिपणीत नमूदही नाही. अशा परिस्थितीत सदर कर्मचा-याने खुलासा दिला किंवा नाही, या बाबतीत स्पष्टीकरण समिती समक्ष प्रथमतः सादर करावे. खुलासा दिला असल्यास तो समितीसमक्ष सादर करावा.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 28/05/2021

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि. ०७/०६/२०२१

**विषय : श्री अरुण गणपत जाधव, वायरमन, विद्युत विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत . . .**

प्रस्ताव वाचला. प्रस्तावावरुन स्पष्ट होते की; संबंधित अरुण गणपत जाधव यांना १९ मे २०२१ रोजी लेखी नोटीस देवून खुलासा सादर करणेबाबत कळविले होते. त्या नुसार या विषयावर मा. अध्यक्ष व इतर सदस्य मा. अप्पर आयुक्त, महसूल नाशिक यांनी अभिप्राय सादर केला आहे. त्यापैकी मा. अध्यक्ष तदर्थ समिती यांनी संबंधित कर्मचाऱ्याचा लेखी खुलासा समिती समक्ष सादर करण्याचे कळविले आहे. प्रस्तावाचे वाचन केले असता ही बाब मला स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक वाटते की संबंधित कर्मचारी यांनी दिनांक २४/०५/२०२१ रोजी त्याचा खुलासा सादर केला आहे. परंतू, मा. अध्यक्ष यांनी खुलासा समिती समक्ष सादर करणेबाबतचा अभिप्राय २८/०५/२०२१ रोजी दिलेला आहे.

सदरच्या प्रस्तावावरुन श्री अरुण जाधव यांची खाते चौकशी होणारच आहे. त्यामुध्ये सर्व बाबी स्पष्ट होतील तसेच सादर केलेल्या एफआयआर बाबत देखील खातेचौकशी व अनुषंगीक फौजदारी प्रक्रियेअंतर्गत योग्य ती चौकशी व तपास होणार असून त्याबाबत सर्व माहिती चौकशीअंती समोर येणार आहे. तसेच खुलासामध्ये संबंधित कर्मचाऱ्यानी त्याची बाजु मांडलेली आहे. त्यामुळे खाते चौकशी पूर्वीच निलंबन करणे योग्य वाटत नाही.

सबब, सदरचा प्रस्ताव माझेतर्फे नामंजूर करण्यात येतो.

07/06/2021

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि. ०७.०६.२०२१

मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर
(सामान्य प्रशासन शाखा,वशी-शिस्त)

---

विषय:- श्री.अरुण गणपत जाधव, वायरमन, विद्युत विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत...

टिपणी

(अ) विषयाची पूर्वपिठीका:-

श्री.जाधव हे विद्युत विभागात वायरमन या पदावर कार्यरत आहात. त्यांची दि.०९.०५.२०२१ रोजी रात्री ३०.०० वा. ते पहाटे ०४.०० वा. अशी डयुटी साईनगर, जनरेटर रुम येथे लावलेली होती. श्री.जाधव हे नेमलेल्या डयुटीचे ठिकाण सोडून श्री साईबाबा हॉस्पीटल येथे रात्री ११.१४ वा. ते रात्री १२.२८ वा. ॲडमीट केलेले कोरोना संसर्ग रुग्णांच्या वार्डात फिरत असतांना रुग्णालयाचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये ते दिसून आलेले आहेत. त्यांनी कामाची जागा सोडल्यामुळे श्री साईबाबा हॉस्पिटल या विभागाचा विदयुत पुरवठा खंडीत झाला असता तर रुग्णांचे जिवितास धोका निर्माण झाला असता. असे त्यांचे विरुध्द उप कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांचे निवेदन आलेले आहे.

श्री.जाधव हे थेट कोव्हीड उपचार घेत असलेल्या अतिदक्षता विभाग उदा. ICCU, GICU तसेच इतर सर्व कोव्हीड उपचार घेत असलेल्या वार्डमध्ये PPE KIT परिधान न करता तसेच कोणत्याही प्रकारची दक्षता सुरक्षा न बाळगता श्री.सचिन चौधुले यांचे बरोबर वार्डमध्ये विनापरवानगी जाऊन कोव्हीड उपचार घेत असलेल्या रुग्णांचे संपर्कात आल्याने सदर विषाणू मोठया प्रमाणात संक्रमीत होण्याची दाट शक्यता आहे. तसेच श्री.जाधव हे संक्रमित झालेस सुपर स्प्रेडर म्हणून समाजातील लोकांमध्ये त्वरीत मिसळून त्याचा प्रादूर्भात वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

श्री. जाधव यांनी मा.जिल्हाधिकारी यांनी कोव्हीडचे संदर्भात दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन केलेले आहे. त्यांनी साथरोग कायदा १८९७ चे कलम आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील तरतूदींचा भंग केलेला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ३(१) अन्वये संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :-

(i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल .
(ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ;
(iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.

श्री.जाधव यांनी उपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ चे कलम ३ (१) चे उल्लंघन केलेले आहे.

म्हणुन सदर गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.जाधव यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२६४/२०२१ दि.१९-०५-२०२१ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून, त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आलेला होता. तथापी, श्री.जाधव यांना सदर कारणे दाखवा नोटीस दि.१९-०५-२०२१ रोजी प्राप्त झालेली आहे.

श्री.अरुण गणपत जाधव, यांची संस्थान सेवेत दि.०६.०८.२००४ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांना यापुर्वी गैरशिस्तवर्तनाबाबत शिक्षा करणेत आलेली नाही.

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत

(१) ठपका ठेवणे,
(२) पदोन्नती रोखणे,
(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.
(४) वेतनावाढी रोखुन धरणे,
(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

पान नंबर २ वर...

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्या व्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

प्रस्ताव:-

श्री.अरुण जाधव यांचे उपरोक्त गैरशिस्तवर्ताबाबत जा.नं.एसएसएसटी/सीसीटीव्हीसेल/ ५०५/ २०२१ दि.१३.०५.२०२१ रोजीचे पत्रान्वये शिर्डी पोलीस स्टेशन यांना पत्र दिलेले आहे.

अ) श्री.अरुण जाधव यांना उपरोक्त गैरशिस्तवर्तनाचे गांभीर्य विचारात घेता त्यांना संस्थान सेवेतून, "तात्पुरते सेवा निलंबीत" करुन, त्यांची विभागीय खाते चौकशी करता येईल. सेवा निलंबन कालावधीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (पदग्रहन अवधी आणि निलंबन, सेवेतुन बडतर्फी आणि काढुन टाकणे या कालखंडातील प्रदाने) विनीयम, २०१३ चे कलम १७ (अ) अन्वये त्यांना निलंबन कालावधीत निम्या वेतनावर रजेवर असतामा जेवढे रजा वेतन मिळाले असते तेवढे वेतन अधिक रजा वेतनावरील महागाई भत्ता इतका निर्वाह भत्ता देता येईल.

तरी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचेसमोर चक्रीय पध्दतीने निर्णयास्तव सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

---

उपरोक्त प्रस्तावात नमुद केले ' अ ' प्रमाणे कार्यवाही करणेस चक्रीय पध्दतीने मान्यता देण्यात आली.

श्रीमती गिता बनकर
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर तथा
सदस्या, तदर्थ (Ad-hoc) समिती

श्री.भानुदास पालवे
अपर आयुक्त (महसुल), नाशिक तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती

श्री.कान्हूराज बगाटे, (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती

मा.श्री. श्रीकांत आणेकर
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती

विषय क्र.- ९/११९

दिनांक: ०३ जून, २०२१

# मा. तदर्थ समितीचे समोर चक्रीय पध्दतीने मान्यतेस्तव सादर

सामान्य प्रशासन विभाग (आस्थापना).

विषय - माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे मे, २०२१ चे मानधन सानुग्रह अनुदान प्रित्यर्थ अदा करणेबाबत. . . . .

टिपणी-

विषयाची पूर्वपीठीका -

(अ-१) मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीचे शासन निर्णयानुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास, म्हणजेच एकूण ४८२६ पदांना (स्थायी २९०८ पदे + अस्थायी १९१८ पदे) खालील अटी-शर्तीस अधिन राहून मान्यता दिलेलीआहे. या अटी-शर्तीचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे –

(१) समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील

(०२) सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.

(०३) सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

(०४) सेवा प्रवेश नियमांमध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख असावा.

(०५) आकृतीबंधातील मंजुर पदांवर काम करणा-या कर्मचा-यांना शासनाप्रमाणे निवृत्तीवेतन लागू असणार नाही.

(०६) समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही.

(०७) समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.

(०८) समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.

(०९) आस्थापनेवरील खर्च सिमीत करण्यासाठी राज्य शासनाच्या अधिका-यांची आकृतीबंधामध्ये निश्चित पदांवर प्रतीनियुक्तीने नियुक्ती करण्याची तरतूद ठेवावी.

(१०) तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.

(११) आकृतीबंधातील पदांवर नविन कर्मचा-यांची नियमित पदावर नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचा-यांचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असावा व त्याचे वेतन वेतनश्रेणीतील सुरूवातीच्या टप्प्यावर निश्चित करावे.

(अ-२) दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ चे शासन निर्णयानुसार मंजूर आकृतीबंधात, उपरोक्त परिच्छेद अ-२ व अ-५ मध्ये नमूद केलेल्या वाढीव पदांची मान्यता विचारात घेता, सध्या एकूण ४८३८ (४८२६+०२+१०) पदांचा आकृतीबंध मंजूर असून, यामध्ये स्थायी पदे २९२० (२९०८+१२) + कंत्राटी पदे १९१८ यांचा समावेश आहे.

(अ-३) दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे प्रस्तावाव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल - ८११ व कुशल - १०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

या प्रस्तावाचे अनुषंगाने, उपरोक्त परिच्छेद अ मध्ये नमुद केलेल्या विवेचनास तसेच संदर्भाकित पत्रव्यवहारास अनुसरुन, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३ / २२ / प्र.क्र.७० / का.१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ अन्वये शासन निर्णय पारित केलेला आहे.

(अ-४) मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत " या शीर्षाखाली पारित केलेल्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -

" .. ..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या ६३५ कर्मचा-यांपैकी कुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५.९१३/- (रु. पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५.११३/- (रु. पाच हजार एकशे तेरा फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस मंजुरी देऊन शासनाच्या दि. ०७.०८.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम,

*२००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.*

*उपरोक्तप्रमाणे एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधित कर्मचा-याचा संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status)हा कंत्राटी कर्मचारी म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. "*

(अ-५) दिनांक ०५/०६/२०१९ ते दिनांक ३०/१०/२०१९ अखेरचे कालावधीत महाराष्ट्र शासन महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजासंदर्भात प्राप्त झालेले शासन निर्णयांचे मा. तदर्थ समितीचे दिनांक ०४ डिसेंबर, २०१९ रोजीचे सभेत सदरहू निर्णयाचे निर्णय क्र. ५७५ अन्वये वाचन करुन नोंद घेणेत आलेली आहे.

(अ-६) सामान्य प्रशासन विभागाकडील संदर्भ क्रमांक ०४ मध्ये नमूद केलेल्या विविध विवेचनात्मक टिपणीनुसार, दिनांक २३ मे, २०१९ रोजीचे कामगार विभागाकडील टिपणी-वजा-पत्रासोबत प्राप्त झालेल्या ६३५ कर्मचा-यांचे यादीनुसार, त्यामध्ये समाविष्ट असणारे कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर हजर असलेले) मधील हजर दिवसांची तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था / २२०० /(०१ ते ६३५) /२०१९ दिनांक ०२ जानेवारी, २०२० अन्वये नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार ५९८ कंत्राटी कर्मचारी कामावर हजर झालेले आहेत.

(ब) २८ ऑगष्ट, २०२० रोजीचे सभेचे इतिवृत्त दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२० रोजी इकडील विभागास प्राप्त झालेले असून त्यातील निर्णय क्र. ४२१ मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे-

" दिनांक १३.०७.२०२० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा. तदर्थ (Ad-hoc) समित सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा. सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.

निर्णय क्र. ३६०- सदस्य सचिव श्री. बगाटे साहेब यांनी दि. १३.०७.२०२० चे विषय क्र. ६ निर्णय क्र. ३६ बाबत सदरचा निर्णय होतांना पूर्वीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. डोंगरे यांनी रेकॉर्डवर जे मुद्दे मांडले होते. तेच मुद्दे पुन्हा मांडतांना समिती सदस्य सचिव / मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत खालील प्रमाणे मत मांडले.

सन १९ नोव्हेंबर, २०११ रोजी तत्कालीन व्यवस्थापन समितीने कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत कार्यरत असलेल्या ९१६ कंत्राटी कर्मचा-यांना नियमीत नेमणूका देण्यास मान्यता देण्यात आली होती. व तो प्रस्ताव शासनास सादर केलेला होता. सदर ९१६ कंत्राटी कामगारांपैकी २२ ऑगष्ट, २००४ पुर्वी कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत असलेल्या ६३५ कंत्राटी कामगारांना पात्र ठरविण्यात आले व त्यानुसार शासन निर्णयाची शासनाने दि. १७.०९.२०१९ रोजी शासन निर्णय पारित करुन त्यास मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयाची संस्थान प्रशासनाने अंमलबजावणी करुन ५९८ कर्मचा-यांना कायम कंत्राटी स्वरुपात नेमणूक दि. ०२ जानेवारी, २०२० रोजी दिली आहे. सदर कार्यवाही ही, तात्कालीन व्यवस्थापन समितीच्या व शासन मान्यतेने केलेली आहे, असे मत मांडले.

५९८ कर्मचा-यांना राज्य शासनाचे विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय दि. १७.०९.२०१९ अन्वये ठेकेदाराचे आस्थापनेवरील एकूण ६३५ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूकीस मान्यता दिलेली आहे व या शासन निर्णयान्वये तात्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या ५९८ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी स्वरुपात दि. ०२.०१.२०२० रोजी नेमणूक दिलेली असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता द्यावी असे प्रतिपादन केले.

त्यावर तदर्थ समितीचे अध्यक्ष, श्री. आणेकर साहेब व सदस्य श्री. स्वामी साहेब यांनी असे प्रतिपादन केले की, सदरचा निर्णय हा संपूर्ण विषयाचा अभ्यास करुन 3 X 1 अशा मताधिक्याने मंजूर करण्यात आलेला असल्याने त्यात बदल करण्याचा प्रश्न येत नाही. सबब सदरचा निर्णय मताधिक्याने कायम करण्यात आला."

तसेच मा. तदर्थ समितीचे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० रोजीचे चक्रीय पध्दतीने ५९८ कर्मचारी यांचेबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे-

(iv) वरील नमूद ५९८ कर्मचा-यांना, त्यांनी केलेल्या कामाप्रमाणे ऑगस्ट, २०२० ते ३१ ऑक्टोबर, २०२० पर्यंत वरील नमूद दि. १३.०७.२०२० च्या तदर्थ समितीच्या सभेतील निर्णय क्र. ३५७ प्रमाणे वेतन द्यावे मात्र असे वेतन हे सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ द्यावे कारण त्यांचे बाबतीत संस्थान प्रशासनाने दि. १३.०७.२०२० रोजीच्या निर्णयानंतर योग्य तो प्रस्ताव आणलेला नाही व त्यांचा दर्जा (status) स्पष्ट नाही.

(v) मानवतेच्या दृष्टीकानातून सदर ५९८ कर्मचा-यांना ३१ ऑक्टोबर २०२० पर्यंत काम केलेले असल्याने त्यांना, अटी व शर्तींची पूर्तता केली असल्यास, वरील प्रमाणे दि. ०१ ऑक्टोबर, २०२० ते ३० सप्टेंबर, २०२० या कालावधीतील त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३% दराने सानुग्रह अनुदान देण्यात यावे.

(vi) सदर ५९८ कर्मचा-यांबाबत योग्य तो प्रस्ताव ठेवण्याची मुभा संस्थान प्रशासनास आहेच.

पान ३.वर .... कृ.पा.प. .. ..

(क) संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कर्मचारी यांचे नियुक्तीबाबत मा. अध्यक्ष तदर्थ समिती यांना जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२०६५/ २०२०, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२० नुसार यथोचीत मार्गदर्शन मिळणेबाबत विनंती करणेत आलेली होती. त्यावर मा. अध्यक्ष तदर्थ समिती यांनी जा.नं. आस्था/ ४७२/२०२० दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२० नुसार ई-मेल पत्र पाठविलेले आहे. ५९८ कर्मचारी यांचे नियुक्तीबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-४/२१०२/२०२० दिनांक ०५ नोव्हेंबर, ई-मेल पत्र पाठविणेत आलेले आहे. सदरचे ई-मेल पत्राबाबत अद्यापपर्यंत कुठलाही निर्णय आलेला नाही.

तथापि, दिनांक १३ जुलै, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० व दिनांक २८ ऑगष्ट, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४२१ नुसार कार्यवाही करणेसाठी दिनांक १९ नोव्हेंबर, २०२० रोजी टिपणी / प्रस्ताव सादर करणेत येऊन संस्थान आस्थापनेवर घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/ २२००/ (०१ ते ६३५)/ २०१९ दिनांक ०२ जानेवारी, २०२० अन्वये देणेत आलेले आदेश रद्द करुन त्यांच्या सेवा दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२० पासून संबंधित ठेकेदार यांचेकडे वर्ग करणेसाठी जा.क्र. एसएसएस/साप्रशा/आस्था/१५१९/२०२० दिनांक २१ नोव्हेंबर, २०२० अन्वये आदेश पारित करणेत आलेला होता. तसेच जा.क्र. एसएसएस/ साप्रशा/आस्था/ १६१२/२०२० दिनांक ०१/१२/२०२० रोजी आदेशान्वये संस्थान आस्थापनेवार घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा दिनांक ०२ डिसेंबर, २०२० पासून पुढील आदेश हाईपावेता खंडीत करणेबाबत आदेश पारित करणेत आलेला होता. परंतू सदरचे प्रकरणाबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक ०१ डिसेंबर, २०२० रोजी जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्याचे मौखिक निर्देश दिल्याने ते पारित करता आलेले नाहीत.

तथापि दरम्यान श्री. अनिल कचरु कोते व इतर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० दि. १०/९/२०२० रोजी दाखल केले. सदर रिट पिटीशन मध्ये श्री अनिल कोते व इतर यांनी मा. तदर्थ समितीचे दिनांक १३/०७/२०२० रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ३६० रद्द करणेस तसेच त्यावर कोणतीही कार्यवाही न करणेबाबत विनंती केलेली आहे. सदर प्रकरण मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सध्या न्यायप्रविष्ठ आहे. सदर प्रकरणामध्ये महाराष्ट्र शासन व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना प्रतिवादी करण्यात आलेले आहे. या प्रकरणामध्ये संस्थानने आपले प्रतिज्ञापत्राव्दारे म्हणणे दि. ०४/११/२०२० रोजी मा. उच्च न्यायालयात सादर केले आहे. महाराष्ट्र शासनानेही सदर प्रकरणामध्ये प्रतिज्ञापत्राव्दारे दाखल केले असल्याचे समजते तथापि शासनाने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राचा तपशिल इकडे उपलब्ध नाही.

सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असतांना मा. तदर्थ समितीच्या दिनांक १३/०७/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३६० यावर अंमलबजावणी करावयाची झाल्यास सदर प्रकरणी महाराष्ट्र शासनाकडून दाखल करण्यात आलेली भूमिका तसेच संस्थानकडून दाखल करण्यात आलेले परिच्छेद निहाय शेरे आणि दाखल करण्यात आलेले प्रमाणपत्र यात सुसंगती असणे आवश्यक आहे. तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने निर्णय घेऊन त्याआधारे विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्र. सांसवि- २०१३/२२/प्र.क्र.७०/का.१६, मंत्रालय मुंबई, दिनांक १७/०९/२०२० नुसार आदेश परित केलेले आहे. सदर शासनाचे निर्णयाचे आधारे सदर कर्मचा-यांना दिनांक ०२/०१/२०२० पासून संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून घेण्यात आलेले आहे.

मात्र आता, तदर्थ (Ad-hoc) समितीचे ठरावांची अंमलबजावणी करतांना वरील पार्श्वभूमीवर परस्पर विरोधी भूमिका नसावी अशी सर्वसाधारण प्रशासकीय निकड लक्षात घेऊन दि. २१ नोव्हेंबर, २०२० चे आदेशाची अंमलबजावणी करतांना प्रशासकीय अडचण निर्माण झालेली आहे. संस्थानस्तरावर तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णय आणि शासन निर्णय हे परस्पर पुरक ठरत नाहीत. सबब तदर्थ (Ad-hoc) समितीचा निर्णय अंमलबजावणी करण्यास्तव शासन स्तरावरुन याबाबत मार्गदर्शन होणेसाठी जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/२२९०/२०२० दि. २१/११/२०२० अन्वये विनंती करणेत आलेली आहे. तसेच याबाबत मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांनीही मार्गदर्शन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तथापि सदर प्रकरणी मा. महाराष्ट्र शासन व मा. अध्यक्ष, तदर्थ समिती यांचेकडून कुठलेही मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

ड) श्री. अनिल कचरु कोते व इतर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० दि. १०/९/२०२० रोजी दाखल केलेली आहे. याबाबत-

१) दिनांक २३/११/२०२० व दिनांक ०१/१२/२०२० रोजी सुनावणी होऊन मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी जे मौखिक निर्देश दिले त्याबाबत संस्थानचे वकील ॲड. अनिल बजाज यांनी लेखीपत्र ई-मेलव्दारे कळविले आहे-

The Writ Petition No. 6224 of 2020 was listed on board on dt. 23/11/2020 and the Hon'ble Court orally instructed the undersigned not to terminate the employment of the 598 workers who are subject matter of the present Writ petition, and again when the Writ Petition was listed on dt. 01.12.2020 the court orally instructed to maintain the status-quo.

पान ४ वर... कृपया प...

The Dy. CEO Mr. Thakre & Mr. Nalge were present on the said date and are aware of the same. This is for your records and necessary actions.

२) मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे दिनांक ०८ डिसेंबर, २०२० रोजीचे सुनावणीबाबत मा. न्यायालय यांनी खालीलप्रमाणे लेखी आदेश दिलेले आहेत-

1. It is submitted that Mr.Bajaj, learned Advocate for respondent no. 2 is not well.

2. Place the mattet on 6th January 2021.

३) तसेच दिनांक ०८ डिसेंबर, २०२० रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालय यांनी दिलेल्या मौखिक निर्देशाबबत ॲड. अनिल बजाज यांनी खालीलप्रमाणे लेखीपत्र ई-मेलव्दारे कळविले आहे-

The Writ Petition No. 6224 of 2020 was listed on board on dt. 23.11.2020 and the Hon'ble Court orally instructed the undersigned not to terminate the employment of the 598 workers who are subject matter of the present Writ petition, and again when the Writ petition was listed on dt. 01.12.2020 the court orally instructed to maintain the status-quo.

That, on dt. 08.12.2020 the matter was listed again on the board and as the undersigned was not well the matter was adjourned and the Hon'ble Court has again orally instructed to follow the same orders and not to terminate the employment of 598 workers.

रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० ची उपरोक्त सद्यस्थिती मा. तदर्थ समिती समक्ष सादर करणेस तसेच सदरचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी विविध विभागांमध्ये कर्तव्यावर उपस्थितीत असल्याने त्यांना माहे नोव्हेंबर, २०२० व तदनंतरचे वेतन अदा करणेबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे दिनांक १९/१२/२०२० रोजीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता. त्यावर दिनांक १९/१२/२०२० रोजीचे मा. तदर्थ समितीचे सभेतील निर्णय क्र. ५७४ खालीलप्रमाणे झालेला आहे. " प्रस्तुत प्रकरण मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ असल्याने माहे, नोव्हेंबर व डिसेंबर, २०२० या महिन्यांचे प्रत्यक्ष कामावर हजर असलेल्या दिवसाचे किमान विहीत वेतनदरानुसार १०० टक्के आणि कोव्हीड-१९ लॉकडाऊन कालावधीतील उर्वरीत दिवस कामावर हजर नसल्याने, त्या दिवसांचे किमान विहीत वेतनदरानुसार ५० टक्के अदा करण्यास मान्यता देण्यात आली. "

मा. अध्यक्षांनी खालील मत मांडले-

सदर ५९८ व्यक्तीचा दर्जा (status) निश्चित नाही. सर्व बाबी न्यायप्रविष्ट आहेत, त्यामुळे त्यांना सानुग्रह अनुदान म्हणून माहे नोव्हेंबर व डिसेंबर-२०२० चे हजर दिवसांबाबतचे अनुदान देण्यास हरकत नसावी.

समिती सदस्या श्रीमती बनकर यांनी सदरचा विषय न्यायप्रविष्ट असलेने त्यांना सानुग्रह अनुदान देण्यास हरकत नाही असे मत मांडले.

तथापि माहे नोव्हेंबर, २०२० चे वेतन जा.क्र. एसएसएस/ साप्रशा / आस्था/ १८७१/ २०२० दिनांक ०५ जानेवारी, २०२१ नुसार ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे दिनांक १५ नोव्हेंबर, २०२० पर्यंत वेतन मा. तदर्थ समितीचे दिनांक १३/०७/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५७ प्रमाणे हजर दिवसाला पूर्ण व कामावर नसलेल्या दिवसाला अर्धवेतन तसेच दिनांक १६ नोव्हेंबर, २०२० पासून श्रींचे मंदिर भक्तांना दर्शनासाठी खुले करण्यात आले असल्याने कामाचे हजर दिवसानुसार, सानुग्रह अनुदाना प्रित्यर्थ अदा करणेबाबत आदेशित करणेत आलेले आहे. तसेच माहे डिसेंबर, २०२० चे वेतन जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/१९०६/२०२० दिनांक १३/०१/२०२१ रोजीचे आदेशानुसार दिनांक १६ नोव्हेंबर, २०२० पासून श्रींचे मंदिर भक्तांना दर्शनासाठी खुले करण्यात आले असल्याने कामाचे हजर दिवसानुसार, सानुग्रह अनुदाना प्रित्यर्थ अदा करणेबाबत आदेशित करणेत आलेले आहे.

ई) ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा संस्थान आस्थापनेवरुन कंत्राटदाराच्या आस्थापनेवर वर्ग करण्या संदर्भात जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्याच्या मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशाप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असल्याने सदरचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी विविध विभागांमध्ये कर्तव्यावर उपस्थितीत आहेत. ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना माहे ऑगष्ट, २०२० ते डिसेंबर, २०२० पर्यंतचे वेतन हे सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ (दिनांक १६ नोव्हेंबर, २०२० पासून श्रींचे मंदिर भक्तांना दर्शनासाठी खुले करण्यात आले असल्याने दिनांक १६/११/२०२० पासून कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने वेतन अदा करणेत येत आहे.) अदा करणेत आलेले आहे.

सबब ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतन रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद यांचे अंतिम आदेशापर्यंत कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने अदा करणेसाठीचे मान्यतेसाठी दिनांक २८/०१/२०२१ रोजी मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्यावर मा. अध्यक्ष साहेब यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद, येथे दाखल करणेत आलेले ॲफिडयुटची प्रत सादर करणेबाबत मौखीक निर्देश दिलेले होते.

पान ५ वर....कृ.मा.प. .....

दिनांक १६/०२/२०२१ रोजी कामगार विभागामार्फत सन २०२१-२२ करिता सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविणेकामी फेरप्रस्ताव सादर करणेस व निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आहे त्या कॉन्ट्रक्टर्स यांना मुदतवाढ देणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर केला होता. सदरचे प्रस्तावाबाबत मा. अध्यक्ष साहेब यांनी 'माहे जानेवारी २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कार्मचारी म्हणून सामावून घेण्यात आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतन अदा करणेबाबतच्या' दि. २८/०१/२०२१ रोजीच्या प्रस्तावावर मा. उच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिकेची प्रत व त्यामध्ये संस्थान प्रशासनाने व शासनाने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत सदरहू विषयाच्या अनुषंगाने निर्णय घेण्याकरता अवलोकनासाठी हजर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सोबत दिनांक १६/०२/२०२१ रोजीचे चक्रीय पध्दतीचे निर्णयाची प्रत सोबत अवलोकनार्थ सादर केलेली आहे.

त्यानुसार दिनांक २०/०२/२०२१ रोजी मा. अध्यक्ष साहेब यांनी मागविलेले सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती अवलोकनार्थ सादर केलेल्या आहेत. मा. अध्यक्ष साहेब यांचेकडे प्र. आस्थापना विभाग प्रमुख ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतनाबाबतच्या चक्रीय पध्दतीचे विषयाबाबतचे निर्णयार्थ अहमदनगर येथे दिनांक २३/०२/२०२१ रोजी जाऊन आलेले आहेत. तथापि ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतनाबाबत दिनांक २४/०२/२०२१ पर्यंत निर्णय झालेला नसल्याने.

The payment of wages Act 1936 नियम ५ मध्ये वेतनाबाबत पुढील प्रमाणे तरतुद आहे-

(c) Any railway, factory or industrial or other establishment upon or in which less than one thousand persons are employed, shall be paid before expiry of the seventh day.

(d) Any other railway, factory or industrial or other establishment, shall be paid before the expiry of the tenth day.

तसेच दिनांक १७/०२/२०२१ रोजीचे अर्जान्वये श्री अविनाश बाबासाहेब जगताप व इतर ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांनी त्यांना वेतन न मिळाल्याने त्यांचे कुटुंबाला अर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे घरात कौटुंबिक कलह निर्माण होत असलेमुळे वेतन मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

उपरोक्त सर्वबाबींचे अवलोकन करुन ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतन रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे अंतिम आदेशापर्यंत कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने अदा करणे विधीवत व अनिवार्य आहे. सदरची बाब मा. तदर्थ समिती अध्यक्ष व सदस्य यांना उक्त विवेचणासह माहितीस्तव तथा अवलोकनार्थ जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ३६९६ /२०२१ दि. २४/०२/२०२१ रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आलेली आहे.

उ) माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंतरचे वेतन अदा करणेबाबत दिनांक २५/०२/२०२१ रोजी चक्रीय पध्दतीने खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

(१) दिनांक २५/०२/२०२१ रोजची चक्रीय पध्दतीचे निर्णयातील मुद्दा क्र. ५ मध्ये मा. श्रीकांत एल. आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर, तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

आज संस्थान प्रशासनाने काही बाबी नमूद करुन ५९८ कर्मचा-यांना त्यांचे वेतन देण्याबाबत ब-याच बाबींचा अहापोह केलेला आहे. मुलतः सदर ५९८ कर्मचा-यांचे status स्पष्ट नसल्याने त्यांच्या बाबतीत वेतन हा शब्दच अयोग्य आहे आणि म्हणूनच आजपर्यंत सदर कर्मचा-यांनी दिलेल्या सेवेबाबत त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे व असे अनुदान मा. उच्च न्यायालयाचे मंजूर केलेले आहे. अशा परिस्थितीत सरसकट वेतन हा शब्द न वापरुन त्यांना दरमहा केलेल्या कामाचा मेहनताना देणे व ही बाब वेळोवेळी ठरविणे, हेच योग्य आहे, कारण सर्व बाबी मा. उच्च न्यायालयासमक्ष न्यायप्रविष्ट आहेत. म्हणूनच संस्थान प्रशासन सुध्दा दि. २८/०१/२०२१ च्या प्रस्तावामध्ये सदर ५९८ कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अदा करण्याबाबत मान्यता मागत आहे, जी देणेत येत आहे. करिता सदर ५९८ कर्मचा-यांना माहे जानेवारी, २०२१ व फेब्रुवारी, २०२१ मध्ये त्यांनी काम केलेले असल्यास त्यांनी केलेल्या कामाचा मेहनताना मानवतेच्या दृष्टीकोनतून सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहून देण्यास माझी मान्यता आहे.

(२) दिनांक २८/०१/२०२१ रोजीचे चक्रीय पध्दतीचे विषय सादर करतांना श्री. कान्हूराज बगाटे, (भा.प्र.से), मा. मुख्य कार्यकारी अधिका-तथा-सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती, यांचा निर्णय खालीलप्रामणे –

५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व तदनंरचे वेतन रिट पिटीशन क्र. ६२२४/२०२० बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद यांचे अंतिम आदेशापर्यंत कामाचे हजर दिवासानुसार विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

(३) दिनांक २५/०२/२०२१ रोजची चक्रीय पध्दतीचे निर्णयाबाबत दिनांक २७/०२/२०२१ रोजी श्री. भानुदास ह. पालवे, अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक-तथा-सदस्य तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

मा. उच्च न्यायालयाचे मान्यतेस अधिन राहून माह जाने. २०२१ व माहे फेब्रु, २०२१ या महिन्याचे महेनताना सानुग्रह अनुदान म्हणून मंजुरीस माझी हरकत नाही.

(४) दिनांक २५/०२/२०२१ रोजची चक्रीय पध्दतीचे निर्णयाबाबत दिनांक ०८/०३/२०२१ रोजी श्रीमती गिता पी. बनकर, सहा. धर्मदाय आयुक्त, अहमदनगर-तथा-सदस्य तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

संस्थान मार्फत सादर करण्यात आलेला प्रस्ताव वाचला. प्रस्ताव, मा. सदस्य अप्पर आयुक्त नाशिक यांचा अभिप्राय तसेच मा. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांचा अभिप्राय वाचला. संस्थानमार्फत सादर करण्यात

आलेल्या विषयाचे अवलोकन केले असता त्यामध्ये कंत्राटी कर्मचारी व वेतन अशा शब्दप्रयोग केल्याचे दिसून येते. त्यामुळे ५९८ कर्मचा-याची स्थिती status अद्याप स्पष्ट न झाल्यामुळे त्यांच्याबाबत वेतन हा शब्द वापरणे अयोग्य आहे.

त्यामुळे त्यांना सानुग्रह मेहनताना हा शब्द वापरणे उचित होईल. याबाबत मा. उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असणा-या न्यायप्रविष्ठ बाबींच्या आदेशास अधिन राहून मान्यता देण्यास हरकत नाही.

त्यानुसार ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे जानेवारी, २०२१ व माहे फेब्रुवारी, २०२१ चे वेतन सानुग्रह अनुदानाप्रित्यार्थ अदा करणेस जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/ २२६०/२०२१ दिनांक २५/०२/२०२१ नुसार आदेश पारित करणेत आलेले आहे.

ऊ) मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट पिटीशिन ६२२४/२०२० बाबत दिनांक २२ मार्च, २०२१ रोजी खालीलप्रमाणे आदेशीत केलेले आहे.

1. The objection is regarding court fees. The petitioner shall comply the objection of deficit court fees.

2. Stand over to 05.04.2021.

माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी माहे मार्च, २०२१ मध्ये विविध विभागांमध्ये कर्तव्यावर उपस्थितीत असल्याने त्यांचे माहे मार्च, २०२१ वेतन कामाचे हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ अदा करणेसाठी मा. तदर्थ समितीचे सभेसमोर दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी चक्रीय पध्दतीने प्रस्ताव सादर करणेत आला होता.

(१) दिनांक ०७/०४/२०२१ रोजची चक्रीय पध्दतीचे निर्णयात मा. श्रीकांत एल. आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर, तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

पूर्वीचे निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे मुलतः सदर ५९८ कर्मचा-यांचे status स्पष्ट नसल्याने त्यांच्या बाबतीत 'वेतन' हा शब्दच अयोग्य आहे आणि म्हणूनच आजपर्यंत सदर कर्मचा-यांनी दिलेल्या सेवेबाबत त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे व असे अनुदान मा. उच्च न्यायालयाने मंजूर केलेले आहे. अशा परिस्थितीत सदर ५९८ कर्मचा-यांना, माहे मार्च २०२१ मध्ये काम केलेले असल्यास त्यांना केलेल्या कामाचा मेहनताना मानवतेच्या दृष्टीकोनातून सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहून देण्यास माझी मान्यता आहे.

(२) दिनांक २४/०३//२०२१ रोजीचे चक्रीय पध्दतीचे विषय सादर करतांना श्री. कान्हूराज बगाटे, (भा.प्र.से), मा. मुख्य कार्यकारी अधिका-तथा-सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती, यांचा निर्णय खालीलप्रामणे –

५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे मार्च, २०२१ चे वेतन कामाचे हजर दिवासानुसार विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

(३) दिनांक ०७/०४/२०२१ रोजी चक्रीय पध्दतीने श्री. भानुदास ह. पालवे, अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक-तथा-सदस्य तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

५९८ कर्मचा-यांना मार्च, २०२१ मध्ये केलेल्या कामाचा मेहनताना सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधिन राहून मंजूर करणेस हरकत नाही.

(४) श्रीमती गिता पी. बनकर, सहा. धर्मदाय आयुक्त, अहमदनगर-तथा-सदस्या तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

पान ७ वर ....कृ.मा.प. ....

५९८ कर्मचा-यांना माहे मार्च, २०२१ मध्ये केलेल्या कामाचा मेहनताना सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहून देण्यास हरकत नाही.

त्यानुसार ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे मार्च, २०२१ चे वेतन कामाचे हजर दिवासानुसार विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदानाप्रित्यर्थ अदा करणेत आलेले आहे.

ए) आता, महसूल व वन, अपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी क्रमांकः डीएमयु/ २०२०/ प्र.क्र. ९२/ डीआयएसएम-१, दिनांक ०४ एप्रिल, २०२१ नुसार ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात कोव्हीड-१९ विषाणूचा फैलाव होण्याचा धोका आहे. याबद्दल राज्य शासनाची खात्री पटली आहे. आणि म्हणून विषाणूचा फैलाव होण्यास प्रतिबंध करण्यासाठी व परिरोध करण्याकरिता काही तातडीच्या उपायोजना हाती घेण्यासाठी साथरोग अधिनियम, १८९७ याचे कलम २ तसेच अपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ याच्या अन्य सर्व समर्थकारी तरतुदी यांअन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर वापर करुन, शासनास, संपूर्ण महाराष्ट्र राज्यमध्ये ३० एप्रिल, २०२१ पर्यंत पुढील उपाययोजनांची अंमलबजावणी करणे इष्ट वाटत आहे.

त्यानुसार लागू केलेल्या उपाय योजना आदेशातील क्र. ०९ मध्ये धार्मिक स्थळांबाबत खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

९. धार्मिक पूजा स्थळे / उपासना स्थळे

- धार्मिक पूजा स्थळे / उपासना स्थळे बंद राहतील.
- धार्मिक स्थळी सेवा देणारे सर्व कर्मचारी, त्यांची कर्तव्ये नियमितपणे बजावतील, परंतु बाहेरील अभ्यागतांना तेथे जाण्यास परवानगी असणार नाही.
- या ठिकाणी काम करणा-या सर्व कर्मचा-यांचे, भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्वांनुसार लवकरात लवकर लसीकरण करुन घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे. जेणेकरुन ही ठिकाणे पुन्हा शीघ्रतेने सुरु करता येतील.

तसेच, मा. जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचेकडील क्र. डी.सी./ कार्या ९ब१/ ८६६/२०२१, दिनांक ०५ एप्रिल, २०२१ अन्वये असे आदेशित केले आहे की,

".. .. त्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रदुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दि. १३ मार्च, २०२० पासुन लागू करुन खंड २, ३, ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोरोना (कोव्हीड-१९) वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्याकरणेसाठी सक्षम प्रधिकारी म्हणुन घोषित करण्यात आलेले आहे.

ज्याआर्थी, दिनांक ०४/०४/२०२१ रोजीचे आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्याचे अनुषंगाने सुधारित मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत. तदनुषंगाने अहमदनगर जिल्ह्यामध्ये कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा संसर्ग व प्रादुर्भाव रोखणेकामी प्रतिबंधात्मक आदेश दि. ३०/०४/२०२१ रोजीचे रात्री २४.०० वाजेपर्यंत लागू करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी अहमदनगर जिल्ह्यात व लगतच्या जिल्ह्यामध्ये कोरोना बाधीत रुणांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यास्तव या कार्यालयाव्दारे वेळोवेळी निर्गमित केलेल्या कोरोनरा विषाणू प्रतिबंधात्मक आदेशांची प्रभावीपणे अंबलबजावणी होणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, कारोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोनजेचे एक भाग म्हणुन नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमा होण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून, मी जिल्हादंडाधिकारी अहमदनगर मला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन, अहमदनगर जिल्हा महसुल स्थळ सीमेच्या हद्दीमध्ये या आदेशान्वये दि. ०५/०४/२०२१ रोजीचे रात्री. ०८.०० पासुन ते दि. ३०/०४/२०२१ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये खालील बाबींस मनाई करीत आहे.

त्यानुसार कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक ३० एप्रिल, २०२१ रोजीचे २४:०० वाजेपर्यंत लागू करणेत आलेला असल्यामुळे सर्व प्रकारचे प्रतिबंधात्मक उपायोजना करणेसाठी दिनांक ०५/०४/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे साईसभागृह येथे मा. प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली प्रशासकीय स्तरांवर बैठक घेणेत येऊन संस्थान व्यवस्थापन संचलित श्री साईबाबा समाधी मंदिरांसह सर्व मंदिरे ( व्दारकामाई, गुरुस्थान, चावडी, प्रधान लेंडीबाग, नंदादीप, श्री दत्त मंदिर, श्री गणेश, श्री शनी, श्री महादेव मंदिर व श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिर आदि) दिनांक ०५/०४/२०२१ रोजी संध्याकाळी ८.०० वाजेपासून भक्तांसाठी पुढील आदेश होईपावेतो दर्शनाकरीता (मुख दर्शनासह) बंद करणेत आलेले आहे.

तसेच जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३७/२०२१ दिनांक ०६/०४/२०२१ नुसार सर्व भक्तनिवासस्थाने ( साईप्रसाद निवासस्थान, व्दारावती भक्तनिवासस्थान, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, साई अश्रम भक्तनिवासस्थान-, साई आश्रम धर्मशाळा) हे दिनांक ०६ एप्रिल, २०२१ पासून भक्तांचे तात्पुरते निवासासाठी बंद करणेत आलेले आहेत. सदरचे विभागांचे कार्यालयीन कामकाजा व्यातिरिक्त या विभागाकडे कार्यरत असलेले ५९८ मधील संस्थान कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा खंडीत करणेत आलेल्या आहेत.

पान ८ वर ....कृ.मा.प. .. ..

कॅन्टीन विभाग हे अंशता बंद करणेत आलेले आहेत. सदर विभागांतील कार्यालयीन कामकाजा व्यातिरिक्त या विभागाकडे कार्यरत असलेले ५९८ मधील कार्यरत असलेले संस्थान कायम कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा खंडीत करणेत आलेल्या आहेत. प्रसादालय विभागही अंशता बंद करण्यात अलेला आहे. प्रसादालय विभागातील ५९८ मधील कार्यरत असलेले कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा अवश्यक्तेनुसार चक्रीय पध्दतीने मा. प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने चालू ठेवण्यात आलेल्या आहेत. प्रसादालय विभागामार्फत कोव्हीड सेंटर व दोन्ही रुग्णालयांचे ठिकाणी दोन वेळेची भोजन व्यवस्था करणेत येत आहे. तर कॅन्टीन विभागामार्फत कोव्हीड सेंटर व दोन्ही रुग्णालयांचे ठिकाणी रुग्णांना व सर्व कर्मचारी यांना चहा / दुध पुरविणेत येत आहे. तसेच कोव्हीड सेंटर व दोन्ही रुग्णालयांचे ठिकाणी बिस्कीट व मिनरल वॉटर यांची विक्री चालू आहे.

संस्थानचे कोव्हीड-१९ सेंटर तसेच साईबाबा हॉस्पिटलकडे ही कोव्हीड-१९ वर उपचार सुरु करणेत आलेले आहेत. साईबाबा हॉस्पिटल, साईनाथ रुग्णालय विभाग, पाणी पुरवठा विभाग, विद्युत विभाग, बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, फायर ॲण्ड सेफ्टी विभाग, मॅकेनिकल विभाग, वाहन विभाग, बगीचा विभाग व संरक्षण विभाग या विभागांच्या सेवा अत्यावश्यक असल्याने सदरचे विभागांकडे कार्यरत असलेले ५९८ मधील कायम कंत्राटी कर्मचारी यांचेसेवा चालू ठेवण्यात आलेल्या आहेत.

परंतू मा. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन व जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांच्याकडील शासन परिपत्रक बंद करण्यात येणा-या कर्मचा-यांचे वेतनाबाबत कुठल्याही प्रकारच्या सुचना / निर्देश देण्यात आलेले नाहीत.

तथापि, संस्थान आस्थापनेवारील विभागांचे कामकाजासाठी काही विभागांचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवा पुर्वीप्रमाणे चालू ठेवण्यात आलेल्या असून काहींच्या सेवा खंडीत करण्यात आलेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | विभाग | तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | साईबाबा हॉसिप्टल व साईनाथ रुग्णालय | ल) कोव्हीड-१९ च्या संसर्गजन्य रोगावरील उपचार व दोन्ही रुग्णालयामधील इतर रुग्णांचे उपचाराकामी<br>ब) या व्यतिरिक्त रुग्णालयाकडे इतर विभागाकडील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी कोव्हीड सेंटर व रुग्णालयाचे कामांसाठी नेमण्यात आलेले आहेत.<br>जशे, दोन्ही रुग्णालयातील स्वच्छतेसाठी आरोग्य विभाग / विद्युत विभाग / बांधकाम विभाग/ मॅकेनिकल विभाग / पाणीपुरवठा विभाग/ फायर ॲण्ड सेफ्टी विभाग / संरक्षण विभाग इत्यादी फिल्ड वर्क कामांकरीता अत्यावश्यक सेवांसाठी कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत. | दोन्ही रुग्णालये विभागाकडील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा तसेच इतर विभागांचे तांत्रकि स्वरुपाच्या सेवा पुर्वीप्रमाणेच चालू आहे. |
| ०२ | संरक्षण विभाग, आरोग्य विभाग, वाहन विभाग, पाणी पुरवठा विभाग, फायर ॲण्ड सेफ्टी विभाग, मॅकेनिकल विभाग, विद्युत विभाग, बगीचा विभाग, बांधकाम | सदरचे विभागांकरीता त्यांचे फिल्ड वर्क असल्या कारणाने तसेच कोव्हीड-१९ चे कामांकरीता सुविधा पुरवविणेसाठी सदरचे विभागांचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा अत्यावश्यक असल्याने पूर्वीप्रमाणेच चालू आहेत. | ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा पुर्वीप्रमाणेच चालू आहे. |
| ०३ | प्रसादालय विभाग / मंदिर विभाग | प्रसादाल विभागाकडील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना कामाचे अवश्यक्तेनुसार चक्रीय पध्दतीने कामवर बोलविणेत येत आहे. | ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या कामाच्या अवश्यक्तेनुसार चक्रीय पध्दतीने सेवा चालू आहेत. |
| ०४ | कॅन्टीन विभाग, लेखशाखा विभाग, साईप्रसाद निवासस्थान विभाग | या विभागांचे ५९८ अकुशल कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा खंडीत करणेत आलेल्या आहेत. फक्त कार्यालयीन कामाकरीतांचे आवश्यक तेवढेच ५९८ कुशल कंत्राटी कर्मचारी कामावर बोलविणेत येत आहे. | फक्त कार्यालयीन कामाचे आवश्यक्तेनुसारच ५९८ कुशल कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा चालू ठेवण्यात आलेल्या आहेत. |
| ०५ | आय टी आय, इंग्लिश मेडियम स्कूल, कन्या विद्यामंदिर, ज्यू. कॉलेज, वरिष्ठ महाविद्यालय | शैक्षणीक संकुलाकडील कंत्राटी / मानधनावरील शिक्षक / ५९८ कायम कंत्राटी शिक्षक यांच्या शिक्षण विभागाचे सुचनेनुसार ऑनलाईन क्लास (Work From Home), परिक्षा / निकाल विषयक कामे चालू आहेत. | शैक्षणीक संकुलाकडे ५९८ पधील कायम कंत्राटी शिक्षक, मानधनावरील शिक्षक व कंत्राटी शिक्षक यांच्या सेवा पूर्वीप्रमाणे चालू होत्या. |

पान ९ वर ....कृ.मा.प. .. ..

| अ.क्र. | विभाग | तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| ०६ | जनसंपर्क विभाग, प्रकाशने विभाग, साईप्रसाद निवासस्थान विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग, व्दारावती भक्तनिवासस्थान विभाग, साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग, ध्वनिक्षेपण व टेलिफोन विभाग, भांडार विभाग, साई अश्रम भक्तनिवासस्थान विभाग, कॅन्टीन विभाग, साई धर्मशाळा विभाग, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग | या विभागांचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा खंडीत करणेत आलेल्या आहेत. | या विभागांचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा खंडीत करणेत आलेल्या आहेत. |

त्यानुसार खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आलेला होता-

मा.प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन व मा.जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचेकडील शासन परिपत्रकात कर्मचा-यांचे वेतनाबाबत कुठल्याही प्रकारच्या सुचना / निर्देश देण्यात आलेले नसल्याने, खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

१) उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे अत्यावश्यक सेवेच्या विभागांकडील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी कर्तव्यावर उपस्थित असल्याने त्यांचे माहे एप्रिल, २०२१ चे मानधन त्यांचे हजर दिवासांनुसार विहीत पध्दतीनी सानुग्रह अनुदाना प्रित्यार्थ अदा करणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

२) ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचेपैकी काही विभागांचे अवशक्तेनुसार सेवा चक्रीय पध्दतीने चालू असून त्यांचे माहे एप्रिल, २०२१ चे हजर दिवासांचे मानधन सानुग्रह अनुदान प्रित्यर्थ अदा करणेस तसेच इतर दिवसांचे मानधानबाबत सहानुभुतीचे दृष्टीने विचार होऊन निर्णय होणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

३) ज्या विभागांचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा खंडीत करणेत आलेल्या आहेत. अशा विभागातील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा खंडीत करणेपूर्वीचे कालावधीचे माहे एप्रिल, २०२१ चे मानधन हजर दिवसांनुसार विहीत पध्दतीने अदा करणेस तसेच सेवा खंडीत केलेनंतरचे कालावधीचे माहे एप्रिल, २०२१ चे मानधनाबाबत सहानुभुतीचे दृष्टीने विचार होऊन निर्णय होणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

४) शैक्षणीक संकुलाकडील ५९८ मधील कायम कंत्राटी शिक्षक यांचे माहे एप्रिल, २०२१ चे मानधन हजर दिवसानुसार विहीत पध्दतीनी सानुग्रह अनुदाना प्रित्यार्थ अदा करणेच्या मान्यतेस्तव इतर दिवसांचे मानधानबाबत सहानुभुतीचे दृष्टीने विचार होऊन निर्णय होणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**मा. तदर्थ समितीचे सभेपुढे दिनांक ०५ मे, २०२१ रोजी चक्रीय पध्दतीने उपरोक्तप्रमाणे सादर करणेत आलेल्या प्रस्तावर खालीलप्रमाणे निर्णय झालेले आहेत.**

(३) दिनांक १०/०५/२०२१ रोजची चक्रीय पध्दतीचे निर्णयात मा. श्रीकांत एल. आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर, तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

विषय पाहिला. पूर्वीचे निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे मुलतः सदर ५९८ कर्मचा-यांचे status स्पष्ट नसल्याने आजपर्यंत सदर कर्मचा-यांनी दिलेल्या सेवेबाबत त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे व असे अनुदान मा. उच्च न्यायालयाने मंजूर केलेले आहे. अशा परिस्थितीत सदर ५९८ कर्मचा-यांना, माहे एप्रिल, २०२१ मध्ये काम केलेले असल्यास त्यांना केलेल्या कामाचा मेहनताना मानवतेच्या दृष्टीकोनातून सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहून देण्यास माझी मान्यता आहे.

जे कामगार काम करत नाहीत त्यांच्या बाबतीत कोव्हीड-१९ च्या परिस्थितीत निर्णय घेण्यासाठी सर्वसमावेषक चर्चा गरजेची वाटते. करिता सदराची बाब नियमीत बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावी.

(४) दिनांक ११/०५/२०२१ रोजी श्रीमती गिता प्र. बनकर, सहा. धर्मदाय आयुक्त, अहमदनगर-तथा-सदस्या तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

प्रस्ताव वाचला. पूर्वीचे निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे मुळातच ५९८ कर्मचा-यांची स्थिती स्पष्ट नाही. त्यामुळे आजपावेतो संबंधित कर्मचा-यांनी दिलेल्या सेवेबाबत त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे. असे अनुदान मा. उच्च न्यायालयांनी मंजूर देखील केले आहे. सद्यपरिस्थिती पहाता ५९८ कर्मचा-यांना, माहे एप्रिल, २०२१ मध्ये त्यांनी काम केले असल्यास त्यांना त्यांचे कामाचा महेनताना म्हणून मानवता दृष्टीकोन लक्षात घेऊन सानुग्रह अनुदान मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अनुसरुन देण्यास हरकत नाही.

ज्यांनी काम केलेले नाही त्यांचेबाबतीत कोव्हीड-१९ चा विचार करता योग्य तो निर्णय घेण्यासाठी सर्वसमावेषक चर्चा होणे आवश्यक आहे. करिता सदरची बाब नियमित बैठकीत ठेवल्यास उचित होईल.

पान १० वर ....क.मा.प. .....

502

(३) दिनांक १७/०५/२०२१ रोजी चक्रीय पध्दतीने श्री. भानुदास ह. पालवे, अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक-तथा-सदस्य तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे-

५९८ कर्मचा-यांना माहे एप्रिल, २०२१ मध्ये काम केले असल्यास केलेल्या कामाचा मेहनताना मानवतेच्या दृष्टीकोनातून सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधिन राहून देणेस माझी मान्यता आहे.

मा. तदर्थ समितीचे चक्रीय पध्दतीचे निर्णयानुसार कार्यवाही करणेसाठी दिनांक १८/०५/२०२१ रोजीचे मंजूर टिपणीनुसार खालीलप्रमाणे मान्यता घेणेत आलेली आहे.

१) अत्यावश्यक सेवेच्या विभागांकडील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी कर्तव्यावर उपस्थित असल्याने त्यांचे माहे एप्रिल, २०२१ चे मानधन त्यांचे हजर दिवासांनुसार विहीत पध्दतीनी सानुग्रह अनुदाना प्रित्यार्थ अदा करता येईल.

२) अत्यावश्यक सेवेच्या व्यतिरिक्त इतर विभागाकडील ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे एप्रिल, २०२१ चे हजर दिवासांचे मानधन सानुग्रह अनुदान प्रित्यर्थ अदा करता येईल.

३) कोव्हीड-१९ मुळे ज्या विभागांच्या सेवा बंद करणेत आलेल्या आहेत. अशा विभागांचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेल्या आहेत. अशा तात्पुरत्या स्वरुपात सेवा खंडीत केलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा खंडीत कालावधीतील वेतनाबाबत मा. तदर्थ समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत येऊन मा. तदर्थ समितीचे निर्णयानुसार पुढील कार्यवाही करता येईल.

त्यानुसार ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे एप्रिल, २०२१ चे हजर दिवसानुसारचे मानधन सानुग्रह अनुदाना प्रित्यार्थ अदा करणेबाबत जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/२६१ /२०२१ दि. १८/०५/२०२१ नुसार आदेशीत करणेत आलेले आहे.

तसेच कोव्हीड-१९ मुळे ज्या विभागांच्या सेवा बंद करणेत आलेल्या आहेत. अशा विभागांचे ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करणेत आलेल्या आहेत. अशा तात्पुरत्या स्वरुपात सेवा खंडीत केलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा खंडीत कालावधीतील वेतनाबाबत मा. तदर्थ समितीचे दिनांक १०/०५/२०२१ व दिनांक ११/०५/२०२१ रोजीचे चक्रीय पध्दतीचे निर्णयानुसार जे कामगार काम करत नाहीत त्यांच्या बाबतीत कोव्हीड-१९ च्या परिस्थितीत निर्णय घेणेसाठी सर्वसमावेशक चर्चा गरजेची वाटते, करिता सदरची बाब नियमीत बैठकीत चर्चेसाठी ठेवणेबाबत निर्देशित करणेत आलेले आहेत.

त्यानुसार माहे मे, २०२१ चे मानधनाबाबत तसेच ज्या विभागांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात सेवा खंडीत करणेत आलेल्या आहेत. अशा तात्पुरत्या स्वरुपात सेवा खंडीत केलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे सेवा खंडीत कालावधीतील वेतन / मानधना बाबतचा प्रस्ताव दिनांक १९ मे, २०२१ चे मंजूर टिपणीनुसार मा. तदर्थ समितीचे नियमित सभेपुढे सादर करणेत आलेला आहे. तथापि अद्यापपर्यंत मा. तदर्थ समितीचे नियमीत बैठकीची दिनांक निश्चित नसल्यामुळे तसेच मा. तदर्थ समितीचे दिनांक २५/०२/२०२१ चे चक्रीय पध्दतीचे निर्णयानुसार अत्यावश्यक सेवेच्या तसेच ज्या विभागांकडे कामाचे अवश्यकतेनुसार ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी कर्तव्यावर उपस्थित आहे. त्यांचे माहे मे, २०२१ चे मानधन हजर दिवासनुसार विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदाना प्रित्यार्थ अदा करणेबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढी चक्रीय पध्दतीने सादर करता येईल.

विभागाचा अभिप्राय:

१) अत्यावश्यक सेवेच्या तसेच ज्या विभागांकडे अवश्यकतेनुसार ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी कर्तव्यावर उपस्थित आहेत त्यांचे माहे मे, २०२१ चे मानधन हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदाना प्रित्यार्थ अदा करता येईल.

तरी, विभागाचा अभिप्रायामध्ये नमूद केलेनुसार सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

8/06/21

( कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

3/6/2021

पान ११ वर ....कृ.मा.प. .....

१) अत्यावश्यक सेवेच्या तसेच ज्या विभागाकडे अवश्यक्तेनुसार ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी कर्तव्यावर उपस्थित आहेत त्यांचे माहे मे, २०२१ चे मानधन हजर दिवसानुसार विहीत पध्दतीने सानुग्रह अनुदाना प्रित्यार्थ अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

मा. उच्च न्यायालयाने फाडलेल्या रिट याचिका ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी कर्मचारी यांना माहे मे २०२१ या महिन्याचे मानधन सानुग्रह अनुदान म्हणून अदा करणेस हरकत नाही.
9/6/2021

(श्रीमती गिता पी. बनकर)
सहा. धर्मादाय आयुक्त , अहमदनगर तथा
सदस्य , तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

(भानुदास ह. पालवे)
अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक, तथा
सदस्य , तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

8/06/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा
सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर. तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

चक्रीय पध्दतीने आणलेल्या विषयावर निर्णय
दि. 09/06/2021

504

**विषय – माहे जानेवारी, 2020 मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या 598 कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे मे, 2021 चे मानधन सानुग्रह अनुदान म्हणून अदा करणेबाबत...**

विषय पाहिला. पूर्वीच्या निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे मुलतः सदर 598 कर्मचा-यांचे **status** स्पष्ट नसल्याने आजपर्यंत सदर कर्मचा-यांनी दिलेल्या सेवेबाबत त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे व असे अनुदान मा. उच्च न्यायालयाने मंजूर केलेले आहे. अशा परिस्थितीत सदर 598 कर्मचा-यांना, माहे मे, 2021 मध्ये काम केलेले असल्यास, त्यांना केलेल्या कामाचा मेहनताना मानवतेच्या दृष्टीकोनातून सानुग्रह अनुदान म्हणून मा. उच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहून देण्यास माझी मान्यता आहे.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 09/06/2021

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि. ०९/०६/२०२१

**विषय : माहे जानेवारी, २०२० मध्ये संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांचे माहे मे, २०२१ चे मानधन सानुग्रह अनुदान म्हणून अदा करणेबाबत**

. . .

याबाबत यापूर्वी केलेल्या निर्णयांमध्ये संबंधित ५९८ कर्मचाऱ्यांची स्थिती अद्याप स्पष्ट नसल्याने त्या कर्मचाऱ्यांना त्यांनी दिलेल्या सेवेबाबत सानुग्रह अनुदान दिले जात होते. सदरचे अनुदान माननिय उच्च न्यायालय यांनी मंजूर केल्याप्रमाणे आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता संबंधित ५९८ कर्मचाऱ्यांनी माहे मे, २०२१ मध्ये काम केले असल्याने, त्यांना कामाचा मोबदला म्हणून सानुग्रह अनुदान हे माननिय उच्च न्यायालय यांच्या आदेशास अधिन राहून देण्यास हरकत नाही.

09/06/2021

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि. ०९.०६.२०२१

विषय क्र.-91920

(127)



मा.तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ

(सामान्य प्रशासन विभाग)

---

दि.२१ मे, २०२१

**विषय - श्री रघुनाथ भागा आहेर, प्र.कार्यकारी अभियंता तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचे मुदतवाढीबाबत.**

टिपणी-

श्री आहेर यांचे सेवानिवृत्तीनंतर रिक्त होणा-या उप कार्यकारी अभियंता (बांधकाम) तथा प्र.कार्यकारी अभियंता पदाबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत दि.५ मे, २०२१ रोजी टिपणी सादर करणेत आलेली होती. त्यावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी " श्री आहेर यांचे मुदतवाढीचा प्रस्ताव ठेवावा " असे निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने,

अ) मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.०७.०८.२००९ रोजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. सदर आकृतीबंधामध्ये कार्यकारी अभियंता हे पद बांधकाम विभागाच्या आकृतीबंधामध्ये समाविष्ठ करणेत आलेले आहे. श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवानिमित्त सन २०१७-१८ मध्ये कार्यकारी अभियंता पदावर मा. शासनाकडून प्रतिनियुक्तीने श्री रविंद्र सतिष घुले यांची नेमणूक करणेत आलेली होती. त्यांचेकडे बांधकाम विभाग, विद्युत विभाग, मेकॅनिकल विभाग व पाणी पुरवठा विभाग इ. विभागांच्या पर्यवेक्षणाची जबाबदारी देण्यात आलेली होती.

श्री साईबाबा समाधी महोत्सव-२०१८ संपल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र.पीओज़ी-टीएफएस-१११८/प्र.क्र.२२५/सेवा-१, दिनांक १७ डिसेंबर, २०१८ अन्वये, श्री घुले यांची कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (अदिवासी) विभाग, कळवण, नाशिक येथे विनंतीनूसार बदली करण्यात आलेने, त्यांना संस्थान सेवेतून दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी कार्यमुक्त करणेत आलेले होते आणि त्यांचेऐवजी श्री राजेंद्र पुंडलीक मोने (वाणी), सहाय्यक संशोधन अधिकारी, महामार्ग संशोधन विभाग, नाशिक यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेत आलेली होती, तथापि श्री मोने (वाणी) हे संस्थान सेवेत रूजू झालेले नाहीत.

संस्थानाचे आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता या स्थायी पदावर मा.शासनामार्फत कार्यकारी अभियंता या स्तरावरील अधिका-यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती होणेबाबतचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.०९ जुन, २०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.क्र.३१५ नुसार जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/७४५/२०२०, दि.२० जुलै, २०२० रोजीचे पत्रान्वये मा.शासनास सादर करणेत आलेला होता. परंतु, अद्याप शासनाकडून कार्यकारी अभियंता या पदी शासकीय अधिका-यांची नेमणूक करणेत आलेली नाही.

संस्थान आस्थापनेवरील रिक्त झालेल्या कार्यकारी अभियंता या स्थायी पदाचा संस्थानाचे प्रशासकीय कामकाजाचे सोयीचे दृष्टीने, जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२८१३/२०१८, दि.१९ डिसेंबर, २०१८ रोजीचे आदेशान्वये तात्पुरता प्रभारी कार्यभार श्री रघुनाथ भागा आहेर, उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांचेकडेस सोपविणेत आलेला आहे. सध्या त्यांचेकडे बांधकाम विभाग, विद्युत विभाग, मेकॅनिकल विभाग व पाणी पुरवठा विभाग इ. विभागांच्या पर्यवेक्षणाची जबाबदारी देण्यात आलेली आहे.

श्री रघुनाथ भागा आहेर यांचे वयास दि.३१ मे, २०२१ रोजी ६० वर्ष पूर्ण होत आहेत. सबब प्रचलित सेवानियमानुसार त्यांना दिनांक ३१ मे, २०२१ चे माध्यान्होत्तर संस्थान सेवेतून निवृत्त होणार आहेत. त्यामुळे त्यांचेकडे अतिरिक्त कार्यभार असलेली कार्यकारी अभियंता व उप कार्यकारी अभियंता (बांधकाम) ही पदे रिक्त होणार आहेत. प्रशासकीय कामकाजाचे दृष्टीने बांधकाम विभागाकडील उप कार्यकारी अभियंता (बांधकाम) व कार्यकारी अभियंता ही पदे महत्वाची आहेत.

आ) सध्या संस्थान व्यवस्थापनामार्फत साईभक्तांना मूलभूत सोयी- सुविधा उपलब्ध होणे कामी खालील प्रमाणे विविध विकास प्रकल्पांचे कामकाज सुरु आहे –

०१. श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकाम - अपेक्षित खर्च रू. १०९.५० कोटी.

०२. नविन शैक्षणिक संकुलाची उभारणी करणे- अपेक्षित खर्च रू. २१८ कोटी.

ERP 14/1/2021

०३. साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीच्या खोल्यांचे नुतनीकरण करणे – अपेक्षित खर्च रू.१३.०८ कोटी.

०४. श्री साईनाथ रूग्णालय इमारतींवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकाम करणे- अपेक्षित खर्च रू.३.९९ कोटी.

०५. श्री साई आश्रम भक्तनिवास येथील खोल्यांचे रंगकाम व दुरूस्तीचे काम करणे- अपेक्षित खर्च रू.४.८३ कोटी.

०६. घनकचरा प्रक्रिया प्रकल्प - अपेक्षित खर्च रू.०४.३५ कोटी खर्च अपेक्षित.

०७. साई नॉलेज पार्क उभारणे- अपेक्षित खर्च रु.१६६.३९ कोटी.

०८. लाडु व बुंदी प्रसाद प्रोसेसिंग युनिट उभारणे – अपेक्षित खर्च रू.२९.७३ कोटी.

०९. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्तांचे भूसंपादन करणे, ते विकसित करणे.

१०. निळवंडे धरण पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करणे.

सद्यस्थितीत दर्शन रांग प्रकल्प, शैक्षणिक संकुल प्रकल्प, श्री साईनाथ रूग्णालयाचे वरचे मजल्याचे बांधकाम, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रूम) रूमचे नुतनीकरण व इतर बांधकामाशी संबधीत महत्वाची प्रकल्प सुरू आहेत. उपरोक्तपैकी काही विकास प्रकल्पांचे कामकाज प्रगतीपथावर असून, काही विकास प्रकल्प नजिकचे काळात कार्यान्वीत होणार आहेत.

इ) १) सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी हे मुदतवाढ मिळणेबाबत संस्थानकडे अर्ज करत असतात त्याअनुषंगाने, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०८/२०११ रोजी झालेल्या सभेतील विषय नं.६६, निर्णय क्र.६६१ अन्वये, **सेवानिवृत्त कर्मचा-यांनी सेवानिवृत्तीनंतर सेवेत मुदतवाढ मागितल्यास नाकारणेत येवून सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेत येऊ नये,** असे ठरलेले आहे.

२) तसेच, महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सांसवि-२०११/ ५३८/प्र.क्र.६९/ पुर्नबांधणी-१२/का-सोळा, दि.२३/०१/२०१३ रोजीचे पत्रातील अ.क्र.०५ अन्वये, श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवर मंजूर करणेत आलेल्या आकृतीबंधाबाहेर जाऊन कोणत्याही पदावर भरती करू नये तसेच शासनाच्या प्रचलित नियमानुसार सेवेत मुदतवाढ, पुर्ननियुक्ती, सेवानिवृत्ती नंतर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात येऊ नये, असे आदेश दिलेले आहे.

३) मा.नामदार श्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दि.०७/१२/२०१२ रोजीचे पत्रान्वये " सेवानिवृत्तीनंतर कर्मचा-यांना मुदतवाढ दिल्यास नवीन व होतकरू तरूणांचा रोजगाराचा प्रश्न निर्माण होतो. नवीन तंत्रज्ञान आत्मसात केलेल्या कर्मचा-यांची नियुक्ती करून त्यांना व्यवस्थापनेचे प्रशिक्षण दिल्यास त्यांच्या ज्ञानाचा संस्थांनला निश्चितच उपयोग होऊ शकेल व बेरोजगारीचा प्रश्नही सुटू शकेल. सेवारत अथवा निवृत्त कर्मचा-यांना मुदतवाढ दिल्यास होतकरू तरूणांचे मनोबल खच्चीकरण होते. संस्थानचे कामात नवीन तरूण कर्मचा-यांना वाव देण्याचे हेतुने **कोणत्याही सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यास मुदतवाढ देऊ नये ही विनंती. तथापी असे प्रस्ताव मंजूर करून शासकीय निर्देशाचे उल्लंघन झाल्यास त्याची सर्वस्वी** जबाबदारी प्रशासकीय मंडळावर राहील. असे नमूद आहे.

यापुर्वी, संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त झालेले माजी प्रशासकीय अधिकारी श्री ई.एन.वाघ, श्री आर.एस.साबळे, श्री पी.बी.बोरावके तसेच माजी अधिक्षक श्री एन.के.कुलकर्णी, श्री रा.रं.शेळके व इतर कर्मचारी यांचे संस्थान सेवेत पुर्ननेमणुक होणेकामीचे अर्ज दप्तरी दाखल करणेत आलेले आहेत ही वस्तुस्थिती आहे परंतु, सद्यस्थितीत संस्थानची दर्शन रांग, शैक्षणिक संकुल इ. प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर सुरू असून ते अंतीम टप्यात आहे. उपकार्यकारी अभियंता श्री रघुनाथ भागा आहेर यांचेकडे सध्या कार्यकारी अभियंता या पदाचा अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे त्यांना सदर प्रकल्पांची सखोल तांत्रीक माहिती आहे. कार्यकारी अभियंता या पदावर शासनाकडून प्रतिनियुक्तीने नेमणूक होणेकामी पत्र क्र.जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/७४५/२०२०, दि.२० जुलै, २०२० व जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४६४/२०२१, दि.१० मे, २०२१ अन्वये, पत्रव्यवहार केलेला आहे. परंतु, अद्याप नेमणूक झालेली नाही. यासर्व बाबींचा विचार करता, श्री रघुनाथ भागा आहेर यांना प्रथम ११ महिने कालावधीकरीता कंत्राटीपध्दतीने किंवा प्रतिनियुक्तीने शासनाकडुन कार्यकारी अभियंता पदी नेमणूक होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत श्री रघुनाथ भागा आहेर यांना कंत्राटी पध्दतीने कार्यकारी अभियंता म्हणून मानधनावर नेमणूक देणेत यावी, असे मत आहे.

प्रस्ताव –

१) श्री रघुनाथ भागा आहेर, प्र.कार्यकारी अभियंता तथा उपकार्यकारी अभियंता हे दि.३१ मे, २०२१ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचे पद नंतर रिक्त रहाणार आहे. त्यांची सेवा नवीन पदाची नियुक्ती होईपर्यंत कंत्राटी पध्दतीने चालू ठेवणे आवश्यक आहे.

२) श्री रघुनाथ भागा आहेर यांना सेवानिवृत्तीनंतर कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर ११ महिने कालावधीकरीता किंवा प्रतिनियुक्तीने शासनाकडुन कार्यकारी अभियंता पदी नेमणूक होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत कार्यकारी अभियंता म्हणून मान्यता मिळणेबाबत.

३) सदर कालावधीत श्री रघुनाथ भागा आहेर, उपकार्यकारी अभियंता यांना द्यावयाच्या मानधनाबाबत निर्णय होणेबाबत.

उपरोक्त प्रस्ताव मा.तदर्थ समितीपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सविनय सादर .

21.5.21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

## मा. तदर्थ समिती निर्णय

दिनांक -

मा. समक्ष तदर्थ समिती
कामे कार्यप्रणाली मंजूर करण्यात
आहे

P वरील 28/5/2021

(श्रीमती गीता बनकर)
सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
तथा सदस्या, मा. तदर्थ समिती

(~~भानुदास पालवे~~)
अपर महसुल विभागीय महसुल आयुक्त, नाशिक
तथा सदस्य, मा.तदर्थ समिती

21.5.21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
तथा सदस्य सचिव, मा. तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
- तथा- अध्यक्ष, तदर्थ समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

मा. सदस्य सचिव आदेश
यांचे प्रमाणे पत्र दिनांक
२९/५/२१ ला

29/5/2021

**चक्रीय पध्दतीने आणलेला विषय, दि. 28/05/2021**

**विषय–श्री रघुनाथ भागा आहेर, प्र. कार्यकारी अभियंता तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचे मुदतवाढीबाबत ...**

विषयाचे वाचन केले. संबंधीत कागदपत्र पाहिले. टिपणीत नमूद ''इ) 1) व इ) 2)'' मध्ये नमूद केल्याप्रमाणे स्पष्टपणे धोरण आधिच ठरलेले दिसून येते. त्याचप्रमाणे श्री. रघुनाथ आहेर यांच्याशिवाय संस्थानचे कामकाजच चालणार नाही अशी परिस्थिती नाही. अशा सर्व परिस्थितीत, सदरचा प्रस्ताव श्री. रघुनाथ आहेर यांच्या सेवानिवृत्तीच्या दोन दिवस अगोदर आणलेला आहे. वरील बाबींकरिता सदरचा प्रस्ताव माझेतर्फे नामंजूर करण्यात येत आहे.

(श्रीकांत एल. आणेकर)
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर**
**तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी**

**दिनांक – 28/05/2021**

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि. ०७/०६/२०२१

**विषय : श्री रघुनाथ भागा आहेर, प्र. कार्यकारी अभियंता तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचे मुदतवाठीबाबत. . .**

सदरचा प्रस्ताव वाचला. प्रस्तावावरुन मा. अध्यक्ष यांनी व मा. सदस्य तदर्थ समिती यांनी सदरचा प्रस्ताव नामंजूर केलेला आहे. परंतू येथे एक बाब नमूद करणे आवश्यक आहे की, मा. सदस्य सचिव यांनी दिनांक २१/०५/२०२१ रोजी या विषयावर मंजूरीबाबतची सही केली आहे परंतू विसंगत बाब म्हणजे त्यांनी दिनांक २९/०५/२०२१ रोजी म्हणजेच तदर्थ समिती मधील मा. अध्यक्ष व इतर सदस्य यांचे अभिप्राय आल्यानंतर एक सदस्य रजेवर आहे म्हणून परत नियमित बैठकीत हा विषय ठेवावा असा अभिप्राय दिला आहे.

संबंधित विषयाचे अवलोकन केले असता प्रस्तावातील टिपणी क्र. इ-१ व इ-२ यावरुन या विषयाचे धोरण या पूर्वीच ठरल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे रघुनाथ आहेर यांचे सेवानिवृत्तीच्या दोन दिवस अगोदर आणलेला विषय हा त्यांच्याशिवाय संस्थानचे काम कुणी पाहू शकत नाही अशा स्वरुपाचा नाही त्यामुळे माझेतर्फे सदरचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येतो.

07/06/2021

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि. ०७.०६.२०२१

विषय क्र.- ७/ ९२९



वाहन विभाग

"मा.तदर्थ (Ad- hoc) समितीचे सभेपुढे चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर"

विषय:- सन २०२१-२२ या कालावधी करीता वाहन विभागाकडील १२५ वाहनांचा वार्षिक विमा नुतनीकरण करणे कामी निम्नतर दर देणारे विमा कंपनी कडुन विमा नुतनीकरण करून घेणेस व येणारे खर्चास मान्यता मिळणे बाबत...

अधिनियम २००४ मधील तरतुद:-कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेची मालमत्तेची व कामाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील ." असे नमुद केलेले आहे. कलम १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील असे नमुद आहे.

कलम २१ (१)(ज) मध्ये विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम च्या तरतुदींना अधिन राहून त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कादयान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर, भाडे, आकार व इतर रकमा यांचे प्रदान करण्यात येईल, असे नमुद केलेले आहे.

प्रस्ताबना . दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२२ अखेर एकवर्ष कालावधी करीता वाहन विभागाकडील १२५ वाहनांचा वाहन निहाय विमा उतरविण्याचा असलेने दि.११/१२/२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad hoc) समितीचे सभेतील विषय क्र.६ व निर्णय क्र.४५९ चे मान्यतेने व जा.नं.एसएसएस/वशी/वाहन/३०८१/२०२०दि.१४.०१.२०२१ चे पत्राने दि.०९/०२/२०२१ अखेर राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडूनच बंद लिफाप्यामध्ये दरपत्रके मागवीण्यात आली होती.सदरची दरपत्रके मा.खरेदी समीतीचे दि.२३.०२.२०२१ चे सभेपुढे उघडण्यात आली आहेत.यावेळी विमा कंपन्यांनी दिलेल्या दरपत्रकातील दरांची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुचा तपशिल | विमा नुतनीकरण |
| ०२ | मागणी | वाहन विभागाकडील १२५ वाहनांचे दि.०१.०४.२०२१ ते दि. ३१.०३.२०२२ या कालावधीसाठी विमा नुतनीकरण करणे |
| ०३ | ई-निविदा प्रसिध्दी / दरपत्रके | जा.नं. एसएसएस/वशी/वाहन/ ३०८१ /२०२०दि.१४.०१.२०२१ |
| ०४ | वृतपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | दुरध्वनीद्वारे व समक्ष दिले |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | सर्व राष्ट्रीयकृत विमाकंपनीचे प्रतिनीधीना समक्ष दिले. |
| ०६ | निविदा / दरपत्रके कालावधी | दिनांक -१४/०१/२०२१ ते दिनांक ०९/०२/२०२१ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०४ (चार) |
| ०८ | पात्र निविदाकाराची संख्या | ०४ (चार) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का? | - |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का ? | दरपत्रके असलेने बयाना रक्कम नाही. |
| ११ | जर नमुने दिले नाही. तर का. | - |
| १२ | राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांनी दरपत्रकात देऊ केलेले दर- | |

| अ.न | तपशिल | वाहन संख्या | IDV | दर पत्रकात दिलेले दर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दि. न्यु. इंडिया अॅश्युरन्स क्रं.लि. शाखा -श्रीरामपुर | दि.ओरीएन्टल इंश्योरेन्स क. लि. शाखा-कोपरगाव | मुनाइटेड इंडिया इन्शुरेन्स के.लि. - शिर्डी | नेशनल इन्श्योरेन्स कं. लि. शाखा-कोपरगाव |
| १ | परिशिष्ट अ झिरो डेप विमा | १३ | १,०२,३२,९९४/- | संपुर्ण १३ वाहनाचे विमा दर दिलेले नाही | ४,०८,१३४/- | ४,१५,६८३/- | ३,९२,५३४/- |
| २ | परिशिष्ट ब फुल विमा (पॅकेज पॉलेसी) | ८८ | ५,१४,०३,६४३/- | २८, ८७,९३२/- | २१,३७,९३२/- | २९,३३,०६०/- | २९,०८,१५५/- |
| ३ | परिशिष्ट क थर्ड पार्टी विमा | २४ | ०.०० - | १,०५,३४७/- | १,०३,५२७/- | १,१०,५९१/- | १,१०,७१३ - |
| | | १२५ | ६,१६,३६,६३७.- | | | | |
| | शेरा | | | परिशिष्ट ब करीता L1 | परिशिष्ट क करीता L1 | - | परिशिष्ट अ करीता L1 |

ERP- 37

पान नं २ वर

512

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या नुतनीकरणचा तपशिल आणि नुतनीकरण दर- | | | |
| | अ.नं. | वर्ष | परिमाण | एकुण रक्कम |
| | | २०२०-२१ | १२३ वाहनाकरीता | ३३,५१,८३७/- |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल:- | | | |
| | अ.नं. | वर्ष | | खर्च परिमाण |
| | २०२०-२१या कालावधीत १२३ वाहनांचा विमा नुतणीकरणा कामी वार्षिक हप्ता | | | ३३,५१,८३७/- |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | लागु नाही- | | |
| १६ | मागील नुतनीकरण दर | १२३ वाहनाकरीता रू ३३,५१,८३७/- | | |
| १७ | मागील नुतनीकरण विमा कंपनी | १३ वाहना करीता नेशनल इन्श्योरेन्स क. लि. शाखा-कोपरगांव<br>८६ वाहना करीता दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स कं.लि. शाखा –श्रीरामपुर<br>२४ वाहना करीतादि.ओरीएन्टल इंश्योरेन्स क. लि. शाखा- कोपरगाव | | |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | १२५ वाहनाचा विमा नुतणीकरणासाठी ३ विमा कंपन्यांनी दिलेले वार्षिक न्युनतम दरानुसार येणारा एकुण खर्च रू.३३,८३,९९३/- सदरचे दर GST सहीत आहेत. | | |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नांव | १.परीशिष्ट अ नुसार१३ वाहनाकरीता नेशनल इन्श्योरेन्स क. लि. शाखा-कोपरगांव<br>२.परीशिष्ट ब नुसार ८८ वाहनाकरीता दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स कं.लि. शाखा –श्रीरामपुर<br>३.परीशिष्ट क नुसार २४ वाहनाकरीता दि.ओरीएन्टल इंश्योरेन्स क. लि. शाखा-कोपरगाव | | |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का? | होय. | | |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे | मा.मुख्य कार्यकारी अधीकारी<br>मा. उप मुख्य कार्यकारी अधीकारी . मा.मुख्य लेखाधिकारी<br>मा. प्रशासकिय अधीकारी . प्र.अधिक्षक वाहन विभाग | | |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशिल अंदाजे रु. | अंदाजे अपेक्षीत खर्च रू. ३३,००,०००/- | | |
| २३ | मागील नुतनीकरण रू.३३,५१,८३७/- सध्याचे प्राप्त दर रू. ३३,८३,९९३/- फरक रू. ३२१५६/- ने जास्त आहेत. | | | |
| | यावर्षी २०२१-२२ मध्ये विमा करावयाची वाहनांची संख्या १२५ असल्याने मागील वर्षापेक्षा विमा रक्कम जास्त आहे. | | | |

२४ संक्षिप्त टिप:- मा.तदर्थ (Add hoc) समितीचे दि.११/१२/२०२० चे सभेतील विषय क्रमांक ६ व निर्णय क्रं.४५९ अन्वये " संस्थानचे विविध प्रकारचे १२५ वाहनांच्या वार्षिक विम्याचे नुतनीकरण करणे कामी राष्ट्रीयकृत विमा कपन्यांकडून विहित पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे ३३,००,०००/- खर्चास मान्यता देण्यात आली होती."

जा.नं.एसएसएस/वशी/वाहन/३०८१/२०२०दि.२०.०२.२०२१ अन्वये दि.०९/०२/२०२१ पर्यंत राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून दरपत्रके मागवीण्यात आली होती.यानुसार ०४ राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांची दरपत्रके मुदतीत प्राप्त झाली आहेत.सदरची दरपत्रके मा.खरेदी समीतीचे दि.२३.०२.२०२१ चे सभेपुढे उघडण्यात आली आहेत.

यावेळी १२५ वाहनांचे विमा नुतनीकरण करणे करीता ४ विमा कंपन्यांनी दिलेल्या दरपत्रकातील दरानुसार न्युनतम दरांची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | तपशिल | परिशिष्ट अ | परिशिष्ट ब | परिशिष्ट क | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | विमा करावयाची वाहन संख्या | १३ | ८८ | २४ | १२५ |
| २ | आय.डी.व्ही | १.०२.३२.९९४/- | ५.१४.०३.६४३/- | ०.००/- | ६.१६.३६.६३७/- |
| ३ | नेशनल इन्श्योरन्स क. लि. शाखा-कोपरगांव | ३,९२,५३४/- | - | - | ३,९२,५३४/- |
| ४ | दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स कं.लि. शाखा-श्रीरामपुर | - | २८,८७,९३२/- | - | २८,८७,९३२/- |
| ५ | दि. ओरीएन्टल इंश्योरेन्स क. लि. शाखा- कोपरगाव | - | - | १,०३,५२७/- | १.०३.५२७/- |
| | | | | एकुण | ३३,८३,९९३/- |

उपरोक्त प्रमाणे संस्थानच्या १२५ वाहनांच्या विम्याकरीता एकुण रू.३३,८३,९९३/-(अक्षरी रू. तेहतीस लाख त्र्याऐंशी हजार नऊशे त्र्यान्नव मात्र) खर्च येणार आहे.

पान नं.३ वर

513

प्रस्ताव:- दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२२ या कालावधीत विमा नुतणीकरणा करीता दिलेल्या परिशिष्ट 'अ' मधील १३ वाहनांचा झिरो डेप (विना घसारा) विम्याकरीता नेशनल इन्श्योरेन्स क. लि. शाखा-कोपरगांव यांनी दिलेले दर रू.३,९२,५३४/- व परिशिष्ट 'ब' मधील ८८ वाहनांचा फुल (पॅकेज पॉलेसी) विम्याकरीता दि.न्यू.इंडिया अॅश्युरन्स कं.लि. शाखा-श्रीरामपूर यांनी दिलेले दर रू.२८,८७,९३२/-तसेच परिशिष्ट 'क' मधील २४ वाहनांचा थर्ड पार्टी विम्या करीता दि. ओरीएन्टल इंश्योरेन्स क. लि. शाखा- कोपरगाव यांनी दिलेले दर रू.१.०३.५२७/- निम्नतम आहेत. याप्रमाणे सदर विमा कंपन्याकडुन संबधीत १२५ वाहनाचे एक वर्ष कालावधी करीता विमा नुतनीकरण करून घेणेस व याकामी येणारे एकुण रू.३३,८३,९९३/-(अक्षरी रू. तेहतीस लाख त्र्याऐंशी हजार नऊशे त्र्यान्नव मात्र) चे खर्चास चक्रीय पध्दतीने मंजुरी मिळणेकामी सविनय सादर.

(कान्हूराज बगाटे भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(श्रीमती गीता प्रवीण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानुदास पालवे)
अपर आयुक्त, नाशिक विभाग
सदस्य, तदर्थ समिती

(कान्हूराज बगाटे भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

श्रीकांत अणेकर
प्रमुख जिल्हा व सत्रन्यायधिश,अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

7618 (1349) ERP-34

विषय क्र.- 9/922

514

## मंदिर विभाग

## मा.तदर्थ समितीचे सभेपुढील विषय

टिपणी-

विषय :- माहे-एप्रिल-२०२१ ते मार्च-२०२२ यावर्षाकरीता फुटाणे प्रसाद, विड्याची पाने, पावडर मार्बल मूर्ती व काशी अष्टगंध पावडर खरेदीकामी विहीत पद्धतीने कोटेशन मागविणे व त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत....

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-

| कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकलम व तरतूद |
|---|---|---|
| २१ | विश्वस्त व्यवस्था निधीचा विनीयोग | १(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन, १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. १ (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. |

प्रस्तावना:- प्रतिवर्षी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मंदिर विभागामार्फत प्रत्येक शुक्रवारी एकादशी वगळता साईभक्तांना धुपारतीनंतर फुटाणेप्रसाद वाटण्यात येतो, साईभक्तांकरीता श्रीसाई सत्यव्रत व अभिषेक पूजेमध्ये विड्याची पाने व नारळ वापरण्यात येतात, मान्यवरांचे सत्काराकरीता पावडर मार्बल मुर्ती तसेच सर्व साईभक्तांना दर्शनरांगेत गंध लावणेकामी काशी अष्टगंध पावडर खरेदी करुन वापरण्यात येतो. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होऊन पुर्वीप्रमाणे दर्शन, प्रसादवाटप, श्रीसाईसत्यव्रत व अभिषेक पुजा पुर्ववत सुरु झाल्यास माहे- एप्रिल-२०२१ ते मार्च-२०२२ साठी फूटाणे, विडयाची पाने, मार्बल पावडर मुर्ती व काशी अष्टगंध पावडर विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून खरेदी करावे लागणार आहे.

प्रस्ताव:-

१) फुटाणे प्रसाद खरेदी- श्रींचे प्रत्येक शुक्रवारी एकादशी वगळता धुपारतीनंतरफुटाणेप्रसाद वाटण्याची प्रथा आहे. आता माहे-एप्रिल-२०२१ ते मार्च-२०२२ अखेर या आर्थिक वर्षात शुक्रवारचे धुपारतीचे प्रसादासाठी एकादशीचे दिवस वगळता दर शुक्रवारी १० किलो प्रमाणे अंदाजे वार्षिक ४८० किलो फुटाणे खरेदी करावे लागणार आहेत.फुटाणे खरेदीसाठी प्रति किलो अदांजे दर रुपये १०० /- मात्र याप्रमाणे एकूण रुपये ४८,०००/- मात्र इतका खर्च येणार आहे. सध्या जगभरात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव असलेने माहे-एप्रिल-२०२० ते मार्च-२०२१ या कालावधीत फूटाणे खरेदी करणेत आलेले नाहीत. खर्चाची तरतूद मंदिराचे वार्षिक बजेटमध्ये करणेत आलेली आहे. तरी फुटाणे प्रसाद खरेदीसाठी विहित पध्दतीने कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

२) विडयाचे पाने खरेदी- श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत भक्तांकरीता मंदिर परिसरामध्ये दररोज श्रीसाईसत्यव्रत पूजा व भक्त अभिषेक पुजा करण्यात येतात. प्रत्येक श्रीसाईसत्यव्रत पूजेकरीता पूजेच्या चौरंगावर दोन विड्याची पाने ठेवण्यात येतात. आता माहे-एप्रिल-२०२१ ते मार्च २०२२ अखेर या वर्षात श्रीसाईसत्यव्रत व अभिषेक पुजेकरीता अंदाजे २,००,००० नग विडयाचे पाने खरेदी करावे लागणार आहे. याकामी अंदाजे प्रति पान रुपये ०१/- प्रमाणे एकूण रुपये २,००,०००/- मात्र इतका खर्च येणार आहे. सध्या जगभरात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव असलेने माहे-एप्रिल-२०२० ते मार्च-२०२१या कालावधीत विडयाचे पाने खरेदी करणेत आलेले नाहीत. खर्चाची तरतूद मंदिराचे वार्षिक बजेटमध्ये करणेत आलेली आहे. तरी विडयाचे पाने खरेदीसाठी विहित पध्दतीने कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

३) पावडर मार्बल मुर्ती खरेदी- श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातुन अनेक सन्माननीय व्यक्ती येत असतात. यामान्यवर अतिथींचा संस्थानचेवतीने यथोचित सत्कार करण्यात येतो. सत्कारामध्ये मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.विश्वस्त मंडळ, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उप मुख्यकार्यकारी अधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी व जनसंपर्क अधिकारी यांचे सुचनेनुसार मान्यवरांना आवश्यकतेप्रमाणे पावडर मार्बल मूर्ती देण्यात येते. तसेच संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त होणारे कर्मचा-यांना संस्थानमार्फत पावडर मार्बल मुर्ती देऊन सत्कार करण्यात येतो. आता एप्रिल-२०२१ ते मार्च -२०२२ अखेर या वर्षात पावडर मार्बल मुर्ती ०४ नंबर ८०० नग अंदाजे दर रुपये २००/-मात्र प्रती नगाप्रमाणे एकूण रुपये १,६०,०००/- मात्र व ०५ नंबर मुर्ती १०० नग अंदाजे दर रुपये ६००/- मात्र नगाप्रमाणे एकूण रुपये ६०,०००/- मात्र असे एकूण रुपये २,२०,०००/- मात्र इतका खर्च येणार आहे. सध्या जगभरात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव असलेने माहे-एप्रिल-२०२० ते मार्च-२०२१ या कालावधीत मार्बल पावडर मुर्ती नं.०४ व मुर्ती नं.५ खरेदी करणेत आलेले नाहीत. खर्चाची तरतूद मंदिराचे वार्षिक बजेटमध्ये करणेत आलेली आहे. तरी मार्बल पावडर मुर्ती खरेदीसाठी विहित पध्दतीने कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.



ERP-34

४) काशी अष्टगंध पावडर खरेदी - श्रींचे दर्शनासाठी समाधी मंदिरात येणा-या साईभक्तांना दर्शनापूर्वी गंध लावणेत येतो. गंध लावल्यामुळे साईभक्तांमध्ये भक्तीमय वातावरण निर्माण होते. साईभक्त व ग्रामस्थ यांना दैनंदिन गंध लावणेत येत असल्याने, सदरहू अष्टगंध आतापर्यंत साईभक्तांनी देणगी स्वरुपात दिलेला आहे. साधारणता: मंदिर विभागासाठी अंदाजे ३५ ते ४५ किलो अष्टगंध प्रति महिन्यास वापर होत आहे. माहे-एप्रिल-२०२१ ते मार्च-२०२२ या आर्थिक वर्षाकरीता अंदाजे ६०० किलो अष्टगंध खरेदी करावे लागणार आहे. अष्टगंध खरेदी कामी अंदाजे दर रुपये १७०/- प्रती किलो प्रमाणे एकूण १,०२,०००/- मात्र इतका खर्च येणार आहे. सध्या जगभरात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव असलेने माहे-एप्रिल-२०२० ते मार्च-२०२१ या कालावधीत काशी अष्टगंध खरेदी करणेत आलेला नाहीत. खर्चाची तरतूद मंदिराचे वार्षिक बजेटमध्ये करणेत आलेली आहे. तरी काशी अष्टगंध खरेदीसाठी विहित पध्दतीने कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

तरी खालील तपशिलाप्रमाणे माहे-एप्रिल-२०२१ ते मार्च २०२२ अखेर आर्थिक वर्षाकरीता साहित्य खरेदी करावे लागणार आहे.

| अ.क्र | तपशील | मागील दर व खर्च | | माहे- एप्रिल-२०२१ ते मार्च-२०२२ ची मागणी (अंदाजे) | अंदाजे दर | | | एकूण अंदाजे खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दर रुपये | खर्च | | रुपये | पैसे | प्रमाण | |
| ०१ | फुटाणे प्रसाद | देणगी | निरंक | ४८० किलो | १०० | ०० | किलो | ४८,०००/- |
| ०२ | विड्याची पाने | ०.८० पैसे | निरंक | २,००,००० नग | ०१ | ०० | नग | २,००,०००/- |
| ०३ | पावडर मार्बल मूर्ती नं.४ | १९०/- | निरंक | ८०० नग | २०० | ०० | नग | १६००००/- |
| | पावडर मार्बल मूर्ती नं.५ | ५७५/- | निरंक | १०० नग | ६०० | ०० | नग | ६०,०००/- |
| ०४ | काशी अष्टगंध पावडर | १७०/- | निरंक | ६०० किलो | १७० | ०० | किलो | १,०२,०००/- |

प्रस्ताव - १) सध्या जगभरात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव असल्याने सन २०२०-२०२१ मध्ये उपरोक्त साहित्य खरेदी करणेत आले नाही. सन २०२१-२०२२ मध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होऊन मंदिर पुर्ववत सुरु झाल्यास उपरोक्त नमूद केलेप्रमाणे साहित्य खरेदी करावे लागणार आहे.

२) अ.नं. ०१ ते ०४ मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक नगांची वार्षिक खरेदीची रक्कम रु. ३,००,०००/- मात्रचे आत असल्याने विहीत पद्धतीने दरपत्रके मागवुन त्यातील न्युनतम दरधारकाचे दर मान्य करणेस व कार्यादेश देणेस तसेच त्याकामी होणारे सर्व समावेशक खर्चास चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

16/3/24

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

16/3

दिनांक –
निर्णय – प्रस्ताव मंजूर.

23/03/2024

(श्रीमती गीता प्रविण बनकर)
सदस्य तदर्थ समिती तथा
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

25/3/2024

(भानुदास ह. पालवे)
सदस्य तदर्थ समिती तथा
अप्पर महसूल विभागीय आयुक्त, नाशिक

16/3/24

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

23/3

(श्रीकांत अणेकर)
अध्यक्ष, तदर्थ समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.
तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर.

(171)

विषय क्र.- 9/923

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ

कॅन्टीन विभाग



विषय – संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता आवश्यक असणा-या सन २०२१-२२ या वर्षाकरीता व्यावसायिक १९ किलो चे गॅस सिलेंडर खरेदी करणेबाबत.

टिपणी -

**अधिनियमातील तरतूद** - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमतत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी,पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील, अशी तरतूद आहे.

तसेच कलम २१(१)(ग) मध्ये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी व कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे आणि कलम २१(१)(घ) मध्ये भक्तांना जेवण देणे आणि अन्नछत्र चालविणे वगैरेबाबतची तरतुद आहे.

संस्थानचे कॅन्टीन विभागामार्फत साईभक्तांना चहा,कॉफी,दुध,मिनरल वॉटर,बिस्कीटे इ. अल्पदरात पुरविले जातात. चहा,कॉफी,दुध बनविणेसाठी संस्थानचे कॅन्टीन विभागास दरवर्षी सुमारे ३५०० इतक्या १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलेंडरची आवश्यकता भासत असते.

संस्थानचे मा.तदर्थ समितीचे दि.१३/०७/२०२० रोजीच्या सभेतील विषय नं.३१ निर्णय क्रं.३८५ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

**"संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता व्यवसायिक १९ किलो चे गॅस् सिलेंडर पुरवठा करणारे श्री साई गणेश गॅस एजन्सी, शिर्डी यांना दि.०८/०९/२०१८ रोजी दिलेल्या पुरवठा आदेशास त्यातील अटी व शर्तीस अधीन राहून दि.३१/०३/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे."** असा निर्णय झालेला आहे.

सदर निर्णयानुसार श्री साई गणेश गॅस एजन्सी यांनी सन २०२०-२१ या कालावधीसाठी शासकिय आधारभुत किंमतीवर प्रती गॅस सिलेंडर रू.१२५/- सवलत देवुन सवलतीच्या दरात वर्षभर मागणीनुसार विनाविलंब गॅस पुरवठा केला आहे. वरील व्यावसायिक गॅस पुरवठाधारकांकडुन प्राप्त झालेल्या दरानुसार श्री साई गणेश गॅस एजन्सी, शिर्डी यांची सवलत रू.२११/- देवु केलेली आहे. सन २०१९-२० मध्ये श्री साई गणेश गॅस एजन्सीकडुन ३३४९ इतके गॅस सिलेंडर खरेदी केले असुन त्यांची बीलांची रक्कम रू.४०,३८,११८/- असुन रू.४,१८,६२५/- सुट वजा जाता रू.३६,१९,४९३/- एजन्सीला प्रत्यक्ष अदा करण्यात आले आहेत.

कोव्हीड कालावधीत दि.१७/०३/२०२० ते दि.१६/११/२०२० पर्यंत श्री साई मंदिर बंद असलेने कॅन्टीन विभागाकडील चहा कांऊटर बंद होते. परंतु साईनाथ मंगल कार्यालयातील मुख्य कॅन्टीन कर्मचारी चहासाठी चालु असल्याने दि.०२/०५/२०२० ते दि.०२/०३/२०२१ अखेर श्री साई गणेश गॅस एजन्सी कडुन ८२४ गॅस सिलेंडर खरेदी केले असुन त्यांची बीलांची रक्कम रू.१०,६९,३६४/- असुन रू १,०३,०००/- सुट वजा जाता रू.९,६६,२६४/- एजन्सीला प्रत्यक्ष अदा करण्यात आले आहेत.

सदर गॅस पुरवठा धारकाची संस्थानला गॅस पुरवठयाची मुदत दि.३१/०३/२०२१ अखेर संपुष्टात येत असल्याने सन २०२१-२२ या वर्षाकरीता संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता आवश्यक असणा-या व्यावसायिक १९ किलोचे गॅस सिलेंडर खरेदी करणेकामी दि.०४/०३/२०२१ ते दि.१२/०३/२०२१ अखेरपर्यंत कोटेशन मागविणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते. तसेच नजीकच्या गॅस एजन्सीजलादेखील पत्र देण्यात आलेले आहे.

तदनुषंगाने दि.१२/०३/२०२१ अखेर खालील गॅस एजन्सीकडून कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

१) साई पॅराडाईज गॅस एजन्सी,शिर्डी

२) मे.समृध्दी इण्डेन,राहाता

३) श्री साई गणेश गॅस एजन्सी,शिर्डी

उक्त कोटेशन दि.१३/०३/२०२१ रोजी उघडणेत आले. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | गॅस एजन्सीचे नाव | प्रती सिलेंडर करीता देत असलेली सवलत |
|---|---|---|
| १ | साई पॅराडाईज गॅस एजन्सी,शिर्डी | सवलत रु. १८०/- |
| २ | मे.समृध्दी इण्डेन,राहाता | सवलत रु. २०३/- |
| ३ | श्री साई गणेश गॅस एजन्सी , शिर्डी. | सवलत रु. २११/- |

**विभागाचा अभिप्राय** – १) गॅस सिलेंडरचे दर हे दर महिन्याला आंतरराष्ट्रीय पातळीवरील कच्च्या तेलाच्या किंमतीनुसार तेल कंपन्या दर महिन्यासाठी निश्चित करतात. हे दर वितरकाचे वितरणाचे ठिकाण व प्रत्येक गॅस प्लॅन्ट यांचे वाहतुक अंतर यानुसार तालुकानिहाय थोडया प्रमाणावर कमी/जास्त होवू शकतात.

ERP NO : 95-2020

२) शिर्डी हे राहाता तालुक्यात येते. सबब प्रस्तावात नमुद तीनही गॅस वितरकांचे १९ किलो व्यावसायिक गॅस सिलेंडर विक्रीचे दर सारखेच आहेत. उदाहरणादाखल एप्रिल २०२१ चे १९ किलो व्यावसायिक गॅस सिलेंडरचे दर वितरकांकडून घेण्यात आले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | गॅस एजन्सीचे नाव | माहे एप्रिल महिन्यातील प्रती सिलेंडर दर (GST सह) |
|---|---|---|
| १ | साई पॅराडाईज गॅस एजन्सी,शिर्डी | रु.१,६५२=५० |
| २ | मे.समृध्दी इण्डेन,राहाता | रु.१,६५२=५० |
| ३ | श्री साई गणेश गॅस एजन्सी , शिर्डी. | रु.१,६५२=५० |

उपरोक्त बाबींचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, गॅस सिलेंडरचे दर हे कंपन्या वेगवेगळया असल्या तरी ते सारखेच आहेत.

३) सन २०२१-२२ या वर्षासाठी संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी आवश्यक असलेले व्यावसायिक १९ किलोचे गॅस सिलेंडरच्या वेळोवेळी निश्चित करण्यात आलेल्या शासकीय दरामध्ये प्रति सिलेंडरमागे जास्तीत जास्त रक्कम रु.२११/- इतकी सुट देणारी गॅस एजन्सी म्हणजेच श्री साई गणेश गॅस एजन्सी,शिर्डी यांचेकडून संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी आवश्यकतेनुसार गॅस सिलेंडर खरेदी करता येतील.

**प्रस्ताव** – सन २०२१-२२ या वर्षासाठी संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी आवश्यक असलेले व्यावसायिक १९ किलोचे गॅस सिलेंडरच्या वेळोवेळी निश्चित करण्यात आलेल्या शासकीय दरामध्ये प्रति सिलेंडरमागे जास्तीत जास्त रक्कम रु.२११/- इतकी सुट देणारी गॅस एजन्सी म्हणजेच श्री साई गणेश गॅस एजन्सी,शिर्डी यांचेकडून संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी आवश्यकतेनुसार गॅस सिलेंडर खरेदी करणेच्या मान्यतेसाठी चक्रीय पध्दतीने सादर.

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

---

सन २०२१-२२ या वर्षासाठी संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी आवश्यक असलेले व्यावसायिक १९ किलोचे गॅस सिलेंडरच्या वेळोवेळी निश्चित करण्यात आलेल्या शासकीय दरामध्ये प्रति सिलेंडरमागे जास्तीत जास्त रक्कम रु.२११/- इतकी सुट देणारी गॅस एजन्सी म्हणजेच श्री साई गणेश गॅस एजन्सी,शिर्डी यांचेकडून संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी आवश्यकतेनुसार गॅस सिलेंडर खरेदी करणेस चक्रीय पध्दतीने मान्यता देण्यात आली.

| | | | |
|---|---|---|---|
| (श्रीमती गीता बनकर)<br>सहा.धर्मादाय आयुक्त,<br>अहमदनगर,<br>तथा सदस्य | (भानुदास पालवे)<br>अपर आयुक्त,<br>विभागीय आयुक्त कार्यालय,<br>नाशिक,तथा सदस्य | (रविंद्र ठाकरे)<br>प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी<br>श्री साईबाबा संस्थान<br>विश्वस्तव्यवस्था,शिर्डी | (श्रीकांत आणेकर)<br>अध्यक्ष,तदर्थ समिती तथा<br>प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश<br>अध्यक्ष,तदर्थ समिती |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.**

विषय क्र.-9/ 928

# मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर

## विभाग- श्री साईबाबा इं. मि. स्कुल, शिर्डी

टिपणी:-

विषय – शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ मध्ये ज्युनियर केजी वर्गासाठी ऑनलाईन पद्धतीने नविन प्रवेश प्रक्रीया राबविणेस व मर्यादीत एकूण २५० प्रवेश देणेस मान्यता मिळणेबाबत .....

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद** –सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – नवीन प्रस्ताव**

**प्रास्ताविक** – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी संचलीत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल,शिर्डी कायम विनाअनुदानीत तत्वावर चालविली जाते. शाळेची प्राथमिक विभागाची इ. १ ली ते ७ वी पर्यंत व माध्यमिक विभागांची इ.८ वी ते १० वी पर्यंत नियमानुसार शालेय मान्यता घेण्यात आलेली आहे. सन १९९० पासून शाळा सुरु करण्यात आली तेव्हापासून आपल्या शाळेत पुर्वप्राथमिक विभाग ज्यु. केजी व सि. केजी. वर्गांना नवीन प्रवेश देण्यात येतात. पुर्व प्राथमिक विभागासाठी शाळेच्या शिक्षक व शिक्षकेतर आकृतीबंधात एकूण ०८ सहा. शिक्षकांची पदे मंजूर करुन घेण्यात आलेले आहेत. सन १९९० ते सन २००७ पर्यंत ज्यु. केजीच्या ०३ वर्ग तुकडी कार्यरत होत्या परंतू संस्थानचे प्रशासन व तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने त्यांचे आखत्यारीत परिस्थितीनुसार वेळोवेळी निर्णय घेऊन ज्यु. केजीच्या वर्ग तुकडी संख्येत वाढ केलेली आहे. सन २०१० पासून ते सन २०२१ पर्यंत ज्यु. केजी तुकडी संख्येत नैसर्गिक वाढ होऊन आजमितीस ज्यु. केजीच्या ०५ व सिनीयर केजीच्या ०५ अशा एकूण १० वर्ग तुकडी कार्यरत झालेल्या आहेत. सिनीयर केजी वर्गाचे हेच विद्यार्थी पुढे इयत्ता १ ली साठी प्रविष्ट करुन घेतले जातात.

सन १९९०ते २०२१ अखेर ज्यु. केजीचे वर्ग तुकडीवाढी बाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | सन | ज्यु. केजी कार्यरत तुकडी | ज्यु. केजी कडे वाढ झालेली तुकडी संख्या | ज्यु. केजी कडे कमी झालेली तुकडी संख्या | ज्यु. केजी विभाग एकूण कार्यरत तुकडी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९९० ते १९९८ | ०२ | --- | -- | ०२ |
| २. | १९९९ ते २००३ | ०२ | ०१ | -- | ०३ |
| ३ | २००४ ते २००६ | ०२ | --- | ०१ | ०२ |
| ४ | २००६ ते २००७ | ०२ | ०१ | -- | ०३ |
| ५ | २००८ ते २००९ | ०३ | ०२ | -- | ०५ |
| ६ | २००९ ते २०१० | ०३ | --- | ०२ | ०३ |
| ७ | २०१० ते २०१३ | ०३ | ०३ | -- | ०६ |
| ८ | २०१३ ते २०२१ अखेर | ०५ | -- | ०० | ०५ |

शैक्षणिक वर्ष २०२०- २१ अखेर पुर्व प्राथमिक ( केजी विभाग) एकूण विद्यार्थी ४०३ आहे. प्राथमिक विभाग इयत्ता १ ली ते ७ वी एकूण विद्यार्थी संख्या १७१७ आहे व इयत्ता ८ वी ते १० वी एकूण विद्यार्थी संख्या ६३९ आहे. शाळेत एकूण २७५९ विद्यार्थी शिक्षण घेत असून एकूण ३५ वर्ग खोल्यांमध्ये ५७ वर्ग तुकडीचे अध्यापनाचे काम दोन सत्रात अविरतपणे करण्यात येते.

शैक्षणिक वर्ष २०२०- २१ मध्ये ज्यु. केजी वर्गासाठी नव्याने प्रवेश प्रक्रिया राबविणेकामी नविन वेळापत्रक तयार करुन मा. तदर्थ (Ad-hoc) समिती दि. २४.०२.२०२० रोजीचे सभेत विषय नं. ३८ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

पान नं. २ वर....

मा. तदर्थ (Ad-hoc) समिती दि. २४.०२.२०२० रोजीची सभा निर्णय क्र. १३८ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन," शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये ज्युनियर के.जी. वर्गाकरीता ०५ वर्ग तुकडीसाठी प्रति वर्ग तुकडीत ५० विद्यार्थी संख्येप्रमाणे वयात बसलेचे नियम व अटी शर्तीस अधिन राहून मर्यादीत एकूण २५० प्रवेश देण्यास तसेच नियमावली व कालावधीनुसार ज्यु. केजीच्या वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली ".

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कोरोना विषाणू संसर्ग परिस्थिती विचारात घेता माहे २१ मार्च २०२० पासून देशभरात लॉकडाऊन सुरु करण्यात आले होते. अशा वेळी ज्यु. केज़ी प्रवेश प्रक्रीया थेट राबविणे शक्य नसल्याने दि. ०४/०५/२०२० रोजीचे टिपणीने दि. ११ मे, २०२० ते दि. ३० मे, २०२० या कालावधीत ऑनलाईन प्रवेश प्रकीया राबविणेस खालीलप्रमाणे मंजुरी देण्यात आली होती..

| अ.न. | प्रवेश प्रक्रिया सन २०२० -२०२१ | तपशिल |
|---|---|---|
| १ | दि. ११ मे २०२० ते दि. २० मे २०२० अखेर | पालकांनी प्रवेश अर्ज ऑनलाईन भरणे. संस्थानचे वेबसाईटवर खालील लिंक देण्यात आली होती. https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSc25SoUvJsxzr1ZCa7ASoa0MC_kpwx1u0WxYlNP0nj3uc-OZg/viewform?usp=sf_link |
| २ | दि. २१ मे २०२० ते दि. ३० मे २०२० अखेर | प्राप्त ऑनलाईन अर्जाची प्रिंट काढणे , छाननी करणे ,प्रवेश पात्र -अपात्र ठरविणे, पात्र याद्या तयार करणे व टिपणी ठेऊन प्रशासनाचे मान्यतेने यादी जाहिर करण्यात आली होती. |
| ३ | पालकांसाठी महत्वाची सूचना | पाल्यांचे प्रवेशासाठी लागणारा मुळ जन्म दाखला, रहिवाशी पत्ता असलेला पुरावा व बालकांचा फोटो प्रवेश अर्जात अपलोड करण्यात आला होता. |

उपरोक्त मान्यतेने ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया राबविण्यात आली असून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये ज्यु. केजी वर्गासाठी एकूण १७२ नविन विद्यार्थ्यांना अटी व शर्तीस आधिन राहून प्रवेश देण्यात आला.

विभागाची मागणी – माहे जुन २०२१ पासून शाळेचे नविन शैक्षणिक वर्ष सुरु होत असल्याने ज्यु. केजी वर्गासाठी प्रवेश प्रकीया करणे अनिवार्य आहे. यापुर्वी शाळेच्या कार्यालयातून ज्यु. केजी प्रवेशाचे अर्ज वाटप व स्विकृती करण्यात येत होती परंतू आजमितीस कोरोना संकटाची परिस्थिती, धोका तसेच Social Distance व जमावबंदी कायदा नियमाचे पालन करावयाचे असल्याने व प्रवेशासाटी होणारी पालकांची गर्दी विचारात घेता, मागील वर्षाप्रमाणे ज्यु. केजी प्रवेश प्रक्रीया ही ऑनलाईन पद्धतीने राबविता येईल व याबाबतचे वेळापत्रक खालीलप्रमाणे ठरविता येईल.

| अ.न. | प्रवेश प्रक्रिया सन २०२१ -२०२२ | तपशिल |
|---|---|---|
| १ | दि. १२ एप्रिल २०२१ ते दि. २० एप्रिल २०२१ अखेर | ज्यु. केजी नवीन प्रवेशासाठी संबधित पालकांना प्रवेश अर्ज ऑनलाईन भरणेकामी संस्थानचे वेबसाईटवर गुगल फॉर्मची लिंक देऊन नवीन प्रवेश अर्ज भरुन घेता येईल. |
| २ | दि. २१ एप्रिल २०२१ ते दि. ३० एप्रिल २०२१ अखेर | प्राप्त ऑनलाईन अर्जाची प्रिंट काढणे , अर्ज छाननी करणे , प्रवेश अर्ज पात्र -अपात्र ठरविणे, पात्र अर्जांच्या याद्या तयार करणे व प्रस्ताव ठेऊन प्रशासनाचे मान्यतेने यादी जाहिर करुन नवीन प्रवेशाबाबतची विहित पद्धतीने पुढील कार्यवाही करता येईल. |
| ३ | पालकांसाठी महत्वाची सूचना | पाल्यांचे प्रवेशासाठी लागणारा मुळ जन्म दाखला, रहिवाशी पत्ता असलेला पुरावा व बालकांचा फोटो प्रवेश अर्जात अपलोड करणेकामी कार्यवाही करता येईल. |

पान नं. ३. वर...

उपरोक्त वेळापत्रक हे शाळेतील विद्यार्थ्यांचे व्हॉटसॲप ग्रुप, संस्थान कर्मचारी व्हॉटसॲप ग्रुप व स्थानिक नागरीकांचे व्हॉटसॲप ग्रुप, शिरडी मर्यादीत असलेल्या स्थानिक केबल नेटवर्कवर ज्यु. केजी नविन प्रवेशाबाबतची बातमी देता येईल व शाळेच्या प्रवेशद्वारावर फ्लेक्स बोर्ड लावून पालकांना सुचीत करता येईल. तसेच संस्थानचे अधिकृत वेबसाईटवर माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत ज्यु. केजी प्रवेश अर्जाबाबतची लिंक उपलब्ध करुन देता येईल.

शिर्डी व परिसरातील जिल्हा परिषदेच्या शाळा व सर्व माध्यमांच्या शाळेमध्येही अशाच प्रकारची ऑनलाईन प्रवेश प्रकीया करण्यात येतात. तसेच इतर इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळेतही ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया राबविण्यात येते त्यानुसार अशी प्रक्रीया आपल्या शाळेतही राबविता येईल असे नम्र मत आहे.

**ज्यु. केजी नविन प्रवेश प्रक्रीया राबवितांना खालील बाबींचा विचार होऊन प्रवेश देण्यात यावा.**

9. शैक्षणिक वर्ष २०२१ – २०२२ मध्ये उपरोक्त नमूद केलेले वेळापत्रकानुसार दिलेल्या मुदतीत मागील वर्षाप्रमाणे ऑनलाईन पद्धतीने नविन प्रवेशाबाबतची कार्यवाही करता येईल.

10. शाळा प्रवेशासाठी बालकाचे किमान वय निश्चित करण्याबाबत शासन निर्णय दिनांक २५.०१.२०१७ अन्वये शाळा प्रवेशासाठी ३० सप्टेंबर, हा मानिव दिनांक घोषित करण्यात आलेला होता, आता शासन निर्णय क्रमांकः आरटीई -२०१८ /प्र.क्र.१८०/एस.डी.- १, दि.१८ सप्टेंबर,२०२० अन्वये ३१ डिसेंबर हा **मानिव दिनांक करण्यात आलेला आहे.** त्यामुळे ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर या महिन्यातील जन्म असलेल्या बालकांच्या प्रवेशाबाबत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये अडचणी निर्माण होत आहे. म्हणून मानिव दिनांक बदलल्यामुळे या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून फक्त शैक्षणिक २०२१-२२ साठी किमान / कमाल वयोमर्यादा पुढीलप्रमाणे असणे आवश्यक आहे.

| अ.नं. | प्रवेशाचा वर्ग | वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | नर्सरी<br>(इयत्ता १ ली पुर्वीचा ३ रा वर्ग ) | ०१ ऑक्टोबर २०१७ ते ३१ डिसेंबर २०१८ |
| २ | एल. के. जी.<br>(इयत्ता १ ली पुर्वीचा २ रा वर्ग ) | ०१ ऑक्टोबर २०१६ ते ३१ डिसेंबर २०१७ |
| ३ | इयत्ता १ ली | ०१ ऑक्टोबर २०१७ ते ३१ डिसेंबर २०१५ |

ऑक्टोबर, २०१७ ते डिसेंबर, २०१७ मधील बालकांना नर्सरी किंवा एल. के.जी. या दोन्ही पैकी एका वर्गात पालकांच्या इच्छेनुसार प्रवेश घेता येऊ शकेल. अशाप्रकारे इयत्ता १ ली पर्यंतच्या वर्गासाठी वयोमर्यादाबाबत ठरविण्यात आलेले आहे. **फक्त शैक्षणिक २०२१-२२ साठी** ज्यु. केजी करीता पाल्यांचा वयोगट ०४ वर्ष ते ०५ वर्ष ०२ महिने या पर्यंत असावा म्हणजे जन्मतारीख **(१ ऑक्टोंबर २०१६ ते ३१ डिसेंबर २०१७ )** या कालावधीतील असावी.

1. शिरडी गांव व परिसरात गोरगरीबांचे विद्यार्थी असून त्यांना परिसरातील इतर इंग्रजी माध्यमांच्या शाळांची फी खर्च पेलवडत नाही. श्री साईबाबा इं.मि.स्कुल, शिर्डी मध्ये कमी खर्चात चांगले प्रतीचे इंग्रजी माध्यमाचे शिक्षण मिळत असल्याने पालकांची प्रवेशासाठी मोठी धडपड असते. प्रत्येक वर्षी अटी व शर्तीचे नियमास अधिन राहून वयात बसलेले किमान २२० ते २३० इतके प्रवेश ज्यु. केजी साठी होतात. मागील वर्षी कोरोनाचे संकट असल्याने ऑनलाईन प्रवेश प्रकीया राबविण्यात आली होती. या प्रक्रीयेत अटी व शर्तीचे नियमास अधिन राहून एकूण १७२ प्रवेश देण्यात आलेले आहेत. मागील वर्षाचा अनुभव विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये ज्यु. केजीच्या ०५ वर्ग तुकडी करता येईल. याकामी ०५ वर्गखोल्याही उपलब्ध असून ०५ वर्ग शिक्षकही उपलब्ध आहेत. तरी किमान २५० विद्यार्थ्यांना ज्यु. केजी साठी प्रवेश देणेस हरकत नाही.

2. ज्यु. केजी प्रवेशासाठी कायम कर्मचारी पाल्य, संस्थान कंत्राटी कर्मचारी पाल्य, कंत्राटी कर्मचारी पाल्य, आऊटसोर्स कर्मचारी पाल्य, शिर्डी गावातील रहिवाशी पाल्य व शिर्डी गावाचे हद्दीचे बाहेरील पाल्य असा नविन प्रवेशासाठी प्राधान्य क्रम ठेवावा. शिर्डी . गावाचे हद्दीचे बाहेरील पाल्यामध्ये (निमगांव को-हाळे, राहाता, साकुरी, निघोज, निमगांव, पिंपळवाडी, नांदुर्खी, डो-हाळे, को-हाळे, सावळीविहीर, रुई ) इ. गावांतील रहिवाशी, प्रवेशाचे वेळी विदयार्थ्यांचा मूळ जन्म दाखला ( ग्रामपंचायत / नगरपालिका / महानगरपालिका ) यांनी प्रमाणित केलेला असावा. तसेच शिरडी गावातील आधारकार्ड ,मतदान कार्ड / नगर पंचायत रहिवासी दाखला / रेशनकार्ड / लाईटबील/ भाडेकरु तत्वावर राहत असलेल्या रहिवाशी (खोली मालकाच्या लाईट बीलाची प्रत ) ही कागदपत्र तपासून प्रवेशासाठी पात्र ठरविता येईल.

पान नं. ४ वर...

3. ज्यु. केजी. प्रवेश निश्चित करतांना प्रवेशाबाबतची सर्व कागदपत्र पडताळणी करणेकामी पुर्व प्राथमिक विभागाकडे कार्यरत असलेले कायम व कंत्राटी सहा. शिक्षिका यांची समिती तयार करण्यात यावी. या समितीने कागदपत्रांची पडताळणी केलेनंतरच प्रशासकीय मंजूरीने प्रवेशासाठी पात्र / अपात्र प्रवेशांची यादी तयार करुन प्रवेश निश्चिती बाबतची सूचना पालकांना मेसेजद्वारे, व्हॉटसॲप द्वारे, इमेल द्वारे पालकांना कळविता येईल.
4. नविन प्रवेश दिलेल्या विदयार्थ्यांचे संबधित वर्षाचे शैक्षणिक शुल्क (पूर्ण शुल्क) एक रक्कमी, एकाच वेळी दिलेल्या मुदतीत भरुन घेता येईल. तसेच कोरोना संकटाचे प्रादुर्भाव विचारात घेऊन संस्थान व शालेय प्रशासनाचे वतीने स्कुलबस सुरु करण्यात आलेनंतर त्यावेळची परिस्थिती विचारात घेऊन स्कुलबस बाबतचे शुल्क भरुन घेता येईल. पाल्यांचे नवीन प्रवेशासाठी जे पालक दिलेल्या मुदतीचे आत शैक्षणिक शुल्क भरणार नाहीत त्यांचा प्रवेश रद्द समजण्यात येईल.
5. स्कुलबस सुविधा ही उपलब्धतेनुसार विद्यार्थ्यांना पुरविण्यात येतील. शालेय प्रशासनाकडे उपलब्ध असलेल्या स्कुलबसमध्ये परंतू पुरेशा प्रमाणात स्कुलबसमध्ये सिट उपलब्ध नसतील तर अशावेळी पालकांना स्वतः आपल्या पाल्यांची शाळेत ने-आण करण्याची सोय करावी लागेल या अटीवर त्यांना प्रवेश देता येईल..
6. ज्यु. केजी प्रवेशासाठी शासनाने विहित करुन दिलेल्या वयानुसार शालेय प्रशासनाचे अटी/ शर्तीस अधिन राहून प्रवेश देता येईल. संस्थान प्रशासनाने विहित केलेल्या मर्यादीत प्रवेशापेक्षा ज्यु. केजी साठी जास्त प्रवेश होत असतील तर सदर वर्गात प्रवेश देणे अथवा नाकारणे हा अधिकार संस्थान प्रशासनाकडे राखून ठेवता येईल.

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी /शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान- ज्यु. के.जी प्रवेशाबाबत उपरोक्त नियमावलीनुसार ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली तर शालेय व संस्थान प्रशासनावर पालकांचा रोष राहणार नाही तसेच गोरगरीब विद्यार्थी इंग्रजी माध्यमाचे शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत - तरी शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ मध्ये ज्यु. केजीच्या ०५ वर्ग तुकडीसाठी, प्रत्येकी ५० विद्यार्थी संख्येप्रमाणे प्रस्तावित केलेल्या नियम व अटी शर्तीस अधिन राहून, मागील वर्षाप्रमाणे ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवून मर्यादीत एकूण २५० नविन प्रवेश देता येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे प्रस्तावीत बाबीना चक्रीय पद्धतीने मंजूरी मिळणेकामी निर्णयार्थ सादर,

21/4/21

( कान्हूराज बगाटे, भा.प्र.से. )
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

"प्रस्ताव मंजूर."

15/04/21

( गीता प्रवीण बनकर)
सहा. धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

16/4/2021

( भानुदास पालवे )
अप्पर आयुक्त, नाशिक विभाग
सदस्य, तदर्थ समिती

21/4/21

( कान्हूराज बगाटे, भा.प्र.से. )
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

1/4

( श्रीकांत अणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्रन्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

विषय क्र.- 9) 125

522

सामान्य प्रशासन विभाग
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
25 DEC 2020
आवक नं. 09047

1

जा.क्र. ५३२ /२०२०,
जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर
दिनांक : २४ डिसेंबर, २०२०

प्रति,

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. साईबाबा संस्थान शिर्डी,
तथा सदस्य सचिव, तदर्थ समिती, श्री. साईबाबा संस्थान शिर्डी,
२. श्री. भा. ह. पालवे, अपर महसूल आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक, तथा सदस्य, तदर्थ समिती,
श्री. साईबाबा संस्थान शिर्डी,
३. श्रीमती गीता बनकर,
सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर तथा सदस्य, तदर्थ समिती,
श्री. साईबाबा संस्थान शिर्डी,

महोदय/महोदया,

यासमेत निम्नलिखित विषय चक्रीय पध्दतीने तदर्थ समीतीच्या निर्णयार्थ पाठवत आहे.

> ''दि. ०५/१२/२०२० च्या भाग-०२/क या पुस्तिकेतील विषय क्र. १११ ''श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे, यांना शिर्डी संस्थान परिसरात माहिती केंद्रासाठी जागा मिळणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे, ता. पाथर्डी, यांचेकडील पत्र जा.क्र.५१/२०२०, दि. ११/०२/२०२०.''

तदर्थ समितीच्या सर्व सदस्यांच्या निर्णयानंतर, मताधिक्याने होणा-या निर्णयाची अंमलबजावणी सदस्य सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी.

( श्रीकांत ल. आणेकर )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अ.नगर, तथा
अध्यक्ष,तदर्थ समिती, श्री.साईबाबा संस्थान,शिर्डी.

समेत : उक्त विषय चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ.

## तदर्थ समिती समोर चक्रीय प्ध्दतीने निर्णयार्थ सादर

विषय : दि. ०५/१२/२०२० च्या भाग-०२/क या पुस्तिकेतील विषय क्र. १११ ''श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे, यांना शिर्डी संस्थान परिसरात माहिती केंद्रासाठी जागा मिळणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे, ता. पाथर्डी, यांचेकडील पत्र जा.क्र.५१/२०२०, दि. ११/०२/२०२०.''

तदर्थ समितीच्या दि. ०५.१२.२०२० रोजी प्रस्तावित केलेल्या सभेच्या विषयात नमूद असलेल्या पुस्तिकेमध्ये विषय क्र. १११ हा ''श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे, यांना शिर्डी संस्थान परिसरात माहिती केंद्रासाठी जागा मिळणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे, ता. पाथर्डी, यांचेकडील पत्र जा.क्र.५१/२०२०, दि. ११/०२/२०२०'' असा नमुद करण्यात आला होता. सदर विषय दिनांक ११.१२.२०२० च्या तदर्थ समितीच्या सभेमध्ये ठेवण्यात आलेला होता परंतु वेळेअभावी त्या दिवशी त्या विषयावर चर्चा झालेली नाही. दि. १९.१२. २०२० च्या तदर्थ समितीच्या सभेमध्ये मात्र सदरचा विषय ठेवला गेला नव्हता.

दि. ०५/१२/२०२० च्या उक्त पुस्तिकेचे अवलोकन दि. ११.१२.२०२० च्या सभेनंतर करण्यात आले व त्यावेळी काही बाबींचा खुलासा तदर्थ समितीचे अध्यक्ष म्हणून झाला. सदर बाबी या अभिलेखावरुन दिसतात, मात्र त्याचा या ठिकाणी उहापोह करणे अप्रस्तुत आहे.

मुलतः दिनांक २८.०८.२०२० रोजीच्या सभेतील विषय क्रमांक २१ हा श्री. जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे, ता. पाथर्डी, यांनी संस्थान परिसरातील माहीती केंद्रासाठी जागा मिळणेबाबत विनंतीचा आहे. त्यास अनुसरुन संस्थान प्रशासनाचे टिप्पणीने माहीती केंद्रसाठी काही जागा सुचवल्या होत्या व देवू केल्या होत्या.

दिनांक २८.०८.२०२० रोजीचा चर्चेअंती मताधिक्याचा निर्णय, ज्यामध्ये सदर जागा ११ महिन्यांच्या करारावर ११ वर्षांसाठी मंजुरी दिल्याबाबत आहे. मात्र सदर निर्णयाला तदर्थ समितीचे सदस्य-सचिव व संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा विरोध होता.

वर नमुद केल्याप्रमाणे काही बाबी स्पष्ट झाल्याने मुलतः ११ वर्षांच्या नुतनीकरणाच्या अटीवर सदर जागा मंजूर करणे अध्यक्ष या नात्याने मला अयोग्य वाटते.

येथे जरुर नमुद करु इच्छितो की, *Quandoque bonus dormitat Homerus (i.e. no one is perfect; even the wisest make mistakes)* या उक्तीप्रमाणे सदर जागा ११ महिन्यांच्या करारावर देण्यात यावी. भविष्यातील नुतनीकरणाचा विचार आज करण्याची गरज नाही व त्यावर यथावकाश भविष्यातील परिस्थीतीनुसार निर्णय होईलच. करीता दिनांक २८.०८.२०२० रोजीच्या विषय क्रमांक २१ वरील निर्णय क्रमांक ४३० यात नमुद बाब म्हणजे 'नुतनीकरणाच्या अटीवर ११ वर्षांसाठी देणेस मंजुरी देण्यात आली' हा निर्णय रद्द करुन सदर जागा ११ महिन्यांच्या करारावर देण्यात यावी असे वाचावे असे मला वाटते. अशा पध्दतीने वरील निर्णयातील बाब दुरुस्त केल्यास विषय क्रमांक १११ बाबत वेगळा कुठलाही निर्णय घेण्याची गरज नाही. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सदर विषयावरील मताप्रमाणे याबाबतचे धोरण तदर्थ समिती समक्ष आणू शकतील.

हा प्रस्ताव चक्रिय पध्दतीने तदर्थ समितीच्या इतर सदस्यांसमक्ष ठेवण्यात यावा व मुख्य कार्यकारी अधिकारी/सदस्य-सचिव यांनी मताधिक्याने निर्णय अंमलात आणावा.

Cn
I have read the subject and the decision of the Hon'ble hairman. The record shows that other 2 members have yet to take decision on this subject. Cn
(space च्या अभावी वगळ्या पानावर मत नोंदवत आहे)

(श्रीकांत ल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अ.नगर, तथा
अध्यक्ष,तदर्थ समिती, श्री.साईबाबा संस्थान,शिर्डी.

(श्रीमती गीता बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त,अहमदनगर
तथा सदस्य, तदर्थ समिती,
श्री.साईबाबा संस्थान,शिर्डी.

(भा.ह. पालवे)
अपर महसूल आयुक्त, नाशिक विभाग,
नाशिक तथा सदस्य, तदर्थ समिती,
श्री.साईबाबा संस्थान,शिर्डी.

मुद्दा परि-४ मध्ये नमुद मत विपरीत आहे. संस्थानची मालमत्ता मंडिपक्षाने द्यावयाची असेल तर प्रथम धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तावाशी सहमत होता येत नाही.

(कान्हूराज बगाटे)
मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.साईबाबा संस्थान, शिर्डी
तथा सदस्य सचिव, तदर्थ समिती, श्री. साईबाबा संस्थान, शिर्डी

Presented Before Ad-hoc Committee by Circulation - "

विषय : दि. 05.12.2020 च्या भाग–2/क या पुस्तिकेतील विषय क्र. 111 श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे, यांना शिर्डी संस्थान परिसरात माहिती केंद्रासाठी जागा मिळणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे, ता. पाथर्डी, यांचेकडील पत्र जा. क्र. 51/2020, दि. 11.02.2020

I have read the subject and decision of the Hon'ble Chairman. The record shows that other two respected members have yet to take decision on this subject.

The undersigned was not present in the meeting dated 28.08.2020, held at Shirdi. As far as giving the trust property for future 11 years is concerned, this aspect was discussed while deciding subject no. 31 in the meeting of Adhoc Committeee held on 04.12.2019. Adopting the same rule, it is not known to me how it was proposed by then members Shri Swami and the decision was taken to give said premises for future 11 years.

Therefore, in my decision it is proper to allow said premises only for 11 months.

24/12/2020

(Geea P. Bankar)
Assistant Charity Commissioner &
Member of Adhoc Committee,
Shri Sai Sansthan, Shirdi.

विषय- दि.०५.१२.२०२० च्या भाग-२/क या पुस्तिकेतील विषय क्र.१११ "श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे यांना शिर्डी संस्थान परिसरात माहिती केंद्रासाठी जागा मिळणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे, ता.पाथर्डी, यांचेकडील पत्र जा.क्र. ५१/२०२० दि.११.०२.२०२०"

विषयांकित प्राप्त प्रस्तावातील परिच्छेद ४ मधील मांडलेले मत विपरित आहे. प्रस्तावास विरोध नसुन त्याबाबत प्रथमत: संस्थानकडून धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. संस्थानकडून अशा प्रकारे कोणत्याही धार्मिक संस्थाना जागा आजपर्यंत देण्यात आलेली नाही. जर अशा प्रकारे प्रस्ताव मंजुर केल्यास इतर धार्मिक संस्थाच्या मागण्या देखील येतील, व त्या नाकारता येणार नाही. सबब धोरणात्मक ठराव केल्याशिवाय सदर प्रस्तावाबाबत निर्णय करणे विधिवत नाही. तरी इतर धार्मिक देवस्थानांना जागा देण्याबाबत प्रथम धोरण व नियमावली निश्चीत करावी व त्या संदर्भात निर्णय झाल्यानंतर सदर प्रस्तावाचा विचार करावा.

5/1/2021

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
तथा सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

# अभिप्राय

संस्थानची मालमत्ता यापूर्वी भाडेपट्टयाने दिल्याचे उदाहरण माझे ऐकिवात नाही. यास्तव याबाबत संस्थानचे धोरण निश्चीत करणे आवश्यक वाटते. त्यानुसार पुढील कार्यवाही करणे योग्य होईल असे नम्र मत आहे.

14/1/2021

(भानुदास पालवे)
अपर आयुक्त,नाशिक नाशिक विभाग
तथा सदस्य,तदर्थ समिती,
श्री.साईबाब संस्थान,शिर्डी

नाशिक
दिनांक 14-01-2021

1142 (13395)

विषय क्र.-9/ 926

मा.तदर्थ समितीचे निर्णयार्थ
मालमत्ता विभाग

528

विषय :- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना त्यांचे ३३/११ के.व्ही.उपकेंद्रासाठी संस्थान मालकीची मौजे निमगांव-को-हाळे येथील गट नं.८७ पैकी २४.५० आर व गट नं.८८ पैकी क्षेत्र २७.५० आर असे एकूण वापरास दिलेले क्षेत्र ०.५२ आर इतके (नवीन गट नं.८७/८८) क्षेत्राच्या जागा वापरास मुदतवाढ मिळणेबाबत मा.अतिरीक्त कार्यकारी अभियंता (स्था) स्थापत्य उपविभाग,महावितरण,अहमदनगर यांचेकडील पत्र क्रं. अकाअ(स्था)/बां व सु उपविभाग/अनगर/तांत्रिक नं.४९८ दि.२१/११/२०२० प्राप्त दि.१५/१२/२०२०.

टिपणी –

**अधिनियमातील तरतूद** - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना -

**प्रकरणाची पूर्वपिठीका** - यापूर्वी दि.१२/०८/२००१ रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे टेक्निकल डायरेक्टर श्री.शामसुंदर देव व श्री साईबाबा संस्थानचे तत्कालिन मा.विश्वस्त यांचेमध्ये शिर्डी साठी स्वतंत्र ५ एम.व्ही.ए./३३ के.व्ही.ए.क्षमतेचे सबस्टेशन मिळणेबाबत चर्चा झाली असता या सबस्टेशन उभारणीसाठी येणारा अंदाजे खर्च १.५ कोटी विद्युत मंडळ करील व याकामी आवश्यक असणारी जागा संस्थानने उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी त्यांनी केली. त्यानुसार नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री.अग्रवाल यांना त्वरीत शिर्डी येथील सबस्टेशनचा प्रस्ताव सादर करणेस तसेच हा प्रस्ताव विद्युत मंडळ तातडीने मंजूर करणार असल्याचे सांगण्यात आले.

दि.१६/१०/२००२ रोजीचे पत्रान्वये कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,संगमनेर यांनी आगामी सिंहस्थ पर्वणीच्या संदर्भात अपेक्षित मागणी पुरविण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने शिर्डी येथे ३३/११ के.व्ही.चे एक उपकेंद्र तातडीने मंजूर केले असून त्यासाठी १०० मीटर x १५० मीटर जमीन लवकरात लवकर मिळावी,अशी विनंती केली.

प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे प्रस्ताव मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेपुढे सादर करणेत आला होता.

"सध्या संस्थानला व शिर्डी गावाला निमगाव येथील ३३/११ हजार व्होल्ट, ५ एमव्हीए क्षमतेच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या उपकेंद्रातून वीज पुरवठा होतो. निमगाव येथून शिर्डीसाठी जो ११ के.व्ही.ए.चा विद्युत पुरवठा देण्यात आलेला आहे त्याचे कंडक्टर्स बरेच जुने झाले असून कमी क्षमतेचे आहेत. शिर्डी गावातील तसेच संस्थानचा वीजभार दिवसेंदिवस वाढत आहे. या जादा भारामुळे वारंवार कंडक्टर तुटणे,इन्सुलेटर खराब होणे इ.मुळे ब-याच वेळा विद्युत पुरवठा खंडीत होतो. त्यामुळे संस्थानला विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी जनरेटरचा वापर करावा लागतो."

सदर प्रस्तावित विद्युत उपकेंद्र कार्यान्वित झाल्यास विद्युत पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण नाहीसे वा अत्यंत कमी होवून शिर्डी शहर व संस्थानला महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचा वीज पुरवठा अखंडीत वा जास्त वेळ मिळून संस्थानचा जनरेटरसाठी डिझेल खरेदीकामी होणारा खर्च कमी होईल. सदर प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९-१०/०८/२००३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३७१ पुढीलप्रमाणे झालेला आहे.

| 27 | दोडके - चांगल्या प्रतीचे | 1250.00 | किलो | 150.00 | **40.00** | 0.00 |
| 28 | हिरवा वाटाणा | 15000.00 | किलो | 150.00 | **65.00** | 70.00 |

| | | |
|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर | - |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल | - |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | - |
| १६ | मागील खरेदी दर | - |
| १७ | मागील पुरवठादार | मे.जय योगेश्वर ॲण्ड कंपनी, राहाता, तिरूपती व्हेजिटेबल कंपनी, राहाता, मे.संजय मोहन गोरे, सिन्नर, साळुंके ट्रेडिंग कंपनी, पुणे, मे.नाशिक ॲग्रो फारमर प्रोडयुसर कंपनी, जोगलटेंभी |

| | | |
|---|---|---|
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | वर अ.नं.१२ मध्ये नमूद केलेप्रमाणे. |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | वर अ.नं.१२ मध्ये अधोरखित केलेले ३ निविदाधारक |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय. |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील - | ------ |
| २३ | मागील खरेदी सध्याचे प्राप्त दर फरक | % ने कमी/जास्त |
| | रु. -- रु. -- रु. -- | -- |
| २४ | विभागाने वार्षिक भाजीपाला खरेदीसाठी मंजुरी घेतलेली अंदाजे रक्कम रू. १,८८,००,०००/- | |

२५. प्रस्ताव -

श्री साई प्रसादालय विभागाचे मागणीप्रमाणे सन-२०२१-२२ चे वार्षिक भाजीपाला मागणीसाठी ३ महिन्याचे ४ टप्प्यामध्ये ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. ई-निविदेमध्ये ०३ (तीन) निविदाधारकांनी भाग घेतला होता. सदर तीनही निविदाधारक तांत्रिक दृष्टया पात्र ठरले होते. सदर पात्र ३ निविदाधारकांच्या ई निविदा कमर्शियल बीड दि.०६.०५.२०२१ रोजी उघडले आहेत.

सदर भाजीपाल्याचे कमर्शियल बीड उघडल्यानंतर ई-निविदा प्राप्त दरांबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे:-

१. एप्रिल ते जून -२०२१ या तिमाही कमर्शियल ई-निविदेमध्ये एकूण २६ आयटेम्सपैकी १२ आयटेमसाठी, जुलै ते सप्टेंबर २०२१ तिमाहीसाठी एकूण २७ आयटेम्सपैकी १२ आयटेमसाठी , ऑक्टोबर ते डिसेंबर-२०२१ तिमाहीसाठी २८ आयटेम्सपैकी १४ आयटेमसाठी व जानेवारी ते मार्च-२०२२ तिमाहीसाठी २८ आयटेम्सपैकी १४ आयटेमसाठी ३ निविदाधारकांचे दर प्राप्त झाले आहेत. यातील एप्रिल ते जून २०२१ या तिमाहीतील अ.नं.९ भोपळा पुरविणेसाठी मे.जय मल्हार ट्रेडींग कंपनी, राहाता व मे.किरण एंटरप्रायजेस, चाकण यांचे दर न्यूनतम व समान आहेत.

२. एप्रिल ते जून -२०२१ या तिमाही कमर्शियल ई-निविदेमध्ये एकूण २६ आयटेम्सपैकी १० आयटेमसाठी , जुलै ते सप्टेंबर २०२१ करीता २७ आयटेम्सपैकी ११ आयटेमसाठी, ऑक्टोबर ते डिसेंबर-२०२१ करीता २८ आयटेम्सपैकी ९ आयटेमसाठी व जानेवारी ते मार्च-२०२२ करीता २८ आयटेम्सपैकी ७ आयटेमकरीता २ निविदाधारकांनी दर सादर केलेले आहेत.

३. एप्रिल ते जून -२०२१ या तिमाहीचे कमर्शियल ई-निविदेमध्ये २६ पैकी ४ आयटेमसाठी, जुलै ते सप्टेंबर २०२१ मध्ये २७ पैकी ४ आयटेमसाठी, ऑक्टोबर ते डिसेंबर-२०२१ साठी २८ पैकी ५ आयटेमसाठी व जानेवारी ते मार्च-२०२२ मध्ये २८ पैकी ७ आयटेमसाठी फक्त एकाच निविदाधारकाकडून दर प्राप्त झाले आहेत.

वरील अ.नं.१, २ व ३ बाबत नमूद केलेले प्राप्त दरांनुसार भाजीपाला खरेदीकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

(अ) वरील अ.नं.१ प्रमाणे ज्या आयटेमसाठी ३ निविदाधारक आहेत. अशा आयटेमच्या एप्रिल ते जून -२०२१ साठी १२ आयटेम्सकरीता, जुलै ते सप्टेंबर २०२१ साठी १२ आयटेंम्सकरीता, ऑक्टोबर ते डिसेंबर-२०२१ साठी १४ आयटेम्सकरीता व जानेवारी ते मार्च -२०२२ साठी १४ आयटेमकरीता न्युनतम आलेले न्युनतम दरधारकांना कोव्हीड-१९ चे धरतीवर चर्चा व वाटाघाटीसाठी लॉकडाऊनमुळे बोलविणे उचित नसल्यांमुळे ई-मेलव्दारे सदर आयटेमसाठी त्यांचे अंतिम दर घेऊन त्याप्रमाणे सदर आयटेमसाठी पुरवठा आदेश देता येतील.

यातील एप्रिल ते जून २०२१ या तिमाहीतील अ.नं.९ भोपळा पुरविणेसाठी मे.जय मल्हार ट्रेडींग कंपनी, राहाता व मे.किरण एंटरप्रायजेस, चाकण यांचे दर न्यूनतम व समान आहेत. तथापि त्यांचेकडून मेलद्वारे अंतिम दर आलेनंतर ज्या निविदाधारकाचे दर न्यूनतम असतील त्यांना पुरवठा आदेश देता येतील. यामध्ये दोन्हीही निविदाधारकांचे दर जर न्यूनतम व समान आले तर त्यांना विभागून पुरवठा आदेश देता येईल.

(ब) वरील अ.नं.२ मध्ये ज्या आयटेमसाठी दोन निविदाधारकांनी दर सादर केले आहेत. त्या आयटेमसाठी सुधारीत खरेदी नियमावलीतील ४.४.३.१ (ब) दोन निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व अगोदर ठरलेली अंदाजित किंमत यामध्ये (-)२० टक्के ते (+)१० टक्के तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहील. या किंमत श्रेणीमध्ये (Price Band) किंमती न आल्यास फेरनिविदा काढावी या तरतुदीप्रमाणे एप्रिल ते जून -२०२१ साठी ३ आयटेम्सकरीता, जुलै ते सप्टेंबर २०२१ साठी ४ आयटेम्सकरीता, ऑक्टोबर ते डिसेंबर-२०२१ साठी ४ आयटेम्सकरीता व जानेवारी ते मार्च -२०२२ साठी २ आयटेमकरीता न्युनतम आलेले व वरील फॉर्म्युल्यानुसार किंमत श्रेणीमध्ये पात्र ठरणा-या न्युनतम दरधारकांना कोव्हीड-१९ चे धरतीवर चर्चा व वाटाघाटीसाठी लॉकडाऊनमुळे बोलविणे उचित नसल्यामुळे ई-मेलव्दारे सदर आयटेमसाठी त्यांचे अंतिम दर घेऊन त्याप्रमाणे सदर आयटेमसाठी पुरवठा आदेश देता येतील.

तसेच सदर तरतुदीनुसार या किंमतश्रेणीमधील दरापेक्षाही एप्रिल ते जून -२०२१ साठी २ आयटेम्स, जुलै ते सप्टेंबर २०२१ साठी ३ आयटेम्स, ऑक्टोबर ते डिसेंबर-२०२१ साठी ३ आयटेम्स व जानेवारी ते मार्च-२०२२ साठी २ आयटेमचे दर कमी आहेत. भाजीपाल्याच्या किमती नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबुन असल्यामुळे उत्पादन जास्त झाल्यास किंमती कमी होतातव उत्पादन कमी झाल्यास किंमती वाढतात, त्यामुळे व सदर आयटेमची खरेदी किरकोळ स्वरुपाची असल्यामुळे सदर ४ ही क्वार्टरचे ९ आयटेमसाठी ई-मेलव्दारे अंतिम दर घेऊन पुरवठा आदेश दयावेत असे मत आहे. सदर आयटेमव्यतिरिक्त ४ ही क्वार्टरमधील वरील तरतुदीतील किंमतश्रेणीमध्ये न बसणारे उर्वरित १४ आयटेमचे वार्षिक खरेदीसाठी फेर ई-निविदा प्रक्रीया करावी लागेल. यामध्ये हिरवा वाटाणासाठी मा.तदर्थ समितीचे निर्णयानुसार प्रथमच दर मागविले असलेमुळे व त्याची एस्टिमेटेड कॉस्ट नसलेमुळे सदर एप्रिल ते जून २०२१ व जुलै ते सप्टेंबर २०२१ मधील हिरवा वाटाणा खरेदीसाठी फेर ई-निविदा मागविण्याचे प्रस्तावित केले आहे.

(क) एप्रिल ते जून -२०२१ या तिमाहीचे कमर्शियल ई-निविदेमध्ये २६ पैकी ४ आयटेमसाठी, जुलै ते सप्टेंबर २०२१ मध्ये २७ पैकी ४ आयटेमसाठी, ऑक्टोबर ते डिसेंबर-२०२१ साठी २८ पैकी ५ आयटेंमसाठी व जानेवारी ते मार्च-२०२२ मध्ये २८ पैकी ७ आयटेमसाठी फक्त एकच निविदाधारकाकडून दर प्राप्त झाले असल्यामुळे सदर आयटेम्स वार्षिक खरेदीसाठी फेर ई-निविदा प्रक्रीया करावी लागेल.

तरी नमूद वस्तुस्थिती विचारात घेता, सन २०२१-२२ वर्षाकरीता वार्षिक भाजीपाला खरेदीकामी वरील "अ" "ब" व "क" मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाही मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. तदर्थ समितीचे सभेत चक्रिय पध्दतीने निर्णयार्थ सादर..

12/5/2021

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

"अ ते क प्रस्ताव मंजूर."

13/5/2021

14/05/2021

(श्रीमती गीता प्रवीण बनकर)
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

12/5/2021

(भानुदास पालवे)
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

12/5/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

13/5

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- 9/984

580

विद्युतविभाग

दिनांक :- ०२-०२-२०२१

**विषय :- "श्री रामनवमी उत्सव-२०२१" मध्ये दि.२०-०४-२०२१ ते दि.२२-०४-२०२१ अखेर श्री साई मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई व देखावा उभारणी करणेस श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांना परवानगी देणेस तसेच विद्युत रोषणाई, देखावा उभारणी करणे व त्याअनुषंगाने कराव्या लागणा-या कामास व खर्चास चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत ....**

प्रस्तावना :- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

**(ख). रुढीनुसार व प्रथेनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे ;**

(ग). भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनसाठी व प्राथनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे;

**वरील अधिनियम २१ (१) (ख) व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.**

प्रस्ताव :- **श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेमार्फत सन १९७९ पासून श्री रामनवमी उत्सवात आजपावेतो गेली ४० वर्ष व श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवात सन १९९२ पासून आजपावेतो गेली २७ वर्षे अशा ह्या दोन्ही उत्सवात मंदिर व मंदिर परिसरात विना नफा या तत्त्वावर विद्युत रोषणाई व सोबत देखावा उभा केला जातो.**

श्री साईबाबा संस्थानमार्फत मागील तीन वर्षात साज-या करण्यात आलेल्या श्री रामनवमी उत्सवात करण्यात आलेल्या विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकामी व त्याअनुषंगाने इतर झालेल्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | श्री रामनवमी उत्सव-२०१७ मध्ये झालेला खर्च | श्री रामनवमी उत्सव-२०१८ मध्ये झालेला खर्च | श्री रामनवमी उत्सव-२०१९ मध्ये झालेला खर्च | श्री रामनवमी उत्सव-२०२० मध्ये झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|
| अ) | विद्युत रोषणाई व देखावा उभारणे. | रु. ५,८२,९२०/- | रु. ५,६३,७८०/- | रु. ५,६७,२००/- | - |
| ब) | भाडोत्री जनसेट खर्च + त्यासाठी इंधन खर्च | रु. १,९१,५६८/- | रु. १,०८,४४७/- | रु. ९५,३६०/- | - |
| क) | भाडोत्री ट्रक वाहतुक खर्च | रु. १,६८,०००/- | रु. २,६४,०००/- | रु. १,६८,०००/- | - |
| | एकुण :- | रु. ९,४२,४८८/- | रु. ९,३६,२२७/- | रु. ८,३०,५६०/- | - |

कोव्हिड-१९ मुळे श्री रामनवमी उत्सव२०२० साजरा करणेत आलेला नाही. त्यामुळे श्री रामनवमी उत्सव-२०२० मधील खर्च निरंक आहे.

२/-



GRP-78-2021

श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई चे अध्यक्ष श्री.रमेशभाई सेहेटा यांनी दि.२०-०१-२०२१ रोजीच्या पत्राने कळविले आहे की,

श्री रामनवमी उत्सव-२०१९ मध्ये विद्युत रोषणाई व सजावट करण्याच्या निमित्ताने श्री साईबाबांची सेवा करण्याची संधी आम्हाला दिली. याबद्दल श्री व्दारकामाई मंडळ आपले शतशः ऋणी आहे. प्रतिवर्षाप्रमाणे आम्ही, याहीवर्षी श्री रामनवमी उत्सव-२०२१ करीता श्री साई मंदिर व मंदिर परिसरामध्ये विद्युत रोषणाई करणे व देखावा उभारणेस येत आहोत.

तसेच श्री साईबाबांचे मंदीर आणि संस्थान परिसर इ.ठिकाणी विद्युत रोषणाई करणे व सजावट करण्याकरीता व साहित्याची ने-आण करण्याकरीता हूड असलेल्या भाडोत्री ०५ (पाच) ट्रक आणि श्री साईबाबा संस्थानचा मोठा ट्रक लागणार आहे. देखाव्याचे व विद्युत रोषणाईचे मटेरीअल मुंबईहून आणतेवेळी दोन टप्प्यात आणावे लागणार आहे. यासाठी पहिला टप्पा दि.०९-०४-२०२१ रोजी ०२ नग भाडोत्री ट्रक व संस्थानचा मोठा ट्रक व दुसरा टप्पा दि.१३-०४-२०२१ रोजी ०३ नग भाडोत्री ट्रक व संस्थानचा मोठा ट्रक मुंबई येथे पाठविण्याचे करावे. तसेच उत्सव काळात ०३ नग भाडोत्री जनसेट (१२५ केव्हीएचे)-०३ दिवसाकरीता संस्थानमार्फत व्यवस्था करण्याची आम्ही आपणास विनंती करीत आहोत. व लागणा-या खर्चाचा तपशिल देत आहोत.

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | २३० कलाकारांचे जाणे येणे सह एस.टी.प्रवास भाडे (येणे व जाणेसह) रु. ४३० x २३० x २ | १,९७,८००/- |
| २ | उत्सवाचे शेवटचे दिवसापर्यंत भाडोत्री लाकडी फळयांचे भाडे, फ्रेम कपडा, फायबर मटेरीअल, प्लॅस्टर ऑफ पॅरीस, लाकडी फ्रेम, सेरीज लाईट, वायर, स्पॉटलाईट, हॅलोजन, मेटल हॅलाईड वगैरे फळया, पीओपी, मोल्डींग्ज व इतर साहित्य हमाली, उतराई, भराई, चढाई मुंबई व शिर्डी (येतेवेळेस सामान मुंबई येथून भरणे, शिरडीला खाली करणे, उत्सव संपल्यावर सामान शिरडी येथून भरणे, मुंबईला खाली करणे.) | ३,००,०००/- |
| ३ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो, त्यानंतर देखावा काढणेसाठी आणाव्या लागणा-या कलाकारांचे गाडी भाडे परतीसह ( रु. ४३० x रु. ४० x २ ) | ०,३४,४००/- |
| ४ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो, त्याकाळातील फळयांचे, लॉगचे व इतर फोकस लाईटचे एकुण भाडे रु. ७०,०००/- होते. त्यापैकी निम्मी ५० टक्के रक्कम. | ०,३५,०००/- |
| | एकुण रक्कम रु. :- | ५,६७,२००/- |

(०१). गोल्टे-१४ फूटी ३० नग, १६ फूटी ४० नग, १८ फूटी ३० नग, बांबु १५ ते १६ फुटाचे १०० नग.

(०२). कलाकारांना राहण्यासाठी उत्सव चालू होण्यापुर्वी (काम चालू असताना) देखावा उभे करणारे कलाकार तसेच विद्युत रोषणाई करणारे यांच्यासाठी २० खोल्या व उत्सव कालावधीत २० ऐवजी १५ खोल्या विनामुल्य मिळाव्यात.

(०३). रोषणाईचे साहित्य ठेवण्यासाठी अंदाजे ४० फूट x २० फूटाचा एक हॉल मंदीराचे परीसरात विनामुल्य मिळावा.

(०४). प्रतीवर्षाप्रमाणे सर्व कलाकारांना तीन वेळचा चहा, सकाळचा नाष्टा, व दोन वेळचे जेवण याची विनामुल्य सोय व्हावी. (पहिल्या टप्प्यात दि.१०-०४-२०२१ रोजी १२५ कलाकार देखावा उभारणीकामी व दुस-या टप्प्यात दि.१४-०४-२०२१ रोजी १०५ कलाकार विद्युत रोषणाई कामी शिर्डी येथे येणार आहेत.)

तसेच वरील खर्चाची रक्कम ही श्री व्दारकामाई मंडळाचे संचालक, श्री.सतिष राव यांचे बँक खातेवर मिळणेस विनंती.

श्री साईबाबा संस्थानचे मा.तदर्थ कमिटीचे सर्व सदस्य, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय, मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांचे गेल्या अनेक वर्षापासून श्री व्दारकामाई मंडळाला उत्तम प्रकारे मार्गदर्शन व सहकार्य मिळत आहे आणि श्री साईच्छेनुसार यापुढेही मिळत राहो, ही श्रींचे चरणी प्रार्थना.

श्री रामनवमी उत्सव-२०२१ मध्ये करावयाच्या विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकामी येणा-या अंदाजित खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ). **श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी श्री रामनवमी उत्सव-२०२१ करीता विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकामी कळविलेला खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | २३० कलाकारांचे जाणे येणे सह एस.टी.प्रवास भाडे (येणे व जाणेसह) रु. ४३० x २३० x २ | १,९७,८००/- |
| २ | उत्सवाचे शेवटचे दिवसापर्यंत भाडोत्री लाकडी फळयांचे भाडे, फ्रेम कपडा, फायबर मटेरीअल, प्लॅस्टर ऑफ पॅरीस, लाकडी फ्रेम, सेरीज लाईट, वायर, स्पॉटलाईट, हॅलोजन, मेटल हॅलाईड वगैरे फळया, पीओपी, मोल्डींग्ज व इतर साहित्य हमाली, उतराई, भराई, चढाई मुंबई व शिर्डी (येतेवेळेस सामान मुंबई येथून भरणे, शिरडीला खाली करणे, उत्सव संपल्यावर सामान शिरडी येथून भरणे, मुंबईला खाली करणे.) | ३,००,०००/- |
| ३ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो, त्यानंतर देखावा काढणेसाठी आणाव्या लागणा-या कलाकारांचे गाडी भाडे परतीसह (रु. ४३० x रु. ४० x २ ) | ०,३४,४००/- |
| ४ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो, त्याकाळातील फळयांचे, लॉगचे व इतर फोकस लाईटचे एकुण भाडे रु. ७०,०००/- होते. त्यापैकी निम्मी ५० टक्के रक्कम. | ०,३५,०००/- |
| | एकुण रक्कम रु. :- | ५,६७,२००/- |

ब). **याव्यतिरिक्त श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी विद्युत रोषणाईचे साहित्य मुंबई येथून आणणे व परत पोहोच करणेकामी मागणी केल्याप्रमाणे ०५ नग भाडोत्री ट्रकसाठी येणा-या अंदाजित खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | तपशील | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १ | ५ नग भाडोत्री ट्रकसाठी अपेक्षित खर्च (रु. ३३,०००/- x ५ भाडोत्री ट्रक) | रु. १,६५,०००/- |
| | एकुण अपेक्षित खर्च रक्कम :- | रु. १,६५,०००/- |

क). **१२५ केव्हीए क्षमतेचे ०३ नग भाडोत्री जनसेट तसेच जनरेटरसाठी लागणारे इंधनसाठी येणा-या अंदाजित खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | तपशील | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १ | ०३ नग भाडोत्री जनरेटरसाठी अपेक्षित खर्च ३ दिवस (रु. ९,५००/- x ३ दिवस x ३ जनसेट = रु. ८५,५००/-) | रु. १८३,९००/- |
| | भाडोत्री जनरेटरसेट करीता अपेक्षित इंधन खर्च (३ दिवसाकरीता) (डिझेल अंदाजे प्रति जनसेट ४०० लि. x ३ जनसेट x दर प्रति लि.रु. ८२/- = रु. ९८,४००/-) | |
| | एकुण अपेक्षित खर्च रक्कम :- | रु. १,८३,९००/- |

उपरोक्तप्रमाणे श्री रामनवमी उत्सव-२०२१ मध्ये ३ दिवसांकरीता श्री साई मंदिर, मंदिर परिसर, व्दारकामाई, गुरुस्थान, लेंडीबाग, चावडी तसेच मंदिर परिसरातील बाहेरील बाजूस विद्युत रोषणाई करणे व नगर महाव्दार (०४ नंबर गेटचे आतील बाजूस) येथे देखावा उभारणी करणेकामी उपरोक्तप्रमाणे (अ) श्री व्दारकामाई मंडळाने कळविलेली रक्कम रुपये ५,६७,२००/- + (ब) ०५ नग भाडोत्री ट्रकासाठी येणारा खर्च रक्कम रुपये १,६५,०००/- (क) १२५ केव्हीए क्षमतेचे ०३ नग भाडोत्री जनसेट तसेच जनरेटरसाठी लागणारे इंधनासाठी येणा-या अंदाजित रक्कम रु.१,८३,९००/- अशी एकुण रक्कम रु. ९,१६,१००/- इतका अंदाजे खर्च येणे अपेक्षित आहे.

याव्यतिरिक्त संस्थानचा ०१ मोठा ट्रक ०४ वेळेस मुंबई येथे वेगवेगळया दिवशी विद्युत रोषणाईचे साहित्य आणणे व पोहोच करणेकामी पाठवावा लागणार आहे. तसेच संस्थानमार्फत देखावा उभारणीकामी गोल्टे-१४ फूटी ३० नग, १६ फूटी ४० नग, १८ फूटी ३० नग असे एकुण १०० नग गोल्टे पुरवावे लागणार आहे. तसेच कलाकारांना राहण्यासाठी उत्सव चालू होण्यापुर्वी (काम चालू असताना) देखावा उभे करणारे कलाकार तसेच विद्युत रोषणाई करणारे यांच्यासाठी ५०० रुम येथे २० खोल्या व उत्सव कालावधीत २० ऐवजी फक्त १५ खोल्या तसेच रोषणाईचे साहित्य ठेवण्यासाठी अंदाजे ४० फूट x २० फूटाचा एक हॉल मंदीराचे परीसरामध्ये विनामुल्य मिळावा अशी श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी मागणी केलेली आहे. तसेच प्रतीवर्षाप्रमाणे २३० कलाकारांना तीन वेळचा चहा, सकाळचा नाष्टा, व दोन वेळचे जेवण याची सोय संस्थानमार्फत विनामुल्य करावी लागणार आहे.

४/-

मागणी :- (०१). श्री रामनवमी उत्सव-२०२१ मध्ये दि. २०-०४-२०२१ ते दि.२२-०४-२०२१ अखेर ०३ दिवसाकरीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून विद्युत रोषणाई व देखावा उभारणीचे काम करुन घेणेसाठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे (अ) श्री व्दारकामाई मंडळाने कळविलेली रक्कम रुपये ५,६७,२००/- + (ब) ०५ नग भाडोत्री ट्रकासाठी येणारा खर्च रक्कम रुपये १,६५,०००/- (क) १२५ केव्हीए क्षमतेचे ०३ नग भाडोत्री जनसेट तसेच जनरेटरसाठी लागणारे इंधनसाठी येणा-या अंदाजित रक्कम रु.१,८३,९००/- अशी एकुण रक्कम रु. ९,१६,१००/- इतक्या येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

(०२). श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून श्री रामनवमी उत्सव-२०२१ साठी विद्युत रोषणाई व देखावा उभारणीचे काम करुन घेणेसाठी त्यांनी त्यांचे पत्रात मागणी केलेप्रमाणे ०३ दिवसाकरीता ०३ नग भाडोत्री जनसेटकरीता व ०५ नग भाडोत्री ट्रक्स करीता विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

(०३). याव्यतिरिक्त संस्थानचा ०१ मोठा ट्रक ०४ वेळेस मुंबई येथे वेगवेगळया दिवशी विद्युत रोषणाईचे साहित्य आणणे व पोहोच करणेकामी पाठविणे. तसेच संस्थानमार्फत देखावा उभारणीकामी गोल्टे-१४ फूटी ३० नग, १६ फूटी ४० नग, १८ फूटी ३० नग असे एकुण १०० नग गोल्टे पुरविणेस. तसेच कलाकारांना राहण्यासाठी उत्सव चालू होण्यापुर्वी (काम चालू असताना) देखावा उभे करणारे कलाकार तसेच विद्युत रोषणाई करणारे यांच्यासाठी ५०० रुम येथे २० खोल्या व उत्सव कालावधीत २० ऐवजी फक्त १५ खोल्या विनामुल्य देणेस तसेच रोषणाईचे साहित्य ठेवण्यासाठी अंदाजे ४० फूट x २० फूटाचा एक हॉल मंदीराचे परीसरामध्ये विनामुल्य देणेस, तसेच श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी मागणी केल्याप्रमाणे प्रतीवर्षाप्रमाणे २३० कलाकारांना तीन वेळचा चहा, सकाळचा नाष्टा, व दोन वेळचे जेवण याची सोय संस्थानमार्फत विनामुल्य करणेस मान्यता मिळणेस विनंती.

श्री रामनवमी उत्सव-२०२१ साठी विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकामी उपरोक्त अ.क्र.०१ ते ०३ वर चर्चा होऊन मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेस विनंती.

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

उपरोक्त प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे अ.क्र.०१ ते ०३ वर चर्चा होऊन "श्री रामनवमी उत्सव-२०२१" मध्ये दि.२०-०४-२०२१ ते दि.२२-०४-२०२१ अखेर श्री साई मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई व देखावा उभारणीचे काम श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून करुन घेणेस व त्याअनुषंगाने कराव्या लागणा-या कामास व खर्चास चक्रीय पध्दतीने मान्यता देण्यात आली.

मा.श्रीमती गीता प्रवीण बनकर
सहाय्यक धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्या

मा.श्री.भानुदास ह.पालवे
अप्पर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक
सदस्य

मा.श्री.रविंद्र ठाकरे
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
सदस्य

मा.श्री.श्रीकांत ल.आणेकर
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
अध्यक्ष

584

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि. 08/02/2021

विषय – **'श्री रामनवमी उत्सव-2021' मध्ये दि. 20.04.2021 ते दि. 22.04.2021 अखेर श्री साई मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई व देखावा उभारणी करणेस श्री. द्वारकामाई मंडळ, मुंबई यांना परवानगी देणेस तसेच विद्युत रोषणाई व देखावा उभारणी करणे व त्या अनुषंगाने कराव्या लागणा-या कामास व खर्चास चक्रीय पदध्तीने मान्यता मिळणेबाबत...**

टिपणीचे वाचन केले. संबंधित विभागाचे विद्युत पर्यवेक्षक श्री. बाबुराव खाडगीर यांच्याकडून संपूर्ण विषय समजावून घेतला. त्यावरुन असे दिसून येते की, श्री. द्वारकामाई मडळ, मंबई हे श्री. रामनवमी उत्सवात विद्युत रोषणाई व देखावा उभारणी करतात. श्री. द्वारकामाई मंडळ, मुंबई हे न्यास आहे, प्रोप्रायटरी फर्म आहे किंवा विद्युत रोषणाई करणारे डेकोरेटर्स आहेत याचा मात्र टिपणीत उल्लेख नाही. तसेच श्री.खाडगीर यांनाही त्याची कल्पना नाही.

टिपणीवरुन हे स्पष्ट होते की, श्री. द्वारकामाई मंडळ, मुंबई हे कुठलेही शुल्क न आकारता रोषणाई तसेच देखावा तयार करणार आहेत. मात्र त्यासंबंधीत अनुषंगिक बाबींचा विचार करता, तो सर्व खर्च सन 2019 मध्ये आठ लाख रुपयांचे वर झालेला आहे. अशा परिस्थितीत असे डेकोरेटर्स साईभक्त किंवा इतर व्यक्ति, संस्था यापेक्षा कमी दरात विद्युत रोषणाई व देखावा उभारत असल्यास, तसा विचार करणे श्री साईबाबा संस्थानच्या आर्थिक हिताचे आहे व तो भाग न अभ्यासता फक्त श्री. द्वारकामाई मंडळ, मुंबई हे कुठलेही शुल्क घेत नाहीत, फक्त या कारणासाठी मंजूर करणे अयोग्य वाटते. करिता योग्य अभ्यास करुन व तसा तपशील इतरांकडून बोलावून सविस्तर वस्तुस्थितीदर्शक तथ्य तदर्थ समिती समक्ष ठेवावे, जेणेकरुन यावर निर्णय घेता येईल.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 08/02/2021

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि. ०८/०२/२०२१



विषय : श्री रामनवमी उत्सव-२०२१ मध्ये दि. २०.०४.२०२१ ते दि. २२.०४.२०२१ अखेर श्री साई मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई व देखावा उभारणी करणेस श्री. द्वारकामाई मंडळ, मुंबई यांना परवानगी देणेस तसेच विद्युत रोषणाई व देखावा उभारणी करणे व त्या अनुषंगाने कराव्या लागणाऱ्या कामास व खर्चास चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत...

सदरचा प्रस्ताव संबंधित विभागाचे विद्युत पर्यवेक्षक श्री. बाबुराव खाडगीर यांच्याकडून सादर करण्यात आला. प्रस्ताव वाचला. त्यावरील टिपणीचे वाचन केले. प्रस्तावावरुन असे दिसून येते की, श्री. द्वारकामाई मंडळ, मुंबई हे न्यास गेले २७ वर्षे श्रीराम नवमी उत्सवानिमित्त श्री साई मंदीर व मंदीर परिसरात विद्युत रोषणाई व देखावा उभारतात. संबंधित श्री द्वारकामाई मंडळ, मुंबई हे न्यास आहे किंवा फर्म आहे किंवा विद्युत रोषणाई करणारे डेकारेटर आहेत याबाबत टिपणीवरुन तसेच संबंधित मंडळाच्या पत्रावरुन अवगत होत नाही.

या टिपणीवरुन केवळ सदरचे मंडळ हे काहीही शुल्क न आकारता रोषणाई तसेच देखावा तयार करणारे आहेत इतकेच स्पष्ट होते. मात्र अनुषंगीक बाबींचा उहापोह करावयाचा झाल्यास सन २०१९ मध्ये सदरचा खर्च ८ लाखांच्या वरती झालेला आहे. त्यामुळे असे डेकोरेटर साईभक्त किंवा इतर व्यक्ति, संस्था यापेक्षा कमी दरात विद्युत रोषणाई व देखावा उभारत असल्यास तसा विचार करणे श्री साईबाबा संस्थानचे आर्थीक हिताचे आहे. केवळ श्री द्वारकामाई मंडळ, मुंबई हे कुठलेही शुल्क घेत नाही या कारणास्तव सदरचा प्रस्ताव मान्य करणे अयोग्य वाटते. त्या करिता अनुषंगीक बाबींचा अभ्यास करुन व नमुद केल्याप्रमाणे इतरांकडून सविस्तर वस्तुस्थिती प्रमाणे मांडणीकरुन सदरचा प्रस्ताव संबंधित समिती समक्ष ठेवल्यास त्यावर निर्णय घेणे उचित होईल.

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ समिती,
साईबाबा संस्थान शिर्डी.

विषय क्र.- ३/१४७

विद्युतविभाग
दिनांक :- ०५-०२-२०२१

**विषय :- जनरेटरसेट करीता १२ व्होल्ट बॅट-या खरेदी करणेकरीता येणा-या खर्चास तसेच ई-निविदा मागविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देणेस व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात नोटीस प्रसारीत करणेबाबत चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत ....**

**प्रस्तावना :-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-
( क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

शासन निर्णय परिच्छेद क्र.४.१ खरेदी किंमत रु. ३ लाखापेक्षा अधिक असेल तेव्हा ई-निविदा प्रणालीचा वापर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव** :- श्री साईबाबा संस्थानने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून उच्च दाबाची वीज घेऊन तिचे कमी दाबात रुपांतर करण्यासाठी प्रत्येक झोनमध्ये सबस्टेशनची उभारणी केलेली आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा सप्लाय खंडीत झाल्यानंतर पर्यायी वीजपुरवठयासाठी सबस्टेशनमध्ये जनरेटरसेट बसविलेले आहे. यामध्ये मंदिर परीसर, साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), श्री साईबाबा हॉस्पीटल + साईनगर, श्री साईनाथ रुग्णालय + व्दारावती, श्री साई प्रसादालय, साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा, पाणीपुरवठा साठवण तलाव, बस स्टॅण्ड, शांतीनिकेतन, फायर ॲण्ड सेफ्टी विभाग तसेच रथ पालखी लाईट व्यवस्थेकरीता १५ केव्हीए पासून १०१० केव्हीए क्षमतेचे असे एकुण २३ जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहे. सदरील जनरेटरसेट हे स्वयंचलीत असल्यामुळे जनरेटर चालू करणेसाठी बॅट-या वापरण्यात आल्या आहे. तसेच प्रत्येक जनरेटरच्या क्षमतेप्रमाणे म्हणजेच ६२.५ केव्हीए क्षमतेपर्यंतच्या जनरेटरला एक बॅटरी, ६२.५ क्षमतेपेक्षा जास्त क्षमतेच्या जनरेटरला दोन बॅट-या व १०१० केव्हीए क्षमतेच्या जनरेटरला चार बॅटरी लागतात. बॅटरीचे सरासरी क्षमता दोन वर्ष इतकी असते. सध्या असलेल्या सर्व ठिकाणच्या बॅट-यांचा कालावधी दोन वर्षापेक्षा जास्त झालेला आहे. यापुर्वी सन-२०१८ मध्ये बॅट-या खरेदी करण्यात आल्या होत्या. खरेदी करुन बसविण्यात आलेल्या बॅट-यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जनसेट ठिकाण | जनसेट क्षमता | बॅट-या बसविल्याची तारीख | बॅटरी कंपनी व क्षमता | बॅट-या संख्या नग |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री साई मंदिर परीसर | ५०० केव्हीए | २१-०६-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | २ |
| | | ५०० केव्हीए | २१-०६-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | २ |
| २ | साईबाबा भक्तनिवासस्थान(५०० रुम) | ५०० केव्हीए | १५-०१-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | २ |
| | | १०० केव्हीए | २१-०६-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | २ |
| ३ | श्री साईबाबा हॉस्पीटल | १०१० केव्हीए | १५-०१-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | ४ |
| | | ५०० केव्हीए | २१-०६-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | २ |
| ४ | धर्मशाळा | २५० केव्हीए | २१-०६-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | २ |
| | | २५० केव्हीए | २१-०६-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | २ |
| ५ | श्री साई प्रसादालय | ५०० केव्हीए | १५-०१-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | २ |
| | | २५० केव्हीए | १५-०१-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | २ |
| ६ | साईआश्रम भक्तनिवास | ५०० केव्हीए | २१-०६-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | २ |
| | | ५०० केव्हीए | २१-०६-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | २ |
| ७ | साई धर्मशाळा | ५०० केव्हीए | १५-०१-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | २ |
| | | ५०० केव्हीए | १५-०१-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | २ |
| ८ | साईआश्रम भक्तनिवास ए.सी. | ३२० केव्हीए | २१-०६-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | २ |
| | | ३२० केव्हीए | २१-०६-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | २ |
| ९ | पाणीपुरवठा साठवण तलाव | २५० केव्हीए | १५-०१-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | २ |
| | | १०० केव्हीए | १५-०१-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | २ |
| १० | कनिष्ठ महाविद्यालय | १५ केव्हीए | ०१-०७-२०१८ | SF Sonic 12 V, 80Ah | १ |
| ११ | रथपालखी (सिंगल फेज) | १५ केव्हीए | ०१-०७-२०१८ | SF Sonic 12 V, 80Ah | १ |
| १२ | शांतिनिकेतन (थ्री फेज) | १५ केव्हीए | २१-१२-२०१८ | SF Sonic 12 V, 180Ah | १ |
| १३ | फायर ॲण्ड सेफ्टी विभाग | ५० केव्हीए | ०५-०१-२०१८ | Cummins 12 V, 150Ah | १ |
| | | | | एकुण बॅट-यांची संख्या - | ४२ |

२/-



EPP 79 - 2021

विद्युत विभागाचे सबस्टोअरला तसेच संस्थानचे भांडार विभागाकडे बॅट-या शिल्लक नसल्याने सदरच्या बॅट-या खरेदी कराव्या लागणार आहे. खरेदी कराव्या लागणा-या बॅट-यांचे दराकरीता स्थानिक दुकानदारांकडून कोटेशन घेण्यात येऊन त्यांनी दिलेल्या दरांची सरासरीचे प्रमाणे दर १२ व्होल्ट १८० Amp. बॅटरीकरीता रु. १७,४५७/- इतकाचा येत आहे. त्यामुळे त्यांचा दर रु. १७,५००/- इतका घेण्यात आलेला आहे. तसेच १२ व्होल्ट १०० Amp. बॅटरीचा सरासरी दर रु. ५,५३३/-इतका येत आहे त्याचा दर रु. ५,५००/- इतका घेण्यात आलेला आहे. खरेदी कराव्या लागणा-या बॅट-यांच्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | बॅटरी मेक | मागणी | प्रती नग अंदाजे किंमत (जी.एस.टी.सह) | एकुण अंदाजे किंमत (जी.एस.टी.सह) |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | जनरेटरकरीता बॅटरी, १२व्होल्ट,डि.सी.१८०Amp. Power box PBX-1800 | S.F. Sonic / Exide / Tata | ४० नग | रु. १७,५००/- | रु. ७,००,०००/- |
| ०२) | जनरेटरकरीता डी.सी. बॅटरी, १२व्होल्ट,डि.सी.100Amp. | S.F. Sonic / Exide / Tata | ०२ नग | रु. ५,५००/- | रु. ११,०००/- |
| | | | | एकुण रक्कम :- | रु. ७,११,०००/- |

मागणी :- उपरोक्तप्रमाणे जनरेटरसेट करीता १२ व्होल्ट बॅट-या खरेदी करणेकरीता स्थानिक दुकानदारांकडून कोटेशन आणून सदर बॅट-यांची किंमत गृहीत धरण्यात आलेली असून बॅट-या खरेदी करणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ७,११,०००/- इतका खर्चास तसेच बॅट-या खेदी करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेस विनंती.

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे जनरेटरसेट करीता १२ व्होल्ट बॅट-या खरेदी करणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ७,११,०००/- ( रु.सात लाख अकरा हजार मात्र) इतक्या खर्चास व याकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस चक्रीय पध्दतीने मान्यता देण्यात आली.

मा.श्रीमती गीता प्रवीण बनकर
सहाय्यक धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्या

मा.श्री.भानुदास ह.पालवे
अप्पर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक
सदस्य

मा.श्री.रविंद्र ठाकरे
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
सदस्य

मा.न्या.श्री.श्रीकांत ल.आणेकर
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
अध्यक्ष

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय
दि. 08/02/2021

**विषय – जनरेटर सेट करिता 12 व्होल्ट बॅट-या खरेदी करणेकरिता येणा-या खर्चास तसेच ई-निविदा मागविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देणेस व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात नोटीस प्रसारीत करणेबाबत चक्रीय पदध्तीने मान्यता घेणेबाबत...**

विषयाचे वाचन केले. संबंधित विभागाचे विद्युत पर्यवेक्षक श्री. बाबुराव खाडगीर यांच्याकडून संपूर्ण विषय समजावून घेतला. ज्या कारणासाठी संपूर्ण बॅट-या बदलण्याचा प्रस्ताव आहे ते एकूणच अतिशय आश्चर्यकारक आहे. संबंधीत बॅटरी कंपनीने बॅटरीचे आयुष्याबाबत विशिष्ट गॅरंटी दिली असल्या कारणाने व ती गॅरंटी संपुष्टात आली असल्या कारणाने सरसकट सर्व बॅट-या बदलणे हे संस्थानचे आर्थिक हिताचे नाही.

ज्या कारणासाठी बॅट-या बदलायच्या आहेत ते कारणच मुळात कारण नाही. कारण संस्थान **standby** (अतिरिक्त) बॅट-या ठेवू शकते व एखादी बॅटरी खराब झाल्यास **standby** (अतिरिक्त) बॅटरी वापरुन सदर जनित्र सुरु ठेवू शकते व अशी खराब झालेली बॅटरी **buyback** (परत खरेदी) करुन बदलता येवू शकते. केवळ गॅरंटी कालावधी संपला म्हणून सरसकट सर्व बॅट-या बदलणे हे अनाकलनीय आहे, करिता माझेतर्फे हा प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 08/02/2021

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय
दि. ०८.०२.२०२१



विषय : जनरेटर सेट करिता १२ व्होल्ट बॅट-या खरेदी करणेकरता येणाऱ्या खर्चास तसेच ई-निविदा मागविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देणेस व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात नोटीस प्रसारीत करणेबाबत चक्रीय पध्दतीने मान्यता घेणेबाबत ...

सदरच्या प्रस्तावाचे अवलोकन केले. अवलोकनार्थ सादर केलेल्या प्रस्तावातून असे दिसून येते की सदरचा प्रस्ताव हा संपूर्ण बॅटरी बदलण्याबाबतचा आहे. ज्या कंपनीकडून अस्तित्वात असणा-या बॅट-या खेरदी केल्या होत्या त्या कंपनीने बॅटरीचे कालमर्यादेबाबत विशिष्ट हमी दिली होती. ती हमी संपुष्टात आल्या कारणाने सर्वच बॅट-या बदलविणे हे संस्थानचे आर्थीक हिताचे वाटत नाही. ज्या कारणासाठी बॅट-या बदलविण्याचे नमुद केले आहे ते योग्य वाटत नाही. संस्थानच्या कामकाजाचा विचार करता व त्या कामाचा व्यापकपणा पाहिले असता संस्थानकडून जरुरत वाटल्यास अवलंब करण्यासाठी अतिरिक्त बाट-या ठेवू शकले असते व ती बॅटरी खराब झाल्यास अतिरिक्त बॅटरीचा वापर करुन जनित्र चालवू शकते. तसेच खराब झालेली बॅटरी परत खरेदी करुन बदलता येवू शकते. केवळ हमी कालावधी संपला म्हणून संपूर्ण बॅट-या बदलवून टाकणे ही गोष्ट अयोग्य आहे. करिता माझेतर्फे हा प्रस्ताव अमान्य करण्यात येतो.

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ समिती,
साईबाबा संस्थान शिर्डी.

590

विषय क्र.- ९/१९८

विद्युतविभाग

दिनांक :- ०३-०२-२०२१

**विषय :- विद्युत विभागाकरीता दैनंदिन इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स कामाकरीता लागणारे इलेक्ट्रीकल मटेरीयल खरेदी करणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत....**

**प्रस्तावना :-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनांसाठी करण्यात येईल:-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

शासन निर्णय परिच्छेद क्र.४.१ खरेदी किंमत रु. ३ लाखापेक्षा अधिक असेल तेव्हा ई-निविदा प्रणालीचा वापर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव :-** विद्युत विभागामार्फत खालील ठिकाणचे इमारती व परीसरातील इलेक्ट्रिकल मेंटेनन्सची कामे केली जातात.

| अ.क्र. | परीसराचे नांव | इमारतींचा तपशील |
|---|---|---|
| ०१) | मंदिर परीसर | ०१).समाधी मंदिर, ०२). शनी मंदिर ,०३).गणपती मंदिर, ०४).महादेव मंदिर, ०५). गुरुस्थान, ०६). चावडी, ०७). व्दारकामाई, ०८).दिक्षित वाडा, ०९). सभामंडप, १०). म्युझियम हॉल, ११). शांतिनिवास इमारतीमधील सर्व ऑफिसेस, १२). भक्तनिवास इमारतीमधील सर्व ऑफिसेस, १३). शांतीनिवास इमारतीमधील दर्शनलाईन हॉल, १४). भक्तनिवास इमारतीमधील दर्शनलाईन हॉल, १५). पिंपळवाडी रोडवरील दर्शन लाईन शेड, १६). साईनाथ छाया इमारत, १७). सेवाधाम इमारत, १८). साईनिवास अतिथीगृह १९). मुख्य भांडार, २०). साईउद्यान इमारत, २१). मंगल कार्यालय इमारत, २२). शांतिनिकेतन इमारत, २३).साई कॉम्प्लेक्समधील मिटींग हॉल, २४). साई कॉम्प्लेक्समधील ०४ काऊंटर, २५). मंदिर परीसरातील दोन्ही डोनेशन काऊंटर, २६). सत्यनारायण पुजेचा हॉल, २७). हनुमान मंदिर, २८). खुले नाटयगृह, २९).गुरुस्थान समोरील ध्यान मंदिर (सध्या सी.सी.टि.व्ही.करीता वापर), ३०). १६ गुंठे परीसर, ३१). लेंडीबाग धबधबा, ३२).जनरेटर रुम, ३३). सरंजाम बाग, ३४). सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०२) | साईनगर परीसर | ०१). श्री साईबाबा हॉस्पीटल, ०२).साईध्यान नं.०१, ०३). साईध्यान नं.०२, ०४).साईनगर, ०५).समर्पण, ०६). साईस्मरण नं.०१, ०७). साईस्मरण नं.०२, ०८). साईस्मरण नं.०३, ०९).साईचिंतन नं.०१, १०).साईचिंतन नं.०२, ११). साईचिंतन नं.०३, १२).साईचिंतन नं.०४, १३). मुख्य भांडार गोडाऊन व परिसर, १४). व्यायाम शाळा, १५). आर.एम.ओ.इमारत, १६). मेडीकल स्टोअर, १७). ब्लड बँक, १८). जनरेटर रुम, १९).एस.टी.पार्कींग,२०) सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट व २१).शिर्डी बसस्थानक भक्तनिवास |
| ०३) | धर्मशाळा परीसर | ०१).व्दारावती भक्तनिवास, ०२). श्री साईनाथ हॉस्पीटल,०३).कॅन्टीन, ०४).केसपेपर कार्यालय, ०५). जनरेटर रुम, ०६).बगीचा, ०७).लॉण्ड्री, ०८). सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०४) | साईआश्रम भक्तनिवास परीसर | ०१).ए ब्लॉक, ०२).बी ब्लॉक,०३).सी ब्लॉक, ०४).डी ब्लॉक, ०५).ई ब्लॉक,०६). एफ ब्लॉक,०७).जी ब्लॉक, ०८).एच ब्लॉक,०९).आय ब्लॉक, १०).जे ब्लॉक, ११).के ब्लॉक,१२).एल ब्लॉक,१३).आर ब्लॉक, १४).ॲम्पिथिएटर, १५).जनरेटर रुम, १६).एच.टी.पी.प्लॅण्ट, १७).सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०५) | साई धर्मशाळा परीसर | ०१).ए ब्लॉक, ०२).बी ब्लॉक ,०३).सी ब्लॉक, ०४).डी ब्लॉक, ०५). ई ब्लॉक, ०६).एफ ब्लॉक, ०७).आर ब्लॉक, ०८).जनरेटर रुम, ०९).एच.टी.पी.प्लॅण्ट, १०).सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०६) | ५०० रुम परीसर | ०१).इमारतीमधील सर्व खोल्या , ०२). कॅन्टीन,०३).बगीचा, ०४).सर्व गाळे, ०५). सर्व हॉल, ०६). मा.मुख्य कार्यकारी अधिकारी निवासस्थान, ०७). साई सहवास नं.०१, ०८).साई सहवास नं.०२, ०९).साईसहवास नं.०३, १०). साईसहवास नं.०४, ११). वाहन विभाग, १२). जनरेटर रुम, १३). वर्कशॉप , १४). पंपरुम, १५). लॉण्ड्री, १६). गुलाब गार्डन, १७). कन्या शाळा, १८). इंग्लीश मेडियम स्कुल, १९).आय.टी.आय., २०). सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०७) | श्री साई प्रसादालय परीसर | ०१).कार्यालय,०२).जनरल हॉल,०३).बुफेहॉल, ०४).व्ही.आय.पी.हॉल, ०५).व्ही.व्ही. आय.पी.हॉल, ०६).मेन किचन, ०७).चपाती किचन, ०८).स्टोअर, ०९).आय.टी.विभाग, १०).गॅस प्लँट एरिया, ११).मेकॅनिकल विभाग, १२).लाडू विभाग, १३).जनरेटर रुम, १४).पंपरुम, १५).सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |



EPP 76-0001

| | | |
|---|---|---|
| ०८) | नवीन सेवाधाम परीसर | ०१).ए ब्लॉक, ०२). बी ब्लॉक,०३). सी ब्लॉक, ०४).डी ब्लॉक, ०५).ई ब्लॉक, ०६).एफ ब्लॉक, ०७).जी ब्लॉक, ०८).एच ब्लॉक, ०९). सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०९) | कनकुरी साठवण तलाव परीसर | ०१).सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट, ०२). जनरेटर रुम,०३). पंपरुम, ०४).वर्कशॉप, ०५).स्टोअर रुम |
| १०) | पालखी थांबे | ०१).पांगरी पालखी थांबा, ०२). सिन्नर पालखी थांबा,०३). पांढुर्ली पालखी थांबा, ०४).येसगांव पालखी थांबा |
| ११) | हेलीपॅड | हेलीपॅडवरील विश्रांतीगृह, नगर-मनमाड रोड ते हेलीपॅड स्ट्रीट लाईट |
| १२) | निमगांव | साई पालखी निवारा इमारत |

वरील ठिकाणचे इमारती व परिसरातील इलेक्ट्रिक मेन्टेनन्सची कामे विद्युत विभागामार्फत केली जातात. तसेच विविध विभागांच्या मागणीप्रमाणे किरकोळ स्वरुपातील वायरींगची कामे तातडीने पुर्ण करुन दयावी लागतात. काही वेळेस काही ठिकाणी नविन केबल टाकून नविन मेनस्वीचेस बसवून सप्लाय चालू करुन दयावा लागतो.

तसेच श्री रामनवमी उत्सव, श्री गुरुपौर्णिमा उत्सव, श्री पुण्यतिथी उत्सव, नाताळ तसेच नववर्षारंभा करीता ठिकाठिकाणी उभारण्यात येणा-या मंडपामध्ये कराव्या लागणा-या विद्युतीकरण कामासाठी इलेक्ट्रीकल मटेरीयलची आवश्यकता असते. तसेच संस्थानमार्फत दरवर्षी साज-या केल्या जाणा-या श्री साई सच्चरित्र पारायण कार्यक्रमाचे मंडपामध्ये कराव्या लागणा-या विद्युतीकरण कामासाठी मोठया प्रमाणात इलेक्ट्रीकल मटेरीयलची आवश्यकता असते. याशिवाय कर्मचारी / अधिकारी निवासस्थानाच्या मेन्टेनन्सकामीही मटेरीयलची गरज भासते. यासर्व कामाकरीता लागणारे इलेक्ट्रीकल साहित्य वेळेवर उपलब्ध असावे लागते.

दैनंदिन इलेक्ट्रिक मेन्टेनन्सकामी तसेच नविन कामांसाठी साहित्याची आवश्यकता असते. मटेरीयल वेळेवर उपलब्ध न झाल्यास देखभाल व दुरुस्तीस अथवा नविन स्वरुपाच्या करावयाच्या कामास विलंब होतो.

विद्युत विभागामार्फत करावयाच्या दैनंदिन मेन्टेनन्सकामी व नविन कराव्या लागणा-या तातडीच्या कामासाठी विविध प्रकारचे लागणारे इलेक्ट्रीकल मटेरीयल संस्थानचे मुख्य भांडार व विद्युत विभागाचे सबस्टोअरला शिल्लक नसल्याने दैनंदिन कामकाजात अडचणी निर्माण होत आहे. तरी विद्युत विभागास दैनंदिन इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स करीता खालीलप्रमाणे इलेक्ट्रीकल मटेरीयल खरेदी करावे लागणार आहे. खरेदी कराव्या लागणा-या इलेक्ट्रीकल मटेरीयलचा तपशील खालीलप्रमाणे :-

| SR. NO. | DESCRIPTION | SIZE | COMPANY | TYPE | UNIT | Stock as on Central Store | To be Purchased | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 POLE MAIN SWITCH 250 VOLT DP MAIN SWITCH | 32 AMP | PANASONIC / ANCHOR / LISHA | 39094 | NOS. | 0 | 50 | 105.00 | 5,250.00 |
| 2 | TWO CORE MULTI STRANDED COPPER CABLE | 2.5 SQMM | POYCAB / R.R / FINOLEX | 2 CORE - 100 MTR. BUNDLE | BUNDLE | 0 | 20 | 4,100.00 | 82,000.00 |
| 3 | WOODEN SCREW ( SHAVED HEAD) | 60 X 8 | R.K.SCREWS / G.K. / MODI | CONFIRMING TO IS-7887 | BOX | 0 | 25 | 130.00 | 3,250.00 |
| 4 | WOODEN SCREW ( SHAVED HEAD) | 35 X 8 | R.K.SCREWS / G.K. / MODI | CONFIRMING TO IS-7887 | BOX | 0 | 100 | 50.00 | 5,000.00 |
| 5 | CEILING ROSE WHITE | 6 A, 3 PLATE, PILOT | PANASONIC / ANCHOR/LISHA | 39072 | NOS. | 0 | 300 | 28.00 | 8,400.00 |
| 6 | RCCB - 30 MA | 63A / 415V / 3 PHASE | SIEMENS / L&T / HAGGER | 5 SM 1 346 -0 | NOS. | 0 | 40 | 2,800.00 | 1,12,000.00 |
| 7 | CASING CAPING WHITE | 32 X 10 | MODI/ PRECISION/ ANCHOR | TFI 3 | METRE | 0 | 1500 | 42.00 | 63,000.00 |
| 8 | P.V.C.WIRE WITH ISI MARK, R-20, Y-20, B-20, BLACK - 30, GREEN -10 | 2.5 SQ.MM | FINOLEX / POLYCAB /R.R | 1100 VOLT | BUNDLE PER BUNDLE 90 METER | 0 | 100 | 1,650.00 | 1,65,000.00 |
| 9 | FAN NUT BOLTS | BRASS = SMALL-50 / BIG-50 | JINDAL / TATA /SALEM | GOOD QUALITY | NOS. | 0 | 100 | 7.00 | 700.00 |
| 10 | MILKY BULB ( NIGHT LAMP) | 0/10 WATT | CROMPTON / PHILIPS/WIPRO | B.C. | NOS. | 0 | 1000 | 11.00 | 11,000.00 |
| 11 | CEILING FAN (BROWN) | 1200 M M | CROMPTON /HAVELLS/ ANCHOR | HIGH SPEED | NOS. | 0 | 50 | 1,650.00 | 82,500.00 |
| 12 | FEXIBLE PIPE | 20 MM | PRECISION / MODI/PRESS FIT | PRECIFLEX | MTR. | 0 | 200 | 5.00 | 1,000.00 |
| 13 | FEXIBLE PIPE | 25 MM | PRECISION / MODI/PRESS FIT | PRECIFLEX | MTR. | 0 | 200 | 5.00 | 1,000.00 |
| 14 | GRIP PLUG (RAWAL PLUG) | 25 X 8 MM | GRIP/ANCHOR | ROYAL | BOX | 0 | 500 | 6.00 | 3,000.00 |
| 15 | 6 AMP PENDENT HOLDER | 6 A 240 V | PANASONIC / ANCHOR/LISHA | 14706 | NOS. | 0 | 500 | 15.00 | 7,500.00 |
| 16 | 5 A UNIVERSEL SOCKET PIANO | 5 A 240 V | PANASONIC / ANCHOR/LISHA | 14303 | NOS. | 0 | 500 | 25.00 | 12,500.00 |
| 17 | BULB | 100 WATT | PHILIPS / ORPAT / SURYA | CLEAR BC | NOS. | 0 | 25 | 30.00 | 750 |
| 18 | LED BULB | 12 W | PHILIPS /SYSKA /CROMPTON | | NOS. | 0 | 1500 | 95.00 | 1,42,500.00 |
| 19 | P.V.C. PIPE | 20 M M | PRECISION / MODI/PRESS FIT | ISI / HEAVY | MTR. | 0 | 500 | 20.00 | 10,000.00 |
| 20 | P.V.C. WIRE WITH ISI, R-20, Y-20, B-20, BLACK-30, GREEN - 10 | 4 SQ. MM. | FINOLEX / POLYCAB /R.R . | FR | PER BUNDLE 90 METER | 0 | 100 | 2,600.00 | 2,60,000.00 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 21 | P.V.C.CABLE 3 CORE COPPER | 2.5 SQ.MM.- UNARMED | FINOLEX / POLYCAB /R.R . | ISI / HEAVY | MTR. | 0 | 500 | 54.00 | 27,000.00 |
| 22 | P.V.C. CABLE 4 CORE COPPER | 2.5 SQ.MM.- UNARM | FINOLEX / POLYCAB /R.R . | ISI / HEAVY | MTR. | 0 | 500 | 70.00 | 35,000 00 |
| 23 | P.V.C. CABLE 4 CORE COPPER | 4 SQ. MM.- UNARM | FINOLEX / POLYCAB /R.R . | ISI / HEAVY | MTR. | 0 | 1000 | 152.00 | 1,52,000.00 |
| 24 | P.V.C.WIRE WITH ISI R-50, Y-50, B-50, BLACK -120, GREEN -30 | 1.5 SQ.MM. | FINOLEX / POLYCAB /R.R . | FR | PER BUNDLE 90 METER | 0 | 300 | 650.00 | 1,95,000.00 |
| 25 | P.V.C.ALU.COND.CABLE ARMOURED WITH ISI | 4 X 16 SQ.M M. | FINOLEX / POLYCAB /R.R . | ISI | MTR. | 0 | 300 | 140.00 | 42,000.00 |
| 26 | WOODN SCREW SHAVED HEAD | 50 X 8 | R.K.SCREWS / G.K. / MODI | HIGH GREAD | BOX | 0 | 25 | 80.00 | 2,000.00 |
| 27 | LED BULB | 3 W / 240 V | PHILIPS / ORPAT/SYSKA | | NOS. | 0 | 500 | 35.00 | 17,500.00 |
| 28 | 3 PIN TOP | 5A | PANASONIC / ANCHOR/LISHA | 38626 | NOS. | 40 | 150 | 40.00 | 6,000.00 |
| 29 | ELCB +BREAKER | C-63,4 POLE (3+N) | L&T / STANDARD/ DATAR / | C-63,100MA | NOS. | 0 | 40 | 3,200.00 | 1,28,000.00 |
| 30 | ISOLATOR 25 A, TWO POLE (DP) | 240V | ANCHOR PENTA/SIEMENS | 5081 PENTA-B-25 | NOS. | 0 | 50 | 350.00 | 17,500.00 |
| 31 | ISOLATOR 40 A , TWO POLE (DP) | 240V | ANCHOR PENTA/SIEMENS | 98055 PENTA-B-32 | NOS. | 0 | 25 | 450.00 | 11,250.00 |
| 32 | EME FAN STEP DIMER | 100 WATT | ANCHOR / PENTA / ROMA | CODE NO.21496 | NOS. | 0 | 50 | 110.00 | 5,500 00 |
| 33 | BLOWER MACHINE | 230V / 1.5A / 335W, 13000 RPM | ELECTREX / KPT /BOSCH | EBC 40 | NOS | 0 | 5 | 700.00 | 3,500.00 |
| 34 | P.V.C WIRE WITH ISI R-2 Y-2, B-2, BLACK-4 | 6 SQ.MM | POLY CAB / FINOLEX / RR | COPPER | PER BUNDLE 90 METER | 0 | 10 | 3,000.00 | 30,000.00 |
| 35 | P.V.C WIRE WITH ISI R-25,Y-25,B-25,GRRN-25,BLACK-50 | 1 SQ.MM | POLY CAB / FINOLEX /RR | COPPER | PER BUNDLE 90 METER | 0 | 150 | 550.00 | 82,500.00 |
| 36 | MCB | 20 A MCB, 1 POLE | SIEMENS / LEGRAND / HAGGER | 5 SQZ 110-7 YA 20 | NOS | 0 | 100 | 80.00 | 8,000.00 |
| 37 | ONE MODEL PVC SURFACE MOUNTING SWITCH BOARD WITH PLATE | ONE WAY MODULAR WHITE | ANCHOR / ROMA / LEON | 21317 +21011M +30216 | NOS | 0 | 100 | 45.00 | 4,500.00 |
| 38 | THREE MODEL PVC SURFACE MOUNTING SWITCH BOARD WITH PLATE | THREE WAY MODULAR WHITE | ANCHOR / ROMA / LEON | 21372 + 22070 + 21011M + 30238 | NOS | 0 | 150 | 60.00 | 9,000.00 |
| 39 | FORE MODEL PVC SURFACE MOUNTING SWITCH BOARD WITH PLATE | 4 WAY MODULAR WHITE | ANCHOR / ROMA / LEON | 21339WH | NOS | 0 | 200 | 75.00 | 15,000.00 |
| 40 | SIX MODEL PVC SURFACE MOUNTING SWITCH BOARD WITH PLATE | 6 WAY MODULAR WHITE | ANCHOR / ROMA / LEON | 21340WH | NOS | 0 | 500 | 85.00 | 42,500.00 |
| 41 | 6 A 1 WAY SWITCH | MODULAR - WHITE | ANCHOR / ROMA / LEON | 21011 M | NOS | 0 | 1500 | 40.00 | 60,000.00 |
| 42 | 6 A SOCKET ( MUILT) | MODULAR - WHITE | ANCHOR / ROMA / LEON | 30373 M | NOS | 0 | 1000 | 70.00 | 70,000.00 |
| 43 | 16 A SOCKET(TWIN0 | MODULAR - WHITE | ANCHOR / ROMA / LEON | 30828 | NOS | 0 | 125 | 120.00 | 15,000.00 |
| 44 | 6A BELL PUSH | MODULAR - WHITE | ANCHOR / ROMA / LEON | 21044 | NOS | 0 | 30 | 55.00 | 1,650.00 |
| 45 | LED TUBE FITTING | 10 W | PHILIPS / JAQUAR / SYSKA | TCH 204 WHITE | NOS | 0 | 750 | 180.00 | 1,35,000.00 |
| 46 | LED TUBE FITTING | 20 W | PHILIPS / BAJAJ / SYSKA | | NOS | 0 | 2500 | 255.00 | 6,37,500.00 |
| 47 | LED LIGHT FITTING | 150 W | PHILIPS / BAJAJ / SYSKA | | NOS | 0 | 100 | 3,600.00 | 3,60,000.00 |
| 48 | BALL BEARING | 6201 | SKF / FAG / KG | ZZ | NOS | 0 | 125 | 85.00 | 10,625.00 |
| 49 | BALL BEARING | 6202 | SKF / EQUIVALENT | ZZ | NOS | 0 | 125 | 85.00 | 10,625.00 |
| 50 | PIANO SWITCH | 6 A | ANCHOR/ ROMA/ LEON | 38058 | NOS | 0 | 200 | 21.00 | 4,200.00 |
| 51 | FAN RUBBER BUSHING(HALF-300) | HALF | ISI APPROVED | HEAVY DUTY | NOS | 0 | 300 | 5.00 | 1,500.00 |
| 52 | CABLE / 3 CORE FLEXIBLE | 1.5 SQ.MM. | POLY CAB / FINOLEX / RR | 3 CORE, 100 M PER BUNDLE | BUNDLE | 0 | 30 | 1,400.00 | 42,000.00 |
| 53 | ONE WAY SWITCH | MODULAR 10 AMP | ROMA / ANCHOR LEON | SP / 21011 M | NOS. | 0 | 1000 | 40.00 | 40,000.00 |
| 54 | MULTY SOCKET | 10 AMP | ROMA / ANCHOR /LEON | SP / 30373 M | NOS. | 0 | 700 | 72.00 | 50,400.00 |
| 55 | D.P.SWITCH WITH KEY TAG | 32 A | ROMA / ANCHOR / LEON | 21770 | NOS. | 0 | 100 | 260.00 | 26,000.00 |
| 56 | KEY RING TAG ONLY | 32 A | ROMA / ANCHOR LEON | 20868 | NOS. | 0 | 1000 | 46.00 | 46,000.00 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 57 | ONE WAY SWITCH | MODULER 20 A | ROMA / ANCHOR/LEON | 21066 | NOS. | 100 | 500. | 80.00 | 40,000.00 |
| 58 | MCB | 6 A / 1P | LEGRAND /SIEMENS/ L&T | C-6 / 603231 | NOS. | 0 | 100 | 70.00 | 7,000.00 |
| 59 | RCCB | 25 A / 30 MA / 1 Ph | LEGRAND /SIEMENS / L&T | 602133 | NOS. | 0 | 50 | 1,400.00 | 70,000.00 |
| 60 | RCCB | 32 A / 100 MA / 3 Ph | LEGRAND /SIEMENS/ L&T | 603305 | NOS. | 0 | 45 | 2,200.00 | 99,000.00 |
| 61 | RCCB | 63 A / 100 MA / 3 Ph | SIMENS /L&T / LEGRAND | 5SM 1346-0 | NOS. | 0 | 50 | 3,200.00 | 1,60,000.00 |
| 62 | 8 GB SIMENS BOARD | 20 A | SIMENES / LEGRAND / L&T/ | 8 GB | NOS. | 20 | 50 | 150.00 | 7,500.00 |
| 63 | LED STREET LIGHT | 120 W | PHILIPS /CROMPTON / OSARAM/ SYSKA | POLYSTER | NOS. | 0 | 100 | 4,000.00 | 4,00,000.00 |
| 64 | MODULAR SURFACE PLATE WITH BOX | 6 WAY | ANCHOR / ROMA /LEON /EQUIVALENT | 30511 WHITE | NOS. | 0 | 150 | 85.00 | 12,750.00 |
| 65 | MODULAR SURFACE PLATE WITH BOX | 8 WAY | ANCHOR / ROMA /LEON | 65988 WHITE | NOS. | 0 | 150 | 100.00 | 15,000.00 |
| 66 | MODULAR SURFACE PLATE WITH BOX | 12 WAY | ANCHOR / ROMA /LEON | 65912 WHITE | NOS. | 0 | 200 | 120.00 | 24,000.00 |
| 67 | MODULAR SURFACE PLATE WITH BOX | 18 WAY | ANCHOR / ROMA /LEON | 65918 WHITE | NOS. | 0 | 30 | 140.00 | 4,200.00 |
| 68 | LED STREET LIGHT | 70 W | CROMPTON / HAVELLS / SYSKA | | NOS. | 0 | 100 | 2,383.00 | 2,38,300.00 |
| 69 | CONTACTOR | ML - 6,440 V | L & T / SIMENS /HPL | 5590921 | NOS. | 0 | 10 | 1,200.00 | 12,000.00 |
| 70 | SIMENES D.B.BOX | 6 WAY / 1 Ph | SIMENES / LEGRAND / L&T | DUBLE DOOR | NOS. | 35 | 50 | 170.00 | 8,500.00 |
| 71 | CILING FAN (WHITE) | 1200 MM | CROMPTON / HAVELLS / ALMONARD | WHITE HIGH SPEED | NOS. | 0 | 150 | 1,650.00 | 2,47,500.00 |
| 72 | TIME SWITCH TIMER | 240 V AC,50 HZ | GIC /HPL /L&T | 3648B1 QT DAILY QT.CAT NO.J648131 | NOS. | 0 | 30 | 1,200.00 | 36,000.00 |
| 73 | PVC TAPE BUNDLE | 10 METER | ANCHOR / STELL GRIP | ISI | NOS. | 0 | 1350 | 10.00 | 13,500.00 |
| 74 | POWER PLATE / WITH BOX | 15 A | ANCHOR / LEON / ROMA / | 39998 SS COMBINE | NOS. | 0 | 100 | 150.00 | 15,000.00 |
| 75 | BLANK PLATE SINGLE | 1 WAY | ANCHOR / LEON / ROMA / | 21598 | NOS. | 0 | 350 | 15.00 | 5,250.00 |
| 76 | LED BULB | 9 WATT | HPL /ORPAT/SYSKA | | NOS. | 0 | 750 | 70.00 | 52,500.00 |
| 77 | AVR | OUT PUT 6A DC 95V DC IN PUT 415 V AC POWER 240 V | SANLAC / CUMMINS / POWERICA | 95 SP 6 | NOS. | 0 | 5 | 1,600.00 | 8,000.00 |
| | | | | | | | | Total Amount Rs. | 47,96,600.00 |

मागणी :- उपरोक्तप्रमाणे विद्युत विभागाचे दैनंदिन इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स करीता इलेक्ट्रीकल मटेरीयल खरेदी करणेकामी खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबवून येणा-या अंदाजे रक्कम रु.४७,९६,६००/- इतक्या खर्चास चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेस विनंती.

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

उपरोक्त प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे विद्युत विभागाचे दैनंदिन इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स करीता इलेक्ट्रीकल मटेरीयल खरेदी करणेकामी खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबवून येणा-या अंदाजे रक्कम रु.४७,९६,६००/- इतक्या खर्चास चक्रीय पध्दतीने मान्यता देण्यात आली.

मा.श्रीमती गीता प्रवीण बनकर
सहाय्यक धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्या

मा.श्री.भानुदास ह.पालवे
अप्पर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक
सदस्य

मा.श्री.रविंद्र ठाकरे
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
सदस्य

मा.न्या.श्री.श्रीकांत ल.आणेकर
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
अध्यक्ष

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि. 08/02/2021

594

विषय – विद्युत विभागाकरिता दैनंदिन इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स कामाकरिता लागणारे इलेक्ट्रीक मटेरियल खरेदी करणेकामी चक्रीय पदध्तीने मान्यता मिळणेबाबत...

टिपणी वाचली. संबंधित विभागाचे विद्युत पर्यवेक्षक श्री. बाबुराव खाडगीर यांच्याकडून विषय समजावून घेतला. विद्युत विभागातील मेन्टेनन्सकरिता लागणारे सदरहू मटेरियल पूर्वी कधी व किती विकत घेतले होते, हे टिपणीत नमूद नाही. ते महत्वाचे आहे कारण दैनंदिन कामकाजात अशा वस्तुंचा वापर किती आहे हे पाहून त्या वस्तुंची खरेदी संख्या ठरु शकते. उदा: **3 Pin Top, One Way Switch etc.** तसेच प्रत्येक मटेरियल बाबत तीन कंपन्यांची नांवे दिली आहेत. मात्र ती वेगवेगळी आहेत. असे का? याचे स्पष्टीकरण नाही. त्याचप्रमाणे मटेरियल **ISI Mark** चे असावे, अशी अटही नमूद केलेली नाही. वरील परिस्थितीत, योग्य तो अभ्यास करुन संपूर्ण माहिती तदर्थ समितीसमक्ष ठेवावी, जेणेकरुन निर्णय घेता येईल.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 08/02/2021

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय
दि. ०८.०२.२०२१

विषय : विद्युत विभागाकरिता दैनंदिन इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स कामाकरिता लागणारे इलेक्ट्रीक मटेरियल खदेरी करणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत...

सदरच्या प्रस्तावाचे अवलोकन केले असता विद्युत विभागातील व्यवस्थापनाकरिता लागणारे साहित्य यापूर्वी कधी व किती प्रमाणात विकत घेतले आहे याबाबत अवगत होत नाही. सदरची बाब टिपणीमध्ये नमूद असणे आवश्यक आहे कारण या वस्तुंचा वापर किती प्रमाणात केला जातो यावरुन अंदाजीत वस्तुंची खरेदी संख्या ठरविणे साईचे होते. तसेच साहित्य खरेदी करतांना वस्तुंच्या विषयी आवश्यक मानांकन देखील नमूद केलेले नाही. तरी सदरचा प्रस्ताव हा अभ्यास करुन संपूर्ण माहितीनिशी तदर्थ समिती समोर ठेवणे उचित वाटते, म्हणजे तदर्थ समितीला त्याबरती लवकरात लवकर निर्णय घेता येईल.

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ समिती,
साईबाबा संस्थान शिर्डी.

विषय क्र.-9/985

विद्युत विभाग
दिनांक :- २२-०३-२०२१

**विषय :- सर्व्हे नं २/४, ३/१ व ३/७ चे ठिकाणचे जुन्या Electrical Substation मधील Cabel शिफ्ट करणे, जॉईंट देऊन नविन पॅनेलमध्ये जोडणी करणे व Electrical Panel मधील कनेक्शन नविन पॅनेलमध्ये जॉईंट करणे व जनरेटर सेट डिसमेंटल करून काढुन घेणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत....**

**प्रस्तावना :-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-
(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

शासन निर्णय परिच्छेद क्र.४.१ खरेदी किंमत रु. ३ लाखापेक्षा अधिक असेल तेव्हा ई-निविदा प्रणालीचा वापर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव :-** संस्थानचे सर्व्हे नं २/४, ३/१ ,व ३/७ या ठिकाणी नविन दर्शन लाईन इमारतीचे तसेच नविन इलेक्ट्रिकल सबस्टेशन इमारतीचे काम चालु आहे. नविन इलेक्ट्रिकल सबस्टेशन इमारतीचे काम पुर्ण झाल्यानंतर इमातीमध्ये नविन जनरेटरसेट, इलेक्ट्रिकल पॅनेल, ट्रॉन्सफॉर्मर बसविले जाणार आहेत. जुन्या इलेक्ट्रिकल सबस्टेशन इमारतीमधील मंदिर व मंदिर परीसराकरीता असलेल्या विद्युत पुरवठयाच्या केबल जुन्या इलेक्ट्रिकल कंट्रोल पॅनल मधुन काढुन घेऊन नविन इमारतीमधील इलेक्ट्रिकल कंट्रोल पॅनल मध्ये जोडाव्या लागतील सध्याच्या जुन्या **असलेल्या केबल्स अपु-या पडणार असल्याने आवश्यक तेवढया नविन केबल खरेदी करून जुन्या केबलला केबल जॉईट व्दारे जोडाव्या लागतील याकरीता केबल जॉईट किट, लग्ज, ग्लॅड इत्यादी नविन खरेदी कराव्या लागतील तसेच केबल टाकणे करीता नाली तयार करावी लागेल.**

सध्याचे असलेले ५ नग इलेक्ट्रिकल कंट्रोल पॅनल व दोन ५०० KVA क्षमतेचे जनरेटर डिसमेंटल करून काढुन घेऊन साईआश्रम भक्तनिवासस्थान कडील सबस्टेशन येथे नेऊन ठेवावे लागतील. (सदर कंट्रोल पॅनेल व जनसेट लिलाव पध्दतीने विक्री करणेकरीता संबंधीत उपकरणे डिस्मेंटल झालेनंतर स्वतंत्र टिपणी ठेऊन त्याची मान्यता नंतर घेण्यात येईल. डिस्मेंटलची तारीख निश्चित नसल्याने व नवीन जनसेट व पॅनेल अद्याप साईटवर आलेले नसल्याने लिलावा संबंधी टिपणी सादर करणे सध्या शक्य नाही) याकरिता सदरील काम आपणास बाहेरील विद्युत ठेकेदार यांचेकडुन ई-निविदा मागवुन करून घ्यावे लागेल. केबल डिसमेंटल करून शिफ्ट करणे, जॉईंट देऊन नविन पॅनेलमध्ये जोडणी करणे, इलेक्ट्रिकल कंट्रोल पॅनेल व जनरेटर सेट डिसमेंटल करून काढुन घेणे इ. कराव्या लागणा-या कामाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे. सदरील कामाचा खर्च हा शासनमान्य सी.एस.आर. सन २०१९-२०२० प्रमाणे तयार केलेला आहे.

| Sr. No. | CSR. No. | Discription | Unit | Qty | Rate | Total Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 7-1-23 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 3½core 240 sq mm aluminium conductor with continuous12.97 sq mm (8 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/ trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | Mtrs. | 400 | 1,447.40 | 5,78,960.00 |
| 2 | 7-1-21 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 3½core 150 sq mm aluminium conductor with continuous12.97 sq mm (8 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall / trusses / pole or laid in provided trench / pipe as per specification no. CB-LT/AL | Mtrs. | 300 | 944.74 | 2,83,422.00 |
| 3 | 7-1-20 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 3½core 120 sq mm aluminium conductor with continuous12.97 sq mm (8 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall / trusses / pole or laid in provided trench / pipe as per specification no. CB-LT/AL | Mtrs. | 200 | 796.00 | 1,59,200.00 |
| | | | | | Total of Page No.1 | 10,21,582.00 |

२/-

| Sr. No. | CSR. No. | Discription | Unit | Qty | Rate | Total Amoun |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Carry Forward from Page No.1 | | | | 10,21,582.00 |
| 4 | 7-1-17 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 3½core 50 sq mm aluminium conductor with continuous12.97 sq mm (8 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall / trusses / pole or laid in provided trench / pipe as per specification no. CB-LT/AL | Mtrs. | 100 | 402.24 | 40,224.00 |
| 5 | 7-1-29 | Supplying, erecting & terminating XLPE armoured cable 4 core 16 sq. mm. aluminium conductor with continuous 5.48 sq. mm. (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall / trusses / pole or laid in provided trench / pipe as per specification no .CB-LT/AL | Mtrs. | 200 | 223.52 | 44,704.00 |
| 6 | 7-1-15 | Supplying, erecting & terminating XLPE armoured cable 3½ core 25 sq. mm. aluminium conductor with continuous 5.48 sq. mm. (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall / trusses / pole or laid in provided trench / pipe as per specification no. CB-LT/AL | Mtrs. | 100 | 256.97 | 25,697.00 |
| 7 | 7-1-19 | Supplying, erecting & terminating XLPE armoured cable 3½ core 95 sq. mm. aluminium conductor with continuous 8.35 sq. mm. (10 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall / trusses / pole or laid in provided trench / pipe as per specification no. CB-LT/AL | Mtrs. | 100 | 639.39 | 63,939.00 |
| 8 | 7-7-11 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3½ core 240 sq mm for PVC armoured cable as per specification No. CB-GL | Nos. | 50 | 392.61 | 19,630.50 |
| 9 | 7-7-9 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3½ core 150 sq mm for PVC armoured cable as per specification No. CB-GL | Nos. | 10 | 289.93 | 2,899.30 |
| 10 | 7-7-8 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3½ core 120 sq mm for PVC armoured cable as per specification No. CB-GL | Nos. | 10 | 191.43 | 1,914.30 |
| 11 | 7-7-5 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3½ core 50 sq mm for PVC armoured cable as per specification No. CB-GL | Nos. | 10 | 288.07 | 2,880.70 |
| 12 | 7-7-3 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3 to 4 core 16 sq. mm. / 3 to 4 core 25 sq. mm. /3 core 35 sq. mm. for XLPE armoured cable as per specification no. CB-GL | Nos. | 20 | 114.11 | 2,282.20 |
| 13 | 7-7-7 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3½ core 95 sq. mm. for XLPE armoured cable as per specification no. CB-GL | Nos. | 10 | 256.47 | 2,564.70 |
| 14 | 7-10-10 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 240 sq mm complete as per specification No. CBCL/AL | Nos. | 200 | 94.10 | 18,820.00 |
| 15 | 7-10-8 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 150 sq mm complete as per specification No. CBCL/AL | Nos. | 40 | 50.43 | 2,017.20 |
| 16 | 7-10-7 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 120 sq mm complete as per specification No. CBCL/AL | Nos. | 40 | 40.39 | 1,615.60 |
| 17 | 7-10-4 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 50 sq mm complete as per specification No. CBCL/AL | Nos. | 40 | 21.56 | 862.40 |
| 18 | 7-10-1 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable up to 16 sq. mm. complete as per specification no. CB-CL/AL | Nos. | 40 | 8.92 | 356.80 |
| 19 | 7-10-2 | Supplying & erecting crimping type aluminium lugs. for cable 25 sq. mm. complete as per specification no. CB-CL/AL | Nos. | 40 | 10.16 | 406.40 |
| 20 | 7-10-6 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 95 sq. mm. complete as per specification no. CB-CL/AL | Nos. | 40 | 27.75 | 1,110.00 |
| 21 | 7-4-1 | Providing & erecting epoxy straight through joint outdoor / indoor for LT XLPE armoured cable 2.5 to 16 sq. mm. cable, with necessary material as per specification no. CB-JT/LT | Nos. | 5 | 2,385.57 | 11,927.85 |
| | | | | | Total of Page No.2 | 12,65,433.95 |

३/-

| Sr. No. | CSR. No. | Discription | Unit | Qty | Rate | Total Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Carry Forward from Page No.2 | | 12,65,433.95 |
| 22 | 7-4-2 | Providing & erecting epoxy straight through joint outdoor / indoor for LT XLPE armoured cable 25 to 50 sq. mm. cable, with necessary material as per specification no. CB-JT/LT | Nos. | 2 | 2,814.26 | 5,628.52 |
| 23 | 7-4-3 | Providing & erecting epoxy straight through joint outdoor / indoor for LT XLPE armoured cable 70 to 95 sq. mm. cable, with necessary material as per specification no. CB-JT/LT | Nos. | 2 | 3,704.55 | 7,409.10 |
| 24 | 7-4-4 | Providing & erecting epoxy straight through joint outdoor / indoor for LT XLPE armoured cable 120 to 185 sq. mm. cable, with necessary material as per specification no. CB-JT/LT | Nos. | 10 | 3,851.49 | 38,514.90 |
| 25 | 7-4-5 | Providing & erecting epoxy straight through joint outdoor / indoor for LT XLPE armoured cable 240 sq. mm. cable, with necessary material as per specification no. CB-JT/LT | Nos. | 6 | 5,968.94 | 35,813.64 |
| 26 | 11-4-2 | Dismantling existing 500 KVA DG set along with Switch gears & AMF panel, etc. from foundation and Shifting with safely without any Damages | Nos. | 2 | 18,213.30 | 36,426.60 |
| 27 | 10-3-1 | Dismantling existing 1000 KVA Transformer from the plinth / foundation and shifting with safely without any Damages. | Nos. | 1 | 35,125.65 | 35,125.65 |
| 28 | Non CSR | Dismantling existing Main Electrical Control Pannels and Shifting with safely without any Damages. | Nos. | 3 | 20,000.00 | 60,000.00 |
| | | | | | TOTAL Rs. | 14,84,352.36 |
| | | | | | ROUND UP RS. | 14,84,352.00 |

मागणी :- उपरोक्तप्रमाणे सर्व्हे नं २/४, ३/१ व ३/७ चे ठिकाणचे जुन्या Electrical Substation मधील Cabel शिफ्ट करणे, जॉईंट देऊन नविन पॅनेलमध्ये जोडणी करणे व Electrical Panel मधील कनेक्शन नविन पॅनेलमध्ये जॉईंट करणे व जनरेटर सेट डिसमेंटल करून काढुन घेणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये १४,८४,३५२/- इतक्या खर्चास तसेच विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामाचे प्रस्तावास चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेस विनंती.

25/3/24

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

22/3/2024

---

उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे सर्व्हे नं २/४, ३/१ व ३/७ चे ठिकाणचे जुन्या Electrical Substation मधील Cabel शिफ्ट करणे, जॉईंट देऊन नविन पॅनेलमध्ये जोडणी करणे व Electrical Panel मधील कनेक्शन नविन पॅनेलमध्ये जॉईंट करणे व जनरेटर सेट डिसमेंटल करून काढुन घेणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. १४,८४,३५२ ( रु.चौदा लाख चौ-याऐंशी हजार तीनशे बावन) इतक्या खर्चास व याकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस चक्रीय पध्दतीने मान्यता देण्यात आली.

25/05/2024

मा.श्रीमती गीता प्रवीण बनकर
सहाय्यक धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्या

23/5/2024

मा.श्री.भानुदास ह.पालवे
अप्पर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक
सदस्य

मा.श्री.कान्हूराज बगाटे (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सदस्य

5/5

मा.न्या.श्री.श्रीकांत ल.आणेकर
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
अध्यक्ष

Ele/meeting/106

महोदय यांचे उपस्थितीत बैठक आयोजीत करणेत आलेली होती. सदर बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार श्री साईभक्तांना कोरोना विषाणू (Covid 19) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेअंतर्गत सर्व नियमांचे पालन करुन साईबाबांचे दर्शन उपलब्ध करुन देणेत आले होते.

कोरोना विषाणू (Covid 19) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी महसुल व वनविभाग महाराष्ट्र शासन यांनी दि.०४ एप्रिल, २०२० नुसार लागू केलेल्या मार्गदर्शक सुचना / उपाय तसेच मा.जिल्हादंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचेमार्फत लागू करणेत आलेले आदेश याअन्वये सर्व प्रकारचे प्रतिबंधात्मक उपाय योजना करणेसाठी प्रशासकीय स्थरावर बैठक घेणेत आली होती. सदर बैठकीत आदेशीत केलेप्रमाणे जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३७/२०२१, दि.०६ एप्रिल, २०२१ अन्वये खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्याचे आदेशीत करणेत आलेले आहे.

1. संस्थान व्यवस्थापन संचलीत श्री साईबाबा समाधी मंदिरासह सर्व मंदिरे (द्वारकामाई, गुरूस्थान,चावडी,प्रधान लेंडीबाग,नंदादीप,श्री दत्त मंदिर,श्री गणेश,श्री शनी व श्री महादेव मंदिर,श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिर आदि) दि.०५.०४.२०२१ रोजी संध्या. ८:०० वाजेपासून भक्तांसाठी पुढील आदेश होईपावेतो दर्शनाकरीता (मुख दर्शनासह) बंद करणेत यावे.
2. संस्थान व्यवस्थापन संचलीत सर्व भक्तनिवासस्थाने (श्री साई निवास अतिथीगृह, साईप्रसाद निवासस्थान, द्वारावती भक्तनिवासस्थान, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, साईआश्रम भक्तनिवासस्थान, श्री साई धर्मशाळा आदि) हे आज दि.०६ एप्रिल, २०२१ रोजीपासून भक्तांचे तात्पुरते निवासासाठी पुढील आदेश होईपावेतो उपलब्ध करुन देणेत येऊ नये.

दि.०५.०४.२०२१ रोजी मा.प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार इकडील विभागाचे दि.०५.०४.२०२१ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, संस्थानचे online.sai.org.in या संकेतस्थळाद्वारे उपलब्ध असलेली ऑनलाईन दर्शन / आरती / निवास आदींचे आगाऊ आरक्षणाची सुविधा पुढील आदेश होईपर्यंत बंद करणेत आलेली आहे.

जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३७/२०२१, दि.०६ एप्रिल, २०२१ रोजीचे आदेशान्वये संस्थान व्यवस्थापन संचलीत श्री साईबाबा समाधी मंदिरासह सर्व मंदिरे दि.०५ एप्रिल, २०२१, संध्याकाळी ८:०० वाजेपासून भक्तांसाठी पुढील आदेश होईपावेतो बंद करणेत आलेले आहेत. तसेच संस्थान व्यवस्थापन संचलीत सर्व भक्तनिवासस्थाने दि.०६ एप्रिल, २०२१ पासून भक्तांचे तात्पुरते निवासासाठी पुढील आदेश होईपावेतो बंद करणेत आलेले आहेत. सबब, दि.०६ एप्रिल, २०२१ पासून पुढील कालावधीदरम्यान श्रींचे आरती / दर्शनपास तसेच रुम यांचे आगाऊ आरक्षण केलेले साईभक्त दुरध्वनीद्वारे इकडील विभागाशी संपर्क करुन त्यांची याकामीची संस्थानखाती जमा झालेली रक्कम त्यांना परत मिळणेबाबत मागणी करत आहेत.

दि.०६ एप्रिल, २०२१ पुढील कालावधीकरीता आरती / दर्शनपास व निवासव्यवस्थेचे online.sai.org.in या संकेतस्थळावर आगाऊ आरक्षण केलेल्या साईभक्तांची माहिती पुढीलप्रमाणे.

| Sr.No. | Service | No. of Transactions | Amount |
|---|---|---|---|
| 01 | Darshan | 809 | 1,61,800 |
| 02 | Aarti | 173 | 69,200 |
| 03 | Accommodation | 366 | 79,100 |
| | | **Grand Total** | **3,10,100** |

विषय क्र.- ७/१५६

**मा.तदर्थ समितीपुढे चक्रिय पद्धतीने सादर**
**माहिती तंत्रज्ञान विभाग**

**विषय :- कोरोना विषाणू (Covid 19) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाय-योजनेअंतर्गत श्रींचे समाधी मंदिर दि.०६.०४.२०२१ पासून पुढील आदेश होईपर्यंत भक्तांकरिता दर्शनासाठी बंद करणेत आल्याने साईभक्तांनी ऑनलाईन पद्धतीने आरक्षीत केलेल्या आरती / दर्शनपास व रुम बुकींग सुविधेचे याकामी संस्थानखाती जमा रक्कम परत करणेबाबत...**

टिपणी,

**अधिनियम २००४ मधील तरतुद :-** कलम १७ (०१) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र :-**

०१. मा.तदर्थ समितीची दि.३१.०३.२०२० रोजीची चक्रिय पद्धतीने मान्यता.
०२. मा.तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.२९९.

**प्रास्ताविक :-** जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२८३२/२०२०, दि.१७ मार्च, २०२० रोजीचे आदेशान्वये, जागतिक स्तरावर उद्भवलेल्या कोरोना विषाणू (Covid 19) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेअंतर्गत संस्थान व्यवस्थापन संचलीत श्री साई समाधी मंदिराबरोबरच इतर सर्व मंदिरे दि.१७.०३.२०२० पासून पुढील आदेश होईपर्यंत दर्शनाकरीता बंद करणेत आले होते. संस्थान व्यवस्थापन संचलीत सर्व भक्तनिवासस्थानेही दि.१७.०३.२०२० पासून पुढील आदेश होईपर्यंत निवासाकरीता बंद करणेत आले होते. तसेच संस्थान व्यवस्थापन संचलीत अधिकृत संकेतस्थळाद्वारे करणेत येणारे ऑनलाईन दर्शन / आरती / निवास आदी सुविधांचे आगाऊ आरक्षण (Online Booking) बंद करणेत आलेले होते.

श्री साई समाधी मंदिराबरोबरच इतर सर्व मंदिरे दि.१७.०३.२०२० पासून पुढील आदेश होईपर्यंत दर्शनाकरीता बंद करणेत आलेले असल्याने सदरचे कालावधीमध्ये संस्थानचे अधिकृत संकेतस्थळ online.sai.org.in द्वारे विविध सुविधांचे ऑनलाईन बुकींग केलेल्या साईभक्तांकडून त्यांची याकामी संस्थानखाती जमा असलेली रक्कम त्यांना परत करणेसंदर्भात मागणी करणेत येत होती. त्यानुसार इकडील विभागाचे दि.३१.०३.२०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये साईभक्तांनी मागणी केलेप्रमाणे त्यांची याकामीची संस्थानखाती जमा असलेली रक्कम परत करणेस मा.तदर्थ समितीचे दि.३१.०३.२०२० रोजीने चक्रिय पद्धतीने मान्यता घेणेत आलेली होती. सदर मान्यतेचे मा.तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.२९९ अन्वये, अवलोकन होऊन त्याची नोंद घेणेत आलेली होती. मा.तदर्थ समितीचे दि.३१.०३.२०२० रोजीचे चक्रिय पद्धतीने घेणेत आलेल्या मान्यतेनुसार इकडील विभागाचे दि.०१.०५.२०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये साईभक्तांची अनुषंगिक रक्कम त्यांना ऑनलाईन पद्धतीने परत करणेस संदर्भ क्र.०२ नुसार मान्यता घेणेत आलेली होती. त्याप्रमाणे मे.टिसीएस यांचेमार्फत प्रणालीमध्ये आवश्यक सुधारणा करुन साईभक्तांची संस्थानखाती जमा असलेली अनुषंगिक रक्कम त्यांना ऑनलाईन पद्धतीने परत करणेची कार्यवाही करणेत आली.

मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांनी दि.१४.११.२०२० रोजी राज्यातील सर्व धार्मिक स्थळे सोमवार दि.१६.११.२०२० पासून भक्तांकरीता खुले करण्याचे जाहिर केलेले होते. त्यानुसार श्री साईभक्तांना कोरोना विषाणू (Covid 19) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेअंतर्गत सर्व नियमांचे पालन करुन दर्शन उपलब्ध करुन देणेसंदर्भात करावयाच्या उपाय-योजनांबाबत दि.१५.११.२०२० रोजी सकाळी ७:३० वा. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी

# चक्रीय पद्धतीने आणलेला विषय
## दि. 23/03/2021

विषय : श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करून देणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत मा. तदर्थ समितीचे निर्देशान्वये, M/s Tata Comm., Mumbai यांचेकडून मागविणेत आलेल्या सुधारीत दराचे प्राप्त ई-मेलबाबत -

प्रस्ताव वाचला, मा. अध्यक्ष सो यांचा अभिप्राय वाचला यातील प्राप्त मुद्द्यानुसार मे. टाटा कम्युनिकेशन हे गतवर्षीपेक्षा कमी दर देणु करतात. त्यांना exclusive rights देवून देखील त्यांनी वरीलप्रमाणे कळविले. परंतु प्रस्तावाचा सर्व निकष विचार करता, प्राप्त परिस्थितीमध्ये एक वर्षाकरिता असे अधिकार देवून पुढील वर्षी मुदतवाढ किंवा दर यांचा फेरविचार करणे उचित वाटते. त्यामुळे तीन वर्षांकरिता अधिकार देण्यापेक्षा वरीलप्रमाणे विचार करणे जास्त योग्य वाटते. त्यामुळे एक वर्षाकरिता मंजुरी देणे योग्य आहे. सबब प्रस्ताव एक वर्षासाठी मंजूर. कालमर्यादा 01 एप्रिल 2021 ते 31 मार्च 2022 असेल.

23/03/2021
Accrand member SSST

**चक्रीय पध्दतीने आणलेला विषय**
**दि. 23/03/2021**

**विषय – श्रींचे ऑनलाईन दर्शन** (Live) **सुविधा** DTH **(डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रिये अंतर्गत मा. तदर्थ समितीचे निर्देशान्वये,** M/s Tata Comm., Mumbai **यांचेकडून मागविणेत आलेल्या सुधारीत दराचे प्राप्त ई-मेलबाबत...**

विषयांचा अभ्यास केला. श्री. अनिल शिंदे, प्रभारी माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख यांचेकडून विषय समजून घेतला. मुळ मुद्दा **exclusive** व **non-exclusive right** बाबत आहे. सद्य परिस्थितीत **exclusive rights** देवून सुध्दा मे.टाटा कम्युनिकेशन हे गतवर्षापेक्षा कमी दर देवू करतात. मात्र **non-exclusive** करिता जरी रु.4,00,000/- प्रतिवर्ष देवू केले तरी संस्थान इतर चॅनलला असे अधिकार देवू शकते.

सर्वकष विचार करता, आज रोजी पुढील तीन वर्षांकरिता संस्थानने मे.टाटा कम्युनिकेशनला अधिकार देण्यापेक्षा सद्य स्थितीत एक वर्षाकरिता असे अधिकार देवून पुढील वर्षी मुदतवाढीचा विचार किंवा दरांबाबत फेरविचार होवू शकतो. करिता माझेतर्फे वरील प्रस्ताव एक वर्षासाठी मंजूर करण्यात यावा व हा कालावधी 01 एप्रिल 2021 ते 31 मार्च 2022 असा राहील.

**(श्रीकांत एल. आणेकर)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर**
**तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी**

**दिनांक –23/03/2021**

केलेल्या विनंतीनुसार ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत देऊ केलेल्या दराप्रमाणे त्यांना DTH (डिश टिव्ही) तसेच मोबाईल व इंटरनेटसाठी Exclusive व टिव्ही चॅनेलसाठी Non Exclusive या प्रमाणे दि.०१ फेब्रुवारी, २०२१ पासून पुढील ०३ वर्षांकरीता कार्यादेश.देणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर चक्रिय पद्धतीने सविनय सादर.

16/3/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

10/03/2021

---

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, श्रींचे ऑनलाईन (Live) दर्शन सुविधा DTH (डिश टिव्ही) तसेच मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी M/s Tata Comm वगळता इतर पुरवठा धारकांकडून प्रतिसाद मिळत नाही. परंतू सदरची सुविधा टिव्ही चॅनेलवर उपलब्ध करुन देणेकामी या क्षेत्रातील पुरवठा धारकांकडून संस्थानकडे विचारणा होत असते. सबब, याकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत M/s Tata Comm यांनी देऊ केलेल्या दराप्रमाणे त्यांना DTH (डिश टिव्ही) तसेच मोबाईल व इंटरनेटसाठी अनुक्रमे रक्कम रुपये ५०,००,०००/- प्रतिवर्ष व रुपये १,०५,००,०००/- प्रतिवर्ष Exclusive प्रकारचा व टिव्ही चॅनेलसाठी रक्कम रुपये ४,००,०००/- प्रतिवर्ष Non Exclusive या प्रकारचा कार्यादेश दि.०१ फेब्रुवारी, २०२१ पासून पुढील ०३ वर्षांकरीता देणेस तसेच, भविष्यात सदर सुविधा उपलब्ध करुन देणेकामी टिव्ही चॅनेलकरीता कोणी विचारणा केल्यास त्यांनाही M/s Tata Comm यांचे कार्यादेशातील दराप्रमाणे कार्यादेश देणेस चक्रीय पद्धतीने मान्यता देणेत आली.

दि. 1/4/2021 ते 31/3/2022 या वर्षाकरीता कार्यादेश देण्यास हरकत नाही

(श्रीमती गीता बनकर)
सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्या

25/3/2021
(भानुदास पालवे)
अप्पर आयुक्त (महसुल),
नाशिक विभाग, नाशिक
सदस्य

16/3/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी
सदस्य सचिव

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश
अहमदनगर
अध्यक्ष

मा.तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(डिश टिव्ही) तसेच मोबाईल व इंटरनेटसाठी Exclusive व टिव्ही चॅनेलसाठी Non Exclusive या प्रमाणे दि.०१ फेब्रुवारी, २०२१ पासून पुढील ०३ वर्षांकरीता कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर चक्रिय पद्धतीने सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी :-** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे मा.तदर्थ समितीचे दि.१९.१२.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८१ निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार, M/s Tata Comm यांचेमार्फत याकामीचे सुधारीत दर (प्रस्ताव) मागविणेकामी दि.२३.०२.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे कळविणेत आले होते. सदरील ई-मेलचे उत्तरादाखल M/s Tata Comm यांनी दि.२४.०२.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत सादर केलेले दर हे उच्चत्तम (सर्वोत्कृष्ट) असल्याचे नमुद केले आहे. सादर केलेल्या Non-Exclusive दरामध्ये कोणतेही बदल करु इच्छित नसल्याने आपल्या सहकार्याची अपेक्षा करत असल्याची ई-मेलद्वारे विनंती केलेली आहे.

श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा उपलब्ध करुन देणेकामी इतर पुरवठा धारकांकडून कोणत्याही प्रकारे प्रतिसाद मिळत नसल्याने, M/s Tata Comm यांनी दि.२४.०२.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे केलेल्या विनंतीनुसार ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत त्यांनी देऊ केलेल्या दराप्रमाणे त्यांना DTH (डिश टिव्ही) तसेच मोबाईल व इंटरनेटसाठी Exclusive व टिव्ही चॅनेलसाठी Non Exclusive या प्रमाणे दि.०१ फेब्रुवारी, २०२१ पासून पुढील ०३ वर्षांकरीता कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर चक्रिय पद्धतीने सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम / ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-** तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :-** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे मा.तदर्थ समितीचे दि.१९.१२.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८१ निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार, M/s Tata Comm यांचेमार्फत याकामीचे सुधारीत दर (प्रस्ताव) मागविणेकामी दि.२३.०२.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे कळविणेत आले होते. सदरील ई-मेलचे उत्तरादाखल M/s Tata Comm यांनी दि.२४.०२.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत सादर केलेले दर हे उच्चत्तम (सर्वोत्कृष्ट) असल्याचे नमुद केले आहे. सादर केलेल्या Non-Exclusive दरामध्ये कोणतेही बदल करु इच्छित नसल्याने आपल्या सहकार्याची अपेक्षा करत असल्याची ई-मेलद्वारे विनंती केलेली आहे.

श्रींचे ऑनलाईन (Live) दर्शन सुविधा DTH (डिश टिव्ही) तसेच मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी M/s Tata Comm वगळता इतर पुरवठा धारकांकडून प्रतिसाद मिळत नाही. परंतू सदरची सुविधा टिव्ही चॅनेलवर उपलब्ध करुन देणेकामी या क्षेत्रातील पुरवठा धारकांकडून संस्थानकडे विचारणा होत असते. सबब, ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत M/s Tata Comm यांनी देऊ केलेल्या दराप्रमाणे त्यांना DTH (डिश टिव्ही) तसेच मोबाईल व इंटरनेटसाठी अनुक्रमे रक्कम रुपये ५०,००,०००/- व रुपये १,०५,००,०००/- प्रतिवर्ष Exclusive प्रकारचा व टिव्ही चॅनेलसाठी रक्कम रुपये ४,००,०००/- प्रतिवर्ष Non Exclusive या प्रकारचा कार्यादेश पुढील ०३ वर्षांकरीता देता येईल. जेणेकरून भविष्यात सदर सुविधा उपलब्ध करुन देणेकामी टिव्ही चॅनेलकरीता कोणी विचारणा केल्यास त्यांनाही याकामी कार्यादेश देता येईल व पर्यायाने साईभक्तांची सोय होऊन संस्थानला आर्थिक फायदाही होईल.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी, M/s Tata Comm यांना दि.३१.०१.२०२१ अखेर मुदतवाढ देणेत आलेली आहे. M/s Tata Comm यांनी दि.२४.०२.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे

कळविणेत आले होते. सदरील ई-मेलचे उत्तरादाखल M/s Tata Comm यांनी दि.२४.०२.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे पुढीलप्रमाणे कळविलेले आहे.

"We have already submitted our best bid through the bidding process last year and while we are already incurring lot of cost to sustain this service and keep it live on Tata Sky DTH and Internet platform, we would request your kind support on the royalty cost as the current market conditions are deteriorating and are having subsequent impact on our business.

To ensure longevity and sustainability of this project we would like you to consider our NON-EXCLSUIVE Bid submitted by us and confirm the effective date from 1st Jan 2021. So we can close the agreement ASAP."

M/s Tata Comm यांनी दि.२४.०२.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी, ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत सादर केलेले दर हे उच्चत्तम (सर्वोत्कृष्ट) असल्याचे नमुद केले आहे. याकामीची सेवा टिकवून ठेवण्यासाठी आमच्याकडून अगोदरच बरीच किंमत खर्च केली जात आहे, बाजाराची परिस्थिती खालावत चालली असून त्याचा परिणाम आमच्या व्यवसायावर होत आहे. तसेच प्रकल्पाचा यापुर्वीचा दिर्घ कालावधी व याकामी स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी आमच्याद्वारे सादर केलेल्या Non-Exclusive दरांचा विचार करावा. तरी ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत सादर केलेल्या Non-Exclusive दरामध्ये कोणतेही बदल करु इच्छित नसल्याने आपल्या सहकार्याची अपेक्षा करत असल्याची विनंती केलेली आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे, श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी, संस्थानचे sai.org.in व mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा प्रसिद्ध करणेत आलेली होती. ई-निविदा विषयक जाहिरात दिल्ली, बैंगलौर, हैद्राबाद, चेन्नई व मुंबई या शहरांशी निगडीत इंग्रजी वृत्तपत्रामध्ये एक दिवस प्रसिद्ध करणेत आली होती. तसेच इकडील विभागाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार एकूण ३४ विविध टिव्ही चॅनेल्स व DTH ऑपरेटर्स यांना ई-निविदा विषयक ई-मेलद्वारे कळविणेत आलेले होते. परंतू निविदा सादर करणेस दोन वेळेस मुदतवाढ (दि.१७.०८.२०२० ते दि.०७.०९.२०२०) देऊनही फक्त M/s Tata Comm यांनीच निविदा सादर केलेली होती. तसेच त्यांनी यापुर्वी दिलेल्या दिर्घ सेवेचाही विचार करता येईल.

श्रींचे ऑनलाईन (Live) दर्शन सुविधा DTH (डिश टिव्ही) तसेच मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी M/s Tata Comm वगळता इतर पुरवठा धारकांकडून प्रतिसाद मिळत नाही. परंतू सदरची सुविधा टिव्ही चॅनेलवर उपलब्ध करुन देणेकामी या क्षेत्रातील पुरवठाधारकांकडून संस्थानकडे विचारणा होत असते. सबब, ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत M/s Tata Comm यांनी देऊ केलेल्या दराप्रमाणे त्यांना DTH (डिश टिव्ही) तसेच मोबाईल व इंटरनेटसाठी अनुक्रमे रक्कम रुपये ५०,००,०००/- व रुपये १,०५,००,०००/- प्रतिवर्ष Exclusive प्रकारचा व टिव्ही चॅनेलसाठी रक्कम रुपये ४,००,०००/- प्रतिवर्ष Non Exclusive या प्रकारचा कार्यादेश पुढील ०३ वर्षांकरीता देता येईल. जेणेकरून भविष्यात सदर सुविधा उपलब्ध करुन देणेकामी टिव्ही चॅनेलकरीता कोणी विचारणा केल्यास त्यांनाही याकामी कार्यादेश देता येईल व पर्यायाने साईभक्तांची सोय होऊन संस्थानला आर्थिक फायदाही होईल.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी, M/s Tata Comm यांनी दि.२४.०२.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे केलेल्या विनंतीनुसार ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत देऊ केलेल्या दराप्रमाणे त्यांना DTH

मुदतवाढ घेणेस असमर्थता दर्शविल्याने त्यांना याकामी देणे प्रस्तावीत असलेला कार्यादेश रद्द होणेकामी, दि.२६.०८.२०२० रोजीचे टिपणीअन्वये मान्यता घेणेत आलेली आहे.

मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२९ अन्वये, दिलेल्या निर्देशाप्रमाणे श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधा उपलब्ध करणेकामी दि.३१.०७.२०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, दि.१७.०८.२०२० ते दि.२३.०९.२०२० या कालावधीत खरेदी नियमावलीस अधीन राहून दोन वेळेस मुदतवाढीसह ई-निविदा प्रसिद्ध करणेत आली होती. ई-निविदा प्रकियेअंतर्गत प्राप्त झालेली एक ई-निविदा खरेदी नियमावली मुद्दा क्र.४.४.३.१ यास अधिन राहून उघडणेकामी दि.२०.१०.२०२० रोजीचे टिपणीअन्वये मान्यता घेणेत आली होती. सदर मान्यतेन्वये, ई-निविदेची तांत्रिक ई-निविदा दि.०४.११.२०२० रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेसमोर उघडणेत आलेली असून वाणिज्यीक ई-निविदा मा.खरेदी समितीचे दि.१६.१२.२०२० रोजीचे सभेसमोर उघडणेत आलेली आहे. उघडणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदेचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Particular | DTH | | TV Channel | | Mobile & Internet | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Non-Exclusive | Exclusive | Non-Exclusive | Exclusive | Non-Exclusive | Exclusive |
| 01 | Live Darshan (Temple Open Time) | 25,00,000 | 50,00,000 | 4,00,000 | 5,00,000 | 35,00,000 | 1,05,00,000 |
| 02 | Kakad Aarti | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 03 | Noon Aarti | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 04 | Dhoop Aarti | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 05 | Shej Aarti | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 06 | All (4) Aartis | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 3 Years Total Amt | | 75,00,000 | 1,50,00,000 | 12,00,000 | 15,00,000 | 1,05,00,000 | 3,15,00,000 |

M/s Tata Comm यांनी ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत देऊ केलेल्या दराबाबत त्यांचेबरोबर चर्चा-विनिमय होऊन, त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामीचा दि.१८.१२.२०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर मा.तदर्थ समितीचे दि.१९.१२.२०२० रोजीचे Microsoft Team द्वारे Online झालेल्या सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी, M/s Tata Comm यांना एक महिना मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आली. तसेच याबाबत दर मागवून अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करण्यात यावा, असे निर्देश देणेत आलेले आहेत.

दरम्यानचे कालावधीमध्ये नविन पुरवठाधारकाची नेमणूक निर्धारीत वेळेत होणे शक्य नसल्याने, M/s Tata Comm यांना मा.तदर्थ समितीचे दि. २८.०८.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४४० अन्वये, दि.३०.०९.२०२० अखेर व दि.२२.०९.२०२० रोजीचे चक्रीय पद्धतीने घेणेत आलेल्या मान्यतेन्वये, तीन महिने (ऑक्टोबर ते डिसेंबर-२०२०) असे एकूण चार महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेकामी संदर्भ क्र.०८ अन्वये, कार्यादेश देणेत आलेले होते. दि.२२.०९.२०२० रोजीचे चक्रिय पद्धतीने घेणेत आलेल्या सदर मान्यतेचे मा.तदर्थ समितीचे दि.११.१२.२०२० रोजीचे सभेमध्ये अवलोकन होऊन नि.क्र.४५५/११ अन्वये नोंद घेणेत आली आहे.

मा.तदर्थ समितीचे दि.१९.१२.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८१ नुसार, M/s Tata Comm यांना एक महिना (दि.०१.०१.२०२१ ते ३१.०१.२०२१) मुदतवाढ देणेकामी इकडील विभागाचे दि.२६.०१.२०२१ रोजीचे टिपणीने संदर्भ क्रं.१० नुसार कार्यादेश देणेत आला. तसेच, सदर निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार M/s Tata Comm यांचेमार्फत याकामीचे सुधारीत दर (प्रस्ताव) मागविणेकामी दि.११.०२.२०२१ रोजीचे टिपणीअन्वये मान्यता घेणेत आली होती. सदर मान्यतेन्वये, M/s Tata Comm यांना दि.२३.०२.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे उच्चत्तम सुधारीत दर देणेबाबत

7588

विषय क्र.- 9/१५५

620

## मा.तदर्थ समितीपुढे चक्रिय पद्धतीने सादर
### माहिती तंत्रज्ञान विभाग

**विषय :- श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत मा.तदर्थ समितीचे निर्देशान्वये, M/s Tata Comm., Mumbai यांचेकडून मागविणेत आलेल्या सुधारीत दराचे प्राप्त ई-मेलबाबत....**

टिपणी,

**अधिनियम २००४ मधील तरतुद :-** कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य/समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा.व्य.समितीचा ठराव क्र. :-**
०१. दि.२८.०४.२०१७ निर्णय क्र.३२२ (१३)
०२. दि.११.०५.२०२० निर्णय क्र.२६१, २६२.
०३. दि.०९.०६.२०२० निर्णय क्र.३०६ (०२), ३२९.
०४. दि.२८.०८.२०२० निर्णय क्र.४४०.
०५. दि.२२.०९.२०२० रोजीची चक्रीय पद्धतीने मान्यता.
०६. दि.११.१२.२०२० निर्णय क्र.४५५/११.
०७. दि.१९.१२.२०२० निर्णय क्र.५८१.

**प्रास्ताविक :-** साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) दर्शन DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी संस्थानचे विहित पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती. ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०४.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२२ (१३) अन्वये, M/s Tata Comm., Mumbai व M/s Associated यांना दि.०१.०६.२०१७ ते दि.३१.०५.२०२० या कालावधीकरीता याकामी कार्यादेश देणेत आलेले होते.

M/s Tata Comm व M/s Associated यांना देणेत आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१.०५.२०२० अखेर संपुष्टात येत असल्याने याकामी प्रचलीत पद्धतीनुसार ई-निविदा राबविणेस मान्यता मिळणेकामी दि.२०.०३.२०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर मा.तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.२६१ अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देणेत आलेले होते. "श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) DTH (डिश टिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी Exclusive rights व Non-Exclusive rights देणेबाबत अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे ठेवणेत यावा." सदर निर्देशाप्रमाणे, दि.३०.०५.२०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, याकामी सादर करणेत आलेल्या सुधारीत प्रस्तावास मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रमांक ३२९ अन्वये मान्यता देणेत आली.

मा.तदर्थ समितीचे उपरोक्त निर्णयान्वये ई-निविदा प्रक्रिया राबवून नविन पुरवठाधारकाची नेमणूक निर्धारीत कालावधीत होणे शक्य होणार नव्हते. सबब, नविन पुरवठाधारकाची नेमणूक होईपर्यंत सदरची सुविधा सुरळीत सुरू राहणेकामी M/s Tata Comm व M/s Associated यांना देण्यात आलेल्या कार्यादेशामध्ये नमुद वार्षिक दर व अटी/शर्तीप्रमाणे तीन महिने (जुन ते ऑगष्ट) कालावधीकरीता मुदतवाढ देणेस मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३०६ (०२) अन्वये मान्यता देणेत आलेली होती.

उपरोक्त मान्यतेप्रमाणे M/s Associated व M/s Tata Comm यांना तीन महिने कालावधी (दि.०१.०६.२०२० ते दि.३१.०८.२०२०) साठी मुदतवाढ देणेकामीचे अनुक्रमे जा.न.एसएसएसटी/वशी-आयटी/६७५ ते ६७८/२०२०, दि.१३ जुलै, २०२० चे कार्यादेशाची स्कॅन कॉपी ई-मेलद्वारे पाठविणेत आलेली होती. त्यानुसार M/s Tata Comm यांनी सदर कार्यादेशास स्विकृती दर्शविलेली होती. परंतू M/s Associated यांनी ई-मेलद्वारे दि.०१.०६.२०२० पासून पुढील कालावधीसाठी

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि. ०७/०६/२०२१



**विषय : मध्यवर्ती पानमळा गोडाऊनचे इमारतीस सात नग नवीन ॲटोमॅटिक (मोटराईज्ड) शटर्स बसविणेकामी येणाऱ्या रक्कम रुपये ५,४१,०००/- मात्रचे खर्चास तसेच याकामी ई-निविदा बोलविणेस मान्यता मिळणेबाबत. . .**

सदरचा प्रस्ताव वाचला. प्रस्तावाचे अवलोकनावरुन असे दिसून येते की शटर्स ओढण्यासाठी कष्ट लागतात त्यामुळे ५,४१,०००/- रुपये खर्च करणे म्हणजे सद्यपरिस्थिती पाहता अनाकलनीय आहे. नमूद केल्याप्रमाणे शटर्स खराब झाले असल्यास त्याबाबत दुरुस्तीचा प्रस्ताव सादर करणे उचित होईल.

सबब, माझेतर्फे प्रस्ताव अमान्य करण्यात येते.

07/06/2021

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि. ०७.०६.२०२१

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय, दि. 30/04/2021 618

**विषय – मध्यवर्ती पानमळा गोडाऊनचे इमारतीस सात नग नवीन ॲटोमॅटिक (मोटराईज्ड) शटर्स बसविणेकामी येणा-या रक्कम रुपये 5,41,000/- मात्रचे खर्चास तसेच याकामी ई-निविदा बोलाविणेस मान्यता मिळणेबाबत...**

सदरचा विषय दि. 22/03/2021 रोजी तयार केलेला दिसून येतो. मात्र हा विषय निम्न स्वाक्षरीदार यांचे पुढे आज दिनांक 30 एप्रिल 2021 रोजी आणलेला आहे. त्यावर तदर्थ समितीचे सन्माननीय सदस्य श्री. पालवे यांनी दिनांक 27/04/2021 रोजी स्वाक्षरी केल्याचे दिसून येते. संपूर्ण विषयाचे वाचन केले. शटर्स ओढायला कष्ट होतात म्हणून ते बदलून सुमारे 5,41,000/- रुपये खर्च करणे अनाकलनीय आहे. सदरचे शटर्स खराब झाले असल्यास त्यांची दुरुस्ती करण्याबाबत प्रस्ताव ठेवावा. नवीन ॲटोमॅटिक (मोटराईज्ड) शटर्स बसविण्याचा प्रस्ताव अनावश्यक वाटतो, करिता माझेतर्फे नामंजूर.

(श्रीकांत एल. आणेकर)
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर**
**तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी**

**दिनांक – 30/04/2021**

163

617

प्रस्ताव : तरी पानमळा गोडावून इमारती करीता नवीन सात नग ऑटोमॅटिक (मोटराईज्ड) शटर्स खरेदीकरून बसविणेकामी विहीत पद्धतीने ई-निविदा बोलावुन खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रु. 5,41,000/- पर्यंतच्या खर्चास चक्रिय पद्धतीने मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

निर्णय – उपरोक्त प्रस्तावात चक्रिय पद्धतीने मान्यता देण्यात आली.

(श्रीमती गीता प्रविण बनकर)
सहा. धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानुदास पालवे)
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सचिव तदर्थ समिती.

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष तदर्थ समिती

विषय क्र.- ९ / १५४

# मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय



## मेकॅनिकल विभाग

## टिपणी

**विषय : मध्यवर्ती पानमळा गोडवुनचे इमारतीस सात नग नवीन ॲटोमॅटिक (मोटराईज्ड) शटर्स बसविणेकामी येणा-या रक्कम रूपये 5,41,000/- मात्रचे खर्चास तसेच याकामी ई-निविदा बोलाविणेस मान्यता मिळणेबाबत ...**

संदर्भ : भांडार विभागाकडील दिनांक 05 जानेवारी, 2021 रोजीचे पत्र.

मान्यतेकरीता सविनय सादर,

**अधिनियम 2004 मधील तरतूद :** कलम 14 (2) (घ) भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरूस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.

**प्रस्तावना :** भांडार विभागाकडील माल ठेवणेकामी साईनिवास अतिथिगृह शेजारी मध्यवर्ती भांडार व पानमळा रोड वरील पानमळा गोडावुन वापरात आहेत. त्या पैकी पानमळा गोडावुन इमारती करीता 14' x 16' या साईजचे सात शटर्स (मॅन्युअल ऑपरेटिंग) सन 2005 साली बनविणेत आलेली आहे. सततचे वापराने शटर्स खराब झालेले असुन त्यांची वारवांर दुरुस्ती करावी लागते. तसेच सदरचे शटर्स मोठया आकाराचे व हेवी असल्याने ते उघडणे , बंद करणेस कर्मचारी यांना त्रासदायक होत असल्याने सदरचे शटर्स काढुन त्या जागी नवीन ॲटोमॅटिक (मोटराईज्ड) शटर्स बनविणेबाबत भांडार विभागाने संदर्भीय पत्राव्दारे कळविले आहे.

**मागणी :** उपरोक्त प्रमाणे पानमळा गोडावून इमारती करीता नवीन ॲटोमॅटिक (मोटराईज्ड) शटर्स बनविणेकामी इंटरनेटव्दारे ॲटोमॅटीक शटर्स सप्लायर यांचेकडुन माहीती घेतली असता त्यांनी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Material | Total Sq. ft. | Qty | Rate Rs. | Total Amount with GST |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Providing and Fixing motorized rolling shutter fabricated from G. I. laths of minimum thiknes 0.9 mm with side gide 75 x 3 mm thick , bottom super round of 3.15 mm thickness reinforced with 40 x 40 x 5 mm angle section filted with sliding bolts and handles for both sides deep channles section of depth and thickness not less than 65 mm & 3.15 mm respectively with hold fast arrangement. G. I. Bracket plate 18 inch x 4 mm minimum size .Shaft of minimum dia. 6 inch x 3 mm. Hood cover of G. I. sheet not less than 0.9 mm thicknes spring in high tension coil,.and one coat of red oxide, primer complete . | 14, x 16' = 224 Sq.ft. | 7 | 215/- Sq. ft | 331000.00 |
| 2. | JEILONG Make motor with lifting capacity up to 1000 kg, single phase with two rotation direction power supply - 230 V AC 50/60 HZ, power KW - 1.5 protection IP with remote control and manual push Buton, manual operate in case power failure. | - | 7 | 30000.00 each | 210000.00 |
| | | | | Total Amount Rs. | 541000.00 |

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :** पानमळा गोडावुन इमारतीचे शटर्स हे सततचे वापराने खराब झालेली असुन ती बदलने आवश्यक आहेत. याकामी अंदाजे रक्कम रुपये 5,41,000/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. याकरीता मा. तदर्थ (Ad - hoc) समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे. मा. तदर्थ समितीचे मान्यते नंतर महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ई निविदा व जाहीरात अपलोड करुन ई-निविदा मागविता येतील.

पान नंबर 2 वर...

**विषय : संस्थानच्या निधीतून शिर्डी नगरपंचायत करिता गॅस दाहिनी खरेदी करणेकामी प्राप्त ई निविदेतील निम्मतम दरधारक मे. कल्याणी एन्टरप्राईजेस, पुणे यांचेकडून ई मेल द्वारे दर कमी करणेबाबत विचारणा करुन प्राप्त दर शासन खरेदी नियमावलीच्या तरतूदी नुसार १० टक्के मर्यादेत आल्यास मा. मुख्या कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर कार्यादेश देणेस अथवा फेर ई निविदा काढणे याबाबत मर्जीनुरुप आदेश होणेकामी विषयाची टिपणी तदर्थ समिती सभेसमोर मान्यतेसाठी चक्रिय पध्दतीने सादर करणेस मान्यता मिळणेबाबत . . .**

सदरच्या प्रस्तावामध्ये नमूद केल्याप्रमाणे टेंडर काढणे ही बाब विचारात घेता सद्य परिस्थिती (कोवीड-१९) वेळखावूपणाचे आहे. गॅस दाहिनी मंजूर करतांना जो हेतू विचारात घेतला होता तोच हेतू मुळातच निष्फळ होतांना दिसत आहे. त्यामुळे सन्माननिय मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निम्मतम दरधारक पुरवठादार यांचेशी चर्चा /वाटाघाटी करुन इस्टीमेंट कॉस्टच्या जास्तीत जास्त १० टक्कापर्यंत सदर गॅस दाहीनी देण्यास विंनती करावी. त्यास अनुसरुन जर संबंधित पुरवठादार दर कमी करण्यास तयार होत असतील तर शासन निर्णयातील तरतुदीनुसार अंदाजित किमतीच्या १० टक्क्याचे मर्यादेत न्यूनतम दरधारकाने दर दिल्यास सन्माननिय मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तसा कार्यादेश द्यावा. परंतू जर संबंधित पुरवठादार जर तशी विनंती मान्य करत नसेल तर तो किती टक्केपर्यंत निम्मत्तम दर देवून गॅस दाहिनी देण्यास तयार आहे हयाबाबत संबंधित पुरवठादार यांचेकडून स्पष्ट विचारणा करुन घ्यावी व त्याबाबत त्याचेकडून लिखित स्वरुपात घ्यावे. तसेच सद्यपरिस्थितीनपूसार आवश्यकता पाहता मा. उचच न्यायालय यांचेकडे सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करुन लवकरात लवकर गॅस दाहिनी बसविण्याची व्यवस्था करावी.

11/05/2021

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि. ११.०५.२०२१

**चक्रीय पध्दतीने आणलेल्या विषयावर निर्णय** 614
**दि. 10/05/2021**

**विषय – संस्थानच्या निधितून शिर्डी नगरपंचायत करिता गॅस दाहिनी खरेदी करणेकामी प्राप्त ई निविदेतील निम्नतम दरधारक मे. कल्याणी एन्टरप्राईजेस, पुणे यांचेकडून ई मेल द्वारे दर कमी करणेबाबत विचारणा करुन प्राप्त दर शासन खरेदी नियमावलीच्या तरतूदी नुसार 10टक्के मर्यादेत आल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर कार्यादेश देणेस अथवा फेर ई निविदा काढणे याबाबत मर्जीनुरुप आदेश होणेकामी विषयाची टिपणी तदर्थ समिती सभेसमोर मान्यतेसाठी चक्रिय पध्दतीने सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्तावातील नमूद परिस्थिती पहाता, पुन्हा टेंडर काढणे हे सद्याच्या कोव्हीड-19 च्या परिस्थितीत वेळखाऊपणाचे आहे. ज्या कारणासाठी गॅस दाहिनी मंजूर करण्यात आली होती तोच हेतू मुळात विफल होताना दिसत आहे. अशा परिस्थितीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निम्नतमदर धारक पुरवठादार यांच्याशी वाटाघाटी करुन ईस्टीमेटेड कॉस्टचे जास्तीचे 10टक्के पर्यंत निम्नतम दरधारकास सदर गॅस दाहिनी देण्याबाबत विनंती करावी. जरका सदर पुरवठादार दर कमी करण्यास तयार असेल तर शासन निर्णयातील तरतूदीनुसार अंदाजित किमतीच्या 10टक्क्याचे मर्यादेत न्यूनतम दरधारकाने दर दिल्यास त्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यादेश द्यावा. जर अशी विनंती त्यांनी मान्य केली केली नाही तर सदर दरधारक किती टक्केपर्यंत खाली येऊन सदर गॅस दाहिनी देण्यास तयार आहे ही बाब स्पष्ट करुन त्याच्याकडून तसे लिखित स्वरुपात घेवून सद्याची निकड पाहता मा. उच्च न्यायालयासमक्ष सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करुन मान्यता घ्यावी व लवकरात लवकर गॅस दाहिनी बसविण्याची व्यवस्था करावी.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 10/05/2021

ई निविदा प्रक्रियातील तांत्रिक दृष्टया पात्र निविदाधारकांनी दिलेल्या दराचा तपशिल

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | ई निविदेतील प्राप्त दर रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. अल्फा इक्युपमेंटस, बडोदा | १,०३,५०,०००/- | L3 |
| २ | मे. कल्याणी एन्टरप्राईजे, पुणे | ७४,२७,०००/- | L1 |
| ३ | मे. चिरंतन उद्योग, ठाणे | ८९,२४,०००/- | L2 |
| ४ | मे. मायक्रोटेक्नीकल, अंबाला, हरियाना | १११२७५०५/- | L4 |

उपरोक्त तपशिलानुसार संस्थानमार्फत एक गॅस क्रिमॅटोरीयम खरेदी करुन नगरपंचायतीचे मालकीचे हिंदु स्मशानभुमीमध्ये उभारणी करणेकामी मे. कल्याणी एन्टरप्राईजेस, यांचे रक्कम रु. ७४,२७,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चौ-याहत्तर सत्तावीस हजार) मात्र निम्नत्तम आहे. निम्नत्तम पुरवठादार यांचे दर मंजूर इस्टेमेट रक्कमेपेक्षा रक्कम रुपये १६,५३,६८७/- (२८.६५%) जास्त आहे.

*शासन निर्णय क्रं. भांखस-२०१४/प्र.कं. ८२/भाग –III/उद्योग -४ दिनांक १ डिसेंबर २०१६ मधील खरेदी नियमावली ३.१.२.१ खरेदी प्रक्रिया हि अंदाजित किंमत आणि त्यानंतर प्रत्यक्ष द्यावी लागणा-या किंमती भोवती फिरत असते. दरांचा / किमंतीचा अचुक अंदाज हा पुरवठादाराकडून प्राप्त झालेल्या देकारांचा वाजवीपणा निश्चित आणि स्थापित करण्यासाठी आवश्यक असतो. त्यामुळे दर / किमंत हे वास्तव, वस्तुनिष्ठ, बाजार किंमतीनुसार आणि व्यवसायिक पद्धतीने काढणेत यावेत. अंदाजित किंमत आणि आणि प्रत्यक्ष द्यावी लागणारी किंमत यामध्ये मोठी तफावत असू शकणार नाही, यावर भर देण्यात यावा. खरेदीची वास्तविक किंमत व अंदाजित किंमत यामध्ये (-) २०% ते (+) १०% तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदारास विचार करता येईल. तथापि खरेदीची अंदाजित किमंत व प्रत्यक्ष द्यावी लागणारी किंमत यामध्ये जास्त तफावत आढळल्यास, संबंधित खरेदीदार विभागाने नव्याने निविदा काढणे आवश्यक राहील. त्यानंतरही त्यामध्ये तफावत आढळलेस एक उच्चस्तर प्राधिका-याची मान्यता घेण्यात यावी.* असे नमुद केलेले आहे.

प्रस्ताव :- न्युनत्तम दरधारकाकडुन ई मेल द्वारे दर कमी करणेबाबात विचारणा करुन पुरवठादार दर कमी करण्यास तयार असल्यास ई मेलद्वारे कमी केलेले दर प्राप्त करुन घेऊन शासन निर्णयातील तरतुदीनुसार अंदाजित किंमतीच्या १०% च्या मर्यादेत न्युनत्तम दरधारकाचे दर आल्यास त्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर कार्यादेश देणेस मान्यता अन्यथा प्रस्तुत ई निविदा प्रक्रिया रद्द होऊन फेर ई निविदा काढणेकामी मा. तदर्थ समितीची चक्रिय पद्धतीने मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

7/5/24

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

---

निर्णय – उपरोक्त प्रस्तावास चक्रिय पद्धतीने मान्यता देण्यात आली.

मा. अध्यक्ष, तदर्थ समिती, तथा प्रमुख जिल्हा न्यायाधिश यांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे

(श्रीमती गीता प्रविण बनकर)
सहा. धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(श्री भानुदास पालवे, भा.प्र.से.)
अप्पर महसूल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

7/5/24

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी
सचिव, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती



ERP— 111

ERP— 111

विषय क्र.- ७१५५३

# मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढील विषयाची टिपणी

612

## मेकॅनिकल विभाग

**विषय :- संस्थानच्या निधितुन शिर्डी नगरपंचायत करीता गॅस दाहीनी खरेदी करणेकामी प्राप्त ई निविदेतील निम्नत्तम दर धारक मे. कल्याणी एन्टरप्राईजेस, पुणे यांचेकडून ई मेल द्वारे दर कमी करणेबाबत विचारणा करुन प्राप्त दर शासन खरेदी नियमावलीच्या तरतुदीनुसार १०% मर्यादेत आल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर कार्योदेश देणेस अथवा फेर ई निविदा काढणे याबाबत मर्जीनुरुप आदेश होणे कामी विषयाची टिपणी तदर्थ समिती सभेसमोर मान्यतेसाठी चक्रिय पद्धतीने सादर करणेस मान्यता मिळणे बाबत ...**

**टिपणी –**

| | | |
|---|---|---|
| ०१ | **कामाचे नाव** | संस्थानच्या निधितुन शिर्डी नगरपंचायत करीता गॅस दाहीनी खरेदीस व कार्यान्वित करुन देणे |
| ०२ | **प्रशासकिय मान्यता** | मा. तदर्थ समिती दिनांक ११.१२.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं ४५५/१८ |
| | | मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांची दिनांक १४ जानेवारी २०२१ रोजीची मान्यता |
| | | शासन निर्णय क्रं. सांसवि-१०२१/२५६/प्र.क्र. ७७/का.१६ दिनांक ४/०५/२०२१ रोजीची महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांची मान्यता |
| ०३ | **अंदाजे खर्च** | रु. ५७,७३,३२२/- |
| ०४ | **प्रस्तावाची थोडक्यात माहीती** | मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दिनांक १.१०.२०२० रोजीचे पत्रान्वये " अहमदनगर जिल्हामध्ये कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव वाढत असून दैनंदिनरित्या मोठया प्रमाणावर नागरिकांना कोरोनाची बाधा होत असल्याने जिल्हासाठी एक गॅस क्रिमॅटोरियम श्री साई संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे निधीतून शिर्डी मध्ये उपलब्ध करुन देणेत यावे " असे कळविलेले होते. त्यानुसार संस्थानमार्फत एक गॅस क्रिमॅटोरीयम खरेदी करुन नगरपंचायतीचे मालकीचे हिंदु स्मशानभुमीमध्ये उभारणी करणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास तसेच गॅस क्रिमॅटोरीयम उभारणी झालेनंतर शिर्डी नगरपंचायत यांचे कडे हस्तांतरीत करणेस मा. तदर्थ समितीची मान्यता घेणेत आलेली आहे |
| ०५ | **ई निविदा तपशिल** | ई निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर अपलोड करण्यात आली होती. ई निविदा अपलोड करणेची मुदत दिनांक २२.४.२०२१ ते दिनांक २९.०४.२०२१ पर्यंत देणेत आली होती. पाच इ निविदा प्राप्त झालेल्या आहे. |
| | **I. कामाची मुदत** | ३० दिवस |
| | **II. तांत्रिक निविदा उघडणेची दिनांक व वेळ** | दिनांक ३/०५/२०२१ रोजी सांय ५.३० वाजता. |
| | **III. प्राप्त ई निविदा** | ०५ |
| | **IV. प्राप्त ई निविदाधारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलॉईन जमा केलेले आहेत का?** | प्राप्त ५ ई निविदा पैकी मे. व्हिजन एन्टरप्राईजेस पुणे यांची वार्षिक उलाढाल ६० लाख (मागील तीन वर्ष सरासरी ) पेक्षा कमी असलेने ते अपात्र झाले. |
| | **V. सर्व निविदाधारकांनी EMD भरलेले कागदपत्रे जमा केलेले आहेत का ?** | होय |

**पुढिल पानावर ..**

मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांना AMC करीता कार्यादेश देणेकामी तसेच AMC कामी वार्षिक रक्कम रुपये ६,१०,५००/- + टॅक्सेस याप्रमाणे अदा करणेसाठी मा. तदर्थ (Ad-hoc) समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे.

**प्रस्ताव** :- साईआश्रम भक्तनिवास येथील A, B व C इमारतीतील ए.सी. यंत्रणेचे पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी (दिनांक ०१/०४/२०२१ ते दिनांक ३१/०३/२०२२ पर्यंत) उत्पादक कंपनी मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि., पुणे. यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी येणा-या रुपये ६,१०,५००/- + टॅक्सेस खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णायार्थ सादर.

31/3/21

(कान्हूराज बगाटे, भाप्रसे)
मुख्य-कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

निर्णय- उपरोक्त प्रस्तावास चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आली.

11/05/2021

( श्रीमती गीता प्रविण बनकर )
सहा. धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

( भानुदास पालवे ) 18/5/2021
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नासिक
सदस्य, तदर्थ समिती

31/3/21

(कान्हूराज बगाटे, भाप्रसे)
मुख्य-कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सचिव तदर्थ समिती

( श्रीकांत आणेकर ) 18/5
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश , अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

D:\Mechanical Dept\AC\Tender Tippani & Notice Draft\Sai Ashram VRV System

ERP- 112

विषय क्र.- 9/942

610

# मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय

## मेकॅनिकल विभाग

टिपणी

विषय : **साईआश्रम भक्तनिवास येथील A, B व C इमारतीचे ए.सी. यंत्रणेचे सन २०२१-२०२२ वर्षाकरीता मे. डायकिन एअर कंडीशनींग इंडीया प्रा. लि., यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देणेसाठी मान्यता मिळणेबाबत ...**

संदर्भ : देणगीदार साईभक्त श्री के.व्ही. रमणी यांचे शिर्डी साई ट्रस्ट्, चेन्नई यांचेकडून मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि., पुणे यांना दिलेला दिनांक १६/०८/२०१२ रोजीचा कार्यादेश क्र. एसएसटी/५४० दिनांक १६ ऑगष्ट, २०१२

मान्यतेकरीता सविनय सादर,

**अधिनियमामधील तरतूद २०१४** : (१) कलम २(१४)(घ) - भक्तांचे सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे (२) कलम २१(१)(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

**प्रस्तावना** : शिर्डी साई ट्रस्ट्, चेन्नई यांचेमार्फत देणगीदाखल साईआश्रम भक्तनिवास येथे A,B,C या तीन इमारतीमध्ये प्रत्येकी १२८ रुम नुसार एकूण ३८४ रुममध्ये एकुण रक्कम रूपये १,५३,२८,२९६/- मात्र रक्कमेची डायकीन कंपनीचे VRV (Variable Refrigerant Volume) टाईप ए. सी. यंत्रणा बसवून दिलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| Sr. No. | Description | Capacity | Qty |
|---|---|---|---|
| 1. | Indoor - 1.33 TR - Model No. FXAQ40 | 1.33 TR | 288 |
| 2. | Indoor - 1.67 TR - Model No. FXAQ50 | 1.67 TR | 96 |
| 3. | Indoor - 10 TR - Model No. RXYQ12PRY6 | 12 hp | 48 |

सदरची यंत्रणा दिनांक ११/०१/२०१३ रोजीपासून कार्यान्वित झालेली आहे. शिर्डी साई ट्रस्ट्, चेन्नई व डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांचेत सदर यंत्रणा बसविणेकामी दिलेल्या कार्यादेशाच्यावेळी करण्यात आलेल्या करारनाम्यात खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

**"Cost of Annual Maintenance Charges (AMC) after the warranty period, will be Rs. 6,10,500/- per year. The AMC will be comprehensive and will include cost of labour and parts. Other Taxes on the AMC Charges will be paid at actuals. The AMC Price will remain fixed and confirmed as valid for 8 years after warranty, by Dalkin (i.e.) 10 years from the date of acceptance of the installation."**

उपरोक्त नमूद करारनाम्यातील अटी व शर्तींनुसार तसेच मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दिनांक – २७/०३/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. १९२ अन्वये साईआश्रम भक्तनिवास येथील A, B व C इमारतीतील VRV ए.सी. यंत्रणेचे एक वर्षे (दिनांक ०१/०४/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२१ ) कालावधीसाठी मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि., पुणे यांना इकडील जा.नं.एसएसएस/वशी/मेकॅनिकल/३०१/२०२०दिनांक ०१/०६/२०२० अन्वये वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) करीता कार्यादेश देण्यात आलेला आहे.

**मागणी** : मे. डायकीन एअर कडीशनिंग इंडिया प्रा. लि., पुणे यांना देण्यात आलेल्या AMC कार्यादेशाची मुदत दिनांक ३१/०३/२०२१ रोजी संपुष्टात येत असून, त्यापुढील एक वर्ष कालावधीकरीता त्यांना AMC देणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय** - शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांच्यात झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्थीनुसार वारंटी कालावधी संपलेपासून पुढील 8 वर्षाचे कालावधीसाठी वार्षिक ए.एम.सी. करीता प्रत्येक वर्षी रक्कम रुपये ६,१०,५००/- + टॅक्सेस याप्रमाणे दर निश्चिती करण्यात आली आहे. या ८ वर्ष कालावधीपैकी ६ वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला असून, पुढील २ वर्षाचा कालावधी बाकी आहे. प्रत्येक वर्षी ए.एम.सी. कामी अदा करावयाची रक्कम निश्चित करण्यात आलेली असल्याने, AMC करीता पुढील एक वर्ष कालावधीसाठी (दिनांक ०१/०४/२०२१ ते दिनांक ३१/०३/२०२२ पर्यंत) कार्यादेश देणे आवश्यक आहे.

पान नं. 2 ... वर

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय
दि. 09/03/2021

**विषय – लाडू प्रसाद निर्मिती विभागाकरिता अद्ययावत नवीन मशिनरी खरेदी करणेबाबत...**

संपूर्ण विषय वाचला. संबंधीत टिपणीचे वाचन केले. मुळातच शिर्डी संस्थान मधील लाडू बनविण्याच्या पध्दतीची श्री. तिरुपती देवस्थान मधील लाडू बनविण्याच्या पध्दतीशी तुलना करुन हा प्रस्ताव आणलेला दिसून येतो. मात्र सद्या उपयोगात असलेली यंत्रणा कुचकामी आहे किंवा त्याचा दर्जा चांगला नाही, असे संस्थान प्रशासनाचे मत नाही.

तसेच सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे मोठया प्रमाणावर बुंदी तयार करणेकामी मशिनरी घेत असतांना त्याच प्रमाणात मनुष्यबळ कमी होणार आहे, असेही संस्थान प्रशासनाचे म्हणणे नाही. अशा परिस्थितीत उत्पादन क्षमता वाढविणे हाच हेतू डोळयासमोर ठेवणे सर्वथा अयोग्य आहे. अशा परिस्थितीत सद्या वापरात असलेल्या यंत्रणेत बदल करण्याचे डोळयासमोर ठेवून सुमारे 2 कोटींचे आसपासचा खर्च करणे मला कोव्हीड-19 महामारीच्या पार्श्वभूमिवर संयुक्तिक वाटत नाही व अनाठायी वाटतो, करिता हा प्रस्ताव माझेतर्फे नामंजूर.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 09/03/2021

**चक्रीय पध्दतीने आणलेला विषय**

**दि. ०९.०३.२०२१**

विषय : लाडू प्रसाद निर्मिती विभागाकरिता अद्ययावत नवीन मशिनरी खरेदी करणेबाबत..

| 03 | | M/s Pyramid Solutions Pvt Ltd | 18,23,444.00 |
| 04 | | M/s Uday Network Technologies | 16,67,400.00 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याप्रमाणे ०१ नग Firewall खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या दरांपैकी M/s Gowra Bits & Bytes Pvt Ltd., यांनी देऊ केलेले दर रक्कम रुपये १४,१२,१४३ + कर हे निम्नत्तम आहेत. याकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत मे.टिसीएस यांनी ०१ नग Firewall ची अंदाजे किंमत माहे एप्रिल, २०२० मध्ये रक्कम रुपये ३५,००,०००/- मात्र इतकी कळविलेली होती. परंतू ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त झालेले निम्नत्तम दर हे रक्कम रुपये १४,१२,१४३/-+कर मात्र, हि अंदाजे रकमेपेक्षा खुपच कमी आहे. याबाबत मे.टिसीएस यांना दि.२४.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे विचारणा केली असता, त्यांनी पुढीलप्रमाणे ई-मेलद्वारे कळविलेले आहे.

Please find our observations below.

- Firewall Budgetary cost was collected in April 2020 from 2 vendors (Uday Networks and GBB) and respective OEMs (Palo Alto and Fortinet).
- Fortinet budgetary cost is higher due to additional hardware involved to perform Analyzer, IDS/IP activities.
- Due to advancement in technology, Analyzer and IDS/IPS activities can be performed using their proprietary software on servers/cloud instead of special hardware from OEM.

During technical evaluation, we have verified the technical compatibility and performance metrics are as per the tender specifications.

Similarly, we will evaluate the vendor deployment is done based on the technical specifications listed in the tender.

Also, as per the discussion with the vendor

- In order to derive the best price, instead of quoting special OEM hardware for Analyzer, they have quoted for an additional DELL server to host the software provided by OEM along with the tender specified Firewall (FG-600E). And confirmed there will not be any deviation on the Tender specifications / performance.

- Initially budgetary price was offered considering standard discount, at the time of bidding with special approval from the OEM management substantial discount was offered keeping in mind Shirdi and also considering the long term business relationship to continue.

मे.टिसीएस यांनी उपरोक्त ई-मेलमध्ये नमुद केलेप्रमाणे Firewall खरेदी करणेची अंदाजीत रक्कम हि एप्रिल २०२० मध्ये पुरवठाधारकांकडून प्राप्त झालेली आहे. त्यावेळी Fortinet या Firewall मध्ये वारणेत येणा-या तंत्रज्ञानानुसार काही अतिरीक्त Hardware वापरणेत येत होते. परंतु तंत्रज्ञानामध्ये झालेल्या सुधारणेमुळे Firewall मध्ये Analyzer and IDS/IPS या प्रक्रियांकरिता Hardware ऐवजी Software चा वापर करणे शक्य झालेले आहे.

ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत तांत्रिक निविदांचे तांत्रिक मुल्यांकणाप्रमाणे निविदाकारांनी देऊ केलेल्या Firewall च्या सर्व तांत्रिक बाबी निविदेत नमुद केलेप्रमाणे आढळून आलेल्या आहेत.

मे.टिसीएस यांनी याबाबत निम्नत्तम दरधारक निविदाकारांबरोबर चर्चा केली असता, निविदाकारांनी Firewall चे अनषंगिक प्रणाली कार्यान्वीत करणेकरिता उत्पादक कंपनीचे विशिष्ट Hardware वापरणेऐवजी त्याच क्षमतेचे Dell या कंपनीचे Server देऊ केलेले आहेत. तसेच संस्थानसाठी त्यांनी उत्पादक कंपनीकडून अधिकची सवलत प्राप्त करुन घेतलेली आहे.

सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेले Firewall हे कालबाह्य झालेले असल्याने सुरक्षीततेच्या दृष्टीने नविन Firewall खरेदी करुन कार्यान्वीत करणे अत्यावश्यक आहे.

सबब, याकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत M/s Gowra Bits & Bytes Pvt Ltd., यांनी देऊ केलेले दर रक्कम रुपये १४,१२,१४३ + कर हे अंदाजीत किंमतीपेक्षा नक्कीच कमी आहेत, संस्थानचे दृष्टीने हे आर्थिक हिताचे आहे. सबब, M/s Gowra Bits & Bytes Pvt Ltd., यांना याकामी पुरवठा आदेश देता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी :-** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे मा.तदर्थ समितीचे दि.१३.०७.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०५ अन्वये माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हरवरील माहिती व प्रणालीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने कार्यान्वीत असलेला Firewall कालबाह्य झाल्याने नविन एक नग Firewall खरेदी करणेकामी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३५,००,०००/- + कर मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली. तसेच मा.तदर्थ समितीचे दि.११.१२.२०२० रोजीचे सभेसमोर निर्णय क्र.५१४ अन्वये समितीने ०१ नग Firewall खरेदी करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

त्यानुसार राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त झालेल्या ०५ ई-निविदांच्या तांत्रिक ई-निविदा मा.खरेदी समितीचे दि.२९.०४.२०२१ रोजीचे सभेसमोर उघडणेत आलेल्या असून, पात्र ०४ निविदाधारकांपैकी M/s Gowra Bits & Bytes Pvt Ltd., यांनी देऊ केलेले दर रक्कम रुपये १४,१२,१४३ + कर हे निम्नत्तम असल्याने त्यांना याकामी पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर चक्रिय पद्धतीने सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम / ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-** आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :-** माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत करणेकरीता नविन ०२ नग Firewall संस्थानचे प्रचलीत पद्धतीने खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ७०,००,०००/- + कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव दि.२३.०९.२०२० रोजीचे टिपणीअन्वये मा.तदर्थ समितीचे सभेसमोर निर्णयार्थ फेर सादर करणेत आला होता. सदरचे प्रस्तावावर मा.तदर्थ समितीचे दि.११.१२.२०२० रोजीचे सभेत सविस्तर चर्चेअंती निर्णय क्रमांक ५१४ समितीने ०१ नग Firewall खरेदी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर मान्यतेन्वये, ०१ नग Firewall खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस इकडील विभागाचे दि.०१.०४.२०२१ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये मान्यता घेणेत आलेली आहे. सदर मान्यतेन्वये राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त झालेल्या ०५ ई-निविदांच्या तांत्रिक ई-निविदा मा.खरेदी समितीचे दि.२९.०४.२०२१ रोजीचे सभेसमोर उघडणेत आलेल्या आहेत. उघडणेत आलेल्या पात्र ०४ निविदाकारांच्या वाणिज्यीक ई-निविदा मा.खरेदी समितीचे दि.२१.०५.२०२१ रोजीचे सभेसमोर उघडणेत आलेल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे.

| Sr.No. | Descriptions | Bidder's Name | Rate (Excl.Taxes) |
|---|---|---|---|
| 01 | Next Generation Firewall covering all the required specifications given in Tender Document with 5 years warranty. Make (model): Palo Alto (PA850 or higher) OR Fortinet (600E or higher) OR Checkpoint (6600 or higher) | M/s Monarch Technologies Pune Pvt Ltd., Pune | 15,36,773.00 |
| 02 | | **M/s Gowra Bits & Bytes Pvt Ltd.,** | **14,12,143.00** |
| 03 | | M/s Pyramid Solutions Pvt Ltd | 18,23,444.00 |
| 04 | | M/s Uday Network Technologies | 16,67,400.00 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याप्रमाणे ०१ नग Firewall खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या दरांपैकी M/s Gowra Bits & Bytes Pvt Ltd., यांनी देऊ केलेले दर रक्कम रुपये १४,१२,१४३ + कर हे अंदाजीत किंमतीपेक्षा नक्कीच कमी आहेत, संस्थानचे दृष्टीने हे आर्थिक हिताचे आहे.

सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेले Firewall हे कालबाह्य झालेले असल्याने सुरक्षीततेच्या दृष्टीने नविन Firewall खरेदी करुन कार्यान्वीत करणे अत्यावश्यक आहे.

सबब, मा.तदर्थ समितीचे वतीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचेमार्फत निम्नत्तम दरधारक निविदाकार M/s Gowra Bits & Bytes Pvt Ltd., यांनी देऊ केलेले दराबाबत त्यांचेबरोबर चर्चा-वाटाघाटी करुन, निम्नत्तम दराप्रमाणे त्यांना याकामी पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर चक्रिय पद्धतीने सविनय सादर.

27/5/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

27/5/2021

---

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, मा.तदर्थ समितीचे दि.१३.०७.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०५ अन्वये नविन एक नग Firewall खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत M/s Gowra Bits & Bytes Pvt Ltd., यांनी देऊ केलेले दर रक्कम रुपये १४,१२,१४३ + कर हे निम्नत्तम असल्याने, मा.तदर्थ समितीचे वतीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचेमार्फत निम्नत्तम दरधारक निविदाकार M/s Gowra Bits & Bytes Pvt Ltd., यांनी देऊ केलेले दराबाबत त्यांचेबरोबर चर्चा-वाटाघाटी करुन, निम्नत्तम दराप्रमाणे त्यांना याकामी पुरवठा आदेश देणेस चक्रिय पद्धतीने मान्यता देणेत आली.

03/06/2021

(श्रीमती गीता बनकर)
सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्या

28/5/2021

(भानुदास पालवे)
अपर आयुक्त (महसुल),
नाशिक विभाग, नाशिक
सदस्य

27/5/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी
सदस्य सचिव

31/5

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश
अहमदनगर
अध्यक्ष

मा.तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विषय क्र.- ९१.१५९



**मा.तदर्थ समितीसमोर चक्रिय पद्धतीने सादर**
**माहिती तंत्रज्ञान विभाग**

**विषय :- मोफत दर्शनपास (Time Base) कार्यप्रणाली संस्थानमार्फत कार्यान्वीत करणेकामी आवश्यक कार्यवाही करणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.....**

टिपणी,

**अधिनियम २००४ मधील तरतुद :-** कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य/समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा.व्य.स.सभेची दिनांक व निर्णय क्र. :-** दि.१६.०८.२०१६ निर्णय क्र.५८०.

**प्रास्ताविक :-** साईभक्तांच्या होणा-या गर्दीचे नियोजन करणेसंदर्भात दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम (इं.) लि., यांचे प्रतिनिधींमार्फत मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ रोजीचे सभेत कार्यप्रणालीचे प्रात्यक्षीक दाखविणेत आले होते. यावेळी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे त्यांनी दिली होती. यावर सविस्तर चर्चा होऊन, निर्णय क्र.५८० अन्वये, पुढीलप्रमाणे निर्देश देणेत आलेले होते.

दर्शनरांग व्यवस्थापन कार्यप्रणालीचे काम मे.त्रिलोक यांना दिल्यास निश्चितच साईभक्तांचा दर्शनासाठी लागणारा वेळ वाचेल व त्यामुळे दर्शनरांगेमध्ये अनावश्यक गर्दीही होणार नाही. ते कार्यादेश दिल्यानंतर तीनच महिन्यामध्ये सदरहू सिस्टीम चालू करणार आहेत. तसेच केंद्र शासनानेही त्यांना परवानगी दिलेली आहे व यामध्ये संस्थानला खर्च करावयाचीही आवश्यकता नाही. या सर्व बाबींचा विचार करता, मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम (इं.) लि. यांना पुढील पाच वर्षासाठी दर्शनरांगेचे व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामीचा कार्यादेश देणेत यावा, असे ठरले.

तसेच सदरहू दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणालीवर संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभाग व संरक्षण विभाग यांनी संयुक्तरित्या नियंत्रण ठेवावे, अशी सुचना करणेत आली.

उपरोक्त निर्णयान्वये, दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी मे.त्रिलोक यांना जा.नं.एसएसएसटी/वशी-आयटी/२४६५/२०१६ दि.१७ ऑगष्ट, २०१६ अन्वये, पुढील पाच वर्षांकरिता कार्यादेश देणेत आलेला आहे. मे.त्रिलोक यांना दिलेल्या कार्यादेशाप्रमाणे सदरची प्रणाली त्यांनी दि.१२.१२.२०१६ पासून संस्थानचे मागणीनुसार कार्यान्वीत केलेली आहे. मे.त्रिलोक यांचेबरोबर याकामी करणेत आलेल्या दि.२७.०४.२०१७ रोजीचे करारनाम्यानुसार दर्शनरांग व्यवस्थापन प्रणाली त्यांचेमार्फत एप्रिल-२०२२ अखेर सुरू राहणे अपेक्षीत आहे.

मे.त्रिलोक यांना याकामी दिलेल्या कार्यादेशाप्रमाणे व करणेत आलेल्या करारनाम्यानुसार सदरची कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकरीता आवश्यक जागा, फर्निचर व विद्युत पुरवठा संस्थानकडून विनामुल्य उपलब्ध करुन देणेत येतो. तर याकामी आवश्यक संगणके, संगणकीय साहित्य, स्टेशनरी तसेच मनुष्यबळ हे मे.त्रिलोक यांचेमार्फत उपलब्ध करुन देणेत येते. करारनाम्यामध्ये नमुद केलेप्रमाणे मे.त्रिलोक यांची केंद्र शासनाच्या Directorate of Advertising & Visual Publicity (DAVP) यांचे पॅनेलवर नियुक्ती झालेली आहे. कार्यप्रणाली अंतर्गत साईभक्तांना वितरीत करणेत येणा-या दर्शनपासचे एका बाजूवर DAVP यांचे निर्देशानुसार शासकीय उपक्रमांचे जाहिराती तथा सामाजिक संदेश छपाई केलेली असते. त्यापोटी मे.त्रिलोक यांना शासनाचे संबधीत विभागामार्फत DAVP यांनी ठरवून दिलेल्या दरकराराप्रमाणे प्रति दर्शनपास ठराविक रक्कम प्राप्त होते.

जागतिक स्तरावर उद्भवलेल्या कोरोना विषाणू (Covid-19) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेअंतर्गत संस्थान व्यवस्थापन संचलीत श्री साई समाधी मंदिराबरोबरच इतर सर्व मंदिरे दि.१७.०३.२०२० पासून पुढील आदेश होईपर्यंत संदर्भ क्र.०३ चे आदेशान्वये, साईभक्तांना दर्शनाकरीता बंद करणेत आले होते. सबब, मोफत दर्शनपास (Time Base) कार्यप्रणालीही दि.१७.०३.२०२० दुपारी ०३:०० वाजेपासून बंद करणेत आलेली होती.

दि.१६.११.२०२० पासून राज्य शासनाचे मार्गदर्शक सुचनांप्रमाणे श्री साईबाबांचे मंदिर कोरोना विषाणू (Covid-19) चा प्रादुर्भाव रोखणेसंदर्भातील सर्व प्रतिबंधात्मक उपाय-योजनांचे पालन करुन साईभक्तांना दर्शनासाठी सुरु करणेत आलेले आहे. श्रींचे मंदिर साईभक्तांसाठी दर्शनाकरीता खुले केल्यानंतर करावयाच्या उपाययोजना व सोयी सुविधांबाबत वेळोवेळी झालेल्या बैठका व प्रत्यक्ष पाहणीअंती देणेत आलेल्या निर्देशाप्रमाणे, दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणालीअंतर्गत

श्रीराम पार्कींग, साईउद्यान, शिर्डी बसस्थानक तसेच संस्थानचे सर्व निवासस्थाने इ. ठिकाणी मोफत दर्शनपास (Time Base) वितरण काऊंटर्स तसेच साईउद्यान समोर प्रवेशद्वार क्र. ०२ येथे बाहेरून येणारे साईभक्त यांचेकरीता व प्रवेशद्वार क्र.०३ चे उत्तरेस गावकरी साईभक्तांकरीता दर्शनपास पडताळणी काऊंटर्स कार्यान्वीत करणेत आलेले आहेत.

सद्यस्थितीत मे.त्रिलोक यांना कार्यप्रणालीबाबत काही सुधारणा तथा अधिकचे काऊंटर्स कार्यान्वीत करणेस सुचित केल्यास ते नेहमी त्यांचे संचालक मयत झाल्याने तसेच शासनामार्फत त्यांचे थकीत देयके अदा होत नसल्याने त्यांचे कंपनीची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची झाली असलेबाबत कळवितात. तसेच, मे.त्रिलोक यांचे दि.०९.०२.२०२१ रोजीचे संस्थान आ.क्र.१३७१७, दि.१९.०३.२०२१ रोजीचे पत्राद्वारे ते त्यांचेमार्फत कार्यान्वीत असलेली मोफत दर्शनपास (Time Base) प्रणाली मार्च-२०२१ नंतर बंद करणार असलेबाबत कळविलेले आहे. सदर पत्रामध्ये त्यांनी पुढीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

सदरची प्रणाली ते केंद्र सरकारचे विविध योजनांचे जाहिराती दर्शनपासवर छपाई करुन चालवत होते. परंतू मागील अनेक दिवसांपासून केंद्र सरकारने सदरची योजना बंद केलेली आहे. अशातच दि.१७.०३.२०२० रोजी कंपनीचे संचालक कै. रविचंद यांचे निधन झालेले आहे. Covid-19 चे पार्श्वभुमीवर कंपनीस फार मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागलेला आहे. तरीपण श्री साईबाबांवरील श्रद्धेपोटी सदरची प्रणाली कंपनीने आर्थिक झळ सोसून दोन वर्षे कार्यान्वीत ठेवलेली आहे. परंतू सद्यस्थितीत उपरोक्त परिस्थितीमुळे त्यांचेसमोर सदरची प्रणाली बंद करणेव्यतिरीक्त कोणताही पर्याय उरलेला नाही. सबब, सदरची प्रणाली ते मार्च-२०२१ नंतर बंद करत असलेबाबत कळविलेले होते.

कोरोना विषाणू (Covid-19) चे पार्श्वभुमीवर साईभक्तांना सर्व अनुषंगिक नियमांचे पालन करुन दर्शनासाठी प्रवेश देणेकरीता मे.त्रिलोक यांचेमार्फत कार्यान्वीत असलेली दर्शनपास प्रणाली कार्यान्वीत ठेवणे आवश्यक आहे. नमुद केलेप्रमाणे मे.त्रिलोक यांनी संदर्भीय पत्राद्वारे कळविलेप्रमाणे त्यांनी सदरची प्रणाली मार्च-२०२१ नंतर बंद केल्यास उपलब्ध कालावधीमध्ये सदरची प्रणाली संस्थानमार्फत कार्यान्वीत करणे केवळ अशक्य आहे. सबब, प्रणाली कार्यान्वीत करणेकरीता मे.त्रिलोक यांना देणेत आलेला कार्यादेश व करारनाम्यानुसार सदरची प्रणाली त्यांचेमार्फत एप्रिल-२०२२ पर्यंत कार्यान्वीत असणे अपेक्षीत असल्याने त्यांनी सादर केलेल्या संदर्भीय पत्राचे उत्तरादाखल सदरची प्रणाली कार्यादेश व करारनाम्यामध्ये नमुद कालावधीकरीता सुरळीत चालू ठेवणेकामी दि.२३.०३.२०२१ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये ई-मेलद्वारे कळविणेत आलेले आहे.

कोरोना विषाणू (Covid-19) चा प्रादुर्भाव रोखणेसंदर्भातील उपाय योजनेअंतर्गत जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३७/२०२१, दि.०६ एप्रिल, २०२१ अन्वये, संस्थान व्यवस्थापन संचलीत श्री साईबाबा समाधी मंदिरासह सर्व मंदिरे दि.०५ एप्रिल, २०२१, संध्याकाळी ८:०० वाजेपासून भक्तांसाठी पुढील आदेश होईपावेतो बंद करणेत आलेले आहेत. तसेच संस्थान व्यवस्थापन संचलीत सर्व भक्तनिवासस्थाने दि.०६ एप्रिल, २०२१ पासून भक्तांचे तात्पुरते निवासासाठी पुढील आदेश होईपावेतो बंद करणेत आलेले आहेत. सबब, मे.त्रिलोक यांचेमार्फत कार्यान्वीत मोफत दर्शनपास कार्यप्रणाली हि दि.०६.०४.२०२१ पासून बंद ठेवणेत आलेली आहे. तोपर्यंत सदरची प्रणाली त्यांचेमार्फत सुरळीत सुरू होती.

मे.त्रिलोक यांनी वेळोवेळी कळविलेप्रमाणे सदरची प्रणाली कार्यान्वीत ठेवणेस ते असमर्थ ठरल्यास साईभक्तांची गैरसोय टाळणेच्या व गर्दीचे नियोजनाच्या दृष्टीने संस्थानची स्वत:ची प्रणाली कार्यान्वीत करणेच्या दृष्टीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार मे.टिसीएस यांना सदरची प्रणाली विकसीत करणेस सुचित करणेत आलेले आहे.

भविष्यात कोरोना विषाणू (Covid 19) प्रादुर्भाव रोखणेसंदर्भात उपाय योजनेअंतर्गत सर्व मार्गदर्शक सुचनांचे पालन करुनच साईभक्तांना श्री साईबाबांचे दर्शनासाठी विविध मंदिरामध्ये तसेच प्रसाद भोजन घेणेसाठी प्रसादालयामध्ये प्रवेश द्यावा लागणार आहे, त्यादृष्टीनें साईभक्तांचे गर्दीचे नियोजनाकरीता दर्शनरांग व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वीत ठेवणे आवश्यक आहे.

मे.टिसीएस यांना सुचित केलेप्रमाणे त्यांनी सदरची प्रणाली विकसीत करणेची कार्यवाही प्राधान्याने सुरू करणेत आलेली आहे. त्यांनी दि.०५.०३.२०२१ रोजी सदर प्रणालीचे सादरीकरण मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांना दाखविले आहे. दि.०५.०३.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे मे.टिसीएस यांनी प्रणालीमध्ये सादरीकरणादरम्यान सुचविणेत आलेल्या सुधारणा लवकरच करणेत

येतील असे कळविलेले आहे. यासंदर्भात वेळोवेळी झालेली चर्चा व देणेत आलेल्या निर्देशान्वये, मे.टिसीएस यांना दि.२२.०३.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे प्रणाली जलदगतीने विकसीत करणेस व याकामी आवश्यक संगणके व संगणकीय साहित्यांची माहिती सादर करणेस कळविणेत आले होते. त्यानुसार मे.टिसीएस यांनी दि.३०.०३.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे दर्शनरांग प्रणालीअंतर्गत पुढीलप्रमाणे तांत्रिक क्षमतेचे संगणके व संगणकीय साहित्यांची आवश्यकता असल्याचे कळविलेले आहे.

1. Desktop : Windows10, Intel i3 processor, 8 GB RAM, 500 GB HDD
2. Biometric device : Mantra Mfs 100 V54
3. Web Camera : Logitech
4. Thermal Printer : Epson srp-e300-e302
5. Bar code / QR code scanner : Symbol – DS9208

उपरोक्तप्रमाणेचे साहित्याचे प्रमाण हे कार्यान्वीत करावयाच्या काऊंटरचे संख्येनुसार उपलब्ध करावे लागेल असे ई-मेलमध्ये नमुद केले आहे.

संस्थानमार्फत दर्शनरांग व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वीत करावयाची झाल्यास पुढीलप्रमाणे मोफत दर्शनपास वितरण व पडताळणी काऊंटर्स कार्यान्वीत करावे लागतील.

| अ.क्र. | ठिकाण | काऊंटर्स | संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | मध्यवर्ती दर्शनपास वितरण (सद्यस्थितीत श्रीराम पार्कींग) | दर्शनपास वितरण | ०६ |
| ०२ | संस्थानचे सर्व निवासस्थाने येथे प्रत्येकी एक | दर्शनपास वितरण | ०४ |
| ०३ | राज्य परिवहन महामंडळ बसस्थानक | दर्शनपास वितरण | ०१ |
| ०४ | साईउद्यान (जेष्ठ नागरीक, दिव्यांग, इ. साठी) | दर्शनपास वितरण | ०२ |
| ०५ | साई कॉम्प्लेक्स समोर १६ गुंठे (स्थानिक साईभक्त) | दर्शनपास वितरण | ०१ |
| ०६ | दर्शनरांग प्रवेशद्वार | दर्शनपास पडताळणी | ०२ |
| ०७ | उदीप्रसाद व बुंदी वाटप | दर्शनपास पडताळणी | ०२ |
| ०८ | प्रसादालय | दर्शनपास पडताळणी | ०१ |
| | | एकूण काऊंटर्स | १९ |

उपरोक्तप्रमाणे एकूण १९ दर्शनपास वितरण / पडताळणी काऊंटर्स कार्यान्वीत करणेकामी मे.टिसीएस यांनी कळविलेल्या तपशिलाचे संगणके व संगणकीय साहित्य खरेदी करणेकामी अंदाजे दर कळविणेबाबत या क्षेत्रातील पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे सुचित करणेत आलेले होते. त्यानुसार M/s Optimistic व M/s Minitek यांचेमार्फत अनुक्रमे दि.०३.०५.२०२१ व दि.०६.०५.२०२१ रोजीचे ई-मेलद्वारे पुढीलप्रमाणे अंदाजीत दर प्राप्त झालेले आहेत.

| Sr No | Description | Qty | M/s Optimistics Tech. Solutions, Thane | M/s Minitek, Nashik | Average Cost |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Desktop : Windows10, Intel i3 processor, 8 GB RAM, 500 GB HDD | 20 | 9,20,000 | 9,15,240 | 9,17,620 |
| 02 | Biometric device : Mantra Mfs 100 V54 | 20 | 37,780 | 37,920 | 37,850 |
| 03 | Web Camera : Logitech | 20 | 54,440 | 39,720 | 47,080 |
| 04 | Thermal Printer : Epson srp-e300-e302 | 15 | 1,46,670 | 1,63,260 | 1,54,965 |
| 05 | Bar code / QR code scanner : Symbol – DS9208 | 06 | 64,590 | 56,520 | 60,555 |
| | | Total : | 12,23,480 | 12,12,660 | 12,18,070 |

संस्थानमार्फत दर्शनरांग व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वीत करणेकामी उपरोक्त संगणके व संगणकीय साहित्य उपलब्ध करणेबरोबरच पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी लागणार आहे.

१. कार्यप्रणाली हताळणीकामी संगणकीय ज्ञान असलेले आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करणे.

२. दर्शनपास वितरणकामी आवश्यक स्टेशनरी उदा.दर्शनपास कार्ड, स्टिकर्स, रिबन इ. उपलब्ध करणे.

सद्यस्थितीत दर्शनपास प्रणालीबाबत मे.टिसीएस यांचेबरोबर झालेल्या चर्चा व सादरीकरणादरम्यान त्यांनी सुचित केलेप्रमाणे त्यांनी सदरची प्रणाली विकसीत केली असून प्रणालीची तपासणी (Testing) अंतिम टप्प्यात आहे.

मे.त्रिलोक यांनी वेळोवेळी कळविलेप्रमाणे सदरची प्रणाली कार्यान्वीत ठेवणेस ते असमर्थ ठरल्यास साईभक्तांची गैरसोय टाळणेच्या व गर्दीचे नियोजनाच्या दृष्टीने तसेच कोरोना विषाणू (Covid 19) प्रादुर्भाव रोखणेसंदर्भात उपाय योजनेअंतर्गत सदरची प्रणाली कार्यान्वीत राहणे अंत्यत आवश्यक

आहे. तसेच, संस्थानने सुचीत केलेप्रमाणे करारनाम्यानुसार त्यांनी सदरची प्रणाली एप्रिल-२०२२ पर्यंत कार्यान्वीत ठेवल्यास, त्यापुढील काळात संस्थानमार्फत सदरची प्रणाली कार्यान्वीत करावी लागणार आहे. सबब, मे.टिसीएस यांचेमार्फत विकसीत सदरची प्रणाली कार्यान्वीत करणेकामी त्यांचे अभिप्रायानुसार सुरवातीचे काळात उपरोक्त नमुद संगणके व संगणकीय साहित्य खरेदी करणेकामी प्रचलीत पद्धतीने खरेदी प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १२,१८,०७०/- + कर (अक्षरी रक्कम रु.- बारा लाख अठरा हजार सत्तर + कर) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर चक्रिय पद्धतीने सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी :- मे.त्रिलोक यांनी वेळोवेळी कळविलेप्रमाणे सदरची प्रणाली कार्यान्वीत ठेवणेस ते असमर्थ ठरल्यास साईभक्तांची गैरसोय टाळणेच्या व गर्दीचे नियोजनाच्या दृष्टीने तसेच कोरोना विषाणू (Covid 19) प्रादुर्भाव रोखणेसंदर्भात उपाय योजनेअंतर्गत सदरची प्रणाली कार्यान्वीत राहणे अंत्यत आवश्यक आहे. सबब, याकामी मे.टिसीएस यांना सुचित केलेप्रमाणे त्यांनी विकसीत केलेली प्रणाली कार्यान्वीत करणेकामी त्यांचे अभिप्रायानुसार सुरवातीचे काळात उपरोक्त नमुद संगणके व संगणकीय साहित्य खरेदी करणेकामी प्रचलीत पद्धतीने खरेदी प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १२,१८,०७०/- + कर (अक्षरी रक्कम रु.- बारा लाख अठरा हजार सत्तर + कर) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर चक्रिय पद्धतीने सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-** तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :-** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे, साईभक्तांच्या होणा-या गर्दीचे नियोजन करणेसंदर्भात दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८० अन्वये, मे.त्रिलोक जा.नं.एसएसएसटी/वशी-आयटी/२४६५/२०१६ दि.१७ ऑगष्ट, २०१६ अन्वये, पुढील पाच वर्षाकरिता कार्यादेश देणेत आलेला आहे. मे.त्रिलोक यांना दिलेल्या कार्यादेशाप्रमाणे सदरची प्रणाली त्यांनी दि.१२.१२.२०१६ पासून संस्थानचे मागणीनुसार कार्यान्वीत केलेली आहे. मे.त्रिलोक यांचेबरोबर याकामी करणेत आलेल्या दि.२७.०४.२०१७ रोजीचे करारनाम्यानुसार दर्शनरांग व्यवस्थापन प्रणाली त्यांचेमार्फत एप्रिल-२०२२ अखेर सुरू राहणे अपेक्षीत आहे.

मे.त्रिलोक यांना याकामी दिलेल्या कार्यादेशाप्रमाणे व करणेत आलेल्या करारनाम्यानुसार सदरची कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकरीता आवश्यक जागा, फर्निचर व विद्युत पुरवठा संस्थानकडून विनामुल्य उपलब्ध करुन देणेत येतो. तर याकामी आवश्यक संगणके, संगणकीय साहित्य, स्टेशनरी तसेच मनुष्यबळ हे मे.त्रिलोक यांचेमार्फत उपलब्ध करुन देणेत येते. करारनाम्यामध्ये नमुद केलेप्रमाणे मे.त्रिलोक यांची केंद्र शासनाच्या Directorate of Advertising & Visual Publicity (DAVP) यांचे पॅनेलवर नियुक्ती झालेली आहे. कार्यप्रणाली अंतर्गत साईभक्तांना वितरीत करणेत येणा-या दर्शनपासचे एका बाजूवर DAVP यांचे निर्देशानुसार शासकीय उपक्रमांचे जाहिराती तथा सामाजिक संदेश छपाई केलेली असते. त्यापोटी मे.त्रिलोक यांना शासनाचे संबधीत विभागामार्फत DAVP यांनी ठरवून दिलेल्या दरकाराप्रमाणे प्रति दर्शनपास ठराविक रक्कम प्राप्त होते.

मे.त्रिलोक, तिरुपती यांनी दि.०९.०२.२०२१ रोजीचे संस्थान आ.क्र.१३७१७, दि.१९.०३.२०२१ रोजीचे पत्राद्वारे ते त्यांचेमार्फत कार्यान्वीत असलेली मोफत दर्शनपास (Time Base) प्रणाली मार्च-२०२१ नंतर बंद करणार असलेबाबत कळविलेले आहे. सदर पत्रामध्ये त्यांनी पुढीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

सदरची प्रणाली ते केंद्र सरकारचे विविध योजनांचे जाहिराती दर्शनपासवर छपाई करुन चालवत होते. परंतू मागील अनेक दिवसांपासून केंद्र सरकारने सदरची योजना बंद केलेली आहे. अशातच दि.१७.०३.२०२० रोजी कंपनीचे संचालक कै. रविचंद यांचे निधन झालेले आहे. Covid-19 चे पार्श्वभुमीवर कंपनीस फार मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागलेला आहे. तरीपण श्री साईबाबांवरील श्रद्धेपोटी सदरची प्रणाली कंपनीने आर्थिक झळ सोसून दोन वर्षे कार्यान्वीत ठेवलेली आहे. परंतू सद्यस्थितीत उपरोक्त परिस्थितीमुळे त्यांचेसमोर सदरची प्रणाली बंद करणे व्यतिरीक्त कोणताही पर्याय उरलेला नाही. सबब, सदरची प्रणाली ते मार्च-२०२१ नंतर बंद करत असलेबाबत कळविलेले होते.

मे.त्रिलोक यांनी कळविलेप्रमाणे सदरची प्रणाली कार्यान्वीत ठेवणेस ते असमर्थ ठरल्यास

साईभक्तांची गैरसोय टाळणेच्या व गर्दीचे नियोजनाच्या दृष्टीने संस्थानची स्वत:ची प्रणाली कार्यान्वीत करणेच्या दृष्टीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार मे.टिसीएस यांना सदरची प्रणाली विकसीत करणेस सुचित करणेत आलेले आहे. त्यानुसार मे.टिसीएस यांनी सदरची प्रणाली विकसीत केली असून, प्रणाली तपासणीची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

मे.त्रिलोक यांनी वेळोवेळी कळविलेप्रमाणे सदरची प्रणाली कार्यान्वीत ठेवणेस ते असमर्थ ठरल्यास साईभक्तांची गैरसोय टाळणेच्या व गर्दीचे नियोजनाच्या दृष्टीने तसेच कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखणेसंदर्भात उपाय योजनेअंतर्गत सदरची प्रणाली कार्यान्वीत राहणे अंत्यत आवश्यक आहे. तसेच, संस्थानने सुचीत केलेप्रमाणे करारनाम्यानुसार त्यांनी सदरची प्रणाली एप्रिल-२०२२ पर्यंत कार्यान्वीत ठेवल्यास, त्यापुढील काळात संस्थानमार्फत सदरची प्रणाली कार्यान्वीत करावी लागणार आहे.

संस्थानमार्फत दर्शनरांग व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वीत करणेकामी संगणके व संगणकीय साहित्य उपलब्ध करणेबरोबरच पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी लागणार आहे.

१. कार्यप्रणाली हताळणीकामी संगणकीय ज्ञान असलेले आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करणे.

२. दर्शनपास वितरणकामी आवश्यक स्टेशनरी उदा. दर्शनपास कार्ड, स्टिकर्स, रिबन इ.उपलब्ध करणे.

सबब, मे.टिसीएस यांचेमार्फत विकसीत सदरची प्रणाली कार्यान्वीत करणेकामी त्यांचे अभिप्रायानुसार सुरवातीचे काळात प्रास्ताविकेत नमुद संगणके व संगणकीय साहित्य खरेदी करणेकामी प्रचलीत पद्धतीने खरेदी प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १२,१८,०७०/- + कर (अक्षरी रक्कम रु.- बारा लाख अठरा हजार सत्तर + कर) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर चक्रिय पद्धतीने सविनय सादर.

1/6/2021

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

---

प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणाली मे.टिसीएस यांचेमार्फत विकसीत करुन कार्यान्वीत करणेकामी त्यांचे अभिप्रायानुसार सुरवातीचे काळात संगणके व संगणकीय साहित्य खरेदी करणेकामी प्रचलीत पद्धतीने खरेदी प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १२,१८,०७०/- + कर (अक्षरी रक्कम रु.- बारा लाख अठरा हजार सत्तर + कर) मात्रचे खर्चास चक्रिय पद्धतीने मान्यता देणेत आली.

1/06/2021

(श्रीमती गीता बनकर)
सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्या

9/6/2021

(भानुदास पालवे)
अपर आयुक्त (महसुल),
नाशिक विभाग, नाशिक
सदस्य

1/6/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी
सदस्य सचिव

2/6

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश
अहमदनगर
अध्यक्ष

मा.तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

IT-MEETING-158-2021.

विषय क्र.- 9 | 9ED



मा.तदर्थ (Ad-hoc) सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर करावयाचा विषय

साईआश्रम भक्तनिवास

विषय :- सन २०२०-२१ मधील (दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर) एक वर्ष कालावधीकरीता साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, इ. स्वच्छता दुरुस्ती व देखभालीचे कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी सुमित फॅसिलिटीज् लि, पुणे यांना देण्यात आलेल्या कार्यादेशास चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत...

टिपणी,

प्रस्तावना :- श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश-विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत साईआश्रम भक्तनिवास विभागातील १५३६ खोल्यामधून साईभक्तांची निवास व्यवस्था करण्यात येते. विभागातील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी, याकरीता साईआश्रम भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग इ.स्वच्छता दुरुस्ती व देखभालीचे कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेतली जातात.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०२/२०२० रोजीचे सभेत नव्याने सन २०२०-२१ मधील दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर एक वर्ष कालावधीसाठी साईआश्रम भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. स्वच्छता दुरुस्ती देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यास मा.व्यवस्थापन समिती सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२४ निर्णय क्र.६३६ "साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा विभागाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग, इ. मेन्टनन्स/ स्वच्छता कामाकरीता तातडीने विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्यासाठी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

त्यास अनुसरुन सन २०२०-२१ मधील दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर एक वर्ष कालावधीसाठी वर्तमानपत्रात ई-निविदा सूचना जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत दि.०५/०९/२०२० रोजी प्रसिध्द करणेत आली. तसेच महाराष्ट्र शासनाच्या व संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा दि.०७/०९/२०२० रोजी अपलोड करणेत आली.

ई-निविदाधारकांनी निविदा भरणेपूर्वी निविदा संदर्भात काही अडचणी असल्यास, त्याचे निरसन करणेकामी दि.११/०९/२०२० रोजी प्री-बीड मिटींग ठेवण्यात आली होती. सदर मिटींगमध्ये उपस्थित निविदाधारकांना कोणत्याही प्रकारची निविदासंदर्भात शंका/अडचणीवर चर्चा करुन त्यासंदर्भात इतिवृत्त ई निविदाधारकांचे माहितीसाठी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. सदर ई-निविदा महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्याची अंतीम मुदत दि.२८/०९/२०२० अखेर होती.

सदर ई-निविदे प्रक्रियेमध्ये मुदतीत चार निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या. ऑनलाईन प्राप्त तांत्रिक बीड (Technical Bid) दि.१५/१०/२०२० रोजीचे स्थानिक खरेदी समिती सभे समोर उघडण्यात येवून, निविदाधारकांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यामधील पात्र/अपात्र निविदांचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | मिळालेले गुण | पात्र/अपात्र |
|---|---|---|---|
| 1 | BVG INDIA LTD,PUNE | १०० | पात्र |
| 2 | PEYUSH TEDERERS, Thane | ७० | पात्र |
| 3 | SUMEET FACILITIES LTD, CHINCHWAD, PUNE | ९५ | पात्र |
| 4 | EXIMIUS MANAGEMENT PVT.LTD, THANE-West | ६५ | अपात्र |

उपरोक्त पात्र तीन निविदाधारकांचे दि.०३/११/२०२० रोजीचे स्थानिक खरेदी समिती सभेसमोर वाणिज्यिक बीड (Financial Bid) उघडण्यात आले असून, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ नं | निविदाधारकाचे नाव | GST वगळून दरमहा रक्कम रु. | १८ % GST | GST सह दरमहा एकूण रक्कम रु. | GST वगळून वार्षिक रक्कम रु. | १८ % GST | GST सह वार्षिक एकूण रक्कम रु. | स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | SUMEET FACILITIES LTD, PUNE | ७४,००,८७६ | १३,३२,१५७.६८ | ८७,३३,०३३.६८ | ८,८८,१०,५१२.१२ | १,५९,८५,८९२.१८ | १०,४७,९६,४०४.३० | L-1 |
| 2 | PEYUSH TEDERS, THANE | ८१,००,००० | १४,५८,००० | ९५,५८,००० | ९,७२,००,००० | १,७४,९६,००० | ११,४६,९६,००० | L-2 |
| 3 | BVG INDIA LTD,PUNE | ९५,७७,५७४.२४ | १७,२३,९६३.३६ | १,१३,०१,५३७.६० | ११,४९,३०,८९०.८८ | २,०६,८७,५६०.३५ | १३,५६,१८,४५१.२३ | L-3 |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे अ.नं.१ सुमित फॅसिलिटीज्.लि, पुणे हे निम्नतम दरधारक (L-1) ठरत असल्याने, त्यांना दि.११/१२/२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर चर्चेसाठी बोलाविणेत आले होते. सदरहू सभेत निर्णय क्र.५२७ खालीलप्रमाणे पारीत झालेला आहे.

(पान नं.०२ वर...)

"यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी व संबंधित विभागाचे प्रमुख यांची समिती गठीत करण्यात आली. या समितीने दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या कालावधीसाठी साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेसाठी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक यांचेशी निम्नतम दराबाबत चर्चा/वाटाघाटी करुन अंतिम दर निश्चित करुन संबंधितास कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याबाबतचा कार्यवाही अहवाल मा.तदर्थ (Ad-hoc) समिती समोर सादर करण्यात यावा, असे ठरले.

त्यानुसार सन २०२०-२१ साईआश्रम भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/ स्वच्छता दुरुस्ती व देखभालीची. कामे आऊटसोर्स पध्दतीने दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर करुन घेणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दरधारक सुमित फॅसिलिटीज् लि, पुणे यांचे समवेत चर्चा वाटाघाटी करणेसाठी दि.११/१२/२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील निर्णयान्वये गठीत समितीची सभा दि.११/१२/२०२० रोजी दुपारी ४.०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दालनात मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे अध्यतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होते.

| | |
|---|---|
| १) श्री. कान्हूराज बगाटे भा.प्र.से | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २) श्री. रविंद्र ठाकरे | उपमुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३) श्री. बी.बी. घोरपडे | मुख्य लेखाधिकारी |
| ४) श्री. दिलीप उगले | प्रशासकिय अधिकारी (निवासस्थाने) |
| ५) श्री. पुंजाहरी कोते | प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास |
| ६) श्री. वसंत पाटील | सुमित फॅसिलीटीज,लि. पुणे यांचे प्रतिनिधी |

सदर बैठकीत साईआश्रम भक्तनिवास विभगाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/ स्वच्छता दुरुस्ती व देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने कामे करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे ठेकेदार सुमित फॅसिलिटीज्.लि, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.वसंत पाटील हे उपस्थित होते. त्यांना दरात सवलत देणार किंवा कसे याबाबत लेखी पत्र देण्याबाबत सांगण्यात आले.

श्री वसंत पाटील यांनी दि.११/१२/२०२० रोजीचे पत्रान्वये महामारीची परिस्थिती पाहता आम्ही सदर कामी सादर केलेले दर कमी करता येणार नाही असे कळविले आहे.

सबब निविदाधारक सुमित फॅसिलिटीज् लि पुणे यांनी निविदेत खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

| GST वगळून दरमहा खर्च | १८% GST सह दरमहा खर्च रु. | GST वगळून वर्षाला खर्च रु. | १८% GST सह वर्षाला येणारा खर्च रु. |
|---|---|---|---|
| रु. ७४,००,८७६ | रु. ८७,३३,०३३.६८ | रु. ८,८८,१०,५१२.१२ | रु. १०,४७,९६,४०४.३० |

**निविदा वार्षिक GST सह रक्कम रु.१०,४७,९६,४०४.३०**

**चर्चा वाटाघाटी अंती देऊ केलेली वार्षिक GST सह रक्कम रु.१०,४७,९६,४०४.३०**

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** सन २०२०-२१ मधील (दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर) एक वर्ष कालावधीकरीता साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, इ. स्वच्छता दुरुस्ती व देखभालीचे कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी ई-निविदा राबविण्यात आली होती. सदर ई-निविदेमधील निम्नतम दरधारक सुमित फॅसिलिटीज् लि, पुणे यांचे समवेत चर्चा वाटाघाटी करणेसाठी दि.११/१२/२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील निर्णयान्वये गठीत समितीची सभा दि.११/१२/२०२० रोजी दु.०४.०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी चर्चा करुन निविदाधारकाने देऊ केलेले दरात सवलत देणार किंवा कसे अशी विचारणा करण्यात आली असता निविदाधारकाने दर कमी करणेबाबत असमर्थता दर्शविल्याने, त्यांनी देऊ केलेले निविदेतील दर स्विकारणेत आले असून, दि.२४/१२/२०२० रोजीचे टिपणीन्वये कार्यादेश देणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/२८७२/२०२० दि.२९/१२/२०२० रोजीचे कार्यादेशानुसार सुमित फॅसिलिटीज लि, पुणे यांना दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या एक वर्ष कालावधीसाठीचा कार्यादेश देण्यात आला आहे.

(पान नं.०३ वर...)

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील विषय क्र.७५ निर्णय क्र.५२७ नुसार उपरोक्त अहवालाचे चक्रिय पध्दतीने नोंद घेणेकामीचा सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीपुढे अवलोकनार्थ सविनय सादर

(रविंद्र ठाकरे)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

निर्णय:- उपरोक्त विषयांकित प्रस्तावाची व त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची चक्रिय पध्दतीने नोंद घेण्यात आली.

(गीता प्रवीण बनकर)
सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानुदास ह.पालवे)
अप्पर महसूल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

**मा.तदर्थ (Ad-hoc) सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर करावयाचा विषय**

**साईआश्रम भक्तनिवास**

**विषय:- साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या विभागाकडील सन २०२०-२१ मधील दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या एक वर्ष कालावधीकरीता निम्नतम दरधारकांस लॉन्ड्री कामाचा देण्यात आलेल्या कार्यादेशास चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत...**

टिपणी,

श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश-विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी श्री साईबाबासंस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीमार्फतसाईआश्रम भक्तनिवास विभागातील १५३६ खोल्यामधून व साईधर्मशाळा विभागातील १२८ हॉलमधून साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते. या विभागातील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी, याकरीता साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या विभागातील बेडशीट, उशी कव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे, गादीच्या खोळी धुणे इ. कामे लॉण्ड्री ठेकेदाराकडून करुन घेतली जातात.

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.१३/०७/२०२० रोजीचे सभेतील विषय नं.३० निर्णय क्र.३८४ नुसार सन २०२०-२१ करीता साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धुणे/इस्त्रीकरणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे, गादीच्या खोळी धुणेचे कामे आऊटसोर्स पध्दतीने करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्यासाठी येणा-या एकत्रित रु.२८,५९,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्यास अनुसरुन सन २०२०-२१ मधील दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या कालावधीसाठी वर्तमानपत्रात ई-निविदा सूचना जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत दि.०५/०९/२०२० रोजी प्रसिध्द करणेत आली. तसेच महाराष्ट्र शासनाच्या व संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा दि.०७/०९/२०२० रोजी अपलोड करणेत आली.

ई-निविदाधारकांनी निविदा भरणेपूर्वी निविदा संदर्भात काही अडचणी असल्यास, त्याचे निरसन करणेकामी दि.११/०९/२०२० रोजी प्री-बीड मिटींग ठेवण्यात आली होती. सदर मिटींगचे इतिवृत्त माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे संकेतस्थळावर व ई.डी.पी विभागामार्फत महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.inया संकेतस्थळावर अपलोड करुन, ई-निविदा ऑनलाईन अपलोड करण्याची अंतीम मुदत दि.२१/०९/२०२० अखेर होती.

सदर ई-निविदे प्रक्रियेमध्ये मुदतीत सहा निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या. ऑनलाईन प्राप्त तांत्रिक बीड (Technical Bid) दि.२५/०९/२०२० रोजीचे खरेदी समिती सभे समोर उघडण्यात येवून, कागदपत्रांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन, ऑनलाईन प्राप्त सहा पैकी पाच निविदाधारक पात्र झाल्याने त्यांचे वाणिज्यिक बीड दि.१५/१०/२०२० रोजीचे खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आले असून, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**अ) संस्थानचे कपड्यांसाठी दर**

| अ नं. | कपड्यांचा तपशील | गुरुकृपा लॉन्ड्री, शिर्डी प्रती नग दर रु. (सर्वकरासह) | अपुर्वा कन्स्ट्रक्शन, उल्हासनगर प्रती नग दर रु. (सर्वकरासह) | साई अन्नपुर्णा ड्रायक्लिनर्स ॲण्ड वॉशिंग कॉन्ट्रॅक्टर, नाशिक प्रती नग दर रु. (सर्वकरासह) | साईभक्ती इंडस्ट्रीज् अंबरनाथ प्रती नग दर रु. (सर्वकरासह) | घरौंदा वॉशिंग कंपनी, शिर्डी प्रती नग दर रु. (सर्वकरासह) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बेडशीट धुवून इस्त्री करणे | ३.५० | १४.०० | ८.२० | ४.३० | ४.०० |
| २ | उशी कव्हर धुवून इस्त्री करणे | १.५० | ७.०० | ५.५५ | १.८० | १.८० |
| ३ | टॉवेल धुवून ड्रायर करणे | ८.०० | ९.०० | ९.३० | ३.७५ | ३.०० |
| ४ | सोलापूर चादर धुणे | १४.०० | १४.०० | २०.०० | ९.०० | ८.०० |
| ५ | चादर धुणे | ७.७५ | १४.०० | ६.३० | ९.०० | ८.०० |
| ६ | गादीच्या खोळी धुणे | ७.७५ | १४.०० | १३.२५ | ७.९० | ८.०० |

उपरोक्त प्रमाणे तीन निविदाधारकांचे साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील कपडे लॉण्ड्री करणेकामी निम्नतम दर प्राप्त झाले असून, त्यामध्ये साई अन्नपुर्ण ड्रायक्लिनर्स ॲण्ड वॉशिंग कॉन्ट्रॅक्टर नाशिक यांना फक्त चादर धुणे कामासाठी दर रु.६.३० प्रति नग निम्नतम असल्याने त्यांनी दि.१७/१०/२०२० रोजी ई- मेल व्दारे फर्मच्या लेटर हेडवर फक्त चादर धुवून देण्यासाठी मी नाशिक मधून येणे जाणे आम्हास परवडणार नसल्याने मी ते काम करु शकत नाही तरी आपण ते दुस-या लॉण्ड्रीधारकास दिल्यास माझा काही अपवाद नाही असे कळविले आहे.

पान नं.०२ वर...

सदर लॉण्ड्री धारकानंतर गुरुकृपा लॉण्ड्री शिर्डी यांचे सदर चादर धुणेकरीता निम्नतम दर रु. ७.७५ प्रति नग असल्याने, त्यांनी साई अन्नपुर्ण ड्रायक्लिनर्स ॲण्ड वॉशिंग कॉन्ट्रक्टर नाशिक यांनी चादर धुणेकामी दिलेल्या दरात रु ६.३० प्रति नग प्रमाणे काम करणेस तयार असलेबाबत दि.१९/१०/२०२० रोजी कळविले असून, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील कपडे धुणे/इस्त्री करणे कामी निम्नतम दर प्राप्त झालेल्या १) गुरुकृपा लॉन्ड्री, शिर्डी व २) घरौंदा वॉशिंग कंपनी शिर्डी यांना दि.११/१२/२०२० रोजी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत आले होते. सदरहू सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.५२८ पारीत झालेला आहे.

**"यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी व संबंधीत विभागाचे प्रमुख यांची समिती गठीत करण्यात आली. या समितीने साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या विभागाकडील दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या कालावधीसाठी निम्नतम दरधारकास लॉन्ड्री कामासाठी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक यांचेशी निम्नतम दराबाबत चर्चा/वाटाघाटी करुन अंतिम दर निश्चित करुन संबंधीतास कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याबाबतचा कार्यवाही अहवाल मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले."**

त्यानुसार सन २०२०-२१ साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे, गादीच्या खोळी धुणेचे कामे आऊटसोर्स दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या कालावधीसाठी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दरधारक **१) गुरुकृपा लॉन्ड्री, शिर्डी व २) घरौंदा वॉशिंग कंपनी शिर्डी** यांचे समवेत चर्चा वाटाघाटी करणेसाठी दि.११/१२/२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेतील निर्णयान्वये गठीत समितीचे सभेत दि.११/१२/२०२० रोजी दु.०४.३० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दालनात मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होते.

| | |
|---|---|
| १) श्री. कान्हूराज बगाटे, भा.प्र.से | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २) श्री. रविंद्र ठाकरे | उपमुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३) श्री. बी.बी.घोरपडे | मुख्य लेखाधिकारी |
| ४) श्री. दिलीप उगले | प्रशासकिय अधिकारी (निवासस्थाने) |
| ५) श्री.पुंजाहरी कोते | प्रभारी अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास |
| ६) श्री. पोपट निर्मळ | प्रभारी अधिक्षक, व्दारावती तथा साईधर्मशाळा |
| ७) श्री. गणेश दत्तात्रय आघाडे | गुरुकृपा लॉण्ड्री शिर्डी. |
| ८) श्री. शंतनू गोविंद राऊत | घरौंदा वॉशिंग कंपनी, शिर्डी |

सदर बैठकीत साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे, गादीच्या खोळी धुणेचे कामे करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दरधारक १) गणेश दत्तात्रय आघाडे गुरुकृपा लॉन्ड्री, शिर्डी व २) शंतनू गोविंद राऊत घरौंदा वॉशिंग कंपनी शिर्डी यांचेशी दरात सवलत देणार किंवा कसे याबाबत लेखी पत्र देण्याबाबत सांगण्यात आले.

**१) गणेश दत्तात्रय आघाडे गुरुकृपा लॉन्ड्री, शिर्डी** लॉण्ड्री ठेकेदार यांनी दि.११/१२/२०२० रोजीचे पत्रान्वये कोरोना संक्रमणामुळे केवळ सेवाभाव हेतूने सध्याची परिस्थिती पाहता आम्ही सादर केलेले दर कमी करता येणार नाही असे कळविले आहे.

सबब, **गणेश दत्तात्रय आघाडे गुरुकृपा लॉन्ड्री, शिर्डी यांनी निविदेत खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.**

| अनं. | कपड्यांचा तपशील | प्रती नग दर रु . (सर्वकरासह) | मुळ दर प्रती नगाकरीता | 18% GST प्रति नगाकरीता |
|---|---|---|---|---|
| १ | बेडशीट धुवून इस्त्री करणे | ३.५० | २.९७ | ०.५३ |
| २ | उशी कव्हर धुवून इस्त्री करणे | १.५० | १.२७ | ०.२३ |
| ३ | चादर धुणे | ६.३० | ५.३४ | ०.९६ |
| ४ | गादीच्या खोळी धुणे . | ७.७५ | ६.५७ | १.१८ |

पान नं.०३ वर...

२) **घरौंदा वॉशिंग कंपनी शिर्डी** लॉण्ड्री ठेकेदार यांनी दि.११/१२/२०२० रोजीचे पत्रान्वये कोरोना संक्रमणामुळे केवळ सेवाभाव हेतूने आम्ही सादर केलेले दर कमी करता येणार नाही असे कळविले आहे.

सबब, **घरौंदा वॉशिंग कंपनी शिर्डी यांनी निविदेत खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.**

| अनं. | कपड्यांचा तपशील | प्रती नग दर रु. (सर्वकरासह) | मुळ दर प्रती नगाकरीता | 18% GST प्रति नगाकरीता |
|---|---|---|---|---|
| १ | टॉवेल धुवून ड्रायर करणे | ३.०० | २.५४ | ०.४६ |
| २ | सोलापूर चादर धुणे | ८.०० | ६.७८ | १.२२ |

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** सन २०२०-२१ मधील (दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर) एक वर्ष कालावधीकरीता साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील लॉण्ड्री कामे करुन घेणेकामी ई-निविदा राबविण्यात आली होती. सदर ई-निविदेमधील निम्नतम दरधारक १) **गणेश दत्तात्रय आघाडे गुरुकृपा लॉन्ड्री, शिर्डी व २) घरौंदा वॉशिंग कंपनी** शिर्डी यांचे समवेत चर्चा वाटाघाटी करणेसाठी दि.११/१२/२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील निर्णयान्वये गठीत समितीची सभा दि.११/१२/२०२० रोजी दु.०४.०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी चर्चा करुन निविदाधारकाने देऊ केलेले दरातं सवलत देणार किंवा कसे अशी विचारणा करण्यात आली असता दोन्ही निविदाधारकांनी दर कमी करणेबाबत असमर्थता दर्शविल्याने, त्यांनी देऊ केलेले निविदेतील दर स्विकारणेत आले असून, दि.२५/१२/२०२० रोजीचे टिपणीन्वये कार्यादेश देणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/२८९३/२०२० दि.३१/१२/२०२० अन्वये १) **गणेश दत्तात्रय आघाडे गुरुकृपा लॉन्ड्री, शिर्डी** यांना व जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/२८९४/२०२० दि.३१/१२/२०२० अन्वये २) **घरौंदा वॉशिंग कंपनी शिर्डी** यांना दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या एक वर्ष कालावधीसाठीचा कार्यादेश देण्यात आला आहे.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील विषय क्र.७६ निर्णय क्र.५२८ नुसार उपरोक्त अहवालाचे चक्रिय पध्दतीने नोंद घेणेकामीचा सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीपुढे अवलोकनार्थ सविनय सादर.

(रविंद्र ठाकरे)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

23/4/2021

---

निर्णय:- उपरोक्त विषयांकित प्रस्तावाची व त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची चक्रिय पध्दतीने नोंद घेण्यात आली.

(गीता प्रवीण बनकर)
सहाधर्मादाय आयुक्त., अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

23/4/2021
(भानुदास ह.पालवे)
अप्पर विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.
सदस्य, तदर्थ समिती

11/5
(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

विषय क्र.- 9|9६2



मा.तदर्थ (Ad-hoc) सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर करावयाचा विषय

साई धर्मशाळा

विषय :- सन २०२०-२१ मधील (दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर) एक वर्ष कालावधीकरीता साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, इ. स्वच्छता दुरुस्ती व देखभालीचे कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी सुमित फॅसिलिटीज् लि, पुणे यांना देण्यात आलेल्या कार्यादेशास चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत...

अधिनियम २००४ मधील तरतुद:- ०१) २१चा (१) (ग) साईभक्तांना मंदिरात श्रींच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी /सुविधा पुरविणे. ०२) (ख) साईभक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्राम गृहे बांधणे व त्याची देखभाल करणे.

प्रस्तावीक :-

श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश-विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत साई धर्मशाळा विभागातील १२८ हॉलमध्ये साईभक्तांची निवास व्यवस्था करण्यात येते. विभागातील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी, याकरीता साई धर्मशाळा विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग इ.स्वच्छता दुरुस्ती व देखभालीचे कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेतली जातात.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०६/०२/२०२० रोजीचे सभेत नव्याने सन २०२०-२१ मधील दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर एक वर्ष कालावधीसाठी साई धर्मशाळा विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. स्वच्छता दुरुस्ती देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यास मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील विषय नं.३६ निर्णय क्र.७७ "साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा विभागाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग, स्वच्छता इत्यादी दुरुस्ती व देखभालीची कामे व व्दारावती भक्तनिवास विभागातील यांत्रिकीरणासह हाऊसकिपींग, स्वच्छता कामे आऊटसोर्स ठेकेदाराकडून करुन घेणेकामी तीनही विभागाकरीता स्वतंत्र पदनिहाय मनुष्यबळ संख्या पुरविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या GST वगळून अंदाजे रक्कम रु.१८,३१,३१,४१६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे". असे ठरले.

त्यानुसार मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा विभागाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग, स्वच्छता इत्यादी दुरुस्ती व देखभालीची कामे व व्दारावती भक्तनिवास विभागातील यांत्रिकीरणासह हाऊसकिपींग, स्वच्छता कामे आऊटसोर्स ठेकेदाराकडून करुन घेणेकामी तीनही विभागाकरीता स्वतंत्र पदनिहाय मनुष्यबळ संख्या पुरविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता दिलेली आहे.

त्यास अनुसरुन सन २०२०-२१ मधील दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर एक वर्ष कालावधीसाठी वर्तमानपत्रात ई-निविदा सूचना जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत दि.०५/०९/२०२० रोजी प्रसिध्द करणेत आली. तसेच महाराष्ट्र शासनाच्या व संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा दि.०७/०९/२०२० रोजी अपलोड करणेत आली.

ई-निविदाधारकांनी निविदा भरणेपूर्वी निविदा संदर्भात काही अडचणी असल्यास, त्याचे निरसन करणेकामी दि.११/०९/२०२० रोजी प्री-बीड मिटींग ठेवण्यात आली होती. सदर मिटींगमध्ये उपस्थित निविदाधारकांना कोणत्याही प्रकारची निविदासंदर्भात शंका/अडचणीवर चर्चा करुन त्यासंदर्भात इतिवृत्त ई निविदाधारकांचे माहितीसाठी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. सदर ई-निविदा महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्याची अंतीम मुदत दि.२८/०९/२०२० अखेर होती.

सदर ई-निविदे प्रक्रियेमध्ये मुदतीत चार निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या. ऑनलाईन प्राप्त तांत्रिक बीड (Technical Bid) दि.१५/१०/२०२० रोजीचे स्थानिक खरेदी समिती सभे समोर उघडण्यात येवून, निविदाधारकांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यामधील पात्र/अपात्र निविदांचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | मिळालेले गुण | पात्र/अपात्र |
|---|---|---|---|
| १ | BVG India Ltd., Pune | १०० | पात्र |
| २ | Eximius Management Pvt. Ltd., Thane - West | ७० | पात्र |
| ३ | Focus Facility & Security Services., Andheri (E) Mumbai | ७५ | पात्र |
| ४ | Peyush Traders., Thane | ७० | पात्र |
| ५ | Spick-N-Span Services., Malad (P) Mumbai | ८० | पात्र |
| ६ | SUMEET FACILITIES LIMITED., Chinchwad, Pune | ८५ | पात्र |

पानं. नं. ०२ वर

650

उपरोक्त पात्र सहां निविदाधारकांचे दि.०३/११/२०२० रोजीचे स्थानिक खरेदी समिती सभेसमोर वाणिज्यिक बीड (Financial Bid) उघडण्यात आले असून, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ नं | निविदाधारकाचे नाव | GST वगळून दरमहा रक्कम रु. | १८ % GST | GST सह दरमहा एकूण रक्कम रु. | GST वगळून वार्षिक रक्कम रु. | १८ % GST | GST सह वार्षिक एकूण रक्कम रु. | स्थि ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | SUMEET FACILITIES LIMITED.Pune | ३१,७४,०४५.०१ | ५,७१,३२८.१० | ३७,४५,३७३.११ | ३,८०,८८,५४०.१२ | ६८,५५,९३७.२२ | ४,४९,४४,४७७.३४ | L-1 |
| 2 | Focus Facility & Security Services. Andheri Mumbai | ३५,९४,४२६.०० | ६,४६,९९६.६८ | ४२,४१,४२२.६८ | ४,३१,३३,११२.०० | ७७,६३,९६०.०० | ५,०८,९७,०७२.०० | L-2 |
| 3 | Peyush Traders. Thane | ३९,५०,०००.०० | ७,११,०००.०० | ४६,६१,०००.०० | ४,७४,००,०००.०० | ८५,३२,०००.०० | ५,५९,३२,०००.०० | L-3 |
| 4 | Spick-N-Span Services. Malad (P) Mumbai. | ४१,२८,५६०.०० | ७,४३,१४०.८० | ४८,७१,७००.८० | ४,९५,४२,७२०.०० | ८९,१७,६८९.०० | ५,८४,६०,४०९.६० | L-4 |
| 5 | BVG India Ltd., Pune | ४१,७१,६२९.०२ | ७,५०,८९१.७८ | ४९,२२,५१२.८० | ५,००,५९,४५२.२४ | ९०,१०,७०१.४० | ५,९०,७०,१५३.६४ | L |
| 6 | Eximius Manágement Pvt.,Ltd.Thane | ४२,३४,९९४.३५ | ७,६२,२९८.९८ | ४९,९७,२९३.३३ | ५,०८,१९,९३२.२० | ९१,४७,५८७.७९ | ५,९९,६७,५१९.९९ | L-6 |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे अ.नं.१ सुमित फॅसिलिटीज्.लि, पुणे हे निम्नतम दरधारक (L-1) ठरत असल्याने, त्यांना दि. ११/१२/२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर चर्चेसाठी बोलाविणेत आले होते. सदरहू सभेत निर्णय क्र.५२५ खालीलप्रमाणे पारीत झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी व संबंधित विभागाचे प्रमुख यांची समिती गठीत करण्यात आली. या समितीने दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या कालावधीसाठी साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ.दुरुस्ती देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेसाठी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक यांचेशी निम्नतम दराबाबत चर्चा/वाटाघाटी करुन अंतिम दर निश्चित करुन संबंधितास कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याबाबतचा कार्यवाही अहवाल मा.तदर्थ (Ad-hoc) समिती समोर सादर करण्यात यावा, असे ठरले.

त्यानुसार सन २०२०-२१ साई धर्मशाळा विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ. दुरुस्ती देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर करुन घेणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दरधारक सुमित फॅसिलिटीज् लि पुणे यांचे समवेत चर्चा वाटाघाटी करणेसाठी दि.११/१२/२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील निर्णयान्वये गठीत समितीची सभा दि.११/१२/२०२० रोजी दुपारी ४.०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दालनात मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे अध्यतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

१) श्री. कान्हूराज बगाटे भा.प्र.से — मुख्य कार्यकारी अधिकारी
२) श्री. रविंद्र ठाकरे — उपमुख्य कार्यकारी अधिकारी
३) श्री. बी.बी. घोरपडे — मुख्य लेखाधिकारी
४) श्री. दिलीप उगले — प्रशासकिय अधिकारी (निवासस्थाने)
५) श्री. पुंजाहारी कोते — प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास
६) श्री पोपट निर्मळ — प्र.अधिक्षक,साई धर्मशाळा
७) श्री. वसंत पाटील — सुमित फॅसिलीटीज,लि. पुणे यांचे प्रतिनिधी

सदर बैठकीत साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ.दुरुस्ती देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने कामे करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दरधारक सुमित फॅसिलिटीज्.लि, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.वसंत पाटील उपस्थित होते. त्यांना दरात सवलत देणार किंवा कसे याबाबत लेखी पत्र देण्याबाबत सांगण्यात आले.

श्री वसंत पाटील यांनी दि.११/१२/२०२० रोजीचे पत्रान्वये महामारीची परिस्थिती पाहता आम्ही सदर कामी सादर केलेले दर कंमी करता येणार नाही असे कळविले आहे.

सबब निविदाधारक सुमित फॅसिलिटीज् लि पुणे यांनी निविदेत खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

| GST वगळून दरमहा खर्च | १८% GST सह दरमहा खर्च | GST वगळून वर्षाला खर्च | १८% GST सह वर्षाला येणारा खर्च |
|---|---|---|---|
| रु. ३१,७४,०४५.०१ | रु. ५,७१,३२८.१० | रु. ३,८०,८८,५४०.१२ | रु. ४,४९,४४,४७७.३४ |

**निविदा वार्षिक GST सह रक्कम रु.४,४९,४४,४७७.३४**

चर्चा वाटाघाटी अंती देऊ केलेली वार्षिक GST सह रक्कम रु. ४,४९,४४,४७७.३४

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:- सन २०२०-२१ मधील (दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर) एक वर्ष कालावधीकरीता साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, इ. स्वच्छता दुरुस्ती व देखभालीचे कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी ई-निविदा राबविण्यात आली होती. सदर ई-निविदेमधील निम्नतम दरधारक सुमित फॅसिलिटीज् लि, पुणे यांचे समवेत चर्चा वाटाघाटी करणेसाठी दि.११/१२/२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील निर्णयान्वये गठीत समितीची सभा दि.११/१२/२०२० रोजी दु.०४.०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी चर्चा करुन निविदाधारकाने देऊ केलेले दरात सवलत देणार किंवा कसे अशी विचारणा करण्यात आली असता निविदाधारकाने दर कमी करणेबाबत असमर्थता दर्शविल्याने, त्यांनी देऊ केलेले निविदेतील दर स्विकारणेत आले असून, दि.२४/१२/२०२० रोजीचे टिपणीन्वये कार्यादेश देणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस/वशी-साईधर्मशाळा/२८७३/२०२० दि.२९/१२/२०२० रोजीचे कार्यादेशानुसार सुमित फॅसिलिटीज लि, पुणे यांना दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या एक वर्ष कालावधीसाठीचा कार्यादेश देण्यात आला आहे.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील विषय क्र.७३ निर्णय क्र.५२५ नुसार उपरोक्त अहवालाचे चक्रिय पध्दतीने नोंद घेणेकामीचा सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीपुढे अवलोकनार्थ सविनय सादर

(रविंद्र ठाकरे)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

---

निर्णय:- उपरोक्त विषयांकित प्रस्तावाची व त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची चक्रिय पध्दतीने नोंद घेण्यात आली.

(गीता प्रवीण बनकर)
सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

23/4/2021
(भानुदास ह.पालवे)
अप्पर महसूल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी .
सदस्य, तदर्थ समिती

11/5
(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

विषय क्र.- 9163



**मा.तदर्थ (Ad-hoc) सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर करावयाचा विषय**
**साई धर्मशाळा**

**विषय :- सन २०२०-२१ करीता (दि.०१/०१/२०२१ ते दि. ३१/१२/२०२१ अखेर) एक वर्ष कालावधीसाठी साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणे कामी निम्नतम दरधारकास देण्यात आलेल्या कार्यादेशास चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतूद :-** अधिनियमाचे कलम- (१)१४/२ घ- भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्ती काम किंवा उपाययोजना हाती घेणे.(२) पोट कलम (१) (ख) भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृह बांधणे व त्यांची देखभाल करणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव :-** यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१/१०/२०२० ते दि. ३०/०९/२०२१ या एक वर्ष कालावधीसाठी साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणेकामी मागील वर्षीच्या खर्चाची रक्कम रु. ६,८२,७०१/- + GST ग्राह्य धरुन विहीतं पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणेस मान्यता देण्यात आली.

**प्रस्ताविक :-** श्रींच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे निवासासाठी साईआश्रम भक्तनिवास या विभागाकडे १२ इमारती असून, १ इमारतीमध्ये १२८ रुम याप्रमाणे एकुण १२ इमारतीमध्ये १५३६ रुम्स आहेत.

तसेच साई धर्मशाळा विभागाकडे एकुण ४ इमारती असुन एका इमारतीस ३२ हॉल या प्रमाणे ४ इमारतीमधील १२८ हॉलमध्ये पालखी पदयात्री, सहली, ग्रुपने येणारे साईभक्त, अंध/अपंग इत्यादिंची निवास व्यवस्था करण्यात येत आहे.

पेस्ट कंट्रोल एम,वाल्शे, मुंबई, यांना जा.न.एसएसएस/वशी-साईधर्मशाळा/१९०१/२०१९ दि.१७/०८/२०१९ अन्वये दि.०१/१०/२०१९ ते दि.३०/०९/२०२० या एक वर्ष कालावधीत दोन्ही निवासस्थानासाठी वार्षिक सहा औषध फवारणी करणेकामी कार्यादेश देण्यात आलेला आहे. कार्यादेशाची मुदत दि.३०/०९/२०२० अखेर सपुंष्टात आली आहे.

साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करुन घेणे साईभक्तांचे सुविधेसाठी आवश्यक आहे. सन २०२०-२१ या एक वर्ष कालावधीसाठी दैनिक वर्तमान पत्रात सूचना जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत दि.०५/०९/२०२० रोजी प्रसिध्द करणेत आली. तसेच महाराष्ट्र शासनाच्या व संस्थानचया अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा दि.०७/०९/२०२० रोजी अपलोड करण्यात आली.

ई-निविदाधारकांना निविदा भरणेपूर्वी निविदा संदर्भात काही अडचणी असल्यास त्याचे निरसन करणेकामी दि.१०/०९/२०२० रोजी प्री-बीड मिटींग ठेवण्यात आली होती. सदर मिटींगचे इतिवृत्त माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे संकेतस्थळावर व ई.डी.पी. विभागामार्फत महाराष्ट्र शासनाचे www.mahatendr.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करुन, ई-निविदा ऑनलाईन सादर करण्याची अंतिम मुदत दि.२१/०९/२०२० अखेर होती.

सदर ई –निविदे प्रक्रियेमध्ये मुदतीत ०५ निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या. ऑनलाईन प्राप्त तांत्रिक बीड ( Technical Bid) दि. २५/०९/२०२० रोजीचे खरेदी समितीचे सभेसमोर उघडण्यात येवून, कागदपत्रांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन लेखाशाखा विभागाकडुन तपासुन घेण्यात आलेला आहे. त्यामधील पात्र / अपात्र निविदांचा तपशिल खालील प्रमाणे –

| अ.नं | निविदाधारकांचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| १ | Central Warehousing Corporation, Near Turbhe Railway Station, Vashi, Navi Mumbai | पात्र |
| २ | IPM and Fumigation India Unit No-126, Bul-No-06, Jogani industrial complex, Chunabhatti, Mumbai | पात्र |
| ३ | Pepcopp Pest Contorl Services, PVT,LTD,317,Hariom Plaza, 3rd Floor, M.G.Road, Borovali (E) Mumbai | पात्र |
| ४ | Pest Control M.Walshe, LLP, 503, Embassy Centre, Nariman Point, Mumbai | पात्र |
| ५ | Pest Terminators, 4&5 Pratibha Corner, 53/54, Shaniwar peth, Punc-30 | पात्र |

पानं. नं. ०२ वर

उपरोक्त अ.क्र.०१ ते०५ क्रमांकाचे पात्र झालेल्या निविदाधारकांचे प्राईज बीड (Financial Bid) दि.१५/१०/२०२० रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आले.

मागणी :- साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा येथे पेस्ट कंट्रोल करणेकामीचा प्राईज बीड (Financial Bid) तपशिल खालील प्रमाणे-

| अ.नं | पात्र ई-निविदाधारकांचे नांवे | साईआश्रम भक्तनिवास १२ इमारती (१५३६ खोल्या) ३४९७३५.०० चौ.फुट<br>साई धर्मशाळा ०४ इमारती (१२८ हॉल) १०५३९९.६८ चौ.फुट<br>तसेच इमारती मधील खोल्या, टॉयलेट, बाथरुम व स्टोअर रुम यांचे एकुण क्षेत्रफळ | फवारणीचा चौ.फुट दर Exclusive of All Taxes दर प्रति चौ.फुट रुपये पैसे | वार्षिक दर (एकुण सहा फवारणी) रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| 1 | Central Warehousing Corporation, Navi Mumbai | ४५५१३४.६८ चौ. फुट | २.१० | ९,५५,७८२.८० |
| 2 | Pest Control M.Walshe, LLP, Mumbai | | १.८० | ८,१९,२४२.४२ |
| 3 | **Pest Terminators, Pune-30** | | १.३५ | ६,१४,४३१.८२ |
| 4 | IPM and Fumigation India, Chunabhatti, Mumbai | | १.९० | ८,६४,७५५.८९ |
| 5 | Pepcopp Pest Control Services, PVT, LTD, Borovali (E) Mumbai | | १.४३ | ६,५०,८४२.५९ |
| Note- Rate of GST as applicable by Govt,time to time | | | | |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे अ.नं. ०३ मधील Pest Terminators, Pune-30 हे निम्नतम दरधारक ठरत असल्याने, त्यांना दि.११/१२/२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत आले होते. सदरहू सभेत निर्णय क्र. ५२६ खालील प्रमाणे पारीत झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी,मुख्य लेखाधिकारी व संबधीत विभागाचे प्रमुख यांची समिती गठीत करण्यात आली, या समितीचे दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या कालावधी करीता साई आश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक यांचेशी दराबाबत चर्चा/वाटाघाटी करुन अंतिम दर निश्चीत करुन संबधीतास कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याबाबतचा कार्यवाही अहवाल मा. तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.

त्यानुसार सन २०२०-२१ साई आश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणेकामी दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर करुन घेणेकामीं प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दरधारक पेस्ट टर्मिनेटर्स, पुणे यांचे समवेत चर्चा वाटाघाटी करणेसाठी दि.११/१२/२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील निर्णयान्वये गठीत समितीची सभा दि.११/१२/२०२० रोजी दुपारी ४.०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दालनात मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे अध्यतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| | |
|---|---|
| १) श्री. कान्हूराज बगाटे भा.प्र.से | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २) श्री. रविंद्र ठाकरे | उपमुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३) श्री. बी.बी. घोरपडे | मुख्य लेखाधिकारी |
| ४) श्री. दिलीप उगले | प्रशासकिय अधिकारी (निवासस्थाने) |
| ५) श्री. पुंजाहरी कोते | प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास |
| ६) श्री पोपट निर्मळ | प्र.अधिक्षक,साई धर्मशाळा |
| ७) श्री. मच्छिंद्र कदम | पेस्ट टर्मिनेटर्स, पुणे यांचे प्रतिनिधी |

सदर बैठकीत साई आश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दरधारक पेस्ट टर्मिनेटर्स, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.मच्छिंद्र कदम उपस्थित होते. त्यांना दरात सवलत देणार किंवा कसे याबाबत लेखी पत्र देण्याबाबत सांगण्यात आले.

श्री मच्छिंद्र कदम यांनी दि.११/१२/२०२० रोजीचे पत्रान्वये कोरोना विषाणु संक्रमाणामुळे केवळ सेवाभावी या हेतुने व साई भक्तांना चांगली सेवा प्रदान करणे या दृष्टीकोनातुन आम्ही सदर कामी सादर केलेले दर कमी करता येणार नाही असे कळविले आहे.

**विभागावार वर्गिकरण**

| किटकनाशक फवारवणी करणे कामी कंत्राट कालावधी | निम्नतम दर असलेले ई-निविदाधारकांचे नाव | अ.नं. | विभागाचे नांव | फवारणीचा चौ.फुट दर Exclusive of All Taxes दर प्रति चौ.फुट रुपये पैसे | वार्षिक दर (एकुण सहा फवारणी ) रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| एक वर्ष कालावधी साठी | Pest Terminators, Pune-30 | १ | साईआश्रम भक्तनिवास १२ इमारती (१५३६ खोल्या) ३४९७३५.०० चौ.फुट | १.३५ | ४,७२,१४२.२५ |
| | | २ | साई धर्मशाळा ०४ इमारती (१२८ हॉल) १०५३९९.६८ चौ.फुट | | १,४२,२८९.५६ |
| | | | | एकुण रक्कम रुपये | ६,१४,४३१.८२ |
| अक्षरी रुपये ( सहा लाख चौदा हजार चारशे एकतीस रु. ब्यऐंशी पैसे मात्र) | | | | | |

**निविदा वार्षिक दर एकुण सहा फवारणी करीता रु. ६,१४,४३१.८२**

**चर्चा वाटाघाटी अंती देऊ केलेली वार्षिक दर सहा फवारणी करीता रु. ६,१४,४३१.८२**

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** सन २०२०-२१ मधील (दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर) एक वर्ष कालावधीकरीता साई आश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणेकामी ई-निविदा राबविण्यात आली होती. सदर ई-निविदेमधील निम्नतम दरधारक पेस्ट टर्मिनेटर्स, पुणे यांचे समवेत चर्चा वाटाघाटी करणेसाठी दि.११/१२/२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील निर्णयान्वये गठीत समितीची सभा दि.११/१२/२०२० रोजी दु.०४.०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी चर्चा करुन निविदाधारकाने देऊ केलेले दरात सवलत देणार किंवा कसे अशी विचारणा करण्यात आली असता निविदाधारकाने दर कमी करणेबाबत असमर्थता दर्शविल्याने, त्यांनी देऊ केलेले निविदेतील दर स्विकारणेत आले असून, दि.२४/१२/२०२० रोजीचे टिपणीन्वये कार्यादेश देणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस/वशी-साईधर्मशाळा/२८९२/२०२० दि.३१/१२/२०२० रोजीचे कार्यादेशानुसार पेस्ट टर्मिनेटर्स, पुणे यांना दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या एक वर्ष कालावधीसाठीचा कार्यादेश देण्यात आला आहे.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील विषय क्र.७४ निर्णय क्र.५२६ नुसार उपरोक्त अहवालाचे चक्रिय पध्दतीने नोंद घेणेकामीचा सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीपुढे अवलोकनार्थ सविनय सादर.

(रविंद्र ठाकरे)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

---

निर्णय:- उपरोक्त विषयांकित प्रस्तावाची व त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची चक्रिय पध्दतीने नोंद घेण्यात आली.

(गीता प्रवीण बनकर)
सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

27/4/2021
(भानुदास ह.पालवे)
अप्पर महसूल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.
सदस्य, तदर्थ समिती

17/5
(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

विषय क्र.- 91968



**मा.तदर्थ (Ad-hoc) सभेसमोर चक्रिय पध्दतीने सादर करावयाचा विषय**

**व्दारावती भक्तनिवास**

विषय :- **सन २०२०-२१ मधील (दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर) एक वर्ष कालावधीकरीता व्दारावती भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग स्वच्छता कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी सुमित फॅसिलिटीज् लि, पुणे यांना देण्यात आलेल्या कार्यादेशास चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत...**

टिपणी,

सेवेसी सादर.

प्रस्तावना:- श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश-विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत व्दारावती भक्तनिवास विभागातील ३१६ खोल्यामधून साईभक्तांची निवास व्यवस्था करण्यात येते. विभागातील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी, याकरीता व्दारावती भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग स्वच्छता कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेतली जातात.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०६/०२/२०२० रोजीचे सभेत नव्याने सन २०२०-२१ मधील दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर एक वर्ष कालावधीसाठी व्दारावती भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यास मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील विषय नं.३६, निर्णय क्र.७७ "साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास विभागातील यांत्रिकीरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनन्स/स्वच्छता कामाकरीता तातडीने विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्यासाठी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

त्यास अनुसरुन सन २०२०-२१ मधील दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर एक वर्ष कालावधीसाठी वर्तमानपत्रात ई-निविदा सूचना जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत दि.०५/०९/२०२० रोजी प्रसिध्द करणेत आली. तसेच महाराष्ट्र शासनाच्या व संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा दि.०७/०९/२०२० रोजी अपलोड करणेत आली.

ई-निविदाधारकांनी निविदा भरणेपूर्वी निविदा संदर्भात काही अडचणी असल्यास, त्याचे निरसन करणेकामी दि.११/०९/२०२० रोजी प्री-बीड मिटींग ठेवण्यात आली होती. सदर मिटींगमध्ये उपस्थित निविदाधारकांना कोणत्याही प्रकारची निविदासंदर्भात शंका/अडचणीवर चर्चा करुन त्यासंदर्भात इतिवृत्त ई निविदाधारकांचे माहितीसाठी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. सदर ई-निविदा महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्याची अंतीम मुदत दि.२८/०९/२०२० अखेर होती.

सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये मुदतीत आठ निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या. ऑनलाईन प्राप्त तांत्रिक बीड (Technical Bid) दि.१५/१०/२०२० रोजीचे स्थानिक खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात येवून, निविदाधारकांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यामधील पात्र/अपात्र निविदांचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | मिळालेले गुण | पात्र/अपात्र |
|---|---|---|---|
| 1 | SPICK-N-SPAN SERVICES, MUMBAI | 80 | पात्र |
| 2 | BVG INDIA LTD, PUNE | 100 | पात्र |
| 3 | PEYUSH TRADERS, THANE | 75 | पात्र |
| 4 | SUMEET FACILITIES LTD, PUNE | 100 | पात्र |
| 5 | KAMTHEN SECURITY SERVICES, INDORE (MP) | 80 | पात्र |
| 6 | FOCUS FACILITY & SECURITY SERVICES, MUMBAI | 85 | पात्र |
| 7 | D M ENTERPRISES, NAVI MUMBAI | 70 | पात्र |
| 8 | UNISEC MANAGEMENT SERVICES PVT LTD, PUNE | 65 | पात्र |

पान नं.०२ वर

उपरोक्त पात्र आठही निविदाधारकांचे दि.०३/११/२०२० रोजीचे स्थानिक खरेदी समिती सभेसमोर वाणिज्यिक बीड. (Financial Bid) उघडण्यात आले असून, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ नं | निविदाधारकाचे नाव | GST वगळून दरमहा रक्कम रु. | १८ % GST | GST सह दरमहा एकूण रक्कम रु. | GST वगळून वार्षिक रक्कम रु. | १८ % GST | GST सह वार्षिक एकूण रक्कम रु. | स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | SUMEET FACILITIES LTD, PUNE | १०,५३,७९०.०१ | १,८९,६८२.२० | १२,४३,४७२.२१ | १,२६,४५,४८०१२. | २२,७६,१८६.४२ | १,४९,२१,६६६.५४ | L-1 |
| 2 | UNISEC MANAGEMENT SERVICES PVT LTD, PUNE | ११,६०,५००.०० | २,०८,८९०.०० | १३,६९,३९०.०० | १,३९,२६,०००/- | २५,०६,६८०.०० | १,६४,३२,६८०.०० | L-2 |
| 3 | KAMTHEN SECURITY SERVICES, INDORE | ११,६५,१९१.१७ | २,०९,७३४.४१ | १३,७४,९२५.५८ | १,३९,८२,२९४.०४ | २५,१६,८१२.९२ | १,६४,९९,१०६.९६ | L-3 |
| 4 | SPICK-N-SPAN SERVICES, MUMBAI | १२,३२,५७०.०० | २,२१,८६२.६० | १४,५४,४३२.६० | १,४७,९०,८४०/- | २६,६२,३५१.२० | १,७४,५३,१९१.२० | L-4 |
| 5 | FOCUS FACILITY & SECURITY SERVICES, MUMBAI | १२,४२,९५४.०० | २,२३,७३१.७२ | १४,६६,६८५.७२ | १,४९,१५,४४८/- | २६,८४,७८०.६४ | १,७६,००,२२८.६४ | L-5 |
| 6 | D M ENTERORISES, NAVI MUMBAI | १३,९५,०००.०० | २,५१,१००.०० | १६,४६,१००.०० | १,६७,४०,०००/- | ३०,१३,२००.०० | १,९७,५३,२००.०० | L-6 |
| 7 | BVG INDIA LTD,PUNE | १३,९९,४५८.२५ | २,५१,९०२.४९ | १६,५१,३६०.७४ | १,६७,९३,४९९.१२ | ३०,२२,८२९.८४ | १,९८,१६,३२८.९६ | L-7 |
| 8 | PEYUSH TEDERS, KALYAN | १४,९०,०००.०० | २,६८,२००.०० | १७,५८,२००.०० | १,७८,८०,०००/- | ३२,१८,४००.०० | २,१०,९८,४००.०० | L-8 |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे **अ.नं.१ सुमित फॅसिलिटीज्. लि, पुणे** हे निम्नतम दरधारक (L-1) ठरत असल्याने, त्यांना दि.११/१२/२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर चर्चेसाठी बोलाविणेत आले होते. सदरहू सभेत निर्णय क्र.५२९ खालीलप्रमाणे पारीत झालेला आहे.

**"यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी व संबंधित विभागाचे प्रमुख यांचे समिती गठीत करण्यात आली समितीने दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या कालावधीसाठी व्दारावती भक्तनिवास विभगाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक यांचेशी निम्नतम दराबाबत चर्चा / वाटाघाटी करुन अंतिम दर निश्चित करुन संबंधितास कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याबाबतचा कार्यवाही अहवाल मा.तदर्थ (Ad-hoc) समिती समोर सादर करण्यात यावा, असे ठरले."**

त्यानुसार सन २०२०-२१ व्दारावती भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसिकपींग स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने दि. ०१/०१/२०२१ ते दि. ३१/१२/२०२१ अखेर करुन घेणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदातील निम्नतम दरधारक सुमित फॅसिलिटीज्.लि, पुणे यांचे समवेत चर्चा वाटाघाटी करणेसाठी दि.११/१२/२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील निर्णयान्वये गठीत समितीची सभा दि.११/१२/२०२० रोजी दु. ०४.०० वाजता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दालनात मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सदर बैठकित खालील प्रमाणे उपस्थिती होते.

१) श्री, कान्हूराज बगाटे भा,प्र,से, मुख्य कार्यकारी अधिकारी
२) श्री, रविंद्र ठाकरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी
३) श्री, बी.बी. घोरपडे, मुख्यलेखाधिकारी
४) श्री. दिलीप उगले, प्रशासकिय अधिकारी
५) श्री. पोपट निर्मळ, प्र.अधिक्षक
६) श्री. वंसत पाटील, सुमित फॅसिलीटीज,लि. पुणे यांचे प्रतिनिधी

पान नं.०३ वर...

सदर बैठकीत व्दारावती भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसिकपींग/स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने कामे करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे ठेकेदार सुमित फॅसिलिटीज्.लि, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. वसंत पाटील हे उपस्थित होते. त्यांना दरात सवलत देणार किंवा कसे याबाबत लेखी पत्र देण्याबाबत सांगण्यात आले

श्री वसंत पाटील यांनी दि.११/१२/२०२० रोजीचे पत्रान्वये महामारीची परिस्थिती पाहता आम्ही सदर कामी सादर केलेले दर कमी करता येणार नाही असे कळविले आहे.

सबब निविदाधारक सुमित फॅसिलिटीज् लि पुणे यांनी निविदेत खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

| GST वगळून दरमहा खर्च | १८% GST सह दरमहा रक्कम खर्च | GST वगळून वर्षाला खर्च | १८% GST सह वर्षाला येणारा खर्च |
|---|---|---|---|
| रु. १०,५३,७९०.०१ | रु. १२,४३,४७२.२१ | रु. १,२६,४५,४८०.१२ | रु.१,४९,२१,६६६.५४ |

निविदा वार्षिक रक्कम GST सह रु. १,४९,२१,६६६.५४

चर्चा वाटाघाटी अंती देऊ केलेली GST सह रक्कम - रु. १,४९,२१,६६६.५४

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:- सन २०२०-२१ मधील (दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर) एक वर्ष कालावधीकरीता व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग स्वच्छता कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी ई-निविदा राबविण्यात आली होती. सदर ई-निविदेमधील निम्नतम दरधारक सुमित फॅसिलिटीज् लि, पुणे यांचे समवेत चर्चा वाटाघाटी करणेसाठी दि.११/१२/२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील निर्णयान्वये गठीत समितीची सभा दि.११/१२/२०२० रोजी दु.०४.०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी चर्चा करुन निविदाधारकाने देऊ केलेले दरात सवलत देणार किंवा कसे अशी विचारणा करण्यात आली असता निविदाधारकाने दर कमी करणेबाबत असमर्थता दर्शविल्याने, त्यांनी देऊ केलेले निविदेतील दर स्विकारणेत आले असून, दि.१२/१२/२०२० रोजीचे टिपणीन्वये कार्यादेश देणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस/वशी-व्दारावती भक्तनिवास/२८७४/२०२० दि.२९/१२/२०२० रोजीचे कार्यादेशानुसार सुमित फॅसिलिटीज लि, पुणे यांना दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या एक वर्ष कालावधीसाठीचा कार्यादेश देण्यात आला आहे.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील विषय क्र.७७ निर्णय क्रं.५२९ नुसार उपरोक्त अहवालाचे चक्रिय पध्दतीने नोंद घेणेकामीचा सदरहू प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीपुढे अवलोकनार्थ सविनय सादर

(रविंद्र ठाकरे)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

---

निर्णय:- उपरोक्त विषयांकित प्रस्तावाची व त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची चक्रिय पध्दतीने नोंद घेण्यात आली.

(गीता प्रवीण बनकर)
सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

27/4/2021
(भानुदास ह.पालवे)
अप्पर महसूल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी .
सदस्य, तदर्थ समिती

11/5
(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती

EKP- LPD/Meeting/101/2021

विषय क्र.- ९ | १६५

658

लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग,

मा. तदर्थ (Adhoc) समितीचे सभेपुढील विषय

विषय –कोरोना विषाणुंचे (Covid-19) संक्रमण थांबविण्यासाठी श्री साई मंदिर बंद झाल्यानंतर लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील शिल्लक असलेल्या बेसन आटयाची स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, व्यापारी/बेसन आटा मिलधारक यांचेकडुन कोटेशन मागवुन त्याची उच्चतम दराने विक्री करून विल्हेवाट (Dispose) लावलेबाबत....

टिपणी.

अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ) - सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद आहे.

प्रस्तावना - कोरोना व्हायरस विषाणुंच्या संसर्गामुळे महाराष्ट्र शासनाने दि.१७/०३/२०२० रोजीपासुन महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, विद्यापिठे व धार्मिक स्थळे बंद करणेबाबतच्या सुचना केल्या होत्या. त्याच धर्तीवर दि.१७/०३/२०२० रोजी दुपारी ०३.०० वाजेपासुन दर्शनासाठी मंदिर पुर्णतः बंद करण्यात आले होते. श्रींचे साई समाधी मंदिर भक्तांना दर्शनासाठी बंद करण्यात आले. सदरचे काळात लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाचे कामकाजही दि.१७/०३/२०२० रोजीपासुन बंद करण्यात आल्याने लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे एकुण ८६.०० क्विंटल बेसन आटा (१७२ गोणी - प्रती गोणी ५० किलो) शिल्लक राहिला होता.

दि.०३/०७/२०२० रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात मा.मुख्यलेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, प्र.खरेदी अधिक्षक व प्र. अधिक्षक – प्रसादालय विभाग यांनी समक्ष चर्चा केली असता, सदरचा बेसन आटा शितगृहामध्ये ठेवल्यास साधारणतः ०४ महिने कालावधीसाठी सुरक्षित राहु शकतो. सदरच्या कामी शितगृहाचे मालक (औरंगाबाद, अहमदनगर) यांचेकडुन माहिती घेऊन त्यानुसार कार्यवाही करावी अशा सुचना करण्यात आल्या होत्या.

त्यानुसार दि.०३/०७/२०२० रोजी औरंगाबाद येथील मराठवाडा कोल्ड स्टोरेज, औरंगाबाद यांचेशी दुरध्वनींवरुन संपर्क केला असता, कोल्ड स्टोरेजचे मॅनेजर यांनी सदर बेसन आटा शितगृहात ठेवल्यास ०१ क्विंटल आटयासाठी प्रती महिना रु.२०/- इतका खर्च येईल असे सांगितले होते व माल आणतांना ५० Micron ची जिलिटीन बॅगमध्ये भरुन (५० कि.ग्रॅ.ची ०१ गोणी याप्रमाणे) आमच्याकडे पोहोच करावी लागेल. तसेच नवकार कोल्ड स्टोरेज, MIDC अहमदनगर यांचेशी दुरध्वनीवरुन संपर्क केला असता, कोल्ड स्टोरेजचे मालक श्री कुणाल बडजाते यांनी सदर बेसन आटा शितगृहात ठेवल्यास ०१ क्विंटल आटयासाठी प्रतीमाह रु.२०/- इतका खर्च येईल व माल ठेवतांना अथवा परत ताब्यात घेतांना हमाली म्हणुन प्रती गोणी रु.२०/- याप्रमाणे खर्च येईल. तसेच सदरचा माल आणतांना ५० Micron ची जिलिटीन बॅगमध्ये भरुन (५० कि.ग्रॅ.ची ०१ गोणीप्रमाणे) आमच्याकडे पोहोच करावी लागेल असे सांगितले होते. त्यानुसार सदरचा आटा अहमदनगर येथील नवकार कोल्ड स्टोरेज, अहमदनगर यांचेकडे ठेवणेसाठी मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ (Adhoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात आला होता, त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झाला.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, कोरोना विषाणूंचे (Covid-19) संक्रमण थांबविण्यासाठी श्री साई मंदिर बंद झाल्यानंतर लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे शिल्लक बेसन आटा कोल्ड स्टोरेजमध्ये ठेवणेकामी नवकार कोल्ड स्टोरेज, अहमदनगर यांचेकडे पाठविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू.१५,१००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

सदरचे निर्णयानुसार लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे शिल्लक असलेला बेसन आटा एकुण ८६.०० क्विंटल (५० कि.ग्रॅ वजनाची एक गोणी येणेप्रमाणे) १७२ नग गोणी चाळुन व ५० Micron ची जिलिटीन बॅगमध्ये भरुन दि.१७/०७/२०२० रोजी संस्थानचे माल वाहतुक वाहन क्र.MH-17, BD-2552 या गाडीमध्ये दुपारी १२.३० वाजता शिर्डी येथुन गेट पास क्र.६८६७, दि.१७/०७/२०२० ने अहमदनगर येथे मे.नवकार कोल्ड स्टोरेज, MIDC अहमदनगर येथे कोल्ड स्टोरेजमध्ये ठेवण्यात आलेले आले होते. दि.०५/०९/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता मे.नवकार कोल्ड स्टोरेज, MIDC अहमदनगर येथे जाऊन, बेसन आटयाची समक्ष पाहणी केली असता, सदरचा बेसन आटा व्यवस्थीत व चांगल्या स्थितीमध्ये असल्याचे दिसुन आले.तदनंतर दि.१५/०९/२०२० रोजी सदर बेसन आटयाची ५० कि.ग्रॅ. ची ०१ गोणी कोल्ड स्टोरेजमधुन शिर्डी येथे घेऊन येवुन ते खाण्यायोग्य आहे किंवा नाही याची तपासणी प्रसादालयाचे प्रयोगशाळेमध्ये करुन घेण्यात आली होती वसदरचा आटा खाण्यायोग्य असलेबाबतचा अहवाल प्राप्त झालेनंतर साधारणतः ०५ किलो बेसनाची बुंदी तयार करुन त्याची टेस्ट घेतली असता, सदर आटयापासुन तयार केलेली बुंदी खाण्यायोग्य असलेची खात्री करणेत आली.

सदर बेसन आटा तयार करुन ७.५ महिने होत आल्याने लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे शिल्लक असलेला ८५.५० क्विंटल बेसन आटयाची लवकरात लवकर विक्री करणेकरीता स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, व्यापारी/बेसन आटा मिलधारक यांचेकडुन कोटेशन मागवुन त्याची उच्चतम दराने विक्री करणेबाबत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे चक्रीय पद्धतीने प्रस्ताव सादर करण्यात आला होता, त्यास चक्रीय पध्दतीने मिळालेल्या मान्यतेनुसार स्थानिक नाशिक, अहमदनगर व औरंगाबाद याठिकाणी प्रत्येकी एका मराठी वृत्तपत्रात उच्चतम दरपत्रके मागविणेबाबत दि.१२/१०/२०२० रोजी जाहीरात प्रसिद्ध करून दि.२०/१०/२०२० अखेर मुदत देण्यात आली होती. सदर मुदती अखेर ०१ हि दरपत्रक प्राप्त न झाल्याने पुन्हा दि.२४/१०/२०२० रोजी स्थानिक नाशिक, अहमदनगर व औरंगाबाद याठिकाणी प्रत्येकी एका मराठी वृत्तपत्रात व संस्थानचे www.sai.org.in. या अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करून दरपत्रके पोहोच करण्याची अंतीम दि.०५/११/२०२० अखेर अशी ठेवण्यात आलेली होती. सदर जाहीरातीनुसार दि.०५/११/२०२० अखेर एक

दरपत्रक (श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी, शिर्डी) संस्थानला प्राप्त झाले होते.

त्यानुसार मे. नवकार कोल्ड स्टोरेज, अहमदनगर येथे ठेवणेत आलेला बेसन आटा संस्थान वाहनाने शिर्डी येथे आणुन लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाचे अन्नदान कक्षात ठेवणेत आला होता. सदरचा बेसन आटा श्री साई प्रसादालयाचे प्रयोगशाळा विभागाकडुन तपासणी करुन घेतला असता, सदरचा आटा खाण्यायोग्य असल्याचा अहवाल प्राप्त झाला होता.

दि.०५/११/२०२० रोजी प्राप्त झालेले ०१ दरपत्रक, दि.०६/११/२०२० रोजी खरेदी समिती सभेपुढे उघडण्यात आले, त्यामध्ये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को- ऑप. सोसायटी, शिर्डी यांनी संस्थानकडे असलेला बेसन आटा प्रत्येकी ३.५ कि.ग्रॅ प्रमाणे एकुण ८१३७.५०० किलो बेसन (२३२५ पिशवी) खरेदी करणेस प्रती कि.ग्रॅ रू.३६.५० असे उच्चतम दर नमुद केले होते.

सदरचे दरपत्रकातील श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी, शिर्डी यांचे नमुद केलेले दर मान्य असलेबाबत जा.क्र.एसएसएस/वशी-लाडु प्रसाद/२१५५/२०२०, दि.१०/११/२०२० रोजीचे पत्रान्वये कळविणेत येऊन, त्यांनी दरपत्रामध्ये नमुद केलेप्रमाणे ३.५ कि.ग्रॅ. बेसन आटयाची एक बॅग याप्रमाणे एकुण ८१३७.५०० कि.ग्रॅ (२३२५ बॅग) बेसन आटा त्यांचे संस्थेच्या कार्यालयापर्यंत पोहोच देण्यात आली आहे वत्याची प्रती कि.ग्रॅ रू.३६.५० चे दराने होणारी एकुण पुर्णाकीत रक्कम रु.२,९७,०१९/- (अक्षरी रुपये दोन लाख सत्यान्नव हजार एकोणावीस मात्र) संस्थानचे लेखाशाखा विभागाकडे चेक क्र.०३६५१७, दि.११/११/२०२० रोजीचे चेकव्दारा जमा करुन त्यांची पावती क्र.१०७४१, दि.२१/११ /२०२० रोजीची पावती लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाचे कार्यालयात जमा केली आहे. याप्रमाणे सदर बेसन आटयाची योग्य पद्धतीने विल्हेवाट (Dispose) करण्यात आली असुन उर्वरीत बेसन आटा श्री साई प्रसादालय विभागाकडे दैनंदिन प्रसाद भोजनामध्ये वापरासाठी देण्यात आला आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय - कोरोना विषाणुंचे (Covid-19) संक्रमण थांबविण्यासाठी श्री साई मंदिर बंद झाल्यानंतर लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील शिल्लक असलेल्या ८५.५० क्विंटल बेसन आट्यापैकी ८१.३७५ क्विंटल आटयाचीश्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी, शिर्डी यांना विक्री करण्यात आली असुन, त्यापासुन प्रती कि.ग्रॅ रू.३६.५० चे दराने प्राप्त होणारी रक्कम रु.२,९७,०१९/- (अक्षरी रुपये दोन लाख सत्यान्नव हजार एकोणावीस मात्र) संस्थानचे लेखाशाखा विभागाकडे चेक क्र.०३६५१७, दि.११/११/२०२० ने जमा केली आहे व त्यांची पावती क्र.१०७४१, दि.२१/११/२०२० त्यांनी लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाचे कार्यालयात जमा केली आहे. तसेच उर्वरीत शिल्लक (०४ क्विंटल) बेसन आटा श्री साई प्रसादालय विभागाकडे दैनंदिन प्रसाद भोजनामध्ये वापरासाठी त्यांचे मागणीनुसार देण्यात आला आहे.

तरी सदर शिल्लक बेसन आटा विल्हेवाटीबाबत (Dispose) योग्य पद्धतीने कार्यवाही करणेत आली असुन, सदर अहवालाची चक्रिय पद्धतीने नोंद घेणेकामी मा.तदर्थ समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सविनय सादर.

(रविंद्र ठाकरे)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी, तथा
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

---

निर्णय – उपरोक्त विषयांकीत प्रस्तावाची व त्यावर करणेत आलेल्या कार्यवाहीची चक्रीय पद्धतीने नोंद घेण्यात आली.

(श्रीमती गीता प्रविण बनकर)
सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानुदास पालवे)
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती.

ERP-107
660

विषय क्र.- ९/१६६

लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग,
मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय

विषय - सन २०२०-२१ या वर्षाकरीता मोतीचूर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद उक्त्या मजुरीने तयार करुन पॅकींग करुन देणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील न्युनतम दराचे निविदाधारक यांचेसमवेत केलेल्या चर्चा-वाटाघाटी करून केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची चक्रीय पद्धतीने नोंद घेणेबाबत.. ..

टिपणी-

(अ) विषयाची पुर्वपिठीका -

१) सन २०२०-२०२१ करीता मोतीचुर लाडु, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद बनवुन पॅकींग करणे इ. कामांसाठी उक्त्या पध्दतीने नविन ठेकेदारांची नियुक्ती करणेसाठी दि.११/०५/२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील विषय क्र.४० निर्णय क्र.२७४ अन्वये, दि.१४/०८/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजेपासुन www.mahatenders.gov.inया अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदरचे कालावधीत केवळ दि यशोधरा महीला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था मर्या, नाशिक - संचालिकासौ.संगिता अनिल दशपुते यांची एकच ई-निविदा प्राप्त झाल्यामुळे खरेदी नियमावलीतील नियम व व अट क्र. ४.४.२.१ मध्ये - निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी ०३ निविदाकार असणे आवश्यक आहे. तीनपेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्यास संबंधित खरेदी अधिका-यांने प्रथम किमान ०१ आठवडयाची मुदतवाढ द्यावी. अशी मुदतवाढ दिल्यानंतर देखील तीनपेक्षा कमी निविदाकांरानी भाग घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास दुस-यांदा ०१ आठवडयाची मुदतवाढ द्यावी. त्यांनतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येऊ नये असे नमुद आहे .

२) त्यानुसार सदर प्रक्रीयेस दि.३१/०८/२०२० रोजीपासुन दि.०७/०९/२०२० पर्यंत एकुण ०७ दिवसांची प्रथम मुदतवाढ देणेत आली होती. त्यानंतर दि.०७/०९/२०२० रोजी सायं.०५ वा ऑनलाईन तपासणी केली असता, एकच निविदा प्राप्त झाल्याचे निदर्शनात आल्याने व निविदा स्पर्धात्मक होणेसाठी आवश्यक असणा-या निविदा संख्येपेक्षा कमी म्हणजे एकच निविदा प्राप्त झाल्याने सदर ई-निविदा प्रक्रीयेस पुनःश्च दि.०८/०९/२०२० ते दि.१५/०९/२०२० अखेर दुस-यांदा मुदतवाढ देणेत आली होती. तथापि, दिनांक १५/०९/२०२० अखेर एकच निविदा प्राप्त झाल्याचे दिसुन आले. त्यामुळे सदर खरेदी नियमावलीतील तरतुदीनुसार आहे त्याच प्राप्त झालेल्या एका निविदेचे तांत्रीक बीड दि.१५/१०/२०२० रोजी मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडुन कागदपत्रांची तपासणी केली असता, दि यशोधरा महिला सह. औद्यो. उत्पा. संस्था, नाशिक यांची ई-निविदा तांत्रीकदृष्टया पात्र ठरल्याने, एका निविदेचे वाणिज्यीक बीड दि.२१/१०/२०२० रोजी मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत येवुन, निविदेतील प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

३) सदरचा तुलनात्मक तक्ता मान्यतेस्तव मा. तदर्थ समितीचे दि.११ डिसेंबर, २०२० रोजीचे सभेत सादर करणेत येऊन, पात्र इच्छुक निविदाधारक यांना समक्ष चर्चा-वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत आलेले होते. सदरचे सभेमधील निर्णय क्र.४८० नुसार - *".. ..यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी व संबंधित विभागाचे प्र.अधिक्षक यांची समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने सन २०२०-२०२१ करीता मोतीचुर लाडु, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद बनविणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदेमधील न्युनतम दरधारकासोबत दरांबाबत चर्चा-वाटाघाटी करुन संबंधितांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली व त्याबाबतचा अहवाल मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले."*

(ब) दिनांक ११ डिसेंबर, २०२० रोजीचे मा. तदर्थ समितीचे निर्णय क्रमांक ४८० नुसार नियुक्त केलेल्या उपसमितीने, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर मा. वरिष्ठ अधिकारी यांनी, पात्र इच्छुक निविदाधारक दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था मर्यादित, नाशिक यांचे प्रतिनिधी श्री. संदिप चौधरी यांचेशी चर्चा-वाटाघाटी केल्यानंतर, संबंधित संस्थेने सुधारीत दर देऊ केले असून, त्याबाबत दिनांक १२/१२/२०२० रोजी लेखी पत्र संस्थानला सादर केलेले होते, त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

कृ.पा.नं.०२ वर....

| अ.नं. | तपशिल | ई-निविदेतील प्राप्त दर रू. | चर्चेअंती देऊ केलेले दर रू. |
|---|---|---|---|
| १ | गावरान तुपातील मोतीचुर बुंदीचे प्रसाद लाडू तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग लाडुस हाताने पॅकींग करणे. (५० ग्रॅम वजनाचा एक लाडु) | २७१/- | २७१/- |
| २ | गावरान तुपातील मोतीचुर बुंदीचे प्रसाद लाडू तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग लाडुस मशिनने पॅकींग करणे. (५० ग्रॅम वजनाचा एक लाडु) | २७१/- | २७१/- |
| ३ | गावरान तुपातील सुट्टी बुंदी प्रसाद तयार करुन सुकविणे , पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग पाकीटांस हाताने पॅकींग करणे (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे एक पाकीट) | २८५/- | २८५/- |
| ४ | गावरान तुपातील सुट्टी बुंदी प्रसाद तयार करुन सुकविणे , पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग पाकीटांसमशिनने पॅकींग करणे. (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे एक पाकीट) | २८०/- | २८०/- |
| ५ | वनस्पती तुपातील रवा/खोबरा बर्फी तयार करणे (०१ क्विंटल साखरेचे) | २१०/- | १९५/- |

(क) विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत –

सन २०२०-२०२१ करीता मोतीचुर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकींग करुन देणेकामी मागविण्यात आलेल्या ई-निविदेमधील न्युनतम दरधारक दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था मर्यादित, नाशिक यांचेशी मा.उपसमितीने नियुक्त केलेल्य मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी चर्चा करून, निविदाधारकाने देऊ केलेले न्युनतम (अधोरेखीत) दर स्विकारणेत आले असुन त्यास उपरोक्त संदर्भ क्र.०३, दि.२१ डिसेंबर, २०२१ रोजीचे टिपणीन्वये मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस/वशी-लाडूप्रसाद/२८९०/२०२०, दि.३०/१२/२०२० रोजीच्या कार्यादेशान्वये त्यांना दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ अखेर पर्यंत कार्यदेश देण्यात आला आहे. दि.११/१२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४८० नुसार उपरोक्त अहवालाची चक्रीय पद्धतीने नोंद घेणेकामीचा सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सविनय सादर.

(रविंद्र ठाकरे)
उप मुख्य कार्यकारी अधिकार, तथा
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

निर्णय – उपरोक्त विषयांकीत प्रस्तावाची व त्यावर करणेत आलेल्या कार्यवाहीची चक्रीय पद्धतीने नोंद घेण्यात आली.

(श्रीमती गीता प्रविण बनकर)
सहा.धर्मदाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

(भानुदास पालवे) 12/7/2021
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(रविंद्र ठाकरे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

(श्रीकांत आणेकर) 7/5
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष, तदर्थ समिती.

EPP HO

विषय क्र.- 9/960

फायर अॅण्ड सेफ्टी विभाग

मा.तदर्थ (Ad-Hoc ) समिती सभेपुढील विषयाची टिपणी 662

---

**विषय :- श्री साईनाथ रुग्णालय इमारतींमध्ये फायर विभागाचे सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांचे ऑडीट अहवालानुसार स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणे व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.....**

संदर्भ :- १. आवक नं.०१३३० दि.०१.०५.२०२१ रोजी साईनाथ रुग्णालयचे ई – निविदा टेंडर

२.जा.नं.एसएसएस/फायर अॅण्ड सेफ्टी /२५७०/२०१७ दि.०९.०८.२०१७ रोजीचा कार्यादेश.

टिपणी..

श्री साईबाबा संस्थानमार्फत सेवाभावी तत्वावर ३०० बेडचे श्री साईनाथ रुग्णालय चालविणेत येत असून तेथे दररोज हजारो गोर गरीब रुग्ण उपचार घेत आहेत. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये ऑपरेशन थिएटर, आय.सी.यु, लॅब, औषध भाडांर, स्ट्रेचर लिफ्ट तसेच विविध आजारांचे ओपीडी व जनरल वॉर्ड मध्ये रुग्णांवर उपचार केले जातात. सदर ठिकाणी आग प्रतिबंधात्मक उपाय-योजने करीता सध्या आगीचे प्रकारानुसार वेगवेगळया प्रकारचे फायर सिलेंडर प्राथमिक स्वरुपाचे आगींवर तात्काळ नियंत्रणाकरीता बसविणेत आलेले असून सध्या विभागाकडील ४ अग्निशमन वाहनांव्दारे नियंत्रण करणेत येते परंतू मोठया स्वरुपाची आग किंवा आगीची घटणा घडलेस त्यावर तात्काळ नियंत्रणा करीता स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणे आवश्यक आहे.

संस्थानचे विविध विभागातील इमारतींचे अग्नी सुरक्षिततेकरीता संस्थानचे सर्व इमारतीचे फायर ऑडीट लाईफ लाईन सर्व्हीसेस, वारी यांचेमार्फत यापुर्वी करणेत आलेले आहे. फायर ऑडीटमध्ये निघालेल्या त्रुटीचे निवारण करणेकामी फायर विभागामार्फत संदर्भ क्र२ नुसार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद या कंपनीची सल्लागार म्हणून नेमणुक करणेत आलेली आहे. फायर ऑडीटमध्ये सुचविलेल्या आवश्यक बाबींची पुर्तता करणेची कार्यवाही मंदिर व मंदिर परिसरापासून सुरु करणेत आलेली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये ३०० बेडस असुन सदर बेडस रुग्णांनी नेहमी उपचारार्थ भरलेले असतात. श्री साईनाथ रुग्णालय परीसरात सेंट्रल ऑक्सीजन प्लॅन्ट कार्यान्वीत असुन त्यातुन संपुर्ण रुग्णालयास पाईपलाईनव्दारे ऑक्सीजनचा पुरवठा केला जातो. तसेच रुग्णालयाचे दोनही इमारतींचे वर तिस-या मजल्याचा वापर रुग्णालयाचे वापरासाठी होणार आहे. साईनाथ रुग्णालयाचे फेर ऑडीट सल्लागार यांचे मार्फत नव्याने दि.०५.०३.२०२१ रोजी करणेत आलेले असुन फायर ऑडीट रिपोर्ट इकडील विभागाकडे प्राप्त झालेला आहे.

आता फायर सल्लागार यांनी केलेल्या ऑडीटनुसार श्री साईनाथ रुग्णालयाचे अग्निसुरक्षिततेकामी करावयाच्या उपाययोजना ज्यामध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणेमध्ये, हायड्रंट सिस्टीम , रायझर सिस्टीम , स्प्रिंकलर सिस्टीम , अॅड्रेसेबल फायर डिटेक्शन सिस्टीम , अलार्म सिस्टीम प्रस्थपित करणेकामी सल्लागार यांचे मार्फत ई - टेंडर तयार करुन संस्थान आवक नं.०१३३० दि.०१.०५.२०२१ रोजी प्राप्त झालेले आहे. फायर सल्लागार यांचे अहवालानुसार श्री साईनाथ रुग्णालय परिसरात स्थायी अग्निशमन यंत्रणा बसविणेकामी शासनाचे स्टेट शेडयुल्ड रेट सन २०२०-२०२१ नुसार ( S.S.R.) रु.१,९०,९१,१५०/- तसेच 18 % GST रु.३४,३६,४०७/- असा एकूण अंदाजे रु.२,२५,२७,५५७/- इतका खर्च अपेक्षित आहे. संस्थानचे मंदिर व इतर परिसरातील फायर ऑडीटमध्ये निघालेल्या त्रुटीचे निवारण करणेकामी फायर विभागाचे सन २०२१ - २०२२ चे वार्षिक बजेटमध्ये संस्थानचे सर्व इमारतींसाठी ( ६४ इमारती ) १० कोटी खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय** – संस्थानचे मंदिर व इतर परिसरातील फायर ऑडीटमधील त्रुटीचे निवारण करणेकामी फायर विभागाचे सन २०२१ -२०२२ बजेटमध्ये १० कोटी खर्चास मान्यता घेण्यात आलेली असुन श्री साईनाथ रुग्णालय परिसरातील फायर ऑडीटमधील त्रुटीचे निवारण करणेकामी संस्थानचे फायर सल्लागार यांनी दिलेल्या अहवालानुसार श्री साईनाथ रुग्णालय व परीसरामध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणीकामी अंदाजे रु.२,२५,२७,५५७/- इतका खर्च अपेक्षित असून त्याबाबत सिव्हील अॅप्लीकेशन संस्थानचे विधी विभागामार्फत सादर करणे आवश्यक आहे.

संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय परिसरातील दोन इमारती व परीसरामध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी येणा-या खर्चाबाबत नवीन टेंडर प्रक्रीया राबवीणेकामी सल्लागार यांचे अहवालानुसार येणा-या अंदाजे रु.२,२५,२७,५५७/- (अक्षरी रुपये – दोन कोटी पंचविस लाख सत्ताविस हजार पांचशे सत्तावन्न मात्र ) खर्चास मान्यता तसेच सिव्हील अॅप्लीकेशन संस्थानचे विधी विभागामार्फत सादर करणेबाबत मा.तदर्थ ( Ad-Hoc ) समितीपुढे चक्रीय पद्धतीने मान्यतेस्तव सविनय सादर...

8/5/21

( कान्हुराज बगाटे, भा.प्र.से )

मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

वरील प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय परीसरातील दोन इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी व फायर सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा. लि. औरंगाबाद यांचे अहवालानुसार रु.२,२५,२७,५५७/- (अक्षरी रुपये – दोन कोटी पंचविस लाख सत्ताविस हजार पांचशे सत्तावन्न मात्र ) खर्चास तसेच सिव्हील ॲप्लीकेशन संस्थानचे विधी विभागामार्फत सादर करणेस चक्रीय पध्दतीने मान्यता देत आहे.

सदरचे दोनही विषय
तदर्थ समिती समक्ष चर्चा उपरा
निर्णय घेण्यासारखे असल्यामुळे सदरचे
विषय नियमित कॅटेगिसमोर ठेवणेस यावे
18/5/2021

(श्रीमती गीता प्रवीण बनकर )
सहा.धर्मादाय आयुक्त , अहमदनगर
सदस्य तदर्थ समिती

(बी.एच.पालवे )
अप्पर महसुल विभागीय आयुक्त,नासीक
सदस्य तदर्थ समिती

( कान्हुराज बगाटे,भा.प्र.से )
सदस्य सचिव , तदर्थ समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

( न्या.श्रीकांत आणेकर )
अध्यक्ष तदर्थ समिती
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायधिश, अहमदनगर

ERPNo - 113

चक्रीय पध्दतीने आणलेले विषय, दि. 11/05/2021

विषय–श्री साईनाथ रुग्णालय इमारतींमध्ये फायर विभागाचे सल्लागार मे. ग्राफिक इंफ्रास्ट्रक्चर प्रा. लि. औरंगाबाद यांचे ऑडीट अहवालानुसार स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणे व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

व

विषय–श्री साईबाबा हॉस्पीटलचे सर्व इमारतींमध्ये फायर विभागाचे सल्लागार मे. ग्राफिक इंफ्रास्ट्रक्चर प्रा. लि. औरंगाबाद यांचे ऑडीट अहवालानुसार स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणे व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

दोन्ही विषयाचे वाचन केले. सदरचे विषय तदर्थ समिती समक्ष चर्चा करुन निर्णय घेण्यासारखे आहेत. अशा परिस्थितीत सदरचे विषय नियमित बैठकीसमोर ठेवावेत.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 11/05/2021

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि.१२.०५.२०२१

विषय : श्री साईनाथ रुग्णालय इमारतींमध्ये फायर विभागाचे सल्लागार मे. ग्राफिक इंफ्रास्ट्रक्चर प्रा. लि. औरंगाबाद यांचे ऑडीट अहवालानुसार स्थाची अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणे व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत ...

व

विषय : श्री साईबाबा हॉस्पीटलचे सर्व इमारतींमध्ये फायर विभागाचे सल्लागार मे. ग्राफिक इंफ्रास्ट्रक्चर प्रा. लि. औरंगाबाद यांचे ऑडीट अहवालानुसार स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणे व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत . . .

दोन्ही प्रस्तावाचे वाचन केले. सदर विषयांचे एकंदरीत अवाका पाहता त्याबाबत समक्ष बैठकीमध्ये विचार होणे आवश्यक वाटते. त्यामुळे सदरचा विषय नियमीत बैठकीमध्ये ठेवण्यात यावा.

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि.१२.०५.२०२१

विषय क्र.- ३/१६४

फायर ॲण्ड सेफ्टी विभाग

666

मा.तदर्थ (Ad-Hoc ) समिती सभेपुढील विषयाची टिपणी

---

**विषय :- श्री साईबाबा हॉस्पीटलचे सर्व इमारतींमध्ये फायर विभागाचे सल्लागार मे ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांचे ऑडीट अहवालानुसार स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणे व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत...**

**संदर्भ :-** १. आवक नं.०१३३१ दि.०१.०५.२०२१ रोजी साईनाथ रुग्णालयचे ई – निविदा टेंडर

२.जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी /२५७०/२०१७ दि.०९.०८.२०१७ रोजीचा कार्यादेश..

टिपणी..

श्री साईबाबा संस्थानमार्फत सेवाभावी तत्वावर २४७ बेडचे श्री साईबाबा हॉस्पीटल चालविणेत येत असून तेथे दररोज हजारो रुग्ण उपचार घेत आहेत. श्री साईबाबा हॉस्पीटल मध्ये आयसीसीयु, जीआयसीयु , औषध भांडार , ऑपरेशन थिएटर , ब्लड बॅक , अपघात विभाग , रॅडीओलॉजी , प्रयोगशाळा, लिफ्ट तसेच इतर आवश्यक विभाग कार्यरत असुन विविध आजारांचे ओपीडी व जनरल वॉर्ड मध्ये रुग्णांवर उपचार केले जातात. सदर ठिकाणी आग प्रतिबंधात्मक उपाय-योजने करीता सध्या आगीचे प्रकारानुसार वेगवेगळया प्रकारचे फायर सिलेंडर प्राथमिक स्वरुपाचे आगींवर तात्काळ नियंत्रणाकरीता बसविणेत आलेले असून सध्या ४ अग्निशमन वाहनांव्दारे नियंत्रण केले जाते परंतू मोठया स्वरुपाची आग किंवा आगीची घटणा घडलेस त्यावर तात्काळ नियंत्रणा करीता स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणे आवश्यक आहे.

संस्थानचे विविध विभागातील इमारतींचे अग्नि सुरक्षिततेकरीता संस्थानचे सर्व इमारतीचे फायर ऑडीट लाईफ लाईन सर्व्हीसेस, वारी यांचेमार्फत यापुर्वी करणेत आलेले आहे. फायर ऑडीटमध्ये निघालेल्या त्रुटीचे निवारण करणेकामी फायर विभागामार्फत संदर्भ क्र.२ नुसार मे.ग्राफीक इंफ्रास्टक्चर प्रा.लि.औरंगाबाद या कंपनीची सल्लागार म्हणून नेमणुक करणेत आलेली आहे. फायर ऑडीटमध्ये सुचविलेल्या आवश्यक बाबीची पुर्तता करणेची कार्यवाही मंदिर व मंदिर परिसरापासून सुरु करणेत आलेली आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये २४७ बेडस असुन सदर बेडस रुग्णांनी नेहमी उपचारार्थ भरलेले असतात. श्री साईबाबा हॉस्पीटल परीसरात सेंट्रल ऑक्सीजन प्लॅन्ट कार्यान्वीत असुन त्यातुन संपुर्ण रुग्णालयास पाईपलाईनव्दारे ऑक्सीजनचा पुरवठा केला जातो. तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलचे फेर ऑडीट फायर सल्लागार यांचे मार्फत नव्याने दि.०५.०३.२०२१ रोजी करणेत आलेले असुन फायर ऑडीट रिपोर्ट इकडील विभागाकडे प्राप्त झालेला आहे.

आता फायर सल्लागार यांनी केलेल्या ऑडीटनुसार श्री साईबाबा हॉस्पिटलअग्निसुरक्षिततेकामी करावयाच्या उपाययोजना ज्यामध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणेमध्ये, हायड्रंट सिस्टीम , रायझर सिस्टीम , स्प्रिंकलर सिस्टीम , ॲड्रेसेबल फायर डिटेक्शन सिस्टीम, अलार्म सिस्टीम प्रस्थपित करणेकामी सल्लागार यांचे मार्फत ई - टेंडर तयार करुन संस्थान आवक नं.०१३३१ दि.०१.०५.२०२१ रोजी प्राप्त झालेले आहे. फायर सल्लागार यांचे अहवालानुसार श्री साईबाबा हॉस्पीटल परिसरात स्थायी अग्निशमन यंत्रणा बसविणेकामी शासनाचे सन २०२०-२०२१ स्टेट शेडयुल्ड रेट ( S.S.R.) रु.१,५९,२१,९६०/- तसेच १८ % GST रु.२८,६५,९५३/- असा एकूण अंदाजे रु.१,८७,८७,९१३/- ( एक कोटी सत्याऐंशी लाख सत्याऐंशी हजार नऊशे तेरा मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

संस्थानचे मंदिर व इतर परिसरातील फायर ऑडीटमध्ये निघालेल्या त्रुटीचे निवारण करणेकामी फायर विभागाचे सन २०२१ - २०२२ चे वार्षिक बजेटमध्ये संस्थानचे सर्व इमारतींसाठी ( ६४ इमारती ) १० कोटी खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय** – संस्थानचे मंदिर व इतर सर्वपरिसरातील फायर ऑडीटमधील त्रुटीचे निवारण करणेकामी फायर विभागाचे सन २०२१ - २०२२ बजेटमध्ये १० कोटी खर्चास मान्यता घेण्यात आलेली असुन श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरातील फायर ऑडीटमधील त्रुटीचे निवारण करणेकामी संस्थानचे फायर सल्लागार यांनी दिलेल्या अहवालानुसार श्री साईबाबा हॉस्पिटल व परीसरामध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणीकामी अंदाजे रु.१,८७,८७,९१३/- ( एक कोटी सत्याऐंशी लाख सत्याऐंशी हजार नऊशे तेरा मात्र) इतका खर्च अपेक्षित असून त्याबाबत सिव्हील ॲप्लीकेशन संस्थानचे विधी विभागामार्फत सादर करणे आवश्यक आहे.

संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरातील सर्व इमारती व परीसरामध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी येणा-या खर्चाबाबत नवीन टेंडर प्रक्रीया राबवीणेकामी सल्लागार यांचे अहवालानुसार येणा-या अंदाजे रु.१,८७,८७,९१३/- ( एक कोटी सत्याऐंशी लाख सत्याऐंशी हजार नऊशे तेरा मात्र) खर्चास मान्यता तसेच सिव्हील ॲप्लीकेशन संस्थानचे विधी विभागामार्फत सादर करणेबाबत सदरचा विषय मा. तदर्थ (Ad-Hoc ) समितीपुढे चक्रीय पद्धतीने मान्यतेस्तव सविनय सादर...

( कान्हुराज बगाटे, भा.प्र.से )
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

वरील प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलपरीसरातील सर्व इमारतींमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी व फायर सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा. लि. औरंगाबाद यांचे अहवालानुसार रु.१,८७,८७,९१३/- ( एंक कोटी सत्याऐंशी लाख सत्याऐंशी हजार नऊशे तेरा मात्र) खर्चास तसेच सिव्हील ॲप्लीकेशन संस्थानचे विधी विभागामार्फत सादर करणेस चक्रीय पधदतीने मान्यता देत आहे.

दोनही विषयाला आवाज पाहता सदरचे विषय नियमीत बैठकीमध्ये ठेवणेत यावे

18/5/2021

(श्रीमती गीता प्रवीण बनकर )
सहा.धर्मादाय आयुक्त , अहमदनगर
सदस्य तदर्थ समिती

( बी.एच.पालवे )
अप्पर महसुल विभागीय आयुक्त,नासीक
सदस्य तदर्थ समिती

10/5/2021

( कान्हुराज बगाटे,भा.प्र.से )
सदस्य सचिव , तदर्थ समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

( न्या.श्रीकांत आणेकर )
अध्यक्ष तदर्थ समिती
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायधिश, अहमदनगर

ER 8 no 117

चक्रीय पध्दतीने आणलेले विषय, दि. 11/05/2021

विषय–श्री साईनाथ रुग्णालय इमारतींमध्ये फायर विभागाचे सल्लागार मे. ग्राफिक इंफ्रास्ट्रक्चर प्रा. लि. औरंगाबाद यांचे ऑडीट अहवालानुसार स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणे व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

व

विषय–श्री साईबाबा हॉस्पीटलचे सर्व इमारतींमध्ये फायर विभागाचे सल्लागार मे. ग्राफिक इंफ्रास्ट्रक्चर प्रा. लि. औरंगाबाद यांचे ऑडीट अहवालानुसार स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणे व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

दोन्ही विषयाचे वाचन केले. सदरचे विषय तदर्थ समिती समक्ष चर्चा करुन निर्णय घेण्यासारखे आहेत. अशा परिस्थितीत सदरचे विषय नियमित बैठकीसमोर ठेवावेत.

(श्रीकांत एल. आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दिनांक – 11/05/2021

चक्रीय पध्दतीने आणलेला विषय

दि.१२.०५.२०२१

विषय : श्री साईनाथ रुग्णालय इमारतींमध्ये फायर विभागाचे सल्लागार मे. ग्राफिक इंफ्रास्ट्रक्चर प्रा. लि. औरंगाबाद यांचे ऑडीट अहवालानुसार स्थाची अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणे व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत ...

व

विषय : श्री साईबाबा हॉस्पीटलचे सर्व इमारतींमध्ये फायर विभागाचे सल्लागार मे. ग्राफिक इंफ्रास्ट्रक्चर प्रा. लि. औरंगाबाद यांचे ऑडीट अहवालानुसार स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणे व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत . . .

दोन्ही प्रस्तावाचे वाचन केले. सदर विषयांचे एकंदरीत अवाका पाहता त्याबाबत समक्ष बैठकीमध्ये विचार होणे आवश्यक वाटते. त्यामुळे सदरचा विषय नियमीत बैठकीमध्ये ठेवण्यात यावा.

(गीता प्र. बनकर)
सहायक धर्मादाय आयुक्त तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी

दि.१२.०५.२०२१

ERP.NO
FRS-meeting-150.20..
150.2021

फायर ॲण्ड सेफ्टी विभाग

मा.तदर्थ (Ad-Hoc) समितीचे सभेपुढील विषय

670

विषय क्र.-१/१६९

**विषय :- संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी निम्नतम दरधारक मे.अल्ट्रा फायरटेक सिस्टीम , पुणे यांचेशी चर्चा / वाटाघाटी करुन पुढील निर्णय घेणेबाबत ....**

**संदर्भ :-** १.मा.व्य.समितीचे दि.१९.०६.२०१६ रोजीचे सभेतील विषय क्रं ०१ व निर्णय क्रं ३२२ नुसार

२. मा.व्य.समितीचे दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील विषय क्रं ३७ व निर्णय क्रं २६० नुसार

३. मा.व्य.समितीचे दि.०८.१२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं १०७५ नुसार.

४. मा.तदर्थ समितींची सिव्हील ॲप्लीकेशन सादर करणेबाबत चक्रीय पदधतीने मान्यता

५. मा.औरंगाबाद हायकोर्ट यांचा सिव्हील अर्ज क्रं १३६६/२०२१ चे मान्यता

६. जा.न.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/२९/२०२१ दि.१२.०५.२०२१ रोजीची मंजुर टिपणी.

७. दि.२१.०५.२०२१ रोजी प्राप्त निविदाधारकांचा उघडणेत आलेला वाणीज्यीक तक्ता.

८. महाराष्ट्र शासन उर्जा , उदयोग व कामगार विभाग शानिक्रं भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग III उदयोग ४ अन्वये

९. सामान्य प्रशासन जावक क्रं.०२४१६ दि.२६.०५.२०२१ रोजीचे फायर सल्लागार यांचे पत्र.

टिपणी..

श्री साईबाबा संस्थानचे सर्व इमारतीचे फायर ऑडीट लाईफ लाईन सर्व्हीसेस व सी.आय.एस.एफ. मुंबई यांचे मार्फत करण्यात आलेले होते. सदर ऑडीटमध्ये निघालेल्या त्रुटीचे निवारण करणेकामी मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांची उपरोक्त संदर्भ क्रं०१ नुसार ( ई – निविदा प्रक्रियाव्दारे) संस्थानचे फायर सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. फायर सल्लागार यांनी साई मंदिर व मंदिर परिसराची पहाणी करुन मंदिर परिसरात स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणेकामी शासनाचे सुधारीत DSR / CSR नुसार अंदाजे ०२ कोटी १५ लाख खर्चाबाबतचा आराखडा सादर केलेला होता. त्यानुसार मंदिर परिसरात स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणेकामी (स्थायी अग्निशमन यंत्रणा, हायड्रंट सिस्टीम, स्प्रिंकलर सिस्टीम, स्मोक डिटेक्टर, अलार्म सिस्टीम) ई - निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे २ कोटी १५ लाख मात्रचे खर्चास उपरोक्त संदर्भ क्रं०२ व संदर्भ क्रं ०४ नुसार मान्यता घेण्यात आलेली आहे.

प्रस्तावीत अग्निशमन यंत्रणा ऊभारणी कामी येणा-या रक्कम रु २.१५ कोटी मात्रचे अपेक्षीत खर्चास मान्यतेकरीता मा.उच्च न्यायालय मुंबई , खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन सादर करणेत आले असता दि.१२.०२.२०२१ रोजीचे आदेशान्वये प्रस्तावीत खर्चास मान्यता मिळालेली आहे.

संदर्भ क्रं ०३ नुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८.१२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१०७५ नुसार श्री साईबाबा संस्थानमध्ये विविध कामांसाठी प्रसिद्ध करण्यात येणा-या ई निवीदा सुचनांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळावा याकरीता ज्या विभागांच्या कामांसाठी शासनाच्या DSR नुसार अंदाजपत्रकीय खर्च दाखवावा लागतो , अशा कामाचे अंदाजपत्रक DSR / CSR नुसार करावे. मात्र अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २० % कमी दराने ई - निवीदा प्रसिद्ध करणेत यावी. असा निर्णय झालेला असलेने प्रस्तावीत कामी महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in. या संकेतस्थळावर अपेक्षित खर्च रक्कम रु.२.१५ कोटी याची २० % रक्कम कपात करुन टेंडर व्हॅल्यु रक्कम रु.१,९१,०८,८८०/- मात्र देणेत आलेली होती.

त्यानुसार प्राप्त ई – निविदांचे तांत्रीक बीड दि.१०.०४.२०२१ रोजी उघडणेत आले असता खालील प्रमाणे ०३ ई - निवीदा प्राप्त झाल्या.

| अ.नं. | प्राप्त ई-निवीदा धारकांचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.लाईफलाईन फायर सर्व्हीसेस , नासीक |
| ०२ | विनटेक्स फायर प्रोटेक्शन प्र.ली. नवी मुंबई |
| ०३ | अल्ट्रा फायरटेक सिस्टीम , पुणे |

तिनही निवीदाधारक पात्र असलेने त्यांचे वाणीज्यीक ई-निवीदा दि.२१.०५.२०२१ रोजी मा.खरेदी समितीचे समक्ष उघडणेत आले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | प्राप्त ई-निवीदा धारकांचे नांव | प्रसिद्ध करणेत आलेली ई-निविदा रक्कम | निवीदा धारकांचे प्राप्त दर | निविदेपेक्षा अधिकचे प्राप्त दर % |
|---|---|---|---|---|
| ०१ | मे.लाईफलाईन फायर सर्व्हीसेस , नासीक | रु.१,९१,०८,८८०/- | रु.२,३६,९५,०११/- | + २४.००० |
| ०२ | मे.विनटेक्स फायर प्रोटेक्शन प्र.ली. नवी मुंबई | | रु.२,४५,८३,५७४/- | + २८.६५० |
| ०३ | मे.अल्ट्रा फायरटेक सिस्टीम , पुणे | | रु.२,२८,३४,१५६/- | +१९.४९५ |

उपरोक्त तुलनात्मक दरानुसार प्रस्तावीत कामी अ.नं.०३ मे. अल्ट्रा फायरटेक सिस्टीम , पुणे यांचे दर रक्कम रु. २,२८,३४,१५६/- ( अक्षरी- दोन कोटी अठ्ठावीस लाख चौतीस हजार एकशे छपन्न मात्र ) निम्नतम आहेत. मात्र सदरचे दर ई-निवीदेत प्रसिध्द करणेत आलेली टेंडर व्हॅल्यु रक्कम ( रु.१,९१,०८,८८०/- ) रक्कमेपेक्षा + १९.४९५ % जास्त तसेच मंजुर रक्कम रु.२.१५ कोटी पेक्षा ६.२० % इतकी रक्कम अधिक आलेली आहे.

उघडणेत आलेले वाणीज्यीक बीड हे प्रकल्प सल्लागार मे.ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. औरंगाबाद यांचेकडे तपासणी कामी पाठविणेत आले असता संदर्भ क्रं ०९ चे पत्रान्वये त्यांनी निम्नतम दरधारक मे.अल्ट्रा फायरटेक सिस्टीम , पुणे यांचे दर संस्थाने प्रसिध्द केलेल्या दरापेक्षा जास्त असल्याने त्यांना संस्थान व्यवस्थापन समितीचे समोर चर्चा / वाटाघाटीकामी बोलविणे , संस्थानचे नियमाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे.

संदर्भ क्रं ८ खरेदी नियमावली मधील ३.१.२.१ किमंतीचा अदांज – खरेदीची वास्तविक किमंत व अंदाजित किमंत यामध्ये ( - ) २० % ते ( + ) १० % तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदारास विचार करता येईल असे नमुद करणेत आलेले आहे.

उपरोक्त तरतुदीनुसार प्रस्तावीत कामी मा.तदर्थ समितीत मंजुर रक्कम ( रु.२.१५ कोटी ) पेक्षा प्राप्त झालेले निम्नतम दर हे + १० % पेक्षा कमी ( ६.२० % ) इतके असल्याने त्यांना मा.तदर्थ समितीसमोर चर्चा वाटाघाटीसाठी बोलावून पुढील कार्यवाही करता येईल.

विभागाचा अभिप्राय – मंदिर परिसरात स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापीत करणेकामी प्रसिध्द करणेत आलेल्या ई – टेंडर मधील न्युनतम दरधारक मे. अल्ट्रा फायरटेक सिस्टीम , पुणे यांचे प्राप्त दर रक्कम रु.२,२८,३४,१५६/- हे मा.तदर्थ समितीत मंजुर रक्कम ( रु.२.१५ कोटी ) पेक्षा ( ६.२० % ) अधिक आहेत. मात्र शासकीय विभागांनी करावयाच्या खरेदीसाठीचे नियमावली मधील ३.१.२.१ मधील तरतुदीनुसार सदरचे प्राप्त झालेले निम्नतम दर हे मुळ मंजुर खर्चाचे + १० % पेक्षा कमी ( ६.२० %) इतके असल्याने त्यांना दराबाबत मा.तदर्थ समितीसमोर चर्चा / वाटाघाटीसाठी बोलावून पुढील कार्यवाही करता येईल असे नम्र मत आहे.

तरी संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी निम्नतम दरधारक मे.अल्ट्रा फायरटेक सिस्टीम , पुणे यांचेशी मा.तदर्थ समितीच्या वतीने मा.मु.का.अ. यांच्याद्वारे चर्चा / वाटाघाटी करण्याचे अधिकार देता येईल. व तदनंतर निम्नतम पुरवठा धारकास कार्यादेश देणेबाबत तसेच पुढील कार्यवाही करणेसाठी मान्यतेकरीता मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर...

( कान्हुराज बगाटे , भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

---

वरील प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानचे मंदिर व मंदिर परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी करणेकामी निम्नतम दरधारक मे.अल्ट्रा फायरटेक सिस्टीम , पुणे यांचेशी मा.तदर्थ समितीच्या वतीने मा.मु.का.अ. यांच्याद्वारे चर्चा / वाटाघाटी करण्याचे अधिकार देवून निम्नतम पुरवठा धारकास कार्यादेश देणे तसेच पुढील कार्यवाही करणेसाढी चक्रीय पध्दतीने मान्यता देत आहे.

07/06/2024

(श्रीमती गीता प्रवीण बनकर )
सहा.धर्मादाय आयुक्त , अहमदनगर
सदस्य तदर्थ समिती

( बी.एच.पालवे )
अप्पर महसुल विभागीय आयुक्त,नासीक
सदस्य तदर्थ समिती

( कान्हुराज बगाटे,भा.प्र.से )
सदस्य सचिव , तदर्थ समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

31/5

( न्या.श्रीकांत आणेकर )
अध्यक्ष तदर्थ समिती
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायधिश, अहमदनगर

विषय क्र.- 9/9100

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय



साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग

**विषय :- सन २०२१-२२ करीता दि. ०१/०५/२०२१ ते दि.३०/०४/२०२२ या कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या विभागाकडील इमारतीमध्ये व पेस्ट कंट्रोल करणे कामी निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतूद :-** अधिनियमाचे कलम- (१)१४/२ घ- भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्ती काम किंवा उपाययोजना हाती घेणे.(२) पोट कलम (१) (ख) भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृह बांधणे व त्यांची देखभाल करणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव :-** मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.१९/१२/२०२० रोजीचे सभेतील विषय नं.०४ व निर्णय क्र. ५३९ नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१/०५/२०२१ ते दि. ३०/०४/२०२२ या एक वर्ष कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान , साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवासस्थान या तिनही विभागांकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणे कामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या साईबाबा भक्तनिवासस्थान , साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवासस्थान विभागासाठी एकत्रित अंदाजे खर्च रक्कम रु.७,१५,९३९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

**प्रस्ताविक :-** साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या विभागाकडे असणा-या हॉल खोल्या व लॉकर्स तसेच त्यांचे एकुण क्षेत्रफळ खालीलप्रमाणे -

| अ.नं | विभाग | इमारतीचे नाव | खोल्या संख्या | हॉल संख्या | लॉकर्स | खोल्या वा हॉल मिळुण एकूण क्षेत्रफळ (चौरस फुटामध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | साईबाबा भक्तनिवासस्थान | साईबाबा भक्तनिवासस्थान | ५१६ | ११ | १९८ | १,७३,२६८.०० |
| २ | साईप्रसाद निवासस्थान | ०१) समर्पण | ०२ | -- | -- | ४९०.०० |
| | | ०२) साईनाथ छाया | -- | ०२ | -- | ४४८.०० |
| | | ०३) साईनिवास अतिथीगृह | २४ | -- | -- | १४,२२४.५० |
| | | ०४) साईउद्यान | ३३ | १२ | ९९ | २३,३१४.०० |
| | | ०५) शांतिनिकेतन | १५ | -- | -- | २,५६८.७२ |
| | | ०६) सेवाधाम | ६० | -- | -- | ५,५०८.८९ |
| | | ०७) साई सेवा बसस्थानक | १४ | १४ | -- | १५,३९७.०२ |
| | | ०८) संस्थान स्पर्धा परिक्षा केंद्र व अतिथीगृह | ६४ | -- | -- | २०,६६२.५३ |
| ३ | द्वारावती निवासस्थान | द्वारावती निवासस्थान | ३३० | -- | -- | २,०५,११७.०० |
| | | एकुण - | १,०५८ | ३९ | २९७ | ४,६०,९९८.६६ |

सन २०२१-२२ करीता साई साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या तीनही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणे कामी दि. ०१/०५/२०२१ ते दि. ३०/०४/२०२२ या एक वर्ष कालावधीसाठी वर्तमानपत्रात ई- निविदा सूचना जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत दि. ११/०३/२०२१ रोजी प्रसिध्द करणेत आली. तसेच महाराष्ट्र शासनाच्या व संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा दि. ०५/०३/२०२१ रोजी अपलोड करणेत आली.

ई-निविदाधारकांना निविदा भरणेपूर्वी निविदा संदर्भात काही अडचणी असल्यास त्यांचे निरसन करणेकामी दि. १८/०३/२०२१ रोजी प्री-बीड मिटींग ठेवण्यात आली होती. सदर मिटींगचे इतिवृत्त माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे संकेतस्थळावर व ई.डी.पी. विभागामार्फत महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करुन ई – निविदा ऑनलाईन सादर करण्याची अंतिम मुदत दि.२६/०३/२०२१ अखेर होती.

सदर ई-निविदे प्रक्रियेमध्ये मुदतीत नऊ निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या. ऑनलाईन प्राप्त तांत्रिक बीड (Technical Bid) दि. ३१/०३/२०२१ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेसमोर उघडण्यात येवून, कागदपत्रांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन लेखाशाखा विभागाकडुन तपासुन घेण्यात आलेला आहे. त्यामधील पात्र / अपात्र निविदांचा तपशिल खालील प्रमाणे –

| अ.नं | निविदाधारकांचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| १. | Elite Corporation Kachchh . Gujarat | पात्र |
| २. | Hindustan Insecticides, Mumbai | पात्र |
| ३. | Pepcopp pest Control Services Pvt. Ltd, Borivali, Mumabi | पात्र |
| ४. | Pest Control M.Walshe, Mumbai | पात्र |
| ५. | Pest Terminatiors, Pune | पात्र |
| ६. | IPM and Fumigation India Mumbai | पात्र |
| ७. | Central Warehousing Corporation, Navi Mumbai | अपात्र |
| ८. | Pest O stop Mumbai | अपात्र |
| ९. | Chintamani pest control Dombivali, Mumbai | अपात्र |

पा.नं. ०२ वर ..

मागणी :- उपरोक्त पात्र सहा निविदाधारकांचे दि.१५/०४/२०२१ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेसमोर वाणिज्यिक बीड (Financial Bid) उघडण्यात आले असून, त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

| अ.नं. | पात्र ई- निविदाधारकांचे नावे | साईबाबा भक्तनिवास<br>खोल्या – ५१६, हॉल- ११<br>लॉकर -१९८<br>१,७३,२६८.०० चौ.फुट<br>.....<br>साईप्रसाद निवासस्थान<br>खोल्या -२१२ हॉल – २८<br>लॉकर -९९<br>८२,६१३.६६ चौ.फुट<br>.....<br>व्दारावती निवासस्थान<br>खोल्या - ३३०<br>२,०५,११७.०० चौ.फुट<br>.....<br>तसेच इमारती मधील खोल्या, टॉयलेट, बाथरुम व स्टोअर रुम यांचे एकुण क्षेत्रफळ | GST वगळून दर प्रति चौ. फुट रुपये पैसे | एकुण फवारणीचा चौ. फुट वार्षिक दर ✡ Exclusive of All Taxes ✡ (सहा फवारणी) रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | Elite Corporation Kachchh . Gujarat | ४,६०,९९८.६६ चौ. फुट | ५.०० | २३०४९९३.३०/- |
| २ | Hindustan Insecticides, Mumbai | | १.६५ | ७६०६४७.७९/- |
| ३ | **Pepcopp pest Control Services Pvt.Ltd, Borivali, Mumbai** | | ०.९२ | ४२४११८.७७/- |
| ४ | Pest Control M.Walshe, Mumbai | | १.८० | ८२९७९७.५९/- |
| ५ | Pest Terminatiors, Pune | | १.१० | ४६७४३३.०२/- |
| ६ | IPM and Fumigation India Mumbai | | १.३५ | ६२२३४८.१९/- |
| Note- Rate of GST as applicable by Govt,time to time | | | | |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे अ.नं. ०३ मधील Pepcopp pest Control Services Pvt.Borivali, Mumabi हे निम्नतम दरधारक आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :-** सन २०२१-२२ करीता दि. ०१/०५/२०२१ ते दि.३०/०४/२०२२ या एक वर्ष कालावधीसाठी(प्रति दोन महिन्यास एक फवारणी एकुण - सहा फवारणी) साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या तीनही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणे कामी ई-निविदा प्रक्रिया राबवितांना निविदाधारकांकडुन GST वगळुन दर मागविण्यात आले आहेत. त्यानुसार पात्र निविदाधारकांचे वाणिज्यिक बीड (Financial Bid) मा.खरेदी समितीचे दि. १५/०४/२०२१ रोजीचे सभेत उघडुन त्यामध्ये अ.नं क्र.०३ मधील **Pepcopp pest Control Services Pvt.Borivali, Mumbai** यांचे निम्नतम वार्षिक दर **रु. ४,२४,११८.७७/-**

( अक्षरी रु. चार लाख चोवीस हजार एकशे अठरा पैसे सत्याहत्तर मात्र /-) प्राप्त झालेले आहेत.

| किटक नाशक फवारणी करणे कामी कंत्राट कालावधी | निम्नतम दर असलेले ई -निविदधारकाचे नाव | अ.नं. | विभागाचे नाव | GST वगळून दर प्रति चौ. फुट रुपये. पैसे | एकुण फवारणीचा चौ. फुट वार्षिक दर ✡ Exclusive of All Taxes ✡ (सहा फवारणी) रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| दि.०१/०५/२०२१ ते दि.३०/०४/२०२२ एक वर्ष कालावधीकरीता | **Pepcopp pest Control Services Pvt. Ltd, Borivali, Mumbai** | १ | साईबाबा भक्तनिवास्थान खोल्या – ५१६, हॉल- ११ लॉकर -१९८ १,७३,२६८.०० चौ.फुट | ०.९२ | १५९४०६.५६/- |
| | | २ | साईप्रसाद निवासस्थान खोल्या -२१२ हॉल – २८ लॉकर -९९ ८२,६१३.६६ चौ.फुट | | ७६,००४.५६/- |
| | | ३ | व्दारावती निवासस्थान खोल्या - ३३० २,०५,११७.०० चौ.फुट | | १८८७०७.६४/- |
| | | | | एकूण रक्कम रुपये | ४,२४,११८.७७/- |
| ( अक्षरी रु. चार लाख चोवीस हजार एकशे अठरा पैसे सत्याहत्तर मात्र /-) | | | | | |

तरी दि.१५/०४/२०२१ रोजी मा.खरेदी समिती सभे समोर उघडण्यात आलेले कमर्शिअल (वाणिज्यीक) बिड निविदेमध्ये **Pepcopp pest Control Services Pvt.Ltd, Borivali, Mumbai** यांचे कर वगळुन दर प्रती चौ. फुटास रु.०.९२ इतके असून मंजुर दरानुसार रक्कम रु. ४,२४,११८.७७ + GST १८ % रक्कम रु. ७६.३४१.३७/- असे एकुण रक्कम रु. ५,००,४६०.१४/- पुर्णांकित रक्कम रु. ५,००,४६०/- (अक्षरी रक्कम रु. पांच लाख चारशे साठ मात्र) इतकी होत असून त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस, सदरहु प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर चक्रीय पध्दतीने सादर.

(रविंद्र ठाकरे)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे **Pepcopp pest Control Services Pvt. Ltd, Borivali, Mumbai** यांचे प्रति चौ.फुटास ०.९२ पैसे निम्नतम दर स्विकारुन दि. ०१/०५/२०२१ ते ३०/०४/२०२२ या एक वर्ष कालावधीकरीता (प्रति दोन महिन्यास एक फवारणी, एकुण - सहा औषध फवारणी) करणे कामी कार्यादेश देणेस चक्रीय पध्दतीने मान्यता देण्यात यावी.

( गीता प्रविण बनकर )
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर
सदस्य, तदर्थ समिती

( भानुदास ह. पालवे )
अप्पर विभागीय आयुक्त, नाशिक
सदस्य, तदर्थ समिती

(रविंद्र ठाकरे)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
सदस्य, तदर्थ समिती

(श्रीकांत आणेकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर
अध्यक्ष , तदर्थ समिती

विषय क्र.- ७/१७७

**"मा.तदर्थ समितीचे (Ad-Hoc) सभेपुढे चक्रिय पद्धतीने निर्णयार्थ विषय"**
**श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डी**

दि.१३.०५.२०२१

**विषय – श्री साईबाबा महाविद्यालय – शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता प्राध्यापक भरती करणेबाबत...**

मान्यतेस सविनय सादर,

**अधिनियम:-** २००४ मधील तरतुद क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक –**

**प्रस्ताविक -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या व्यवस्थापनास मा. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्रमांक मान्यता-२०१८ /(३०/१८)/ मशि -४, दि. २८ फेब्रुवारी २०१८ चे आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासुन नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देणेबाबत मान्यता दिलेली आहे. तसेच शासन आदेश क्रमांक एनजीसी-२०१८(१००/१८) मशि-४, दि.१५ जुन, २०१८ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये श्री साईबाबा महाविद्यालय या नामाभिधानाने नवीन महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सन २०१८-१९ मध्ये श्री साईबाबा महाविद्यालयाचे कामकाज सुरु करणेत आलेले असून, नैसर्गिक वाढीनुसार सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षामध्ये द्वितीय वर्षाचे वर्ग व सन २०२०-२१ मध्ये तृतीय वर्षाचे वर्गांकरीता मान्यता प्राप्त झालेली आहे.

मा.शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांचेकडील जा.क्र.ससं/उशि/पुवि/कायम विना अनु. कार्यभार/महावि/२०२०/१४२८ दि.३०.०७.२०२० अन्वये सन २०१९-२० मधील विद्यार्थी संख्या विचारात घेता, प्रथम व द्वितीय वर्षाकरिता अनुज्ञेय शिक्षक व शिक्षकेतर पदांना मान्यता दिलेली होती.

तृतीय वर्षातील कार्यभारानुसार निर्माण होणा-या Ad-Hoc पदांसाठी मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांची पुर्वमान्यता घेणेकामी मा.शिक्षण सहसंचालक, पुणे यांचेकडे दि.०६.०८.२०२० रोजी प्रस्ताव दाखल केला असता, मा.शिक्षण सहसंचालक, पुणे यांनी त्यांचेकडील जा.क्र./उशिसं/पुवि/कायम विनाअनुदानित/कार्यभार/२०२०/ १४५५ दि.०६.०८.२०२० पत्रान्वये सदर पदनिश्चिती करतांना दि.०१ ऑक्टोबर रोजीची विद्यार्थीसंख्या गृहीत धरुन या कार्यालयाकडून पदनिश्चिती करुन देण्यात येते. तरी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी १ ऑक्टोबर, २०२० रोजीची विद्यार्थी संख्या सादर केल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता शिक्षक-शिक्षकेतर पदे निश्चिती करुन देण्यात येतील, असे कळविलेले होते.

त्यामुळे मा.शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांचेकडील जा.क्र.ससं/उशि/पुवि/कायम विना अनु. कार्यभार/महावि/२०२०/१४२८ दि.३०.०७.२०२० अन्वये मंजूर २२ प्राध्यापक, ०१ ग्रंथपाल व ०१ शारिरीक शिक्षण संचालक असे एकुण २४ पदे भरतीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, Walk In Interview घेऊन सर्व कार्यवाही करणेस मा. तदर्थ समितीचे सभेत दिनांक ११.०८.२०२० रोजी चक्रिय पद्धतीने सादर केलेल्या प्रस्तावानुसार मान्यता मिळालेली होती. तसेच जा.क्र.एसएसएस/श्री साईबाबा महाविद्यालय/८७४/२०२० दि.१२.०८.२०२० रोजीचे पत्रान्वये, दिनांक २४ व २५ ऑगस्ट, २०२० रोजी सहाय्यक प्राध्यापक (Assistant Professor) , ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक या पदावरील नियुक्ती कामी Walk in Interview ची जाहिरात महाराष्ट्रातील प्रमुख वर्तमानपत्रातुन व संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती.

भरतीकामी विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्वानुसार निवड समिती गठीत करुन, उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखती घेतलेल्या उमेदवारांमधून शैक्षणिक अर्हता, अनुभव व मुलाखतीमध्ये मिळालेल्या गुणांनुसार पात्र उमदेवारांची निवड करण्यात आलेली आहे. सदर मुलाखतीकामी गठीत केलेल्या निवड समितीने झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल दि.२६.०८.२०२० रोजी मा.तदर्थ समितीचे सदस्यांसमोर चक्रिय पद्धतीने सादर केलेला होता. सदर अहवालामध्ये केलेल्या शिफारशींना मा.तदर्थ समितीने चक्रिय पद्धतीने मान्यता दिलेली आहे. सदरचा ठराव मा.तदर्थ समितीचे दि.११.१२.२०२० रोजीचे सभेत कायम करुन, पुढील कार्यवाहीसाठी दि.२९.१२.२०२० रोजी विभागाकडे देण्यात आलेला होता. त्यानुसार केलेल्या सर्व कार्यवाहीस मा.उच्च न्यायालय, खडपीठ औरंगाबाद यांची कार्योत्तर मान्यता मिळणेकामी संस्थानचे विधी विभागाकडे दि.०१.०२.२०२१ रोजी सिव्हील ॲप्लीकेशनचा मसुदा अंतिम करुन दिलेला आहे. मात्र सदरचा विषय अद्याप मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्याबाबत संस्थानचे प्र.विधी अधिकारी यांचेकडे वारंवार पाठपुरावा केलेला आहे.

पान क्र.२ वर

मा.तदर्थ समितीने चक्रिय पद्धतीने मान्यता दिलेल्या दि.२६.०८.२०२० चे प्रस्तावानुसार सामान्य प्रशासन विभागामार्फत २२ सहाय्यक प्राध्यापक, ०१ ग्रंथपाल व ०१ शारिरीक शिक्षण संचालक असे एकूण २४ पदांच्या निवड झालेल्या उमेदवारांना मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्णयास अधीन राहून जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/वरिष्ठ/१३१७ (१ ते २४)/२०२० दि.०७.०९.२०२० अन्वये दि.३१.०५.२०२१ अखेर नेमणूक आदेश देण्यात आलेले आहेत. त्यामध्ये संगणकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स विषयांच्या प्राध्यापकांना प्रती माह रु.२२,०००/-, विज्ञान शाखेच्या प्राध्यापकांना प्रती माह रु.२१,०००/- व कला व वाणिज्य शाखेच्या प्राध्यापकांना प्रती माह रु.२०,०००/- मात्र मानधन देण्यात आलेले आहे.

सदर नेमणूक आदेशांतील अटी व शर्तीनुसार २२ सहा.प्राध्यापक, ०१ ग्रंथपाल असे एकूण २३ उमेदवार कामावर हजर झालेले होते. पैकी इलेक्ट्रॉनिक्स विषयाचे सहा.प्राध्यापक कै.सुनिल रामनाथ पठारे यांचा दि.१९.०९.२०२० रोजी कोल्हार गावानजीक अपघाती निधन झालेले आहे. त्यांचे रिक्त झालेल्या जागेवर इकडील कार्यालयाकडील दि.०५.१०.२०२० रोजीचे मंजुर टिपणीन्वये तासिका तत्वावर (व्हिजीटींग) प्राध्यापक आमंत्रित करण्यात येत आहे. तसेच शारिरीक शिक्षण संचालक पदासाठी मुलाखतीमध्ये पात्र उमेदवार यादीतील ०३ उमेदवारांना क्रमाक्रमाने नियुक्ती पत्र / नेमणूक आदेश देण्यात आलेले होते. त्यापैकी कोणीही हजर झालेले नाही, त्यामुळे इकडील कार्यालाकडील दि.०३.११.२०२० रोजीचे मंजुर टिपणीन्वये तासिका तत्वावर (व्हिजीटींग) शारिरीक शिक्षण संचालक यांना आमंत्रित करण्यात येत आहे.

दि.०७.०९.२०२० रोजी दिलेल्या नेमणूक आदेशांनुसार प्रथम टप्प्यात हजर झालेल्या १६ प्राध्यापकांचे मान्यतेचे प्रस्ताव मुदतीमध्ये विद्यापीठाकडे पाठविण्यात आले असता, सदर १६ पदांना संदर्भ क्र.CCO/3437 दि.२८.११.२०२० अन्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ संपेपर्यंत विद्यापीठाची मान्यता मिळालेली असून, उर्वरीत ०६ सहा.प्राध्यापक व ०१ ग्रंथपाल अशा ०७ पदांना मान्यता मिळणेकामी इकडील जा.क्र.एसएसएस/श्री साईबाबा महाविद्यालय/ ११४/२०२० दि.१५.१२.२०२०, जा.क्र.३४७७/२०२१ दि.०५.०२.२०२१, जा.क्र.१७८/२०२१ दि.०८.०३.२०२१ व जा.क्र.१९०/२०२१ दि.३०.०३.२०२१ अन्वये विद्यापीठाकडे पाठपुरावा करण्यात आलेला आहे. मात्र सदर ०७ पदांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव अद्याप विद्यापीठाकडे प्रलंबित आहे.

मा.शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे यांचेकडील जा.क्र.उशिंस/पुवि/कायम विनाअनुदानित/कार्यभार/२०२१/२९ दि.०४.०१.२०२१ रोजीचे पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विद्यार्थी संख्या व उपलब्ध होणारा कार्यभार गृहीत धरुन शिक्षक व शिक्षकेतर पदे मंजुर करण्यात आलेली आहेत. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे –

**शिक्षकीय पदे**

| अ.क्र. | विद्याशाखा | विषय | कार्यभार तासिका | अनुज्ञेय पदे | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | पुर्णवेळ | तासिका तत्व |
| ०१. | कला | मराठी | ३६ | ०२ | ०० |
| ०२. | | हिंदी | ३२ | ०२ | ०० |
| ०३. | | इंग्रजी | २४ | ०१ | ०० |
| ०४. | | इतिहास | २८ | ०१ | ०१ |
| ०५. | | भूगोल | ३२ | ०२ | ०० |
| ०६. | | राज्यशास्त्र | २८ | ०१ | ०१ |
| ०७. | | अर्थशास्त्र | २४ | ०१ | ०० |
| ०८. | वाणिज्य | वाणिज्य | ६४ | ०३ | ०० |
| ०९. | विज्ञान | रसायनशास्त्र | ८८ | ०४ | ०१ |
| १०. | | वनस्पतीशास्त्र | ७२ | ०४ | ०० |
| ११. | | पदार्थविज्ञान | ६८ | ०३ | ०० |
| १२. | | गणित | ५४ | ०३ | ०० |
| १३. | | प्राणीशास्त्र | ६४ | ०३ | ०० |
| १४. | संगणकशास्त्र | इलेक्ट्रॉनिक्स | २० | ०१ | ०० |
| १५ | | संगणकशास्त्र | २० | ०१ | ०० |
| १६. | | प्राचार्य | ०६ | ०१ | - |
| १७. | | ग्रंथपाल | - | ०१ | - |
| १८. | | शा.शि.संचालक | - | ०१ | - |
| | | एकुण | ६६० | ३५ | ०३ |

पान क्र.३ वर

*शै.वर्ष २०२०-२१ चे प्राध्यापक भरतीचा विषय अद्याप मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे प्रलंबित असून, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चे प्राध्यापक भरतीबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडूनही अद्यापपावेतो कोणत्याही प्रकारच्या सुचना अथवा निर्देश प्राप्त झालेले नाहीत. विद्यापीठामार्फत ज्या प्राध्यापकांच्या पदांना मान्यता मिळालेली आहे, त्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ संपेपर्यंत असे स्पष्ट नमुद केलेले आहे.*

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या व विद्यापीठाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार बहुतांशी दिवस महाविद्यालये बंद होती, त्यामुळे आजपावेतो फक्त प्रथम सत्राचे अध्यापन होऊन, प्रथम सत्राची परीक्षा झालेली आहे. अद्याप द्वितीय सत्राचे संपुर्ण अध्यापन, परीक्षा व अंतिम निकाल ही सर्व प्रक्रिया पार होणे बाकी आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ची द्वितीय सत्राची परीक्षा जुलै-२०२१ अखेर किंवा ऑगस्ट – २०२१ मध्ये होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. मात्र आपले महाविद्यालयाकरिता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता नियुक्त करण्यात आलेल्या प्राध्यापकांची मुदत दि.३१.०५.२०२१ रोजी संपुष्टात येत आहे.

त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता आवश्यक प्राध्यापक भरतीबाबत श्रीसाईबाबा महाविद्यालयामार्फत दि.०३.०५. २०२१ रोजी सविस्तर प्रस्ताव सादर केला असता, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचेशी दि.१०.०५.२०२१ रोजी झालेली समक्ष चर्चा व श्रीसाईबाबा महाविद्यालयाकडील दि.१०.०५.२०२१ रोजीचे टिपणीवरील निर्देशानुसार मा.तदर्थ समितीचे मान्यतेने खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**मागणी** – (अ) वरिष्ठ महाविद्यालयाकडील शैक्षणिक वर्ष हे सरासरी मे महिन्याच्या अखेरीस संपत असते. मात्र शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सदरचे शैक्षणिक वर्ष संपण्यास जुलै किंवा ऑगस्ट-२०२१ पर्यंतचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. महाविद्यालयाकडे सध्या कार्यरत असलेल्या २१ प्राध्यापकांनी शै.वर्ष २०२०-२१ मध्ये नेमूण दिलेल्या वर्गांना अध्यापनाचे काम केलेले आहे, सदर प्राध्यापकांचे नियुक्ती आदेशातील अटी शर्तीनुसार त्यांची नेमणूक दि.३१.०५.२०२१ रोजी संपुष्टात येणार आहे, मात्र शैक्षणिक वर्ष संपण्यास जुलै किंवा ऑगस्ट महिना लागणार आहे, त्यामुळे शैक्षणिक वर्षाच्या शेवटच्या टप्प्यात व परीक्षेच्या कालावधीमध्ये त्यांचे जागी नवीन प्राध्यापक नेमणे हे विद्यार्थ्यांच्या व महाविद्यालयाच्या दृष्टीने योग्य होणार नाही. तसेच सध्या कार्यरत २१ प्राध्यापकांपैकी १६ प्राध्यापकांना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ संपेपर्यंत विद्यापीठाची मान्यता मिळालेली आहे. तसेच सध्या देशभरात कोरोना विषाणूमूळे उदभवलेली परिस्थिती व त्यासाठी केंद्र व राज्य सरकार करत असलेले उपाययोजना विचारात घेता, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे संपुर्ण कामकाज संपेपर्यंत (द्वितीय सत्राचे अध्यापन, परीक्षा व निकाल) सध्या कार्यरत ०१ ग्रंथपाल व २१ प्राध्यापकांना आहे त्याच अटी –शर्ती व मानधनावर शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे संपुर्ण कामकाज संपेपर्यंत (द्वितीय सत्राचे अध्यापन, परीक्षा व निकाल) मुदतवाढ देणे योग्य होईल, असे नम्र मत आहे.

(ब) दरम्यानचे काळात मा.शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे यांचेकडील जा.क्र.उशिंस/पुवि/कायम विनाअनुदानित/ कार्यभार/२०२१/२९ दि.०४.०१.२०२१ रोजीचे पत्रान्वये मान्यता मिळालेल्या ०१ प्राचार्य, ३५ सहा.प्राध्यापक, ०१ ग्रंथपाल व ०१ शारिरीक शिक्षण संचालक अशा एकूण ३८ पदांसाठी वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीचा मसुदा तयार करुन, सदरचा मसुदा विद्यापीठाचे शैक्षणिक विभागाकडून अनौपचारिक तपासणी करुन, सामान्य प्रशासन विभागामार्फत वर्तमानपत्रात प्रसिद्ध करुन, विद्यापीठाच्या नियमानुसार तज्ञ समितीची नियुक्ती करुन मुलाखतीद्वारे उपरोक्त ३८ पदे एकत्रित मानधनावर (Ad-Hoc) भरती करणेबाबत कार्यवाही करता येतील, असे नम्र मत आहे.

कोविड-१९ आजाराच्या अनुषंगाने राज्य सरकाराकडून प्राप्त निर्देशानुसार संचारबंदी/जमावबंदी/जिल्हाबंदी व इतर बाबी विचारात घेऊन, प्राध्यापक भरतीबाबत वृत्तपत्रात जाहिरात देऊन, साधरणत: ७ ते १० दिवसांची मुदत देऊन, संस्थानच्या वेबसाईटवर पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन स्वरुपात अर्ज मागविता येतील. मुदतीअंती प्राप्त अर्जांची तपासणी करुन, त्यामध्ये पात्र असलेल्या उमेदवारांची विद्यापीठाचे नियमानुसार नियुक्त तज्ञ समितीमार्फत ऑनलाईन / ऑफलाईन मुलाखतीचे नियोजन करता येईल, असे नम्र मत आहे.

तसेच दरम्यानचे काळात शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे द्वितीय सत्राबाबत व शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चे प्राध्यापक भरतीबाबत विद्यापीठाकडून काही सुचना अथवा निर्देश प्राप्त झाल्यास त्यानुसार वरिष्ठांची परवानगी घेऊन योग्य ती कार्यवाही करता येईल.

पान क्र.४ वर

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान** – प्रशासकीय मान्यतेअंती कार्यवाही करता येईल.
**विभागाचा अभिप्राय** – तरी प्रास्ताविकातील वस्तुस्थिती विचारात घेता मागणी परिच्छेदामध्ये नमुद केलेप्रमाणे (अ) व (ब) नुसार कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय चक्रिय पद्धतीने मा.तदर्थ समितीचे सभेत सादर.

24.5.24

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

---

निर्णय –

श्री साईबाबा महाविद्यालयासाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता आवश्यक प्राध्यापक भरतीबाबत चक्रिय पद्धतीने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील मागणी परिच्छेदातील (अ) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे संपुर्ण कामकाज संपेपर्यंत (द्वितीय सत्राचे अध्यापन, परिक्षा व निकाल) सध्या कार्यरत ०१ ग्रंथपाल व २१ प्राध्यापकांना आहे त्याच अटी –शर्ती व मानधनावर शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे संपुर्ण कामकाज संपेपर्यंत (द्वितीय सत्राचे अध्यापन, परिक्षा व निकाल) मुदतवाढ देणेस व (ब) दरम्यानचे काळात मा.शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे यांचेकडील जा.क्र.उशिंस/पुवि/कायम विनाअनुदानित/ कार्यभार/२०२१/२९ दि.०४.०१.२०२१ रोजीचे पत्रान्वये मान्यता मिळालेल्या ०१ प्राचार्य, ३५ सहा.प्राध्यापक, ०१ ग्रंथपाल व ०१ शारिरीक शिक्षण संचालक अशा एकूण ३८ पदांसाठी वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीचा मसुदा तयार करुन, सदरचा मसुदा विद्यापीठाचे शैक्षणिक विभागाकडून अनौपचारिक तपासणी करुन, सामान्य प्रशासन विभागामार्फत वर्तमानपत्रात प्रसिद्ध करुन, विद्यापीठाच्या नियमानुसार तज्ञ समितीची नियुक्ती करुन ऑनलाईन/ ऑफलाईन मुलाखतीद्वारे उपरोक्त ३८ पदे एकत्रित मानधनावर (Ad-Hoc) भरती करणेबाबत कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे.

24/05/2024

(श्रीमती गिता पी. बनकर)
सदस्य तदर्थ समिती तथा
सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

24/5/2024

(भानुदास पालवे)
सदस्य तदर्थ समिती तथा
अपर महसुल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक

24.5.24

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
सचिव-सदस्य तदर्थ समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

24/5

(श्रीकांत ल.आणेकर)
अध्यक्ष, तदर्थ समिती तथा
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश
अहमदनगर

Pub-Meeting-165-2024

'परिशिष्ट-ब'
आयत्या वेळेच्या

विषय क्र.- ७/१

मा. तदर्थ समितीसमोर चक्रीय पध्दतीने मान्यतेसाठी सविनय सादर

सामान्य प्रशासन (वशी - ०८) दि. २७.०५.२०२१

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**विषय :- साईभक्तांना मोफत उदी प्रसाद पोस्टाने पाठविणेकामी मान्यता मिळणेबाबत...**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील

प्रस्तावना :-

सध्या देशात/महाराष्ट्र राज्यात कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव आहे त्यामुळे राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायद्यान्वये अधिसुचना निर्गमीत करण्यात आलेली आहे सदरच्या अधिसूचनेचा कालावधी कधीपर्यंत असेल हे आज सांगता येणार नाही.

सध्या देशात/महाराष्ट्र राज्यात कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्यामुळे महाराष्ट्रातील व इतर राज्यातील साईभक्त यांना एप्रिल २०२१ पासून ते आजपावेता ब-याच साईभक्तांची बाबांवर श्रध्दा असूनही शिर्डी येथे दर्शनासाठी येता येत नाही. तसेच बरेच साईभक्त फोनव्दारे संस्थानकडे बाबांची उदी पाठविणेबाबत मागणी करत असतात. त्यामुळे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी साईभक्तांच्या भावनेचा विचार करुन बाबांच्या उदीप्रसादाने साईभक्तांचे समाधान होण्याच्या दृष्टीने भक्तांना उदीप्रसादाची मागणी केल्यास त्यांना संस्थानमार्फत मोफत उदीप्रसाद पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल अशी घोषणा जाहीर केली आहे. तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी लवकरच पावसाळा सुरु होत असल्यामुळे पाकीटांना पाणी लागून उदीप्रसाद खराब होऊ नये भक्तांना उदीप्रसाद व्यवस्थित मिळावा या हेतूने पॉली कोटेड पाकीटे छपाई करणेबाबत निर्देश दिले आहेत.

विभागाचा अभिप्राय : -

उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केलेप्रमाणे साईभक्तांना मोफत उदीप्रसाद पाठविणेकामी चांगल्या प्रकारचे पॉली कोटेड पाकीटे छपाई करणेकामी दरपत्रकांची मागणी करुन छपाई करुन घेता येईल. त्याकरीता शिर्डी परिसरातील प्रेसधारकांकडून दरपत्रकांची मागणी करण्यात येईल व ज्या छपाई धारकाचा निम्नतम दर असेल अशा प्रेसधारकास छपाई कामाचा कार्यादेश देता येईल जोपर्यंत मंदिर चालू होत नाही तोपर्यंत जसजशी भक्तांची मागणी येईल त्याप्रमाणात पाकीटांची छपाई करण्यात येऊन उदीप्रसाद संस्थानमार्फत मोफत पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

संस्थानमार्फत दि.१८ मे, २०२१ रोजी श्रीसाईभक्तांना मोफत उदी प्रसाद मिळणेकरीता आवाहन करणेत आलेले आहे. त्यानुसार साधारणत: दैनदिन ५००० भक्तांकडून ई मेल दृवारे/व्हॉटसअप मेसेज दृवारे उदीप्रसादाची मागणी होत आहे. त्याअनुषंगाने दि.१०.०६.२०२१ रोजी पर्यंत अंदाजे खर्च खालीलप्रमाणे-

**(कालावधी दि.१८ मे, २०२१ ते दि.१० जून, २०२१ पर्यंत एकूण दिवस २३)**

| अ.नं. | विभागामार्फत भक्तांकडून आलेली उदीप्रसाद मागणी | उदीप्रसादाची मागणी केलेल्या भक्तांची संख्या | उदीप्रसाद पोस्टाने पाठविणेकामी प्रती नग रु.५/- प्रमाणे पोस्टेज खर्च | पाकीटे छपाईकामी अंदाजे प्रती नग रु.१.४० पैसे प्रमाणे येणारा अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | जनसंपर्क विभागामार्फत व्हॉटसपव्दारे आलेली मागणी व माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत मेलव्दारे आलेली मागणी | दैनदिन ५००० ×२३ दिवस = १,१५,०००/- | ५,७५,०००/- | १,६१,०००/- |
| | एकूण | संख्या - १,१५,०००/- | रक्कम रु. ५,७५,०००/- | रक्कम रु. १,६१,०००/- |

पा.नं.२ वर

...ing - 200 - 2021

पा.नं.२

प्रस्ताव :-

सध्या देशात/महाराष्ट्र राज्यात कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्यामुळे महाराष्ट्रातील व इतर राज्यातील साईभक्त यांना एप्रिल २०२१ पासून ते आजपावेता ब-याच साईभक्तांची बाबांवर श्रध्दा असूनही शिर्डी येथे दर्शनासाठी येता येत नसल्याने संस्थानमार्फत दि.१८ मे, २०२१ रोजी श्रीसाईभक्तांना मोफत उदी प्रसाद मिळणेकरीता आवाहन करणेत आलेले होते त्यानुसार साधारणतः दैनदिन ५००० भक्तांकडून ई मेल दृवारे/व्हॉटसअप मेसेजद्वारे उदीप्रसादाची मागणी होत आहे. तरी उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे प्रथमतः दि.१० जून, २०२१ पर्यंत साधारणतः १,१५,००० साईभक्तांची उदीप्रसादाची मागणी गृहीत धरल्यास अंदाजे रक्कम रु.७,३६,०००/- एवढा खर्च होणे अपेक्षीत आहे.

त्याअनुषंगाने, संस्थानमार्फत श्री साईभक्तांना एकदाच मोफत उदीप्रसाद पाठविणेस, पाकीटे छपाई व स्टीकरची खरेदी करणेकामी तसेच उदीप्रसाद पाठविणेकामी येणा-या योग्य त्या अनुषंगीक खर्चास व स्थानिक प्रेसधारंकाकडून दरपत्रके मागवून कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी चक्रीय पध्दतीने निर्णयार्थ सादर.

27/5/21

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

27/5

---

निर्णय -

(श्रीमती गीता प्रवीण बनकर)
सदस्य तदर्थ समिती तथा
सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

प्रस्तावाप्रमाणे मंजुरीस हरकत नाही

28/5/2021
(भानुदास ह. पालवे)
सदस्य तदर्थ समिती तथा
अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक

27/5/21

(कान्हुराज बगाटे, भा.प्र.से.)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

सविस्तर चर्चा गरजेची आहे.
नियमीत बैठकीत ठेवा

28/5

(श्रीकांत अणेकर)
अध्यक्ष, तदर्थ समिती
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी
तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,अहमदनगर

प्रस्ताव सादर करणेत आला.
याबाबत सविस्तर चर्चा आवश्यक
वाटते, सबब नियमित बैठकीत
सादर करावे.

15/06/2021

member Ad-hoc
Committee S.S.S.T Shirdi

आयत्या वेळेचा विषय क्र.- 9/2

## मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढील विषय

लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग

---

**विषय:- अ) मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी, प्रो.प्रा. सोन्याबापु गंगाधर शेळके यांना काळ्या यादीत (Black List) समाविष्ट करुन, संस्थानकडे असलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेस व ब) मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांचे कोव्हीड-१९ चे काळातील थकीत वेतन नव्याने नियुक्ती करणेत आलेल्या ठेकेदारामार्फत करणेस चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत....**

**टिपणी,**

**प्रस्तावना** - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील सन २०१९-२०२० करीता मोतीचुर लाडु, सुटी बुंदी तयार करुन पॅकींग करुन देणे व बर्फी प्रसाद तयार करुन देणेबाबत मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी प्रो.प्रा.सोन्याबापु गंगाधर शेळके यांना जा.नं.एसएसएस/वशी-लाडुप्रसाद/१८१७/२०१९, दि.१२/०८/२०१९ रोजीचे कार्यादेशान्वये, दि.१६/०८/२०१९ पासुन दि.१५/०८/२०२० अखेर कंत्राट देणेत आलेले असुन, त्याबाबत दि.०७/०९/२०१९ रोजी संबंधित ठेकेदारासोबत ०१ ते ३७ अटी-शर्तींचा करारनामा करणेत आला होता. सदर कंत्राटाची मुदत दि.१५/०८/२०२० रोजी संपुष्टात येणार असल्याने, त्यांना दि.१३/०७/२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील विषय क्र.४४ निर्णय क्र.३९८ नुसार जा.नं.एसएसएस/वशी-लाडुप्रसाद/११०१/२०२०, दि.२०/०८/२०२० रोजीचे मुदतवाढ आदेशान्वये, दि.१६/०८/२०२० रोजीपासुन सध्याच्या आहे त्याच दराने व आहे त्याच अटी-शर्तींवर ऑक्टोंबर २०२० अखेर किंवा नविन ठेकेदाराची ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

**अ)** सदर कंत्राटबाबत झालेल्या करारनाम्यातील अटी-शर्ती क्र.१५ मध्ये- "पार्टी नं ०२ यांनी कामास लावलेल्या कामगारांचे नियमित पगार/वेतन वाटप किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार किमान वेतन दराप्रमाणे व पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३९ चे तरतुदीस अनुसरून महिना पुर्ण झाल्यानंतर पुढील महिन्याचे १० तारखेचे आत विहित मुदतीत पुर्ण करण्याची कायदेशीर जबाबदारी पार्टी नं.०२ वर राहिल. कामगारांचे पगार वाटप बॅंक अकाऊंट पद्धतीने करणे पार्टी नं.०२ वर बंधनकारक राहील. कामगारांचे पगार १० तारखेपर्यंत न केल्यास त्यानंतरच्या विलंबासाठी प्रती कामगार प्रतीदिन किमान रू २०/- इतका दंड आकारला जाईल व तो देयकामधुन ताबडतोब वसुल केला जाईल" असे नमुद असल्याने सदर अटी-शर्तींचे पालन करणे ठेकेदारावर बंधनकारक होते.

त्यानुसार मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी प्रो.प्रा.सोन्याबापु गंगाधर शेळके यांना त्यांचेमार्फत लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे कामास लावणेत आलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचा-यांची मासिक वेतन त्यांचे बॅंक खाती आदा करुन त्याबाबतची बीले व अनुषंगीक कागदपत्रे (जसे - बॅंक यादी, पगारपत्रक, पी.एफ. चलन व जीएसटी चलन इ.) इकडील कार्यालयास तातडीने जमा करणेबाबत समक्ष कार्यालयात बोलावुन सुचना/समज व त्याबाबत जा.नं.एसएसएस/वशी-लाडुप्रसाद /२८५९/२०१९, दि.२८/१०/२०१९ रोजी व जा.नं.एसएसएस/वशी-लाडुप्रसाद/३०९६ / २०१९, दि.११/११/२०१९ रोजीची नोटीस देण्यात आली होती. तसेच जा.नं.एसएसएस/वशी-लाडुप्रसाद/६९/२०२०, दि.०१/०४/२०२०, ७०/२०२०, दि.१५/०४/२०२०, ९२/२०२०, दि.२०/०८/२०२०, ९५/२०२०, दि.२८/०८/२०२०, ९९/२०२०, दि.१०/०९/२०२०, १४०२/२०२०, दि.१४/०९/२०२०,व जा.क्र.एसएसएस/ वशी-लाडुप्रसाद/१६७२/२०२०, दि.०१/१०/२०२० रोजीचे पत्रान्वये, माहे एप्रिल, मे, जुन जूलै व ऑगस्ट २०२० चे बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचा-यांची मासिक वेतन त्यांचे बॅंक खाती आदा करुन, त्याबाबतची बीले व अनुषंगीक कागदपत्रे (जसे - बॅंक यादी, पगारपत्रक, पी.एफ. चलन व जीएसटी चलन इ.) इकडील कार्यालयास तातडीने जमा करणेबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुसार मे. शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी (प्रो.प्रा. श्री सोन्याबापु शेळके) यांनी त्यांचेकडील कामास असलेल्या कंत्राटी कामगारांचे माहे एप्रिल २०२० चे वेतन रु.५,५४,७०७/- मात्रचा कार्पोरेशन बॅंकेचा चेक क्र.३५०७२६, दि.२०/०८/२०२० रोजी युनियन बॅंक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांचेकडे संबंधित कर्मचा-यांच्या नावाच्या यादीसह जमा करुन, त्याची पोहोच इकडील कार्यालयास दि.२०/०८/२०२० रोजी दुपारी जमा केली होती.

त्यासअनुसरून मे. शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांचेमार्फत मोतीचुर लाडु, बुंदी व बर्फी प्रसाद निर्मितीचे काम करणा-या कुशल व अकुशल कामगारांना माहे एप्रिल २०२० महिन्यातील कोव्हीड-१९ चे बीलात दर्शविल्याप्रमाणे (PF, CGST, SGST सह) एकुण रुपये ८,४०,५०७/- चे बील सादर केले असुन, त्यांनी करारनाम्यातील अटी-शर्ती क्र.१५ चा भंग केल्याने त्यांना रु. २,१०,०८०/- इतकी दंडाची रक्कम व (TDS) इतर वजावटी करून त्यांचे माहे एप्रिल २०२० चे बीलातील उर्वरीत रु.६,०५,४९७/- इतकी रक्कम मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांचे बॅंक खात्यावर माहे एप्रिल २०२० चे वेतनापोटी दि.१०/०९/२०२० रोजी श्री साईबाबा संस्थानचे लेखाशाखा विभागामार्फत RTGS व्दारे वर्ग करणेत आली आहे. त्यानुसार त्यांनी वेतन आदा केलेबाबतची अनुषंगीक कागदपत्रे (जसे - पगारपत्रक, पी.एफ. चलन व जीएसटी चलन इ.) दि.२०/०९/२०२० रोजी इकडील कार्यालयास जमा केली होती.

दि.०१/१०/२०२० रोजी आवक क्र.५७४७ चे (इकडील कार्यालयास प्राप्त दि.१२/१०/२०२०) पत्रान्वये ठेकेदाराकडील काही कंत्राटी कर्मचा-यांनी त्यांचे माहे एप्रिल २०२० चे वेतन बॅंक खाती जमा झाले नसल्याबाबत तक्रार केली होती.

कृ.पान नं.०२ वर....

त्यानुसार उपरोक्त पत्रात नमुद केलेल्या तक्रारीबाबत खातरजमा (चौकशी) करणेसासठी संबंधीत कर्मचा-यांपैकी काही कर्मचा-यांना दुरध्वनीवर संपर्क करून त्यांचे माहे एप्रिल २०२० चे वेतन त्यांचे बॅक खात्यावर जमा झाले किंवा कसे? याबाबत खात्री करणेकामी कर्मचा-यांच्या पासबुकाच्या (अद्यावत नोंदी घेतलेल्या) छायांकीत प्रती लाडु विभागामध्ये जमा करणेबाबत कळविले होते. त्यानुसार त्यांचेकडील एका कर्मचा-याने अद्यावत नोंदी केलेल्या पासबुकाची छायांकीत प्रत इकडील कार्यालयात जमा केली होती. सदरचे पासबुकाची तपासणी केली असता, त्यामध्ये संबंधितांचे खात्यावर माहे एप्रिल २०२० चे वेतनासंबधीत कोणतीही रक्कम जमा झाली असल्याचे दिसुन आले नाही. यावरुन अर्जात नमुद केलेल्या तक्रारीप्रमाणे इतर १०४ कर्मचा-यांचे माहे एप्रिल २०२० चे वेतन संबंधीत ठेकेदाराने व बॅकेने कर्मचा-यांच्या खात्यावर वर्ग केल्याचे दिसुन आले नाही.

याबाबत श्री भगतराम कुमावत, शाखा प्रबंधक - कार्पोरेशन बॅक (सध्या युनियन बॅक ऑफ इंडीया) शाखा-शिर्डी यांचेकडे दुरध्वनीवरुन चौकशी केली असता, मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांना यादी व चेक मिळाल्याची आम्ही पोहोच दिली आहे. तथापि, सदर दिवशी त्यांचे बॅक खात्यावर रक्कम शिल्लक नसल्याचे सांगितले व त्यांच्या खात्यावर संस्थानकडुन रक्कम जमा झाल्यानंतर मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांनी सदर कर्मचा-यांचा माहे एप्रिल २०२० चे वेतन त्यांचे खात्यावर जमा न करता श्री सागर साहेबराव खरात यांचे नावे चेक देऊन रु.३,५०,०००/- इतकी रक्कम सदरचे खात्यातुन काढुन घेतली असल्याचे सांगितले. म्हणजेच ठेकेदार मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी प्रो.प्रा- श्री सोन्याबापु गंगाधर शेळके यांनी त्यांचेकडील कर्मचा-यांना त्यांचे खात्यावर वेतन जमा केले असलेबाबतचा बॅकेत जमा केलेला चेक व कर्मचा-यांची बॅक यादीची छायांकीत प्रत लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाचे कार्यालयास पोहोच म्हणुन देऊन संस्थानची फसवणुक केली आहे.

सदरचे घटनेबाबत दि.२१/१०/२०२० रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात संबंधीत बॅक शाखा व्यवस्थापक व ठेकेदार मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांचेतर्फे (त्यांचा मुलगा) श्री चंद्रकांत सोन्याबापु शेळके यांना समक्ष बोलवुन चौकशी केली असता, सदर कर्मचा-यांचा माहे एप्रिल २०२० महिन्याचा वेतनाचा चेक व कर्मचा-यांच्या नावाची यादी बॅकेत जमा केल्याची पोहोच दिली, तथापि, प्रत्यक्षात कामगारांचे बॅक खात्यावर वेतन जमा केले नसलेबाबत त्यांनी कबुल केले आहे व त्याच वेळी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी संबंधीतास त्यांना संस्थानने अदा केलेल्या रक्कमेचा चेक परत करणेबाबत तोंडी निर्देश दिले होते. त्यानुसार ठेकेदार मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी प्रो.प्रा- श्री सोन्याबापु गंगाधर शेळके यांनी दि.२२/१०/२०२० रोजी कार्पोरेशन बॅकेचा चेक क्र.३५०७३०, दि.३१/१०/२०२०, रक्कम रू.६,३०,४२७/- मात्रचा चेक संस्थानंचे लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे जमा केला होता, सदरचा चेक दि.२६/१०/२०२० रोजी लेखाशाखा विभागाकडे जमा केला होता, सदरचा चेक स्टेट बॅक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांचेकडे Clearing करीता पाठविला असता बॅकेने "Fund Insufficient" असे कारण देऊन, दि.०२/११/२०२० रोजी संस्थानकडे परत पाठविला आहे व चेक बाऊन्स झालेप्रकरणी संस्थानला रु.२९५/- इतके रिटर्न चार्जेस आकारले आहेत.

दि.२८/१०/२०२० रोजी मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांनी त्यांचेकडे कामास असलेले बाह्यस्त्रोत कर्मचारी यांना माहे एप्रिल - २०२० चे वेतन त्यांचे बॅक खाती वर्ग करून त्यांचेकडील ०८ कर्मचा-यांची अद्यावत बॅक पासबुकाच्या छायांकित प्रती इकडील कार्यालयास जमा करण्यात आल्या होत्या, सदरच्या जमा केलेली पासबुक (छायांकित प्रती) तपासल्या असता ठेकेदार मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांनी संबंधीत कर्मचा-यांना माहे एप्रिल - २०२० चे वेतन त्यांचे बॅक खाती अदा केले असल्याचे दिसुन आले आहेत. सदरच्या ०८ कर्मचा-यांच्या पासबुकांच्या छायांकित सादर केल्या व उर्वरीत कर्मचा-यांच्या पासबुकाच्या छायांकीत प्रती नंतर जमा करतो असे ठेकेदाराने सांगितले होते.

तथापि, सदरबाबत त्यांनी सांगितलेप्रमाणे माहे एप्रिल-२०२० चे वेतन संबंधीत कर्मचा-यांच्या बॅक खात्यावर जमा केले किंवा नाही याबाबत चौकशी करणेकामी दि.३१/१०/२०२० रोजी सकाळी ११.३० वा. कार्पोरेशन बॅक, शाखा-शिर्डी येथे तत्कालीन प्र.अधिक्षक - लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग यांनी बॅकेचे शाखा प्रबंधक – श्री भगतराम कुमावत यांचेशी समक्ष चर्चा करून, मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांचेकडील कर्मचा-यांचे वेतनाबाबत चौकशी केली असता, त्यांनी आमचेकडे एकुण ३१ कर्मचा-यांची यादी सादर करुन रुपये – १,८८,२४३/- इतकी रक्कम संबंधित ३१ कर्मचा-यांच्या खाती वर्ग केली असलेबाबतची माहिती दिली. तदनंतर कर्मचा-यांचे वेतन खाते असलेली युको बॅक, शाखा-शिर्डी येथे जाऊन वेतनाबाबत समक्ष चौकशी केली असता, केवळ ३१ कर्मचा-यांचे खात्यावर रक्कम जमा झाले असलेबाबत माहिती मिळाली, म्हणजे मे. शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांनी ७३ कर्मचा-यांचे वेतन त्यांचे खातेवर जमा केले नसल्याचे दिसुन आले.

यापुर्वी सन २०१६ मध्ये उपरोक्त नमुद केलेप्रमाणे परिस्थिती सध्याचे ठेकेदार श्री सोन्याबापु गंगाधर शेळके यांचा मुलगा श्री चंद्रकांत सोन्याबापु शेळके (शिवसाई केटरर्स अॅण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर) यांचेकडुन अशाप्रकारे संस्थानमध्ये श्री साई प्रसादालय येथे चपाती पुरी व अन्नपाकिटे याचा ठेका असतांना उद्भवली होती, त्यावेळी त्यांना दंड करून, अंतीम ताकीद पत्र देवुन देखील कामात सुधारणा न झाल्याने, त्यांना दि.०२/०२/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०२, निर्णय क्र. ७३ अन्वये, काळया यादीत समाविष्ट करण्यात आले होते. तथापी, शिवसाई केटरर्स अॅण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर यांना संस्थानकडुन काळ्या यादीत समाविष्ट करण्यात आल्याने सदर ठेकेदाराने त्याचे एजन्सीचे नाव बदलुन मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी प्रो.प्रा- श्री सोन्याबापु गंगाधर शेळके अशा नावाने दस्ताऐवज तयार केली व सन २०१९-२० या कालावधीतील संस्थानचे लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील मोतीचुर लाडु, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद तयार करण्याचा तसेच इतर विभागाकडील कामाचे ठेके मिळविली आहेत.

कृ.पान नं.०३ वर....

सबब, संबंधित ठेकेदार यांनी त्यांचेशी करणेत आलेल्या करारनाम्यातील अटी-शर्ती क्र.२८ मध्ये – "उपरोक्त सर्व अटी-शर्ती व्यतीरिक्त निविदेतील अटी-शर्तीतील एक किंवा अनेक अटी-शर्तींचा भंग पार्टी नं.०२ किंवा त्यांचे कामगारांकडुन झाल्यास पार्टी नं०२ ची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन ती संस्थानखाती जमा करुन घेणेत येईल, त्याबाबत पार्टी नं.०२ चे कोणतीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही" असे नमुद केले आहे.

सदरबाबत संबंधित ठेकेदार यांनी कामास लावलेल्या कर्मचा-यांचे माहे एप्रिल २०२० चे ७३ कर्मचा-यांचे व मे, जुन जुलै व ऑगस्ट, व सप्टेंबर २०२० चे १०४ कर्मचा-यांचे वेतन अदा केले नसल्याचे निदर्शनास आले होते.

त्यामुळे सदरबाबत जा.नं.एसएसएस/वशी-लाडुप्रसाद/१८०३/२०२०, दि.१२/१०/२०२० व जा.नं.एसएसएस/वशी- लाडुप्रसाद /१९७५/२०२०, दि.२८/१०/२०२० अन्वये, कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती सदरचे नोटीसीमध्ये "तुम्ही करारनाम्यातील अटी-शर्ती क्र.१५ चे उल्लंघन केलेले असुन, तुमचेवर करारनाम्यातील अटी-शर्ती क्र.२८ मध्ये नमुद केलेप्रमाणे कारवाई करणेत येवुन, तुम्हांस काळया यादीमध्ये समाविष्ट का करणेत येवु नये?" याबाबत लेखी खुलासा सदरची नोटीस मिळालेपासुन ०७ दिवसाचे आत इकडील कार्यालयास सादर करावा. सात दिवसांचे आत लेखी खुलासा इकडील कार्यालयास प्राप्त न झाल्यास एकतर्फी निर्णय घेणेत येईल व त्यानुसार पुढील योग्य ती उचीत कार्यवाही करणेत येईल, असे कळविण्यात आले होते. तथापी, त्यांनी कोणताही लेखी खुलासा सादर केलेला नाही, यावरून त्यांना सदरची बाब मान्य असल्याचे स्पष्ट होते.

उपरोक्त नमुद परिस्थिती विचारात घेता, मे. शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी, प्रो.प्रा.- श्री सोन्याबापु गंगाधर शेळके यांच्याकडील कर्मचा-यांच्या वेतनाबाबत कायम तक्रारी आल्या आहेत. त्यामुळे करारनाम्यातील अटी-शर्ती क्र.२८ मध्ये नमुद केलेप्रमाणे त्यांची श्री साईबाबा संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रू.७,५०,०००/- (अक्षरी रुपये – सात लाख पन्नास हजार मात्र) जप्त करून घेऊन त्यांना पुढील ०३ वर्षे कालावधीकरीता काळया यादीत समावेश करता येईल.

ब) मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी, प्रो.प्रा- श्री सोन्याबापु गंगाधर शेळके यांना काळया यादीत समाविष्ट केलेनंतर त्यांचेकडे सन २०२० मध्ये कार्यरत असणारे बाह्यस्त्रोत १०४ कंत्राटी कर्मचा-यांना कोव्हीड-१९ (माहे मे, ते ऑक्टोंबर २०२०) या कालावधीतील विहीत पध्दतीने आदा करावयाचे वेतन हे सन २०२१ मध्ये नव्याने नियुक्त करणेत आलेल्या ठेकेदारामार्फत आदा करणेसाठी टिपणी सादर करणेत आली होती. सदरचे टिपणीवर मा. उपमुख्यकार्यकारी अधिकारी यांनी "याबाबत मा.मुख्यलेखाधिकारी यांचे अभिप्राय घ्यावे" असे निर्देश दिले होते. त्यासअनुसरुन सदरची टिपणी मा.मुख्यलेखाधिकारी यांचेकडे अभिप्राय घेणेकामी सादर करण्यात आला होता, त्यावर मुख्यलेखाधिकारी यांनी -

3) नविन ठेकेदाराची नेमणुक झालेनंतर सदर ठेकेदाराला विभागाने वेतनाबाबतचे सर्व तपशिल पुरविल्यास त्यांचेमार्फत वेतन आदा करण्यास नाही.
4) कर्मचारी भविष्य निर्वाह निधीचा भरणा विलंबाने होणार असल्याने त्याबाबतचे विलंब शुल्क संस्थानने ठेकेदाराला आदा करावे लागेल. सदर विलंब शुल्काची रक्कम मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी, प्रो.प्रा- श्री सोन्याबापु गंगाधर शेळके यांच्या देय होणा-या सुरक्षा अनामत रकमेतुन वसुल करता येईल असे अभिप्राय दिले आहेत.

उपरोक्तप्रमाणे कारवाई करावयाची ठरल्यास या कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधिची रक्कम उशिराने भरली जाणार आहे. त्यामुळे याबाबत भविष्य निर्वाह निधि विभागामार्फत भविष्यात दंड आकारणी होते किंवा विलंब शुल्क भरावे लागु शकते. या सर्व बाबींचा विचार करुन सदरची भविष्य निर्वाह निधीवरील दंड / विलंब शुल्काची रक्कम मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी, प्रों.प्रा- श्री सोन्याबापु गंगाधर शेळके, शिर्डी यांचे जप्त करणेत आलेल्या व संस्थानखाती जमा करणेत आलेल्या रकमेतुन वसुली करता येईल असा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करणेत आला होता.

सदरचे ठेकेदार मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी, यांचेकडील कर्मचा-यांना आदा करावयाची माहे मे ते ऑक्टोंबर २०२० ची थकीत बिले ही कोव्हीड -१९ च्या काळात कर्मचारी कामावर नसतांना मानवतेच्या दृष्टीकोनातुन किमान वेतन दराच्या ५० टक्के प्रमाणे आदा करणे आवश्यक होते. तथापि, ठेकेदाराचे नाकर्तेपणामुळे सदर महिन्यांचे वेतन आदा करणेत आलेले नसुन, विषेश बाब म्हणुन मानवतेच्या दृष्टीकोनातुन उपरोक्त थकीत वेतन बीले (माहे मे २०२० ते ऑक्टोंबर २०२०) लाडु व बर्फी प्रसाद निर्मितीकामी नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या ठेकेदाराशी चर्चा – विचार निविमय करुन त्यांचेमार्फत सदरचे थकीत वेतन आदा करणेबाबत मुख्यलेखाधिकारी यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेऊन, त्याप्रमाणे उचीत कार्यवाही करता येईल.

<u>सद्यस्थिती</u> – मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांनी दरम्यानच्या कालावधीमध्ये त्यांना आदा केलेली रक्कम संबंधित कामगारांना न देता त्यांचेकडे ठेवली सदर रकमेचा गैरव्यवहार केला आहे असे लक्षात आल्याने व त्यांनी वेतन रकमेपोटी दि.२२/१०/२०२० रोजी कारपोरेशन बॅकेचा चेक क्र.३५०७३०, दि.३१/१०/२०२०, रक्कम रू.६,३०,४२७/- मात्रचा चेक बॅकेने "Fund Insufficient" चे कारण देऊन, संस्थानकडे परत पाठविल्याने त्यांना संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड. जे.के.गोंदकर यांचेमार्फत नोटीस बजावण्यात आली आहे.

त्यांनतर त्यांनी उशिराने (माहे ऑक्टोंबर, नोव्हेबर व डिसेंबर २०२० मध्ये) सदर कर्मचा-यांचे माहे एप्रिल २०२० चे वेतन आदा केले आहे. तसेच त्यांचेकडील बाह्यस्त्रोत कर्मचा-यांचे उर्वरीत महिन्यांचे (मे २०२० ते ऑक्टोंबर २०२०) वेतनाची आदायगी अद्यापपावेतो केलेली नाही.

कृ.पान नं.०४ वर....

सदरचे कारणास्तव संस्थानमार्फत (म्हणजेच तत्कालीन प्र.अधिक्षक यांचे मार्फतीने) मा.कनिष्ठ न्यायालय, राहाता न्यायालय यांचेकडे संबंधित ठेकेदार मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांचेवर एस.सी.सी.नं.७९/२०२१, दि.१३/०१/२०२१ अन्वये, फिर्याद/दावा दाखल करणेत आलेला असुन, सध्या तो न्यायप्रविष्ट आहे. याबाबत पहिली सुनावणी माहे फेब्रुवारी २०२१ मध्ये दि.२३/०२/२०२१ रोजी होती, यानंतर यापुढील सुनावणी माहे एप्रिल २०२१ मध्ये होणार आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय-

अ) मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांनी कोव्हीड-१९ चे कालावधीमध्ये त्यांना आदा केलेली माहे एप्रिल २०२० ची वेतनाची रक्कम संबंधित कामगारांना न देता त्यांचेकडे ठेवली सदर रकमेचा गैरव्यवहार केला असे लक्षात आल्याने व त्यांनी वेतन रकमेपोटी दि.२२/१०/२०२० रोजी कार्पोरेशन बॅकेचा चेक क्र.३५०७३०, दि.३१/१०/२०२०, रक्कम रू.६,३०,४२७/- मात्रचा चेक बॅकेने "Fund Insufficient" चे कारण देऊन, संस्थानकडे परत पाठविल्याने त्यांना संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड. जे.के.गोंदकर यांचेमार्फत नोटीस बजावण्यात आली आहे. त्यांनतर त्यांनी उशिराने (माहे ऑक्टोंबर, नोव्हेबर व डिसेंबर २०२० मध्ये) सदर कर्मचा-यांचे माहे एप्रिल २०२० चे वेतन आदा केले आहे. तसेच त्यांचेकडील बाह्यस्त्रोत कर्मचा-यांचे उर्वरीत महिन्यांचे (मे २०२० ते ऑक्टोंबर २०२०) वेतनाची आदायगी अद्यापपावेतो केलेली नाही. सदरचे कारणास्तव संस्थानमार्फत (म्हणजेच तत्कालीन प्र.अधिक्षक यांचे मार्फतीने) मा.कनिष्ठ न्यायालय, राहाता न्यायालय यांचेकडे संबंधित ठेकेदार मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांचेवर एस.सी.सी.नं.७९/२०२१, दि.१३/०१/२०२१ अन्वये, फिर्याद/दावा दाखल करणेत आलेला असुन, सध्या तो न्यायप्रविष्ट आहे. याबाबत पहिली सुनावणी माहे फेब्रुवारी २०२१ मध्ये दि.२३/०२/२०२१ रोजी होती, यानंतर यापुढील सुनावणी माहे एप्रिल २०२१ मध्ये होणार आहे.

मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी, प्रो.प्रा- श्री सोन्याबापु गंगाधर शेळके यांना काळया यादीत समाविष्ट केलेनंतर त्यांचेकडे सन २०२० मध्ये कार्यरत असणारे बाह्यस्त्रोत १०४ कंत्राटी कर्मचा-यांना कोव्हीड-१९ (माहे मे, ते ऑक्टोंबर २०२०) या कालावधीतील विहीत पध्दतीने आदा करावयाचे वेतन हे सन २०२१ मध्ये नव्याने नियुक्त करणेत आलेल्या ठेकेदारामार्फत आदा करावयाचे ठरल्यास या कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधिची रक्कम उशिराने भरली जाणार आहे. त्यामुळे याबाबत भविष्य निर्वाह निधि विभागामार्फत भविष्यात दंड आकारणी होते किंवा विलंब शुल्क भरावे लागु शकते. या सर्व बाबींचा विचार करुन सदरची भविष्य निर्वाह निधीवरील दंड / विलंब शुल्काची रक्कम मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी, प्रो.प्रा- श्री सोन्याबापु गंगाधर शेळके, शिर्डी यांचे जप्त करणेत आलेल्या व संस्थानखाती जमा करणेत आलेल्या रकमेतुन वसुली करता येईल त्याकरीता त्यांची सुरक्षा अनामत रक्कम रू.७,५०,०००/- (अक्षरी रुपये – सात लाख पन्नास हजार मात्र) जप्त करून व त्यांना पुढील ०३ वर्षे कालावधीकरीता काळया यादीत समावेश करता येईल.

ब) मे.शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी, प्रो.प्रा- श्री सोन्याबापु गंगाधर शेळके यांना पुढील ०३ वर्षे कालावधीसाठी काळया यादीत समाविष्ट केलेनंतर त्यांचेमार्फत लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे कामास असलेल्या १०४ बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचा-यांचे माहे मे २०२० ते ऑक्टोंबर २०२० अखेरचे थकीत (आदा न झालेले) वेतनाबाबत मा. मुख्यलेखाधिकारी यांनी दिलेले अभिप्राय विचारात घेऊन व लाडु व बर्फी प्रसाद बनविणेकामी नव्याने नियुक्त केलेल्या ठेकेदार दि यशोधरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था, नाशिक यांचेशी चर्चा करुन, त्यांचेमार्फत सदरचे वेतन आंदा करणेची कार्यवाही करता येईल.

